अथर्ववेद–
ब्रह्मविद्या प्रकरण

(भाग १)

लेखक

म. म. ब्रह्मर्षि पं. श्रीपाद दामोदर सातवळेकर

विद्या–मार्तण्ड, साहित्य–वाचस्पति, गीतालंकार

पारडी (जि. बलसाड)

■ **प्रकाशक :**
स्वाध्याय मंडळ
पं. सातवळेकरजी मार्ग
पोस्ट - ' स्वाध्याय मंडळ (पारडी) '
पारडी
जि. बलसाड, पिन :- ३९६ १२५ (गुजरात)

■ **मुद्रक :**
संवाद ट्रेडप्रिंटस् प्रा. लि.
१,००५ सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.
(दूरध्वनी : ४८५६३२)

■ **द्वितीय आवृत्ती :**
नारळी पौर्णिमा, श्रावण शके १९२०
(७ ऑगस्ट १९९८)

■ **प्रमुख वितरक**
भारतीय विचार साधना
' मोतीबाग, ' ३०९ शनिवार पेठ,
पुणे - ४११ ०३०.
(दूरध्वनी : ४९० ४५४)

■ **मूल्य :** Rs. 600.

प्रकाशकाचे मनोगत ...

संस्कृत, वेद आणि वैदिक साहित्याचे ज्ञाते, अभ्यासक आणि संशोधक वेदमूर्ती पं.श्रीपाद दा. सातवळेकर यांनी लिहिलेल्या ' अथर्ववेद- ब्रह्मविद्या प्रकरण' या ग्रंथाचे पुनर्प्रकाशन करताना संस्थेला आनंद होत आहे.

पं. सातवळेकर यांनी लिहिलेल्या ' वैदिक राष्ट्रगीता' वर ब्रिटिश सरकारने १९०७ साली प्रतिबंध घातला. वेदांच्या एका छोट्या मंत्रात जर ब्रिटिश राजवटीला हादरवून टाकण्याचे सामर्थ्य असेल तर वेदांचा समग्र अभ्यासच का करू नये, अशा विचाराने त्यांनी वेदांचा प्रचार - प्रसार हेच पुढे आपल्या जीवनाचे ध्येय बनवले.

वेदवाङ्मय व अन्य संस्कृत साहित्याच्या आधारे पंडितजींनी ४०९ ग्रंथ - पुस्तके लिहिली. यातील अनेक ग्रंथ - पुस्तके सध्या उपलब्ध नसल्याने पंडितजींच्या साहित्याचे पुनर्प्रकाशन करण्याचे काम सुरू आहे.

विविध संस्था , व्यक्ती यांनी अर्थसाहाय्य केल्यामुळेच या दुर्मिळ ग्रंथांच्या पुनर्प्रकाशनाचे काम शक्य झाले. प्रस्तुत ग्रंथासाठी गुरुदेव कॉर्पोरेशनचे श्री. शिवजीभाई पटेल, लातूर, वैशाली कन्स्ट्रक्शन्स्‌चे श्री. उत्तमराव पाटील , लातूर , श्री. भानुदास रामप्रसाद किराड,पुणे , श्री. चिंतामणी श्रीपाद चितळे , पुणे यांनी केलेल्या अर्थसहाय्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

वेदांच्या अभ्यासकांसाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरेल असा विश्वास वाटतो.

प्रकाशक

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

ब्रह्मविद्या प्रकरण

भू मि का

अथर्ववेदाचीं २० कांडें आहेत त्यांत १३ ते १८ कांडापर्यंत विषयवार मंत्रसंग्रह आहे. उदा०-

सात कांडें प्रकरणवार

१३	व्या	कांडांत	अध्यात्म	प्रकरण	आहे.
१४	,,	,,	विवाह	,,	,,
१५	,,	,,	व्रात्य	,,	,,
१६	,,	,,	दुःखविमोचन	,,	,,
१७	,,	,,	अभ्युदय	,,	,,
१८	,,	,,	पितृमेध	,,	,,
२०	,,	,,	इंद्रसूक्त	,,	,,

याप्रमाणें हीं ७ कांडें व्यवस्थित प्रकरणबद्ध आहेत, परंतु १२ व्या कांडापर्यंत, तसेंच १२ व्या कांडांत विषयावर सूक्तसंग्रह नाहीं. पहा-

१	प्रथम	कांडांत	४	मंत्रांचीं	सूक्तें	जास्त आहेत.
२	द्वितीय	,,	५	,,	,,	,, ,,
३	तृतीय	,,	६	,,	,,	,, ,,
४	चतुर्थ	,,	७	,,	,,	,, ,,
५	पंचम	,,	११	,,	,,	,, ,
६	षष्ठ	,,	३	,,	,,	,, ,,
७	सप्तम	,,	१--२	,,	,,	,, ,,

याप्रमाणें सूक्तांतील मंत्रसंख्येप्रमाणें हीं कांडें संगृहित केलेलीं आहेत. अर्थात् हीं कांडें विषयानुक्रमानुसार नाहींत. या कांडांतून कोणते विषय आले आहेत, ते पहा-

अथर्ववेद कांडांतील सूक्तें

प्रथम कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	मेधाजननं	४
२	रोगोपशमनं	४
३	मूत्रमोचनं	९
४	अपां भेषजं	४
५	अपां भेषजं	४
६	अपां भेषजं	४
७	यातुधाननाशनं	७
८	यातुधाननाशनं	४
९	विजयाय प्रार्थना	४
१०	पाशविमोचनं	४
११	नारी-सुखप्रसूतिः	६
१२	यक्ष्मनाशनं	४
१३	विद्युत्	४
१४	कुलपा कन्या	४
१५	पुष्टिकर्म	४
१६	शत्रुबाधनं	४
१७	रुधिरस्रावनिवृत्तये धमनीबन्धनं	४
१८	अलक्ष्मीनाशनं	४

सूक्त	नांव	मंत्र
१९	शत्रुनिवारणं	४
२०	शत्रुनिवारणं	४
२१	शत्रुनिवारणं	४
२२	हृद्रोग–कामिलानाशनं	४
२३	श्वेतकुष्ठनाशनं	४
२४	श्वेतकुष्ठनाशनं	४
२५	ज्वर–नाशनं	४
२६	शर्मप्राप्तिः	४
२७	स्वस्त्ययनं	४
२८	रक्षोघ्नं	४
२९	राष्ट्राभिवर्धनं, सपत्नक्षयणं च	४
३०	दीर्घायुःप्राप्तिः	४
३१	पाशमोचनं	४
३२	महद् ब्रह्म	४
३३	आपः	४
३४	मधुविद्या	५
३५	दीर्घायुः प्राप्तिः	४
		१५३

४ मंत्रांची	३० सूक्तें	मंत्र	१२०
५ ,,	१ ,,	,,	५
६ ,,	२ ,,	,,	१२
७ ,,	१ ,,	,,	७
९ ,,	१ ,,	,,	९
	३५ ,,	,,	१५३

प्रथम कांडात ४ मंत्रांची सूक्तें जास्त आहेत.

× × ×

द्वितीय कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	परमं धाम	५
२	भुवनपतिसूक्तं	५
३	आस्रावस्य भेषजं	६
४	दीर्घायुः प्राप्तिः	६
५	इन्द्रस्य वीर्याणि	७
६	सपत्नहा अग्निः	५
७	शापमोचनं	५
८	क्षत्रियरोगनाशनं	५
९	दीर्घायुः प्राप्तिः	५
१०	पाशमोचनं	८
११	श्रेयःप्राप्तिः	५
१२	शत्रुनाशनं	८
१३	दीर्घायुः प्राप्तिः	५
१४	दस्युनाशनं	६
१५	अभयप्राप्तिः	६
१६	सुरक्षा	५
१७	बलप्राप्तिः	७
१८	शत्रुनाशनं	५
१९	शत्रुनाशनं	५
२०	शत्रुनाशनं	५
२१	शत्रुनाशनं	५
२२	शत्रुनाशनं	५
२३	शत्रुनाशनं	५
२४	शत्रुनाशनं	८
२५	पृश्निपर्णी	५
२६	पशुसंवर्धनम्	५
२७	शत्रुपराजयः	७
२८	दीर्घायुः प्राप्तिः	५
२९	दीर्घायुष्यं	७
३०	कामिनीमनोऽभिमुखीकरणं	५
३१	क्रिमिजंभनं	५
३२	क्रिमिनाशनं	६
३३	यक्ष्मविवर्हणं	७
३४	पशवः	५
३५	विश्वकर्मा	५
३६	पतिवेदनं	८
		२०७

५ मंत्रांची	सूक्तें २२	मंत्र	११०
६ ,,	,, ५	,,	३०
७ ,,	,, ५	,,	३५
८ ,,	,, ४	,,	३२
	३६		२०७

द्वितीय कांडात ५ मंत्रांची सूक्तें जास्त आहेत.

× × ×

तृतीय कांड

सूक्त	नाम	मंत्र
१	शत्रुसेनासंमोहनं	६
२	शत्रुसेनासंमोहनं	६
३	स्वराज्ये राज्ञः पुनः स्थापनं	६
४	प्राजाभी राज्ञः संवरणं	७
५	राष्ट्रस्य राजा राजकृतश्च	८
६	शत्रुनाशनं	८
७	यक्ष्मनाशनं	७
८	राष्ट्रधारणं	६
९	दुःस्वप्ननाशनं	६
१०	रायस्पोषप्राप्तिः	१३
११	दीर्घायुः प्राप्तिः	८
१२	शालानिर्माणं	९
१३	आपः	७
१४	गोष्ठः	६
१५	वाणिज्यं	८
१६	स्वस्तये प्रार्थना	७
१७	कृषिः	९
१८	वनस्पतिः	६
१९	अजरं क्षत्रं	८
२०	रयिसंवर्धनं	१०
२१	शान्तिः	१०
२२	वर्चःप्राप्तिः	६
२३	वीर-प्रसूतिः	६
२४	समृद्धि-प्राप्तिः	७
२५	कामस्य इषुः	६
२६	दिक्षु आत्मरक्षा	६
२७	शत्रुनिवारणं	६
२८	पशुपोषणं	६
२९	अविः	८
३०	सांमनस्यं	७
३१	यक्ष्मनाशनं	११
		१३०

६	मंत्रांचीं	सूक्तें	१३	मंत्र ७८
७	,,	,,	६	,, ४२
८	,,	,,	६	,, ४८
९	,,	,,	२	,, १८
१०	मंत्रांचीं	सूक्तें	२	मंत्र २०
११	,,	,,	१	,, ११
१३	,,	,,	१	,, १३
			३१	१३०

तृतीय कांडांत ६ मंत्रांचीं सूक्तें जास्त आहेत.

× × ×

चतुर्थ कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	ब्रह्मविद्या	७
२	आत्मविद्या	८
३	शत्रुनाशनं	७
४	वाजीकरणं	८
५	स्वापनं	७
६	विषघ्नं	८
७	विषनाशनं	७
८	राज्याभिषेकः	७
९	आंजनं	१०
१०	शंखमणिः	७
११	अनड्वान्	१२
१२	रोहिणी वनस्पतिः	७
१३	रोगनिवारणं	७
१४	स्वर्ज्योतिः प्राप्तिः	९
१५	वृष्टिः	१६
१६	सत्यानृतसमीक्षकः	९
१७	अपामार्गः	८
१८	अपामार्गः	८
१९	अपामार्गः	८
२०	पिशाचक्षयणं	७
२१	गावः	९
२२	अमित्रक्षयणं	७
२३	पाप-मोचनं	७
२४	पाप-मोचनं	७
२५	पाप-मोचनं	७
२६	पाप-मोचनं	७
२७	पाप-मोचनं	७
२८	पाप-मोचनं	७
२९	पाप-मोचनं	७
३०	राष्ट्रीदेवी	८

सूक्त	नांव	मंत्र
३१	सेनानिरीक्षणं	७
३२	सेनासंयोजनम्	७
३३	पाप-नाशनं	८
३४	ब्रह्मौदनं	८
३५	मृत्युसंतरणं	७
३६	सत्यौजा अग्निः	१०
३७	कृमिनाशनं	१२
३८	वाजिनीवान् ऋषभः	७
३९	संगतिः	१०
४०	शत्रुनाशनं	८
		३२४

७	मंत्रांचीं	सूक्तें	११	मंत्र	१४७
८	,,	,,	१०	,,	८०
९	,,	,,	३	,,	२७
१०	,,	,,	३	,,	३०
१२	,,	,,	२	,,	२४
१६	,,	,,	१	,,	१६
			४०		३२४

चौथ्या कांडांत ७ मंत्रांचीं सूक्तें जास्त आहेत.

× × ×

पांचवें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	अमृतासुः	९
२	भुवनेषु ज्येष्ठः	९
३	विजयाय प्रार्थना	११
४	कुष्ठतक्मनाशनम्	१०
५	लाक्षा	९
६	ब्रह्मविद्या	१४
७	अरातिनाशनं	१०
८	शत्रुनाशनं	९
९	आत्मा	८
१०	आत्मरक्षा	८
११	संपत्कर्म	११
१२	ऋतस्य यज्ञः	११
१३	सर्पविषनाशनं	११
१४	कृत्यापरिहरणं	१३
१५	रोगोपशमनं	११
१६	वृषरोगशमनं	११
१७	ब्रह्मजाया	१८
१८	ब्रह्मगवी	१५
१९	ब्रह्मगवी	१५
२०	शत्रुसेनात्रासनं	१२
२१	शत्रुसेनात्रासनं	१२
२२	तक्मनाशनं	१४
२३	क्रिमिघ्नं	१३
२४	ब्रह्मकर्म	१७
२५	गर्भाधानं	१३
२६	नवशालायां घृतहोमः	१२
२७	अग्निः	१२
२८	दीर्घायुः	१४
२९	रक्षोघ्नं	१५
३०	दीर्घायुष्यं	१७
३१	कृत्यापरिहरणं	१२
		३७६

८	मंत्रांचीं	सूक्तें	२	मंत्र	१६
९	,,	,,	४	,,	३६
१०	,,	,,	४	,,	४०
११	,,	,,	६	,,	६६
१२	,,	,,	५	,,	६०
१३	,,	,,	३	,,	३९
१४	,,	,,	३	,,	४२
१५	,,	,,	३	,,	४५
१७	,,	,,	२	,,	३४
१८	,,	,,	१	,,	१८
			३१		३७६

पांचव्या कांडांत ११ मंत्रांचीं सूक्तें जास्त आहेत.

× × ×

सहावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	अमृतप्रदाता	३
२	जेता इंद्रः	३
३	आत्मगोपनं	३

सूक्त	नांव	मंत्र	सूक्त	नांव	मंत्र
४	आत्मगोपनं	३	४२	परस्परचित्तैकीकरणं	३
५	वर्चःप्राप्तिः	३	४३	मन्युशमनं	३
६	शत्रुनाशनं	३	४४	रोगनाशनं	३
७	असुरक्षयणं	३	४५	दुःष्वप्ननाशनं	३
८	कामात्मा	३	४६	दुःष्वप्ननाशनं	३
९	कामात्मा	३	४७	दीर्घायुः प्राप्तिः	३
१०	संप्रोक्षणं	३	४८	स्वस्तिवाचनं	३
११	पुंसवनं	३	४९	अग्निस्तवः	३
१२	सर्प-विष-निवारणं	३	५०	अभययाचना	३
१३	मृत्युंजयः	३	५१	एनोनाशनं	३
१४	बलासनाशनं	३	५२	भैषज्यं	३
१५	शत्रुनिवारणं	३	५३	सर्वतो रक्षणं	३
१६	अक्षिरोगभैषजं	४	५४	अमित्रदंभनं	३
१७	गर्भदृंहणं	४	५५	सौमनस्यं	३
१८	इर्ष्याविनाशनं	३	५६	सर्वेभ्यो रक्षणं	३
१९	पावमानं	३	५७	जलचिकित्सा	३
२०	यक्ष्मनाशनं	३	५८	यशःप्राप्तिः	३
२१	केशवर्धिनी औषधिः	३	५९	औषधिः	३
२२	भैषज्यं	३	६०	पतिलाभः	३
२३	अपां भैषज्यं	३	६१	विश्वस्रष्टा	३
२४	अपां भैषज्यं	३	६२	पावमानं	३
२५	मन्याविनाशनं	३	६३	वर्चोबलप्राप्तिः	४
२६	पाप्मनाशनं	३	६४	सांमनस्यं	३
२७	अरिष्टक्षयणं	३	६५	शत्रुनाशनं	३
२८	अरिष्टक्षयणं	३	६६	शत्रुनाशनं	३
२९	अरिष्टक्षयणं	३	६७	शत्रुनाशनं	३
३०	पापशमनं	३	६८	वपनं	३
३१	गौः	३	६९	वर्चःप्राप्तिः	३
३२	यातुधानक्षयणं	३	७०	अघ्न्या	३
३३	इन्द्रस्तवः	३	७१	अन्नं	३
३४	शत्रुनाशनं	५	७२	वाजीकरणं	३
३५	वैश्वानरः	३	७३	सांमनस्यं	३
३६	वैश्वानरः	३	७४	सांमनस्यं	३
३७	शापनाशनं	३	७५	सपत्नक्षयणं	३
३८	वर्चस्यं	४	७६	आयुष्यं	४
३९	वर्चस्यं	३	७७	प्रतिष्ठापनं	३
४०	अभयं	३	७८	दाम्पत्यो रयिप्राप्तये प्रार्थना	३
४१	दीर्घायुः प्राप्तिः	३	७९	ऊर्जःप्राप्ति	३

सूक्त	नांव	मंत्र
८०	अरिष्टक्षयणं	३
८१	गर्भाधानं	३
८२	जायाकामना	३
८३	भैषज्यं	४
८४	निर्ऋतिमोचनं	४
८५	यक्ष्मनाशनं	३
८६	वृषकामना	३
८७	राज्ञः संवरणं	३
८८	ध्रुवो राजा	३
८९	प्रीतिसंजननं	३
९०	इषुनिष्कासनं	३
९१	यक्ष्मनाशनं	३
९२	वाजी	३
९३	स्वस्त्ययनं	३
९४	सांमनस्यं	३
९५	कुष्ठौषधिः	३
९६	चिकित्सा	३
९७	अभिभूर्वीरः	३
९८	अजरं क्षत्रं	३
९९	संग्रामजयः	३
१००	विषदूषणं	३
१०१	वाजीकरणं	३
१०२	अभिसांमनस्यं	३
१०३	शत्रुनाशनं	३
१०४	शत्रुनाशनं	३
१०५	कासशमनं	३
१०६	दूर्वाशाला	३
१०७	विश्वजित्	४
१०८	मेधावर्धनं	५
१०९	पिप्पली-भैषज्यं	३
११०	दीर्घायुः प्राप्तिः	३
१११	उन्मत्ततामोचनं	४
११२	पाशमोचनं	३
११३	पापनाशनं	३
११४	उन्मोचनं	३
११५	पापमोचनं	३
११६	मधुमदनं	३
११७	आनृण्यं	३
११८	आनृण्यं	३
११९	पाशमोचनं	३
१२०	सुकृतस्य लोकः	३
१२१	सुकृतलोकप्राप्तिः	४
१२२	तृतीयो नाकः	५
१२३	सौमनसं	५
१२४	निर्ऋत्यपस्तरणं	३
१२५	वीरस्य रथः	३
१२६	दुन्दुभिः	३
१२७	यक्ष्मनाशनं	३
१२८	राजा	४
१२९	भगप्राप्तिः	३
१३०	स्मरः	४
१३१	स्मरः	३
१३२	स्मरः	५
१३३	मेखलाबन्धनं	५
१३४	शत्रुनाशनं	३
१३५	बलप्राप्तिः	३
१३६	केशदृंहणं	३
१३७	केशवर्धनं	३
१३८	क्लीबत्वं	५
१३९	सौभाग्यवर्धनं	५
१४०	सुमंगलौ दन्तौ	३
१४१	गोकर्णयोर्लक्ष्यकरणं	३
१४२	अन्नसमृद्धिः	३
		४५४

३ मंत्रांचीं	सूक्तें १२२	मंत्र	३६६
४ ,,	,, १२	,,	४८
५ ,,	,, ८	,,	४०
	१४२		४५४

सहाव्या कांडांत ३ मंत्रांचीं सूक्तें अधिक आहेत.

× × ×

कांड ७ वें

सूक्त	नांव	मंत्र
१	आत्मा	२
२	आत्मा	१
३	आत्मा	१

सूक्त	नांव	मंत्र	सूक्त	नांव	मंत्र
४	विश्वप्राणाः	१	४१	सुपर्णः	१
५	आत्मा	५	४२	पापमोचनं	२
६	अदितिः	४	४३	वाक्	१
७	आदित्याः	१	४४	इन्द्राविष्णू	१
८	शत्रुनाशनं	१	४५	ईर्ष्यानिवारणं	२
९	स्वस्तिदा पूषा	४	४६	सिनीवाली	३
१०	सरस्वती	१	४७	कुहूः	२
११	सरस्वती	१	४८	राका	२
१२	राष्ट्रसभा	४	४९	देवपत्न्यः	२
१३	शत्रुनाशनं	२	५०	विजयः	९
१४	सविता	४	५१	परिपाणं	१
१५	सविता	१	५२	सांमनस्यं	२
१६	सविता	१	५३	दीर्घायुः	७
१७	द्रविणार्थं प्रार्थना	४	५४	अध्यापकविघ्नशमनं	२
१८	वृष्टिः	२	५५	मार्गस्वस्त्ययनं	१
१९	प्रजा	१	५६	विषभैषज्यं	८
२०	अनुमतिः	६	५७	सरस्वती	२
२१	एको विभुः	१	५८	अन्नं	२
२२	ज्योतिः	२	५९	शाप-मोचनं	१
२३	दुष्वप्ननाशनं	१	६०	रम्यं गृहं	७
२४	सविता	१	६१	तपः	२
२५	विष्णुः	२	६२	शत्रुनाशनं	१
२६	विष्णुः	८	६३	दुरितनाशनं	१
२७	इडा	१	६४	पापमोचनं	३
२८	स्वस्ति	१	६५	दुरितनाशनं	३
२९	अग्नाविष्णू	२	६३	ब्रह्म	१
३०	अंजनं	१	६७	आत्मा	१
३१	शत्रुनाशनं	१	६८	सरस्वती	३
३२	दीर्घायुः	१	६९	सुखं	१
३३	दीर्घायुः	१	७०	शत्रुदमनं	५
३४	शत्रुनाशनं	१	७१	अग्निः	१
३५	सपत्नीनाशनं	३	७२	इंद्रः	३
३६	अंजनं	१	७३	धर्मः	११
३७	वासः	१	७४	गंडमाला चिकित्सा	४
३८	केवलः पतिः	५	७५	अघ्न्याः	२
३९	आपः	१	७६	गंडमालाचिकित्सा	६
४०	सरस्वान्	२	७७	शत्रुनाशनं	३

१	मंत्रांची	सूक्तें	५६	मंत्र	५६
२	,,	,,	२६	,,	५२
३	,,	,,	१०	,,	३०
४	,,	,,	११	,,	४४
५	,,	,,	३	,,	१५
६	,,	,,	४	,,	२४
७	,,	,,	३	,,	२१
८	,,	,,	३	,,	२४
९	,,	,,	१	,,	९
११	,,	,,	१	,,	११
			११८		२८६

सातव्या कांडांत १–२ मंत्रांची सूक्तें अधिक आहेत.

× × ×

आठवें कांड

× × ×

नववें कांड

सूक्त	नांव	मंत्र
३	शाला	३१
४	ऋषभः	२४
५	पंचौदनो अजः	३८
६	अतिथि-सत्कार	७३
७	गौः	२६
८	यक्ष्मनिवारणं	२२
९	आत्मा	२२
१०	आत्मा	२८
		३१३

× × ×

दहावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	कृत्यादूषणं	३२
२	ब्रह्मप्रकाशनं	३३
३	सपत्नक्षयणो वरणमणिः	२५
४	सर्पविषदूरीकरणं	२६
५	विजयप्राप्तिः	५०
६	मणिबंधनं	३५
७	सर्वाधारवर्णनं	४४
८	ज्येष्ठब्रह्मवर्णनं	४४
९	शतौदना गौः	२७
१०	वशा गौः	३४
		३५०

× × ×

अकरावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	ब्रह्मौदनं	३७
२	रुद्रः	३१
३	ओदनः	५६
४	प्राणः	२६
५	ब्रह्मचर्यं	२६
६	पापमोचनं	२३
७	उच्छिष्ट-ब्रह्म-सूक्तं	२७
८	अध्यात्मं	३४
९	शत्रुनिवारणं	२६
१०	शत्रुनाशनं	२७
		३१३

× × ×

बारावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	भूमिसूक्तं	६३
२	यक्ष्मरोगनाशनं	५५
३	स्वर्गौदनः	६०
४	वशा गौः	५३
५	ब्रह्मगवी	७३
		३०४

× × ×

तेरावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	अध्यात्म-प्रकरणं	६०
२	अध्यात्मं	४६
३	अध्यात्मं	२६
४	अध्यात्मं	५६
		१८८

× × ×

चौदावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	विवाह-प्रकरणं	६४
२	विवाह-प्रकरणं	७५
		१३९

× × ×

पंधरावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	अध्यात्म-प्रकरणं (व्रात्य-प्रकरणं) १८ पर्यायाः	२२०

× × ×

सोळावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१	दुःखमोचनं ९ पर्यायाः	१०३

× × ×

सतरावें कांड

× × ×

अठरावें कांड

× × ×

एकोणिसावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
६०	अंगानि	१
६१	पूर्णायुः	१
६२	सर्वप्रियत्वं	१
६३	आयुर्वर्धनं	१
६४	दीर्घायुत्वं	४
६५	अवनं	१
६६	असुरक्षयणं	१
६७	दीर्घायुत्वं	४
६८	वेदोक्तं कर्म	१
६९	आपः	४
७०	पूर्णायुः	१
७१	वेदमाता	१
७२	परमात्मा	१
		४५३

× × ×

विसावें कांड

सूक्त	नांव	मंत्र
१-१४३	इंद्रसूक्तानि	९५८
	कुल मंत्र	५९७७

या सात कांडांत सात प्रकरणें आहेत. पहिल्या १२ कांडांत आणि १९ व्या कांडांत प्रकरणच नाहीं. त्यांतील सूक्तें प्रकरणवार एकत्रित केलीं तर अध्ययनास फार सोपें जाईल. अतएव हा विचार सर्वांनीं करावा.

पहिल्या स्थानीं क्षात्र प्रकरण चिकित्सा प्रकरण दिलीं आहेत. या सूक्तांचा एकदुसऱ्याशीं संबंध पाहून सर्व सूक्तें एकत्रित केलीं तर अध्ययनास किती सरळ होईल. आजच्या व्यवस्थेंत सूक्तें विषयवार लावलेलीं नाहींत. तीं सर्व विषयवार लावण्यानें अध्ययन करणारास अर्थाचें अनुसंधान सहज ध्यानीं येईल.

विषयवार संग्रह

ब्रह्मज्ञान, ईश्वर, राज्यशासन, मातृभूमि, चिकित्सा, युद्ध, शत्रुपराजय असे ४०।५० विषय त्या त्या विषयांच्या सूक्तक्रमानें लावण्यांत आले तर वेदांची दुर्बोधता आपोआप दूर होईल आणि संस्कृताभिज्ञ वाचकांस वेदाचा नित्यपाठ करण्यांस आणि त्यापासून लाभ प्राप्त करण्यास सुलभ होईल.

देवतावार मंत्रांचीं प्रकरणें

ऋग्वेदातील आजची व्यवस्था ऋषींच्या क्रमाप्रमाणें आहे. फक्त नवम मंडळ 'सोम देवतेचें' आहे, त्यामुळें तें तयार केलेलें दैवतसंहिताच आहे. अग्नि, इंद्र, मरुत्, सोम, अश्विनौ, औषधि वगैरे देवतांचें मंत्र एकत्रित करण्यांत आले आणि चारी वेदांचे मंत्र देवतानुक्रमें ठेवण्यांत आले तर प्रत्येक देवतेचे मंत्र एकाचवेळीं अध्ययनाला मिळूं शकतील आणि प्रकरणवार मंत्र असल्यानें अर्थज्ञान होण्यास सोपें जाईल.

हल्लींच्या संहिता आहेत त्या तशाच रहातील, त्यांत खास कांहीं फरक करावयाचा नाहीं. परंतु दैवतसंहिता तयार करून विषयवार मंत्र एवढ्यासाठीं एकत्रित करावयाचे (केले आहेत) कीं वाचकांस एकाच विषयाचें ज्ञान सहज मिळावें. जसें—

इन्द्र-सूक्तद्वारां युद्धव्यवस्थेचें ज्ञान
मरुत्-सूक्तद्वारां सैन्यव्यवस्थेचें ज्ञान
अश्विनौ-सूक्तद्वारां आरोग्यव्यवस्थेचें ज्ञान

याप्रमाणें निरनिराळ्या देवतांच्या सूक्तांवरून निरनिराळ्या विषयांचें ज्ञान होणें सोपें होईल. आज सर्व मंत्र एकत्रित नसल्यानें कित्येकांस सुसंगत अर्थ लागत नाहीं. म्हणून आतां विषयवार आणि देवताप्रमाणें मंत्रसंग्रह एकत्रित करण्याची खास आवश्यकता आहे

अध्ययनास सरळ पडावें म्हणून दैवतसंहिता छापण्यांत आली आहे. त्यांत वैदिकसंहितेंतील सर्व मंत्र प्रकरणअनुसार आहेत एकहि मंत्र गाळलेला नाहीं. तो 'वेद' ग्रंथ ८०० ते ९०० पानांचा निरंतर जवळ बाळगण्या सारखा सोईस्कर आहे. फार मोठा हि आकार नाहीं आणि मूल्यहि साधारणच आहे.

वेदधर्म मानणाऱ्या सर्वांनींच या गोष्टीचा अवश्यमेव विचार करावा आणि अर्थानुसार अध्ययनाची आजची अडचण दूर करण्यास जी व्यवस्था आम्हीं अंगिकारली आहे त्यास संमति द्यावी; व स्वतःचें शक्य तें सहाय्य आम्हांस द्यावें.

या अथर्ववेदाच्या सूक्तांचीं नांवें पहातां हें सहज ध्यानीं येईल कीं प्रथम १२ कांडें आणि १९ वें कांडातील सूक्तसंग्रह विषयवार लावलेला नाहीं. काण्ड १३ ते १८ आणि २० काण्ड अशीं ७ प्रकरणवार आहेत, त्याप्रमाणें जर बाकीचीं कांडेंहि विषयानुसार बदलून नवी व्यवस्था लावण्यांत आली तर विषय समजण्यास किती सोपें पडेल याचा वाचकांनींच विचार करावा.

या 'ब्रह्मज्ञान' प्रकरणांत एकूक १०६ सूक्तें ब्रह्मज्ञानाशीं संबंधित असल्यानें एकात्रित करण्यांत आली आहेत. वाचक जर त्याचा विचार करतील तर ब्रह्माविषयीं अथर्ववेदमंत्रांचें काय म्हणणें

आहे तें त्यास यथास्थित कळूं शकेल. येथें कांडवार जीं सूक्तें घेतलीं आहेत तीं अशी—

१ प्रथम	कांड सूक्त	१३,२०,३२	– ३ सूक्तें
२ द्वितीय	,, ,,	१,२,११,१६,३४	– ५ ,,
३ तृतीय	,, ,,	१६	– १ ,,
४ चतुर्थ	,, ,,	१,२,११,१४,१६, २०	– ६ ,,
५ पंचम	,, ,,	१,२,६,९,१०,११	– ६ ,,
६ षष्ठ	,, ,,	१,२,३३,३४, ३५,३६,६१, ८०,१११,११३	– १० ,,
७ सप्तम	,, ,,	१,२,३,४,५,९, १४,१५,१७,२१, २२,२४,२५,२६, ४०,४१,४४,६३, ६६,६७,७१,८३, ८७,१०२,१०५, १०६	– २६ ,,
८ अष्टम	,, ,,	९	– १ ,,
९ नवम	,, ,,	९,१०	– २ ,,
१० दशम	,, ,,	२,७,८	– ३ ,,
११ एकादश	,, ,,	७	– १ ,,
१२ द्वादश	,, ,,	०	– ० ,,
१३ त्रयोदश	,, ,,	१-९	– ९ ,,
१४ चतुर्दश	,, ,,	०	– ० ,,
१५ पंचदश	,, ,,	१-१८	– १८ ,,
१६ षोडष	,, ,,	१-९	– ९ ,,
१७ सप्तदश	,, ,,	०	– ० ,,
१८ अष्टादश	,, ,,	०	– ० ,,
१९ एकोनविंश	,, ,,	३,५,६,४३ ५१, ७१	– ६ ,,
२० विंश	,, ,,	०	– ० ,,
		कुल	१०६

याप्रमाणें ब्रह्मज्ञानांशी संबंधित सूक्तें या ग्रंथांत संग्रहीत करण्यांत आलीं आहेत. आतां या सूक्तान्वयें ब्रह्माचे कोण कोणते गुण वर्णिले आहेत तें पाहूं.

कमलांत ब्रह्म

पुण्डरिकं नवद्वारं त्रिभिर्गुणेभिरावृतम् ।
तस्मिन् यद् यक्षं आत्मन्वत् तद्वै ब्रह्मविदो विदुः
(१०।८।४३)

नवद्वाराचें कमळ, तीन गुणांनीं वेष्टित आहे. त्यांत आत्मावान् यक्ष रहातो. त्यास ब्रह्मज्ञानी जाणतो.

हें हृदयकमल आहे. त्यांत आत्मा हाच यक्ष रहातो. मनुष्यांनीं जाणण्याचा विषय तोच आहे. त्यास यथावत् जाणण्यानें मनुष्याचें जीवन कृतकृत्य होतें. त्यास न जाणलें तर मनुष्यजन्म निरर्थक होय. म्हणून ब्रह्मज्ञानाचे विषय उत्तम रीतीनें जाणण्याचा मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे. म्हणूनच ब्रह्मज्ञानांशीं संबंधीत सूक्तें येथें एकत्रित करण्यांत आलीं आहेत.

१. **त्वं विश्वेषां जनिता यथासः** (४।१।७)- तूं सर्वांचा उत्पन्नकर्ता आहेस.

२. **त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत कुमारी त्वं जीर्णो दण्डेन वञ्चसि त्वं जातो भवसि विश्वतोमुखः** (१०।८।२७)- तूं स्त्री, पुरुष, कुमार, कुमारी, वृद्ध इत्यादि होऊन काठीच्या आधारानें चालतोस परंतु तुझें मुख सर्व दिशांस आहेच.

३. **एतैषां पिता, उत वा पुत्र एषां, एतैषां ज्येष्ठ उत वा कनिष्ठः** ((१०।८।२८)- तूं त्याचा पिता आणि त्याचा पुत्र, त्याच्याहून कनिष्ठ आणि श्रेष्ठ पण आहेस.

४. **एको ह देवो मनसि प्रविष्टः प्रथमो जातः स उ गर्भे अन्तः**- देवानें मनांत प्रवेश केला आहे. तो प्रथम जन्मला त्यानंतर तो गर्भांत पण येऊन राहिला होता.

५. **एषा पुराणी परि सर्वं बभूव** (१०।८।३०)- ती जुनी असून ती सर्वरूपें धारण करणारी झाली आहे.

६. **अन्ति सन्तं न जहाति, अन्ति सन्तं न पश्यति** (१०।८।३२)- जवळ असून ती सोडीत नाहीं, जवळ असून ती पहात नाहीं.

७. **देवस्य पश्य काव्यं न ममार न जीर्यति**-देवाचें काव्य पहा, जीर्णहि होत नाहीं आणि मरतहि नाहीं.

८. **यो विद्यात् सूत्रं विततं यस्मिन्नोताः प्रजा इमाः, सूत्रं सूत्रस्य यो विद्यात् स विद्याद्ब्राह्मणं महत्** (१०।८।३७)- जो पसरलेल्या सूत्रास जाणतो, ज्यांत सर्व प्रजा गुंतलेली आहे, सूत्राचें सूत्रास जो जाणतो तो महान् ब्रह्मास जाणतो.

९. स्तुहि देवं सवितारं (८।१।११)- सर्वांच्या उत्पादक देवाची स्तुति कर (सविता-स्वतःतून सर्व देवांस प्रगट करणारा देव.)

१०. अहं अजानं पृथिवीमुत द्यां अहं ऋतूंरजनयं सप्त सिन्धून् (६।६१।३)- मी पृथ्वी आणि द्युलोक निर्माण केले. मी ऋतु उत्पन्न केले आणि सप्तसागर पण मीच निर्माण केले.

सर्वव्यापक आणि सर्वाधार

११. स बुध्न्यादाष्ट् जनुषोऽभ्यग्रं (४।१।५)- तो प्रगट होण्याबरोबरच सर्वत्र पसरतो.

१२. यो भूतं च भव्यं च सर्वं यश्चाधितिष्ठति। (१०।८।१)- जो भूत, भविष्य आणि सर्वांचा अधिष्ठाता आहे.

१३. स्कम्भेनेमे विष्टभिते द्यौश्च भूमिश्च तिष्ठतः (१०।८।२)- सर्वाधार परमेश्वराने आधार देऊन हा द्युलोक आणि ही भूमि टिकवून धरली आहे.

१४. स्कम्भ इदं सर्वमात्मन्वत् यत् प्राणन्निमिषच्च यत्- सर्वाधार ईश्वराच्या आधारावरच सर्व आत्मा असणारे, प्राण असणारे आणि डोळ्यांची उघडझांप करणारे राहिले आहेत.

१५. आविः सन्निहितं गुहा जरन्नाम महत्पदम्, तत्रेदं सर्वमार्पितमेजत्प्राणत् प्रतिष्ठितम् (१०।८।६)- जवळ हृदयरूपी गुहेत तो महान् यक्ष आहे, ज्यांत हालचाल करणारे प्राण असणारे ते सर्व आधारित आहेत.

१६. तद्दाधार पृथिवीं विश्वरूपं, तत्संभूय भवत्येकमेव (१०।८।११)- तो विश्वरूप पृथ्वीस धारण करतो, तो सर्व मिळून एकच झाला आहे.

१७. अनन्तं विततं पुरुत्रा (१०।८।१२)- अनन्त चारीबाजूस पसरलें आहे.

१८. अनन्तं अन्तवच्चा समन्ते- अनन्त आणि अन्त असणारा दोघेहि एक-दुसऱ्यांत मिसळलेले आहेत.

१९. ते नाकपालश्चरति विचिन्वन्, विद्वान् भूतमुत भव्यमस्य- भूत आणि भव्य जाणणारा तो स्वर्गपालक विवेकानें चालतो (वर्तते).

२०. ततः परिष्वजीयसी देवता सा मम प्रिया (१०।८।२५)- जी सर्वांस आलिंगन देणारी देवता आहे ती मला प्रिय आहे.

२१. इयं कल्याणी अजरा मर्त्यस्य अमृता गृहे (१०।२८।२६)- ही कल्याण करणारी देवता मृत्युच्या (मानवाचा) घरीं अमर आहे.

२२. न तत्पृथिव्यां नो दिवि येन प्राणन्ति वीरुधः (१।३२।१)- ज्याचे योगें वनस्पति वगैरे जीवित रहातात तो फक्त पृथ्वी अथवा द्युलोकांत नाहीं तर सर्वत्र आहे.

२३. तमु ष्टुहि यो अन्तः सिन्धौ सूनुः (६-१-२)- संसार समुद्रांत जो सत्याची प्रेरणा करणार आहे त्याची स्तुति कर.

२४. युवानं अद्रोघवाचं सुशेवं (स्तुहि)- जी सप्ततरुण, द्रोहरहित वाणीनें युक्त आणि सेवा करणारी आहे तिची स्तुति कर.

२५. अनड्वान् दाधार पृथिवीं उत द्यां (४।११।१)- संचलकानें पृथ्वी आणि द्युला धारण केलें आहे.

२६. अनड्वान् दाधार उर्वन्तरिक्षम्- विश्व शकटाच्या संचाकानें हें महान् अन्तरिक्ष धारण केलें आहे.

२७. अनड्वान् दाधार प्रदिशः षडुर्वीः, अनड्वान् विश्वं भुवन मा विवेश- त्या संचालकानें विस्तृत सहा दिशांस पसरलेल्या विश्वास धारण केलें आणि तो त्यांतच प्रवेशून राहिला आहे.

२८. इन्द्रो जातो मनुष्येष्वन्तः (४।११।३)- प्रभु मनुष्यांत रहातो.

२९. अनड्वान् दुहे सुकृतस्य लोक (४।११।४)- हा विश्व शकट चालविणार पुण्यलोकांत दोहून करून देतो.

३०. यो विश्वजित्, विश्वभृत्, विश्वकर्मा (४।१।५)- जो विश्वास जिंकणारा, विश्वाचें भरणपोषण करणारा आणि सर्व कर्मांचा कर्ता आहे.

३१. येन देवाः स्वरारुरुहुः (४।११।६)- ज्याच्या आधारानें देवांनीं स्वर्ग प्राप्त केला.

३२. तेन गेष्म सुकृतस्य लोकं घर्मस्य व्रतेन तपसा यशस्यवः- त्यामुळें आम्हीं पुण्यलोकांत जाऊं, यज्ञाच्या व्रतानें आणि तपानें यशस्वी होऊ.

३३. इन्द्रो रूपेण अग्निः वहेन प्रजापतिः परमेष्ठी विराट् (४।११।७)- ईंद्र स्वरूपानें अग्नि प्रजापति, परमेष्ठी आणि विराट् आहे.

३४. यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा (७।२६।३)- ज्याच्या तीन विक्रमांत (पराक्रमांत) सर्व भुवनें राहिलीं आहेत.

३५. उरु क्षयाय नस्कृधि- आमच्यासाठीं निवासासाठीं स्थान कर.

३६. तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः

दिवीव चक्षुराततम् (७।२६।७)- आकाशांत सूर्य दिसतो त्याप्रमाणें विष्णूच्या परम स्थानास ज्ञानी पहातो.

३७. यो अग्नौ रुद्रो यो अप्स्वन्तर्य ओषधीर्वीरुध आविवेश (७.८७।१)- जो अग्नींत, जलांत आणि जो औषधी वनस्पतीमध्यें रुद्र देव आहे. (म्हणजे सर्व व्यापक आहे.)

३८. य इमा विश्वा भुवनानि चाक्लृपे तस्मै रुद्राय नमो अस्त्वग्नये- जो या सर्व भुवनांची रचना करतो त्या तेजस्वी रुद्राला नमस्कार असो.

३९. त्रिपात् ब्रह्म पुरुरूपं वि तष्ठे तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्रः (९।१०।१९)- त्रिपाद् ब्रह्म अनेक रूपानें राहिलें आहे त्याचे मुळ चारी दिशा जीवन्त राहिल्या आहेत.

४०. तस्य भूतं भव्यं वशे (९।१०।२४)- त्याच्या अधिकारांत भूत भविष्य आहे.

४१. एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति-(९।१०।२८)- ज्यास ज्ञानी अनेक नांवानीं जाणतात तें वस्तुतः एकच सत् आहे.

४२. यस्मिन्भूमिरन्तरिक्षं द्यौर्यस्मिन्नध्याहिता, यत्राग्निश्चन्द्रमाः सूर्यो वातस्तिष्ठन्त्यार्पिताः स्कंभं तं ब्रूहि- (१०।७।१२) भूमि, अन्तरिक्ष आणि द्यु तसेंच अग्नि, चंद्र, सूर्य आणि वायु ज्यांत रहातात तो सर्वाधार आहे.

४३ यस्य त्रयस्त्रिंशद्देवाः अंगे सर्वे समाहिताः स्कंभं तं ब्रूहि- (१०।७।१३) सर्व तेहतीस देव ज्याच्या शरीरांत राहिले आहेत तो सर्वाधार देव आहे.

४४. ये पुरुषे ब्रह्म विदुः ते विदुः परमेष्ठिनम् (१०।७।१७)- जो मानव शरीरांतील ब्रह्म जाणतो तोच परमेष्ठीस जाणतो.

४५. यस्य भूमिः प्रमान्तरिक्षमुतोदरं दिवं यश्चक्रे मूर्धानं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः (१०।७।३२)- भूमि ज्याचे पाय, अन्तरिक्ष ज्याचे पोट, द्युलोक ज्याचें मस्तक अश्या श्रेष्ठ ब्रह्मास नमस्कार असो.

४६. पूषेमा आशा अनु वेद सर्वाः सो अस्माँ अभयतमेन नेषत् (७।९।१)- पूषा या सर्व दिशा जाणतो तो आम्हांस निर्भय मार्गानें घेऊन जातो.

४७. स्वस्तिदा आघृणिः सर्ववीरोऽप्रयुच्छन् पुर एतु प्रजानन् (७।९।१)- तो कल्याण करणारा, तेजस्वी, सर्व प्रकारें वीर, सर्व जाणणारा, प्रमाद न करतां आमचा नेता होवो.

४८. विश्वंभर विश्वेन मा भरसा पाहि (२।१६।५)- विश्वाचें भरण पोषण करणाऱ्या हे देवा! संपूर्ण पोषण शक्तीनें माझें रक्षण कर.

४९. य आत्मदा बलदा यस्य विश्व उपासते प्रशिषं यस्य देवाः- (४।२।१) जो आत्मशक्ति आणि बल देतो आणि सर्व देव ज्याच्या आज्ञेचें पालन करतात

५०. योऽस्येशे द्विपदो यश्चतुष्पदः- जो द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांचा स्वामी आहे.

५१. यः प्राणतः निमिषतः महित्वैको राजा जगतो बभूव- (४।२।२) जो प्राण धारण करणारे, निमेष (डोळ्यांची उघडझांप करणारा) सर्व जगाचा तो स्वतःच्या महत्त्वानें एकमेव राजा झाला.

५२. यस्यच्छायामृतं यस्य मृत्युः- ज्याच्या छायेंत रहाण्यानें अमरत्व प्राप्त होतें आणि त्या छायेपासून दूर रहाण्यानें मृत्यु येतो.

५३. स दाधार पृथिवीमुत द्यां- (४।२।७) त्यानें पृथ्वी आणि द्युलोकांस धारण केलें आहे.

५४. ब्रह्मणा भूमिर्विहिता ब्रह्म द्यौरुत्तरा हिता ब्रह्मेदमूर्ध्वं तिर्यक्चान्तरिक्षं व्यचो हितं-(१०।२।२५) भूमि, द्यु आणि खालीं वर पसरलेल्या अन्तरिक्षाला ब्रह्मानें उत्तम रीतीनें टिकविलें आहे.

५५. रोहितो द्यावा पृथिवी जजान तत्र तन्तुं परमेष्ठी ततान- (१३।१।६) रोहितानें द्यु आणि पृथ्वी उत्पन्न केली आणि परमेष्ठीनें त्यांत एक सूत्र पसरविलें.

५६. य इमे द्यावापृथिवी जजान यो द्रापिं कृत्वा भुवनानि वस्ते-(१३।३।१) ज्यानें हीं द्यु आणि पृथ्वी केलीं आणि भुवनांचें वस्त्र करून तें धारण करतो.

५७. यो मारयति प्राणयति यस्मात् प्राणन्ति भुवनानि विश्वा- (१३।३।३) जो मारतो आणि जीवंत करतो, ज्यामुळें सर्व भुवनें जीवंत रहातात.

५८. भूतो भविष्यत भुवनस्य यस्पतिः- (१३।३।७) जो भूत आणि भविष्य भुवनाचा पति आहे.

५९. तमिदं निगतं सहः स एष एक एकवृदेक एव एते अस्मिन् देवा एकवृतो भवन्ति- (१३।४ १२।१३) तें एकत्रित झालेलें सामर्थ्य तें एकच आहे. एकटाच तो आहे. सर्व देव त्याच्यांत एकरूप होतात.

६०. सोऽवर्धत् स महानभवत्, स महादेवोऽभवत् (१५।१।४)- तो वाढला, महान् झाला, तो महादेव झाला.

सर्वाधार ईश्वराचें वर्णन करणारीं हीं **वचनें वाचल्यानें ईश्वराचा सर्वांस** आधाररूप होण्याचा गुण **स्पष्टपणें कळून येतो.**

प्रजापतिश्चरति गर्भे अन्तरदृश्यमानो बहुधा वि जायते ।
अर्धेन विश्वं भुवनं जजान यदस्यार्धं कतमः स केतुः ॥ १३ ॥
ऊर्ध्वं भरन्तमुदकं कुम्भेनेवोदहार्यम् ।
पश्यन्ति सर्वे चक्षुषा न सर्वे मनसा विदुः ॥ १४ ॥
दूरं पूर्णेन वसति दूर ऊनेन हीयते ।
महद्यक्षं भुवनस्य मध्ये तस्मै बलिं राष्ट्रभृतो भरन्ति ॥ १५ ॥
यतः सूर्य उदेत्यस्तं यत्र च गच्छति ।
तदेव मन्येऽहं ज्येष्ठं तदु नात्येति किं चन ॥ १६ ॥
ये अर्वाङ्मध्य उत वा पुराणं वेदं विद्वांसमभितो वदन्ति ।
आदित्यमेव ते परि वदन्ति सर्वे अग्निं द्वितीयं त्रिवृतं च हंसम् ॥ १७ ॥
सहस्राह्ण्यं वियतावस्य पक्षौ हरेर्हंसस्य पततः स्वर्गम् ।
स देवान्त्सर्वानुरस्युपदद्य संपश्यन् याति भुवनानि विश्वा ॥ १८ ॥
सत्येनोर्ध्वस्तपति ब्रह्मणार्वाङ् वि पश्यति ।
प्राणेन तिर्यङ् प्राणति यस्मिन् ज्येष्ठमधि श्रितम् ॥ १९ ॥

अर्थ— (प्रजापतिः अदृश्यमानः गर्भे अन्तः चरति) प्रजापति अदृश्य राहून गर्भांत संचार करतो, आणि (बहुधा विजायते) तो अनेक प्रकारें उत्पन्न होतो. (अर्धेन विश्वं भुवनं जजान) अर्ध्या भागानें सर्व भुवनांना उत्पन्न करतो, (यत् अस्य अर्धं सः कतमः केतुः) जें त्याचें दुसरें अर्धं आहे त्याची खूण काय आहे ? (१३)

(कुम्भेन उदकं ऊर्ध्वं भरन्तं उदहार्यं इव) घागरीनें पाणी भरून वर आणणारा असतो त्याप्रमाणें, (सर्वे चक्षुषा पश्यन्ति) सगळे डोळ्यांनीं पहातात, (सर्वे मनसा न विदुः) परंतु सगळे मनानें जाणत नाहींत. (१४)

(पूर्णेन दूरं वसति) पूर्ण असतांनाही तें दूर राहातें, (ऊनेन दूरे हीयते) तें न्यून असतांनाही दूर राहतें. (भुवनस्य मध्ये महत् यक्षं) विश्वामध्यें महान् पूज्य देव आहे, (तस्मै राष्ट्रभृतः बलिं भरन्ति) त्याच्यासाठीं राष्ट्रसेवक स्वतःचें बलिदान करतात. (१५)

(यतः सूर्यः उदेति) जेथून सूर्य उगवतो आणि (यत्र च अस्तं गच्छति) जेथें अस्तास जातो, (तत् एव अहं ज्येष्ठं मन्ये) तेंच श्रेष्ठ आहे, असें मी मानतों, (तत् उ किंचन न अत्येति) त्याची अवज्ञा –अतिक्रमण– कोणी करीत नाहींत. (१६)

(ये अर्वाङ् मध्ये उत वा पुराणं) जे आलीकडे, मधल्या काळांत अथवा अतिप्राचीन काळांत (वेदं विद्वांसं अभितः वदन्ति) वेदवेत्त्यांची चारी बाजूंनीं प्रशंसा करतात, (ते सर्वे आदित्यं एव परि वदन्ति) ते सर्व आदित्याचीच प्रशंसा करतात, (द्वितीयं अग्निं) दुसऱ्या अग्निची आणि (त्रिवृतं हंसं) त्रिवृत्त हंसाचीहि प्रशंसा करतात. (१७)

(अस्य हंसस्य) या हंसाचे (स्वर्गं पततः) स्वर्गांत जातां जातां (पक्षौ सहस्राह्ण्यं वियतौ) दोन्ही पंख हजारों दिवसपर्यंत पसरलेले राहतात. (सः सर्वान् देवान् उरसि उपदद्य) तो सर्व देवांना आपल्या छातीवर घेऊन (विश्वा भुवनानि संपश्यन् याति) सर्व भुवनांना पहात पहात जातो, (१८)

(सत्येन ऊर्ध्वः तपति) सत्याने तो वर तापत असतो, (ब्रह्मणा अर्वाङ् विपश्यति) ज्ञानानें तो खालीं पहातो, (प्राणेन तिर्यङ् प्राणति) प्राणानें तो तिरकस प्राण धारण करतो; (यस्मिन् ज्येष्ठं अधिश्रितं) ज्यांत श्रेष्ठ ब्रह्म राहतें. (१९)

यो वै ते विद्यादरणी याभ्यां निर्मथ्यते वसु ।
स विद्वान् ज्येष्ठं मन्येत स विद्यात् ब्राह्मणं महत् ॥ २० ॥
अपादग्रे समभवत् सो अग्रे स्व१राभरत् ।
चतुष्पाद् भूत्वा भोग्यः सर्वमादत्त भोजनम् ॥ २१ ॥
भोग्यो भवदथो अन्नमदद्बहु ।
यो देवमुत्तरावन्तमुपासातै सनातनम् ॥ २२ ॥
सनातनमेनमाहुरुताद्य स्यात्पुनर्णवः ।
अहोरात्रे प्र जायेते अन्यो अन्यस्य रूपयोः ॥ २३ ॥
शतं सहस्रमयुतं न्यर्बुदमसंख्येयं स्वमस्मिन्निविष्टम् ।
तदस्य घ्नन्त्यभिपश्यत एव तस्माद् देवो रोचत एष एतत् ॥ २४ ॥
बालादेकमणीयस्कमुतैकं नेव दृश्यते ।
ततः परिष्वजीयसी देवता सा मम प्रिया ॥ २५ ॥
इयं कल्याण्य१जरा मर्त्यस्यामृता गृहे ।
यस्मै कृता शये स यश्चकार जजार सः ॥ २६ ॥

अर्थ— (यः वै ते अरणी विद्यात्) जो त्या दोन अरणींना जाणतो (याभ्यां वसु निर्मथ्यते) ज्यांपासून वसु निर्माण केला जातो (सः विद्वान् ज्येष्ठं मन्यते) तो ज्ञानी श्रेष्ठ ब्रह्माला जाणतो आणि (सः महत् ब्राह्मणं विद्यात्) तो महान् ब्रह्मालाहि जाणतो, (२०)

(अग्रे अपात् सं अभवत्) प्रारंभीं पादरहित आत्मा एकच होता. (सः अग्रे स्वः आभरत) प्रारंभीं तो स्वात्मानंदांतच निमग्न राहिलेला होता. तोच (चतुष्पाद् भोग्यः भूत्वा) चार पायांचा भोग्य होऊन, (सर्वं भोजनं आदत्त) सर्व भोजनाला प्राप्त करता झाला. (२१)

(भोग्यः अभवत्) तो भोग्य होऊन (अथो बहु अन्नं अदत्) नंतर पुष्कळ अन्न खाऊं लागला, (यः सनातनं उत्तरावंतं देवं उपासातै) जो सनातन आणि ज्येष्ठ देवाची उपासना करतो (२२)

(एनं सनातनं आहुः) याला सनातन म्हणतात (उत अद्य पुनः नवः स्यात्) आणि तो आजहि पुन्हां नवा होतो. याच्यायोगें (अन्यः अन्यस्य रूपयोः) परस्परांच्या भिन्न रूपाच्या (अहोरात्रे प्रजायेते) दिवस रात्री होतात. (२३)

(शतं, सहस्रं, अयुतं) शंभर, हजार, दहाहजार, (न्यर्बुदं असंख्येयं स्वं अस्मिन् निविष्टम्) लक्ष अथवा असंख्य स्वत्वें यांत समाविष्ट आहेत, (अस्य अभिपश्यतः एव) याला पहातां क्षणींच (तत् घ्नन्ति) तीं स्वत्वें आघात करतात, (तस्मात् एषः देवः एतत् रोचते) त्यामुळें हा देव त्यांना प्रकाशित करतो, (२४)

(एकं बालात् अणीयस्कं) एक केसाहूनही जें अति सूक्ष्म आहे (उत एकं नैव दृश्यत) आणि दुसरें आहे असें दिसतहि नाहीं. (ततः परिष्वजीयसी देवता) त्यामुळें जी दोघांनाही आलिंगन देणारी देवता आहे (सा मम प्रिया) ती मला प्रिय आहे. (२५)

(इयं कल्याणी अजरा) ही कल्याण करणारी अक्षय आहे. (मर्त्यस्य गृहे अमृता) ती मरणाऱ्याच्या घरांत अमरासमान आहे. (यस्मै कृता सः शये) ज्यासाठीं ती केली आहे तो निद्राधीन होतो आणि (यः चकार सः जजार) जो कर्म करतो तोच वृद्ध होतो. (२६)

त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी ।
त्वं जीर्णो दण्डेन वञ्चसि त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ॥ २७ ॥
उतैषां पितोत वा पुत्र एषामुतैषां ज्येष्ठ उत वा कनिष्ठः ।
एको ह देवो मनसि प्रविष्टः प्रथमो जातः स उ गर्भे अन्तः ॥ २८ ॥
पूर्णात्पूर्णमुदचति पूर्णं पूर्णेन सिच्यते ।
उतो तदद्य विद्याम यतस्तत्परिषिच्यते ॥ २९ ॥
एषा सनत्नी सनमेव जातैषा पुराणी परि सर्वं बभूव ।
मही देव्युषसो विभाती सैकेनैकेन मिषता वि चष्टे ॥ ३० ॥
अविर्वै नाम देवतर्तेनास्ते परीवृता ।
तस्या रूपेणेमे वृक्षा हरिता हरितस्रजः ॥ ३१ ॥
अन्ति सन्तं न जहात्यन्ति सन्तं न पश्यति ।
देवस्य पश्य काव्यं न ममार न जीर्यति ॥ ३२ ॥
अपूर्वेणेषिता वाचस्ता वदन्ति यथायथम् ।
वदन्तीर्यत्र गच्छन्ति तदाहुर्ब्राह्मणं महत् ॥ ३३ ॥

अर्थ- (त्वं स्त्री त्वं पुमान् असि) तूं स्त्री आहेस आणि तूंच पुरुष आहेस. (त्वं कुमारः उत वा कुमारी) तूं कुमार आहेस आणि कुमारीहि आहेस. (त्वं जीर्णः दण्डेन वंचसि) तूं वृद्ध झाल्यावर काठीच्या आधारानें चालतोस. (त्वं जातः विश्वतो-मुखः भवसि) तूं प्रगट होऊन चोहोंकडे मुख असलेला होतोस. (२७)

(उत एषां पिता) यांचा पिता (उत वा एषां पुत्रः) आणि यांचा पुत्र (एषां ज्येष्ठः उत वा कनिष्ठः) यांत ज्येष्ठ वा कनिष्ठ हे सगळे (एकः ह देवः मनसि प्रविष्टः) एकच देव मनांत प्रवेश करून (प्रथमः जातः स उ गर्भे अन्तः) प्रथम जो निर्माण झाला होता, तोच परत गर्भात प्रवेश करतो. (२८)

(पूर्णात् पूर्णं उदचति) पूर्णातून पूर्ण उत्पन्न होतें, (पूर्णं पूर्णेन सिच्यते) पूर्णच पूर्णानें सिंचित होतें. (उतो अद्य तत् विद्याम) आतां आज तें आम्ही जाणावें कीं (यतः तत् परिषिच्यते) जेथून तें सिंचित होतें. (२९)

(एषा सनत्नी) ही सनातन शक्ति आहे (सनं एव जाता) सनातन काळापासून विद्यमान आहे, तीच (पुराणी सर्वं परि बभूव) फार प्राचीन शक्ति सर्व होऊन राहते. (मही देवी उषसः विभाति) हीच महान् शक्ति देवी उषःकालांना प्रकाशित करते. (सा एकेन एकेन मिषता वि चष्टे) ती एकेकट्या प्राण्यांच्या बरोबर दिसते. (३०)

(अविः वै नाम देवता) रक्षण करणारी या नांवाची एक देवता आहे; तीच (ऋतेन परिवृता अस्ति) सत्यानें घेरलेली आहे. (तस्याः रूपेण इमे वृक्षाः) तिच्या रूपानें हे सर्व वृक्ष (हरिताः हरितस्रजः) हिरवे आणि हिरव्या पानांनीं भरलेले असे झालेले आहेत. (३१)

(अन्ति सन्तं न जहाति) जवळ असतांनाही तो सोडत नाहीं आणि (अन्ति सन्तं न पश्यति) तो जवळ असतांना दिसतहि नाहीं. (देवस्य पश्य काव्यं) या देवाचें हें काव्य पहा, जो (न ममार न जीर्यति) मरत नाहीं आणि जीर्णही होत नाहीं. (३२)

(अपूर्वेण इषिताः वाचः) जिच्या पूर्वी कोणीही नाहीं, अशा या देवतेनें प्रेरित केलेल्या ह्या वाचा आहेत. (ताः यथायथं वदन्ति) त्या वाणी यथायोग्य वर्णन करतात. (वदन्तीः यत्र गच्छन्ति) बोलतां बोलतां त्या वाणी जेथें पोहोंचतात (तत् महत् ब्राह्मणं आहुः) तें महत् ब्रह्म आहे असें म्हणतात. (३३)

यत्र देवाश्च मनुष्याश्चारा नाभाविव श्रिताः ।
अपां त्वा पुष्पं पृच्छामि यत्र तन्मायया हितम् ॥ ३४ ॥
येभिर्वात इषितः प्रवाति ये ददन्ते पञ्च दिशः सध्रीचीः ।
य आहुतिमत्यमन्यन्त देवा अपां नेतारः कतमे त आसन् ॥ ३५ ॥
इमामेषां पृथिवीं वस्त एकोऽन्तरिक्षं पर्येको बभूव ।
दिवमेषां ददते यो विधर्ता विश्वा आशाः प्रति रक्षन्त्येके ॥ ३६ ॥
यो विद्यात्सूत्रं विततं यस्मिन्नोताः प्रजा इमाः ।
सूत्रं सूत्रस्य यो विद्यात्स विद्याद् ब्राह्मणं महत् ॥ ३७ ॥
वेदाहं सूत्रं विततं यस्मिन्नोताः प्रजा इमाः ।
सूत्रं सूत्रस्याहं वेदाथो यद्ब्राह्मणं महत् ॥ ३८ ॥
यदन्तरा द्यावापृथिवी अग्निरैत्प्रदहन्विश्वदाव्यः ।
यत्रातिष्ठन्नेकपत्नीः परस्तात्क्वेवासीन्मातरिश्वा तदानीम् ॥ ३९ ॥
अप्स्वासीन्मातरिश्वा प्रविष्टः प्रविष्टा देवाः सलिलान्यासन् ।
बृहन्ह तस्थौ रजसो विमानः पवमानो हरित आ विवेश ॥ ४० ॥

अर्थ- (देवाः च मनुष्याः च) देव आणि माणसें (नाभौ अरा, इव यत्र श्रिताः) चक्राच्या नाभींत आरे ज्याप्रमाणें असतात त्याप्रमाणे आश्रित झालेले आहेत, त्या (अपां पुष्पं त्वा पृच्छामि) आप तत्वाच्या पुष्पा ! मी तुला विचारतों कीं (यत्र तत् मायया हितम्) जेथें तें मायेनें आच्छादित होऊन राहते तें काय आहे ? (३४)

(येभिः इषितः वातः प्रवाति) ज्या योगानें प्रेरित होऊन वायु वाहतो, (ये सध्रीचीः पञ्च दिशः ददन्ते) जे एकमेकांना लागलेल्या पांचही दिशांना धारण करतात. (ये देवाः आहुतिं अति अमन्यन्त) जे देव आहुतींना अधिक मानतात (ते अपां नेतारः कतमे आसन्) ते जलाचे नेते कोण आहेत ? (३५)

(एषां एकः इमां पृथिवीं वस्ते) यांपैकीं एक या पृथ्वीवर राहतो, (एकः अन्तरिक्षं परि बभूव) एक अंतरिक्षांत व्यापून राहिलेला आहे, (एषां यः विधर्ता) यांतील जो धारण करणारा आहे तो (दिवं ददते) द्युलोकाला धारण करतो आणि (एके विश्वाः आशाः प्रति रक्षति) कांहीं सर्व दिशांचें रक्षण करतात. (३६)

(यस्मिन् इमाः प्रजाः ओताः) ज्याच्यांत या प्रजा ओंवलेल्या आहेत, (यः विततं सूत्रं विद्यात) जो व्यापक सूत्राला बरोबर जाणतो आणि (सूत्रस्य सूत्रं यः विद्यात्) जो या सूत्राच्या सूत्रालाहि जाणतो (सः महत् ब्राह्मणं विद्यात्) तो महान् ब्रह्माला जाणतो. (३७)

(यस्मिन् इमाः प्रजाः ओताः) ज्यांत या प्रजा ओंवलेल्या आहेत (अहं विततं सूत्रं वेद) या व्यापक सूत्राला मी जाणतों, (सूत्रस्य सूत्रं अहं वेद) सूत्राच्या सूत्रालाही मी जाणतों आणि (अथो यत् महत् ब्राह्मणं) जें महान् ब्रह्म आहे त्यालाही मी जाणतों. (३८)

(यत् द्यावापृथिवी अन्तरा) जो द्युलोक आणि पृथ्वीच्या मध्यभागीं (विश्वदाव्यः प्रदहन् अग्निः ऐत्) विश्वाला चालणारा अग्नि असतो (यत्र परस्तात् एक-पत्नीः अतिष्ठन्) जेथें अनंत कालपर्यंत एकच रक्षण करणारी शक्ति राहते (तदानीं मातरिश्वा क्व एव आसीत्) त्या वेळीं वायु कोठें होता ? (३९)

(मातरिश्वा अप्सु प्रविष्टः आसीत्) वायु जलांमध्यें प्रविष्ट झालेला होता (देवाः सलिलानि प्रविष्टाः आसन्) सर्व देव जलांत प्रवेशून राहिले होते (बृहत् ह रजसः विमानः तस्थौ) त्याच वेळीं महान् रजाचें प्रमाण अधिक होतें आणि (पवमानः हरितः आविवेश) वायु सूर्यकिरणांबरोबर होता. (४०)

उत्तरेणेव गायत्रीममृतेऽधि वि चंक्रमे ।
साम्ना ये साम संविदुरजस्तद्ददृशे क्व ॥ ४१ ॥
निवेशनः संगमनो वसूनां देव इव सविता सत्यधर्मा ।
इन्द्रो न तस्थौ समरे धनानाम् ॥ ४२ ॥
पुण्डरीकं नवद्वारं त्रिभिर्गुणेभिरावृतम् ।
तस्मिन्यद्यक्षमात्मन्वत्तद्वै ब्रह्मविदो विदुः ॥ ४३ ॥
अकामो धीरो अमृतः स्वयंभू रसेन तृप्तो न कुतश्चनोनः ।
तमेव विद्वान्न बिभाय मृत्योरात्मानं धीरमजरं युवानम् ॥ ४४ ॥

अर्थ— (उत्तरेण अमृते अधि गायत्रीं अधि वि चक्रमे) उज्ज्वल रूपानें अमृतांमध्यें गायत्रीला विशेष रीतीनें प्राप्त करतात. (ये साम्ना साम सं विदुः) जे सामाला सामानें जाणतात (तत् अजः क ददृशे) तो अजन्म्यानें कोठें पाहिला ? (४१)

(सत्यधर्मा सविता देवः इव) सत्य धर्मानें युक्त सविता देवाप्रमाणें (वसूनां संगमनः निवेशनः) सर्व प्रकारच्या संपत्ति देणारा आणि सर्व निवासांचें कारण आहे, असा तो (धनानां समरे) द्रव्य मिळवण्याच्या युद्धांत (इन्द्रः न तस्थौ) इंद्राप्रमाणें स्थिर राहतो. (४२)

(नवद्वारं पुण्डरीकं) नऊ द्वारांचें कमल (त्रिभिः गुणेभिः आवृतं) सत्व, रज, तम या तीन गुणांनीं जें वेष्टित आहे, (तस्मिन् यत् आत्मन्वत् यक्षं) त्यांत जो आत्म्यानें युक्त एक पूज्य देव आहे, (तत् वै ब्रह्मविदः विदुः) त्याला ब्रह्मज्ञानी जाणतात. (४३)

(अकामः धीरः अमृतः स्वयंभूः) निष्काम, धीर, अमर, स्वयंभू (रसेन तृप्तः) रसानें संतुष्ट झालेला तो देव (न कुतश्चन ऊनः) कोठेंही न्यून नाहीं, (तं एव विद्वान् मृत्योः न बिभाय) त्याला जाणणारा ज्ञानी मृत्यूला भीत नाहीं, कारण कीं (आत्मानं धीरं अजरं युवानं) तोच धीर, अजर, तरुण आत्मा आहे. (४४)

उच्छिष्ट-ब्रह्मसूक्त

कांड ११, सूक्त ७

(ऋषिः - अथर्वा । देवता - अध्यात्मं, उच्छिष्टः)

उच्छिष्टे नाम रूपं चोच्छिष्टे लोक आहितः ।
उच्छिष्ट इन्द्रश्चाग्निश्च विश्वमन्तः समाहितम् ॥ १ ॥

अर्थ— (उच्छिष्टे नाम रूपं) उच्छिष्ट अर्थात् अवशिष्ट आत्म्यांत नाम आणि रूप (उच्छिष्टे लोक आहितः) अवशिष्टांत लोक लोकांतर स्थित झालेले आहेत (उच्छिष्टे इन्द्रः च अग्निः च) उच्छिष्टांत इंद्र आणि अग्नि त्याचप्रमाणें (अन्तः विश्वं समाहितम्) त्यांमध्यें संपूर्ण विश्व सामावलेलें आहे. (१)

उच्छिष्टे द्यावापृथिवी विश्वं भूतं समाहितम् ।
आपः समुद्र उच्छिष्टे चन्द्रमा वात आहितः ॥ २ ॥
सन्नुच्छिष्टे असंश्चोभौ मृत्युर्वाजः प्रजापतिः ।
लौक्या उच्छिष्ट आयत्ता व्रश्च द्रश्चापि श्रीर्मयि ॥ ३ ॥
दृढो दृंहस्थिरो न्यो ब्रह्म विश्वसृजो दश ।
नाभिमिव सर्वतश्चक्रमुच्छिष्टे देवताः श्रिताः ॥ ४ ॥
ऋक्साम यजुरुच्छिष्ट उद्गीथः प्रस्तुतं स्तुतम् ।
हिङ्कार उच्छिष्टे स्वरः साम्नो मेडिश्च तन्मयि ॥ ५ ॥
ऐन्द्राग्नं पावमानं महानाम्नीर्महाव्रतम् ।
उच्छिष्टे यज्ञस्याङ्गान्यन्तर्गर्भ इव मातरि ॥ ६ ॥
राजसूयं वाजपेयमग्निष्टोमस्तदध्वरः ।
अर्काश्वमेधावुच्छिष्टे जीवबर्हिर्मदिन्तमः ॥ ७ ॥
अग्न्याधेयमथो दीक्षा कामप्रश्छन्दसा सह ।
उत्सन्ना यज्ञाः सत्त्राण्युच्छिष्टेऽधि समाहिताः ॥ ८ ॥

अर्थ—(उच्छिष्टे द्यावापृथिवी) उच्छिष्टांत द्युलोक आणि भूलोक (विश्वं भूतं समाहितम्) सर्व भूतमात्र स्थिर झालेलें आहे. (उच्छिष्टे आपः समुद्रः चंद्रमाः वातः आहितः) जल, समुद्र, चंद्र, वायु हे सर्व त्यांतच स्थिर झालेले आहेत. (२)

(सत् असत् च उभौ उच्छिष्टे) सत्य आणि असत् हीं दोन्हीं उच्छिष्टांतच आहेत, (मृत्युः वाजः प्रजापतिः) मृत्यु, अन्न अथवा बल आणि प्रजापालक, (लौक्याः व्रः च द्रः च) लोकांसाठीं सर्व धन आणि स्वीकारण्यास योग्य आणि नाश करण्यास योग्य असे सर्व पदार्थ (उच्छिष्टे आयत्ताः) उच्छिष्टांतच आश्रित झालेले आहेत. (श्रीः मयि) सर्व शोभा माझ्यामध्येंच आहे. (३)

(दृढः दृंह-स्थिरः न्यः) सुदृढ, दृढतेनें स्थिर असणारा आणि गतिमान् (ब्रह्म विश्वसृजः दश देवताः) ज्ञान, विश्वाची उत्पत्ति करणाऱ्या दहा शक्ति धारण करणारे देव (नाभिं चक्रं इव सर्वतः) नाभिचक्राच्या सभोंवार असणाऱ्या आऱ्यांप्रमाणें सर्व बाजूंनीं (उच्छिष्टे श्रिताः) उच्छिष्टांतच स्थित आहेत. (४)

(ऋक् साम यजुरुच्छिष्टे उद्गीथः) ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, उद्गीथ, (प्रस्तुतं स्तुतं) स्तुति आणि स्तवन, (हिंकारः स्वरः) हिंकार, स्वर (साम्नो मेडिः) सामगानाचे आलाप हे सर्वच उच्छिष्टांत आहेत. (तन्मयि) हे सर्व माझ्यामध्यें राहोत. (५)

(ऐंद्राग्नं पावमानं) इंद्र, अग्नि आणि पावमान, वायूचीं सूक्तें, (महानाम्नीः महाव्रतं) महानाम आणि महाव्रताचे मंत्रभाग हीं सर्व (यज्ञस्य अंगानि उच्छिष्टे) यज्ञाचीं अंगें उच्छिष्टांत स्थित आहेत, जसा (मातरि अंतः गर्भः इव) मातेच्या उदरांत गर्भ असतो. (६)

राजसूय, वाजपेय, अग्निष्टोम (तत् अध्वरः) ते हिंसा रहित यज्ञ, अर्कअश्वमेध, (मदिन्तमः जीवबर्हिः) आनंद देणारा जीवांचा रक्षक यज्ञ, हे सर्व उच्छिष्टांतच स्थित आहेत (७)

(अग्न्याधेयं अथो दीक्षा) अग्न्याधान, दीक्षा, (छन्दसा सह कामप्रः) छंदांच्या कामाची पूर्णता करणारा यज्ञ, (उत्सन्ना सत्त्राणि) उत्सन्न यज्ञ आणि सर्व सत्र हे सर्व उच्छिष्टांतच स्थित आहेत. (८)

अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद

विभाग पहिला

ब्रह्मविद्या प्रकरण

ब्रह्माची विद्या

कांड ४, सूक्त १

(ऋषिः - वेनः । देवता - बृहस्पतिः, आदित्यः । छंदः - त्रिष्टुप्; २,५ पुरोऽनुष्टुप्)

ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद्वि सीमतः सुरुचो वेन आवः ।
स बुध्न्या उपमा अस्य विष्ठाः सतश्च योनिमसतश्च वि वः ॥ १ ॥
इयं पित्र्या राष्ट्र्येत्वग्रे प्रथमाय जनुषे भुवनेष्ठाः ।
तस्मा एतं सुरुचं ह्वारमह्यं घर्मं श्रीणन्तु प्रथमाय धास्यवे ॥ २ ॥

अर्थ — (**पुरस्तात् प्रथमं**) प्राचीनकालापेक्षांहि प्रथम (**जज्ञानं ब्रह्म**) प्रगट झालेल्या ब्रह्माला (**सुरुचः सीम-तः**) उत्तम प्रकाशित मर्यादांनीं (**वेनः वि आवः**) ज्ञानी विद्वानानें पाहिलें आहे. आणि (**सः**) हाच ज्ञानी (**अस्य बुध्न्याः वि-स्थाः**) स्वतःच्या आकाश संचारी विशिष्ट रीतिनें-स्थित आणि (**उप-माः**) उपमा देण्यास योग्य अशा सूर्यादि देवतांना पाहून (**सतः च असतः योनिं**) सत्य आणि असत्याच्या उत्पत्तिस्थानालाहि (**वि वः**) प्रकाशित करतो. (१)

(**इयं भुवने-स्थाः पित्र्या राष्ट्री**) या मानवप्राण्यांमध्यें वास्तव्य करणारी पित्यापासून प्राप्त झालेली चमकणारी बुद्धि (**प्रथमाय जनुषे अग्रे एतु**) मुख्य जीवनासाठीं पुढें जावो. (**तस्मै प्रथमाय धास्यवे**) त्या प्रथम धारण करणाऱ्यास अर्पण करण्यासाठीं (**एतं सुरुचं, ह्वारं अ+ह्यं घर्मं श्रीणन्तु**) या तेजस्वी, दुष्टांना दाबून टाकणाऱ्या, हीन नसलेल्या यज्ञाला सिद्ध करोत. (२)

भावार्थ— सर्वांहून प्रथम प्रगट झालेल्या ब्रह्माला त्याच्या प्रकाशाच्या मर्यादांच्या द्वारें ज्ञानी जाणतो, आणि तोच ज्ञानी उपमा देण्यास योग्य अशा आकाशसंचारी सूर्यादि ग्रह आणि नक्षत्रांना पाहून सत्यासत्यरूपी मूळ उत्पत्तिस्थानाच्या विषयासंबंधीं खरा उपदेश करतो. (१)

या मानवांत स्थित असलेली, पित्यापासून प्राप्त झालेली तेजस्वी बुद्धि, श्रेष्ठ जीवन व्यतीत करण्यासाठीं विकसित होवो. त्याप्रमाणें ही बुद्धि सर्वांना मुख्यतः धारण करणाऱ्या परमात्म्याला, समर्पण करण्याच्या हेतूनें तेजस्वी, दुष्टांना दूर करणाऱ्या, उच्च आणि श्रेष्ठ अशा यज्ञाची सिद्धि करो. (२)

प्र यो ज॒ज्ञे वि॒द्वान॑स्य॒ बन्धु॒र्विश्वा॑ दे॒वानां॒ जनि॑मा विवक्ति ।
ब्र॒ह्म ब्रह्म॑ण॒ उज्ज॑भार॒ मध्या॑न्नी॒चैरु॒च्चैः स्व॒धा अ॒भि प्र त॑स्थौ ॥ ३ ॥
स हि दि॒वः स पृ॑थि॒व्या ऋ॑त॒स्था म॒ही क्षेमं॒ रोद॑सी अस्कभायत् ।
म॒हान्म॒ही अस्क॑भाय॒द्वि जा॒तो द्यां सद्म॒ पार्थि॑वं॒ च॒ रजः॑ ॥ ४ ॥
स बु॒ध्न्यादा॑ष्ट्र ज॒नुषो॒ऽभ्यग्रं॒ बृह॒स्पति॑र्दे॒वता॒ तस्य॑ स॒म्राट् ।
अह॒र्यच्छु॒क्रं ज्योति॑षो॒ जनि॒ष्टाथ॑ द्यु॒मन्तो॒ वि व॑सन्तु॒ विप्राः॑ ॥ ५ ॥
नू॒नं तद॑स्य का॒व्यो हि॑नोति म॒हो दे॒वस्य॑ पू॒र्व्यस्य॒ धाम॑ ।
ए॒ष ज॑ज्ञे ब॒हुभिः॑ सा॒कमि॒त्था पूर्वे॒ अर्धे॒ विषि॑ते स॒सन्नु ॥ ६ ॥

अर्थ— (यः विद्वान्) जो विद्वान् (अस्य बंधुः प्रजज्ञे) याचा बंधु झाला, तोच (देवानां जनिमा विवक्ति) सर्व देवांचे जन्म सांगतो. (ब्रह्मणः ब्रह्म उज्जभार) ब्रह्मापासून ब्रह्म प्रगट झालें आहे ! त्याच्या (मध्यात् नीचैः उच्चैः) मध्यभागापासून, खालच्या भागापासून आणि उच्च भागापासून (स्व-धाः अभि प्रतस्थौ) त्याच्या स्वतःच्याच धारणाशक्ति विस्तारल्या आहेत. (३)

(सः हि दिवः) तोच द्युलोकाला आणि (सः पृथिव्याः ऋत-स्थाः) तोच पृथ्वीला सत्य नियमांनीं टिकवून ठेवणारा आहे. त्यानेंच (मही रोदसी क्षेमं अस्कभायत्) महान् द्युलोक आणि भूलोकास घराप्रमाणें स्थिर केलें आहे. (महान् जातः) तोच महान् देव प्रगट होऊन (द्यां पार्थिवं सद्म रजः च) द्युलोक, पृथ्वीतील निवासस्थानें आणि अंतरिक्ष लोकास (मही अस्कभायत्) विस्तृतरूप देऊन स्थिर करतो. (४)

(तस्य सम्राट् देवता बृहस्पतिः) त्या जगाचा सम्राट् बृहस्पति देव आहे आणि (सः बुध्न्यात् जनुषः अग्रं अभि आष्ट्र) तो प्रथम जन्माहूनही प्राचीन काळापासून चारी बाजूंनीं व्यापून आहे. (अथ यत् ज्योतिषः शुक्रं अहः जनिष्ट) आतां ज्या ज्योतिपासून शुद्ध दिवस उत्पन्न झाला, त्यानें (द्युमन्तः विप्राः विवसन्तु) प्रकाशित होणारे ज्ञानी विशेष प्रकारानें येथें निवास करोत. (५)

(काव्यः नूनं) ज्ञानी निश्चयानें (अस्य पूर्व्यस्य देवस्य तत् महः धाम) त्या प्राचीन देवाच्या त्या महान् धामाला (हिनोति) प्राप्त करतो. (इत्था बहुभिः साकं एषः जज्ञे) याचप्रमाणें अनेकांबरोबर हा ज्ञानी उत्पन्न झाला; परंतु ज्या वेळेस (पूर्वे अर्धे वि-सिते) पूर्व दिशेचें अर्धें द्वार उघडलें, त्यावेळीं त्यांपैकीं कित्येक (ससन् नु) झोंपलेलेच होते. (६)

भावार्थ— जो ज्ञानी या परमात्म्याचा बंधु होतो, तोच देवांच्या देवत्वाविषयींचें सत्यज्ञान सांगतो. परब्रह्मापासून ज्ञान प्रकाशित झालें आहे आणि त्याच्या खालीं, मध्यें आणि वर म्हणजेच सर्वांगांतून धारकशक्ति चारी बाजूंस पसरल्या आहेत. (३)

तोच एक देव द्युलोक आणि भूलोक इत्यादिंना सत्य नियमांनीं आपापल्या स्वतःच्या स्थानांत स्थिर करणारा आहे. त्यानेंच या द्युलोक आणि भूलोकास घराप्रमाणें बनविलें आहे. त्या प्रगट झालेल्या महान् देवानें द्युलोक, अंतरिक्षलोक आणि हा आपल्या घरासारखा असलेला भूलोक यांना विस्तृत आणि महान् बनवून त्यांच्या स्वतःच्या स्थानांत त्यांना सुदृढ केलेलें आहे. (४)

या जगताचा एकमेव सम्राट् बृहस्पति देव आहे. तो आदिकालापासून चोहोंबाजूस पूर्णतेनें पसरलेला आहे. त्याच्या ज्योतीपासून जो पवित्र दिवस प्रकाशित होतो, त्यानें प्रकाशित होणारे ज्ञानी येथें विशेष प्रकारें जीवन व्यतीत करोत. (५)

ज्ञानी निश्चयानें त्या प्राचीन देवाचें तें प्रसिद्ध महान् धाम प्राप्त करतो. वस्तुतः ज्ञान्याचा जन्म अनेक मनुष्यांच्या जन्माबरोबर झालेला असतो; परन्तु प्रयत्नानें ज्ञान्यासाठीं ज्यावेळीं तें पूर्व महाद्वार थोडेंसें उघडलेलें असतें, त्यावेळीं जागृत असल्यामुळें त्या द्वारांत ज्ञानी प्रवेश करतो; परंतु अन्य लोक मात्र बाहेरच निजलेले रहातात. (६)

योऽथर्वाणं पितरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात् ।
त्वं विश्वेषां जनिता यथासः कविर्देवो न दभायत्स्वधावान् ॥ ७ ॥

अर्थ— (यः) जो (अथर्वाणं पितरं देवबन्धुं) निश्चल पिता आणि देवबंधु अशा (**बृहस्पतिं नमसा च अव गच्छात्**) बृहस्पति देवाला नमस्कार करून याप्रमाणें जाणतो कीं, "(**त्वं विश्वेषां जनिता असः**) तूं सर्वांचा उत्पादक आहेस. (**यथा कविः स्वधावान् देवः न दभायत्**) आणि ज्ञानी, स्वकीय सामर्थ्ययुक्त देव कधींही दबला जात नाहीं." (७)

भावार्थ— मनुष्य, देवबंधु, परमपिता अशा निश्चल बृहस्पतिची नम्रतेनें केलेल्या उपासनेने या प्रकारचें ज्ञान प्राप्त करतो कीं, " हे देवा ! तूं सर्वांचा उत्पादक आहेस, तूंच ज्ञानी आणि स्वसामर्थ्यानें युक्त आहेस आणि तूंच केव्हांही न दबला जाणारा देव आहेस. " (७)

ब्रह्माची विद्या

या सूक्तांत ' **ब्रह्माच्या विद्ये** ' चें फारच मनोहर वर्णन केलेलें आहे. जे ब्रह्मविद्येचें मनन करतात, त्यांच्यासाठीं हें सूक्त फारच बोधप्रद आहे. यांत प्रथम असें सांगितलें आहे कीं—

प्राचीन देव

पुरस्तात् प्रथमं ब्रह्म जज्ञानम् ॥ (मं. १)

" अत्यंत प्राचीनतमकाळाची जी कांहीं कल्पना करतां येईल, त्या प्राचीन काळाहूनही अतिप्राचीनकाळापासून तें परब्रह्म स्वप्रकाशानें प्रकाशित होऊन राहिलें आहे. " ज्या वेळेस दुसरा कोणताही पदार्थ उत्पन्न झालेला नव्हता, त्या वेळेपासून स्वयंप्रकाशी ब्रह्म प्रकाशित होऊन राहिलेलें आहे. यांतील तात्पर्य हें आहे कीं, हें ब्रह्म स्वयंप्रकाशी आहे. प्रकाशित होण्यासाठीं त्याला अन्य कोणाचेंही सहाय्य घ्यावें लागत नाहीं. त्याच्या अतिप्राचीनतम अस्तित्वाबाबत या सूक्तांतील खालील वचनें ध्यानांत ठेवण्यालायक आहेत—

१ प्रथमाय तस्मै धास्यवे । (मं. २)
२ अग्रं स बुध्न्यात् जनुषः अभि आग्रे । (मं. ५)
३ पूर्वस्य अस्य देवस्य तत् धाम । (मं. ६)

" (१) सर्वांहून प्रथम तें धारक ब्रह्म आहे. (२) सर्वांहून प्रथम ज्याची उत्पत्ति झाली आहे त्याहूनहि प्रथम हें चोहोंबाजूंस व्याप्त होऊन राहिलेलें आहे. (३) सर्वांहून प्राचीनांत प्राचीन देवाचें तें स्थान आहे. "

या मंत्रांत या देवाची अतिप्राचीनता असल्याविषयीं निश्चयात्मक वर्णन आहे. यावरून हें सिद्ध होतें कीं, हा देव स्वयंसिद्ध किंवा स्वयंभू, सर्वाधार आणि सर्व जगाची निर्मिती होण्यापूर्वीही अस्तित्वांत आहे.

त्याचें ज्ञान !

त्याचें ज्ञान कोणत्या रीतीनें होऊं शकेल याविषयीं विचार करण्यासाठीं खालील मंत्र पुष्कळ सहाय्यभूत होणारे आहेत-

सुरुचः सीमतः वेनः वि आवः । (मं. १)

" (**सु-रुचः**) उत्तम प्रकाशमान् (**सीमा-तः**) सीमांनी (**वेनः**) ज्ञानी मनुष्य त्याला पहातो. "

मेघांनीं आच्छादित सूर्य ज्याप्रमाणें मेघांच्या चमकणाऱ्या कडांवरूनच जाणला जातो, त्याचप्रमाणें सूर्य चंद्र इत्यादिकांच्या मागें राहून त्यांना प्रकाशित करणारा तो देव-त्या गोलांच्या चमकदारपणानें जाणला जातो. " ज्याला सूर्य वगैरे प्रकाशित करीत नाहींत, परंतु ज्याच्या तेजानें सूर्य वगैरे प्रकाशित होऊन राहिले आहेत, तेंच ब्रह्म आहे. " अर्थात् सूर्यादिकांच्या सुप्रकाशित सीमांना पाहून आणि विचार करून परमात्म्याचें ज्ञान होऊं शकतें. सृष्टींतील त्याचें कार्य पाहून त्या परमात्म्याचें ज्ञान होऊं शकतें. त्याच्या ज्ञानासाठीं दुसरा अन्य मार्ग नाहीं.

त्याच्यासाठीं उपमा

हा परमात्मा प्रत्यक्ष दिसत नाहीं. सृष्टींतील त्याचें कार्य पाहून त्याच्याविषयीं अनुमान होऊं शकतें, अथवा त्याचें वर्णन उपमांच्या द्वारेंहि होऊं शकतें. जसें—

अस्य उपमाः बुध्न्याः वि-स्थाः । (मं. १)

" त्याच्यासाठीं उपमा (**बुध्न्याः**) आकाशांत (**वि-स्थाः**) विशिष्ट रीतीनें राहणारे सूर्यादि गोलच आहेत. " अर्थात् या परमात्म्याचें वर्णन करणें असेल तर " तो सूर्याचाही सूर्य व चंद्राचाहि चंद्र आहे " याप्रमाणें करतां येतें. अर्थात् सूर्यादि ग्रहांची उपमा देऊनच त्याविषयीं ज्ञान होतें; अथवा मनुष्यानें सृष्टींतील त्याचीं कार्यें पाहून त्याचे बाबतींत अनुमान करावें अथवा सूर्यादि गोलकांना तो प्रकाशित करीत असल्यानें तो सूर्याचाहि सूर्य आहे, असें त्यानें जाणावें. अशा प्रकारच्या धारणांनींच त्याच्याविषयीं कांहीं अनुमान करतां येणें शक्य आहे.

आदिकारण

सर्वांचें आदिकारण तो मुख्य परमात्माच आहे. सत् आणि असत्, दीर्घकालपर्यंत टिकून राहणारे तसेंच क्षणभंगुर असे जे पदार्थ आहेत, त्या सर्वांचें मूळ अथवा आदिकारण ही तेंच (ब्रह्म) आहे. पहा —

सतः असतः च योनिं सः वि वः । (मं. १)

" सत् अथवा असताचें आदिकारण तें आहे याविषयीं यथायोग्य विवरण फक्त ज्ञानीच करूं शकतो. " अन्य मनुष्यांना त्या बाबतींत कांहीं ज्ञान नसतें. त्यासंबंधीं ते पूर्ण अज्ञानी असतात.

श्रेष्ठ जीवन

ज्ञानी स्वतःचें जीवन कसें व्यतीत करीत असतो हा एक मोठा महत्वाचा विषय आहे. याचें वर्णन दुसऱ्या मंत्रांत खालीलप्रमाणें केलें आहे, तें आतां पहा——

इयं पित्र्या राष्ट्र्येत्वग्रे प्रथमाय जनुषे भुवनेष्ठाः ।
तस्मा एतं सुरुचं ह्वारमह्यं घर्मं श्रीणन्तु प्रथमाय धास्यवे ॥ २ ॥ (मं. २)

" मानवांत स्थित असलेली, पित्यापासून प्राप्त झालेली मनुष्याची बुद्धि प्रथम श्रेणीचें श्रेष्ठ जीवन व्यतीत करण्यासाठीं उत्सुक होऊन पुढें जावो आणि सर्वाधार परमात्म्याच्या संतोषासाठींच हें सुंदर श्रेष्ठ यज्ञकर्म करो. "

या मंत्राचे कांहीं शब्द मनन करण्यासारखे आहेत—

१ **भुवनेष्ठाः**=(**भुवने-स्थाः**) म्हणजे भुवनांत राहणारी. 'भुवन' शब्दाचे हे अर्थ आहेत– ' मनुष्य, मानवजाति, प्राणी, जगत्, निर्मित झालेले सर्व पदार्थ, पृथ्वी, घर, स्थान आणि अभ्युदयासाठीं प्राप्तस्थिति ' यांतून या ठिकाणीं ' मनुष्य अथवा मानवजाति ' हाच अर्थ अभिप्रेत आहे, कारण कीं त्यांत असणारी शक्ति (**प्रथमाय जनुषे**) प्रथम श्रेणीचें जीवन व्यतीत करण्यासाठीं (**अग्रे एतु**) पुढें येवो अर्थात् उत्साहानें स्वतःचें जीवन सुधारो, असें सांगण्यांत आलें आहे. मानवेतर प्राणी अथवा पदार्थ यांमध्यें अशी संभावना नसते; म्हणून मनुष्यविषयक अर्थच या ठिकाणीं अपेक्षित आहे.

२ **पित्र्या राष्ट्री**=(**पित्र्या**) पित्यापासून आनुवंशिक शुभ संस्कारांनीं सुसंस्कृत झालेली (**राष्ट्री**) तेजस्वी सुप्रकाशित बुद्धि.

या प्रकारची बुद्धि मनुष्यांत शुभसंकल्प सुदृढ करो आणि या संकल्पाच्या बलानें बलवान् होऊन मनुष्य (**प्रथमाय जनुषे**) प्रथम अर्थात् श्रेष्ठ कोटीचें जीवन व्यतीत करण्याचा उत्साह स्वतःच्या मनांत वाढवो. उत्साहानें तो श्रेष्ठ जीवन व्यतीत करो. मध्यंतरीं तो कोणत्याही प्रलोभनानें न फसो आणि अकस्मात् विघ्न प्राप्त झाल्यास हताश न होवो. अर्थात् शुभाशुभ स्थिति प्राप्त झाली असतांही स्वतःचा मार्ग न सोडो. त्यानंतर—

प्रथमाय धास्यवे घर्मं श्रीणन्तु । (मं. २)

" सर्वांचा मुख्य आधारभूत जो परमात्मा, त्यासाठीं यज्ञ सिद्ध करो. " अर्थात् यज्ञ करावा आणि तो समर्पण करण्याच्या बुद्धीनेंच करावा; कारण यज्ञाचा पुरुष तोच आहे आणि सर्व यज्ञ त्यासाठींच करण्यांत येतात.

यज्ञाचें लक्षण

या मंत्रांत यज्ञाचें लक्षण तीन शब्दांनीं सांगितलें आहे, म्हणून यज्ञाचें स्वरूप समजण्यासाठीं या तीन शब्दांचें मनन केलें पाहिजे.

१ **अ-ह्यं-(अहीनं)**= ज्यांत हीनता नाही; ज्यांत हीन अथवा त्याज्य भाव बिल्कुल नाहीं, अर्थात् जो उच्च भावयुक्त आहे.

२ **सुरुचं** =अत्यंत तेजस्वी, तेजस्विता वाढविणारा.

३ **ह्वारं** = दबवणारा, दुष्टपणा आणि नीचपणा दबवून टाकणारा, दुष्टपणाला डोकें वर करण्यास अवसर न देणारा.

' **घर्म** ' हा शब्द येथें यज्ञवाचक आहे. त्याचा अर्थ ' उष्णता, सूर्यप्रकाश, यज्ञ ' असा होतो. येथें उष्णता म्हणजे मानवी मनाची उष्णता अर्थात् उत्साहशक्ति. ज्या श्रेष्ठ कर्मानें मनुष्याचा पुरुषार्थ प्राप्तिविषयींचा उत्साह वृद्धिंगत होतो, त्या यज्ञकर्माचें नांव ' घर्म ' आहे. पूर्वोक्त प्रकारचा मनुष्य या प्रकारचा श्रेष्ठ यज्ञ करो आणि स्वतःच्या जीवनाचें सार्थक करो.

परमात्म्याचें सामर्थ्य

चतुर्थ मंत्रांत सांगितलें आहे कीं, तोच सर्वांचा आधार आहे, ज्यानें या संपूर्ण जगाला टिकवून ठेवलें आहे.'

१ स हि दिवः पृथिव्याः च ऋतस्थाः । (मं. ४)
२ सः मही रोदसी क्षेमं अस्कभायत् । (मं. ४)
३ द्यां पार्थिवं सद्म रजः च स जातः
मही अस्कभायत् । (मं. ४)

" (१) त्यानें द्युलोकास आणि पृथ्वीलोकास सत्य नियमांनीं धारण केलें आहे. (२) महान् द्यावापृथ्वीला त्यानें सुखपूर्ण बनविलें आहे, आणि (३) द्युलोक, पृथ्वीलोक आणि अंतरिक्षाला त्या सुप्रसिद्ध परमात्म्यानें विस्तृत आणि सुदृढ बनविलें आहे. "

या संपूर्ण जगाचा रचयिता तोच परमात्मा आहे आणि तो जगाची रचना सत्य नियमानें करीत असतो, चालवीत असतो आणि सुदृढ करतो. याविषयीं सातव्या मंत्राचें कथन ध्यानांत घेण्याजोगें आहे—

त्वं विश्वेषां जनिता असः । (मं. ७)

" तूं सर्वांचा उत्पन्नकर्ता आहेस. " यांत असंदिग्ध रीतीनें सांगितलें आहे कीं तोच सर्वांचा उत्पादक आहे. हीच गोष्ट भिन्न शब्दांच्या द्वारें तृतीय मंत्रांतहि सांगितलेली आहे—

ब्रह्म ब्रह्मणः उज्जभार । (मं. ३)
मध्यात् नीचैः उच्चैः स्वधा अभिप्रतस्थौ । (मं. ३)

" ब्रह्म ब्रह्मापासूनच प्रकट झालेलें आहे. त्याच्या मध्य, खालच्या आणि उर्ध्वभागापासून त्याच्या स्वतःच्या धारकशक्ति चोहोंबाजूंस पसरल्या आहेत. " ब्रह्मापासून ब्रह्म उत्पन्न होतें आणि त्यापासूनच अनंत धारणशक्ति उत्पन्न झाल्या आहेत आणि त्यांमुळेंच या विश्वाचें धारण झालें आहे.

' ब्रह्म ' शब्दाचे अर्थ—' परब्रह्म, परमात्मा, आत्मा, ज्ञान, मंत्र, वेद, ब्राह्मण, भक्त, तप, पवित्राचरण, धन, अन्न, सूर्य, बुद्धि, प्रजापति ' हे आहेत. येथें एक ' ब्रह्म ' शब्दाचा अर्थ परमात्मा आहे आणि दुसरा ' ब्रह्म ' शब्दाचा अर्थ ' आत्मा, ज्ञान, बुद्धि, तप ' वगैरे आहेत. ब्रह्मामध्यें ' स्व-धा ' म्हणजे स्वतःची धारकशक्ति आहे. तीच सर्वांचें धारण करते. त्यांत स्वतःची शक्ति असल्यानें तें अन्य शक्तीची अपेक्षा करीत नाहीं. हेंच दुसऱ्याला शक्ति देत असतें, हेंच याचें मोठें सामर्थ्य आहे. याच्यामुळेंच सूर्य, चंद्र वगैरे तेजोगोल बनले आहेत आणि त्या ब्रह्मशक्तीमुळेंच ते सर्व स्वतःच्या स्थानांत स्थित आहेत.

ज्ञानी

या परमात्म्याचा जो बंधु असतो म्हणजे जो भावासारखा परमात्म्याशीं व्यवहार करतो, तोच त्याच्या सामर्थ्याचें वर्णन करूं शकतो.

यः विद्वान् अस्य बन्धुः जज्ञे,
सः देवानां जनिमा विवक्ति । (मंत्र ३)

" जो ज्ञानी त्याचा भाऊ म्हणून प्रसिद्ध होतो तोच त्या परमात्म्यापासून उत्पन्न झालेल्या सूर्यादि देवांच्या उत्पत्ति स्थिति वगैरे विषयांचें यथायोग्य विवरण करूं शकतो. " कारण कीं तोच मनुष्य व्यवस्थितपणें परमात्म्याच्या शक्तीला जाणतो. त्याचा भाऊ होण्याचें तात्पर्य एवढेंच आहे कीं, उच्च अधिकारानें संपन्न होणें, जीवात्मा हा त्या परमात्म्याचा ज्याप्रमाणें ' अमृतपुत्र ' आहे तसाच तो त्याचा ' बंधु ' हि आहे. हे शब्द जीवात्म्याच्या उन्नतीच्या कक्षेचे दर्शक आहेत. वस्तुतः बंध आदि संबंध तेथें लाक्षणिकच आहेत; हे साधक मनुष्याच्या उन्नतीची अवस्था दाखवितात.

मनुष्याची योग्यता कशाप्रकारें वृद्धिंगत होते या बाबतींत पांचव्या मंत्रांतील वचन फारच मनोरंजक आहे, तें पहा—

अथ यत् ज्योतिषा शुक्रं अहः जनिष्ट
(तेन) द्युमन्तः विप्राः वि वसन्तु । (मं. ५)

' ज्या परमेश्वराच्या ज्योतीचा हा प्रकाशपूर्ण दिवस आहे, त्याच्याच प्रकाशानें प्रकाशित होत होत ज्ञानी विशेष प्रकारानें येथें राहोत. ' अर्थात् त्यांचें रहाणें सवरणें विशेष नियमानें नियमित असलें पाहिजे. विशेष परिशुद्ध पद्धतिनें जीवन व्यतीत करण्यानेंच त्यांची योग्यता वाढत रहाते. परमात्म्याच्या प्रकाशानें प्रज्ज्वलित झालेल्या दिवसाचा याला सर्वत्र साक्षात्कार झाला पाहिजे. जेथें जेथें तो फिरेल तेथें तेथें त्या परमात्म्याची अखंड ज्योति त्याला दिसली पाहिजे. त्या ज्योतीच्या प्रकाशांतच त्याचे सर्व व्यवहाराचे मार्ग प्रकाशित झाले पाहिजेत, तेव्हांच त्याची उन्नति संभवते.

सूर्यप्रकाशानें जो ' दिवस ' होतो त्याची आणि परमात्मज्योतीनें प्रकाशित होणाऱ्या ' दिवसा ' ची तुलना करणें शक्य नाहीं, कारण सूर्यप्रकाशानें प्रकाशित होणाऱ्या दिवसास दिवस म्हणणेंही योग्य होणार नाहीं. कारण सूर्य स्वतःच परमेश्वरी ज्योतीनें प्रकाशित होतो. अर्थात् त्या परमात्म्याच्या ज्योतीचें महत्त्व दुसऱ्या कोणत्याही प्रकाशांपेक्षां विशेष आहे.

ज्ञान्याची जागृति

या मार्गानें स्वतःची उन्नति करून घेण्याची ज्या विद्वानाची इच्छा आहे, त्यानें जागृत राहून प्राप्त संधीचा योग्य लाभ घ्यावा, हें उचित आहे. यामुळेंच निःसंदेह त्याची उन्नति होणें शक्य आहे. योग्य प्रसंगीं तो जर जागृत राहिला नाहीं तर त्याची उन्नति न होतां तो मागें राहील. या बाबतींत सहावा मंत्र फार महत्वपूर्ण उपदेश देत आहे—

१ एष बहुभिः साकं इत्था जज्ञे । (मं. ६)

२ (परंतु) अस्य पूर्व्यस्य देवस्य तत् महः धाम काव्यः नूनं हिनोति । (मं. ६)

३ (अन्ये) पूर्वे अर्धे विसिते ससन् नु । (मं. ६)

" (१) हा ज्ञानी दुसऱ्या पुष्कळ मनुष्यांबरोबरच उत्पन्न झालेला होता. (२) परंतु प्राचीन देवाचें तें श्रेष्ठतम धाम तो एकटा ज्ञानीच प्राप्त करतो. (३) त्याच्याबरोबर जन्मलेले दुसरे साधारण लोक जेव्हां पूर्वदिशेचें महाद्वार उघडलें होतें तेव्हां गाढ निद्रेंत पडलेले होते. "

द्वार उघडण्याच्या वेळीं ज्ञानी जागृत होता त्यामुळेंच त्याचा प्रवेश देवाच्या स्थानांत झाला. बाकी लोक निद्रावश होते त्यामुळें ते आंत प्रवेश करूं शकले नाहींत. हा मंत्र योग्य समयाचें महत्व वर्णन करतो.

ज्या दिवशीं ज्ञानी जन्मला त्याच दिवशीं या पृथ्वीवर दुसरे अनेक लोक जन्माला आले होते. परंतु योग्य संधीचा लाभ न घेतल्यानें ते सर्व मागें राहिले आणि जाग्रत राहून प्राप्त संधीचा लाभ घेतल्यामुळें ज्ञानी पुढें निघून गेला. मनुष्य केवळ जन्मानेंच उच्च कोटीचा होत नाहीं, तर त्यानें जागृत राहून आपल्या उन्नतीचा प्रयत्न केला पाहिजे तरच त्याची उन्नति होणें शक्य आहे. ज्या वाचकांना स्वतःची आध्यात्मिक उन्नति व्हावी अशी इच्छा असेल त्यांनीं या मंत्राचें मनन करून योग्य बोध प्राप्त करून घ्यावा.

नमन आणि गुणचिंतन

या सूक्ताच्या शेवटच्या सातव्या मंत्रांत ज्ञानी होण्यांसाठीं मुख्य दोन साधनें सांगितलीं आहेत—

१ परमेश्वराला भक्तियुक्त भावानें नमन आणि
२ त्याच्या गुणाचें चिंतन करणें.

ह्या दोन साधनांचा आतां विचार करूं—

यः अथर्वाणं पितरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसा अवगच्छात् । (मं ७)

" निश्चल परमपिता, समग्र देवांचा बंधु आणि सर्वज्ञ अशा त्या परमेश्वराला जो मानव नमन करतो तोच त्याला जाणतो. " भक्तिपूर्वक परमेश्वराला शरण जावें, त्याला प्रेमपूर्ण हृदयानें नमस्कार करावा, त्याच्यासमोर नम्र व्हावें; हे सर्व मार्ग असे आहेत कीं, ज्यांचें ग्रहण केल्यानें मनुष्य उत्तरोत्तर उच्च स्थितीला जातो. आध्यात्मिक उन्नतिसाठीं आणि आत्मशक्तीच्या विकासासाठीं नम्र होणें अत्यंत आवश्यक आहे. नम्र झाल्याशिवाय आत्मशक्ति विकसित होऊं शकत नाहीं. नम्रतापूर्ण अंतःकरणानें त्या परमात्म्याच्या गुणांचें चिंतन केलें पाहिजे. तें असें—

१ त्वं विश्वेषां जनिता असः । (मं. ७)

२ कविः स्वधावान् देवः न दभायत् । (मं. ७)

" हे देवाधिदेवा ! तूंच या सर्वांचा एकच उत्पादक आहेस. हे देवा ! तूंच खरा ज्ञानी आहेस, स्वसामर्थ्यानें युक्त आहेस. त्यामुळेंच कोणीही तुला दबविणें शक्य नाहीं. " याप्रमाणें त्या परमात्म्याचें गुणगान केलें पाहिजे. तसेंच—

तस्य सम्राट् देवता बृहस्पतिः । (मं. ५)

" या जगताचा खरा सम्राट् बृहस्पति देव आहे. " या ठिकाणीं बृहस्पति म्हणजे परमात्मा असा अर्थ आहे. बृहस्पति शब्दाचा अर्थ " ज्ञानाचा स्वामी, महाविश्वाचा प्रभु " असा होतो. या सूक्ताची देवता बृहस्पतिच आहे. ही देवता परब्रह्म परमेश्वराच्या सर्वज्ञतेचें वर्णन करीत आहे.

या सूक्तांत परब्रह्माचें स्वरूप, त्याचें सामर्थ्य, त्याच्या प्राप्तीचे उपाय इत्यादि महत्वपूर्ण विषय सांगितले आहेत. जे वाचक ब्रम्हविद्येचे अभ्यासी आहेत त्यांना या सूक्ताच्या मननापासून मोठा लाभ होण्यासारखा आहे.

कांड ५, सूक्त ६

(ऋषिः- अथर्वा । देवताः - सोमारुद्रौ । १ ब्रह्म, २ कर्माणि, ३-४ रुद्रगणाः ; ५-८ सोमारुद्रौ, ९ हेतिः, १०-१४ सर्वात्मा रुद्रः ।)

ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद् वि सीमतः सुरुचो वेन आवः ।
स बुध्न्या उपमा अस्य विष्ठाः सतश्च योनिमसतश्च वि वः ॥ १ ॥
अनाप्ता ये वः प्रथमा यानि कर्माणि चक्रिरे ।
वीरान् नो अत्र मा दभन् तद् व एतत्पुरो दधे ॥ २ ॥
सहस्रधार एव ते समस्वरन् दिवो नाके मधुजिह्वा असश्चतः ।
तस्य स्पशो न नि मिषन्ति भूर्णयः पदेपदे पाशिनः सन्ति सेतवे ॥ ३ ॥
पर्यू षु प्र धन्वा वाजसातये परि वृत्राणि सक्षणिः ।
द्विषस्तदध्यर्णवेनेयसे सनिस्रसो नामासि त्रयोदशो मास इन्द्रस्य गृहः ॥ ४ ॥

अर्थ-(पुरस्तात् प्रथमं) प्राचीन कालापेक्षाहि प्रथम **(जज्ञानं ब्रह्म)** प्रगट झालेल्या ब्रह्माला (सुरुचः **सीमतः)** उत्तम प्रकाशित मर्यादांनीं (वेनः वि आवः) ज्ञानी मनुष्यानें जाणलें आहे. (सः) असा ज्ञानी (अस्य **बुध्न्याः वि-स्थाः)** याच्या आकाशसंचारी विशिष्ट रीतीनें स्थित आणि **(उप-माः)** उपमा देण्यास योग्य अशा सूर्यादि देवतांना पाहून **(सतः च असतः योनिं)** सत् आणि असत् यांच्या उत्पत्तिविषयीं **(वि वः)** विवेचन करतो. (१)

(ये प्रथमाः अनाप्ताः) जे प्रथम श्रेष्ठ ज्ञानी पुरुष होते; त्यांनीं **(वः यानि कर्माणि चक्रिरे)** तुमच्यासाठीं जीं कर्मे केलीं, तीं **(नः वीरान् अत्र मा दभन्)** आमच्या वीरांना कष्ट न देवोत. **(तत् एतत् वः पुरः दधे)** हें सर्व तुमच्यासमोर ठेवीत आहे. (२)

(दिवः सहस्रधारे नाके एव) द्युलोकाच्या सहस्रधारांनीं युक्त सुखपूर्ण स्थानांत (ते असश्चतः मधुजिह्वाः **समस्वरन्)** ते निश्चल शांत स्वभावाचे आणि मधुर बोलणारे लोक सर्व मिळून एकस्वरानें सांगतात कीं (तस्य भूर्णयः **स्पशः न निमिषन्ति)** त्याचे पकडण्यासाठीं पाश घेतलेले दूत कधींही डोळे बंद करीत नाहींत. (सेतवे पदे पदे पाशिनः **सन्ति)** बांधण्यासाठीं ठिकठिकाणीं ते पाश घेवून उभे आहेत. (३)

(वाजसातये वृत्राणि सक्षणिः) अन्नदानासाठीं प्रतिबंध करणाऱ्या शत्रूंना दूर करणारा होऊन **(उपरि सु प्र धन्व)** त्या सर्वांना चोहोंबाजूस दूर हांकवून दे; कारण कीं **(तत् द्विषः अर्णवेन अधि ईयसे)** तूं शत्रूंवर समुद्राच्या बाजूनेंहि चढाई करूं शकतोस आणि त्यामुळेंच **(सनि-स्रसः नाम असि)** तुमचें नांव सनिस्रस म्हणजे चढाई करण्यांत कुशल या अर्थाचें आहे. **(त्रयोदशः मास इन्द्रस्य गृहः)** तेरावा महिना इंद्राचें घर आहे. **(४)**

भावार्थ— सर्वांहून प्रथम प्रगट झालेल्या ब्रह्माला त्याच्या प्रकाशाच्या किरणांमुळें ज्ञानी जाणतात; आणि तेच ज्ञानी उपमा देण्यास योग्य अशा आकाशसंचारी सूर्यादि ग्रह आणि नक्षत्रांना पाहून सत् आणि असत् यांच्या मूळ उत्पत्तिस्थानासंबंधीं उपदेश करतात. (१)

पहिल्या ज्ञानी पुरुषांनीं जीं जीं प्रशस्त कामें केलीं आहेत, त्यांचें स्मरण करून तशींच कामें तुम्ही करा; आणि बालकांना आणि वीरपुरुषांना वांचवा हेंच तुम्हांला सांगणें आहे. (२)

प्रकाशपूर्ण स्वर्गधामांत राहणारे शांत आणि मधुरस्वभावाचे ज्ञानी लोक एक आवाजानें सांगतात कीं, त्या परमेश्वराचे दूत कधींही डोळे बंद ठेवीत नाहींत. स्वतःचे डोळे नेहमीं उघडे ठेवून हातांत पाश घेवून, पाप्यांना बांधण्यासाठीं ते पदोपदीं तत्पर राहातात. (३)

जे लोक अन्नदानासारख्या परोपकारी कार्यांत विघ्नें उत्पन्न करतात त्यांना दूर करा. ज्याप्रमाणें शत्रूवर जमिनीवरून चढाई करतां येते, त्याचप्रमाणें त्यांच्यावर समुद्रावरून चढाई करण्याचीहि कुशलता तूं मिळव. तेरावा महिनाहि इतर महिन्याप्रमाणें इंद्राचें घर आहे. (४)

न्वे३तेनारात्सीरसौ स्वाहा ।
तिग्मायुधौ तिग्महेती सुशेवौ सोमारुद्राविह सु मृडतं नः ॥ ५ ॥
अवैतेनारात्सीरसौ स्वाहा ।
तिग्मायुधौ तिग्महेती सुशेवौ सोमारुद्राविह सु मृडतं नः ॥ ६ ॥
अपैतेनारात्सीरसौ स्वाहा ।
तिग्मायुधौ तिग्महेती सुशेवौ सोमारुद्राविह सु मृडतं नः ॥ ७ ॥
मुमुक्तमस्मान्दुरितादवद्याज्जुषेथां यज्ञममृतमस्मासु धत्तम् ॥ ८ ॥
चक्षुषो हेते मनसो हेते ब्रह्मणो हेते तपसश्च हेते ।
मेन्या मेनिरस्यमेनयस्ते सन्तु येऽस्माँ अभ्यघायन्ति ॥ ९ ॥

अर्थ—(नु एतेन असौ अरात्सीः) निश्चयानें तूं याप्रमाणें सिद्धि प्राप्त केलेली आहेस (स्वा-हाः) आत्मसर्वस्वाचें समर्पण हाच सिद्धीचा मार्ग आहे. (तिग्मायुधौ तिग्महेती) तीक्ष्ण हत्यारें बाळगणारे आणि तीक्ष्ण अस्त्रें बाळगणारे (सुसेवौ सोमारुद्रौ) सुसेव्य असे सोम आणि रुद्र (इह नः मृडतं) येथें आम्हांला सुखी करोत. (५)

(एतेन असौ अव अरात्सीः) याप्रकारेंच तूं ही सिद्धी प्राप्त करतोस. (स्वाहा) त्याग हेंच सिद्धीचें मूळ आहे, (तिग्मायुधौ०) उत्तम शस्त्रास्त्रसंपन्न वीर येथें सर्वांना सुखी करोत. (६)

(एतेन असौ अव अरात्सीः) याप्रकारेंच तूं सिद्धि प्राप्त करतोस. (स्वाहा) त्याग हें सिद्धीचें मूळ आहे. (तिग्मा०) उत्तम शस्त्रास्त्रसंपन्न वीर येथें सर्वांना सुखी करोत. (७)

(अस्मान् अवद्यात् दुरितात् मुमुक्तं) आम्हां सर्वांना निंद्य पापांपासून सोडवा. (यज्ञं जुषेथां) यज्ञाचें सेवन करा आणि (अस्मासु अमृतं धत्तं) आमच्यांत अमृत धारण करा. (८)

हे (चक्षुषः हेते) डोळ्यांच्या शस्त्रा ! (मनसः हेते) हे मनाच्या शस्त्रा ! (ब्रम्हणः हेते) हे ज्ञानाच्या शस्त्रा ! आणि (तपसः च हेते) हे तपाच्या शस्त्रा ! (मेन्याः मेनिः असि) तूं शस्त्रांचें शस्त्र आहेस. (ये अस्मान् अभ्यघायन्ति) जे आम्हांला त्रास देतात (ते अ-मेनयः सन्तु) ते शस्त्ररहित बनोत. (९)

भावार्थ— या मार्गानें प्रत्येकास सिद्धि मिळते. परोपकारासाठीं आत्मसर्वस्वाचें समर्पण करणें हेंच सिद्धीचें मूळ आहे. उत्तम शस्त्रास्त्रधारी सेवा करण्यास योग्य असे वीर याप्रमाणें येथें सर्वांना सुखी करोत. (५)

या रीतीनेंच प्रत्येक मानव सिद्धि प्राप्त करूं शकतो. त्यागाची भावना हेंच सिद्धीचें मूळ आहे. सर्व वीरपुरुष याच मार्गानें सर्वांना सुखी करोत. (६)

याप्रमाणेंच सिद्धि प्राप्त होऊं शकते. त्यागभाव हेंच सिद्धीचें मूळ आहे. सर्व वीर याच मार्गानें सर्वांना सुखी करोत. (७)

पापापासून दूर राहा. प्रशस्त सत्कार्यें करा आणि अमरत्व प्राप्त करा. (८)

डोळे, मन, ज्ञान आणि तप हीं महान् शस्त्रास्त्रें आहेत. दुसऱ्या शस्त्रास्त्रांचींही हींच शस्त्रें आहेत. या शस्त्रांनीं त्या दुष्टांना शस्त्रहीन करा कीं जे स्वबलाच्या जोरावर दुसऱ्यांना त्रास देतात. (९)

योऽस्मांश्चक्षुषा मनसा चित्त्याकूत्या च यो अघायुरभिदासात् ।
त्वं तानग्ने मेन्यामेनीन् कृणु स्वाहा ॥ १० ॥
इन्द्रस्य गृहोऽसि । तं त्वा प्र पद्ये तं त्वा प्र विशामि सर्वगुः सर्वपूरुषः ।
सर्वात्मा सर्वतनूः सह यन्मेऽस्ति तेन ॥ ११ ॥
इन्द्रस्य शर्मासि । तं त्वा प्र पद्ये तं त्वा प्र विशामि सर्वगुः सर्वपूरुषः
सर्वात्मा सर्वतनूः सह यन्मेऽस्ति तेन ॥ १२ ॥
इन्द्रस्य वर्मासि । तं त्वा प्र पद्ये तं त्वा प्र विशामि सर्वगुः सर्वपूरुषः
सर्वात्मा सर्वतनूः सह यन्मेऽस्ति तेन ॥ १३ ॥
इन्द्रस्य वरूथमसि । तं त्वा प्र पद्ये तं त्वा प्र विशामि सर्वगुः सर्वपूरुषः
सर्वात्मा सर्वतनूः सह यन्मेऽस्ति तेन ॥ १४ ॥

अर्थ— (यः यः अघायु अस्मान्) जो कोणी पापाचरण करणारा आम्हांला (चक्षुषा मनसा चित्त्या) डोळे, मन, चित्त (च आकूत्या अभिदासात्) आणि संकल्पानें दास बनविण्याचा प्रयत्न करील, तर हे अग्नि ! (त्वं तान् मेन्या अ-मेनीन् कृणु) तूं त्यांना तुझ्या शस्त्रांनीं शस्त्रहीन कर. (स्वा- हा) आत्मसर्वस्वाचें समर्पण हाच मुक्तीचा हेतु आहे. (१०)

(इन्द्रस्य गृहः असि) तू इंद्राचें घर आहेस. मी (सर्व-गुः) सर्व प्रकारच्या गतींनीं युक्त, (सर्व-पूरुषः) सर्व पुरुषार्थाच्या शक्तींनीं युक्त, (सर्व-आत्मा) सर्व आत्मबळानें युक्त, (सर्व-तनूः) सर्व शारीरिक शक्तींनीं युक्त (यत् मे अस्ति तेन सह) जें कांहीं माझें आहे त्या सर्वांसह (तं त्वा प्रपद्ये) त्या तुला प्राप्त करतों आणि (तं त्वा प्रविशामि) त्या तुझ्यांत मी प्रवेश करतों. (११)

(इन्द्रस्य शर्म असि) इन्द्राचें तूं आश्रयस्थान आहेस. मी (सर्व-गुः) सर्व गति, पुरुषार्थ-शक्ति, आत्मबळ आणि शारीरिकशक्तीनें युक्त होऊन, आणि जें कांहीं माझ्याजवळ आहे त्यांसह तुला प्राप्त करतों आणि तुझ्यांत आश्रय घेतों. (१२)

(इन्द्रस्य वर्म असि) इन्द्राचें कवच तूं आहेस. मी सर्व गति, पौरुषशक्ति, आत्मिक आणि शारीरिक बळानीं युक्त होऊन आणि जें कांहीं मजजवळ आहे त्यांसह तुला प्राप्त करतों आणि तुझ्या आश्रयानें रहातों. (१३)

(इन्द्रस्य वरूथं असि) इंद्राची ढाल तूं आहेस. मी सर्व गति, पौरुषशक्ति, आत्मिक आणि शारीरिक बळानीं युक्त होऊन आणि जें कांहीं माझें आहे त्यांसर्वांसह मी तुला प्राप्त करतों व तुझ्या आश्रयानें रहातों. (१४)

भावार्थ— जो कोणी पापी- आततायी डोळे, मन, चित्त अथवा संकल्पानें दुसऱ्यांना दास बनविण्याचा प्रयत्न करील, त्याला तूं आपल्या शस्त्रांनीं शस्त्रहीन कर. या मार्गांत आत्मसर्वस्वाचें समर्पण हाच बंधमुक्त होण्याचा एक उपाय आहे. (१०)

सर्व गति, सर्व पुरुषार्थशक्ति, सर्व आत्मिक बल आणि संपूर्ण शारीरिक बळानें युक्त आणि दुसरें जें कांहीं माझें असें म्हणण्यास योग्य आहे, त्यांसह, मी परमेश्वराला शरण जातों. त्याच्या गृहांत प्रवेश करतों आणि तेथेंच राहतों. तेंच आमचें सर्वांचें खरें घर आणि सर्वांसाठीं सुरक्षित स्थान आहे. (११-१४)

ब्रह्मप्राप्तीचा मार्ग

या सूक्ताचा पहिला मंत्र चवथ्या कांडाच्या प्रथम सूक्ताचा पहिला मंत्र आहे (कां. ४।१।१) आणि या सूक्ताचा द्वितीय मंत्र चतुर्थ कांडाच्या सप्तम सूक्ताचा सातवा मंत्र आहे (कां. ४। ७।७); तरी या मंत्रांचे अर्थ, भावार्थ आणि स्पष्टीकरण वाचकांनीं तेथें पहावे.

जरी या सूक्ताचा द्वितीय मंत्र कां. ४।७।७ या ठिकाणीं आहे, तरी तो मंत्र त्या ठिकाणीं विष दूर करण्याच्या औषधि-प्रकरणांत आहे. त्यामुळें प्रकरणानुसार तेथें औषधि प्रकरणाचा सामान्य अर्थ तो मंत्र दर्शवितो. परंतु हें प्रकरण ब्रह्मविद्या आणि आत्मोन्नतिचें आहे. त्यामुळें ह्या प्रकरणांत या मंत्राचा अर्थ ह्या प्रकरणाला अनुकूळ होईल असा करावा लागेल आणि असें करण्यासाठीं, याला अनुकूल असेच अर्थ पहावे लागतील. हा सामान्य अर्थाचा मंत्र आहे आणि असे मंत्र निरनिराळ्या प्रकरणांत आले तरीहि ते तेथील योग्य अर्थ दाखवूं शकतात. उदाहरणार्थ- कोणी आपल्या अनुयायांना सांगितलें कीं,' तुम्ही तयार रहा, ' ही सामान्य सूचना मिळतांक्षणीच प्रत्येक शाखेचे कार्यकर्ते स्वतःच्या कर्तव्यकर्मांत तत्पर राहण्याचा इशारा समजतात, आणि या आज्ञेनुसार ब्राम्हण स्वतःच्या ज्ञानकर्मांत, क्षत्रिय युद्धकर्मांत, वैश्य स्वतःच्या व्यापार कार्यात आणि शूद्र स्वतःच्या परिचर्येच्या कार्यांत तयार होतात. एकच सामान्य आज्ञा भिन्न भिन्न श्रोत्यांना भिन्न भिन्न कार्यांसाठी प्रेरणा देऊं शकते. त्याचप्रमाणें या मंत्राची सामान्य आज्ञा चतुर्थ कांडांत (४।७।७) औषधि प्रयोगासंबंधीं प्रेरणा देते आणि येथें उपासना योगाची प्रेरणा देते. वाचकांनीं यासंबंधीं योग्य विचार करून या सामान्य मंत्राचें महत्व समजून घ्यावें.

प्रथम मंत्राचें विस्तृत स्पष्टीकरण चतुर्थ कांडाच्या सू. १, मं. १ च्या विवरणांत वाचकांनीं पहावें. या प्रथम मंत्राचा मथितार्थ असा आहे—

" ब्रम्ह सर्वांहून प्रथम प्रगट झालेलें आहे. त्याच्या प्रकाशाच्या ज्या मर्यादा आहेत त्या निरखून ज्ञानी या ब्रह्माला जाणतो. हाच ज्ञानी सूर्यादि तेजस्वी पदार्थांचें अद्भुत तेज पाहून आणि त्यांना उपमा देण्यास तें योग्य आहे असा अनुभव घेऊन, ह्या कल्पनेच्या उपलक्षणानें मूळ उत्पत्तिस्थानाच्या बाबतींत निश्चित ज्ञान प्राप्त करून त्याचा उपदेश देऊं शकतो. " (मं. १)

ज्याप्रमाणें सूर्याचा प्रकाश कोणत्याही पदार्थावर पडल्यामुळें, अर्थात् त्याच्या प्रकाशाच्या मर्यादेच्या बंधनामुळें तो पाहिला जातो— जर त्याची मर्यादा नसेल तर सूर्याचा प्रकाश पाहिलाच जाणार नाहीं, त्याचप्रमाणें परमेश्वराच्या परम तेजाचा अनुभवहि सूर्यादि विविध केंद्रांत त्याची मर्यादा असल्यामुळेंच होतो. अर्थात् जर जग उत्पन्नच झालें नाहीं तर परमेश्वराच्या अद्भुत सामर्थ्याचा अनुभव कसा येणार ? परमात्मा परम तेजस्वी आहे. सर्वांहून प्रथम अनादिकालापासून तो प्रकाशितो आहे, हें सर्व सत्य आहे; तरीहि सूर्यचंद्रादि केंद्रांत जेव्हां त्याच्या प्रकाशाची अंतिम सीमा व्यक्त होते, तेव्हांच त्याच्या सामर्थ्याचें ज्ञान होतें. घरांत खोलीमध्यें जळत असलेल्या दिव्याचा प्रकाश भिंतीवर पडल्यामुळेंच दिसतो; कारण जर भिंत तेथें प्रकाशाला प्रतिबंधकरूप नसती तर त्या प्रकाशाला कोणींही पाहूं शकलें नसतें. याचप्रमाणें विश्वरूपी ह्या घरांत परमात्मरूपी दिवा चमकत आहे. अग्नि, सूर्य, चंद्र इत्यादि देवतारूपी भिंतींवर त्याचा प्रकाश पडून तो मर्यादित झाला आहे आणि त्या मर्यादामुळेंच त्या परमेश्वराच्या शक्तींचें ज्ञान होतें. ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाचा हा एक सोपान आहे.

विश्वांत परमात्म्याच्या शक्तीचें कार्य पाहून सद्वस्तूचें मूळ आदि कारण जाणलें पाहिजे. ज्ञानी, कवि, संतच याप्रकारें परमेश्वरासंबंधीं ज्ञान प्राप्त करून घेतात आणि त्यासंबंधीं इतरांना सत्य उपदेश करतात. हा प्रथम मंत्राचा मथितार्थ आहे.

नंतर दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं—

" प्राचीन काळाच्या ज्ञानी आणि पुण्यशाली पुरुषांनीं ज्याप्रकारें पुष्कळ प्रशस्त कर्में केलीं होतीं, त्याचप्रमाणें तूंहि प्रशस्त कार्य कर. आपल्या संतानांचें आणि वीरांचें रक्षण कर आणि त्यांची उन्नति कर. हेंच तुम्हांला सांगणें आहे. " (मं. २) तुमच्या डोळ्यांपुढें जो आदर्श प्राचीनकालीन श्रेष्ठ पुरुषांनीं ठेविला होता, तोच रहावा. याचप्रमाणें प्राचीनकाळच्या श्रेष्ठ पुरुषांचें जीवन-चरित्र तूं तुझ्यासमोर ठेव व त्यांच्यासारखें होण्याचा प्रयत्न कर. त्यांनीं परमार्थसाधन करतां

करतांहि संसार कसा केला, परमेश्वराची भक्ति करतां करतां स्वतःच्या मुलांबाळांची उन्नति कशी केली, स्वतःच्या संतानांना विनाशापासून कसें वाचविलें इत्यादि गोष्टींचे त्यांच्या चरित्रांतून मनन करून, त्या गोष्टी तुझ्या स्वतःच्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न कर आणि त्याप्रमाणें स्वतःचें आचरण ठेवून स्वतःचा उन्नति करून घे. हा उपदेश या द्वितीय मंत्रापासून प्राप्त होतो.

हा सामान्य व्यवहाराचा मंत्र वैद्यकप्रकरणांत वैद्यकीय व्यवहार उत्तमरीतीनें करण्याची प्रेरणा देतो आणि येथें या आत्मोन्नतीच्या प्रकरणांत, संसार करीत असतां परमार्थ कसा साधावा या संबंधीं प्रेरणा देतो. याप्रकारें सामान्य मंत्राचे महत्व वाचकांनीं याठिकाणीं लक्षांत घ्यावें, म्हणजे वेदाच्या या अद्‌भुत शैलीचें रहस्य त्यांच्या लक्षांत येईल.

ह्या दोन मंत्रांचा याप्रमाणें गुह्यार्थ समजून घेतल्यावर आतां आपण तिसऱ्या मंत्राच्या अर्थाच्या मननाकडे वळूं—

स्वर्गांतील महान् संतपुरुषांची घोषणा

ज्यांना स्वर्गसुखाचा अनुभव प्राप्त झाला आहे, त्या संतांनीं जनतेच्या कल्याणासाठीं जो उपदेश केला आहे, तो उपदेश या तृतीय मंत्रांत देण्यांत आला आहे.

ते असश्चतः मधुजिह्वाः सहस्रधारे दिवो नाके समस्वरन् । (मं. ३)

" ते स्थितप्रज्ञ, मधुर भाषण करणारे, सहस्रधारांनीं ज्या ठिकाणीं अमृत मिळतें त्या द्युलोकाच्या स्थानाचा अनुभव घेणारे संतपुरुष एकमुखानें हा उपदेश करतात. "

अर्थात् ते जनतेच्या कल्याणासाठीं एकमुखानें खालील उपदेश करतात—

तस्य भूर्णयः स्पशः न निमिषन्ति ।
सेतवे पदे पदे पाशिनः सन्ति ॥ (मं. ३)

" दुष्टांना पाशांनीं बांधणारे ते परमेश्वराचे दूत स्वतःचे डोळे कधीं बंद करीत नाहींत. अर्थात् लोकांच्या पुण्य–पापांना उघड्या डोळ्यांनीं नेहमीं पाहत असतात. पापी लोकांना पाशांनीं बांधण्यासाठीं स्वतःच्या पाशांसह सर्व जगांत प्रत्येक ठिकाणीं ते नेहमीं तयार असतात. "

अर्थात् त्यांच्या दृष्टींतून कोणी पापी कधींही निसटत नाहीं. प्रत्येक पापी मनुष्याला त्याच्या पापाप्रमाणें दंड देण्यासाठीं हे दूत नेहमीं तत्पर राहतात आणि पापी माणसाला अवश्य बंधनांत टाकतात. यामुळे कोणाही पाप्यानें असें मानूं नये कीं पाप करून तो परमेश्वराच्या शिक्षेतून सुटेल. ठिकठिकाणीं परमेश्वराचे दूत स्वतःचे नेत्र उघडे ठेवून उभे आहेत. ते पाप्यांना तत्काळ पकडतात. या दूतांचा त्यांना पकडण्याचा प्रबंध इतका कांहीं व्यवस्थित असतो कीं, पाप्याला पुष्कळवेळां असेंच वाटत असतें कीं तो अगदीं स्वतंत्र आहे; परंतु खरें पहातां तो त्यावेळीं संपूर्ण बंधनांतच असतो. परमेश्वराची व्यवस्था इतकी अद्‌भुत असते. यासाठीं सर्व मनुष्यांनीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं धर्मानुकूल योग्य व्यवहार दक्षतेनें करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. पापाचरणापासून स्वतःचा बचाव करावा आणि अशाप्रकारें सावधानतापूर्वक आचरण करून परमात्म्याच्या या गुप्तचरांपासून आपला बचाव करावा. कोणी चोरून पाप करील आणि तें पाप गुप्त राहील, ही असंभवनीय गोष्ट आहे. यासाठीं विशेष सावध व दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. जर कोणी एखादा मनुष्य पुण्यमार्गाचें अनुसरण करणारा असेल तर त्याचें उत्तम रक्षणही हे परमेश्वराचे दूत तितक्याच सावधगिरीनें करीत असतात आणि त्यामुळेंच पुण्यात्म्याला कधींही कोणाचेंही भय नसतें.

जे वाचक या मंत्राचा उत्तम प्रकारें विचार करतील त्यांचें आचरण खात्रीनें सुधारेल, यांत कांहीं संशय नाहीं. जर आत्मशक्तीचा विकास करण्याची वाचकांची इच्छा असेल तर परिशुद्ध आचरणाची आवश्यकता त्यांनीं स्मरणांत ठेवावी. हा उपदेश या मंत्रद्वारें उत्तमरीतीनें मिळतो.

शत्रूंना पळवून लावणें

चवथ्या मंत्रांत शत्रूंच्या लक्षणाचें वर्णन करून त्यांना दूर करण्याचा उपदेश सांगितलेला आहे. " वृत्र " शब्दाचा अर्थ येथें शत्रुवाचक आहे. जे घेरतात, जे चोहोंबाजूंनीं प्रतिबंध उत्पन्न करतात, विशेषतः (वाज–सातये) अन्नदानादि परोपकारी कृत्यांत जे विघ्नें आणतात, ते शत्रू आहेत. वाचक जर विचार करतील तर अशा अडचणी उत्पन्न करणारे शत्रु कोण आहेत, हें त्यांच्या लक्षांत येईल. धार्मिक, सामाजिक, राष्ट्रीय, वैयक्तिक अथवा सांघिक अडचणी उत्पन्न करणारे अनेक शत्रु विद्यमान आहेत. त्यांना दूर करून स्वतःच्या उन्नतिचा मार्ग मोकळा करून घेण्याची आवश्यकता आहे. अशा शत्रूंना (**परि सु प्र धन्व**) सर्व बाजूंनीं योग्य प्रतिबंध करून घालवून द्या. स्वतःजवळ त्यांना फिरकूं देऊं नका. शत्रूंवर जमिनीवरून तसेंच समुद्रावरूनही चढाई करतां येते. याठिकाणीं एकच पद्धति नाहीं. वाटेल त्या रीतीनें शत्रूंना दूर पळवून लावून स्वतःच्या उन्नतिचा मार्ग

मोकळा करून घेतला पाहिजे. स्वतःच्या उन्नतिचा मार्ग प्रतिबंध रहित होणें याचेंच नांव मुक्ति. तो मार्ग या मंत्रानें दाखविला आहे. हा मार्ग आध्यात्मिक मुक्तिसाठीं आणि सामाजिक व राष्ट्रीय मुक्तीला अत्यंत उपयुक्त आहे.

सिद्धीचा मार्ग

शत्रूंचा प्रतिबंध दूर करणें, स्वतःचा मार्ग प्रतिबंधरहित करणें आणि स्वतंत्रता प्राप्त करणें, हा उपदेश या चार मंत्रांत वर दाखविल्याप्रमाणें करण्यांत आला आहे. आतां ही सिद्धि कशाप्रकारें होऊं शकेल याचा विचार करावयाचा आहे. यासाठीं खालीलप्रमाणें मंत्र आहेत—

एतेन नु अरात्सीः (मं. ५)
एतेन अव अरात्सीः (मं. ६)
एतेन अप अरात्सीः (मं. ७)

" या मार्गानेंच तूं सिद्धि प्राप्त करूं शकशील. " अर्थात् पूर्वोक्त चार मंत्रांत जो धर्ममार्ग सांगितला आहे तो आचरणांत आणूनच मनुष्याला सिद्धि मिळवितां येते. या चार मंत्रांत जो धर्म सांगितला आहे त्याचें संक्षिप्त स्वरूप असें आहे.

(१) परमेश्वराची भक्ति करावी,
(२) श्रेष्ठ पुरुषांचा आदर्श आपल्या समोर ठेवावा,
(३) पापाचें भय धारण करावें, आणि
(४) प्रतिबंधक विघ्न अथवा शत्रूंना दूर करावें.

हीं उन्नतीचीं चार सूत्रें आहेत. या सूत्रांप्रमाणें आचरण करणाऱ्या मनुष्याची उन्नति होऊ शकते. या उन्नतिच्या मार्गांत एका गोष्टीची अत्यंत आवश्यकता आहे आणि ती आहे ' स्वाहा करणें. ' स्वाहा करण्याचा अर्थ आतां पहा—

स्वा–हा करा !

या सूक्ताच्या ५ ते ७ या तीन मंत्रांत व दहाव्या मंत्रांत मिळून चार वेळां ' स्वा–हा ' शब्द आलेला आहे. याप्रमाणें या सूत्रांत अनेकदां आणि वारंवार स्वाहा शब्द आल्यानें याचें महत्त्व या सूत्रांत सांगितलेल्या सिद्धीसाठीं पुष्कळ आहे; म्हणून आतां स्वाहा शब्दाचा अर्थ पाहूं—

(स्व) स्वतःचें सर्वस्व (हा) समर्पण करणें, हा स्वाहा शब्दाचा अर्थ आहे. स्वतःच्या अधिकारांत जें तन, मन, धन वगैरे आहे तें सर्व जनतेच्या कल्याणासाठीं समर्पण करणें म्हणजे स्वाहा करणें होय. स्वतःच्या शक्तीचा व्यय केवळ स्वतःच्या भोगविलासांत न करतां, सर्व समाजाच्या कल्याणार्थ प्रशस्त कार्यें करण्यांत ती शक्ति खर्च करावी असा अर्थ स्वाहा शब्दानें सूचित करण्यांत आला आहे; म्हणूनच यज्ञांत हवनाचें वेळीं स्वाहा शब्दाचा उच्चार करण्यांत येतो. त्याचा अर्थच मुळीं असा आहे कीं यज्ञांत दिलेली ही आहुति दुसऱ्यांच्या उन्नतिसाठीं दिलेली आहे. ती आहुती देऊन मी माझ्या भोगेच्छा वाढविण्याची इच्छा करीत नाहीं. यज्ञ खरोखर आपल्याला हीच शिकवण देतो. विद्यायज्ञ, ज्ञानयज्ञ, द्रव्ययज्ञ, इत्यादि अनंत यज्ञ आहेत. त्यांचा अर्थच हा आहे कीं द्रव्य, ज्ञान, विद्या इत्यादि सर्व परोपकारार्थ समर्पण करावें आणि तें फक्त स्वतःच्याच भोगविलासांत खर्च करूं नयेत. परोपकारासाठीं आत्मसर्वस्वाचें समर्पण करणें हाच स्वाहाकार होय. हा स्वाहाकार करण्यानेंच या सूक्तांत सांगितल्याप्रमाणें परमोच्च सिद्धि प्राप्त होऊं शकते. जितका हा स्वाहाकार जास्त, तितकी सिद्धिही अधिक होईल. सिद्धिसाठीं या स्वाहाकाराची अत्यंत आवश्यकता आहे. मं. ५ ते ७ पर्यंत तिन्ही मंत्रांत तीन वेळां लागोपाठ असें सांगण्यानें या आत्मसमर्पणाचें अत्यंत महत्त्व सिद्ध होतें. जगांत पाहिलें असतांही आपल्याला हेंच दिसून येतें कीं, त्याग करणाऱ्यांनाच समाजांत मोठा मान मिळतो आणि स्वार्थी माणसाला तो मिळत नाहीं. अर्थात् स्वार्थत्याग ज्याप्रमाणें जगाच्या सामान्य व्यवहारांतहि मान मिळविण्यास आवश्यक आहे त्याचप्रमाणें परमार्थ साधनांतहि त्याची जरूरी आहेच.

सोम आणि रुद्र

या जगांत शांति आणि उग्रता वाढविणाऱ्या दोन शक्ति आहेत. त्यांचीं नांवें वेदांत " सोम–रुद्र, अग्नि–सोम, इंद्र–सोम " अशीं आलेलीं आहेत. सोमशक्ति जगांत शांति वाढविणारी आहे आणि रुद्रशक्ति उग्रता वाढविणारी आहे. प्रत्येक ठिकाणीं या दोन्ही शक्ति काम करीत असतात. एकाद्या ठिकाणीं एक शक्ति कमी असेल तर दुसरी प्रबळ असते. जी प्रबळ असते, तिचा प्रभाव अधिक असतो. अर्थात् ज्या व्यक्तींत सोमशक्तीचा प्रभाव अधिक असेल ती व्यक्ति शांत, गंभीर आणि विवेकी असते, आणि ज्या व्यक्तींत रुद्रशक्तीचा प्रभाव अधिक असेल ती व्यक्ति शूर, वीर, युद्धप्रिय, क्रूर अथवा कठोर असते. याप्रमाणें मनुष्याची स्वाभाविक प्रवृत्ति पाहून आपल्या चटकन् ध्यानांत येईल कीं त्याच्यांत कोणती शक्ति प्रबळ आहे व कोणत्या शक्तीची न्यूनता आहे.

ज्या प्रमाणांत व्यक्तीमध्यें सोम व रुद्र शक्तीची न्यूनाधिकता असते त्या प्रमाणांत समाज अथवा जातींमध्येंही या शक्तींची

न्यूनाधिकता असते. याच कारणानें समाजांत ब्राह्मण आणि क्षत्रिय हे वर्ण अनुक्रमें शांत स्वभावाचे आणि उग्र स्वभावाचे असतात. ब्राह्मणांची शांति व क्षत्रियांची उग्रता याच कारणानें प्रसिद्ध आहे! म्हणून सोमारुद्रौ ह्या देवतावाचक शब्दानें आदर्श ब्राह्मण-क्षत्रियांचा बोध होतो.

मंत्र ५ ते ७ पर्यंत या तीन मंत्रांत 'सोमारुद्रौ' देवता आहे. "या दोन्ही देवता आम्हांला सुखी करोत" अशी प्रार्थना या तीन मंत्रांत आहे. व्यक्तीमध्यें असणारी शांति आणि उग्रता त्याच्या हितासाठीं सहाय्यक व्हावी अर्थात् मनुष्याची शांति त्याला शिथिल बनवणारी न व्हावी व मनुष्याची उग्रता त्याला हिंसक न करो असा अर्थ या ठिकाणीं अभिप्रेत आहे. समाजांतही शांति प्रिय ब्राह्मण आणि युद्धप्रिय क्षत्रिय परस्पर सहायकारी होऊन परस्परांची उन्नति करीत राष्ट्राचा उद्धार करणारे व्हावेत. या प्रमाणें मनुष्याची वैयक्तिक उन्नति होत रहावी आणि सर्वांचें सुख वाढत रहावें व कोणीहि हीन वा दीन न व्हावें. वर सांगितल्याप्रमाणें मनुष्यानें त्यागभावनेनें स्वार्थत्याग व आत्म-समर्पण करून शांति व उग्रतेचें योग्य सहाय्य घेऊन सिद्धि प्राप्त करावी. हें तात्पर्य या तीन मंत्रांचें आहे. या मंत्रांचा विचार केला असतां, कोणत्या रीतीनें स्वार्थत्याग व आत्मोन्नतिच्या मार्गाचें आत्मसमर्पणपूर्वक अनुसरण करून मनुष्य स्वतःची उन्नति कशी प्राप्त करून घेऊं शकतो, हें वाचकांच्या लक्ष्यांत येईल. या तीन मंत्रांचें तात्पर्यच निराळ्या शब्दांत आठव्या मंत्रांत सांगितलें आहे. या आठव्या मंत्राचे तीन भाग आहेत—

तीन उपदेश

१ अवद्यात् दुरितात् अस्मान् मुमुक्तम्। (मं. ८)
२ यज्ञं जुषेथाम्। (मं. ८)
३ अस्मासु अमृतं धत्तम्। (मं. ८)

"(१) निंद्य पापाचरणापासून आम्हाला मुक्त कर, (२) यज्ञाचें सेवन कर, (३) आमच्यांत अमृत धारण कर." हे तीन उपदेश आठव्या मंत्रांत आहेत. पापाचरणापासून दूर राहणें, आत्मसमर्पणरूप यज्ञ करणें आणि शेवटीं अमृतत्व प्राप्त करणें, हे तीन उपदेश वरील मंत्राचे साररूप आहेत. "पापापासून दूर राहणें, सत्कर्म करणें आणि मृत्यूला दूर करून अमृतत्व प्राप्त करणें." असे हे सर्व धर्माचे नियम या तीन मंत्रभागांत समाविष्ट झाले आहेत. अमृतत्व प्राप्त करणें हें मानवाचें साध्य आहे. त्याचें साधन यज्ञ म्हणजेच सत्कर्माचें अवलंबन आणि पापाचरणाचा निषेध आवश्यक आहे. याप्रमाणें हा त्रिवृत यज्ञ आहे. हा उपदेश मनुष्याच्या मनांत स्थिर झाला तर त्याची उन्नति होऊन तो निःसंशय कृतार्थ होईल. किती व्यापक महत्वाचा उपदेश, किती थोडक्या शब्दांत वेदानें केला आहे, ह्याचा विचार वाचक करतील तर या उपदेशाचें महत्व व मर्म त्यांच्या सहज ध्यानांत येईल.

शस्त्रांचें शस्त्र

शत्रूंना दूर घालवून देण्याचा उपदेश या पूर्वीं पुष्कळ वेळां केलेला आहे. त्याचें पालन करण्यासाठीं शत्रूंच्या शस्त्रास्त्रांपेक्षां आपलीं स्वतःचीं शस्त्रास्त्रें वाढविण्याची आवश्यकता असते. अर्थात् आपलीं शस्त्रें पाहून शत्रूही स्वतःचीं शस्त्रें वाढवितोच. याप्रमाणें दोघांचींही शस्त्रास्त्रें वाढत राहिलीं तर तीं इतकीं वाढतात कीं त्यांना कांहींच परिमिति रहात नाहीं. यानंतर जें राष्ट्र अत्यधिक शस्त्रास्त्रांनीं सुसज्जित असतें, त्याचें नियमन कसें करावें हा प्रश्न विचारी माणसासमोर उपस्थित होतो. या प्रश्नाचें उत्तर नवव्या मंत्रांत दिलें आहे—

चक्षुषः मनसः ब्रह्मणः तपसः हेतिः मेन्याः मेनिः
(मं. ९)

"डोळे, मन, ज्ञान आणि तप यांचीं जीं शस्त्रें आहेत तीं शस्त्रांचींही शस्त्रें आहेत." अर्थात् शस्त्रांहून पुष्कळपट शक्ति यांच्यांत आहे. यांच्यांत जें आत्मबळ असतें तें शस्त्रास्त्रांच्या बळापेक्षां कितीतरी पट अधिक समर्थ आणि बलवान असतें. यावरून शस्त्रास्त्रांच्या पाशवी बळाचा प्रतिकार नेत्र, मन, ज्ञान, तपरूपी आत्मबलाच्या आध्यात्मिक शक्तीनें केला जाऊं शकतो. केवळ दृष्टीक्षेपानें, केवळ मनाच्या संकल्पानें, केवळ ज्ञानाच्या योगानें, किंवा तपाच्या प्रभावानें पाशवीशस्त्रांचा प्रतिकार होऊं शकतो. लोखंडाची शस्त्रास्त्रें क्षत्रियांचीं असतात आणि हें आत्मिक बळ ब्राह्मणांचें असतें. विश्वामित्राचीं पाशवी शस्त्रें, तपस्वी वसिष्ठाच्या इच्छाशक्तीसमोर व्यर्थ ठरलीं, ही ऐतिहासिक कथा याठिकाणीं पहाण्यासारखी आहे.

पाशवीबळाचा आत्मिकबळानें प्रतिकार

ज्याच्याजवळ पाशवी बळ वाढतें तो स्वतःचें सुख वाढविण्या-साठीं दुसऱ्यांवर अत्याचार करतो. यामुळें तो (अघ+आयुः) ज्याचें आयुष्य पापमय झालेलें आहे असा पापी होतो. ज्या-प्रमाणें एक पापी व्यक्ति दुसऱ्यावर अत्याचार करते, त्याप्रमाणें पाशवी शस्त्रास्त्रांनीं सुसज्ज असें पापी राष्ट्रही दुसऱ्या राष्ट्रावर अत्याचार करतें व त्यामुळें तें राष्ट्रही 'अघ-आयु' म्हणजे पापी राष्ट्र म्हटलें जातें. त्यासंबंधींचें वर्णन खालीलप्रमाणें आहे—

ये अस्मान् अभ्यघायन्ति । (मं. ९)
यो अघायुः अस्मान् अभिदासात् । (मं. १०)

" जे आम्हांला सर्व बाजूंनीं पापाचरणानें दुःख देतात, जे पापी आम्हांला दास बनविण्याची इच्छा करतात अथवा आमच्या सर्वस्वाचा नाश करण्याची इच्छा करतात. " या मंत्रांत पाशवी अत्याचारांचें स्वरूप दाखविलें आहे. (१) दुसऱ्याचा घात पाप-पुण्याचा विचार न करतां करणें, आणि (२) दुसऱ्याच्या सर्वस्वाचा नाश करणें. हें पाशवी अत्याचाराचें स्वरूप आहे. जगांत प्रवर्तित असलेली गुलामी आणि लोकांचीं सर्व दुखें यांचें हेंच मुख्य कारण आहे. ' एक बलवान् दुसऱ्या निर्बलाला आपल्या उदरपूर्तिसाठीं खात आहे ' हें वाचकांना जगाच्या इतिहासांत आढळून येईल. हाच पाशवी अत्याचार आहे. या बलवानाच्या पाशवी शस्त्रास्त्रांना निर्बळ करण्याचा उपाय केवळ आत्मिकबळ हाच आहे—

चक्षुषा मनसा चित्त्या आकूत्या मेन्या तान् अमेनीन् कृणु । (मं. १०)
ब्रह्मणः तपसः च मेन्या ते अमेनयः सन्तुः । (मं. ९)

" डोळे, मन, चित्त आणि संकल्परूपी शस्त्रांनीं त्या अत्याचारी शत्रूंना शस्त्ररहित कर. ज्ञान आणि तपाच्या शस्त्रांनीं त्यांना शस्त्रहीन कर. "

अर्थात् पाशवीशस्त्रांचा सामना या आत्मिकबळानें कर. आपले डोळे, मन, चित्त, संकल्प, ज्ञान आणि तप हींच आत्म्याचीं शस्त्रें आहेत. त्यांना तूं तेजस्वी कर आणि त्यायोगें लोखंडी शस्त्रांचा प्रतिकार कर. तुमच्यांत हें आत्मिबळ ज्या प्रमाणांत वाढेल त्या प्रमाणांत शत्रूंचें पाशवीबळ सत्वहीन होईल. पाशवीशक्तीचा प्रतिकार करण्याचा हाच सनातन मार्ग आहे. या मार्गानेंच वसिष्ठानें विश्वामित्राचा आणि प्रल्हादानें हिरण्यकश्यपुचा प्रतिकार केला होता. या आत्मिकबळाच्या मार्गानें शेवटीं निःसंदेह विजय होईल. सर्वांहून अधिक प्रभावी हें आत्मिक बळ आहे. जे पाशवीशक्तिसंपन्न आहेत ते स्वतःच्या लोखंडीशस्त्रास्त्रांच्या घमेंडीवर आत्मिकबळ वाढविण्याचा प्रयत्न करीत नाहींत अथवा अत्याचारी प्रवृत्तिमुळें स्वतःचें आत्मिकबळ वाढवूं शकत नाहींत.

अनत्याचारी, शांतिपूर्ण, अहिंसामय आत्मिकबळाच्या मार्गानें जाणारे लोक जितका स्वतःचा मार्ग जास्त चालूं शकतील तितका त्यांचा विजय वाढतच जाईल, कारण त्यांचे शत्रू या मार्गांत येत नाहींत आणि जरी ते या मार्गावर आले तरी जय आत्मिकबळानें युक्त असणाराचाच होईल. त्याचें कारण हें आहे कीं जर या मार्गावर येण्यासाठीं ते शत्रु अहिंसामय, अनत्याचारी झाले तर दुःखाचें मूळच नष्ट होईल व शत्रुत्वच उरणार नाहीं. उदाहरणार्थ, वसिष्ठाच्या आत्मबळाला पाहून विश्वामित्रानें अत्याचारी क्षात्रबळाचा त्याग केला आणि शांतिमय, अनत्याचारी ब्रह्मबलाचा स्वीकार केला, त्यामुळें दोघांत शत्रुत्वाचें कारणच राहिलें नाहीं. अशाप्रकारें आत्मबलशाली व्यक्तींचा सदा, सर्वत्र विजयच होत रहातो.

या आत्मिकबळानें पाशवी अत्याचारांचा निरोध करण्यासाठीं ' स्वा-हा ' अर्थात् आत्मसर्वस्वाचें समर्पण करण्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठीं दहाव्या मंत्रांत पुन्हां ' स्वाहा ' शब्दाच्याद्वारें आत्मत्यागाचा उपदेश केला आहे. वाचकांनीं या ठिकाणीं हें लक्षांत ठेवावें कीं, अत्यंत स्वार्थत्याग केल्याशिवाय ही आत्मशुद्धि आणि आत्मबळाच्या मार्गावर चालणें अशक्य आहे. या आत्मसर्वस्वाच्या समर्पणाचें स्वरूप पहा—

आत्मसमर्पण

' स्वतःचें म्हणून जें जें कांहीं आहे तें सत्कार्यांत समर्पण करणें यालाच आत्मसमर्पण म्हणतात. ' याचें वर्णन असें आहे—

यत् मे अस्ति तेन सह सर्वतनूः सर्वगुः, सर्वात्मा, सर्वपूरुषः त्वा प्रपद्ये, त्वा प्रविशामि ॥ ११-१४ ॥

" जें कांहीं माझें आहे तें बरोबर घेऊन, तसेंच सर्व शरीर, सर्व इंद्रियें, सर्व आत्मशक्ति, सर्व पुरुषार्थशक्तींसह मी तुला प्राप्त होतों व तुझ्यांत प्रवेश करतों. "

या मंत्रांत स्वार्थ समर्पणाची परमसीमा वर्णन केली आहे. या जगांत माझें म्हणून जें कांहीं आहे तें सर्व परमार्थ सिद्धीसाठीं मी समर्पण करतों; आणि त्यांबरोबर माझें शरीर, माझीं इंद्रियें, माझें मन इत्यादि शक्ति आणि सर्व पुरुषार्थशक्ति मी ह्या परमकार्यांसाठीं समर्पण करतों; अर्थात् जें कांहीं माझें असें आहे तें सर्व ध्येयसिद्धिसाठीं समर्पण करतों. याप्रमाणें " स्वाहा " शब्दाचा स्पष्ट अर्थ या मंत्रद्वारें सांगण्यांत आला आहे. या मंत्रांच्या अध्ययनानें आत्मसमर्पणाचा भाव किति व्यापक आहे ही गोष्ट लक्षांत येते. याप्रमाणें आत्मसमर्पण जे करूं शकतात ते त्यागीच शेवटीं बंधमुक्त होऊन अमृतत्व प्राप्त करूं शकतात आणि ते कोणत्याही पाशवीशक्तींनीं बांधलें जात नाहींत.

याप्रमाणें या सूक्तांत आत्मोन्नतिच्या मार्गाचा उपदेश केला आहे. या मार्गानें आत्मशुद्धि होऊन वैयक्तिक, सामाजिक, राजकीय आणि पारमार्थिक उन्नतिचें साधन मनुष्य करूं शकतो. हें सूक्त अनेक दृष्टींनीं मनन करण्यास योग्य आहे. जे वाचक याप्रमाणें या सूक्ताचें मनन करतील ते स्वतःच्या उद्धारासाठीं उत्तम बोध यांतून प्राप्त करूं शकतील.

ज्येष्ठ ब्रह्माचें वर्णन

कांड १०, सूक्त ८

(ऋषिः – कुत्सः । देवता – आत्मा)

यो भूतं च भव्यं च सर्वं यश्चाधितिष्ठति ।
स्व१र्यस्य च केवलं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः ॥ १ ॥
स्कम्भेनेमे विष्टभिते द्यौश्च भूमिश्च तिष्ठतः ।
स्कम्भ इदं सर्वमात्मन्वद्यत्प्राणन्निमिषच्च यत् ॥ २ ॥
तिस्रो ह प्रजा अत्यायमायन् न्य१न्या अर्कमभितोऽविशन्त ।
बृहन् ह तस्थौ रजसो विमानो हरितो हरिणीरा विवेश ॥ ३ ॥
द्वादश प्रधयश्चक्रमेकं त्रीणि नभ्यानि क उ तच्चिकेत
तत्राहतास्त्रीणि शतानि शङ्कवः षष्टिश्च खीला अविचाचला ये ॥ ४ ॥
इदं सवितर्वि जानीहि षड्यमा एक एकजः ।
तस्मिन् हापित्वमिच्छन्ते य एषामेक एकजः ॥ ५ ॥
आविः सन्निहितं गुहा जरन्नाम महत्पदम् ।
तत्रेदं सर्वमार्पितमेजत्प्राणत्प्रतिष्ठितम् ॥ ६ ॥

अर्थ— (यः भूतं भव्यं) जें भूतकाळांत आणि भविष्यकाळांत, तसेंच वर्तमानकाळांत (यत् सर्वं अधितिष्ठति) जें सर्वांवर अधिष्ठित होऊन रहातें (यस्य च केवलं स्वः) ज्याचें केवल प्रकाशमय स्वरूप आहे (तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः) अशा श्रेष्ठ ब्रह्माला नमस्कार असो. (१)

(स्कंभेन वि-स्तभिते) या सर्वाधार परमात्म्यानें स्थापित केलेले (द्यौः च भूमिः च तिष्ठतः) द्युलोक आणि भूलोक हे टिकून राहिलेले आहेत (यत् प्राणत् यत् निमिषत् च) जें प्राण धारण करतें आणि जें डोळ्यांची उघड झांप करतें (इदं सर्वं आत्मन्वत् स्कम्भे) हें सर्व या आत्म्यानें युक्त विश्व स्कंभांत आधार स्तंभांत आहे. (२)

(तिस्रः ह प्रजाः अत्यायं आयन्) तीन प्रकारच्या प्रजा अतिक्रमणाला प्राप्त होतात (अन्याः अर्कं अभितः नि अविशन्त) एक प्रकारची –सत्वगुण प्रधान प्रजा– सूर्याला प्राप्त करते; दुसरी (बृहन् ह रजसः विमानः तस्थौ) महान् रजो लोकांत विस्तृत होऊन राहते आणि तिसरी (हरिणीः हरितः आविवेश) हरण करणाऱ्या हरिद्वर्णाला प्राप्त करते. (३)

(द्वादश प्रधयः) बारा श्रेष्ठ बुद्धि आहेत, (एकं चक्रं) एक चक्र आहे, (त्रीणि नभ्यानि) तीन नाभि आहेत, (कः उ तत् चिकेत) त्याला कोण जाणूं शकतो ! (तत्र त्रीणि शतानि षष्टिः च शङ्कवः आहताः) त्या चक्रांत तीनशे साठ खुंट्या लावलेल्या आहेत आणि तितकेच (खीलाः) खिळे मारलेले आहेत, (ये अविचाचलाः) जे मुळींच हालत नाहींत. (४)

हे (सवितः) सूर्या ! (इदं विजानीहि) तूं हें जाण कीं येथें (षट् यमाः एकः एकजः) सहा जोड्या आहेत व एक एकटा आहे. (यः एषां एकजः एकः) यांत जो एकटाच एक आहे (तस्मिन्) त्यांत (ह आपित्वं) निश्चयपूर्वक स्वतःचा संबंध जोडण्याची दुसरे (इच्छन्ते) इच्छा करीत असतात. (५)

एकचक्रं वर्तत एकनेमि सहस्राक्षरं प्र पुरो नि पश्चा ।
अर्धेन विश्वं भुवनं जजान यदस्यार्धं क्व १ तद्बभूव ॥ ७ ॥
पञ्चवाही वहत्यग्रमेषां प्रष्टयो युक्ता अनुसंवहन्ति ।
अयातमस्य ददृशे न यातं परं नेदीयोऽवरं दवीयः ॥ ८ ॥
तिर्यग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्नस्तस्मिन् यशो निहितं विश्वरूपम् ।
तदासत ऋषयः सप्त साकं ये अस्य गोपा महतो बभूवुः ॥ ९ ॥
या पुरस्ताद्युज्यते या च पश्चाद्या विश्वतो युज्यते या च सर्वतः ।
यया यज्ञः प्राङ् तायते तां त्वा पृच्छामि कतमा सर्चाम् ॥ १० ॥
यदेजति पतति यच्च तिष्ठति प्राणदप्राणन्निमिषच्च यद्भुवत् ।
तद्दाधार पृथिवीं विश्वरूपं तत्संभूय भवत्येकमेव ॥ ११ ॥
अनन्तं विततं पुरुत्रानन्तमन्तवच्चा समन्ते ।
ते नाकपालश्चरति विचिन्वन्विद्वान्भूतमुत भव्यमस्य ॥ १२ ॥

अर्थ—(गुहा जरन् नाम) गुहेंत संचार करणारें जें (महत्पदं) मोठें प्रसिद्ध स्थान आहे (आविः सन्निहितं) तें प्रगट होण्यास योग्य असें जवळच आहे. (एजत् प्राणत्) तें कंपायमान् आणि प्राणवान् आहे, (तत्र इदं सर्वं आर्पितं प्रतिष्ठितं) तें त्या गुहेंत समर्पित आणि प्रतिष्ठित आहे. (६)

(एकचक्रं एकनेमि वर्तते) एक चाक एकच मध्यें नाभि असलेलें आहे, जें (सहस्र-आरं प्रपुरः नि पश्चा) हजारों आऱ्यांनीं युक्त असून तें पुढें मागें होत असतें. (अर्धेन विश्वं भुवनं जजान) अर्ध्यानें सर्व भुवनें बनविलीं आहेत आणि (अस्य यत् अर्धं क तत् बभूव) जो याचा अर्धभाग आहे तो कोठें राहिला आहे ? (७)

(एषां पञ्चवाही अग्रं वहति) यांतून जी पांचांनीं उचलली जाते ती शेवटपर्यंत जाऊं शकते (प्रष्टयः युक्ताः अनुसंवहन्ति) जे अश्व जोडलेले आहेत ते उत्तमप्रकारें भार सहन करीत आहेत. (अस्य अयातं ददृशे, न यातं) याचें न चालणेंच दिसतें, पण चालणें दिसत नाहीं. त्याचप्रमाणें (परं नेदीयः अवरं दवीयः) फार दूर जें आहे, तें फारच जवळ आहे, आणि जें जवळ आहे, तें फार दूर आहे. (८)

(तिर्यग्बिलः ऊर्ध्वबुध्नः चमसः) वाकड्या मुखाचें आणि वरच्या पाठीचें एक कलशपात्र आहे, (तस्मिन् विश्व-रूपं यशः निहितं) त्यांत नाना रूपांचें यश ठेवलेलें आहे, (तत् सप्तऋषयः साकं आसत) त्यांत सात ऋषि जवळ जवळ बसलेले आहेत (ये अस्य महतः गोपाः बभूवुः) जे या महानुभावाचे संरक्षक आहेत. (९)

(या पुरस्तात् युज्यते याच पश्चात्) जें पुढें मागें जोडलेलें असतें (या विश्वतो युज्यते या च सर्वतः) जें चारी बाजूंनीं सर्व रीतीनें जोडलेलें असतें, (यया यज्ञः प्राङ् तायते) ज्यामुळें यज्ञ पूर्वेकडे पसरविला जातो, (तां त्वा पृच्छामि) त्या विषयीं मी तुला विचारतों (ऋचां सा कतमा) ऋचांमध्यें ती कोणती ऋचा आहे ? (१०)

(यत् एजति, पतति, यत् च तिष्ठति) जें कांपतें, जें पडतें आणि जें स्थिर राहातें (यत् प्राणत्, अप्राणत् निमिषत् च भुवत्) जें प्राणांना धारण करतें, जें प्राणरहित आणि जें डोळ्यांची उघडझांप करतें, आणि जें सर्वदा विद्यमान् आहे (तत् विश्वरूपं पृथिवीं दाधार) तें विश्वरूपी सत्व या पृथ्वीला धारण करतें (तत् संभूय एकं एव भवति) तें सर्व मिळून एकच होतें. (११)

(अनन्तं पुरुत्रा विततं) अनंत चहूंकडे पसरलेलें आहे, (अनन्तं अन्तवत् च समन्ते) अनंत आणि सान्त हीं दोन्ही एकमेकांत मिसळलेलीं आहेत. (अस्य भूतं उत भव्यं ते विचिन्वन्) याच्या भूतकालांतील, भविष्यकालां-तील व वर्तमानकालांतील सर्व वस्तुमात्रांच्या परस्पर संबंधाविषयीं विचार करीत आणि पुन्हां (विद्वान्) सर्वांना जाणून (नाकपालः चरति) सुखपालक व्यवहार करीत राहिलेला आहे. (१२)

या वचनांचा विचार या दृष्टिबिंदूतून वाचकवर्ग करील तर संपूर्ण विश्वास आधार देणारा प्रभू कसा आहे त्याचें परिपूर्ण ज्ञान होईल.

सर्वश्रेष्ठ देव

१. तदिदास भुवनेषु ज्येष्ठं यतो जज्ञ उग्रस्त्वेषनृम्णः (५।२।१)– जेथून उग्र तेजोबलयुक्त प्रकाश उत्पन्न झाला, तो सर्व भुवनांत श्रेष्ठ तत्त्व होता.

२. यदेनं मदन्ति विश्व ऊमाः– त्यास प्राप्त करून सर्व संरक्षक आनंदित होतात.

३. अव्यनच्च व्यनच्च सस्नि (५।२।२)– प्राणरहित आणि प्राणयुक्त बरोबरच रहातात (जड आणि चेतन बरोबर रहातात).

४. महो गोत्रस्य क्षयति स्वराजा तुरश्चिद्विश्वं अर्णवत् तपस्वान् (५।२।८)– महान गोरक्षक राष्ट्राचा स्वराजा होऊन तो रहातो आणि वेगवान् तपस्वी निःसंशय विश्वांत भ्रमण करतो. (तो सर्वव्यापक आहे)

५. सत्यमहं गभीरः काव्येन सत्यं जातेनास्मि जातवेदाः (५।११।३)– हें सत्य आहे कीं मीं गंभीर आहे. (आणि हेंहि) सत्य आहे कीं काव्य प्रगट होण्यामुळें मीं जातवेदा (ज्याच्यापासून वेद जन्मले) तो मींच आहे.

६. न मे दासो नार्यो महित्वा व्रतं मीमाय यदहं धरिष्ये– जे नियम मीं करतो त्याचें बरोबर पालन मीं करतों. माझ्या नियमास दास अथवा आर्य कोणी तोडूं शकत नाहीं.

७. न त्वदन्यः कवितरो न मेधया धीरतरो वरुण स्वधावान् (५।११।४)– हे वरुण तुझ्या शिवाय अन्य कोणीं अधिक ज्ञानी, अधिक बुद्धिवान्, अधिक धैर्यवान् नाहीं, तसेंच स्वतःच्या धारकशक्तीनें युक्त सुद्धां कोणी नाहीं.

८. त्वं ता विश्वा भुवनानि वेत्थ– तूं सर्व भुवनांस जाणतोस.

९. चिन्नु त्वज्जनो मायी बिभाय– तो कपटी मनुष्य तुला भीतो.

१०. त्वं ह्यंग वरुण स्वधावन् विश्वा वेत्थ जनिमा सुप्रणीते (५।११।५)– हे प्रिय वरुण तुं सामर्थ्यवान आहेस, हे सर्वांस चालविणाऱ्या देवा, तूं सर्वांचें जन्म जाणतोस.

११. युज्यो मे सप्तपदः सखासि (५।११।९)– तूं माझा योग्य आणि सप्तपद मित्र आहेस.

१२ तस्मा उ राधः कृणुहि सुप्रशस्तं सखा नो असि परमं च बन्धुः (५।११।११)– तूं आमचा मित्र आणि भाऊ आहेस म्हणून तूं आम्हांस प्रशस्त धन दे.

१३. वयं देवानां सुमतौ स्याम (३।१६।४)– आम्हीं देवांच्या उत्तम बुद्धीत रहावें.

१४. यस्य सूर्यश्चक्षुश्चन्द्रमाश्च पुनर्णवः, अग्निं यश्चक्र आस्यं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः (१०।७।३३)– सूर्य ज्याचा, एक डोळा, पुनः पुनः नवीन होणारा चंद्र ज्याचा दुसरा डोळा, अग्नीस ज्यानें स्वतःचें मुख केलें आहे त्या श्रेष्ठ ब्रह्मास आमचा नमस्कार असो.

१५. यस्य वातः प्राणापानौ चक्षुरङ्गिरसोऽभवन्, दिशो यश्चक्रे प्रज्ञानीस्तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः (१०।७।३४)– वायु ज्याचे प्राण आणि अपान आहे, आङ्गिरस (अग्नि) ज्याचे डोळे आहेत, दिशा ज्यांचे कान आहेत त्या श्रेष्ठ ब्रह्माला नमस्कार असो.

१६. स्कम्भो दाधार द्यावापृथिवी उभे इमे स्कम्भो दाधारोर्वन्तरिक्षम् । स्कम्भो दाधार प्रदिशः षडुर्वीः स्कम्भ इदं विश्वं भुवनमा विवेश (१०।७।३५)– द्यावा पृथिवी, महान अन्तरिक्ष सहादिशा हे आधारस्तंभ धारण करून तो सर्व भुवनांत प्रविष्ट झाला.

१७. महद्यक्षं भुवनस्य मध्ये तपसि क्रान्तं सलिलस्य पृष्ठे, तस्मिन् छ्रयन्ते य उ के च देवा वृक्षस्य स्कंधः परित इव शाखाः (१०।७।३८)– ज्याप्रमाणें वृक्षाच्या शाखा असतात तद्वत्, या भुवनांच्या मध्यें महान् पूजनीय देव आहे, त्याच्या आश्रयानें सर्व देव रहातात,

या प्रमाणें सर्वांहून मोठा देव अर्थात् परमेश्वर त्याचें वर्णन येथें केलेलें आहे वाचकानें मनन पूर्वक तें पहावें आणि सर्वांहून महान् देवांस अंतरांत ठेवावें.

सर्वांचा पिता

१. इयं पित्र्या राष्ट्री (४।१।२)– ही पितृस्थानची तेजस्वी शक्ति आहे.

२. अर्धेन विश्वं भुवनं जजान (१०।८।७)– अर्धभागातून सर्व विश्व उत्पन्न झालें.

३. प्रजापतिश्चरति गर्भे अन्तरदृश्यमानो बहुधा वि जायते (१०।८।१३)– प्रजापति गर्भांत दाखल होतो आणि न पहाणारा अनेक प्रकारें उत्पन्न होतो.

४. अर्धेन विश्वं भुवनं जजान, यदस्यार्धं कतमः स केतुः (१०।८।१३)– अर्ध्या भागानें सर्व भुवनें निर्माण केलीं आणि बाकी अर्धा भाग राहिला त्याचीं चिन्हें काय आहेत ?

५. स नः पिता जनिता स उत बन्धुर्धामानि वेद

भुवनानि विश्वा (२।१।३)- तो आमचा पिता आहे, जनक आणि भाऊ आहे. तो सर्व भुवनें आणि स्थानांना जाणतो.

६. यो देवानां नामध एक एव तं संप्रश्नं भुवना यन्ति सर्वा- तो अन्य देवांची नांवें धारण करणारा एकच प्रभु आहे, त्या प्रश्न विचारण्याच योग्य परमात्म्यापाशीं सर्व भुवनें जातात.

७. दिव्यो गन्धर्वो भुवनस्य यस्पतिरेक एव नमस्यः विक्ष्वीड्यः (२।२।१)- जो सर्वांचा दिव्य आधार आणि सर्व भुवनांचा एकमेव स्वामी आहे तो नमनास योग्य आणि प्रजाजनांत स्तुत्य आहे.

सर्वांचा पिता-परमपिता-परमेश्वर आहे. तो ज्याप्रमाणें पिता आहे त्याप्रमाणें बंधु सुद्धां आहे, मित्र आहे, सखा सुद्धां आहे, याप्रमाणें तोच सर्व कांहीं आहे. असें जाणून मनुष्यांनीं स्वतःच्या घरांत ' मीं त्याचा अमृतपुत्र आहे ' आणि ' तो आमचा परमपिता आहे ' असा भाव नेहमीं धारण करावा.

विश्वाचा सम्राट्

१. सम्राट् देवता बृहस्पतिः (४।१।५)- सर्वांचा सम्राट् बृहस्पति देवता आहे.

२. ऋतावानं वैश्वानरं ऋतस्य ज्योतिषस्पतिं अजस्रं घर्ममीमहे (६।३६।१)- सत्य, सत्यप्रकाशी, विश्वाचा नेता, तेजाचा स्वामी, निरंतर प्रकाशणारा, विश्वाचा संचालक अशा ईश्वरास आम्हीं प्राप्त करतों.

३. अग्निः परेषु धामसु कामो भूतस्य भव्यस्य सम्राडेको वि राजति (६।३६।२)- अग्निसमान तेजस्वी, जो श्रेष्ठ स्थानांत रहातो, जो भूतभविष्याचा एकमेव सम्राट् आहे तो विराजत आहे.

४. बृहन्नेषामधिष्ठाता अन्तिकादिव पश्यति (४।१६।१)- त्याचा महान अधिष्ठाता जवळच आहे व सर्वांस पाहतो.

५. य स्तायन् मन्यते चरन्त्सर्वं देवा इदं विदुः- जो पसरतो., जो संचरतो आणि जाणतो तें सर्व हा देव बरोबर जाणतो.

६. यः तिष्ठति चरति यश्च वञ्चति, यो निलायं चरति यः प्रतङ्कम् , द्वौ संनिषद्य यन्मन्त्रयेते राजा तद्वेद वरुणस्तृतीयः (४।१६।२)- जो उभा रहातो, जो चालतो, जो फसवतो, जो गुप्त आहे पण स्पष्ट पहातो, मोकळा व्यवहार करतो, अथवा दोघांनीं एकत्र बसून कांहीं विचार केला तर तो सर्व तिसरा राजा परमेश्वर तें सर्व जाणतो.

७. उतेयं भूमिर्वरुणस्य राज्ञ उतासौ द्यौर्बृहती दूरेअन्ता, उतो समुद्रौ वरुणस्य कुक्षी उतास्मिन्नल्प उदके निलीनः (४।१६।३)- ही भूमि वरुणराजाची आहे. जो फार दूर द्युलोक आहे तो हि त्याचाच आहे. हा समुद्र त्याच्या कांखा आहेत, परंतु तो या अल्प उदकांतहि विलीन झाला आहे.

८. उत यो द्यामतिसर्पात् परस्तान्न स मुच्यातै वरुणस्य राज्ञः (४।१६।४)- जो कोणी द्युलोकाहूनहि वर जातो तरी तो वरुण राजाच्या शासनांतून मुक्त होत नाहीं.

सर्वं तद्राजा वरुणो विचष्टे यदन्तरा रोदसी यत् परस्तात् (४।१६।५)- जो या द्यावापृथ्वींत आहे, जें पलिकडे पैलपारीं आहे तें सर्व वरुण राजा पहातो.

१०. संख्याता अस्य निमिषो जनानां- लोकांच्या आयुष्याचें निमिष (डोळ्यांची उघडझांप) त्यानें मोजून ठेवले आहेत.

सर्व विश्वाच्या सम्राटाचें हें वर्णन पहाण्यालायक आहे. तो सर्वांचा शासक आहे. त्याचे पाश सर्वत्र पसरलेले आहेत. कोणी कोठेंहि गेला तरी त्याच्यापासून त्याची सुटका होऊं शकत नाहीं. म्हणूनच म्हटलें आहे—

विश्वशासकाचे पाश

१. तस्य स्पशो न नि मिषन्ति भूर्णयः- (५।६।३) त्या प्रभूचे दूत पाश घेऊन फिरत असतात. ते डोळे कधींच बंद करीत नाहींत. ते नेहमीं सर्वत्र पहातच असतात.

२. पदे पदे पाशिनः सन्ति सेतवे- बांधण्यासाठीं ते दूत पावलों पावलीं उभे आहेत.

३. दिवः स्पशः प्र चरन्तीदमस्य सहस्राक्षा अति पश्यन्ति भूमिम् (४।१६।४)- या दिव्य देवाचे दूत या विश्वांत संचार करतात, हजारों डोळ्यांनीं भूमीवर पहात असतात.

४. ये ते पाशाः वरुण सप्तसप्त त्रेधा तिष्ठन्ति विषिता रुशन्तः छिनन्तु सर्वे अनृतं वदन्तं यः सत्यवाद्यति तं सृजन्तु (४।१६।६)- हे वरुण ! विनाशक पाश सात सात असे तीन जागीं बांधलेले आहेत त्यांनीं असत्यवादी जे आहेत त्यांस बांध आणि जे सत्यवादी आहेत त्यांस सोडून दे.

५ शतेन पाशैरभि धेहि वरुण एनं मा ते मोच्यनृतवाङ् नृचक्षः (४।१६।७)- हे वरुण ! शेंकडो

पाशांनीं त्यांस बांध. हे मानवांस पहाणाऱ्या वरुणा ते असत्य बोलणारे तुझ्या पाशांतून सुटून न जावोत.

६. आस्तां जाल्म उदरं श्रंसयित्वा कोश इवाबंधः परिकृत्यमानः (४।१६।७)– न बांधलेल्या पोत्याप्रमाणें स्वतः-च्या पोटाच्या खालीं कापून घेऊन नीच मनुष्य पडून राहो.

याप्रमाणें त्याचे पाश सर्वत्र पसरलेले आहेत. अधार्मिक मनुष्य त्यांत बांधला जातो. हें जाणून मनुष्यानें धर्माच्या नियमानुसार चालावें आणि बंधनांतून मुक्त व्हावें.

पापापासून मुक्ति

१. **मुमुक्तमस्मान्दुरितादवद्यात्** (५।६।८)– या पापापासून आम्हांस वांचवा.

२. योऽस्मांश्चक्षुषा मनसा चित्त्याकूत्या च यो अघायुरभिदासात् त्वं तानग्ने मेन्यामेनीन् कृणु (५।६।१०)–जे पापी आम्हांस डोळे, मन, चित्, संकल्प इत्यादींनीं दास करूं इच्छितात त्यांस तूं स्वतःच्या शस्त्रानें शस्त्रहीन कर.

३. अवयाता हरसो दैव्यस्य (२।२।२)– दिव्य आपत्तींतून दूर करणारा तूच आहेस.

४. अशरसद् भवतु देव (१।२०।१)– हे देव! आमच्यांत आपसांत फूट न पडो.

५. मा नो विददभिभा मो अशस्तिः मा नो विदद् वृजिना द्वेष्या या (१।२०।१)– पराभव आमचे जवळ न येवो. अकीर्ति आम्हांस प्राप्त न व्हावी आणि द्वेष वाढविणारी कुटिल कृत्यें आमचेजवळ न यावींत.

६. वरीयो यावया वधं (१।२०।३)– वध अथवा शस्त्र आमचे पासून दूर राहो.

पापापासून दूर रहाणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. उन्नत होण्यासाठीं हेंच खरें अनुष्ठान आहे.

प्रभूची प्राप्ति

१. तं त्वा प्र पद्ये, तं त्वा प्र विशामि, सर्वगुः सर्वपूरुषः सर्वात्मा सर्वतनूः सह यन्मेऽस्ति तेन– (५।६।११) हे प्रभू! मी तुला प्राप्त करतो. तुझ्यांत मीं प्रवेश करतो, सर्व गतींसह (अथवा गायींसह) सर्व पुरुषांसह, सर्व आत्मबलानें, सर्व शरीरासह जें कांहीं माझें आहे त्या सर्वांसह मीं तुझ्यांत प्रतिष्ठित होतो (लीन होतो.)

२. अकामो धीरो अमृतः स्वयंभू रसेन तृप्तो न कुतश्चनोनः तमेव विद्वान् न बिभाय मृत्योः आत्मानं धीरं अजरं युवानम् (१०।८।४४)– निष्काम, धीर, अमर, स्वयंभू, रसानें तृप्त, कोठेंहि न्यून नसलेला त्यास जाणून मृत्युपासून दूर होतां येते. हा आत्मा धीर, जराहीत आणि युवान आहे.

३. शास इत्था महाँ अस्यमित्रसाहो अस्तृतः, न यस्य हन्यते सखा न जीयते कदा चन ।(१।२०।४)– तूं या प्रमाणें महान् शासक आहेस, तूं शत्रूंचा पराजय करणारा परंतु तूं स्वतः नेहमीं अपराजित आहेस, ज्याचा मित्र कधीं पराजित होत नाहीं अथवा मारला जात नाहीं असा तूं आहेस.

महान् शासक प्रभु आहे, त्याचा जो मित्र होऊन रहातो त्याचा कधीं नाश होत नाहीं. म्हणून स्वार्थ, इच्छा वाढवून दुष्ट आचरण कोणा मनुष्यानें कधीं न करावें आणि सदाचारानें स्वतःचें जीवन चालवावें त्याच्या योगें मनुष्य उत्तम रीतीनें उन्नतिमार्गानें चालून स्वतःचें जीवन सफल करूं शकतो.

दर्शन आणि अदर्शन

१. अयातमस्य ददृशे न यातं (१०।८।८)– त्याची चाल दृष्टीस पडत नाहीं पण त्याचे न चालणें दृष्टीस पडतें.

२. परं नेदीयः अवरं दवीयः – दूरचा तो जवळ आहे आणि जवळचा तो फार दूर आहे.

३. दूरे पूर्णेन वसति, दूर ऊनेन हीयते. महद्यक्षं भुवनस्य मध्ये, तस्मै बलिं राष्ट्रभृतो भरन्ति (१०।८।१५)– पूर्ण असून सुद्धां तो दूर आहे. न्यून असूनही तो दूर आहे. भुवनाच्या मध्यें तो महापूजनीय देव आहे. त्यासाठीं राष्ट्रसेवक स्वतःचें बलिदान अर्पण करतो.

४. तदेव मन्येऽहं ज्येष्ठं तदु नात्येति किं चन (१०।८।१६)– ज्याचें कोणी अतिक्रमण (अवज्ञा) करीत नाहीं; त्यास मीं श्रेष्ठ मानतो.

५. स विद्वान् ज्येष्ठं मन्येत स विद्याद्ब्राह्मणं महत् (१०।८।२०)– त्या ज्येष्ठ ब्रह्मास जो जाणतो तो महान् ब्रह्म जाणतो.

तो प्रभु अत्यंत समीप असून दिसत नाहीं, तो आहे तर फार दूर पण दिसत नाहीं, तो सर्वत्र आहे. केवळ विचार केल्यानेंच, ' तो आहे ' अशी जाणीव होते.

सत् आणि असत्चें उत्पत्तिस्थान

१. सतश्च योनिं असतश्च (४।१।१)– सत् आणि असत् ज्याच्यापासून उत्पन्न होतात.

२. स हि दिवः स पृथिव्या ऋतस्थाः (४।१।४)– तो द्यु आणि पृथ्वीवर ऋतु–सत्यनियम चालविणारा आहे.

' सत् ' आत्म्यासाठीं संकेत शब्द आहे आणि ' असत् ' प्रकृतीचा संकेत आहे. असत्चा अर्थ (अस्यति) स्वतःच्या अंतरातून वस्तुमात्रांस आकारासह बाहेर फेंकणारी. प्रकृतीचा अर्थ असाच होऊं शकतो. सत् आणि असत् यांत संचलन करणारें तेज आहे.

सर्वांत प्रथम उत्पन्न

१. ब्रह्म जज्ञानं प्रथमं पुरस्ताद् (४।१।१)- सर्वांत प्रथम ब्रह्म प्रकट झालें.

२. तस्मा प्रथमाय धास्यवे (४।१।२)- तो सर्वांचा आधार आहे.

३. ब्रह्म ब्रह्मण उज्जभार (४।१।३)- ब्रह्मापासून ब्रह्मच प्रथम प्रगट झाले.

४. को ददर्श प्रथमं जायमानं अस्थन्वन्तं यदनस्था बिभर्ति (९।९।४)- प्रथम उत्पन्न झालेल्यास कोणी पाहिलें, जो अस्थिरहित असून अस्थियुक्तास धारण करतो. चेतन जडास धारण करतो.

५. पश्यदक्षण्वान् न वि चेतदन्धः (९।९।१५)- डोळे असलेल्यास दिसतें, आंधळा पाहूं शकत नाहीं.

६. द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परि षस्वजाते (९।९।२०)- दोन पक्षी नेहमींबरोबर रहाणारे मित्र एकाच झाडावर जवळ जवळ बसतात.

सर्वांत प्रथम उत्पन्न म्हणजे प्रगट परमात्मा झाला, तोच ईश्वर आहे. अनेक रीतीनें त्याच्या प्रगट होण्याचें वर्णन मंत्रांत आहे. तें वरील मंत्रांत वाचकांस पहावयास मिळेल.

देवांचा जन्म

१. देवानां जनिमा विवक्ति (४।१।३)- ज्ञानी देवांच्या जन्माविषयीं सांगत आहे.

२. स देवान्त्सर्वानुरस्युपदद्य संपश्यन् याति भुवनानि विश्वा (१०।८।१८)- तो सर्व देवांस स्वतःच्या छातीवर घेऊन सर्व भुवनें पहात पहात जातो.

३. सर्वा देवानां चरति व्रतानि (४।११।२)- सर्व देवांच्या व्रतास तो चालवितो.

४. बृहन्तो नाम ते देवा येऽसतः परि जज्ञिरे, एकं तदंगं स्कंभस्यासदाहुः परो जनाः (१०।७।२५)- जो असतांपासून उत्पन्न झालेला तो महान् देव आहे. सर्वाधाराचे एक अंग असत् आहे असें लोक म्हणतात.

५. यस्य त्रयस्त्रिंशद्देवा अंगे गात्रा विभेजिरे (१०।७।२७)- तेहतीस देव ज्याच्या अंगा- अवयवांपासून झालेले आहेत.

परमेश्वर एक आहे परंतु सूर्य, चंद्र, आदि देव अनेक आहेत आणि ते या विश्वाची अनेक प्रकारचीं कार्ये करीत राहिले आहेत. सूर्य प्रकाश देतो, वायु जीवन देतो, चंद्र शांति देतो. भूमि अन्न देते, पाणी तृषा शांत करतें, या प्रमाणें अनेक देव परमेश्वराच्या योजनेनुसार अनेक कार्यांस उद्युक्त झाले आहेत या देवांचे जन्म होतात आणि ते अनेकविध कार्यें करतात. ही सर्व परमात्म्याची योजना आहे.

महागृह

१. मही क्षेमं रोदसी अस्कभायत् (४।१।४) पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत एकच घर त्यानें स्थिर केलें आहे.

२. महान् मही अस्कभायत् वि जातो द्यां सद्म पार्थिवं च रजः (४।१।१४)- प्रगट होण्या बरोबरच त्यानें द्यु, अन्तरिक्ष, आणि पृथ्वी मिळून एक घर केलें.

३. अस्य काव्यो हिनोति महो देवस्य पूर्व्यस्य धाम (४।१।६)- ज्ञानी या प्राचीन महान् देवाच्या स्थानाचें वर्णन करूं शकतो.

परमात्मा आणि सर्व देव एका विशाल घरांत रहातात. खालीं पृथ्वी आणि वर आकाश असें हें विशाल घर आहे. त्यांत नाना प्रकारचें देव रहातात. या देवांत परस्पर विरोधि देवसुद्धां आहेत उदा. अग्नि आणि जल यांचा विरोध प्रसिद्धच आहे. परंतु हे सर्व देव विश्वरूपी घरांत रहातात आणि परमेश्वरी आदेशानुसार कार्ये करीत असतात. ते सर्व परमेश्वराची आज्ञा पालन करतात.

स्वयं प्रकाश

१. स्वर्यस्य च केवलं (१०।८।१)- जो प्रभूचा केवळ स्वयं प्रकाश आहे.

२. तस्मात् देवो रोचत (१०।८।२४)- हा देव त्यास प्रकाशित करतो.

३. दोषो गाय, बृहद्गाय, द्युमद्धेहि (६।१।१)-रात्रीचें वेळीं भजन कर, खूप भजन कर, तेजस्वी देवाची धारणा कर.

४. तदस्मभ्यं सविता सत्यधर्मा प्रजापतिः अनुमतिर्नि यच्छात् (७।२४।१)- त्या सर्व सुखाचा जनिता सत्यधर्मा प्रजापति आम्हांस अनुकूल बुद्धीनें देवो.

तो परमेश्वर स्वयंप्रकाश आहे. त्याच्या प्रकाशानें सर्व देव प्रकाशित होतात.

विश्वरूप यश

१. तिर्यग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्नस्तस्मिन् यशो निहितं विश्वरूपं (१९।८।९)- तिरप्या तोंडाच्या वरच्या भागांत-

पाठीचा भाग आहे असा तांब्या-मस्तकधडावर ठेवले आहे त्यांत विश्वरूप यश सांठविलें आहे.

२. **तदासत ऋषयः सप्त साकं ये अस्य गोपा महतो बभूवुः**- त्यांत सात ऋषि एकत्र बसले आहेत. आणि ते या महान्चे रक्षक झाले आहेत.

३. **यदेजति पतति यच्च तिष्ठति प्राणदप्राणन्निमिषच्च यद् भुवत्** (१०।८।११)- जें चालतें, जें पडतें, जें हसतें, जें प्राण धारण करतें, जें करीत पण नाहीं, डोळ्यांची उघडझांप करतें असें तें होतें.

४. **शतं सहस्रमयुतं न्यर्बुदं असंख्येयं स्वं अस्मिन्निविष्टम्** (१०।८।२४)- शंभर, हजार, दहा हजार, लक्ष अथवा असंख्य स्वशक्ति त्यांत राहिल्या आहेत.

सर्व विश्व परमेश्वरी सामर्थ्यानें, शक्तीनें, उत्पन्न झालें आहे, जे कांहीं येथें आहे तें त्याचेंच सामर्थ्य आहे असें समजून सर्व पदार्थांत त्याचें सामर्थ्य पाहिलें पाहिजे. प्रत्येक वस्तूस पाहून परमेश्वराच्या अद्भुत सामर्थ्यास जाणलें पाहिजे.

नमन

१. **यः अथर्वाणं पितरं देवबन्धुं बृहस्पतिं नमसाव च गच्छात्** (४।१।७)- जो शान्त, सर्वांचा पिता, देवांचा बंधु, ज्ञानी त्या देवास नमस्कार करतो.

२. **तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः** (१०।८।१)- त्या जेष्ठ ब्रह्मास माझा नमस्कार असो.

३. **यो देवमुत्तरावन्तमुपासातै सनातनम्** । (१०।८।२२)- जो सनातन श्रेष्ठ देवाची उपासना करतो.

४. **सनातनमेनमाहुः उताद्य स्यात् पुनर्णवः** (१०।८।२३)- ज्यास सनातन म्हणतात तो आज नव्यासारखा झाला आहे.

५. **तं त्वा यौमि ब्रह्मणा दिव्य देव नमस्ते अस्तु दिवि ते सधस्थम्** (२।२।१)- अशा तुला मीं उपासना द्वारा प्राप्त करतो. हे दिव्य देव ! तुला नमस्कार असो. तुझें स्थान देवलोकांत आहे.

६. **मृडात् गन्धर्वो भुवनस्य यस्पतिरेक एव नमस्यः सुशेवाः** (२।२।२)- तो विश्वाचा आधार आम्हांस सुखी करो. तो भुवनांचा एकच पालक नमस्कारयोग्य आहे आणि सेवा करण्यास योग्य आहे.

७. **अभि त्यं देवं सवितारं ओण्योः कविक्रतुं, अर्चामि सत्यसवं रत्नधां अभि प्रियं मतिं** (७।१४।१)- तो सर्वांचा प्रसविता, रक्षकांचा ज्ञानी, कर्ता, सत्य आणि रमणीयतेचा धारक, रत्नधारक, प्रिय आणि मननीय देवाची मीं पूजा करतो.

तो परमेश्वर नमन करण्यास योग्य, उपास्य, पूजनीय देव आहे. मनुष्यानें नेहमीं त्याची उपासना करावी.

ज्ञानीभक्त

१. **वेनस्तत् पश्यत् परम गुहा यत्, यत्र विश्वं भवत्येकरूपं** (२।१।१)- ज्ञानीच त्यास पाहूं शकतात. जो गुहेंत रहातो आणि जेथें विश्व एकरूप होतें

२. **प्र तद्वोचदमृतस्य विद्वान् गन्धर्वो धाम परमं गुहा यत्** (२।१।२)- जें गुहेत आहे त्या अमृत धामास ज्ञानी जाणतो.

३. **त्रीणि पदानि निहिता गुहास्य यस्तानि वेद स पितुष्पितासत्**- तीन पाय त्यानें गुहेंत ठेवले आहेत, जो त्यास जाणतो तो पित्याचा पिता होतो. तो महाज्ञानी होतो.

४. **ब्रह्मैनद्विद्यात्तपसा विपश्चित्** (८।९।३)- ज्ञानी तपानें त्या ब्रह्मास जाणतो.

५. **माया ह जज्ञे मायायाः** (८।९।५)- मायेनें (कपटानें) माया (कपटच) उत्पन्न होतें.

६. **य इत् तद् विदुस्ते अमृतत्वमानशुः** (९।१०।१)- जो त्या ब्रह्मास जाणतो तो अमरत्व प्राप्त करून घेतो.

७. **विद्म ते धाम परमं गुहा यत्** (१।१३।३)- बुद्धींत जें तुझें स्थान आहे, त्याचा आम्हांस जाणीव आहे.

८. **अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या, तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः** (१०।२।३१)- आठ चक्र आणि नऊ द्वारें असलेली ही शरीररूप देवांची अयोध्या नगरी आहे. तिच्यात तेजानें घेरलेला सुवर्णमय कोश तोच स्वर्ग आहे.

९. **पृष्ठात्पृथिव्या अहमन्तरिक्षमारुहं, अन्तरिक्षाद्दिवमारुहम्, दिवो नाकस्य पृष्ठात्स्वर्ज्योतिरगामहम्** (४।१४।३)- मी पृथ्वीहून अंतरीक्षांत, अन्तरिक्षांतून द्युलोकांत आणि द्युलोकांतून स्वर्गज्योतीला पोंहोचलों आहे.

ज्ञानी भक्त तोच होय जो परमेश्वरास जाणतो आणि ज्ञानपूर्वक त्याची उपासना करतो.

यज्ञ

१. **जुषथां यज्ञं** (५।६।८)- यज्ञांचें सेवन करा

२. **अमृतमस्मासु धत्तम्**- आम्हांस अमृत द्या

३. **यज्ञं ये विश्वतोधारं सुविद्वांसो वितेनिरे** (४।२४।४)- उत्तम विद्वान् विश्वाचा धारक असा यज्ञ करतो.

४. **यज्ञेन यज्ञमयजन्त देवाः, तानि धर्माणि प्रथमान्यासन्, ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः** (७।५।१) – प्रथम देव यज्ञानें यज्ञ करीत. त्या पूर्वी समय धर्म होता. हा यज्ञकर्ता महान् होऊन स्वर्गांत जेथें प्रथम साधक जाऊन रहात असत तेथें गेला.

५. **स देवानामधिपतिर्बभूव** (७।५।२)– तो यज्ञ देवांचा स्वामी झाला.

यज्ञ हें मनुष्यास करण्यायोग्य कर्म आहे. यज्ञांत ज्ञान्यांचा सत्कार, संगठन आणि दान हीं कार्यें होतात हीं कार्यें जनतेची उन्नति करणारीं आहेत.

शस्त्रधारी देव

१. **तिग्मायुधौ तिग्महेती सुशेवौ सोमारुद्राविह सु मृडतं नः** (५।६।६)-तीक्ष्ण शस्त्रें धारण करणारे, तीक्ष्ण अस्त्र, उत्तम सेवा करण्यास योग्य सोम आणि रुद्र येथें आम्हांस सुखी करोत. (सोमः- शान्त, रुद्रः-तीक्ष्ण, रयि-प्राण)

जे शस्त्र धारण करतात त्यांनीं स्वतःचीं शस्त्रें तीक्ष्ण करून ठेवावीत ज्यामुळें शत्रूपराजय होईल आणि आपला विजय होईल.

जीव

१. **जीवो मृतस्य चरति स्वधाभिः अमर्त्यो मर्त्येन सयोनिः** (९।१०।८)- अमर जीव मर्त्य देहासह समान योनींत उत्पन्न होऊन विचरतो.

२. **अद्य ममार स ह्यः समान** (९।१०।९)- जो काल प्राण धारण करून होता. आज तो मेला

जीव या जगांत आहे. शरीर सोडून पुनः त्यास धारण करतो त्याच्या उन्नतीसाठींच यज्ञ, कर्म, ज्ञान वगैरे आहे.

विशेषें करून परमात्म्याचे गुण या वेदमंत्रांत आपणास पहावयाचे होते ते आपण पाहिले. वाचकानें त्यांचा विचार करावा आणि, परमेश्वर, परब्रह्म, परमात्मा इत्यादि शब्दानीं ज्या अतर्क्य शक्तीचा बोध होतो त्याचें वेदोक्त स्वरूप जाणावें. हाच या मंत्रांचा संग्रह करण्याचा उद्देश आहे.

वाचकांनीं असें मानूं नये कीं येथें आम्हीं दिलेला सूक्तांचा क्रम हाच बरोबर आहे. त्यांत मागेंपुढें होणें शक्य आहे. कोणी विद्वान् जर दुसरा कांहीं अनुक्रम दाखविल व तो योग्य वाटला तर आम्हीं जरूर त्याचा स्वीकार करूं. त्यांत आम्हांस जराहि गर्व अथवा अहंकार नाहीं. परमेश्वरविषयक सर्व अथर्वसूक्तें एकाच ठिकाणीं एकत्रित असावींत अशी एक इच्छा होती, त्या इच्छेनेंच हा संग्रह केला आहे, तो वाचकांसमोर सिद्ध आहे या योगें परमात्म्याविषयीं नक्की वैदिक कल्पना वाचकांसमोर त्वरीत येईल अशी आम्हांस आशा आहे.

स्वाध्यायमंडळ,
पारडी (जि. सुरत)

श्रीपाद दामोदर सातवळेकर

अग्निहोत्रं च श्रद्धा च वषट्कारो व्रतं तपः ।
दक्षिणेष्टं पूर्तं चोच्छिष्टेऽधि समाहिताः ॥ ९ ॥
एकरात्रो द्विरात्रः सद्यःक्रीः प्रक्रीरुक्थ्यः ।
ओतं निहितमुच्छिष्टे यज्ञस्याणूनि विद्यया ॥ १० ॥
चतूरात्रः पञ्चरात्रः षड्रात्रश्चोभयः सह ।
षोडशी सप्तरात्रश्चोच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे ये यज्ञा अमृते हिताः ॥ ११ ॥
प्रतीहारो निधनं विश्वजिच्चाभिजिच्च यः ।
साह्नातिरात्रावुच्छिष्टे द्वादशाहोऽपि तन्मयि ॥ १२ ॥
सूनृता संनतिः क्षेमः स्वधोर्जामृतं सहः ।
उच्छिष्टे सर्वे प्रत्यञ्चः कामाः कामेन तातृपुः ॥ १३ ॥
नव भूमीः समुद्रा उच्छिष्टेऽधि श्रिता दिवः ।
आ सूर्यो भात्युच्छिष्टेऽहोरात्रे अपि तन्मयि ॥ १४ ॥
उपहव्यं विषूवन्तं ये च यज्ञा गुहा हिताः ।
बिभर्ति भर्ता विश्वस्योच्छिष्टो जनितुः पिता ॥ १५ ॥
पिता जनितुरुच्छिष्टोऽसोः पौत्रः पितामहः ।
स क्षियति विश्वस्येशानो वृषा भूम्यामतिघ्न्यः ॥ १६ ॥

अर्थ— अग्निहोत्र, श्रद्धा, वषट्कार, व्रत, तप, दाक्षिणा, इष्ट, पूर्त हे सर्व उच्छिष्टांतच रहात आहेत. (९)

एकरात्र, द्विरात्र, सद्यःक्रीः प्रक्रीः उक्थ्य हे सर्व यज्ञ आणि (**यज्ञस्य अणूनि**) यज्ञाचे अन्य अंश (**विद्यया उच्छिष्टे ओतं निहितं**) विद्येच्या बरोबर उच्छिष्टांत ओतप्रोत आहेत. (१०)

चतूरात्र, पंचरात्र, षड्रात्र (**उभयः**) उभय अर्थात् आठ, दहा आणि बारा रात्री (**षोडशी**) सोळा (**सप्तरात्रः**) आणि सात रात्रीचे हे सर्व यज्ञ उच्छिष्टापासून झालेले आहेत आणि (**अमृते हिताः**) ते अमृतांत रहातात. (११)

प्रतीहार, निधन, विश्वजित्, अभिजित्, साह्न, अतिरात्र, द्वादशाह हे सर्व उच्छिष्टांत राहिलेले आहेत. हें सर्व ज्ञान माझ्यांत राहो. (१२)

(**सूनृता संनतिः**) सत्यभाषण, नम्रता. (**क्षेमः स्वधा ऊर्ज**) कल्याण, स्वधा, बल, (**अमृतं सहः**) अमरत्व, सहनशक्ति हे (**सर्वे कामाः कामेन तातृपुः**) सर्व काम जे कामनांनीं तृप्ति करणारे आहेत, (**उच्छिष्टे प्रत्यञ्चः**) ते सर्व उच्छिष्टांतच राहिलेले आहेत. (१३)

नऊ भूमि, सर्व समुद्र आणि (**दिवः**) द्युलोकहि (**उच्छिष्टे अधिश्रिताः**) उच्छिष्टांत आश्रित आहेत. सूर्य उच्छिष्टांतच (**आभाति**) प्रकाशतो व त्यामुळें दिवसरात्री होतात. हें सर्व ज्ञान (**मयि**) माझ्यांत राहो. (१४)

उपहव्य, विषूवान् आणि (**ये च गुहा हिताः यज्ञाः**) जे गुहेंत आश्रित यज्ञ आहेत, त्यांना (**विश्वस्य भर्ता जनितुः पिता**) विश्वाचा पोषक आणि जनकाचाहि जनक, (**उच्छिष्टः बिभर्ति**) उच्छिष्ट संज्ञा ज्याला आहे असा परमात्मा धारण करतो. (१५)

(**उच्छिष्टः जनितुः पिता**) उच्छिष्ट पित्याचाहि परमपिता आहे, जो (**असोः पौत्रः पितामहः**) प्राणाचा नातू आहे, परंतु तो सर्वांचा पितामहहि आहे. (**सः विश्वस्य ईशानः क्षियति**) तो विश्वाचा ईश्वर होऊन सर्वत्र राहतो, तो (**वृषा भूम्यां अतिघ्न्यः**) बलवान् आणि पृथ्वीवर सर्वांहून श्रेष्ठ आहे. (१६)

ऋतं सत्यं तपो राष्ट्रं श्रमो धर्मश्च कर्म च ।
भूतं भविष्यदुच्छिष्टे वीर्यं लक्ष्मीर्बलं बले ॥ १७ ॥
समृद्धिरोज आकूतिः क्षत्रं राष्ट्रं षडुर्व्यः ।
संवत्सरोऽध्युच्छिष्ट इडा प्रैषा ग्रहा हविः ॥ १८ ॥
चतुर्होतार आप्रियश्चातुर्मास्यानि नीविदः
उच्छिष्टे यज्ञा होत्राः पशुबन्धास्तदिष्टयः ॥ १९ ॥
अर्धमासाश्च मासाश्चार्तवा ऋतुभिः सह ।
उच्छिष्टे घोषिणीरापः स्तनयित्नुः श्रुतिर्मही ॥ २० ॥
शर्कराः सिकता अश्मान ओषधयो वीरुधस्तृणा ।
अभ्राणि विद्युतो वर्षमुच्छिष्टे संश्रिता श्रिता ॥ २१ ॥
राद्धिः प्राप्तिः समाप्तिर्व्याप्तिर्मह एधतुः ।
अत्याप्तिरुच्छिष्टे भूतिश्चाहिता निहिता हिता ॥ २२ ॥
यच्च प्राणति प्राणेन यच्च पश्यति चक्षुषा ।
उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे दिवि देवा दिविश्रितः ॥ २३ ॥
ऋचः सामानि च्छन्दांसि पुराणं यजुषा सह ।
उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे दिवि देवा दिविश्रितः ॥ २४ ॥

अर्थ— ऋत, सत्य, तप, राष्ट्र, श्रम, धर्म, कर्म, भूत, भविष्य, वीर्य, लक्ष्मी, (बले बलं) बलिष्ठांतील बल हे सर्व उच्छिष्टांत राहिलेले आहेत. (१७)

समृद्धि, (ओजः) शक्ति, (आकूतिः) संकल्प, क्षात्र, राष्ट्र, (षट् ऊर्व्यः) सहा भूमि, संवत्सर, (इडा) अन्न, (प्रैषाः ग्रहाः) प्रैष, ग्रह आणि हवि हे सर्व उच्छिष्टांत राहिलेले आहेत. (१८)

चतुर्होता, आप्रिय, चातुर्मास्य, नीविद, यज्ञ, होत्रा, पशुबन्ध आणि याच्या सर्व इष्ट्या उच्छिष्टांत राहिलेल्या आहेत. (१९)

(अर्धमासाः) पक्ष (मासाः) महिने, (आर्तवाः ऋतुभिः सह) ऋतूंसह ऋतुसंबंधीं पदार्थ, (स्तनयित्नुः) मेघ (मही श्रुतिः) भीषण गर्जना आणि (घोषणी आपः) गर्जना करणारे जलप्रवाह हे सर्व उच्छिष्टांतच आहेत. (२०)

(शर्कराः सिकताः अश्मानः) वाळू, रेती, पाषाण (ओषधयः वीरुधः तृणा) औषधी, वनस्पति आणि गवत (अभ्राणि विद्युतः वर्षं) मेघ, विजा आणि पर्जन्य (उच्छिष्टे संश्रिताः श्रिताः) हे सर्व उच्छिष्टांत आश्रित आहेत. (२१)

(राद्धिः प्राप्तिः समाप्तिः) सिद्धि, प्राप्ति आणि समाप्ति, (व्याप्तिः महः एधतुः) व्याप्ति, महत्व आणि वृद्धि (अत्याप्तिः भूतिः) अतिशय प्राप्ति आणि ऐश्वर्य हे सर्व उच्छिष्टांत (आहिता निहिता हिताः) ठेवलेले आहेत. (२२)

(यत् च प्राणेन प्राणिति) जें प्राणानें प्राण धारण करतें आणि (यत् च चक्षुषा पश्यति) जें नेत्रांनीं पहातें, तें सर्व उच्छिष्टापासून (जज्ञिरे) निर्माण झालेलें आहे. (दिवि-श्रितः देवा दिवि) जे देव द्युलोकांत आहेत ते सर्व द्युलोकांत, आणि उच्छिष्टांतहि राहिलेले आहेत. (२३)

प्राणापानौ चक्षुः श्रोत्रमक्षितिश्च क्षितिश्च या ।
उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे दिवि देवा दिविश्रितः ॥ २५ ॥
आनन्दा मोदाः प्रमुदोऽभीमोदमुदश्च ये ।
उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे दिवि देवा दिविश्रितः ॥ २६ ॥
देवाः पितरो मनुष्या गन्धर्वाप्सरसश्च ये ।
उच्छिष्टाज्जज्ञिरे सर्वे दिवि देवा दिविश्रितः ॥ २७ ॥

अर्थ— ऋचा, साम, छंद, पुराण आणि यजुर्वेद, प्राण, अपान, चक्षु, श्रोत्र, (क्षितिः अक्षतिः) भौतिक आणि अभौतिक पदार्थ, आनंद, मोद, प्रमोद, (अभीमोदमुदः) प्रत्यक्ष आनंद, देव, पितर, मनुष्य, गंधर्व, अप्सरा, द्युलोकांत राहणाऱ्या सर्व देवता हे सर्व (उच्छिष्टात् जज्ञिरे) उच्छिष्टापासून निर्माण झालेले आहेत. (२४-२५-२६-२७)

उच्छिष्ट-ब्रह्म-सूक्ताचा आशय

या सूक्ताची भाषा फारच सरळ असल्यानें त्याचा वेगळा भावार्थ लिहिण्याची विशेष आवश्यकता नाहीं.

उच्छिष्टाचा अर्थ

" उच्छिष्ट " अर्थात् ' उर्ध्व भागांत अवशिष्ट असलेलें ' जें उच्च स्थानांत स्थित आहे तें. विश्वनिर्मितीनंतर जो भाग अवशिष्ट म्हणजे शिल्लक राहिला त्याचें नांव ' उच्छिष्ट ' आहे. पुरुषसूक्तांत म्हटलें आहे कीं—

त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोऽस्येहाभवत्पुनः ।
(ऋ. १०।९०।४)

' त्रिपात् पुरुषाचा उच्चस्थानीं उदय झालेला आहे, आणि त्याचा एक अंश या विश्वांत पुन्हां पुन्हां उत्पन्न होतो. ' एक अंशापासून हें विश्व निर्माण होतें आणि विनाश पावतें, परंतु जो त्रिपात् पुरुष ऊर्ध्वभागांत अवशिष्ट राहिलेला आहे तो तसाच विनाशरहित एक स्वरूपानें राहतो. याप्रमाणें परब्रह्माचा एक अंश विश्वाचा आकार घेतो आणि शेष राहिलेला भाग मूळ रूपांत, मूळ स्थितींत अवशिष्ट राहतो. त्याचेंच नांव उच्छिष्ट आहे, आणि हाच ऊर्ध्व भागांत अवशिष्ट राहतो.

(**उच्छिष्टे नाम रूपं**) याच परब्रह्मांत नामरूप समाविष्ट झालेलें आहे, असें सांगून सर्व त्यांतच आहे असें सांगितलें आहे. कारण, या विश्वांत जें कांहीं आहे तें सर्व नामरूपात्मकच आहे. ज्याला नाम नाहीं आणि ज्याला रूप नाहीं अशी एकही वस्तु या विश्वांत नाहीं, जो पदार्थ आपल्या डोळ्यांसमोर येतो तो नामरूपात्मकच आहे. हें सर्व नामरूपमय विश्व या उच्छिष्ट परब्रह्मांतच राहिलेलें आहे.

नामही उच्छिष्टांत आहे आणि रूपही उच्छिष्टांत आहे असें सांगण्याचा हेतूच हा आहे कीं सर्व नामरूप उच्छिष्ट परब्रह्मांत आहे. ज्याप्रमाणें घट हें नाम आणि घटाचा आकार म्हणजे रूप हें सर्व मातीच आहे, अर्थात् नामरूप म्हणजे 'घट' या आकाराला आणि नामाला प्राप्त झालेली मातीच होय. ती मूळ मातीच घटाकार होऊन आपल्या डोळ्यांसमोर येते. याचप्रमाणें उच्छिष्ट परब्रह्मच नामरूप धारण करून, विश्वाकार होऊन, विश्वरूप होऊन आपल्यासमोर येतें. हेंच परमात्म्याचें विश्वरूप दर्शन, जें भगवद्गीतेच्या अकराव्या अध्यायांत आणि यजुर्वेदाच्या रुद्राध्यायांत वर्णिलेलें आहे.

उच्छिष्टांत रूप

' उच्छिष्टांत नामरूप समाविष्ट झालें आहे ' हाच मंत्र भाग मुख्य आहे. उच्छिष्टांत लोक, इंद्र, अग्नि, विश्व, द्यावा-पृथिवी, सर्व भूतमात्र, जल, समुद्र, चंद्र, वायु, (मं. १-२) नव भूमि, सूर्य, (मं. १४) रेती, पत्थर, मोठमोठ्या शिला, औषधी, वनस्पति, गवत, अभ्र, विद्युत्, वृष्टि, (मं. २१) जे प्राणानें

जीवंत राहतात, जे चक्षूनें पहातात, जे आकाशांत आहेत ते सर्व, (मं. २३) देव, पितर, मनुष्य, गंधर्व, अप्सरा, (मं. २७) विश्व उत्पन्न करणाऱ्या दहा देवता (मं. ४) हे सर्व उच्छिष्टांत आहेत. हे सर्व आकारवान्–रूपवान् पदार्थ आहेत. त्यांना आश्रय उच्छिष्ट परमात्म्याचाच आहे.

उच्छिष्टांत नाम

आतां नामाचें वर्णन पहा– ऋग्वेद, सामवेद, उद्गीथ, स्तवन, हिंकार, स्वर, सामवेदाचे आलाप, (मं. ५) इंद्राग्नि सूक्त, पवमानसूक्त, महाव्रतादिसूक्त, (मं. ६) छन्द, पुराण (मं. २४) हीं सर्व नामें आहेत. हे सर्व शब्द आहेत. शब्दसृष्टीचा हा सर्व विस्तार आहे आणि हें सर्व नाममय उच्छिष्टाच्या आधारावरच राहतें.

याप्रमाणें नाम आणि रूप उच्छिष्ट ब्रह्मांत स्थित आहे. जें रूप आहे तें उच्छिष्टाचेंच रूप आहे, आणि जें नाम आहे तेंहि त्याचेंच नाम आहे. असें हें सर्व नामरूप त्यांतच राहिलें आहे.

उच्छिष्टांत कर्म

याप्रमाणें सर्व नाम आणि रूप उच्छिष्ट ब्रह्मांत आहे या गोष्टीची प्रचीति आल्यावर " कर्म " कोठें राहतें, हा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाचें उत्तरहि या सूक्तांतच मिळतें. राजसूय, वाजपेय, अग्निष्टोम, अध्वर, अश्वमेध (मं. ७) अग्न्याधान, दीक्षायज्ञ, सत्र, (मं. ८) अग्निहोत्र, व्रत, तप, दक्षिणा, इष्टापूर्त, (मं ९) एकरात्र, द्विरात्र, सद्यःक्रीः, प्रक्रीः, उक्थ, (मं. १०) चतूरात्र, पंचरात्र, षड्रात्र, सप्तरात्र, अष्टरात्र, दशरात्र, द्वादशाह, षोडशी, (मं. ११) विश्वजित्, अतिरात्र, (मं. १२) वगैरे सर्व यज्ञकर्मेंच आहेत आणि तीं सर्व उच्छिष्टांतच राहिलेलीं आहेत. त्या उच्छिष्ट ब्रह्माच्या आधारावर या संपूर्ण कर्ममार्गाची व्यवस्था आहे अर्थात् सर्व कर्मांचा आधार ब्रह्मच आहे.

उच्छिष्टांत काल

'काल' हि उच्छिष्ट ब्रह्माच्या आधारावरच आहे. यासाठीं म्हटलें आहे की– अर्धमास (पक्ष), मास (महिना), ऋतु, (मं. २०) अयन, वर्ष, संवत्सर (मं. १८) हे सर्व उच्छिष्ट ब्रह्मांतच राहिलेले आहेत. भूत, भविष्य, (मं. १७) संपूर्ण काल व त्याचे अवयव हे उच्छिष्ट ब्रह्माच्या आधारावर आहेत, हें येथें सांगण्यांत आलें आहे.

कर्म

कर्माचा संबंध कालाबरोबर आहे. एकरात्र, द्विरात्र वगैरे अनेक यज्ञ कालमर्यादेनें युक्त आहेत. कित्येक इष्टि लहान लहान कालखंडाशीं निगडित आहेत आणि कित्येक सत्रें दीर्घकालाचीं असतात. तथापि सर्व प्रकारचे यज्ञ याप्रमाणें कालानें मर्यादित आहेत, अर्थात् ज्याप्रमाणें नामरूपाचा परस्पर संबंध आहे त्याप्रमाणें काल कर्मांचा परस्पर संबंध आहे. वाचकांनीं यासंबंधीं विचार करावा व अनुभव घ्यावा.

कर्मांचे भेद

श्रद्धा, तप, व्रत, दीक्षा, (मं. ९) सूनृत, नम्रता, कल्याण, स्वधा अर्थात् स्वतःची धारणाशक्ति, बल, अमृतत्व, सहनसामर्थ्य, कामना, वासना (मं. १३), ऋत, सत्य, श्रम, धर्म, वीर्य– पराक्रम, लक्ष्मी, शोभा, (मं. १७) समृद्धि, संकल्प, क्षात्रबल, (मं. १८), सिद्धि, प्राप्ति, समाप्ति, व्याप्ति, महत्व, वृद्धि, (मं. २२) आनंद, मोद, प्रमोद (मं. २५) वगैरे सर्व ज्यांचा कर्माशीं संबंध आहे, त्यांची मानवाच्या उन्नतीसाठीं अत्यंत आवश्यकता आहे. हे सर्व उच्छिष्ट ब्रह्माच्या आधारावरच आहेत.

प्राण

जे प्राणानें सजीव राहतात, जे डोळ्यानें पहातात, ते सर्व प्राणिमात्र उच्छिष्ट ब्रह्माच्या आश्रयावरच रहातात. अर्थात् ते सर्व उच्छिष्ट ब्रह्माहून निराळे नाहींत. (मं. २३)

द्वंद्वें

सत्, असत्, जीवन, मृत्यु, त्र आणि द्र (वरण आणि द्रावण) हीं द्वंद्वें उच्छिष्ट ब्रह्मांतच आहेत. अर्थात् जें कांहीं येथें या विश्वांत आहे त्या सर्वांचा संबंध परब्रह्माशीं आहे. परब्रह्माहून पृथक् अस्तित्व कोणाचेंही नाहीं.

कर्मकांड

या सूक्तांत अनेक यज्ञांचीं नावें आलेलीं आहेत. त्यांचीं स्वरूपें यजुर्वेदावरील विवेचनांत विशेष स्पष्टरीतीनें देण्यांत येतील; कारण कर्मकांड हा यजुर्वेदाचा विषय आहे.

विश्वरूप–दर्शन

ज्या विश्वरूपदर्शनाचा उल्लेख येथें करण्यांत आला आहे तोच विषय श्रीमद्‌भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायांत आणि यजुर्वेदाच्या रुद्राध्यायांत विस्तारानें सांगण्यांत आलेला आहे. वाचकांनीं तुलना करून वेदाचें मर्म बरोबर समजून घ्यावें.

ब्रह्मप्राप्ति

कांड ७ सूक्त ६६ (६८)

(ऋषिः- ब्रह्मा । देवता ब्रह्म)

यद्यन्तरिक्षे यदि वात आस यदि वृक्षेषु यदि वोलपेषु ।
यदश्रवन्पशव उद्यमानं तद्ब्राह्मणं पुनरस्मानुपैतु ॥ १ ॥

गुह्य-अध्यात्म विद्या

कांड २ सूक्त १

(ऋषिः- वेनः । देवता- ब्रह्म, आत्मा)

वेनस्तत्पश्यत्परमं गुहा यद्यत्र विश्वं भवत्येकरूपम्
इदं पृश्निरदुहज्जायमानाः स्वर्विदो अभ्यनूषत व्राः ॥ १ ॥
प्र तद्वोचेदमृतस्य विद्वान् गन्धर्वो धाम परमं गुहा यत्
त्रीणि पदानि निहिता गुहास्य यस्तानि वेद स पितुष्पितासत् ॥ २ ॥

अर्थ-(**यदि अंतरिक्षे यदि वाते**) जर अंतरिक्षांत आणि जर वायूंत, (**यदि वृक्षेषु यदि वा उलपेषु**) जर वृक्षांत अथवा जर गवतांत आपण पहाल तर त्यांत जें (**आस**) नेहमीं राहतें (**यत् पशवः अस्रवन्**) जें प्राण्यामध्यें प्रवाहित आहे, (**तत् उद्यमानं ब्राह्मणं**) तें प्रकट होणारें ब्रह्म (**पुनः अस्मान् उपैति**) पुन्हां आम्हांला प्राप्त होतें. (१)

अर्थ— (**वेनः तत् परमं पश्यत्**) भक्तच त्या परम श्रेष्ठ परमात्म्याला पाहूं शकतो (**यत् गुहा**) जो हृदयरूपी गुंफेंत वास करतो आणि (**यत्र विश्वं एकरूपम् भवति**) ज्यांत संपूर्ण जगत् एकरूप होतें. (**इदं पृश्निः जायमानाः अदुहत्**) याचेंच दोहन करून प्रकृतिनें जन्म घेणारे पदार्थ बनविलेले आहेत आणि यासाठींच (**स्वर्विदः व्राः**) प्रकाशाला जाणून व्रत पालन करणारे मनुष्यच याची (**अभ्यनूषत**) उत्तम प्रकारें स्तुति करतात. (१)

(**यत् गुहा**) जें हृदयांतील गुहेंत आहे (**तत् अमृतस्य परमं धाम**) त्या अमृताचें श्रेष्ठ स्थान (**विद्वान् गन्धर्वः प्रवोचेत्**) ज्ञानी वक्त्यानें सांगावें, (**अस्य त्रीणि पदा**) याचे तीन पाद (**गुहा निहिता**) हृदयरूपी गुहेंत राहिलेले आहेत. (**यः तानि वेद**) जो याला जाणतो (**सः पितुः पिता असत्**) तो पित्याचा पिता अर्थात् सामर्थ्यसंपन्न होतो. (२)

भावार्थ— जें ब्रह्म या अंतरिक्षांत, वायूंत, वृक्षांत, गवतांत विराजमान आहे, जें पशूंत अर्थात् प्राण्यांमध्यें प्रवाहित होतें अर्थात् जें स्थिर-चर यांत विद्यमान आहे, तें सर्वत्र प्रकाशित होणारें ब्रह्म आम्हांला प्राप्त होतें. (१)

ब्रह्म नामक महान् आत्मतत्व जें सर्वत्र स्थिर-चरांत व्यापून आहे, तें सर्वत्र प्रकाशित होतें, ज्याच्या शक्तीनें संपूर्ण जगाला हें सुंदर रूप प्राप्त झालें आहे, तें ब्रह्म आम्हां सर्व मनुष्यांना प्राप्त होणें शक्य आहे, म्हणून त्याच्या प्राप्तीसाठीं मानवानें प्रयत्न करावा.

भावार्थ— ज्यांत जगाची विविधता भेदाचा त्याग करून एकरूपतेला प्राप्त होते आणि ज्याचा निवास हृदयांत आहे, त्या परमात्म्याला भक्तच स्वतःच्या हृदयांत साक्षात् पाहूं शकतो. या प्रकृतीनें त्या एका आत्म्याच्या विविध शक्तींचा अवलंब करून उत्पन्न होणाऱ्या या विविध जगताची रचना केली आहे, म्हणूनच आत्मज्ञानी मनुष्य नेहमीं त्या आत्म्याचेंच गुणवर्णन करीत असतात. (१)

जें स्वतःच्या हृदयांतच आहे त्या अमृततत्वाच्या परमधामाचें वर्णन आत्मज्ञानी संयमी वक्ताच करूं शकतो. त्या तत्वाचे तीन पाद हृदयांत गुप्त आहेत. जो त्यांचें यथार्थ ज्ञान करून घेतो तोच परमज्ञानी होतो. (२)

स नः पिता जनिता स उत बन्धुर्धामानि वेद भुवनानि विश्वा ।
यो देवानां नामध एक एव तं संप्रश्नं भुवना यन्ति सर्वा ॥ ३ ॥
परि द्यावापृथिवी सद्य आयमुपातिष्ठे प्रथमजामृतस्य ।
वाचमिव वक्तरि भुवनेष्ठा धास्युरेष नन्वेषो अग्निः ॥ ४ ॥
परि विश्वा भुवनान्यायमृतस्य तन्तुं विततं दृशे कम् ।
यत्र देवा अमृतमानशानाः समाने योनावध्यैरयन्त ॥ ५ ॥

अर्थ— (**सः नः पिता**) तो आपणां सर्वांचा पिता आहे, (**जनिता**) तो जन्म देणारा (**उत सः बन्धुः**) आणि तोच आपला भाऊ आहे, तो (**विश्वा भुवनानि धामानि वेद**) सर्व भुवनांना व स्थानांना जाणतो (**यः एकः एव**) जो एकटाच (**देवानां नाम-धः**) संपूर्ण देवांचीं नामें धारण करणारा आहे, (**तं सं-प्रश्नं**) त्याच योग्य प्रकारें विचाराई अशा परमात्म्यापाशींच (**सर्वा भुवना यन्ति**) सर्व भुवनें पोहोंचतात. (३)

(**सद्यः**) आतांच (**द्यावा पृथिवी परि आयं**) द्युलोक आणि भूलोकांत सर्वत्र मी फिरून आलों आहें आणि आतां (**ऋतस्य प्रथमजां उपातिष्ठे**) सत्याच्या प्रथम उत्पादकाची उपासना करीत आहें. (**वक्तरि वाचं इव**) वक्त्यांत जशी वाणी रहाते तसाच हा (**भुवनि स्था**) सर्व भुवनांमध्यें राहतो आणि (**एषः धास्युः**) हाच सर्वांचा धारक आणि पोषणकर्ता आहे. (**ननु एषः अग्निः**) खात्रीपूर्वक हा अग्निच आहे. (४)

(**यत्र**) ज्यांत (**अमृतं आनशानाः देवाः**) अमृत पिणारे सर्व देव (**समाने योनौ**) समान आश्रयाला (**अध्यैरयन्त**) प्राप्त होतात, त्या (**ऋतस्य**) सत्याच्या (**विततं कं तन्तुं दृशे**) व्यापक सुखरूप तंतूंना पहाण्यासाठीं मी (**विश्वा भुवनानि परि आयं**) सर्व भुवनें फिरून आलों आहें. (५)

भावार्थ— तोच आपला सर्वांचा पिता, जन्मदाता आणि भाऊहि आहे. तोच सर्व प्राण्यांच्या सर्व अवस्थांना संपूर्णपणें यथार्थ जाणतो. तो एकटाच आहे आणि अग्न्यादि सर्व देवांचीं नामें त्यालाच प्राप्त होतात, अर्थात् त्यालाच संबोधून तीं दिलेलीं असतात. जिज्ञासू त्याच्या संबंधीं वारंवार प्रश्न करतात आणि ज्ञान प्राप्त करतां करतां शेवटीं त्याला प्राप्त करतात. (३)

द्युलोक आणि भूलोकांमध्यें जे अनंत पदार्थ आहेत, त्या सर्वांचें निरीक्षण केल्यावर आपल्याला असें ज्ञान होतें कीं, अटल सत्य नियमांचा प्रथम प्रवर्तक एक परमात्माच आहे. यासाठींच मी त्याची उपासना करतों. ज्याप्रमाणें वक्त्यांत वाणी असते, त्याप्रमाणें जगांतील सर्व पदार्थांत अथवा सर्व प्राण्यांत तो सर्वांचें धारण पोषण करणारा, एकच आत्मा राहतो. त्याला अग्निही म्हणतां येईल; अर्थात् ज्याप्रमाणें अग्नि लाकडांमध्यें गुप्तरीतीनें असतो, त्याप्रमाणें तो सर्व पदार्थांत, गुप्तरूपानें राहिलेला आहे. (४)

ज्या एका परमात्म्यांत अग्नि, वायु, सूर्यादि देव सारखेच आश्रय करून राहिलेले आहेत आणि ज्याची अमृतमय शक्ति या सर्व देवांमध्यें कार्य करीत राहिली आहे, तेंच एक सर्वत्र व्यापक असें सत्य आहे. त्याचा साक्षात्कार होण्यासाठीं मी सर्व वस्तूंचें निरीक्षण केलें आहें आणि त्यानंतर मला असा अनुभव आला आहे कीं तें एकच सूत्र सर्वांत पसरलेलें आहे. (५)

गूढ-आध्यात्मिक-विद्या

गूढ विद्या

‘ गूढ विद्या ’ या शब्दाचा अर्थ ‘ गूढ तत्वाचें ज्ञान करून देणारी विद्या ’ असा आहे. पुष्कळांचा असा समज आहे कीं ही विद्या गुप्त ठेवायची असते, आणि त्यासाठीं ह्या विद्येला गूढ-विद्या किंवा गुह्यविद्या, असें म्हणतात; परंतु हें असें नाहीं. या दृश्य संसारांत सर्वांचें आधारभूत तत्व एक आहे. संसारांतील सर्व पदार्थ दृश्य आहेत आणि हें सर्वव्यापक आधारतत्व अदृश्य आहे. प्रत्येक मनुष्य सर्व पदार्थांचे रंग, रूप, आकार,

वजन वगैरे पाहूं शकतो, परंतु त्या पदार्थांच्या आंत व्यापून राहिलेल्या तत्वाला तो जाणूं शकत नाहीं. फारच थोडे याचा अनुभव घेऊं शकतात. मनुष्याचा स्थूल देह सर्व पाहूं शकतात, परंतु त्याच देहांत राहणाऱ्या गुह्य अथवा गुप्त आत्म्याचें दर्शन कोणाला होतें ? परंतु जेवढें देहाचें अस्तित्व सत्य आहे, तेवढेंच किंबहुना त्याहूनही अधिक सत्य देहधारी आत्म्याच्या अस्तित्वांत आहे. याचप्रमाणें संपूर्ण जगाच्या आंत व्यापून राहिलेल्या गुह्य-तत्वाविषयीं समजलें पाहिजे.

दृश्य आकाराचें जगत् दिसतें, म्हणून तें गुह्य नाहीं; परंतु या दृश्य जगाला आधार ज्या गुह्यतत्वाचा आहे, तें तत्व तितकें स्पष्टपणें दिसत नाहीं; म्हणून त्या तत्वाला शोधून काढणें, याचा अनुभव घेणें, याचा साक्षात्कार करणें, हें या ' गुह्य विद्येचें ' कार्यक्षेत्र आहे. यासाठींच या विद्येला " गुह्यविद्या, गूढविद्या, गुप्तविद्या, गुह्यात् गुह्यतराचें ज्ञान, आत्मज्ञान, ब्रह्मविद्या, परा-विद्या, विद्या " वगैरे अनेक नांवें आहेत. या सर्व शब्दांचें तात्पर्य ' त्या जगाला आधारभूत अशा आत्मतत्वाचें ज्ञान ' असेंच आहे.

वेदमंत्रांत ही विद्या विशेष रीतीनें सांगितली आहे. ठिक-ठिकाणीं निरनिराळ्या रीतीनें ह्या विद्येचें वर्णन केलेलें आहे. कांहीं मंत्रांत स्पष्ट वर्णन आहे तर कांहीं मंत्रांत गूढ वर्णन आहे. हें सूक्त या विद्येचें स्पष्ट वर्णन करणारें असल्यानें, उपासकांना याच्या मननानें फारच लाभ होण्यासारखा आहे.

गूढ विद्येचा अधिकारी

सर्व विद्यांमध्यें ही गूढविद्या मुख्य आहे, म्हणून या विद्येच्या प्राप्तीकरतां प्रत्येकानें प्रयत्न केलाच पाहिजे. वास्तविक पाहिलें असतां सर्व माणसें या विद्येच्या प्राप्तीच्या मार्गांतच आहेत. कांहींनीं दूरचा मार्ग धरला आहे आणि कांहींनी जवळचा मार्ग पकडला आहे. या अनेक मार्गांपैकीं या सूक्ताला कोणता मार्ग अभीष्ट आहे तें आतां आपण पाहूं.

वेनः तत्पश्यत् ॥ १ ॥

" वेनच त्याला पाहूं शकतो " हें प्रथम मंत्राचें विधान आहे. याठिकाणीं प्रत्यक्ष पाहतो– ज्याप्रमाणें मनुष्य सूर्याला आकाशांत प्रत्यक्ष पाहात असतो, त्याचप्रमाणें भक्त ही त्या आत्म्याला स्वतःच्या हृदयांत प्रत्यक्ष पाहतो, हा भाव येथें स्पष्ट आहे. हा अधिकार फक्त ' वेना ' चाच आहे. हा वेन कोण ? ' वेन ' धातूचे अर्थ– ' भजन-पूजन करणें, विचारानें पाहणें, भक्ति करणें, तसेंच उपासनेचें कार्य करण्याकरितां जाणें ' असे आहेत. हेच अर्थ याठिकाणीं या वेन शब्दांत आहेत. " जो ईश्वराचें भजन-पूजन करतो, हृदयामध्यें त्याची भक्ति करतो, विचार करून त्याला जाणण्याचा प्रयत्न करतो. " या प्रकारचा जो ज्ञानी भक्त आहे, तोच याठिकाणीं वेन शब्दानें अभिप्रेत आहे. अर्थात् केवळ ' बुद्धिमान् ' असाच अर्थ येथें घेणें योग्य नाहीं. बुद्धि पाहिजे तेवढी विशाल असली तरी जोंपर्यंत हृदयांत भक्तीच्या ऊर्मि उठत नाहींत, तोंपर्यंत असल्या शुष्कज्ञानानें परमात्म-साक्षात्कार होणें शक्य नाहीं, ही गोष्ट या सूक्तानें विशेष रीतीनें सांगितली आहे.

दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं—

अमृतस्य धाम विद्वान् गंधर्वः ॥ २ ॥

" अमृताच्या स्थानाला जाणणारा गंधर्वच त्याचें वर्णन करूं शकतो. " याठिकाणीं गंधर्व शब्द महत्वाचा आहे. गंधर्व शब्दाचा अर्थ " संत, पवित्र आत्मा " असा कोशांत प्रसिद्ध आहे, आणि हा शब्द वेन शब्दाच्या पूर्वीं सांगितलेल्या अर्थाशीं जुळणारा आहे. तरीपण " **गां वाणीं धारयाति** " अर्थात् ' स्वतःच्या वाणीला धारण करणारा ' हा अर्थ येथें जास्त योग्य दिसतो. तसें पाहिलें तर वाणीला सगळेच धारण करतात, परंतु या-ठिकाणीं स्वतःच्या वाणीचा फाजिल प्रयोग न करतां स्वतःच्या वाक्शक्तीवर संयम ठेवणारा, अत्यंत आवश्यकता भासेल तेव-ढाच वाणीचा उपयोग करणारा असा अर्थ ' गंधर्व ' या शब्दांत आहे. विशेष अर्थानें युक्त पण अल्प शब्द बोलणारा विद्वान् येथें गंधर्व शब्दानें घेणें योग्य आहे. प्रायः आत्मज्ञानी वक्त्याचें वक्तृत्व मुकेंच असतें, किंवा थोड्या परंतु अर्थपूर्ण शब्दांनींच आत्मज्ञानी, पवित्रात्मा, आप्तपुरुष जें कांहीं सांगावयाचें असतें तें सांगत असतो.

जोंपर्यंत लौकिक विद्येचें ज्ञान मनुष्याच्या मनांत खळबळ करीत असतें, तोंपर्यंत तो मेघगर्जनेप्रमाणें वक्तृत्व करीत असतो, परंतु याचा परिणाम श्रोत्यांवर विशेष होत नाहीं. ज्यावेळीं आत्म-ज्ञान होतें आणि ईश्वराचा साक्षात्कार होतो त्यावेळीं मनुष्याचें बोलणें कमी होतें. परंतु प्रभाव वाढत असतो, स्वतःच्या वाक्शक्तीवर संयम होऊं लागतो. हीच गंधर्व अवस्था समजावी.

येथें ' वेन आणि गंधर्व ' हे दोन शब्द आत्मज्ञानाचा अधि-कार दाखविणारे आहेत. उपासक, भक्त आणि गंभीर शब्दांचा प्रयोग संयमासह करणारा जो असतो त्यालाच परमात्म्याचा साक्षात्कार होतो आणि तोच त्याचें वर्णन करूं शकतो.

पूर्व–तयारी (प्रथमावस्था)

उक्त उपासक आत्मज्ञानी होऊं शकतो, परंतु असे उपासक होण्यासाठीं पूर्वतयारीची आवश्यकता आहे. ही पूर्वतयारी खालील

शब्दांच्या द्वारें या सूक्तांत सांगितली आहे.—

सद्यः द्यावा पृथिवी परि आयम् ॥ ४ ॥
विश्वा भुवनानि परि आयम् ॥ ५ ॥

" एक वेळ द्युलोक आणि पृथ्वी लोकांत फिरून आलों आहें. संपूर्ण भुवनांमध्यें फिरून आलों आहें. " अर्थात् द्युलोक आणि पृथ्वीला तसेंच अन्यान्य भुवनांमध्यें आणि स्थानांत जें जें द्रष्टव्य, प्राप्तव्य आणि भोक्तव्य आहे तें सर्व पाहिलें आहे, मिळविलें आहे आणि भोगलें आहे. जगांत खूप भ्रमण केलें, कार्य व्यवहार केले, धनदौलत मिळविली, राज्यादि भोग प्राप्त केले, विजय मिळविला, यश पसरविलें, सर्व कांहीं केलें आहे. अभ्युदयासाठीं मनुष्याला जें जें करणें शक्य आहे तें तें सर्व केलें आहे. गूढतत्वदर्शनाची ही प्रथमावस्था आहे. या अवस्थेंत भोगेच्छा मुख्य असते.

द्वितीय अवस्था

यानंतर द्वितीयावस्था येते. त्यावेळीं विचार येतो कीं, हे नाशवंत भोग वाटेल तितके मिळविले तरी त्यांपासून खरी तृप्ति होत नाहीं, म्हणून खरी तृप्ति, खरें मनाचें समाधान मिळविण्याकरितां कांहीं प्रयत्न केला पाहिजे, यावेळीं या द्वितीय अवस्थेंत भोग-विलासांकडे प्रवृत्ति कमी होत जाते आणि अभौतिक तत्वदर्शनाची लालसा वाढत जाते. त्यासंबंधींचा निर्देश या सूक्तांत खालीं लिहिल्याप्रमाणें केलेला आहे—

अमृतस्य विततं कं तन्तुं दृशे विश्वा भुवनानि परि आयम् ॥ ५ ॥

" अमृतमय सुखकारक मूल सूत्राला पहाण्यासाठीं मी सर्व भुवनांमध्यें फिरलों. " अर्थात् या द्वितीय अवस्थेंत त्याचें भ्रमण या विविधतेनें भरलेल्या जगांत एकतेचा मूळ धागा जर असेल तर तो पहायला मिळावा, याकरितां असतें. दुःख, कष्ट, भेद-भाव, झगडे यांनीं भरलेल्या या जगांत सुख, शांति, ऐक्य, अविरोध देणारें तत्व असेल तर तें मी शोधून काढीन, या उद्देशानें त्याचें भ्रमण होतें. ही जिज्ञासूची दुसरी अवस्था आहे. या अवस्थेंत असलेला मनुष्य तीर्थक्षेत्रें, पुण्यप्रदेश फिरतो. तेथें अनेक सज्जनांना भेटतो. देशदेशांतरीं जाऊन तेथून ज्ञान प्राप्त करतो. यावेळीं त्याचा उद्देश हाच असतो कीं या भेदपूर्ण, दुःख-मय अवस्थेंतून सुटून अभेदमय, सुखमय अशा अवस्थेला प्राप्त करावें. याप्रमाणें इतका प्रयत्न केल्यानंतर अर्थात् त्याला कांहींना कांहीं ज्ञान प्राप्त होतेंच. नंतर या प्राप्त झालेल्या ज्ञानाला आपल्यांत स्थिर करण्याची तो तयारी करतो. याप्रमाणें द्वितीयावस्थेंतून तो तृतीयावस्थेंत जातो. या तृतीयावस्थेचें वर्णन या सूक्तांत खालीं लिहिलेल्या शब्दांच्या द्वारें केलें आहे—

तृतीयावस्था

द्यावापृथिवी परि आयं सद्यः ऋतस्य प्रथमजां उपातिष्ठे ॥ ४ ॥

" मी द्युलोक आणि भूलोकांत पुष्कळ फिरून आलों आणि आतां सत्याच्या प्रथम प्रवर्तकाची मी उपासना करतों. "

जगभर फिरून विचारपूर्वक निरीक्षण केल्यानें लक्षांत येतें कीं, या विभिन्न जगांत एक अभिन्न तत्व आहे आणि तेंच एक खरें सुख देणारें आहे. ज्यावेळीं हें ज्ञान याला होतें त्यावेळीं त्याच्याजवळ जाण्याची तो इच्छा करतो. तें तत्व प्राप्त करण्याला उपासनेशिवाय दुसरा मार्ग न दिसल्यामुळें शेवटीं तो उपासक होतो. या अवस्था या सूक्तांत मंत्रद्वारां व्यक्त करण्यांत आल्या आहेत. या मंत्रांबरोबर यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेंतील मंत्र पाहिले असतां हा विषय अधिक स्पष्ट होईल; म्हणून ते मंत्र आतां येथें दिले आहेत—

परीत्य भूतानि परीत्य लोकान् परीत्य सर्वाः प्रदिशो दिशश्च ।
उपस्थाय प्रथमजामृतस्यात्मनात्मानमभि सं विवेश ॥ ११ ॥
परि द्यावा पृथिवी सद्य इत्वा परि लोकान्परि दिशः परि स्वः ।
ऋतस्य तन्तुं विततं विचृत्य तदपश्यत्तद-भवत्तदासीत् ॥ १२ ॥ (वा. यजु. अ. ३२)

अर्थ— " (**भूतानि परीत्य**) सर्व भूतांना जाणून अगर सर्व भूतांत संचार करून (**लोकान् परीत्य**) सर्व लोकांत फिरून (**सर्वाः दिशः प्रदिशः च परीत्य**) सर्व दिशा, उपदिशांत भ्रमण करून अर्थात् या सर्वांना यथायोग्य जाणून (**ऋतस्य प्रथमजां उपस्थाय**) सत्याच्या प्रथम नियमांच्या प्रवर्तकाची उपासना करून (**आत्मना आत्मानं**) केवळ आत्मस्वरूपानें परमात्म तत्वांत (**अभि सं विवेश**) सर्व प्रकारें मी प्रवेश करतों. (११)

" (**सद्यः द्यावा पृथिवी परि इत्वा**) एकाच वेळीं द्युलोकांतील आणि पृथ्वींतील सर्व पदार्थ पाहून (**लोकान् परि**) सर्व लोकांना पाहून (**दिशः परि**) दिशांचें निरीक्षण करून (**स्वः परि**) आत्मप्रकाशाला जाणून (**ऋतस्य विततं तन्तुं**) अटल सत्याच्या पसरलेल्या सूत्राला वेगवेगळे करून ज्यावेळीं (**तत् अपश्यत्**) तें (**सूत्र**) पहातो त्यावेळीं (**तत् अभवत्**) तो तसा होतो जसा (**तत् आसीत्**) तो पूर्वी होता. " (१२)

हे दोनही मंत्र उपासकाच्या उन्नतिच्या मार्गावर उत्तम रीतीनें प्रकाश पाडतात. जगामध्यें भ्रमण करण्याची जी गोष्ट अथर्ववेदांत सांगितलेली आहे त्या गोष्टीचें विशेष स्पष्टीकरण या यजुर्वेदाच्या प्रथमार्धाच्या द्वारें झालें आहे. सर्व भूतें, सर्व लोक लोकांतर, सर्व दिशा, उपदिशा, द्युलोक आणि पृथ्वींतील सर्व पदार्थ किंवा स्वतःचें अस्तित्व जेथपर्यंत जाऊं शकतें तेथपर्यंत जाऊन तेथें विजय मिळवून, पुरुषार्थ प्रयत्नानें यश पसरवून, तसेंच या सर्वांचें परीक्षण, निरीक्षण, समीक्षण, जें काहीं करणें शक्य असेल तें सर्व करून पाहिलें. दुसऱ्या मंत्रभागांत सांगितलें कीं, इतक्या निरीक्षणानें कळलें, कीं अटल सत्यनियमांना चालविणारा एकच सूत्ररूप आत्मा सर्वांच्या आंत राहिलेला आहे, तोच सर्वव्यापक आहे, सर्व कांहीं याच्याच आधारानें आहे. त्याच्या आधारावांचून कोणींहि राहूं शकत नाहीं. हें ज्ञान झाल्यावर त्याचीच उपासना केली आणि केवळ आपल्या आत्मस्वरूपानेंच त्यांत प्रवेश केला. ज्यावेळीं तिथला हा अनुभव घेतला, त्यावेळीं उपासक तत्सदृश झाला, जसा तो पूर्वी होता.

वाचक या मंत्रांचा हा आशय समजून घेतील तर त्यांना कळून येईल कीं जो अथर्ववेदाच्या या सूक्तांतील मंत्रांच्या द्वारें आशय व्यक्त झाला आहे, तोच विशेष विस्तारानें या मंत्रांत वर्णिलेला आहे; आणि हे मंत्र उन्नतिच्या अवस्थाही स्पष्ट शब्दांच्या द्वारें सांगत आहेत. त्या पहा—

(१) प्रथमावस्था - (अज्ञानावस्था) स्वतःविषयीं अथवा जगाविषयीं पूर्ण अज्ञान.

(२) द्वितीयावस्था - (भोगावस्था) जग स्वतःच्या भोगासाठीं आहे, असें मानणें आणि जगावर प्रभुत्व मिळविण्याकरितां यत्न करणें. प्रभुत्व स्थापित करणें. या अवस्थेंत राज्यैश्वर्याचे भोग वाढविले जातात.

३ तृतीयावस्था - (त्यागावस्था) जगांतील भोगविलासांपासून समाधान प्राप्त न झाल्यामुळें, विभक्तांत व्यापक असलेल्या अविभक्त सत्तावान् सद्वस्तूला शोधण्याचा प्रयत्न करणें, ही जिज्ञासूची अवस्था आहे.

४ चतुर्थ अवस्था - (भक्तावस्था) विभिन्न विश्वांत व्यापक असें एक अभिन्न तत्व ज्यावेळीं मनुष्य पाहूं लागतो आणि श्रद्धेनें व भक्तिनें त्या तत्वाची उपासना करूं लागतो ती.

५ पंचमावस्था - (स्वरूपावस्था) उपासना आणि भक्ति दृढ आणि सहज झाल्यावर तो तद्रूप होऊन जातो. जणूं त्याच्याशीं एकरूप होऊन त्यांत प्रविष्ट होतो अथवा जसा पूर्वी होता तसा होऊन जातो. ही साक्षात्काराची अवस्था आहे. याठिकाणीं त्याला सर्व ज्ञान प्रत्यक्ष होतें.

हाच मार्ग या अथर्ववेदाच्या सूक्तांत वर्णन केला आहे. या ठिकाणीं वाचकांच्या लक्षांत स्पष्टपणें आलें असेल कीं पूर्व तयारी कोणती ? आणि पुढचा मार्ग कोणता आहे.

पूर्णावस्था

पूर्वोक्त यजुर्वेदाच्या मंत्रांत सांगितलें आहे कीं—

उपस्थाय प्रथमजामृतस्य
आत्मनात्मानमभि सं विवेश ॥ ११ ॥
ऋतस्य तन्तुं विततं विचृत्य
तदपश्यत्तदभवत्तदासीत् ॥ १२ ॥ (वा. य. अ ३२)

" सत्याचा पहिला प्रवर्तक जो परमात्मा त्याची उपासना करून आत्मस्वरूपानें परमात्म्यांत प्रविष्ट झाला, सत्याच्या पसरलेल्या सूत्राला पृथक् करून पाहिलें तेव्हां तसा झाला जसा तो प्रथम होता. " हें सर्व वर्णन पूर्ण अवस्थेचें आहे. अथर्वसूक्तांत हें वर्णन खालील शब्दांच्या द्वारें केलेलें आहे—

स्वर्विदः व्राः अभ्यनूषत ॥ १ ॥
अमृतस्य धाम विद्वान् ॥ २ ॥
यस्तानि वेद स पितुष्पिताऽसत् ॥ २ ॥

" (**व्राः**) व्रतपालन करणारे (**स्वर्विदः**) आत्मज्ञानी त्याचीच स्तुति करतात. अमृतस्थानाला जाणतात. जो हें स्थान जाणतो तो पित्याचा पिता अर्थात् सर्वांत अधिक ज्ञानी अथवा सर्वांत अधिक समर्थ होत असतो. " हें अंतिम फल आहे. पूर्ण अवस्थेला पोहोंचण्याचा निश्चय या अवस्थेंत होऊं शकतो. प्रथम मंत्रांतील " व्राः " हा शब्द फार महत्वाचा आहे. व्रतें अथवा नियमांचें पालन करणारा, स्वतःच्या उन्नतिसाठीं जे नियम आवश्यक आहेत, त्यांचे स्वेच्छेनें पालन करणारा असतो. त्याचें हें (**व्राः**) नांव आहे. नियम स्वतः पाहून स्वतःच त्या व्रताचें पालन करणें हें महान् पुरुषार्थानेंच साध्य होतें. यांत व्रतभंग झाल्यास स्वतःच स्वतःला दंड द्यावयाचा असतो. स्वतःच प्रायश्चित्त करावयाचें असतें. महान् आत्माच असें करूं शकतो. प्रत्येक मनुष्य दुसऱ्यावर अधिकार गाजवूं शकतो, परंतु स्वतः आपल्यावर अधिकार गाजविणें फार कठीण आहे. स्वतःच्या संपूर्ण शक्ती आपल्या स्वाधीन ठेवणें, केव्हांही कुविचारादि शत्रूंच्या आधीन न होणें, इत्यादि महत्वाच्या गोष्टी या आत्मशासनांत येतात; परंतु जो या गोष्टी करील तोच आत्मज्ञानी आणि विशेष समर्थ होईल आणि त्याचेंच महत्व सर्व लोक मान्य करतील.

सूत्रात्मा

मण्यांची माळ बनते. या माळेंत जितके मणी असतात त्या सर्व मण्यांत सूत्र एकच असतें. ज्याच्या आधारावर हे मणी आहेत, तें सूत्र तुटून गेलें तर माळेचें अस्तित्व राहणार नाहीं आणि मणी पण इतस्ततः सांडून जातील. ज्याप्रमाणें अनेक मण्यांमध्यें एकच सूत्र अथवा दोरा असतो, त्याचप्रमाणें या जगाच्या सूर्यचंद्रादि विविध मण्यांत परमात्मारूपी व्यापक सूत्र अथवा तंतू आहे आणि याच्या आधारावर हें सर्व विश्व राहिलेलें आहे. त्याचें प्रत्यक्ष दर्शन होत नाहीं. सर्व माळेचेंच वर्णन करतात, परंतु ज्या सूत्राच्या आधारावर ते सर्व मणी माळेच्या रूपानें राहतात, त्या सूत्राचें महत्व फक्त तत्वज्ञानीच जाणूं शकतात आणि त्या जगदाधाराला प्राप्त करूं शकतात.

वेदांमध्यें " तंतु, सूत्र " वगैरे शब्द याच अर्थानें आलेले आहेत. जगांतील सर्व पदार्थांत तें परमात्मरूपी सूत्र व्यापलेलें आहे. कोणताही पदार्थ त्याच्या आधाराशिवाय नाहीं, हें जाणणें म्हणजे या ज्ञानाला प्रत्यक्ष करणें आहे; आणि त्याचा साक्षात्कारानें अनुभव घेणें हा गूढ विद्येचा विषय आहे. याच विषयाचें यथार्थ प्रतिपादन या सूक्तांत केलें आहे.

अमृताचें स्थान

हा आत्माच अमृताचें स्थान आहे. त्याला शोधून काढणें हें प्रत्येकाचें अवश्य कर्तव्य आहे. त्याला कोठें शोधावें हाच प्रश्न फार विचारणीय आहे. हें मिळविण्याकरितांच जग भटकत राहिलें आहे, पण विचारदृष्टीनें पाहिलें तर त्याचा पत्ता लागेल. सुख आणि आनंदासाठीं प्रत्येक प्राणी प्रयत्न करीत राहिला आहे, आणि प्रत्येकाला वाटत असतें कीं बाह्य पदार्थांच्या प्राप्तीनें सुख होत असतें; म्हणून मनुष्य काय अथवा अन्य कीटपतंगादि प्राणी काय भ्रमण करीत राहिले आहेत. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात आहेत. इष्ट पदार्थ मिळाल्यावर क्षणभर सुखाचा अनुभव घेतात, परंतु नंतर पुन्हां दुःख जसेंच्या तसें शिल्लक रहातेंच. याचें मनन करतां करतां मनुष्याच्या मनांत असा विचार येतो कीं आनंदाचें मूळ बाहेर शोधीत रहाण्यापेक्षां आपल्या आंत तरी शोधून पाहूं या. हीच गोष्ट ' मी द्यावा-पृथ्वींत भ्रमण केलें, सर्व भूतांमध्यें फिरलों, सर्व दिशा धुंडाळून पाहिल्या आणि आतां मी सर्वत्र व्यापक एका सूत्रात्म्याला जाणून त्याची उपासना करीत आहे ' इत्यादि जो भाव चवथ्या आणि पांचव्या मंत्राचा आहे, त्यांत दाखविली आहे.

गूढ विद्येचा प्रारंभ याच्या पुढच्या क्षेत्रांत आहे. येथूनच गूढतत्वाचा शोध सुरू होतो. ज्याप्रमाणें डोळा बाहेरच्या सर्व पदार्थांना पाहत असतो पण आपल्या डोळ्यांत पडलेला कण पाहूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें मनुष्य सर्व जगावर विजय मिळवूं शकतो परंतु स्वतःचें अंतरंग पाहणें त्याला कठीण होतें. हेंच गुप्तविद्येचें क्षेत्र आहे, म्हणून त्याला कोठें शोधावें हें पाहिलें पाहिजे. या सूक्तांत या विषयाचें स्पष्टीकरण करणारे शब्द हे आहेत—

गुहा

यत् परमं गुहा ॥ १ ॥ यत् धाम परमं गुहा ॥ २ ॥

" हें परमधाम गुहेंत आहे. " अर्थात् त्याला गुहेंतच शोधणें उचित आहे. या हेतुनेंच पुष्कळ लोक पर्वतावरील गुहेंत जातात आणि त्या ठिकाणीं एकांत सेवन करितात. योग्य गुरूजवळ राहून, गिरिकंदरांत एकान्त सेवन व अनुष्ठान करण्यानें ह्या गुह्यविद्येचा अनुभव घेण्याच्या विषयांत निःसंशय मोठा लाभ होतो, परंतु हें एक बाह्य साधन आहे. खरी गुहा तर हृदयाची गुहाच आहे. त्यांतच ह्या गुह्यतत्वाचा शोध केला पाहिजे.

सर्व प्राणि, सर्व मनुष्य बाहेर पहात असतात. या बहिर्दृष्टीनें गुह्यतत्वाचा शोध शक्य होत नाहीं. या कार्यासाठीं दृष्टि अंतर्मुख झाली पाहिजे. स्वतःच्या इन्द्रियशक्तींचा प्रवाह आंतील बाजूला अर्थात् उलटा सुरू झाला पाहिजे, तेव्हांच या गूढतत्वाचा शोध शक्य होतो. आपल्या हृदयांतच त्या गुप्त आत्म्याला पाहिलें पाहिजे. अर्थात् त्याच्या प्राप्तिसाठीं बाह्यदिशांमध्यें भ्रमण करण्याची जरूर नसून, अंतर्मुख होऊन स्वतःच्या हृदयगुंफेंत त्याला शोधलें पाहिजे.

चार भाग

या अमृताचें स्थान हृदयांत आहे. जर या अमृताचे चार भाग मानले तर, तीन भाग आंत गुप्त आहेत आणि केवळ एक भागच बाहेर व्यक्त आहे. जें बाहेर दिसतें, जें स्थूल दृष्टिनें अनुभवास येतें, तें अत्यंत अल्प आहे. परंतु जे आंत गुप्त आहेत ते फार विस्तृत आहेत. आपल्या शरीरांतही पहा. आत्मा, बुद्धि, मन, प्राण आमच्या अंतःशक्ति अदृश्य आहेत, आणि फक्त स्थूल शरीर हें दृश्य आहे. जर शक्तींची तुलना केली तर स्थूलशरीराच्या शक्तीपेक्षां आंतरिक शक्ति फार प्रभावशाली आहेत. अर्थात् स्थूल आणि व्यक्त शक्तींपेक्षां, सूक्ष्म आणि अव्यक्ताची शक्ति फारच मोठी आहे. हेंच खालील शब्दांच्या द्वारें व्यक्त होतें—

त्रीणि पदानि निहिता गुहास्य यस्तानि वेद स पितुष्पिताऽसत् ॥ २५ ॥

" त्याचे तीन पाद गुहेंत गुप्त आहेत. जो त्यांना जाणतो, तो समर्थांहूनही समर्थ होतो. " अर्थात् स्थूल शरीराच्या शक्ती-

वर ताबा मिळविण्यापेक्षां आंतरिक शक्तींवर प्रभुत्व मिळविलें तर अधिक सामर्थ्य प्राप्त होतें. याविषयीं हे मंत्र पहा—

पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्याऽमृतं दिवि ॥ ३ ॥
त्रिपादूर्ध्वं उदैत्पुरुषः पादोऽस्येहाऽभवत्पुनः ॥ ४ ॥

(ऋ. १०।९०; वा. य. ३१)

त्रिभिः पद्भिर्द्यामरोहत्पादोस्येहाऽभवत्पुनः ॥

(अथर्व १९।६)

त्रिपाद्ब्रह्म पुरुरूपं वि तष्ठे तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्रः ।

(अथर्व ९।१०।१९)

" त्याच्या एका अंशानें सर्व भूतें झालीं आहेत आणि तीन अमृत पाद–द्युलोकांत आहेत. तीन पाद पुरुषाचा वर उदय झाला आहे आणि एक पाद पुरुष येथें वारंवार प्रगट होत असतो. तीन पायांनीं स्वर्गावर चढला आहे, आणि एक पाद येथें वारंवार प्रकट होतो. त्रिपाद ब्रह्म अनेक रूपें धारण करून राहिलें आहे. ज्यामुळें चारी दिशा जीवंत राहतात. "

या सर्व मंत्रांचें तात्पर्य हेंच आहे कीं जें या सूक्ताच्या वर सांगितलेल्या भागांत विशद केलें आहे. त्या अमृताची लहानशी शक्ति स्थूलांत प्रगट होते, आणि शेष राहिलेली अनंत शक्ति अप्रगट स्थितींत गुप्त राहिलेली आहे; आणि या गुप्तशक्तींच्या मुळेंच या व्यक्तांत कार्य होत राहिलें आहे. वाचक मनाच्या शक्तीबरोबर शारीरिक शक्तींची तुलना करतील तर वरील विधानाची सत्यता त्यांच्या प्रत्ययाला येईल. मनाची शक्ति मोठी आहे. त्याचा थोडासा भाग शरिरांत आलेला आहे आणि येथें कार्य करीत राहिला आहे. या स्थूलांत कार्य करणारें अंशरूप मन वारंवार मूळ गुप्त मनाच्या शक्तीनें प्रभावित होत असतें, नवजीवन प्राप्त करीत असतें आणि वारंवार शरीरांत येऊन कार्य करीत असतें. हीच गोष्ट अधिक सत्यतेनें अमृततत्त्वाशीं संगत होत आहे. त्याचा एकच अंश प्रगट होतो, शेष अनंत शक्ति गुप्त असतात. त्यांच्याशीं आपला संबंध जोडणें हें गूढविद्येचें साध्य आहे.

एक रूप

जगांत विविधता आहे आणि या आत्मतत्त्वांत एकरूपता आहे. जगांत गति आहे आणि त्यांत शांति आहे. जगांत भिन्नता आहे आणि यांत एकता आहे. याप्रमाणें जग व आत्मा यांचें वर्णन करण्यांत येत असतें. सर्वांना या वर्णनाचा परिचय आहे. या सूक्तांतही पहा—

वेनस्तत्पश्यत्परमं गुहा यद्यत्र विश्वं भवत्येकरूपम् ।
इदं पृश्निरदुहज्जायमानाः स्वर्विदो अभ्यनूषत व्राः ॥ १

" ज्ञानी भक्तच त्याला पाहतो, जो हृदयांतील गुंफेंत आहे; आणि ज्यांत संपूर्ण विश्व आपली विविधता सोडून एकरूप होतें. त्याची शक्ति प्रकृति आकर्षित करते आणि जन्म घेणारे पदार्थ उत्पन्न करते. म्हणूनच आत्मज्ञानी व्रत पालन करणारे भक्त आत्म्याचेंच गुणवर्णन करीत असतात "

वाचकांनीं याचा अनुभव आपल्या आंत घेऊन पाहावा. जागृतींत जगांतील विविधतेचा अनुभव येतो, स्वप्नांतहि काल्पनिक सृष्टींच्या विविधतेचा अनुभव येतो, परंतु तृतीय अवस्था म्हणजे गाढ निद्रा–सुषुप्ति तेथें भिन्नतेचा अनुभव येत नाहीं व केवळ एकत्वाचा अनुभव व्यक्त करणें असंभवनीय असल्यामुळें, या अवस्थेंत कोणत्याही प्रकारचें भान होत नाहीं. सुषुप्ति, समाधि आणि मुक्ति यांत " ब्रह्मरूपता " होते. सत्व, रज, तम या तीन गुणांची भिन्नता वगळल्यास वरील तिन्ही स्थानांत ब्रह्मरूपता, आत्मरूपता किंवा साधारण भाषेंत ईशरूपता होते आणि या अवस्थेंत भिन्नतेचा अनुभव नाहींसा होतो, म्हणून या अवस्थेला ' एक–त्व ' असें म्हणतात. या उद्देशानेंच या मंत्रांत म्हटलें आहे कीं—

यत्र विश्वं एकरूपं भवति ॥१॥

" जेथें संपूर्ण विश्व एकरूप होतें " अर्थात् जेथें जगताची विविधता अनुभवाला येत नाहीं, परंतु त्या सर्व विविधतेला एकतेचें रूप आल्यासारखें होतें. वृक्षाचें मूळ, शाखा, पल्लव वगैरे यांमध्यें भिन्नरूपतेचा अनुभव आहे, परंतु त्या वृक्षाच्या बीजांत हीच भिन्नता एकरूपानें दिसते. याचप्रमाणें या विश्वरूपी वृक्षाची विविधता, त्याच्या मूळ उत्पत्तिस्थानांत जाऊन पाहिली तर एकरूपतेंत दिसून येईल. या मुख्य आदिकारणापासून नानाप्रकारच्या शक्ति आपल्यांत धारण करून प्रकृतिही उत्पन्न होणारे अनेक पदार्थ निर्माण करते. याप्रमाणें उत्पन्न न होणाऱ्या एक तत्त्वापासून उत्पन्न होणारीं अनेक तत्त्वें बनतात. याचेंच नांव या मंत्रांत " जायमानाः " असें म्हटलें आहे. याच्यांत मनुष्याचाही समावेश होतो. त्याचप्रमाणें अन्य प्राणी व अप्राणी या सर्वांचा समावेश होतो. यांत मनुष्य (**व्राः**) व्रतपालनादि सुनियमांनीं आपली उन्नति करून घेऊन आदिमूळाला जाणतो आणि त्याचा अनुभव घेऊन (**स्वर्विदः**) प्रकाश प्राप्त करून नित्य अनुष्ठान करतां करतां समर्थ होतो.

अनुभवाचें स्वरूप

आत्मज्ञानी मनुष्याला अमृतस्थानाचा अनुभव कसा होतो तें त्याच्या अनुभवाचें स्वरूप आतां आपणांस पाहिलें पाहिजे.

" आत्मज्ञानी मनुष्य अमृतस्थानाला आपल्या हृदयगुहेंत अनुभवितो. अनंतशक्ति तेथेंच एकत्रित झाल्या आहेत, हा त्याचा अनुभव आहे. " (मंत्र २ पहा.)

आणि तो अनुभव घेतो कीं, " तोच परमात्मा आम्हां सर्वांचा, पिता उत्पादक आणि बंधु आहे. तोच सर्वज्ञ आहे. " (मं. ३) इतकेंच नाहीं. तर " तो आमची खरी माता आणि आमचा खरा मित्र आहे " हाही त्याचा अनुभव आहे. या ठिकाणीं ऋग्वेद आणि अथर्ववेदाच्या मंत्रांची तुलना करा—

स नः पिता जनिता स उत बन्धुर्धामानि वेद भुवनानि विश्वा । यो देवानां नामध एक एव तं संप्रश्नं भुवना यन्ति सर्वा ॥ अथर्व (२।१।३)

यो नः पिता जनिता यो विधाता धामानि वेद भुवनानि विश्वा । यो देवानां नामधा एक एव तं संप्रश्नं भुवना यन्त्यन्या ॥

(ऋग्वेद १०।८२।३)

स नो बन्धुर्जनिता स विधाता धामानि वेद भुवनानि विश्वा । (वा. यजु. ३२।१०)

यांत थोडेसे पाठभेद आहेत. परंतु सर्वांचें तात्पर्य वर सांगितलेलेंच आहे; आणि हाच ज्ञानी भक्तांचा अनुभव आहे. अधिक एक अनुभव या यजुर्वेदाच्या मंत्रांत दिलेला आहे तोही येथें पहा—

तंतुमय जग

वेनस्तत्पश्यत्परमं गुहा सद्यत्र विश्वं भवत्येकनीडम् । तस्मिन्निदं सं च विचैति सर्वं स ओतः प्रोतश्च विभूः प्रजासु ॥ (वा. यजु. ३२।८)

" ज्ञानी भक्त परमात्म्याला जाणतो. जो हृदयांतील गुहेंत आहे. आणि ज्यांत संपूर्ण विश्व माळेंत राहणाऱ्या मण्यांप्रमाणें राहिलेलें आहे; तसेंच ज्यांत हें सर्व विश्व एका वेळीं **(सं एति)** मिळून जातें किंवा लीन होतें आणि दुसऱ्या वेळीं **(वि एति)** वेगळें होतें, **(सः विभुः)** तो सर्वव्यापक आणि सर्व ऐश्वर्यानें युक्त आहे आणि **(प्रजासु ओतः प्रोतः)** प्रजेंत कपड्यांतील आडव्या-उभ्या तंतूंप्रमाणें पसरलेला आहे. " वस्त्रांत ज्याप्रमाणें आडवे उभे तंतू असतात त्याप्रमाणें परमात्मा या जगांत सर्वत्र व्यापलेला आहे, असा या ज्ञानी पुरुषाचा अनुभव आहे.

बालकावर ज्यावेळीं संकट येतें त्यावेळीं तो बालक आपल्या आई, बाप, मोठा भाऊ, काका, आजोबा पणजोबा वगैरेंच्या जवळ सहाय्याकरितां जातो. तोच बालक मोठा झाल्यावर आपत्ति आली असतां आपल्या समर्थ मित्राजवळ जाऊन त्याचें सहाय्य घेतो. याचप्रमाणें दुसऱ्या एकाद्या प्रसंगीं गुरु, राजा इत्यादिकांचें सहाय्य घेतो. हे सर्व संबंध ज्ञानी परमात्म्यांत अनुभवितो; अर्थात् ज्ञानी भक्तासाठीं एक परमात्माच सम्राट्, राजा, सरदार, शासक, शिक्षक, गुरु, माता, पिता, बंधु, मित्र, वगैरे रूपाचा होतो.

एकाचीं अनेक नामें

एकाच मनुष्याला त्याचा पुत्र पिता म्हणतो, स्त्री पति म्हणते, भाऊ बन्धु म्हणतो. याप्रमाणें विविध नातेवाईक त्या एकाच पुरुषाला निरनिराळ्या संबंधाच्या अनुभवानें त्याला निरनिराळ्या नांवांनीं संबोधतात. याप्रमाणें एकाच माणसाला अनेक नांवांनीं जरी संबोधण्यांत आलें तरी त्याच्या एकत्वांत कांहीं भेद होत नाहीं. त्याचप्रमाणें परमात्मा एकच असतांनाही त्याच्या अनंत गुणांच्या योगानें आणि अनंत गुण सृष्टीच्या अनंत पदार्थांत आल्यामुळें त्याला अनंत नांवें देण्यांत येतात. ज्याप्रमाणें अग्निमध्यें असलेला उष्णतागुण परमात्म्यापासून त्याला प्राप्त झाला आहे, त्यामुळें अग्नीचें अग्नि नांव गुणदृष्टीनें पाहिलें तर परमात्म्याचेंच नांव आहे; कारण तो अग्नीचाही अग्नि आहे. याप्रमाणें अन्य देवांच्या नामाविषयीं जाणणें योग्य आहे.

शरीरांतही पहा. डोळे, नाक, कान वगैरे इंद्रियें स्वतः आपली कार्यें करूं शकत नाहींत, परंतु आत्म्याची शक्ति स्वतःमध्यें घेऊनच तीं स्वतःचीं कार्यें करावयास समर्थ होतात, म्हणून सर्व इंद्रियांचीं नांवें आत्म्यास यथार्थ होतात; म्हणून आत्म्याला डोळ्यांचा डोळा, कानांचा कान, असें म्हणतात. असेंच परमात्मा सूर्याचा सूर्य, विद्युत्‌चा विद्युत् आहे. देवांचीं नांवें धारण करणारा परमात्माच आहे असें जें तिसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे तें या प्रमाणें सत्य आहे.

तो एकच आहे

परमात्मा एकच आहे. ही गोष्ट या तिसऱ्या मंत्रांत **" एक एव "** **(तो एकच आहे)** या शब्दांच्या द्वारें जोरानें सांगितली आहे. कोणासही परमात्म्याच्या अस्तित्वासंबंधीं यत्किंचितही शंका राहूं नये यासाठीं " एव " पदाची योजना

केलेली आहे. भक्तालाही ईश्वराच्या 'एकत्वाचा' अनुभव येतो, कारण 'विभक्तामध्ये ही अविभक्तता' इत्यादि अनुभव त्याला येतो. वगैरे विषय या पूर्वी सांगितलेला आहेच.

ज्ञानी भक्ताचा विशेष अनुभव हा आहे की तो परमात्मा "संप्रश्नः" आहे, अर्थात् प्रश्न विचारण्याला योग्य आणि त्याच्या कडून उत्तर घेण्याला योग्य आहे. भक्तीनें भक्त ज्यावेळीं परमेश्वराला प्रश्न करतो त्यावेळीं त्याचें उत्तर तो साक्षात्कारानें देतो. कठिण प्रसंगीं त्याच्याकडे सहाय्यतेची याचना केली व एकांतांत अनन्यशरण वृत्तीनें भगवंताची प्रार्थना केली असतां निःसंशय तो ती ऐकतो आणि भक्तांचीं संकटें दूर करतो. दुसरे मित्र योग्य समयाला सहाय्यार्थ येतीलच हा भरंवसा नाहीं; परंतु हा परमात्मा असा मित्र आहे कीं तो अनन्यभावानें शरण गेले असतां त्याच्या सहाय्याला सदा सिद्ध असतो आणि केव्हांही शरणागतांना परमेश्वराचें सहाय्य मिळालें नाहीं असें होत नाहीं; म्हणूनच सहाय्यार्थ कुणाला विचारणें झाल्यास अन्य मित्रापेक्षां फक्त परमेश्वराचीच प्रार्थना करणें उचित आहे, कारण नेहमींच ऐकण्यास तो तयार असतो आणि त्याचा उदार दयामय हस्त आम्हां सर्वांवर नेहमींच आहे.

तो सर्वांचा (**धास्युः**) धारण, पोषण करणारा आहे आणि तो (**भुवने-स्थाः**) संपूर्ण स्थावर जंगम जगांत विराजमान आहे, अर्थात् प्रत्येक पदार्थांत व्याप्त आहे. त्याच्याशिवाय एकही स्थान रिकामें नाहीं. वक्त्यांत जसें वक्तृत्व तसा जगांत हा आहे. खरोखरी हा अग्निही आहे. (मंत्र ४) याप्रमाणें वाचक सांगूं शकतात. हा सूर्य आहे आणि हाच विद्युत् आहे. कारण पदार्थमात्राचें अस्तित्व हाच आहे. मग अग्नि, वायु, सूर्य हा आहे हें सांगण्याची आवश्यकताच काय आहे ? परंतु सर्वांना सुबोध व्हावें म्हणून येथें असें सांगितलें. शब्द आत्मशक्तीनें निर्माण होतो. त्याचप्रमाणें सूर्यही परमात्म्याच्या शक्तीनेंच प्रकाशित होतो.

देवांचें अमृतपान

या सूक्ताच्या पांचव्या मंत्रांत सांगितलें आहे कीं त्या परमात्म्यांत देव अमृतपान करतात—

यत्र देवा अमृतमानशानाः समाने योनावध्यैरयन्त ५

"त्या परमात्म्यांत देव अमृतपान करतां करतां समान अर्थात् एकाच आश्रयाला प्राप्त होतात."

अर्थात् सर्व देव त्या परमेश्वरांत समान अधिकारानें, समान रूपानें आणि आपल्या विभिन्नतेला सोडून, एकरूप होऊन त्याच्यांत विलीन होतात आणि तेथील अनुपमेय अमृत पितात.

मुक्ति, समाधि आणि सुषुप्ति —ह्यांत ही गोष्ट अनुभवाला येते. मुक्ति अथवा समाधिचा अनुभव प्रत्येकाला येत नाहीं; परंतु सुषुप्तिचा अनुभव प्रत्येकाला आहे. या अवस्थेंत सर्व जीव ब्रह्मरूप होतात. त्यावेळीं मानवी शरीरांत रहाणारे देव म्हणजे सर्व इंद्रियें आपला भेदभाव सोडून त्या एक आदिकारणांत लीन होतात, आणि आत्मस्वरूपांत बुडी मारून अमृतपानाचा अनुभव घेतात. त्या अमृतपानानें त्यांचा सर्व श्रमपरिहार होऊन ज्यावेळीं सुषुप्तींतून त्याचीं इन्द्रियें जागृतावस्थेंत येतात त्यावेळीं तीं तेजस्वी झालेलीं असतात. जर चार आठ दिवस मनुष्याला सुषुप्ति मिळाली नाहीं तर मनुष्य शरीरांत राहणारा एक हा देव आपलें कार्य करण्याला योग्य राहणार नाहीं. आजारांतही मनुष्याला दररोज जोपर्यंत झोप येत असेल तोपर्यंत त्याची रुग्णावस्था चिंताजनक समजली जात नाहीं, परंतु रोग्याला चारपांच दिवस झोप आली नाहीं तर वैद्यही सांगतात कीं, रोग असाध्य झाला आहे. इतकें महत्व तमोगुणमय सुषुप्तावस्थेंत प्राप्त होणाऱ्या ब्रह्मरूपतेचें आणि त्यांत प्राप्त होणाऱ्या अमृतपानाचें आहे. यावरून वाचक अनुमान करतील कीं, समाधि आणि मुक्तावस्थेंतील अमृतपानानें किती लाभ आणि किती आनंद मिळत असेल ?

यजुर्वेदांत हाच मंत्र थोड्याशा पाठभेदानें आलेला आहे. तोही येथें पाहण्यासारखा आहे—

यत्र देवा अमृतमानशानास्तृतीये धामन्नध्यैरयन्त ।
(वा. यजु. ३२।१०)

"तेथें देव अमृतपान करीत तिसऱ्या धामांत पोंचतात." पूर्वोक्त मंत्रांत ज्याठिकाणीं "समाने योनौ" शब्द आहेत, त्या ठिकाणीं या मंत्रांत '**तृतीये धामन्**' हा शब्द आहे. समान योनीचाच अर्थ तृतीय धाम आहे. जाग्रत, स्वप्न, सुषुप्ति या तीन अवस्था मानल्या तर तिसरी अवस्था (**तिसरें धाम**) सुषुप्त्यवस्थाच येते— जीमध्यें सर्व देव आपला भेदभाव सोडून एकरूप होतात व ब्रह्मरूप होऊन अमृतपान करतात. स्थूल, सूक्ष्म, कारण हें प्रकृतीचें रूप येथें घेतलें तरी कारणांत म्हणजे तृतीय धामांत सर्व इंद्र, चंद्र सूर्यादि देव स्वतःची विभक्तता टाकून त्या ब्रह्मांमध्यें लीन होऊन अमृतरूप होतात. ज्ञानी भक्त, महात्मा, साधुसंत हे लोक स्वतःच्या समान भावनेनें मुक्तावस्थेंत लीन होऊन अमृतपानाच्या महानंदाला प्राप्त होतात. याचप्रमाणें

प्रत्येक ठिकाणीं याचा अर्थ पाहिला पाहिजे. (वाचकांनीं या सूक्ताचें मनन कांड १ सूक्त. १३ आणि २० या बरोबर करावें.)

येथें या सूक्ताचा विचार पूर्ण झाला आहे. जर वाचक या सूक्ताच्या एक एक मंत्राचा व मंत्राच्या एक एक भागाचा विचार करतील व त्यावर विशेष मनन करतील तर त्यांच्या मनांत गूढ विद्येचे विचार स्वयंस्फुरित होतील. या सूक्तांत शब्द निवडक ठेवले आहेत म्हणून वाचक त्याचा अधिक विचार करूं शकतील. विशेष विचार करणें सोपें व्हावें म्हणून समान अर्थाचे ऋग्वेद आणि यजुर्वेदांतील मंत्रही येथें दिले आहेत. यामुळें वाचक याचें अधिक मनन करूं शकतील. वेदांतील ही विशिष्ट गूढ विद्या आहे. या करितां या सूक्ताच्या मननानें जितका जास्ती लाभ घेतां येईल, तितकें अधिक चांगलें आहे.

एकच पूजनीय ईश्वर

कांड २, सूक्त २

(ऋषिः - मातृनामा । देवता - गंधर्वाप्सरसः)

दिव्यो गन्धर्वो भुवनस्य यस्पतिरेक एव नमस्यो विक्ष्वीड्यः ।
तं त्वा यौमि ब्रह्मणा दिव्य देव नमस्ते अस्तु दिवि ते सधस्थम् ॥ १ ॥
दिवि स्पृष्टो यजतः सूर्यत्वगवयाता हरसो दैव्यस्य ।
मृडाद्गन्धर्वो भुवनस्य यस्पतिरेक एव नमस्यः सुशेवाः ॥ २ ॥

अर्थ— (यः दिव्यः गन्धर्वः) जो दिव्य पृथिव्यादिकांचा धारक देव (भुवनस्य एक एव पतिः) भुवनांचा एकमात्र स्वामी (विक्षु नमस्यः ईड्यः च) जगतांत तो एकच नमस्कारार्ह आणि स्तुति करण्यास योग्य आहे. (दिव्य देव) दिव्य अद्‌भुत ईश्वरा ! (तं त्वा) अशा तुला (ब्रह्मणा यौमि) उपासनाद्वारें मी प्राप्त करतों (ते नमः अस्तु) तुला नमस्कार असो (ते सध-स्थं दिवि) तुझें स्थान द्युलोकांत आहे. (१)

(भुवनस्य एकः एव पतिः) भुवनांचा एकमेव स्वामी असा (गन्धर्वः) भूमि वगैरेंना धारण करणारा (नमस्यः सुशेवाः) नमन करण्यास आणि सेवा करण्यास योग्य आहे, (मृडात्) सर्वांना आनंद देवो. हाच दिव्य देव (दिवि स्पृष्टः) द्युलोकांत प्राप्त होतो, (यजतः) पूज्य आहे आणि (सूर्य-त्वक्) सूर्य ज्याची त्वचा आहे अर्थात् सूर्यामध्यें व्यापून असणारा आणि (दैव्यस्य हरसः) दैवी आपत्तींना (अवयाता) दूर करणारा आहे. त्यामुळें तो सर्वांना पूजनीय आहे. (२)

भावार्थ— पृथ्वी, सूर्य, चंद्र, नक्षत्रें आदि संपूर्ण जगताला धारण करणारा आणि सर्व जगाचा एकच अद्वितीय स्वामी परमेश्वरच आहे आणि तोच लोकांना पूजा आणि उपासना करण्यास योग्य आहे. स्तुति, प्रार्थना, उपासना अर्थात् भक्तीनें त्याची प्राप्ति होते. हा ईश्वर स्वतःच्या स्वर्गधामांत राहतो. त्यालाच सर्व लोक नमस्कार करीत. (१)

संपूर्ण जगताचा एकमेव स्वामी आणि सर्व जगाचें धारण आणि पोषण करणारा परमेश्वरच सर्व लोकांना वंद्य व उपासना करण्यास योग्य आहे. त्याची भक्ति आणि सेवा सर्वांनीं केली पाहिजे, कारण तोच सर्वांना खरा आनंद देणारा आहे. हा दिव्य अद्‌भुत देव स्वर्गधामांत प्राप्त होतो. सर्वांना अत्यंत पूजनीय असा एकच देव आहे. हा सर्वांत राहतो. इतकेंच काय तो सूर्यांतहि आहे. ज्यावेळीं त्याची प्राप्ति होते त्यावेळीं सर्व साधारण आणि असाधारण आपत्ती निवारण होतात. (२)

अनवद्याभिः समु जग्म आभिरप्सरास्वपि गन्धर्व आसीत्
समुद्र आसां सदनं म आहुर्यतः सद्य आ च परा च यन्ति ॥ ३ ॥
अभ्रिये दिद्युन्नक्षत्रिये या विश्वावसुं गन्धर्वं सचध्वे ।
ताभ्यो वो देवीर्नम इत्कृणोमि ॥ ४ ॥
याः कलन्दास्तमिषीचयोऽक्षकामा मनोमुहः ।
ताभ्यो गन्धर्वपत्नीभ्योऽप्सराभ्योऽकरं नमः ॥ ५ ॥

अर्थ— (अनु अवद्याभिः आभिः) दोषरहित अशा या प्राणशक्तींच्यासह (उ सं जग्मे) निश्चयपूर्वक हा मिळून असतो आणि (अप्सरासु अपि) या प्राणशक्तींत पण (गंधर्वः आसीत्) भूमि वगैरेंचा धारक देव विद्यमान आहे. (आसां स्थानं समुद्रे) त्याचें स्थान अंतरिक्षांत आहे, जेथून (यतः सद्यः) लागलीच तो (आयन्ति) येतो आणि (परायन्ति च) दूर जातो. ही गोष्ट (मे आहुः) मला सांगितली आहे. (३)

(अभ्रिये विद्युत्) अभ्रांत असलेल्या विजेंत अथवा (नक्षत्रिये) नक्षत्रांच्या प्रकाशांतही (याः) ज्या तुम्ही (विश्वा-वसुं गन्धर्वं) विश्वाला वसविणाऱ्या धारक देवाला (सचध्वे) प्राप्त करतां किंवा त्याची सेवा करतां, त्यासाठीं हे (देवीः) देवी हो ! (ताभ्यः वः) त्या तुम्हांला (इत् नमः कृणोमि) निश्चयपूर्वक मी नमस्कार करतों. (४)

(याः क्रन्दाः) जी बोलविणाऱ्या अथवा प्रेरणा करणाऱ्या, (तमिषीचयः) ग्लानीला दूर करणाऱ्या, (अक्ष-कामाः) चक्षूंच्या इच्छा तृप्त करणाऱ्या, (मनो-मुहः) मनाला हालविणाऱ्या (ताभ्यः गन्धर्व-पत्नीभ्यः अप्सराभ्यः) अशा गंधर्व पत्नीरूप अप्सरांना अर्थात् सर्वधारक आत्म्याच्या प्राणशक्तींना (नमः अकरम्) मी नमस्कार करतों. (५)

भावार्थ— त्याच्याजवळ जीवनाच्या अनंत कला आहेत, इतकेंच नाहीं परंतु त्या सर्व जीवनशक्तीमध्येंही तोच आहे. या सर्वांचा निवास मध्यलोक-अंतरिक्ष आहे, जेथून या सर्व शक्ति प्रगट होतात आणि जेथें त्या पुन्हां गुप्त होतात. (३)

मेघांत चमकणाऱ्या विजेंत काय किंवा नक्षत्रांच्या प्रकाशांत काय तो सर्व ठिकाणीं जगाचा पालनकर्ता एकरसानें भरलेला आहे आणि त्याचीच सेवा संपूर्ण जीवनशक्तीरूप देवता करीत आहेत, म्हणून त्यांनाही नमन करणें योग्य आहे. (४)

या प्राणशक्ति सर्वांना प्रेरणा देणाऱ्या, सर्वांच्या चालक, परिश्रम-थकवा दूर करणाऱ्या, चक्षूंच्या कामना तृप्त करणाऱ्या आणि मनाला मोह पाडणाऱ्या आहेत. याच आत्म्याच्या शक्ति आहेत. त्या दृष्टीनें मी त्या सर्वांना नमस्कार करतों. (अर्थात् तो त्यांना केलेला माझा नमस्कारहि त्या अद्वितीय परमेश्वरालाच पोहोंचेल, कारण कीं या शक्ति त्याच्याच आधारावर आहेत.)

एकच पूजनीय ईश्वर

पूर्वसंबंध

पहिल्या सूक्तांत ' गुह्य अध्यात्म-विद्ये ' चें वर्णन करण्यांत आलें आहे. त्या सूक्तांत ज्या परमात्म-देवाचें वर्णन करण्यांत आलें आहे, त्याचेंच वर्णन येथें ' गंधर्व ' शब्दानें करण्यांत आलें आहे. या प्रथम सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रांत सुद्धां ' गंधर्व ' शब्द आहे. त्यावरून पूर्व सूक्ताचा या सूक्ताशीं संबंध स्पष्ट होतो.

गंधर्व आणि अप्सरा

' गंधर्व ' शब्दाचा अर्थ पूर्व सूक्ताच्या स्पष्टीकरणाच्या प्रसंगानें करण्यांत आलाच आहे. (गां+धर्वः) अर्थात् (गां) भूमि, सूर्य, वाणी, इंद्रियें, अंतःकरण यांच्या शक्ति वगैरेंचें (धर्वः) धारण पोषण करणारा आत्मा हा त्याचा अर्थ आहे. भूमि, सूर्य आणि अन्य चराचर स्थूल सूक्ष्म सर्व पदार्थांचें धारणपोषण

करण्यामुळें गंधर्व हें परमात्म्याचें नांव आहे. त्याचप्रमाणें लघु कार्यक्षेत्रांत शरीरांत स्थित अशा वाणी, प्राणशक्ति, इंद्रियांच्या वृत्ति इत्यादि देहाच्या स्थूल सूक्ष्मादि क्रियांचें धारण करणारा या अर्थी तें जीवात्म्याचेंहि नांव आहे. या सूक्तांत मुख्यतः परमात्म्याचेंच वर्णन आहे; परंतु अल्पांशानें हें वर्णन अर्थसंकोच करून जीवात्म्याकडेही लागूं शकतें. हें गन्धर्वाचें रूप वाचकांनीं नीट ध्यानांत ठेवून गंधर्व शब्दाचे इतर अर्थ पहिल्या सूक्तांतही पहावे.

गन्धर्व- पत्नीभ्यः अप्सराभ्यः ॥ (मंत्र ५).

गंधर्वाच्या स्त्रिया अप्सरा आहेत. गंधर्व एक आहे, परंतु याच्या अप्सरा अनेक आहेत. (**अप्+सरस्**) अर्थात (**अप्**) जलाच्या आश्रयानें (**सरस्**) चालणारी. जलाश्रित प्राणवाचक हें नांव आहे. " आपोमयः प्राणः " जलमय अथवा जलाच्या आश्रयानें प्राण राहतात असें उपनिषदांत कथन आहे, आणि तीच गोष्ट या शब्दांत आहे; म्हणून ' अप्सराः ' हा शब्द प्राणशक्तीचा वाचक म्हणून वेदांत आलेला आहे. श्वास आणि उच्छ्वास अर्थात् प्राण हे आयुष्यरूपी वस्त्राचे आडवेउभे तंतू बनून राहिले आहेत असेंही वेदांत अन्यत्र वर्णिलें आहे.

यमेन ततं परिधिं वयन्तोऽप्सरस उप सेदुर्वसिष्ठाः

(ऋ. ७।३३।९)

(अप्सरसः वसिष्ठाः) जलाश्रित प्राण, **(यमेन ततं)** यमानें पसरलेल्या उभ्या सुताच्या मर्यादेपर्यंत **(वयन्तः)** आयुष्यरूपी वस्त्र विणतात.

' यम ' = आयुष्यरूपी वस्त्राचा तागा पसरणारा विणकर
' ताना ' = आयुष्याची अवधी, आयुष्याची मर्यादा
' प्राणः ' = कापड, विणणारा कोष्टी
' कापड ' = आयुष्य

' मनुष्याचें आयुष्य हें एक वस्त्र आहे. जें मनुष्यदेहरूपी मागावर विणलें जातें, येथें विणणारा कोष्टी **(विणकर)** प्राण आहे. या ठिकाणीं ' अप्सरस ' आणि ' वसिष्ठ ' हे दोन शब्द प्राणवाचक आलेले आहेत. **(अप्सरस्)** जलाश्रयानें राहणारा **(वसिष्ठ)** निवासाचा हेतु प्राण आहे.

यावरून अनुमान होऊं शकतें कीं जलतत्वाच्या आधारानें राहणारा प्राण आत्म्याची धर्मपत्नीरूप आहे असें या ठिकाणीं सांगितलें आहे. ही प्राणशक्ति म्हणजे निःसंशय जीवन कला आहे. गंधर्व जर आत्मा आहे तर त्याची धर्मपत्नी अप्सरा निःसंशय प्राणशक्ति अथवा जीवनशक्तिच आहे. शरीरांतील आत्मा आणि शक्ति हे दोन शब्द येथील ' गंधर्व आणि अप्सरा ' यांचे वाचक आहेत. हें उत्तम रीतीनें मानतां येणें शक्य आहे. शरीरांत लहान प्राण व जगतांत विश्वव्यापक प्राण आहे. या करितां गंधर्व शब्दाचा अर्थ आत्मा परमात्मा मानला असतां दोन्ही ठिकाणीं अर्थाची संगती लागूं शकते.

महान् गंधर्व

या सूक्ताच्या पहिल्या दोन मंत्रांत अतिमहान् गंधर्वाचें प्रेमपूर्ण वर्णन आलें आहे. हें वर्णन पाहिलें म्हणजे गंधर्व शब्द परमात्मावाचक आहे याबद्दल संशयच राहत नाहीं. पहा —

१ **भुवनस्य पत एव पतिः**— भुवनांचा एकमेव स्वामी. त्याच्या शिवाय या जगाचा दुसरा कोणीही स्वामी नाहीं. हाच परमेश्वर सर्वांचा एक स्वामी आहे.

२ **एक एव नमस्यः**— हाच एक अद्वितीय परमात्मा (मं. १-२) सर्व लोकांनीं नमस्कार करण्यालायक आहे. त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणाचीही उपासना व्हावी नये. (मं. १-२)

३ **दिव्य गंधर्वः**- हाच अद्भुत आहे, दिव्य पदार्थ आहे. याच्या ठिकाणीं मनाची गति कुंठित होऊन जाते आणि हाच **(गां)** भूमि आदि सर्व विश्वाचा खरा (**धर्वः**) धारक पोषक आहे. (मं. १)

४ **विक्षु ईड्यः**- सर्व विश्वांत तोच एक प्रशंसेला योग्य आहे.

५ **दिवि ते सधस्थं**- स्वर्गधामांत अर्थात् तृतीय स्थानांत त्याचें वसतिस्थान आहे. (मं. १) (या विषयांत प्रथम सूक्ताचे मंत्र १-२ पहा, ज्यांत त्याच्या गुहेंत वास्तव्याबद्दल वर्णन आलें आहे.)

६ **दिवि स्पृष्टः**- याचा स्पर्श अर्थात् याची प्राप्ति पूर्वोक्त तृतीय गुह्यस्थानांतच होते. हेंही पूर्वोक्त शब्दांचेंच स्पष्टीकरण आहे. (मं. २)

७ **सूर्यत्वक्**- महान् सहस्ररश्मि सूर्य भगवानही त्याचा देह आहे. अर्थात् हा त्याच्यांतही आहे इतकेंच नव्हे, त्याचा मोठा प्रकाशही त्याला त्याच्यापासून प्राप्त झाला आहे. असा त्याचा महिमा आहे. (मं. २) याप्रमाणें भिन्न भिन्न सर्व पदार्थांत त्याचीच सत्ता पाहिली पाहिजे. इतर ठिकाणीं व्यापक सत्ता दर्शविण्यासाठीं हा ' सूर्यत्वक् ' शब्द एक उपलक्षण म्हणून वापरला आहे.

८ **विश्वा-वसुः (गंधर्वः)**- विश्वाचा तोच निवासक आहे. (मं. ४)

वरील लक्षणांवरून स्पष्ट होतें कीं हें गंधर्वाचें वर्णन निःसंशय परमात्म्याचें वर्णन आहे. कोणत्याही दुसऱ्या पदार्थांत तें वरील अर्थ पूर्णरूपानें सार्थ होऊं शकणार नाहीं; म्हणून वाचकांनीं या लक्षणांचें मनन करून, आपल्या मनांत या परमात्म्याचीच भक्ति स्थिर करावी; कारण तोच एक सर्वांना पूजनीय आहे.

ब्रह्माची ब्राह्म उपासना

या परमात्म्याची प्राप्ति याच्या उपासनेनेंच होते. या सूक्तांत याची 'ब्राह्म उपासना' करण्याचें विधान फार महत्त्वाचें आहे.

१ **तं त्वा यौमि ब्रह्मणा**। (मं. १)

२ **नमस्यः**। (मं १,२) **नमस्ते अस्तु**। (मं. १)

३ **विक्षु ईड्यः**। (मं. १)

४ **सुशेवाः**। (मं. २)

हे चार मंत्रभाग याची 'ब्राह्म उपासना' करण्याचे मार्ग सुचवितात. ब्राह्मउपासना म्हणजे ब्रह्मयज्ञ अथवा मनोद्वारा करण्याची 'मानस उपासना' च आहे. आत्मा, बुद्धि, चित्त, मन या अंतःसाधनांनींच या परमात्म्याची पूजा होते. या शक्तीचें नामही शरीरांत ब्रह्म असें आहे. ब्रह्म शब्दाचा अर्थ मंत्रही आहे आणि मंत्राचा आशय मनन आहे. मननानेंच ही उपासना करावी लागते. मनाच्या मननानेंच ही होऊं शकते. दुसऱ्या रीतीनें ही होत नाहीं. हें स्पष्ट सांगण्यासाठींच या ठिकाणीं "ब्रह्मणा" हा शब्द मंत्रांत योजिला आहे. ही गोष्ट लक्षांत ठेवून वर सांगितलेल्या चार मंत्र भागांचा अर्थ असा होतो—

१ **तं त्वा यौमि ब्रह्मणा**- त्या तुज परमेश्वराला मी मननानें प्राप्त करतों. (मनन)

२ **नमस्यः**- (नमस्ते) तूंच एक नमस्काराला योग्य आहेस. (नमन)

३ **विक्षु ईड्यः**- सर्व जगांत प्रशंसा करण्यास योग्य एक तूंच आहेस. (सर्वत्र दर्शन)

४ **सुशेवाः**- उत्तम सेवा करण्यास तूंच एक योग्य आहेस. (सेवन) या चार मंत्रभागांच्या मननानें मानसपूजेचा विधि समजतो.

(१) परमात्म्याच्या गुणांचें मनानें मनन करावें.

(२) त्याला मनानें नमन करावें.

(३) प्रत्येक पदार्थांत, प्राणिमात्रांत त्याचें दर्शन करावें. आणि (४) सर्व कर्में त्याची सेवा करण्यासाठींच करावींत.

हे चार भाग त्या प्रभूच्या उपासनेचे आहेत. या चार भागांतून जितक्या भागांचें अनुष्ठान झालें असेल तितक्या प्रमाणानें उपासना झाली आहे असें समजावें. जिज्ञासूंनीं स्वतः विचार करून स्वतःच्या उपासनेची कसोटी ठरवावी. प्रत्येक मनुष्य स्वतःला आपण परमात्म्याचा उपासक आहे असें मानीत असतोच; परंतु त्याची उपासना या वैदिक मानस उपासनेच्या कसोटीच्या कोणच्या कक्षेंत मोजता येईल हें पाहिलें पाहिजे. या दृष्टीनें हे चार मंत्रभाग अत्यंत महत्त्वाचे आहेत.

"मनन, नमन, सर्वत्र दर्शन आणि सेवा" हीं चार नामें संक्षेपानें मानस उपासनेच्या चार अंगांचीं दर्शक मानता येतील.

१ **मनन**- यामुळें परमात्म्याचें महत्त्व मनांत स्थिर होतें. या दृष्टीनें त्याची अत्यंत आवश्यकता आहे.

२ **नमन**- मनानें परमेश्वराचें महत्त्व कळल्यानंतर स्वाभाविकच माणूस त्या परमेश्वरापुढें नम्र होतो, लीन होतो. मननानंतरची ही अवस्था स्वाभाविकच आहे.

३ **दर्शन**- मननानेंच त्याच्या सार्वत्रिक सत्तेचा अनुभव होतो. स्थिर चर पदार्थांत एकरूपानें त्याच्या व्यापकत्वाच्या साक्षात्काराची ही तिसरी अवस्था आहे. जगामध्यें सर्वत्र त्या परमात्म्याचा साक्षात्कार या अवस्थेंत होतो.

या तिन्ही क्रिया मानसिक आहेत. यानंतर तो भक्त आपण परमात्म्याच्या परम यज्ञांत स्वतःला समर्पण करतो. ही सेवावस्था आहे.

४ **सेवन**- हा या अवस्थेंत परमेश्वराचा सेवक होतो. 'सेवन आणि भजन' हे दोन्ही शब्द समानार्थकच आहेत. भगवंताच्या कार्यासाठीं स्वतःला समर्पित करणें म्हणजे भक्ति अथवा सेवा होय.

'दीनांचा उद्धार करणें, साधूंचें रक्षण करणें, सज्जनांचें रक्षण करणें, दुर्जनांना दूर करणें, हीं परमात्म्याचीं कर्में आहेत. हीं कर्में ईश्वरार्पण बुद्धीनें करणें ही त्याची भक्ति किंवा सेवा आहे.

नामस्मरण

नामस्मरणाचेंही तात्पर्य हेंच आहे. ज्याप्रमाणें "हरि" (दुःखानि हरति) दुःखें दूर करणारा देव आहे म्हणून दुःखितांचें दुःख यथाशक्ति भक्त म्हणविणारा मी दूर करीन, व दुसऱ्याला सुख देण्याच्या कृतीनें ईश्वराची सेवा करीन. "राम" (आनंद देणारा) ईश्वर आहे म्हणून मी सुद्धा दीन, दुःखी मनुष्य अथवा प्राणी यांच्या पीडा दूर करण्याचा प्रयत्न करीन व या द्वारें परमात्म्याची भक्ति वा सेवा करीन. हाच नामस्मरणाचा उद्देश आहे. तरी आजकाल केवल नांवाचें स्मरणच राहिलें आहे, आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या कर्तव्याचें पालन होत नाहीं.

परंतु वस्तुतः यापासून महान् कर्तव्याचा बोध होतो हें वाचकांनीं विचार करून जाणावें. परमेश्वराचीं इतकीं नामें सांगण्याचा उद्देश समजून घ्यावा. अनेक ग्रंथ वाचूनही जें कर्तव्य समजत नाहीं तें एक नामाचें मनन केल्यानें समजतें. यासाठींच वेदादि ग्रंथांत परमात्म्याला अनेक नांवें दिलेलीं आहेत; आणि तीं सर्व नामें कर्तव्यमार्गदर्शक आहेत. मात्र निरीक्षण करणारा आणि कर्म करणारा भक्त पाहिजे. असो.

ईश्वर उपासनेचे हे चार भाग आहेत. वाचकांनीं यांचा अधिक विचार करावा आणि या मार्गानें जावें. हाच अगदीं साधा, सरळ आणि अति सुगम मार्ग आहे.

ब्राह्म उपासनेचें फळ

उपरोक्त प्रकारें मानस उपासना केल्यानें जें फल प्राप्त होतें त्यानेंही वर्णन या मंत्रांत वाचक पाहूं शकतात.

१ त्वं त्वा यामि- परमात्म्याची भेट, ब्रह्मरूप अवस्था प्राप्त करणें. (मं. १)

२ दैव्यस्य हरसः अवयाता- परमात्मा सर्व महापीडा दूर करणारा असल्यानें त्याच्या प्राप्तीनें सर्व पीडा दूर होतात. (मं. २)

३ मृडात्- तो आनंद देतो. (मं. २)

या शब्दांच्या मननानें उपासनेचें फळ परमानंदाची प्राप्ति आहे, हें वाचकांना कळून येईल. तो भगवान् सच्चिदानंदस्वरूप असल्यानें त्याच्या स्वरूपांत एकरूप होणाऱ्या उपासकांतही तोच आनंद येतो, आणि जेवढी उपासना दृढ आणि पूर्ण, तितका आनंदही दृढ आणि पूर्ण असतो. हें फळ प्राप्त करण्याचाही पूर्वोक्त वैदिक मार्गच आहे.

याठिकाणीं पहिल्या दोन मंत्रांचा विचार झाला. आतां त्या पुढील तीन मंत्रांचें वर्णन बरोबर लक्षांत येण्यासाठीं तें वर्णन प्रथम आपल्या शरीरांत समजून घेऊन, नंतर त्याचा भाव विशाल जगांत समजून घेतला पाहिजे.

आपल्या आंतील जीवनशक्ति

यापूर्वी सांगितलेंच आहे कीं जलतत्वाच्या आश्रयानें काम करणारी प्राणशक्ति अथवा जीवनशक्ति " अप्सराः " या शब्दानें सूक्तांत वर्णिलेली आहे. तें वर्णन पहा—

१ क्रन्दाः- पुकारणारी, बोलविणारी, प्रेरणा देणारी प्राणशक्ति अथवा जीवनशक्ति प्राण्यांना प्रेरित करते, या अर्थाचें हें नांव आहे.

२ तमिषी-चयः- (**तमिषी**) ग्लानि अथवा थकवा (**चयः**) दूर करणारी प्राणशक्ति आहे. प्राणिमात्रांत जो उत्साह आहे तो प्राणशक्तीचाच आहे. प्राणायामानेंही उत्साहवृद्धि होऊन, श्रम परिहार झाल्याचा अनुभव आहे.

३ अक्ष-कामाः (आक्षि-कामाः)- डोळ्यांची कामना पूर्ण करणारी. वाचकांच्या हें लक्षांत येईल कीं शरीरांत प्राण असेपर्यंत शरीर डोळ्यांना तृप्त करूं शकतें. प्रेत पाहून कोणाचेही डोळे तृप्त होत नाहींत. यावरून डोळ्यांची तृप्ति प्राणशक्तीनेंच होते हें उघड आहे.

४ मनो-मुहः- मनाला मोहित करणारी. हा भावही वर सांगितल्याप्रमाणेंच आहे.

हे चार शब्द शरीरांत असणाऱ्या प्राणशक्ति अथवा जीवनशक्तींचे वाचक आहेत. वाचकांनीं या शब्दांच्या अर्थाचा अनुभव स्वतः आपल्या आंत घ्यावा. या शक्तींनाच (मं. ५) मध्यें " गंधर्व-पत्नी अप्सराः " म्हटलें आहे. गंधर्व म्हणजे या शरीरांत राहिलेला जीवात्मा आणि त्याच्या पत्नी जीवनशक्ति अथवा प्राणशक्ति आहेत. प्राण जलतत्वाच्या आश्रयानें रहात असल्यानें (**अप+सरः**) हा शब्द प्राणास अत्यंत सार्थ लागतो. या प्राणशक्तींना पांचव्या मंत्रांत नमन केलें आहे. प्राणाधीन सर्व जग आहे. यावरून प्राणाचें महत्व ध्यानांत येईल. वाचकांनींही स्वतःच्या शरीरांतील प्राणाचें महत्व पहावें. जोंपर्यंत प्राण शरीरांत असतात तोंपर्यंत त्याची शोभा कशी असते आणि प्राण निघून गेल्यावर शरीराची अवस्था कशी होऊन जाते, याचें मनन केलें म्हणजे आपल्या शरीरांत प्राणाचें महत्व किती आहे हें लक्षांत येतें. जो नियम एका शरीरांत आहे तोच नियम सर्व शरीरांना लागू आहे. याप्रमाणें प्राणाच्या दिव्यशक्तींचा अनुभव लक्षांत घेवूनच पांचव्या मंत्रांत प्राणाला नमन केलें आहे.

प्राणाचा प्राण

येथें प्रश्न असा उद्भवतो कीं ह्या पत्न्या स्वतंत्र आहेत कीं परतंत्र. ' पत्नी ' शब्दाच्या उच्चारणाबरोबरच पतीच्या आधीन असलेली, पति बरोबर राहून शोभा वाढविणारी, पतिशिवाय असतांना दुःखी, पतीच जिचें उपास्य दैवत आहे इत्यादि गोष्टींचें ज्ञान होतें. वेदधर्मांत पतिबरोबर धर्माचरण करणारी सहधर्मचारिणी पत्नी असते. हें गंधर्व (**आत्मा**) आणि अप्सरा (**प्राणशक्ति**) या नात्यानेंच पाहिलें पाहिजे. ज्याप्रमाणें पतीनें शोभित होऊन पत्नी गृहस्थाचें कार्य करीत असते त्याचप्रमाणें या छोट्या गंधर्वा (**जीवात्मा**) पासून त्याची अप्सरा स्त्री (**प्राणशक्ति**) बल मिळवून स्वतःच्या घरांतील (**शरीरां-**

तील) सर्व कामकाज करीत असते; म्हणून जी शोभा वा सौंदर्य धर्मपत्नीचें दिसत असतें तें वास्तविक पतिपासूनच मिळालेलें असतें; म्हणून धर्मपत्नीला केलेला नमस्कार धर्मपत्नीला नसून वास्तविक तिच्या पतिलाच असतो; कारण पतिविरहित अशा विधवा स्त्रीला अशुभ समजून कोणीही नमस्कार करीत नाहीं. तसेंच येथेंही प्राणशक्ति अथवा जीवनशक्ति जीवात्म्याच्या आश्रयानेंच सर्व कार्यें करीत असते. त्याच्या अभावानें ती कार्य करूं शकत नाहीं त्यामुळें जें वर्णन, प्रशंसन अथवा महत्व प्राणशक्तीचें सांगितलें आहे तें प्राणाचें नाहीं; परंतु प्राणाचा प्राण अर्थात् आत्मा त्याचें आहे. ही गोष्ट येथें विसरण्यासारखी नाहीं. यामुळें येथील प्राणशक्तीला केलेलें नमन आत्म्यालाच उद्देशून आहे. केवळ प्राणालाच उद्देशून नाहीं.

असें कां सांगितलें आहे ?

या गोष्टीची इतकी दीर्घ चर्चा कां केली असेल ? या ठिकाणीं वेदाला असें सांगावयाचें आहे, कीं संपूर्ण स्थूल विश्वाचे जे रंग, रूप, रस, आकार वगैरे आहेत, ते सर्व आत्म्याच्या शक्तीमुळें बनलेले आहेत. जर जगांतून आत्म्याची शक्ति काढून टाकली तर जगत् रहाणार नाहीं, आणि त्याची शोभाही रहाणार नाहीं. ज्याप्रमाणें पतिविहिन स्त्री विधवा होऊन विशोभित होते, तसेंच आत्मरहित शरीर मृत, प्रेत होऊन निस्तेज होतें. त्याकडे पाहवत नाहीं. याचप्रमाणें जगतही आत्मविरहित होईल तर तें निःसत्व होईल; म्हणून जगाकडे पहातांना आत्मदृष्टि ठेवली पाहिजे. स्थूल दृष्टी नसावी. ज्याप्रमाणें कोणत्याही सुवासिनी स्त्रीकडे पाहिलें तर तिच्या पतिच्या सत्तेचें दर्शन तिच्यांत होते व पतिहीन स्त्री दुर्वासिनी समजली जाते, त्याचप्रमाणें आत्मरहित शरीर आणि परमात्मारहित जगत् आहे.

गुलाबाचें फूल, आम्रवृक्ष, सूर्यप्रकाश, त्याचप्रमाणें प्राण्यांचे प्राण हे सर्व पाहात असतां आत्म्याच्या शक्तीचा अनुभव केला पाहिजे. तोच सर्वधारक " गंधर्व " सर्वत्र उपस्थित आहे आणि त्याच्या प्रभावानें हें सर्व प्रभावित होऊन राहिलें आहे. हा भाव मनामध्यें सदा जागृत ठेवला पाहिजे. या दृष्टीनें पाहिलें असतां केलेलें नमन गंधर्वाला कसें पोहोंचतें हें स्पष्ट होईल आणि हा गंधर्व सर्व भुवनांचा एक अद्वितीय पतिही आहे, तोच सर्वांना (**नमस्यः**) नमस्कार करण्यास योग्य आहे, असें जें पहिल्या आणि दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे, त्याच्याशीं याची संगतिही लागू शकते. नाहींतर पहिल्या दोन मंत्रांत हा परमात्मा (**नमस्यः**) नमस्कार करण्यास योग्य आहे, असें सांगितलें व पुढें चवथ्या व पांचव्या मंत्रांत अप्सरांना नमस्कार केला आहे, हा विरोध आहे असें होईल; पण हा विरोध पूर्वोक्त दृष्टिनें विचार केला तर राहणार नाहीं.

विरोधालंकार

ताभ्यो वो देवीर्नम इत्कृणोमि ॥ (मं. ४)
ताभ्यो गंधर्व-पत्नीभ्यः अप्सराभ्यः अकरं नमः ॥
(मं. ५)

" त्या गंधर्वपत्नी अप्सरा देवींना मी नमस्कार करतों. " पहिल्या दोन मंत्रांत " एकच जगत्पालक गंधर्वच नमस्कार करण्यास योग्य आहे " असें सांगून अंतिम दोन मंत्रांत त्याला नमस्कार न करतां त्याच्या धर्मपत्नींनाच नमस्कार केला आहे. हा विरोधालंकार आहे. पहिल्या कथनाच्या एकदम विरुद्ध हें दुसरें कथन आहे. जो (**नमस्यः**) नमस्कार करण्याला योग्य आहे त्याला तर नमन केलेंच नाहीं, परंतु ज्या नमस्काराला योग्य असल्याबद्दल कुठेंहीं कांहीं सांगण्यांत आलें नाहीं त्यांना नमस्कार केला आहे. या सूक्तांत विरोधही तुल्यबल आहे. पहिल्या दोन मंत्रांत गंधर्वच नमस्कार करण्यास योग्य आहे असें दोनदा सांगितलें आहे. इतकेंच नव्हे तर—

एक एव नमस्यः (मं. १–२)

" तोच एक नमस्कार करण्यास योग्य देव आहे. " हें असें निश्चयार्थकवाक्यानें सांगितलें आहे, कीं त्याबद्दल कोणासही संशय राहूं नये. तरीहि आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं, नमस्कार करण्याच्या वेळीं मात्र दोन मंत्रांत (मं. ४–५) त्याच्या पत्नींनाच नमस्कार केला आहे, आणि विशेषतः त्यांच्या पतिला (**गंधर्वाला**) नमस्कार केला नाहीं. हा साधारण विरोध नाहीं. यांतील हेतु आपण पाहिला पाहिजे.

व्यवहाराची गोष्ट

ज्यावेळीं आपण एकाद्या मित्राला नमस्कार करतों त्यावेळीं आपण विचार करा कीं, आपण त्याच्या आत्म्याला नमस्कार करितों कीं त्याच्या शरीराला, प्राणाला, इंद्रियांना—कोणाला नमस्कार करतों ? तुमच्यासमोर आत्मा तर राहातच नाहीं, तुम्ही त्या आत्म्याला पाहूंही शकत नाहीं, त्याला स्पर्श करूं शकत नाहीं. तुम्ही ज्याला पाहूंही शकत नाहीं त्याला नमस्कार कसा करणार ? विचारानें कळून येईल कीं तुमचा नमस्कार तुमच्या मित्राच्या शरीराला नमस्कार केला असेंच दिसेल.

आतां जर तें नमन आत्म्याला नसून शरीराला आहे, असें खरेंच मानलें तर कोणी मनुष्य मित्राच्या मृत, निर्जीव शरीराला नमस्कार करतो का ? तर नाहीं. मग नमस्कार कोणासाठीं करण्यांत येतो ? ही नेहमींच्या व्यवहारांतील गोष्ट असतांही याचें उत्तर मात्र कोणालाही सहसा देतां येत नाहीं, तरीसुद्धां एकमेकांना माणसें नमस्कार करीतच असतात.

जड चेतनाचा संधि–प्राण

या ठिकाणीं वास्तविक गोष्ट ही आहे कीं स्थूल शरीर आणि त्याचीं इंद्रियें प्रत्यक्ष दिसतात. प्राण यद्यपि अदृश्य आहे तथापि श्वासोच्छ्वासाच्या गतीवरून तो प्रत्यक्ष होतो; परंतु मन, बुद्धि आणि आत्मा अदृश्य आहेत. त्यांतीलही मन आणि बुद्धि कर्मांच्या अनुसंधानानें जाणणें शक्य होतें, परंतु आत्मा तर सर्वदा अप्रत्यक्षच आहे. पहा—

शरीर — इंद्रियें — " प्राण " — मन — बुद्धि — आत्मा
दृश्य ◀———— —०—— —— ————▶ अदृश्य

प्राण अशा स्थानांत स्थित आहे कीं एका बाजूला दृश्य आणि दुसऱ्या बाजूला अदृश्याला जोडणारा तो मध्यबिंदु आहे. यासाठींच स्थूल दृश्याकडून सूक्ष्म अदृश्याकडे पोहोंचण्यासाठीं योगादिशास्त्रांत प्राणाचेंच अवलंबन सांगितलें आहे. कारण प्राण एकच असा आहे कीं जो स्थूल, सूक्ष्म, दृश्य, अदृश्य, जड, चेतन, शक्ति, पुरुष यांना जोडून असतो. यासाठींच प्राणाला भुवनाचें मध्य म्हटलें आहे; आणि आध्यात्मिक उन्नतिकरितां मुख्यत्वें प्राणाचेंच अवलंबन मानण्यांत आलें आहे. हा अदृश्य असूनही अनुभवांत येऊं शकतो, आणि या मुळेंच सूक्ष्मतत्वाचें ज्ञान होऊं शकतें.

साधारण अज्ञ लोक स्थूल शरीराला पाहूनच नमस्कार करतात, तर त्याहून अधिक ज्ञानी प्राणाचें अस्तित्व लक्ष्यांत ठेवून नमस्कार करतात. याहूनही उच्च कोटीचे ज्ञानी याच्यांत जो अधिष्ठाता आहे त्याला पाहून नमस्कार करितात. वास्तविक नमन तर एकच आहे; परंतु कर्त्यांच्या अधिकारभेदानें तें विभिन्न स्वरूपाचें आहे.

स्थूलानें सूक्ष्माचें ज्ञान

आता एक गोष्ट सत्य आहे आणि ती हीच आहे कीं, जर जगांत स्थूलशरीर– स्थूलपदार्थ– एकही राहिला नाहीं तर चेतन आत्म्याची कल्पना होणें असंभव आहे. यासाठीं चेतन आत्म्याची शक्ति जाणण्यासाठीं स्थूल विश्वाची रचना अत्यंत आवश्यक आहे. यामुळें स्थूलाच्या अवलंबनानें सूक्ष्माची कल्पना करण्यांत येते, आणि यासाठींच शरीरांत काम करणाऱ्या प्राणशक्तींना (मंत्र ४–५) यांत नमस्कार करून शरीराचा मुख्य अधिष्ठाता जो आत्मा, त्याच्यापर्यंत तो नमस्कार पोहोंचविण्यांत आला आहे. या ठिकाणीं हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं जड शरीराला नमन केलेलें नाहीं, परंतु जडचेतानची संगति करणाऱ्या प्राणशक्तींना नमन केलें आहे. अर्थात् ज्या ठिकाणीं स्थूलाला पाठीमागें ठेवून सूक्ष्म शक्ति सुरू होतात, तेथें त्या त्या सूक्ष्म शक्तींना नमन केलेलें आहे. या ठिकाणीं स्थूलाचें अवलंबन अगदीं सोडून देण्याचा उपदेशही मिळतो.

प्रत्यक्षांतून अप्रत्यक्ष

या विवरणावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल कीं प्रत्यक्ष वस्तु निमित्त मात्र असते. त्याला अनुसंधानांत ठेवून अप्रत्यक्षाला नमस्कार करतां येतो. जो सर्व जगाचा एक प्रभु आहे तो सर्व व्यापक आणि पूर्ण अदृश्य आहे. वास्तविक सर्व मनुष्यांनीं त्याला नमस्कार करणें योग्य आहे, आणि दुसरा कोणीही नमस्कार करण्यास योग्य नाहीं. तरीहि जगांतील स्थूल पदार्थ–सूर्य चंद्रादि यांना प्रत्यक्ष पाहूनच त्याच्या सामर्थ्याचें अनुमान करतां येतें. जगाचें कार्य पाहूनच त्याच्या अद्भुत् रचना चातुर्याचें कांहीं अनुमान करतां येतें. त्यासाठींच जगांतील प्रत्येक पदार्थांत त्याच्या सत्तेचा अनुभव केला पाहिजे आणि प्रत्येक पदार्थ पाहून प्रत्येक पदार्थाचें महत्त्व त्याच्यामुळेंच आहे, असें समजून त्या पदार्थांद्वारें (पदार्थ त्याच्या सत्तेचें प्रतीक समजून) त्याला नमस्कार केला पाहिजे. त्यावेळींच त्याला नमस्कार होऊं शकतो. सूर्याला पाहून त्याच्या प्रकाशाचें तेज परमात्म्यापासून प्राप्त झालेलें आहे, असें समजून त्याच्या अगाध सामर्थ्याचा त्यांत (सूर्यांत) अनुभव घेऊन अंतःकरणपूर्वक त्याला नमस्कार केला पाहिजे. ह्याप्रमाणें प्रत्येक वस्तूंत परमात्मप्रतीती घ्यावी. ही गोष्ट या सूक्ताच्या ४ थ्या मंत्रांत सांगितली आहे—

अभ्रिये दिद्युन्नक्षत्रिये या ।
विश्वावसुं गंधर्वं सचध्वे (मंत्र ४)

" मेघांतील विजेंत काय किंवा नक्षत्रांच्या प्रकाशांत काय विश्वाला निर्माण करणाऱ्या सर्वधारक परमेश्वराला प्राप्त करीत आहेस (पहात आहेस)." या मंत्रांत सांगितल्याप्रमाणें विजेची चमक पाहून अथवा तेजोगोलकांना पाहून, त्या अद्वितीय आत्म्याच्या

सत्तेची जागृति झाली पाहिजे, त्या परमात्म्याचें सामर्थ्य ध्यानांत आलें पाहिजे, या आदिदेवाचें अद्भुत रचनाचातुर्य मनांत उभें राहिलें पाहिजे, याच परमेश्वराला सर्वत्र उपस्थित असा जाणला पाहिजे. ही नमनाची एकच पद्धत आहे कीं. याच्यामुळें ज्ञानी त्या परमात्म्याचा सर्वत्र साक्षात्कार करतो.

वाचकांनीं हें पहावें कीं प्रथम आणि द्वितीय मंत्रांत 'तो परमात्मा एकटाच वंदनीय आहे' असें सांगून चवथ्या व पांचव्या मंत्रांत प्रत्यक्ष नमन मात्र जगांतलीं कार्यें करणाऱ्या प्राणशक्तींना केलें आहे. वरवर दिसणारा हा विरोध, वरील विवेचन लक्षांत घेतां, विरोधाभास आहे हें चटकन लक्षांत येतें व उपासना मार्ग हा एकच मार्ग उन्नतीसाठीं सुगम आहे हें समजतें. मेघांत चमकणाऱ्या विजेंत आणि तेजोगोलकांतील प्रकाशांत त्या प्रभुचें सामर्थ्य पाहणें हाच परमेश्वरी सामर्थ्याचा साक्षात्कार करणें आहे. जर विश्वाच्या अंतर्गत पदार्थांचा विचार करण्याचेंच सोडून दिलें, तर या परमात्म्याचें सामर्थ्य कसें कळेल ?

या ठिकाणीं चवथ्या व पांचव्या मंत्रासंबंधीं विचार समाप्त झाला, आणि या विचाराची प्रत्यक्षता आपण आपल्या आंत पाहिली. कारण हेंच स्थान असें आहे कीं, तेथें आम्हांस प्रत्यक्ष अनुभव घेतां येतो. आतां यानंतर याला जगांत व्यापकदृष्टीनें पाहिलें पाहिजे. परंतु तत्पूर्वी तिसऱ्या मंत्राचा विचार केला पाहिजे. या तिसऱ्या मंत्रांत दोन गोष्टी फार महत्वपूर्ण आहेत. त्या आतां पहा—

प्राणांचें गमनागमन

समुद्र आसां स्थानं म आहुर्यतः सद्य
आ च परा च यन्ति ॥ (मं. ३)

" समुद्र त्यांचें स्थान आहे असें मला सांगण्यांत आलें आहे. जेथून वारंवार त्या येथें येतात आणि दूर जातात. " या मंत्रांत प्राणशक्तींचें वर्णन उत्तमरीतिनें केलेलें आहे. (आयन्ति, यन्ति-येथें येतात व दूर जातात.) प्राणाच्या या गति दोन आहेत. एक गति 'येणें,' आणि दुसरी गति 'जाणें.' श्वास आणि उच्छ्वास या प्राणाच्या दोन गति प्रसिद्ध आहेत. प्राण आणि अपान अशींही दोन नावें आहेत. एक गति बाहेरून आंत जाण्याचा मार्ग दाखविते आणि दुसरी आंतून बाहेर जाण्याचा मार्ग दाखविते. ह्या दोन गति सर्वांना माहित आहेत.

ह्या प्राणांचें स्थान हृदयांतील मानससमुद्र आहे—म्हणजे हृदय-स्थान आहे. या सरोवरांत किंवा समुद्रांत जावून प्राण बुडी देतो आणि त्यांत स्नान करून पुन्हां बाहेर येतो. वेदांत अन्यत्र सांगि-तलें आहे कीं—

❀

एकं पादं नोत्खिदति सलिलाद्धंस उच्चरन् ।
यदङ्ग स तमुत्खिदेन्नैवाद्य न श्वः स्यान्न रात्रीः
नाहः स्यान्न व्युच्छेत्कदाचन ॥

अथर्व. ११।४ (६) २१.

हा (**हं-सः**) प्राण स्वतःचा एक पाद नेहमीं तेथेंच ठेवीत असतो, कारण जर तो तेथून उचलून घेईल तर या जगांत कोणीही जिवंत राहूं शकणार नाहीं, दिवस आणि रात्रही असणार नाहीं. (अथर्व ११।४ (६) २१)

" प्राण आंतून बाहेर जाते वेळीं स्वतःचा संबंध सोडून जात नाहीं; कारण प्राणाचा संबंध बाहेर येतांना सुटला तर प्राण्याला मृत्युच येईल. हीच गोष्ट या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रांत सांगितली आहे. हृदयांतील अंतरिक्षरूपी समुद्र या प्राणाचें स्थान आहे. तेथून तो एकदां बाहेर येतो व पुनः दुसऱ्यांदा आंत जातो. परंतु तो जेव्हां बाहेर जातो तेव्हां तो नेहमींच बाहेर रहात नाहीं. कारण तो बाहेरच राहिला व पुनः आंत गेलाच नाहीं तर प्राणी जिवंतच राहणार नाहीं. या प्राणाचा जीवनाशीं इतका महत्वाचा संबंध आहे. हा प्राणाचा जीवनाशी असलेला संबंध येथें पाहणें आवश्यक आहे. हें पाहिलें असतां प्राणाचें महत्व लक्षांत येईल. याच पद्धतीनें प्राणाचाही प्राण असा जो आत्मा त्याचें महत्व जाणतां येतें.

प्राणांचा स्वामी

वास्तविक पहातां प्राण हा एकच आहे. तथापि विविध स्थानांत राहिल्यानें आणि विविध कार्यें केल्यानें त्यांत विविध भेद मानण्यांत आले आहेत. पांच मुख्य प्राण आणि पांच उपप्राण मिळून दहा प्रकारचे भेद शास्त्रकारांनीं मानले आहेत. परंतु ही शेवटची मर्यादा नाहीं. अनेक स्थळीं आणि अनेक कार्यांच्या संबंधानें अनेक भेद मानतां येतील. प्राणासाठीं 'अप्सराः' हा शब्द या सूक्तांत प्रयुक्त केला आहे आणि तो गंधर्वांच्या बरोबर राहतो असेंही आलंकारिक वर्णन केलें आहे. या दृष्टिनें खालील मंत्रभाग आतां पाहा—

अनवद्याभिः समु जग्म आभिः
अप्सरास्वपि गंधर्व आसीत् । (मंत्र ३)

" या अनेक निर्दोष अप्सरांसह तो एक गंधर्व समागम करतो आणि त्या अप्सरांमध्यें तो गंधर्व राहतो. "

जर गंधर्व आणि अप्सरा हे दोन शब्द बाजूला ठेवले तर आपण निश्चित केलेल्या अर्थाप्रमाणें या मंत्र भागाचा अर्थ खालील प्रमाणें होईल.

" या अनेक निर्दोष प्राणशक्तींबरोबर हा एक आत्मा समागम

करतो आणि या प्राणांमध्यें तो एक सर्वधारक आत्मा राहतो. "

हा अर्थ फारच सरळ आणि सुबोध असल्यानें त्याचें अधिक स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं, कारण कीं प्रत्येक गोष्टीचें विशेष स्पष्टीकरण यापूर्वीच आलेलें आहे. हें रूपक चाणाक्ष वाचकांच्या चटकन ध्यानांत येण्यासारखें आहे. सर्व प्राण आत्म्यांतून शक्ति घेवूनच शरीरांत कार्य करीत असतात आणि आत्माही प्राणांत राहतो. या बाबतींत यजुर्वेद सांगतो—

सो असावहम् । (यजु. अ. ४०।१७)

" (**सः**) तो (**असौ**) असु अर्थात् प्राणांमध्यें राहणारा आत्मा (**अहं**) मी आहें. " अर्थात् प्राणांत आत्मा राहतो आणि आत्म्याच्या बाहेरच्या भागांत प्राण अथवा जीवनशक्ति आहे, आणि हे उभयतां जगाचे सर्व व्यवहार करीत असतात.

ब्रह्मांड देह

या सर्व गोष्टींचा स्वतःशीं वाचकांनीं विचार करावा. या ठिकाणीं फक्त आपल्या देहांतील अनुभव घेऊन भागणार नाहीं. जी आपल्या लहान देहांत पाहिली, ती बाहेरील महाब्रह्मांड देहांतही पहावयाची आहे अथवा विराट पुरुषांत त्याची कल्पना करावयाची आहे. या सूक्तांत विश्वव्यापक आत्म्याचें वर्णन करणें हा मुख्य उद्देश आहे, तथापि समजण्यासाठीं आम्ही सर्व गोष्टी देहांत पाहण्याचा विचार केला. आतां त्याच पद्धतीनें ब्रह्मांड देहांची कल्पना केली पाहिजे.

ज्याप्रामाणें प्रत्यांच्या देहांत प्राण आहे, त्याचप्रमाणें ब्रह्मांड-रूपी देहांत विश्वव्यापक प्राणाचा महान् समुद्र आहे. या महा-प्राण समुद्रांतून आपण प्राणाचा थोडासाच अंश घेत असतो. या प्रमाणेंच अन्यशक्तीही या ब्रह्मांडदेहांत पुष्कळ विशालरूपानें आहेत. दोन्हीं ठिकाणीं शक्तींनें स्वरूप एकच आहे, फरक फक्त अल्पत्व व महत्त्वाचाच आहे. त्यामुळेंच आपण आपल्या देहांतील व्यवस्था पाहून बाह्य व्यवस्थेचें ज्ञान प्राप्त करून घेऊं शकतों.

सारांश

वाचक या सूक्तांत परमात्म्याची सर्वव्यापक सत्ता पाहूं शकतात. तोच एक उपास्य देव आहे, आणि सर्वांचा आधार आहे. तोच सर्वांचें दुःख दूर करतो, व सर्वांना सुख देतो. त्याची प्राप्ति मानस उपासनेनें केली पाहिजे. तो सर्वत्र उपस्थित आहे, असें समजून त्याला नमस्कार केला पाहिजे. सृष्टीच्या अंतर्गत प्रत्येक पदार्थांत त्याचें कार्य पाहण्याचा अभ्यास केल्यानें, त्याच्याविषयीं ज्ञान होऊं लागतें आणि त्याच्यावर श्रद्धा वाढूं लागते.

त्याच्या बरोबर प्राणशक्ति राहते. जी जगांत कधीं प्रकट तर कधीं गुप्तरूपानें राहते. ती कोठें प्रकट होते आणि कोठें गुप्त राहते हें पाहिलें असतां जगांत चाललेल्या त्याच्या कार्यांची कल्पना होऊं शकते.

हा ज्याप्रमाणें मेघांतील विजेमध्यें प्रकाश ठेवतो, तसाच नक्षत्रांमध्येंही ठेवतो. प्रकाशकांचाही हाच प्रकाशक आहे. मोठ्यांतही तो मोठा आहे, आणि तो सूक्ष्माहूनही सूक्ष्म आहे. याप्रमाणें त्याला जाणून सर्व भूतमात्रांमध्यें त्याचा अनुभव करून त्याला नमन केलें पाहिजे. त्याच्यासमोर आपलें मस्तक नम्र केलें पाहिजे. सर्व जगांत जी प्रेरणा, उत्साह आणि प्रेम आहे तें सर्व त्याच्या जीवनशक्तीमुळेंच आहे, हें जाणून सर्वत्र याचा महिमा पाहून त्याची पूजा केली पाहिजे.

' मनन, नमन, सर्वत्र दर्शन ' केल्यावर त्याची सेवा करण्या-साठीं त्याच्या कार्यांत आपल्याला स्वतःला समर्पण करून घेतलें पाहिजे. " सज्जनांचें पालन आणि दुष्टांचें निर्दलन " रूप परमा-त्म्याच्या कर्मांत पूर्वोक्त रीतीप्रमाणें आपल्या कर्तव्याचा भाग आनंदानें पार पाडणें, ह्याचेंच नांव त्याची भक्ति करणें आहे; आणि ती भक्ति करण्यासाठीं ' दुःखी लोकांचें दुःख दूर करण्याचें कार्य आपल्या शिरावर घेतलें पाहिजे.' ईशप्राप्तीचा हा सरळ मार्ग या सूक्ताच्या द्वारें प्रकाशित झाला आहे. वाचकांनीं त्याचा अधिक विचार करावा.

जीवनरसाचा महासागर

कांड १ सूक्त ३२

(ऋषिः- ब्रह्मा । देवता-द्यावापृथिवी)

इदं जनासो विदथं महद्ब्रह्म वदिष्यति ।
न तत्पृथिव्यां नो दिवि येन प्राणन्ति वीरुधः ॥ १ ॥
अन्तरिक्ष आसां स्थाम श्रान्तसदामिव ।
आस्थानमस्य भूतस्य विदुष्टद्वेधसो न वा ॥ २ ॥
यद्रोदसी रेजमाने भूमिश्च निरतक्षतम् ।
आर्द्रं तदद्य सर्वदा समुद्रस्येव स्रोत्याः ॥ ३ ॥
विश्वमन्यामभीवार तदन्यस्यामधिश्रितम् ।
दिवे च विश्ववेदसे पृथिव्यै चाकरं नमः ॥ ४ ॥

अर्थ— (जनासः) लोक हो ! (इदं विदथ) हें ज्ञान प्राप्त करून घ्या. तोच ज्ञानी (महत् ब्रह्म वदिष्यति) महान ब्रह्माच्याविषयीं सांगेल. (येन वीरुधः प्राणन्ति) ज्याच्यामुळें औषधी वगैरे टवटवीत राहतात (ज्याने प्राण प्राप्त करतात), (तत् पृथिव्यां न, नो दिवि) तो पृथ्वींत नाहीं, त्याचप्रमाणें द्युलोकांतही नाहीं. (१)

(आसां अंतरिक्षे स्थाम) या औषधी वगैरेंचें अंतरिक्षांत स्थान आहे. (श्रान्तसदां इव) थकून बसलेल्यांच्या प्रमाणें (अस्य भूतस्य आस्थानम्) या उत्पन्न झालेल्याचें जो स्थान आहे (तत् वेधसः विदुः वा न) ज्ञानी लोक जाणतात किंवा नाहीं ? (२)

(यत् रेजमाने रोदसी) ज्या कंपायमान होणाऱ्या द्यावापृथिवीनें व (भूमिः च) केवळ भूमिनेंही (निरतक्षतं) बनविलें, (तत् अद्य सर्वदा आर्द्रं) तें आजपर्यंत नेहमीं रसमय आहे. (समुद्रस्य स्रोत्याः इव) ज्याप्रमाणें समुद्राचे प्रवाह असतात. (३)

(विश्वं) सर्वांनीं (अन्यां अभीवार) दुसरीला घेरलें आहे (तत्) तें (अन्यस्यां अधिश्रितम्) दुसरीचें आश्रित झालेलें आहे. (दिवे च) द्युलोक आणि (विश्ववेदसे च पृथिव्यै) संपूर्ण धनांनीं युक्त पृथ्वीला (नमः अकरं) मी नमस्कार केला आहे. (४)

भावार्थ— हे लोकहो ! इतकें लक्षांत ठेवा कीं ज्याला तत्वज्ञान समजेल तो ज्ञानीच त्याचें विवरण करूं शकेल. तत्वज्ञान हें आहे कीं, ज्याच्यापासून वाढणाऱ्या वनस्पति वगैरे स्वतःचें जीवन प्राप्त करून घेतात. तें जीवनसत्व पृथ्वीवर नाहीं आणि द्युलोकांतही नाहीं. (१)

या वनस्पति आदींचें स्थान अंतरिक्ष आहे. ज्याप्रमाणें थकले-भागलेले विश्रांति घेतात त्याप्रमाणें या वनस्पति वगैरे अंतरिक्षांत रहातात. या बनलेल्या जगाचा जो आधार आहे. त्याला कोणी ज्ञानी लोक जाणतात आणि कोणी जाणत नाहींत ! (२)

हालचाल करणाऱ्या द्युलोक आणि पृथ्वीलोकाच्या द्वारां जें कांहीं बनलेलें आहे, तें सर्व यावेळपर्यंत बिलकुल नवें अर्थात् जीवनरसानें परिपूर्ण असें आहे, ज्याप्रमाणें सरोवरापासून निघालेले प्रवाह जलानें परिपूर्ण असतात. (३)

हें सर्व जग दुसऱ्या शक्तीवर वाढलेलें आहे आणि. तीही दुसऱ्याच्या शक्तींच्या आश्रयानें राहिलेली आहे. द्युलोक आणि सर्व धनांनीं युक्त पृथ्वीदेवीला मी नमस्कार करतों, कारण या दोन देवता या जगाला निर्माण करणाऱ्या आहेत. (४)

जीवनरसाचा महासागर

स्थूल सृष्टि

जी सृष्टि पहाण्यांत येते ती स्थूल सृष्टि आहे. यांत माती, दगड इत्यादि अति स्थूल पदार्थ, वृक्ष वनस्पत्यादि वाढणारे पदार्थ, पशुपक्षी इत्यादि वाढणारे आणि हालचाल करणारे प्राणि, तसेच वाढणारे, हालचाल करणारे व उन्नत होणारे मनुष्य प्राणी आहेत. दगड माती वगैरे स्थिर सृष्टीला सोडून, पशु, वनस्पति आणि मानव सृष्टीचें अवलोकन केलें तर असें स्पष्ट दिसून येतें कीं, ते उत्पन्न होतात, वाढतात आणि प्राण धारण करतात. ही गोष्ट स्पष्ट दिसते. त्यांच्यांत दिसून येणारें जीवन सत्व हें कोणतें तत्व आहे ? हें काय स्थूलच आहे कीं या शिवाय एकादें भिन्न तत्व आहे ? याचा विचार या सुक्तांत केलेला आहे.

सर्व लोकांनीं या जीवनरसाचें ज्ञान करून घ्यावें. जर जीवनांतून आनंद प्राप्त करणें असेल तर त्यांनीं (**जनासः विदथ**) ज्ञानाची प्राप्ती करून घेणेंच योग्य आहे. ही मनन करण्यासारखी सूचना मंत्राच्या आरंभींच दिली आहे. (मंत्र १)

ही जीवनरसाची विद्या कोण देईल ? कोणापासून ती प्राप्त होईल ? ही शंका येथें उत्पन्न होते. या विषयीं पहिल्या मंत्रांतच विवेचन केलें आहे. त्यांत सांगितलें आहे कीं, जो या विद्येला जाणतो तोच (**महत् ब्रह्म वदिष्यति**) महाब्रह्माच्या विषयीं अर्थात् या महत्वपूर्ण ज्ञानाविषयीं सांगूं शकेल. ज्याला या विद्येची जिज्ञासा आहे, त्यानें अशा विद्वानाकडे जावें आणि ज्ञान प्राप्त करून घ्यावें. दुसऱ्या कोणाकडे जाण्याची जरूर नाहीं.

जीवनरस

थोडक्यांत एवढें समजावें कीं,' ज्या जीवनतत्त्वाच्या आश्रयानें वृद्धिंगत होणारे वृक्ष, वनस्पति, व प्राणी प्राण धारण करतात, हें जीवनाचें आधारतत्त्व पृथ्वीवर त्याचप्रमाणें द्युलोकांत नाहीं.' (मं. १). तें तत्व अर्थात् अन्य स्थानांत आहे आणि त्यामुळें त्याचा शोध ह्या बाह्य द्यावा-पृथिवींहून भिन्न अशा स्थानांतच केला पाहिजे.

या प्रथम मंत्रांत स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे कीं, ज्यांतून जीवन रस प्राप्त होतो, तें तत्व या स्थूल संसाराच्या बाहेर आहे अर्थात् तें अतिसूक्ष्म आहे. तें कुठें आहे याचें संपूर्ण उत्तर पुढच्या मंत्रांत येईल.

भूतमात्रांचा आश्रय

दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं,-' या सृष्टिगत सर्व पदार्थांचें आश्रयस्थान अंतरिक्ष आहे. या स्थूल पदार्थांचें जें अंतरिक्षांत आश्रय स्थान आहे तें ज्ञानी ही जाणतात कीं नाहीं कोण जाणें !' अर्थात् हें ज्ञान सर्व विद्वानांना आहे किंवा नाहीं ? ज्ञान्यांमध्येंही जे परिपूर्ण ज्ञानी असतात तेच फक्त हें जाणत असतात. सृष्टी-विद्या जाणणारे ही गोष्ट जाणूं शकत नाहींत, परंतु आत्मविद्येचें ज्ञान ज्यांनीं संपादन केलें आहे ते याला यथावत् जाणतात. (मंत्र २)

या द्वितीय मंत्रांत " भूत " शब्द आहे. त्याचा अर्थ " बन-लेला पदार्थ. " जी ही बनलेली सृष्टि आहे तिचें नांव भूत आहे आणि हिच्या विद्येचें नांव भूतविद्या आहे. या सर्व सृष्टीला आधार देणारें एक सूक्ष्मतत्व आहे. ज्याचें ज्ञान अध्यात्मविद्या जाणणारेच जाणूं शकतात, म्हणून जीवनरसविद्येचें अध्ययन कर-णाऱ्यांनीं जो ही विद्या जाणतो अशा सद्गुरुजवळ जावें व त्याच्यापासून ही जीवनविद्या प्राप्त करून घ्यावी. हा ज्ञानीच (**महत् ब्रह्म वदिष्यति**) महाब्रह्माचें ज्ञान सांगेल. याप्रमाणें द्वितीय मंत्राचा प्रथम मंत्राशीं संबंध आहे.

सनातन जीवन

तिसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, " या द्यावापृथिवींत फक्त बनलेले पदार्थ आहेत. ते सदासर्वदा ज्या वेळेपासून झाले आहेत, तेव्हांपासून आजतागायत बरोबर जीवनरसानें परिपूर्ण भरलेले आहेत आणि त्यामुळेंच अगदीं ते नवीन असल्यासारखे आहेत. त्यांच्यामध्यें जीवन रस असा भरलेला आहे कीं, ज्या प्रमाणें एकाद्या सरोवरांतून निघणाऱ्या अनेक प्रकारच्या जलप्रवा-हांत सरोवराचें जल परिपूर्ण भरलेलें असतें.

जगाचे मातापिता

अदिति – भूमि जगाची माता आहे आणि द्यौ जगाचा पिता आहे. भूलोक आणि द्युलोक, भूमि आणि सूर्य, स्त्रीशक्ति आणि पुरुषशक्ति, ऋणशक्ति आणि धनशक्ति, रयि आणि प्राण, प्रकृति आणि पुरुष, प्रकृति आणि आत्मा याप्रमाणें दोन शक्तिंनीं जगत् झालें आहे; म्हणून या शक्तिंनाच जगाचे माता पिता म्हणण्यांत आलें आहे. विविध ग्रंथकारांनीं वरील द्वंद्व-शक्तिंच्या

विविधनावांतून कोणत्यातरी नावांनीं संबोधिलेलें आहे आणि जगाच्या मूळ उत्पादकशक्तीचें वर्णन केलें आहे.

जीवनाचा एक महासागर

वेदांत द्यावापृथिवी- द्युलोक आणि पृथ्वी लोकाला जगाचें माता-पिता म्हणून वर्णन केलें आहे. कारण कीं, संपूर्ण जग त्यांतच समाविष्ट झालेलें आहे. हें बनलेलें जग जरी उत्पत्तीनंतर वाढतें व नष्ट होतें. तथापि बनलेल्या संपूर्ण पदार्थांत तें जीवनतत्त्व व्यापून राहिलें आहे, तें एकरूपानें व्यापून राहिलें आहे. त्यामुळें संपूर्ण जगाचे नियम अटल आणि एकसारखे आहेत. हजारों वर्षांपूर्वी जें जीवन या जगांत चालत होतें, तसेंच आजही चालू आहे. यावरून जीवनरूपी अमृतत्वाच्या अगाध सामर्थ्याची कल्पना होऊं शकते.

ज्याप्रमाणें एका समुद्रांतून अनेक प्रवाह निघाले तर त्यांच्यांत एकच जीवन रस सर्वांत एकसारखाच प्रवाहित होत असतो, त्याप्रमाणें या जगांत बनलेल्या अनंत पदार्थांत, एकच अगाध जीवनाच्या महासागरांतून जीवनरस पसरलेला आहे. जणूं काय ते संपूर्ण पदार्थ त्या जीवनामृतानें ओतप्रोत-भरपूर राहिलेले आहेत.

वाचकांनीं क्षणभर आपणा स्वतःला त्याच जीवनमहासागरांत ओतप्रोत भरलेला एक घट समजावें आणि स्वतःमध्येंही तोच जीवनस्रोत वहात आहे असें लक्षांत घ्यावें. ज्याप्रमाणें पोहणाऱ्या मनुष्याला सभोंवतीं जिकडेतिकडे पाण्याचाच अनुभव येतो, त्याप्रमाणें मनुष्यही त्या जीवन महासागरांत पोहणारा एक प्राणी आहे. याप्रमाणें ध्यानांत ठेवलें असतां त्या जीवनामृत महासागराची सहज थोडी कल्पना येऊं शकते. हें जीवन नेहमीं नवें आहे. तें कधींही जुनें होत नाहीं व कधींही बिघडत नाहीं. पदार्थ उत्पन्न झाले व बिघडले तरी तें मात्र एकसारखें नवीन राहून सर्वांना जीवन देत असतें. (**तत् अद्य सर्वदा आर्द्रं**) तें आजही आणि नेहमीं एकसारखें अभिनव रसपूर्ण रहातें. सर्वांना जीवन देऊनही ज्याची जीवनशक्ति रतिमात्रही कमी होत नाहीं, इतकी अगाध जीवनशक्ति त्यांत आहे.

सर्वांचा एक आश्रय

चतुर्थ मंत्रांत सांगितलें आहे कीं, " संपूर्ण विश्व अर्थात् हें स्थूल जगत् दुसऱ्या एका शक्तीवर राहतें आणि ती शक्ति दुसऱ्या शक्तीच्या आश्रयानें राहिली आहे. तें आधाररूप तत्व पृथ्वी आणि द्युलोकाच्या स्वरूपांत दिसून राहिलेलें आहे; त्यामुळें मी द्युलोकांत त्याच्या प्रकाशशक्तीला आणि पृथ्वींतील त्याच्या आधारशक्तीला नमस्कार करतों. " अर्थात् संपूर्ण जगांत त्याची शक्तीच जगद्रूपानें प्रकट झालेली आहे, असें समजून, जगाकडे पाहून त्याच्या शक्तिचें स्मरण करतां करतां त्याच्याविषयीं मी माझी नम्रता प्रगट करतों.

स्थूल, सूक्ष्म आणि कारण

या मंत्रांत " विश्व " शब्द स्थूल जगाचा बोधक आहे. या स्थूलाचा आधार (**अन्या**) दुसरा आहे, तो याच्यापेक्षां सूक्ष्म आहे आणि तो या स्थूलाच्या आंत आहे, किंवा त्याच्या बाहेर हें सर्व विश्व आहे. प्रत्येक स्थूल पदार्थाच्या आंत हें सूक्ष्म तत्व आहे; आणि हेंही सूक्ष्मतत्व आणखी तिसऱ्या अतिसूक्ष्म तत्वाच्या आश्रयानें आहे. हें तिसरें तत्त्वच सर्वांचा एकमात्र आधार आहे. या अतिसूक्ष्म तत्वाचें जीवन, अमृत सर्वत्र एकरस होऊन व्यापून राहिलेलें आहे. या जीवन समुद्रांत विश्वांतील सर्व पदार्थ तरून राहिलेले आहेत, अथवा सर्व पदार्थरूपी लहानमोठे स्रोत त्याच एका अद्वितीय जीवन महासागरांतून निघालेले आहेत, आणि त्या पदार्थांत त्याचें जीवनकार्य करीत राहिलेले आहेत, हें दर्शविण्याचा या सूक्ताचा उद्देश आहे. अनेकांत एकच जीवन भरलेलें आहे. त्याची प्रतीती येथें होतें.

हें सूक्त केवळ वाचण्यासाठीं नाहीं; परंतु तें मनाची धारणा करून, मनामध्यें धारणेनें स्थिर करण्याचें अनुष्ठान करण्यासाठींच आहे. जे वाचक वर सांगितल्याप्रमाणें धारणा करूं शकतील तेच याच्यापासून योग्य लाभ मिळवूं शकतील. वाचकांनीं या ठिकाणीं हेंही लक्षांत घ्यावें कीं या लहानांत लहान सूक्ताच्या द्वारें वेद किति अद्भुत उपदेश देत आहे. निःसंदेह हा उपदेश जीवन पालटून देण्यास समर्थ आहे. परंतु हा लाभ तोच [illegible] शकेल कीं जो त्या उपदेशाला आपल्या जीवनांत उतरविण्याचा प्रयत्न करील.

अमृतदाता ईश्वर

कांड ६ सूक्त १

(ऋषिः- अथर्वा । देवता- सविता)

दोषो गाय बृहद्गाय द्युमद्धेहि । आथर्वण स्तुहि देवं सवितारम् ॥ १ ॥
तमु ष्टुहि यो अन्तः सिन्धौ सूनुः । सत्यस्य युवानमद्रोघवाचं सुशेवम् ॥ २ ॥
स घा नो देवः सविता साविषदमृतानि भूरि । उभे सुष्टुती सुगातवे ॥ ३ ॥

अर्थ— हे (**आथर्वण**) अथर्व्याचे अनुयायी ! (**सवितारं देवं**) सविता देवाची (**स्तुहि**) स्तुति कर. (**दोषो गाय**) रात्रीच्या वेळीं गा, (**बृहत् गाय**) पुष्कळ भजन कर, (**द्युमत् धेहि**) जें तेजयुक्त आहे त्याची धारणा कर. (१)

(**यः सिंधौ अन्तः सत्यस्य सूनुः**) जो भवसमुद्रांत सत्याची प्रेरणा देणारा आणि (**युवानं**) तरुण (**सुशेवं**) उत्तम सुख देणारा आणि (**अ-द्रोघ-वाचं**) द्रोहरहित वाणीनें युक्त आहे (**तं उ स्तुहि**) त्याचेच गुणवर्णन कर. (२)

(**सः घा सविता देवः**) तो सर्व प्रेरक देव (**उभे सुष्टुती सुगातवे**) दोन्ही प्रकारच्या स्तुतीला योग्य उत्तम मार्गावरून आम्ही जावें म्हणून (**नः भूरि अमृतानि साविषत्**) आम्हांला अतिशय अमृतमय असें सुख देत राहिला आहे. (३)

भावार्थ— हे योगमार्गात प्रवृत्त असलेल्या मनुष्या ! तूं प्रेरक अशा एका ईश्वराची उपासना कर. रात्रीच्या वेळीं त्याचें गुणगान कर, त्याचें पुष्कळ भजन कर आणि त्याच्या तेजाची मनांत धारणा कर ! (१)

तोच एक ईश्वर या भवसमुद्रांत सत्याची प्रेरणा करणारा आहे. तो बालक होत नाहीं आणि वृद्धही होत नाहीं, परंतु सदा सर्वदा तरुण राहतो. तोच सर्व सुख देणारा आहे आणि हिंसारहित वाणीचा प्रवर्तक आहे. त्याचेंच गुणगान कर. (२)

तोच सर्वांना प्रेरणा देणारा एक देव आम्ही दोन्ही प्रकारच्या प्रशंसनीय मार्गावर प्रगति करावी म्हणून आम्हांला नेहमीं अनंत सुख देत राहिला आहे. (३)

अमृतदाता ईश्वर

एक देवाची भक्ति !

या सूक्तांत एका देवाच्या भक्तिचा उपदेश फारच उत्तम रीतीनें केलेला आहे. फारसा विचार न करतां या सूक्ताचा अर्थ पाहूनही हें सूक्त सूर्याची उपासना करण्याचा उपदेश करीत आहे असें प्रतीत होतें. परमात्म्याचा प्रतिनिधीरूप सूर्य या सूर्यमालेंत आहे, म्हणून त्याची उपासना केल्यानें परंपरेनें परमात्म्याची उपासना होऊं शकते यांत संशय नाही. परंतु ही प्रतीकोपासना साधारण अल्पबुद्धिवान् माणसांच्या मनःस्थिरतेसाठीं उपयोगी आहे. वेदांमध्यें अग्नि, विद्युत् आणि सूर्यद्वारा पार्थिव, अंतरिक्ष आणि द्युलोकासंबंधीं तीन दृश्य तेजांचें दर्शन करवून त्यांच्याद्वारां परमात्मोपासनेचाच धडा देण्यांत आला आहे. या नियमानुसार या ठिकाणीं सविता देवाच्या द्वारें सूर्याचें दर्शन करवितां- करवितां एका अद्वितीय परमात्म्याचीच उपासना सांगितली आहे. याचें उत्तम प्रमाण हें आहे—

दोषो गाय (मं. १)

''रात्रीच्या वेळीं त्याचें गुणगान कर' त्याची भक्ति कर, त्याची उपासना कर. जर दिवसा दिसणाऱ्या सूर्याचीच उपासना या सूक्तांत असती तर 'रात्रीच्या वेळीं त्याचें गुणगान कर' हें सांगणें

अनुचित ठरलें असतें; कारण सूर्याची उपासना फक्त दिवसाच होऊं शकते, रात्रीच्या वेळीं होत नाहीं. या सूक्तांत तर रात्रीच्या एकांत समयीं त्या सूर्यदेवाचें पुष्कळ भजन करा, अशी आज्ञा आहे. पहा—

दोषो गाय बृहद् गाय । (मं. १)

" रात्रीच्या वेळीं भजन कर, पुष्कळ भजन कर. " याप्रमाणें रात्रीच्या वेळींच भजन करण्यास सांगितलें आहे. जर या सूर्याचीच उपासना या सूक्तांत अभिप्रेत असती, तर त्याची उपासना, रात्रीचा नामनिर्देश करून कशी सांगितली असती ? या सूक्तांत दिवसाचें नांवही नाहीं, परंतु रात्रीचा स्पष्ट उल्लेख आहे. इतकेंच नाहीं पण त्या रात्रीच्या वेळीं—

द्युमत् धेहि । (मं. १)

" तेजस्वी स्वरूपाची मनांत धारणा कर. " सूर्याचें तेज दिवसा दिसतें, रात्रीच्या वेळीं दिसत नाहीं. परंतु या ठिकाणीं रात्रीच्या वेळीं सूर्याच्या तेजाचें ध्यान करावें असें लिहिलें आहे; म्हणून जो सूर्य रात्रीच्या वेळीं उपासनेला मिळूं शकतो आणि ज्याच्या तेजाची धारणा रात्रीच्या वेळींही होऊं शकते, अशा सूर्याचें वर्णन या सूक्तांत आहे, असें आम्हीं सांगूं शकतों. अर्थात् सूर्याचाही सूर्य जो परमात्मा आहे, त्याच्या आज्ञेनें हा सूर्य येथें तळपून राहिला आहे, अशा परमात्मारूपी सूर्याची उपासना या सूक्तद्वारां सांगितली आहे. त्याचे गुण— ज्यांच्या उपासनेच्या वेळीं मनन करावे, ते गुण-सूक्तांत खालीलप्रमाणें वर्णिलेले आहेत—

१ **बृहत्** = तो सर्वांहून मोठा आहे. त्याच्याहून कोणीही मोठा नाहीं.

२ **द्युमत्** = तो प्रकाशवान् आहे.

३ **देव** = तो सर्व प्रकारें दिव्य आहे. तो दाता, प्रकाशक आणि ऐश्वर्ययुक्त आहे.

४ **सविता** = तो सर्वांची उत्पत्ति करणारा आणि सर्वांचें ऐश्वर्य वाढविणारा आहे.

५ **सिन्धौ अन्तः** = या संसार समुद्रांतील अत्यंत सखोल भागांतही तो विद्यमान आहे.

६ **सत्यस्य सूनुः** = सत्याची प्रेरणा करणारा तो सत्य-स्वरूप आहे.

७ **युवा** = तो नेहमीं तरुण आहे. तो कधींहीं लहान नव्हता व वृद्धही होणार नाहीं. नेहमीं तरुणासारखा शक्तिशालीच आहे.

८ **सुशेवः** = उत्तम सुख देणारा अथवा (**सु-सेवः**) उत्तम प्रकारें सेवा करण्यास योग्य आहे.

९ **अद्रोघ-वाक्** = हिंसारहित शब्दांची प्रेरणा करणारा.

१० **अमृतानि भूरि साविषत्** = अनंत सुखांना देत राहिला आहे.

परमात्म्याचे हे दहा गुण या सूक्तांत वर्णन केले आहेत. उपासकानें या गुणांचें मनन केलें पाहिजे. परमात्म्याच्या या गुणांचें मनन करून, त्यांची धारणा मनांत करून आपल्या आंत साधेल तेवढ्या प्रमाणांत या गुणांची वृद्धि केली पाहिजे. या गुणांचा सर्वोत्कर्ष मनुष्यांत होणें शक्य नसलें तरी हरकत नाहीं. ज्या मर्यादेपर्यंत करवेल तेवढा उत्कर्ष करून घेणें आवश्यक आहे.

परमात्म्याच्या या गुणांचें मनन करण्यानें, त्याच्या तेजःस्वरूपाचा सर्वत्र साक्षात्कार होऊं लागतो. योगमार्गप्रवृत्त होऊन प्राणायाम, ध्यान, धारणेच्या बाजूला थोडी प्रवृत्ति झाल्यास प्रकाशदर्शन होऊं लागतें. या प्रकाशदर्शनाचें नित्य स्मरण केल्यानें आणि त्याला ध्यानांत स्थिर करण्यानें योगसिद्ध उन्नतिच्या प्रकाशाचा मार्ग सिद्ध होऊं लागतो. हें तेजाचें केंद्र या संसारसागरांत सर्वत्र उपस्थित असलेलें पहावें, आणि त्याशिवाय दुसरा पदार्थच नाहीं, असा मनाचा निश्चय केला पाहिजे. त्याचें तेज, त्याचे सत्य-नियम आणि त्याची दया यांचा सर्वत्र अनुभव केला असतां त्याची सर्वत्र उपस्थिति समजणें शक्य होतें.

अहिंसक वाणी

परमात्मा स्वतः अहिंसक वाणीचा प्रवर्तक आहे; म्हणून जे मनुष्य त्याचे भक्त होऊं इच्छितात, त्यांनीं नेहमीं द्रोहरहित वाणीचा उपयोग करावा. " अद्रोहवाक् " म्हणजे ज्या शब्दांत थोडाही द्रोह नसेल, थोडीही हिंसा नसेल, दुसऱ्याला दुःख होईल असा किंचितही आशय नसेल, अशी वाणी बोलणें मनुष्यांना उचित आहे. ईश्वरभक्तानें कसें आचरण ठेवावें तें या शब्दाच्या द्वारें या सूक्तांत दर्शविलेलें आहे. जर परमेश्वर हिंसामय शब्दाचा प्रयोग करीत नाहीं तर त्याच्या भक्तांनींही तसा प्रयोग करूं नये. अर्थात् भगवद्भक्तानें हिंसाभाव मनांत ठेवूं नये, वाणीनें प्रगट करूं नये आणि हिंसेचें कांहींही कर्म करूं नये. असा सतत प्रयत्न केला असतां एक दिवस असा येईल कीं उपासकाच्या मनांत हिंसेसंबंधीं विचारही येणार नाहीं. ज्यावेळीं अशी अवस्था प्राप्त होते, त्यावेळीं त्या मनुष्यासमोर हिंस्र प्राणीही स्वतःची हिंसावृत्ति विसरून जातात. आत्मोन्नतिसाठीं या प्रकाराची " अद्रोह वृत्ति " अत्यंत आवश्यक आहे.

अद्रोहवृत्ति केवळ द्रोहाचा निषेधच व्यक्त करते असें कोणी समजूं नये, तर, द्रोहनिषेध म्हणजे " दुसऱ्याचें सुख वाढविण्या-

साठीं आत्मसमर्पणही करण्याची या वृत्तींत अपेक्षा आहे. अहिंसा, अद्रोह हे शब्द केवळ हिंसानिवृत्तिच दाखवीत नाहींत. जनतेची सेवा करण्याच्या द्वारें भगवंताची सेवा होते. ती करण्याचीही यांत आवश्यकता दाखविली आहे.

सत्याचा मार्ग

अहिंसे बरोबर 'सत्या' चा मार्गही या सूक्तांत दाखविला आहे. परमात्म्याला "**सत्यस्य सूनुः**" म्हटलें आहे. याठिकाणीं 'सूनु' शब्दाचा अर्थ (**सु-प्रसवे**) प्रसविणें असा आहे. सत्याचा प्रसव करणें याचें तात्पर्य सत्य मानणें, सत्य बोलणें आणि सत्याचें आचरण करणें अर्थात् सत्यरूप होणें, परमात्मा सत्याचा प्रवर्तक आहे असें म्हटलें असतां, ईश्वरभक्तानें सत्यनिष्ठ होणें उचित आहे. स्वतःच्या उन्नतिसाठीं सत्याची अत्यंत आवश्यकता आहे.

अहिंसावृत्ति आणि सत्यनिष्ठा या दोन भावनांनीं मनुष्याची उन्नति होऊं शकते आणि त्याला परमेश्वराचा साक्षात्कार होतो.

दोन मार्ग

अहिंसा आणि सत्य हे दोन प्रशंसनीय मार्ग आहेत. त्या मार्गांनींच मनुष्यमात्राचें ऐहिक आणि पारलौकिक कल्याण होऊं शकतें. या दोन मार्गांबद्दल या सूक्तांत असें सांगितलें आहे—

उभे सुष्टुती सुगातवे सः भूरि अमृतानि साविषत् (मं. ३)

" या दोन उत्तम प्रशंसनीय मार्गांवरून (**सु**) उत्तम रीतीनें (**गातवे**) जाण्यासाठीं तो परमात्मा आम्हांला पुष्कळ सुखसाधनें देतो. " हीच त्याची अपार दया आहे. या जगांत त्यानें अनंत सुखसाधनें निर्माण केलीं आहेत, आणि तीं **मनुष्यांना** दिलेलीं आहेत. त्याचा उद्देश हा आहे कीं मनुष्यांनीं त्या सुखसाधनांचें अवलंबन करून अहिंसा आणि सत्य या दोन मार्गांनीं स्वतःची उन्नति करून घ्यावी आणि शेवटीं परमात्म्याची प्राप्ती करून घ्यावी. याप्रमाणें परमेश्वराच्या अपार दयेचा अनुभव करून त्यावर दृढ श्रद्धा ठेवणें योग्य आहे.

वरील दोन मार्गांनीं ऐहिक अभ्युदय आणि पारमार्थिक निःश्रेयस या दोहोंची प्राप्ती होऊं शकते. धर्माचींही दोन अंगेंच आहेत. परमात्म्यानें या जगांत जीं सुखसाधनें निर्माण केलीं आहेत, त्यांच्या योगानें मनुष्यांनीं आपला ऐहिक अभ्युदय आणि निःश्रेयस मिळवून परम गती प्राप्त करून घ्यावी.

अथर्व्यांचा अनुयायी

या सूक्तांतील उपदेश 'आथर्वणा' साठीं केलेला आहे. 'थर्व' या शब्दाचे अर्थ कुटिलता, हिंसा, चंचलता आदि आहेत. " अथर्व " या शब्दाचा अर्थ " अकुटिलता, अहिंसा आणि स्थिरता. " जे मनुष्य अकुटिलता आणि अहिंसावृत्तिचें अनुसरण करून मनःस्थैर्य प्राप्त करून घेतात; अर्थात् योगमार्गाचें अनुष्ठान करून चित्तवृत्तींचा निरोध करतात, त्यांना अथर्वा म्हणतात. या योगमार्गाचे जे अनुयायी आहेत त्यांना 'आथर्वण' म्हणतात. या आथर्वणांची उन्नति कशी होते याचें वर्णन या सूक्तांत केलेलें आहे. या दृष्टिनें वाचकांनीं या सूक्ताचा विचार केल्यास त्यांना आत्मोन्नतिच्या वेदप्रतिपादित योगमार्गाचें ज्ञान प्राप्त होणें शक्य आहे.

आशा आहे कीं वाचकांनीं या सूक्तावरून, अहिंसा आणि सत्याचें महत्व ओळखून, त्याच्या अवलंबनानें स्वतःच्या उन्नतिचें साधन करावें व वेदांचा उपदेश आपल्या दैनिक आचरणांत आणून इहपर परम उन्नति प्राप्त करावी.

अमृतरसमय देव

कांड ७ सूक्त ४० (४१)

(ऋषिः – प्रस्कण्वः । देवता– सरस्वान्)

यस्य॑ व्र॒तं प॒शवो॒ यन्ति॒ सर्वे॒ यस्य॑ व्र॒त उ॑प॒तिष्ठ॑न्त॒ आप॑ः ।
यस्य॑ व्र॒ते पु॑ष्ट॒पति॒र्निवि॑ष्ट॒स्तं सर॑स्वन्त॒मव॑से हवामहे ॥ १ ॥

अर्थ—(**सर्वे पशवः यस्य व्रतं यन्ति**) सर्व पशु ज्याच्या नियमानुसार जातात, (**यस्य व्रते आपः उपतिष्ठंति**) ज्याच्या व्रतांत कर्मानुसार जल उपस्थित होतें, (**यस्य व्रते पुष्टपतिः निविष्टः**) ज्याच्या व्रतांत पोषणकर्ता कार्य करीत असतो, (**तं सरस्वन्तं अवसे हवामहे**) त्या अमृतरसयुक्त देवाची आमच्या रक्षणासाठीं आम्ही प्रार्थना करतों. (१)

आ प्रत्यञ्चं दाशुषे दाश्वंसं सरस्वन्तं पुष्टपतिं रयिष्ठाम् ।
रायस्पोषं श्रवस्युं वसाना इह हुवेम सदनं रयीणाम् ॥ २ ॥

अर्थ— (दाशुषे) दात्याला (प्रत्यञ्चं दाश्वंसं) प्रत्येक वेळीं समोर पाहून दान देणारे, (पुष्टपतिं सरस्वन्तं) पुष्टी करणारे, अमृतरसवान्, (रयि-स्थां) ऐश्वर्यांत स्थिर राहणारे, (रायस्पोषं श्रवस्युं) धनाची पुष्टी करणारे आणि अन्नवान् (रयीणां सदनं) धनांच्या आश्रयस्थानरूपी देवाची (इह वसानाः) येथें राहणारे आम्ही सर्व (आहुवेम) प्रार्थना करीत आहों. ॥ २ ॥

भावार्थ— सर्व पशुपक्षी ज्याच्या नियमांत राहतात, पाणी ज्याच्या नियमानें वहातें, ज्याच्या नियमानें सर्वांची पुष्टि होते, त्या देवाची आम्ही प्रार्थना करतों कीं तो आमचें रक्षण करो. (१)

प्रत्येक दात्याला जो धन देतो, सर्वांचें जो पोषण करतो, ज्याच्यामुळें सर्वांत शोभा आहे, जो सर्वांच्या ऐश्वर्याची वृद्धि करतो, आणि ज्याच्यापाशीं अन्नही विपुल आहे, ज्याच्या आश्रयानें सर्व धनें राहातात, त्या देवाची आम्ही प्रार्थना करितों कीं त्याच्या कृपेनें आम्ही सर्व या ठिकाणीं राहणारे लोक सुरक्षित होवोत. (२)

ईश्वराजवळ संपूर्ण अमृतरस आहे. तो स्वतः सर्वांचें पोषण करतो; म्हणून आम्ही त्याची प्रार्थना करतों कीं तो आमचें रक्षण करो, आम्हाला पुष्ट बनवो, आम्हाला धनसंपन्न करो आणि आम्हाला अमृतरसानें युक्त करो.

महान् शासक

कांड १ सूक्त २०

(ऋषिः – अथर्वा । देवता– सोमः, मरुतः)

अदारसृद् भवतु देव सोमास्मिन्यज्ञे मरुतो मृडता नः ।
मा नो विददभिभा मो अशस्तिर्मा नो विदद् वृजिना द्वेष्या या ॥ १ ॥
यो अद्य सेन्यो वधोऽघायूनामुदीरते ।
युवं तं मित्रावरुणावस्मद्यावयतं परि ॥ २ ॥

अर्थ— हे (देव सोम) सोमदेवा ! (अदार-सृत् भवतु) आपसांत फूट उत्पन्न करण्याचें कार्य न होवो. हे (मरुतः) मरुतांनो ! (अस्मिन् यज्ञे) या यज्ञांत (नः मृडत) आम्हाला सुखी करा, (अभि भाः नः मा विदद्) पराजय आमच्याकडे न येवो, (अशस्तिः मा) अपकीर्ति आमच्याकडे न येवो (या द्वेष्या वृजिना) जीं द्वेष वाढविणारीं कुटिल कृत्यें आहेत तींही (नः मा विदद्) आमच्या पाशीं न येवोत. (१)

(अघायूनां) पापमय आयुष्य घालविणाऱ्यांचा (यः सैन्यः वधः) सेनेच्या वीरांकडून जो वध (अद्य उदीरते) आज होऊन राहिला आहे त्यांना हे मित्र आणि वरुण हो, (युवं) तुम्ही (तं अस्मत् परि यावयतं) त्याला आमच्या पासून सर्वथा दूर करा. (२)

भावार्थ— हे ईश्वरा ! आपापसांत विद्वेष येईल असें कोणतेंही कार्य आमच्याकडून न होवो. या सत्कर्मानें आम्हाला सुख प्राप्त होवो आणि पराजय, दुष्कीर्ति, अपयश, द्वेष आणि कुटिलता आमच्या पाशीं न येवोत. (१)

हे देवा ! शूर वीरांकडून पाप्यांचे जे वध होत राहतात तशा वधाचा प्रसंगही आमच्यावर न येवो. (२)

इतश्च यद॒मुत॑श्च यद्व॒धं व॑रुण यावय ।
वि म॒हच्छर्म॑ यच्छ॒ वरी॑यो यावया व॒धम् ॥ ३ ॥
शा॒स इ॒त्था म॒हाँ अ॑स्यमित्रसा॒हो अ॑स्तृ॒तः ।
न यस्य॑ ह॒न्यते॒ सखा॑ न जीयते॒ क॒दा च॒न ॥ ४ ॥

अर्थ— हे (**वरुण**) सर्वश्रेष्ठ ईश्वरा ! (**यत् इतः च यत् अमुतः वधं**) जो येथें आणि तेथें वध होईल त्याला (**यावय**) दूर कर, (**महत् शर्म वियच्छ**) मोठा आश्रय आणि सुख आम्हाला दे आणि (**वधं वरीयः यावय**) वधाला आमच्यापासून फार लांब ठेव. (३)

(**इत्था महान् शास**) याप्रमाणें सत्य आणि महान् शासक ईश्वर ! (**अ-मित्र-साहः अस्तृतः**) शत्रूंचा पराजय करणारा आणि कधींही पराजय न पावणारा असा (**असि**) तूं आहेस. (**यस्य सखा**) ज्याचा मित्र (**कदाचन न हन्यते**) कधींही मारला जात नाहीं आणि (**न जीयते**) कधींही पराजितही होत नाहीं. (४)

भावार्थ— हे परमेश्वरा ! आमच्यांत आणि दुसऱ्यांत वध करण्याची भावना राहूं देऊं नको. वधाची भावनाच आमच्या सर्वांच्या हृदयांतून दूर करून, तुझा महान् आश्रय-सुखमय आश्रय, आम्हाला दे. (३)

याप्रमाणें तुझेंच महान् सत्यशासन सर्वांवर आहे. तूंच खरा शत्रूंना योग्यप्रकारें दूर करणारा आणि नेहमीं विजयी आहेस. तुझा मित्र होऊन जो राहतो त्याचा कधींही पराजय होत नाहीं. (४)

महान् शासक

पूर्व सूक्ताशीं संबंध

पूर्व सूक्ताच्या शेवटीं " ईश्वरभक्तियुक्त सत्यज्ञानच माझें खरें कवच आहे," ही विशेष गोष्ट सांगितली आहे. तिचें विशेष वर्णन या सूक्तांत आलेलें आहे. सर्वांत प्रथम आपसांतील दुही दूर करण्याची सूचना दिली आहे.

आपसांतील दुही दूर करा

" **अ-दार-सृत् भवतु** " आमचें आचरण दुही दूर करणारें असो, हें या उपदेशाचें तात्पर्य आहे. पहा—

दार = फूट, दुही (**दॄ** विदारणे धातु)

दार-सृत् = फुटीचा प्रयत्न, दुहीचें कार्य

अ-दार-सृत् = दुही दूर करण्याचें कार्य

" **अ+दार-सृत् भवतु** " म्हणजे आपसांतील दुही दूर करण्याचें कार्य आम्हां सर्वांकडून घडो. या आपसांतील दुहीमुळें शत्रु आमचेवर हल्ला करितात, आणि शत्रूंचे हल्ले होऊं लागल्यावर त्यांना घालवून देण्याचा यत्न आम्हाला करावा लागतो. म्हणून युद्धाचें कारण आपसांतील फूटच आहे. जर आपसांत फूट नसेल व सर्व लोक मिळून मिसळून राहत असतील, तर दुसरे लोक हल्ला करावयाला धजणार नाहीत. जेथें आपसांत दुही असते, तेथेंच शत्रुकडून हल्ला होतो; म्हणून युद्धाचें मूळ कारण आपसांतील दुहीच आहे. हें समजून त्या दुहीला दूर केलें पाहिजे. राष्ट्रीय सुखाचा हाच खरा पाया आहे.

आपसांतील दुही दूर झाल्यावर (**मृडत्**) सुखी होण्याची संभावना असते, नाहींतर सुखाची आशा व्यर्थ आहे. आपसांतील दुही दूर केल्यानें जो लाभ होतो तो खालीं लिहिल्याप्रमाणें पहिल्या मंत्राच्या उत्तरार्धांत वर्णन केला आहे.

१ **अभिभाः नः मा विदत्** = पराजय आमचेकडे न येवो.

२ **अशस्तिः मो** = दुष्कीर्ति आमचेकडे न येवो.

३ **वृजिना नः मा** = कोणतेंही कुटिल कृत्य आमचेकडून न घडो.

४ **द्वेष्या नः मा विदत्** = द्वेषभाव आमच्या जवळ न येवो.

ज्यावेळीं आम्ही आपसांतील दुही दूर करूं त्या वेळीं आम्हास कोणाशींही द्वेष करण्याचें कारणच उरणार नाहीं. कोणा बरोबरही

कपटयुक्त कुटिल व्यवहार करण्याचें प्रयोजन रहाणार नाहीं. आमचा कधींच पराभव होणार नाहीं, किंवा आमचेवर कांहींही संकटें येणार नाहींत, आणि आमची अपकीर्तिही होणार नाहीं. अर्थात् जेव्हां आम्ही आपसांतील फूट नाहींशी करून आमच्यांत उत्तम संघटन घडवून आणूं आणि ऐक्याच्या सामर्थ्यानें आम्हीं उन्नति करून घेऊं, त्यावेळीं सर्व लोक आमचे मित्र होऊन आमच्याशीं मैत्रीचा व्यवहार ठेवतील व आम्हीही सर्वांबरोबर सरळ व्यवहार करीत राहूं. ऐक्यामुळें आमचें सामर्थ्य वाढेल आणि त्यामुळें आमचा कधींही पराजय होणार नाहीं आणि आमचें यश सगळीकडे पसरत राहील. (मंत्र १)

दुसऱ्या आणि तिसऱ्या मंत्रांत सैनिक वीरांकडून दुष्टांचा संहार होण्याविषयीं जें वर्णन आहे, तें असें आहे- आमच्या आपसांतील दुहीमुळेंच दुष्ट लोक आम्हाला त्रास देतात आणि तेव्हांच त्यांचा वध करण्याची पाळी येते. अर्थात् जर आमचा समाज सुसंघटित असेल, तर वधाचें मूळ न राहिल्यानें. वध करण्याचा प्रसंगच उद्भवणार नाहीं आणि आम्हाला (**महत् शर्म**) मोठें सुख प्राप्त होईल. " शर्म " शब्दाचा अर्थ " सुख आणि आश्रय " आहे. पूर्वापर संबंध पाहिला तर या ठिकाणीं परमेश्वराचा आश्रयच अभीष्ट आहे. कारण खरें सुखही परमात्म्याच्या आश्रयानेंच मिळतें. (मंत्र २-३)

महान् शासक

एक ईश्वरच महान् शासक आहे, त्यावर दुसऱ्या कोणाचाही अधिकार नाहीं; परंतु त्याच्या शासनानेंच सर्व कार्यें होतात. तोच सर्वसत्ताधीश आहे. शत्रुत्वाचा खरा नाश करणारा आणि कधींही पराजित न होणारा तो आहे. जर अशा सर्वसमर्थ भगवंताचा तो मित्र होऊन राहील तर त्याचा कधींही नाश होणार नाहीं, आणि त्याचा कधीं पराजयही होणार नाहीं. अर्थात् परमेश्वराचा मित्र होऊन व्यवहार करणाऱ्याचें यश आणि कीर्ति सर्वत्र पसरते. (मंत्र ४)

पूर्वीच्या सूक्तांत जें ' ज्ञान-कवच, ब्रह्मवर्म ' चें वर्णन केलें आहे, तें ब्रह्मकवच हेंच आहे कीं, " परमेश्वराचें शासन महान् मानणें आणि त्याचा मित्र होऊन सर्व व्यवहार करणें. "

आशा आहे कीं, याप्रमाणें वाचक परमेश्वराचा मित्र होण्याचा प्रयत्न करतील.

जगाचा एकमेव सम्राट्

कांड ६, सूक्त ३६

(ऋषिः - अथर्वा (स्वस्त्ययनकामः) । देवता- अग्निः)

ऋतावानं वैश्वानरमृतस्य ज्योतिषस्पतिम् । अजस्रं घर्ममीमहे ॥ १ ॥
स विश्वा प्रति चाक्लृप ऋतूंरुत्सृजते वशी । यज्ञस्य वय उत्तिरन् ॥ २ ॥
अग्निः परेषु धामसु कामो भूतस्य भव्यस्य । सम्राडेको वि राजति ॥ ३ ॥

अर्थ-- (**ऋतावानं**) सत्ययुक्त, (**ऋतस्य ज्योतिषः पतिं**) सत्य प्रकाशाचा स्वामी, आणि (**अजस्रं घर्मं वैश्वानरं**) निरंतर प्रकाशणारा सर्व विश्वाचा चालक अशा ईश्वराची (**ईमहे**) आम्ही प्राप्ति करीत आहों. (१)

(**सः विश्वा प्रति चाक्लृपे**) तो सर्वांना बलशाली बनवितो. (**वशी ऋतून् उत सृजते**) आणि तो सर्वांना वश करणारा वसंत आदि ऋतूंना बनवितो. आणि (**यज्ञस्य वयः उत्तिरन्**) यज्ञांसाठीं उत्तम अन्न बनवितो. (२)

(**भूतस्य भव्यस्य कामः**) भूत व पुढें उत्पन्न होणाऱ्या जगांतील सर्व कामना पूर्ण करणारा (**एकः सम्राट् अग्निः**) एक सम्राट् प्रकाशमय देव (**परेषु धामसु विराजति**) दूरदूरच्या स्थानांतही उपस्थित आहे. (३)

सर्वांचा एक ईश्वर

ईश्वर सर्व जगाचा " एक सम्राट् " आहे ही गोष्ट या सूक्तांत फारच उत्तम रीतीनें सांगितलेली आहे. तो ईश्वर (**परेषु धामसु विराजति**) अति दूर स्थानांतही विराजमान आहे. जवळ तर आहेच, पण अति दूरही आहे अर्थात् तो सर्वत्र आहे. सर्व (**भूतस्य भव्यस्य**) भूतकाळांत उत्पन्न झालेल्या पदार्थांचा ज्याप्रमाणें तो सम्राट् होता त्याचप्रमाणें वर्तमानकालीं दिसणाऱ्या सर्व जगाचा तो स्वामी आहे. इतकेंच नव्हे, परंतु भविष्यकाळांत उत्पन्न होणाऱ्या जगाचाही तो स्वामी असेल, अर्थात् संपूर्ण जगाचा सर्वकाळीं तो स्वामी आहे. त्याच्याशिवाय दुसरा अन्य स्वामी नाहींच.

तो सर्वांहून अधिक सामर्थ्यवान् आहे आणि त्यामुळेंच तो (**विश्वा चाक्लृपे**) सर्वांना सामर्थ्यवान् बनवितो. तो समर्थ असल्यानें सर्वांना (**वशी**) स्वतःच्या ताब्यांत ठेवतो. त्याच्या शासनाच्या बाहेर कोणी नाहीं. तोच सर्व प्रकारचें अन्न आणि विविध ऋतूंमध्यें होणारे यजनीय पदार्थ आणि भोग्य पदार्थ उत्पन्न करतो.

तो तिन्हीकाळीं (**ऋतावानं**) सत्य स्वरूप आहे आणि (**ऋतस्य पतिः**) सत्य नियमांचें पालन करणारा आहे. तोच सर्व (**वैश्वानरः**) विश्वाचा संचालक, विश्वाला चालविणारा आहे, सर्वांना तोच उपास्य आणि प्राप्त करण्यास योग्य आहे.

या सूक्तांत उत्तम एकेश्वरी उपासना सांगितलेली आहे, म्हणून उपासनेसाठीं हें सूक्त फार उत्तम आहे.

प्रजापालक

कांड ७, सूक्त २४

(ऋषिः– अथर्वा । देवता– इंद्रः, अग्निः, सविता)

यन्न इन्द्रो अखनद्यदग्निर्विश्वे देवा मरुतो यत्स्वर्काः ।
तदस्मभ्यं सविता सत्यधर्मा प्रजापतिरनुमतिर्नि यच्छात् ॥ १ ॥

अर्थ— (**यत्**) जो लाभ अग्नि, इन्द्र, विश्वेदेव, (**स्वर्काः मरुतः**) प्रखर तेजस्वी वायु या सर्वांत, प्रत्येक (**नः अखनत्**) आमच्यासाठीं देत राहिला आहे (**तत्**) तो (**सत्यधर्मा प्रजापतिः अनुमतिः सविता**) सत्य धर्मवान प्रजापालक अनुमति देणारा सविता आम्हांला (**नियच्छात्**) देवो. (१)

भावार्थ— आम्हां सर्व प्राणीमात्रासाठीं विद्युत्, अग्नि, पृथिवी इत्यादि सर्व देव आणि विविध प्रकारचे वायु, हे जो लाभ करून देतात, तो लाभ आम्हांला सूर्यापासून प्राप्त होतो. परंतु तो यापासून योग्यमार्गानें प्राप्त करून घेतला पाहिजे, कारण खरा प्रजापालक हाच सूर्य आहे.

व्यापक आणि श्रेष्ठ देव

कांड ७, सूक्त २५ (२६)

(ऋषिः- मेधातिथिः । देवता- विष्णुः, वरुणः)

यमोरोजसा स्कभिता रजांसि यौ वीर्यैर्वीरतमा शविष्ठा ।
यौ पत्येते अप्रतीतौ सहोभिर्विष्णुमगन्वरुणं पूर्वहूतिः ॥ १ ॥
यस्येदं प्रदिशि यद्विरोचते प्र चानति वि च चष्टे शचीभिः ।
पुरा देवस्य धर्मणा सहोभिर्विष्णुमगन्वरुणं पूर्वहूतिः ॥ २ ॥

अर्थ— (**ययोः ओजसा**) ज्या दोघांच्या सामर्थ्यानें (**रजांसि स्कभिता**) लोकलोकान्तर स्थिर आहेत, (**यौ वीर्यैः शविष्ठा वीरतमा**) जे दोघे स्वतःच्या पराक्रमानें आणि बलानें श्रेष्ठ आहेत, (**यौ सहोभिः अप्रतीतौ**) जे दोघे स्वबळानें परत न हटतां (**पत्येते**) पुढें जातात, ते दोघे (**विष्णुं वरुणं**) विष्णु अर्थात् व्यापक देव आणि वरुण अर्थात् श्रेष्ठ देव, यांना उद्देशून (**पूर्वहूतिः अगन्**) सर्वांच्या आधीं प्रार्थना करितां करितां त्यांना मी प्राप्त करतों. (१)

(**यस्य प्रदिशि**) ज्याचें दिशा आणि उपदिशांमध्यें (**इदं यत् विरोचते**) हें जें प्रकाशित आहे, (**प्र अनति च**) आणि जें उत्तम प्रकारें प्राण धारण करतें (**देवस्य धर्मणा सहोभिः**) या देवाच्या धर्मानें आणि बळानें (**शचीभिः विचष्टे च**) आणि शक्तींनीं जो प्रकाशतो त्या (**विष्णुं च वरुणं च पूर्वहूतिः अगन्**) व्यापक आणि श्रेष्ठ देवाची सर्व प्रथम प्रार्थना करून मी त्या शक्तींना प्राप्त करतों. (२)

भावार्थ— ज्यानें स्वसामर्थ्यानें या त्रैलोक्याला आपल्या जागीं स्थिर केलें आहे, जो स्वतःच्या विविध शक्तींनीं अत्यंत बलवान् आणि पराक्रमी झाला आहे. जो कधीं परत हटत नाहीं परंतु पुढेंच जात असतो, त्या व्यापक आणि सर्वश्रेष्ठ अशा देवाची सर्वां आधीं मी प्रार्थना करितों कारण तो देव सर्वश्रेष्ठ आहे. (१)

ज्याच्या सामर्थ्यानें दिशा आणि उपदिशांमध्यें सर्वत्र प्रकाश पसरून राहिला आहे, ज्याच्या जीवनशक्तीनें प्राणिमात्र प्राण धारण करतात. ज्या देवाच्या स्वतःच्या धर्मानें आणि सामर्थ्यानें सर्व प्राणी पहातात आणि अनुभव करतात, त्या व्यापक आणि सर्वश्रेष्ठ देवाची मी सर्वांआधीं प्रार्थना करतो कारण तो देव सर्वांहून वरिष्ठ आहे.

हें सूक्त स्पष्ट असल्यानें त्याचें विवरण करण्याची आवश्यकता नाहीं. या सूक्ताच्या प्रथम मंत्रांत दोन देव भिन्न आहेत असें मानून त्याचें तसें वर्णन केलें आहे, परंतु दुसऱ्याच मंत्रांत त्यांना अभिन्न मानून त्यांचा एकवचनी प्रयोग केला आहे. अर्थात् ' विष्णु आणि वरुण ' ही दोन विशेषणरूप पदें एकाच अभिन्न देवतेच्या वर्णनासाठीं आहेत हें उघड आहे. वाचकांनीं याचा आणखी खोल विचार करावा.

विश्वशकटाचा चालक

कांड ४, सूक्त ११

(ऋषिः- भृग्वंगिराः । देवताः- अनड्वान्, इंद्रः)

अनड्वान्दाधार पृथिवीमुत द्यामनड्वान्दाधारोर्वन्तरिक्षम् ।
अनड्वान्दाधार प्रदिशः षडुर्वीरनड्वान्विश्वं भुवनमा विवेश ॥ १ ॥
अनड्वानिन्द्रः स पशुभ्यो वि चष्टे त्रयां छक्रो वि मिमीते अध्वनः
भूतं भविष्यद्भुवना दुहानः सर्वा देवानां चरति व्रतानि ॥ २ ॥
इन्द्रो जातो मनुष्येष्वन्तर्घर्मस्तप्तश्चरति शोशुचानः ।
सुप्रजाः सन्त्स उदारे न सर्षद्यो नाश्नीयादनडुहो विजानन् ॥ ३ ॥
अनड्वान्दुहे सुकृतस्य लोक ऐनं प्याययति पवमानः पुरस्तात् ।
पर्जन्यो धारा मरुत ऊधो अस्य यज्ञः पयो दक्षिणा दोहो अस्य ॥ ४ ॥

अर्थ—(**अनड्वान् पृथिवीं दाधार**) विश्वरूपी शकट चालविणाऱ्या ईश्वरानें पृथ्वीला धारण केलें आहे. (**अनड्वान् द्यां उत उरु अंतरिक्षं दाधार**) याच ईश्वरानें द्युलोक आणि अंतरिक्षाला धारण केलें आहे. (**अनड्वान् षट् उर्वीः प्रदिशः दाधार**) याच ईश्वरानें सहा महा दिशांना धारण केलें आहे. (**अनड्वान् विश्वं भुवनं आविवेश**) हाच ईश्वर सर्व भुवनांमध्यें प्रविष्ट झाला आहे. (१)

(**सः अनड्वान् इन्द्रः**) हा अनड्वान इंद्र आहे. तो (**पशुभ्यः विचष्टे**) पशूंचें निरीक्षण करतो. (**शक्रः त्रयान् अध्वनः वि मिमीते**) हा समर्थ प्रभु तीन्ही मार्ग मापून राहतो. (**भूतं भविष्यत् भुवना दुहानः**) भूत, भविष्य आणि वर्तमान काळांतील पदार्थ निर्माण करतां करतां (**देवानां सर्वा व्रतानि चरति**) देवांच्या सर्व व्रतांना चालवितो. (२)

(**इन्द्रः मनुष्येषु अन्तः जातः**) इन्द्र मनुष्यांमध्यें प्रकट झालेला आहे. तो (**तप्तः घर्मः शोशुचानः चरति**) तळपत्या सूर्याप्रमाणें सर्व प्रकाशित करीत जातो. (**अनडुहः विजानन्**) या संचालकाला जाणतां जाणतां म्हणजे त्याचें स्मरण करतां करतां (**यः न अश्नीयात्**) जो भोग भोगीत नाही (**सः**) तो (**सु- प्रजाः सन्**) सुप्रजावान् होऊन (**उत- आरे न सर्षत्**) देहपातानंतर भटकत नाहीं. (३)

(**सुकृतस्य लोके अनड्वान् दुहे**) पुण्यलोकांत हा ईश्वर तृप्ति देतो आणि (**पुरस्तात् पवमानः एनं आप्याययति**) पहिल्यापेक्षाही अधिक पवित्र करून त्यांना समृद्ध करतो. (**पर्जन्यः अस्य धाराः**) पर्जन्य या त्याच्या धारा होत. (**मरुतः ऊधः**) मरुत् अर्थात् वायु स्तन आहेत, (**अस्य यज्ञः पयः**) यज्ञ हेंच त्याचें दुग्ध आहे आणि (**अस्य दक्षिणा दोहः**) त्याची दक्षिणा, दूध दोहन करून धार काढण्याच्या पात्राप्रमाणें आहे. (४)

भावार्थ— इंद्रानें, पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक आणि सहा दिशा यांना धारण केलें आहे आणि तो सर्व भुवनांमध्यें प्रविष्ट झालेला आहे. (१)

या इन्द्रालाच अनड्वान् म्हणतात. तो सर्वांचा निरीक्षक आहे. याच समर्थ इन्द्रानें तीन मार्गांना निर्माण केलें आहे. भूत, भविष्य आणि वर्तमान काळच्या सर्व पदार्थांना निर्माण करतां करतां, तो अन्य सर्व देवतांच्या व्रतांना चालवितो. (२)

हा प्रभु मनुष्यांच्या अंतरांत प्रगट होतो. तो प्रकाशमान् सूर्यासारखा तेजस्वी आहे. या ईश्वराला जो जाणतो तो स्वार्थी-भोग तृष्णेचा त्याग करून, तसेंच सुप्रजावान् होऊन देहपातानंतर इकडेतिकडे न भटकतां स्वतःच्या मूळ स्थानाला प्राप्त करतो. (३)

यस्य नेशें यज्ञपतिर्न यज्ञो नास्यं दातेशे न प्रतिग्रहीता ।
यो विश्वजिद्विश्वभृद्विश्वकर्मा घर्मं नो ब्रूत यतमश्चतुष्पात् ॥ ५ ॥
येन देवाः स्वरारुरुहुर्हित्वा शरीरममृतस्य नाभिम् ।
तेन गेष्म सुकृतस्य लोकं घर्मस्य व्रतेन तपसा यशस्यवः ॥ ६ ॥
इन्द्रो रूपेणाग्निर्वहेन प्रजापतिः परमेष्ठी विराट् ।
विश्वानरे अक्रमत वैश्वानरे अंक्रमतानडुह्यक्रमत ।
सोऽदृंहयत सोऽधारयत ॥ ७ ॥
मध्यमेतदनडुहो यत्रैष वह आहितः ।
एतावदस्य प्राचीनं यावान्प्रत्यङ् समाहितः ॥ ८ ॥

अर्थ— (**यज्ञपतिः यस्य न ईशे**) यज्ञपति याचा स्वामी नाहीं, (**न यज्ञः**) त्याचप्रमाणें यज्ञही त्याचा स्वामी नाहीं, (**न दाता न प्रतिग्रहीता अस्य ईशे**) दाता आणि दान घेणारा, हेही त्याचे स्वामी नाहींत. (**यः विश्वजित्**) जो सर्वांना जिंकणारा, (**विश्वभृत् विश्वकर्मा**) सर्वांचा पोषणकर्ता आणि निर्माता आहे (**घर्मं नः ब्रूत**) त्या उष्णता देणाऱ्याचें आम्हाला वर्णन सांगा. तो (**यतमः चतुष्पात्**) काय चार पायांचा आहे ? (५)

(**येन देवाः शरीरं हित्वा**) ज्याच्या सहाय्यानें देव शरीराचा त्याग करून (**अमृतस्य नाभिं स्वः आरुरुहुः**) अमृताच्या केंद्ररूप आत्मीय प्रकाशस्थानावर चढले आहेत. (**घर्मस्य तेन व्रतेन तपसा यशस्यवः**) प्रकाशपूर्ण अशा त्याच्या व्रतानें आणि तपश्चर्येनें यशाची वाढ इच्छिणारे आम्ही (**सुकृतस्य लोके गेष्म**) सुकृत- पुण्यलोकांत आमचें स्वतःचें स्थान प्राप्त करूं. (६)

(**इन्द्रः रूपेण अग्निः**) प्रभूच आपल्या रूपानें अग्नि झालेला आहे. तोच (**परमेष्ठी प्रजापतिः**) परमात्मा प्रजापालन करणारा ईश्वर (**वहेन विराट्**) सर्व विश्वाला आधार देण्यामुळें विराट् स्वरूपाला प्राप्त झाला आहे, तो (**विश्वानरे अक्रमत्**) सर्व मनुष्यामध्यें व्यापून राहिला आहे. तोच (**वैश्वानरे अक्रमत्**) अग्नि वगैरेमध्यें पसरलेला आहे. तोच (**अनडुहि अक्रमत्**) रथ खेचणाऱ्यांमध्यें पसरलेला आहे. (**सः अदृंहयत**) तो बलयुक्त करतो आणि (**सः अधारयत**) तोच धारण करणारा आहे. (७)

(**अनडुहः एतत् मध्यं**) या संचालकाचा तो मध्य आहे. (**यत्र एषः वहः आहितः**) जेथें या विश्वाचा भार ठेवलेला आहे, (**एतावत् अस्य प्राचीनं**) इतका त्याचा पूर्व भाग आहे (**यावान् प्रत्यङ् समाहितः**) जेवढा त्याचा पाठीमागचा भाग ठेवलेला आहे. (८)

भावार्थ-- हा ईश्वर पुण्यलोकांत तृप्ति देतो आणि प्रारंभापासूनच पवित्र जीवात्म्याची वृद्धि करतो. पर्जन्य या त्याच्या पुष्टीच्या धारा आहेत. वायु अथवा प्राण हे त्याचे स्तन आहेत, ज्यांतून या धारा निघतात. यज्ञ हें पुष्टिकारक दूध आहे आणि दक्षिणा ही दोहनपात्राप्रमाणें आहे. (४)

यज्ञ, यज्ञपति, दाता अथवा दान घेणारा यांपैकीं कोणीही त्यावर शासन करूं शकत नाहींत. तो विश्वाला जिंकणारा सर्वांचा पोषणकर्ता आणि विश्वासंबंधीं सर्व कर्में करणारा आहे. त्याच्या चतुष्पात्- स्वरूपाविषयींचें ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. (५)

ज्याच्या सहाय्यानें शरीरत्यागानंतर अमृतकेंद्ररूप आत्मशक्तीवर स्वामित्व प्राप्त करतात, (त्याच्या कृपेनें) प्रकाश वाढविणाऱ्या व्रतादिकांनीं आणि तपानें यश प्राप्त करण्याची इच्छा करणारे आम्ही, पुण्यलोकांत आमचें स्थान प्राप्त करूं. (६)

इंद्रच अग्नि, परमेष्ठी, प्रजापति आणि विराट् आहे, तोच सर्व मनुष्यांत आणि प्राण्यांत व्याप्त आहे. तो सर्वत्र आहे आणि तोच सर्वांना सामर्थ्य देणारा आहे. (७)

ज्यावर या संसाररूपी शकटाचा भार ठेवला आहे असा हा संचालक देवाचा मध्यभाग आहे. या मध्यभागाच्या पूर्व आणि पश्चिमभागांत हा संसार राहिला आहे. (८)

यो वेदानडुहो दोहान्त्सप्तानुपदस्वतः ।
प्रजां च लोकं चाप्नोति तथा सप्तऋषयो विदुः ॥ ९ ॥
पद्भिः सेदिमवक्रामन्निरां जङ्घाभिरुत्खिदन् ।
श्रमेणानड्वान्कीलालं कीनाशश्चाभि गच्छतः ॥ १० ॥
द्वादश वा एता रात्रीर्व्रत्या आहुः प्रजापतेः ।
तत्रोप ब्रह्म यो वेद तद्वा अनडुहो व्रतम् ॥ ११ ॥
दुहे सायं दुहे प्रातर्दुहे मध्यंदिनं परि ।
दोहा ये अस्य संयन्ति तान्विद्मानुपदस्वतः ॥ १२ ॥

अर्थ— (यः अनु उपदस्वतः अनडुहः सप्त दोहान् वेद) ज्याचा कधीं विनाश होत नाहीं अशा या संचालकाचे, जे सात प्रवाह आहेत, त्यांना जो जाणतो (प्रजां च लोकं च आप्नोति) तो प्रजा आणि लोकांना प्राप्त होतो. (तथा सप्तऋषयः विदुः) असें सप्तर्षि जाणतात. (९)

(पद्भिः सेदिं अवक्रामन्) पायानें भूमीचें आक्रमण करतो, (जंघाभिः इरां उत्खिदन्) जांघांनीं अन्न उत्पन्न करतो, (श्रमेण कीलालं) आणि परिश्रमानें रसाला उत्पन्न करतो, याप्रमाणें (अनड्वान् कीनाशः च) बैल आणि शेतकरी (अभिगच्छतः) बरोबर चालतात. (१०)

(द्वादश वै एताः रात्रीः) निश्चयानें बारा अशा या रात्री आहेत (प्रजापतेः व्रत्याः आहुः) ज्या प्रजापतीच्या व्रताला योग्य आहेत असें म्हटलें जातें (तत्र यः ब्रह्म उपवेद) त्यांत जो ब्रह्माला जाणतो, (तत् वै अनडुहः व्रतं) तेंच हे विश्वचालकाचें व्रत आहे. (११)

(सायं दुहे प्रातः दुहे) सायंकाळीं आणि प्रातःकाळीं मी दोहन करतों. (मध्यं दिनं परि) दुपारींही दोहन करतों. (ये अस्य दोहाः संयन्ति) त्यापासून जे रस प्राप्त होतात, (तान् अनु-उपदस्वतः विद्मः) अशा त्या अविनाशीला आम्ही जाणतों. (१२)

भावार्थ— जो या संसाररूपी शकटाच्या संचालक देवाच्या सात दोहनप्रवाहांना जाणतो तो सुप्रजावान् होतो, आणि पुण्यलोक प्राप्त करतो. याप्रमाणें सप्तऋषि जाणतात. (९)

पायानें भूमीचें आक्रमण करतात व जंघांनीं अन्न उत्पन्न करतात, श्रमानें अन्नरस उत्पन्न करतात, याप्रमाणें बैल आणि शेतकरी हे दोघे जोडीनें चालतात. (१०)

या बारा रात्री आहेत, ज्या प्रजापतीचें व्रत करण्यास योग्य आहेत. त्यावेळीं ब्रह्मज्ञान प्राप्त करणें हेंच विश्वचालकाचें व्रत आहे. (११)

प्रातःकाळीं, दुपारीं व सायंकाळीं दोहन होतें. या दोहनानें जो रस प्राप्त होतो तोच अविनाशी रस होय. (१२)

विश्वशकटाचा चालक

विश्वशकटाचें स्वरूप

हा सर्व संसार अथवा हें सर्व विश्व, एक मोठा शकट (गाडा) आहे. या शकटांत सर्व मनुष्यादिक प्राणि बसलेले आहेत आणि आपल्या मुकामाकडे जात आहेत. या शकटाचें वर्णन वेदामध्यें याप्रमाणें आलेलें आहे—

मनो अस्या अन आसीद् द्यौरासीदुत च्छदिः ।
शुक्रावनड्वाहावास्तां यदयात्सूर्या गृहम् ॥ १० ॥
ऋक्सामाभ्यामभिहितौ गावौ ते सामनावितः ।
श्रोत्रं ते चक्रे आस्तां दिवि पन्थाश्चराचरः ॥ ११ ॥

शुची ते चक्रे यात्या व्यानो अक्ष आहतः ।
अनो मनस्मयं सूर्या ऽऽरोहत्प्रयती पतिम् ॥ १२ ॥

(ऋ. १०।८५।१०–१२)

" याचा मनरूपी रथ होता. त्या रथाचा वरील भाग द्युलोक होता. दोन शुभ्र बैल त्याला जोडलेले होते, ज्यावेळीं सूर्यादेवी पतीच्या घरीं जाऊं लागली. (१०) हे बैल ऋचा आणि सामवेदाच्या मंत्रांनीं प्रेरित झालेले होते. श्रोत्ररूपी दोन चाकें या रथाला लागलेलीं आहेत, आणि त्याचा मार्ग आकाशांतून चराचररूपी आहे. (११) हीं चाकें शुद्ध आहेत आणि या दोन्हींमधील जो आधार दंड तो व्यानवायु आहे. हा मनोमय रथ आहे आणि यावर बसून सूर्यादेवी पतीच्या घरीं जाते आहे. (१२) "

या ठिकाणीं या रथाचा वरील भाग द्युलोक आहे असें सांगितलें आहे; अर्थात् त्याच्या खालचा भाग पृथ्वी आणि मध्यभाग अंतरिक्ष आहे. शरीरांत मस्तिष्क, छाती आणि पाय हे रथाचे तीन भाग आहेत. विश्वांतील तीन लोक हे तीन भाग आहेत. शरीरांत दशेंद्रियें हीं घोड्याच्या स्थानीं आहेत. त्याप्रमाणें जगाच्या विशाल रथाला दहा देव लागलेले आहेत, ज्यांच्यापासून हीं दहा इन्द्रियें बनलीं आहेत. ज्या लोकांना शरीररूपी रथाची बरोबर कल्पना येईल, त्यांना विश्वरूपी विशाल रथाची कल्पना बरोबर येऊं शकेल. पिंड–ब्रह्मांड, शरीररथ–विश्वरथ यांची तुलना प्रत्येकस्थळीं होते. या ठिकाणीं विचारानें ब्रह्मांडाच्या विशाल रथाची कल्पना करणें उचित आहे. या विश्वरथाचा संचालक ईश्वर या सूक्ताचा वर्ण्य विषय आहे. हाच " अनड्वान् अथवा इंद्र " आहे.

इंद्र शब्द ईश्वरवाचक प्रसिद्ध आहे, परंतु ' अनड्वान् ' शब्द ईश्वरवाचक आहे, याबद्दल वाचकांना शंका येणें स्वाभाविक आहे; कारण कीं ' अनः शकटं वहति इति अनड्वान् ' अर्थात् शकट अथवा गाडी खेंचणारा बैल असा त्याचा अर्थ होतो. तर ज्याप्रमाणें गाडीला बैल चालवितो, त्याप्रमाणें विश्वरूपी रथाला जो चालवितो, तो विश्वरथाचा (**अनड्वान्**) बैलच आहे, हे म्हणणें वावगें होणार नाहीं. विश्व चालविणारा जो प्रभु, तोच त्याला खेंचून राहिला आहे. दुसऱ्या कुणाची शक्ति आहे कीं जो याला चालवील ? म्हणून प्रथम मंत्रांत सांगितलें आहे कीं, " भूमि, अंतरिक्ष आणि द्युलोक सर्व दिशांसह त्याच्याच आधारानें स्थित आहेत आणि तो सर्व भुवनांमध्यें प्रविष्ट झालेला आहे " (मंत्र १). या मंत्रांत जो ' अनड्वान् ' शब्द आलेला आहे, तो सर्व विश्वाला आधार देणाऱ्या सर्व विश्वव्यापक अशा देवतेचा वाचक आहे. जरी ' अनड्वान् ' शब्द संस्कृतांत ' बैल ' वाचक आहे. तथापि या ठिकाणीं त्याचा अर्थ ' विश्वचालक ' असा आहे. कित्येक लोक या ठिकाणीं फक्त बैलाचीच कल्पना करतात आणि अर्थाचा अनर्थ करतात. त्यांनीं मंत्राच्या वर्णनाचाही त्याच्या बरोबर विचार करावा व प्रसंगानुकूल योग्य अर्थ करून त्याचा लाभ करून घ्यावा.

' ज्या रथाचा वरील भाग द्युलोक आहे, मध्यभाग अंतरिक्ष आहे आणि खालील भाग भूमि आहे, त्या रथांत मनुष्यमात्र बसलेले आहेत. मीही त्यांत बसलों आहें, आणि या रथाला चालविणारा स्वतः प्रभु आहे; असा हा रथ आम्हां सर्वांना अभीष्ट स्थळीं पोहोंचवीत आहे. ' ही अत्यंत श्रेष्ठ काव्यमय कल्पना या मंत्रांत सांगितलेली आहे. अर्जुनाचा रथ स्वतः भगवान् श्रीकृष्ण चालवित होते. वस्तुतः ' कुरुक्षेत्र ' अर्थात् कर्मक्षेत्रांत प्रत्येक मनुष्याचा देहरथ परमात्म्याच्या शक्तीनेंच चालविला जात असतो. त्याचप्रमाणें विश्वाचा हा प्रचंड रथही त्याच्याच शक्तीनें चालत राहिला आहे. ही कल्पना मनांत आणून ' विश्वचालक ' ईश्वराचें ज्ञान प्राप्त करणें, येथें प्रत्येक मनुष्याला उचित आहे. या कल्पनेचें जितकें जास्त मनन करण्यांत येईल, तितकें परमात्म्याच्या शक्तीचें अधिक ज्ञान प्राप्त होऊं शकेल आणि मनुष्य ईश्वराच्या अगाध शक्तीला ओळखूं शकेल.

ज्याप्रमाणें रथाचे अनेक विभाग निरनिराळे असतांनाही ते भाग रथांतच असल्यामुळें सर्वांचा एकमेकांशीं अविभाज्य संबंध असतो, आणि त्यांपैकीं एक भाग जरा ढिला झाला तर सर्व रथ मोडतो, त्याप्रमाणें हें विश्व एकमेकांशीं बांधलेलें आहे. सूर्य-चंद्रादि लोक लोकान्तर एकमेकांपासून फार दूर अंतरावर आहेत, तरी त्यांचा परस्पर संबंध रथचक्राच्या संबंधाप्रमाणें, एकमेकांशीं दृढ आहे. मनुष्याच्या शरीरांतही अनेक अवयव आहेत. ते सर्व अवयव वेगवेगळे असतांही, परस्परांशीं संबंधित आहेत. त्यांतून एक अवयव वेगळा झाला अगर रोगी झाला तर सर्व शरीरावर आपत्ति येते. याचप्रमाणें मनुष्यसमाजांत चार अवयव आहेत. ते असे — ज्ञानी, शूर, व्यापारी आणि कारागीर. हे सर्व व्यक्तिशः एकमेकांहून पृथक् आहेत, परंतु संघभावनेनें एकमेकांशीं शरीरांतील अवयवांप्रमाणें बांधलेले आहेत. जर कांहीं व्यक्ति संघाचे नियम तोडून, शत्रुपक्षाला मिळाल्या तर संघाचें बळ नष्ट होतें. कारण ज्याप्रमाणें व्यक्तीचें शरीर रथ आहे, त्याचप्रमाणें समाजशरीर हाही एक रथ आहे, आणि त्याचप्रमाणें विश्वाचें विराट् शरीर हाही एक विशाल रथच आहे. या तिन्ही स्थानीं हे नियम सारखेच आहेत. या रथाच्या कल्पनेपासून व मननापासून वाचकांना पुष्कळच बोध प्राप्त होण्यासारखा आहे. सर्व विश्व मिळून एक रथ आहे, याच्यांत कांहींही भेदभाव नाहीं. प्रत्येक सजीव अथवा निर्जीव पदार्थ या एका रथाचें अंग असल्यानें, त्याला ही कल्पना

*

मनांत ठेवूनच येथें राहिलें पाहिजे. या रथाला जो चालवितो तोच इंद्र, परमात्मा आहे. तोच ईश्वर आहे. पहा—

अनड्वान् इन्द्रः । (मं. २)

' या रथाला जो चालवितो तोच इंद्र आहे. ' या विश्वांत जी गति आलेली आहे ती त्याचीच गति आहे. या जड जगताला चेतना देणारा तो एकच ईश्वर आहे. तो काय करतो पहा—

(१) शक्रः त्रयान् अध्वनः मिमीते ।
(२) भूतं भविष्यत् भुवना दुहानः ॥
(३) देवानां सर्वा व्रतानि चरति । (मं. २)

" (१) तो समर्थ तीन मार्गांना मापतो. (२) भूत, वर्तमान आणि भविष्यकाळाचे भोग देतो. (३) आणि देवांचीं सर्व व्रतें चालवितो. " हीं त्याचीं कार्यें आहेत.

(१) **तीन मार्ग हे आहेत**— सत्व, रज आणि तम या प्रकृतिप्रमाणें कोणी कोणत्या मार्गानें जावें व कसें जावें त्याची कल्पना त्याला बरोबर असते आणि तोच या तिन्ही मार्गांचें मोजमाप जाणतो.

(२) तिन्ही काळांतील दोहन— भूत, वर्तमान आणि भविष्यकाळ या तिन्ही काळांत जो दोहन करतो आणि पूर्वोक्त मार्गावर चालणाऱ्यांना जे आवश्यक भोग आहेत ते देतो. ज्याला जसा भोग देणें योग्य आहे, ते अनुकूल भोग त्यांना देऊन त्यांची उन्नति करतो.

(३) **देवांच्या व्रतांना चालवितो**— देवांचीं व्रतें हीं आहेत— सूर्याचें व्रत प्रकाश देण्याचें, जलाचें व्रत वाहण्याचें, वायूचें व्रत वाळविण्याचें, वगैरे बाह्य देवांचीं व्रतें आहेत. शरीराच्या आंतील देवांचीं व्रतें म्हणजे, चक्षुचें पहाण्याचें व्रत, कर्णाचें ऐकण्याचें व्रत, प्राणांचें जीवन देण्याचें व्रत. हीं सर्व व्रतें आत्म्याच्या शक्तीनें होत राहिलीं आहेत.

याचा विचार केल्यानें, त्या परमात्म्याचा महिमा लक्षांत येतो.

मनुष्यांतील देव

हा देव–जो विश्वरूपी शकट चालवितो आणि सर्व भुवनांत व्याप्त आहे–तो मनुष्यांत प्रगट होतो. पहा—

इन्द्रो मनुष्येषु अन्तः जातः । (मं. ३)

" हा इंद्रदेव मनुष्यामध्यें प्रगट होतो. " मनुष्याच्या हृदयांत तो प्रगट होतो. मनुष्य आपल्या हृदयांत त्याला पाहतो, व त्याचा अनुभव घेवूं शकतो. विश्वाचा चालक ईश्वर मनुष्याच्या हृदयांत प्रकाशित होतो. केवढें हें माणसामध्यें सामर्थ्य आहे कीं, विश्वाचा संचालक त्याच्या हृदयांत वास करतो आणि तेथें प्रगट होतो ! मनुष्यानें स्वतःमधील ही शक्ति ओळखली पाहिजे. या ज्ञानाचें फळ खालीलप्रमाणें सांगितलें आहे—

(१) अनडुहः विजानन्, (२) यः न अश्नीयात्
(३) सः सुप्रजाः सन् उत–आरे न सर्पत् । (मं. ३)

" (१) या विश्वरूपी शकटाला चालविणाऱ्याला जो जाणतो, (२) तो स्वतःसाठीं स्वार्थानें भोग भोगीत नाहीं, त्याचें कारण (३) तो सुप्रजा प्राप्त करतो आणि देहपातानंतर इकडे तिकडे भटकत नाहीं. ' अर्थात् सरळ स्वतःच्या अमृतधामाला जातो. यांत प्रथम परमेश्वराला जाणणें आणि नंतर स्वार्थ सोडून परोपकारांत जीवन समर्पण करणें, या दोन्ही ' ज्ञान आणि कर्म ' यांचें यथावत् अनुष्ठान केल्यानें तिसऱ्या मंत्रभागांत सांगितलेली सिद्धि प्राप्त होऊं शकते. हा ईश्वर जीवात्म्याला पवित्र करून कसा उद्धरून नेतो, हें चतुर्थ मंत्रांत क्रमानें सांगितलें आहे.

(१) पुरस्तात् पवमानः, (२) एनं आप्याययति ।
(३) सुकृतस्य लोके अनड्वान् दुहे ॥ (मं. ४)

' (१) पहिल्यापेक्षां पवित्र करून (२) ईश्वर त्याला वाढवितो, पुष्ट करतो आणि त्याची वृद्धि करतो, (३) पुण्यलोकांत तो त्याला तृप्तीचें साधन देतो. '

परमेश्वराचा उपासक झाल्यानंतर त्याला पवित्र होण्याचा पहिला लाभ मिळतो, त्याच्या आत्मिक बळाची वृद्धि होणें हा त्याला दुसरा लाभ होतो आणि पुण्यलोक मिळून तेथें विविध प्रकारची तृप्ति प्राप्त होणें हा तिसरा लाभ आहे. परमात्मोपासनेचें हें फळ आहे. याप्रमाणें पवित्र होऊन जीवात्मा उन्नत होतो आणि आपल्या निजधामाला जातो. याप्रमाणें परमात्मा सहाय्यकर्ता आहे. त्यामुळें म्हटलें आहे कीं—

विश्वजित्, विश्वभृत्, विश्वकर्मा । (मं. ५)

" तो (**परमेश्वर**) विश्वाला जिंकणारा, विश्वाचा पालक पोषक आणि विश्वासंबंधीं सर्व कार्यें करणारा आहे " त्यामुळें उपासक निर्भय होऊन त्याच्या सहाय्यानें पुढें जातो आणि आपल्या प्राप्तव्य-स्थानाला पोहोंचतो. ज्या ठिकाणीं त्याला पोहोंचावयाचें आहे तें स्थान अमृतकेंद्र आहे. तो जीवात्मा कोणत्या अनुष्ठानानें तेथें पोहोंचतो या विषयींचा उपदेश सहाव्या मंत्रांत पाहण्यासारखा आहे—

व्रतेन तपसा यशस्यवः सुकृतस्य लोकं गेष्म (मं. ६)

" व्रत आणि तपानें यश प्राप्त करतां करतां, पुण्यलोक प्राप्त करूं. " या मंत्रभागांत व्रतपालन व तपाचें आचरण, हीं यश आणि आत्मोन्नतीचीं साधनें आहेत असें स्पष्ट सांगितलें आहे. विचार केला असतां कळून येईल कीं हें तर इहपरलोकांतील

सद्गति प्राप्त करण्याचें उत्तम साधन आहे. हें साधन केल्यानें—

शरीरं हित्वा अमृतस्य नाभिं स्वः आरुरुहुः ।
(मं. ६)

" शरीरत्यागानंतर आत्मप्रकाशानें युक्त होऊन अमृतकेंद्रांत वर चढतात. " हा आहे तपाचा प्रभाव आणि व्रतपालनाचें महत्व ! वाचक हें महत्व ओळखून त्या मार्गानें जाऊन स्वतःची उन्नति प्राप्त करूं शकतील.

सातव्या मंत्रांत " इन्द्र, अग्नि, प्रजापति, परमेष्ठी, विराट् " इत्यादि नांवें एकाच देवाचीं आहेत असें सांगितलें आहे. ती गोष्ट ऋग्वेदांत (१.१६४.४६) सुद्धां अन्य रीतीनें सांगितली आहे. हाच ईश्वर सर्वव्यापक आहे, तो सर्वांना बलवान् बनवितो, सर्वांचें धारण करतो, अर्थात् तो प्रत्येकाला त्याचा आधार आहे आणि प्रत्येकाला तो प्राप्य आहे. तो कुणासही अप्राप्य नाहीं.

आठव्या मंत्राचा आशय असा आहे, कीं ईश्वर सर्वांच्यामध्यें असल्यानें तोच सर्वांचा मध्य आहे; म्हणून सर्व विश्व हें समान प्रमाणांत त्याच्या दोहों बाजूस आहे. ही गोष्ट सहज सिद्ध होते. ज्याप्रमाणें शकटाचा मध्यदंड दोन्ही चाकांच्या मधून जातो, आणि त्याच्या पुढेंमागें रथाचे सहजच दोन भाग होतात, त्याप्रमाणें हा ईश्वर या विश्वशकटाचा मध्यदंड आहे आणि हें विश्व त्याच्या चारी बाजूंना आहे.

सप्तऋषि

" या अविनाशी ईश्वराचीं वा आत्म्याचीं सात दोहनपात्रें आहेत आणि त्यांत सप्तप्रवाह दोहण्यांत येतात. त्यांना सप्तऋषी या नांवानें ओळखण्यांत येतें. " (मं. ९)

हे नवव्या मंत्राचें कथन आहे. हीं सात दोहनपात्रें अर्थात् दूध दोहण्याचीं पात्रें म्हणजे आमचीं सात ज्ञानेंद्रियें आहेत. दोन डोळे रूपाचें दोहन करतात, दोन कर्ण शब्दरसरूपी दुधाचें दोहन करतात, दोन नाकपुड्या सुवासाचें दोहन करतात आणि एक मुख मधुरादि रसांचें ग्रहण करतें. प्रकृतिमातेचीं हीं सात दूध काढण्याचीं दोहनपात्रें आहेत. हाच रस मनुष्यमात्र पीत असतो आणि पुष्ट होऊन उन्नति प्राप्त करतो. हेच सात ऋषि आहेत—

सप्त ऋषयः प्रतिहिताः शरीरे
सप्त रक्षन्ति सदमप्रमादम् ॥ (यजु. ३४-५५)

" प्रत्येक शरीरांत सप्तऋषी राहिलेले आहेत. ते सात या शरीररूपी घराचें प्रमाद न करतां रक्षण करीत असतात. " ही गोष्ट वरील मंत्रांत सांगितलेली आहे. या ठिकाणीं जीं सात दोहनपात्रें सांगितलेली आहेत, तेच हे सात ऋषी होत; अथवा हे सप्त ऋषी या दोहनपात्रांमध्यें त्या परम मातेचें दूध दोहन करतात, यांत कांहीं संशय नाहीं. सर्वसाधारण जे सप्त ऋषी समजले जातील त्यांचीं नांवें वर सांगितलीं आहेत; परंतु आमच्या मनांत एक गोष्ट खटकते ती ही कीं, या ठिकाणीं दोन डोळे, दोन कान, नाकपुड्या हे सहा ऋषी सांगितले आहेत, परंतु वस्तुतः हे दोन डोळे एकाच प्रकारचें ज्ञान प्राप्त करतात, आणि म्हणून त्यांना भिन्न समजणें योग्य नाहीं. जरी संख्येनें हे सात होत असले, तथापि वास्तविक त्यांना सात मानणें योग्य होणार नाहीं. कारण मूळ मंत्रांत सात ऋषी भिन्न मानलेले आहेत, आणि त्यांचीं दोहनपात्रेंही सात भिन्न मानलीं आहेत; अर्थात् त्यांत दोहन केलेलें दूधही सात भिन्न प्रकारचें असलें पाहिजे. ही गोष्ट वर सांगितलेल्या सप्तपात्रांनीं व सप्तऋषींनीं सिद्ध होत नाहीं; म्हणून यांना दुसऱ्या ठिकाणीं शोधलें पाहिजे.

आमच्या मताप्रमाणें सप्तऋषी आणि त्यांचीं सात दोहनपात्रें खालीलप्रमाणें अशीं आहेत.

१ **आत्मा—** हा ऋषी परमात्म्यांतून ' आनंद ' रूपी दूध स्वतःमध्यें दोहन करतो.

२ **बुद्धि— (संज्ञान) —** हा ऋषी परमात्म्यांतून " चित् " अथवा वि-ज्ञान रूपी दूध स्वतःमध्यें दोहन करतो.

३ **अहंकार—** हा ऋषी परमात्म्यांतून ' अहं ' भावरूपी दूध दोहन करतो.

४ **मन—** हा ऋषी परमात्म्यांतून ' मनन ' रूप दूध दोहन करतो.

५ **प्राण—** हा ऋषी परमात्म्यांतून ' जीवन ' रूपी दूध दोहन करतो.

६ **ज्ञानेंद्रियें (संघ) —** हा ऋषी परमात्म्यांतूनच ' विषयज्ञान ' रूपी दूध दोहन करतो.

७ **कर्मेंद्रियें—** हा ऋषी परमात्म्यांतून ' कर्मशक्ति ' रूप दूध दोहन करतो.

हे सप्तऋषी एकमेकांहून भिन्न आहेत. त्यांच्यापाशीं दोहनपात्रेंही विभिन्न आहेत. त्याचप्रमाणें या प्रत्येकानें दोहन केलेलें दूधही भिन्न आहे, व त्या दुधाच्या सेवनानें प्राप्त होणारी पुष्टी ही भिन्नभिन्न प्रकारची आहे; म्हणून हे सातऋषी व हीं सात दोहनपात्रें आहेत असें मानणें येथें जास्त उचित आहे. वाचकांनीं या बाबतींत जास्त विचार करावा व योग्य बोध प्राप्त करून घ्यावा.

बैल आणि शेतकरी

दहाव्या मंत्रांत बैल आणि शेतकऱ्याच्या रूपकानें पुष्कळ बोधप्रद उपदेश दिला आहे. त्याचा स्पष्ट अर्थ याप्रमाणें आहे.– ' पायानें भूमीवर चालतो, जंघापासून अन्न उत्पन्न करतो, परिश्रमापासून रस बनवितो. याप्रमाणें बैल आणि शेतकरी फार मोठें कार्य करतात.' ही गोष्ट लौकिक शेतांत स्पष्ट दिसते, पण या मंत्रांत केवळ एवढेंच सांगण्याचा मुख्य उद्देश नाहीं. कारण या मंत्रांत ज्या शेतकऱ्याचें वर्णन केलें आहे, तो ' क्षेत्र–ज्ञ ' अर्थात् जीवात्मा आहे. भगवद्गीतेंत त्याचें नांव ' क्षेत्रज्ञ ' असेंच दिलेलें आहे. शेतीचें उत्तम ज्ञान असलेला शेतकरी ज्याप्रमाणें शेतापासून उत्तम फायदा मिळवितो, त्याप्रमाणें या शरीररूपी कार्यक्षेत्राला यथायोग्य जाणणारा हा जीवात्मारूपी शेतकरी या शरीररूपी कार्यक्षेत्रांत शुभ विचाररूपी शेती करून पुष्कळ फायदा मिळवितो. त्याच्या शेतींत नांगर चालविणें वगैरे सहाय्य करणारा परमेश्वर आहे, ज्याचें वर्णन याच सूक्तांत 'अनड्वान्' शब्दानें केलेलें आहे. याप्रमाणें हें त्याचें क्षेत्र आहे आणि ही त्याची शेती आहे. शेतकरी या शेतीचा उपभोग करणारा आहे. वाचकांनी या उत्तम रूपकाचा योग्य विचार करून बोध प्राप्त करून घ्यावा.

बारा रात्री

अकराव्या मंत्रांत ' प्रजापतीचें व्रत करण्याच्या बारा रात्री आहेत, ' असें सांगितलें आहे. रात्र अंधकाराची द्योतक आहे आणि अंधकार अज्ञानाचा वाचक आहे. त्यामुळें येथें बारा घोर रात्रींचें तात्पर्य बारा प्रकारचीं गाढ अज्ञानें असें आहे. प्रत्येकांत हें अज्ञान आहे आणि जसजसें हें अज्ञान दूर होत जातें, तसतशी मनुष्याची योग्यता वाढते. ज्यावेळीं बारा प्रकारचें अज्ञान दूर होतें; त्यावेळीं पुरुष विशुद्धात्मा होतो व मोक्षाचा अधिकारी बनतो. (१) परमात्मा, (२) जीवात्मा, (३) बुद्धि (४) अहंकार (५) मन, (६) प्राण, (७) ज्ञानेंद्रियें, (८) ज्ञानेंद्रियांचे विषय, (९) कर्मेंद्रियें, (१०) कर्मेंद्रियांचे विषय, (११) शरीर, (१२) विशाल जगत्. या बारा क्षेत्रासंबंधीं बारा अज्ञानें, मिथ्या ज्ञानें वा विपरीत ज्ञानें जें कांहीं म्हणता येईल तें प्रत्येक मनुष्यांत असतें. तीं सर्व अज्ञानें दूर झालीं पाहिजेत आणि त्या विषयांमध्यें ज्ञान, विज्ञान, संज्ञान आणि प्रज्ञान प्राप्त झालें पाहिजे. प्रत्येक मनुष्यानें विचार करून पहावें कीं, स्वतःमध्यें या अज्ञानांमधून कोणतें अज्ञान किती आहे आणि कोणतें विज्ञान किती प्राप्त करण्यांत आलें आहे. याप्रमाणें आत्मनिरीक्षणानें आपल्याला कोणता मार्ग, किती आक्रमावयाचा आहे हें ध्यानांत येईल. या मंत्रानें ही एक प्रकारची परीक्षाच सांगितलेली आहे. या मंत्राचा वाचकांनीं ह्या दृष्टीनें विचार करून पहावा. त्यामुळें पुष्कळ आत्मसुधार होणें शक्य आहे.

व्रत

ज्या व्रतानें वरील बारा प्रकारचें अज्ञान दूर होऊं शकतें, तें व्रत या अकराव्या मंत्राच्या उत्तरार्धांत सांगितलें आहे.

यः ब्रह्म उपवेद तत्० व्रतम् । (मं. ११)

" जें ज्ञान प्राप्त करतो तें त्याचें व्रत आहे. " हेंच व्रत माणसाची उन्नति करतें. ज्ञान प्राप्त करणें अर्थात् पूर्वोक्त बारा प्रकारचें अज्ञान आणि मिथ्या ज्ञान दूर करण्यासाठीं बारा प्रकारचें ज्ञान आणि विज्ञान प्राप्त करणें. हें व्रत पालन केल्यानें अज्ञानरूपी मळ धुवून जातो आणि व्रती शुद्ध होत जातो म्हणून हें व्रत जितकें शक्य होईल तेवढें प्रत्येकानें केलें पाहिजे.

बाराव्या मंत्रांत या अनुष्ठानाचें स्वरूपच सांगितलेलें आहे.– ' मी सकाळीं, दुपारीं आणि संध्याकाळीं त्याचें दोहन करतों. हें दोहन काय आहे? त्याचीं दोहनपात्रें कोणतीं आहेत? आणि दोहन करणारे कोण आहेत? याचें वर्णन या सूक्तांत पूर्वी येऊन गेलें आहे. हेंच व्रत आहे. परमात्म्याच्या उपासनेनें ज्ञान आणि आनंद प्राप्त करणें, हेंच दोहन होय. जो जितक्या प्रमाणांत हें दूध प्राशन करील, तितक्या प्रमाणांत तो पुष्ट होईल. ' अविनाशी तत्वापासून हें दोहन होतें ' असें जो जाणतो त्यालाच या व्रतानें लाभ होऊं शकतो. हें अंतिम कथन निःसंदेह सत्य आहे. वाचकांनीं या सूक्ताचें मनन करून लाभ करून घ्यावा.

सर्व-साक्षी प्रभु

कांड ४, सूक्त १६

(ऋषिः - ब्रह्मा । देवताः - वरुणः, सत्यानृतान्वीक्षणम्)

बृहन्नेषामधिष्ठाता अन्तिकादिव पश्यति ।
य स्तायन्मन्यते चरन्त्सर्वं देवा इदं विदुः ॥ १ ॥
यस्तिष्ठति चरति यश्च वञ्चति यो निलायं चरति यः प्रतङ्कम् ।
द्वौ संनिषद्य यन्मन्त्रयेते राजा तद्वेद वरुणस्तृतीयः ॥ २ ॥
उतेयं भूमिर्वरुणस्य राज्ञ उतासौ द्यौर्बृहती दूरेअन्ता ।
उतो समुद्रौ वरुणस्य कुक्षी उतास्मिन्नल्प उदके निलीनः ॥ ३ ॥
उत यो द्यामतिसर्पात्परस्तान्न स मुच्यातै वरुणस्य राज्ञः ।
दिव स्पशः प्र चरन्तीदमस्य सहस्राक्षा अति पश्यन्ति भूमिम् ॥ ४ ॥

अर्थ— (एषां बृहन् अधिष्ठाता अन्तिकात् इव पश्यति) यांचा महान् अधिष्ठाता अगदीं जवळच्या प्रमाणें पहातो. (यः तायत्) जो पसरवितो आणि पालन करतो, (चरन्) जो चालतो आणि चालवित असून (मन्यते) जाणतो. (देवाः इदं सर्वं विदुः) दिव्यलोक हें जाणतात (१)

(यः तिष्ठति, चरति) जो उभा राहतो अथवा चालतो, (च यः वंचति) आणि जो फसवितो, (यः निलायं चरति, यः प्रतंकं) जो गुप्त व्यवहार करतो अथवा प्रगट व्यवहार करतो, त्याचप्रमाणें (द्वौ संनिषद्य यत् मंत्रयेते) दोघे मिळून एक ठिकाणीं बसून जो कांहीं विचार करतात (तत्) त्या सर्वांना (तृतीयः राजा वरुणः वेद) तिसरा असा राजा वरुण जाणतो. (२)

(इयं भूमिः) ही पृथ्वी, (उत उत असौ बृहती दूरं अन्ता द्यौः) आणि अतिशय दूर अंतरावर दिसणारा तो द्युलोक आहे हे सर्व (वरुणस्य राज्ञः) वरुण राजाचे आहेत. (उतो समुद्रौ वरुणस्य कुक्षी) आणि हे दोन्ही समुद्र वरुणाच्या दोन्ही कांखा आहेत, (उत अस्मिन् अल्प उदके निलीनः) आणि तो या अल्पशा उदकांतही विलीन झालेला आहे. (३)

(उत यः परस्तात् द्यां अतिसर्पात्) आणि जो दूर द्युलोकाच्या पलीकडेही चालून जातो (सः वरुणस्य राज्ञः न मुच्यातै) तोहि वरुण राजाच्या शासनांतून सुटूं शकत नाहीं. (अस्य दिवः स्पशः इदं प्रचरन्ति) या दिव्य देवाचे दूत या जगांत संचार करतात, ते (सहस्र-अक्षाः भूमिं अति पश्यन्ति) हजारों डोळ्यांनीं भूमीचें विशेष निरीक्षण करतात. (४)

भावार्थ— या संपूर्ण लोकलोकांतराचा एक मोठा अधिष्ठाता आहे व तो या सर्वांचें निरीक्षण प्रत्येकाच्या जवळ राहून केल्यासारखें करतो. तो सर्वांचा विस्तार करतो, आणि सर्वांचें रक्षण करतो. सर्वांना चालवितो, सर्वांत संचार करतो आणि सर्वांना जाणतो. त्या परमेश्वराचे हे गुण सर्व ज्ञानी लोक जाणतात. (१)

कोणी मनुष्य उभा असेल, कोणी चालत असेल, कोणाला फसवित असेल, कोणी घराच्या आंतील भागांत लपून कांहीं करीत असेल, अथवा कोणी उघड्या जागेवर कांहीं कर्म करीत असेल, अथवा दोन माणसें एकांतांत बसून आपसांत गुप्त विचार करीत असतील, तरी या सर्व गोष्टींना तो परमेश्वर त्याच वेळीं जाणतो. (२)

ही पृथ्वी आणि हा महान् द्युलोक व त्याच्यामधले सर्व पदार्थ त्याच प्रभूचे आहेत. हे महासमुद्र त्याच्या कांखेंत आहेत. तो ज्याप्रमाणें मोठ्या समुद्रांत आहे त्याप्रमाणें पाण्याच्या लहानांत लहान जलबिंदूंतही आहे. (३)

जर कोणी कुकर्म करून द्युलोकाच्याही पलीकडे कोठें पळून गेला, तरीही त्या प्रभूच्या शासनांतून तो सुटावयाचा नाहीं; कारण त्याचे दिव्य गुप्तचर या जगांत संचार करीत असतात आणि ते आपल्या हजारों डोळ्यांनीं या पृथ्वीचें निरीक्षण करीत असतात. (४

सर्वं तद्राजा वरुणो वि चष्टे यदन्तरा रोदसी यत्परस्तात् ।
संख्याता अस्य निमिषो जनानामक्षानिव श्वघ्नी नि मिनोति तानि ॥ ५ ॥
ये ते पाशा वरुण सप्तसप्त त्रेधा तिष्ठन्ति विषिता रुशन्तः ।
छिनन्तु सर्वे अनृतं वदन्तं यः सत्यवाद्यति तं सृजन्तु ॥ ६ ॥
शतेन पाशैरभि धेहि वरुणैनं मा ते मोच्यनृतवाङ् नृचक्षः ।
आस्तां जाल्म उदरं श्रंसयित्वा कोश इवाबन्धः परिकृत्यमानः ॥ ७ ॥
यः समाम्यो३ वरुणो यो व्याम्यो३ यः संदेश्यो३ वरुणो यो विदेश्यः ।
यो दैवो वरुणो यश्च मानुषः ॥ ८ ॥
तैस्त्वा सर्वैरभि ष्यामि पाशैरसावामुष्यायणामुष्याः पुत्र ।
तानु ते सर्वाननुसंदिशामि ॥ ९ ॥

अर्थ— (**राजा वरुणः तत् सर्वं विचष्टे**) वरुण राजा त्या सर्वांना पहातो. (**यत् रोदसी अन्तरा यत् परस्तात्**) जे द्युलोक आणि पृथ्वीच्या मधोमध आहे आणि जें यांहून निराळें आहे, त्याप्रमाणें (**जनानां निमिषा अस्य संख्याताः**) मनुष्यांच्या डोळ्यांच्या उघडझापींनाही तो मोजतो (**तानि निमिनोति**) त्यांचे माप घेतो (**इव श्वघ्नी अक्षान्**) ज्याप्रमाणें एकादा जुगारी (**द्यूत खेळणारा**) फाशांचें मोजमाप करतो. (५)

हे (**वरुण**) वरुण देवा ! (**सप्त सप्त त्रेधा विषिताः**) सात सात तीन प्रकारानें बांधलेले (**ये ते रुशन्तः पाशाः तिष्ठन्ति**) जे तुझे विनाशक पाश आहेत, ते (**सर्वे अनृतं वदन्तं छिनन्तु**) सर्व असत्य बोलणाऱ्यांना बंधन करोत व छिन्नभिन्न करोत (**यः सत्यवादी तं अति सृजन्तु**) जो सत्यवादी आहे त्याला सोडून देवोत. (६)

हे (**वरुण**) ईश्वर ! (**शतेन पाशैः एनं अभिधेहि**) शेंकडों फांशांनीं याला बांध. (**अनृतवाक् ते मा मोचि**) खोटें बोलणारा तुझ्यापासून न सुटो. हे (**नृ चक्षः**) मनुष्यांना पाहणाऱ्या ! (**जाल्मः उदरं श्रंसयित्वा**) दुष्ट, नीच लोक स्वतःच्या उदराला खालीं ठेवून (**अबन्धः कोशः इव**) न बांधलेल्या कोशाप्रमाणें (**परिकृत्यमानः आस्तां**) कापलेले असे पडून राहोत. (७)

(**वरुणः यः समाम्यः**) वरुण जो समान भाव ठेवणारा आहे आणि (**यः व्याम्यः**) जो विषम भाव ठेवणारा आहे (**वरुणः यः सं-देश्यः, यः वि-देश्यः**) वरुण समान प्रदेशात राहणारा आहे आणि जो विशिष्ट प्रदेशींहि राहणारा आहे (**वरुण यः दैवः यः च मानुषः**) वरुण जो देवांचा संबंधीं आणि जो मनुष्यांचाही संबंधीं आहे. (८)

हे (**अमुष्यायण**) अमुक पित्याच्या पुत्रा ! हे (**अमुष्याः पुत्र**) अमुक मातेच्या पुत्रा ! (**असौ**) असा तू (**त्वा**) तुला (**तैः सर्वैः पाशैः अभिष्यामि**) त्या सर्व पाशांनीं मी बंधन करतों आणि (**तान् सर्वान् उ ते अनुसंदिशामि**) त्या सर्वांना तुझ्यासाठीं प्रेरित करतों. (९)

भावार्थ— जें कांहीं या पृथ्वी आणि द्युलोकाच्या मध्यभागीं आहे, त्या सर्वांचें निरीक्षण प्रभु स्वतःच करीत असतो. फार काय सांगावें ! तो मनुष्याच्या डोळ्यांच्या पापणीच्या उघडझापी सुद्धां मोजत असतो. अर्थात् त्याला अज्ञात असें कांहींच नाहीं. (५)

जे असत्य बोलतात, त्यांना प्रभु स्वतःच्या हिंसक पाशांनीं बांधतो आणि जे सत्यवादी आहेत त्यांना मुक्त करतो. (६)

हे प्रभु ! तूं दुष्टांना तुझ्या शेकडों पाशांनीं बांधतोस. असत्यवादी तुझ्या पाशांतून सुटूं शकत नाहींत. जीं दुष्ट माणसें स्वतःच्या पोटासाठीं दुसऱ्यांना उपद्रव देतात, त्यांच्या पोटाचा नाश करून शेवटीं तूं त्यांचाही नाश करतोस. (७)

सर्वांबरोबर समभाव ठेवणारा, सर्वप्रदेशीं समान राहणारा एक दिव्य वरुणदेव अर्थात् परमेश्वर आहे. त्याचप्रमाणें विषमभाव ठेवणारा आणि लहान लहान प्रदेशीं राहणारा एक मानुष वरुण अर्थात् मनुष्यांमध्यें राहणारा जीवात्माही आहे. (८)

हे अमुक मातापित्याच्या सुपुत्रा ! तूं उत्तम प्रकारें, सत्य व्यवहार कर, नाहींतर ज्याचें येथें वर्णन केलें आहे, त्या परमेश्वराच्या पाशांनीं तूं बांधला जाशील. (९)

सर्वसाक्षी प्रभु

सर्वांचा अधिष्ठाता प्रभु

या सूक्तांत सर्वसाक्षी, सर्वद्रष्टा, सर्वाधिष्ठाता अशा प्रभूचें वर्णन आहे. हें सूक्त इतकें सुस्पष्ट, सुबोध व भावपूर्ण आहे की, ज्याची प्रशंसा आमच्या शब्दांत होणें असंभव आहे. पहिल्या मंत्रांत सांगितलें आहे की, '•या जगाचा एक महान् अधिष्ठाता आहे. तो सर्व मनुष्यांचे व्यवहार, प्रत्येकाच्या जवळ असल्याप्रमाणें पाहत असतो.' प्रत्येकानें हें कथन ध्यानांत ठेवावें. तो परमेश्वर जें काम करतो त्याचें वर्णन या सूक्तांत प्रथम मंत्रांत खालील शब्दांत केलें आहे—

(१) **तायत्** (**ताय्-संतान-पालनयोः**) तो सर्वांचा विस्तार करतो, अर्थात् सर्वांना विस्तारण्याला वा वृद्धिंगत होण्याला अवकाश देतो, आणि सर्वांचें यथायोग्य पालन करतो. कोणतेंही न्यून पडूं देत नाहीं. ही त्याची सर्वांवर मोठी दया आहे. (मं. १)

(२) **चरन्**- तो सर्वत्र जातो, सर्व स्थानांत, सर्व ठिकाणीं त्याची प्राप्ति आहे, तो सर्वांना चालवितो, तो सर्वव्यापक आहे. (मं. १)

(३) **मन्यते**- (**मन्-ज्ञाने**) तो जाणतो, तो सर्वज्ञ आहे. (मं. १)

(४) **अन्तिकात् इव पश्यति**- जवळ असल्याप्रमाणें सर्वांचें व्यवहार यथावत् पाहतो. तो सर्वत्र व्यापक असल्यानें, सर्वांचें उत्तम प्रकारें निरीक्षण करतो. (मं. १)

(५) **अधिष्ठाता**- तो सर्वांचा मुख्य अधिष्ठाता आहे. शासक आणि प्रभु आहे. त्याच्याहून वरिष्ठ कोणी नाहीं. (मं. १)

त्याची सर्वज्ञता

"तो सर्वांचे व्यवहार जवळ राहणाऱ्याप्रमाणें पूर्णपणें पहातो." असें जें प्रथम मंत्रांत सांगितलें आहे त्याचेंच स्पष्टीकरण दुसऱ्या मंत्रानें केलें आहे. " कोणी मनुष्य कोठेंही राहिला असेल, चालत असेल, धांवत असेल, लपून गुप्तरीतीनें अथवा जाहीरपणें कांहीं कर्म करीत असेल, दोन अथवा अधिक माणसें एकान्तांत कांहीं विचार करीत असतील, तर हें सर्व त्या प्रभुला यथावत् समजतें." (मं. २) अर्थात् त्याच्यापासून गुप्त असें मनुष्य कांहींही करूं शकत नाहीं. हें त्याच्या सर्वज्ञतेचें उत्तम वर्णन आहे.

भूमि येथें आपल्या अगदीं जवळ आहे आणि द्युलोक फार दूर आहे, तथापि या सर्वांवर त्या परमेश्वराचा सारखाच अधिकार आहे. एवढ्या विशाल विश्वावर त्या एकट्याचेंच स्वामित्व आहे. तो एवढा मोठा आहे की हे सर्व समुद्र त्याच्या कांखेत मावतात. तो एवढा मोठा असतांनाही लहानांतील लहान जलबिंदूतही तो विराजमान् आहे. प्रत्येक सूक्ष्मतम अणुरेणूंनही तो पूर्णपणें व्यापक आहे. (मं. ३) हें तृतीय मंत्रांत सांगितलें आहे.

प्रबळ शासक

त्याचें शासन इतकें प्रबळ आहे कीं कोणी मनुष्य त्याच्या शासनाखालून सुटून वाटेल तेथें पळून जाईल वा द्युलोकाच्या पलीकडे जाईल, तरीही त्याच्यापासून दूर जाऊं शकत नाहीं. वाटेल तेथें गेला तरी तो त्याच्या शासनांतच राहणार. तो स्वतः सर्वांचें निरीक्षण करतो आणि त्याचे दूतही असे प्रबळ आहेत कीं त्यांची दृष्टि एकाचवेळीं सर्वांवर सारखी राहते. (४)

जें कांहीं या द्युलोकामध्यें आहे त्या सर्वांना तो परमेश्वर जाणतो. ते इतक्या मर्यादेपर्यंत कीं, तो जें पहातो त्याचें मोजमाप व संख्यागणनही करतो. प्रत्येक मनुष्याच्या पापणीची उघडझांप कितीवेळां झाली हेंही त्याच्या मोजण्यांत येतें. इतक्या सूक्ष्मतम रीतीनें तो सर्व पाहूं शकतो, जाणूं शकतो. त्याला न समजेल असें मानून कांहीं तरी करूं शकेल का ? कधींच नाहीं. (मं. ५) म्हणून सर्व मनुष्यांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं, तो परमेश्वर आमचा निरीक्षक आहे, आणि त्यामुळें त्याला स्वतःच्या सन्मुख मानूनच, नेहमीं उत्तम कर्में करून आपल्या अभ्युदय आणि निःश्रेयसाची सिद्धि प्रत्येकानें प्राप्त करून घेतली पाहिजे.

त्याचे पाश

जग, शरीर, कर्मेंद्रिय, ज्ञानेंद्रिय, मन, चित्त, बुद्धि या सात क्षेत्रांत त्याचे विविध पाश पसरलेले आहेत. प्रत्येक क्षेत्रांना अनुकूल असे त्याचे पाश आहेत. आणि सत्व, रज, तम या त्रिविध भेदानुसार, प्रत्येक क्षेत्रांत पाशही भिन्न आहेत. हे सर्व पाश "असत्य भाषण करणाऱ्यांना बंधन करतात व सत्यवाद्यांना मुक्त करतात." (मं. ६) सत्यनिष्ठेचें महत्त्व किती आहे, हें याठिकाणीं वाचकांनीं समजून घ्यावें, आणि जमेल तेवढें सत्यपालनांत तत्पर राहून आपल्या जन्माचें सार्थक करून घ्यावें, हा सातव्या मंत्राचाही असाच आशय आहे. आठव्या मंत्रांत, " दैवी वरुण आणि मानुषी वरुणा " चें वर्णन आहे. या वर्ण-

नानें वेदाची वर्णनशैली लक्षांत येईल. यासंबंधीं थोडेसें विवेचन आवश्यक आहे.

दोन वरुण

दिव्य वरुण	मानुष वरुण
१ **समास्यः**– सर्वांबरोबर समभाव ठेवणारा.	१ **व्यास्यः**– विषमभावानें पहाणारा.
२ **संदेश्यः**– समान देशांत राहणारा, अर्थात् सर्वस्थळीं समानतेनें राहाणारा.	२ **विदेश्यः**– स्थान विशेषांत रहाणारा.
३ **दैवः**– जो देवसंबंधीं आहे.	३ **मानुषः**– जो मनुष्यांच्या संबंधीं आहे.
४ **वरुणः**– जो श्रेष्ठ ईश्वर आहे.	४ **वरुणः**– जो श्रेष्ठ जीवात्मा आहे.

परमेश्वर सर्वांबरोबर समान व्यवहार ठेवणारा, सर्वस्थळीं सारखाच व्यापून रहाणारा देव आहे; आणि जीवात्मा प्रत्येकाबरोबर विषमवृत्तीनें व्यवहार करणारा आणि लहान लहान स्थळीं रहाणारा आहे. दोघेही आपापल्या क्षेत्रांत वरुणच आहेत. परंतु एकाची व्यापकता विशाल आहे, आणि दुसऱ्याची अल्प आहे. एकाच शब्दानें जीवात्मा व परमात्म्याचें वर्णन करण्याची ही वेदाची वर्णनशैली किती अपूर्व आहे हें वाचकांनीं ध्यानांत ध्यावें.

ही वेदाची वर्णनशैली आहे

अंतिम मंत्रांत मनुष्यमात्राला संदेश दिला आहे कीं, या प्रभूचे उपासक व्हा, याच्या आज्ञेंत रहा आणि सत्यपालन द्वारा त्याला अनुकूल होऊन व्यवहार करा. जे लोक याप्रमाणें वागणार नाहींत ते पाशानें बद्ध होतील. जें सत्यपालन करतील ते पाशमुक्त होतील.

भुवनांत ज्येष्ठ देव

कांड ५, सूक्त २

(ऋषिः– बृहद्दिवो अथर्वा । देवता– वरुणः)

तदिदास भुवनेषु ज्येष्ठं यतो जज्ञ उग्रस्त्वेषनृम्णः ।
सद्यो जज्ञानो नि रिणाति शत्रूननु यदेनं मदन्ति विश्व ऊमाः ॥ १ ॥
वावृधानः शवसा भूर्योजाः शत्रुर्दासाय भियसं दधाति ।
अव्यनच्च व्यनच्च सस्नि सं ते नवन्त प्रभृता मदेषु ॥ २ ॥

अर्थ— (**तत् इत् भुवनेषु ज्येष्ठं आस**) तो निश्चयानें भुवनांत श्रेष्ठ ब्रह्म होता (**यतः उग्रः त्वेष नृम्णः जज्ञे**) ज्यांपासून उग्र तेजोबलानें युक्त असा सूर्य उत्पन्न झाला. हा (**सद्यः जज्ञानः शत्रून् नि रिणाति**) तत्काल प्रगट होतांच शत्रूंचा नाश करतो. (**यत् एनं विश्वे ऊमाः अनुमदन्ति**) यामुळें त्याला प्राप्त करून सर्व संरक्षक हर्षित होतात. (१)

(**शवसा वावृधानः भूरि ओजाः शत्रुः**) बलानें वाढणारा महाबलवान् शत्रु (**दासाय भियसं दधाति**) दासालाच भय देतो. येथें (**अव्यनत् च व्यनत् च सस्नि**) प्राणरहित आणि प्राणयुक्त दोन्ही जवळ जवळ राहिले आहेत, आणि (**ते प्रभृता मदेषु सं नवन्त**) ते पोषित होऊन आनंदानें स्तुति करीत रहातात. (२)

भावार्थ— संपूर्ण भुवनांत तेंच श्रेष्ठ तत्व आहे कीं, ज्यापासून सूर्यासारखे तेजस्वी गोल निर्माण होतात. तें प्रगट झाल्याबरोबरच सर्व अंधकार दूर होतो. त्यामुळें त्याला पाहूनच संरक्षक लोक निर्भय झाल्यामुळें आनंदित होतात. (१)

अत्यंत बलवान् शत्रु दासवृत्तीच्या लोकांच्या अंतःकरणांतही भय उत्पन्न करतात. (वीरवृत्तीचे लोक शत्रूंना कधींही भीत नाहींत.) या जगांत प्राणरहित आणि प्राणवान् हे दोघेही एकमेकांच्या आश्रयानें रहातात आणि ते परस्परांच्या सहाय्यानें परिपुष्ट होऊन आनंदित होतात. (अर्थात् विभक्त झाल्यावर ते क्षीण होतात.) (२)

त्वे क्रतुमपि पृञ्चन्ति भूरि द्विर्यदेते त्रिर्भवन्त्यूमाः।
स्वादोः स्वादीयः स्वादुना सृजा समदः सु मधु मधुनाभि योधीः ॥ ३ ॥
यदि चिन्नु त्वा धना जयन्तं रणेरणे अनुमदन्ति विप्राः।
ओजीयः शुष्मिन्त्स्थिरमा तनुष्व मा त्वा दभन्दुरेवासः कशोकाः ॥ ४ ॥
त्वया वयं शाशद्महे रणेषु प्रपश्यन्तो युधेन्यानि भूरि।
चोदयामि त आयुधा वचोभिः सं ते शिशामि ब्रह्मणा वयांसि ॥ ५ ॥
नि तद्दधिषेऽवरे परे च यस्मिन्नाविथावसा दुरोणे।
आ स्थापयत मातरं जिगत्नुमत इन्वत कर्वराणि भूरि ॥ ६ ॥

अर्थ— (यत् एते ऊमाः) जेव्हां हे रक्षक (त्वे अपि क्रतुं भूरि पृञ्चन्ति) तुझ्यांतही स्वतःची बुद्धि अनेक प्रकारानें स्थापित करतात, तेव्हां (द्विः त्रिः भवन्ति) दुप्पट, तिप्पट होतात. (स्वादोः स्वादीयः स्वादुना सं सृज) स्वादिष्टाहूनही जास्त मधुर रसाला मधुराशीं मिळवून, आणि (अदः सुमधु मधुना समभि योधीः) त्या मधुर रसांना मधुरतेबरोबर प्राप्त होवोत. (३)

हे (शुष्मिन्) बलवान् ! (चित् नु) निश्चयानें (रणे रणे धना जयन्तं त्वा) प्रत्येक युद्धांत धन जिंकणाऱ्या तुला प्राप्त होऊन (यदि विप्राः अनुमदन्ति) जर ज्ञानी लोक आनंदित होतील तर त्यांचेसाठीं (स्थिरं ओजीयः आतनुष्व) स्थिर असें बल पसरव. (दुरेवासः कशोकाः त्वा मा दभन्) दुराचारी आणि शोक करविणारे (अर्थात् दुष्ट) तुला न जिंकोत. (४)

(भूरि युधेन्यानि प्रपश्यन्तः) पुष्कळ युद्धांत प्राप्त झालेल्या धनांना पाहून (वयं रणेषु त्वया शाशद्महे) आम्ही सर्व युद्धांत तुझ्याबरोबर राहून शत्रूचा नाश करूं (ते आयुधा वचोभिः चोदयामि) तुझ्या शस्त्रांना वचनद्वारां चालवितों आणि (ते वयांसि ब्रह्मणा सं शिशामि) तुझ्या गतींना ज्ञानानें मी तीक्ष्ण बनवितों. (५)

(अवरे परे च) लहान आणि मोठे दोघांना (यस्मिन् दुरोणे) ज्या घरांत (नि दधिषे) धारण करतो आणि तेथें (तत् अवसा अविथ) त्याच्या रक्षकशक्तीनें रक्षण करतो, त्या (जिगत्नुं मातरं आस्थापयत) प्रगतिशील मातेला स्थापित करून (अतः भूरि कर्वराणि इन्वत) त्या योगें पुष्कळ कर्में पार पाडो. (६)

भावार्थ— सर्व रक्षक ज्यावेळीं परमात्म्यांत स्वतःच्या बुद्धीचा संयोग करतात, त्यावेळीं ते दुप्पट आणि तिप्पट बळ प्राप्त करतात. ते स्वतः मधुर रसापेक्षांही अधिक मधुर होऊन त्यांतही अधिक माधुर्य उत्पन्न करतात. (३)

प्रत्येक युद्धांत विजय प्राप्त करून संपत्ति मिळविणाऱ्या वीरांना ज्ञानी लोक अनुमोदन देवोत; आणि हे दोघेही मिळून स्थिर बळ प्रसृत करोत. दुष्ट दुराचारी लोक सज्जनांना कधींही पराभूत न करोत. (४)

युद्धांत प्राप्त झालेल्या धनांना पाहून आम्ही सर्व तुझ्यासारख्या उत्तम वीराबरोबर राहून शत्रूचा नाश करूं. तुझ्या शस्त्रांना आमच्या वक्तृत्वानें आम्ही उत्तेजित करून चालवूं आणि तुझ्या हालचालींना ज्ञानानें आम्ही उत्तेजित करूं. (५)

लहान मोठे सर्व एकाच घरांत राहिल्यासारखे राहूं लागतील तेव्हां बल वाढून त्यांचें रक्षण होईल. सर्व लोक स्वतःच्या मनांत स्वतःच्या विजयी मातृभूमीची स्थापना करोत, ज्यायोगें ते पुष्कळ कर्में करूं शकतील. (६)

*

स्तुष्व वर्ष्मन्पुरुवर्त्मानं समृभ्वाणमिनतममाप्तमाप्त्यानाम् ।
आ दर्शति शवसा भूर्योजाः प्र सक्षति प्रतिमानं पृथिव्याः ॥ ७ ॥
इमा ब्रह्म बृहद्दिवः कृणवदिन्द्राय शूषमग्रियः स्वर्षाः ।
महो गोत्रस्य क्षयति स्वराजा तुरश्चिद्विश्वमर्णवत् तपस्वान् ॥ ८ ॥
एवा महान्बृहद्दिवो अथर्वावोचत्स्वां तन्व१मिन्द्रमेव
स्वसारौ मातरिभ्वरी अरिप्रे हिन्वन्ति चैने शवसा वर्धयन्ति च ॥ ९ ॥

अर्थ— हे (वर्ष्मन्) बलवाना ! (पुरुवर्त्मानं ऋभ्वाणं) पुष्कळ मार्गांना, फार तेजस्वी (इनतमं आप्त्यानां आप्तं) श्रेष्ठ आणि आप्तपुरुषांमधील आप्ताचीच (स-स्तुष्व) स्तुति कर ! (भूरि-ओजाः शवसा आदर्शति) महाबलवान् बलानें आदर्शभूत होतो आणि (पृथिव्याः प्रतिमानं प्र सक्षति) भूमीच्या समानतेला प्राप्त करतो. (७)

(अग्रियः स्वः-साः बृहद्दिवं) प्रथम आत्मप्रकाशानें युक्त बृहद्दिव अर्थात् महान् तेजस्वी अशा ऋषीनें (शूषं इमा ब्रह्म) बलयुक्त असें हें स्तोत्र (इन्द्राय कृणवत्) प्रभुसाठीं केलें. (महः गो+त्रस्य स्वराजा क्षयति) तो महान् गोरक्षक राष्ट्राचा स्वाधीन राजा होऊन राहातो. (तुरः तपस्वान् चित् विश्वं अर्णवत्) वेगवान् तपस्वी निःशंक होऊन विश्वांत भ्रमण करतो. (८)

(महान् बृहद्दिवः अथर्वा) मोठ्या महातेजस्वी योगी ऋषीनें (स्वां तन्वं इन्द्रं एव अवोचत) आपल्या शरीरांत [illegible] इन्द्रालाही हें स्तोत्र सांगितलें (मातरि+भ्वरी स्वसारौ) मातृभूमींत पोषण करणाऱ्या दोन बहिणी दोन [illegible] (च अ-रिप्रे एने) ज्या निर्दोष आहेत त्या दोघींना (शवसा हिन्वन्ति) बळानें प्रेरित करतात (वर्धयन्ति च) आणि वाढवितात. (९)

भावार्थ— अनेक मार्गांनीं उन्नति करणाऱ्या तेजस्वी, श्रेष्ठ आणि आप्त पुरुषांची स्तुति करा. ते महाबलवान् स्वतःच्या बळानें आदर्शभूत बनवितात, आणि ज्याप्रमाणें भूमि समानतेनें सर्वांना आधार देते, त्याप्रमाणें सर्वांना आधार देतात. (७)

आत्मप्रकाशानें युक्त तेजस्वी असे ज्ञानी लोक परमेश्वराची पुष्कळ स्तुति करतात, अर्थात् त्याच्या गुणाचें वर्णन करतात. ते राष्ट्राच्या स्वाधीन राजे होऊन वेगशील आणि तेजस्वी होऊन संपूर्ण विश्वांत आपला प्रभाव वाढवितात. (८)

अत्यंत तेजस्वी योगी आणि ज्ञानी लोक आपल्या शरीरांत राहाणाऱ्या आत्म्याचें स्तोत्र करतात. मातृभूमींत राहणाऱ्या दोन बहिणी (अर्थात् मातृभाषा आणि मातृसभ्यता) मातृभूमीचें भरणपोषण करीत निर्दोष होऊन आपल्या सामर्थ्यानें सर्वांना प्रेरित करून त्यांची वृद्धि करतात. (९)

भुवनांत ज्येष्ठ देव

सूक्ताचें वैशिष्ट्य

हें सूक्त जरी मुख्यतः सर्वश्रेष्ठ परमात्म्याचें वर्णन करित आहे आणि त्याच्या प्राप्तीचा उपाय दाखवित आहे, तथापि श्लेषालंकारानें राज्यशासनविषयक आणि इतर अभ्युदयविषयक महत्त्वपूर्ण गोष्टींचाही त्याबरोबरच त्यांत उपदेश देत आहे. या कारणानें हें सूक्त ज्याप्रमाणें संसारी लोकांना लाभदायक आहे, त्याप्रमाणें परमार्थाकरितां यत्न करणाऱ्या करितांही बोधकर आहे. या सूक्तांत प्रायः प्रत्येक मंत्रांत श्लेषार्थ असल्यानें हें सूक्तही पूर्व सूक्ताप्रमाणें अत्यंत क्लिष्ट आणि दुर्बोध झालें आहे. तरीही त्याचें मनन करण्यानें जे विचार मनांत आले आहेत ते येथें देत आहोंत.

ज्येष्ठाचें लक्षण

पहिल्या मंत्रांत ज्येष्ठाचीं तीन लक्षणें सांगितलेलीं आहेत. तीं

लक्षणें आपण प्रथम येथें पाहूं—

(१) **यतः उग्रः त्वेष-नृम्णः जज्ञे**- जेथून उग्र तेज उत्पन्न होतें आणि ज्याच्या योगानें तेजस्विता वाढते. (मं. १)

(२) **सद्यः जज्ञानः शत्रून् निरिणाति**- उत्पन्न होतांक्षणींच शत्रूंना दूर करतो. कार्यांच्या आरंभींच वैऱ्यांना पराजित करतो. (मं. १)

(३) **विश्वे ऊमाः एनं अनुमदन्ति**- सर्व संरक्षक ज्याला अनुकूळ राहून आनंदित होतात. ज्याच्याबरोबर आनंदानें राहून सर्व संरक्षक आपल्या रक्षणाचें कार्य उत्तम प्रकारें करतात. (मं. १)

(४) **तत् भुवनेषु ज्येष्ठं आस**- तो निःसंदेह भुवनांत श्रेष्ठ आहे. ज्याच्यांत पूर्वोक्त तीन लक्षणें संगत होत आहेत, तो सर्वांत श्रेष्ठ आहे असें म्हटलें पाहिजे. (मं. १)

सर्वांच्या आदि परमेश्वराला " ज्येष्ठ आणि श्रेष्ठ " म्हणतात. कारण कीं, (१) त्यापासून सूर्यासारखे तेजोगोल उत्पन्न होतात आणि प्रकाशित करतात, (२) तो जेथें प्रगट होतो तेथें शत्रुत्व नष्ट होतें, आणि (३) सर्व त्याला मान देतात.

अर्थात् ज्येष्ठत्वाचीं तिन्हीं लक्षणें त्याच्यांत सार्थ होतात. त्यामुळेंच म्हणतात कीं तो परमेश्वर सर्व भुवनांत ज्येष्ठ आणि श्रेष्ठ आहे. दुसरें कोणीही त्याच्या समान श्रेष्ठ नाहीं. याचें तात्पर्य हें आहे कीं, तेजस्विता, शत्रूंना दूर करण्याची शक्ति आणि रक्षक वीरांची अनुकूलता ज्याच्यापाशीं असते त्याला ज्येष्ठ आणि श्रेष्ठ म्हणणें योग्य आहे. राष्ट्रांतही जे श्रेष्ठ पुरुष म्हणविले जातात, " ते तेजस्वी असतात. त्यांच्या योजनेनें दुसरीं माणसेंही तेजस्वी कार्यें करण्याला समर्थ होतात. ते धार्मिक, सामाजिक, औद्योगिक अथवा राजकीय शत्रूंना हटवितात, आणि त्यांना राष्ट्रांतील दुसऱ्या वीरांची अनुकूलताही असते. " ज्या पुरुषांमध्यें हीं तीन लक्षणें असतात तेच सर्वांहून श्रेष्ठ आणि सर्वांचे पुढारी मानले जातात. "

पहिल्या लक्षणांत **त्वेष+नृम्णः** " हा शब्द आहे. वस्तुतः हा शब्द **" त्वेष+नृ+ मनः "** असा आहे. अर्थात् त्याचा अर्थ तेजस्वी माणसाचें मन, अथवा मनुष्याचें तेजस्वी मन " असा आहे. ज्यांत असें तेजस्वी मन असतें तोच ज्येष्ठ आणि श्रेष्ठ असतो. तें मनही " **उग्र** " अर्थात् वीरतायुक्त असलें पाहिजे. शौर्य, वीर्य, धैर्य इत्यादि गुणांनीं युक्त मन असलें पाहिजे. मनुष्याचें मन तेजस्वी आणि वीर भावनेनें युक्त असेल तर तो आपल्या शत्रूंना परास्त करूं शकतो आणि लोकमताची अनुकूलताही त्याला मिळते. व्यक्तींतही श्रेष्ठत्वासाठीं या तीन गुणांची आवश्यकता आहे. ज्या आत्म्यापासून असें मनाचें बल प्रगट होतें तो श्रेष्ठ आत्मा आहे. याप्रमाणें प्रथम मंत्रांत व्यापक भाव आहे.

दासाचा भेकडपणा
दासाचीं लक्षणें

दुसऱ्या मंत्रांत दासाचीं लक्षणें सांगितलीं आहेत. पहिल्या मंत्रांत वीर पुरुषाचीं तीन लक्षणें सांगितलीं आहेत. या दुसऱ्या मंत्रांत दासाचें एकच लक्षण सांगितलें आहे. तें लक्षण म्हणजे " भेकडपणा. "

(५) **शत्रुः दासाय भियसं दधाति**- शत्रूंपासून दासाला भय उत्पन्न होतें. शत्रूला पाहून दासाला भय वाटतें. शत्रु केवळ दासवृत्तीच्या मनुष्यालाच भय दाखवूं शकतो. वीरवृत्तीचा मनुष्य शत्रूला भीत नाहीं. शत्रू कितीही प्रबळ असला तरी वीरवृत्तिवाला मनुष्य केव्हांही भीत नाहीं. भयाचा संबंध दासवृत्तीशीं आहे. ' शत्रूंचें भय वाटणें ' हें येथें एक दासाचें लक्षण सांगितलें आहे. लोक दास तेव्हांच होतात, कीं जेव्हां ते शत्रूंना भितात. या एकाच लक्षणानें प्रथम मंत्रांत सांगितलेल्या वीराच्या लक्षणांवरून अनुमान होणारीं दासवृत्तीचीं तीन लक्षणें जाणतां येतात- (१) तेजोहीन जीवन, (२) आपल्या नादानपणानें शत्रूंचें बळ वाढविणें आणि (३) जे आत्मरक्षण करूं शकत नाहींत त्यांची अनुकूलता. हीं लक्षणें व सूक्तांतील एक लक्षण मिळून दासाचीं याप्रमाणें चार लक्षणें आपण करूं शकतो- (१) तेजोहीन जीवन, (२) स्वतःच्या भेकडपणानें शत्रूंचें बळ वाढविणें. (३) आत्मरक्षण न करणें (४) आणि शत्रूंचें भय बाळगणें. हीं चार लक्षणें दासाचीं आहेत. हीं लक्षणें जेथें आहेत तेथें दास राहत आहेत असें समजावें; अथवा हीं लक्षणें ज्या राष्ट्रांत असतील, त्या राष्ट्रांत दासवृत्तीचे लोक राहतात असें समजावें. या लक्षणांवरून वाचकांच्या ध्यानांत येईल कीं, दास कोण आहेत आणि आर्य कोण आहेत? श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण ? पहिल्या मंत्रानें या प्रमाणें आर्य अथवा श्रेष्ठाचीं तीन लक्षणें दाखविलीं आहेत आणि या दुसऱ्या मंत्रानें दासवृत्तीच्या मनुष्याचीं लक्षणें सांगितलीं आहेत. वाचकांनीं याप्रमाणें विचार करून आत्मपरीक्षण करावें. जर कदाचित् आपल्यांत दासाचें एकादें लक्षण आढळून येत असेल तर तें दूर करून स्वतःमध्यें ज्येष्ठ श्रेष्ठ आर्यत्वाचें लक्षण वाढविण्याचा प्रयत्न करावा.

विरोधी लोकांबरोबर सहकार्य

या जगांत विरोधी लोकांच्या झगड्याचे वृतांत पुष्कळ ठिकाणांहून ऐकण्यांत येतात. विरोधी लोकांच्या झगड्यांत सामील

होणाऱ्या दोन्ही पक्षांची शक्ति क्षीण होते. या प्रकारच्या नाशापासून वांचण्याचा उपाय या दुसऱ्या मंत्राच्या उत्तरार्धांत सांगितला आहे. तो उपाय म्हणजे विरुद्धधर्मीयांबरोबर सहकार्य करणें. पहा —

(६) अव्यनत् च व्यनत् च सस्नि, ते प्रभृता मदेषु सं नवन्त— जड आणि चेतन हे विरुद्ध धर्माचे सलोख्यानें रहातात त्यामुळें ते पुष्ट होऊन आनंदांत रहातात. (मं. २)

आपल्या शरीरांतच पहा. शरीर जड आहे व आत्मा चेतन आहे. दोघांचेही गुणधर्म परस्पर भिन्न आहेत तरीही ते एकच स्थानांत इतकें मिळून मिसळून रहात आहेत कीं त्यांना कोणी भिन्न करूं शकत नाहीं. याप्रमाणें या विभिन्न धर्मीयांचें ऐक्य झाल्यामुळें ते दोघेही परस्परांच्या शक्तीनें परिपुष्ट होतात, आणि दोघांचीही वृद्धि होते. स्थूलापासून सूक्ष्माची वृद्धि आणि सूक्ष्मापासून स्थूलाची वृद्धि होते. जडाचें सहाय्य चेतनाला आणि चेतनाचें सहाय्य जडाला होतें. परस्पर विरुद्धधर्माचे हे दोघे एकदुसऱ्याशीं मिसळून राहिल्यामुळें विलक्षण कार्य करण्याला समर्थ झाले आहेत. जर जड-चेतन सहकार्यानें राहिले नसते तर हा जगांतील चमत्कार दिसलाच नसता. हा चमत्कार केवळ या विरुद्ध शक्ती एकाजागीं ऐक्यानें कार्य करीत आहेत त्यामुळेंच होऊं शकत आहे. पूर्वीच्या सूक्तांत " दोन विरोधीं चक्रें एकाजागीं कार्य करूं लागलीं कीं दोघांचीही शक्ति वाढते, " (मं. १।५) असें जें सांगितलें आहे, त्याबरोबर वाचकांनीं या मंत्रांतील या उपदेशाची तुलना करावी.

जड व चैतन्यानें एकत्र कार्य करण्याचा उपदेश या ठिकाणीं एवढ्यासाठीं सांगितला आहे कीं जनतेंत कित्येक लोक जडबुद्धीचे असतात व कित्येक तीव्र बुद्धीचे असतात. ह्या दोघांनीं आपसांत लढूं नये. ऐक्यानें रहावें. या शिवाय बलवान्-निर्बल-ज्ञानी-अज्ञानी, श्रीमंत-गरीब-भांडवलवाले मजूर असे विरुद्ध धर्माचे अनेक लोक राहात असतात. प्रायः यांच्यांत लढा चालत असतो, आणि या लढ्यामुळें आपसांतील शक्ति नष्ट होत असते. त्यामुळें त्यांना हें करणें योग्य आहे कीं त्यांनीं जडचेतन किंवा पुरुषप्रकृति प्रमाणें परस्पर मिळून मिसळून रहावें आणि परस्परांना सहाय्यभूत होऊन परस्परांची शक्ति वाढवावी. हा उपदेश अत्यंत बहुमोल आहे. जे याचें मनन करतील, त्यांना उन्नतीचा मार्ग निश्चित दिसेल. ज्ञानी व अज्ञानी यांनीं आपसांत मिळून रहावें. ज्ञानी लोकांनीं अज्ञानी लोकांना ज्ञानदान करावें, उलट अज्ञानी लोकांनीं आपल्या बळाचें सहाय्य ज्ञानी लोकांना द्यावें. याचप्रमाणें स्त्री आणि पुरुष. दोघेही विषमधर्मी असतांना गृहस्थाश्रम धर्मानें एकमेकांशीं मिळून असतात. त्यामुळें स्त्रीची शक्ति पुरुषाला व पुरुषाची सहाय्यता स्त्रीला मिळते. दोघांच्या सहकार्यामुळें दोघांचीही उन्नति होते. याप्रमाणें विरुद्धधर्मीयांचें ऐक्य उभयतांच्या उन्नतीला कारण होतें. उन्नतीचा हा महासिद्धांत या दुसऱ्या मंत्रांत सांगितला आहे. त्यामुळें या द्वितीय मंत्राचें महत्व फारच अधिक आहे.

राजनैतिक क्षेत्रांत विविध जातींचा आपापसांत संघर्ष होतो. याठिकाणीं हें सहकार्याचें तत्व जर लागूं करण्यांत आलें, तर फार मोठा लाभ होईल. या तत्वानुसार जेव्हां भिन्नभिन्न जाति एकत्र होतील त्यावेळीं सर्वांचें मिळून एक महान् राष्ट्र उदयाला येईल आणि त्या राष्ट्राची महान् शक्ति विलक्षण कार्य करण्यास समर्थ होईल. ब्राह्मण ज्ञानानें, क्षत्रिय बाहुबलानें, वैश्य धनानें व शूद्र कलाकौशल्यानें स्वतःच्या राष्ट्राची पूजा करोत. हे परस्पर विभिन्न धर्मीय मिळून मिसळून स्वतःची शक्ति वाढवोत. हें ऐक्य नेहमींच लाभप्रद होऊं शकतें. मनुष्याच्या व्यवहारांत असे विरोधी प्रसंग अनेक येतात. त्यावेळीं हा नियम लक्षांत ठेवला तर जनतेचें मोठें कल्याण होऊं शकेल.

शक्तीची वृद्धि

(७) ऊमाः त्वे क्रतुं पृञ्चन्ति, द्विः त्रिः भवन्ति- संरक्षक वीर तुझ्यांत स्वतःच्या बुद्धीचा योग करतात त्यामुळें ते दुप्पट, तिप्पट बलवान् होतात. जे लोक आपल्या अंतःकरणाला परमेश्वरांत लीन करतात, चित्तैकाग्र्यानें परमेश्वराचें ध्यान करतात, त्यांचें बळ वाढतें. याठिकाणीं ' क्रतु ' शब्दाचा अर्थ ' प्रज्ञाशक्ति आणि कर्मशक्ति ' असा आहे. अर्थात् जे मनुष्य स्वतःची बुद्धि आणि कर्तृत्वशक्ति ईश्वरार्पण बुद्धीनें एकाच सत्कर्मांत उपयोगांत आणतात, त्यांची शक्ति निश्चित वाढते. याठिकाणीं बुद्धि आणि कर्मशक्तीला एका केंद्रांत केंद्रित करण्याचें महत्व दर्शविण्यांत आलें आहे. कोणत्याही व्यवहारांत, मन बुद्धि, चित्त इत्यादि स्वतःच्या सर्व शक्ति एकाग्र करण्यानें शक्तीची वृद्धि होते अथवा आपल्या शक्तीनें अधिकांत अधिक कार्य करण्याची शक्यता वाढते. आपल्या अंतःकरणाला अनेक कार्यांत व्यग्र ठेवण्यानें आपली शक्ति क्षीण होते. परंतु अनेक व्यवसायांचा झंझाट दूर सारून कोणत्यातरी एकाच कार्यांत मन लावलें तर एकाग्रतेनें आपलें बळ वाढल्यामुळें तें कार्य लवकर सिद्ध होतें. ' ऊम ' चा अर्थ स्वसंरक्षण करणारे लोक. जे स्वतःचें व जनतेचें रक्षणकार्य करतात, त्यांना आपल्या चित्ताची एकाग्रता साधणें अत्यंत आवश्यक आहे. जर त्यांचें चित्त अनेक चिंतांनीं व्यग्र राहिलें तर त्यांच्या हातून रक्षणाचें कार्य होणें शक्य नाहीं. अर्थात् चित्ताच्या एकाग्रतेनें शक्ति दुप्पट वा

तिप्पट होते व चित्ताची व्यग्रता वाढल्यानें शक्ति क्षीण होते. याच नियमानें योगमार्गाची उत्पत्ति झाली आहे. चित्तवृत्तींचा निरोध करणें याचेंच नांव योग आहे. चित्तवृत्तींचा निरोध म्हणजे चित्तवृत्तींना अनेक ठिकाणांहून काढून त्यांना एकाच ठिकाणीं केन्द्रित करणें होय. आपल्या मनाची शक्ति वाढविण्यासाठींच हें योगसाधन आहे. उदाहरणार्थ वाचकांनीं पहावें- कोणा एका इसमाजवळ १ रुपयाची शक्ति आहे. जर तो एका कार्यांत एक पैची शक्ति खर्च करील तर १९२ कार्यांना त्याची एकेक पैची शक्ति मिळेल. परंतु एकही कार्य इतक्या कमी शक्तीनें सिद्धीस जाणार नाहीं. परंतु तीच सर्व एक रुपयाची शक्ति, त्यानें एकाच कार्यांत खर्च केली, तर तें कार्य निःसंशय सिद्धीस जाईल. इतकेंच नव्हें तर अपेक्षेपेक्षांही अधिक सिद्धि खचित् प्राप्त होऊं शकेल. एकाग्रतेनें शक्ति याप्रमाणें वाढत जाते. आपली थोडी शक्ति अनेक कार्यांत खर्च करण्यापेक्षां ती सर्व शक्ति एकाच कार्यांत खर्च केल्यास, वरील कारणाप्रमाणें पुष्कळ लाभदायक आहे. या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल कीं शक्ति वाढविणें याचा अर्थ शक्ति दुप्पट वा तिप्पट होणें हा नाहीं. परंतु तेवढ्याच शक्तीनें अधिकांत अधिक कार्य करूं शकणें, हा आहे. एकाग्रतेनें कार्यक्षमता वाढते, हाच नियम येथे सांगितलेला आहे.

माधुर्य

(८) स्वादोः स्वादीयः स्वादुना सं सृज। सुमधु म धुना समभि योधीः— मधुराहूनही मधुर होऊन त्यांत जास्त मधुरता आणा. उत्तम मधुरतेनें मध संयुक्त कर. हें रूपक आहे. प्रकृतिच्या स्वादुरसाबरोबर जीवात्म्याचा स्वादुरस एकत्र झाला आहे. या मिश्रणानेंही मानवदेहरूपी मधुररस झाला आहे. त्यांत अधिक मधुर असा परमात्म्याचा अमृतरस मिळविण्यांत आला तर तो सर्वांहून उत्तम मधुरतेला प्राप्त होईल. हें माधुर्य संत आणि महात्मे लोक यांत दिसून येतें. उत्तम मधु परमात्मा आहे. त्याला आपल्या जीवात्म्याच्या माधुर्यांत मिळविला पाहिजे. हें अध्यात्मोन्नतीचें अनुष्ठान या मंत्रांत सांगितलेलें आहे. जे स्वतःची उन्नति या साधनानें करण्याची इच्छा करीत असतील त्यांनीं हें मधुर साधन साधावें. मनुष्यानें प्रथम प्रकृति आणि पुरुषाच्या संबंधांत उत्पन्न होणाऱ्या माधुर्याचा अनुभव घ्यावा आणि नंतर त्यांत परमात्म्याची मधुरता मिळविली पाहिजे. हा माधुर्याचा मार्ग व्यवहारांतही फार उपयोगी आहे. व्यवहारांतही बोलण्याचालण्यांत आणि विचारांत माधुर्य ठेवल्यानें मित्र वाढतात आणि शत्रु कमी होतात. कित्येक माणसें अशीं कटु बोलणारीं असतात, कीं कारणावाचूनही कटु वाक्प्रहार करून मित्रांनाही ते शत्रु बनवितात व त्यामुळें आपलें नुकसान करून घेतात. हें फारच अनिष्ट आहे. यासाठीं प्रत्येकास योग्यच आहे कीं आपल्यांत माधुर्य वाढवून, स्वतःचे सर्व व्यवहार माधुर्ययुक्त करावे. हे प्रत्येकास योग्य आहे. त्यामुळें यांचे मित्र वाढून, अनेक प्रकारानें लाभ होईल. (मं. ३)

ब्राह्मण-क्षत्रियांचें ऐक्य

(९) रणे रणे धना जयन्तं त्वा विप्राः अनुमदन्ति, स्थिरं ओजीयः आतनुष्व ।- प्रत्येक युद्धांत धन जिंकणाऱ्या तुझ्यासारख्या वीराला ज्ञानी अनुमोदन देतात, यासाठीं तूं स्थिर बल प्रस्तुत कर. यांत मुख्यतः हें सांगावयाचें आहे कीं परमेश्वर प्रत्येक युद्धांत विजय प्राप्त करतो आणि म्हणून ज्ञानी लोक त्याची उपासना करतात, आणि परमेश्वरही त्यांच्यासाठीं स्थिर बल उत्पन्न करतो. हा परमेश्वरविषयक भावार्थ झाला, परंतु याठिकाणीं आणखी अधिक आशय सांगावयाचा आहे तो असा—

" प्रत्येक युद्धांत विजय प्राप्त करणाऱ्या क्षत्रिय वीरांना ज्ञानी ब्राह्मण अनुमोदन देतील; तर ज्या देशांत मिळून मिसळून कार्य करणारे क्षत्रिय आणि ब्राह्मण राहतात, त्या राष्ट्रांत नेहमीं स्थिर राहणारें बल निर्माण होतें. अर्थात् तें राष्ट्र अत्यंत बलवान् होतें. " यजुर्वेदांत सांगितलें आहे कीं—

यत्र ब्रह्म च क्षत्रं च सम्यञ्चौ चरतः सह ।
तं लोकं पुण्यं प्रज्ञेषं यत्र देवाः सहाग्निना ॥

(यजु. २०।२५)

" ज्या राष्ट्रांत ब्राह्मण आणि क्षत्रिय मिळून मिसळून एकत्र व्यवहार करतात व सलोख्यानें राहतात त्या राष्ट्राला पुण्य देश म्हणतात. " या कथनाबरोबर या सूक्ताचें पूर्वोक्त कथन वाचकांनीं ताडून पहावें.

१ रणे रणे जयन्तं विप्राः अनुमदन्ति ।—प्रत्येक युद्धांत विजय प्राप्त करणाऱ्या वीरांचें ज्ञानी लोक अभिनन्दन करतात.

२ यत्र ब्रह्म च क्षत्रं च सम्यंचौ सह चरतः ।— ज्या देशांत ब्राह्मण आणि क्षत्रिय सलोख्यानें राहतात.

याप्रमाणें हीं दोन्हीं वर्णनें जेथें संगत होतात, त्या राष्ट्रांत बल असतें. यासाठीं प्रत्येक राष्ट्रांतील ज्ञानी व शूरवीर यांनीं सलोख्यानें राहून आपली शक्ति वाढवावी. या उलट ज्या ठिकाणीं ब्राह्मण-क्षत्रिय आपापसांत झगडत असतील, तें राष्ट्र अधोगतीच्या पंकांत रुतून बसेल, यांत कांहींच शंका नाहीं. ब्राह्मण क्षत्रियांच्या ऐक्यानें बलवृद्धि होते उलट त्यांच्यांतील झगड्यानें राष्ट्राचें बळ क्षीण होतें.

(१०) **दुरेवासः कशोकाः त्वा मा दभन्**- दुष्ट आणि शोक उत्पन्न करणारे तुला न दबवोत. अध्यात्मपक्षीं " दुष्ट विचार आणि शोकाचे विचार मनुष्याच्या मनाला न दबवोत " हा अर्थ आहे.

राष्ट्राच्या बाबतीत, ' दुष्ट, घातपात करणारे आणि इतरांना पीडा देणारे लोक राष्ट्राला न दबवोत, ' असा अर्थ आहे. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांनीं आपसांत ऐक्य स्थापून आपल्या राष्ट्राचें बळ एवढें वाढविलें पाहिजे कीं, ज्याच्या योगानें राष्ट्रांत दुष्टांचा उपद्रव वाढणार नाहीं. सर्वत्र रक्षणाचा प्रबंध इतका उत्तम असला पाहिजे कीं, ज्यामुळें दुष्ट वर डोकेंच काढूं शकणार नाहींत. व्यक्ति, कुटुंब, जाति आणि राष्ट्र या सर्वांसाठीं हा उपदेश फार बोधप्रद आहे. ब्राह्मण-क्षत्रिय यांचें आपापसांत युद्ध झालें, अर्थात् दोघांमध्यें दुफळी माजली कीं, या दुष्टांना डोकें वर करण्यास अवसर मिळतो. यासाठीं राष्ट्रांत अभेद्य एकी ठेवून दुष्टांना वाढण्याला कोणतीही संधि मिळूं देऊं नये.

(११) **युध्म्यानि प्रपश्यन्तः वयं रणेषु त्वया शाशद्मह**- युद्धांत विजय प्राप्त करून जें धन मिळतें तें पाहून, आम्ही सर्व युद्धांत तुझ्या बरोबर राहून शत्रूंचा निःपात करूं. याठिकाणीं ही पूर्ववत् ज्ञानी व शूरांच्या सहकार्याचा उपदेश केला आहे. ज्ञानी आणि शूर यांनीं मिळून एकमतानें युद्ध चालवावें, आणि विजय प्राप्त करावा व धन आणि यश मिळवावें. (मं. ५)

(१२) **ते आयुधा वचोभिः चोदयामि**- तुज क्षत्रियांचीं आयुधें मी वाणीनें प्रेरित करतों. ब्राह्मणांनीं आपल्या उपदेशानें क्षत्रियांसाठीं अनुकूल वातावरणें निर्माण करावें व क्षत्रियांनीं ब्राह्मणांची विद्या वाढण्यासाठीं योग्य सहाय्य करावें. क्षत्रियांच्या शस्त्रांना ब्राह्मणानें आपल्या भाषणानें प्रेरणा द्यावी. (मं. ५)

(१३) **ते वयांसि ब्रह्मणा सं शिशामि**- तुझ्या गतींना मी माझ्या ज्ञानानें अधिक सतेज करतों, अर्थात् क्षत्रियांच्या हालचालींना ब्राह्मणांनीं आपल्या ज्ञानानें योग्य दिशेला वळवावें. (मं. ५)

याप्रमाणें या पांचव्या मंत्रांतही ब्राह्मण क्षत्रियांच्या ऐक्याचा विषय उत्तम रीतीनें सांगितला आहे. चवथ्या आणि पांचव्या मंत्रांचा भाव एकच आहे. ज्या देशांत शूर आणि ज्ञानी असे एक विचारानें व्यवहार करतात, त्या देशाचें तेज निःसंदेह चारी दिशांना पसरतें. पुढील सहाव्या मंत्रांतही हा एकतेचा विषय भिन्न रीतीनें सांगितला आहे. तो आतां पहा-

(१४) **यस्मिन् दुरोणे अवरे परे च निदधिषे, तत् अवसा अविथ**- ज्या घरांत लहान मोठे सलोख्यानें राहतात तें घर बलानें सुरक्षित होतें. उच्च-नीच, लहान- मोठे, सबल-निर्बल, सधन-निर्धन, मालक-नोकर इत्यादि प्रकारचे लोक असतात. प्रायः यांच्यांत विरोध असतो, आणि विरोधामुळें ते एकमेकांशीं झगडत असतात, परंतु ज्या घरांत अथवा राष्ट्रांत लहान मोठ्या लोकांत ऐक्य असतें, आणि एका घरांत राहिल्याप्रमाणें मिळून मिसळून राहतात तेथेंच त्यांच्या स्वतःच्या ऐक्याच्या सामर्थ्यानें सर्वांचें रक्षण होतें. अर्थात् ज्या देशांत लहान मोठे आपसांत झगडत रहातात, तो देश असुरक्षित झाल्यामुळें त्याचा अधःपात होतो. राष्ट्र कितीही मोठें असलें, तरी त्यांतील लोकांना तें एक लहानसें घर आहे असें वाटलें पाहिजे. राष्ट्रांत कुणालाही मी लहान आणि दुसरा मोठा, असें वाटूं नये. या विषयांत एक मंत्र पहा-

(१) अज्येष्ठासो अकनिष्ठास एते सं भ्रातरो वावृधुः सौभगाय। (ऋ. ५।६०।५)

(२) ते अज्येष्ठा अकनिष्ठास उद्भिदोऽमध्यमासो महसा वि वावृधुः ।
सुजातासो जनुषा पृश्निमातरो दिवो मर्या आ नो अच्छा जिगातन ॥ (ऋ. ५।५९।६)

" (१) ज्यांच्यांत कोणी मोठा नाहीं आणि कोणी लहानही नाहीं. हे सर्व परस्पर भाऊ आहेत आणि हे सर्व आपल्या कल्याणाकरितां प्रयत्न करीत आहेत, (२) त्यांच्यांत कोणी मोठा नाहीं, कोणी लहान नाहीं व मध्यमही नाहीं. ते सगळे एक असल्यासारखे आहेत, आणि ते आपल्या उदयासाठीं उत्साहानें प्रयत्न करीत आहेत. ते उत्तम कुळांत जन्मलेले, भूमीला माता मानणारे, दिव्य लोक आमच्या जवळ उत्तम रीतीनें येवोत. "

या मंत्रांत अशा वीरांचें वर्णन आहे कीं, ज्यांत कोणी उच्च-नीच नाहीं. सर्व एकाच श्रेणीचे आहेत, आणि मातृभूमीची उपासना करणारे व आपल्या सामुदायिक यशासाठीं प्रयत्न करणारे आहेत, ते सगळे लहान मोठे लोक एकाच घरांत राहिल्यासारखे राहतात व ऐक्यानें स्वतःची शक्ति वाढवून उन्नति करीत आहेत. अध्यात्मपक्षीं परमात्म्याच्या घरांत लहानमोठे सर्व एकसारखे आहेत. येथील लहानपणा वा मोठेपणा तेथें नाहीं. तेथें तर अंतःकरणाच्या शुद्धतेवर उच्च नीच श्रेणी मानली जाते. (मं. ६)

(१५) **जिगत्नुं मातरं आस्थापयत**- प्रगतिशील मनुष्य स्वतःच्या मातृभूमीला नेहमीं स्वतःच्या अंतःकरणांत स्थापन करित असतो. पूर्वी दिलेल्या ऋग्वेदाच्या मंत्रांत हे मातृभूमीचे उपासक असतात असें स्पष्ट सांगितलें आहे. हीच गोष्ट येथें सांगितली आहे. या विषयीं दुसरा एक मंत्र पाहण्यासारखा आहे. तो आतां पहा—

इळा सरस्वती मही तिस्रो देवीर्मयोभुवः।
बर्हिः सीदन्त्वस्रिधः॥ (ऋ. १।१३।९)
तिस्रो देवीर्बर्हिरेदं सदन्तामिडा
सरस्वती मही भारती गृणाना॥
(अथर्व. ५।२७।९; यजु. २७।१९)

"(**इळा, भारती**) मातृभाषा (**सरस्वती**) मातृसभ्यता किंवा मातृसंस्कृति आणि (**मही**) मातृभूमि. या तीन देवी अंतःकरणांत स्थिर राहोत." अर्थात् मनुष्यानें अंतःकरणपूर्वक या तीन देवींची उपासना केली पाहिजे. हाच उपदेश या सूक्ताच्या या मंत्रभागांत आहे. (**मातरं आस्थापयत**) मातृभूमीला आपल्या मनांत उत्तम प्रकारें स्थापित करा; अर्थात् मातृभूमीच्या उद्देशानें ब्राह्मण, क्षत्रिय, लहान मोठे, उच्चनीच सर्वांनीं एक व्हावें व सलोख्यानें राहून आपल्या उन्नतीसाठीं यत्न करावा आणि आपापसांत झगडे करून स्वतःच्या शक्तीचा ऱ्हास करून घेवूं नये. (मं. ६)

(१६) **अतः भूरि कर्वराणि इन्वत।**— यामुळें फार उत्तम कार्यं तुम्ही सिद्ध करूं शकाल. जर पूर्वी सांगितल्याप्रमाणें लोक ऐक्यानें राहिले तर ते मोठा पुरुषार्थ करूं शकतील. अर्थात् आपापसांत झगडून त्यांनीं काळ घालविला तर त्यांच्याकडून कोणताही पुरुषार्थ होणार नाहीं आणि ते पतित होतील. आपसांतील झगड्यानें मनुष्यांची पुरुषार्थशक्तिही नष्ट होते. (मं. ६)

आप्तपुरुषाची स्तुति

(१७) **पुरुवर्त्मानं ऋभ्वाणं इनतमं आप्त्यानां आप्तम् सं स्तुष्व।**— ज्याचे मार्ग पुष्कळ आहेत, तेजस्वी, श्रेष्ठ आणि आप्तांमध्येंही आप्त अशा पुरुषाची प्रशंसा कर. दुसऱ्याची स्तुति करूं नको. परमेश्वराकडे जाण्याचे अनेक मार्ग आहेत आणि त्या अनेक मार्गांनींच लोकांचें कल्याण करूं शकतो, तो तेजस्वी आणि सर्वांत श्रेष्ठ आहे आणि तोच सर्व आप्तांत परम आप्त आहे. त्यामुळें स्तुति करण्यास तोच योग्य आहे. त्यांच्या जागीं दुसऱ्या कुणाचीही स्तुति करणें योग्य नाहीं. आप्त पुरुष तोच आहे कीं जो नेहमीं सत्यवचनी असतो आणि कधींही कुणाच्याही अहिताची गोष्ट करत नाहीं. ज्याचे शब्द लोकांत प्रमाण मानले जातात, त्याला आप्त असें म्हणतात. अशा आप्तांत जो सर्वांहून श्रेष्ठ आप्तपुरुष असतो त्यालाच 'आप्त्यानां आप्तः' असें म्हणतात. अर्थात् अशा प्रामाणिक पुरुषांत जो सर्वश्रेष्ठ आहे व अधिक प्रामाणिक आहे; त्यामुळेंच परमेश्वराला सर्व गुरूंचा महागुरु अथवा आदिगुरु असें म्हणतात. हें वर्णन तर परमात्मविषयक झालें. आतां या सूक्ताचा अन्य मनुष्यविषयक भावार्थ पाहूं. जो मनुष्य (**पुरु-वर्त्मानं**) पुष्कळ मार्गांनीं युक्त आहे, म्हणजे आपल्या उन्नतीसाठीं व आपल्या राष्ट्राच्या अभ्युदयासाठीं अनेक मार्गांनीं पुष्कळ प्रयत्न करतो, एका मार्गानें सिद्धि नाहीं झाली तर दुसऱ्या मार्गानें आपले पाऊल पुढें टाकतो आणि अवश्य सिद्धि प्राप्त करतो अशा, आणि (**ऋभ्वाणं ऋभुं**) कुशल, कारागिर, कलावंत, हुन्नरी, हातीं घेतलेलें कार्य कुशलतेनें करणारा अशा, आणि (**इन+तमं**) अत्यंत शक्तिमान्, सामर्थ्यवान्, बलवान्, ओजस्वी अशा, शिवाय (**आप्त्यानां आप्तं**) प्रामाणिक पुरुषांमध्यें सर्वांहून अधिक प्रामाणिक असा जो पुरुष असेल त्याची स्तुति कर. जो अनेक उपायांनीं कार्यसिद्धि करणारा, कर्मकुशल आणि प्रामाणिक पुरुष असेल, तोच प्रशंसेला पात्र आहे. दुसऱ्या कुणाचीही स्तुति करणें योग्य नाहीं. केवळ ज्ञानी, केवळ अधिकारी, केवळ धनवान असे जे पुरुष असतील ते जर वर लिहिल्याप्रमाणें जनहिताचीं कृत्यें तत्परतेनें करीत नसतील, तर ते स्तुतीला योग्य होणार नाहींत. (मं. ७).

आदर्श पुरुष

(१८) **भूरि+ओजाः शवसा आदर्शति।**— अत्यंत बलवान् मनुष्य आपल्या सामर्थ्यानें आदर्शरूप होतो. जनतेंत जो आदर्श होतो तो बलामुळेंच होतो. ज्याच्यांत कोणत्याही प्रकारचें बल नसतें, तो पुरुष कधींही आदर्श होऊं शकत नाहीं. आत्मिक, बौद्धिक, मानसिक, शारीरिक वगैरे अनेक प्रकारचीं बळें आहेत. ज्या पुरुषांत यापैकीं कोणतेंही बल अधिक असलें तरी ही तो त्यामुळें लोकांत आदर्श पुरुष होऊं शकतो. मनुष्यांत जें बळ असेल तें जर तो लोकोद्धारासाठीं खर्च करील तर लोकांत आदर्श समजला जाईल. पूर्वापर संगतीवरून वाचक या सूक्ताचा हा भावार्थ स्वतः जाणूं शकतील. श्रेष्ठ पुरुष कोणत्या गुणांनीं होतात, हें या सूक्तांत सांगितलें आहे. आदर्श पुरुष होण्याला स्वतः बल प्राप्त करून घेतलें पाहिजे व तें परोपकारांत खर्च करणें आवश्यक आहे. या विषयांत पुढचा मंत्रभाग पाहण्यासारखा आहे.

(१९) **पृथिव्याः प्रतिमानं प्र सक्षति।**— तो पृथ्वीशीं समानता प्राप्त करतो. तो पृथ्वीचा नमुना बनतो. ज्याप्रमाणें पृथ्वी ही गंभीरता, गुरुत्व आणि सहनशीलतेचा आदर्श आहे त्याचप्रमाणें तोही गंभीर, महान आणि सहनशील बनतो. पृथ्वी सर्व चराचराला आधार देते. स्थिरचरांचे आघात सहन करून ती त्यांना उत्तम पोषणाचे पदार्थ देते. हा शांति आणि परोपकाराचा आदर्श आहे. पृथ्वी सर्वांना हाच उपदेश देत राहिली आहे. हा आदर्श जो पुरुष आपल्यापुढें ठेवतो आणि आपल्या जीवनांत उतरवूं शकतो, तोच आदर्श पुरुष बनूं शकतो.

पृथ्वी ज्याप्रमाणें आपली शक्ति परोपकाराकडे लावते त्याचप्रमाणें जो पुरुष आपल्या सर्व शक्ति जनतेच्या कल्याणार्थ खर्च करतो तोच इतरांसाठीं आदर्श पुरुष होऊं शकतो. (मं. ७)

काव्य कसें असावें

(२०) अग्रियः स्वर्+साः बृहद्दिवः शूषं ब्रह्म कृणवत् ।- प्रथम श्रेणींत असलेले, स्वप्रकाशानें युक्त, मोठ्या द्युलोकाप्रमाणें तेजस्वी ऋषि, बल उत्पन्न करणारें काव्य करतो. या मंत्रांत प्रथम ऋषींचे गुण सांगितले आहेत. जो कवि सर्वांत प्रमुख स्थानीं विराजमान् होण्याच्या पात्रतेचा असेल, आत्मप्रकाशानें प्रकाशणारा, द्युलोकाहून अधिक विस्तृत आणि प्रभावशाली असेल तर त्या कवीला ऋषि म्हणता येईल. हा ऋषि (**शूषं ब्रह्म**) बल वाढविणारें स्तोत्र अथवा काव्य तयार करो. कविलोकांनीं काव्यें अशीं करावींत कीं जीं वाचण्यानें, वाचणाऱ्याच्या मनांत बलवृत्तीचें पोषण व्हावें. निर्बल अंतःकरणही बलशाली बनावें. उदासीन लोक उत्साही होतील आणि पुरुषार्थहीन लोक पुरुषार्थी होतील. काव्य याप्रकारचें असलें पाहिजे. ऋषींच्या काव्याचें हेंच लक्षण आहे. ऋषीचें काव्य निर्जीव माणसालाही विलक्षण पुरुषार्थी बनवूं शकतें. ही गोष्ट पुढील मंत्रभागांत पहा—

(२१) महः गो+त्रस्य स्वराजा क्षयति ।— महान् गोरक्षक राष्ट्राचा स्वतंत्र राजा होऊनच राहतो. ' गो+त्र ' या शब्दाचा अर्थ गाईचें रक्षण करणारा असा आहे. पुष्टि आणि बळा" साठीं गाईचें रक्षण करणें अत्यावश्यक आहे. अशा गोरक्षक राष्ट्रांत तो राजा होऊनच राहातो. मागें सांगितल्याप्रमाणें जो बलवृत्तीला पोषक काव्य करतो, तो जणु राष्ट्राचा स्वतंत्र राजाच होतो. जो राजाला सन्मान मिळतो तो या ज्ञान्याला मिळतो; किंबहुना राजा-पेक्षांही अधिक मान ज्ञानी लोकांना मिळतो. याचें कारण पुढील मंत्रभागांत दिलें आहे. पहा -

(२२) तुरः चित् तपस्वान् विश्वं अर्णवत् ।- शीघ्रतेनें कार्य सफल करणारा तो तपस्वी विश्वालाही हालवून सोडतो. इतकी त्याच्यांत शक्ति उत्पन्न होते. तपस्वी मनुष्य संपूर्ण विश्वाला आपल्या काव्यानें हालवितो, संपूर्ण जगांत चैतन्य निर्माण करतो. **(मं. ८)**

(२३) महान् बृहद्दिवः अ+थर्वा स्वां तन्वं इन्द्रं एव अवोचत् ।- महातेजस्वी स्थिरचित्ताचा योगी आपल्या महान् शरीरांत राहणाऱ्या इंद्रालाही याप्रमाणें बोलला. उक्त योगी ऋषि स्वतःच्या शरीरांतील इंद्र-आत्म्यालाही त्याप्रमाणेंच स्तोत्ररूपी वचन बोलला; किंवा त्याचें वर्णन केलें. अर्थात् या सूक्तांत जें आहे तें स्वतःच्या शरीरांतील आत्म्याचेंच वर्णन आहे, अशा भावनेनें ऋषीनें वर्णन केलें आहे. कवि जो उपदेश दुसऱ्यांना देतात, अथवा कवि जें काव्य करतात तें दुसऱ्यांसाठीं करीत नाहींत, परंतु तें आपल्या आंतच चरितार्थ असलेलें पाहतात; आणि त्यांत जगाच्या कल्याणाचा भावही इतका तीव्र असतो कीं जसा आपल्या कल्याणाचा भाव सामान्य मनुष्यांत असतो; आणि म्हणून कवि व ऋषि जें कांहीं बोलतात तें विशेषेंकरून स्वतःच्या अंतरात्म्याला उद्देशूनच असतें आणि त्यापासून जगांतील माणसांनीं जेवढा पाहिजे तेवढा लाभ घ्यावा. परंतु कवींत उपदेश देण्याचा घमेंड असत नाहीं. ते जें बोलतात (म्हणजे काव्यरूपानें) तें केवळ त्यांच्या स्वतःच्या आत्मशांतीसाठींच असतें. (मं. ९)

(२४) मातरि + भ्वरि + स्वसारौ अ + रिप्रे हिन्वान्ति शवसा वर्धयन्ति ।= मातृभूमीचें पोषण करणाऱ्या दोन बहिणी (मातृभाषा आणि मातृसभ्यता) निर्दोषी असल्यानें सर्वांना प्रभावित करतात व सामर्थ्यानें सर्वांची वाढ करतात. मातृभूमि, मातृभाषा, आणि मातृसभ्यता या तीन देवी आहेत. या बाबतींत या सूक्ताच्या विवरणाच्या प्रसंगानें अन्यत्र विशेष रीतीनें सांगितलेंच आहे. या तीन देवी दोषरहित आहेत, सर्वांना चेतना देणाऱ्या आहेत व सर्वांना बलासह उत्कर्षाला पोहोंच-विणाऱ्या आहेत. कवि अथवा ऋषि स्वतःच्या काव्यानें अशी चेतना मनुष्याच्या अंतःकरणांत उत्पन्न करतात. त्यामुळें त्यांची योग्यता असाधारण समजली जाते.

परमेश्वर महाकवि आणि महाऋषि असल्यानें हें वर्णन त्याच्या काव्याला पूर्णपणें लागूं पडतें. मनुष्यांत जे कवि असतील त्यांना या सूक्तांत असा आदेश आहे कीं त्यांनीं स्वतःच्या काव्यांत अशीच चेतनाशक्ति ठेवावी. याप्रमाणें या दोन्ही मंत्रांचें वर्णन परमगुरु जो परमात्मा त्याच्याकडे आणि मानवी कवीसही लागूं पडतें. इतकें सांगितल्यानंतर या सूक्ताच्या विशेष गोष्टींकडे वाचकांचें लक्ष आकर्षित करूं इच्छितों. ती गोष्ट ही आहे कीं, या सूक्ताचा ऋषि ' **बृहद्दिवः अथर्वा** ' हा आहे आणि हें ऋषीचें नांव मंत्र ८ आणि मंत्र ९ यांत आलें आहे. त्यामुळें या ऋषीचेंच हें सूक्त आहे असें म्हणतात. हें नांव त्या ऋषीचें आहे यांत कांहीं संशय नाहीं, तथापि त्या नांवाचा श्लेषालंकारानें होणारा अर्थ आम्ही वर सांगितलेला आहे. या शब्दांचा परमात्मपरक अर्थही वरच्या अर्थांत विशद झाला आहे. (**बृहत्+दिवः अ+थर्वा**) द्युलोकाहून मोठा निश्चल आत्मा, असा या शब्दाचा परमात्मपर अर्थ होतो. याप्रमाणें हे शब्द तीन्ही ठिकाणीं योग्य प्रकारें लागूं शकतात. वाचकांनीं या गोष्टीचा

अधिक विचार करावा. आतां या सूक्ताचा राष्ट्रोन्नतिपरक अर्थ सरळ शब्दांत देत आहोंत.

राष्ट्रोन्नतीचा संदेश

(१) ज्यांपासून उग्र तेजस्विता निर्माण होते तो सर्व मनुष्यांत श्रेष्ठ आहे. तो उत्पन्न होतांच शत्रूंचा पराभव करतो त्यामुळें सर्व संरक्षकगण त्याला स्वतःचा अग्रणी (पुढारी) करून आनंदित होतात.

(२) शक्तियुक्त होऊन पुढें येणाऱ्या प्रबल शत्रूंना पाहून दासवृत्तीचे मनुष्यच भितात. (वीरवृत्तीचे कदापि भीत नाहींत.) वस्तुतः पाहिलें तर परस्पर विरुद्ध धर्माचे जड आणि चेतन एकोप्यानें राहून परस्परांच्या शक्तीनें बलवान् होऊन आनंदित होतात. (असेंच विरुद्धधर्माचीं माणसें जर एकोप्यानें राहतील तर परस्परांच्या शक्तीनें बलवान् होऊन परमानंदाला प्राप्त करूं शकतील.)

(३) जे स्वतःच्या बुद्धीला आणि कर्मशक्तीला दीर्घकाल-पर्यंत एकाच कार्यांत स्थिर करतात, ते दुप्पट आणि तिप्पट सामर्थ्य प्राप्त करतात. मधुरांत मधुर पदार्थांत अधिक माधुर्य एकत्रित करून उत्तम मधुरता उत्पन्न कर आणि माधुर्याची वृद्धि कर. (अर्थात् स्वतःच्या आचरणांत माधुर्य ठेवा आणि ज्यां-च्याशीं संबंध येईल त्यांनाही मधुर बनवा.)

(४) युद्धांत विजय प्राप्त करणाऱ्या वीरांना ज्ञानी अनुमोदन देवोत, कीं ज्यामुळें वीर आणि ज्ञानी यांचें ऐक्य होऊन राष्ट्रांत स्थिर बल वाढेल आणि दुष्ट माणसें प्रबळ होणार नाहींत.

(५) युद्धांत प्राप्त होणारा विजय आदि पाहून आम्ही सर्व ज्ञानी वीरांबरोबर राहून शत्रूंचा नाश करतों, आणि आमच्या ज्ञानानें वीरांच्या शस्त्रांना सतेज बनवून त्यांच्या हालचालींना अधिक सतेज बनवितों.

(६) लहान मोठे ज्या देशांत एका घरांत राहिलेल्याप्रमाणें समान भावनेनें रहातात, त्या राष्ट्राचें स्वतःच्या सामर्थ्यानें रक्षण होतें. प्रगतिशील मातृभूमीला आपल्या अंतःकरणांत स्थापन करा आणि विशेष पुरुषार्थ करा.

(७) जे अनेक मार्गांनीं उन्नति साधतात, जे कर्मांत कुशल आहेत, जे श्रेष्ठ आहेत आणि जे अधिक प्रामाणिक आहेत, अशा उत्तम पुरुषांची प्रशंसा करीत रहां. (दुसऱ्या हीन पुरुषांची स्तुति करूं नका). पुष्कळ बलवान् मनुष्य स्वतःच्या सामर्थ्य-वान् कार्यांमुळें आदर्श मनुष्य होतो आणि पृथ्वीप्रमाणें सर्व लोकांचा आधार देणारा होतो.

(८) महातेजस्वी आत्मबलशाली श्रेष्ठ ऋषींचें बळ उत्पन्न करणारें हें इंद्रसूक्त आहे, हा तपस्वी ऋषि सर्व विश्वांत खळबळ उत्पन्न करतो व स्वतंत्र राजासारखा होऊन रहातो.

(९) महातेजस्वी योगी ऋषीनें इंद्राचें अथवा जणूं काय आपल्या आंत रहाणाऱ्या देवतेचेंच स्तोत्र केलें आहे. यांत मातृभूमीचें भरणपोषण करणाऱ्या दोन बहिणी (मातृभाषा आणि मातृसभ्यता या दोघी) निर्दोष राहून उन्नतीसाठीं प्रेरणा करतात व सर्वांना बळवान् बनवून त्यांचा उत्कर्ष करतात. हा भावार्थ राष्ट्रीय उन्नतिविषयक आहे. हा अर्थ या सूक्तांत मुख्य स्थानीं आहे. त्यामुळें विस्तारपूर्वक दिला आहे. परमात्म्याच्या वर्णनपर अर्थही येथें विशेषेंकरून आहे हें वाचकांना समजलें असेलच.

देवता

या सूक्ताची देवता ' **वरुण** ' आहे असें सर्वानुक्रमकारानें लिहिलें आहे; परंतु या सूक्ताच्या नवव्या आणि दहाव्या मंत्रांत हें सूक्त ' **इंद्र** ' देवतेचें आहे असें स्पष्ट सांगितलें आहे. त्यामुळें ह्या सूक्ताची देवता ' इंद्र ' मानणें योग्य आहे तरीहि या बाबतींत संशोधन करणें योग्य आहे.

ईश्वरविषयक भावार्थ

आतां या सूक्तांतील ईश्वरविषयक भावार्थ संक्षेपांत देत आहोंत– (१) ज्यांपासून सूर्यादि तेजस्वी गोल निर्माण झाले आहेत तो ईश्वर सर्वांहून श्रेष्ठ आहे. त्यापासून अंधकार दूर होतो म्हणून सर्व रक्षक आनंदित होतात. (२) तो बलानें वाढणारा आणि दुष्टांना भय देणारा आहे. त्याच्या योजनेनें जड व चेतन एकत्र राहून सर्वांना आनंद देतात. (३) जे या ईश्वराकडे मन लावतात ते द्विगुणित बल प्राप्त करतात आणि मधुराहूनहीं अधिक मधुर बनतात. (४) हा ईश्वर प्रत्येक युद्धांत विजयी होतो. त्यामुळें ज्ञानी लोक त्याला प्राप्त करून आनंद भोगतात. स्थिर बल प्राप्त करून दुष्टांना दूर करतात. (५) हे परमेश्वरा ! तुझा विजय सर्वत्र पाहून आम्ही तुझ्या बरोबर राहून शत्रूंना पराभूत करूं. तुझ्या आयुधांना आम्ही शब्दानें प्रेरित करूं आणि ज्ञानानें तुझ्या गतीलाही जाणूं. (६) तुझ्या घरांत (विश्वांत) लहान मोठे सर्व समान अधिकारानें राहतात आणि तूं स्वबलानें सर्वांचें उत्तम रक्षण करतोस. आम्हांला प्रकृतिमातेच्या अंकावर तूं ठेविलेलें आहेस, ज्यामुळें आम्ही उत्तम कर्में करूं शकतों. (७) जो विविध मार्गांनीं प्राप्त होणारा, श्रेष्ठ कारागिर आणि परम आप्तपुरुष आहे त्याचीच तूं स्तुति कर. तो बलवान् असल्यानें सर्वांना आदर्श आहे आणि पृथ्वीप्रमाणें सर्वांचा आधार आहे. (८) महातेजस्वी आत्मप्रभावी अशा ऋषीनें हें सूक्त इंद्राची प्रशंसा करण्यासाठीं

*

बनविलें आहे. तो महातपस्वी या संपूर्ण जगताला चालवितो आणि स्वतंत्र राजा होऊन या जगांत राहतो. (९) महा तेजस्वी योगी ऋषींनें स्वतःच्या प्रभु-शक्तीसाठीं हें स्तोत्र केलें आहे. त्याच्यापाशीं माता (प्रकृति) आणि दोन बहिणी (शक्ति) राहून सर्वांना प्रेरित करतात आणि बलानें सर्वांची वृद्धि करतात.

याप्रमाणें या सूक्ताचा ईश्वरविषयक भावार्थ आहे. वाचकांनीं वरील दोन्ही भावार्थांचा गंभीर आशय तुलनेनें जाणावा. याच्या अनुष्ठानानें फार लाभ होणें शक्य आहे. हें सूक्त एकदम समजण्यास फार अवघड असल्यामुळें तत्संबंधीं एवढें विवरण केलें आहे. तरीही त्यांतील अर्थांचा अधिक शोध घेण्याची आवश्यकता आहे. जिज्ञासु वाचकांनीं या सूक्तांचें वारंवार मनन करून अधिक अर्थ समजून घेण्याचा यत्न करावा.

श्रेष्ठ देव

कांड ५, सूक्त ११

(ऋषिः - अथर्वा । देवता- वरुणः)

कथं महे असुरायाब्रवीरिह कथं पित्रे हरये त्वेषनृम्णः ।
पृश्निं वरुण दक्षिणां ददावान्पुनर्मघ त्वं मनसाचिकित्सीः ॥ १ ॥
न कामेन पुनर्मघो भवामि सं चक्षे कं पृश्निमेतामुपाजे ।
केन नु त्वमथर्वन्काव्येन केन जातेनासि जातवेदाः ॥ २ ॥
सत्यमहं गभीरः काव्येन सत्यं जातेनास्मि जातवेदाः ।
न मे दासो नार्यो महित्वा व्रतं मीमाय यदहं धरिष्ये ॥ ३ ॥

अर्थ— (महे असुराय कथं अब्रवीः) महान् शक्तिवानासंबंधीं तूं कसें व काय सांगितलें आहेस ? आणि (त्वेष नृम्णः इह हरये पित्रे कथं) स्वयं तेजस्वी असतांनाही तूं येथें दुःख हरण करणाऱ्या पित्यासाठींही कसें आणि काय सांगितलें आहेस ? हे (वरुण) श्रेष्ठ प्रभो ! हे (पुनर्मघ) पुन्हां पुन्हां धन देणाऱ्या देवा ! (पृश्निं दक्षिणां ददावान्) गाय इत्यादि दक्षिणा देतां देतां (त्वं मनसा अचिकित्सीः) तूं मनानें आमची चिकित्सा केली आहेस. (१)

(कामेन पुनर्मघः न भवामि) केवळ इच्छेनेंच मी पुन्हां पुन्हां धनवान् होत नाहीं, मी (कं संचक्षे) हें कोणाला सांगूं ? (एतां पृश्निं उप अजे) या गाय इत्यादिकांनां मी बरोबर घेऊन जातों. हे (अ-थर्वन्) शां[illegible] स्वभावाच्या देवा ! (केन नु काव्येन त्वं) कोणत्या काव्यानें तूं आणि (केन जातेन जातवेदाः असि) क[illegible] तूं जातवेदा झाला आहेस ? (२)

(सत्यं अहं गभीरः) हें सत्य आहे की मी गंभीर आहें आणि (सत्यं) हेंही सत्य आहे कीं मी (जातेन [illegible]न जातवेदाः अस्मि) काव्य उत्पन्न करण्यानेंच जातवेदा म्हटला जातों. (यत् अहं धरिष्ये) ज्याला मी धारण करतों त्या (मे व्रतं) माझ्या नियमाला (न दासः न आर्यः) दास किंवा आर्य कोणीही (महित्वा मीमाय) महत्त्वासह तोडूं शकत नाहीं. (३)

भावार्थ— (भक्ताचें कथन) हे परमेश्वरा ! महान् शक्तिवानांनाही तू काय उपदेश केला आहेस आणि सर्वांचें दुःख हरण करणाऱ्या पित्यालाही तुम्ही काय सांगितलें होतें ? तूं स्वतः तेजस्वी आहेस. तूंच ह्या गायी, भूमि, वाणी इत्यादींचें दान केलें आहेस आणि हें पुन्हां पुन्हां धन देणाऱ्या देवा ! तूंच आमची चिकित्सा केली आहेस. (१)

केवळ इच्छा केल्यानेंच मी धनवान् होत नाहीं. हें मी योग्य रीतीनें कोणाला सांगूं ? मी या गायी, भूमि, वाणी इत्यादि प्राप्त करतों. हे देवा ! कसें काव्य केल्यानें व कोणत्या पदार्थांच्या निर्मितीनें तुला जातवेद म्हटलें जातें. (२)

(ईश्वराचें उत्तर) ही गोष्ट सत्य आहे कीं मी गंभीर आहें. आणि हेंही खरें की हें काव्य प्रकाशित झाल्यानें मी जातवेद नांवानें प्रसिद्ध झालों. ज्या नियमांना मी करतों ते नियम दास अथवा आर्य कोणीही तोडूं शकत नाहींत. (३)

न त्वदुन्यः कुवितरो न मेधया धीरतरो वरुण स्वधावन् ।
त्वं ता विश्वा भुवनानि वेत्थ स चिन्नु त्वज्जनो मायी बिभाय ॥ ४ ॥
त्वं ह्य1ङ्ग वरुण स्वधावन्विश्वा वेत्थ जनिमा सुप्रणीते ।
किं रजस एना परो अन्यदस्त्येना किं परेणावरममुर ॥ ५ ॥
एकं रजस एना परो अन्यदस्त्येना पर एकेन दुर्णशं चिदुर्वाक् ।
तत्ते विद्वान्वरुण प्र ब्रवीम्यधोवचसः पणयो भवन्तु
नीचैर्दासा उप सर्पन्तु भूमिम् ॥ ६ ॥
त्वं ह्य1ङ्ग वरुण ब्रवीषि पुनर्मघेष्ववद्यानि भूरि ।
मो षु पणीँरभ्ये1तावतो भून्मा त्वा वोचन्नराधसं जनासः ॥ ७ ॥

अर्थ—हे (**स्वधावन् वरुण**) आपल्या धारणशक्तीनें युक्त श्रेष्ठ देवा ! (**त्वत् अन्यः कवितरः न**) तुझ्याशिवाय श्रेष्ठ कवि दुसरा नाहीं. (**मेधया धीरतरः न**) आणि बुद्धिमुळें अधिक धैर्यवानही दुसरा कोणी नाहीं. (**त्वं ता विश्वा भुवनानि वेत्थ**) तूं त्या सर्व भुवनांना जाणतोस. त्यामुळें (**सः मायी जनः**) तो कपटी मनुष्य (**त्वत् चित् नु बिभाय**) निःसंशय तुझ्यापासून भयभीत होतो. (४)

हे (**अङ्ग स्वधावन् सुप्रणीते वरुण**) प्रिय, आपल्या धारणशक्तीनें युक्त, उत्तम संचालन करणाऱ्या श्रेष्ठ देवा ! (**त्वं हि विश्वा जनिमा वेत्थ**) तूंच सर्व जन्मांना जाणतोस. हे (**अ-मुर**) ज्ञानी ! (**एना रजसः परः अन्यत् किं अस्ति**) या प्रकृतीच्या पलीकडे दुसरें काय आहे बरें ? (**एना परेण अवरं किं**) आणि त्या पराच्या अलीकडचे असें काय आहे बरें ? (५)

(**एना रजसः परः अन्यत् एकं अस्ति**) या प्रकृतीच्या पलिकडे दुसरा एक पदार्थ आहे. आणि (**एका एकेन परः**) या एकाच्या पलिकडे जें आहे त्याच्या (**अर्वाक् चित् दुर्णशं**) अलीकडचा पदार्थही दुष्प्राप्य आहे. हे (**वरुण**) श्रेष्ठ देवा ! (**ते तत् विद्वान् प्रब्रवीमि**) तुझा तो महिमा जाणणारा मी सांगतों कीं (**पणयः अधो-वचसः भवन्तु**) कुत्सित व्यवहार करणारे लोक शरमेनें अधोमुख, खालीं तोंड करणारे होवोत, आणि (**दासाः भूमिं नीचैः उपसर्पन्तु**) दासवृत्तीचे लोक भूमीवर खालच्या बाजूनें जाऊं द्यात. (६)

हे (**अङ्ग वरुण**) प्रिय श्रेष्ठ प्रभो ! (**त्वं हि पुनर्मघेषु**) तूंही पुनः धन प्राप्त करण्याच्या व्यवसायांत (**भूरि अवद्यानि ब्रवीषि**) पुष्कळ निंद्य दोष आहेत असें सांगतोस. (**एतावतः पणीन् मो सु अभिभूत्**) या व्यवहार करणाऱ्यांनाही कदापि हानि न होवो आणि (**जनासः त्वा अराधसं मा वोचन्**) लोक तुला धनहीनही न म्हणोत. (७)

भावार्थ— (भक्ताचें कथन) हे श्रेष्ठ आणि समर्थ देवा ! तुझ्याहून भिन्न अधिक श्रेष्ठ कवि आणि बुद्धिमान् कोणीही नाहीं. तूं सर्व भुवनांचा ज्ञाता आहेस, म्हणून सर्व दुष्ट कपटी लोक तुला भिऊन असतात. (४)

हे ईश्वरा ! तूं सर्वच्या सर्व जन्मांना जाणतोस. हे देवा ! प्रकृतीच्या पलीकडे काय आहे ? तसेंच जें सर्वांहून दूर आहे त्याच्या अलीकडे काय आहे ? (५)

(ईश्वराचें उत्तर) या प्रकृतिच्या पलिकडेही एक वस्तु आहे आणि त्या अंतिम वस्तुच्या अलीकडेही एक दुष्प्राप्य वस्तु आहे. (भक्ताचें कथन) हे देवा ! तुझा महिमा जाणून मी सांगतों कीं दुष्ट व्यवहार करणाऱ्यांची तोंडें खालीं होवोत व दासवृत्तीचे लोकही अधोगतीला जावोत. (६)

हे श्रेष्ठ देवा ! तूं सांगितलें आहेस कीं वारंवार धन वाढविण्याच्या प्रयत्नांत पुष्कळ दोष उत्पन्न होतात. त्यामुळें मी प्रार्थना करतों कीं सर्वांवर अशी दया कर कीं या व्यवहार करणाऱ्यांना कदापि नुकसान होऊं नये आणि दुसरे लोकही तुला कृपण न म्हणोत. (७)

मा मां वोचन्नराधसं जनासः पुनस्ते पृश्निं जरितर्ददामि ।
स्तोत्रं मे विश्वमा याहि शचीभिरन्तर्विश्वासु मानुषीषु दिक्षु ॥ ८ ॥
आ ते स्तोत्राण्युद्यतानि यन्त्वन्तर्विश्वासु मानुषीषु दिक्षु ।
देहि नु मे यन्मे अदत्तो असि युज्यो मे सप्तपदः सखासि ॥ ९ ॥
समा नौ बन्धुर्वरुण समा जा वेदाहं तद्यन्नावेषा समा जा ।
ददामि तद्यत्ते अदत्तो अस्मि युज्यस्ते सप्तपदः सखास्मि ॥ १० ॥
देवो देवाय गृणते वयोधा विप्रो विप्राय स्तुवते सुमेधाः ।
अजीजनो हि वरुण स्वधावन्नथर्वाणं पितरं देवबन्धुम् ।
तस्मा उ राधः कृणुहि सुप्रशस्तं सखा नो असि परमं च बन्धुः ॥ ११ ॥

अर्थ— (**जनासः मा अराधसं मा वोचन्**) लोक मला धनहीन न म्हणोत. हे (**जरितः**) स्तुति करणाऱ्या ! (**ते पृश्निं पुनः ददामि**) तुझ्या गाईंना मी परत देतो (**विश्वासु मानुषीषु दिक्षु अंतः**) सर्व मनुष्यांनीं युक्त अशा दिशांमध्यें (**शचीभिः मे विश्वं स्तोत्रं आयाहि**) बुद्धीनीं युक्त अशा माझ्या सर्व स्तोत्रांना प्राप्त हो. (८)

(**ते स्तोत्राणि**) तुझीं स्तोत्रें (**विश्वासु मानुषीषु दिक्षु अंतः**) सर्व मनुष्यांनीं युक्त अशा दिशांत (**उद्यतानि यन्तु**) उत्तम प्रकारें पसरोत (**यत् मे अदत्तः**) जें मला दिलें नाहीं, (**नु मे देहि**) तें मला दे, कारण कीं तूं (**मे सप्तपदः युज्यः सखा असि**) सात पावलें चालण्यानें होणाऱ्या मित्रासारखा माझा योग्य मित्र आहेस. (९)

हे (**वरुण**) श्रेष्ठ देवा ! (**नौ समा बन्धुः**) आपण दोघे समान बंधु आहोंत. आणि (**जा समा**) आपली उत्पत्तिहि समान आहे. (**अहं तत् वेद**) मी तेंहि जाणतों, (**यत् नौ एषा समा जा**) कीं आमची जी ही समान उत्पत्ति आहे, (**यत् ते अदत्तः**) जें तुला देण्यांत आलें नाहीं, (**तत् ददामि**) ते मी तुला देतों (**ते युज्यः अस्मि**) मी तुझ्या योग्य आहें. (**सप्तपदः सखा अस्मि**) सात पावलें बरोबर चालण्यानें झालेला मित्र मी आहें. (१०)

(**गृणते देवाय वयोधाः देवः**) स्तुति करणाऱ्या विद्वानांसाठीं अन्न देणारा देव तूं आहेस. आणि तूं (**स्तुवते विप्राय सुमेधाः विप्रः**) स्तुति करणाऱ्या ज्ञानी लोकांसाठीं उत्तम मेधावान् ज्ञानी आहेस. (**स्वधावन् वरुण**) स्वतःच्या धारणाशक्तीनें युक्त श्रेष्ठ देवा ! तूं (**देवबन्धुं पितरं अथर्वाणं अजीजनः**) देवाच्या बंधुप्रमाणें पालक, अथर्वा योग्याला बनवितोस. (**तस्मा उ सुप्रशस्तं राधः कृणुहि**) त्यासाठीं उत्तम प्रशंसनीय धन प्रदान कर. (**नः सखा असि**) तूं आमचा मित्र आहेस आणि (**परमं च बन्धुः**) तूं परम बंधुही आहेस. (११)

भावार्थ— लोक मलाही कृपण वा धनहीन न म्हणोत. हे देवा ! ज्या गायी इत्यादि माझें धन आहे तें सर्व मी तुझ्यासाठीं समर्पण करतों. मी इच्छा करतों कीं हें तुझें स्तोत्र सर्वत्र जगांतील मनुष्यांमध्यें पसरो. (८)

तुझीं स्तोत्रें जगांतील मनुष्यांत पसरोत. हे देवा ! आतांपर्यंत मला जें प्राप्त झालें नाहीं तें आतां प्राप्त होवो; कारण कीं, मी तुझा सुयोग्य मित्र आहें. (९)

हे ईश्वरा ! आपण दोघे भाऊ आहोंत, आपला जन्मही सारखा आहे. आपली समानता कशी आहे हें मी जाणतों. आजपर्यंत तुझ्या प्रीत्यर्थ जें समर्पण केलें नाहीं तें आतां समर्पण करतों. आतां मी तुझा योग्य मित्र आणि सखाही आहें. (१०)

स्तुति करणाऱ्या उपासकाला अन्नादि देणारा तूंच एक देव आहेस. उपासकाला उत्तम ज्ञान देणाराही तूंच आहेस. हे श्रेष्ठ देवा ! तूंच रक्षकांना उत्पन्न करतोस आणि त्यांना धन इत्यादि पदार्थ आणि सिद्धि देतोस. तूं आमचा सर्वांचा मित्र आणि भाऊही आहेस. (११)

श्रेष्ठ देव

ईश्वर आणि भक्ताचा संवाद

ईश्वर आणि भक्त यांचा संवाद या सूक्तांत असल्यानें या सूक्ताचें महत्व विशेष आहे. याप्रकारचीं संवादात्मक सूक्तें फार थोडीं आहेत. त्यामुळें या सूक्ताचें मनन जरा विशिष्ट पद्धतीनें करणें आवश्यक आहे.

या सूक्तांत परमेश्वराचें नांव ' पुनर्मघ ' असें आलेलें आहे. या शब्दाचा अर्थ पुन्हां पुन्हां धन देणारा अर्थात् एकवेळ निर्धन झालेल्यालाही पुन्हां धन देणारा, असा आहे. ईश्वराकडून दोन प्रकारें सहाय्य होतें. ही गोष्ट या सूक्ताच्या प्रथम मंत्रांत सांगितली आहे-

१ पृश्नि दक्षिणां ददावान् । (मं. १)

२ त्वं मनसा अचिकित्सीः । (मं. १)

" (१) परमेश्वर भूमि, गाय, वाणी इत्यादि धनांची दक्षिणा वारंवार देतो. आणि (२) सर्वांची मनानें चिकित्सा करतो. " अर्थात् जगांतील विविध पदार्थ देऊन उपभोगाचीं अनन्त साधनें प्रदान करतो, ज्यामुळें मनुष्य सुखपूर्वक या भूमीवर राहूं शकतो. या स्थूल शरीराच्या सुखाचा प्रबंध ईश्वर द्वारां होतो. त्याचप्रमाणें सर्वांची मानसचिकित्साही तो करतो. प्रत्येक मनुष्याला तो सन्मार्गांत प्रवृत्त करतो. उलट्या मार्गानें जाणाऱ्या मनुष्याला तो सरळ मार्गावर आणतो सन्मार्गाची प्रेरणा करतो. याप्रमाणें ज्याच्या योगानें तो सर्वांचें भलें करतो, अशा अनन्त रीति आहेत.

सर्वांवर ईश्वराचे हे अनंत उपकार आहेत. या मंत्रांत '**पृश्नि**' शब्द आहे. त्याचे ' प्रकृति, भूमि, गाय, वाणी, विद्या ' इत्यादि अनेक अर्थ होऊं शकतात. याठिकाणीं प्राकृतिक विश्वाच्या उपलक्षणांत हा शब्द आलेला आहे.

दोन प्रकारचे लोक

जगांत दोन प्रकारचे लोक आहेत आणि त्यांना ज्ञान देण्याचे प्रकारही दोन आहेत. एका प्रकारच्या लोकांना ' असुर ' म्हणतात व दुसऱ्या प्रकारच्या लोकांना ' पिताहरी ' म्हणतात ' असुर ' शब्द शारीरिक बलानें युक्त पुरुषांचा वाचक आहे आणि 'पिताहरि' चा अर्थ ' रक्षक आणि दुःख दूर करणारे ' असा होतो. या विषयीं खालीलप्रमाणें सांगितलें आहे--

१ महे असुराय कथं अब्रवीः (मं. १)

२ पित्रे हरये कथं अब्रवीः (मं. १)

' (१) महाशक्तिशाली लोकांसाठीं तूं काय आणि कशाप्रकारें सांगितलें आहेस ? आणि (२) दुसऱ्यांचें रक्षण आणि दुःख हरण करणाऱ्या मनुष्यांसाठीं कशाप्रकारें आणि कोणता उपदेश दिला आहेस ? ' या जगांत कित्येक लोक शारीरिक बलाच्या गर्वानें विशिष्ट प्रकारचा व्यवहार करून राहिले आहेत आणि दुसरे असेहि लोक आहेत कीं स्वतःचें बळ परोपकारार्थ खर्च करून दुसऱ्यांचें रक्षण करितात, त्याचप्रमाणें दुसऱ्यांचीं दुःखें दूर करतात. अशा सत्पुरुषांना तूं कशा प्रकारचा उपदेश दिला आहेस ? कित्येक शक्तिमान् लोक असे आहेत कीं जे स्वतःच्या शक्तीचा उपयोग दुसऱ्यांचें बरें करण्यांत करतात, परंतु कित्येक बलशाली लोक असेही आहेत कीं जे स्वतःची शक्ति दुसऱ्यांना सहाय्य करण्यांतही खर्च करतात. या सर्व लोकांना तूं काय उपदेश दिला आहेस कीं ज्यामुळें या विविध प्रकारच्या प्रवृत्ति लोकांत दिसून येतात. हा प्रथम मंत्रांतील प्रश्नांचा आशय आहे, तूं लोकांना सर्व जगांतलें पदार्थ अर्पण करून, त्यांच्या आधिव्याधींचें शमन करून, तूं सर्वांचें कल्याण करतोस. तरीही जनतेंत या प्रकारें भिन्नभिन्न प्रवृत्तीचे लोक कां उत्पन्न होतात हा भाव या ठिकाणीं आहे.

प्रयत्नाचें महत्व

केवळ इच्छा करण्यानेंच सफलता प्राप्त होऊं शकत नाहीं. इच्छेबरोबर प्रयत्नाचीही अत्यंत आवश्यता आहे. ही गोष्ट विशेष रीतीनें द्वितीय मंत्रांत सांगितली आहे—

न कामेन पुनर्मघो भवामि । (मं. २)

' केवळ इच्छा करण्यानेंच मी पुनः धनवान् होऊं शकत नाहीं. ' अर्थात् इच्छेबरोबर विशेष प्रयत्नाचीही आवश्यकता आहेच. जो इच्छा करतो आणि त्यासाठीं विशेष प्रयत्न करतो, त्याला सिद्धि प्राप्त होऊं शकते. नाहींतर केवळ इच्छा करणारा कोणीही धनहीनच राहिला नसता. परंतु आपण पहातों कीं प्रत्येक मनुष्य धनवान् होण्याची इच्छा करतो, पण सर्व निर्धन राहतात आणि क्वचित एखादा मनुष्य धनवान् होतो आणि धनवान् होऊनही फार थोडे सुखी असतात. म्हणून पुरुषार्थाचें महत्व विशेष आहे. ही गोष्ट—

कं संचक्षे ? (मं. २)

'कोणाला मी सांगूं ?' अर्थात् प्रत्येक मनुष्य धनिक होण्याची इच्छा करतो, परंतु प्रयत्न करायला तयार होत नाहीं. याप्रमाणें स्थिति असल्यानें मंत्र म्हणतो कीं केवळ इच्छामात्रें सिद्धि होऊं

शकत नाहीं, ही गोष्ट मी कोणाला सांगूं ? कोण या उपदेशाला खरोखर ऐकावयास तयार आहे ? एकतात तर सगळेच, परंतु थोडेच प्रयत्न करतात. जे प्रयत्न करतात ते—

एतां पृश्निं उप आजे (मं. २)

"या प्रकृतीला (भूमि, वाणी गाय इत्यादिंना) चालवितात, प्राप्त करतात आणि स्वतःच्या इच्छेनुसार त्यांचेपासून काम घेतात." हें सर्व प्रयत्नानेंच साध्य आहे, परंतु जे कोणी मुळींच प्रयत्न करित नाहींत व इच्छा मोठमोठ्या करतात, त्यांच्याकडून कांहींही होणार नाहीं; म्हणून उत्कर्षाची इच्छा करणाऱ्यानें सदिच्छा धारण केली पाहिजे आणि सिद्धीसाठीं शक्य तितका प्रयत्न केला पाहिजे.

ईश्वराचें महत्त्व

जसे इतर पदार्थ आहेत त्याप्रमाणेंच ईश्वरही आहे. मग सर्वांवर परमात्म्याचें शासन कसें झालें ? या विषयांत दुसऱ्या मंत्रांत विचारलेला प्रश्न फार मननीय आहे—

हे अथर्वन् ! त्वं केन ? केन काव्येन जातेन जातवेदाः असि ? (मं. २)

"हे निश्चल देवा ! तूं कोणत्या कारणानें निश्चल झाला आहेस ? आणि कोणतें काव्य प्रगट करण्यानें तुला जातवेदा असें म्हणतात ? " अर्थात् तूं जो निश्चल आहेस आणि कोणीही तुला तुझ्या स्थानापासून च्युत करूं शकत नाहीं, त्या तुझ्यांत एवढी शक्ति कोणत्या कारणानें प्राप्त झाली आहे ? आणि तुला ज्ञानाचें उगमस्थान म्हणतात तेंहि कोणत्या कारणानें ? कोणत्या पुरुषार्थानें परमेश्वराला एवढें महत्व प्राप्त झालें आहे ? परमेश्वराची अशी कोणती पुरुषार्थ शक्ति आहे कीं, ज्यामुळें परमेश्वराचें याप्रमाणें ऐश्वर्य वाढलें आहे ? या ठिकाणीं हा प्रश्न भक्ताचा आहे. हा प्रश्न ऐकून परमेश्वर तृतीय मंत्रांत त्याला उत्तर देत आहे कीं—

यत् अहं धरिष्ये, (तत्) मे व्रतं न दासः आर्यः मीमाय । (मं. ३)

"मी जे नियम करतों, त्या माझ्या नियमांना तोडण्यास दास अथवा आर्य कोणीही समर्थ होऊं शकत नाहीं. " व्रतपालनाची ही दक्षता परमेश्वरांत आहे. त्यामुळेंच त्याचें शासन सर्वतोपरी झालें आहे. नियमांचें पालन स्वतः करणें व दुसऱ्याकडून करविणें हें कार्य आत्मशक्तीनेंच होत असतें. परमेश्वर सर्वांहून अधिक शक्तिमान् असल्यानें, तो स्वतः नियमांचें पालन करतो व इतरांकडून करवितो. त्यानें स्वतःच्या विश्वव्यापी राज्यांत अशी व्यवस्था ठेवली आहे कीं त्याच्या नियमांचा भंग कोणीही करूं शकत नाहीं. याप्रमाणें त्याचें उत्तम शासन असल्यानेंच त्याचा अधिकार सर्वतोपरी झाला आहे. ही गोष्ट परमेश्वराच्या शक्तिसंबंधीं झाली. आतां त्याच्या ज्ञानाच्या बाबतींत पहा—

सत्यं काव्येन जातेन अहं जातवेदाः अस्मि । (मं. ३)

"ही गोष्ट खरी आहे कीं, हें काव्य प्रसिद्ध होण्यानेंच मी जातवेद या नांवानें प्रसिद्ध झालों आहें. " जातवेद या शब्दाचा अर्थ 'ज्यांपासून वेदांची उत्पत्ति झाली' असा आहे. परमेश्वराचें निश्वसित हे वेद जगांत प्रसिद्ध झाल्याकारणानेंच ईश्वराची ज्ञानविषयक श्रेष्ठता जगांत प्रसिद्ध झाली आहे. पहिल्या मंत्रभागांत त्याच्या शक्तीचें वर्णन आहे, आणि प्रबंध शक्तीचेंही वर्णन झालें आहे. या मंत्रभागांत त्याच्या ज्ञानशक्तीचें वर्णन झालें. सर्वांहून पूर्ण आणि श्रेष्ठ ज्ञान परमेश्वरच सर्वांना देतो. जे ध्यान धरतात ते त्यापासून समाधान प्राप्त करतात. हें सामर्थ्य फक्त परमेश्वराचेंच आहे. याप्रमाणें परमेश्वराच्या गंभीरपणाचें वर्णन या मंत्रांत खालीलप्रमाणें केलें आहे—

सत्यं अहं गभीरः । (मं. ३)

"हें सत्य आहे कीं मी गंभीर आहे " गंभीर त्याला म्हणतात कीं ज्याच्या सखोलतेचा थांग कुणाला लागत नाहीं. सर्वांहून गंभीर परमेश्वरच आहे, कारण कीं त्याच्या सखोलतेचा थांग आजपर्यंत कुणासही लागलेला नाहीं. इतकेंच नव्हें तर त्यानें निर्माण केलेल्या या सृष्टीचाही पुरतेपणीं थांग अजून कुणास लागलेला नाहीं. अशी त्याची गंभीरता आहे. हे गुण परमेश्वरांत असल्यानेंच परमेश्वराचें शासन सर्वतोपरी झालें आहे.

याप्रमाणें तृतीय मंत्रांत परमेश्वराचें भाषण श्रवण करून भक्त पुन्हां परमेश्वराच्या गुणांचें वर्णन करतो—

१ त्वत् अन्यः कवितरः न (मं. ४)
२ (त्वत् अन्यः) मेधया धीरतरः न (मं. ४)

"(१) तुझ्याहून भिन्न दुसरा कोणीही अधिक श्रेष्ठ कवि अथवा ज्ञानी नाहीं, आणि (२) तुझ्याहून भिन्न अधिक बुद्धिमानही दुसरा कोणी नाहीं. " अर्थात् तूंच या गुणांत सर्वांहून श्रेष्ठ आहेस. कारण कीं—

त्वं ता विश्वा भुवनानि वेत्थ । (मं. ४)
त्वं विश्वा जनिमा वेद । (मं. ५)

"तूंच या सर्व भुवनांना आणि जन्मांना जाणतोस. " संपूर्ण पदार्थमात्राचें ज्ञान तुझ्यांत आहे. तुला कोणताही पदार्थ अज्ञात नाहीं. तूं सर्वज्ञ, श्रेष्ठ कवि आणि विशेष ज्ञानी असल्यानें सर्व लोकांचे गुणदोष तूं यथास्थित जाणतोस. यासाठीं—

मायी जनः त्वत् बिभाय । (मं. ४)

"कुटिल मनुष्य तुला भितो." कारण कुटिल माणूस जरी दुसऱ्याबरोबर कपट करूं शकतो, तथापि परमेश्वराबरोबर तो कपट करूं शकत नाहीं. कारण परमेश्वर त्याच्या सर्व कृत्यांना यथावत्

जाणतो, त्याला अज्ञात असें कांहींच नाहीं. त्यामुळें सर्व छल, कपट करणारे नेहमीं त्याला भिऊन असतात. प्रकटरीत्या ते दाखवोत वा न दाखवोत, परंतु मनामध्यें ते नेहमीं भीत असतात. या परमेश्वराच्या सर्वज्ञतेमुळें, त्याचें शासन सर्वांवर झालेलें आहे.

पांचव्या मंत्रांतही हीच गोष्ट पुन्हा सांगितलेली आहे की, " तो ईश्वर सर्वांच्या जन्मांना यथावत् जाणतो. " असें आहे तर कोण त्याचेपासून काय लपवूं शकणार ? पांचव्या मंत्राच्या उत्तरार्धांत म्हटलें आहे कीं—

रजसः परः किम् अन्यत् अस्ति । (मं. ५)
किं परेण अवरम् ! (मं. ५)

" या प्रकृतीच्या पलीकडे दुसरें काय आहे आणि त्याच्या पलीकडेही दुसरें काय आहे ? " उत्तरांत सांगितलें आहे कीं—

रजसः एकं परः अन्यत् अस्ति ।
परः एकेन दुर्णशं चित् अर्वाक् ॥ (मं. ६)

" या प्रकृतीच्या पलीकडे एक श्रेष्ठ तत्त्व आहे आणि त्यांही पलिकडे अविनाशी तत्त्व आहे. याठिकाणीं प्रकृति, जीवात्मा आणि परमात्म्याचें वर्णन स्पष्टपणें आलेलें आहे. मनुष्यांनीं स्वतःच्या उन्नतीचा मार्ग परमेश्वरावलंबित निश्चयानें आहे असें समजणें हें इष्ट आहे.

धनप्राप्तींत दोष

वरीलप्रमाणें अध्यात्मविषयाचें वर्णन केल्यावर आतां थोडा व्यवहाराचा उपदेश दिला आहे. या लोकीं व्यवहार चालविण्यासाठीं धन पुष्कळ पाहिजे. हें धन मिळविण्याचे मार्ग पुष्कळ आहेत. परंतु—

पुनर्मघेषु भूरि अनवद्यानि । (मं. ७)

" पुन्हां पुन्हां धन मिळविण्यांत फार दोष आणि निंद्य कर्में घडतात. " अर्थात् दोष न घडूं देतां आणि निंद्य कर्म न करतां जितकें धन मिळविणें शक्य आहे तेवढेंच मिळविलें पाहिजे. दोष आणि निंद्य कर्मांचा अवलंब करून धन मिळविण्याचा व्यवहार करणारे सर्वथा दंडनीय समजले गेले पाहिजेत. याबाबतींत पहा—

पणयः अधोवचसः भवन्तु । (मं. ६)
दासाः भूमिं नीचैः उपसर्पन्तु । (मं. ६)

" व्यवहारांत निंद्य कर्में करून द्रव्य मिळविण्याची इच्छा करणाऱ्यांचीं तोंडें नेहमीं खालीं होवोत आणि दुसऱ्यांचा घातपात करून द्रव्य मिळविणारे अधोगतीला जावोत. " अर्थात् जें धन मिळविणें आहे तें धर्मानुकूल व्यवहार करूनच मिळविलें पाहिजे. कोणीही निंद्य व्यवहार आणि घातपात करून धन मिळविण्याचा प्रयत्न करूं नये.

या मंत्रभागांत " पणि " शब्द आहे. त्याचा अर्थ " खरेदी विक्री करणारा व्यापारी " असा होतो. पणि शब्दांत खरोखर कांहीं वाईट भाव नाहीं. परंतु वाचकांना हें माहितच असेल कीं व्यापारी लोकांत शुद्धधर्मानुसार व्यवहार करून द्रव्य मिळविण्याची इच्छा करणारे फार थोडे असतात आणि स्वच्छंदपणें वाटेल तसा भलाबुरा व्यवहार करून, थोड्या काळांत श्रीमंत होण्याची इच्छा करणारेच जास्त असतात. म्हणून उक्त मंत्रभागांत जो (**पणयः**) व्यापाऱ्यांचें तोंड खालीं होवो असा शाप दिला आहे, तो केवळ दुष्ट व्यवहार करणाऱ्या व्यापाऱ्यांना उद्देशूनच आहे. याप्रमाणेंच " दास " शब्दाचा धात्वर्थ " क्षय करणारे, घातपात करणारे " असा होतो. ' दुसऱ्यांना लुबाडून श्रीमंत होणारा ' असा अर्थ ' दास ' शब्दाचा करणें योग्य आहे. या सर्व कुत्सित व्यवहार करणाऱ्यांची शेवटीं दुर्दशाच होते. म्हणून धर्ममार्गानें उत्तम व्यवहार करून धनवान् होण्याचा प्रयत्न सर्वांनीं करावा, हाच उपदेश याठिकाणीं आहे. इतकें होऊनही—

एतावतः पणीन् मा सु अभिभूत् । (मं. ७)

" व्यापाऱ्यांचेंही नुकसान न होवो." अर्थात् उत्तम धर्मानुकूल व्यवहार करून योग्य लाभ त्यांनीं जरूर मिळवावा व तो त्यांना मिळावाही. जोंपर्यंत ते धर्मानुकूल व्यवहार करीत आहेत, तोंपर्यंत त्यांना कोणताही अडथळा न यावा. परंतु ज्यावेळीं ते धर्मनियमांचा भंग करतील, त्यावेळींच त्यांना दूर करावे व्यवहार करणाऱ्या सर्वच लोकांनीं हा उपदेश शिरोधार्य समजून, त्याप्रमाणें व्यवहार करून श्रीमंत व्हावें.

पुढच्या आठव्या आणि नवव्या मंत्रांत " परमेश्वराचें स्तोत्र अर्थात् ईशभक्ति सर्व लोकांत पसरो, " अशी इच्छा प्रगट केली आहे. याचा अर्थ एवढाच आहे कीं सर्वांनीं परमेश्वराच्या भक्तींत रंगून जावें, कीं ज्यामुळें वाईट व्यवहार करण्याची इच्छाच कोणास होणार नाहीं आणि सर्व लोक उत्तम रीतीनें धर्मानुकूल वर्तन करतील. ईश्वरभक्तीनें मनुष्याचें जीवनही पवित्रच होतें.

ईश्वराचा सखा

प्रत्येक मनुष्याला असा विश्वास असला पाहिजे कीं मी परमेश्वराचा मित्र आहें. जे धार्मिक भक्त आहेत, त्यांच्यांत हा भाव उत्पन्न होतो.

१ मे युज्यः सप्तपदः सखा असि । (मं. ९)
२ ते युज्यः सप्तपदः सखा असि । (मं. १०)
३ सखा नः असि । बंधुः च असि । (मं. ११)

ईश्वर माझा मित्र आणि बंधु आहे. वस्तुतः जीवात्मा आणि

परमात्मा परस्पर मित्र आणि बंधु, आणि एका वृक्षावर राहणाऱ्या दोन पक्ष्यांप्रमाणें परस्पर सख्य करणारे ते आहेत. कित्येक लोक असे आहेत की त्यांना परमेश्वराबरोबरच्या या मैत्रीचा अनुभव येत असतो. यासंबंधीं विचार केला असतां, असें दिसून येतें कीं, बहुतेक मनुष्यांनीं ही मित्रता ध्यानांतच घेतलेली नाहीं आणि ते प्रायः ती विसरलेच आहेत. ईश्वराबरोबर जिवंत आणि जागृत मैत्रीचा संबंध ठेवणारे संत-महन्त क्वचितच आढळतात. बाकीचे सर्व हा मैत्रीचा संबंध विसरूनच गेलेले आहेत. हा ईश-मैत्रीचा संबंध अंतःकरणांत जेवढा दृढ आणि जाग्रत होईल तेवढा चांगला आहे. ज्यांच्यांत हा संबंध जागृत होतो तेच—

देहि नु मे यत् मे अदत्त । (मं. ९)
ददामि तत् यत् ते अदत्त । (मं. १०)

" जें आजपर्यंत मला मिळालेलें नाहीं तें तूं मला दे. मीही तें तुला देतों, जें आजपर्यंत मी तुला दिलेलें नाहीं. " हा भक्त आणि ईश्वराचा वार्तालाप त्यावेळीं प्रत्यक्ष होऊं शकतो कीं ज्या-वेळीं मनुष्य दृढ निश्चयानें परमेश्वराला स्वतःचा मित्र समजून त्याप्रमाणें अनुभव घेतो. जी आजपर्यंत मिळालेली नाहीं ती वस्तु म्हणजे ' मोक्ष ' आणि तीच भक्त मागतात व परमेश्वर देतोही. परमेश्वराकडून प्राप्त होणारें हें अन्तिम दान आहे व तें भक्ताला शेवटीं प्राप्त होतें.

प्रातःकाळची ईश्वर प्रार्थना

कांड ३, सूक्त १६

(ऋषिः- अथर्वा । देवता- बृहस्पतिः, बहुदेवत्यम्)

प्रातरग्निं प्रातरिन्द्रं हवामहे प्रातर्मित्रावरुणा प्रातरश्विना ।
प्रातर्भगं पूषणं ब्रह्मणस्पतिं प्रातः सोममुत रुद्रं हवामहे ॥ १ ॥
प्रातर्जितं भगमुग्रं हवामहे वयं पुत्रमदितेर्यो विधर्ता ।
आध्रश्चिद्यं मन्यमानस्तुरश्चिद्राजा चिद्यं भगं भक्षीत्याह ॥ २ ॥

अर्थ— (**प्रातः अग्निं**) प्रातःकाळीं अग्नीची (**प्रातः इन्द्रं**) प्रातः काळीं इंद्राची (**प्रातः मित्रावरुणौ**) प्रातः-काळीं मित्र आणि वरुणाची आणि (**प्रातः अश्विनौ**) प्रातःकाळीं अश्विनी देवांची (**हवामहे**) आम्ही स्तुति करतों. (**प्रातः पूषणं ब्रह्मणस्पतिं भगं**) प्रातःकाळीं पूषा, ब्रह्मणस्पति व भग नामक देवांची, त्याचप्रमाणें (**प्रातः सोमं उत रुद्रं हवामहे**) प्रातःकाळीं सोम आणि रुद्राची आम्ही प्रार्थना करीत आहों. (१)

(**वयं प्रातर्जितं अदितेः उग्रं पुत्रं भगं हवामहे**) आम्हीं प्रातःकाळीं अदितीच्या विजयी आणि शूर पुत्र भगाची प्रार्थना करतों, (**यः विधर्ता**) जो विशेष प्रकारें धारण करणारा आहे (**आध्रः चित्**) अशक्तही त्याचप्रमाणें (**तुरः चित् यं**) बलवान्‌ही ज्याला व (**राजा चित्**) राजाही (**यं मन्यमानः**) ज्याचा सन्मान करतो व (**' भगं भक्षि ' इति आह**) " धनाचा भाग मला दे " असें म्हणतो. (२)

भावार्थ— प्रातःकाळीं आम्ही अग्नि, इंद्र, मित्रावरुण, अश्विनीकुमार, पूषा, ब्रह्मणस्पति, भग सोम आणि रुद्र नामक भगवानाची प्रार्थना करतों. (१)

या प्रातःकाळीं अदीनतेच्या शूर पुत्राची आम्ही प्रार्थना करतों, जो भगवान् सर्वांना विशेष प्रकारें धारण करतो आणि ज्याला अशक्त त्याचप्रमाणें सशक्त, राजा रंक सर्व एक सारखेच परमपूज्य मानतात आणि स्वतःला भाग्यवान् करण्याच्या इच्छेनें प्रार्थना करतात. (२)

भग प्रणेतर्भग सत्यराधो भगेमां धियमुदवा ददन्नः ।
भग प्र णो जनय गोभिरश्वैर्भग प्र नृभिर्नृवन्तः स्याम ॥ ३ ॥
उतेदानीं भगवन्तः स्यामोत प्रपित्व उत मध्ये अह्नाम् ।
उतोदिता मघवन्त्सूर्यस्य वयं देवानां सुमतौ स्याम ॥ ४ ॥
भग एव भगवाँ अस्तु देवस्तेना वयं भगवन्तः स्याम ।
तं त्वा भग सर्व इज्जोहवीमि स नो भग पुरएता भवेह ॥ ५ ॥
समध्वरायोषसो नमन्त दधिक्रावेव शुचये पदाय ।
अर्वाचीनं वसुविदं भगं मे रथमिवाश्वा वाजिन आ वहन्तु ॥ ६ ॥
अश्वावतीर्गोमतीर्न उषासो वीरवतीः सदमुच्छन्तु भद्राः ।
घृतं दुहाना विश्वतः प्रपीता यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ॥ ७ ॥

अर्थ—हे (भग) भगवान् ! हे (प्र-नेतः) महान् पुढाऱ्या ! हे (**सत्यराधः भग**) सत्य सिद्धि देणाऱ्या ईश्वरा ! (**इमां धियं ददत् न उत अव**) ही बुद्धि प्रदान करून तूं आमचें रक्षण कर. हे (**भग**) भगवन् ! (**गोभिः अश्वैः नः प्रजनय**) गाय, घोडे यांच्यासह तूं आमची संतानवृद्धि कर. हे (**भग**) भगवन् ! (**नृभिः नृवन्तः स्याम**) चांगल्या मनुष्यांबरोबर राहून मनुष्यांनीं युक्त असें आम्ही व्हावें. (३)

(**उत इदानीं भगवन्तः स्याम**) आतां आम्ही भाग्यवान् होऊं (**उत प्रपित्वे उत मध्ये अह्नाम्**) त्याचप्रमाणें संध्याकाळीं आणि दुपारचे वेळींही, हे (**मघवन्**) भगवन् ! (**उत सूर्यस्य उदितौ**) आणि सूर्योदयाच्या वेळीं (**वयं देवानां सुमतौ स्याम**) आम्ही देवांच्या सुमतींत राहूं. (४)

(**भगवान् भगः देवः अस्तु**) भगवान् भगदेव माझ्या बरोबर असो, (**तेन वयं भगवन्तः स्याम**) त्यांचे सहाय्यानें आम्ही भाग्यवान होऊं. हे (**भग**) भगवन् ! (**तं त्वा सर्वः इत् जोहवीमि**) त्या तुला मी सर्व रीतीनें भजतों. (**भग**) देवा ! (**सः नः पुरएता इह भव**) तूं आमचा पुढारी येथें हो. (५)

(**उषसः अध्वराय संनमन्त**) उषा यज्ञासाठीं उत्तम प्रकारें नम्रत्वानें राहो (**शुचये पदाय दधिक्रावा इव**) ज्याप्रमाणें शुद्ध केलेल्या जागीं पाय ठेवण्याची घोडा इच्छा करतो. (**वाजिनः अर्वाचीनं वसुविदं भगं मे आवहन्तु**) हे घोडे इकडे धनपति प्रभूला माझेकडे आणोत. (**अश्वाः रथं इव**) ज्याप्रमाणें घोडे रथाला आणतात. (६)

(**अश्वावतीः गोमतीः वीरवतीः भद्राः उषासः**) घोडे, गाई आणि वीरांनीं युक्त कल्याणकारी उषा (**नः सदं उच्छन्तु**) आमच्या घरांना प्रकाशित करो. (**घृतं दुहानाः**) घृत प्राप्त करतां करतां (**विश्वतः प्रपीताः**) सर्व प्रकारें धष्टपुष्ट होऊन (**यूयं स्वस्तिभिः सदा नः पात**) तुम्ही सर्व अनेक कल्याणांसह आमचें सर्वांचें रक्षण करा. (७)

भावार्थ— हे आम्हां सर्वांच्या मोठ्या पुढाऱ्या ! हे सत्यसिद्धि देणाऱ्या ईश्वरा ! आमच्या शुद्ध बुद्धीची वृद्धि करून तूं आमचें रक्षण कर ! गायी आणि घोडे यांच्या वृद्धीबरोबर आमची संतानवृद्धीही तूं कर, आमच्या सहवासांत नेहमीं श्रेष्ठ मनुष्य राहतील असें कर. (३)

प्रातःकाळीं, दुपारीं तसेंच सायंकाळीं आम्हां अशीं शुभकर्में करावींत कीं ज्यामुळें, आम्ही भाग्यशाली होत राहूं ! सूर्योदयकाळीं देवाच्या उत्तमबुद्धीनें युक्त आम्ही भाग्यशाली होऊं. (४)

भगवान् परमेश्वर आम्हांला भाग्य देवो, त्याच्या कृपेनें आम्ही भाग्यशाली होऊं ! हे देवा ! आम्ही सर्व तुझें भजन करतों, त्यामुळें तू प्रसन्न हो आणि आम्हाला योग्य मार्गावर चालविणारा आमचा पुढारी हो. (५)

उषःकाळची वेळ अहिंसामय अकुटिल अशा सत्कर्मांच्या दिशेकडे वळो आणि त्या कर्मांनीं धनवान् देव आमच्या अधिक जवळ येवो. (६)

ज्या उषःकाळीं घोडे, गाई आणि वीर पुरुष उत्साहानें कार्यें करीत असतात, अशी उषा आमच्या घरांना प्रकाशित करो. अशा उषा घृत प्राप्त करून आणि सर्वांना दुग्ध पाजून, अनेक कल्याणासह आमचें सर्वांचें रक्षण करोत ! (७)

प्रातःकाळची ईश्वर प्रार्थना

प्रातःकाळची प्रभुप्रार्थना

प्रातःकाळीं उठून देवाची प्रार्थना केली पाहिजे. आपलें मन शुद्ध आणि पवित्र बनवून एकाग्रतेनें ही प्रार्थना झाली पाहिजे. यावेळीं विरोधाचा एकही विचार मनांत येतां नये आणि परमेश्वरभक्तीचाच विचार मनांत जागृत राहिला पाहिजे. या प्रमाणें शुद्ध भावनेनें सकाळच्या पवित्र वेळीं केलेली प्रार्थना परमेश्वर ऐकतोच. त्यामुळें—

सर्वांचा उपास्य देव

आध्रश्चिद्यं मन्यमानस्तुरश्चिद्राजा चिद्यं भगं भक्षीत्याह ॥ (मं. २)

यावेळीं निर्बल आणि बलवान, प्रजाजन आणि राजा समानभावानें प्रभूची आदरपूर्वक प्रार्थना करतात आणि त्याचेपाशीं आपल्या भाग्याचा भाग मागतात. "कारण कीं निर्बल आणि बलवान, प्रजा आणि शासक हे सर्व त्या परमेश्वरासमोर समान भावानेंच राहतात. या मंत्राचे शब्द विचाराच्या दृष्टीनें अधिक पहाण्यासारखे आहेत. या करितां या शब्दांचे अर्थ आतां पहा—

१ **आध्रः**— आधार देण्याला योग्य, ज्याला दुसऱ्याच्या आधाराची आवश्यकता असते, निर्बल, अशक्त, निर्धन.

२ **तुरः**— त्वरायुक्त, वेगानें कार्य करणारा, वेगवान्, पुढें होणारा, बलवान्, सामर्थ्यवान्, स्वतःच्या शक्तीनें पुढें सरणारा.

३ **राजा**— शासन करणारा, सत्तावान्, दुसऱ्यावर अधिकार गाजविणारा.

येथील या राजा शब्दाच्या प्रयोगानें याठिकाणीं शासित होणाऱ्या प्रजेचाही बोध होतो. निर्बल, अशक्त, निर्धन, शासित इत्यादि लोक आणि बलशाली, समर्थ, धनी आणि शासक हे या जगांत साधारण दृष्टीनें जरी उच्चनीच समजले जातात तरी जगन्नियंत्या परमेश्वरासमोर हे सर्व समान भावानेंच रहातात. परमेश्वराच्या दृष्टीनें उच्चनीच नाहीं. परमेश्वराची प्रार्थना रंक जशी करतो, तशीच राजाही करतो. दोघेही परमेश्वर कृपेनेंच आपल्या भाग्याची वृद्धि होते असें समजतात. याप्रमाणें हा परम पिता भगवान् सर्वांचा सारखाच रक्षणकर्ता आहे. त्याच प्रमाणें—

यः विधर्ता । (मं. २)

" सर्वांना विशिष्ट रीतीनें धारण करणारा आहे. " साधारण धारणकर्ते दुसरे पुष्कळ असतात, परंतु परमात्मा धारणकर्त्यांचाही आधार आहे. त्यामुळें त्याला ' विशेष धारक ' असें म्हणतात. हा—

प्रातर्जितं अदितेः पुत्रं भगं । (मं. २)

" **(प्रातः जितं)** प्रातःकाळींही विजयी आहे. " अर्थात् अन्य वीर युद्ध करतील व नंतर विजयी होतील. या कार्यासाठीं त्यांना विजय मिळविण्यास कांहीं समय लागेल.परंतु परमात्मा नेहमीं विजयीच आहे. काळाची सुरुवात ज्या उषःकालापासून होते, त्या उषःकालापासूनच परमेश्वर विजयी आहे. नंतर तो विजयी होईलच परंतु आरंभापासूनच तो विजयी आहे. ही गोष्ट येथें स्पष्ट सांगितली आहे.

अदीनतेचा रक्षक

" **दिति** " म्हणजे पराधीनता अथवा दीनता आणि अ-दिति म्हणजे स्वतंत्रता, स्वाधीनता आणि अदीनता. या स्वाधीनतेचा हा पुत्र म्हणजे (**पु-त्र=पुनाति च त्रायते च इति पुत्रः**) पवित्रतायुक्त व तारण करणारा आहे. याचमुळें तो भाग्यवान् असल्यानें त्याला " **भग** " म्हणतात. जो पवित्रतेबरोबर स्वाधीनतेचें रक्षण करील तोच भाग्यवान् होईल आणि ऐश्वर्यवान्ही होईल. अ-दितिचा पुत्र होणें हें महान् पुरुषार्थाचें कार्य आहे. ही गोष्ट साधारण नाहीं. परमेश्वर तर स्वयंसिद्ध स्वाधीनतेचा रक्षक आहे, त्यामुळें त्याला ही सिद्धि स्वभावसिद्धच आहे. अर्थात् प्रयत्नावांचूनच मिळाली आहे. पुरुषार्थी मनुष्य स्वतःच्या पुरुषार्थानेंच स्वाधीनतेचा रक्षक होतो. त्याला ही सिद्धि परमेश्वराच्या उपासनेपासून प्राप्त होते. याची उपासनाही कोण कोणत्या रूपांत करतो, याचें वर्णन पहिल्या मंत्रांत दिलें आहे.

उपासनेची पद्धति

" अग्नि, इन्द्र, मित्र, वरुण, अश्विनीकुमार, पूषा, ब्रह्मणस्पति, सोम, रुद्र, भग यांची आम्ही उपासना करतों. " (मं.१) हें य

मंत्राचें कथन आहे. एकाच परमेश्वराचीं हीं गुणबोधक निरनिराळीं विशेषणें आहेत. या सूक्तांत ' भग ' म्हणजे ऐश्वर्याची प्रधानता असल्यानें ' भग ' शब्द मुख्य आहे आणि इतर शब्द त्याचीं विशेषणें आहेत. जर कुणाला अन्य गुणांची उपासना करणें असेल त्यानें त्या गुणवाचक नामाला मुख्य मानून इतर शब्दांना त्याचीं विशेषणें मानणें शक्य आहे. ज्याप्रमाणें (१) भाग्योदयाची इच्छा करणाऱ्यानें ' भग ' नामाला मुख्य मानून त्याची उपासना करावी. (२) ज्ञानप्राप्तीची इच्छा करणाऱ्यानें ' ब्रह्मणस्पति ' नामाला मुख्य समजून त्याची उपासना करावी. (३) प्रभुत्वाची इच्छा करणाऱ्यानें ' इन्द्र ' नामाला मुख्य समजून त्याची उपासना करावी. (४) पुष्टीची इच्छा करणाऱ्यानें ' पूषा ' नामाला मुख्य मानून त्याची उपासना करावी. (५) शांतीची इच्छा करणाऱ्यानें ' सोम ' नामाला मुख्य मानून त्याचीं उपासना करावी. (६) उग्रतेची इच्छा करणाऱ्यानें ' रुद्र ' नामाला मुख्य मानून त्याची उपासना करावी.

याप्रमाणें उपासनाभेदानें नामांना मुख्य वा गौण मानून, त्याप्रमाणें उपासना करून आपल्यामध्यें त्या गुणांची वृद्धि करावी. त्या एका परमेश्वराचीच अग्नि आदि हीं अनंत नामें आहेत. या प्रथम मंत्रांत आलेले सर्व शब्द एकाच परमात्म्याचे वाचक आहेत.

एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति । (ऋग्वेद)

एकाच सद्वस्तूचें कविलोक भिन्नभिन्न नामानें वर्णन करतात. त्यामुळें कोणत्याही नामाला प्रधान मानून उपासना केली तरी ती त्या परमात्म्याचीच उपासना होते, आणि ज्या गुणाचें चिंतन करण्यांत येते त्याची वृद्धि होत जाते. ज्या गुणाचा मनाला ध्यास लागतो तो गुण मनांत वृद्धीला पावतो. या नियमाप्रमाणें ही उपासना होते. उपासनेच्या सौकर्यासाठीं या शब्दांचे विशेष अर्थ खालीं दिले आहेत—

(१) **अग्निः**– तेज, प्रकाश, उष्णता आणि गति करणारा
(२) **इन्द्रः**– शत्रूंना दूर करणारा, ऐश्वर्यवान्, नियामक, शासन करणारा राजा.
(३) **मित्रः**– मित्रदृष्टीनें सर्वांवर प्रेम करणारा, सर्वांचें हित करणारा.
(४) **वरुणः**– श्रेष्ठ, निष्पक्षपातानें सत्यासत्याचें निरीक्षण करणारा, वरिष्ठ.
(५) **अश्विनौ**– धन आणि ऋणशक्तीनें युक्त, वेगवान्, सर्वव्यापक, सर्वत्र उपस्थित.
(६) **भगः**– भाग्यवान्, ऐश्वर्ययुक्त, धनवान्.
(७) **पूषा**– पोषक, पुष्टि करणारा.
(८) **ब्रह्मणस्पतिः**– ज्ञानाचा स्वामी, ज्ञानी.
(९) **सोमः**– शांत, आल्हाद देणारा, कलानिधि, कलावान्, मधुर, प्रसन्नता देणारा.
(१०) **रुद्रः**– उग्र, प्रचंड, भयानक, गर्जना करणारा, वीर, शूर, वीरभद्र, शत्रुविध्वंसक वीर, शत्रूंना रडविणारा.

प्रथम मंत्रांत आलेल्या दहा शब्दांचे हे अर्थ आहेत. वाचक या शब्दांच्या मननानें ईश्वराची उपासना करूं शकतात. जो गुण आपल्यांत वाढवून घेण्याची इच्छा असेल त्या गुणवाचक शब्दानें ईश्वराचें ध्यान करावें व अन्य शब्दांना गुणबोधक विशेषणें मानावीत अशी उपासनेची पद्धति आहे. याप्रमाणें मनन आणि निदिध्यास केल्यानें मनाचें वायुमंडल अर्थात् मनाचें वातावरण तसें तयार होतें आणि आवश्यक अशा गुणांचा मनांत विकास होतो. या ठिकाणीं वाचकांनीं हें ध्यानांत ठेवावें कीं स्वतःच्या उन्नतीसाठीं आवश्यक त्या गुणांचा विकास साधण्यासाठीं मनामध्यें त्याप्रकारचें वायुमंडळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठींच तृतीय मंत्रांत सांगितलें आहे कीं—

धारणा

इमां धियं दद्न्नः उदव । (मं. ३)

" या बुद्धीला वाढवितां वाढवितां आमची उन्नति करून आमचें रक्षण कर. " या प्रार्थनेंत धन मागितलेलें नाहीं, परंतु बुद्धि मागितली आहे. ही ' धारणावती बुद्धि ' जी कर्मशक्तीनें युक्त असते. ही गोष्ट येथें विशेष प्रकारें ध्यानांत ठेवणें इष्ट आहे. भाग्य प्राप्त करणें असेल, धन, ऐश्वर्याची वृद्धि करणें असेल, अथवा प्रभुत्व संपादन करणें असेल तर या सर्वांसाठीं पुरुषार्थ करण्यांत समर्थ अशा धारणात्मक बुद्धीची आवश्यकता आहे. त्याशिवाय उन्नति होणें संभवनीय नाहीं. धी शब्दांत ज्याप्रमाणें बुद्धिमत्तेचा भाव आहे त्याचप्रमाणें पुरुषार्थप्रधान कर्मशक्तीचाही भाव आहे, हें विसरतां कामा नये. ही बुद्धि जेवढी वाढेल, तेवढी मनुष्याची योग्यता वाढते. ज्या बुद्धींत ज्ञानशक्ति पुरुषार्थशक्तीशीं संमिश्र असेल अशी बुद्धि आम्हांला दे, ही इच्छा " इमां धियं " या शब्दांत आहे. पहिल्या व दुसऱ्या मंत्रांत ज्या बुद्धि आणि कर्मशक्तीचा विकास करण्याचा उपदेश केला

आहे, ती बुद्धीच या तिसऱ्या मंत्रांत (**इमां धियं उदन्**) ' त्या बुद्धीला या ' या शब्दांत मागितली आहे. येथें प्रश्न असा उभा राहतो कीं कोणती बुद्धि प्रथम व द्वितीय मंत्रांत सांगितली आहे ? त्याचें उत्तर या मंत्राच्या मननानेंच मिळणें शक्य आहे. मनन करण्यासाठीं पूर्वी शब्दार्थ दिलेलाच आहे. परंतु विशेष स्पष्टतेसाठीं या ठिकाणीं थोडें अधिक स्पष्टीकरण करीत आहोत.

उपासना — आणि त्यांपासून सिद्ध होणारी — धारणा

मंत्राचा शब्दार्थ — आणि त्यांपासून उद्दीपित होणारा — बुद्धीचा भाव

प्रथम मंत्र

(**अग्निं**) तेजस्वी परंतु (**सोमं**) शांत गोड स्वभावाचा (**मित्रा-वरुणौ**) मित्रदृष्टीनें सर्वांना पहाणारा आणि निष्पक्षपाती होऊन सत्यासत्य पहाणारा (**पूषणं**) पोषण करणारा असा जो (**ब्रह्मणस्पतिं**) ब्रह्मज्ञानी देव त्याची प्रार्थना मी सकाळीं करतों.

(**अश्विनौ**) वेगवान् धनऋण शक्तीवान् आणि (**रुद्रं**) शत्रूला रडविणारा, (**भगं**) भाग्यवान् (**इन्द्रं**) शत्रूंना दूर करणारा शासनकर्ता असा जो परमेश्वर त्याची मी प्रातःकाळचे वेळीं प्रार्थना करतों.

(१)

(१) मी तेजस्वी होईन. परंतु (२) शांत आणि मधुर स्वभाव धारण करून (३) मित्र दृष्टीनें सर्व भूतमात्रांना पाहीन (४) निष्पक्षपातानें सत्यासत्याची परीक्षा करीन (५) दुसऱ्यांना यथाशक्ति सहाय्य देवून त्यांचें पोषण करीन आणि (६) माझ्यांत ज्ञानाची वृद्धि करीन.

(१) मी माझा वेग वाढवून (२) शत्रूला रडविण्यास योग्य पराक्रम युद्धभूमीवर करीन आणि (३) भाग्यवान् होऊन माझ्या सर्व शत्रूंना दूर करून उत्तम व्यवस्थेनें शासन चालवीन

द्वितीय मंत्र

(**प्रातर्जितं**) नित्यविजयी (**उग्रं**) उग्र शूरवीर परमात्म्याची मी प्रातःकाळीं प्रार्थना करतों. याच प्रभूची भक्ति अशक्त, सशक्त, राजा, रंक सर्व करतात आणि स्वतःच्या भाग्याचा भाग त्याचे पाशीं मागतात; कारण कीं तो (**विधर्ता**) सर्वांना धारण करणारा आणि (**अदितेः**) बंधनरहित अवस्थेचा (**पु-त्रः**) पावनकर्ता आणि तारणकर्ता आहे.

(२)

मी प्रातःकाळीं माझ्या विजय साधनाचा विचार करतों. त्यासाठीं आवश्यक उग्रता मी धारण करीन आणि परमेश्वराची भक्ति करून माझ्या अदीनतेचें अहर्निश रक्षण करण्याचा प्रयत्न करीन. त्याचप्रमाणें माझ्यांत सर्व प्रकारची पवित्रता वाढवितां वाढवितां माझ्यांत रक्षणशक्तीही वाढवीन.

उपासनेच्या मंत्रांनीं धारणाशक्ति कशी असते ती रीत या या ठिकाणीं दाखविली आहे. पुत्र पित्यासारखा होतो आणि पिता जें करतो तें पुत्र करूं लागतो– करण्याचा प्रयत्न करतो. ही गोष्ट परमपित्याच्या गुणगानानेंच होऊं शकते. कारण या जीवात्मारूप अमृत पुत्रानें परमेश्वराप्रमाणें सच्चिदानंद स्वरूपाला प्राप्त केलेंच पाहिजे. त्या मार्गावर तो जातो आणि त्याकरितां उपासना करतो.

(१) ' परमेश्वर ज्ञानी आहे ' हें वाक्य उच्चारल्याबरोबर मनांत असा विचार येतो कीं ' मीही ज्ञानी होईन व अधिक ज्ञान प्राप्त करून घेईन. '

(२) परमेश्वर शत्रूचें निवारण करणारा आहे ' हें म्हटल्याबरोबर मनांत अशी भावना निर्माण होते कीं, ' मीही शत्रूचें निवारण करून शत्रुरहित बनेन. '

(३) त्याचप्रमाणें ' परमेश्वर ऐश्वर्यसंपन्न आहे ' हें म्हटल्याबरोबर मनांत विचार येतो कीं, ' मीहि ऐश्वर्य मिळविण्यासाठीं पुरुषार्थ करीन. '

(४) ' या रीतीनें परमेश्वर या विश्वाचा कर्ता आहे ' हें म्हटल्याबरोबर मनांत असें वाटायला लागतें कीं, ' मीही कांहीं विलक्षण कार्य करावें. ' याप्रमाणें उपासना आणि धारणा यांचा अन्योन्यसंबंध आहे. ज्यावेळीं बुद्धीमध्यें कोणता तरी विशिष्ट विचार स्थिर होऊन दृढ होतो, त्यावेळीं त्या बुद्धीला ' धी ' म्हणतात. वाचकांच्या आतां ध्यानांत आलेंच असेल कीं प्रथम

आणि द्वितीय मंत्रांच्या उपासनेनें जी धारणात्मक बुद्धि बनते तीच कर्ममयी ज्ञानशक्ति कशी आहे आणि ती मनुष्यमात्राचा उद्धार करण्यासाठीं कशी सहाय्यक होऊं शकते. (**इमां धियं ददन् नः उत् अव**) (मं. ३) ' ही धारणात्मक बुद्धि देऊन आमची उन्नति करतां करतां आमचें रक्षण कर, ' या तृतीय मंत्राच्या उपदेशांत हा किती महत्वपूर्ण भाग आहे, याचा विचार वाचकांनीं येथें करावा आणि याप्रमाणें मंत्राच्या उपासनामय वाणीनें स्वतःच्या उद्धाराचा मार्ग समजून घेवून वाचकांनीं स्वतःच्या अभ्युदयाचें व निःश्रेयसाचें साधन करावें.

सत्याचा मार्ग

तृतीय मंत्रांत " प्रणेतः " आणि " सत्यराधः " असे दोन शब्द विशेष महत्वाचे आहेत. " प्र-नेता " या शब्दाचा अर्थ ' उत्कर्षाकडे घेवून जाणारा पुढारी ' आणि " सत्यराधः " या शब्दाचा अर्थ ' सत्यमार्गानें सिद्धि प्राप्त करून देणारा ' असा आहे. हे दोन्ही शब्द परमेश्वराचे गुण दाखवितात. परमात्मा सर्वांना उन्नतीच्या मार्गाला घेवून जातो आणि सत्यमार्गानें ही सर्वांना सिद्धि देतो. त्यामुळें हे दोन्ही शब्द परमात्म्यांत सार्थ आहेत. हे दोन शब्द मनुष्यवाचकही होतात. त्यावेळीं त्यांचा अर्थ फारच बोधप्रद होतो. मनुष्य तसेच मनुष्यांचे पुढारी हे शब्दांनीं आपल्या आचरणानें आपल्यांत चरितार्थ करोत, मनुष्यांतील पुढारी आपल्या अनुयायांना उत्कर्षाच्या मार्गाला नेवोत व सिद्धीसाठीं, सत्याच्या सरळ मार्गानेंच स्वतःचें कार्य करोत आणि यश प्राप्त करोत. अशा सत्यमार्गानें सिद्धि प्राप्त करणाऱ्या मनुष्यालाच " नृ अथवा नर " म्हणतात; आणि अशा श्रेष्ठ-सत्य पुढाऱ्याच्या सहवासांतच राहून मनुष्याला मनुष्याबरोबर राहिल्याचें सुख प्राप्त होऊं शकतें. म्हणूनच म्हटलें आहे कीं—

नृभिः नृवन्तः स्याम । (मं. ३)

' श्रेष्ठ मनुष्यांचे बरोबर राहिल्यानें आम्ही मनुष्ययुक्त होऊं. ' याठिकाणीं ' **नृवान्** ' शब्द " मातृमान्, पितृमान् " अशा शब्दांच्या समानार्थक आहे. ज्याप्रमाणें (**मातृमान्**) प्रशंसनीय गुणवान् मातेनें युक्त, (**पितृमान्**) प्रशंसनीय गुणवान् पित्यानें युक्त, त्याचप्रमाणें (**नृमान्**) (**नृवान्**) म्हणजे प्रशंसनीय श्रेष्ठ मनुष्यांनीं युक्त !

वास्तविक प्रत्येक मनुष्याबरोबर कोणीतरी मनुष्य रहातच असतो. चोराबरोबरही त्याचे साथीदार चोर रहातातच, परंतु या चोराला ' नृमान्-नृवन् ' म्हणतां येणार नाहीं. चांगल्या माणसाबरोबर राहूनच मनुष्याचा अभ्युदय होण्याचा संभव आहे. म्हणून ' स्वतःच्या सहवासांत चांगलीं माणसें राहोत ' अशी इच्छा याठिकाणीं प्रगट केली आहे. याप्रमाणें चांगल्या माणसांचा सहवास मिळाल्यानें निःसंदेह मनुष्याचें कल्याण होऊं शकतें.

देवांची सुमति

' आम्ही सकाळीं, दुपारीं आणि सायंकाळीं अशीं कर्मे करूं कीं ज्यामुळें आम्ही (**भगवन्तः**) भाग्यवान् होऊं आणि आम्ही देवांच्या उत्तम मतींत राहूं, ' (मं. ४) असें चतुर्थ मंत्रानें कथन आहे. या ठिकाणीं सबंध दिवसभर पुरुषार्थ आणि प्रयत्न करण्याची सूचना देण्यांत आली आहे. सकाळीं काय, दुपारीं काय किंवा संध्याकाळीं काय, स्वतःचें ऐश्वर्य वाढविण्यासाठीं पुरुषार्थ केलाच पाहिजे. सत्यमार्गानें चालतां चालतां असें कर्म केलें पाहिजे कीं ज्यापासून भाग्य प्राप्त होईल.

ज्या ठिकाणीं भाग्य प्राप्त होत असतें, त्या ठिकाणीं मनुष्यांत स्वार्थ उत्पन्न होऊं शकतो आणि भाग्याच्या मदांत सत्यासत्यतेचा विचार रहात नाहीं. त्यामुळें भाग्यप्राप्तीचा उद्योग करण्याचा उपदेश करणाऱ्यानें या मंत्रांत सांगितलें आहे कीं —

वयं देवानां सुमतौ स्याम । (मं. ४)

" आम्ही देवाच्या सुमतींत रहावें. " अर्थात् भाग्यप्राप्तीच्या वेळीं आमचेकडून असें आचरण व्हावें कीं ज्यामुळें देव असंतुष्ट न व्हावे, आमचेवर अप्रसन्न न व्हावे आणि शेवटीं आमच्या बाबतींत त्यांचे मनांत नेहमीं उत्तम भाव टिकून राहो. आमचेकडून अशीं कर्में होवोत कीं ज्यामुळें तो परमेश्वर नेहमीं संतुष्ट व्हावा. या मंत्रांत ही सावधानीची सूचना अत्यंत महत्वाची आहे. कारण कीं भाग्य आणि ऐश्वर्य हे दोन पदार्थ असे आहेत कीं जे प्राप्त झाले असतां अथवा ज्यांच्या प्राप्तीच्या इच्छेनें मनुष्य सन्मार्गावर चालणें कठिण आहे, परंतु वेदाला मनुष्यांना सन्मार्गावर ठेवूनच भाग्य देणें अभीष्ट आहे. त्यामुळें जेथें पतन होण्याची संभावना असेल तेथें याप्रमाणें सावधानीची सूचना देण्यांत येत असते. उद्देश हा कीं मनुष्याचें पतन न व्हावें आणि त्यानें भाग्यही प्राप्त करावें.

पांचव्या मंत्रांत (**स नो भग पुरएता भवेह**) (मं. ४)

" हे परमेश्वर तूं आमचा अग्रेसर हो. " असा उपदेश दिला आहे. त्यांतील उद्देशही हाच आहे कीं मनुष्य परमेश्वरालाच स्वतःचा पुढारी समजो आणि स्वतःला त्याचा अनुयायी मानो आणि त्याच्याच प्रकाशांत कार्य करित स्वतःच्या उन्नतीसाठीं कार्य करो. पतनापासून वांचविण्याच्या हेतूनें हा उपदेश दिला आहे. सर्वज्ञ परमेश्वर हा आपल्या कार्यांचा निरीक्षक आहे, असा

विश्वास मनुष्याला पतनापासून पुष्कळ प्रकारें वांचवूं शकतो.

अहिंसेचा मार्ग

सहाव्या मंत्रांत अध्वरमार्गानें जाण्याचा उपदेश आहे. हा अध्वरमार्ग समजण्यासाठीं अध्वर शब्दाचा अर्थ समजला पाहिजे–

अध्वर— (**अ-ध्वराः**) अकुटिलता, जेथें वांकडेपणा नाहीं. ज्याठिकाणीं अत्यंत सरळभाव आहे, जेथें हिंसा नाहीं, जेथें दुसऱ्याचा घातपात करण्याचा हेतु नाहीं, जेथें दुसऱ्यांना कष्ट देऊन स्वतःचा स्वार्थ साधण्याचा विचारच नाहीं, अशा मार्गाला अध्वर मार्ग म्हणतात.

अध्वर शब्दाचा अर्थ

हा अध्वर शब्दाचा अर्थ या मार्गाचें स्वरूप दाखवितो. या अहिंसेच्या मार्गानें जाणें आणि पांचव्या मंत्रांत ' परमेश्वराला स्वतःचा पुढारी बनविणें ' चौथ्या मंत्रांत ' देवाच्या सुमतींत रहाणें ' आणि तिसऱ्या मंत्रांत ' सत्यमार्गानें सिद्धि प्राप्त करणें ' या सर्व मंत्रांत सांगितलेल्या भिन्नभिन्न उपदेशाच्या बाबतीं मुळांमध्यें तात्पर्यार्थानें एकच आहेत. एकच गोष्ट विविध प्रकारानें या सूक्तांत सांगितली आहे. यावरून हें स्पष्ट होतें कीं वेदाचा उद्देश लोकांना अहिंसामार्गाकडे प्रवृत्त करण्याच्या विषयांत किती दृढ आणि स्पष्ट आहे.

गायी आणि घोडे

या सूक्ताच्या तृतीय मंत्रांत ' गाई आणि घोड्यांसह आम्हांला युक्त कर ' असें सांगितलें आहे. सातव्या मंत्रांत तीच गोष्ट पुन्हां सांगितली आहे. यावरून घरांत गाई आणि घोडे असणें, वेदांच्या दृष्टीनें घराचें भूषण आहे, ही गोष्ट सिद्ध होते.

दूध, दही, तूप

सातव्या मंत्रात (**घृतं दुहानाः**) ' घृताचें दोहन करणारी ' आणि (**विश्वतः प्रपीताः**) ' सर्व प्रकारें दुग्धपान करवणारी. ' हें उषेचें वर्णन सकाळचे वेळीं दुधाचें दोहन करणें, दोहनानंतर तत्काळ ताजें दूध पिणें, लोण्याचें तूप बनविणें इत्यादि गोष्टींचें सूचक आहे. घरांत गाई एवढ्यासाठीं बाळगण्यांत येतात कीं त्यांचें ताजें दूध पिण्यास मि ळें, आदले दिवशीं विरजलेल्या दुधाच्या दह्यापासून तयार झा ल्या लोण्याचें ताजें तूप खाण्यास मिळावें. अशा तुपाला ' हैयंगवीन घृत ' असें म्हणण्यांत येतें. असें तूप खाण्यानें वा असें ताजें दूध पिण्यानें शरीराची पुष्टि होते, आणि त्याचे हवनानें हवाही निरोगी होते.

भ्रमण

या प्रमाणें दुग्धपान केल्यावर, घोड्यावर बसून फिरण्यासाठीं बाहेर गेलें पाहिजे व तास दोन तास याप्रमाणें घोड्यावर फिरून आल्यानंतर, मग घरीं येऊन स्वतःच्या कार्यांत निमग्न झालें पाहिजे. फारच थोडे भाग्यवान् लोक असे आहेत कीं ज्यांना घरच्या गायींचें ताजें दूध पिण्यास मिळत असेल आणि स्वतःच्या घोड्यावर बसून प्रभातींच्या प्राणदायक वायूमध्यें भ्रमण करण्याचें सौभाग्य प्राप्त होत असेल. आजचा समय फारच विपरीत प्राप्त झाला आहे. अशा वैदिक काळाच्या पद्धति फक्त स्मरणांत ठेवणें इष्ट आहे.

एकच उपास्य देव

कांड ८, सूक्त ९

(ऋषिः- अथर्वा, कश्यपः, सर्वे ऋषयः । देवता- विराट्)

कुतस्तौ जातौ कतमः सो अर्धः कस्माल्लोकात्कतमस्याः पृथिव्याः ।
वत्सौ विराजः सलिलादुदैतां तौ त्वा पृच्छामि कतरेण दुग्धा ॥ १ ॥

अर्थ— (**तौ कुतः जातौ**) ते दोन्ही कोठून प्रगट झाले ? (**सः अर्धः कतमः**) तो कोणता अर्धा भाग आहे ? आणि तो (**कस्मात् लोकात्**) कोणत्या लोकापासून आणि (**कतमस्याः पृथिव्याः**) कोणत्या भूमीभागावर (**सलिलात् विराजः**) जलतत्त्वानें विराजित (**वत्सौ उत् ऐतां**) दोन्हीं बालकें प्रगट होत आहेत. (**तौ त्वा पृच्छामि**) त्या दोघांच्या बाबतींत मी तुला विचारतों. त्यांपैकीं ती गाय (**कतरेण दुग्धा**) कोणांकडून दोहन केली जाते ? (१)

भावार्थ— (**स्त्रीत्व आणि पुरुषत्व**) हीं दोन्हीं कोठून प्रगट झालीं आहेत ? यांत तो अर्धा भाग कोठून मानण्यांत येतो. कोणत्या पृथ्वीवर कोणत्या जलतत्त्वांतून विराट् उत्पन्न होऊन (**रयि आणि प्राण**) हीं दोन्हीं बालकें कोणत्या प्रकारें उत्पन्न झालीं ? त्या विराटरूपी गाईचें दोहन कोणत्या बालकाबरोबर झालें ? हे प्रश्न मी तुला विचारतों. (१)

यो अक्रन्दयत्सलिलं महित्वा योनिं कृत्वा त्रिभुजं शयानः ।
वत्सः कामदुघो विराजः स गुहा चक्रे तन्वः पराचैः ॥ २ ॥
यानि त्रीणि बृहन्ति येषां चतुर्थं वियुनक्ति वाचम् ।
ब्रह्मैनद्विद्यात्तपसा विपश्चिद्यस्मिन्नेकं युज्यते यस्मिन्नेकम् ॥ ३ ॥
बृहतः परि सामानि षष्ठात्पञ्चाधि निर्मिता ।
बृहद्बृहत्या निर्मितं कुतोऽधि बृहती मिता ॥ ४ ॥
बृहती परि मात्राया मातुर्मात्राधि निर्मिता ।
माया ह जज्ञे मायाया मायाया मातली परि ॥ ५ ॥
वैश्वानरस्य प्रतिमोपरि द्यौर्यावद्रोदसी विबबाधे अग्निः ।
ततः षष्ठादामुतो यन्ति स्तोमा उदितो यन्त्यभि षष्ठमह्नः ॥ ६ ॥

अर्थ— (**त्रिभुजं योनिं कृत्वा**) त्रिभुजान्वित आश्रयस्थान करून (**शयानः यः**) विश्राम करणारा जो स्वतःच्या (**महित्वा सलिलं अक्रन्दयत्**) महत्त्वानें जलांत खळबळ उडवून देतो, (**विराजः कामदुघः सः वत्सः**) विराजरूपी कामधेनूचें तें वांसरूं (**पराचैः गुहा**) दूर आणि गुप्त (**तन्वः चक्रे**) शरीरांना बनवितो. (२)

(**यानि बृहन्ति त्रीणि**) जे मोठे तीन आहेत; आणि (**येषां चतुर्थं वाचं वियुनक्ति**) यांच्यांतील चवथा वाणीला प्रगट करतो (**विपश्चित् तपसा**) ज्ञानी तपानें (**एनत् ब्रह्म विद्यात्**) या ब्रह्माला जाणतो. (**यस्मिन् एकं युज्यते**) ज्यांच्यांत एकाचा संयोग करण्यांत येतो, आणि (**यस्मिन् एकं**) ज्यांत एक असतो. (३)

(**बृहतः षष्ठात् परि**) महान् अशा सहाव्यावर (**पञ्च सामानि अधि निर्मिता**) पांच सामांचें निर्माण झालें आहे. (**बृहत्याः बृहत् निर्मितं**) मोठ्यांतून मोठें बनविलें आहे. (**बृहती कुतः अधि निर्मिता**) ती मोठी कोठून निर्माण झाली आहे ? (४)

(**मातुः मात्रायाः परि**) मातेच्या तन्मात्रेच्या आधारावर (**बृहती मात्रा अधि निर्मिता**) महान् मात्रा निर्माण झाली आहे. (**माया ह मायायाः जज्ञे**) माया निश्चयपूर्वक मायेपासून उत्पन्न झाली आहे, आणि (**मायायाः परि मातली**) मायेवरही मातली आहे. (५)

(**उपरि द्यौः वैश्वानरस्य प्रतिमा**) वर जो द्युलोक आहे तो वैश्वानराची प्रतिमा आहे (**यावत् अग्निः रोदसी विबबाधे**) जोपर्यंत अग्नि द्युलोक आणि पृथ्वीला बाधित करतो, (**ततः अमुतः षष्ठात् स्तोमाः आयन्ति**) तेथून दूरच्या सहाव्या स्थानांतून स्तोम येतात आणि ते (**इतः अह्नः षष्ठं अभि उत् यन्ति**) येथून सहाव्या दिवसानंतर वर उठतात. (६)

भावार्थ— त्रिगुणमयी प्रकृतिमध्यें व्यापणारा स्वतःच्या शक्तीनेंच तिच्यांत गति उत्पन्न करतो. त्यापासून विराट् नांवाची कामधेनु होते. तिचा तो बच्चा आहे, जो दूरच्या गुहेंत आपल्या शरीराला बनवितो. (२)

तीन मोठीं तत्त्वें आहेत, जें चवथें आहे तें वाणीला प्रेरित करतें. ज्ञानी तपानें या ब्रह्माला जाणतो. ज्यांत एका मनाचा योग करण्यांत येतो. (३)

महान् सहाव्या तत्वाच्या आधारावर पांच सामांची रचना झाली आहे. मोठ्यांतूनच मोठें निर्माण झालें आहे; परंतु पहिली मोठी कोठून उत्पन्न झाली ? (४)

प्रकृतिमातेपासून तन्मात्रेची उत्पत्ति होते; आणि त्यांपासून पृथ्वी इत्यादींची उत्पत्ति होते. मायेपासून याप्रमाणें मायेची उत्पत्ति होते आणि या मायेवर मायेचा निरीक्षकहि आहे. (५)

द्युलोकाएवढा *वैश्वानर आहे. द्युलोकापासून पृथ्वीपर्यंत जेवढें अंतर आहे तेवढी वैश्वानराची व्याप्ति आहे. वैश्वानर सहावा आहे. ज्याच्यापासून स्तोम आणि यज्ञ प्रचलित होतात, आणि ते सर्व पुन्हां त्यांतच मिळून जातात. (६)

षट् त्वा पृच्छाम ऋषयः कश्यपेमे त्वं हि युक्तं युयुक्षे योग्यं च ।
विराजमाहुर्ब्रह्मणः पितरं तां नो वि धेहि यतिधा सखिभ्यः ॥ ७ ॥
यां प्रच्युतामनु यज्ञाः प्रच्यवन्त उपतिष्ठन्त उपतिष्ठमानाम् ।
यस्या व्रते प्रसवे यक्षमेजति सा विराडृषयः परमे व्योमन् ॥ ८ ॥
अप्राणैति प्राणेन प्राणतीनां विराट् स्वराजमभ्येति पश्चात् ।
विश्वं मृशन्तीमभिरूपां विराजं पश्यन्ति त्वे न त्वे पश्यन्त्येनाम् ॥ ९ ॥
को विराजो मिथुनत्वं प्र वेद क ऋतून्क उ कल्पमस्याः ।
क्रमान्को अस्याः कतिधा विदुग्धान्को अस्या धाम कतिधा व्युष्टीः ॥ १० ॥

अर्थ— हे कश्यपा ! (इमे षट् ऋषयः त्वा पृच्छामः) हे आम्ही सहा ऋषि तुला प्रश्न विचारतों कारण कीं (त्वं हि युक्तं योग्यं च युयुक्षे) तूंच युक्त आणि योग्याचें संयोजन करतोस. (विराजं ब्रह्मणः पितरं आहुः) विराजाला ब्रह्माचा पिता म्हणतात. (तां नः सखिभ्यः) त्याचें आम्हां मित्रांजवळ (यतिधा विधेहि) जितक्या प्रकारानें होईल तितक्या प्रकारानें वर्णन कर. (७)

हे (ऋषयः) ऋषिगणहो ! (यां प्रच्युतां) ज्याच्या स्थानापासून चालण्यानें (यज्ञाः अनुप्रच्यवन्ते) यज्ञ सुरू होतात, आणि ज्याच्या (उपतिष्ठमानां उपतिष्ठन्ते) उपस्थितीनें उपस्थित होतात (यस्याः प्रसवे व्रते) ज्याच्या प्रगट होण्याच्या नियमानें (यक्षं एजति) यजनीय देव हालचाल करतात. (सा विराट्) ती विराट् (परमे व्योमन्) परम आकाशांत आहे. (८)

(अ- प्राणा प्राणतीनां प्राणेन एति) स्वतः प्राणरहित असूनही प्राण्यांच्या प्राणांबरोबर चालते. नंतर (विराट् स्वराजं अभ्येति) विराट् स्वतःच प्रकाशाजवळ पोहोंचते (विश्वं मृशन्तीं अभिरूपां विराजं) सर्वाला स्पर्श करणाऱ्या अनुरूप विराटाला (त्वे पश्यन्ति) ते कित्येक पहातात, परंतु (त्वे एनां न पश्यन्ति) ते हिला पहात नाहींत. (९)

(विराजः मिथुनत्वं कः प्रवेद) विराटाच्या स्त्रीत्व आणि पुरुषत्वाला कोण जाणतो ? (कः ऋतून्) ऋतूंना कोण आणि (कः अस्याः कल्पं उ) हिच्या कल्पाला कोण जाणतो ? (अस्याः क्रमान् कः) हिच्या क्रमांना कोण जाणतो ? (कतिधा विदुग्धान्) किती वेळां हिचें दोहन झालें कोण जाणे ? (कः अस्याः धाम) हिचें स्थान कोण जाणतो ? आणि (कतिधा व्युष्टीः) हिचे प्रभात समय किती प्रकारांनीं होतात ? (१०)

भावार्थ— हे कश्यपा ! हे आम्ही सहा ऋषी तुला विचारतों. तूं सर्वांना योग्य स्थानांत नियुक्त करतोस, म्हणून त्याचें उत्तर दे. विराट् ब्रह्माचा पिता म्हणतात. या विषयांत आम्हांला सर्वप्रकारें सर्व सांग. (७)

हे ऋषि हो ! जिच्या चालण्यानें यज्ञ चालतो व जिच्या स्थिर होण्यानें यज्ञ स्थिर होतो. जिच्या प्रेरणेनें आत्मा प्रेरणा करतो तीच विराट् देवता आहे. (८)

ही विराट् स्वतः प्राणरहित असतांनाही प्राण्यांच्या प्राणाबरोबर चालते; तशीच ही विराट् स्वयं प्रकाशित आत्म्याजवळहि पोहोंचते. सर्वांना स्पर्श करणाऱ्या या विराटाला कित्येक पहातात व कित्येक पाहूं शकत नाहींत. (९)

या विराटाच्या आंत स्त्रीत्व आणि पुरुषत्व कसें रहातें ? याचे ऋतू आणि कल्प कोणत्या क्रमानें होतात, आणि कोण याला यथावत् जाणतो ? हें विराटाचें स्थान कोणीं पाहिलें आहे ? आणि त्याच्या प्रभातसमयाची कुणास माहिती आहे ? या विराटाचें दोहन किती प्रकारें केलें आहे ? अर्थात् किती रस त्यांपासून उत्पन्न करण्यांत आले आहेत ? (१०)

इयमेव सा या प्रथमा व्यौच्छदास्वितरासु चरति प्रविष्टा ।
महान्तो अस्यां महिमानो अन्तर्वधूर्जिगाय नवगज्जनित्री ॥ ११ ॥
छन्दःपक्षे उषसा पेपिशाने समानं योनिमनु सं चरेते ।
सूर्यपत्नी सं चरतः प्रजानती केतुमती अजरे भूरिरेतसा ॥ १२ ॥
ऋतस्य पन्थामनु तिस्र आगुस्त्रयो घर्मा अनु रेत आगुः ।
प्रजामेका जिन्वत्यूर्जमेका राष्ट्रमेका रक्षति देवयूनाम् ॥ १३ ॥
अग्नीषोमावदधुर्या तुरीयासीद्यज्ञस्य पक्षावृषयः कल्पयन्तः ।
गायत्रीं त्रिष्टुभं जगतीमनुष्टुभं बृहदर्कीं यजमानाय स्वराभरन्तीम् । ॥ १४ ॥
पञ्च व्युष्टीरनु पञ्च दोहा गां पञ्चनाम्नीमृतवोऽनु पञ्च ।
पञ्च दिशः पञ्चदशेन क्लृप्तास्ता एकमूर्ध्नीरभि लोकमेकम् ॥ १५ ॥

अर्थ— (इयं एव सा या प्रथमा व्यौच्छत्) हीच ती आहे कीं जी प्रथम होऊन प्रकाशित होते. जी (आसु इतरासु प्रविष्टा चरति) यांच्यांत आणि दुसऱ्यांत प्रवेश करून चालते, (अस्यां अन्तः महान्तः महिमानः) हिच्यांत मोठ्या शक्ति आहेत. (नवगत् जनित्री वधूः जिगाय) ती नूतन जननी वधुप्रमाणें सर्वांना जिंकते. (११)

(छन्दःपक्षे उषसा पेपिशाने) छंदाचे दोन पक्ष उषेनें सुंदर होतात. (समानं योनिं अनु संचरेते) एकच स्थानाला लक्ष्य करून चालतात, (प्रजानती केतुमती सूर्यपत्नी) जाणणारी केतुयुक्त सूर्यपत्नी प्रभा (अजरे भूरि रेतसा संचरतः) जी अजर व बहुत वीर्यवाली अशी संचार करते. (१२)

(तिस्र ऋतस्य पन्थां अनु आगुः) तिन्ही सत्याच्या मार्गाला अनुकूल होतात (त्रयः घर्माः रेतः अनु आगुः) तिन्ही यज्ञ वीर्याला अनुकूल होतात (एका प्रजां जिन्वति) एक प्रजा-संततिला तृप्त करते. (एका ऊर्जं) दुसरी बलाचें रक्षण करते. (एका देव-यू-नां राष्ट्रं रक्षति) तिसरी देवांबरोबर योग करणाऱ्या राष्ट्रांचें रक्षण करते. (१३)

(अग्नीषोमौ यज्ञस्य पक्षौ) अग्नि आणि सोम हे दोन यज्ञाचे पंख आहेत. असें (ऋषयः कल्पयन्तः) ऋषींनीं मानलेलें आहे. (या तुरीया आसीत्) जी चतुर्थ अवस्था आहे, तिला आणि (गायत्रीं त्रिष्टुभं जगतीं अनुष्टुभं) गायत्री, त्रिष्टुभ, जगती आणि अनुष्टुप् रूपानें (यजमानाय स्वः आभरन्तीं बृहदर्कीं) यजमानांना प्रकाश देणाऱ्या महान् उपासनेला ते (अदधुः) धारण करतात. (१४)

(पञ्च व्युष्टीः) पांच उषा, (पञ्च दोहाः अनु) पांच अनुकूल दोहन समय, (पञ्चनाम्नीं गां अनु) पांच नांवाची अनुरूप धेनु (पञ्च ऋतवः) पांच ऋतु, (पञ्चदशेन पञ्च दिशः क्लृप्ताः) पंधराव्यानें पांच दिशांना अनुकूल केलें आहे (ताः एकमूर्ध्नीः) ते सर्व एक शिरवाले होऊन (एकं लोकं अभि) एका लोकाच्या चारी बाजूंना आहेत. (१५)

भावार्थ— हीच विराट् प्रथम प्रकाशित झाली आहे, जी दुसऱ्यांत प्रवेश करून विचरण करते. हिच्यांत मोठमोठ्या शक्ति आहेत. ही नववधूप्रमाणें सर्वांवर प्रभाव पाडते. (११)

छंदाचे दोन पक्ष आहेत, जे एकाच छंदांत अनुकूलतेनें कार्य करतात. ज्याप्रमाणें सूर्यपत्नी प्रभेचा उषःकालापासून प्रकाशित होण्याला आरंभ होतो, त्याप्रमाणें हे छन्दाचे दोन पक्ष क्षीण न होतां विशेष बळासह सर्वत्र संचार करतात. (१२)

तीन्ही शक्ति सत्यानुकूळ आहेत आणि तीन्ही यज्ञ वीर्याबरोबर चालतात. एक संततीचें रक्षण, दुसरी बळाचें रक्षण आणि तिसरी देवांच्या उपासकांच्या राष्ट्राचें रक्षण करते. (१३)

अग्नि आणि सोम हे यज्ञाचे दोन पंख आहेत, ही गोष्ट ऋषींनीं मानली आहे; आणि ते असेंही मानतात कीं जी चतुर्थ अवस्था आहे, ती गायत्री, त्रिष्टुप्, जगती, अनुष्टुप् रूपानें यजमानासाठीं नेहमीं स्वर्गसुख भरपूर देते. (१४)

*

षड् जाता भूता प्रथमजर्तस्य षडु सामानि षडहं वहन्ति ।
षड्योगं सीरमनु सामसाम षडाहुर्द्यावापृथिवीः षडुर्वीः ॥ १६ ॥
षडाहुः शीतान्षडु मास उष्णानृतुं नो ब्रूत यतमोऽतिरिक्तः ।
सप्त सुपर्णाः कवयो नि षेदुः सप्त च्छन्दांस्यनु सप्त दीक्षाः ॥ १७ ॥
सप्त होमाः समिधो ह सप्त मधूनि सप्तर्तवो ह सप्त ।
सप्ताज्यानि परि भूतमायन्ताः सप्तगृध्रा इति शुश्रुमा वयम् ॥ १८ ॥
सप्त च्छन्दांसि चतुरुत्तराण्यन्यो अन्यस्मिन्नध्यार्पितानि ।
कथं स्तोमाः प्रति तिष्ठन्ति तेषु तानि स्तोमेषु कथमार्पितानि ॥ १९ ॥

अर्थ— (**ऋतस्य प्रथमजाः**) सत्याचे पहिले प्रवर्तक (**षट्-भूताः जाताः**) सहा भूतें झालेलीं आहेत. (**षट् उ सामानि**) सहा सामें (**षट् अहं वहन्ति**) सहा दिवसांना घेवून जातात (**षट् योगं सीरं अनु साम-साम**) सहा बैल जोडलेल्या नांगराला साम-साम म्हणतात, (**द्यावापृथिवीः षट् आहुः**) द्युलोकापासून पृथ्वीपावेतो सहा केंद्रें आहेत. ज्यांना (**षट् उर्वीः**) सहा भूमि म्हणतात. (१६)

(**षट् शीतान् आहुः**) सहा शीतकालाचे महिने आहेत (**षट् उष्णान् मासः**) सहा उष्णकालाचे महिने आहेत (**नः ऋतं ब्रूहि**) त्यांचे ऋतु आम्हांला सांगा. (**यतमः अतिरिक्तः**) त्यांत कोणता विशेष रिक्त आहे? (**सप्त सुपर्णाः कवयः**) सात उत्तम पक्षाचे कवि (**निषेदुः**) राहतात, (**सप्त छंदांसि**) सात छंद आहेत (**अनु सप्त दीक्षाः**) त्यांला अनुकूल सात दीक्षाही आहेत. (१७)

(**सप्त होमाः**) सात यज्ञ आहेत, (**समिधः ह सप्त**) समिधाही सात आहेत, (**मधूनि सप्त**) सात मधु आणि (**सप्त ऋतवः ह**) सात ऋतु आहेत, (**सप्त आज्यानि भूतं परि आयन्**) सात प्रकारचीं घृतें सर्व जगांत प्राप्त आहेत. (**ताः सप्त गृध्राः**) ते सात गृध्र आहेत (**इति वयं शुश्रुम**) असें आम्ही ऐकतों. (१८)

(**सप्त छंदांसि**) सात छंद आहेत (**उत्तराणि चतुः**) त्यांत चार श्रेष्ठ आहेत. ते (**अन्यः अन्यस्मिन्**) एक दुसऱ्यांत (**अधि आ अर्पितानि**) समर्पित आहेत. (**स्तोमाः तेषु कथं प्रति तिष्ठन्ति**) स्तोम त्यांच्यांत कशा रीतीनें राहतात? (**तानि स्तोमेषु कथं अर्पितानि**) ते स्तोमांत कशा प्रकारें समर्पित झालेले आहेत? (१९)

भावार्थ— एका गायीला अनुकूळ पांच उषा, पांच दोहनसमय आहेत, पांच ऋतु व पांच दिशा असून त्या प्रत्येक दिशेवर एकाचा अधिकार आहे. या एकाजवळ सर्वांना जाणें आहे. (१५)

सत्यमार्गाचा प्रथम प्रवर्तक आत्मा आहे. त्यापासून सहा तत्वें उत्पन्न झालीं आहेत. सहा साम, सहा दिवसाचा यज्ञ समाप्त करतात. ज्याप्रमाणें सहा बैल जोडलेल्या नांगराला शेतकरी चालवितात त्याचप्रमाणें हे साम सहा दिवसाच्या यज्ञाला चालवितात. जगांत द्युलोक आणि पृथ्वीच्या आंतही सहा पृथ्वीसारखे गोल आहेत. (१६)

शीतकालाचे सहा महिने आहेत. उष्णकालाचेही सहा महिने आहेत. त्यांचे ऋतु आम्हांला सांगा आणि त्यांत रिकामें कोण आहे हेंहि सांगा. सात कवि उत्तम रीतिचें येथें बसलेले आहेत. त्यांचेजवळ सात छन्द आहेत आणि सात दीक्षाही आहेत. (१७)

सात होम, सात समिधा, सात मधु, सात ऋतु आणि सात घृतें भूतमात्रांच्या सभोंवार पसरलेलीं आहेत. त्यांचेबरोबर सात गिधाडेंही आहेत असें आम्ही ऐकतों. (१८)

सात छंद आणि त्यांचे चार उत्तरपक्ष एक दुसऱ्याबरोबर मिसळलेले आहेत. हे स्तोमांत कसे राहतात, आणि हे स्तोम त्यांच्यांत कसे राहतात? (१९)

कथं गायत्री त्रिवृतं व्यापि कथं त्रिष्टुप्पंचदशेन कल्पते ।
त्रयस्त्रिंशेन जगती कथमनुष्टुप्कथमेकविंशः ॥ २० ॥
अष्ट जाता भूता प्रथमजर्तस्याष्टेन्द्रर्त्विजो दैव्या ये ।
अष्टयोनिरदितिरष्टपुत्राष्टमीं रात्रिमभि हव्यमेति ॥ २१ ॥
इत्थं श्रेयो मन्यमानेदमागमं युष्माकं सख्ये अहमस्मि शेवा ।
समानजन्मा क्रतुरस्ति वः शिवः स वः सर्वाः सं चरति प्रजानन् ॥ २२ ॥
अष्टेन्द्रस्य षड्यमस्य ऋषीणां सप्त सप्तधा ।
अपो मनुष्याँ३नोषधीस्ताँ उ पञ्चानु सेचिरे ॥ २३ ॥
केवलीन्द्राय दुदुहे हि गृष्टिर्वशं पीयूषं प्रथमं दुहाना ।
अथातर्पयच्चतुरश्चतुर्धा देवान्मनुष्याँ३ असुरानुत ऋषीन् ॥ २४ ॥

अर्थ— (गायत्री त्रिवृतं कथं व्याप) गायत्री त्रिवृताला कशी व्यापते ? (कथं त्रिष्टुप् पंचदशेन कल्पते) त्रिष्टुप् पंधरांतून कशी होते ? (त्रयस्त्रिंशेन जगती कथं) तेहतीसापासून जगती कशी होते ? आणि (अनुष्टुप् एकविंशः कथम्) अनुष्टुप् एकविसापासून कसा होतो ? (२०)

(ऋतस्य प्रथमजाः अष्ट भूताः जाताः) सत्याच्या पहिल्या प्रवर्तकापासून आठ भूतें उत्पन्न झालीं आहेत. हे इन्द्रा ! (ये दैव्याः ऋत्विजः अष्ट) जे दिव्य ऋत्विज तेही आठ आहेत (अदितिः अष्ट योनिः अष्टपुत्रा) आदिति आठ उत्पत्तिस्थानयुक्त आहे आणि तिलाही आठ पुत्र आहेत. (अष्टमीं रात्रिं) आठव्या रात्रीला (हव्यं अभि एति) हवनीय पदार्थांना प्राप्त होते. (२१)

(इत्थं श्रेयः मन्यमाना) याप्रमाणें कल्याणाला मानणारी (इदं युष्माकं सख्ये) याप्रमाणें तुमच्या मैत्रींत (आगमं) आलें आहें. (अहं शेवा अस्मि) मी सेवनीय आहें (समान-जन्मा वः क्रतुः) तुमच्याबरोबर उत्पन्न झालेला तुमचा यज्ञ (शिवः अस्तु) कल्याणकारी होवो. (सः प्रजानन्) तें जाणणारा होऊन (वः सर्वाः संचरति) तुम्हां सर्वांत संचार करतो. (२२)

(इन्द्रस्य अष्ट) इंद्राचे आठ, (यमस्य षट्) यमाचे सहा, (ऋषीणां सप्तधा सप्त) ऋषींचे सात-प्रकारचे सात आहेत. (पंच आपः) पाच प्रकारचें जल, (तान् मनुष्यान् ओषधीः) मनुष्य आणि औषधींना (उ अनु सेचिरे) अनुकूलतेप्रमाणें सिंचन करतें. (२३)

(केवली गृष्टिः) केवळ गायच (पीयूषं प्रथमं दुहाना) अमृतरूपी दूध सर्वांच्या आधीं देणारी (इन्द्राय वशं-दुदुहे) इंद्रासाठीं अनुकूलतेप्रमाणें धार देते, (अथ) आणि (चतुरः) चार देव, मनुष्य, असुर आणि ऋषींना (चतुर्धा अतर्पयत्) चार प्रकारानें तृप्त करते. (२४)

भावार्थ— गायत्रीनें त्रिवृत्ताला कसें व्यापलें आहे ? पंधराबरोबर त्रिष्टुप कसा युक्त आहे ? तेहतीसाला जगतीनें कसें व्यापलें आहे, आणि अनुष्टुभाचा एकविसाशीं कसा संबंध आहे ? (२०)

सत्याच्या पहिल्या प्रवर्तकापासून आठ तत्वें उत्पन्न झालीं आहेत. हे आठ दिव्य ऋत्विज आहेत. अदितिचेही हे आठ पुत्र आहेत. आठव्या रात्रीपासून ही अदिती हवनीय पदार्थांना प्राप्त होते. (२१)

याप्रमाणें माझें कल्याण आहे असें जाणून मी आपल्या मैत्रीला प्राप्त झालें. मी सेवनीय आहें. तुमचा यज्ञ सर्वांच्या समप्रयत्नानें होणार आहे, तो तुम्हाला कल्याणप्रद होवो, तो यज्ञ तुम्हां सर्वांत प्रचलित राहो. (२२)

इंद्राचे आठ, यमाचे सहा, ऋषींचे सात प्रकारचे सात आहेत. पांच प्रकारचें जल औषधींत प्रवेश करून सर्व मनुष्यांची सेवा करतें. (२३)

केवळ एक गाय अमृतरूपी दूध देते आणि ती इन्द्राला आपलें दूध अर्पण करते. आणि हीच देवता, मनुष्य, असुर आणि ऋषींना चार प्रकारानें तृप्त करते. (२४)

को नु गौः क एक ऋषिः किमु धाम का आशिषः ।
यक्षं पृथिव्यामेकवृदेकर्तुः कतमो नु सः ॥ २५ ॥
एको गौरेक एकऋषिरेकं धामैकधाशिषः ।
यक्षं पृथिव्यामेकवृदेकर्तुर्नाति रिच्यते ॥ २६ ॥

अर्थ— (**कः नु गौः**) कोण गाय आहे ? (**क एक ऋषिः**) कोण एक ऋषि आहे ? (**किं उ धाम**) कोणते धाम आहे ? (**काः आशिषः**) कोणते आशीर्वाद आहेत ? (**पृथिव्यां एकवृत् यक्षं**) पृथ्वीमध्यें एकच व्यापक पूजनीय देव कोणता आहे ? (**सः एक ऋतुः कतमः नु**) तो एक ऋतु कोणता ? (२५)

(**एकः गौः**) एकच गाय आहे, (**एकः एक ऋषिः**) एकच एक ऋषि आहे. (**एकं धाम**) एकच धाम आहे (**आशिषः एकधा**) आशीर्वाद एकाच प्रकारचा दिला जातो, (**पृथिव्यां एकवृत् यक्षं**) पृथ्वीवर एकच व्यापक पूज्य देव आहे. (**एकः ऋतुः**) एकच ऋतु आहे (**न अतिरिच्यते**) त्यापेक्षां दुसरा श्रेष्ठ कोणी नाहीं. (२६)

भावार्थ— ती एक गाय कोण आहे ? एक ऋषि कोण आहे ? त्याचें धाम कोठें आहे ? त्याचे आशीर्वाद कोणते आहेत ? या पृथ्वीवर एक उपास्य कोण आहे ? आणि एक ऋतु कोणता आहे ? (२५)

एकच गाय आहे आणि एकच ऋषि आहे. त्याचें धामहीं एकच आहे. आशीर्वादही एकाच प्रकारचा असतो. पृथ्वीभर एकच पूज्य देव आहे. सर्वांचा ऋतही एकच आहे. त्याचें अतिक्रमण (उल्लंघन) कोणी करूं शकत नाहीं. (२६)

एकच उपास्य देव

एक उपास्य देव

संपूर्ण पृथ्वीवर जेवढीं माणसें आहेत, त्या सर्वांचा उपास्य देव एकच आहे. ही गोष्ट या सूक्ताच्या अंतिम मंत्रांत सांगितली आहे. पहा—

पृथिव्यां एकवृत् यक्षं न अतिरिच्यते । (मं. २६)

" या संपूर्ण पृथ्वीवर एकच सर्वव्यापी सर्वांचा उपास्य देव आहे. त्याचें अतिक्रमण कोणी करूं शकत नाहीं. " कारण कीं त्याची शक्ति सर्वश्रेष्ठ आहे. याच उपास्य देवाचा महिमा या सूक्तांत वर्णन केला आहे. परंतु करण्याची रीत अशी गूढ आहे, कीं कित्येक मंत्रांचा अर्थ विचार करूनही पूर्णपणें लक्षांत येत नाहीं. तरीही आतांपर्यंत जितका शोध झाला त्याला अनुसरून कांहीं स्पष्टीकरण या ठिकाणीं करीत आहों. वाचकांनीं आणखीही शोध करण्याचा प्रयत्न करावा.

या सूक्ताच्या पहिल्या मंत्रांत '**कुतः तौ जातौ ?**' ते दोघे कुठून प्रगट झाले ? हा प्रश्न विचारलेला आहे. अर्थात् एकाच पदार्थांतून या जगांत सुप्रसिद्ध असे दोन पदार्थ कसे निर्माण झाले ? हें या प्रश्नाचें तात्पर्य आहे. स्त्री आणि पुरुष, रयि आणि प्राण या दोघांचें सांकेतिक नाम चंद्र आणि सूर्य असेंही आहे. या ठिकाणीं चंद्र वा सूर्य अपेक्षित नाहींत; परंतु जगाची सोमशक्ति आणि अग्निशक्ति अपेक्षित आहेत. या सूक्ताच्या चवदाव्या मंत्रांत ' अग्नि-षोमौ ' शब्द आहे. हा शब्द या जगाच्या आग्नेयी शक्ति आणि सोमशक्तीचा वाचक आहे. या जगाला ' अग्निषोमीयं जगत् ' म्हणतात, कारण कीं त्यांत हेच दोन पदार्थ आहेत. जी रसात्मक शांत शक्ति आहे ती सोमाची आहे आणि जी उग्र, तीव्र आणि उष्ण आहे ती आग्नेयी शक्ति आहे. या दोन्ही शक्तींची रयिप्राण, चंद्रसूर्य, इडापिंगला, प्रकृति-पुरुष, जडचैतन्य, अनात्मा-आत्मा या प्रकारचीं अनेक नांवें आहेत. अशा अनेक द्वंद्वसूचक नांवांनीं दोन तत्वांचें ज्ञान होतें व ज्यांना स्त्री आणि पुरुष म्हणण्यांत येतें. हीं दोन्हीं उत्पन्न होण्यापूर्वी मात्र एकच तत्त्व विद्यमान होतें. या एक तत्त्वांतून हीं दोन तत्वें कशीं उत्पन्न झालीं ? मनुष्यानें या प्रश्नाचा बरोबर विचार करून जाणलें पाहिजे कीं या दोन्हीं तत्वांचें मूळ कोठें आहे.

मुळांत एक तत्व होतें. त्याच्या एका अंशापासून प्रकृति-पुरुषाची उत्पत्ति झाली. बाकी जें राहिलें त्या विषयांत, ' **कतमः**

सः अर्धः ' तें अर्ध कोणतें आहे की ज्याच्यांत स्त्रीपुरुष शक्ति विभिन्न झालेली नाहीं. त्या मूळ तत्त्वाचा अर्धा भाग कोठें राहिला आहे ? या बाबतींत वेदांत सांगितलें आहे—

त्रिपादूर्ध्वमुदैत्पुरुषः पादोऽस्येहाभवत्पुनः ॥
(ऋ. १०।९०।४)

" त्याचे तीन भाग वर आहेत आणि एक भागच या ठिकाणीं वारंवार बनतो. " अर्थात् मूळतत्वाचा थोडाच भाग या जगांत विविध रूपांना धारण करतो, अथवा स्त्रीपुरुषरूपानें दिसतो. हा भाग—

कस्माल्लोकात्कतमस्याः पृथिव्याः । (मं. १)

" कोणच्या लोकांतून, कोणत्या पृथ्वीच्या कोणत्या भागांत प्रगट झाला आहे ? " अर्थात् या जगांत अनंत पृथ्वीलोक आहेत. त्यांपैकीं कोणत्या भूमीवर आणि त्या भूमीच्या कोणत्या विभागावर हा प्रगट झालेला आहे ? येथें हा आला कोठून ? तत्व-ज्ञानाच्या दृष्टीनें हे सर्व प्रश्न विचार करण्यासारखे आहेत. या आपल्या भूमिभागावरही सर्वत्र एकाच वेळीं प्राण्यांची उत्पत्ति झाली नाहीं. दुसऱ्या ठिकाणीं होऊन ती अन्यत्र पसरली आहे. याप्रमाणें सर्वत्र जाणलें पाहिजे; आणि कित्येक ग्रह आणि उपग्रह असे आहेत कीं ज्या ठिकाणीं या प्रकारचे प्राणी अजूनही झालेले नाहींत.

गायीचीं दोन वांसरें

स्त्री आणि पुरुष दोन वासरांप्रमाणें आहेत. हे स्वतःच्या आईचें दूध पितात. ते दोघे—

वत्सौ विराजः सलिलादुदैताम् । (मं. १)

" या विराट्रूपी गायीचीं दोन्हीं वांसरें हें जग उत्पन्न होण्या-पूर्वीं सर्वत्र जो प्रकृतीचा समुद्र होता त्यांपासून उदयाला आलीं आहेत. " प्रायः प्रथम जल उत्पन्न होतें व नंतर सर्व उत्पत्ति होत असते. बालकें उत्पन्न होण्यापूर्वींही पाणी उत्पन्न होतें. या भूमीवरही प्रथम पाणीच होतें, त्यांत वनस्पति उत्पन्न झाल्या आणि नंतर त्या पाण्यांत जल-जन्तु उत्पन्न झाले. याप्रमाणें सर्वांचा उदय पाण्यापासूनच आहे. जन्मापासून लयापर्यंत हें " ज-ल " च सर्वांबरोबर आहे. या स्त्री पुरुषांचा उदयही पाण्यापासूनच आहे. याप्रमाणें हीं दोन्हीं बालकें एकाच गायीचीं आहेत. याच्यांत कोण आपल्या आईचें दूध पितें ? हा प्रश्न खालील मंत्रांत विचारला आहे.

तौ त्वा पृच्छामि कतरेण दुग्धा । (मं. १)

" या दोघांविषयीं मी विचारतों कीं दोघांपैकीं कोणी आपल्या आईचें दूध प्राशन केलें आहे ? आणि कोण प्यालें नाहीं ? " या ठिकाणीं प्रकृति आणि पुरुष या दोघांतून कोण प्रकृतिमाता गाई-च्या दुधानें पुष्ट होतो व कोण होत नाहीं ? हा प्रश्नाचा भाव आहे. सर्वांनीं या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. आपल्यांतच पहा. आपल्यांत देह आणि आत्मा आहे. हेच प्रकृति पुरुष होत. यांत प्राकृतिक पुष्टिसाधनांनीं देहाची पुष्टि करण्यांत येते. आत्म्याची नाहीं. अर्थात् देहच आपल्या प्रकृतिमातेचें दूध पिऊन पुष्ट होतो. आत्मा सदा एकरसच राहतो. याप्रमाणें विचार करून प्रश्नाचा भाव आणि त्याचें उत्तर समजून घ्यावें.

या विश्वाची रचना होण्यापूर्वीं कशी अवस्था होती ? हा प्रश्न तत्वज्ञानाचा विचार करणाऱ्यासमोर उभा राहतो. त्याचें उत्तर वेदानें ' सलिल अवस्था ' होती असें दिलें आहे. अगाध, अपरंपार, अतिशांत आणि गंभीर महासागराची जी अवस्था होते, त्याप्रमाणें प्राकृतिक परमाणूंचा समुद्र अति शांत होता. त्यांत किंचितही हालचाल नव्हती. थोडीही न्यूनाधिकता नव्हती. सर्वत्र शांतता होती. याठिकाणीं प्रश्न असा उपस्थित होतो कीं या शांत-मय स्थितींत चंचलता कोणी उत्पन्न केली ? जर चंचलता हा समुद्राचा स्वयंसिद्ध धर्म मानला जाईल तर त्यांत शांति कशी होऊं शकते ? जर तसें न मानलें तर ही अशांति कोणी उत्पन्न केली ? ह्या प्रश्नाचें उत्तर दुसऱ्या मंत्रांत दिलें आहे—

त्रि-भुजं योनिं कृत्वा शयानः । (मं. २)

" सत्व, रज आणि तमरूपी तीन गुणांनीं युक्त प्राकृतिक बिछान्यावर निजणारा हा एक देव आहे." जोंपर्यंत हा (**शयानः**) निजून असतो तोंपर्यंत या प्राकृतिक समुद्रांत बिलकुल हालचाल होत नाहीं. त्याची निद्रा समाप्त होईपर्यंत, सर्वत्र शांति पसरलेली असते. जेव्हां तो जागा होऊं लागतो त्यावेळीं हालचाल सुरू होते.

यः महित्वा सलिलं अक्रन्दयत् । (मं. २)

" जो आपल्या महिम्यानें या जल अवस्थेमध्यें मोठी हालचाल सुरू करतो. " हा तीन गुणावर निजतो म्हणून ते गुण हालचाल करीत नाहींत, परंतु हा ज्यावेळीं जागृत होतो त्यावेळीं ते गुण हालचाल करण्यास मोकळे होतात. त्यावेळीं सत्वगुण समतेची इच्छा करतो, रजोगुण खळबळ उडवून देण्याची इच्छा करतो आणि तमोगुण स्तब्धतेची इच्छा करतो. याप्रमाणें एकाच सलि-लाचे तीन परमाणु एक दुसऱ्यावर आपापल्या विभिन्न गुणांमुळें एकमेकावर हल्ला करतात आणि त्यामुळें शांत सलिल प्रक्षुब्ध होतें आणि या प्रक्षोभाचें कारणही त्या उपास्य देवाचा महिमाच आहे. शांत सलिलांत क्षोभ उत्पन्न करणें आणि क्षोभांत पुन्हां शांति स्थापन करणें हा त्याचाच महिमा आहे.

विराजः कामदुघः सः वत्सः गुहा तन्वः चक्रे ।
(मं. २)

" विराट्रूपी कामधेनूचें तें बालक गुहेमध्यें आपल्याला राहण्यासाठीं तीन शरीरें बनवितें. " हीं तीन शरीरें (गुहा) गुप्त आहेत, प्रगट नाहींत. प्रगट असतीं तर तीं गुंफेच्या आंत

नसतीं. हीं तीन शरीरें म्हणजे सूक्ष्म शरीर, कारण शरीर आणि महाकारण शरीर अशीं आहेत; अथवा प्राणशरीर, सूक्ष्मशरीर आणि कारण शरीर. हीं तीन शरीरें गुप्त आहेत आणि त्यामुळेंच या जगाची स्थिति आहे. आत्मदेवानें हीं शरीरें अति गुप्तरीतीनें बनविलीं आहेत. या कारणानेंच त्यांची उत्पत्ति, स्थिति, वृद्धि वगैरेचा पत्ता साधारण लोकांना लागत नाहीं.

यानि त्रीणि बृहन्ति, चतुर्थं वाचं नियुनक्ति । (मं. ३)

" हीं तिन्हीं शरीरें बऱ्या विलक्षण शरीरानें युक्त आहेत. त्यांच्यांत शक्तीही पुष्कळ आहे, जें चवथें शरीर आहे त्या चवथ्या शरीराबरोबर वाणीचा योग होत असतो. हेंच स्थूल शरीर आहे. " हें स्थूल शरीर भाषण करतें, वक्तृत्व करतें. आत्म्यांतील भाव प्रकट करतें, या स्थूल शरीरांच्या आंत गुप्त तीन शरीरें आहेत. परंतु त्यांपैकीं एकही याप्रमाणें वक्तृत्व करण्यास समर्थ नाहीं. ज्यापासून हें सर्व जग उत्पन्न होतें त्याला ब्रह्म म्हणतात. या ब्रह्माचें ज्ञान तपानें होतें. पहा—

विपश्चित् तपसा एनत् ब्रह्म विद्यात् । (मं. ३)

" ज्ञानी मनुष्य तपानें या ब्रह्माला जाणतो. " अर्थात् अज्ञानी मनुष्य त्याला जाणण्यास असमर्थ आहे. तपाशिवाय कोणीही त्या ब्रह्माला जाणूं शकत नाहीं. (**विपश्चित् = वि-पश्-चित्**) याचा अर्थ जो जगाला विशेष सूक्ष्म दृष्टीनें पहातो असा आहे. तोच ह्या ब्रह्माला जाणूं शकतो. जो साधारण दृष्टीनें या जगाचें निरीक्षण करतो तो जाणूं शकत नाहीं. ब्रह्माला जाणण्याची रीत अशी आहे—

यस्मिन् एकं (मनः) युज्यते । (मं. ३)

' ज्यांत एका मनाचा योग करण्यांत येतो. ' ज्या तपामध्यें या एका मनाचा योग करण्यांत येतो. या मनाच्या योगानेंच अर्थात् चित्तवृत्तीच्या निरोधानें जेव्हां हें जागृतींतील मन शांत आणि स्तब्ध होतें आणि त्यावेळीं त्या विज्ञानी पुरुषाला ब्रह्माचा साक्षात्कार होतो. सर्वांच्या आधीं—

बृहत्याः बृहत् निर्मितम् । (मं. ४)

" मोठ्या प्रकृतिपासून महत्तत्त्व निर्माण झालें. " प्रथम पहिल्या मंत्राची व्याख्या करतेवेळीं सांगितलें आहे कीं सर्वांच्या आधीं प्रथम प्राकृतिक शांत समुद्र होता. या महती दैवी प्रकृति पासून (बृहत्) महतत्त्व उत्पन्न झालें. हाच सर्वांहून पहिला सर्ग आहे. याठिकाणीं (बृहती) दैवी महती मूळ प्रकृतिपासून महत्तत्त्वाची उत्पत्ति सांगितली आहे. परंतु या ठिकाणीं अशी शंका येते कीं ही मूळ प्रकृति—

बृहती कुतः अधिमिता । (मं. ४)

" महती दैवी प्रकृति कोठून झाली ? " याप्रमाणें प्रश्नच विचारत गेले तर अनवस्था प्रसंग होईल. म्हणून दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं एक सलिल अवस्था प्रथम होती. हीच सर्वांची पहिली अवस्था आहे. ही झाली कशी ? हा प्रश्न कोणी–कोणाला न केला पाहिजे. कारण ही अवस्था सर्वांच्या अगोदरची आहे. या महती प्रकृतीच्या बरोबर एक आत्मा शयन करीत होता. याच्याही पूर्वीं कोणी नव्हतें. याप्रमाणें सर्वांहून पूर्वींची हीं दोन आहेत, म्हणून हें कोठून उत्पन्न झालें असा प्रश्न कोणीं विचारूं नये. तत्त्वज्ञानांत याप्रमाणें अनवस्था प्रसंग निर्माण करणें हा मोठा दोष मानलेला आहे. अस्तु.

बृहतः परि पञ्च सामा अधिनिर्मितानि । (मं. ४)

" या महत्तत्त्वाच्या वर अर्थात् या महत्तत्त्वाचा मसाला घेवून पांच सामांची रचना झाली आहे. " महत्तत्त्वापासून पंचतन्मात्रांची उत्पत्ति येथें सांगितली आहे. येथपर्यंत जें सृष्टीचें वर्णन केलें तें याप्रमाणें दाखवितां येतें—

१	मूळ प्रकृति, सलिल माता, बृहती विराट्, कामधेनु		पुरुष, ब्रह्म, स्वराट्, यक्ष, वैश्वानर, विराट्
२	महत् तत्व बृहत, कारण	कारण देह	जीव, वत्सः, ब्रह्मा
३	पंच तन्मात्रा पंच साम,	पंच सूक्ष्म इंद्रियें	
४	शरीर स्थूल	पांच स्थूल इंद्रियें	जीव, निरीक्षक

येथपर्यंत सृष्टिरचनेच्या तिसऱ्या युगाचें वर्णन करण्यांत आलें. यामुळें जीवात्म्याला शांति प्राप्त होते, त्यामुळें त्याचें नांव येथें साम आहे आणि ह्या शरीरधारी आत्म्याच्या जीवनाला पुढें यज्ञाचें रूपक सांगायचें आहे. त्या विशेष कार्यासाठींही याठिकाणीं त्याला साम नामानें दर्शविण्यांत आलें आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. हीच गोष्ट पुढील मंत्रांत अन्य शब्दांत सांगितली आहे—

मात्राया परि बृहती । मातुः मात्रा अधिनिर्मिता । (मं. ५)

' बृहती प्रकृती तन्मात्रांच्या पलीकडे आहे. ती आदिमाता आहे. या मातेपासून तन्मात्रा निर्माण झाली. ' याठिकाणीं माता, आदिमाता, जगन्माता, बृहती, हीं सर्व मूळ प्रकृतिचींच नांवें आहेत. तिच्यापासून पंचतन्मात्रांची उत्पत्ति होते. याठिकाणीं

एका प्रकृतीचीं पांच विभिन्न गुणधर्मयुक्त पदार्थतत्त्वें बनणें ही याची विशेषता आहे. यालाच म्हणतात—

मायायाः माया जज्ञे । मायायाः परि मातली । (मं. ५)

" आदिमायेपासून दुसरी माया निर्माण झाली आणि मायेवर निरीक्षकही निर्माण झाला. " मूळ आदिमायेपासून हें प्राकृतिक शरीर झालें आणि त्याचा अधिष्ठाता अथवा निरीक्षक जीवात्मा पण झाला. ही चतुर्थ अवस्थेची सृष्टि आहे. हिचेंच नांव जग आहे. आदिमायेपासून ही माया रचली गेली आहे; आणि तिचा निरीक्षक याठिकाणीं आत्मा आहे. येथपर्यंत अविकृत मूळ प्रकृतींतून विकृत जगाची निर्मिती झाल्याचें वर्णन या पांच मंत्रांत केलेलें आहे. आतां त्यांतील व्यापक देवाचें वर्णन करतात.

वैश्वानराची प्रतिमा

वैश्वानरस्य प्रतिमोपरि द्यौर्यावद्रोदसी विबबाधे अग्निः । (मं. ६)

" वैश्वानराची प्रतिमा इतकी आहे की जितका द्युलोक वर विस्तृत आहे आणि जेथपर्यंत अग्नीचें तेज पसरलेलें आहे. " अर्थात् हा वैश्वानर भूलोकापासून द्युलोकापर्यंत पसरलेला आहे. हाच विश्वाचा नेता आहे, म्हणून त्याला वैश्वानर म्हणतात. हा वैश्वानर प्रकृतीच्या बरोबर राहून जगद्रचनादि सर्व कार्यें करतो. सर्व जगाचा जर कोणी प्रमुख नेता असेल तर तो हाच आहे. तो सहावा आहे. पूर्वोक्त कोष्टकांत (१) स्थूल (२) सूक्ष्म (३) कारण (४) मूल प्रकृति (५) जीव हे पांच आणि हा (६) वैश्वानर सहावा आहे. पहिले चार जड आहेत व शेवटचे दोन चेतन आहेत. या सहाव्या वैश्वानरापासून—

ततः षष्ठात् अमुत उदिताः स्तोमाः आयन्ति । (मं. ५)

" त्या सहाव्या वैश्वानरापासून प्रकाशित होणारे यज्ञ येथें मनुष्यलोकांत येतात. " हाच मुख्य देव सर्व यज्ञांचा प्रकाशक आहे. मनुष्याच्या उत्पत्तिबरोबर जो यज्ञ उत्पन्न होतो तो हाच आहे, आणि तींच यज्ञकर्में (**अह्नः षष्ठं अभियन्ति**) दिवसाच्या सहाव्या भागाच्या समाप्तीच्या वेळेला पुन्हां त्याचेकडे पोहोंचतात. त्यापासूनच, ज्ञान आणि कर्माची प्रेरणा होते आणि त्यांतच अंतकाळीं जाऊन मिळतात. त्याला सर्वांचा द्रष्टा म्हणतात. त्यासाठींच त्याला कश्यप- (**पश्यकः**) पहाणारा, सर्वांचा द्रष्टा अथवा निरीक्षक म्हटलें आहे.

त्वं हि युक्तं योग्यं च युयुक्षे (मं. ७)

" तूं युक्त आणि योग्याचा संयोग करतोस. " जो पदार्थ ज्याठिकाणीं ठेवणें योग्य आहे, ज्या प्रकारें संयुक्त करणें योग्य आहे, त्याच प्रकारें त्या सर्वांची यथायोग्य योजना करतो. त्यांत कोणत्याही प्रकारची चूक करीत नाहीं. याचमुळें त्याचेकडून सुयोग्य सृष्टीची रचना निर्दोषरीतीनें होऊं शकते. हा उत्तम द्रष्टा असल्यानें जो पदार्थ जेथें जसा असावयास पाहिजे, तो योग्यप्रकारें त्याला ज्ञात होतो. आणि त्याप्रमाणें तो योग्यरीतीनें बनवितो. जर तो द्रष्टा योग्य नसता तर इतका सुयोग्य संसार (जगाची रचना) बनविणें त्याला अशक्य झालें असतें. म्हणून ऋषिगण प्रश्न करतात—

इमे षट् ऋषयः (वयं) त्वां पृच्छामः । (मं. ७)

" आम्ही सहा ऋषी तुला प्रश्न विचारतों. " वैश्वानराला प्रश्न विचारण्याचा अधिकार फक्त ऋषींनाच आहे. दुसरा त्याला प्रश्न कोण विचारूं शकेल ? आणि तोही दुसऱ्या कुणास उत्तर काय म्हणून देईल ? याकरितां प्रश्न विचारण्यासही चित्ताची शुद्धता पाहिजे आणि त्यापासून उत्तर मिळवण्याचीही तयारी पाहिजे. तसली तयारी ऋषी-मुनींची असते, म्हणून ते वैश्वानराला प्रश्न विचारतात, आणि त्यापासून उत्तरही मिळवितात. त्यांची धन्य आहे कीं जे परमात्म्याबरोबर अशाप्रकारें संबंध जोडूं शकतात. खरें पाहिलें असतां, मनुष्य जो या ठिकाणीं आला आहे तो प्रत्येक या प्रकारची योग्यता मिळविण्याकरितांच आला आहे; परंतु फार थोडे या स्थितीपर्यंत पोहोंचतात, आणि स्वतःची उन्नति करून घेतात. ऋषींचा प्रश्न या प्रकारचा आहे—

विराजं ब्रह्मणः पितरं आहुः तां नः सखिभ्यः यतिधा विधेहि । (मं. ७)

" विराटाला ब्रह्माचा पिता म्हणतात, तो कसा होतो तें आम्हां सर्वांना सांगा ? " या ठिकाणीं ' आत्मा-परमात्मा, ब्रह्मा- ब्रह्म, पुरुष- पुरुषोत्तम, इंद्र- महेंद्र ' ही पुत्र आणि पित्याचीं संयुक्त नामें आहेत. हा पितापुत्राचा संबंध कसा आहे, हा महत्त्वपूर्ण प्रश्न आहे. प्रत्येक मनुष्यानें याचा विचार करून आपलें व आपल्या पित्याविषयींचें ज्ञान प्राप्त करून घेतलें पाहिजे. मनुष्याला तर आपलेंही ज्ञान नसतें, आणि आपल्या पित्याचेंही ज्ञान असत नाहीं. जिथें आपलेंच ज्ञान नसतें तिथें पित्याचें ज्ञान कुठून संभवणार ?

वरील कोष्टकांत ' विराज अथवा विराट् ' हे शब्द प्रकृति आणि पुरुषासाठीं समानतेनें लिहिले आहेत. या मंत्रांतही विराज शब्द पुल्लिंगी आहे व स्त्रीलिंगीही आहे. पुल्लिंगी शब्द आत्मा-परमात्मा वाचक आहे आणि स्त्रीलिंगी शब्द प्रकृति व आदिशक्ति यांचा वाचक आहे. परंतु सर्वत्र हा नियम लागू नाहीं; कारण पिता-माता दोनीही तो एकच असल्यानें दोन्ही प्रयोग त्या एकासाठींच

आहेत. ' वि-राज् ' शब्दाचा अर्थ ' विशेष तेजस्वी ' असा आहे. यासाठीं हा शब्द दोघांसाठींही प्रयुक्त होतो.

या ठिकाणीं ' ब्रह्मा ' पुराणपुरुषापासून उत्पन्न झालेला असल्यामुळें तो जीवात्मवाचक आहे. त्याचा पिता पुरुष अथवा परमात्मा आहे. वाचकांनीं येथें हें पहावें, कीं वेदांत सर्वत्र पिता-पुत्रांचीं नांवें सारखींच आहेत. दोघांनाही उद्देशून ' इंद्र, आत्मा, पुरुष, विराट् ' इत्यादि नांवें आहेत. पित्याची शक्ति मोठी आणि पुत्राची शक्ति अल्प आहे, तरीही गुणधर्म आणि कर्में समान आहेत. त्यामुळें पुत्राला हें समजून येईल कीं आज जरी माझी शक्ति अल्प असली तरी ती वाढवून मी माझ्या पित्या-प्रमाणें ' समर्थ ' होऊं शकेन. हा विश्वास देण्याच्या हेतूनें या मंत्रांतील प्रश्नाची प्रवृत्ति झाली आहे. त्याचें विशेष उत्तर पुढील मंत्रांत दिलें आहे. तें आतां पाहूं—

हे ऋषयः यां प्रच्युतां यज्ञाः अनु प्रच्यवन्ते, (यां) उपतिष्ठमानां (यज्ञाः) उपतिष्ठन्ते, यस्याः व्रते प्रसवे यक्षं एजति, सा परमे व्योमन् विराट् (अस्ति) । (मं. ८)

" हे ऋषि हो ! ज्याच्या प्रेरणेनें सर्व यज्ञ चालतात, आणि ज्याची प्रेरणा बंद झाल्यानंतर सर्व यज्ञ स्तब्ध होतात, ज्याला प्रगट होण्यासाठीं पूजनीय देवांची गति कारण होते, तो परमाकाशांत सर्वत्र व्यापक विशेष प्रकाशमान देव आहे. " हें परमात्म्याचें वर्णन आहे. हाच सर्वांचा पिता आणि माता आहे. सर्व जग त्याच्या प्रेरणेनेंच चालत राहिलें आहे. त्याच्याच नियमांत राहिलें आहे. त्यानें चालविलें तर चालतें व त्यानें चालविलें नाही तर स्तब्ध होतें. अशी त्याची अगाध शक्ति आहे. या शक्तीचें चिंतन केलें पाहिजे. सर्वत्र त्याची शक्तीच पसरून राहिलेली आहे. या जगाचा सर्व चमत्कार त्याच्या शक्तीनेंच होऊन राहिला आहे. परमाकाशा-एवढी त्याची व्याप्ति आहे. अर्थात् सर्वत्र संपूर्ण परिपूर्ण होऊनही तो अवशिष्ट आहे. पुढील मंत्राचें वर्णन याहीपेक्षां अधिक विचारणीय आहे—

अप्राणा प्राणतीनां प्राणेन एति । (मं. ९)

" जी स्वतः प्राणानें जीवित राहत नाहीं परंतु स्वतःच्या शक्तीनेंच जिवंत राहते अशी विराट् प्राण्यांच्या प्राणाला बरोबर घेऊन जाते. " मुख्य देवतेला प्राणांच्या सहाय्याची आवश्यकता नाहीं, ती तर स्वतः स्वतःच्या सत्तेनेंच स्वयंसिद्ध आहे. त्यामुळेंच तिला स्वयंभू म्हणतात. अन्य प्राण्यांना जीवन धारणेसाठीं प्राणांची आवश्यकता आहे. प्राण्यांच्या बरोबर राहून हा प्राण त्यांच्या जीवनाचा हेतु बनतो. त्यानंतर तो—

विराट् स्वराजं अभ्येति (मं. ९)

" विराट् स्वराजाच्या जवळ पोहोंचते. " या वाक्यांत एक राजनैतिक भावार्थही भरलेला आहे. (**वि-राज**) जेथें राजा नाहीं असा राजसंस्थाहीन समाज (**स्व-राजं**) स्वराज्यशासन अर्थात् स्वसंमत राजशासनाला प्राप्त करतो. ज्या ठिकाणीं राजा-रूपी शासनसंस्था नसेल तेथील जनता स्वयंशासित असते. ती जनता स्वतःची राज्यव्यवस्था स्वतः पहाते. हा राजनैतिक भाव विचारणीय आहे.

या मंत्रभागाचा आणखीही एक अर्थ होतो. तो हा आहे— (**वि-राज**) राज शब्दाचा अर्थ प्रकाश असा आहे. ज्याच्या जवळ प्रकाश नाहीं त्याला वि-राज म्हणतात. जो स्वयंप्रकाशी नसतो, तो (**स्वराजं**) म्हणजे स्वतःच्या तेजानें जो प्रकाशतो त्याजकडे (**अभ्येति**) जातो आणि त्यापासून तेज प्राप्त करून प्रकाशित होतो.

परंतु याठिकाणीं जो अर्थ अभिप्रेत आहे तो असा- विराट् अर्थात् जो आत्मा जगाच्या व्यवहारांत लागला आहे, तो शुद्धात्म्याकडे जातो. जो त्रिपाद आत्मा अवशिष्ट आहे, ' त्याला स्वराट् ' म्हणतात; कारण तो स्वतःच्या प्रकाशानें प्रकाशित असतो. जो एकपाद आत्मा जगांत वारंवार ये जा करतो तो त्रिपाद आत्म्यासारखा स्वयंप्रभावान् दिसत नाहीं. हा भाव केवळ लक्षणेनेंच जाणला पाहिजे. याप्रमाणें हा आत्मा आहे—

त्वे विश्वं मृशन्तीं अभिरूपां विराजं पश्यन्ति, त्वे एनां न पश्यन्ति । (मं. ९)

" कित्येक लोक या सर्व जगाला सौंदर्यानें प्रकाशित करणाऱ्या आत्म्याला पहातात, परंतु कित्येक त्याला पाहूं शकत नाहींत. " तो सर्वत्र उपस्थित आहे, परंतु थोडेच त्याचा साक्षात्कार करूं शकतात आणि कांहीं आंधळ्याप्रमाणें त्या सर्व जगाला प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकाला पाहूं शकत नाहींत. बहुतेक सर्व प्राणी असेच अंध असतात. अगदीं विरळाच याला पाहूं शकतात.

विराजः मिथुनत्वं कः प्रवेद ? क ऋतून् वेद ? कः अस्याः कल्पं वेद । (मं. १०)

" या विराटापासून उत्पन्न होणाऱ्या स्त्रीपुरुषांच्या भेदाला कोण जाणतो ? ऋतूंची उत्पत्ति कोण जाणतो ? आणि कल्पाच्या वेळेला कोण जाणतो ? " तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें या गोष्टीचें ज्ञान मनुष्याला झालें पाहिजे. त्याचप्रमाणें—

अस्याः कतिधा विदुग्धान् क्रमान् कः वेद ? अस्याः धाम कः वेद ? अस्याः कतिधा व्युष्टिः ? (मं. १०)

" अन्न वगैरे रस देणाऱ्या ऋतु आदींच्या क्रमाला कोण जाणतो ? त्याच्या मूळ स्थानाला कोणी जाणलें आहे ? आणि या सृष्टीच्या प्रभातकालाला कोण जाणतो ? " तत्वविचारकांनीं या प्रश्नांचा विचार करणें योग्य आहे आणि त्याचें ज्ञानही प्राप्त करून घेतलें पाहिजे. यांपैकीं कांहीं प्रश्नांचें उत्तर पुढें येईल.

इयं एव सा या प्रथमा व्यौच्छत्। (मं. ११)

" हीच ती आहे कीं जी प्रथम प्रकाश देते. " पहिली उषा हेंच करते. जगांत प्रकाशाचा संचार हिच्यापासूनच होतो. (**आसु इतरासु प्रविष्टा चरति** । मं. ११) आणि सर्वत्र संचार करून सर्व जगाचें कार्य करते. तिच्या शक्तीनेंच संपूर्ण जगाचें कार्य सुव्यवस्थित पद्धतीनें होऊन राहिलें आहे. त्याच प्रमाणें —

अस्यां अन्तः महान्तः महिमानः । (मं. ११)

" हिच्यांत मोठमोठ्या महत्त्वपूर्ण शक्ति आहेत. " आणि या शक्तींनींच या जगाचें संपूर्ण कार्य करण्यास ती समर्थ होते. (**नवगत् जनित्री वधूः जिगाय**) ज्याप्रमाणें पुत्रांन जन्म देणारी घरांत नवीन आलेली सुंदर कुलवधु शेवटीं घरांत स्वामिनी होते, त्याचप्रमाणें ही विराट् या जगांत सर्वांहून श्रेष्ठ विराजमान् आहे. जाणून वा न जाणून सर्व हिच्यावरच प्रेम करीत असतात.

ज्याप्रमाणें एकाच छंदांत पूर्व आणि उत्तर असे दोन चरण (**छंदः पक्षी**) असतात आणि ते दोन्ही एकाच छंदांत समान अधिकारानें राहून परस्परांच्या अनुकूलतेबरोबर छंदांची शोभा वाढवितात, त्याप्रमाणें या जगांत स्त्री आणि पुरुष हे संसाररूपी छंदाचे दोन पक्ष आहेत. दोन्ही परस्परांच्या सहायता आणि पूर्तीसाठीं आहेत. दोन्ही वेगळे रहाण्यासाठीं नाहींत. ते या गृहस्थाच्या संसारांत समान अधिकारानें राहून (**समानं योनि**) स्वतःच्या घरांत समान अधिकारानें (**अनु संचरेते**) अनुकूल राहून या संसारांत संचार करतात. त्यासाठीं सूर्यपत्नीचें उदाहरण दिलें आहे.

सूर्यपत्नी प्रजानती केतुमती अजरा भूरिरेतसा संचरति । (मं. १२)

" ज्याप्रमाणें सूर्याची धर्मपत्नी प्रभा ज्ञान प्राप्त करून, विज्ञानयुक्त होऊन, क्षीण न होतां, विशेष पराक्रमी होऊन या जगांत संचार करते. " अगदीं याचप्रमाणें गृहस्थाची धर्मपत्नी ज्ञानविज्ञानयुक्त, बलयुक्त, पराक्रमानें युक्त होऊन स्वतःच्या संसाराचीं कार्यें दक्षतेनें करणारी पाहिजे. गृहस्थाचा गृहस्थाश्रम धर्मपत्नीमुळेंच होतो. म्हणून धर्मपत्नीचा येथें निर्देश करण्यांत आला आहे. परंतु याठिकाणीं हेच शब्द धर्मपतीचींही कर्तव्यें सांगत आहेत. पतिही ज्ञानविज्ञानयुक्त व हृष्टपुष्ट होऊन विशेष पराक्रमाचीं कार्यें करतां करतां, या संसाराचीं विविध कार्यें करणारा व आपल्या गृहस्थधर्माची उन्नति करणारा पाहिजे. पति-पत्नीचे धर्म साधारणरीतीनें पूर्वोक्त विषयांत सारखेच आहेत; त्यामुळें एकाच्या धर्माचा निर्देश केल्यानें दुसऱ्याच्या धर्माचेंही ज्ञान होतें. पूर्वोक्त स्थानांत त्यांच्या सामान्य धर्माचा उल्लेख आहे, विशेष धर्माचा उल्लेख नाहीं. अस्तु. आतां या गृहस्थधर्माचें थोडें वर्णन प्रसंगानुरूप पुढील मंत्रांत करण्यांत आलें आहे —

तिस्रः ऋतस्य पन्थां अनु आगुः ।
त्रयो धर्माः रेतः अनु आगुः । (मं. १३)

" तिन्ही शक्ति सत्याच्या अनुकूलतेबरोबर राहतात, आणि तिन्ही धर्म वीर्याच्या अनुकूलतेबरोबर होतात. " हा सिद्धांत गृहस्थाश्रमी मनुष्यानें नेहमीं लक्षांत ठेवला पाहिजे. शरीराची, अंतःकरणाची आणि आत्म्याची, अशा तीन शक्ति सत्याच्या आधारानें प्राप्त होतात. जो सत्याचा पूजक नाहीं, त्याच्याजवळ कोणत्याही प्रकारची शक्ति रहात नाहीं. त्याचप्रमाणें ब्रह्मचारी, गृहस्थ आणि वानप्रस्थाचे तीन धर्म वीर्य, बल आणि पराक्रमांबरोबर सिद्ध करणें शक्य होतें. अशक्त मनुष्य त्यांना सिद्ध करूं शकत नाहीं. प्रत्येक मनुष्यानें हे दोन्ही उपदेश नेहमीं चित्तांत धारण करणें योग्य आहे. संन्यासधर्म तर विशेष योग्यतेच्या मनुष्याकडूनच सिद्ध होणारा आहे. त्यामुळें सर्वसाधारण लोकांसाठीं त्याचा निर्देश येथें केलेला नाहीं. त्याबद्दल पुढें आणखी स्पष्टीकरण केलें आहे—

एका प्रजां जिन्वति । एका ऊर्जं जिन्वति ।
एका देवयूनां राष्ट्रं रक्षति । (मं. १३)

" एक प्रजेचें रक्षण, दुसरी बलाची वृद्धि आणि तिसरी देवांच्या उपासकांच्या राष्ट्राचें रक्षण करते. " याप्रमाणें संतानरक्षण बलरक्षण आणि राष्ट्ररक्षण करण्याचा भार गृहस्थाश्रमी मनुष्यावर आहे. हा गृहस्थधर्म आहे. जो स्वतःच्या प्रजेचें संवर्धन, पालन, पोषण आणि उत्तम शिक्षण वगैरेचा प्रबंध करीत नाहीं तो स्वतःच्या गृहस्थधर्मापासून भ्रष्ट होतो. जो आपलें बल वाढवून, त्यायोगें आपल्या राष्ट्राचें रक्षण करीत नाहीं तोही तसाच गृहस्थधर्मापासून च्युत होतो. गृहस्थांत ज्या तीन शक्ति आहेत, त्या शक्तींचा उपयोग हा आहे. प्रत्येक गृहस्थानें त्यांचा उपयोग करून स्वतःचें कर्तव्यपालन केलें पाहिजे. सत्य आणि वीर्याला अनुकूल जे गृहस्थाचे धर्म आहेत ते हे आहेत.—

अग्निषोमौ यज्ञस्य पक्षौ । (मं. १४)

" अग्नि आणि सोम हीं दोन यज्ञाचे पंख आहेत. " ज्याप्रमाणें पक्ष्याला दोन पंख असतात, त्याचप्रमाणें हेही यज्ञाचे दोन पंख आहेत. हवनरूप यज्ञांत अग्नि मुख्य आहे, कारण अग्निशिवाय यज्ञ होऊंच शकत नाहीं आणि सोमरसही प्रधान द्रव्य आहे. याप्रमाणें हवनरूप यज्ञांत हे दोन पदार्थ मुख्य आहेत. परंतु हाच केवल यज्ञ नाहीं. मनुष्याचें जीवन हा एक महान् यज्ञ आहे, त्यांतही अग्नि आणि सोम मुख्य आहेत. येथें मनुष्याचें मन हे सोमरूप आहे व वाणी ही अग्निरूप आहे. मन आणि वाणी हीं मनुष्याचें सर्वस्व आहेत. याप्रमाणें या गोष्टीचा आणखीही विचार करतां येईल. एका बाजूला सोम शांति आणि अहिंसेची सूचना देतो तर अग्नि उग्रता आणि प्रतापाची सूचना देतो. मनुष्याचा सर्व व्यवहार त्यामुळेंच चालत राहिला आहे. हा यज्ञ शक्य तोपर्यंत उत्तम करणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे.

वर तीन शक्तींचें वर्णन आहे. येथें आणखी एक (**तुरीया आसीत्**) चवथी शक्तीही सांगितली आहे. ती म्हणजे परमात्म्याची विश्वव्यापिनी शक्ति आहे. ही शक्ति ऋषिलोक प्राप्त करतात आणि त्यामुळें यजमानाला (**स्वः**) स्वर्गाची प्राप्ति होते. या मंत्रांत आणि या सूक्तांत दुसऱ्या ठिकाणीं जीं छंदांचीं नांवें आहेत ते वेदमंत्राच्या उपासनेला योग्य असे छंद आहेत. ही मंत्रोक्त उपासना मनुष्याला (**स्वः आभरन्ती**) स्वर्गस्थानापर्यंत पोंचविते. ' स्व ' चा अर्थ (**स्व–र**) आत्मप्रकाश आहे. या उपासनेनें आत्म्याचा प्रकाश अधिकाधिक उज्ज्वल होतो.

पुढें मंत्र १५ ते २१ पर्यंत पांच, सहा, सात आणि आठ संख्येचे गण सांगितले आहेत. हे गण वैदिकमंत्रांत वारंवार येतात. पंच ज्ञानेंद्रियें, सहा ऋतु, सप्त ऋषी, आठ वसु इत्यादि गणांची गणना अनेक ठिकाणीं आहे. त्यांतून कित्येक गण मनुष्यशरीरांत आहेत, कित्येक कालविभाग आहेत, कित्येक बाह्य देवतांचे आहेत. हे सर्व मिळून संपूर्ण जग बनतें आणि एक दुसऱ्याशीं अनुकूल राहून उन्नति केल्यामुळें सर्वांचीच उच्च स्थिति होते. वेगळे झाल्यानें हानि आणि मिळून राहिल्यानें उन्नति हा नियम साधारणतः सर्वत्र आहे.

सात गृध्र

अठराव्या मंत्रांत ' सप्त गृध्राः ' पद आहे. हे सात गृध्रही मानवी शरीरांतच आहेत. ज्याप्रमाणें येथें सप्तऋषी आहेत, त्याप्रमाणें सात गृध्रही आहेत. जे ऋषी आहेत, तेच गृध्र होतात. दोन नासिका रंध्रें, दोन कान, दोन डोळे आणि एक मुख, हे ज्यावेळीं चांगल्या कर्मांस प्रवृत्त होतात, त्यावेळीं ऋषी होतात, आणि ज्यावेळीं स्वार्थांध होतात त्यावेळीं हेच गृध्र अथवा राक्षस होतात. वाचकांनीं आपल्या शरीरांत तपास करून पहावें कीं, ते ऋषि आहेत कां राक्षस, गृध्र बनले आहेत. जर गृध्र झाले असतील तर त्यांना ऋषी करण्याचा प्रयत्न करावा.

ज्यावेळीं मनुष्य अनासक्तिभावानें वागतो, त्यावेळीं सर्व संसार किंवा प्रकृति, त्याची सेवा करण्यास तत्पर रहाते. ती म्हणते—

श्रेयः मन्यमाना युष्माकं सख्ये आगमं, अहं शेवा अस्मि । (मं. २२)

" तुमचें कल्याण करण्याची इच्छा धरून मी तुमच्याजवळ आलें आहें. मी तुमची सेवा करणारी दासी आहें. " ज्यावेळीं प्रकृति याप्रमाणें अनुकूल होते, त्यावेळीं जाणावें कीं, योग सफळतेला पोंचूं लागला आहे. जी प्रकृति आरंभीं जीवावर अधिकार गाजवीत होती, तीच त्याच्या उदासीनतेमुळें सेविका होऊन अनुकूल होते. हें येथें पहाण्यासारखें आहे. प्रकृति वशीभूत होण्याचें आणखी एक कारण आहे—

वः समानजन्मा क्रतुः शिवः अस्तु स वः सर्वाः संचरति । (मं. २२)

" तुमच्या बरोबर जन्मलेला यज्ञ तुमच्यासाठीं कल्याण करणारा होवो आणि तुमच्यांत संचार करो. " भगवद्गीतेंत ' **सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा** (भ. गी. ३।१०) सांगितलें आहे. प्रजेबरोबर यज्ञ उत्पन्न झाल्याचें वर्णन तेथें आहे. हीच गोष्ट या मंत्रांत ' समानजन्मा क्रतुः ' या शब्दांनीं सांगितली आहे. मनुष्याबरोबर यज्ञाची उत्पत्ति झालेली आहे. ते केल्यानें मनुष्यांची उन्नति होते आणि ते न केल्यानें निःसंदेह त्यांचा नाश होणार आहे.

गो महिमा

केवली गृष्टिः प्रथमं इन्द्राय पीयूषं दुदुहे ।
अथ देवान् ऋषीन् मनुष्यान् असुरान् अतर्पयत् ॥ (मं. २४)

" एकटी गाय सर्वांआधीं आपलें अमृतरूपी दूध इंद्राच्या यज्ञकर्माला देत असते आणि जें रहातें त्यानें देव, ऋषी, मनुष्य आणि असुरांची तृप्ति करते. " यज्ञासाठीं याप्रमाणें गायीची उत्पत्ति आहे. या हवनरूपी यज्ञानें वायुशुद्धि, जलशुद्धि, आरोग्य इत्यादि प्राप्त होऊन मनुष्याचें जीवन सुखपूर्ण होतें. यामुळें यज्ञयाग, होमहवन करणें हा मनुष्यांचा धर्म आहे आणि तें त्यांच्या उन्नतीचें एक उत्तम साधन आहे. पुढील दोन मंत्र पहा—

को नु गौः क एकऋषिः किमु धाम का आशिषः ।
यक्षं पृथिव्यामेकवृदेकर्तुः कतमोऽनु सः ॥ २५ ॥
एको गौरेक ऋषिरेकं धामैकधा आशिषः ।
यक्षं पृथिव्यामेकवृदेकर्तुर्नाति रिच्यते ॥ २६ ॥

या ठिकाणीं एकच प्रकृतिरूप गाय आहे, जी जीवात्म्यांच्या पुष्टीसाठीं दूध देते. या सर्वांचा एकच निरीक्षक परमात्माच परमऋषि आहे. या पृथ्वीवर सर्वव्यापक एकच परमात्मा देव सर्वांचा उपास्य आहे, आणि त्याचा सर्वांना उत्तम आशीर्वाद आहे. याप्रमाणें विचार करून या मंत्रांचा आशय लक्षांत घ्यावा.

एक प्रकृतिरूपी गाय, एक दिव्यदृष्टिरूप ऋषि, एक परमात्म्याचें धाम, एक स्वस्तिरूप आशीर्वाद आणि या भूमीवर व्यापक असा एकच पूज्य देव आहे, या गोष्टी येथें सांगितल्या आहेत. पूर्वोक्त वर्णनानें यांचा बोध सहज होतो.

या सूक्तांत पांच, सहा, सात आणि आठ शब्दांनीं वेदोक्त अनेक कोष्टकें बनतात, परंतु ती सर्व पूर्णतया अजून तयार झालेली नसल्यानें या ठिकाणीं दिलेलीं नाहींत. ज्यावेळीं तीं संपूर्ण तयार होतील त्यावेळीं त्याचें प्रकाशन करण्यांत येईल.

विश्वाचा संचालक देव

कांड ६, सूक्त ३५

(ऋषिः – कौशिकः । देवताः– वैश्वानरः)

वैश्वानरो न ऊतय आ प्र यातु परावतः । अग्निर्नः सुष्टुतीरुप ॥ १ ॥
वैश्वानरो न आगमदिमं यज्ञं सजूरुप । अग्निरुक्थेष्वंहसु ॥ २ ॥
वैश्वानरोऽङ्गिरसां स्तोममुक्थं च चाक्लपत् । ऐषु द्युम्नं स्वर्यमत् ॥ ३ ॥

अर्थ— (**वैश्वानरः**) विश्वाचा नेता ईश्वर (**ऊतये**) आमचें रक्षण करण्यांसाठीं (**परावतः नः प्र आयातु**) स्वतःच्या श्रेष्ठ स्थानापासून आमचेकडे येवो आणि तो (**अग्निः नः सुष्टुतीः उप**) प्रकाशाचा देव आमच्या उत्तम स्तुतींचा स्वीकार करो. (१)

(**उक्थेषु अंहसु**) स्तुति करण्याचे वेळीं (**अग्निः सजूः वैश्वानरः**) तो तेजस्वी विश्वाचा चालक, प्रेमपूर्ण ईश्वर (**इमं नः यज्ञं उप आगमत्**) या आमच्या यज्ञाजवळ येवो. (२)

(**वैश्वानरः**) विश्वाचा चालक देव (**अंगिरसां स्तोमं उक्थं च**) ज्ञानी ऋषींच्या स्तुतिस्तोत्रांना (**अ चाक्लपत्**) समर्थ बनवितो आणि तो (**एषु द्युम्नं स्वः आयमत्**) त्यांत प्रकाशित होणाऱ्या आत्मतेजाला स्थिर करतो. (३)

भावार्थ— विश्वाचा संचालक देव, जो विश्वांतील सर्व पदार्थांचें संचालन करतो, तो एक तेजस्वी, प्रेममय, प्रशंसनीय आणि श्रेष्ठ देव आहे. तो उपासकांना श्रेष्ठ आत्मतेज देतो.

सर्वव्यापक ईश्वर

कांड ७ सूक्त २६

(ऋषिः – मेधातिथिः । देवता– विष्णुः,)

विष्णोर्नु कं प्रा वोचं वीर्याणि यः पार्थिवानि विममे रजांसि ।
यो अस्कंभायदुत्तरं सधस्थं विचक्रमाणस्त्रेधोरुगायः ॥ १ ॥
प्र तद्विष्णुः स्तवते वीर्याणि मृगो न भीमः कुचरो गिरिष्ठाः
परावत आ जंगम्यात्परस्याः ॥ २ ॥
यस्योरुषु त्रिषु विक्रमणेष्वधिक्षियन्ति भुवनानि विश्वा ।
उरु विष्णो वि क्रमस्वोरु क्षयाय नस्कृधि ।
घृतं घृतयोने पिब प्रप्र यज्ञपतिं तिर ॥ ३ ॥

अर्थ— (विष्णोः वीर्याणि) सर्वव्यापक ईश्वराच्या पराक्रमांचें (कं प्रवोचं नु) सुखवर्धक वर्णन निश्चयानें करतों. (यः पार्थिवानि रजांसि विममे) जो पृथ्वीवरील लोकांना विशेषरीतीनें निर्माण करतो (यः उरुगायः) जो अनेकप्रकारें प्रशंसित होतां होतां (त्रेधा विचक्रमाणः) तीन प्रकारांनीं पराक्रम करतां करतां (उत्तरं सधस्थं अस्कभायत्) उच्चतर स्वर्गीय प्रकाशस्थानाला स्थिर करतो. (१)

(तत् वीर्याणि) त्याचे पराक्रम दाखविण्यांसाठीं (विष्णुः स्तवते) तो व्यापक ईश्वर स्तविला जातो. तो (भीमः मृगः न) भयानक सिंहाप्रमाणें (कु-चरः गिरि-ष्ठः) सर्वत्र संचार करणारा आणि गिरिगुफांमध्यें राहणारा आहे. तो (परस्याः परावतः) दूर दूरच्या प्रदेशांतून (आजगम्यात्) जवळ येतो. (२)

(यस्य उरुषु त्रिषु विक्रमणेषु) ज्याच्या विशाल तीन फेऱ्यांत (विश्वा भुवनानि अधि क्षियन्ति) सर्व भुवनें रहातात. हे (विष्णो, उरु वि क्रमस्व) व्यापक देवा ! विशेष पराक्रम कर, (नः क्षयाय उरु कृधि) आम्हांला निवासासाठीं विस्तृत स्थान दे. हे (घृतयोने, घृतं पिब) रस उत्पन्न करणाऱ्या ! रसाचें पान कर आणि (यज्ञपतिं प्रप्र तिर) यज्ञकर्त्याला पार घेऊन जा. (३)

भावार्थ— सर्वव्यापक परमेश्वराचे पराक्रम पुष्कळ आहेत. जे स्वतःचें सुख वाढविण्याची इच्छा करतात त्यांनीं ते गुण वर्णन करावेत, व गुणगान करावें. त्या परमेश्वरानेंच सर्व पार्थिव पदार्थांना विशेष कुशलतेनें निर्माण केलें आहे. त्यामुळें त्याची सर्वत्र अतिशय प्रशंसा होते. तो तिन्ही लोकांत तीन प्रकारचा पराक्रम करतो आणि त्यानें सर्वांत वर असलेला द्युलोक आधाराशिवाय स्थिर केला आहे. (१)

या परमेश्वराचें गुणसंकीर्तन केल्यानें, त्याच्या पराक्रमांचें ज्ञान प्राप्त होतें आणि त्यामुळें त्याच्या महत्त्वाचा अनुभव करणें सुगम होतें. ज्याप्रमाणें सिंह गिरिकंदरांत संचार करतो आणि जमिनीवरही फिरतो, त्याचप्रमाणें हा परमेश्वरही हृदयगुंफेंत संचार करतो व लोकांत व्यापून रहातो. तो अतिशय दूर असतांनाही भक्तीच्या योगानें अतिशय जवळ येतो. (२)

पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोक या तिन्ही लोकांत त्या ईश्वराचे तीन पराक्रम पहाण्यांत येतात. त्या तीन पराक्रमांनींच या तीन लोकांचें अस्तित्व आहे. त्यामुळें त्या प्रभूची आम्ही विशेष प्रार्थना करतों कीं जो आम्हांला उत्तम आणि विस्तृत स्थान कार्य करण्यासाठीं अर्पण करो. हे प्रभो ! यजमान जें सत्कर्म करतो, त्याचें रस ग्रहण करून यजमानाला या दुःखसागराच्या पैलतीराला ने (३)

इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा नि दधे पदा । समूढमस्य पांसुरे ॥ ४ ॥
त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः । इतो धर्माणि धारयन् ॥ ५ ॥
विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे । इन्द्रस्य युज्यः सखा ॥ ६ ॥
तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः । दिवीव चक्षुराततम् ॥ ७ ॥
दिवो विष्ण उत वा पृथिव्या महो विष्ण उरोरन्तरिक्षात् ।
हस्तौ पृणस्व बहुभिर्वसव्यैराप्रयच्छ दक्षिणादोत सव्यात् ॥ ८ ॥

अर्थ— (विष्णुः इदं विचक्रमे) व्यापकदेव या विश्वांत पराक्रम करून राहिला आहे. (पदा त्रेधा निदधे) स्वतःच्या पायानें तीन प्रकारानें पाऊलें टाकीत आहे, (अस्य पांसुरे समूढं) त्याचा जो पाय मधल्या लोकांत आहे तो गुप्त आहे. (४)

(अदाभ्यः गोपाः विष्णुः) तो न दबणारा पालक आणि व्यापक देव (त्रीणि पदा विचक्रमे) तीन पायांना या जगांत ठेवतो. तो (इतः धर्माणि धारयन्) तेथून सर्व धर्मांचें धारण करतो. (५)

(विष्णोः कर्माणि पश्यत) व्यापकदेवाचीं हीं कार्यें पहा (यतः व्रतानि पस्पशे) जेथून तो सर्व गुणधर्मांना पाहतो. (इन्द्रस्य युज्यः सखा) तो जीवात्म्याचा योग्य मित्र आहे. (६)

(विष्णोः तत् परमं पदं) व्यापकदेवाचें तें परमस्थान (सूरयः सदा पश्यन्ति) ज्ञानी लोक नेहमीं पहातात (दिवि आततं चक्षुः इव) ज्याप्रमाणें द्युलोकांत पसरलेला चक्षुरूपी सूर्य असतो. (७)

हे (विष्णो) व्यापकदेवा ! (दिवः उत पृथिव्याः) द्युलोक आणि पृथ्वीपासून, त्याचप्रमाणें (महः उरो अन्तरिक्षात्) महान् विस्तृत अंतरिक्षांतून (बहुभिः वसव्यैः हस्तौ पृणस्व) पुष्कळ संपत्तीनें आपले दोन्ही हात भरून घे आणि (दक्षिणात् उत् सव्यात्) डाव्या आणि उजव्या दोन्ही हातांनीं (आ अयच्छ) त्यांचें दान कर. (८)

भावार्थ— व्यापकदेवाचें कार्य या तिन्ही लोकांत पाहून त्यानें स्वतःचें तीन पाय तिन्ही लोकांत ठेवून त्यांतील कार्य केलें आहे. पृथ्वीवर त्याचें कार्य दिसून येतें, द्युलोकांतही असेंच अनुभवास येतें, परंतु मध्यस्थानीय अंतरिक्ष लोकांत त्याचें जें कार्य चालतें तें पहाण्यांत येत नाहीं. (४)

तो व्यापकदेव कोणत्याही कारणानें न दबणारा आणि सर्वांचें रक्षण करणारा आहे. या तिन्ही लोकांत तो आपले तीन पाय ठेवतो आणि तेथील सर्व कार्यें करतो. येथूनच त्याचे सर्व गुणधर्म प्रगट होतात. (५)

हे लोकांनो ! या सर्वव्यापक परमेश्वराचे हे चमत्कार पहा ! ज्याच्या प्रभावानें त्याचीं सर्व व्रतें यथायोग्य रीतीनें चाललीं आहेत. प्रत्येक जीवाचा हा परमेश्वर उत्तम मित्र आहे. (६)

ज्याप्रमाणें द्युलोकांत सूर्याला सर्व लोक पाहतात, त्याचप्रमाणें ज्ञानी लोक नेहमीं त्याला पहात असतात. अर्थात् तो ईश्वर त्यांना ही त्याचप्रमाणें प्रत्यक्ष होत असतो. (७)

हे सर्वव्यापक प्रभो ! पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोकांतून पुष्कळ संपत्ति, तूं आपल्या हातांत घे आणि त्या दोन्ही हातांनीं त्या धनाचें आम्हांला प्रदान कर. (८)

या सूक्तांत सर्व व्यापक ईश्वराचें वर्णन आहे. तिन्ही लोकांत जे विलक्षण चमत्कार दिसून येतात ते सर्व त्याच्या शक्तीनें होत आहेत. त्यानेंच हे तिन्ही लोक रचले आहेत आणि त्यानेंच या तीन लोकांना धारण केलें आहे आणि तोच येथील सर्व चमत्कार करीत आहे. तो सर्वव्यापक असूनही सामान्य लोकांना प्रत्यक्ष होत नाहीं, परंतु ज्याप्रमाणें दुपारचा सूर्य आकाशांत स्पष्ट दिसतो त्याप्रमाणें ज्ञानी लोकांना तो प्रत्यक्ष दिसतो. हा त्याचा महिमा सर्व लोकांनीं पहावा व त्याचा अनुभव घ्यावा.

व्यापक देव

कांड ७ सूक्त ८७

(ऋषिः- अथर्वा । देवता- रुद्रः)

यो अग्नौ रुद्रो यो अप्स्व१न्तर्य ओषधीर्वीरुध आविवेश ।
य इमा विश्वा भुवनानि चाक्लृपे तस्मै रुद्राय नमो अस्त्वग्नये ॥ १ ॥

अर्थ— (यः रुद्रः अग्नौ) जो वाणीचा प्रवर्तक देव अग्नींत (यः अप्सु अन्तः) जो जलामध्यें (यः ओषधीः वीरुधः आविवेश) जो औषधी आणि वनस्पतिमध्यें प्रविष्ट झालेला आहे. (यः इमा विश्वा भुवनानि चाक्लृपे) जो या सर्व भुवनांची रचना करतो, (तस्मै अग्नये रुद्राय नमः अस्तु) त्या अग्निप्रमाणें तेजस्वी वाणीच्या प्रवर्तक देवाला नमस्कार असो. (१)

भावार्थ—(रुद्रः रुत्+रः) रुत् अर्थात् वाणी अथवा शब्द याचा प्रवर्तक जो आत्मा आहे तो सर्व स्थिरचर पदार्थांत व्याप्त आहे. तो जल, अग्नि, औषधी, वनस्पति, सर्व भुवनें इत्यादींत आहे. तो सर्वांचा रचयिता आहे. अशा त्या तेजस्वी आत्मदेवाला माझा नमस्कार असो.

एक आत्म्याचीं अनेक नांवें

कांड ९, सूक्त १०

(ऋषिः- ब्रह्मा । देवता–गौः विराट्, अध्यात्मम्)

यद्गायत्रे अधि गायत्रमाहितं त्रैष्टुभं वा त्रैष्टुभान्निरतक्षत ।
यद्वा जगज्जगत्याहितं पदं य इत्तद्विदुस्ते अमृतत्वमानशुः ॥ १ ॥
गायत्रेण प्रति मिमीते अर्कमर्केण साम त्रैष्टुभेन वाकम्
वाकेन वाकं द्विपदा चतुष्पदाक्षरेण मिमते सप्त वाणीः ॥ २ ॥

अर्थ— (यत्) जो (गायत्रे) गायत्रांत (गायत्रं अधि आहितं) गायत्र ठेवलेलें आहे आणि (त्रैष्टुभात् वा त्रैष्टुभं) त्रैष्टभांतून त्रैष्टुभाची (निरतक्षत) रचना केली आहे, (यत् वा) अथवा जें (जगत् जगति आहितम्) जगत् जगतींत ठेवलेलें आहे. (ये इत्) जे (तत् पदं विदुः) त्या पदाला जाणतात, ते (ते अमृतत्वं आनशुः) अमरत्वाला प्राप्त करतात. (१)

(गायत्रेण अर्कं प्रतिमिमीते) गायत्री छंदानें अर्चनीय देवाचे प्रतिमापन अर्थात् गुणवर्णन करतो. (अर्केण साम) अर्चनीय देवताद्वारा साम अर्थात् शांति प्राप्त करतो (त्रैष्टुभेन वाकं) त्रिष्टुभ छंदानें वाणीचें मापन करतो आणि (वाकेन वाकं) वाणीनें वर्णन करतो, याप्रमाणें (द्विपदा चतुष्पदा सप्त वाणीः अक्षरेण मिमते) दोन चरण आणि चार चरणाच्या सात छंदाच्या अक्षरांच्या गणनेनें मोजतात. (२)

भावार्थ— गायत्री, त्रिष्टुप आणि जगति छंदांत जें महत्त्वपूर्ण ज्ञान भरलेलें आहे, त्या ज्ञानाला जे जाणतात, ते अमृततत्व-मोक्षाला प्राप्त करतात. (१)

गायत्री छंदानें पूज्य ईश्वराचें वर्णन होतें, त्याच्या उपासनेनें शांति प्राप्त होते. त्रिष्टुप छंदानें पण त्याच वर्णनीय देवाचें वर्णन होतें आणि याप्रमाणें दोन चरण आणि चार चरणांच्या सर्व छंदांनीं तेंच वर्णन केलेलें आहे. हें सातही छंद अक्षरांच्या गणनेनें मोजण्यांत येतात. (२)

जगता सिन्धुं दिव्यस्कभायद्रथंतरे सूर्यं पर्यपश्यत् ।
गायत्रस्यं समिधस्तिस्र आहुस्ततो महा प्र रिरिचे महित्वा ॥ ३ ॥
उप ह्वये सुदुघां धेनुमेतां सुहस्तो गोधुगुत दोहदेनाम् ।
श्रेष्ठं सवं सविता साविषन्नोऽभीद्धो घर्मस्तदु षु प्र वोचत् ॥ ४ ॥
हिङ्कृण्वती वसुपत्नी वसूनां वत्समिच्छन्ती मनसाभ्यागात् ।
दुहामश्विभ्यां पयो अघ्न्येयं सा वर्धतां महते सौभगाय ॥ ५ ॥
गौरमीमेदभि वत्सं मिषन्तं मूर्धानं हिङ्ङकृणोन्मातवा उं ।
सृक्काणं घर्ममभि वावशाना मिमाति मायुं पयते पयोभिः ॥ ६ ॥

अर्थ—(जगता सिन्धुं दिवि अस्कभायत्) जगति छंदद्वारा समुद्राला द्युलोकांत थोपवून ठेवले आहे. द्युलोकाचें वर्णन समुद्राप्रमाणें केलें आहे. (रथन्तरे सूर्यं परि अपश्यत्) रथन्तरांत सूर्याचें दर्शन केलें आहे, सूर्याचें हें वर्णन आहे. (गायत्रस्य तिस्रः समिधः आहुः) गायत्री छंदाच्या तीन समिधा – तीन पाद – आहेत, (ततः महा महित्वा प्ररिरिचे) त्यामुळें महान् महिम्यानें तो संयुक्त होत आहे. (३)

(सुहस्तः एतां सदुघां धेनुं उपह्वये) उत्तम हस्ताचा मी या सुखानें दोहन करतां येईल अशा धेनूला बोलावितों. (उत गोधुक् एनां दोहत) आणि गाईला दोहणारा या गाईला दोहो, (सविता श्रेष्ठं सवं नः साविषत्) सर्वांना उत्पन्न करणारा सविता हें श्रेष्ठ अन्न आम्हांला देवो. (अभीद्धः घर्मः तत् उ सु प्रवोचत्) प्रदीप्त तेजस्वरूपी दूध त्याविषयीं आम्हांला कथन करो. (४)

(हिंकृण्वती वसूनां वसुपत्नी) हीं हीं करणारी ऐश्वर्याचें पालन करणारी, (मनसा वत्सं इच्छन्ती) मनानें वासरांची इच्छा करणारी (नि आगत्) जवळ आली आहे. (इयं अघ्न्या अश्विभ्यां पयः दुहां) ही अवध्या गाय दोन्ही अश्विदेवांसाठीं दूध देवो. (सा महते सौभगाय वर्धतां) आणि ती महान् सौभाग्यासाठीं वाढो. (५)

(गौः मिषन्तं वत्सं अभि अमीमेत्) गाय उत्सुक वत्सावर चोहोंबाजूंनें प्रेम करते आणि (मातवै उ मूर्धानं हिंकृणोत्) ती मान्यतेसाठीं स्वतःच्या डोक्याला हिंकारानें युक्त करते. (सृक्काणं घर्मं वावशाना) उत्पादक उष्णतेला इच्छिणारी (पयोभिः मायुं अभि मिमीते पयते) दुधाबरोबर प्रकाशाला चोहोंकडे पसरविणारी आणि त्याबरोबर दूधही देणारी ती आहे. (६)

भावार्थ–जगति छंदानें त्याचें वर्णन केलें आहे कीं ज्यानें या द्युलोकाला आधार दिला आहे. रथन्तर साम मंत्रानें सर्वप्रकाशक सूर्याचें वर्णन होतें. गायत्री छंदांत तीन पाद आहेत आणि त्या छंदांत महत्त्वपूर्ण ज्ञान भरून ठेवलें आहे. (३)

मी उत्तम स्वच्छ हातानें युक्त होऊन या अमृत–मोक्षरूपी दूध देणाऱ्या ज्ञानमयी वाणीरूपी धेनूची प्रार्थना करतों. जो या गाईचें दोहन करण्याचें जाणतो तोच या गाईला दुहो. सर्वांचा उत्पादक देव आम्हांला हें ज्ञानरूपी अन्न देवो आणि प्रकाशमय यज्ञरूपी धर्म आमचेकडून सिद्ध होवो. (४)

हिंकारानें युक्त आणि मनानें शिष्यरूपी वत्साची कामना करणारी ही दिव्य ज्ञानपूर्ण वेदवाणीरूप गाय आमच्याजवळ आली आहे. ही अवध्य गाय आम्हांला अमृताप्रमाणें ज्ञानरूपी दूध देवो आणि आमचें महान् सौभाग्य वाढवो. (५)

ही गाय त्या उत्सुक अशाच वत्साला दूध देते व त्याला अनुकूल होते. ती यज्ञरूपी धर्माचा प्रचार करण्याची इच्छा करते आणि ज्याचें यज्ञरूपी जीवन होतें त्याला आपल्या अमृतरसधारांनीं पुष्ट करते. (६)

अयं स शिङ्क्ते येन गौरभीवृता मिमाति मायुं ध्वसनावधि श्रिता ।
सा चित्तिभिर्नि हि चकार मर्त्यान्विद्युद्भवन्ती प्रति वव्रिमौहत ॥ ७ ॥
अनच्छये तुरगातु जीवमेजद् ध्रुवं मध्य आ पस्त्यानाम् ।
जीवो मृतस्य चरति स्वधाभिरमर्त्यो मर्त्येना सयोनिः ॥ ८ ॥
विधुं दद्राणं सलिलस्य पृष्ठे युवानं सन्तं पलितो जगार ।
देवस्य पश्य काव्यं महित्वाद्या ममार स ह्यः समान ॥ ९ ॥
य ईं चकार न सो अस्य वेद य ईं ददर्श हिरुगिन्नु तस्मात् ।
स मातुर्योना परिवीतो अन्तर्बहुप्रजा निर्ऋतिरा विवेश ॥ १० ॥

अर्थ— (अयं सः शिङ्क्ते) हाहो तोच शब्द करतो (येन अभीवृता गौः) ज्याच्याशीं संयुक्त झालेली गाय त्यांत (ध्वसनो अधिश्रिता) प्रलयांत आश्रित होते, (मायुं मिमाति) प्रकाशाचें माप करते, (सा चित्तिभिः मर्त्यान् नि चकार) ती चिंतनशक्तींच्या बरोबर मनुष्यांना युक्त करते, आणि (विद्युत् भवन्ती वव्रिं प्रति औहत) विजे प्रमाणें चमकून उत्तम रूपाला प्राप्त होते. (७)

(पस्त्यानां मध्ये) लोकांमध्यें (ध्रुवं एजत् जीवं) स्थिर चालक जीव (तुरगातु अनत् शये) तीव्र गतिमान् प्राणशक्तिवान् होऊन रहातो. हा (मृतस्य जीवः) मृत मनुष्याचा जीव (अमर्त्यः) स्वतः अमर असतांनाही (मर्त्येन सयोनिः) मर्त्य शरीरासह समान योनींत प्रवेश करून (स्वधाभिः चरति) आपल्या धारक-शक्तींनीं चालतो. (८)

(सलिलस्य पृष्ठे) प्रकृति समुद्राच्या पृष्ठभागावर (दद्राणं विधुं) गतिमान् विधान-कर्म कर्ता (युवानं सन्तं) युवारूपी सत्यपदार्थाला (पलितः जगार) एक वृद्ध गिळत आहे. (देवस्य पश्य काव्यं) ईश्वराचें हें काव्य पहा. (महित्वा) योग्यतेनें जो (ह्यः सं आन) कालपर्यंत प्राण धारण करत होता, (सः अद्य ममार) तो आज मृत झालेला आहे. (९)

(यः ईं चकार) जो करतो, (सः अस्य न वेद) तो याला जाणत नाहीं. (यः ईं ददर्श) जो पहातो (तस्मात् हिरुग् इत् नु) त्याचे खालींच तो आहे. (सः मातुः योनौ अन्तः परिवीतः) तो मातेच्या योनींत परिवेष्टित होऊन (बहुप्रजा निर्ऋतिः आविवेश) पुष्कळ संतान उत्पन्न करणाऱ्या प्रकृतींत प्रविष्ट होतो. (१०)

भावार्थ— येथें हा तोच एक शब्द आहे कीं, ज्यानें युक्त झालेली ही वाणीरूपी धेनु प्रलयकाळानंतरही अर्थात् मृत्युनंतरही प्रकाश देते. ही मननशक्तीनें मनुष्यांना युक्त करते, आणि विजेप्रमाणें विशेष प्रकाश देऊन मार्ग दाखविते. (७)

मनुष्याच्या शरीरांत एक जीव आहे; जो स्थिर आहे, तरी तो चालविणारा आहे. तो शीघ्रगति आहे व प्राणालाही आपल्याबरोबर शरिरांत ठेवतो. हाच जीव या शरीरांत रहातो. मृत मनुष्याचा हा जीव स्वतः अमर आहे, त्यामुळें तो स्वतःच्या शक्तीनें चालतो आणि दुसऱ्या मर्त्य देहाला धारण करण्यासाठीं दुसऱ्या एकाद्या योनींत देह धारण करतो. (८)

या प्राकृतिक संसारसागरांत हा जीव प्रगति करतो व विशेष कर्मही करतो. हा जीवात्मा तरुण असतांनाही दुसऱ्या महावृद्ध परमात्म्यांत प्रवेश करतो. ही त्या देवाची काव्यशक्ति पहाण्यासारखी आहे. जो जीव कालपर्यंत जिवंत होता तो आज मरत आहे. (आणि पुन्हां दुसरें शरीरही धारण करतो.) हा सर्व त्या देवाचा महिमा आहे. (९)

जो कर्ममार्गी कर्म करतो तो या देवाच्या महत्वाला जाणत नाहीं. परंतु जो ज्ञानमार्गी त्याचा साक्षात्कार करतो, त्याचे खालीं अर्थात् त्याच्या हृदयांतही तो देव त्याला दिसतो. हा जीव जेव्हां दुसरें शरीर धारण करण्यासाठीं मातेच्या गर्भांत प्रवेश करतो, त्यावेळीं पुष्कळ संतानें उत्पन्न करणारी प्रकृति त्याला घेऊन टाकते व याप्रमाणें त्याला नवीन शरीर मिळतें. (१०)

अपंश्यं गोपामनिपद्यमानमा च परा च पथिभिश्चरन्तम् ।
स सध्रीचीः स विषूचीर्वसान आ वरीवर्ति भुवनेष्वन्तः ॥ ११ ॥
द्यौर्नः पिता जनिता नाभिरत्र बन्धुर्नो माता पृथिवी महीयम् ।
उत्तानयोश्चम्वोर्योनिरन्तरत्रा पिता दुहितुर्गर्भमाधात् ॥ १२ ॥
पृच्छामि त्वा परमन्तं पृथिव्याः पृच्छामि वृष्णो अश्वस्य रेतः ।
पृच्छामि विश्वस्य भुवनस्य नाभिं पृच्छामि वाचः परमं व्योम ॥ १३ ॥
इयं वेदिः परो अन्तः पृथिव्या अयं सोमो वृष्णो अश्वस्य रेतः ।
अयं यज्ञो विश्वस्य भुवनस्य नाभिर्ब्रह्मायं वाचः परमं व्योम ॥ १४ ॥

अर्थ— (**गो-पां अनिपद्यमानं**) इंद्रियांचा रक्षक पतनाला प्राप्त न होणारा (**पथिभिः आ च परा च चरन्तं**) स्वतःच्या मार्गाच्या जवळ आणि दूर जाणाऱ्यांना (**अपश्यं**) मी पाहिलें, (**सः सध्रीचीः**) तो बरोबर विराजमान आहे (**सः विषूचीः**) तो सर्वत्र आहे, तो (**भुवनेषु अन्तः वसानः**) भुवनांमध्यें रहाणारा (**आ वरीवर्ति**) पुन्हां पुन्हां आवर्तन करतो. (११)

(**द्यौः नः पिता जनिता**) प्रकाशक देव आमचा रक्षक आणि उत्पादक आहे. तोच (**नाभिः**) आमच्यामध्यें आहे आणि (**नः बन्धुः**) आमचा बंधु आहे. त्याचप्रमाणें (**इयं मही पृथिवी माता**) ही महान् पृथ्वी आमची माता आहे. (**उत्तानयोः चम्वोः योनिः अत्र**) वरून विस्तृत तोंडाचीं हीं दोन पात्रें आहेत. त्यांचें मूळ उत्पत्तिस्थान येथेंच आहे. येथें (**पिता दुहितुः गर्भं आधात्**) पालक दूर असलेल्या प्रकृतींत गर्भाची स्थापना करतो. (१२)

(**पृथिव्याः परं अन्तः त्वा पृच्छामि**) पृथ्वीचा शेवट कोणता आहे हें मी तुला विचारतों. (**वृष्णः अश्वस्य रेतः पृच्छामि**) बलवान् अश्वाच्या वीर्याविषयीं मी तुला विचारतों. (**विश्वस्य भुवनस्य नाभिं पृच्छामि**) सर्व भुवनांच्या केंद्रांच्या विषयीं मी तुला विचारतों. (**वाचः परमं व्योम पृच्छामि**) वाणीचें परमाकाश अर्थात् उत्पत्तिस्थान मी तुला विचारतों. (१३)

(**इयं वेदिः पृथिव्याः परः अन्तः**) ही वेदी पृथ्वीच्यापलीकडचा शेवटचा भाग आहे, (**अयं सोमः वृष्णः अश्वस्य रेतः**) आणि हा सोम बलवान् अश्वाचें वीर्य आहे; (**अयं यज्ञः विश्वस्य भुवनस्य नाभिः**) हा यज्ञ सर्व भुवनांचें मध्य आहे, आणि (**अयं ब्रह्मा वाचः परमं व्योम**) तो ब्रह्मा वाणीचें परमस्थान आहे. (१४)

भावार्थ— हा जीवात्मा इंद्रियांचा रक्षक आहे आणि स्वतः पतनशील नाहीं. तो शरीरांत येतो व शरीरांतून दूरही जातो. तो परमात्मा त्याच्याबरोबर आहे, तो सर्वत्र व्याप्त आहे आणि सर्व पदार्थांत विराजमान् आहे. (११)

तो परमात्मा द्यु अर्थात् सूर्याप्रमाणें प्रकाशमान् आहे. तो आमचा सर्वांचा पिता, जनक, बंधु आणि केंद्र आहे. ही पृथ्वी अर्थात् प्रकृति आमची मोठी माता आहे. हा पिता ह्या पुत्रीरूप प्रकृतींत गर्भाचें आधान करतो. ज्यापासून ही सर्व सृष्टि उत्पन्न होत आहे. या दोन्ही प्रकृतिपुरुषांत सर्वांचें उत्पत्तिस्थान आहे. (१२)

या पृथ्वीचा शेवटचा अंतिम भाग कोणता ? बलवान् अश्वाचें वीर्य कोणतें आहे ? संपूर्ण जगाचें केंद्र कोणतें आहे ? वाणीचें परम उत्पत्तिस्थान कोणतें ? (१३)

ही यज्ञवेदी ह्या पृथ्वीचा पलीकडचा अंतभाग आहे. हा सोमरस बलवान् अश्वाचें वीर्य आहे. यज्ञच सर्व जगाचें केंद्र आहे आणि हा ब्रह्मा-आत्माच वाणीचें परम उत्पत्तिस्थान आहे. (१४)

❀

न वि जानामि यदिवेदमस्मि निण्यः संनद्धो मनसा चरामि ।
यदा मागन्प्रथमजा ऋतस्यादिद्वाचो अश्नुवे भागमस्याः ॥ १५ ॥
अपाङ् प्राङेति स्वधया गृभीतोऽमर्त्यो मर्त्येना सयोनिः ।
ता शश्वन्ता विषूचीना वियन्ता न्य१न्यं चिक्युर्न नि चिक्युरन्यम् ॥ १६ ॥
सप्तार्धगर्भा भुवनस्य रेतो विष्णोस्तिष्ठन्ति प्रदिशा विधर्मणि ।
ते धीतिभिर्मनसा ते विपश्चितः परिभुवः परि भवन्ति विश्वतः ॥ १७ ॥
ऋचो अक्षरे परमे व्योमिन्यस्मिन्देवा अधि विश्वे निषेदुः ।
यस्तन्न वेद किमृचा करिष्यति य इत्तद्विदुस्ते अमी समासते ॥ १८ ॥

अर्थ—(न विजानामि यत् इव इदं अस्मि) मी जाणत नाहीं कीं मी कोणासारखा आहें. (निण्यः संनद्धः मनसा चरामि) आंतून बांधलेला मी मनानें चालतों. (यदा ऋतस्य प्रथमजाः मा अगन्) जेव्हां सत्याचा पहिला प्रवर्तक माझ्याजवळ आला, (आत् इत् अस्याः वाचः भागं अश्नुवे) त्याचवेळीं मी त्याच्या वाणीचा भाग प्राप्त केला. (१५)

(अमर्त्यः मर्त्येन सयोनिः) अमर आत्मा मरणधर्मवान् शरीराबरोबर एक उत्पत्तिस्थानांत प्राप्त होऊन (स्वधया गृभीतः अपाङ् प्राङ् एति) स्वतःच्या धारणाशक्तीनें युक्त होऊन खालीं व वर जातो. (ता शश्वन्ता विषूचीना) ते दोन्ही शाश्वत रहाणारे, विविध गतियुक्त परंतु (वियन्ता) विरुद्ध गतिमान् आहेत. त्यांतून (अन्यं निचिक्युः) एकाला जाणतात आणि (अन्यं न निचिक्युः) दुसऱ्याला जाणत नाहींत. (१६)

(भुवनस्य रेतः सप्त अर्धगर्भाः) सर्व भुवनांचें वीर्य सात अर्धगर्भांत परिणत होऊन (विष्णोः प्रदिशा विधर्मणि तिष्ठन्ति) व्यापक देवाच्या आज्ञेंत राहून विशेष गुणधर्मांत राहतात. (ते धीतिभिः मनसा) बुद्धि आणि मनानें युक्त होऊन त्याचप्रमाणें (ते विपश्चितः परिभुवः) ते ज्ञानी आणि सर्वत्र उपस्थित होऊन (विश्वतः परिभवन्ति) सर्व बाजूनीं घेरतात. (१७)

(परमे व्योमन्) परमाकाशांत उत्पन्न होणाऱ्या (यस्मिन् ऋचः अक्षरे) ज्या मंत्राच्या अक्षरांत (विश्वे देवाः अधि निषेदुः) सर्व देव निवास करतात, (यः तत् न वेद) जो ही गोष्ट जाणत नाहीं तो (ऋचा किं करिष्यति) वेदमंत्र घेवून काय करील ? (ये इत् तत् विदुः ते इमे समासते) जे निश्चितरूपानें त्याला जाणतात ते या उत्तमस्थानांत बसतात, (१८)

भावार्थ— हा आत्मा कोणासारखा आहे हें समजत नाहीं. हा आत्मा या शरीरांत बद्ध होऊन राहिला आहे परंतु मनानें मोठी हालचाल करतो. ज्यावेळीं सत्यधर्माचा प्रथम प्रवर्तक परमात्म्याला प्राप्त होतो त्यावेळींच या दिव्य मंत्राच्या वाणीचें भाग्य त्याला प्राप्त होतें. (१५)

हा आत्मा अमर आहे, तथापि मरणधर्मवान् शरीराबरोबर राहिल्यामुळें विविध योनींमध्यें जन्मतो. तो आपल्या धारक-शक्तीच्या बरोबरच शरीरांत येतो अथवा शरीरांपासून पृथक् होतो. हे दोघे शाश्वत आहेत व गतिमानही आहेत. तथापि त्यांच्या गतीमध्यें अंतर आहे. त्यांतून एकाला जाणतात, परंतु दुसऱ्याचें ज्ञान होत नाहीं. (१६)

सर्व बनलेल्या पदार्थांचें मूळ बीज सात तत्वांत आहे. हीं सात मूळ तत्वें व्यापक परमेश्वराच्या आज्ञेंत कार्य करतात. ज्ञानी लोक मनानें या ज्ञानाला प्राप्त करून सर्वत्र उपस्थित असल्यासारखे ज्ञानी होतात. (१७)

या मोठ्या आकाशांत शब्द उत्पन्न होतो; त्या शब्दांनीं होणाऱ्या ऋचेच्या अक्षरांत अनेक देवतांचा निवास असतो. जो मनुष्य ही गोष्ट जाणत नाहीं, तो नुसत्या मंत्रांना घेऊन काय करणार ? परंतु जे या तत्त्वाला जाणतात ते परमपदावर जाऊन विराजमान् होतात (१८)

ऋचः पदं मात्रया कल्पयन्तोऽर्धर्चेन चाक्लृपुर्विश्वमेजत् ।
त्रिपाद्ब्रह्म पुरुरूपं वि तष्ठे तेन जीवन्ति प्रदिशश्चतस्रः ॥ १९ ॥
सूयवसाद्भगवती हि भूया अधा वयं भगवन्तः स्याम ।
अद्धि तृणमघ्न्ये विश्वदानीं पिब शुद्धमुदकमाचरन्ती ॥ २० ॥
गौरिन्मिमाय सलिलानि तक्षत्येकपदी द्विपदी सा चतुष्पदी ।
अष्टापदी नवपदी बभूवुषी सहस्राक्षरा भुवनस्य पङ्क्तिस्तस्याः
समुद्रा अधि वि क्षरन्ति ॥ २१ ॥
कृष्णं नियानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति ।
त आववृत्रन्त्सदनादृतस्यादिद् घृतेन पृथिवीं व्यूदुः ॥ २२ ॥

अर्थ— (ऋचः पदं मात्रया कल्पयन्तः) मंत्राच्या पदाला मात्रेनें समर्थ करतात. (अर्धर्चेन एजत् विश्वं चाक्लृपुः) अर्ध्या मंत्रानें चालणारे जगाला समर्थ करतात. याप्रमाणें (त्रिपात् ब्रह्म पुरुरूपं वितष्ठे) तीन पदांचें ज्ञान बहुरूपानें स्थिर झालें आहे. (तेन चतस्रः प्रदिशः जीवन्ति) त्यामुळें चारी दिशा जीवित राहतात. (१९)

हे (अघ्न्ये) अवध्य धेनु ! तूं (सु-यवस-अद् भगवती हि भूयाः) उत्तम गवत खाणारी भाग्यशाली हो, (अधा वयं भगवन्तः स्याम) आणि आम्ही भाग्यशाली होऊं. (विश्वदानीं तृणं अद्धि) सर्वदा तृण भक्षण कर आणि (आचरन्ती शुद्धं उदकं पिब) फिरत असतां शुद्ध जल प्राशन कर. (२०)

(गौ इत् सलिलानि तक्षति) गाय निश्चयानें पाण्याला हालवीत (मिमाय) शब्द करते. (सा एकपदी द्विपदी चतुष्पदी) ती एक पादाची, दोन पादाची, चार पादाची (अष्टापदी नवपदी) आठ पादाची, नऊ पादाची (बभूवुषी) बहुत होण्याची इच्छा करणारी (सहस्र अक्षरा) हजारों अक्षरांची (भुवनस्य पंक्तिः) भुवनाची पंक्ति आहे. (तस्याः समुद्राः अधि विक्षरन्ति) तिच्यापासून सर्व समुद्राचे रस वाहतात. (२१)

(अपः वसानाः) पाणी आपल्याबरोबर घेऊन (सुपर्णाः हरयः) उत्तम गतिमान् सूर्यकिरण (कृष्णं नियानं दिवं) सर्वांचें आकर्षण करणाऱ्या सर्वांच्या गतिरूप सूर्यावर (उत्पतन्ति) चढतात. (ते ऋतस्य सदनात्) ते जलस्थानरूप अंतरिक्षांतून (आववृत्रन्) खालीं येतात, (आत् इत् घृतेन पृथिवीं वि ऊदुः) आणि पाण्यानें पृथ्वीला भिजवतात. (२२)

भावार्थ— मंत्राचे पाद मात्रेच्या संख्येनें मोजले जातात. या मंत्राच्या अर्ध्या भागानेंच संपूर्ण विश्व चेतन आणि सामर्थ्यवान् होतें. हें त्रिपाद ब्रह्म अनेक रूपांत स्थिर झालेलें आहे आणि त्याच्या योगानेंच चारी दिशा उपदिशांचें जीवन सुरू झालें आहे. (१९)

हे अवध्य वाक्‌रूपी धेनु ! तूं अर्थात् तुला प्रयुक्त करणारा वक्ता उत्तम सात्त्विक अन्नानें उत्तम भाग्ययुक्त होवो आणि तुझ्या भाग्यानें आम्हीहि भाग्यशाली होऊं. तूं नेहमीं शुद्ध जल आणि अन्नाचें सेवन कर. (२०)

ही वाक्‌रूपी गाय अर्थात् काव्यमय वाक् एक, दोन, चार, आठ, अथवा नऊ पादांच्या छंदांत विभक्त झाली आहे. ती अनेक प्रकारची आहे आणि हजार अक्षरांपर्यंत तिची मर्यादा आहे. जणूं काय ती सर्व भुवनाला पूर्ण करणारी आहे, आणि तिच्यापासून विविध रस स्रवतात. (२१)

सूर्यकिरण स्वतःबरोबर पाणी नेतात. ते पाणी त्यांच्याबरोबर वर मेघमंडलांत जातें आणि तेथून परत पर्जन्याच्या स्वरूपांत खालीं येतें व भूमीला भिजवितें. (२२)

अपादेति प्रथमा पद्वतीनां कस्तद् वां मित्रावरुणा चिकेत ।
गर्भो भारं भरत्या चिदस्या ऋतं पिपर्त्यनृतं नि पाति ॥ २३ ॥
विराड् वाग् विराट् पृथिवी विराडन्तरिक्षं विराट् प्रजापतिः ।
विराण्मृत्युः साध्यानामधिराजो बभूव तस्य भूतं भव्यं
वशे स मे भूतं भव्यं वशे कृणोतु ॥ २४ ॥
शकमयं धूममारादपश्यं विषूवता पर एनावरेण ।
उक्षाणं पृश्निमपचन्त वीरास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ॥ २५ ॥
त्रयः केशिन ऋतुथ वि चक्षते संवत्सरे वपत एक एषाम् ।
विश्वमन्यो अभिचष्टे शचीभिर्ध्राजिरेकस्य ददृशे न रूपम् ॥ २६ ॥

अर्थ--(पद्वतीनां प्रथमा अपात् एति) पाय असलेल्या प्राकृत मूर्तीमध्यें सर्वांच्या प्रथमस्थानांत राहणारी शक्ति पादरहित आहे. हे मित्र आणि वरुण हो ! (वां कः तत् चिकेत) तुम्हां दोघांतून कोण त्याला जाणतो ? (गर्भः अस्याः भारं आभरति चित्) गर्भांत राहणारा हा प्रकृतीचा भार वहन करतो, तोच (ऋतं पिपर्ति) सत्याची पूर्णता करतो आणि (अनृतं नि पाति) असत्याचा नाश करतो. (२३)

विराट् वाणी, पृथ्वी, अंतरिक्ष, प्रजापति आणि मृत्यु आहे. तोच विराट् (साध्यानां अधिराजः बभूव) साध्यांचा अधिराजा आहे; (तस्य वशे भूतं भव्यं) त्याच्या आधीन भूत आणि भविष्य आहे. (सः मे वशे भूतं भव्यं कृणोतु) तो माझ्या स्वाधीन भूत आणि भविष्य करो. (२४)

(विषूवता परः आरात् अवरेण) अनेक रूपांच्या अतिशय दूर आणि जवळही (एना शकमयं धूमं अपश्यं) त्या शक्तिशाली धूमाला मी पाहिलें आहे. तेथें (वीराः पृश्निं उक्षाणं अपचन्त) वीर पुरुष लहान बैलांना परिपक्व करून राहिले आहेत. (तानि धर्माणि प्रथमानि आसन्) ते धर्म प्रथम होते. (२५)

(त्रयः केशिनः ऋतुथ विचक्षते) तीन किरणांचे पदार्थ ऋतूंच्या अनुसार पहाण्यांत येतात. (एषां एकः संवत्सरे वपते) त्यांतून एक वर्षांत एक वेळ उत्पन्न होतो. (अन्यः शचीभिः विश्वं अभिचष्टे) दुसरा शक्तींनीं विश्वाला प्रकाशित करतो. (एकस्य ध्राजिः ददृशे) एकाची गति दिसते परंतु त्यांचें (रूपं न) रूप दिसत नाहीं. (२६)

भावार्थ— पाय असलेल्या शरीराचा चालक आत्मा पायांशिवाय आहे. या चालक आत्म्याला कोण जाणूं शकतो ? हा चालक आत्मा या स्थूलाचा सर्व भार सहन करतो आणि सत्याचें रक्षण करून असत्याचा नाश करतो. (२३)

या विराट् आत्म्याचें रूप वाणी, पृथ्वी, अंतरिक्ष, प्रजापालक आणि प्रजासंहारक मृत्युही आहे. हा सर्वांचा राजाधिराज आहे. आणि या विराटाच्या अधीन भूत, भविष्य आणि वर्तमान आहे. तो विराट् सर्व भूत, भविष्य, वर्तमान माझ्या स्वाधीन करो. (२४)

जवळ आणि बहुत दूरही मी धूमाला पाहिलें व त्यावरून अग्नीचें अनुमान केलें. या अग्नीवर वीर लोक लहान बैलांना परिपक्व बनवितात. हीं यज्ञकर्में सर्वांच्या पूर्वी होत होतीं. (२५)

तीन देव किरणवाले अर्थात् प्रकाशमान आहेत. त्यांतून एक वर्षांतून एकदांच प्रकाशतो, दुसरा स्वतःच्या निजशक्तींनीं सर्व विश्वाला प्रकाशित करतो आणि तिसऱ्याची मात्र फक्त गतीच प्रतीत होते. परंतु त्याचें रूप दिसत नाहीं. (२६)

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः ।
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥ २७ ॥
इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् ।
एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ २८ ॥

अर्थ— (वाक् चत्वारि पदानि परिमिता) वाणीचीं चार स्थानें परिमित झालीं आहेत. (ये मनीषिणः ब्राह्मणाः) जे ज्ञानी ब्राह्मण आहेत ते (तानि विदुः) त्यांना जाणतात. त्यांपैकीं (त्रीणि गुहा निहिता) तीन गुप्त स्थानीं ठेवलेल्या आहेत. त्या (न इंगयन्ति) प्रगट होत नाहींत. (मनुष्याः वाचः तुरीयं वदन्ति) मनुष्य वाणीच्या चतुर्थ रूपाला बोलतात. (२७)

(एकं सत्) एक सत् वस्तु आहे, तिचें (विप्राः बहुधा वदन्ति) ज्ञानी लोक अनेक प्रकारें वर्णन करतात. त्याच एकाला इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, दिव्य सुपर्ण, गरुत्मान्, यम आणि मातरिश्वा (अथो आहुः) म्हणतात. (२८)

भावार्थ— वाणीचीं चार स्थानें आहेत. त्यांना मननशील ब्रह्मज्ञानी जाणतात. त्यांतून तीन स्थानें हृदयांत गुप्त आहेत, आणि जें मनुष्य बोलतो, ती चतुर्थस्थानांत व्यक्त होणारी वाणी आहे. (२७)

सत्यतत्त्व केवल एकच आहे, परंतु ज्ञानी लोक त्या एक सत्यतत्त्वाचें वर्णन त्याच्या गुणबोधक अनेक नामांनीं करतात. त्य एक सत्यतत्त्वाला ते इंद्र, मित्र, वरुण वगैरे भिन्न भिन्न नामें देतात. (२८)

एक आत्म्याचीं अनेक नांवें

छंदांचें महत्व
वाणी आणि गोरक्षण

गायत्री, त्रिष्टुप, जगती, इत्यादि सात छंद मुख्य आहेत. त्यांचे भेद आणखी पुष्कळच आहेत. या सात छंदांत वेदांचें ज्ञान भरलेलें आहे; म्हणून म्हटलें आहे कीं अज्ञानाचें आच्छादन करून ज्ञानाचें प्रकाशन करणारे हे छंद आहेत. या छंदांत कोणत्या प्रकारचें ज्ञान आहे, या विषयीं थोडेंसें विवरण प्रथम मंत्रांत आहे. त्यांत सांगितलें आहे कीं—

(गायत्रं गाय-त्रं) गायत्री छंदांत (गाय) प्राणांचें (त्रं) रक्षण करण्याचें ज्ञान आहे. जे लोक गायत्री छंदात्मक मंत्रांचें उत्तमरीतीनें अध्ययन करतील, ते प्राण रक्षण करण्याची विद्या उत्तम रीतीनें जाणूं शकतील. (त्रैष्टुभात्) त्रिष्टुप् छंदांत (त्रै-ष्टुभं) तिघांचें अर्थात् प्रकृति, जीवात्मा आणि परमात्मा यांचें गुणवर्णन आहे. यामुळें जे लोक त्रिष्टुप् छंदात्मक मंत्रांचें उत्तम रीतीनें अध्ययन करतील, त्यांना प्रकृतिविद्या, आत्मविद्या आणि ब्रह्मविद्येचें ज्ञान होऊं शकतें आणि ते प्रकृतिविद्येपासून ऐहिक सुख आणि आत्मविद्येपासून अमृतत्व प्राप्त करूं शकतात. याप्रमाणें ही वेदमंत्रांची विद्या इह-परलोकाच्या सुखाचें साधन होतें.

(जगति जगत्) जगती छंदांत जगासंबंधीं अद्भुत ज्ञान भरलेलें आहे. जें ज्ञान प्राप्त केल्यानें मनुष्य या जगांत विजयी होऊं शकतो. यासाठींच या मंत्रांत पुढें सांगितलें आहे कीं—

य इत् तत् विदुः अमृतत्वं आनुशुः । (मं १)

" जे ज्ञानी या (वैदिक) ज्ञानाला यथावत् जाणतात ते अमृताला अर्थात् मोक्षाला मिळवितात. " उक्त प्रकार छंदाची विद्या जाणणारे मोक्षाचे अधिकारी होऊं शकतात. याचा अर्थ असा नाहीं कीं, ते फक्त मोक्षाचेच अधिकारी होतात आणि या जगातील उन्नतीला प्राप्त करूं शकत नाहींत. परंतु ते जागतिक उन्नतीला जसे प्राप्त करतात त्याचप्रमाणें आत्मिक उन्नतीही प्राप्त करून घेऊं शकतात. जे मोक्षाचे अथवा अमृततत्त्वाचे अधिकारी आहेत ते सामान्यतः भौतिक उन्नतीला प्राप्त करूं शकतात हें निराळें सांगण्याची आवश्यकताच नाहीं.

श्रीकृष्ण भगवान्, राजा जनक, प्रभु रामचंद्र इत्यादि मुक्त पुरुष या लोकाचा व्यवहार करण्यांतही अत्यंत दक्ष होते; आणि त्यांनीं ऐहिक व्यवहार उत्तम रीतीनें केले होते आणि हे अमृतत्वाचे अधिकारी होते याविषयीं तर कुणासही शंकाच नाहीं. याप्रमाणें या वेदमंत्राचें ज्ञान प्राप्त करणारे मनुष्य इह-परलोकीं परम उच्चगतीला प्राप्त करूं शकतात. प्रत्येक मनुष्य जो या भूलोकांत देह धारण करून आला आहे, तो अमरत्व, प्राप्त करण्यासाठींच आलेला आहे, म्हणून असें म्हटलें जातें कीं वेदाचें ज्ञान प्रत्येक मनुष्याला उन्नतीचा मार्ग दाखविण्यास समर्थ आहे. (**गायत्रेण अर्कं प्रति मिमीते**) गायत्री छंदानें अर्चनीय देवाची शब्दरूपी प्रतिमा निर्माण केली आहे. प्रत्येक मनुष्याला ज्या एका अद्वितीय ईश्वराची अर्चा अत्यंत आवश्यक आहे, त्या देवाची प्रतिमा वस्तुतः मुळांत नाहींच, परंतु त्याची शब्दमयी प्रतिमा '**गायत्री छंद**' आहे. यासाठींच कोणीही एकाद्या स्थळीं परमात्म्याची प्रतिमा पाहूं शकत असेल तर तो या छंदांतच पाहूं शकतो. (**अर्केण साम**) या अर्चनीय अर्थात् पूजनीय देवाच्या सहाय्यानें 'साम' अर्थात् शांति प्राप्त होते. या शांतीचें ही दुसरें नांव 'अमृत' आहे. अमृत आणि साम हे एकाच अवस्थेचे वाचक शब्द आहेत. याचप्रमाणें त्रिष्टुप् छंदानें पण वर्णनीय देवतेचें वर्णन होऊं शकतें. त्रिष्टुभ छंदाची वाणी त्याचेंच वर्णन करते. पूर्वमंत्रांत सांगितलें आहे कीं त्रिष्टुप छंदानें प्रकृति, जीव आणि परमात्म्याचें वर्णन होतें, ही गोष्ट येथें अनुसंधानासाठीं लक्षांत घ्यावी. याप्रमाणें—

सात छंद

द्विपदा चतुष्पदा सप्तवाणीः अक्षरेण मिमते । (मं. २)

'दोन चरण आणि चार चरणांचे जे सात छंद आहेत, त्यांच्या प्रत्येक चरणांत अक्षरांच्या संख्येचें परिमाण अक्षरांच्या संख्येची गणना केल्यानेंच होतें.' ज्याप्रमाणें अनुष्टुप् छंदाच्या चरणांत आठ अक्षरें येतात, याचप्रमाणें दुसऱ्या छंदांच्या पादांत अक्षरांची संख्या अन्य आहे. याप्रमाणें अक्षरांच्या संख्येच्या न्यूनाधिकतेनें हे छंद होतात.

(**गायत्रस्य तिस्रः समिधः**) गायत्री छंदाचे तीन पाद आहेत. प्रत्येकांत आठ अक्षरें असतात. जगति छंदानें जगाचें वर्णन होतें ही गोष्ट प्रथम मंत्रांत सांगितलेलीच आहे. हीच गोष्ट पुन्हां या तिसऱ्या मंत्रांत दुसरे वेळीं सांगितली आहे, आणि असें म्हटलें आहे कीं (**जगता दिवि सिंधुं अस्कभायत्**) जगति छंदानें जणूं काय द्युलोकांत महासागराला पसरून ठेवला आहे. अर्थात् जसें महासागराचें वर्णन होतें तसेंच द्युलोकाचें वर्णन केलें आहे. या महासागरांत हीं नक्षत्रें लहान लहान द्वीपाप्रमाणें आहेत. इत्यादि अलंकारिक वर्णन येथें समजणें उचित आहे.

याचप्रमाणें (**रथंतरेण सूर्यं पर्यपश्यत्**) रथंतरानें सूर्याचें ज्ञान प्रत्यक्ष होतें. कारण कीं त्यांत हें वर्णन अतिस्पष्ट आहे. त्या ज्ञानाच्या 'महा महित्वा' महत्तेचें काय वर्णन करावें ? हें स्थान तर मनुष्याला त्याच्या अंतिम मजल्यापर्यंत पोहोंचवितें. हें ज्ञान तर मनुष्याला या जगांत आणि त्या स्वर्गांत त्याप्रमाणें शेवटीं मोक्षापर्यंत उत्तम मार्गदर्शक होतें, म्हणून हेंच वेदमंत्राचें ज्ञान सर्वांहून अधिक महत्वपूर्ण आहे.

चांगल्या हाताचे गोरक्षक

ज्याप्रमाणें (**सुहस्तः सुदुघां धेनुं उपह्वये**) उत्तम हाताचा गोरक्षक दोहन करण्यास योग्य अशा धेनूस बोलावितो, त्याप्रमाणें योग्य संस्कारी मनुष्यानें त्या वेदवाणीरूपी कामधेनूला स्वतःजवळ बोलवावें. गायीची धार काढणारा '**सुहस्तः**' अर्थात् उत्तम प्रेमपूर्ण हाताचा असला पाहिजे. तो 'दुर्हस्त' खराब हाताचा असूं नये. दुर्हस्त मनुष्य धार काढतांना गाईला कष्ट देतो. अशा दुर्हस्त मनुष्यानें गायीला कधींहि आपल्याजवळ बोलावूं नये. गाय अवध्य असल्यानें, तिच्याशीं कोणत्याही प्रकारें खराब हाताच्या मनुष्याचा संबंध न यावा. सुहस्त होऊनच मनुष्य तिच्याजवळ जावा. याप्रमाणें वेदाचा उपदेश हा सांगत आहे कीं '**गोरक्षण**' करणें हा मनुष्याचा वेदोक्त धर्म आहे. जो प्रेमानें गायींचें पालन करतो तोच खरा वैदिकधर्मी आहे. कारण '**गौ**' शब्द ज्याप्रमाणें गायीचा वाचक आहे त्याचप्रमाणें तो '**वेदवाणीचा**' ही वाचक आहे. त्यामुळें '**गोरक्षा**' याचा अर्थ '**गाईचें रक्षण**' तसेंच 'वेदज्ञानाचें रक्षण' असाही होतो. म्हणूनच म्हटलें आहे कीं गोरक्षकच वैदिकधर्मी होऊं शकतो.

(**गोधुक् एनां दोहत**) गायींची धार काढणारा या गाईचें त्याचप्रमाणें या वेदवाणीचें दोहन करो. गाईची धार काढण्यानें अमृतरूपी दूध प्राप्त होतें. त्याचप्रमाणें वेदवाणीरूप वाक् गाईचें दोहन केल्यानें अमृताप्रमाणें ज्ञान प्राप्त होतें. गाईच्या दुधानें ज्याप्रमाणें यज्ञ होतो, त्याप्रमाणें वेदज्ञानानेंही होतो. येथें यज्ञ करण्याची हींच दोन्हीं साधनें आहेत. म्हणूनच म्हटलें आहे कीं (**तत् घर्मः सुप्रवोचत्**) यज्ञाचेंच वर्णन ते मंत्र करतात. वेदवाणीरूपी गाय स्वतःच्या ज्ञानानें यज्ञाचा मार्ग दाखविते व ही गाय स्वतःच्या दुधानें यज्ञ करते. याप्रमाणें या दोन्ही गायीं समान आहेत.

(**वसूनां वसुपत्नी**) ही गाय-वेदवाणी आणि गोमाता वसूंचे पालन करणारी आहे. वसु हें नांव ऐश्वर्याचें वाचक आहे. सर्व प्रकारचें ऐश्वर्य ज्ञानानें व बलानेंच प्राप्त होतें. वेदवाणीरूप गायीपासून ज्ञान मिळतें, आणि गोमातेपासून पोषक अन्न मिळतें. याप्रमाणें या दोन्ही गाई ऐश्वर्याचें प्रदान करतात. ज्याप्रमाणें ही गोमाता आपल्या (**वत्सं इच्छन्ती**) वत्साची इच्छा करणारी होऊन घरांत येते त्याचप्रमाणें ही वेदवाणीही या भूमंडळावर यासाठीं अवतीर्ण झाली आहे कीं या अनंत मानव जीवांनीं ज्ञानामृताचें पान करावें व अमर व्हावें. याप्रमाणें दोन्ही गाईंना आपल्या वत्सांच्या पालन पोषणाची इच्छा आहे. या गाई (**महते सौभगाय वर्धतां**) आम्हांस मोठें सौभाग्य वाढवोत, व या वाढवितातही; पण मनुष्यांनीं त्या गाईपाशीं जावें आणि त्यांचा अमृतरस पिऊन पुष्ट व्हावें. या गाई तर आमचें कल्याण करण्यास तयार आहेतच फक्त माणसें इतकी मंदमति झालेलीं आहेत कीं, तीं गाईचें दूध पीत नाहींत आणि दुसरींच दुधाच्या मागे लागत असतात. अगदीं याचप्रमाणें मनुष्य वेदवाणीचा अवलंब न करतां, तिला शरण न जातां अन्य ग्रंथांच्या नादीं लागतात, आणि भ्रमांत पडतात; म्हणून हा उपदेश सर्व मनुष्यांनीं ग्रहण करावा. ज्याला ज्याला म्हणून स्वतःच्या उन्नतीची चाड आहे, त्यानें गोदुग्धप्राशन करावें आणि वेदांचा उपदेश ग्रहण करावा.

गायसुद्धां (**गौः मिषन्तं वत्सं अमीमेत्**) स्वतःच्या उत्सुक वांसरावरच प्रेम करीत असते. जर वांसरूंच प्रेमानें आईकडे गेलें नाहीं अथवा पोटांतील कांहीं अस्वस्थतेमुळें त्यानें तिचें दूध प्राशन न केलें, तर त्याला माता काय बरें करणार ? म्हणून वासरांत उत्सुकता पाहिजे. ज्या वत्सांचें पोट ठीक आहे, भूक उत्तम लागते आणि पचनशक्ति उत्तम आहे, त्यांनाच मातेच्या दुधानें लाभ होतो. त्याचप्रमाणें वेदवाणीरूप गायही जो शिष्य उत्सुक असेल त्यालाच लाभ देऊं शकते. मनुष्य जर वेदवाचन करणार नाहीं, वेद वाचूनही त्यांतील अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणार नाहीं, जर कदाचित् अर्थ समजला तर त्याप्रमाणें अनुष्ठानास प्रवृत्त होणार नाहीं, अनुष्ठानास प्रवृत्त झालाच तर त्यांत तत्पर राहणार नाहीं, तर वेदवाणीरूप गाईपासुन त्याला लाभ तरी कसा होईल ? याप्रमाणेंच मुमुक्षु होणेंही आवश्यक आहे. ही गाय (**पयोभिः मायुं अभिमिमीते**) आपल्या दुधाबरोबर प्रकाशही पसरविते. ही गोष्ट सर्वांस माहितच आहे की सकाळीं गाईची धार काढली न काढली, तोंच सूर्योदय होतो व विश्वांत सर्वत्र प्रकाशच प्रकाश पसरतो. वेदवाणीरूप गायही स्वतःचें ज्ञानरूपी अमृत देते व ज्ञानाचा प्रकाश उपासकाच्या मनांत पसरविते. याप्रमाणें दोन्ही ठिकाणीं दूध देणें व प्रकाश पसरविण्याचें तत्त्व समान आहे.

गाईचें सहाय्य

ही गाय (**ध्वसनौ अधिश्रिता**) विनाशकाळीं आश्रय करण्यास योग्य आहे. रोग, क्षीणता, अपचन वगैरे समयीं गाईचें दूध अमृततुल्य आहे. रोगी अवस्थेंत आणि प्रसूति समयीं गाईचें दूधच लाभप्रद आहे. त्याचप्रमाणें उदासवाणें वाटूं लागल्यावर आणि जगाचा विनाश पाहून उपरति झाल्यावर मोक्षमार्गाचा स्वीकार करण्यास उत्सुक झालेल्यांना वेदरूपी गाईचाच आश्रय करणें योग्य आहे. त्या वेदाचे मंत्रच (**मायुं मिमाति**) मार्गांतील दिव्यांप्रमाणें सहायक होतात. (**सा चितिभिः मर्त्यान् निचकार**) ती गाय मनुष्याला चिंतन आणि मननशक्तीच्या योगानें सहायक होते. अर्थात् गाईच्या दुधानें मनुष्याची बुद्धि तीव्र आणि सूक्ष्म होते, आणि मनुष्य बुद्धिमान होतो. वेदरूपी गाईपासूनच मनुष्य मनन करूं शकतो. मननशक्ति वाढविण्यामुळेंच छन्दांना मंत्र अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. याप्रमाणें दोन्ही ठिकाणीं मननशक्तीनें ही गाय मनुष्याला सहाय्य करते. (**विद्युत् भवन्ती**) ती विजेप्रमाणें आहे. ज्याप्रमाणें वीज वेग वाढविते, त्याप्रमाणें गाईच्या दुधाच्या सेवनानें मनुष्यांत स्फूर्ति येते, आणि वेदज्ञानानें बुद्धिही तीव्र होते. विजेप्रमाणें बुद्धि आणि तेज वाढविण्याचें कार्य दोन्ही गायींकडून होतें.

येथपर्यंत सात मंत्रांत गाय आणि वेदवाणीचें समान वर्णन केलेलें आहे. पुढें २० आणि २१ या दोन मंत्रांतही असेंच वर्णन असल्यानें, विषय सादृश्यामुळें हे दोन मंत्र येथें पाहत आहों.

ही गाय (**सु-यवस-अद्**) उत्तम जव खाणारी असल्यानें (**भगवती भूयाः**) भाग्यवान् होते. जर ती दुसरे पदार्थ खाईल तर तिचें दूध पाहिजे तेवढें हितकारक होणार नाहीं. वेदवाणीरूप गाईच्या बाबतींत जव भक्षण करणाऱ्यांचे वर्णोच्चार उत्तम आणि शुद्ध असतात. जव व तांदुळ खाणाऱ्यांचे वर्णोच्चार शुद्ध, उत्तम आणि सूक्ष्म असतात. हीं मनुष्यें तीव्र व सूक्ष्म कुशाग्रबुद्धीचीं असतात. याप्रमाणें आम्ही–

अधा वयं भगवन्तः स्याम । (मं. २०)

" या योगानें आम्हीही भाग्यवान् होऊं. " अर्थात् आम्हीही जवाचें अन्न खाऊन बुद्धिमान् होऊं आणि गायही जव भक्षण करून उत्तम दूध देवो. जवाचें गवत गाईनें खावें, व जवाचें पीठ अर्थात सातू अथवा सत्तुपिष्ठ मनुष्यानें खावें. श्रावणीच्या वेळेला सातू भक्षण करणें आवश्यक सांगितलें आहे येथें हें सूचित केलें आहे. किं तें शुद्ध आणि सात्त्विक अन्न आहे. वेदांतही (**सक्तुमिव तितउना पुनन्तः** ऋ. १०।७१।२) इत्यादि मंत्रांत सातूचें अन्नच

निर्दिष्ट केलें आहे. यावरून या अन्नाचें महत्व स्पष्ट होतें. गाईनें जवाचें गवत (**तृणं अद्धि**) खावें आणि (**शुद्धं उदकं पिब**) शुद्ध निर्मल पाणी प्यावें. मनुष्यांनाही शुद्ध जवाचें पीठ भक्षण करणें व वस्त्रानें गाळलेलें शुद्ध पाणी पिणें योग्य आहे. याप्रमाणें गाय आणि वाणी यासाठीं एकाच प्रकारचें अन्न पथ्य आहे. मनुष्याचें खाणेंपिणें सात्त्विक असेल, तरच त्याची वाणी पवित्र होतें, हें येथें तात्पर्य आहे. मनुष्य ज्या गाईचें दूध पीत असेल, ती गायही तेच पदार्थ खात असली पाहिजे. अभक्ष्य असे अपवित्र दुसरे पदार्थ तिनेंही न खावेत. या विचारानें हें उघड आहे कीं बाजारांत जें गाईचें दूध विकलें जातें तें दूध अमृत नाहीं. अर्थात् प्रत्येक घरांत गाय पाळण्यांत येऊन तिला शुद्ध आणि पवित्र पदार्थ खाण्यांस दिले गेले आणि शुद्ध पाणी पिण्यास दिलें गेलें तरच तिच्यापासून उत्पन्न होणारें दूध अमृत पदवीला प्राप्त होऊं शकेल. वेद ज्याप्रमाणें गोरक्षण इच्छित आहे त्याचा विधि हा आहे. वाचकांनीं विचारानें जाणावें कीं वेदांत गोरक्षणाचा विधि कसा आहे.

पुढील मंत्रांत (**गौः सलिलानि तक्षति**) गाय पाणी हालविते असें सांगितलें आहे. गाय शुद्ध आणि निर्मळ जलांत प्रविष्ट झाल्यानें तें हालतें व तें शुद्ध जल पिते; व ती तें पिऊन तृप्त होते. या सामान्य वर्णनानंतर ही गाय (**एकपदी, द्विपदी, चतुष्पदी, अष्टापदी, नवपदी, सहस्राक्षरा**) एक, दोन, चार, आठ, नऊ पायांची आणि सहस्र अक्षरांनीं युक्त आहे असें जें सांगितलें आहे, तें उघड वेदवाणीचेंच वर्णन आहे. वेदांतील छंद एक चरणाचे, दोन, आठ, नऊ चरणांचे आणि सहस्र अक्षरांचे आहेत. सामान्य गाय नेहमीं चार पायांची असते. ती कधींही आठ, नऊ पायांची नसते. चरण आणि पाद हीं नांवें मंत्रभागाचीं आहेत, अर्थात् हा मंत्रभाग वेदवाणीरूप गाईचेंच वर्णन करीत आहे हें उघड आहे. ही वेदवाणीरूप गाय (सहस्र अक्षरा) हजारों अक्षय अमृतधारांचें प्रदान करते आणि (**भुवनस्य पंक्तिः**) सर्व भुवनांना संपूर्णपणें पावन करते आणि (**तस्याः समुद्राः अधि विक्षरन्ति**) तिच्यापासून समुद्रासारखे रसप्रवाह भरपूर प्रमाणांत लोकांना मिळतात. यामुळें या वेदवाणीरूप गाईचें ज्ञानामृत प्राशन करून, मोक्षमार्गावर चालून अमरत्व प्राप्त करून घेणें हेंच मनुष्याचें योग्य आणि उचित कर्तव्य आहे. येथपर्यंत गायींच्या वर्णनाच्या मिषानें अर्थात् गोरक्षणाच्या मिषानें वेदज्ञानाचें महत्व वर्णन केलें आहे. यापुढें हें ज्ञान मनुष्याला उन्नतीच्या मार्गावर नेण्यास कसें सहायक होतें तें पहा—

जीवात्मा

प्राण्यांच्या शरीरांत जीवात्मा आहे, आणि तोच येथील जीवनाचें कार्य करतो. याबाबतींत आठव्या मंत्राचें विधान पहा—

पस्त्यानां मध्ये ध्रुवं एजत् जीवं तुरगातु अनत् शये ।
(मं. ८)

" प्राण्यांच्या शरीरांत जीवात्मा आहे अर्थात स्थिर, चालक, वेगवान् प्राणाला चालविणारा तो आहे आणि तो या शरीरांत राहतो. " हें शरीरांत शयन करणाऱ्या जीवात्म्याचें वर्णन आहे. ' पुरुष ' शब्दाचा अर्थ ' **पुरि शेते इति पुरुषः** ' शरीररूपीं नगरींत शयन करतो, म्हणून या आत्म्याला ' पुरुष ' (**पुरिशय**) असें म्हणतात, असा अर्थ येथें आहे. या जीवात्म्याची ' ध्रुव, एजत्, जीव, तुरगातु, अनत् ' हीं विशेषणें विचारार्ह आहेत. हीं विशेषणें अन्यत्रही आलीं आहेत. जोंपर्यंत शरीरांत हा जीवात्मा राहतो तोंपर्यंत उक्त कार्यें शरीरांत पहाण्यांत येतात. तो शरीराहून भिन्न आहे आणि शरीर क्षीण व निकामी झालें असतां तो शरीराला सोडून देतो. या विषयीं याच मंत्रांत सांगितलें आहे कीं—

मृतस्य जीवः अमर्त्यः स्वधाभिः चरति मर्त्येन सयोनिः । (मं. ८)
अमर्त्यः मर्त्येन सयोनिः अपाङ् प्राङ् एति । (मं. १५)

" मृत मनुष्याचा जीव वास्तविक रीतीनें अमर आहे. तो स्वतःच्या निजशक्तींनीं कार्य करतो आणि हा देह सोडल्यानंतर दुसऱ्या मर्त्य देहाबरोबर संयुक्त होतो. " ' मनुष्य देह मरणारा आहे परंतु त्याचा आत्मा अमर आहे. '

अर्थात् देह भिन्न आहे आणि आत्मा भिन्न आहे. या परस्पर भिन्न दोन पदार्थांचा संयोग कांहीं कारणानें झालेला आहे. यासंबंधीं कारणाचा विचार करणें हें या तत्वज्ञानाचें मुख्य प्रयोजन आहे. (**मृतस्य जीवः अमर्त्यः**) मृत प्राण्याचा जीवात्मा अमर आहे, हा महासिद्धांत सर्वदा स्मरणांत ठेवला पाहिजे. जर जीवात्मा अमर आहे तर तो देहप्राप्तीच्या पूर्वी आणि देहपातानंतर पण राहाणाराच आहे. देह मरण्यानें तो मरत नाहीं आणि देह जन्मल्यानें तो जन्मत नाहीं. हा जीवात्मा आपल्या निजशक्तीनें रहातो. त्याचीही (**स्वधा**) निजशक्ति आहे; म्हणून ती नेहमीं त्याजबरोबर असते. तिच्यापासून ती कधींच दूर रहात नाहीं. परंतु शरीराची शक्ति अन्नादि पदार्थांवर अवलंबित असते, त्यामुळें शारीरिक शक्तींना ' **स्व-धा** ' म्हणत नाहींत. आत्म्याच्या शक्तीलाच ' **स्वधा** ' ही संज्ञा आहे; कारण कीं ती कोणत्याही बाह्य कारणावर अवलंबित नाहीं. शरीर मिळो वा न

मिळो, तरीही ती सतत एकसारखी त्याच्याबरोबरच असते. पूर्व शरीर सोडल्यावर, दुसरें शरीर मिळेपर्यंत जसा आत्मा स्वतः-च्या शक्तीनेंच विचरण करीत असतो, त्याचप्रमाणें शरीरांत प्रवेश केल्यानंतरही त्याच शक्तींना शरीरांत नियुक्त करून त्यांच्याकडून शरीराचीं सर्व कार्यें करवितो. येथें अमर असतांनाही (**मर्त्येन सयोनिः**) मर्त्य शरीराबरोबर समान योनींत आत्मा येतो. अर्थात् ज्या योनींत ज्या जातीच्या प्राण्यांत आत्मा जातो, त्या जातीच्या योनींत योग्य असें शरीर प्राप्त करतो. मृत्युलोकांतील जीवन क्षणभंगुर आहे, कारण कीं, शरीराचें वाटेल तितकें रक्षण केलें तरी, तें कधींतरी मरणारेंच असतें. त्यामुळें म्हटलें आहे कीं—

ह्यः सं-आन, सः अद्य ममार । (मं. ९)

" जो काल उत्तम प्रकारें जिवंत होता तो आज मरत आहे."

आज सकाळीं जो जिवंत असतो, तो संध्याकाळीं मरून जातो. याचप्रमाणें पिता, पुत्र, भाऊ इत्यादि मरत आहेत आणि ते पाहून आपणांलाही केव्हांतरी मरावयाचें आहे, अशी खात्री होते. अर्थात् आपलें शरीर मरून गेलें, तरीही या शरीराचा अधिष्ठाता कधींही न मरणारा आहे, तो अमर आहे. कधींही तो बाल्यावस्थेला वा वृद्धावस्थेला प्राप्त होत नाहीं. तो अवस्था-तीत आहे. तो सतत एकाच अवस्थेंत असतो, म्हणून त्याला (**युवानं सन्तं**) युवा आहे असें म्हणतात. या जीवात्म्याला युवा म्हटलें तर परमात्म्याला पुराण पुरुष (वृद्ध) म्हणणें योग्य आहे. या मंत्रांत ' **पलित** ' पांढऱ्या शुभ्र केसांचा वृद्ध असें म्हटलें आहे. हा पलित पूर्वोक्त तरुणाला गिळून टाकतो. परमात्मा सर्वव्यापक आहे, त्यामुळें एकदेशीय जीवात्म्याला तो चोहोंकडून घेरून टाकतो. ह्यामुळें असें म्हणण्यांत येतें कीं परमात्मा या जीवात्म्याला गिळून टाकतो म्हणजे आपल्या पोटांत ठेवतो. (**युवानं संतं पलितः जगार**) तरुणाला वृद्ध गिळून टाकतो. यावरून दोघांच्या आकाराचें प्रमाण स्पष्ट होतें. तरुण जीवात्म्याला वृद्ध परमात्मा गिळून जातो, यावरून तो वृद्ध परमात्मा तरुण जीवात्म्यापेक्षां किती तरी पटीनें मोठा आहे ही गोष्ट स्पष्ट आहे.

हा जीवात्मा ' विधु ' आहे अर्थात् कर्मशील आहे, कर्म करणारा आहे आणि विविध कर्में करण्यासाठींच शरीर धारण करतो. शरीर धारण करण्याचा हेतु हा आहे—

सः मातुः योनौ अन्तः परिवीतः बहुप्रजा निर्ऋतिः आविवेश । (मं. १०)

" तो जीवात्मा ज्यावेळीं मातेच्या योनींत-गर्भाशयांत असतो त्यावेळीं प्राकृतिक शरीरानें परिवेष्टित असतो आणि त्यानंतर अनुकूल समयीं पुष्कळ प्रजा प्रसविणाऱ्या या भूमीवर अथवा या प्रकृतींत आविष्ट होऊन पृथ्वीवर अवतीर्ण होतो. " येथें विवाहादि द्वारां तो स्वतःच्या वंशाचा विस्तार करतो आपला वंश वाढवतो. आणि समय आला कीं मरून जातो. पुनः त्याला तसेंच नवीन शरीर प्राप्त होतें. हा क्रम वारंवार चालूच असतो. हें त्याचें जाणें येणें नियमानुसार करणारा जो कोणी आहे त्याच्या नियमाला तो जाणत नाहीं—

यः ईं चकार अस्य सः न वेद । (मं. १०)

' जो हें सर्व करतो त्याच्या त्या कर्तृत्वाला तो जाणत नाहीं.' प्रत्येक मनुष्य विचारानें हें जाणूं शकतो. आपल्याला येथें कोणी आणलें, आपलें भवितव्य कोण नियत करतो, इत्यादि विषय प्रत्येक मनुष्याला अज्ञात आहेत. परंतु—

यः ईं ददर्श तस्मात् हिरुग् इत् नु । (मं. १०)

" जो त्याला पहातो अर्थात् त्याचा साक्षात्कार करतो, त्या त्या खालींच, त्याच्या अगदीं जवळ तो विद्यमान असतो. " म्हणून त्याच्या अगदीं जवळ तो असतो, परंतु अन्य मनुष्यांसाठीं मात्र अत्यंत दूर असतो. अर्थात् त्याचें दूर असणें वा समीप असणें मनुष्याच्या ज्ञानावर अवलंबून आहे.

हा जीवात्मा (**गो-पां**) इंद्रियांचे पालन करणारा आहे, आपल्या शरीरांत जीवनशक्तीचा संचार करून तो सर्व शरीर जिवंत ठेवणारा आहे. त्यामुळें हा (**अनिपद्यमानं**) खालीं न पाडणारा आहे. शरीराला स्थिर ठेवण्यासाठीं तो शरी-राला न पाडणारा आहे. शरीराला उचलून धरणारा आणि चालविणारा हाच जीवात्मा आहे. ' **तनू-न-पात्** ' हें नांवही याच अर्थाचें सूचक आहे. (**तनु**) शरीराला (**न**) न (**पात्**) पाडणारा आत्मा आहे. तोच भाव ' **अनिपद्यमानं** ' शब्दांत आहे. असें असतांनाही—

पथिभिः आ च परा च चरन्तं । (मं. ११)

" निश्चित मार्गानें जवळ व दूर जाणारा. " अर्थात् या शरीराजवळ आणि दूर जाणारा हा आत्मा आहे. जन्म घेतांना तो शरीराजवळ येतो व शरीराचा मृत्यु होतांच तो शरीरापासून दूर जातो. याप्रमाणें त्याचें जवळ येणें व दूर जाणें ज्या मार्गानें होतें त्या मार्गाचें ज्ञान आम्हांला होऊं शकत नाहीं. तो मार्ग अदृश्य आहे आणि परमात्माच त्याला त्या मार्गावर चाल-वितो.

स सध्रीचीः विषूचीः भुवनेषु अन्तः वसानः (मं. ११)

" तो परमात्मा या जीवात्म्याच्या बरोबर राहतो, सर्वत्र विराजमान राहून तो संपूर्ण पदार्थमात्रांत राहात असतो. " तो नाहीं असें स्थान नाहीं. प्रत्येक पदार्थाच्या आंत बाहेर

*

आणि चोहोंबाजूला तो विराजमान आहे. त्यामुळें तो या जीवात्म्याला स्वतःमध्यें समावून घेवून, जेथें जाण्यानें त्याचें कल्याण होईल, त्याठिकाणीं त्याला पोंचवितो.

हा देव (**नः पिता जनिता नाभिः बन्धुः**) आम्हां सर्वांचा पिता, जनक, संबंधी आणि भाऊ आहे. (**पृथ्वी माता**) ही भूमि आमची मातृभूमि आहे. या मातापित्याची उपासना आम्हांला केली पाहिजे. त्या उक्त देवापासून या प्रकृति-मातेमध्यें जी गर्भधारणा होते, त्यापासून सर्व सृष्टीची रचना होते.

प्रश्नोत्तर

वर तेराव्या आणि चौदाव्या मंत्रांत क्रमानें कांहीं प्रश्न आणि त्यांचीं उत्तरें येऊन गेलीं आहेत. येथेंही त्या मनोरंजक प्रश्नोत्तरां-विषयीं आतां पाहूं—

प्रश्न- **पृथिव्याः परं अन्तं पृच्छामि** । (मं. १३)
उत्तर- **इयं वेदिः पृथिव्याः परः अन्तः** । (मं. १४)

" पृथ्वीचा दूरचा अंतिम भाग कोणता ? " " ही वेदी हाच पृथ्वीचा दूरचा अंतिम भाग आहे. "

यज्ञवेदीच्या जवळ उभे राहून एकजण प्रश्न करतो कीं, पृथ्वीचा अलीकडील भाग आम्ही जेथें उभे आहों, तो आहे, परंतु दुसरें टोंक कुठें आहे ? या भूमीची समाप्ति कुठें होते ? या प्रश्नाचें उत्तर याप्रमाणें आहे.

या आपल्या जवळील जो वेदीचा भाग आहे तोच भूमीची अंतिम सीमा आहे. हें उत्तर पाहिलें तर असें दिसून येतें कीं वेदमतानुसार ही भूमि गोलाकार कंदुकाप्रमाणें आहे. जर ही भूमि सपाट फळीसारखी असती तर असें उत्तर मिळणें संभवलें नसतें. भूमि गोल असेल तर ज्या बिंदूपासून आरंभ होतो त्याच बिंदूला त्याची समाप्ति शक्य आहे. पृथ्वी चेंडूप्रमाणें गोल असल्यामुळें, कोणत्याही जागेपासून सरळ रेषा काढली तर त्या रेषेचा अंतिम बिंदु प्रारंभिक बिंदूंत मिळून जाईल. हा नियम ध्यानांत धरून वरील मंत्रांत स्पष्ट सांगितलें आहे कीं पृथ्वीचा आरंभ या वेदींत आहे आणि अंतिम भागही वेदीच आहे. पृथ्वी चेंडूप्रमाणें गोल मानली तरच ही गोष्ट सिद्ध होणें शक्य आहे. सृष्टीचा आरंभ ही यज्ञांत आणि अंतही यज्ञांतच आहे. परमेश्वराच्या यज्ञापासून या सृष्टीचा आरंभ झालेला आहे. यज्ञा-वरच ही सृष्टि निर्भर आहे आणि शेवटीं तिची परिसमाप्तिही यज्ञांतच होईल. याप्रमाणें कर्मभूमीचा प्रारंभ वेदींत व समाप्ति पण यज्ञांतच होते. या दृष्टीनें सुद्धां हीं प्रश्नोत्तरें विचार करण्यासारखीं आहेत. आतां दुसरा प्रश्न पाहूं—

अश्वशक्ति

प्रश्न- **वृष्णः अश्वस्य रेतः पृच्छामि** । (मं. १३)
उत्तर- **अयं सोमः वृष्णः अश्वस्य रेतः** । (मं. १४)

" बलवान् अश्वाचें वीर्य कोणतें ? हा सोमच बलवान् अश्वाचें वीर्य आहे. " अश्ववाचक शब्द वीर्य, पराक्रम आणि बल-सूचक आहेत. ' वाजीकरण ' शब्दाचा अर्थ वीर्यवर्धक उपाय आहे. अश्वशक्ति, अश्वबल, अश्वरेत, अश्ववीर्य वगैरे शब्द एकाच अर्थाचे वाचक आहेत. बलवती अश्वशक्ति कशापासून प्राप्त होते, हा या प्रश्नाचा आशय आहे. त्याचें उत्तर हें आहे कीं, सोम वनस्पति हीच अश्वशक्ति आहे. सोम या शब्दाचा अर्थ सोमवल्ली अथवा वनस्पति असा आहे. या वनस्पतीच अश्ववीर्य देण्याला समर्थ आहेत.

याठिकाणीं वेदानें स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे कीं शरिरांत अश्ववीर्य वाढविण्याची इच्छा असेल तर तें वनस्पति-सेवनानेंच वाढणें शक्य आहे. कारण कीं सोमादि वनस्पतींमध्येंच (**अश्वस्य रेतः**) अश्ववीर्य आहे. जे लोक मांसभक्षणाची तरफदारी करीत असतात त्यांनीं या वेदाच्या उपदेशापासून योग्य बोध घ्यावा. वेदांत सोमालाच अन्न म्हटलें आहे, मांसाला नाहीं. सोमालाच अश्ववीर्य म्हटलें आहे, मांसाला नाहीं. ज्या वाजीकरणासाठीं मनुष्य प्रयत्न करतो तो वाजी (घोडा) केवळ तृण (वनस्पति) सेवन करूनच वाजी झाला आहे. मांस खाऊन तो वाजी झालेला नाहीं. यावरून हें स्पष्ट होतें कीं जे बळ औषधी, वनस्पति यांत आहे, ते मांसांत नाहीं. म्हणून जे स्वतःचें बल वाढविण्याची इच्छा करतात, त्यांनीं मांसाशनाचा त्याग करून वनस्पतींचें सेवन करावें व स्वतःचें वीर्य वाढवावें. जे लोक नेहमीं विचारीत असतात कीं वेदांत मांसभक्षणासाठीं अनुकूल संमति आहे किंवा प्रतिकूल आहे ? त्यांनीं या प्रश्नो-त्तरांचा अवश्य विचार करावा. विचारानें त्यांच्या अवश्य लक्ष्यांत येईल कीं सोमादि औषधींचें रसरूप अन्नच वेदानुकूल मनुष्याचें भक्ष्य अन्न आहे. वेदांत मांसाला भक्ष्य अन्न म्हणून कुठेंही म्हटलेलें नाहीं.

प्रश्न- **विश्वस्य भुवनस्य नाभिं पृच्छामि** । (मं. १३)
उत्तर- **अयं यज्ञः विश्वस्य भुवनस्य नाभिः** । (मं. १४)

" सर्व भुवनांचें केंद्र कोणतें आहे ? यज्ञच सर्व भुवनांचें केंद्र आहे. " मध्यबिंदूला केंद्र म्हणतात. या मध्यबिंदूवर सर्व बाह्य-रचना करण्यांत येते. मध्यबिंदूवरच सर्व चक्राची स्थिति असते. जर मध्यबिंदु स्वतःच्या जागेपासून बाजूला गेला तर चक्राची गति नष्ट होते. म्हणून या प्रश्नांत विचारण्यांत आलें आहे कीं

या विश्वाचें केन्द्र कोण आहे ? अर्थात् हें विश्व कोणत्या केंद्रावर टिकून राहिलें आहे ? उत्तरांत सांगितलें आहे कीं विश्वाचें केंद्र यज्ञ आहे. अर्थात् यज्ञावरच हें सर्व विश्व स्थिर राहिलें आहे. यज्ञ कमी झाले तर विश्व रहाणार नाहीं. यज्ञ विधिहीन झाला तर विश्वाची रचना बिघडून जाईल. हें दर्शविण्यासाठीं येथें सांगितलें आहे कीं संपूर्ण विश्वाची स्थिति यज्ञावरच अवलंबून आहे. श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं–

अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक्।

(भ. गी. ३।१०)

या यज्ञानें तुम्ही उन्नतीला प्राप्त व्हा, हा यज्ञ तुमच्या सर्व मनःकामना पूर्ण करणारा होवो. असें जें सांगितलें आहे त्याचेंही तात्पर्य हेंच आहे कीं यज्ञ हेंच सर्व विश्वाच्या उन्नतीचें केंद्र आहे. संपूर्ण वेदांत 'यज्ञ' विषयच सांगितला आहे. ह्याचें कारणही हेंच आहे कीं यज्ञ हेंच सर्व विश्वाचें केंद्र आहे. या केंद्राचें ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठींच सर्व उत्पन्न झाले आहेत. आता अंतिम प्रश्न पाहूं—

प्रश्न– **वाचः परमं व्योम पृच्छामि ।** (मं. १३)

उत्तर– **अयं ब्रह्मा वाचः परमं व्योम ।** (मं. १४)

" वाणीचें परमाकाश अर्थात् उत्पत्तिस्थान कोठें आहे ? हा महान् वाणीचें परम उत्पत्तिस्थान आहे. " आकाशाचा गुण शब्द आहे, आणि शब्द आकाशांतून उत्पन्न होतो. या ठिकाणीं केवळ (**वाचः व्योम**) वाणीचें आकाशच विचारलेलें नाहीं, परंतु (**वाचः परमं व्योम**) वाणीचें परमाकाश विचारलें आहे. आकाशाचेंही जें आकाश त्याला परमाकाश म्हणतात. अग्नीचा अग्नि, वायुचा वायु आणि आकाशाचें आकाश तो परमात्माच आहे. देवाचाही देव तोच आहे. त्या आत्म्यापासूनच आकाशाची उत्पत्ति झाली आहे —

तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः ।

(तै. उ. २।१।१)

" त्या आत्म्यापासून आकाश उत्पन्न झालें आहे. " आणि त्या आकाशापासून शब्द उत्पन्न होतो. त्यामुळें शब्दाच्या आकाशाचें जें उत्पत्तिस्थान आहे त्याचेंच नांव '**परम व्योम**' आहे. या वाणीचें मूळ उत्पत्तिस्थान आणि परम आकाश परमात्मा आहे. ह्यासाठींच म्हटलें आहे कीं वेद परमात्म्याचे निःश्वसित आहेत, अर्थात् त्याचेच हे शब्द आहेत. याप्रमाणें सामान्य शब्दही आत्म्याचाच शब्द आहे आणि हा ब्रह्मा वाणीचें परम आकाश आहे. आत्मा बुद्धीबरोबर राहून बोलण्याची कामना करतो व मनाला प्रेरणा करतो, मन शारीरिक उष्णतेला चालना देतें. तो अग्नि वायूला चालना देतो, तो वायु हृदयांतून मुखांत येऊन निरनिराळ्या स्थानांत आघात करतो आणि त्यामुळें अनेक शब्द उत्पन्न होतात. ह्यासाठींच याठिकाणीं ब्रह्माला शब्दाचें महान् आकाश म्हटलेलें आहे. ही गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे आणि शब्दांत आत्म्याची शक्ति आहे असें मानून पवित्र भावनाच शब्दद्वारां उच्चारित राहिलें पाहिजे, आणि कधींही व्यर्थ शब्दोच्चार करून आत्म्याची शक्ति क्षीण करतां नये. अस्तु. याप्रमाणें प्रश्नोत्तरानें या मंत्रांत ज्ञान सांगितलें आहे. त्याच्या पुढील मंत्रांत सांगितलें आहे कीं—

न विजानामि यत् इव इदं अस्मि । (मं. १५)

" मी कोणासारखा आहें हें मी जाणत नाहीं. " प्रत्येक मनुष्य हें जाणतो कीं '**मी आहें.**' परंतु 'मी कसा आहें, कोणाप्रमाणें आहें, माझे गुणधर्म काय आहेत, माझें स्वरूप काय आहे' इत्यादि बाबतींचें कोणासही ज्ञान नसतें. [illegible] आणि शास्त्र पाहणारे असें सांगतात कीं शरीर भिन्न आहे व आत्मा भिन्न आहे. परंतु हा आत्मा कसा [illegible] कोणासारखा आहे हें क्वचित् कोणी जाणतात. बहुतकरून कोणी जाणतच नाहींत. त्यामुळें या आत्म्याला अज्ञेय, अतर्क्य असे शब्द वापरण्यात येतात. हा आत्मा जेव्हां शरिरांत येतो त्यावेळीं तो–

निण्यः संनद्धः । (मं. १५)

" आंत गुप्त आहे आणि बांधलेला आहे. " हेंच त्याचें बंधन आहे आणि या बंधनापासून मुक्ति मिळण्यासाठीं प्रयत्न केला पाहिजे. हा आत्मा (**निण्यः**) गुप्त आहे, लपलेला आहे, झांकलेला आहे, अव्यक्त आहे आणि बद्ध आहे, ही या आत्म्याची स्थिति आहे. प्रत्येक वाचकानें याचा अवश्य विचार केला पाहिजे.

या आत्म्याला बंधन कसें होतें ? त्याची मुक्ति कशी होते ? आणि कोण त्याला मुक्त करूं शकतो ? हा विषय तत्त्वज्ञानाचा आहे. हा विषय या मंत्राच्या उत्तरार्धांत याप्रमाणें सांगितला आहे—

यदा ऋतस्य प्रथमजा आगन् । आत् इत्
अस्याः वाचः भागं अश्नुते । (मं. १५)

" ज्यावेळीं सत्याचा पहिला प्रवर्तक परमात्मा मला सन्मुख झाला, ज्यावेळीं मला त्याचा साक्षात्कार झाला, त्यावेळीं त्याच्या या वाणीचें-देवीवाणीचें भाग्य मला प्राप्त झालें. ' हा एक नियम याठिकाणीं सांगितला आहे. ज्यावेळीं परमेश्वराचा साक्षात्कार होतो अथवा परम ऋषींचा उपदेश मिळतो त्यावेळीं अंतःकरणांत सत्यज्ञानाचा प्रकाश होतो. हेंच विद्येचें भाग्य आहे. हें आत्मसाक्षात्काराशिवाय होत नाहीं.

याठिकाणीं आत्मा शरीर धारण करतो हा ' मर्त्य आणि अमर्त्य ' असा संबंध आहे. अर्थात् हे दोन्ही पदार्थ येथें आहेत. मर्त्य अमर्त्य होऊं शकत नाहीं व अमर्त्य मर्त्य बनूं शकत नाहीं—

ता शश्वन्त विषूचीना वियन्ता । अन्यं नि चिक्युः । अन्यं न निचिक्युः । (मं. १६)

" हे दोन्ही मर्त्य आणि अमर्त्य अर्थात् जड आणि चेतन हे दोन्ही सनातन-शाश्वत आहेत, हे सर्वत्र आहेत, परस्पर विरुद्ध गुणधर्मस्वभावाचे आहेत. त्यांतून एकाला लोक जाणतात परंतु दुसऱ्याचें ज्ञान होत नाहीं. " ' मर्त्य पदार्थाचें ज्ञान कांहीं अंशानें होतें. ' या ज्ञानाला भौतिक ज्ञान, पदार्थज्ञान अथवा विज्ञान म्हणतात. मनुष्य या ज्ञानाला प्राप्त करूं शकतो. परंतु दुसरा जो चेतन आत्मा आहे, ज्यांत आत्मा आणि परमात्मा संमिलित आहेत-तो अतर्क्य आहे, अज्ञेय आणि गूढ आहे.

जगाची रचना

पूर्वोक्त प्रकारें जड आणि चेतन मिळून या जगाची रचना झाली आहे. या विषयांसंबंधीं खालील मंत्रांत याप्रमाणें सांगितलें आहे—

भुवनस्य रेतः सप्त अर्धगर्भाः विष्णोः प्रदिशा विधर्मणि तिष्ठन्ति । (मं. १७)

" सर्व सृष्टीच्या वीर्यानें सात मूलतत्त्वें विविध धर्मांनीं युक्त होऊन व्यापक परमात्म्याच्या आज्ञेंत रहातात. " सृष्टि उत्पन्न करणारीं हीं सात मूलतत्त्वें आहेत, त्यांचे गुणधर्म परस्पर भिन्न आहेत आणि तीं व्यापक परमेश्वराच्या आज्ञेंत राहून कार्यें करतात. या सात तत्त्वांना जाणणें आणि आत्म्याला जाणणें हेंच ज्ञान होय आणि हें ज्ञान मनुष्याच्या उद्धाराचा हेतु आहे. या ज्ञानाशिवाय मनुष्याचा उद्धार होऊं शकत नाहीं. असें—

ते विपश्चितः धीतिभिः मनसा परिभुवः विश्वतः परि भवन्ति ॥ (मं. १७)

" ते विशेष ज्ञानी आपल्या बुद्धीनें, कर्मांनीं आणि मनाच्या विचारानें विशेष श्रेष्ठ होऊन सर्वप्रकारें सर्वोत्कृष्ट होतात. " सर्वांवर आपला प्रभाव बसवितात. सर्वत्र उपस्थित राहून सर्वांना प्रभावित करतात. हें कार्य या ज्ञान्यांकडून यामुळेंच होतें कीं त्यांचेजवळ पूर्वोक्त प्राकृतिक आणि आत्मिक ज्ञान पूर्णपणें असतें. या ज्ञानाचें महत्त्व हें आहे—

ऋचः अक्षरे विश्वे देवाः अधि निषेदुः (मं. १८)

" ऋचांच्या अक्षरांत सर्व देव निवास करतात." ही योग्यता वेदमंत्राच्या ज्ञानाची आहे. एक वेदमंत्राचें ज्ञान होणें म्हणजे इतक्या देवतेचें ज्ञान होणें होय. वेदाचें ज्ञान हें प्रत्यक्ष देवतेचेंच ज्ञान आहे. अग्निमंत्रानें अग्निविद्या, वायुमंत्रानें वायुविद्या, त्याचप्रमाणें अन्यान्य मंत्रांनीं अन्यान्य देवतांची विद्या जाणण्यांत येते. ही विद्या ज्याप्रमाणें प्राकृतिक पदार्थाचें ज्ञान देते, त्याचप्रमाणें आत्म्याचेंही ज्ञान देते. अग्नि, वायु, रवि, इंद्र इत्यादि शब्दांनीं एक सत्य आत्म्याचाच बोध होतो. ही गोष्ट या सूक्ताच्या शेवटच्या मंत्रांत सांगितली आहे. तो अत्यंत महत्त्वाचा मंत्र असा आहे—

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् । एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ (मं. २८)

" एकच सत्य आत्म्याचें वर्णन ज्ञानी लोक अनेक प्रकारें करतात. त्यालाच इन्द्र, मित्र, वरुण, अग्नि, दिव्य सुपर्ण, गरुत्मान्, यम, मातरिश्वा इत्यादि नामें ते देतात. " अर्थात् इन्द्र, मित्र, वरुण वगैरे नांवें एकाच आत्म्याचीं आहेत. प्रत्येक नामानें व्यक्त होणारा गुण त्यांत आहे. तो शत्रुनाशक असल्यानें इन्द्र, सर्वांचा हितचिंतक असल्यानें मित्र, सर्वांहून वरिष्ठ असल्यानें वरुण, गतिमान असल्यानें अग्नि, द्युस्थानांत असल्यानें दिव्य, उत्तमपूर्ण असल्यानें सुपर्ण, श्रेष्ठ असल्यानें गरुत्मान्, एक अद्वितीय असल्यानें एक, तिन्हीकाळीं सत्य असल्यानें सत्, सर्वांचा नियामक असल्यानें यम, अंतराळांत राहत असल्यानें मातरिश्वा म्हटला जातो. याप्रमाणें त्या एकाचींच हीं अनेक नामें आहेत, आणि वेदमंत्रांत त्या सत्य आत्म्याची विद्या याप्रमाणें आहे.

त्याबरोबरच हीं नामें अग्नि, वायु इत्यादि भौतिक पदार्थांचीही वाचक आहेत. त्यामुळें या देवतांच्या नामांनीं आणि मंत्रांनीं या पदार्थांचीही विद्या होते. याप्रमाणें या मंत्रांनीं या देवांची विद्या, भूतविद्या आणि प्राकृतिक विज्ञान प्राप्त होण्याचाही संभव आहे. म्हणूनच म्हटलें आहे कीं वेदमंत्रांच्या अक्षरांत देव उपस्थित आहेत. याठिकाणीं देवांची ज्ञानरूपानें उपस्थिति समजणें योग्य आहे.

यः तत् न वेद किं ऋचा करिष्यति ? (मं. १८)

" जो या विद्येला जाणत नाहीं तो वेदमंत्रांना घेऊन काय करील ? " अर्थात् फक्त मुखोद्गत करणें किंवा शब्दांचे अर्थ जाणणें व्यर्थ आहे. मंत्राचा यथार्थ अर्थ त्याचवेळीं समजला असें म्हणतां येईल कीं मंत्रपाठ करणाऱ्याला मंत्रदेवतेचा साक्षात्कार यथावत् होईल ! जर भौतिक देवतांचा साक्षात्कार झाला तर भूतविद्या साध्य झाली असें समजावें आणि जर आत्म्याचा साक्षात्कार झाला तर आत्मविद्या ज्ञात झाली असें समजावें. याप्रमाणें

साक्षात्कार झालेल्या ज्ञान्याचीच योग्यता श्रेष्ठ आहे, नुसत्याच शब्दपंडिताची नाहीं. म्हणून म्हटलें आहे कीं—

ये इत् तत् विदुः ते इमे समासते (मं. १८)

" जे ज्ञानी पूर्वोक्त विद्येला यथावत् जाणतात तेच श्रेष्ठ स्थानीं विराजमान होऊं शकतात. " सुखात्मक, उत्तम अथवा परमस्थानाला प्राप्त होऊं शकतात. सत्यज्ञानाचें एवढें महत्त्व आहे. याचविषयीं हा मंत्र आतां पहा—

अर्धर्चेन एजत् विश्वं चाक्लृपुः (मं. १९)

" अर्ध्या मंत्रभागानें चेतन आत्मा आणि सर्व जग समर्थ होऊं शकतें. " अर्ध्या मंत्राचें चांगलें ज्ञान झाल्यानें आत्माही बलवान् होतो, आणि जगांतील पदार्थही आपापल्या सामर्थ्यानें सामर्थ्यवान् होतात. केवळ अर्ध्या मंत्रांत जर इतकें विलक्षण ज्ञान भरलेलें आहे तर सबंध सूक्तांत आणि संपूर्ण अनुवाकांत किती ज्ञान असेल आणि तें मनुष्याचा कसा उद्धार करूं शकतें ह्या गोष्टीची वाचक कल्पना करूं शकतील. यासाठींच वेदज्ञानाचा गौरव आर्यशास्त्रांत सर्वत्र केलेला आहे. परंतु हें ज्ञान सद्गुरुकडून प्राप्त झालें पाहिजे. वेदाच्या परंपरेंतून मिळालें पाहिजे आणि मननद्वारां तें आत्मसात् झालें पाहिजे, आणि शेवटीं देवतेचा साक्षात्कार झाला पाहिजे; साक्षात्कारानंतरच पूर्वी सांगितलेला लाभ होऊं शकतो. केवळ शब्दज्ञानानें होत नाहीं. सारांशरूपानें जाणायचें असेल तर ही गोष्ट वाचकांनीं ध्यानांत ठेवावी.

त्रिपाद् ब्रह्म पुरुरूपं वि तस्थे तेन चतस्रः प्रदिशः जीवन्ति । (मं. १९)

" त्रिपाद ब्रह्म विविधरूपानें जगांत विशेष रीतीनें राहिलेलें आहे आणि त्याच्या जीवनानें चतुर्दिशांना असणारे पदार्थ जिवंत राहूं शकतात. " हें ब्रह्म अथवा परमात्मा सर्व पदार्थांत व्यापक आहे आणि त्याच्या अगाध शक्तीनें हें सर्व जग जिवंत राहिलें आहे. जर ती ब्रह्माची शक्ति या जगाला आधार न देईल तर या जगांतील एकही पदार्थ जिवंत राहणार नाहीं. सर्वांच्या जीवनाचा आधार तेंच ब्रह्म श्रेष्ठ आहे.

जगाचें चक्र

जगाचें चक्र कसें फिरतें हें दाखविण्यासाठीं बाविसाव्या मंत्रांत वृष्टीचें उदाहरण दिलें आहे. पृथ्वीवरील पाण्याची वाफ सूर्यकिरणांनीं होऊन ती वर जाते, तेथें त्या वाफेचे मेघ बनतात आणि योग्यकाळीं वृष्टि होऊन पृथ्वीवर पाण्याच्या स्वरूपांत परत येते. पुन्हां वाफ, मेघ व वृष्टि असें जलचक्र सनातन चाललेलें आहे. याप्रमाणें अनेक चक्रें आहेत आणि त्यांत जगचक्रही एक आहे. पदार्थांची उत्पत्ति, स्थिति आणि लय, आणि लयानंतर पुनः उत्पत्ति याप्रमाणें हें जगाचें चक्र चालू आहे. चक्राचा एक बिन्दु एकदां वर असतो आणि दुसऱ्यांदा तोच खालीं येतो. ह्याचप्रमाणें ज्याचा जन्म होतो तोच योग्यकाळीं तरुण होतो; आणि नंतर नाशाला प्राप्त होतो; आणि त्यानंतर नवीन होतो. याप्रमाणें जगाचीं सर्व चक्रें चालत राहिलीं आहेत. प्रवाहरूपानें जग सनातन अथवा अनादि अनंत आहे असें जे म्हणतात त्याचें कारणही हेंच आहे, परंतु प्रत्येक पदार्थाच्या दृष्टीनें पाहिलें तर जग उत्पत्तिवान् आणि नाशवान् आहे. मनुष्य व्यक्तिशः मरून जातो, परंतु मानव-समाज अनादिकाळापासून चालत आला आहे आणि भविष्य-कालींही राहील. याप्रमाणें जगाच्या बाबतींत जाणणें योग्य आहे.

या जगांत एक विलक्षण गोष्ट आहे. ती ही आहे कीं—

पद्वतीनां प्रथमा अपात् एति । (मं. २३)

" पाय असलेल्याच्या पूर्वी पाय नसलेला धांवतो. " वस्तुतः पाय असलेल्याची धांव वेगानें झाली पाहिजे, परंतु याठिकाणीं पाय असलेला चालण्यांत असमर्थ आहे आणि पाय नसलेला धांवतो, इतकेंच नव्हे तर पाय असलेल्याला हा पाय नसलेला चालवीत असतो. येथें आपल्या शरीरांतच पहा. शरीराला पाय आहेत परंतु तें शरीर स्वतः चालूं शकत नाहीं, आणि आत्म्याला पाय नाहींत, परंतु तो या पाय असलेल्या शरीराला चालवूं शकतो. हें केवढें आश्चर्य आहे ? एवढ्यासाठींच एका सुभाषि-तांत म्हटलें आहे कीं—

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरीन् ।

" ह्या मुक्या शरीराला हा आत्मा वाचाळ बनवितो आणि पांगळ्याकडून पहाडांतील सहल करवितो ! " अशी अद्भुत शक्ति या आत्म्याची आहे. ही गोष्ट नीट लक्षांत येण्यासाठीं—

कः तत् चिकेत । (मं. २३)

"या गोष्टीला कोण जाणूं शकतो ? " पुष्कळ लोक जाणण्या-च्या रीतीनें जाणतात परंतु साक्षात्काराप्रमाणें जाणणें कठीण आहे. हें ज्ञान खरें पाहिलें असतां प्रत्येकानें प्राप्त करून घेणें आवश्यक आहे; परंतु मनुष्यें अशा भ्रमचक्रांत चकरा खात रहातात कीं त्यांत फारच थोडीं माणसें या सत्यज्ञानाला यथावत् जाणूं शक-तात. ह्या आत्म्याच्या शक्तीविषयीं पहा—

गर्भः अस्याः भारं आभरति । (मं. २६)

" मध्यभागीं स्थित आत्मा—प्रत्येकाचें केंद्र, ह्या प्रकृतीचा सर्व भार वाहतो. " या जड शरीराचा भार तो चेतन आत्मा वाहतो. तोच या शरीराला धांवबतो, दवडवतो, उड्या मारवितो. हें सर्व ह्या शरीराकडून होणें अशक्य आहे, परंतु ह्या सर्व गोष्टी या शरीराकडूनच होत राहिल्या आहेत. या सर्व या आत्म्याच्य

शक्तीनेंच होत राहिल्या आहेत. जडाकडून चेतनवत् चालविण्याचें कार्य करणें हें त्याच्या अद्भुत शक्तीचें द्योतक आहे. इतकें करणारा हा आत्मा—

ऋतं पिपर्ति, अनृतं निपाति । (मं. २३)

" सत्याची पूर्णता करतो आणि असत्याला खालीं दडपून टाकतो." जगांत त्याची हालचाल यासाठींच होत आहे. सत्याचा विजय व्हावा व असत्याचा पराजय व्हावा, यासाठींच त्याची ही हालचाल होत असतें. हीच गोष्ट भगवद्गीतेंत याप्रमाणें सांगितली आहे—

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥
(भ. गी. ४।८)

" सत्यमार्गानें जाणाऱ्यांचें रक्षण करण्यासाठीं आणि असत्यमार्गानें जाणाऱ्यांचा नाश करण्यासाठीं अर्थात् सत्यधर्माची स्थापना करण्यासाठीं आत्मा सत्य आणि असत्याच्या युद्धाच्या वेळीं प्रगट होतो. " सत्यासत्याचें युद्ध चालत राहिलें आहे, तें नेहमीं चालत असतें आणि हा आत्मा स्वतःची शक्ति या युद्धाच्या प्रारंभींच सत्याच्या रक्षणासाठीं प्रगट करतो आणि आपल्या शक्तीनें सत्याचें रक्षण करतो, असत्याचा नाश करतो आणि सत्य धर्माची संस्थापना करतो.

या आत्म्याचें नांव विराट् आहे आणि तो पृथ्वी, आप इत्यादि जगांत जगद्रूप बनलेला आहे. तो **(अधिराजः बभूव)** सर्वांचा राजाधिराज आहे, तोच सर्वांचा ईश्वर आहे आणि याच्या **(वशे भूतं भव्यं)** आधीन भूत, भविष्य आणि वर्तमान संपूर्ण जगत् आहे. सर्वावर त्याचें शासन चाललेलें आहे, तोच सर्वांचा एक ईश्वर आहे आणि त्याच्या शासनांत सर्व जगचक्र चाललें आहे. त्याची प्रसन्नता झाली तर तो **(मे वशे भूतं भव्यं)** माझ्यासारख्या मनुष्याच्या ताब्यांत हीं भूत, भविष्य, वर्तमान देतो. त्याची मात्र कृपा होण्याचीच जरूर आहे. त्याची कृपा फक्त यज्ञीय जीवन केल्यानेंच होते. दुसरा कांहीं मार्ग नाहीं. प्राचीनकाळांत ईश्वराची कृपा संपादन करण्यासाठींच यज्ञ करण्यांत येत असत. **(तानि धर्माणि प्रथमानि आसन्)** हेच पूर्वीं शुद्ध आत्म्याचे धर्म होते. **(वीराः पृश्निं उक्षाणं अपचन्त)** हे वीरलोक बैलांना पुष्ट करून वाढवीत असत. अर्थात् यज्ञकर्मांच्या निमित्तानें पुष्कळ उक्षांची–बैलांची परिपक्वता होत होती. याठिकाणीं **(पृश्निं उक्षाणम्)** लहान बैल कोण आहे, त्याचा विचार केला पाहिजे. वेदांत दुसऱ्या ठिकाणीं सांगितलें आहे कीं—

उक्षा स द्यावापृथिवी बिभर्ति । (ऋ. १०।३१।८)
अग्रिय उक्षा बिभर्ति भुवनानि वाजयुः । (ऋ. ९।८३।३)
अनड्वान्दाधार पृथिवीमुत द्यामनड्वान्दाधारोर्वन्तरिक्षम् । अनड्वान्दाधार प्रदिशः षडुर्वीरनड्वान्विश्वं भुवनमा विवेश ॥ (अथर्व. ४।११।१)

" उक्षा द्युलोक आणि पृथ्वीचें भरणपोषण करतो. मोठा भाऊ उक्षा अन्न देऊन भुवनांचें धारण पोषण करतो. अनड्वान्, पृथ्वी, अंतरिक्ष, द्युलोक, सर्वदिशा, सहा पृथ्व्या आणि सर्व भुवनांचें धारणपोषण करतो." याठिकाणीं उक्षा आणि अनड्वान् एकच आहे, हें सर्व जाणतात. भाषेमध्यें या शब्दांचा अर्थ ' बैल ' असा होतो आणि त्याचा यौगिक अर्थ ' उचलणारा, खेंचणारा, गाडी चालविणारा ' असा होतो. उक्त मंत्रांत त्रिभुवनाला चालविणारा, सर्व भुवनांना चालविणारा, सर्वांचा आधार उक्षा आहे असें म्हटलें आहे; म्हणून याठिकाणीं उक्षा अथवा अनड्वान् शब्द निश्चित बैलाचा वाचक नाहीं हें स्पष्ट आहे.

उक्त ऋग्वेदाच्या मंत्रांत **' अग्रिय उक्षा '** शब्द आहे. त्याचा अर्थ ' मोठा भाऊ उक्षा ' आहे अर्थात् जो सर्व भुवनांचा आधार आहे तो मोठा भाऊ उक्षा आहे. यावरून सिद्ध होतें कीं या मोठ्या भावाचा दुसरा लहान भाऊ उक्षा आहे. त्यामुळें **' पृश्निं उक्षाणं '** हा शब्दप्रयोग लहान भाऊ उक्षासाठींच आलेला आहे हें निःसंदेह आहे. **' पृश्नि '** चा अर्थ ' लहान ' असा आहे.

अग्रियः उक्षा । (ऋ. ९।८३।३)
पृश्नि उक्षा (अथर्व १०।१५।२५)

या दोन मंत्रांतील शब्द स्पष्टपणें दाखवित आहेत कीं त्यांतून एक मोठा भाऊ आहे व दुसरा लहान भाऊ आहे. मोठा भाऊ लहान भावापेक्षां प्रथमच परिपक्व आहे, परंतु दुसरा भाऊ परिपक्व बनवायचा आहे. यावरून हें स्पष्ट लक्षांत येतें कीं परिपक्व होणाऱ्याचें हें वर्णन जीवात्म्याचें आहे. परमात्मा शुद्ध, बुद्ध, मुक्त स्वभावाचा म्हणून तो परिपक्व आहे आणि जीवात्मा अबुद्ध आणि अमुक्त असल्यानें अपरिपक्व आहे. अरिपक्वाला परिपक्व बनवायचें असतें. हें कार्य वीर अथवा बलवान लोकच करतात. कारण कीं **(नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।** कठ. उ. १।२।२२ **).** बलहीन मनुष्याकडून याला परिपक्व करण्याचें अनुष्ठान होऊं शकत नाहीं. या कारणानेंच वीर लोक या लहानभावाला (उक्षाला) परिपक्व बनविण्याचें कार्य करतात, अर्थात् हा **(पृश्निः उक्षा)** लहान भाऊ उक्षा जीवात्मा आहे. दोन सुपर्ण, दोन उक्षा हे वैदिक वर्णन जीवात्मा–परमात्म्याचे वाचक

आहेत. अस्तु. याठिकाणीं लहान भाऊ उक्षाला जीवात्म्याला परिपक्व बनविण्याचें साधन ' यज्ञ ' सांगितलें आहे—

विषूवता आरात् शकमयं धूमं अपश्यं (मं. २५)

" सर्वत्र दूर आणि जवळ शक्तिमान यज्ञाग्नीचा धूर मी पहातों. " या यज्ञाग्निद्वाराच वीरलोक या लहान लहान वृक्षाला परिपक्व बनवितात. यज्ञानेंच त्याची परिपक्वता होते. अग्नीमध्यें हवन करणें हें यज्ञाचें उपलक्षण आहे. यज्ञाचा मुख्य अर्थ ' देवपूजा संगतीकरण आणि दान ' असा आहे. हा मुख्यार्थ घेऊन आणि उपलक्षणाला सूचक मानूनच त्याचा अर्थ करणें उचित आहे. कित्येक लोक या ठिकाणीं ' उक्षा, धूम आणि पचन्ति ' हे शब्द पाहून ' प्राचीन लोक बैलाला अग्नीवर शिजवीत असत, भाजीत असत ' असा भावार्थ काढतात. परंतु ह्या ठिकाणीं कोणालाही संशय राहूं नये म्हणून या मंत्राचें इतकें स्पष्टीकरण येथें करणें भाग पडलें. अशी आशा आहे कीं इतक्या स्पष्टीकरणानंतर कोणाही वाचकाच्या मनांत याविषयीं कांहीं शंका राहणार नाहीं.

किरणयुक्त तीन देव

(**त्रयः केशिनः**) किरणयुक्त अर्थात् प्रकाशमान तीन देव आहेत. हे तिन्ही देव (**ऋतुथा विचक्षते**) ऋतुप्रमाणें प्रकाशतात. येथें याप्रकारचे देवाचे कित्येक गण आहेत. पहिला सूर्यगण आहे. त्यांत सूर्य, विद्युत् आणि अग्नि हे तिन्ही देव क्रमशः द्यु, अंतरिक्ष आणि भूस्थानांत रहातात. तिन्ही प्रकाशमान असल्यानें ' केशी अर्थात् किरणांनीं युक्त ' किंवा केसांनीं युक्त आहेत. (**एषां एकः संवत्सरे वपते**) या तिन्हींपैकीं एक वर्षांतून एकदां अन्नादीचें बीजारोपण करतो. सूर्यामुळेंच वर्षांतून एकदां भूमींत बीज पेरण्यांत येऊन धान्य उत्पन्न करण्यांत येतें. (**अन्यः शचीभिः विश्वं अभिचष्टे**) दुसरा तेजस्वी देव स्वतःच्या किरणांनीं सर्वांना प्रकाशित करतो. हा अग्नि आपल्या तेजानें रात्रींच्या वेळींही जगांत प्रकाश करतो. तिसरा देव विद्युत आहे. (**एकस्य ध्राजिः ददृशे**) त्या विद्युद्देवतेची गति पहाण्यांत येते, परंतु (**न रूपं**) तिचें रूप दिसत नाहीं. कारण ती क्षणमात्र प्रकाशित होते व नंतर कोणत्या स्थानावर निघून जाते त्याचा पत्ताही लागत नाहीं. यंत्रद्वारा पेटविणें वगैरे कार्यं करणारी वीजही दिसत नाहीं, परंतु तिचा वेग अनुभवाला येतो.

याप्रमाणें अग्नि, वायु आणि सूर्य हे तिन्ही देव वर सांगितलेल्या तीन स्थानांत आहेत. त्यांत मधला दिसत नाहीं, आणि दोघे देव दिसतात. शरीरांतही वाणी, प्राण आणि नेत्र आहेत. त्यांपैकीं मध्यस्थानांतील प्राण दिसत नाहीं, परंतु त्याचा गतीमुळें अनुभव येतो. याप्रमाणें या तीन तीन देवतांचे अनेक गण आहेत.

वाचक याप्रमाणें विचार करतील तर त्यांना या गणांचें ज्ञान होईल. याठिकाणीं लक्षांत ठेवावें कीं हे तिन्ही जरी स्थूल दृष्टीनें विभिन्न प्रतीत होत असले तरीहीं तिन्ही एकाचींच तीन स्वरूपें आहेत.

चतुष्पाद गाय

' गौ ' चा अर्थ वाचा आहे. ही वाक् चतुष्पाद अर्थात् चार पायांची आहे. (**वाक् चत्वारि पदानि परिमिता**) नाभि, उर आणि कंठांत असे तिचे तीन पाद गुप्त आहेत आणि मुखांत चतुर्थ पाद आहे तो व्यक्त आहे. याप्रमाणें हे वाणीचे चार पाद आहेत. या चार पादांत अर्थात् स्थानांत ही वाणी उत्पन्न होते. परंतु या वाणीचीं हीं स्थानें साधारण मनुष्य जाणूं शकत नाहींत. योगीलोक मात्र ध्यान धारणेच्या योगानें जाणूं शकतात. (**मनीषिणः ब्राह्मणाः विदुः**) ज्ञानी ब्रह्माला जाणणारेच–ही गोष्ट जाणूं शकतात. वाणीच्या उत्पत्तीचा याप्रमाणें विचार केल्यास मनुष्य आत्म्यापर्यंत पोहोंचू शकतो. वाचकांनीं याप्रमाणें मनन करून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावें.

सात मधु

या कांडांत ३०२ मंत्र आहेत आणि त्यांत कित्येक मंत्र विशेष मनन करण्यासारखे आहेत. या सर्वांत प्रथम सूक्तांत ' सात मधु ' म्हणजे सात मधुर पदार्थांचें वर्णन करणारा मंत्र वाचकांनीं विशेष स्मरणांत ठेवावा.

ब्राम्हणश्च राजा च धेनुश्चानड्वांश्च व्रीहिश्च यवश्च मधु सप्तमम्। (कां. ३।१।२२)

" ब्राह्मण, राजा, धेनु, बैल, तांदुळ, जव आणि मध हे सात मधु या जगांत आहेत. " प्रत्येक मनुष्य मधुरतेची इच्छा करतो. गोड पदार्थ खाण्याची इच्छा करतो. वेद सांगतो कीं हे ' सात मधुर पदार्थ आहेत. ' जो मनुष्य मिठाई सेवन करण्याची इच्छा धरतो, त्यानें यांचें सेवन करावें, परंतु हे सेवन करण्याचे विधि भिन्न भिन्न आहेत. प्रथम आपण या सातही मधूंचें स्वरूप पाहूं.

' ब्राह्मण ' प्रथम मधु आहे. त्याच्याजवळ ज्ञानरूपी मधुर रस आहे, हेंच साक्षात अमृत आहे. ज्ञान आणि विज्ञान यांत संमिलीत आहे. अभ्युदय आणि निःश्रेयस या दोन्हींची सिद्धि या ज्ञानावर अवलंबित आहे. ब्राह्मणाच्या आधीन राष्ट्राचें अध्ययन आणि अध्यापन आहे. अर्थात् हेंच राष्ट्राच्या भावी पिढीला उदयोन्मुख करतें. हें ज्ञान मधु आहे. प्रत्येक मनुष्यानें व तरुणानें याचें सेवन करावें.

' राजा ' दुसरा मधु आहे. (**रञ्जयति इति राजा**)

प्रजेचें रंजन करणारा राजा असतो. जो प्रजेच्या उत्साहाला चिरडून टाकतो तो राजा नव्हे. राजा शब्दांत सर्व क्षत्रिय येतात. दुःखापासून प्रजेचें रक्षण करणें व त्याचें रंजन करणें, हेंच राज्य-शासनाचें कार्य आहे. याठिकाणीं ' प्रजारंजन रूप मधु ' देणारा राजा आहे. राष्ट्रांतील प्रत्येक मनुष्य हें रक्षणकार्य करण्यास समर्थ असला पाहिजे. तरच हा मधु प्रजेला प्राप्त होतो. ज्या ठिकाणीं ब्राह्मण आणि क्षत्रिय मिळून मिसळून राष्ट्राची उन्नति करण्यांत तत्पर असतात, त्याच राष्ट्राची उन्नति होते.

यानंतर तिसरा मधु ' गौ ' आहे. ज्ञान आणि रक्षण संपादन झाल्यावर, गोदुग्धरूपी अमृत प्रत्येक मनुष्याला प्राप्त झालें पाहिजे. तें अमृत आहे आणि तेंच जीवन आहे.

चौथें मधु ' बैल ' आहे. उत्तम गाईची उत्पत्ति उत्तम बैलाच्या वीर्यावर अवलंबून आहे. यासाठीं बैलाची गणना ' मधूं ' त केली आहे. त्यानंतर आमची शेतीही बैलावरच अवलंबून आहे.

यानंतरचे तीन मधु ' तांदुळ, जव आणि मध ' हे आहेत. हीं तीन उत्तम भक्ष्यान्नें आहेत. तांदुळ आणि जव बुद्धिवर्धक आहेत आणि शरिरांतील स्वस्थतेसाठीं हें अन्न उत्तम आहे. मध तर सर्वोत्तम स्वादिष्ट पदार्थ आहे.

वनस्पतींमध्यें उत्तम फूल आणि फुलांत उत्तम मध. तांदुळ, जव आणि मध हाच ऋषींचा आहार होता आणि त्यामुळेंच त्यांची बुद्धि कुशाग्र होती. याप्रमाणें हा सात मधूंचा विषय आहे. याचा विचार वाचकांनी करावा.

सूर्यकिरण

आठव्या सूक्तांत सूर्यकिरणांचें महत्व वर्णन केलें आहे. सूर्य-किरणांनीं शरीराचे रोग बरे होतात, असें जें सांगितलें आहे तें प्रत्येकानें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

सं ते शीर्ष्णः कपालानि हृदयस्य च यो विधुः ।
उद्यन्नादित्य रश्मिभिः शीर्ष्णो रोगमनीनशोऽङ्गभेदमशीशमः ॥ (अथर्व ९।८।२२)

उगवणारा सूर्य आपल्या किरणांनीं डोक्याचें दुखणें, शरीराचे रोग, हृदयाचे रोग आणि अन्य रोग दूर करतो. ' मंत्राचें हें कथन सर्वांनीं नेहमीं लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. आजकाल रोग वाढत आहेत. जे रोग पूर्वी बिलकूल नव्हते ते आजकाल सर्वत्र पसरलेले दिसत आहेत. अशा परिस्थितींत सूर्यकिरणांच्या या रोगनाशक धर्माचा आम्हांला विशेष उपयोग होऊं शकेल. आजकाल प्रायः बहुतेक प्रत्येक मनुष्य डोकेंदुखीच्या आजारानें त्रस्त असतो. पोटाच्या अपचनासारख्या रोगांनीं कित्येक पछाडलेले दिसतात. देहदौर्बल्य प्रमाणाबाहेर वाढत आहे. अशा परिस्थितींत सूर्यकिरणांचा उपयोग मनुष्य करील तर निःसंदेह अधिक लाभ होईल. सूर्याकडे सारखें टक लावून पाहिलें असतां नेत्ररोग आणि दृष्टिदोष दूर होतात. ही अनुभव-सिद्ध गोष्ट आहे. जे लोक स्वतःच्या शरीरावरील चामडी सूर्याच्या किरणांनीं तापवून घेतात त्यांच्या ज्वरादि पीडा दूर होतात. याप्रमाणें सूर्यकिरणांनीं अनंत लाभ होण्याचा संभव आहे. याचा वाचकांनीं विचार करावा.

एक देव

सूक्त नववें व दहावें फार महत्वाचें आहे. ऋग्वेदांत हीं दोन्हीं सूक्तें मिळून एकच सूक्त आहे. या दोन्ही सूक्तांचा प्रायः एकच विषय आहे. आत्मा आणि जगाचें ज्ञान देणें हा मुख्यतः त्यांतील विषय आहे. हा विषय या सूक्तांत अनेक प्रकारानें समजाविलेला आहे. वेदाचें वाचन करतांना वाचकांच्या मनांत एक गोष्ट नेहमीं खटकते कीं या भिन्न भिन्न देवता अगदीं वेगळयाच आहेत कीं एकच आहेत. अर्थात् वेदांत ' एक देवतावाद ' आहे कीं ' बहु देवतावाद ' आहे ह्याचें उत्तर दहाव्या सूक्तांत उत्तम रीतीनें दिलेलें आहे.

इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् । एकं सत् विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ (अथर्व. ९।१०।२८)

हा मंत्र ऋग्वेदाच्या प्रथम मंडलांतही आहे. या मंत्राचें कथन हें आहे कीं (**एकं सत्**) एकच सत्य तत्व आहे. एकच आत्मा, परमात्मा, ब्रह्म, परब्रह्म, देव, ईश्वर अथवा परमेश्वर आहे. त्याचें कांहीं नांव नाहीं परंतु ज्याचीं सर्वच नांवें आहेत. त्याला ' सत् ' एवढेंच नांव येथें सांगितलेलें आहे. ' सत् ' चा अर्थ आहे ' जें आहे तें ' अर्थात् अशी एक विलक्षण शक्ति आहे कीं, या जगाच्या पाठीशीं राहून सर्व जगाचें कार्य चालविते. ज्याच्या शक्तीनें अग्नि जळतो, सूर्य प्रकाशतो, वीज चमकते, वारा वाहतो आणि पाणी वाहतें ! त्यामुळेंच या अनाम सत्य तत्वालाच अग्नि, सूर्य, इत्यादि नांवें देण्यांत आलीं आहेत.

वेदवाचन करतेवेळीं हा सत्यसिद्धांत मनामध्यें बरोबर ठसवून

घेतला पाहिजे. वेदाचें सत्यज्ञान होण्यासाठीं या सिद्धांताचें ज्ञान व समजूत याची अत्यंत आवश्यकता आहे. जे लोक या मंत्राच्या उपदेशाला मानीत नाहींत, ते वेदार्थ समजण्याला अधिकारीच होऊं शकत नाहींत. त्यासाठीं स्वतः वेदानेंच या सूक्तांत सांगितलें आहे कीं, जे या तत्वाला जाणत नाहींत ते- **किं ऋचा करिष्यति ।** ' वेदमंत्र घेवून काय करणार ? ' अर्थात् त्यांना त्यांपासून कांहीं लाभ होणार नाहीं. लाभ तर त्यांनाच होईल कीं, जे वेदाची प्रक्रिया स्वीकारून वेदपठण करतात. दुर्दैवानें आजकाल असे कांहीं लोक आहेत, कीं जे या मंत्राला अप्रमाण मानतात. वस्तुतः वेदांत हाच प्रधान मंत्र आहे ! कारण कीं याच्याच आधारानें वेदमंत्रांचा अर्थ सुस्पष्ट होतो. म्हणून पाठकांना अशी प्रार्थना आहे कीं, त्यांनीं या मंत्राचें उत्तम रीतीनें मनन करावें आणि सर्व वैदिक देवतांचीं नांवें हीं एकाच सद्वस्तूचीं नांवें आहेत असें जाणून वेदार्थ करूं लागावें. याप्रमाणें कित्येक महत्वाच्या गोष्टी या नवव्या कांडांत आहेत, व त्या विशेष महत्वाच्या असल्यानें वाचकांच्या समोर पुन्हां मांडल्या आहेत.

एका वृक्षावर दोन सुपर्ण

कांड ९, सूक्त ९

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- वामः, अध्यात्मं आदित्यः)

अस्य वामस्य पलितस्य होतुस्तस्य भ्राता मध्यमो अस्त्यश्नः ।
तृतीयो भ्राता घृतपृष्ठो अस्यात्रापश्यं विश्पतिं सप्तपुत्रम् । ॥ १ ॥
सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा ।
त्रिनाभि चक्रमजरमनर्वं यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः ॥ २ ॥

अर्थ— (**तस्य अस्य वामस्य पलितस्य**) त्या या सुंदर आणि अतिवृद्ध (**होतुः**) दान करणाऱ्याचा (**मध्यमः भ्राता**) मधला भाऊ (**अश्नः अस्ति**) फार खाणारा आहे. (**अस्य तृतीयः भ्राता**) त्याचा तिसरा भाऊ आपल्या (**घृतपृष्ठः**) पाठीवर पुष्टिदायक तूप ठेवतो. (**अत्र**) या ठिकाणींच मी (**सप्तपुत्रं विश्पतिं अपश्यं**) सप्तपुत्रवान् प्रजापालकाला पाहिलें आहे. (१) (ऋ. १।१६४।१)

(**एकं चक्रं रथं सप्त युंजन्ति**) एक चाक असलेल्या रथाला सात घोडे जोडण्यांत येतात. (**सप्तनामा एकः अश्वः वहति**) सात नांवाचा एक घोडा त्याला खेंचतो. त्याचे (**त्रिनाभि अजरं अनर्वं चक्रं**) तीन केंद्राचें जरारहित आणि नाशरहित हें चक्र आहे. (**यत्र**) ज्याच्यांत (**इमा विश्वा भुवना**) हीं सर्व भुवनें (**अधि तस्थुः**) स्थिर राहिलेलीं आहेत. (२) (ऋ. १।१६४।२, अथर्व १३।३।१८)

भावार्थ— या अलौकिक सुंदर दात्या पुराणपुरुषाचा मधला भाऊ जीवात्मा भोक्ता आहे आणि त्याचा एक तिसरा भाऊही आहे. तो आपल्या पाठीवर घृतादि पोषक पदार्थ धारण करतो. हाच संसार आहे. या ठिकाणीं सर्व प्रजेचा पालनकर्ता एक देव आहे. ज्याला सात पुत्र आहेत. (१)

या एका चाकाच्या रथाला सात घोडे जोडले आहेत परंतु वस्तुतः सात नांवाचा एकच घोडा या रथाला खेंचतो. या तीन केंद्राच्या जरारहित अविनाशी चक्रांत हीं संपूर्ण भुवनें राहिलेलीं आहेत. (२)

इमं रथमधि ये सप्त तस्थुः सप्तचक्रं सप्त वहन्त्यश्वाः ।
सप्त स्वसारो अभि सं नवन्त यत्र गवां निहिता सप्त नाम ॥ ३ ॥
को ददर्श प्रथमं जायमानमस्थन्वन्तं यदनस्था बिभर्ति ।
भूम्या असुरसृगात्मा क्व स्वित्को विद्वांसमुप गात्प्रष्टुमेतत् ॥ ४ ॥
इह ब्रवीतु य ईमङ्ग वेदास्य वामस्य निहितं पदं वेः ।
शीर्ष्णः क्षीरं दुह्रते गावो अस्य वव्रिं वसाना उदकं पदापुः ॥ ५ ॥
पाकः पृच्छामि मनसाविजानन्देवानामेना निहिता पदानि ।
वत्से बष्कयेऽधि सप्त तन्तून्वि तत्निरे कवय ओतवा उ ॥ ६ ॥

अर्थ— (**इमं सप्तचक्रं रथं**) या सात चक्राच्या रथावर (**ये सप्त अधि तस्थुः**) जे सात रहातात, त्यांना (**सप्त अश्वाः वहन्ति**) सात घोडे खेंचतात. (**सप्त स्वसारः**) सात बहिणी (**अभि सं नवन्ते**) ज्याच्या बरोबर रहातात, (**यत्र**) आणि ज्या ठिकाणीं (**गवां सप्तनामा निहिता**) गायींचीं सात यशें राहतात. (३) (ऋ. १।१६४।३)

(**प्रथमं जायमानं**) प्रथम प्रगट होणाऱ्याला (**कः ददर्श**) कोणी पाहिलें आहे ? (**यत् अनस्था अस्थन्वन्तं**) जो हाडाशिवाय असून हाडें असलेल्याला (**बिभर्ति**) धारण करतो. (**भूम्याः असुः असृक् आत्मा क स्वित्**) या मातीमध्यें प्राण, रक्त आणि आत्मा कोठें आहेत बरें ? (**कः विद्वांसं**) कोणता मनुष्य कोणत्या ज्ञान्याजवळ (**एतत् प्रष्टुं उपगात्**) हें विचारण्यासाठीं गेला ? (४) (ऋ. १।१६४।४)

हे (**अंग**) प्रिय मनुष्या ! (**यः अस्य वामस्य वेः**) जो या प्रिय सुपर्णाच्या (**निहितं पदं वेद**) ठेवलेल्या पदाला जाणतो. तो येऊन (**इह ब्रवीतु**) येथें सांगो. (**गावः अस्य शीर्ष्णः**) गाई, किरण त्याच्या शिरोभागापासून (**क्षीरं दुह्रते**) दूध, अमृत दोहतात, ते (**वव्रिं वसानाः**) रूप धारण करून (**पदा उदकं आपुः**) स्वतःच्या पायानें जलपान करतात. (५) (ऋ. १।१६४।७)

(**पाकः**) परिपक्व होणारा आणि (**मनसा अविजानन्**) मनानें जाणणारा मी (**देवानां एना निहिता पदानि**) देवतांनीं ठेवलेल्या या पदांच्या विषयांत (**पृच्छामि**) विचारतों. (**कवयः**) कवि लोकांनीं (**बष्कये वत्से अधि**) वाढलेल्या या वांसरांवर (**ओतवै उ**) विणण्यासाठीं (**सप्त तंतून् नि तत्निरे**) सात तंतूंना पसरलें आहे. (६) (ऋ. १।१६४।५)

भावार्थ—या सात चक्रांनीं युक्त रथावर सात वीर उभे राहिले आहेत. या रथाला सात घोडे खेचून राहिले आहेत. या रथावर सात बहिणीही त्यांच्याजवळ बसल्या आहेत आणि जेथें गायींबरोबर त्यांचीं सात यशें पण विराजमान आहेत. (३)

सर्वांपूर्वी प्रगट होणाऱ्या या आत्म्याला कोणीं पाहिलें आहे ? येथें तर हाडरहित आत्मा हाडें असलेल्या शरीराला धारण करतो. या पार्थिव शरीरांत प्राण, रक्त आणि आत्मा-मन-कोठें राहातें ? कोणत्या विद्वानाला मनुष्य त्याविषयीं विचारण्यास जातो ? (४)

हे प्रिय शिष्य ! जो या रमणीय सुपर्ण-आत्म्याचें परमपद यथावत् जाणतो त्यानेंच या विषयाचा उपदेश करावा. या आत्म्याच्या मुख्य भागापासून सर्व गायींत अमृतासारखें दूध येतें. त्या गायींत पाणी प्यायल्यावर लोकांना सुंदर रूप आणि रस देण्याचें सामर्थ्य येतें. (५)

हे गुरुजी ! मी परिपक्व नाहीं. मनानें पण मी कांहीं जाणत नाहीं, म्हणून देवांनीं ठेवलेल्या पदासंबंधीं विचारतों. आपण त्या विषयासंबंधीं सांगा ! कवि लोक जें सप्त तंतूंचें वस्त्र विणण्यासाठीं वासरांवर पसरतात त्याचा आशय काय आहे ? (६)

अचिकित्वांश्चिकितुषश्चिदत्र कवीन्पृच्छामि विद्मनो न विद्वान् ।
वि यस्तस्तम्भ षळिमा रजांस्यजस्य रूपे किमपि स्विदेकम् ॥ ७ ॥
माता पितरमृत आ बभाज धीत्यग्रे मनसा सं हि जग्मे ।
सा बीभत्सुर्गर्भरसा निविद्धा नमस्वन्त इदुपवाकमीयुः ॥ ८ ॥
युक्ता मातासीद्धुरि दक्षिणाया अतिष्ठद्गर्भो वृजनीष्वन्तः ।
अमीमेद्वत्सो अनु गामपश्यद्विश्वरूप्यं त्रिषु योजनेषु ॥ ९ ॥
तिस्रो मातॄस्त्रीन्पितॄन्बिभ्रदेक ऊर्ध्वस्तस्थौ नेमव ग्लापयन्त ।
मन्त्रयन्ते दिवो अमुष्य पृष्ठे विश्वविदो वाचमविश्वविन्नाम् ॥ १० ॥

अर्थ— (**अचिकित्वान् न विद्वान् चित्**) अज्ञानी आणि विद्या न जाणणारा मी (**चिकितुषः विद्मनः कवीन् चित्**) ज्ञानी विद्वान् कवींनाच (**पृच्छामि**) विचारतों. (**यः इमाः षट् रजांसि तस्तंभ**) जे या सहा लोकांना आधार देतात (**अजस्य रूपे**) त्या अजन्म्याच्या रूपांत (**किं अपि एकं स्वित्**) एक कोणतें तत्व आहे ? (७) (ऋ. १।१६४।६)

(**माता पितरं ऋते आबभाज**) माता बालकाच्या पित्याला अर्थात् स्वतःच्या पतीला सत्यधर्मांत भाग देते (**अग्रे धीती**) प्रारंभीं बुद्धीनें आणि (**मनसा**) मनानें ती (**हि सं जग्मे**) निश्चयानें संगति करते. (**सा बीभत्सुः गर्भरसा निविद्धा**) ती भरण पोषण करणारी, स्वतःमध्यें रस धारण करणारी विद्ध झालेली आहे. जे (**नमस्वन्तः इत् उपवाकं ईयुः**) नमस्कार करणारे भक्त निश्चयानें तिची प्रशंसा करतात. (८) (ऋ. १।१६४।८)

(**दक्षिणायाः धुरि माता युक्ता आसीत्**) दक्षिणेकडील धुरींत माता जोडलेली होती, आणि तिचा (**गर्भः वृजनीषु अन्तः अतिष्ठत्**) गर्भ आपल्या शक्तींमध्यें होता. (**वत्सः गां अनु अमीमेत्**) वांसरू गाईला पाहून तिच्याकडे जातें आणि (**त्रिषु योजनेषु**) तिन्हीं योजनांमध्यें (**विश्वरूप्यं अपश्यत्**) संपूर्ण रूपाला पहातें. (९) (ऋ. १।१६४।९)

(**एकः तिस्रः मातॄः**) एकटा तीन मातांना आणि (**त्रीन् पितॄन्**) तीन पित्यांना (**बिभ्रत्**) धारण करतां करतां (**ऊर्ध्वः तस्थौ**) सरळ उभा राहतो. तो त्यांना (**न ईं अव ग्लापयन्त**) ग्लानीला प्राप्त होऊं देत नाहीं. (**अमुष्यः दिवः पृष्ठे**) तो द्युलोकाच्या पाठीवर विराजमान होऊन (**विश्वविदः**) सर्वज्ञ लोक (**अ-विश्वविन्नां वाचं मन्त्रयते**) सर्वांना न समजणाऱ्या गूढ वचनाचें मनन करतो. (१०) (ऋ. १।१६४।१०)

भावार्थ— मी अज्ञानी आणि निर्बुद्ध आहें, त्यामुळें आपल्या सारख्या ज्ञानी व सुबुद्ध अशा विद्वानांना प्रश्न विचारतों. ज्यानें हे सहा लोक धारण केले आहेत त्या अजन्मा आत्म्याचें एक सत्यस्वरूप कोणतें आहे ? (७)

प्रकृति माता परमात्मारूपी पित्याला सत्यधर्माचा भाग समर्पण करते; अर्थात् सत्यधर्माचा भाग त्याचाच आहे असें दर्शवीत आहे. सर्व प्रथम बुद्धि, कर्म आणि विचारशक्तीचें संगतीकरण झालें, ज्यामुळें त्याची रचना झाली. ही प्रकृति सर्वांचें पोषण करण्यास समर्थ आहे, तिच्यांत सर्व प्रकारचे उत्तम पोषक रस आहेत. जे भक्त नमस्कारपूर्वक तिची भक्ति करतात ते निश्चयानें तिची प्रशंसा करतात. (८)

माता या यज्ञरूप रथांत प्रमुखस्थानीं नियुक्त झालेली आहे. तिचें गर्भधारण अनेक शक्तींनीं होतें. ज्यावेळीं तें जन्मतें त्यावेळीं गाईच्या मागें मागें चालतें आणि मोठें झाल्यावर पूर्वी सांगितलेल्या तीन केंद्रांत सर्व विश्वाचें रूप राहिलें आहे ही गोष्ट पहातो. (९)

तो एकटाच (खोंड) स्वतःच्या तिन्हीं माता व तिन्हीं पित्यांना धारण करतां करतां सरळ उभा राहतो. त्याला कोणी ग्लानि उत्पन्न करूं शकत नाहीं तेव्हां त्याला या गोष्टीचें ज्ञान होतें की द्युलोकावर सर्वज्ञ लोक गुप्त मंत्रांचा विचार करतात. (१०)

पञ्चा॑रे च॒क्रे प॑रि॒वर्त॑माने॒ यस्मि॑न्ना॒तस्थु॒र्भुव॑नानि॒ विश्वा॑ ।
तस्य॒ नाक्ष॑स्तप्यते॒ भूरि॑भारः स॒नादे॒व न च्छि॑द्यते॒ सना॑भिः ॥ ११ ॥
पञ्च॑पादं॒ पि॒तरं॒ द्वाद॑शाकृतिं दि॒व आ॑हुः॒ परे॒ अर्धे॑ पुरी॒षिण॑म् ।
अथे॒मे अ॒न्य उप॑रे विचक्ष॒णे स॒प्तच॑क्रे॒ षड॑र आहु॒रर्पि॑तम् ॥ १२ ॥
द्वाद॑शारं॒ न॒हि तज्जरा॑य॒ वर्व॑र्ति च॒क्रं परि॒ द्याम॒तस्य॑ ।
आ पु॒त्रा अ॑ग्ने मिथु॒नासो॒ अत्र॑ स॒प्त श॒तानि॑ विंश॒तिश्च॑ तस्थुः ॥ १३ ॥
सने॑मि च॒क्रम॒जरं॒ वि वा॑वृत उत्ता॒नाया॒ं दश॑ यु॒क्ता व॑हन्ति ।
सूर्य॑स्य॒ चक्षू रज॑सै॒त्यावृ॑तं॒ यस्मि॑न्ना॒तस्थु॒र्भुव॑नानि॒ विश्वा॑ । ॥ १४ ॥

अर्थ— (**यस्मिन् परिवर्तमाने पञ्चारे चक्रे**) ज्या पांच आरांच्या फिरत्या चक्रांत (**विश्वा भुवनानि आतस्थुः**) सर्व भुवनें राहिलेलीं आहेत. (**तस्य भूरि भारः अक्षः न तप्यते**) त्या चक्राचा अत्यंत भारी वजनदार अक्षदंड थोडाही तापत नाहीं, आणि (**सनात् एव सनाभिः न छिद्यते**) चिरकालापासून केंद्रस्थानांवर असतांही छिन्नभिन्न होत नाही. (११) (ऋ. १।१६४।१३)

(**पञ्चपादं द्वादशाकृतिं पितरं**) पांच पायांचा आणि बारा आकृतींचा पिता (**दिवः परे अर्धे पुरीषिणं आहुः**) द्युलोकाच्या दूरच्या अर्ध्या भागांत आहे असें म्हणतात. (**अथ इमे अन्ये आहुः**) आणि कित्येक दुसरे असें सांगतात कीं, (**उपरे विचक्षणे**) अति विलक्षण (**सप्त चक्रे षडरे अर्पितं**) सात चक्रांच्या आणि सहा आरांच्या चक्रांत तो राहिला आहे. (१२) (ऋ. १।१६४।१२)

(**द्वादशारं तत् चक्रं**) बारा आरांचें तें चक्र (**नहि जराय**) जीर्ण होत नाहीं, तें (**ऋतस्य द्यां परि वर्वर्ति**) सत्याच्या द्युलोकावर फिरतें. हे (**अग्ने**) अग्नि ! (**अत्र सप्त शतानि विंशतिः च**) येथें सातशें वीस (**मिथुनासः पुत्राः आ तस्थुः**) जुळे पुत्र राहिले आहेत. (१३) (ऋ. १।१६४।११)

(**सनेमि अजरं चक्रं**) परिघ असलेलें अविनाशी चक्र (**वि-वावृते**) विशेष रीतीनें फिरून राहिलें आहे. (**उत्तानायां दश युक्ताः वहन्ति**) ताणलेल्या धुरांमध्यें दहा जोडलेले खेंचत आहेत. (**सूर्यस्य रजसा आवृतं चक्षुः**) सूर्याच्या रजानें व्याप्त असलेला डोळा (**एति**) चालतो. (**यस्मिन् विश्वा भुवना आतस्थुः**) ज्यांत सर्व भुवनें राहिलेलीं आहेत. (१४) (ऋ. १।१६४।१४)

भावार्थ— पांच आरांच्या सतत फिरणाऱ्या चक्रांत सर्व भुवनें समाविष्ट झालेलीं आहेत. त्याचा वजनदार अक्षदंड सतत फिरणारा असूनही तापत नाहीं आणि चिरकालापासून चक्राच्या मध्यबिंदूंत फिरत असतांनाही तुटत नाहीं. (११)

पित्याला पांच पाय व बारा रूपें आहेत व तो द्युलोकाच्या दूरच्या अर्ध्या भागांत रहातो, असें एक प्रकारचें लोक त्याचें वर्णन करतात. परंतु कित्येक दुसरे ज्ञानी लोक असें वर्णन करतात कीं, तो अति विलक्षण सहा आरा असलेल्या सात चक्रांत रहातो. (१२)

बारा आरांचें तें चक्र कधींही क्षीण होत नाहीं, तें सत्यमय द्युलोकांत वारंवार फिरतें. त्यांत सातशेंवीस जुळे भाऊ त्याचे पुत्र विराजमान आहेत. (१३)

हें परीघवान नाशरहित चक्र वारंवार फिरतें. या रथाच्या ताणलेल्या मोठ्या धुरांना जोडलेले दहा घोडे रथाला खेंचतात. ज्यामुळें सर्व भुवनें स्थिर झालेलीं आहेत. तो सूर्याच्या चक्षुरजानें व्याप्त झालेला आहे. (१४)

स्त्रियः सतीस्ताँ उ मे पुंस आहुः पश्यदक्षण्वान्न वि चेतदन्धः ।
कविर्यः पुत्रः स ईमा चिकेत यस्ता विजानात्स पितुष्पितासत् ॥ १५ ॥
साकंजानां सप्तथमाहुरेकजं षडिद्यमा ऋषयो देवजा इति ।
तेषामिष्टानि विहितानि धामश स्थात्रे रेजन्ते विकृतानि रूपशः ॥ १६ ॥
अवः परेण पर एनावरेण पदा वत्सं बिभ्रती गौरुदस्थात् ।
सा कद्रीची कं स्विदर्धं परागात्क्व स्वित्सूते नहि यूथे अस्मिन् ॥ १७ ॥
अवः परेण पितरं यो अस्य वेदावः परेण पर एनावरेण ।
कवीयमानः क इह प्र वोचद्देवं मनः कुतो अधि प्रजातम् ॥ १८ ॥

अर्थ— (स्त्रियः सतीः) त्या स्त्रियां असतांनाही (तान् उ मे पुंस आहुः) त्यांना ते पुरुष आहेत असें त्यांनीं मला सांगितलें आहे. ती गोष्ट (अक्षण्वान् पश्यत्) डोळे असलेला पाहूं शकतो, परंतु (अन्धः न विचेदत्) आंधळा त्याला जाणत नाहीं. (यः कविः पुत्रः) जो पुत्र कवि आहे (सः आ ईं चिकेत) तो त्याला फारच चांगल्या प्रकारें जाणतो. (यः ताः विजानात्) जो त्यांना जाणतो (सः पितुः पिता असत्) तो पित्याचा ही पिता होतो. (१५) (ऋ. १।१६४।१६)

(साकंजानां सप्तथं एकजं आहुः) बरोबर जन्मलेल्यांत सातवा एकटाच झाला आहे असें म्हणतात. (षट् इत् यमाः) जे सहा निश्चयानें जोडलेले आहेत, ते (देवजाः ऋषयः इति) देवांपासून उत्पन्न झालेले ऋषि आहेत (तेषां धामशः) त्यांच्यासाठीं स्थानापासून (इष्टानि विहितानि) इष्ट गोष्टी बनविलेल्या आहेत. (स्थात्रे रूपशः विकृतानि रेजन्ते) स्थिर राहणाऱ्या एकासाठीं आकारापासून विकृत होऊन कांपतात. (१६) (ऋ. १।१६४।१५)

(एना गौः) ही गाय (अवः परेण) निम्नस्थानाच्या दूरच्या पायानें आणि (परः अवरेण) दूरच्या आणि जवळच्या (पदा) पायानें (वत्सं बिभ्रतीः) वांसराला धारण करतां करतां, (उत् अस्थात्) वर उभी राहते. (सा कद्रीची) ती कोठून येते, आणि (कं स्वित् अर्धं परा अगात्) कोणत्या अर्धभागाजवळ जाते, ती (क्व स्वित् सूते) कोठे प्रसूत होते ? (अस्मिन् युथे न) या संघांत तर नाहींच. (१७) (ऋ. १।१६४।१७)

(परेण अवः अस्य पितरं) वरपासून खालपर्यंत याच्या पित्याला (यः वेद) जो जाणतो, आणि (परेण अवः एना अवरेण परः) दुरून खालपर्यंत आणि खालून वरपर्यंत जो जाणतो (कवीयमानः कः इह प्रवोचत्) कवीप्रमाणें आचरण करणारा कोण येथें सांगेल ? (देवं मनः कुतः अधिजातं) दैवीशक्तीनें युक्त मन कोठून प्रगट झालें आहे ? (१८) (ऋ. १।१६४।१८)

भावार्थ-- वस्तुतः स्त्रिया असतांनाही त्यांना पुरुष म्हणतात. कारण कीं ज्याचे डोळे चांगले आहेत, तेच पाहूं शकतात. आंधळ्याला तें दिसणार नाहीं. त्यांत जो कवि आहे तो सत्य गोष्ट जाणूं शकतो. आणि जो जाणतो; तो पित्याचा पण पिता बनतो. (१५)

एकाच वेळीं सात उत्पन्न झाले आहेत. त्यांतील एक असा आहे कीं तो एकटाच जन्मलेला आहे व बाकी सहा जोडलेले आहेत. त्यांना देवतांपासून उत्पन्न झालेले ऋषि म्हणतात. त्याचें जागोजागीं इष्ट करणें योग्य आहे. एक जो नेहमीं रहाणारा आहे, त्यासाठीं आकारानें बनविलेले नाना पदार्थ कंप उत्पन्न करतात. (१६)

ही गाय स्वतःच्या व जवळच्या पावलांनीं दूरच्या बालकांचें धारण-पोषण करते. ही कोठून आली ? कोणत्या अर्धभागानें जवळ जाते ? कोठें प्रसूत होते ? हें सर्व जाणलें पाहिजे. ती या संघांत तर रहात नाहींच. (१७)

दुरून जवळपर्यंत तिच्या पित्याला जो जाणतो तो सर्वांना खालपासून वरपर्यंत व वरपासून खालपर्यंत कोण जाणतो ? कवि त्याला जाणून येथें येऊन सांगेल काय ? आमचें दैवीशक्तीनें युक्त मन कोठून प्रगट झालें आहे ? (१८)

ये अर्वाञ्चस्ताँ उ पराच आहुर्ये पराञ्चस्ताँ उ अर्वाच आहुः ।
इन्द्रश्च या चक्रथुः सोम तानि धुरा न युक्ता रजसो वहन्ति ॥ १९ ॥
द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परि षस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभि चाकशीति ॥ २० ॥
यस्मिन्वृक्षे मध्वदः सुपर्णा निविशन्ते सुवते चाधि विश्वे ।
तस्य यदाहुः पिप्पलं स्वाद्वग्रे तन्नोन्नशद्यः पितरं न वेद ॥ २१ ॥
यत्रा सुपर्णा अमृतस्य भक्षमनिमेषं विदथाभिस्वरन्ति ।
एना विश्वस्य भुवनस्य गोपाः स मा धीरः पाकमत्रा विवेश ॥ २२ ॥

अर्थ— (ये अर्वाञ्चः) जे येथील आहेत (तान् उ पराचः आहुः) त्यांना दूरचें म्हणण्यांत येतें आणि (ये पराञ्चः तान् उ) जे दूरचे आहेत त्यांना (अर्वाचः आहुः) जवळचे असें म्हणतात. हे (सोम) सोम ! तूं आणि (इन्द्रः च) इंद्र (या चक्रथुः) ज्यांची रचना करतात (तानि) त्यांना (धुरा युक्तान्) धुरेला जोडलेल्याप्रमाणें (रजसः वहन्ति) लोकांना खेंचतात. (१९) (ऋ. १।१६४।१९)

(द्वा सुपर्णा) दोन उत्तम पंखाचें पक्षी आहेत. ते (सयुजा सखाया) जवळ जवळ रहाणारे मित्र आहेत. ते (समानं वृक्षं परिषस्वजाते) एकाच वृक्षावर मिळून रहातात. (तयोः अन्यः) त्यांतून एक (स्वादु पिप्पलं अत्ति) मधुर फल भक्षण करतो, (अन्यः अनश्नन्) दुसरा न खातां (अभि चाकशीति) चमकतो. (२०) (ऋ. १।१६४।२०)

(यस्मिन् वृक्षे) ज्या वृक्षावर (मध्वदः सुपर्णाः) मधुर रस खाणारे पक्षी (निविशन्ते) निवास करतात, आणि (विश्वे अधि सुवते) सर्व संतान उत्पन्न करतात (तस्य यत् अग्रे स्वादु पिप्पलं आहुः) त्याचे प्रारंभीं जें मधुर फळ आहे असें म्हणतात (तत् न उत् नशत्) तें त्याला मिळत नाहीं. (यः पितरं न वेद) जो पित्याला जाणत नाहीं. (२१) (ऋ. १।१६४।२१)

(सुपर्णाः) हे पक्षी (यत्र अमृतस्य भक्षं) जेथें अमृताचें अन्न (विदथाभिः अनिमेषं अभिस्वरन्ति) ज्ञानपूर्वक विश्रांति न घेतां एक स्वरानें प्राप्त करतात. (एना विश्वस्य भुवनस्य गोपाः). त्या सर्व भुवनांचा रक्षक (कः धीरः) कोण धैर्यशाली (अत्र मा पाकं आविवेश) येथे मी जो परिपक्व होऊन राहिलो आहे, त्या माझ्यांत प्रविष्ट होतो. (२२) (ऋ. १।१६४।२१)

भावार्थ— जे येथील आहेत ते दूरचे आहेत असें म्हणतात आणि जे दूरचे आहेत ते जवळचे आहेत असें मानतात. सोम आणि इंद्र येथील सर्व रचना करतात. ते सर्व या विश्वाच्या धुरेंत जोडले जाऊन संपूर्ण लोकांना चालवितात. (१९)

दोन आत्मे आहेत. ते दोघे एकत्र रहाणारे एकमेकांचे मित्र आहेत. ते दोघे या संसारवृक्षावर मिळून रहातात. त्यांपैकीं एक या संसारवृक्षाचें गोड फळ खातो व दुसरा न खातां फक्त चमकत रहातो. (२०)

या संसाररूपी वृक्षावर गोड फळें खाणारे अनंत आत्मारूपी पक्षी निवास करतात. ते सर्व येथें संतान उत्पन्न करतात आणि त्यांपैकी जे आपल्या पित्याला जाणत नाहीत त्यांना समोरचें गोड फळही त्यांना मिळत नाहीं. (२१)

हे सर्व आत्मारूपी अनंत पक्षी अमृतफळ खाण्याच्या इच्छेनें विश्रांति न घेतां ज्ञानपूर्वक जाहीर करतात कीं, संपूर्ण भुवनांचा रक्षक तो धैर्यशाली परमात्मा या जगांत माझ्यासारख्या अपरिपक्वांत अर्थात् कित्येक प्राणिमात्रांत प्रविष्ट झालेला आहे. (२२)

एका वृक्षावर दोन सुपर्ण

जीवात्मा, परमात्मा आणि संसार

या सूक्तांत अध्यात्मविद्येचा उत्तम विचार केलेला आहे. ऋग्वेदांत (१।१६४) मध्यें हेंच सूक्त आहे. त्यांत या सूक्ताचे ५१ मंत्र आहेत. या ऋग्वेदाच्या एकाच सूक्ताचे दोन भाग करून अथर्ववेदांत नवव्या कांडांत, नववें आणि दहावें अशीं दोन सूक्तें बनवलेलीं आहेत. नवव्या सूक्ताचे २२ मंत्र आहेत आणि दहाव्या सूक्ताचे २८ मंत्र आहेत. या दोन्ही सूक्तांचे मिळून ५० मंत्र होतात. पूर्वोक्त ऋग्वेद १।१६४ चे ५२ मंत्र आहेत. कांहीं पाठभेद, मंत्रक्रमभेद आणि मंत्रांची न्यूनाधिकता आहे. तरी पण सर्वसाधारणतः असें म्हणतां येईल कीं, या ऋग्वेदसूक्ताचीं हीं अथर्ववेदाचीं दोन सूक्तें बनलीं आहेत. अथर्ववेदांत ऋग्वेदाचीं कित्येक सूक्तें आहेत. त्यांपैकीं हेंही एक आहे.

ऋग्वेदाच्या या सूक्ताचे पहिले २२ मंत्र थोड्या क्रमभेदानें येथें दिलेले आहेत आणि पुढच्या मंत्रांचें त्यानंतरचें सूक्त बनलेलें आहे. या सूक्तांत जीवात्मा, परमात्मा आणि संसारवृक्ष, यांचें उत्तम वर्णन आहे. वेदांत जो उत्तम विषय आहे तो हाच आहे. जी ब्रह्मविद्या अथवा आत्मविद्या म्हटली आहे ती अशाच सूक्तांत सांगितलेली आहे. ही गुप्तविद्या आहे; म्हणून व्यंग शब्दांच्या योजनेनें ही अध्यात्मविद्या येथें सांगितलेली आहे. स्पष्ट शब्दांत सांगितली नाहीं. त्यामुळें वर वर पाहिलें तर या मंत्रांतील शब्दांनीं कांहींच स्पष्ट बोध होत नाहीं, परंतु खोल आणि सूक्ष्म विचार करण्यानेंच त्याचा बोध अथवा ज्ञान होतें. या सूक्ताचा विचार करण्यासाठीं प्रथम शेवटच्या मंत्राचा विचार केला पाहिजे. त्याचें कारण हें आहे कीं जी गोष्ट सांगावयाची आहे ती या तीन मंत्रांत स्पष्ट शब्दद्वारें व्यक्त करण्यांत आली आहे. त्यामुळें या तीन मंत्रांचा विचार आम्ही येथें प्रथम करीत आहोंत—

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते।
(मं. २०)

या मंत्राचा व्यक्त अर्थ हा आहे कीं, " दोन उत्तम पंखांचे पक्षी एकत्र रहाणारे, परस्परांचे मित्र आहेत आणि ते दोन्ही एकाच वृक्षावर एकमेकांना आलिंगन देऊन राहतात. " याठिकाणीं जे पक्षी सांगितले आहेत ते मात्र दोनच नाहींत, परंतु पुढील मंत्रांत सांगितलें आहे कीं, (**मध्वदः सुपर्णाः**) मधुर फळांचा भोग करणारे पक्षी पुष्कळ आहेत, असंख्य आहेत, अनंत आहेत. याठिकाणीं (**मधु-अदः**) मधुर फळांचा भोग करणारे पक्षी अनंत आहेत, असें सांगितलें आहे; परंतु दुसरा पक्षी हीं गोड फळें खाण्याची इच्छा करणारा नाहीं, आणि तो मात्र नेहमीं त्यांच्या बरोबरच रहातो. तो (**अभिचाकशीति**) चमकतो, प्रकाशतो; परंतु (**अन-भश्नन्**) कांहीं खात नाहीं. हा पक्षी मात्र एकच आहे. या संपूर्ण वृक्षावर भोग करणारे पक्षी अनंत आहेत परंतु भोग न करणारा असा एकच पक्षी आहे. तथापि हा पक्षी एक असतांनाही सर्व अन्य भोगी पक्ष्यांना असें प्रतीत होतें कीं, 'हा आमचा (**सयुज् सखा**) साथीदार-मित्र आहे.' हा पक्षी एकच असतांनाही सर्वांबरोबर राहतो आणि सर्वांचा प्रिय मित्र होऊन रहातो. ही गोष्ट कशी संभवनीय असेल ह्याचा विचार करून समजून घेतलें पाहिजे.

हा वृक्ष 'संसारवृक्ष' च आहे. या संसारवृक्षावर पुष्कळ फळें लागतात. कांहीं फळें पिकतात व कांहीं कच्चींही राहतात. याच संसारवृक्षावर एक परमात्मा सर्वत्र व्यापक होऊन रहातो. या संसारवृक्षाच्या प्रत्येक शाखेवर तो विराजमान आहे. हा संसारवृक्षाचें एकही फळ खात नाहीं, परंतु आपल्या निज तेजानें चमकत रहातो, कारण कीं त्याच्यासारखें तेज दुसऱ्या कोणाचेंच नाहीं.

याच संसारवृक्षावर गोड फळें खाण्याची इच्छा करणारे जीवात्मे राहतात. त्यांच्या विषयीं असें वर्णन आहे—

यस्मिन् वृक्षे मध्वदः सुपर्णा निविशन्ते सुवते चाधि विश्वे ॥ (मं. २१)

" या संसारवृक्षावर गोड फळें खाणारे अनंत पक्षी रहातात, येथें ते आपली संतानवृद्धि करतात आणि सर्व या वृक्षावरच रहातात. " हे पक्षी निःसंदेह जीवात्मेच होत. कारण कीं हाच जीवात्मा वारंवार जन्म घेतो व सुखोपभोगांची लालसा धारण करतो, संसारांत रहातो आणि संतान उत्पन्न करतो. हाच जीवात्मा—

तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्ति अनश्नन्न्यो अभि चाकशीति । (मं. २०)

" त्यांतील एक मधुर फळ खातो, परंतु दुसरा फलभोग न करतां, केवळ प्रकाशत रहातो. " गोड फळ खाणारा जीवात्मा आहे आणि फलभोग न करणारा परमात्मा आहे. त्याचें वर्णन वेदांत अन्य ठिकाणीं याप्रमाणें आलेलें आहे—

अकामो धीरो अमृतः स्वयंभू रसेन तृप्तो न कुतश्चनानः । तमेव विद्वान् न बिभाय मृत्योरात्मानं धीरमजरं युवानम् ।। (अथर्व. १०।८।४४)

"भोगाची कामना नसलेला, धैर्यवान्, अमर, स्वयंभू, रसानें तृप्त, कोणतीही न्यूनता नसणारा, जरारहित, तरुण अशा या आत्म्याला जाणलें असतांही मृत्यूचें भय दूर होतें. " हा परमात्मा अकाम असल्यानें फलोपभोग करीत नाहीं, परंतु त्याचा मित्र जीवात्मा सकाम असल्यानें, नेहमीं गोड फळें खाण्याची (म्हणजे विविध उपभोगांची) इच्छा करतो. परंतु नेहमीं ह्या जीवात्म्याला गोड फळेंच मिळतात असा नियम नाहीं. तो जशीं कर्में करतो, तदनुसार त्याला गोड अथवा कडू फळें मिळत रहातात, व जीं मिळतात त्यांचा तो उपभोग करीत राहतो.

जीवात्मा आणि परमात्मा '**स-युज्**' अर्थात् एक दुसऱ्याच्या अगदीं निकट आहेत. त्यांच्यामध्यें कांहीं स्थानाचें अंतर नाहीं. ज्या स्थानांत एक आहे त्याच स्थानीं त्याच्याबरोबर दुसराही आहे. (**मध्वदः सुपर्णाः**) गोड फळें खाणारे हे जीव अनंत आहेत. हे जीव अनंत असल्यानें त्यांचा आकार सूक्ष्म अणुसारखा आहे, अर्थात् ते लहान लहान असे परिच्छिन्न आहेत. परंतु परमात्मा प्रत्येकाबरोबर समानतेनें असल्यानें, विभु (**न कुतश्चन ऊनः**) सर्वव्यापक आणि कोठेंही न्यून नाहीं असा आहे. हा परमात्मे प्रत्येकांत व्यापक आहे. त्याचें वर्णन पहा—

एना विश्वस्य भुवनस्य गोपाः स मा धीरः पाकमत्रा विवेश । (मं. २२)

" हा संपूर्ण भुवनांचा रक्षक धैर्यशाली परमात्मा येथें माझ्यासारख्या अपरिपक्व जीवनांतही प्रविष्ट झाला आहे. " जसा तो माझ्यांत आहे तसाच तो सर्वांतही आहे. सर्वव्यापक असल्यानें तो सर्वांबरोबर मिळून मिसळून राहूं शकतो. याप्रमाणें हा परमात्मा एक, सर्वव्यापक आणि सर्वत्र परिपूर्ण आहे आणि जीवात्मे अनेक परिच्छिन्न, अपूर्ण आणि भोगी आहेत. त्यामुळें त्यांची नेहमीं इच्छा राहाते कीं—

सुपर्णा अमृतस्य भक्षमनिमेषं विदथाभिस्वरन्ति । (मं. २२)

" हे जीवात्मे अमृताचें अन्न नेहमीं प्राप्त करण्यासाठीं पुकारीत असतात. " या जीवात्म्यांची जर नेहमीं कांहीं मागणी असेल, तर ती ' अमृत पाहिजे ' हीच एक असते. मला असा अन्नभोग पाहिजे कीं ज्यामुळें मी निरोगी होऊन अमर होईन, हीच मागणी प्रत्येक जीवात्म्याची असते. वाचकांनीं या जगांत सूक्ष्म अवलोकन केल्यास हेंच आढळून येईल कीं, प्रत्येक जीवाची हीच मागणी आहे. प्रत्येक मनुष्य आणि प्राणी हीच मागणी करीत असतो व त्याचे प्रयत्नही यासाठींच असतात. नेहमीं शाश्वत टिकणारें सुख मला प्राप्त व्हावें हीच इच्छा व प्रयत्न प्रत्येकाचे आहेत. सुखाची तीव्रतर इच्छा जशी प्रत्येकाला आहे तशी दुःखाची अनिच्छा पण प्रत्येकाला असतें. परंतु सुख दूर जात असतें व दुःख मात्र मिळत असतें. यावरून ही गोष्ट स्पष्ट होतें कीं, त्याचो नियामक शक्ति वेगळीच आहे.

हा जीवात्मा परमात्म्याच्या बरोबर रहातो, त्याच्या जवळ रहातो, अत्यंत जवळ रहातो, किंबहुना जीवात्मा, परमात्मा (**परिषस्वजात**) हे एकमेकांना आलिंगन देऊन राहिल्यासारखे राहतात. अथवा याहिपेक्षां जास्त सांगावयाचें म्हणजे (**आविवेश**) जीवात्म्यात परमात्मा आहे.

परमात्मा इतका जवळ असतांनाही, जीवात्मा त्याला जाणतोच असें नाहीं आणि परमात्म्याला, स्वतःच्या परमपित्याला न जाणल्यानेंच त्याचें सुख दूर जातें. या उद्देशानेंच ही गोष्ट येथें सांगितली आहे--

तस्य यदाहुः पिप्पलं स्वाद्वग्रे तन्नोन्नशद्यः पितरं न वेद । (मं. २१)

" जो स्वतःच्या पित्याला जाणत नाहीं, त्याच्या जवळ गोड फळें असतांनाही, तीं त्याच्यासाठीं नष्ट होतात. " प्रत्येकाजवळ गोड फळें असतातच, परंतु तीं फळें त्यालाच प्राप्त होतात कीं जो स्वतःच्या पित्याला जाणतो. जो स्वतःच्या पित्याला जाणत नाहीं, त्याच्या जवळ गोड फळें असूनही तीं त्याला भोगावयाला मिळत नाहींत. जीवात्मा आणि परमात्मा इतक्याजवळ असतांना आणि परमात्मा इतका हितकारी मित्र अगदीं जवळ– निकट असतांनाही जीव त्या परमपित्याला जाणत नाहीं व दुःखें भोगत रहातो. यापेक्षां जास्त खेदाची कोणती गोष्ट असेल? जीवात्मा, परमात्म्याला जाणूं शकतो व त्याला जाणून निश्चयानें परम सुखही प्राप्त करूं शकतो; परंतु खेदाची गोष्ट ही आहे कीं, कित्येक जीवात्मे असे आहेत कीं, हें ज्ञान प्राप्त करण्याचा

[illegible] [illegible] राहून आणि निरंतर दुःखें भोगीत असतात. मनुष्य जवळ असलेल्या परमात्म्याला जाणत नाहीं आणि दूरवर दूर असलेल्या पदार्थांना जाणण्याची मात्र धडपड करीत असतो। ही केवढी विपरीत बुद्धि आहे. पहा—

ये अर्वाञ्चस्तां उ पराच आहुर्ये पराञ्चस्तां उ अर्वाच आहुः । (मं. १९)

" जे जवळचा आहे तो त्याला दूरचा वाटतो आणि जो दूर आहे तो जवळचा आहे असें त्याला वाटत असतें. " हें मिथ्या ज्ञानच त्याच्या दुःखाला कारण आहे. परमात्मा इतका अत्यंत जवळ असतांनाही त्याला दूर वाटतो आणि जगाचे भोग फार दूर असतांनाही त्याला जवळ वाटतात. त्यामुळें तो परमात्म्याला जाणण्याची इच्छाच करीत नाहीं आणि निरंतर जगाचे भोग प्राप्त करून घेण्यांत तत्पर रहातो. परंतु याप्रमाणें स्वतःच्या पित्याला– परमात्म्याला– न जाणल्यानें त्याला कोणत्याही प्रकारचें सुख मात्र प्राप्त होत नाहीं आणि वारंवार दुःखांच्या फेऱ्यांत तो फसतो. म्हणून—

अवः परेण पितरं यो अस्य वेदावः परेण पर एनावरेण । (मं. १८)

" स्वतःचा पिता वरपासून खालपर्यंत आहे असें जो जाणतो " तो निःसंदेह सुखाचा भागीदार होऊं शकतो. परमपिता परमात्म्याची शक्ति विशाल आहे, तो आपला साथीदार व खराखुरा मित्र आहे. तो माझा साथीदार आहे, सर्वदा हितकर्ता आहे, तो माझ्या आंत आहे. तो निष्काम, अकाम आणि नित्यतृप्त असतांनाही माझ्या आंत आहे, ही गोष्ट जो जाणतो, तोच खऱ्या सुखाचा भागीदार होतो. या परमपित्याचें ज्ञान प्राप्त होण्यासाठीं स्वतःचें मन दिव्यशक्तीनें युक्त आणि पवित्र असलें पाहिजे. हें मन—.

देवं मनः कुतो अधिप्रजातम् । (मं. १८)

" हें मन दिव्य कसें होईल ? " राक्षसी मन तर प्रत्येकाचें बनूं शकतें. विशेष स्वार्थवृत्तीनें मनांत जी राक्षसी वृत्ति निर्माण होऊं शकते. परंतु दिव्य भाव मनांत कोणत्या रीतीनें येऊं शकतो ? ह्याचा विचार प्रत्येक मनुष्यानें केला पाहिजे; कारण मनुष्य देव वा राक्षस होणें हें त्याच्या मनाच्या अवस्थेवर अवलंबून आहे. या मनाला देव बनविण्यासाठीं कोणत्या उपायांची योजना करावी, त्याचा विचार—

कवीयमानः क इह प्रवोचत् । (मं १८)

" कोणता श्रेष्ठ विद्वान् येथें येऊन आम्हांला सांगेल ? " अशी चिंता प्रत्येकानें केली पाहिजे, आणि जो विद्वान अशा प्रकारचा उपदेश देण्यास समर्थ असेल, त्याच्या जवळ जाऊन त्यापासून ही विद्या ग्रहण केली पाहिजे व त्याचें अनुष्ठान करून आपलें मन सुसंस्कारांनीं व दैवी गुणांनीं युक्त बनविलें पाहिजे. ज्याचें मन दिव्य गुणांनीं युक्त असतें आणि ज्याच्या मनांतून राक्षसी भाव खरोखर नष्ट होऊन जातात, तोच आपल्या पित्याला स्वतःमध्यें प्रविष्ट असलेला पाहूं शकतो व परमसुखाचा भागीदार बनवूं शकतो. याप्रमाणें येथें गुरूचा तपास करण्याची सूचना केली आहे. इतक्या विवेचनानंतर वाचकांच्या हें लक्षांत आलेंच असेल कीं, एक विभु, परमात्मा, दुसरा परिच्छिन्न जीवात्मा आणि तिसरा हा संसार, असे तीन पदार्थ या ठिकाणीं सांगितले आहेत. त्यांत जीवात्मा आणि परमात्मा, आत्मा असल्यानें एक असल्याप्रमाणें आहेत. परंतु तिसरा संसारवृक्ष जीवात्म्याला भोग–विलास देण्याच्या कार्यांत उपयुक्त आहे. या तिन्हींचें वर्णन या सूक्ताच्या प्रारंभिक मंत्रांत एका नवीन पद्धतीनें देण्यांत आलें आहे. पहा–

अस्य वामस्य पलितस्य होतुस्तस्य भ्राता मध्यमो अस्त्यश्नः । (मं. १)

" एक दाता सुंदर पुराणपुरुष आहे आणि त्याचा मधला भाऊ भोक्ता आहे. " या ठिकाणीं दोन पदार्थांचें वर्णन आहे. पहिला (पलित) अतिवृद्ध पुराणपुरुष आहे. त्याला उद्देशून ' वृद्ध, स्थविर, पलित, पुराण ' वगैरे नांवें ठिकठिकाणीं वापरलेलीं आहेत. तरीपण हा **' युवा '** (अ. १०।८।१४४) ही आहे. आदिकालापासून दूर असलेल्या ह्या पुरुषाला कोणी वृद्ध ही संज्ञा देतात. परमात्मा हा पुराणपुरुष असतांनाही तरुण आहे. यामुळेंच त्याला येथें **' वाम '** अर्थात् सुंदर– रमणीय म्हटलें आहे. तो **' होता '** अर्थात् सर्वांना दान करून सर्वांवर अनुग्रह करणारा आहे. सर्व जगावर त्याचा महान् अनुग्रह आहे. त्याच्या कृपेनेंच हा सर्व संसार चालला आहे. हा सर्वांहून वृद्ध अर्थात् मोठा भाऊ आहे. त्या दोघांत एक मधला भाऊ **(मध्यमः भ्राता)** आहे. तो **(अश्नः)** पुष्कळ खाणारा आहे, व भोग भोगणारा आहे. तो भोगांशिवाय राहूं शकत नाहीं. मोठा भाऊ भोग भोगीत नाहीं. तो विरक्त आहे. विरक्तीमुळें बलवान् आहे आणि हा मधला भोग भोगण्यामुळें रोगग्रस्त होऊन निर्बल होतो. याप्रमाणें येथें या दोन भावांचें वर्णन केलेलें आहे. या **' द्वौ सुपर्णौ '** द्वारा वर्णित जीव आणि शिवच आहेत. त्यांचा एक तिसरा भाऊ आहे. त्याचें वर्णन याप्रमाणें आहे–

तृतीयो भ्राता घृतपृष्ठो अस्य । (मं. १)

' त्याचा एक तिसरा भाऊ आहे. तो पाठीवर घृत घेवून रहातो.' या तिन्ही भावांमध्यें मोठा भाऊ कांहीं खात नाहीं. अति वृद्ध असल्यानें कदाचित् त्याची क्षुधा मंद झाली असण्याचाही संभव आहे. मधला भाऊ तरुण असल्यानें खूप खात राहतो आणि हा जो तिसरा भाऊ आहे, तो स्वतःच्या पाठीवर घृतासारखे पौष्टिक पदार्थ अथवा रस धारण करून, आपल्या मधल्या भावाला चारीत राहिला आहे. अन्नरस तयार करण्याचें कार्य या तिसऱ्या भावाच्या आधीन आहे. ज्ञान, सुख आणि शांति प्रदान करण्याचें वृद्ध भावाच्या हातांत आहे. आणि मधला भाऊ या दोघा भावांची मदत घेऊन स्वतःची उन्नति करून घेत राहिला आहे. याप्रमाणें या ठिकाणीं तीन भावांचे वर्णन आहे. तें १८ व्या मंत्रांत आलेल्या वर्णनाशीं जुळणारें आहे.

या वर्णनात तीन तेजांची कल्पना करून यज्ञाची रचना केलेली आहे. सूर्य द्युस्थानांत, विद्युत् अंतरिक्षांत, आणि अग्नि भूस्थानांत, अशीं हीं तीन तेजें आहेत. सूर्य सर्वांत मोठा भाऊ आहे,(**वाम**) सुंदरही आहे आणि (**पलित**) श्वेतकिरणांनीं युक्त आहे. त्याचा मधला भाऊ विद्युत् तेज आहे. तो खूप खाणारा आहे. वीज ज्या ठिकाणीं पडते त्या ठिकाणचे सर्व पदार्थ ती भस्मीभूत करते. या दोघांचा सर्वांत लहान भाऊ या पृथ्वीवर अग्निरूपानें आहे. तो आपल्या पाठीवर आहुतीरूपानें टाकलेले, घृतादिक पदार्थ व इतर हवनसामुग्रीचा भार वाहीत उभा राहतो व देवतादिकांना त्यांचा त्यांचा भाग देऊन त्यांचें पोषण करतो. त्याच्याकडून भाग घेवून दुसऱ्या देवता पुष्ट होतात. अग्नि या ठिकाणीं भूस्थानाचा प्रतिनिधि आहे. सर्व यज्ञांची उत्पत्ति हें विज्ञान दर्शविण्यासाठीं झालेली आहे. सूर्य प्रकाश देणारा, अग्नि पोषक घृतादि पदार्थ देणारा आणि या दोघांपासून शक्ति प्राप्त करून पुष्ट होणारा मधला तिसरा भाऊ आहे. हें वर्णनही पूर्वोक्त जीवात्मा, परमात्मा आणि पोषक संसाराचेंही सूचक आहे. विद्युत् तेजानें मन आणि जीवात्म्याचें वर्णन केलें जात आहे. क्षणमात्र चमकण्याचा विजेचा चंचलधर्म आणि मनाचा चंचलपणा समान आहे. ज्याप्रमाणें वीज एकाक्षणांत चमकून दुसऱ्या क्षणाला राहत नाहीं, त्याप्रमाणें जीवही जन्मापासून मृत्यु-पर्यंतच चमकतो. तत्पूर्वी आणि त्यानंतर लपूनच असतो. अस्तु. याप्रमाणें या मंत्रांत सूर्यादि तीन तेजांच्या वर्णनाच्या निमित्तानें जीवात्मा, परमात्मा आणि संसाराचें वर्णन केलेलें आहे. याच मंत्रांत पुढें सांगितलें आहे कीं—

अत्रापश्यं विश्पतिं सप्तपुत्रम् । (मं. १)

" याठिकाणीं सात पुत्र ज्याला आहेत अशा प्रजापतीचें मीं दर्शन केलें. " पूर्वोक्त वर्णनात विश्पति अर्थात् प्रजापतीचें वर्णन आहे ही गोष्ट या मंत्रानें स्पष्ट आहे. याठिकाणीं विश्पति-प्रजापति हें नांव सर्व जगाच्या पालनकार्याचें सूचक आहे. त्याला सात पुत्र आहेत. त्याचे सात पुत्र हेच सात लोक आहेत. कारण कीं त्यानेंच त्यांची उत्पत्ति केलेली आहे. तो या सात लोकांचा पिता आहे आणि हे त्याचे पुत्र आहेत. जो ' **वाम पलित** ' वगैरे नांवांनीं प्रथम मंत्रांत वर्णन केलेला आहे, तोच जगत्पालक सर्वांचा पिता आणि मोठा भाऊ परमेश्वर आहे. त्याचा भाऊ अथवा पुत्र सर्व जीव आहेत आणि या जीवांना भोग देणारा हा सर्व संसार आहे. ही गोष्ट या प्रथम मंत्राच्या मननानें स्पष्ट झालेली आहे. पुढें सांगितलें आहे कीं—

सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रम् । एको अश्वो वहति सप्त नामा । (मं. २)

" एक रथाला सात घोडे जोडलेले आहेत. " अर्थात् या शरीररूपी रथाला सात घोडे जोडलेले आहेत. परंतु सात घोडे असतांनाही वस्तुतः सात नावांचा एकच घोडा या रथाला चालवितो. अर्थात् या रथाला चालविणारी गति एकच आहे, परंतु ती सात प्रकारच्या रूपांत दिसते. ज्याप्रमाणें डोळे, कान, नाक, रसना, त्वचा, मन हीं सात ज्ञानेंद्रियें आहेत. हे ज्ञानेंद्रियरूपी सात घोडे या शरीररूपी रथाला जोडलेले आहेत, परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां असें स्पष्ट प्रतीत होतें कीं, आत्म्याची एकच चित्शक्ति या सातही इंद्रियांत विभक्त झालेली आहे. त्यामुळें येथें सात घोडेही सांगितले आहेत आणि सात नांवांचा एक घोडाही सांगितला आहे. एक कथन स्थूल आहे तर दुसरें सूक्ष्म आहे.

याप्रमाणेंच दोन हात, दोन पाय, मुख, गुदा आणि शिश्न हीं कर्मेंद्रियें जरी सात आहेत तरीही वास्तविक एक आत्म्याच्या कर्मशक्तीचेच हे सात विभाग झालेले आहेत. त्यामुळें स्थूल दृष्टीनें पहातां हे सात घोडे या शरीररूपी रथाला जोडलेले आहेत असें दिसतें. परंतु आत्मदृष्टीनें पाहिलें असतां आपल्याला हें स्पष्ट दिसून येतें कीं एकाच आत्म्याची कर्मशक्ति या ठिकाणीं सात प्रकारें विभक्त होऊन कार्य करीत राहिलेली आहे.

कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें, प्राण, मन, चित्त, अहंकार आणि बुद्धि हेही सात घोडे या शरीररूपी रथाला जोडलेले आहेत. परंतु

आत्मदर्शानें विचार केला असतां, एकच इंद्रशक्ति या सर्व इंद्रियांत काम करीत आहे असें स्पष्ट कळून येईल.

याबद्दल दुसराही एक विचार लक्षांत घेण्यासारखा आहे. एकच प्राण शरीराच्या अकरा स्थळीं राहिल्यानें प्राण, आत्मा इत्यादि नांवें प्राप्त करतो. ही गोष्ट शारीरिक विषयासंबंधीं झाली. परंतु ज्याप्रमाणें हें शरीर एक लहानसें ब्रह्मांड आहे, त्याप्रमाणें हें जगही एक मोठें शरीरच आहे. त्यामुळें हा नियम दोन्ही ठिकाणीं सारखाच लागू पडेल. त्यामुळें ' एका रथाला सात घोडे जोडलेले आहेत, परंतु सात नांवांनीं वस्तुतः एकच घोडा या रथाला खेंचतो, ' ही गोष्ट जगांतही पाहिली पाहिजे.

हें जग पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, तन्मात्रा आणि महत्तत्व या सात तत्वांच्या द्वारें चाललेलें आहे ही गोष्ट सत्य आहे. परंतु एकच महत्तत्व सात प्रकारें विभक्त होऊन जगाचा व्यापार करीत आहे, हेंही तेवढेंच सत्य आहे. सूर्याच्या किरणांत सात रंगांचे सात किरण आहेत ही गोष्ट जेवढी सत्य आहे, तेवढीच सूर्याचा एकच किरण सात प्रकाश किरणांत विभक्त झालेला आहे, ही पण गोष्ट सत्य आहे. याच कारणानें सूर्याला सप्ताश्व, सप्तरश्मि इत्यादि नांवें देण्यांत आलीं आहेत.

एक संवत्सराचे सात ऋतु आहेत. वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत, शिशिर व अधिक मासाचा ऋतुकाळ. परंतु या सातही ऋतूंच्या रूपानें एकच काळ परिणत झाला आहे, हें स्पष्ट आहे.

बाल्य, कौमार्य, तारुण्य, यौवन, परिहाण, वार्धक्य आणि जरा हे आयुष्याचे जसे सात भाग आहेत, आणि या सातही भागांत व्यतीत होणारा जीवनकाल एकच आहे, त्याचप्रमाणें या जगाच्या आयुष्याचेही सात विभाग आहेत आणि त्या सात भागांत तें आयुष्य विभक्त आहे. याच दृष्टिबिंदूनें सर्वत्र पहाणें योग्य आहे. तात्पर्य, स्थूल दृष्टीनें विभक्तावस्था जाणण्यांत येते व सूक्ष्म दृष्टीनें एकावस्था अथवा साम्यावस्था प्रतीत होते. उदाहरणार्थ माती एकच आहे, परंतु तिचे आकार अनंत आहेत, सोनें एकच असतांना त्याचे अनंत अलंकार बनतात. याठिकाणीं माती अथवा सोन्याच्या दृष्टीनें सर्व पात्रें वा अलंकार एकच आहेत, परंतु व्यवहारांतील आकारभेदानें त्यांत भेद प्रतीत होतो. याप्रमाणेंच ' एका रथाला खेंचणारे सात घोडे आहेत तथापि त्या सातही घोड्यांचें नांव धारण करणारी, रथाला खेंचणारी शक्ति एकच आहे. ' या मंत्राच्या कथनांत एकच शक्ति सात स्थळीं विभक्त होऊन या जगाचें कार्य करीत राहिली आहे, एवढाच विषय मुख्य आहे; मग वाचकांनीं हा विषय स्वतःच्या शरीरांत पहावा वा जगांत पहावा.

ज्या रथाला हे सात घोडे जोडलेले आहेत त्या रथाला एकच चक्र आहे, आणि हें चक्र—

त्रिनाभि चक्रमजरमनर्वम् । (मं. २)

" तीन मध्यकेंद्रांचें एक चक्र जरारहित आणि अप्रतिबंधानें फिरणारें आहे. " प्रथम आपण जगांत याचा विचार करूं. काळचक्र एकच आहे. त्याचीं भूत, भविष्य आणि वर्तमान अशीं तीन केंद्रें आहेत. हें चक्र कधींही क्षीण होत नाहीं आणि त्याला कोणी प्रतिबंधही करूं शकत नाहीं. संवत्सर चक्र एक आहे आणि त्याला शीत, उष्ण आणि वृष्टिरूपी तीन केंद्रें आहेत. त्यांतच तें फिरत राहिलेलें आहे. जगत्चक्र एक आहे आणि त्याचीं उत्पत्ति, स्थिति, आणि लय अशीं तीन केंद्रें आहेत. त्यांत तें फिरत राहिलेलें आहे. याप्रमाणें सृष्टीमध्यें या एका चक्राची योजना वाचकांनीं पहावी व त्याचा अनुभव घ्यावा.

हें चक्र माणसाच्या शरीरांतही आहे. शरीर हें एक चक्र आहे आणि तें कफ, वात, पित्त या तीन केंद्रांवर चाललेलें आहे.

हें प्रकृति चक्रही सत्व, रज आणि तम या तीन केंद्रांवर फिरत राहिलेलें आहे. याचप्रमाणें दुसरीं अनेक केंद्रें येथें आहेत—

यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः । (मं. २)

" त्याच्या आंत सर्व भुवनें राहिलेलीं आहेत. " हें जें पूर्वस्थानीं सांगितलें आहे त्या जगत् चक्रामध्यें सर्व भुवनें आहेत हें स्पष्ट आहे. शरीराच्या बाबतींत शरीरांतील सर्व अंगें आणि अवयव हीं भुवनें म्हटलीं, तर मंत्रांत सांगितलेल्या तत्वांचा शरीरांत अनुभव होऊं शकेल. शरीरांत कफ, पित्त, वात नामक तीन केंद्रांत भ्रमण करणाऱ्या चक्रांत, हीं सर्व अंगें आणि अवयव कार्यें करीत आहेत. याचप्रमाणें दुसऱ्या चक्रांच्या बाबतींत जाणणें योग्य आहे.

पुढच्या तृतीय मंत्रांत (**इमं रथं ये सप्त अधितस्थुः**) या रथाच्या आश्रयावर जीं सात तत्वें अधिष्ठित आहेत असें सांगून या सप्तचक्र रथ, सप्त अश्व, सात (**स्वसारः**) बहिणी आणि (**गवां सप्त**) सात गाई आहेत असें सांगितलें आहे . हा रथ सात चक्रांचा आहे, त्याच्या सात गति आहेत. या सात गति म्हणजेच त्या चक्राचे घोडे आहेत. गौ हें नांव वाणीसाठीं वापरेलेलें आहे. या शरीरांत या वाणीचे सात भेद आहेत.

इंद्रियें सात, विभक्ती सात, काळाचे विभागही सात आहेत. अयन, ऋतु, मास, पक्ष, दिन, रात्र आणि मुहूर्त हे सात कालविभाग आहेत. सात बहिणी म्हणजे या शरीरांत सात मज्जाकेंद्रांतून वाहणारे प्रवाह आहेत. सात इंद्रियांत चालणारा एक प्रवाह आहे. बाह्य जगांत सप्तलोक, सप्तावस्था, सप्तकिरणें, सात नद्या वगैरे कल्पना करणें योग्य आहे.

हा कूटमंत्र आहे आणि त्याचा अर्थ या प्रकारच्या मननानेंच जाणणें शक्य आहे. यापुढील ४ था मंत्र पहा—

अनस्था अस्थन्वन्तं बिभर्ति । (मं. ४)

" (**अन्- अस्था**) ज्यांत हाडें नाहींत असा आत्मा (**अस्थन्- वन्तं**) हाडें असणाऱ्या शरीराला धारण करतो. " हें महत्वपूर्ण कथन या मंत्रांत आहे. आत्म्यासाठीं ' अनस्था ' शब्द आहे आणि शरीरासाठीं (**अस्थन्वान्**) शब्द आहे. याच प्रकारचा भाव खालीं लिहिलेल्या यजुर्वेदाच्या मंत्रांत आहे--

अकायमव्रणमस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ।
(वा. यजु. ४०।८)

" तो आत्मा शरीररहित, व्रणरहित, स्नायु- मांसरहित आहे, म्हणून शुद्ध आणि पापरहित आहे. " हें (**अन- अस्था**) (**अस्थि -रहित**) शब्दार्थेच अधिक विवरण आहे. अधिक अर्थाचा विस्तार आहे. तो आत्मा अस्थिरहित, मांसरहित, शरीररहित, व्रणरहित, रक्तरहित, धमनीरहित, चर्मरहित आहे. याप्रमाणें आणखीही वर्णन करणें शक्य आहे. शरीर, हाडें, रक्त, मांस, व्रण, धमनी इत्यादींनीं युक्त आहे. या शरीराला वर सांगितल्याप्रमाणें आत्मा धारण करतो. जड शरीराचें धारण चेतन आत्मा करतो. त्याला कोण पहातें ?

कः जायमानं प्रथमं ददर्श । (मं. ४)

" या प्रगट होणाऱ्या आत्म्याचें प्रथम दर्शन कोणी केलें ? " त्याच्या अस्तित्वाच्या विषयांत सर्वांत प्रथम अनुभव कोणी घेतला ? कोणी त्याला निश्चितपणें जाणलें आहे ? त्याच्या आश्चर्यकारक शक्तींचा पहिला अनुभव कोणाला आला ? अर्थात् कोण त्याला पूर्णपणें जाणतो ? आणि—

भूम्याः असृक् असुः आत्मा क्वित् । (मं. ४)

" या भूमीमध्यें अर्थात् स्थूल शरीरामध्यें रक्त, मांस, प्राण आणि आत्मा कोठें निवास करतात ? " हें स्थूल शरीर पृथ्वीतत्वाचें बनलेलें आहे. याहून निराळें जलतत्व आहे, वायुतत्वही निराळेंच आहे, तथापि या शरीरांत हीं पंचतत्वें एकाच स्थानांत विराजमान झालेलीं आहेत, आणि एकाच उद्देशानें कार्य करीत आहेत. या विभिन्न तत्वांना एकाच उद्देशानें चालविणारा कोण आहे ? येथें पृथ्वीतत्वानें हाडें वगैरे कठीण पदार्थ, जलतत्वानें रक्त, रेत आदि प्रवाही पदार्थ, अग्नितत्वानें पाचनशक्ति, उष्णता वगैरे असणें, वायुतत्वानें प्राणादिकांची स्थिति आणि परमात्म्यानें आत्म्याचें प्रगटीकरण या शरीरांत झालेलें आहे. परंतु हे येथें कोठें कसे रहातात ? त्यांचा संचालक कोण आहे ? या विषयांत अथर्ववेदांत एक मंत्र आहे. पहा--

को अस्मिन्नापो व्यदधाद्विषूवृतः पुरूवृतः सिन्धुसृत्याय जाताः । तीव्रा अरुणा लोहिनीस्ताम्रधूम्रा ऊर्ध्वा अवाचीः पुरुषे तिरश्चीः ॥
(अथर्व० १०।२।११)

" कोणत्या देवतेनें या शरीरांत शीघ्रगतिवान्, रक्तवर्णाचे आणि तांब्याच्या धुराच्या वर्णाचे वर, खालीं आणि तिरके वाहणारे जलप्रवाह सुरू केले आहेत ? " हें वर्णन रुधिराभिसरणाचें आहे. या केन सूक्तांत (१०।२) शरीराच्या निरनिराळ्या विषयांचीही पृच्छा केली आहे. याप्रमाणें या सर्व शरीराचें धारण कोणत्या देवतेच्या द्वारें झालें आहे ? हा तत्वज्ञानाच्या विषयांत एक महत्वाचा प्रश्न आहे.

कः विद्वांसं प्रष्टुं उपगात् । (मं. ४)

" कोणता शिष्य यासंबंधीं विचारण्यासाठीं विद्वानाजवळ जातो ? " आणि कोण त्याच्या विषयांत ज्ञान प्राप्त करण्याची इच्छा करतो ? त्याचप्रमाणें कोण त्याच्या विषयांत निश्चित ज्ञान देतो ?

यः वेद इह ब्रवीतु । (मं. ५)

" जो या आत्म्याविषयीं योग्य रीतीनें जाणत असेल त्यानें येथें यावें व आम्हां सर्व शिष्यांना उपदेश करावा. " आणि हा आत्मा या शरीराचें धारण कशा प्रकारें करतो, हें त्यानें आम्हांला दाखवावें. हा आत्मा अस्थिरहित असतांनाही अस्थिवाल्या शरीराला चालवितो; मूक शरीराकडून हाच वार्तालाप करवितो, आणि पांगळ्या शरीराला हाच चालवितो. पायानें चालण्याचें कार्य होतें, परंतु हे पाय शरीराला आहेत, आत्म्याला नाहींत, तरीही आत्म्याच्या प्रेरणेशिवाय हे पाय चालत नाहींत. याप्रमाणें शब्दोच्चार करणारें तोंड शरीराला आहे, परंतु आत्म्याच्या प्रेरणेशिवाय केवळ शरीराकडून शब्दोच्चार होऊं शकत नाहीं. म्हणून—

अस्य वामस्य वेः निहितं पदं वेद । (मं. ५)

" या परमप्रिय गतिमान आत्म्याचें शरीरांत जें ठेवलेलें पद आहे तें जाणलें पाहिजे. " हें पद गुप्त आहे, एवढ्यासाठींच त्याचा शोध केला पाहिजे व तें जाणून प्राप्त करून घेतलें पाहिजे.

सर्व योगी, मुनी, ऋषी, संत, महंत त्याचा शोध करतात, त्याला प्राप्त करतात व आनंदाचा अनुभव घेतात.

गावः अस्य शीर्ष्णः क्षीरं दुह्रते । (मं. ५)

" इंद्रियरूपी गाई त्याच्या डोक्यापासून दूध प्राप्त करून घेतात. ' डोळे, नाक, कान, जिह्वा, त्वचा इत्यादि इंद्रियरूपी गाई, रूप, रस, गंध, स्पर्श रूपी रस-दूध काढतात आणि त्या या विषयरूप दुधाला प्राप्त करून सुखाचे भागीदार होतात. त्याच्या विषयांत जिज्ञासू पुरुषाच्या मनांत कित्येक वेळां अनेक प्रश्न उपस्थित होतात आणि तो विचारतोही—

पाकः मनसा अविजानन् पृच्छामि ।
देवानां एना निहिता पदानि ॥ (मं. ६)

" (**पाकः**) मनांत निश्चय करून तयार झालेला मुमुक्षु (**मनसा अविजानन्**) मनानें कांहींहि आत्मज्ञान जाणत नाहीं, त्यामुळें विचारतो कीं, या देहाच्या आंत (**देवानां पदानि**) अनेक देवांचीं स्थानें कोठें कोठें आहेत ! " मनुष्यें निश्चय करून परिपक्व अर्थात् पूर्ण होण्यासाठींच येथें आहेत. त्यांतून ज्यांना स्वतःच्या अज्ञानाचा बोध होतो, ते मुमुक्षु होतात आणि सद्गुरूजवळ जाऊन त्यांना प्रश्न करतात, ' हे गुरुवर्य ! अनेक देवांचीं पदें या शरीरांत कोठें आहेत ? कोणत्या देवतेचे स्थान येथें कोणत्या प्रकारें ठेविलें आहे ? ' या शरीरांत सूर्यानें स्वतःचें स्थान डोळ्यांत ठेवलें आहे, वायूनें आपलें स्थान फुफ्फुसामध्यें ठेवलेलें आहे, जलदेवानें आपलें स्थान जिह्वा आणि रक्त याठिकाणीं ठेवलेलें आहे. याप्रमाणें अन्य देवांनीं निरनिराळ्या ठिकाणीं स्वतःचीं स्थानें ठेवलेलीं आहेत. अशाप्रकारें या शरीरांत अनेक देवतांनीं आपलें पद म्हणजे स्थान-निवासस्थान ठेवलें आहे. याचा अनुभव घ्यावा व हें शरीर देवमंदिर कसें आहे याचें त्यांना ज्ञान होईल. हीच गोष्ट दुसऱ्या एका ठिकाणीं खालील प्रकारें सांगितली आहे—

दश साकमजायन्त देवा देवेभ्यः पुरा ।
यो वै तान्विद्यात्प्रत्यक्षं स वा अद्य महद्वदेत् ॥ ३ ॥
प्राणापानौ चक्षुः श्रोत्रमक्षितिश्च क्षितिश्च या ।
व्यानोदानौ वाङ्मनस्ते वा आकूतिमावहन् ॥ ४ ॥
ये त आसन् दश जाता देवा देवेभ्यः पुरा ।
पुत्रेभ्यो लोकं दत्त्वा कस्मिंस्ते लोक आसते ॥ १० ॥
संसिचो नाम ते देवा ये संभारान्त्समभरन् ।
सर्वं संसिच्य मर्त्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ १३ ॥
गृहं कृत्वा मर्त्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ १८ ॥
रेतः कृत्वाज्यं देवाः पुरुषमाविशन् ॥ २९ ॥
तस्माद्वै विद्वान् पुरुषमिदं ब्रह्मेति मन्यते ।
सर्वा ह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते ॥ ३२ ॥

अथर्व. ११।८

" दहा देवांपासून दहा देवपुत्र उत्पन्न झाले. जो त्यांना प्रत्यक्ष पहातो, तो महान् तत्त्वज्ञान सांगू शकतो. प्राण, अपान, डोळे, कान, अमरत्व आणि नाश, व्यान, उदान, वाणी आणि मन हे दहा तुझ्या संकल्पांना चालवितात. दहा देवांपासून जे दहा देवपुत्र उत्पन्न झाले, ते स्वतःच्या पुत्रांना स्थान देऊन कोणत्या लोकांत गेले ? सिंचन करणारे जे देव आहेत, जे सर्व सामुग्री एकत्र करतात, सर्व मर्त्य देहाला सिंचन करून ते देव मनुष्य देहांत शिरलेले आहेत. देहरूपी मर्त्याला घर बनवून त्यांत देव राहिले आहेत. रेतरूपी घृत करून देव या पुरुषांत आले आहेत. जो ज्ञानी आहे तो या पुरुषाला ब्रह्म मानतो. कारण गोशाळेंत ज्याप्रमाणें गाई रहातात, त्याप्रमाणें सर्व देव त्यांत वास्तव्य करून राहिलेले आहेत."

याप्रमाणें या शरीररूपी देवशालेचें वर्णन आहे. येथें डोळ्यांत सूर्य, फुफ्फुसांत प्राण अथवा वायु, याप्रमाणें निरनिराळे देव निरनिराळ्या स्थानांत विराजमान आहेत. महान् सूर्य, महान् वायु इत्यादि देव बाह्य विश्वांत आहेत, आणि त्यांचे लहान पुत्र नेत्रादि स्थानांत निवास करतात. हेंच त्यांचें पद या शरीरांत आहे असें जाणावें. अर्थात् सूर्यानें स्वतःचें स्थान नेत्रांत ठेवलेलें आहे, वायूनें आपलें स्थान फुफ्फुसांत ठेवलेलें आहे, जलानें जिह्वेंत ठेवलेलें आहे. याचप्रमाणें दुसऱ्या देवांनींही स्वतःचें पद शरीरांत निरनिराळ्या स्थानांत ठेवलेलें आहे. यांचेंच वर्णन (**देवांना निहिता पदानि**) या शब्दांनीं येथें केलेलें आहे. त्याचप्रमाणें—

कवयः ओतवै उ सप्त तन्तून् वितत्निरे । (मं. ६)

" कवी जीवनरूपी वस्त्र विणण्यासाठीं सात तंतूंना पसरवतात." ज्याप्रमाणें कोष्टी ताणा पसरतो आणि त्यांतील आडवे धागे, विणून उत्तम वस्त्र तयार करतो, त्याचप्रमाणें डोळ्यांनीं रूपाचे, कानांनीं शब्दाचे, नाकानें गंधाचे, जिभेनें स्वादाचे, त्वचेनें स्पर्शाचे, मनानें ज्ञानाचे आणि बुद्धीनें विज्ञानाचे धागे पसरवून कर्मयोग आणि ज्ञानयोग यांच्या आडव्या सुतांनीं युक्त असें हें सुंदर जीवनरूपी वस्त्र तयार केलें आहे हेंच पुरुषार्थी जीवनाचें वर्णन आहे. हे सात तन्तु आहेत. प्रायः प्रत्येक मनुष्याच्या जीवनरूपी वस्त्रांत हे सात तंतु आहेत. त्यांत जो पुरुषार्थरूपी ताणा मिसळवीक

तोच उत्तम जीवनवस्त्र तयार करील. याप्रमाणें सात तंतूंचें वर्णन वाचकांनीं पहावें आणि यापूर्वी ज्या सात पदार्थांचें वर्णन आलेलें आहे त्याशीं तें ताडून पहावें.

अचिकित्वान् न विद्वान्, चिकितुषः विद्वनः कवीन् पृच्छामि । (मं. ७)

" मी अज्ञानी आहें, अविद्वान् आहें आणि म्हणून ज्ञानी विद्वान् कवींना विचारतों. हे ज्ञानी लोक माझ्या शंका दूर करोत." अज्ञानी लोकांनीं ज्ञानी लोकांना विचारावें, अविद्वान् विद्वानांजवळ जावोत, साधारण मनुष्यांनीं कवींजवळ राहावे आणि आलेल्या शंकांचें निरसन करून, ज्ञान प्राप्त करून घ्यावें! विद्वानांना विचारण्याजोगे योग्य प्रश्न हे आहेत—

यः इमाः षट् रजांसि तस्तंभ । (मं. ७)

" कोणी एकानें या सहा लोकांना आधार दिला ? " कोणा एकाचा आधार या संपूर्ण जगाला आहे ? कुणाच्या आधारावर हें विश्व आहे आणि तें कसें चालत आहे ? हे प्रश्न विद्वानांना विचारण्यासारखे आहेत. दुसराहि एक प्रश्न विचारण्यासारखा आहे—

अजस्य रूपे किं एकं स्वित् ? (मं. ७)

" अजन्मा आत्म्याच्या रूपांत एकरूप असा कोण आहे ? " अनेक अजन्मा जिवात्मे आहेत. त्यांची संख्या अनंत आहे. या अनंत जीवात्म्यांत जें एक तत्त्व राहिलेलें आहे, तें तत्त्व कोणतें ? एकच परमात्मा सर्वव्यापक आहे. तो एकरस आणि सर्वत्र एकसारखा पसरलेला आहे. जीवांत अनेकत्व आणि अणुत्व आहे. परमात्म्यांत अनेकत्व नाहीं व अणुत्वही नाहीं; परंतु त्याच्यांत एकत्व आणि सर्वव्यापकत्व आहे. तें एकच तत्त्व सर्वत्र पसरलेलें आहे. एकही पदार्थ त्यांवाचून नाहीं. हा परमात्मा स्वतःच्या प्रकृतिबरोबर रहातो. हा एकाद्या गृहस्थाप्रमाणें आहे. प्रकृति त्याची धर्मपत्नी आहे आणि तो त्या प्रकृतीचा धर्मपति आहे. त्यांचें एकमेकांशीं कसें वर्तन असतें पहा—

माता पितरं ऋते आबभाजे । (मं. ८)

" माता सत्यधर्मांत– यज्ञांत– पित्याची सेवा करते आणि मदत करते. " धर्मपत्नीनें स्वतःच्या पतिची सेवा करावी आणि यज्ञकार्यांत त्याला मदत करावी, हा गृहस्थधर्माचा उपदेश येथें देण्यांत आला आहे. सर्वांची माता प्रकृति परमपिता परमात्म्याची सेवा आणि सहाय्यता करते आणि सृष्टीरूप यज्ञ सिद्ध करण्यांत सहाय्यक होते. हा आदर्श गृहस्थाश्रम आहे. प्रत्येक गृहस्थानें गृहस्थाश्रमाचा व्यवहार याप्रमाणें करावा.

धीती अग्रं मनसा सं जग्मे । (मं. ८)

" या गृहस्थाश्रमाला धारण करणारी धर्मपत्नी प्रथमपासूनच मनानें त्याच्याशीं एकरूप झालेली असते. " अर्थात् केवळ बाह्य देखाव्यासाठींच ती पतिबरोबर मिळून मिसळून रहाते, असें नव्हें तर मनापासून आंतरिक भावानें ती पतिबरोबर मिळून मिसळून रहाते. गृहस्थाश्रमी स्त्रीपुरुषांनीं याप्रमाणें मनानें एकरूप होऊन गृहस्थाश्रम चालवावेत आणि कृतकृत्य व्हावें. प्रकृतिमाता स्वतःच्या मनानें परमात्म्याबरोबर मिळून मिसळून राहते आणि त्याला कधींही विरोध करीत नाहीं. विश्वरचनेसंबंधीं परमात्म्याची जशी इच्छा असते, तसें कार्य ही प्रकृति करीत असते. गृहस्थाश्रमी मानवांसाठीं हें फारच अनुकरणीय उदाहरण देण्यांत आलें आहे.

सा बीभत्सुः गर्भरसा निविद्धा । (मं. ८)

" ती माता गर्भाचें धारणपोषण करणारी, गर्भाच्या रसानें रंगलेली गर्भाच्या पोषणांत निमग्न आहे. " दुसरें कांहीं काम तिला सुचत नाहीं. गृहस्थाश्रमांतील प्रत्येक स्त्रीनें याप्रमाणें घरांत रहाणाऱ्या पुत्रादिकांच्या पोषणांत तत्पर रहावें. गर्भधारणा झाली कीं गर्भाच्या पालनांत योग्य रीतीनें सावध रहावें आणि जें कार्य गर्भपोषणांत प्रतिकूल असेल त्या कार्यापासून परावृत्त व्हावें. प्रकृतिमाता स्वतःच्या गर्भाचें धारण पोषण वगैरे कार्यांत तत्पर असते आणि कोणत्याही प्रकारें प्रमाद करीत नाहीं. ती स्वतःचें कार्य तत्परतेनें करीत असते.

नमस्वन्तः उपवाकं ईयुः (मं. ८)

"(**नमस्वन्तः**) नमस्कार करीत अथवा अन्नानें युक्त पुरुष त्याची प्रशंसा करीत करीत त्याच्याजवळ जातात. " वरील प्रकारचे गृहस्थधर्मी ज्या ठिकाणीं असतात त्या ठिकाणीं बाकी सर्व लोक त्यांना नमस्कार करतात आणि त्यांच्या संगतींत रहाण्याची इच्छा करतात. आदर्श गृहस्थाश्रमाचा याप्रकारें जिकडे तिकडे सत्कार होतो. प्रकृति–पुरुषाचा दृष्टांत आदर्श गृहस्थाश्रमाचा सूचक आहे. पुढें पहा—

माता धुरि युक्ता आसीत् (मं. ९)

" माता गृहस्थाच्या कार्यांत धुरेला जोडलेली आहे. " माता मागें पडणारी नाहीं, ती पुढें राहून बरोबरीनें कार्य करणारी आहे. गृहस्थाश्रमांत धर्मपत्नीचें हेंच कार्य आहे. पतीच्या बरोबर प्रत्येक कार्यांत राहून कार्याचा भार हलका करणारी ती असल्यामुळेंच तिला सहधर्मचारिणी–पत्नी म्हणतात, ती गर्भवती असतांनाही सर्व कार्यांत पतिबरोबर राहून कार्यें करते.

गर्भो वृजनीष्वन्तः अतिष्ठत् । (मं. ९)

" गर्भ स्वतःमध्यें असलेल्या अन्तःशक्तींच्या आधारावर रहातो. " गर्भाला उदरांत धारण करणारी गृहिणी धुरा धारण करून सर्व कार्यांचा भार वहाते. याप्रमाणें प्रत्येक गृहिणी स्वतःच्या घरांत

कार्य करो. पतीला अनुकूल पत्नीनें रहावें. मुलांनीं मातापित्यांना अनुकूल रहावें. ज्याप्रमाणें (**गां अनु वत्सः**) गाईला तिचें वासरूं अनुकूल रहातें त्याप्रमाणें सद्वर्तनी गृहिणीला तिचीं बालकें अनुकूल होतात; आणि याप्रमाणें स्वतःच्या पुत्रांत ते आईबाप (**विश्व-रूप्यं अपश्यत्**) सगळें आपलेंच रूप पहातात. मातापित्यांचें सर्व प्रकारचें रूप मुलांमध्यें उतरतें. ज्या प्रकारचें आईबापांचें शरीर, मन आणि बुद्धीचा भाव असतो, तसेच भाव त्यांच्या मुलांमुलींमध्यें बहुधा येतात. त्यासाठींच म्हटलें आहे कीं (**त्रिषु योजनेषु**) शरीर, मन आणि बुद्धि तिन्हींमध्यें सारखें रूप दिसून येतें. पूर्ण गृहस्थाश्रमाचें हें फळ आहे. त्यांत आई, बाप आणि मुलें हीं सर्व एकाच विचाराचीं असतात आणि कोणत्याही प्रकारचा विरोध त्यांच्यांत नसतो.

एकः तिस्रः मातॄः त्रीन् पितॄन्, बिभ्रत् उर्ध्वः तस्थौ । (मं. १०)

" एकटाच तो पुत्र आपल्या तीन माता व तीन पित्यांना आपल्यांत धारण करीत सरळ उभा रहातो. " अर्थात् वांकडा-तिकडा व्यवहार ठेवीत नाहीं. तीन माता या आहेत–' प्रकृतिमाता, विद्यामाता आणि जननीमाता.' तीन पिते हे आहेत ' परमात्मा, गुरु आणि जनकपिता. ' या तिघांनाही तो धारण करतो आणि सरळ व्यवहार करतो आणि त्यामुळें कधींही (**न अवग्लापयन्त**) ग्लानीला प्राप्त करीत नाहीं. याप्रमाणें उपासना आणि आचरणानें त्याला उच्च योग्यता प्राप्त होते व तो स्वर्गाला जातो आणि तेथें—

अमुष्य दिवः पृष्ठे विश्वविदः अविश्वविन्नां वाचं मन्त्रयन्ते । (मं. १०)

" त्या द्युलोकाच्या पृष्ठभागावर राहून हे ज्ञानी लोक सर्वांच्या लक्षांत न येणाऱ्या गोष्टींचें मनन करतात. " तेथें स्वर्गांत राहून अशा तत्वाचा विचार करतात कीं, ज्याचें ज्ञान साधारण मनुष्याच्या ध्यानांतही येणार नाहीं.

परिवर्तमाने पञ्चारे चक्रे विश्वा भुवनानि आतस्थुः । (मं. ११)

" पांच आरांच्या फिरणाऱ्या चक्रांत हीं संपूर्ण भुवनें राहिलेलीं आहेत. " अर्थात् या चक्राच्या आधारानेंच सर्व भुवनें राहिलेलीं आहेत. पांच प्राणांचे जें पांच अऱ्यांचें चक्र (**प्राणचक्र**) आहे, त्याच्या आधारावरच सर्व भुवनांची स्थिति आहे. शरीरांत प्राणचक्राच्या आधारावरच शरीरांतील सर्व अवयव राहिलेले आहेत. प्राण निघून गेला असतां एकही अवयव राहूं शकत नाहीं. सर्व अवयव चेतनाविहीन होतात. याचप्रमाणें हें संपूर्ण विश्वही बृहत्प्राणचक्रावर राहिलेलें आहे. विश्वव्यापक महाप्राण जगांतील सर्व भुवनांना धारण करतो. हें चक्र भ्रमण करीत राहिलें आहे; तरीही त्याचा मध्यदंड (**अक्षः न तप्यते**) तापत नाहीं. अनादिकालापासून हें विश्व फिरत राहिलें असतांनाही, त्याचा कोणताही भाग तापत नाहीं. कोणतेंही चक्र फिरत असतां त्याचा मध्यदंड न तापण्यासाठीं त्यांवर तेल टाकावें लागतें. परंतु या ठिकाणीं तेल कधींही टाकत नसतांना त्याचा मध्यदंड कधींही तापत नाहीं. हें परमात्म्याचें अद्भुत सामर्थ्य पहाण्यासारखें आहे. या विश्वांतील निरनिराळे लोक एकाच गतीनें फिरत राहिलेले आहेत. ते कधीं थांबत नाहींत आणि त्यांच्या गतींत कधीं विघ्नही येत नाहीं. या चक्राच्या मध्यदंडावर (**भूरिभारः**) पुष्कळ वजन येतें. हे अनेक लोक आहेत त्यांचा भार किती असेल ह्याची कल्पनाही करणें अशक्य आहे. इतका भार असतांनाही हें विश्वचक्र विलक्षण शांतीनें व अव्याहत गतीनें चाललें आहे; आणि अनादि काळापासून चाललेलें असतांनाही (**सनात् एव सनाभिः न छिद्यते**) कधींही छिन्नभिन्न होत नाहीं. याप्रमाणें हें जगच्चक्र विलक्षण सामर्थ्यानें युक्त आहे.

यापुढील बाराव्या मंत्रांत ' काळचक्रा ' चें वर्णन आहे. (**द्वादश आकृति**) बारा महिन्यांच्या बारा अवस्था दर्शविणारें हें काळचक्र अथवा संवत्सरचक्र आहे. हें संवत्सरचक्र (**षड्- अरे**) सहा विभागांत विभागलेलें आहे. सहा ऋतु ह्या त्याच्या सहा आरा आहेत. अधिकमासाचा एक स्वतंत्र ऋतु मिळून सात ऋतु होतात. हें दाखविण्यासाठीं (**सप्तचक्रे**) शब्द वापरला आहे. अथवा संवत्सर, अयन, ऋतु, मास, पक्ष, अहोरात्र आणि मुहुर्त ही सात मिळूनही काळचक्र होतें. हा संवत्सर (**पञ्चपाद**) पांच पायांचा आहे. शीतकाळ, उष्णकाळ, वर्षाकाळ हे तीन काळ वर्षाचे आहेत. त्यांत चांद्रमान आणि सौरमान हे दोन्ही गणनात्मक विभाग मिळविले असतां संवत्सराचे पांच पाय होतात. कारण कीं या पायांनींच तो सर्वांचा पिता (**पिता माता**) चालतो आणि सर्वांचें संरक्षण करतो. याप्रमाणें हें काळचक्र वर्षांत एकदां स्वतःचा एक फेरा पूर्ण करतें आणि सर्व जगाचें कल्याण करतें. या चक्रांत–

मिथुनासः पुत्राः अत्र सप्तशतानि विंशतिः च आतस्थुः ॥ (मं. १३)

" मिथुन अर्थात् जुळे पुत्र असे सातशेवीस आहेत. " हे दिवस आणि रात्रीच होत. दिवसाबरोबर रात्र आणि रात्रीबरोबर दिवस जोडलेला आहे. चांद्रवर्ष आणि सौरवर्ष यांचे मध्य अर्थात् ३६० दिवसाचें मध्यम वर्ष आहे. त्याचे दिवस आणि रात्र असे दोन जुळे पुत्र एक दिवसाचे मानले तर ते ७२० होतात.

अर्थात् चांद्रवर्षही नाहीं व सौरवर्षही नाहीं, परंतु दोन्ही वर्षांच्या मध्यम परिमाणाचें हें वर्ष आहे. या बारा महिन्यांचें (**द्वादशारं चक्रं न हि जराय**) बारा आरांचें चक्र कधीं जुनें होत नाहीं आणि प्रथम जसें होतें तसेंच आजही चालत राहिलें आहे. कधींही जीर्ण (**सनेमि अजरं चक्रं**) अथवा क्षीण होत नाहीं. असें हें सामर्थ्यवान् काळचक्र आहे आणि त्यांत (**विश्वा भुवनानि आतस्थुः**) सर्व भुवनें राहिलेलीं आहेत. सर्वांचें आयुष्य या कालचक्रानेंच मोजण्यांत येतें. जे ज्ञानी आहेत (**अक्षण्वान् पश्यत् न अन्धः**), त्याचप्रमाणें ज्यांचे डोळे उत्तम आहेत, तेच या गोष्टी पाहूं शकतात, जाणूं शकतात, परंतु जे आंधळे आहेत ते कसें पाहूं शकतील ?

यः कविः स आचिकेत यः ता विजानात्,
सः पितुः पिता असत् । (मं. १५)

" जो कवि आहे तोच हें सर्व ज्ञान प्राप्त करूं शकतो आणि जो या ज्ञानाला यथावत् जाणतो तो पित्याचाही पिता होतो. " अर्थात् त्याची योग्यता खूप मोठी असते. तो मुक्तच असतो. याठिकाणीं हें आश्चर्य आहे कीं—

स्त्रियः सतीः ताँ उ पुंस आहुः । (मं. १५)

" कित्येक स्त्रिया असतांनाही त्यांना पुरुष म्हणण्यांत येतें." याचप्रमाणें जगाचा व्यवहार चालत राहिला आहे. मनुष्यांतही कित्येकांना पुरुष आणि कित्येकांना स्त्रिया म्हणण्यांत येतें. परंतु आत्म्याच्या दृष्टीनें पाहिलें असतां सर्व सारखेच आहेत. शरीराच्या दृष्टीनेंही दोघे सारखेच आहेत. कोणी स्त्री नाहीं व कोणी पुरुष नाहीं. सर्व प्रकृति आहे. वस्तुतः आत्मा पुरुष आहे आणि त्याशिवाय बाकी सर्व प्रकृति स्त्री आहे. जीवात्मा तर स्त्री शरीरांतही जातो व पुरुष शरीरांतही जातो. हा सत्यसिद्धांत असतां नाही या जगांत केवळ भ्रमानें स्त्रीपुरुषरूपी व्यवहार चालत राहिला आहे.

यानंतरच्या सोळाव्या मंत्रांत पुन्हां एकदां काळचक्राचें वर्णन जरा निराळ्या प्रकारें करण्यांत आलें आहे.

षट् यमाः एकः एकजः देवजाः ऋषयः । (मं. १६)

" देवतांपासून उत्पन्न झालेले ऋषी आहेत. त्यांत सहा जोडलेले आहेत आणि एक एकटाच आहे. " प्रत्येक ऋतु दोन मासांचा असतो आणि तेराव्या मासाचा ऋतु फक्त एक महिन्याचा असतो. हे सर्व ऋतु सूर्यदेवापासून उत्पन्न होतात आणि (**ऋषयः रश्मयः**) त्यांच्यांत सूर्याच्या किरणांमुळें कमीजास्तीपणा येतो. त्यामुळें या ऋतूंना (**सप्तथं**) सात प्रकारचे म्हणण्यांत येतात.

यापुढील सतराव्या मंत्रांत प्रकृतिरूपी गाईचें वर्णन आहे. ही अद्भुत गाय स्वतःच्या सूर्यादि बालकांना घेऊन कुठें रहाते, काय करते आणि स्वतःच्या पायांनीं बालकांचें धारण कशी करते इत्यादि वर्णन आहे. हें जरी संदिग्ध वर्णन आहे तरी पूर्वीं दिलेल्या वर्णनाचा विचार आणि मनन केल्यानें जास्त ज्ञान होऊं शकतें.

या नंतरच्या मंत्रांचें विवरण यापूर्वी झालें आहे. त्यामुळें त्यांचा पुन्हा जास्त विचार करण्याची कांहीं आवश्यकता नाहीं.

याप्रमाणें या सूक्ताची संगति आहे. आत्मा, परमात्मा, काळ आणि विश्वांतील सर्व भूतप्राणी यांचें सुंदर वर्णन येथें आलेलें आहे. वाचकांनीं या मंत्रांचें मनन करावें व त्यांतील आध्यात्मिक आशय समजून घ्यावा. या सूक्ताचा संबंध पुढील सूक्ताशीं असल्यानें आतां त्याचें मनन करूं.

सर्वाधाराचें वर्णन

कांड १०, सूक्त ७

(ऋषिः - अथर्वा । देवताः - स्कम्भः आत्मा वा)

कस्मिन्नङ्गे तपो अस्याधि तिष्ठति कस्मिन्नङ्ग ऋतमस्याध्याहितम् ।
क्व व्रतं क्व श्रद्धास्य तिष्ठति कस्मिन्नङ्गे सत्यमस्य प्रतिष्ठितम् ॥ १ ॥

अर्थ— (अस्य कस्मिन् अंगे तपः अधितिष्ठति) या मनुष्याच्या कोणत्या अंगांत तप करण्याची शक्ति आहे ? (अस्य कस्मिन् अंगे ऋतं अध्याहितं) या मनुष्याच्या कोणत्या भागांत ऋत-सरळतेचा भाव आहे ? (अस्य श्रद्धा व्रतं क्व तिष्ठति) याच्यांत श्रद्धा आणि तप कुठें राहतात ? (अस्य कस्मिन् अंगे सत्यं प्रतिष्ठितम्) याच्या कोणत्या अवयवांत सत्य राहिलेलें आहे ? (१)

कस्मादङ्गाद्दीप्यते अग्निरस्य कस्मादङ्गात्पवते मातरिश्वा ।
कस्मादङ्गाद्वि मिमीतेऽधि चन्द्रमा मह स्कम्भस्य मिमानो अङ्गम् ॥ २ ॥
कस्मिन्नङ्गे तिष्ठति भूमिरस्य कस्मिन्नङ्गे तिष्ठत्यन्तरिक्षम् ।
कस्मिन्नङ्गे तिष्ठत्याहिता द्यौः कस्मिन्नङ्गे तिष्ठत्युत्तरं दिवः ॥ ३ ॥
क्व१ प्रेप्सन्दीप्यत ऊर्ध्वो अग्निः क्व१ प्रेप्सन्पवते मातरिश्वा ।
यत्र प्रेप्सन्तीरभियन्त्यावृतः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ ४ ॥
क्वार्धमासाः क्व यन्ति मासाः संवत्सरेण सह संविदानाः ।
यत्र यन्त्यृतवो यत्रार्तवाः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ ५ ॥
क्व१ प्रेप्सन्ती युवती विरूपे अहोरात्रे द्रवतः संविदाने ।
यत्र प्रेप्सन्तीरभियन्त्यापः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ ६ ॥
यस्मिन्त्स्तब्ध्वा प्रजापतिर्लोकान्त्सर्वाँ अधारयत् ।
स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ ७ ॥

अर्थ— (अस्य कस्मात् अंगात् अग्निः दीप्यते) या परमात्म्याच्या कोणत्या अंगांतून अग्नि प्रदीप्त होतो ? (कस्मात् अंगात् मातरिश्वा पवते) याच्या कोणत्या अवयवांतून वायु वाहतो ? (कस्मात् अंगात् चंद्रमा अधि वि मिमीते) कोणत्या अवयवापासून चंद्रमा प्रकाशित होतो ? (महः स्कंभस्य अंगं मिमानः) आणि महान् स्कंभ अर्थात् विश्वाधाराच्या कोणत्या अंगाचें मापन तो करतो ? (२)

(अस्य कस्मिन् अंगे भूमिः तिष्ठति) या परमात्म्याच्या कोणत्या अंगांत भूमि रहाते ? (कस्मिन् अंगे अंतरिक्षं तिष्ठति) कोणत्या अंगांत अंतरिक्ष आहे ? (कस्मिन् अंगे आहिता द्यौः तिष्ठति) कोणत्या अंगांत हा सुरक्षित द्युलोक आहे ? आणि (कस्मिन् अंगे उत्तरं दिवः तिष्ठति) कोणत्या अंगांत उच्चतर द्युलोकाचा दूरचा भाग राहिलेला आहे ? (३)

(ऊर्ध्वः अग्निः क प्र-ईप्सन् दीप्यते) वरील अग्नि अर्थात् सूर्य कोणत्या बाजूला प्रकाशतो ? (मातरिश्वा क प्र ईप्सन् पवते) वायु कोठें दृष्टि ठेवून वाहतो ? (यत्र प्र-ईप्सन्तीः आवृतः अभियन्ति) जेथें नजर टाकीत हे जलप्रवाह वाहत राहिले आहेत, (तं स्कंभं ब्रूहि) त्या सर्वाधाराच्या विषयासंबंधीं मला सांगा कीं (सः कतमः स्वित् एव) तो कोण आहे ? (४)

(अर्धमासाः मासाः) पक्ष आणि महिने (संवत्सरेण सह संविदानाः) वर्षाबरोबर राहून (क क यन्ति) कोठें कोठें जात आहेत ? (यत्र ऋतवः यत्र आर्तवाः यन्ति) जेथें हे ऋतु आणि ऋतूंत उत्पन्न होणारे पदार्थ जात आहेत, (तं स्कंभं ब्रूहि) त्या सर्वाधाराच्या विषयांत मला सांगा कीं तो कोण आहे ? (५)

(क प्र-ईप्सन्ती विरूपे युवती) कोणत्या बाजूकडे लक्ष्य ठेवून याविरुद्ध स्वरूपाच्या स्त्रिया अर्थात् (अहो रात्रे) दिनप्रभा आणि रात्री (संविदाने द्रवतः) मिळून जोडीनें धांवत आहेत ? (यत्र प्र-ईप्सन्तीः आपः अभियन्ति) जेथें लक्ष ठेवून जल वाहत राहिलें आहे, (तं स्कंभं ब्रूहि) त्या सर्वाधाराच्या विषयांत मला सांगा कीं तो कोण आहे ? (६)

(यस्मिन् स्तब्ध्वा) ज्या आधारावर (प्रजापतिः सर्वान् लोकान् अधारयत्) प्रजापतीनें सर्व लोकांचें धारण केलें (तं स्कंभं ब्रूहि) त्या सर्वाधाराच्या विषयीं मला सांगा कीं तो कोण आहे ? (७)

यत्परममवमं यच्च मध्यमं प्रजापतिः ससृजे विश्वरूपम् ।
कियता स्कम्भः प्र विवेश तत्र यन्न प्राविशत्कियत्तद्बभूव ॥ ८ ॥
कियता स्कम्भः प्र विवेश भूतं कियद्भविष्यदन्वाशयेऽस्य ।
एकं यदङ्गमकृणोत्सहस्रधा कियता स्कम्भः प्र विवेश तत्र ॥ ९ ॥
यत्र लोकांश्च कोशांश्चापो ब्रह्म जना विदुः ।
असच्च यत्र सच्चान्तः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १० ॥
यत्र तपः पराक्रम्य व्रतं धारयत्युत्तरम् ।
ऋतं च यत्र श्रद्धा चापो ब्रह्म समाहिता
स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ ११ ॥
यस्मिन्भूमिरन्तरिक्षं द्यौर्यस्मिन्नध्याहिताः ।
यत्राग्निश्चन्द्रमाः सूर्यो वातस्तिष्ठन्त्यार्पिताः
स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेवः सः ॥ १२ ॥
यस्य त्रयस्त्रिंशद्देवा अङ्गे सर्वे समाहिताः ।
स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १३ ॥

अर्थ— (यत् परमं अवमं यत् च मध्यमं) जें श्रेष्ठ, निकृष्ट आणि जें मध्यम (विश्वरूपं प्रजापतिः ससृजे) विश्वरूप प्रजापतीनें उत्पन्न केलें आहे, (तत्र स्कम्भः कियता प्रविवेश) त्यांत सर्वाधार परमात्म्यानें किती प्रवेश केला आहे ? आणि (यत् न प्राविशत् तत् कियत् बभूव) जेथें त्यानें प्रवेश केलेला नाहीं, तो किती झालेला आहे ? (८)

(स्कम्भः भूतं कियता प्रविवेश) हा सर्वाधार भूतकाळीं विश्वांत किती अंशानें प्रविष्ट झालेला होता ? (अस्य कियत् भविष्यत् अनु-आशये) त्याचा किती अंश भविष्यांत उत्पन्न होणाऱ्या विश्वांत प्रवेश करील ? (यत् एकं अंगं सहस्रधा अकृणोत्) ज्यानें स्वतःच्या एकाच अंगाला हजारो प्रकारांनीं वर्तमानकाळीं प्रगट केलेलें आहे, (तत्र स्कम्भः कियता प्रविवेश) त्यांत सर्वाधार किती प्रमाणांत प्रविष्ट आहे ? (९)

(यत्र लोकान् कोशान्) ज्यांत सर्व लोक आणि कोश राहतात आणि (आपः ब्रह्म) ज्या ठिकाणीं जल आणि ब्रह्म राहतें, असें (जनाः विदुः) मनुष्य जाणतात, (असत् च सत् च यत्र अन्तः) सत्य आणि असत्य ज्या ठिकाणीं मिळालेलें आहेत (तं स्कम्भं ब्रूहि) त्या सर्वाधाराचें वर्णन मला सांगा (सः कतमः स्वित् एव) कीं तो कोण आहे ? (१०)

(यत्र) ज्याच्या आधारानें (पराक्रम्य तपः) खूप प्रयत्न करून तप, (उत्तरं व्रतं धारयति) उच्चतर व्रताला धारण करतें, त्याचप्रमाणें जेथें (यत्र ऋतं च श्रद्धा च आपः ब्रह्म ऋत-सरलता, श्रद्धा, आप आणि ब्रह्म (समाहिताः) समान स्थिर राहिले आहेत, (तं स्कंभं ब्रूहि०) त्या सर्वाधाराच्या विषयांत सांगा कीं तो कोण आहे ? (११)

(यस्मिन्) ज्यांत (भूमिः अंतरिक्षं द्यौः) पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोक (अध्याहिता) स्थिर रीतीनें राहिले आहेत आणि ज्यांत (यत्र अग्निः चंद्रमाः सूर्यः वातः) अग्नि, चंद्रमा, सूर्य आणि वायु (अर्पिताः तिष्ठन्ति) आश्रय घेऊन रहातात, त्या (तं स्कम्भं०) सर्वाधाराच्या विषयांत सांगा कीं तो कोण आहे ? (१२)

(सर्वे त्रयस्त्रिंशत् देवाः) सर्व तेहतीस देव (यस्य अंगे समाहिताः) ज्याच्या शरीरांत स्थिर झालेले आहेत. (तं स्कंभं०) त्या सर्वाधाराच्या विषयांत सांगा कीं तो कोण आहे ? (१३)

यत्र ऋषयः प्रथमजा ऋचः साम यजुर्मही ।
एकर्षिर्यस्मिन्नार्पितः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १४ ॥
यत्रामृतं च मृत्युश्च पुरुषेऽधि समाहिते ।
समुद्रो यस्य नाड्य१ः पुरुषेऽधि समाहिताः
स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १५ ॥
यस्य चतस्रः प्रदिशो नाड्य१स्तिष्ठन्ति प्रथमाः ।
यज्ञो यत्र पराक्रान्तः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १६ ॥
ये पुरुषे ब्रह्म विदुस्ते विदुः परमेष्ठिनम् ।
यो वेद परमेष्ठिनं यश्च वेद प्रजापतिम् ॥
ज्येष्ठं ये ब्राह्मणं विदुस्ते स्कम्भमनुसंविदुः ॥ १७ ॥
यस्य शिरो वैश्वानरश्चक्षुरङ्गिरसोऽभवन् ।
अङ्गानि यस्य यातवः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १८ ॥
यस्य ब्रह्म मुखमाहुर्जिह्वां मधुकशामुत ।
विराजमूधो यस्याहुः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ १९ ॥

अर्थ— (यत्र प्रथमजाः ऋषयः) ज्यांत प्रथम झालेले ऋषी आणि (ऋचः साम यजुः मही) ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद आणि महान् ब्रह्मविद्या अर्थात् अथर्ववेद राहिलेले आहेत, (यस्मिन् एकः ऋषिः अर्पितः) ज्यांत एक मुख्य ऋषि आधार घेऊन राहिले आहेत, (तं स्कम्भं०) त्या सर्वाधाराच्या विषयांत सांगा कीं तो कोण आहे ? (१४)

(यत्र पुरुषे) ज्या पुरुषांत (अमृतं च मृत्युः च समाहिताः) अमरत्व आणि मरण राहिले आहेत (यस्य नाड्यः समुद्रः) ज्याच्या नाड्या समुद्र आहे, जो (पुरुषे अधि समाहिताः) पुरुषाच्या शरीरांत आहे (तं स्कम्भं०) त्या सर्वाधाराच्या विषयांत सांगा कीं तो कोण आहे ? (१५)

(चतस्रः प्रथमाः प्रदिशः) चारही प्रथम दिशा (यत्र नाड्यः तिष्ठन्ति) जेथें नाड्या होऊन राहिलेल्या आहेत, (यत्र यज्ञः पराक्रान्तः) जेथें यज्ञ पराक्रम करीत राहिला आहे, (तं स्कम्भं०) त्या स्कंभाच्या विषयांत सांगा कीं तो कोण आहे ? (१६)

(ये पुरुषे ब्रह्म विदुः) जे या मनुष्य-शरीरांत ब्रह्मसाक्षात्कार करतात, (ते विदुः परमेष्ठिनं) ते परमेष्ठीला ओळखतात, (यः वेद परमेष्ठिनं) जो परमेष्ठीला जाणतो आणि (यः च प्रजापतिं वेद) जो प्रजापतीला सुद्धां जाणतो, आणि (ये ज्येष्ठं ब्राह्मणं विदुः) जे ज्येष्ठ ब्राह्मणास जाणतात (ते स्कम्भं अनुसंविदुः) ते सर्वाधारास उत्तम रीतीनें जाणतात. (१७)

(यस्य शिरः वैश्वानरः) ज्याचें मस्तक वैश्वानर अग्नि आहे, (चक्षुः अङ्गिरसः अभवन्) आणि डोळे अङ्गिरस अग्नि झाला आहे, (यस्य अङ्गानि यातवः) आणि ज्याचे अवयव- यातु आहेत (तं स्कम्भं०) त्या सर्वाधार स्कम्भाविषयीं सांगा, तो कोण आहे ? (१८)

(यस्य मुखं ब्रह्म आहुः) ज्याचें मुख ब्रह्म आहे असें म्हणतात (उत मधुकशां जिह्वां) आणि जीभ मधुकशा झाली आहे, (यस्य ऊधः विराजं) आणि ज्याचे स्तन-दुग्धाशय त्या विराट् स्वरूपाचे आहेत, (तं स्कम्भं०) त्या स्कम्भाविषयीं सांगा, तो कोण आहे ? (१९)

यस्मादृचो अपातक्षन्यजुर्यस्मादपाकषन् ।
सामानि यस्य लोमान्यथर्वाङ्गिरसो मुखं स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ २० ॥
असच्छाखां प्रतिष्ठन्तीं परममिव जना विदुः ।
उतो सन्मन्यन्तेऽवरे ये ते शाखामुपासते ॥ २१ ॥
यत्रादित्याश्च रुद्राश्च वसवश्च समाहिताः ।
भूतं च यत्र भव्यं च सर्वे लोकाः प्रतिष्ठिताः स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ २२ ॥
यस्य त्रयस्त्रिंशद्देवा निधिं रक्षन्ति सर्वदा ।
निधिं तमद्य को वेद यं देवा अभिरक्षथ ॥ २३ ॥
यत्र देवा ब्रह्मविदो ब्रह्म ज्येष्ठमुपासते ।
यो वै तान्विद्यात्प्रत्यक्षं स ब्रह्मा वेदिता स्यात् ॥ २४ ॥
बृहन्तो नाम ते देवा येऽसतः परि जज्ञिरे ।
एकं तदङ्गं स्कम्भस्यासदाहुः परो जनाः ॥ २५ ॥
यत्र स्कम्भः प्रजनयन्पुराणं व्यवर्तयत् ।
एकं तदङ्गं स्कम्भस्य पुराणमनुसंविदुः ॥ २६ ॥

अर्थ—(**यस्मात् ऋचः अपातक्षन्**) ज्याच्यापासून ऋचा झाल्या, (**यस्मात् यजुः अपाकषन्**) ज्याच्यापासून यजुः [illegible] ा, (**यस्य लोमानि सामानि**) ज्याचे लोम साम आहे, ज्याचें (**मुखं अथर्वा अङ्गिरसः**) मुख अंङ्गिरस अथ [illegible] (**तं स्कम्भं०**) त्या सर्वाधाराविषयीं सांगा कीं तो कोण आहे ? (२०)

([illegible] सत् शाखां प्रतिष्ठन्तीं) असत् मधून उत्पन्न झालेली आणि स्थिर राहणारी एक शाखा आहे जिला (**जनाः परमं इव** [illegible]**दुः**) मनुष्य परमश्रेष्ठ तत्त्व असें मानतात, (**उत ये अवरे सत् मन्यन्ते**) आणि इतर लोकहि तिला सत् समजतात ([illegible] **शाखां उपासते**) ते त्या शाखेची उपासना करितात. (२१)

(**यत्र**) जेथें आदित्य रुद्र आणि वसु (**समाहिताः**) रहातात, (**भूतं भव्यं च**) भूत, भविष्य आणि वर्तमान त्याचप्रमाणें (**यत्र सर्वे लोकाः प्रतिष्ठिताः**) जेथें हे सर्व लोक आधारानें राहिले आहेत, (**तं स्कम्भं०**) त्या सर्वाधाराविषयीं सांगा, तो कोण आहे ? (२२)

(**त्रयः त्रिंशत् देवाः**) तेहतीस देव (**यस्य निधिं सर्वदा रक्षन्ति**) ज्याच्या निधीचे नेहमीं रक्षण करतात. हे देवहो ! (**यं अभिरक्षथ**) ज्याचें तुम्हीं रक्षण करतां (**तं निधिं अद्य कः वेद**) त्या निधीला आज कोण जाणतो ? (२३)

(**यत्र ब्रह्मविदः देवाः**) जेथें ब्रह्मास जाणणारे विद्वान् ज्ञानी (**ज्येष्ठं ब्रह्म उपासते**) ज्येष्ठ ब्रह्माची उपासना करतात, (**यः वै तान् प्रत्यक्षं विद्यात्**) जे निश्चयपूर्वक त्याला प्रत्यक्ष ओळखतात (**सः वेदिता ब्रह्मा स्यात्**) तो ज्ञाता ब्रह्म होऊन राहील. (२४)

(**ते देवाः बृहन्तः नाम**) ते देव महान् प्रख्यात आहेत, (**ये असतः परि जज्ञिरे**) जे असत् म्हणजे प्रकृतीपासून उत्पन्न झालेले आहेत, (**तत् एकं स्कम्भस्य अङ्गं**) तें स्कम्भाचें एक अंग होय. ज्याला (**जनाः असत् परः आहुः**) ज्ञानी लोक असत् परंतु श्रेष्ठ असें म्हणतात. (२५)

(**यत्र स्कम्भः प्रजनयन्**) जेथें सर्वाधार आत्मा सृष्टि उत्पन्न करतो, (**पुराणं व्यवर्तयत्**) पुराणांची सुद्धां जो पुनः पुनः रचना करतो (**तत् स्कम्भस्य एकं अंगं**) त्या सर्वाधार आत्म्याचें एक अंग (**पुराणं अनुसंविदुः**) पुराण नांवानें जाणिलें जातें. (२६)

यस्य त्रयस्त्रिंशद्देवा अङ्गे गात्रा विभेजिरे ।
तान्वै त्रयस्त्रिंशद्देवानेके ब्रह्मविदो विदुः ॥ २७ ॥
हिरण्यगर्भं परममनत्युद्यं जना विदुः ।
स्कम्भस्तदग्रे प्रासिञ्चद्धिरण्यं लोके अन्तरा ॥ २८ ॥
स्कम्भे लोकाः स्कम्भे तपः स्कम्भेऽध्यृतमाहितम् ।
स्कम्भं त्वा वेद प्रत्यक्षमिन्द्रे सर्वं समाहितम् ॥ २९ ॥
इन्द्रे लोका इन्द्रे तप इन्द्रेऽध्यृतमाहितम् ।
इन्द्रं त्वा वेद प्रत्यक्षं स्कम्भे सर्वं प्रतिष्ठितम् ॥ ३० ॥
नाम नाम्ना जोहवीति पुरा सूर्यात्पुरोषसः ।
यदजः प्रथमं संबभूव स ह तत्स्वराज्यमियाय यस्मान्नान्यत्परमस्ति भूतम् ॥ ३१ ॥
यस्य भूमिः प्रमान्तरिक्षमुतोदरम् ।
दिवं यश्चक्रे मूर्धानं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः ॥ ३२ ॥

अर्थ— (यस्य अंगे गात्रा) ज्याच्या शरीराच्या अवयवांत (त्रयस्त्रिंशत् देवाः विभेजिरे) तेहतीस देव विभक्तपणें राहिले आहेत (तान् वै त्रयस्त्रिंशत् देवान्) त्या तेहतीस देवांना (एके ब्रह्मविदः विदुः) मात्र एकटे ब्रह्मज्ञानी जाणूं शकतात. (२७)

(जनाः हिरण्यगर्भं) लोक हिरण्यगर्भाला (परमं अनति-उद्यं विदुः) श्रेष्ठ आणि उच्च मानतात, (लोके अन्तरा) या लोकांमध्यें (अग्रे स्कम्भः तत् हिरण्यं प्रासिञ्चत्) प्रारंभीं सर्वाधार आत्म्यानेंच ते सुवर्णमय हिरण्यगर्भ निर्माण केलें. (२८)

(स्कम्भे लोकाः) स्कम्भ सर्वाधार परमात्मा आहे, त्याच्या आधारानें सर्व लोक राहतात (स्कम्भे तपः) त्याच्यांत तप राहतें (स्कम्भे अधि ऋतं आहितं) त्याच्या आधारानें ऋत-सत्य रहातें, (स्कम्भ) सर्वाधार ! मीं (त्वा प्रत्यक्षं वेद) तुला प्रत्यक्ष जाणतों कीं तुझ्या (इन्द्रे सर्वं समाहितं) इंद्रामध्यें हें सर्व समाविष्ट आहे. (२९)

(इन्द्रे) इंद्राचे ठायीं, सर्व लोक, तप आणि ऋत म्हणजे सत्य राहिले आहेत. हे इंद्र, मीं (त्वा प्रत्यक्षं वेद) तुला प्रत्यक्ष जाणतों कीं तूंच (स्कम्भे सर्वं प्रतिष्ठितं) ईश्वर आहेस, सर्वाधार आहेस, ज्याच्यामध्यें सर्व समाविष्ट आहे. (३०)

(सूर्यात् पुरा उषसः पुरा) सूर्योदयापूर्वी पहाटे उषःकालापूर्वी (नाम्ना नाम जोहवीति) नामसंकीर्तनासह ईश्वराच्या यशाचें गायन करतात, ईश्वरभक्ति करतात. (यत् अजः प्रथमं सं बभूव) जेव्हां याप्रकारें प्रयत्नशील आत्मा ईश्वराशीं उत्तम प्रकारें तादात्म्य पावतो (सः ह तत् स्वराज्यं इयाय) तोच तें स्वराज्य-स्वात्मानंदरूपी स्वराज्य मिळवितो. (यस्मात् अन्यत् परं भूतं न अस्ति) ज्याच्याशिवाय दुसरें कांहीं श्रेष्ठ निर्माण झालेलें नाहीं. (३१)

(यस्य भूमिः प्रमा) ज्याची भूमि एक पावलाच्या मापाएवढी आहे. (उत अन्तरिक्षं उदरं) आणि अंतरिक्ष ज्याचें उदर आहे, (यः दिवं मूर्धानं चक्रे) ज्यानें द्युलोक आपलें मस्तक बनविलें आहे, (तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः) त्या ज्येष्ठ ब्रह्माला माझा नमस्कार असो. (३२)

यस्य सूर्यश्चक्षुश्चन्द्रमाश्च पुनर्णवः ।
अग्निं यश्चक्र आस्यं१ तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः ॥ ३३ ॥
यस्य वातः प्राणापानौ चक्षुराङ्गिरसोऽभवन् ।
दिशो यश्चक्रे प्रज्ञानीस्तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः ॥ ३४ ॥
स्कम्भो दाधार द्यावापृथिवी उभे इमे स्कम्भो दाधारोर्व१न्तरिक्षम् ।
स्कम्भो दाधार प्रदिशः षडुर्वीः स्कम्भ इदं विश्वं भुवनमा विवेश ॥ ३५ ॥
यः श्रमात्तपसो जातो लोकान्त्सर्वान्त्समानशे ।
सोमं यश्चक्रे केवलं तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः ॥ ३६ ॥
कथं वातो नेलयति कथं न रमते मनः ।
किमापः सत्यं प्रेप्सन्तीर्नेलयन्ति कदा चन ॥ ३७ ॥
महद्यक्षं भुवनस्य मध्ये तपसि क्रान्तं सलिलस्य पृष्ठे ।
तस्मिन् छ्रयन्ते य उ के च देवा वृक्षस्य स्कन्धः परित इव शाखाः ॥ ३८ ॥

अर्थ—(**यस्य सूर्यः चक्षुः**) ज्याचा डोळा सूर्य आहे, (**पुनः नवः चंद्रमाः च**) त्याचप्रमाणें पुनः पुनः नवा होणारा चंद्रमा ज्याचा दुसरा डोळा आहे, (**अग्निं यः आस्यं चक्रे**) ज्यानें अग्नीला स्वतःचें मुख केलें आहे. (**तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः**) त्या श्रेष्ठ ब्रह्माला माझा नमस्कार असो. (३३)

(**यस्य प्राणापानौ वातः**) ज्याचे प्राण आणि अपान वायु आहेत, (**चक्षुः अंगिरसः अभवन्**) डोळे अंगिरस झाले आहेत, (**यः दिशः प्रज्ञानीः चक्रे**) ज्यानें दिशांना बुद्धीचे साधन असे कान बनविले आहेत (**तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः**) त्या श्रेष्ठ ब्रह्मास नमस्कार असो. (३४)

(**स्कंभः इमे उभे द्यावापृथिवी दाधार**) या सर्वाधारानें पृथ्वी आणि द्युलोकास धारण केलें आहे, (**स्कंभः उरु अन्तरिक्षं दाधार**) त्यानें विस्तृत अंतरिक्षास धारण केलें आहे. (**स्कम्भः षट् उर्वीः प्रदिशः दाधार**) त्यानें या सहा महान् दिशांस धारण केलें आहे (**स्कम्भः इदं विश्वं भुवनं आविवेश**) तोच या सर्व विश्वांत भरून राहिलेला आहे. (३५)

(**यः तपसा श्रमात् जातः**) जो तपाच्या श्रमानें प्रगट होऊन (**सर्वान् लोकान् सं आनशे**) सर्व विश्व व्यापून राहिला आहे (**यः सोमं केवलं चक्रे**) ज्यानें एका सोमासच मात्र औषधिरूप बनविलें आहे, (**तस्मै ज्येष्ठाय ब्रह्मणे नमः**) त्या श्रेष्ठ ब्रह्माला नमस्कार असो (३६)

(**कथं वातः न ईलयति**) वायु स्थिर कां रहात नाहीं ? (**कथं मनः न रमते**) मन कां रमत नाहीं म्हणजे आनंदित होत नाहीं ? (**किं सत्यं प्र-ईप्सन्तीः आपः**) सत्याच्या प्राप्तीच्या इच्छेनें जल (**कदा चनन ईलयन्ति**) केव्हांच स्थिर रहात नाहीं ? (३७)

(**भुवनस्य मध्ये महत् यक्षं**) या विश्वांत, म्हणजे मध्यें–केन्द्रस्थानीं एक महान् पूज्य देव आहे. (**तपसि क्रान्तं सलिलस्य पृष्ठे**) ताप–उष्णता वगैरे देण्यांत जो मुख्य हालचाल करतो आणि जो पाण्याच्या पश्चाद् भागीं आहे, (**तस्मिन् ये उ के च देवा श्रयन्ते**) त्यांत जे कोणी देव आहेत तें वास्तव्य करतात, (**वृक्षस्य स्कन्धः परितः शाखा इव**) ज्याप्रमाणें वृक्षाच्या आधारानें त्याच्या शाखा चहूंबाजूस पसरतात. (३८)

यस्मै हस्ताभ्यां पादाभ्यां वाचा श्रोत्रेण चक्षुषा ।
यस्मै देवाः सदा बलिं प्रयच्छन्ति विमितेऽमितं
स्कम्भं तं ब्रूहि कतमः स्विदेव सः ॥ ३९ ॥
अप तस्य हतं तमो व्यावृत्तः स पाप्मना ।
सर्वाणि तस्मिन् ज्योतींषि यानि त्रीणि प्रजापतौ ॥ ४० ॥
यो वेतसं हिरण्ययं तिष्ठन्तं सलिले वेद । स वै गुह्यः प्रजापतिः ॥ ४१ ॥
तन्त्रमेके युवती विरूपे अभ्याक्रामं वयतः षण्मयूखम् ।
प्रान्या तन्तूंस्तिरते धत्ते अन्या नाप वृञ्जाते न गमातो अन्तम् ॥ ४२ ॥
तयोरहं परिनृत्यन्त्योरिव न वि जानामि यतरा परस्तात् ।
पुमानेनद्वयत्युद्गृणत्ति पुमानेनद्वि जभाराधि नाके । ॥ ४३ ॥
इमे मयूखा उप तस्तभुर्दिवं सामानि चक्रुस्तसराणि वातवे ॥ ४४ ॥

अर्थ— (यस्मै हस्ताभ्यां पादाभ्यां) ज्याच्यासाठीं हात आणि पाय (वाचा श्रोत्रेण चक्षुषा) वाणी, कान आणि डोळ्यांनीं, (देवाः सदा अमिते बलिं यस्मै विमिते प्रयच्छन्ति) देव नेहमीं अपार उपहार अपरिमिताला देत असतात, (स्कंभं तं ब्रूहि कतमः स्वित् एव सः) त्या सर्वाधाराविषयीं सांगा तो कोण आहे ? (३९)

(तस्य तमः अपहतं) त्याचें अज्ञान दूर झालें आहे, (सः पाप्मना व्यावृत्तः) तो पापापासून मुक्त झालेला आहे. (यानि त्रीणि ज्योतींषि) ज्या तीन ज्योति आहेत (सर्वाणि तस्मिन् प्रजापतौ) त्या सर्व प्रजापतीच्या ठिकाणीं आहेत. (४०)

(यः सलिले हिरण्ययं वेतसं तिष्ठन्तं वेद) जो पाण्यांत सोनेरी वेत उभा आहे, त्यास जाणतो, (स वै गुह्यः प्रजापतिः) तोच गुप्त असा प्रजापति होय. (४१)

(एके विरूपे युवती) दोन विरुद्ध रूपांच्या युवती (षट् मयूखं तंत्रं) सहा खुंट्यांच्या ताण्याला (अभि आक्रामं वयतः) पुनः पुनः विणतात, त्यांतून (अन्या तन्तून् प्रतिरते) एक धागे पसरविते आणि (अन्या धत्ते) दुसरी ते धारण करते, (न अपवृञ्जाते) विसांवा घेत नाहीं आणि (न गमातो अन्तम्) पूर्ण हि करीत नाहीं, म्हणजे कार्य समाप्त करीत नाहीं. (४२)

(परिनृत्यन्तोः इव तयोः) जणूं काय नाचत आहेत अशा त्या दोन स्त्रियांपैकीं (यतरा परस्तात् न विजानामि) कोण दूरची आहे तें मीं जाणत नाहीं (एनत् पुमान् वयति) त्यावर एक पुरुष विणतो (एनत् पुमान् उद्गृणत्ति) आणि तें दुसरा पुरुष ढकलून टाकतो, आणि तो (अधि नाके विजभार) स्वर्गांत तें धारण करतो. (४३)

(इमे मयूखाः दिवं उप तस्तभुः) त्या खुंट्या स्थिर राहून द्युलोकास धारण करतात (सामानि वातवे तसराणि चक्रुः) सामांना जणूं काय विणण्याच्या धाग्यांच्या जाळ्याप्रमाणें बनविलें आहे. (४४)

ईश्वराचें प्रचंड सामर्थ्य

कांड ६, सूक्त ३३

(ऋषिः- जाटिकायनः । देवता- इन्द्रः)

यस्येदमा रजो युजस्तुजे जना वनं स्वः। इन्द्रस्य रन्त्यं बृहत् ॥ १ ॥
नाधृष आ दधृषते धृषाणो धृषितः शवः ।
पुरा यथा व्यथिः श्रव इन्द्रस्य नाधृषे शवः । ॥ २ ॥
स नो ददातु तां रयिमुरुं पिशङ्गसंदृशम् । इन्द्रः पतिस्तुविष्टमो जनेष्वा ॥ ३ ॥

अर्थ— हे (जनाः) लोक हो ! (अस्य तुजे) या प्रभूच्या शक्तींत (इदं रजः) हे लोकलोकान्तर (वनं स्वः) हें वन अर्थात् ही पृथ्वी आणि हा स्वर्ग (आ युजः) एकत्रित झाले आहेत. इतकी (इन्द्रस्य बृहत् रन्त्यं) या प्रभूची अत्यंत रमणीय शक्ति आहे. (१)

(धृषितः) पराजित झालेला शत्रु (धृषाणः शवः न आधृषे) त्यास पराजित करणाऱ्याच्या शक्तीची बरोबरी करूं शकत नाहीं. त्याप्रमाणें (आदधृषते) त्यास हरवूंहि शकत नाहीं. (यथा पुरा व्यथिः) ज्याप्रमाणें प्रथम पीडेनें थकलेला शत्रु (इन्द्रस्य श्रवः शवः न आधृषे) प्रभूच्या स्तुति करण्यायोग्य शक्तीस हरवूं शकत नाहीं. (२)

(इन्द्रः जनेषु तुविष्टमः पतिः आ) ईश्वर जन्म घेणाऱ्या सर्व जीवापेक्षां फार महान् शक्तिशाली प्रभु आहे. (सः नः तां उरुं पिशङ्गसंदशं रयिं ददातु) तो आम्हां सर्वांस तें मोठें सोन्यासारखें महान् धन देवो. (३)

भावार्थ— त्याच्या सामर्थ्यानें हा भूलोक, अन्तरिक्ष आणि स्वर्गलोक राहिले आहेत. त्या प्रभूचें असें प्रचंड सामर्थ्य आहे. त्या प्रभूस कोणी शत्रु पराजित करूं शकत नाहीं, कारण त्याची शक्तीच विलक्षण प्रभावशाली आहे. सर्व उत्पन्न झालेल्या पदार्थांपेक्षां प्रभु अधिक समर्थ आहे. त्यामुळें तो प्रभु आम्हांस उत्तम धन देवो.

परमेश्वराचा महिमा

कांड ६, सूक्त ६१

(ऋषिः- अथर्वा । देवता- रुद्रः)

मह्यमापो मधुमदेरयन्तां मह्यं सूरो अभरज्ज्योतिषे कम् ।
मह्यं देवा उत विश्वे तपोजा मह्यं देवः सविता व्यचो धात् ॥ १ ॥

अर्थ— (आपः मह्यं मधुमत् आ ईरयन्तां) पाणी माझ्यासाठीं मधुररसानें युक्त होऊन वहावें; (सूरः मह्यं ज्योतिषे कं अभरत्) माझ्यासाठीं सूर्यानें चारी दिशांस आपलीं किरणें पसरवून प्रकाशानें दिशा भरल्या आहेत. (उत विश्वे तपोजाः देवाः) आणि प्रकाश देणारे सर्व देव (सविता देवः स मह्यं व्यचः धात्) आणि सूर्यदेवसुद्धां माझ्यासाठीं महान् विस्तार पावत आहे. (१)

भावार्थ— पाणी परमेश्वरी प्रेरणेमुळें मधुर रसयुक्त वहात आहे. सूर्य त्याच्यासाठींच प्रकाशतो. सर्व अन्य देव त्याच्या महात्म्याच्या विस्तारासाठीं प्रयत्नशील आहेत. (१)

अहं विवेच पृथिवीमुत द्यामहमृतूँरजनयं सप्त साकम् ।
अहं सत्यमनृतं यद्वदाम्यहं दैवीं परि वाचं विशश्च ॥ २ ॥
अहं जजान पृथिवीमुत द्यामहमृतूँरजनयं सप्त सिन्धून् ।
अहं सत्यमनृतं यद्वदामि यो अग्नीषोमावजुषे सखाया ॥ ३ ॥

अर्थ- (**अहं पृथ्वीं उत द्यां विवेच**) मीं पृथ्वी आणि द्युलोक पृथक् केले आहेत, (**अहं सप्त ऋतून् साकं अजनयं**) मीं सात ऋतु एकाच वेळीं निर्माण केले आहेत. (**अहं सत्यं अनृतं यत्**) माझ्यासाठीं सत्य आणि अनृत वाणी जी बोलली जाते ती (**विशः दैवीं वाचः अहं परिवदामि**) मनुष्यांची जी दैववाणी ती सर्व प्रकारें मीच बोलतों. (२)

(**अहं पृथिवीं उत द्यां जजान**) मीं पृथ्वी आणि द्युलोक निर्माण केले आहेत (**अहं सप्त ऋतून् सिंधून् अजनयम्**) मीं सात ऋतु आणि सागर निर्माण केले आहेत. (**अहं सत्यं अनृतं यत् वदामि**) जें कांहीं सत्य अथवा अनृत बोलावयाचें असेल तें मींच बोलतों. (**सखायौ अग्नीषोमौ अजुषे**) मित्र, अग्नि आणि सोम यांस मीं एकत्रित करतों. (३)

भावार्थ— पृथ्वी आणि द्युलोक त्याच ईश्वरानें निर्माण केले आहेत. सहा ऋतु आणि सातवा अधिक मास पण तद्द्वाराच निर्माण झाला आहे. मनुष्याची वाणी पण त्याच्या प्रेरणेमुळें बोलली जाते. (२)

सात समुद्र आणि सात नद्या त्याच्या आज्ञेनें निर्माण झाल्या आहेत. आंतरिक प्रेरणाहि तोच देतो; आणि अग्नि आणि सोमाची शक्ति तोच एकत्रित करतो. (३)

या विश्वाची उत्पत्ति परमेश्वर करतो ही गोष्ट या सूक्तांत सांगितली आहे.

तेजस्वी ईश्वर

कांड ६, सूक्त ३४

(ऋषिः- चातनः । देवता- अग्निः)

प्राग्नये वाचमीरय वृषभाय क्षितीनाम् । स नः पर्षदति द्विषः ॥ १ ॥
यो रक्षांसि निजूर्वत्यग्निस्तिग्मेन शोचिषा । स नः पर्षदति द्विषः ॥ २ ॥
यः परस्याः परावतस्तिरो धन्वातिरोचते । स नः पर्षदति द्विषः ॥ ३ ॥
यो विश्वाभि विपश्यति भुवना सं च पश्यति । स नः पर्षदति द्विषः ॥ ४ ॥
यो अस्य पारे रजसः शुक्रो अग्निरजायत । स नः पर्षदति द्विषः ॥ ५ ॥

अर्थ— (**क्षितीनां वृषभाय अग्नये**) पृथ्वी आदि सर्व लोकांच्या महाबलवान् तेजस्वी ईश्वरासाठीं (**वाचं प्र ईरय**) स्तुतिरूप वाणी प्रेरित करा. (**यः अग्निः**) जो तेजस्वी प्रभु (**तिग्मेन शोचिषा रक्षांसि निजूर्वति**) स्वतःच्या तीक्ष्ण प्रकाशानें राक्षसांचा नाश करतो. (**यः परस्याः परावतः धन्व**) जो अत्यंत दूर अशा स्थानास (**तिरः अति रोचते**) पार करून चमकतो. (**यः विश्वा भुवना अभिविपश्यति**) जो सर्व भुवनांस निरनिराळे पहातो (**सं पश्यति**) आणि मिसळून गेलेलेही पहातो. (**यः शुक्रः अग्निः**) जो तेजस्वी प्रकाशाचा देव (**अस्य रजसः पारे अजायत**) या सर्व लोकांहून अत्यंत दूरपर्यंत प्रकट रहातो (**स नः द्विषः अति पर्षद्**) तो आमच्या शत्रूंना दूर करून आम्हांस पूर्ण करो. (१-५)

भावार्थ— ईश्वर सर्वांहून महाबलवान् आहे. तो स्वतःच्या तेजोमात्रेंकरून दुष्टांना नष्ट करतो अर्थात् दुष्टांचा नाश करतो. तो सर्व पदार्थमात्रांस त्यांस प्राप्त झालेल्या निरनिराळ्या स्थितींत जाणतो. तो अत्यंत तेजस्वी आहे आणि या दृश्य जगापासून अतिदूर विराजमान् झालेला आहे. तो स्वतःच्या उपासकांचें शत्रूंपासून रक्षण करून त्यांस परिपूर्ण करितो.

*

विजयी इंद्र

कांड ६, सूक्त २

(ऋषिः– अथर्वा । देवता– सोमः वनस्पतिः)

इन्द्राय सोममृत्विजः सुनोता च धावत । स्तोतुर्यो वचः शृणवद्धवं च मे ॥ १ ॥
आ यं विशन्तीन्दवो वयो न वृक्षमन्धसः । विरप्शिन्वि मृधो जहि रक्षस्विनीः ॥ २ ॥
सुनोता सोमपाव्ने सोममिन्द्राय वज्रिणे । युवा जेतेशानः स पुरुष्टुतः ॥ ३ ॥

अर्थ— हे (ऋत्विजः) ऋतूंना अनुकूल यज्ञ करणाऱ्यांनो ! (इन्द्राय सोमं सुनोत) इंद्रासाठीं सोमरस काढून गाळून तयार करा, (च आ धावत) आणि तो चांगला शुद्ध करा (यः स्तोतुः मे वचः) मीं स्तुति करणारा जी स्तुति करीत आहे ती तो ऐको आणि (हवं च) माझी प्रार्थना (शृणवत्) ऐको. (१)

(यं अन्धसः इन्दवः) ज्याच्याकडे अन्नरसाचे अंश (आविशन्ति) पोंहोचतात (वृक्षं वयः न) ज्याप्रमाणें पक्षी वृक्षांकडे आकर्षित होतात. हे (विरप्शिन्) विज्ञानयुक्त वीरा ! (रक्षस्विनीः मृधः वि जहि) आसुरी वृत्तींच्या शत्रूंचा नाश कर. (२)

(सोमपाव्ने वज्रिणे इंद्राय) सोमपान करणाऱ्या शस्त्रधारी वीर इंद्रासाठीं (सोमं सुनोत) सोमरस काढून तयार करा. (सः पुरुष्टुतः जेता युवा ईशानः) तो प्रशंसनीय विजयी तरुण ईश्वर आहे. (३)

भावार्थ– हे यज्ञ करणाऱ्यांनो ! इंद्रदेवासाठीं सोमरस काढून गाळून पवित्र शुद्ध तयार करा. तो प्रभु असा आहे की तो आमची प्रार्थना ऐकून आमचे मनोरथ पूर्ण करील. (१)

त्या प्रभूप्रत हा सोमयज्ञ पोहोंचतो. हे वीर ! राक्षसी वृत्तींच्या शत्रूंना पराजित कर. (२)

सोमपान करणाऱ्या वज्रधारी इंद्रासाठीं सोमरस तयार करा. तोच इंद्र प्रशंसनीय विजयी तरुण वीर आहे, आणि तोच सर्वांचा प्रभु आहे. (३)

इंद्रासाठीं सोमरस

सोमरस काढून तो गाळून पवित्र करून, तो प्रभूला समर्पण करावयास हवा, आणि जो शिल्लक राहील तो स्वतः सेवन केला पाहिजे. हा सोमरस पुष्कळ बलवर्धक, पौष्टिक, आरोग्यवर्धक, उत्साहवर्धक आणि तेजस्विता वाढविणारा आहे. इन्द्रास भक्तिपूर्वक समर्पण केल्यानंतर राहील तें सेवन करण्याचें महत्त्व या सूक्तांत वर्णिलें आहे.

तिसऱ्या मंत्रांत ' ईशान ' शब्द आहे तो इंद्राचें विशेषण असल्यामुळें येथील वर्णन परमात्म्याविषयींच आहे असें खात्रीपूर्वक म्हणतां येतें. ' युवा, जेता, इंद्र ' हे शब्दसुद्धां प्रभुवाचकच आहेत. ईश्वरासाठीं ते प्रसिद्ध आहेत.

विजयी देव

कांड ७, सूक्त ४४

(ऋषिः– प्रस्कण्वः । देवते– इंद्रः विष्णुः)

उभा जिग्यथुर्न परा जयेथे न परा जिग्ये कतरश्चनैनयोः ।
इन्द्रश्च विष्णो यदपस्पृधेथां त्रेधा सहस्रं वि तदैरयेथाम् ॥ १ ॥

अर्थ— (उभा) इंद्र आणि विष्णु दोघेहि (जिग्यथुः) विजय मिळवतात. ते कधींही (न परा जयेथे) पराजित होत नाहींत. (एनयोः कतरः चन न पराजिग्ये) त्या दोघांतील एक सुद्धां कधीं पराजित होत नाहीं. (इन्द्रः विष्णो च) हे इंद्र आणि विष्णु ! (यत् अपस्पृधेथां) जेव्हां तुम्ही दोघे मन लावून युद्ध करतां (तत सहस्रं त्रेधा वि ऐरयेथां) त्यावेळीं हजारों शत्रूंना तीनप्रकारें पळावयास लावतां. (१)

भावार्थ— 'विष्णु' हें नांव व्यापक परमात्म्याचें आहे आणि 'इंद्र' हें नांव शरीरांत राहिलेल्या, इंद्रियांना स्वतःची शक्ति प्रदान करणाऱ्या जीवात्म्याचें आहे. हे दोघेहि विजयी आहेत. हेच नर आणि नारायण होत. ते शरीररूपी एकाच रथावर आरूढ होऊन विजय प्राप्त करतात. ते दोघे अथवा त्यांतील एकएकटा नेहमींच विजयी होतात. ते स्वतःच्या शत्रूंस अनेक प्रकारें पळावयास लावतात. वाचकांनीं या मंत्राचा खरा भाव असा समजावा कीं इंद्र तो त्याचा (वाचकाचा) जीवात्मा आणि विष्णु हा त्याचा परममित्र परमात्मा होय. त्याची विजयशक्ति त्याच्या ठायीं अंतरंगांत आहे. त्यामुळें या शक्तीचा जर तो योग्य उपयोग करील तर त्याचा निःसंशय विजयच होईल.

प्रभूचें ध्यान

कांड ७, सूक्त ७१

(ऋषिः- अथर्वा । देवता- अग्निः)

परि॑ त्वाग्ने॒ पुरं॑ व॒यं विप्रं॑ सहस्य धीमहि । धृ॒षद्व॑र्णं दि॒वेदि॑वे ह॒न्तारं॑ भङ्गु॒राव॑तः ॥ १ ॥

अर्थ— हे (**सहस्य अग्ने**) बलवान् तेजस्वी देवा ! (**वयं पुरं विप्रं धृषद्वर्णं**) आम्हीं सर्व परिपूर्ण ज्ञानी, शत्रुबरोबर युद्ध करणाऱ्या (**भंगुरावतः हन्तारं**) विनाशकांस मारून टाकणाऱ्या (**त्वा दिवे दिवे परि धीमहि**) तुझी, ईश्वराची सर्वप्रकारें दररोज स्तुति करतों. (१)

भावार्थ— परमेश्वर शक्तिशाली, अग्निप्रमाणें तेजस्वी, सर्वदा परिपूर्ण, ज्ञानी, शत्रूंचा पराजय करणारा, मारहाण करणाऱ्यांचा नाश करणारा आहे. त्यामुळें तुज ईश्वराची सर्वप्रकारें स्तुति करणें योग्य आहे. (१)

मनुष्यानें ईश्वराचें गुणगान करावें, ते गुण स्वतःच्या अंगीं बाणविण्याचा प्रयत्न करावा, ते वाढवावेत. हें सिद्ध करण्यासाठींच ईश्वराच्या गुणांचें वर्णन ठायीं ठायीं करण्यांत आलें आहे. येथें अग्नीच्या नांवानें ईश्वराचें वर्णन केलें आहे. अग्निहि त्या प्रभूची आग्नेयशक्ति घेऊन अग्निगुणयुक्त झाला आहे. याप्रमाणें निरनिराळ्या नांवांनीं तो प्रभु वारंवार वर्णिला जातो.

रक्षण करणारा देव

कांड ७, सूक्त ६३

(ऋषिः- मरीचिः काश्यपः । देवता- जातवेदाः)

पृ॒त॒ना॒जितं॒ सह॑मानम॒ग्निमु॒क्थैर्ह॑वामहे पर॒मात्स॒धस्था॑त् ।
स नः॑ पर्ष॒दति॑ दु॒र्गाणि॒ विश्वा॒ क्षाम॑द्दे॒वोऽति॑ दुरि॒तान्य॒ग्निः ॥ १ ॥

अर्थ— (**पृतनाजितं सहमानं अग्निं**) शत्रुसेनेचा पराजय करणाऱ्या सामर्थ्यवान् तेजस्वी देवास आम्हीं (**उक्थैः परमात् सधस्थात् हवामहे**) स्तोत्रांनीं-स्तुति करून उत्कृष्ट स्थानांहून बोलावितों. (**सः नः विश्वा दुर्गाणि अति पर्षत्**) तो आम्हांस सर्व दुःखांतून पार करो आणि (**सः अग्निः देवः**) तो तेजस्वी देव ! (**दुरितानि अति क्षामत्**) आमच्या दुःखांचा (वाईट परिस्थितीचा) नाश करो. (१)

भावार्थ— शत्रूंचा पराजय करणारा आणि आक्रमक शत्रूंचा सामना करणारा तेजस्वी देव प्रभु आहे. त्याचें आम्हीं गुणगान करतों. आणि त्यास त्याच्या श्रेष्ठ स्थानापासून आमच्या जवळ बोलावितों. तो खात्रीपूर्वक आमचें रक्षण करील आणि आमच्या अडचणी दूर करील. (१)

ही प्रभूची स्तुति, प्रार्थना, उपासना प्रत्येक मनुष्यानें करावी आणि त्याचे हे गुण स्वतःच्या ठायीं वाढवावेत. अर्थात् त्यामुळें उपासकानेंहि शत्रूंचा पराजय करावा. शत्रूंचें आक्रमण सहन करून त्यास यशस्वी रीतीनें तोंड द्यावें. त्यानें पळून जाऊं नये. दुसऱ्यास दुःखांतून वांचवावें आणि वाईट परिस्थितींत मदत करावी.

मनुष्याचा निरीक्षक देव

कांड ७, सूक्त ४१

(ऋषिः- प्रस्कण्वः। देवता- श्येनः)

अति धन्वान्यत्यपस्ततर्द श्येनो नृचक्षा अवसानदर्शः ।
तरन्विश्वान्यवरा रजांसीन्द्रेण सख्या शिव आ जगम्यात् ॥ १ ॥
श्येनो नृचक्षा दिव्यः सुपर्णः सहस्रपाच्छतयोनिर्वयोधाः ।
स नो नि यच्छाद्वसु यत्पराभृतमस्माकमस्तु पितृषु स्वधावत् ॥ २ ॥

अर्थ— (अवसान-दर्शः नृचक्षाः श्येनः) अंतिम अवस्था समजणारा, सर्व मनुष्यांस यथायोग्य जाणणारा, सूर्याप्रमाणें प्रकाशमान् ईश्वर, (धन्वानि अति अपः अति ततर्द) रणासारख्या रेताड प्रदेशांत सुद्धां पुष्कळ पाऊस पाडतो. आणि (विश्वानि अवरा रजांसि) सर्वं नीच प्रकारच्या म्हणजे हलक्या लोकांना (इन्द्रेण सख्या शिवः) स्वतःचा जो मित्र इंद्र त्याबरोबर कल्याणरूप होऊन (तरन्) सर्वांना पार करतां करतां (आ जगम्यात्) प्राप्त होतो. (१)

(नृचक्षाः दिव्यः सुपर्णः) मनुष्यांचा निरीक्षक, द्युलोकांत रहाणारा आणि ज्याचीं किरणें उत्तम आहेत (सहस्रपात् शतयोनिः) हजारों पायांनीं सर्वत्र संचार करणारा, शेंकडो प्रकारच्या उत्पादक शक्तींनीं युक्त (वयोधाः श्येनः) अन्न देणारा सूर्यासारखा तेजस्वी देव (यत् पराभृतं वसु) जें दुसऱ्याकडून प्राप्त होणारें धन आहे तें धन (सः नः नियच्छात्) तो देव आम्हांस देवो. (अस्माकं पितृषु स्वधावत् अस्तु) आमच्या पितरांच्या ठिकाणीं अन्नाचा भोग घेण्याची शक्ति सदा वास्तव्य करो. (२)

भावार्थ— सर्व मनुष्यांची अंतिम स्थिति काय होईल हें यथार्थ ज्ञान ज्यास आहे असा, सर्व मनुष्यांच्या कर्माचें योग्य निरीक्षण करणारा, द्युलोकांत पूर्णपणें प्रकाशमान् होणारा, जो हजारों प्रकारच्या गतींनीं सर्वत्र संचार करतो, आणि शेंकडो प्रकारच्या उत्पादन शक्तिद्वारां विविध पदार्थ उत्पन्न करतो, जो सर्वांस अन्न पुरवितो, असा प्रकाशमय आणि दयाळु देव रेताड रणप्रदेशांत सुद्धां पुष्कळ पाऊस पाडतो, त्या शिवाय दुसऱ्या स्थळीं वनस्पतींना तर पाणी पुरवितोच. हा देव द्युलोकाचे आसपास दुसरे अन्य देश आहेत, त्यांनाहि आधार देतो. त्यांचें कल्याण करतो. सर्व दुःखांतून तारतो. इंद्र म्हणजेच हा देव जीवात्म्याचा परममित्र आहे आणि भूमीवर सर्वत्र हजर असतो. हा देव दुसऱ्यांपासून जें धन प्राप्त होतें तें उपासकांस देतो, एवढेंच नव्हे तर दुसरें सुद्धां पुष्कळच कल्याणकारी धन देतो. तो देव आमच्या पितरांस आणि आम्हां सर्वांस अन्नादि देवो.

आत्म्याची उपासना

कांड ७, सूक्त २१

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- आत्मा)

समेत विश्वे वचसा पतिं दिव एको विभूरतिथिर्जनानाम् ।
स पूर्व्यो नूतनमाविवासत्तं वर्तनिरनु वावृत एकमित्पुरु ॥ १ ॥

अर्थ— (विश्वे) तुम्हीं सर्व लोक (दिवः पतिं वचसा समेत) प्रकाशलोकाचा स्वामी जो आत्मा त्याला स्तुतीच्या वचनांनीं प्राप्त करा. तो (एकः जनानां विभुः अ-तिथिः) एकच आहे. सर्व जनांत अर्थात् प्राणीमात्रांत तो विद्यमान आहे आणि त्याच्या येण्याजाण्याचा समय निश्चित नाहीं. (स पूर्व्यः) तो सर्वांच्या आधींच उपस्थित असणारा असल्यामुळें (नूतनं आविवासत्) नवीन उत्पन्न झालेल्या शरीरांतहि त्याचें वास्तव्य आहेच. (तं एकं इत्) त्या एकाकडे (पुरुवर्तनिः) पुष्कळ प्रकारचे मार्ग (अनुवावृते) पोंहोचतात. (१)

भावार्थ— सर्व लोक एकच होऊन प्रकाशाचा स्वामी जो आत्मा त्याची आपल्या वचनांनीं स्तुति करीत. तो आत्मा एकच आहे. सर्व जनांत त्याचप्रमाणें सर्व प्राण्यांमध्यें त्याचें वास्तव्य आहे, आणि त्याची येण्याजाण्याची वेळ निश्चित नाहीं. सर्वांआधीं त्याचें एकट्याचेंच अस्तित्व होतें; तथापि आधुनिक वस्तूमध्यें सुद्धां तो राहतो. तो जरी एकच आहे तरी अनेक प्रकारचे मार्ग त्याच्यापर्यंत जाऊन पोहोंचतात. (१)

सर्व लोक आत्म्याचा विचार करीत. तो आत्मा एकच आहे. अर्थात् संपूर्ण विश्वांत तो एकच आहे. तोच स्वर्ग आणि प्रकाशलोकाचा स्वामीहि आहे. प्रत्येक मनुष्यानें त्याचें गुणगान करावें. अस्तित्वांत असलेल्या सर्व वस्तूंत तो (**विभूः**) हजर आहेच आणि (**अ-तिथिः**) त्याच्या येण्याजाण्याची तिथि कोणास माहित नाहीं; अथवा (**अतिथिः**) तो सर्वदा प्रेरणा देणारा आहे. सर्वदा गति दाता आहे. विश्वास तो फिरवीत राहिला आहे; अथवा अतिथिप्रमाणें तो पूज्य आहे. हें सर्व जग (**पूर्व्यः**) प्रथमपासूनच निर्माण झालेलें आहे. तें कधीं नव्हतें असें नाहीं. तो स्वतः पुराण पुरुष असून सुद्धां तो नव्या शरीरांत व पदार्थांत राहतो. सर्वत्र त्यानें व्यापिलें असल्यानें तो अमुक स्थानीं नाहीं असें नाहीं. त्यामुळेंच तो जुन्या आणि नव्या सर्व वस्तूमध्यें असतो. तो आत्मा एक असूनहि त्याप्रत पोहोंचण्याचे मार्ग अनेक आहेत. कोणत्याहि मार्गानें गेलें तरी शेवटीं प्राप्ति एकट्यानेंच होणार आहे. एखादा मार्ग दूरचा असेल, एखादा जवळचा असेल, परंतु प्रत्येक मार्ग त्याच्यापर्यंत जाऊन पोंहोंचतो, यांत शंका नाहीं.

या सूक्तांत परमात्म्याचें आणि थोडेसें जीवात्म्याचेंही वर्णन आहे. परमात्म्याचें क्षेत्र विस्तृत आणि जीवात्म्याचें संकुचित असें आहे; आणि अशा प्रकारें क्षेत्राच्या न्यूनाधिक्यामुळें हें एकच वर्णन दोघांना लागू पडतें, ही गोष्ट वाचकांनीं या सूक्तानें मननप्रसंगीं ध्यानीं घ्यावी. जीवात्म्यासंबंधीं 'अतिथि' शब्द 'अनिश्चित तिथि ज्याची' अशा अर्थानें घ्यावा आणि परमात्म्यासंबंधीं त्याचा अर्थ 'गतिमान्' असा करावा. याप्रमाणें वाचकानें अर्थ समजून आत्म्याचें गुणवर्णन दोन्ही क्षेत्रांत कसें आहे, तें समजून त्यावर विचार करून आत्म्याच्या गुणांचा अनुभव घ्यावा.

उपासना

कांड ७, सूक्त १४

(ऋषिः- अथर्वा । देवता- सविता)

अ॒भि त्यं दे॒वं स॑वि॒तार॑मो॒ण्योः᳡ क॒विक्र॑तुम् ।
अर्चा॑मि स॒त्यस॑वं रत्न॒धाम॒भि प्रि॒यं म॒तिम् ॥ १ ॥
ऊ॒र्ध्वा यस्या॒मति॒र्भा अदि॑द्युत॒त्सवी॑मनि ।
हिर॑ण्यपाणिरमिमीत सु॒क्रतुः॑ कृ॒पात्स्वः᳡ ॥ २ ॥

अर्थ— (**ओण्योः सवितारं**) रक्षण करणारा द्युलोक आणि पृथ्वीचा (**सवितारं**) उत्पादक सूर्य (**कविक्रतुं**) ज्ञानी आणि कर्मकर्ता आहे. (**सत्य-सवं रत्नधां**) सत्याचा प्रेरक आणि रमणीयतेचा आधार आणि (**प्रियं मतिं**) प्रिय आणि मननीय आहे (**त्यं देवं अभि अर्चामि**) अशा त्या देवाची मी पूजा करतों. (१)

(**यस्य अमतिः भाः**) ज्याचें अपरिमित तेज (**सवीमनि ऊर्ध्वा अदिद्युतत्**) त्याच्या आज्ञेंत राहून वर-वर पसरत जातें आणि सर्वत्र प्रकाशित होतें, तें (**सुक्रतुः हिरण्यपाणिः**) उत्तम कर्म करणारें तेजच ज्याचे हात आहेत असा हा देव (**कृपात् स्वः अमिमीत**) स्वतःच्या शक्तीनें प्रकाश निर्माण करतो. (२)

भावार्थ— सर्व जगाचें रक्षण करणारा, सर्वांचें उत्पादन करणारा, ज्ञानी, जगत्कर्ता, सत्याचा प्रेरक, रमणीय पदार्थ धारण करणारा, सर्वांस प्रिय, ज्याचें ध्यान सर्व मनुष्यांनीं केलेंच पाहिजे असा सविता देव आहे. मी त्याची उपासना करतों. (१)

ज्याची कांति अपरिमित आहे, ज्याच्या आज्ञेंत राहून त्याचें तेज सर्वत्र पसरतें, जो उत्तम कार्य करतो आणि तेजाची किरणें हीं ज्याचे हात होत तो स्वतःच्या शक्तीनें आत्मतेज सर्वत्र पसरवितो.

साविीर्हि देव प्रथमाय पित्रे वर्ष्माणमस्मै वरिमाणमस्मै ।
अथास्मभ्यं सवितर्वार्याणि दिवोदिव आ सुवा भूरि पश्वः ॥ ३ ॥
दमूना देवः सविता वरेण्यो दधद्रत्नं दक्षं पितृभ्य आयूंषि ।
पिबात्सोमं ममददेनमिष्टे परिज्मा चित्क्रमते अस्य धर्मणि ॥ ४ ॥

अर्थ— हे देव ! तूं (प्रथमाय पित्रे हि सावीः) प्रथम पालकासाठींच याला उत्पन्न करतोस आणि (अस्मै वर्ष्माणं) याला देह; (अस्मै वरिमाणं) त्याला श्रेष्ठता आहे, हे (सवितः) सविता देव ! (अथ अस्मभ्यं वार्याणि) आमच्यासाठीं पसंत करण्यास लायक असे पुष्कळच पदार्थ (भूरि पश्वः) पुष्कळ पशु इत्यादि सर्व (दिवः दिवः आसुव) प्रतिदिनीं तूं आम्हांस प्रदान कर. (३)

हे देवा ! तूं (सविता वरेण्यः) सर्वांचा प्रेरक, श्रेष्ठ आणि (दमूनाः) शमदमइत्यादींनीं युक्त मनाचा आहेस. तूं (पितृभ्यः रत्नं दक्षं आयूंषि) पितरांना रत्न, बळ आणि आयुष्य (दधत्) अर्पण करीत असतोस (अस्य धर्मणि सोमं पिबात्) त्याच्या धर्मशासनांत सोमरसरूपीं अन्न घेतात तो (एनं ममदत्) त्यास आनंदित करतो. (परिज्मा इष्टे चित् क्रमते) तो गतिमान इष्ट स्थानाकडे गमन करतो. (४)

भावार्थ— या देवानेंच प्रारंभींच जीं मनुष्यें निर्माण झालीं होतीं त्यांच्यासाठीं आवश्यक पदार्थ उत्पन्न केले. या मनुष्यांस देह, श्रेष्ठता वगैरे सर्व तोच देतो. तोच आम्हांस पुष्कळ पदार्थ, पशु वगैरे नेहमीं देत असतो. आणि देत राहील. (३)

हा देव सर्वांचा प्रेरक, सर्वांहून श्रेष्ठ, मानसिक शक्तीचें दमन करणारा आहे. त्यानेंच प्राचीन काळच्या मनुष्यांस धन, बल आणि आयुष्य दिलें होतें. याच्याच शक्तीनें प्रभावित होऊन वनस्पति मनुष्यादि प्राण्यांना अन्नरस देऊन पुष्ट करतात, त्यापासून सर्वांस आनंद प्राप्त होतो. हा देव कोणताही अडथळा न येतां सर्वत्र स्वतंत्रपणें संचार करतो. (४)

उपास्य देवाचें हें वर्णन स्पष्ट आहे. त्यामुळें त्याचें जास्त स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाहीं. ब्राह्मणांच्या गायत्री मंत्राची जी सविता देवता आहे तीच या मंत्राचीही. ' देव, सविता, वरेण्य ' इत्यादि शब्द सुद्धां गायत्री मंत्राप्रमाणेंच या सूक्तांत आहेत. थोडक्यांत गायत्री मंत्राचें अधिक स्पष्टीकरण या सूक्तांत आहे. जर वाचक गायत्री मंत्राशीं या सूक्ताची तुलना करून पाहतील तर त्यास गायत्री मंत्राच्या अर्थाचें आणि या सूक्ताच्या अर्थाचें ज्ञान प्राप्त करण्यांत पुष्कळच साहाय्य होईल.

सवितादेवाची उपासना

कांड ७, सूक्त १५

(ऋषिः– भृगुः । देवता– सविता)

तां सवितः सत्यसवां सुचित्रामाहं वृणे सुमतिं विश्ववाराम् ।
यामस्य कण्वो अदुहत्प्रपीनां सहस्रधारां महिषो भगाय ॥ १ ॥

अर्थ— हे (सवितः) उत्पादक प्रभो, (अहं सत्यसवां) मी सत्याची प्रेरणा करणाऱ्या (सुचित्रां विश्ववारां तां सुमतिं) सर्वांचें विलक्षण, रक्षण करणाऱ्या त्या उत्तम बुद्धीचा (आ वृणे) स्वीकार करतों. (यां सहस्रधारां प्रपीनां) ज्या सहस्रधारांनीं पुष्ट करणाऱ्या शक्तीचें (अस्य भगाय) स्वतःच्या भाग्यासाठीं (महिषः कण्वः अदुहत्) बलवान् ज्ञानी मनुष्य दोहन करतो आणि जिला प्राप्त करून घेतो. (१)

भावार्थ— ज्या शक्तीला प्राप्त करून ज्ञानीलोक श्रेष्ठ बनतात, ती सत्यप्रेरक विलक्षण शक्तिशाली, सर्वांचें रक्षण करणारी उत्तम मतिरूप बुद्धि शक्ति तिचा मी स्वीकार करतों. (१)

गायत्री मंत्रात सांगितलें आहे कीं, (धियो योः नः प्रचोदयात्) आमच्या बुद्धीस सविता देव चेतना देतो. तेंच वर्णन येथें अन्य शब्दांनीं केलें आहे. गायत्री मंत्रांत धी, धियः शब्द आहेत, त्या ऐवजीं येथें ' सुमति ' शब्द आहे. पूर्वोक्त सूक्ताप्रमाणें हेंहीं सूक्त गायत्री मंत्राचा आशय जास्त स्पष्ट करीत आहे.

आत्म्याचा प्रकाश

कांड ७, सूक्त २२

(ऋषिः– ब्रह्मा । देवता– मंत्रोक्ता; १ ब्रध्नः)

अयं सहस्रमा नो दृशे कवीनां मतिर्ज्योतिर्विधर्मणि ॥ १ ॥
ब्रध्नः समीचीरुषसः समैरयन् ।
अरेपसः सचेतसः स्वसरे मन्युमत्तमाश्चिते गोः ॥ २ ॥

अर्थ— (**अयं**) हा परमात्मा (**वि-धर्मणि**) विरुद्ध अथवा नानाविध धर्मांच्या पदार्थांच्या गोंधळांत (**नः कवीनां सहस्रं दृशे**) आम्हां ज्ञान्यांना हजारों प्रकारच्या दर्शनासाठीं (**मतिः ज्योतिः आ**) उत्तम बुद्धि आणि ज्योतिरूप होतो. (१)

तो (**ब्रध्नः**) महान् आत्मारूपी सूर्य (**समीचीः अरेपसः**) उत्तम रीतीनें चालणाऱ्या, निर्दोष (**सचेतसः मन्युमत्तमाः**) ज्ञान देणाऱ्या, उत्साह वाढविणाऱ्या (**उषसः**) उषःकालाच्या किरणांना (**गोः स्वसरे चिते**) इंद्रियांना स्वयंसंचाराचा मार्ग दाखविण्याच्या कार्यात (**समैरयन्**) प्रेरित करतो. (२)

भावार्थ— विरुद्ध गुणधर्मांच्या पदार्थांच्या ठिकाणीं व्याप्त होणारा एक परमात्मा आहे. तो ज्ञान्यांना उत्तम मार्ग हजारों रीतीनीं दाखवितो आणि त्यांस उत्तम बुद्धि आणि प्रकाश देतो. (१)

हा परमात्मा एक महान् सूर्य आहे. त्याचीं ज्ञान देणारीं किरणें अत्यंत निर्मल, उत्साह वाढविणारीं, प्रकाश देणारीं, आमच्या इंद्रियांचा संचार करण्यास मार्ग दाखविणारी आहेत. अर्थात् त्यांच्यापासूनच शक्ति प्राप्त करून आमचीं इंद्रियें कार्य करीत असतात. (२)

या सूक्तांत जगाचेंही वर्णन आहे, त्यास व्यापणाऱ्या परमात्म्याचेंसुद्धां वर्णन आहे; आणि त्याची उपासना करणाऱ्या भक्तांचेंसुद्धां वर्णन यांत आहे.

जगाचें वर्णन करणारा शब्द हा आहे— (**विधर्मणि**) जग हें परस्पर विरुद्धधर्माचें आहे. पहा— त्यांत अग्नि उष्ण आहे. तर जल शीतल आहे, पृथ्वी स्थिर तर वायु चंचल आहे, पृथ्वी इत्यादि पदार्थ अवयवयुक्त तर आकाश अवयवरहित आहे. अशा प्रकारच्या विरुद्ध गुणधर्मी पदार्थांत एकरस होऊन व्यापून राहणारा आत्मा आहे. सदा विरुद्ध गुणधर्मयुक्त पदार्थांच्या संगतींत राहूनही त्याच्या गुणधर्मांत अदल-बदल अथवा फेरफार होत नाहीं. या प्रकारें विरुद्ध गुणधर्मी लोकांस स्वतःजवळ ठेवून स्वतः मात्र त्यांच्या दुर्गुणापासून अलिप्त राहून स्वतःच्या शुभ गुणांनीं त्यांस उत्तेजन दिलें पाहिजे.

ज्याप्रमाणें सर्वांना परमात्मा (**मतिः ज्योतिः**) सुबुद्धि आणि प्रकाश देतो, त्याचप्रकारें स्वतः जवळ असणारें ज्ञान दुसऱ्यास दिलें पाहिजे. आणि स्वतःजवळ जेवढा प्रकाश आहे तो अंधकारांतून चालणाऱ्या दुसऱ्या लोकांस दाखवून त्यांचें मार्गदर्शक व्हावें.

तो महान् आहे. त्याचीं किरणें निर्दोष आहेत. तो निर्मळ आहे. उत्साहप्रेरक आहे; म्हणूनच मनुष्यास योग्य आहे कीं मनुष्यांनीं त्याच्याप्रमाणेंच उच्च, निर्दोष, शुद्ध आणि पवित्र व्हावें. स्वतः उत्साही व्हावें आणि इतरांस, उच्च, निर्दोष, शुद्ध, पवित्र आणि उत्साही करावें. अशा प्रकारें आत्म्याच्या गुणांचा विचार करून ते गुण स्वतःच्या ठिकाणीं वाढविले पाहिजेत.

ईश्वराची भक्ति

कांड ७, सूक्त ९

(ऋषिः– उपरिबभ्रवः । देवता– पूषा)

प्रपथे पथामजनिष्ट पूषा प्रपथे दिवः प्रपथे पृथिव्याः ।
उभे अभि प्रियतमे सधस्थे आ च परा च चरति प्रजानन् ॥ १ ॥
पूषेमा आशा अनु वेद सर्वाः सो अस्माँ अभयतमेन नेषत् ।
स्वस्तिदा आघृणिः सर्ववीरोऽप्रयुच्छन्पुर एतु प्रजानन् ॥ २ ॥
पूषन्तव व्रते वयं न रिष्येम कदा चन । स्तोतारस्त इह स्मसि ॥ ३ ॥
परि पूषा परस्ताद्धस्तं दधातु दक्षिणम् । पुनर्नो नष्टमाजतु सं नष्टेन गमेमहि ॥ ४ ॥

अर्थ— (पूषा) पोषक देव ईश्वर (दिवः प्रपथे) द्युलोकाच्या मार्गांत (पथां प्रपथे) अंतरिक्षांतील विविध मार्गांत आणि (पृथिव्याः प्रपथे) पृथ्वीवरील मार्गांत (अजनिष्ट) प्रगट होतो. (उभे प्रियतमे सधस्थे अभि) दोन्ही अत्यंत प्रियस्थानांत (प्रजानन् आ च परा च चरति) सर्वांना उत्तम रीतीनें जाणून जवळ तसेंच दूर इतस्ततः फिरतो. (१)

(पूषा सर्वाः इमाः आशाः अनुवेद) पोषण करणारा देव या सर्व दिशांना चांगल्या प्रकारें जाणतो. (सः अस्मान् अभयतमेन नेषत्) तो आपणां सर्वांस निर्भयतेच्या मार्गावरून नेतो. तो (स्वस्ति-दाः आघृणिः) कल्याण करणारा तेजस्वी, (सर्ववीरः) सर्व प्रकारें वीर असा (प्रजानन्) सर्वांना उत्तम प्रकारें ओळखतो आणि (अप्रयुच्छन्) कधींहि प्रमाद न करणारा (पुरः एतु) आमचा नेता होवो. (२)

हे (पूषन्) पोषक देवा ! (वयं तव व्रते कदाचन न रिष्येम) आम्हीं तुझें व्रताचरण करीत असतां कधींहि नाश पावणार नाहीं. (इह ते स्तोतारः स्मसि) येथें तुझें गुणगान करीत आम्हीं राहूं. (३)

(पूषा परस्तात् दक्षिणं हस्तंपरि दधातु) पोषक देव स्वतःचा उजवा हात आम्हांस देवो. (नः नष्टं पुनः नः आजतु) आमच्या नाश पावलेल्या वस्तु पुनः आम्हांस प्राप्त होवोत. (नष्टेन सं गमेमहि) आम्हीं नाश झालेले पदार्थ पुनः मिळवूं. (४)

भावार्थ— परमेश्वर या तिन्ही लोकांच्या सर्वस्थळीं उपस्थित आहे. तो सर्व सुखदायक स्थानांना आणि अवस्थांना उत्तम प्रकारें जाणतो, आणि तो आपणां सर्वांजवळही आहे तसाच दूर पण आहे. (१)

तो सर्वांचें पोषण करतो आणि सर्वांस यथावत् जाणतो. तोच आपणांस निर्भयतेच्या मार्गानें उत्तम प्रकारें आणि सुरक्षितपणें घेऊन जातो. तो आम्हां सर्वांचें कल्याण करणारा, सर्वांस तेज देणारा, सर्वांत वीरवृत्ति उत्पन्न करणारा, सर्वांच्या उन्नतीचा मार्ग जाणणारा आणि कधींहि प्रमाद न करणारा असा आहे. तोच आम्हां सर्वांचा मार्गदर्शक होवो, म्हणजे आम्हीं सर्व त्यास आमचा मार्गदर्शक मानूंया. (२)

या ईश्वराच्या व्रतानुष्ठानांत आम्हीं राहिलों तर आमचा कधींही नाश होणार नाहीं, यासाठीं आम्हीं त्या ईश्वराचें गुणगान करीत आहोंत. (३)

तो पोषक ईश्वर स्वतःचा उत्तम आधार आम्हांस देवो. आमचीं जीं साधनें नाश पावलीं आहेत तीं आम्हांस योग्य वेळांत पुनः प्राप्त होवोत. (४)

भक्ताचा विश्वास

भक्ताचा असा विश्वास असला पाहिजे कीं, परमेश्वर (पूषा) सर्वांचा पोषणकर्ता आहे. सर्वांचें पोषण त्याच्या पोषकशक्तीनें होत आहे. दुसरा विश्वास असा कीं ईश्वर सर्वत्र आहे, त्याच्यावांचून असें एकहि स्थान नाहीं. तिसरा विश्वास असा असावा कीं

तो आमचीं सर्व कर्में चांगलीं अगर वाईट, स्वतःच्या शक्तीनें जाणतो. तो आमच्या जवळ आहे तसाच अत्यंत दूरसुद्धां आहे. चौथा विश्वास असा कीं तो ईश्वरच आम्हांस निर्भयता देऊन सर्वश्रेष्ठ मार्गानें नेतो, कधींहि वाईट मार्ग दाखवित नाहीं. तो सर्वांचें कल्याण करतो. सर्वांस प्रकाशित करतो. स्वतः कधींहि प्रमाद करीत नाहीं आणि सर्वांस उत्तम प्रकारें चालवितो. पांचवा विश्वास असा कीं त्याच्या व्रतानुसार चालण्यानें कोणाचा कधींही नाश होत नाहीं. सहावा विश्वास असा पाहिजे, कीं, तो आम्हांस उत्तम आधार देत असतोच आणि आम्हींहि त्याच्याच आसऱ्याची अपेक्षा केली पाहिजे. सातवा विश्वास असा कीं कांहीं कारणानें आमचें कांहीं नाश पावलें तर त्याच्या सहाय्यानें तें सर्व ठीक होऊं शकतें. मनुष्यांस यासाठीं हेंच उचित आहे कीं त्यांनीं वर सांगितल्याप्रमाणें विश्वास ठेऊन ईश्वराचें गुणगान करावें आणि त्याचे गुण आंगीं बाणवून स्वतःची उन्नति साधावी.

अंतर्यामी ईश्वरास नमन

कांड १, सूक्त १३

(ऋषिः- भृग्वङ्गिराः। देवता- विद्युत्)

नमस्ते अस्तु विद्युते नमस्ते स्तनयित्नवे।
नमस्ते अस्त्वश्मने येना दूडाशे अस्यसि ॥ १ ॥
नमस्ते प्रवतो नपाद्यतस्तपः समूहसि
मृडया नस्तनूभ्यो मयस्तोकेभ्यस्कृधि ॥ २ ॥
प्रवतो नपान्नम एवास्तु तुभ्यं नमस्ते हेतये तपुषे च कृण्मः।
विद्म ते धाम परमं गुहा यत्समुद्रे अन्तर्निहितासि नाभिः ॥ ३ ॥

अर्थ— (विद्युते ते) विशेष प्रकाशमान अशा तुला (नमः) नमस्कार (अस्तु) असो. (स्तनयित्नवे ते नमः) गडगडणाऱ्या तुला नमस्कार असो. (अश्मने ते नमः अस्तु) गारास्वरूपी तुला नमस्कार असो (येन) ज्यामुळें तूं (दुडाशे अस्यसि) दुःख देणारास दूर फेकतोस. (१)

हे (प्रवतः न-पात्) उच्चतेस नीच न करणाऱ्या! (ते नमः) तुला नमस्कार असो. (यतः) कारण कीं तूं (तपः समूहसि) तपास एकत्रित करतोस. (नः तनूभ्यः मृडय) आमच्या शरीरांना सुख आणि (तोकेभ्यः मयः कृधि) बालकांना सुख दे. (२)

हे (प्रवतः न-पात्) उच्चतेहून अवनति न देणाऱ्या! (तुभ्यं एव नमः अस्तु) तुलाच नमस्कार असो. (ते हेतये तपुषे च नमः कृण्मः) तुझ्या वज्रास व तेजास आम्हीं नमस्कार करतों. (यत् ते धाम) जें तुझें स्थान (परमं गुहा) परम गुहा म्हणजे हृदयरूपी गुहेंत आहे तें आम्ही (विद्म) जाणतों. तें (समुद्रे अंतः) समुद्रांत आंत (नाभिः निहिता असि) तूं नाभिरूपानें राहिला आहेस. (३)

भावार्थ— हे देवी! ईश्वरी! तूं तुझें तेज वीज वगैरेमध्यें प्रगट करतेस, तूंच मेघांत गडगडाट करवितेस आणि तूं आपल्या शक्तीनें गाराही पाडतेस. या सर्व गोष्टींनीं तूं आमचीं सर्व दुःखें दूर करतेस, यासाठीं आम्ही सर्व तुला प्रणाम करितों. (१)

उच्चतेवरून खालीं न पाडणाऱ्या हे देवी ईश्वरी! तूं तपोमय जीवन आम्हांमध्यें एकत्रित करत्येस. म्हणजे आमचें तपः- सामर्थ्य वाढवितेस. त्या तपाच्या शक्तीनें आम्ही व आमचीं संतानें सुखी कर. आम्हीं तुला प्रणाम करितों. (२)

उच्चतेवरून अधःपात न करणाऱ्या हे देवी! ईश्वरी! आम्हांस माहित आहे कीं तुझें स्थान हृदयरूपी श्रेष्ठ गुहेंत आहे. तेथील समुद्राच्या आंत आधाररूप केंद्र बनून तूं रहातेस; त्यामुळें तुझें तेज आणि तुझीं दुष्टांचा नाश करणारीं शस्त्रास्त्रें म्हणजेच तुझी शक्ति—तिच्यासमोर आम्ही आमचें मस्तक नम्र करतों. (३)

*

यां त्वा देवा असृजन्त विश्व इषुं कृण्वाना असनाय धृष्णुम् ।
सा नो मृड विदथे गृणाना तस्यै ते नमो अस्तु देवि ॥ ४ ॥

अर्थ— हे (**देवि**) देवी ! (**असनाय**) शत्रूंवर फेकण्यास (**धृष्णुं इषुं कृण्वानाः**) बलवान् सुदृढ बाण बनविणारे (**विश्वे देवाः**) सर्व देव (**यां त्वा**) ज्या तुला (**असृजन्त**) प्रगट करतात (**तस्यै ते नमः अस्तु**) त्या तुला नमस्कार असो. (**सा**) तीच तूं (**विदथे गृणाना**) युद्धांत प्रशंसित होणारी (**नः मृड**) आम्हांस सुख दे. (४)

भावार्थ — हे देवी ! ईश्वरी ! शत्रू दूर करण्यासाठीं शस्त्रास्त्रें तयार करणारे सर्व विजयेच्छु लोक नेहमीं तुझी भक्ति करतात. त्यामुळेंच युद्धांत प्रशंसित होणारी तूं आम्हांस सुख दे. आम्ही सर्व तुला प्रणाम करतों. (४)

अंतर्यामी ईश्वरास नमन

सूक्ताची देवता

या सूक्ताची देवता ' विद्युत् ' आहे. जरी विद्युत शब्दाचा अर्थ वीज असा होतो, तसेंच या सूक्ताचा आरंभहि मेघांमध्यें असणाऱ्या विजेच्या वर्णनानेंच होत आहे, तरी या सूक्ताचा मुख्य उद्देश विजेचें वर्णन करण्याचा नाहीं. ज्याप्रमाणें अन्य सूक्तांतून अग्नि इत्यादि देवतांच्यारूपानें परमात्म्याचें वर्णन केलेलें आहे, त्याचप्रकारें विद्युतरूपी स्त्री देवतेच्या मिषें ईश्वराचें जगन्माता, आदिमाता देवीच्या रूपानें परमात्म्याचेंच वर्णन येथें केलेलें आहे. ही गोष्ट सिद्ध करण्यास या सूक्ताचा खालील मंत्रभाग पहावा.

१. ' **प्रवतः न-पात्** '- ' **प्रवत्** ' शब्दाचा अर्थ उच्च-स्थान असा आहे. उच्च अवस्था, उच्चस्थान अथवा उच्चता इत्यादि भाव या शब्दानें प्रगट होतात. उच्चतेंतून खालीं न पाडणारा तो ' **प्रवतो न पात्** ' चा भावार्थ आहे. परमात्माच मनुष्यास उच्च अवस्थेंत ठेवणारा आणि तेथून **अधःपतन** न होऊं देणारा असा आहे. (मंत्र २।३)

२. ' **ते परमं धाम गुहा** '— तुझें परमधाम हृदयरूपी गुहेंत आहे. हृदयांत आत्म्याचा निवास असतो. तेंच त्याचें परमपवित्र निवास-स्थान आहे. ही गोष्ट उपनिषदादिकांत अनेक वेळां आलेली आहे.

३. ' **समुद्रे अन्तः नाभिः निहिताऽसि ।** ' त्या समुद्रांतील मध्यभाग तूं आहेस. हृदयगुहेंत मानससरोवर आहे. समुद्र आहे. विचारांचा आणि भावनांचा महासागर आहे. त्याची नाभि म्हणजे आधारस्थान तोच आत्मा आहे. कारण त्या समुद्रांतील सर्व लाटा त्याच्याच प्रेरणेनें आणि शक्तीनें उठतात आणि त्याच्याच भक्तीनें या समुद्रांत शांति प्रस्थापित होते.

४. ' **यां त्वा देवा असृजन्त विश्वे** '— ज्या तुला सर्व देव प्रगट करतात. आत्म्याचें देवांमार्फत प्रगट होणें वेदांमध्यें अनेक ठिकाणीं स्पष्ट झालें आहे. शरिरांत नेत्रादि सर्व इंद्रियद्वारें आत्म्याचें प्रकाशन होत आहे. जर नेत्रादि इंद्रियें नसतीं तर आत्म्याचें अस्तित्वही समजूं शकलें नसतें. अशाप्रकारें सर्व इंद्रियादि देव शरिरांत आत्म्यास प्रगट करतात. विश्वांत सूर्य, चंद्र वगैरे देव परमात्म्याचा महिमा प्रगट करतात. मनुष्यसमाजांत विद्वान परमेश्वराची प्रशंसा करीत राहिले आहेत. अशा प्रकारें देवांमार्फत आत्मा प्रकाशित होतो.

५. ' **विदथे गृणाना** '— युद्धकालीं त्याची भक्ति करण्यांत येते. मनुष्य जेव्हां संकटांत सांपडतो तेव्हां त्याची सहायतेकरितां प्रार्थना करतो. थोड्या सज्जनांखेरीज सामान्यपणें साधारण माणसें संकटांत सांपडलीं म्हणजेच ईश्वरभक्ति करूं लागतात. मनुष्यावर संकटें आलीं नाहींत तर तो परमेश्वराची पर्वा सुद्धां करणार नाहीं. युद्ध प्रसंगीं खरी भक्ति होऊं शकते. मुख्य युद्ध जीवनयुद्ध होय. मनुष्य नित्य संघर्ष करूनच जीवित राहूं शकतो. विरोधी बलांशीं टक्कर देणें याचेंच नांव युद्ध, अथवा संघर्ष.

हे सर्व मंत्रभाग काळजीपूर्वक तपासले तर असें ध्यानीं येतें कीं या सूक्तांत परमात्म्याच्या तेजोमय शक्तीचेंच वर्णन मुख्यत्वें

केलेलें आहे, आणि तें वर्णन स्त्री रूपी देवीच्या वर्णनद्वारांच येथें केलेलें आहे.

ज्याप्रमाणें पाहण्याचें काम डोळे करतात पण ते केवळ स्वतःच्या शक्तीनें पाहूं शकत नाहींत, तर हृदयस्थ आत्म्याच्या शक्तीनेंच ते सर्व दृश्य वस्तु पाहूं शकतात. तद्वत् बाकी सर्व इंद्रियेंसुद्धां आत्म्याच्या शक्तीनेंच प्रेरित होऊन स्वतःचीं कार्यें करीत असतात. ज्याप्रमाणें शरीराची गोष्ट आहे तशीच या विश्वाची स्थिति आहे· या विश्वांत सूर्यादि देवता तेज पसरविणें इत्यादि स्वतःचीं कामें स्वतःच्या शक्तीनें करीत नाहींत. विश्वव्यापी परमात्म्याच्या शक्तीनें सूर्य प्रकाशतो,वीज चमकते आणि वारा वाहतो. त्यामुळें सूर्य प्रकाशानें, विजेच्या चमकाऱ्यानें अथवा वायूच्या वेगामुळें, मात्र त्या त्या देवतांचीच शक्ति प्रगट होते असें नव्हे तर परमात्म्याच्या विविध शक्तींचा साक्षात्कारही तद्वारांच होतो. ही भावना बाळगून जर वाचकांनीं या सूक्ताचा विचार केला तर विजेच्या चमकाऱ्यानें परमात्म्याचें तेज सर्वत्र पसरलेलें आहे हें ध्यानीं येईल. याप्रमाणें या सूक्ताचा विचार केला पाहिजे.

प्रथम मंत्रांत वीज चमकणें, मेघगर्जना, मेघांतून बर्फ किंवा पाण्याचा वर्षाव इत्यादींनीं परमात्म्याच्या प्रचंड कार्यशक्तीचा अनुभव व्हावा हें उचित आहे. यामुळेच परमात्मा प्राणिमात्रांचीं दुःखें दूर करतो. पावसामुळें पाणी मिळतें आणि पाण्यामुळें धान्योत्पादन होतें आणि प्राणिमात्रांचे कितीतरी कष्ट आणि क्लेश दूर होतात. हीच खरी परमात्म्याची मोठ्यांत मोठी कृपा आहे असें समजलें पाहिजे.

तपाचें महत्त्व

दुसऱ्या मंत्रांत तपाचें महत्त्व वर्णन केलें आहे. तप मनुष्याच्या अनेक प्रकारच्या शक्तींनीं होऊं शकतें. वाणीचें तप, मनाचें तप, शरीराचें तप, ब्रह्मचर्यानें तप, प्रत्येक इंद्रियाचें तप अशीं अनेक प्रकारचीं तपें मनुष्यानें केलीं पाहिजेत. या तपाचा जेवढा मोठा (**तपः समूहासि**) सांठा असेल तितकें उच्च स्थान मनुष्यास प्राप्त होईल. अर्थात् तपस्वी जीवनावरच मनुष्याचें महत्त्व अवलंबून असतें.

जसा तपःप्रभावानें मनुष्य उच्च कोटीचा होतो, त्या प्रमाणेंच तपःसामर्थ्यानें त्याचें अधःपतन होत नाहीं त्यामुळें या दुसऱ्या मंत्रांत उच्चतेहून अधःपतन न होण्याचें कारण तपःसामर्थ्य (**प्रवतः न पात् यत् तपः समूहासि**) सांगितलें आहे. याप्रमाणें वाचक जर त्याचा परस्पर संबंध पहतील आणि पतनापासून वांचण्याचें कारण समजून घेतील तर ते स्वतःला अधःपतनापासून वांचवूं शकतील, आणि इतरांस सुखी करूं शकतील.

परम धाम

तृतीय मंत्रांत परमेश्वराच्या परमधामाची ओळख करून दिली आहे. परमेश्वराचें परमधाम प्रत्येकाच्या हृदयांत आहे. विशेषतः भक्तांच्या हृदयांत आहे. परमेश्वराचे भक्तच तें धाम ओळखूं शकतात, आणि त्याचें वर्णन करूं शकतात. तें परमेश्वरधाम जाणून त्याचें वर्णन दुसरा कोण करूं शकेल ? हें स्थान जाणून त्याचा अनुभव होणें हेंच प्रत्येक मानवाचें ध्येय (साध्य) असलें पाहिजे.

एकादा मनुष्य समुद्रांत पडला असतां, आजुबाजूस समुद्राच्या उत्तुंग लाटा उंच उंच उसळत आहेत, त्यांचें प्रचंड तांडव चालू आहे, प्रचंड वायु सोसाट्यानें वाहत आहे, मुसळधार पाऊस पडत आहे, विज चमकत आहेत आणि डोळे दिपवून टाकीत आहेत, अशा प्रक्षुब्ध वातावरणांत तो मानव मदतीसाठीं ओरडत असतो. त्याला वाटते कीं मदत बाहेरून येणार आहे. हाच मनुष्याचा भ्रम आहे, हेंच त्याचें अज्ञान आहे आणि हाच त्याचा कमकुवतपणा होय.

या तिसऱ्या मंत्रांत स्पष्ट शब्दांत सांगितलें आहे कीं या प्रक्षुब्ध समुद्राचा मध्यबिंदु हाच परमात्मा आहे. आणि तो भक्तांच्या हृदयांत विराजमान आहे. हे भक्ता ! जर खरोखर तूं त्याला मदतीसाठीं हांका मारीत असशील तर त्या मदत करणाऱ्याचा शोध तूं स्वतःच्या हृदयांत कर. तें त्याचें स्वतःचें परंधाम आहे. तेथेंच तो स्वतःच्या संपूर्ण वैभवानें आणि तेजानें प्रकाशित झालेला, विराजलेला तुला दिसेल.

वाचक हो ! आपण हें ध्यानांत ठेवा कीं आपणां सर्वांच्या हृदयांत ती आत्मज्योत प्रज्ज्वलित आहे· सर्व प्रकारच्या उन्नतीसाठीं तीच महान् सहाय्यक शक्ति आहे. जर आपण तिला साध्य करूं शकलां तर तीच निःसंदेह आपली सर्व प्रकारची उन्नति साध्य करील. सर्व जगाचा विकास अंतरंगांतून होत आहे, बाह्यतः नव्हे. आपल्या उन्नतीसहि हाच नियम लागू पडतो.

युद्धांत सहाय्य

युद्ध प्रसंगीं, शत्रूच्या हल्ल्याच्या वेळीं, भयप्रसंगीं त्या परमात्म्याच्या सहाय्याची प्रत्येक जण अपेक्षा करतो. मरण, दुःख इत्यादि कारणांमुळेंच मनुष्य परमात्म्याचा शोध करीत असतात; म्हणून मोठे सत्पुरुष स्वतः दुःख सोसतात, आणि दुसऱ्यांस सुख

देण्याचाच प्रयत्न करतात. हेंच दुःखाचें महत्त्व आहे.

चौथ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं ' सर्व देव त्यास प्रगट करितात, ' याचें स्पष्टीकरण यापूर्वी करण्यांत आलें आहे. ' युद्धांत त्याची स्तुति किंवा प्रार्थना करण्यांत येते.' त्याचें कारण सुद्धां आम्हीं पाहिलें. शत्रूला दूर पळवून लावण्यासाठीं प्रबल शक्ति प्राप्त व्हावी एवढ्यासाठींच हें सर्व करतात. जे परमात्म्याचे खरोखर भक्त असतात त्यांच्या समोर कोणी शत्रु टिकूं शकत नाहीं, अथवा जे शत्रुत्व करण्यास येतात ते स्वयं नाश पावतात. अर्थात परमेश्वराची परमभक्ति हीच एक अशी प्रचंड शक्ति आहे कीं जी सर्व शत्रूंचा नाश करूं शकते.

नमन

या चार मंत्रांच्या सूक्तांत परमेश्वराला सात वेळां नमस्कार केला आहे. याप्रकारें त्यास अनेकवार नमन करण्यानें हें सिद्ध होतें कीं परमेश्वराच्या सार्वभौम सत्तेसमोरच प्रत्येकानें मस्तक नमविलेंच पाहिजे. तो परमात्मा सर्वत्र उपस्थित आहे, तो सर्वांचच आहे, सर्वोपरि आहे, असें मानणें हें मनुष्याच्या उन्नतीस आवश्यक आहे. त्याच्याशिवाय दुसऱ्या कोणास नमन न करण्याविषयीं, ' **तुभ्यं एव नमोऽस्तु** ' (मं. ३) हा मंत्रभाग पहाण्यासारखा आहे. ' मीं तुलाच नमन करतों ' तुझ्याहून निराळ्या अशा दुसऱ्या कोणाची उपासना मीं करणार नाहीं. हे परमेश्वरा ! तुझ्यासमोर मी माझें मस्तक नम्र करीत आहें. मजवर कृपा कर व मला कृतार्थ कर. या सूक्तांत सर्वोत्कृष्ट उपासना सांगितली आहे वाचकांनीं तिचा उपयोग उपासनेच्या वेळीं जरूर करावा.

विश्वंभराची भक्ति

कांड २, सूक्त १६

(ऋषिः– ब्रह्मा । देवता– प्राणः, अपानः, आयुः)

प्राणापानौ मृत्योर्मा पातं स्वाहा ॥ १ ॥
द्यावापृथिवी उपश्रुत्या मा पातं स्वाहा ॥ २ ॥
सूर्य चक्षुषा मा पाहि स्वाहा ॥ ३ ॥
अग्ने वैश्वानर विश्वैर्मा देवैः पाहि स्वाहा ॥ ४ ॥
विश्वंभर विश्वेन मा भरसा पाहि स्वाहा ॥ ५ ॥

अर्थ— हे प्राण आणि अपान ! तुम्ही दोघे **(मृत्योः मा पातं)** मृत्यूपासून मला वांचवा. **(स्वा-हा)** मीं आत्मसमर्पण करतों. (१) हे द्युलोक आणि पृथ्वीलोक ! **(उपश्रुत्या मा पातं)** श्रवणशक्तीनें माझें रक्षण करा. (२) हे सूर्य ! **(चक्षुषा मा पाहि)** दर्शनशक्तीनें माझें रक्षण कर. (३) हे वैश्वानर अग्नि ! **(विश्वैः देवैः मा पाहि)** सर्व देवांसह माझें रक्षण कर. (४) हे विश्वंभर ! **(विश्वेन भरसा मा पाहि)** संपूर्ण पोषकशक्तीनें माझें रक्षण कर.. **(स्वा-हा)** मीं आत्मसमर्पण करतों. (५)

भावार्थ— प्राण आणि अपान मृत्यूपासून रक्षण करोत. (१) द्यावापृथ्वी श्रवणशक्तीच्या सहाय्यानें, सूर्य दर्शनशक्तीच्या द्वारा माझें रक्षण करो. (२–३) विश्वव्यापक पुरुष सर्व दिव्यशक्तिद्वारा तसेंच विश्वंभर ईश्वर स्वतःच्या पोषणशक्तिद्वारा माझें रक्षण करो. मी मला स्वतःला त्याच्या या रक्षणकार्यांत समर्पित करतों. (४–५)

विश्वंभराची भक्ति

विश्वंभर देव

या सूक्ताच्या शेवटच्या म्हणजे पांचव्या मंत्रांत ' विश्वं-भर ' शब्द आहे. विश्वाचें भरण आणि पोषण करणारा देव असा याचा अर्थ आहे. सर्व जगाचें भरणपोषण करणारा एकच देव असें येथें ' विश्वंभर ' शब्दानें सांगितलें आहे. हा विश्वंभर शब्द परमात्म्यासाठीं योजिला आहे यांत जराहि शंका नाहीं; आणि या शब्दद्वारा येथें जगांतील एकच देवाची उत्कृष्ट कल्पना व्यक्त केली गेली आहे. (मं. ५)

या जगाचें भरणपोषण करणाऱ्या या देवाजवळ (विश्वेन भरसा) विश्वव्यापक पोषक रस आहे, ज्याच्या सहाय्यानें हा देव सर्व विश्वाचें पोषण करतो. (मं. ५)

वैश्वानर

चौथ्या मंत्रांत याचेंच नांव ' वैश्वानर ' असें दिलें आहे त्याचा अर्थ तो विश्वाचा नेता, विश्वाचा चालक, संपूर्ण जगताचा नर, सर्व जगांत मुख्य, सर्व जगांतील मुख्य पुरुष असा आहे. याचेंच पुढें ' विश्वंभर,' नांवानें वर्णन केलें आहे. ज्याप्रमाणें अग्नि सर्वव्यापक आहे त्याप्रमाणें हा जगाचा चालक मुख्य पुरुष पण सर्व जगव्यापी आहे; सूर्य-चंद्रादि सर्व (विश्वैः देवैः) अन्य देव याच्याच ताब्यांत राहतात. आणि स्वतःचें कार्य करतात. सर्व देव त्याचीच आज्ञा मानणारे आहेत. हे अन्य देव त्याचेच सहचारी आहेत.

एक उपास्य

वाचकांनीं या सूक्तांतील, ' विश्वंभर आणि वैश्वानर ' या दोन शब्दांचें मनन करावें आणि मननानें एकमेव अद्वितीय उपास्य परमात्मदेवाची भक्ति करावयास शिकावें. तो सर्व जगाचें भरणपोषण करणारा असल्यामुळें तो आमचेंही भरणपोषण करीलच या विषयीं कोणास शंका येण्याचें कारणच काय ? ज्यानें बालकास जन्मास घालण्यापूर्वींच त्याच्या मातेच्या स्तनांत त्याच्या पोषणासाठीं दुधाची व्यवस्था केली, त्याची सार्वत्रिक भरणपोषण शक्ति केवढी विशाल असेल याची कल्पना येऊं शकते. अशा अनंत सामर्थ्यशाली विश्वंभराची भक्ति करणें हेंच मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे.

देवांकडून रक्षण

सूर्य नेत्रेंद्रियांत दर्शनशक्ति देऊन मनुष्याचें रक्षण करतो. या पृथ्वीमध्यें चोहोंबाजूस पसरलेल्या दिशा कर्णेंद्रियाच्या श्रवणशक्तिद्वारें मनुष्याचें रक्षण करीत आहेत. त्याचप्रमाणें प्राण आणि अपान शरीरांत स्थित होऊन रक्षण करीत आहेत. ही गोष्ट प्रत्येकास येथें प्रत्यक्ष दिसेल. याचप्रमाणें इतर देवही निरनिराळ्या स्थळीं राहून आमचें रक्षण करीत आहेत.

हें सर्व त्या विश्वंभराच्या कृपेनें होत आहे. असा अनुभव आल्यामुळें त्या एकच एक अद्वितीय प्रभूची भक्ति करणें हें प्रत्येक मनुष्याला योग्य आहे. याप्रमाणें विश्वंभराची भक्ति करून वाचक शाश्वत कल्याणाचे भागीदार होतील अशी आशा आहे.

कोणत्या देवाची उपासना करावी ?

कांड ४, सूक्त २

य आत्मदा बलदा यस्य विश्वे उपासते प्रशिषं यस्य देवाः ।
योऽस्येशे द्विपदो यश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ १ ॥

अर्थ— (कस्मै देवाय हविषा विधेम ?) कोणत्या देवतेची समर्पणद्वारां आम्हीं सर्वांनीं पूजा करावी ? (यः आत्मदाः बलदाः) जो आत्मिक बल आणि इतर सर्व शक्ति देणारा आहे, तसेंच (यस्य प्रशिषं विश्वे देवाः उपासते) ज्याची आज्ञा सर्व देव मानतात आणि (यः अस्य द्विपदः यः चतुष्पदः ईशे) जो या सर्व द्विपाद आणि चतुष्पादांचा स्वामी आहे, त्याची पूजा सर्वांनीं करणें उचित आहे. (१)

भावार्थ— आम्हीं कोण्या देवाची पूजा करावी ? जो देव आत्मिक बल देणारा आहे आणि अन्य प्रकारचीं बलें देणाराहि

यः प्राणतो निमिषतो महित्वैको राजा जगतो बभूव ।
यस्य च्छायामृतं यस्य मृत्युः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ २ ॥
यं क्रन्दसी अवतश्चस्कभाने भियसाने रोदसी अह्वयेथाम् ।
यस्यासौ पन्था रजसो विमानः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ३ ॥
यस्य द्यौरुर्वी पृथिवी च मही यस्याद उर्वन्तरिक्षम्
यस्यासौ सूरो विततो महित्वा कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ४ ॥
यस्य विश्वे हिमवन्तो महित्वा समुद्रे यस्य रसामिदाहुः ।
इमाश्च प्रदिशो यस्य बाहू कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ५ ॥

अर्थ— (कस्मै देवाय हविषा विधेम ?) कोणत्या देवाची उपासना आम्हीं सर्वांनीं यजनद्वारें करावी ? (यः प्राणतः निमिषतः जगतः) जो श्वासोच्छ्वास करणाऱ्या आणि डोळयांची उघडझांप करणाऱ्या जगाचा (महित्वा एकः राजा बभूव) आपल्या महिम्यानें एकच राजा झाला आहे. (यस्य छाया अमृतं) ज्याचा आश्रय अमृतत्व देणारा आहे आणि (यस्य मृत्युः) ज्या देवाचा आश्रय न घेतल्यामुळें मृत्यु होतो, त्या देवतेची पूजा आम्हीं सर्वांनीं करावी. (२)

(कस्मै देवाय हविषा विधेम ?) कोणत्या देवतेची पूजा आम्हीं सर्वांनीं यज्ञद्वारा करावी ? (चस्कभाने क्रन्दसी यं अवतः) लढणाऱ्या आणि समोरासमोर एकमेकांवर अथडणाऱ्या दोन सेना ज्याला शरण जातात आणि (भियसाने रोदसी अह्वयेथाम्) भिणारे द्युलोक आणि भूलोक ज्यास बोलावीत आहेत, (यस्य रजसः असौ पन्थाः विमानः) ज्याच्या लोकीं जाण्याचा मार्ग विशेष सन्मानकारक आहे, त्या देवतेची आम्हीं सर्वांनीं पूजा करावी हें बरें. (३)

(कस्मै देवाय हविषा विधेम) कोणत्या देवाची यजनद्वारां आम्हीं सर्वांनीं पूजा करावी ? (यस्य महित्वा) ज्याच्या महिम्यानें (उर्वी द्यौः) विस्तीर्ण द्युलोक (च मही पृथिवी) आणि ही मोठी विशाल पृथ्वी आणि (यस्य अदः उरु अन्तरिक्षं) आणि ज्याच्या महिम्यानें हें विशाल अंतरिक्ष आणि (यस्य असौ सूरः विततः) ज्याच्या महिम्यानें हा सूर्य स्वतःच्या प्रकाशानें पसरलेला आहे, त्या देवतेची आम्हीं सर्वांनीं पूजा करावी. (४)

(कस्मै देवाय हविषा विधेम) कोणत्या देवाची आम्हीं यजनद्वारां पूजा करावी ? (यस्य महित्वा) ज्याच्या महिम्यानें (विश्वे हिमवन्तः) सर्व बर्फयुक्त पर्वत उभे आहेत आणि (यस्य समुद्रे इत् रसां आहुः) ज्याच्या महिम्यानें समुद्रांतसुद्धां ही भूमि स्थिर रहाते, (इमाः च प्रदिशः यस्य बाहू) आणि या दिशा ज्याचे बाहू आहेत, त्या देवाची आम्हीं सर्वांनीं पूजा करावी. (५)

भावार्थ— जो स्वतःच्या सामर्थ्यानें श्वासोच्छ्वास करणाऱ्यांचे आणि डोळयांची उघडझांप करणाऱ्यांचा एकमात्र राजा आहे, ज्याचा आश्रय अमरत्व देणारा आहे आणि ज्याच्यापासून दूर राहाणें म्हणजेच मृत्यु आहे. (२)

युद्ध करणाऱ्या दोन्ही सेना विजय मिळविण्यासाठीं ज्याला शरण जातात, द्यावा पृथ्वी सुद्धां भयाचे वेळीं ज्याचें सहाय्य मिळावें म्हणून प्रार्थना करतात, तसेंच ज्याच्या प्राप्तीचे मार्ग त्या मार्गावरून जाणाऱ्यांची योग्यता वाढवितात. (३)

ज्याच्या महिम्यानें द्युलोक विस्तीर्ण झाला आहे, पृथ्वी विशाल बनली आहे आणि अंतरिक्ष लांबरुंद झालें आहे, त्याचप्रमाणें ज्याच्या सामर्थ्यानें सूर्य प्रकाशतो. (४)

ज्याच्या बळानें हिमयुक्त पर्वत उंच उंच उभे आहेत, प्राण्यांना रहाण्यासाठीं सागरांत जमीन निर्माण झाली आहे, आणि सर्व दिशा उपदिशा ज्याच्या बाहुसमान लांब पसरल्या आहेत. (५)

आपो अग्रे विश्वमावन्गर्भं दधाना अमृता ऋतज्ञाः ।
यासु देवीष्वधि देव आसीत्कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ६ ॥
हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत् ।
स दाधार पृथिवीमुत द्यां कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ७ ॥
आपो वत्सं जनयन्तीर्गर्भमग्रे समैरयन् ।
तस्योत जायमानस्योल्ब आसीद्धिरण्ययः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ८ ॥

अर्थ-- (**कस्मै देवाय हविषा विधेम**) आम्हीं कोणत्या देवाचें पूजन करावें ? (**ऋतज्ञाः अमृताः**) सत्य नियमांनीं चालणाऱ्या जीवनशक्तीनें युक्त आणि (**गर्भं दधानाः आपः**) गर्भास धारण करणाऱ्या पाण्यानें (**अग्रे विश्वं आवन्**) प्रारंभीं विश्वास गति दिली होती. (**यासु देवीषु अधि देवः आसीत्**) ज्या दैवीशक्तींवर एका देवाचें अधिष्ठान आहे त्या देवतेची आम्हीं सर्वांनीं पूजा करावी. (६)

(**कस्मै देवाय हविषा विधेम**) आम्हीं कोणत्या देवाची पूजा करावी ? जो (**अग्रे हिरण्यगर्भः समवर्तत**) प्रारंभीं सुवर्णाप्रमाणें चमकणाऱ्या पदार्थांना स्वतःच्या गर्भांत धारण करणारा होता, (**भूतस्य एकः पतिः आसीत्**) भूतमात्रांचा एकच स्वामी होता (**सः दाधार पृथिवीं उत द्यां**) त्यानेंच भूमि आणि द्युलोकास धारण केलें आहे, त्या एका देवाची आम्हीं सर्वांनीं पूजा करावी. (७)

(**कस्मै देवाय हविषा विधेम**) कोणत्या देवतेची आम्हीं पूजा करावी ? (**अग्रे वत्सं जनयन्तीः**) जगताच्या आरंभीं बालकांस जन्म देणाऱ्या (**आपः गर्भं समैरयन्**) जलधारांनीं गर्भास प्रेरित केलें होतें, (**उत तस्य जायमानस्य**) त्या उत्पन्न होणाऱ्या बालकाचा जो (**हिरण्ययः उल्बः आसीत्**) सुवर्णाप्रमाणें गर्भावरण होता, त्याची आम्हीं सर्वांनीं उपासना करावी. (८)

भावार्थ—सत्य नियमानें चालणारी, जीवन देणारी, गर्भधारण करणारी आणि प्रजा उत्पन्न करणारी प्रकृतिरूप जलधारा जेव्हां विश्वाची रचना करण्यास पुढें सरसावली तेव्हां त्याचें संचलन करणारा एकच देव होता. (६)

ज्याचे आंत सूर्यासारखे चमकणारे हजारों तेजस्वी गोल राहतात, या उत्पन्न झालेल्या संपूर्ण जगाचा जो एकच खरा स्वामी आहे आणि ज्यानें द्यावापृथ्वींना धारण केलें आहे. (७)

प्रारंभीं सृष्टि निर्माण करणारे मूळ प्रकृतीचे प्रवाह जेव्हां प्रेरित झाले तेव्हां उत्पन्न होणाऱ्या पदार्थमात्रांवर, गर्भावर ज्याप्रमाणें एक संरक्षक पातळ पापुद्रा असतो त्याच्यासारखा तेजस्वी संरक्षक असा जो होता त्याची उपासना सर्वांनीं केली पाहिजे. (८)

कोणत्या देवाची उपासना करावी ?

आम्हीं कोणत्या देवाची उपासना करावी ?

प्रत्येक उपासकासमोर कीं आम्हीं कोणत्या देवाची 'उपासना करावी ?' हा प्रश्न उभा रहातो. अनेक प्रकारांनीं निरनिराळ्या धर्मांनीं या प्रश्नाचें उत्तरें दिलेलें आहे. वेदापुढें सुद्धां हाच प्रश्न उपस्थित झाला आहे. चारी वेदांत हा प्रश्न उपस्थित करण्यांत आला, आणि त्याचें उत्तर सुद्धां सखोल तत्त्वज्ञानाच्या आधारें दिलें आहे. या सूक्तांत हा प्रश्न आठ वेळां उपस्थित करण्यांत आला आहे आणि विभिन्न बाजूंनीं त्याचीं उत्तरें तितक्याच मंत्राच्याद्वारें देण्यांत आलीं आहेत. हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे, म्हणून येथें याचा विचार करणें अत्यंत आवश्यक आहे. वस्तुतः हें सूक्त अति सरळ आहे, तरीही यांत कित्येक महत्त्वपूर्ण गोष्टींचा उल्लेख आहे. यासाठीं '**कस्मै देवाय हविषा विधेम**' या प्रश्नाच्या प्रत्येक उत्तराचा विचार आम्हीं येथें करीत आहोंत.

प्रश्नाचें महत्त्व

यांत जो प्रश्न केला आहे तो असा आहे- '**कस्मै देवाय हविषा विधेम ?**' (मं. १-८)

'कोणत्या देवासाठीं आम्हीं हविर्द्रव्यानें यजन करावें ?' हा प्रश्नांतील शब्दांचा अर्थ झाला. हवींनीं काय करावें तें येथें सांगितलें नाहीं; पण हविर्द्रव्यांनीं हवन करतात. हवनाचा अर्थ 'आहुति समर्पण' असा आहे. हवनांत हविर्द्रव्यांच्या आहुति टाकण्यांत येतात आणि प्रत्येक आहुति देतांना असें म्हणतात—

अग्नये स्वाहा अग्नय इदं न मम।
इन्द्राय स्वाहा इन्द्राय इदं न मम।

'अग्नीस हें अर्पण करतों, हें अग्नीचें आहे, माझें नव्हे. इंद्राला हें अर्पण आहे, हें इंद्राचें आहे, माझें नव्हे.' हे हवीच्या हवनाचे मंत्र हें स्पष्ट सांगतात कीं आहुतींनीं जें हवन करण्यांत येतें तें संपूर्णपणें समर्पण केलें जातें, म्हणजे त्यावरील आपला अधिकार सोडून दिला जातो. यज्ञाचा हा मूळ आशय मनांत ठेऊन या प्रश्नाचा विचार केला तर आपली खात्री होईल कीं 'कोणत्या देवतेला आम्हीं स्वतःचें समर्पण करावें ? कोणत्या देवाला उपलक्षून आम्हीं स्वतःचा त्याग करावा ? कोणत्या (देवाय इदं) देवासाठीं हें सर्व आहे आणि (न मम) माझें नाहीं असें आम्हीं म्हणावें ?' हें या प्रश्नाचें सार आहे. ज्या देवतेनें हें सर्व आम्हांस दिलें त्या देवतेसाठीं हें सर्व समर्पण करणें हें आमचें कर्तव्य ठरतें. यासाठीं त्या देवतेची ओळख आम्हांस कशी पटावी? त्याचा शोध केला पाहिजे. त्या शोधासाठीं त्या देवतेचीं खालील लक्षणें या सूक्तांत सांगितलीं आहेत—

१ **यः आत्म-दाः**– जो आत्म्यास देणारा आहे, ज्यानें आत्मा दिला आहे, म्हणजे स्वतःप्रमाणें होण्यास योग्य असा आत्मा ज्यानें आम्हां मनुष्यांत आणि प्राणिमात्रांत ठेविला आहे.

२ **यः बल-दाः**– जो शक्ति देणारा आहे, आत्मिक, मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक बल ज्याच्यापासून प्राप्त होतें.

३ **विश्वे देवाः यस्य प्रशिषं उपासते**– सर्व अन्य देव ज्याच्या आज्ञेचें पालन करितात; म्हणजे सूर्यादि देव जगांत, ब्राह्मण, क्षत्रिय इत्यादि विद्वान् माणसें राष्ट्रांत आणि नेत्र-कर्णेंद्रियादि इंद्रियशक्ति या शरीरांत ज्याच्या नियमानें चालतात. तीन स्थानांत हे तीन देव आहेत आणि ते त्याच्या नियमांत राहून स्वतःचीं कार्यें करितात.

४ **यः द्विपदः चतुष्पदः ईशे**– जो द्विपाद आणि चतुष्पादांचा स्वामी आहे, म्हणजे जो द्विपाद आणि चतुष्पाद पशुपक्ष्यांचें एकसारखेंच पालन करतो.

५ **यः प्राणतः निमिषतः जगतः महित्वा एकः राजा बभूव**– जो प्राणिमात्रांचा त्याचप्रमाणें इतरांचा स्व-सामर्थ्यामुळें एकमेव राजा आहे, ज्याच्यावर दुसऱ्या कोणाचेंहि शासन नाहीं. याचेंच शासन सर्वांवर आहे.

६ **यस्य छाया अमृतं**– ज्याचा आश्रय अमरत्व देणारा आहे, ज्याची प्राप्ति झाली असतां अमरत्व प्राप्त होतें.

७ **यस्य (अच्छाया) मृत्युः**– ज्याच्यापासून विमुख होणें मृत्यु आहे. येथें विमुख होणें म्हणजे त्याची भक्ति इत्यादि सोडून देणें असें समजावें.

८ **चस्कभाने क्रन्दसी यं अवतः**– परस्पर विरोध करणाऱ्या आणि खूपच जोमानें युद्ध करणाऱ्या दोन्ही सेना स्वतः-च्या रक्षणार्थ ज्याला शरण जातात, म्हणजे दोन्ही पक्षांच्या लोकांचा ज्याच्यावर विश्वास आहे, आणि ज्याच्याजवळ बलाची याचना ते करतात.

९ **भियसाने रोदसी यं अह्वयेथां**– भय वाटलें असतां द्यावापृथ्वीवर रहाणारे सर्व ज्याला सहाय्यासाठीं आवाहन करि-तात, भयाचे वेळीं दुसऱ्या कोणास शरण न जातां एकमतानें सर्वजण ज्याचें नांव घेतात.

१० **यस्य रजसः असौ पन्थाः विमानः**– ज्याच्या लोकास प्राप्त करण्यासाठीं– त्याच्या मार्गाचें आक्रमण करणाऱ्याची योग्यता दिवसानुदिवस वृद्धिंगत होते असा हा प्रसिद्ध मार्ग आहे. अर्थात् त्याच्या स्थानास पोंहोचण्याच्या मार्गाचें अनुसरण करणाऱ्याची योग्यता दररोज वाढत जाते. जितका अधिक मार्ग आक्रमण होईल तितकी त्याची श्रेष्ठता, योग्यता जास्त वाढेल.

११. **यस्य द्यौः ऊर्वी पृथिवी च मही यस्य अदः अन्तरिक्षं उरु**– ज्याच्या प्रभावानें द्यौ, पृथ्वी आणि अंतरिक्ष विस्तीर्ण झाले आहेत म्हणजे त्यांचा जेवढा विकास होणें अवश्य तेवढा झाला आहे.

१२ **यस्य महित्वा असौ सूरः विततः**– ज्याच्या प्रभा-वानें हा सूर्य आपला प्रकाश सर्व दिशांस पसरवीत आहे.

१३ **यस्य महित्वा विश्वे हिमवन्तः**–ज्याच्या महात्म्या-मुळें हे हिमाच्छादित पर्वत स्थिर उभे आहेत.

१४ **यस्य महित्वा समुद्रे रसां आहुः**– ज्याच्या सामर्थ्यानें समुद्राच्या पाण्यांतही भूमि निर्माण झाली असें म्हणतात.

१५ **यस्य बाहू इमाः प्रदिशाः**– ज्याचे बाहू या सर्व दिशा व उपदिशा होत.

१६ **ऋतज्ञाः अमृताः आपः अग्रे गर्भं दधानाः विश्वं आवन्, यासु देवांषु अधिदेवः आसीत्**– सत्य नियमानें चालणाऱ्या, जीवन देणाऱ्या मूळ प्रकृतीच्या प्रवाहधारा जगाचा गर्भ धारण करीत विश्वाच्या उत्पत्तीसाठीं जेव्हां पुढें आल्या तेव्हां त्या दिव्यधारांत एक तोच अधिष्ठित देव होता.

१७ हिरण्यगर्भः अग्रे समवर्तत– ज्याच्या आंत प्रकाशमान अनेक तेजोगोल आहेत असा तो देव प्रथम पासूनच विद्यमान आहे.

१८ भूतस्य एकः पतिः जातः आसीत्– सर्व जगाचा एकटाच स्वामी म्हणून जो प्रसिद्ध आहे.

१९ स दाधार पृथिवीं उत द्याम्– ज्यानें पृथ्वी आणि द्युलोक म्हणजेच सर्व विश्वास धारण केलें आहे.

२० आपः गर्भं वत्सं जनयन्तीः अग्रे समैरयन्, उत तस्य जायमानस्य यः हिरण्ययः उल्बः आसीत्– मूल प्रकृतीच्या जलधारा स्वतःच्या अंतरंगांत गर्भधारणा करून तद्द्वारा जगत्‌रूपी वासरूं उत्पन्न करीत जेव्हां पुढें पुढें जात असतात, तेव्हां त्या विश्वरूपी वासराचा सोन्यासारखा चमकणारा गर्भावरील वारीप्रमाणें तो संरक्षक होता.

त्याची उपासना करावी

वर सांगितलेल्या वीस लक्षणांनीं ज्या परमात्म्याचा बोध होतो त्याची उपासना सर्वांनीं करावी. त्याहून दुसऱ्या अन्य कोणाचीही उपासना करूं नये.

हीं वीस लक्षणें इतकीं सरळ आणि सुबोध आहेत कीं त्यांच्या जास्त स्पष्टीकरणाची जरूरी नाहीं. वाचकांनीं त्यांवरून आपल्या उपास्यदेवास जाणावें आणि त्याची उपासना करून उत्तम गति प्राप्त करून घ्यावी.

या वीस लक्षणांतील पहिलीं दोन लक्षणें मनुष्याच्या आंतरिक शक्तींचें वर्णन करीत आहेत. मनुष्याच्या आंतरिक शक्तींशीं परमात्म्याचा संबंध त्यांत वाचकांस दिसून येईल. त्या पुढील पांच लक्षणांत तोच परमात्मा प्राणीमात्रांचा राजा आहे आणि मनुष्यास अंतिम सुख म्हणजे मोक्ष देणारा आहे ही गोष्ट सांगितली आहे. बाकी लक्षणांमध्यें सामान्यतः परमात्म्याचा विश्वधारक गुण विविध प्रकारें सांगितला आहे. दहाव्या लक्षणांत परमात्मप्राप्तीच्या मार्गाचें महत्त्व वर्णन केलें आहे. या मार्गानें जे जातात त्यांचा सन्मान वाढतो ही गोष्ट विशेष यांत सांगितली आहे. ही गोष्ट एकाग्र चित्तानें मनन करण्यासारखी आहे.

कित्येक लोक ' कस्मै देवाय हविषा विधेम ? ' या वाक्यावरून असें अनुमान करतात कीं हें सूक्त रचणाऱ्यास ईश्वर विषयाचें सम्यग्ज्ञान नव्हतें. तो ईश्वराचा शोधक होता परंतु हें कथन निर्मूल आहे; कारण पूर्वोक्त वीस लक्षणांनी परमात्म्याचें निश्चित स्वरूप दाखविलें आहे आणि त्यापूर्वी ' ब्रह्म जज्ञानं० ' (सू. १) या सूक्तांत ब्रह्मविषयक ज्ञान स्पष्ट शब्दांत केलेलें आहे. त्यामुळें ' अज्ञात देवा ' ची प्रार्थना या सूक्तांत केली आहे, असें मानणें ही मोठी चूक होईल.

त्यामुळें या सूक्तांत पूर्वोक्त वीस लक्षणांनीं बोधित होणाऱ्या ' एका अद्वितीय ईश्वराची पूजा केली पाहिजे, ' हा वेदाचा सिद्धांत स्पष्ट आहे. उपासकांस तो बोधप्रद आणि असंदिग्ध रीतीनें मार्गदर्शक आहे. विचारवंत वाचक यापासून उचित बोध प्राप्त करून घेतील अशी आशा आहे.

केन सूक्त

स्थूल शरीराच्या अवयवांसंबंधीं प्रश्न

कांड १०, सूक्त २

(ऋषिः– नारायणः । देवता– पार्ष्णिसूक्तम् , पुरुषः, ब्रह्मप्रकाशनम्)

केन॒ पार्ष्णी॒ आभृ॑ते॒ पूरु॑षस्य॒ केन॑ मां॒सं संभृ॑तं॒ केन॑ गु॒ल्फौ ।
केना॒ङ्गुलीः॒ पेश॑नीः॒ केन॒ खानि॒ केनो॑च्छ्लङ्खौ॑ मध्य॒तः कः प्र॑ति॒ष्ठाम् ॥ १ ॥

अर्थ— (पूरुषस्य पार्ष्णी केन आभृते) मनुष्याच्या टांचा कोणी बनविल्या ? (केन मांसं संभृतं ?) मांस कोणी भरलें ? (केन गुल्फौ ?) घोटे कोणीं निर्माण केले ? (केन पेशनीः अंगुलीः ?) सुंदर बोटें कोणी बनविलीं ? (केन खानि ?) इंद्रियांचीं छिद्रें कोणीं बनावलीं ? (केन उच्छ्लंखौ ?) पायाचें तळवे कोणीं जोडले ? (मध्यतः कः प्रतिष्ठाम् ?) मध्य भागास आधार कोण देतो ? ॥ १ ॥

*

कस्मान्नु गुल्फावधरावकृण्वन्नष्ठीवन्तावुत्तरौ पूरुषस्य ।
जङ्घे निर्ऋत्य न्यदधुः क्व स्विज्जानुनोः संधी क उ तच्चिकेत ॥ २ ॥
चतुष्टयं युज्यते संहितान्तं जानुभ्यामूर्ध्वं शिथिरं कबन्धम् ।
श्रोणी यदूरू क उ तज्जजान याभ्यां कुसिन्धं सुदृढं बभूव ॥ ३ ॥
कति देवाः कतमे त आसन्य उरो ग्रीवाश्चिक्युः पूरुषस्य ।
कति स्तनौ व्यदधुः कः कफोडौ कति स्कन्धान्कति पृष्टीरचिन्वन् ॥ ४ ॥
को अस्य बाहू समभरद्वीर्यं करवादिति ।
अंसौ को अस्य तद्देवः कुसिन्धे अध्या दधौ ॥ ५ ॥
कः सप्त खानि वि ततर्द शीर्षणि कर्णाविमौ नासिके चक्षणी मुखम् ।
येषां पुरुत्रा विजयस्य मह्मनि चतुष्पादो द्विपदो यन्ति यामम् ॥ ६ ॥
हन्वोर्हि जिह्वामदधात्पुरूचीमधा महीमधि शिश्राय वाचम् ।
स आ वरीवर्ति भुवनेष्वन्तरपो वसानः क उ तच्चिकेत ॥ ७ ॥

अर्थ— (नु कस्मात् अधरौ गुल्फौ अकृण्वन् ?) खरेंच घोट्याच्या खालचा भाग कोणी बनविला ? आणि (पुरुषस्य उत्तरौ अष्ठीवन्तौ) मनुष्याचे वरील गुडघे ? (जंघे निर्ऋत्य क्स्वित् न्यदधुः) जांघा निरनिराळ्या करून पुनः कशा सुंदर जोडल्या आहेत ? (जानुनोः संधी क उ तत् चिकेत् ?) गुडघ्याच्या सांध्यांचा आकार कोणी निर्माण केला ? (२)

(चतुष्टयं संहितान्तं शिथिरं कबंधं जानुभ्यां ऊर्ध्वं युज्यते) हें ढिलें धड शेवटीं चार प्रकारांनीं गुडघ्यावर जोडण्यांत आलें आहे. (श्रोणी, यत् ऊरू क उ तत् जजान ? याभ्यां कुसिंधं सुदृढं बभूव) नितंब आणि जांघा हें सर्व कोणी निर्माण केलें कीं ज्याच्यामुळें हें धड खूपच सुदृढ झालें आहे. (३)

(ते कति कतमे देवाः आसन् ये पूरुषस्य उरः ग्रीवाः चिक्युः ?) ज्यांनी मनुष्याची छाती आणि गळ्याला जोडलें ते किती आणि कोण देव होते ? (कति स्तनौ व्यदधुः ?) स्तन किती जणांनीं बनविले ? (कः कफोडौ ?) कोंपरें कोणी बनविलीं ? (कति स्कंधान् ?) खांदे किती जणांनीं बनविले ? (कति पृष्टीः अचिन्वन् ?) फांसळ्या कोणी जोडल्या ? (४)

(वीर्यं करवात् इति, अस्य बाहू कः समभरत् ?) त्यानें पराक्रम करावा एतदर्थ त्याचे बाहू भरगच्च कोणीं केले ? (कः देवः अस्य तद् अंसौ कुसिंधे अध्यादधौ ?) कोणत्या देवानें याचे ते खांदे धडाला जोडून दिले ? ॥५॥

(इमौ कर्णौ, नासिके, चक्षणी, मुखं सप्त खानि शीर्षणि कः वि ततर्द ?) हे दोन कान, दोन नाक (नाकपुड्या), दोन डोळे आणि एक मुख मिळून सात छिद्रें याच्या डोक्यांत कोणी पाडलीं ? (येषां विजयस्य मह्मनि चतुष्पादः द्विपदः यामं पुरुत्रा यन्ति) ज्याच्या विजयाच्या महिम्यानें चतुष्पाद आणि द्विपाद स्वतःचा मार्ग पुष्कळ प्रकारांनीं आक्रमित आहेत. (६)

(हि पुरूचीं जिह्वां हन्वोः अदधात्) ज्यानें फार चापल्य करणारी ही जीभ दोन जबड्यांच्या खांचेमध्यें बसविली आहे. (अधा महीं वाचं अधि शिश्राय) आणि प्रभावशाली वाणी त्यावर आधिष्ठित केली आहे (अपः वसानः सः भुवनेषु अन्तः आ वरीवर्ति) कर्मांना आधारभूत असा तो सर्व भुवनांमध्यें गुप्त राहिला आहे. (क उ तत् चिकेत ?) त्याला कोण बरें जाणूं शकतो ? (७)

मस्तिष्कमस्य यतमो ललाटं ककाटिकां प्रथमो यः कपालम् ।
चित्वा चित्यं हन्वोः पूरुषस्य दिवं रुरोह कतमः स देवः ॥ ८ ॥
प्रियाप्रियाणि बहुला स्वप्नं संबाधतन्द्र्यः ।
आनन्दानुग्रो नन्दांश्च कस्माद्वहति पूरुषः ॥ ९ ॥
आर्तिरवर्तिर्निर्ऋतिः कुतो नु पुरुषेऽमतिः ।
राद्धिः समृद्धिरव्यृद्धिर्मतिरुदितयः कुतः ॥ १० ॥
को अस्मिन्नापो व्यदधाद्विषूवृतः पुरूवृतः सिन्धुसृत्याय जाताः ।
तीव्रा अरुणा लोहिनीस्ताम्रधूम्रा ऊर्ध्वा अवाचीः पुरुषे तिरश्चीः ॥ ११ ॥
को अस्मिन्रूपमदधात्को मह्मानं च नाम च ।
गातुं को अस्मिन्कः केतुं कश्चरित्राणि पूरुषे ॥ १२ ॥
को अस्मिन्प्राणमवयत्को अपानं व्यानमु ।
समानमस्मिन्को देवोऽधि शिश्राय पूरुषे ॥ १३ ॥

अर्थ— (अस्य पूरुषस्य मस्तिष्कं, ललाटं, ककाटिकां, कपालं, हन्वोः चित्यं यः यतमः प्रथमः चित्वा दिवं रुरोह, स देवः कतमः ?) या मनुष्याचा मेंदू, मस्तक, डोक्याच्या पाठीमागचा भाग, कपाळ आणि जबड्यांचा समूह इत्यादिकांना ज्या पहिल्या देवानें बनविले आणि नंतर तो द्युलोकांत निघून गेला, तो देव कोण बरें ? (८)

(बहुला प्रियाऽप्रियाणि, स्वप्नं संबाधतन्द्र्यः आनंदान् नंदान् च उग्रः पुरुषः कस्मात् वहति ?) फार प्रिय आणि अप्रिय अशा गोष्टी, निद्रा, हरकती आणि थकावटी, आनंद आणि हर्ष, हा प्रचंड पुरुष कोणत्या कारणास्तव धारण करितो ? (९)

(आर्तिः अवर्तिः, निर्ऋतिः अमतिः पुरुषे कुतः नु) पीडा, दारिद्र्य, व्याधि, कुबुद्धि हीं मनुष्यांत कोठून आलीं ? (राद्धिः समृद्धिः मतिः अ-वि-ऋद्धिः उदितयः कुतः ?) पूर्णता, वैभव, बुद्धि, अहीनता, आणि उन्नतीसाठीं प्रवृत्ति सुद्धां कोठून झाली बरें ? (१०)

(अस्मिन् पुरुषे वि-सु-वृतः, पुरू-वृतः सिंधु-सृत्याय जाताः अरुणाः लोहिनीः, ताम्रधूम्राः ऊर्ध्वाः अवाचीः तिरश्चीः, तीव्राः अपः कः व्यदधात् ?) या मनुष्यांत विशेष प्रकारें फिरणारे, सर्वत्र फिरणारे नदीप्रमाणें वाहण्यासाठीं बनविलेले, लाल रंगाच्या लोखंडास बरोबर घेऊन जाणारे, तांब्याच्या धुरासारख्या रंगाचे, वर, खालीं, तिरपे वेगानें वाहणारे (रक्ताचे) जलप्रवाह कोणी निर्माण केले ? (११)

(अस्मिन् रूपं कः अदधात् ?) त्याला रूप कोणीं दिलें ? (मह्मानं च नाम च कः अदधात्) महिमा, आणि कीर्ति-यश कोणी ठेवलें ? (अस्मिन् गातुं कः ?) यांच्यांत गति कोणीं ठेवली ? (कः केतुं ?) ज्ञान कोणी भरलें ? आणि (पूरुषे चरित्राणि कः अदधात् ?) मनुष्यांत चारित्र कोणीं ठेविलें ? (१२)

(अस्मिन् कः प्राणं अवयत् ?) याच्यांत प्राणांस चालना कोणी दिली ? (कः अपानं व्यानं उ ?) अपान आणि व्यान कोणीं बनविले ? (अस्मिन् पूरुषे कः देवः समानं शिश्राय) या पुरुषांत समान प्राण कोणी स्थिर केला ? (१३)

को अस्मिन्यज्ञमदधादेको देवोऽधि पूरुषे ।
को अस्मिन्त्सत्यं कोऽनृतं कुतो मृत्युः कुतोऽमृतम् ॥ १४ ॥
को अस्मै वासः पर्यदधात्को अस्यायुरकल्पयत् ।
बलं को अस्मै प्रायच्छत्को अस्याकल्पयज्जवम् ॥ १५ ॥
केनापो अन्वतनुत केनाहरकरोद्रुचे । उषसं केनान्वैन्द्ध केन सायंभवं ददे ॥ १६ ॥
को अस्मिन्रेतो न्यदधात्तन्तुरा तायतामिति ।
मेधां को अस्मिन्नध्यौहत्को बाणं को नृतो दधौ ॥ १७ ॥
केनेमां भूमिमौर्णोत्केन पर्यभवद्दिवम् ।
केनाभि मह्ना पर्वतान्केन कर्माणि पूरुषः ॥ १८ ॥
केन पर्जन्यमन्वेति केन सोमं विचक्षणम् ।
केन यज्ञं च श्रद्धां च केनास्मिन्निहितं मनः । ॥ १९ ॥
केन श्रोत्रियमाप्नोति केनेमं परमेष्ठिनम् ।
केनेममग्निं पूरुषः केन संवत्सरं ममे ॥ २० ॥

अर्थ— (कः एकः देवः अस्मिन् पूरुषे यज्ञं अदधात् ?) कोणत्या एक देवानें या पुरुषांत यज्ञाची स्थापना केली ? (कः अस्मिन् सत्यं ?) यांच्यात सत्य स्थिर कोणीं केलें ? (कः अन्-ऋतम्) असत्य कोणी ठेविलें आहे ? (कुतः मृत्युः) मृत्यु कोठून (किंवा कशामुळें) होतो (येतो) ? (कुतः अमृतम् ?) आणि अमरत्व कसें (कोठून) येतें (प्राप्त होतें) ? (१४)

(अस्मै वासः कः परि-अदधात् ?) याला कपडे कोणीं चढविले (कपडे = शरीर). (अस्य आयुः कः अकल्पयत् ?) याचें आयुष्य कोणीं नक्की केलें ? (अस्मै बलं कः प्रायच्छत्) याला बल कोणीं दिलें ? आणि (अस्य जवं कः अकल्पयत् ?) याचा वेग कोणीं नक्की केला ? (१५)

(केन आपः अन्वतनुत ?) पाण्यास कोणी पसरविलें ? (केन अहः रुचे अकरोत् ?) प्रकाशासाठीं दिवस कोणीं निर्माण केला ? (केन उषसं अनु ऐन्द्ध ?) उषेला कोणी चमक दिली ? (केन सायंभवं ददे) सायंकाळ कोणी दिली ? (१६)

(तन्तुः आ तायतां इति, अस्मिन् रेतः कः नि-अदधात् ?) प्रजारूपी तंतु चालू रहावा म्हणून याच्यांत वीर्य कोणी ठेवलें ? (अस्मिन्मेधां कः आधि-औहत् ? याच्यांत बुद्धीची जोड कोणी दिली ? (कः बाणं ?) वाणी कोणी ठेवली ? (कः नृतः दधौ ?) नृत्याचा भाव कोणीं ठेविला ? (१७)

(केन इमां भूमिं और्णोत् ?) या भूमीस आच्छादित कोणी केली ? (केन दिवं पर्यभवत् ?) द्युलोकास वर कोणीं ठेविलें ? (केन मह्ना पर्वतान् अभि) पर्वतांत महत्त्व कोणीं स्थापन केलें ? (पुरुषः केन कर्माणि ?) पुरुष कर्में कोणामुळें करीत आहे ? (१८)

(पर्जन्यं केन अन्वेति ?) पाऊस कोणामुळें मिळतो ? (विचक्षणं सोमं केन ?) विचित्र असा सोम कोठून मिळतो ? (केन यज्ञं च श्रद्धां च ?) कोणामुळें यज्ञ आणि श्रद्धा प्राप्त होतात. (अस्मिन् मनः केन निहितं ?) याच्यांत मन कोणीं ठेविलें ? (१९)

ब्रह्म श्रोत्रियमाप्नोति ब्रह्मेमं परमेष्ठिनम् ।
ब्रह्मेममग्निं पूरुषो ब्रह्म संवत्सरं ममे ॥ २१ ॥
केन देवाँ अनु क्षियति केन दैवजनीर्विशः ।
केनेदमन्यन्नक्षत्रं केन सत्क्षत्रमुच्यते ॥ २२ ॥
ब्रह्म देवाँ अनु क्षियति ब्रह्म दैवजनीर्विशः ।
ब्रह्मेदमन्यन्नक्षत्रं ब्रह्म सत्क्षत्रमुच्यते ॥ २३ ॥
केनेयं भूमिर्विहिता केन द्यौरुत्तरा हिता ।
केनेदमूर्ध्वं तिर्यक्चान्तरिक्षं व्यचो हितम् ॥ २४ ॥
ब्रह्मणा भूमिर्विहिता ब्रह्म द्यौरुत्तरा हिता ।
ब्रह्मेदमूर्ध्वं तिर्यक्चान्तरिक्षं व्यचो हितम् ॥ २५ ॥
मूर्धानमस्य संसीव्याथर्वा हृदयं च यत् ।
मस्तिष्कादूर्ध्वः प्रैरयत्पवमानोऽधि शीर्षतः ॥ २६ ॥
तद्वा अथर्वणः शिरो देवकोशः समुब्जितः ।
तत्प्राणो अभि रक्षति शिरो अन्नमथो मनः ॥ २७ ॥

अर्थ—(ब्रह्म श्रोत्रियं आप्नोति) ज्ञान ज्ञान्यास प्राप्त करून घेतें. (ब्रह्म इमं परमेष्ठिनं) ज्ञान या परमात्म्यास प्राप्त करून घेते. (पुरुषः ब्रह्म इमं अग्निं) मनुष्य ज्ञानद्वारा त्या अग्निला प्राप्त करून घेतो. (ब्रह्म संवत्सरं ममे) ज्ञानच संवत्सरकालाचें माप काढूं शकतें. (२१)

(केन देवान् अनु क्षियति ?) देवांना अनुकूल बनवून वसविण्याचें कोणाकडून होऊं शकते ? (केन दैवजनीः विशः ?) दिव्य जनरूप प्रजेला अनुकूल बनवून कोण वसवूं शकतो ? (केन सत् क्षत्रं उच्यते ?) कुणामुळें उत्तम क्षत्रिय म्हटलें जातें. (केन इदं अन्यत् न क्षत्रम्) कशामुळें हे दुसरे क्षत्रिय नाहींत असें म्हणूं शकतो ? (२२)

(ब्रह्म देवान् अनु क्षियति) ज्ञान देवांना अनुकूळ करून वसवितें (ब्रह्म दैवजनीः विशः) ज्ञानच दिव्य जनरूप प्रजेला अनुकूळ करून घेऊन वसवूं शकतें. (ब्रह्म सत् क्षत्रं उच्यते) ज्ञान हेंच उत्तम क्षात्र होय असें म्हटलें जातें. (ब्रह्म इदं अन्यत् नक्षत्रम्) ज्ञान हेंच दुसरें नक्षत्र म्हणजे क्षात्राशिवाय दुसरें अन्य बळ आहे. (२३)

(केन इयं भूमिः विहिता ?) ही भूमि विशेष रीतीनें कोणीं ठेविली आहे ? (केन द्यौः उत्तरा हिता) द्युलोकास उंचावर कोणीं टिकवून धरिलें आहे ? (केन इदं अन्तरिक्षं उर्ध्वं तिर्यक् व्यचः च हितम् ?) या अंतरिक्षास वर तिरपें आणि पसरलेलें कोणीं ठेविलें आहे ? (२४)

(ब्रह्मणा भूमिः विहिता) ब्रह्मानें ही भूमि विशेष प्रकारें ठेविली आहे. (ब्रह्म द्यौः उत्तरा हिता) ब्रह्मानें हा द्युलोक वर ठेविला आहे. (ब्रह्म इदं अन्तरिक्षं ऊर्ध्वं, तिर्यक् व्यचः च हितम्) ब्रह्मानेंच हें अंतरिक्ष वर, तिरपें आणि पसरून ठेविलें आहे (२५)

(अथर्वा अस्य मूर्धानं यत् च हृदयं संसीव्य) अ-थर्वा म्हणजे, निश्चल योगी स्वतःचें मस्तक अथवा हृदय स्वतः मध्येंच शिवून घेऊन (पवमानः शीर्षतः अधि, मस्तिष्कात् ऊर्ध्वः प्रैरयत्) प्राण मेंदूचें आंत परंतु मस्तकावर प्रेरित करतो. (२६)

(तद् वा अथर्वणः शिरः समुब्जितः देव-कोशः) तें निश्चयानें योग्याचें मस्तक देवांचा सुरक्षित खजिनाच आहे. (तत् शिरः प्राणः अन्नं अथो मनः अभि रक्षाति) प्राण, अन्न आणि मन त्या शिराचें रक्षण करतात. (२७)

ऊर्ध्वो नु सृष्टा३स्तिर्यङ् नु सृष्टा३ः सर्वा दिशः पुरुष आ बभूवाँ३ ।
पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते ॥ २८ ॥
यो वै तां ब्रह्मणो वेदामृतेनावृतां पुरम् ।
तस्मै ब्रह्म च ब्राह्माश्च चक्षुः प्राणं प्रजां ददुः ॥ २९ ॥
न वै तं चक्षुर्जहाति न प्राणो जरसः पुरा ।
पुरं यो ब्रह्मणो वेद यस्याः पुरुष उच्यते ॥ ३० ॥
अष्टाचक्रा नवद्वारा देवानां पूरयोध्या ।
तस्यां हिरण्ययः कोशः स्वर्गो ज्योतिषावृतः ॥ ३१ ॥
तस्मिन्हिरण्यये कोशे त्र्यरे त्रिप्रतिष्ठिते ।
तस्मिन्यद्यक्षमात्मन्वत्तद्वै ब्रह्मविदो विदुः ॥ ३२ ॥
प्रभ्राजमानां हरिणीं यशसा संपरीवृताम् ।
पुरं हिरण्ययीं ब्रह्मा विवेशापराजिताम् ॥ ३३ ॥

अर्थ— (पुरुषः ऊर्ध्वः नु सृष्टाः) पुरुष वर निश्चयानें पसरलेला आहे. (तिर्यक् नु सृष्टाः) निश्चयेंकरून तो तिरपा पसरलेला आहे. तात्पर्य (पुरुषः सर्वाः दिशः आबभूव) पुरुष सर्व दिशांत आहे. (यः ब्रह्मणः पुरं वेद) जो ब्रह्माच्या नगरीस जाणतो (यस्याः पुरुषः उच्यते) ज्या नगरीमुळें त्यास पुरुष असें म्हणतात. (२८)

(यः वै अमृतेन आवृतां तां ब्रह्मणः पुरं वेद) जो निश्चयेंकरून अमृतानें परिपूर्ण त्या ब्रह्माच्या नगरीला जाणतो (तस्मै ब्रह्म ब्राह्माः च चक्षुः प्राणं प्रजां च ददुः) त्याला ब्रह्म आणि इतर देव डोळे, प्राण आणि प्रजा देत आले आहेत. (२९)

(यस्याः पुरुष उच्यते ब्रह्मणः पुरं यः वेद) ज्यामुळें (आत्म्याला) पुरुष असें म्हणतात, त्या ब्रह्माच्या नगरीला जो जाणतो (तं जरसः पुरा चक्षुः न जहाति, न वै प्राणः) याला वृद्धावस्थेच्या पूर्वी चक्षु सोडत नाहीं, आणि प्राणही सोडत नाहीं. (३०)

(अष्टा-चक्रा नवद्वारा अयोध्या देवानां पूः) ज्यास आठ चक्रें व नऊ द्वारें आहेत अशी ही अयोध्या देवांची नगरी आहे. (तस्यां हिरण्ययः कोशः, ज्योतिषा आवृतः स्वर्गः) त्यामध्यें तेजस्वी कोश आहे, जो तेजानें परिपूर्ण स्वर्गच होय. (३१)

(त्रि-अरे त्रि-प्रतिष्ठिते तस्मिन् तस्मिन् हिरण्यये कोशे यत् आत्मन्वत् यक्षं, तद् वै ब्रह्मविदः विदुः) तीन आरांनीं युक्त तीन केंद्रांत स्थिर अशा त्या तेजस्वी कोशांत जो आत्मवान् यक्ष आहे त्यास निश्चयेंकरून ब्रह्मज्ञानी जाणतात. (३२)

(प्रभ्राजमानां हरिणीं, यशसा सं परीवृतां अपराजितां हिरण्ययीं पुरं ब्रह्म आविवेश) तेजस्वी दुःख हरण करणारी यशानें परिपूर्ण, कधींहि पराजित न होणारी अशा प्रकाशमय नगरींत ब्रह्म समावलेलें असतें. (३३)

केन सूक्ताचा विचार

स्थूल शरीरांतील अवयवांसंबंधीं प्रश्न

(१) अवयव कोणीं निर्माण केले ?

चौथ्या मंत्रांत ' कति देवाः ' देव किती आहेत. जे या मनुष्याचे अवयव बनविणारे आहेत ? असा प्रश्न उत्पन्न होतो. या पूर्वीच्या आणि नंतरच्या मंत्रांत सुद्धां ' देव ' शब्दाचा अर्थ पूर्वापरसंबंध पाहून केला पाहिजे. ' मनुष्याच्या टांचा कोणत्या देवानें केल्या ? ' इत्यादि प्रकारें अर्थ सर्वत्र समजला पाहिजे. मनुष्याचें शरीर एकाच देवानें केलें आहे कीं अनेक देवांनीं मिळून ? आणि कोणत्या देवानें कोणता भाग-अवयव तशींच इंद्रियें बनविलीं हा या प्रश्नाचा सारांश आहे. याचप्रमाणें पुढेंहि समजलें पाहिजे.

(२) ज्ञानेन्द्रियें आणि मानसिक भावनासंबंधीं प्रश्न

सहाव्या मंत्रांत सात इंद्रियांच्या नांवें आलेलीं आहेत. दोन कान, दोन नाक, दोन डोळे आणि एक मुख. हीं सात इंद्रियें ज्ञानाचीं आहेत. वेदांत अन्यत्र यांसच, १ सप्त ऋषि, २ सप्त अश्व, ३ सप्त किरण, ४ सप्त अग्नि, ५ सप्त जिह्व, ६ सप्त प्राण इत्यादि नांवांनीं वर्णन केलें आहे. त्या त्या स्थानीं याच शब्दाचा अर्थ समजून त्या त्या मंत्रांचा अर्थ केला पाहिजे. गुदा आणि मूत्रद्वार हीं आणखीं दोन छिद्रें आहेत. सर्व मिळून या शरीरांचीं नवद्वारें होतात. मुख हें पूर्वद्वार आहे आणि गुदा हें पश्चिमद्वार आहे. या शरीररूपीं नगरास अशीं नऊ महाद्वारें आहेत. दुसरीं द्वारें हीं पूर्व पश्चिमद्वारापेक्षां लहान आहेत. (याच सूक्ताचा ३१ वा मंत्र पहा.)

खरें पाहतां ' पूरुष ' शब्द **(पुर्+वस्)** त्या नगरींत राहणाऱ्यास उद्देशून आहे, त्यामुळें सर्वसाधारणपणें सर्व प्राणीमात्रांचा वाचक तो शब्द आहे. असें असलें तरी येथील वर्णन हें मनुष्यशरीरास उद्देशून आहे असेंच समजणें योग्य होईल. ' चतुष्पाद आणि द्विपाद ' शब्दांनीं संपूर्ण प्राणीमात्रांचा बोध ६ व्या मंत्रांत घेणें आवश्यकच आहे. त्याच प्रकारें अन्य मंत्रांतहि अर्थ गृहीत धरण्यानें कांहीं हानि होणार नाहीं. पण मंत्र ७ मध्यें वाणीचें वर्णन आहे तें मनुष्यवाणीचेंच होय. कारण सर्व प्राण्यांची वाणी मनुष्याइतकी पूर्ण विकसित झालेली नाहीं. मंत्र ९-१० मध्यें **' मतिः अमतिः '** इत्यादि शब्द मनुष्याचेंच वर्णन करीत आहेत. याप्रमाणें जरी सर्वत्र मुख्यतः मनुष्याचें वर्णन आहे तरी पण जे मंत्र प्रसंगविशेषीं सामान्य अर्थाचे बोधक आहेत ते सर्व सामान्य प्राणिजातीबद्दल आहेत असें समजण्यांत कांहीं वावगें नाहीं.

आठव्या मंत्रांतील ' स्वर्गावर चढणारा देव कोणता आहे ? ' हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. हा मंत्र जीवात्म्याचा मार्ग दाखवितो. या मंत्राचा दुसरा यांत न सांगितलेला भाग आहे, तो असा कीं ' नरकांत कोण पडतो ? ' तात्पर्य मनुष्य स्वर्गांत कां जातो आणि नरकांत कशासाठीं पडतो ?

मंत्र ९ आणि १० यांत उत्तम आणि कनिष्ठ अशा दोन्ही स्थितींसंबंधीं प्रश्न आहेत. १ अप्रिय, स्वप्न, संबाध, तंद्री, आर्ति, अवर्ति, निर्ऋति, अमति हे शब्द हीन अवस्था दाखवितात; आणि २ प्रिय, आनंद, नंद, राद्धि, समृद्धि, अव्यृद्धि, मति, उदिति हे शब्द उच्च स्थितीचे दर्शक आहेत. दोन्ही स्थानांत आठ आठ शब्द आहेत आणि त्यांना परस्परसंबंधहि आहे. वाचक विचार करतील तर हा अर्थ समजू शकतील. तसेंच—

(३) रक्त, प्राण, चारित्र्य, अमरत्व वगैरे विषयासंबंधीं प्रश्न

मंत्र ११ मध्यें या शरीरांत रक्तप्रवाह कोणी संचारित केला, असा प्रश्न केला आहे. बहुतेक लोक असें समजतात कीं शरिरांतील रुधिराभिसरणाचें तत्त्व युरोपांतील डॉक्टरांनीं शोधून काढलें, परंतु अथर्ववेदांत या मंत्रानें तें तत्त्व स्पष्ट सांगितलें आहे. रक्तासाठीं या मंत्रांत **' लोहिनीः आपः '** असा शब्द आहे त्याचा अर्थ- **' (लोह-नीः)** लोहास स्वतः बरोबर घेऊन जाणारें **(आपः)** पाणी याप्रमाणें होतो. अर्थात् रक्तांत पाणी आहे आणि त्याचेबरोबर लोहही आहे. रक्तांत लोखंड असल्यानें त्याचा रंग लाल असतो. लोह ज्यांत आहे तें **(लोह+इत)** ' लोहित ' होय. रक्त दोन प्रकारचें असतें. एक **' अरुणाः आपः '** अर्थात् लाल रंगाचें आणि दुसरें **' ताम्र-धूम्राः आपः '** तांब्यांत गंज चढलेल्या रंगाचें म्हणजे मलयुक्त. पहिल्या प्रकारचें रक्त शुद्ध आहे. तें हृदयांतून बाहेर जातें व सर्व शरीरांत वर, खालीं आणि सर्वत्र व्यापून असतें. दुसरे मळकट रंगाचें रक्त आहे, जें सर्व शरीरांतून फिरून ते ते अवयव शुद्ध करीत (तेथील मल गोळा करीत) हृदयाकडे परत येतें. या प्रकारचीं आश्चर्यकारक रुधिराभिसरणाची योजना कोणी निर्माण केली, असा प्रश्न येथें विचारला आहे. हें कार्य कोणत्या देवतेचें

आहे त्याचा वाचकांनीं विचार करावा.

१२ व्या मंत्रांत विचारलें आहे कीं ' मनुष्यामध्यें सौंदर्य, महत्व, कीर्ति, प्रयत्न, शक्ति, ज्ञान आणि चारित्र्य कोणत्या देवतेच्या प्रभावानें दृश्यमान होतात ? या मंत्रांतील चरित्र या शब्दाचा अर्थ कित्येक लोक (चर = चालणें) या धातुवरून चालण्याची क्रिया करणारे ' पाय ' असा करतात. परंतु या मंत्राचा पूर्वापरसंबंध लावतां तसा अर्थ निघत नाहीं. कारण स्थूल पायाचें (शरीरावयवांपैकीं भाग) वर्णन पहिल्या मंत्रांत होऊन गेलें. येथें तर शरीराच्या सूक्ष्मतर गुणधर्मांचें वर्णन चालू आहे. त्याप्रमाणें महिमा, यश, ज्ञान इत्यादींच्या बरोबर चारित्र्य हाच अर्थ योग्य दिसतो.

मंत्र १५ मध्यें ' **वासः** ' शब्द ' कपडे ' या अर्थी आहे. येथें जीवात्म्यावर जे शरीररूप कपडे आहेत त्या संबंधीं हा उल्लेख आहे. त्यांचा संबंध धोतर, कुडतें वगैरे कपड्यांशीं नाहीं. श्रीमद्‌भगवद्‌गीतेंत म्हटलें आहे कीं ' ज्या प्रकारें मनुष्य जुन्या कपड्यांचा त्याग करून नवे धारण करतो त्याप्रमाणें शरीराचा स्वामी आत्मा जुन्या शरीराचा त्याग करून नवीन शरीर धारण करतो (गी. अ. २।२२)' त्यांत शरीराची तुलना कपड्यांशीं केली आहे. या गीताश्लोकांत ' **वासांसि** ' अर्थात् ' **वासः** ' हाच शब्दप्रयोग आहे. याप्रमाणें गीतेंतील कल्पना अथर्ववेदावरून घेतली आहे. कित्येक विद्वान् लोक या मंत्रांतील ' **वासः** ' शब्दाचा अर्थ ' **निवासः** ' असा करतात, परंतु पुढें ' **परि-अधात्** ' (धारण करविलें) ही क्रिया दाखविते कीं येथें कपडे घालणें हेंच सूचित आहे. या आत्म्यावर शरीररूपीं कपडे कोणी घातले असें या प्रश्नाचें सरळ तात्पर्य आहे.

(४) मन, वाणी कर्म, मेधा, श्रद्धा आणि बाह्य जगासंबंधीं प्रश्न

(समष्टि-व्यष्टीचा संबंध)

१५ व्या मंत्रापर्यंत व्यक्तीच्या शरीरासंबंधीं विविध प्रश्न विचारण्यांत आले होते, परंतु १६ व्या मंत्रापासून विश्वासंबंधीं प्रश्न विचारले जात आहेत आणि यापुढें मंत्र २१-२२ मध्यें तर समाज आणि राष्ट्रासंबंधीं पण प्रश्न येतील. तात्पर्य यावरून वेदाच्या शैलीचा आपणांस अंदाज कळतो. (१) अध्यात्मांत व्यक्तीचा संबंध, (२) आधिभौतिकांत प्राणिसमष्टीचा अर्थात् सामाजिक संबंध आणि (३) आधिदैवतांत संपूर्ण जगाचा संबंध आहे. वेद व्यक्तीपासून सुरवात करून पुढें विस्तार पावतां पावतां संपूर्ण विश्वाचें ज्ञान यथाक्रम देत आहेत. हीच वेदाची शैली आहे. जे ही समजूं शकत नाहींत त्यांच्या ध्यानीं वरील प्रश्नाची संगति येऊं शकत नाहीं; म्हणून ही शैली बरोबर समजून घेतली पाहिजे.

वेद हें समजावून सांगतात कीं ज्याप्रमाणें एकेक अवयव हात पाय आदि शरीराशीं जोडलेला आहे, तद्वत् एक शरीर-व्यक्ति समाजाशीं आणि समाज जगाशीं जोडलेला आहे. ' व्यक्ति, समाज आणि जग ' हे भिन्न होऊं शकत नाहींत. हात, पाय इत्यादि अवयव ज्याप्रमाणें शरीरांत आहेत तद्वत् व्यक्ति आणि त्यांनीं बनलेलें कुटुंब हें समाजाशीं संलग्न आहे, आणि सर्व प्राणिमात्रांची समष्टि-समुदाय संपूर्ण जगाशीं संलग्न आहे. त्यामुळें तिघांसही एकच नियम लागू पडतात.

सोळाव्या मंत्रांत, ' **आप् अहः उषा सायंभव** ' या चार शब्दांनीं अनुक्रमें बाह्य जगांतले ' पाणी, दिवस, उषःकाल आणि सायंकाल ' यांचा उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें व्यक्तीच्या शरीरांत ' जीवन, जागृति, इच्छा आणि विश्रांति ' यांचे ते द्योतक आहेत. त्यामुळें या १६ व्या मंत्राचा भाव (अर्थ) उभयपक्षीं समजावयास हवा. हे चारी भाव समाज आणि राष्ट्रासहि लागू पडतात. सामाजिक जीवन, राष्ट्रीय जागृति, जनतेची इच्छा आणि लोकांचा आराम हे भाव सामुदायिक जीवनांत आहेत. वाचकांनीं याप्रकारें या मंत्राचा भाव समजून घ्यावा.

मंत्र १७ मध्यें पुनः वैयक्तिक गोष्टी येतात. प्रजातंतु अर्थात् वंशवेल तुटून न जावी म्हणून शरीरांत वीर्य आहे ही गोष्ट येथें स्पष्ट शब्दांत मांडली आहे. तैत्तिरीय उपनिषदांत ' **प्रजातन्तुं मा व्यवच्छेत्सीः** ' (तै. १।११।१) वंशवेल तोडूं नकोस, असा उपदेश केला आहे. तोच भाव येथें सूचित केला आहे. येथें दुसरीहि एक गोष्ट स्पष्ट होते कीं शरीरांतील वीर्य ही उधळपट्टी करण्याची गोष्ट नव्हे, म्हणून कामोपभोगामध्यें अतिरेक करून वीर्यनाश करून घेऊं नका. परंतु तें सुरक्षित ठेऊन सुंदर, सुदृढ उत्तम संतति निर्माण करण्यासाठीं त्याचा उपयोग करा. याच सूक्तांत पुढें २९ व्या मंत्रांत, ' जो ब्रह्माची नगरी जाणतो त्यास ब्रह्म आणि इतर देव उत्तम इंद्रियें, दीर्घजीवन आणि उत्तम संतति देतात, ' असें म्हटलें आहे. त्या मंत्राच्या अनुसंधानांत या मंत्राचा विचार केला पाहिजे. वंश अथवा कुलाचा नाश होता कामा नये आणि संततीचा क्रम चालू राहिला पाहिजे. इतकेंच नव्हे तर उत्तरोत्तर संततीमध्यें शुभगुण वाढत गेले पाहिजेत. एवढ्यासाठीं वरील सूचना दिली आहे. अज्ञानी लोक दुर्व्यसनामध्यें वीर्याचा नाश करितात, आणि यामुळें ते स्वतःच्या कुलाचाहि नाश करून घेतात; पण ज्ञानी लोक वीर्याचें संरक्षण करून सुसंतति निर्माण करून तद्वारां स्वतःचें तसेंच कुलाचें रक्षण करतात.

धार्मिक आणि अधार्मिकांत हाच फरक आहे.

याच मंत्रांत 'बाण' शब्द 'वाणी' चा वाचक आणि '**नृतः**' शब्द 'नाच्या' चा वाचक आहे, मनुष्य बोलत असतां हातापायांनीं आणि शरीराच्या विशिष्ट हालचालींनीं त्याचप्रमाणें चेहऱ्यावरील हावभावांनीं आपलें बोलणें स्पष्टपणें व्यक्त करण्याचा प्रयत्न करतो. यासच '**नृत्**' असें म्हणतात. भाषणाबरोबर मनाचे भाव प्रगट करण्यासाठीं अंगांचीं विवक्षित हालचाल दिसली पाहिजे हा आशय येथें स्पष्ट केला आहे.

मंत्र १८ मध्यें जगतासंबंधीं प्रश्न आहे. भूमि, द्युलोक आणि पर्वत कोणीं व्यापिले आहेत ? अर्थात् व्यापक परमात्मा सर्व जगांत व्यापून राहिला आहे, हेंच त्याचें उत्तर पुढें मिळणार आहे. व्यक्तीमध्यें ज्याप्रमाणें आत्मा आहे त्याप्रमाणें जगतांत परमात्मा व्याप्त आहे. पुरुष शब्दानें दोघांचा उल्लेख होतो. व्यक्तीमध्यें जीवात्मा पुरुष आणि जगतांत परमात्मा पुरुष होय. हा आत्मा कर्मे कशासाठीं करतो ? हा प्रश्न या मंत्रांत विचारला आहे.

१९ मध्यें यज्ञ करण्याचा भाव आणि श्रद्धेची श्रेष्ठ भावना मनुष्यांत कशी निर्माण होते हा प्रश्न आहे. वाचकांनीं याचा सखोल विचार करावा कारण या गुणांवरच माणसांचें श्रेष्ठत्व अवलंबून आहे. असे भाव मनांत दृढमूल होतात आणि मनाच्या प्रभावानेंच मनुष्य श्रेष्ठ होत असतो. त्याप्रमाणेंच—

(५) ज्ञान आणि ज्ञानी

मंत्र २० मध्यें चार प्रश्न आहेत आणि त्यांचीं उत्तरें मंत्र २१ मध्यें दिलीं आहेत. श्रोत्रियांस कसें प्राप्त करून घ्यावें ? गुरूंस कसें प्राप्त करून घ्यावें ? त्याचें उत्तर— 'ज्ञानानेंच प्राप्त करावें.' अर्थात् गुरूला ओळखण्यासाठीं शिष्यामध्यें ज्ञान असलेंच पाहिजे. अन्यथा, ढोंगी धूर्तांच्या जाळ्यांत सांपडणें अशक्य नाहीं. (फसण्याची पूर्ण शक्यता असते.)

परमात्म्यास कशाप्रकारें मिळवावें ? या प्रश्नाचें उत्तर 'ज्ञानानें' च परमात्म्याचें ज्ञान होतें असें आहे. '**परमेष्ठी**' या शब्दाचा अर्थ 'परमश्रेष्ठ स्थानीं रहाणारा आत्मा' असा आहे. जे अत्यंत दूर दूर असें स्थान तेथें रहाणारा जो तो परमेष्ठी परमात्मा होय. (१) स्थूल, (२) सूक्ष्म, (३) कारण आणि (४) महाकारण यांपासूनहि तो दूर आहे. त्याचें ज्ञान अथवा त्याची ओळख ज्ञानानेंच मात्र होऊं शकेल. सर्व प्रथम स्वतःचें ज्ञानानें सद्गुरु प्राप्त केला पाहिजे. त्यानंतर त्या सद्गुरुद्वारां दिव्यज्ञान प्राप्त करून घेऊन परमेष्ठी परमात्म्यास जाणतां येते.

*

तिसरा प्रश्न 'अग्नि कसा प्राप्त होतो ?' असा आहे. येथें अग्नि शब्दाचा सामान्य आग्नेयभाव असा अर्थ घेणें उचित आहे. ज्ञानाग्नि, आत्माग्नि, प्राणाग्नि, ब्रह्माग्नि इत्यादि जे सांकेतिक अग्नि आहेत त्यांचा बोध–अर्थ घेणें योग्यच आहे; कारण गुरूचा उपदेश आणि परमात्मज्ञानाशीं संबंधित असें तेज तद्विषयीं भाव येथें समजणें योग्य होईल. तें सर्व गुरूच्या उपदेशानें प्राप्त होणाऱ्या ज्ञानानेंच मिळविलें जाणार आहे.

चौथा प्रश्न संवत्सराच्या गणनेविषयीं आहे. 'संवत्सर' हा 'वर्षाचा' प्रतिशब्द आहे, म्हणजे त्यापासून कालाचा बोध होतो. त्याशिवाय संवत्सराचा असाहि अर्थ आहे– **(सं सम्यक् वसति वासयति वा स सं-वत्सरः)** जो स्वतः सर्वत्र उत्तमप्रकारें रहातो आणि सर्वांस उत्तमप्रकारें वसवितो त्यास संवत्सर म्हणावें. विष्णु-सहस्रनामांत संवत्सराचा अर्थ सर्वव्यापी परमात्मा असा केला आहे. 'सम्यक् निवास' एवढाच अर्थ येथें अपेक्षित आहे. सम्यक् निवास म्हणजे उत्तम प्रकारें रहाणें हें कोणामुळें शक्य आहे ? हा प्रश्न आहे. त्याचें उत्तर 'ज्ञानानेंच उत्तम निवास होऊं शकतो' असें दिलें आहे. म्हणजे ज्ञानानेंच मनुष्य सामुदायिक आणि वैयक्तिक कर्तव्यें जाणूं शकतो आणि ज्ञानाच्या सहाय्यानेंच त्यांचें योग्य पालन करूं शकतो. तात्पर्य, व्यक्ति, समाज आणि जगांत उत्तम शांतीची स्थापना उत्तम ज्ञानामुळें होते. ज्ञान हेंच सर्व सुस्थितीचें कारण आहे. अशाप्रकारें या मंत्रद्वारा ज्ञानाचें महत्त्व वर्णिलें आहे.

ज्ञान हा आत्म्याचा गुण असल्यानें येथें ब्रह्मशब्दानें आत्म्याचाही बोध होतो, आणि आत्मज्ञानानेंच हें सर्व होतें, हा भाव व्यक्त होतो. कारण ज्ञान हें आत्म्याहून निराळें नाहीं. त्यामुळें ब्रह्म शब्दाचा अर्थ ज्ञान, आत्मा, परमात्मा, परब्रह्म इत्यादि होतो.

(६) देव आणि देवजन

२२ व्या मंत्रांतील 'देव' शब्दाचे तीन अर्थ होतात. (१) इंद्रियें, (२) ज्ञानी, शूर वगैरे सज्जन आणि (३) अग्नि, इंद्र इत्यादि देवता. हे अर्थ घेऊन पहिल्या प्रश्नाचा अर्थ लावला पाहिजे. देवांस अनुकूळ करून घेऊन त्यांस उत्तम स्थान देणें हें काम कोण करूं शकतो ? असा प्रश्न आहे. त्याचें उत्तर खालीलप्रमाणें आहे—

(१) आध्यात्मिक भाव=व्यक्तीच्या देहांत=इंद्रियें, अवयव, आणि सर्व अंगें अनुकूल कशापासून बनविण्यांत येतात ? आणि त्यांचें स्वास्थ्यपूर्वक वास्तव्य कोण करूं शकतो ? त्याचें उत्तर ज्ञानानें इंद्रियें अनुकूल करून घेतां येतात आणि त्यांचा निवास उत्तम स्वास्थ्यपूर्वक होण्याची व्यवस्था करण्यांत येते असें आहे.

(२) आधिभौतिक भाव=राष्ट्राच्या देहांत राष्ट्रांत देवांचें पंचायतन असतें. एक ' ज्ञान-देव ' ' ब्राह्मण असतात. दुसरा 'बल-देव' क्षत्रिय, तिसरा ' धन-देव ' वैश्य, चौथा ' कर्म देव ' शूद्र होय. पांचवा ' वन-देव ' नगराबाहेर (रानांत) राहणारे लोक. या पांचांचे प्रतिनिधि ज्या सभेंत असतात त्या सभेस ' पंचायत ' अथवा ' पंचायतन ' म्हणतात आणि त्या सभेच्या सभासदांना पंच म्हणतात.

हे पांची प्रकारचे देव राष्ट्रपुरुषाच्या शरीरांत अनुकूल होऊन कोणामुळें राहतात ? हें या प्रश्नाचें सार आहे. ' ज्ञानानेंच सर्व माणसें अनुकूल व्यवहार करतात आणि ज्ञानानेंच सर्वांचा योग्य निवास होत असतो ' हें या प्रश्नाचें उत्तर आहे. राष्ट्रांत ज्ञानाचा प्रसार होण्यामुळें सर्वांचे व्यवहार उत्तम चालतात. या दोन्ही मंत्रांत ' दैव-जनीः विशः ' असे शब्द आहेत. त्याचा अर्थ ' **देवांपासून जन्मलेली प्रजा** ' असा होतो, अर्थात् सर्व प्रजाजनांच्या उत्पत्तीचें कारण देवच आहेत. ही सर्व प्रजा देवांची आहे. तात्पर्य कोणी स्वतःचे स्वतःला नीच मानूं नये अथवा दुसऱ्यास हीन-दीन समजूं नये. कारण कीं सर्व लोक देवांपासून उत्पन्न झाले आहेत, तेव्हां सर्वच श्रेष्ठ आहेत आणि समान आहेत. त्यांची उन्नति ज्ञानानें होणार आहे.

(३) आधिदैविक भाव = जगतांत = अग्नि, विद्युत्, वायु, सूर्य, इत्यादि देवांना अनुकूल करण्याचें कार्य कोणामुळें होतें ? आणि निवासासाठीं त्यांच्याकडून मदत कशी मिळते ? या प्रश्नाचें उत्तर सुद्धां ' ज्ञानानेंच हें सर्व होतें ' हेंच आहे. ज्ञानानेंच भूमि, जल, तेज, वायु, सूर्य इत्यादि देवतांचें आनुकूल्य संपादन करून स्वतःच्या सुखकारक निवासासाठीं त्यांचें साहाय्य मिळवितां येतें; अथवा जें ज्ञानस्वरूप ब्रह्म आहे तेंच हें सर्व करतें- करवितें. या प्रश्नांचीं तीन्ही ठिकाणीं उत्तरे अशींच मिळतात. येथें ' ब्रह्म ' शब्दाचा अर्थ ' ज्ञान, आत्मा, परमात्मा' वगैरे असा होतो कारण कीं केवळ ज्ञान आत्म्यापासून भिन्न असूं शकत नाहीं.

दुसऱ्या प्रश्नांत ' **दैव-जनीः विशः** ' अर्थात् दिव्य प्रजा परस्पर अनुकूल बनून सुखपूर्ण निवास कशा प्रकारें करतात ? असा आशय आहे. याविषयीं पूर्वी लिहिलें आहेच. या प्रश्नाचें उत्तर सुद्धां ' **ज्ञानानेंच हें सर्व होतें हेंच आहे.** '

तिसऱ्या प्रश्नांत विचारलें आहे कीं ' **सत् क्ष-त्रं** ' उत्तम क्षात्र कोणापासून उत्पन्न होतें ? क्षतापासून अर्थात् दुःखापासून जें त्राण अर्थात् रक्षण केलें जातें त्याला क्षत्र असें म्हणतात. दुःख, कष्ट, आपत्ति, हानि, अवनति, इत्यादींपासून बचाव करण्याची शक्ति कोणापासून प्राप्त होते ? असा प्रश्न आहे. त्याचें उत्तर ' ज्ञानानें ती शक्ति येते ' हेंच आहे. ज्ञानानें सर्व दुःखें नाहींशी होतात ही गोष्ट व्यक्तीसंबंधीं जितकी खरी आहे तितकीच समाज आणि राष्ट्र यांच्या बाबतींतहि अगदी खरी आहे.

' दुसरा न-क्षत्र कोणापासून होतो ? ' असा चौथा प्रश्न आहे. येथें ' न-क्षत्र ' शब्द विशेष अर्थी योजिला आहे. आकाशांत जे तारागण आहेत त्यांस 'नक्षत्र' म्हणतात, कारण कीं ते (न-क्षरन्ति) स्वतःच्या स्थानापासून पतित होत नाहींत; म्हणजे खालीं पडत नाहींत असा भाव जो ' न-क्षत्र ' शब्दांत आहे तोच येथें अभीष्ट आहे. हा अर्थ घेण्यामुळें उक्त प्रश्नाचें तात्पर्य खालीलप्रमाणें होईल. ' हा पतन न होण्याचा दुसरा सद्गुण कोणापासून प्राप्त होतो ? ' त्याचें उत्तर सुद्धां 'ज्ञानानेंच पतन न होण्याचा सद्गुण प्राप्त होतो, ' असा आहे. ज्याच्याजवळ ज्ञान असतें तो स्वस्थानापासून कधींच भ्रष्ट होत नाहीं. हें व्यक्तीविषयीं जितकें सत्य आहे तितकेंच समाज आणि राष्ट्राच्या बाबतींत सुद्धां आहे; म्हणजे ज्ञानामुळें एका व्यक्तीमध्यें एवढें सामर्थ्य एकवटतें कीं ती व्यक्ति स्वतःच्या उच्च अवस्थेवरून अथवा स्थितीपासून खालीं पतन पावत नाहीं; त्याचप्रमाणें ज्या समाजांत अथवा राष्ट्रांत भरपूर ज्ञान असतें त्या समाजाची किंवा राष्ट्राची अवनति कधींच होत नाहीं.

या मंत्रांत व्यक्ति आणि समाजाच्या उन्नतीचीं तत्वें उत्तम रीतीनें सांगितलीं आहेत. ज्ञानामुळें व्यक्तीचीं इंद्रियें त्याप्रमाणेंच राष्ट्राचीं पांच अंगें उत्तम अवस्थेंत रहातात. प्रजेची उन्नति होते, तिच्यांत दुःख दूर करण्याचें सामर्थ्य येतें, आणि ज्ञानाच्या उच्च स्थानावरून ती कधीं पतन पावत नाहीं. येथें सुद्धां ज्ञानवाचक 'ब्रह्म' शब्द वापरला आहे, तो पूर्वोक्ताप्रमाणेंच 'ज्ञान, आत्मा, परमात्मा, परब्रह्म ' इत्यादींचा वाचक आहे; कारण कीं सत्य ज्ञान याच्यांतच राहिलें आहे.

(७) अधिदैवत

या प्रश्नोत्तरांत तिन्ही लोकांचा विषय आलेला आहे. त्यामुळें त्याचा विचार जरा सूक्ष्म दृष्टीनें केला पाहिजे. भूलोक, अंतरिक्ष-लोक, आणि द्युलोक मिळून तीन लोक होतात. ते व्यक्तींत आणि जगांत सुद्धां आहेत. पहा—

लोक	व्यक्तींतील रूप	राष्ट्रांत रूप	जगांत रूप
		(विशः)	
भूः-	बेंबीपासून गुदा-पर्यंतचा प्रदेश आणि पाय	जनता, प्रजा, धनी धनवान आणि कारागीर लोक	पृथ्वी (अग्नि)

	क्षत्रं	
भुवः– छाती आणि हृदय	शूरलोक, लोकसभा, समिति	अंतरिक्ष (वायु) इंद्र
	(ब्रह्म)	
स्वः-शिर	ज्ञानीलोक	द्युलोक
स्वर्ग– मस्तिष्क (मेंदू)	मंत्रिमंडळ	नभोमंडळ (सूर्य)

मंत्र २४ मध्यें 'पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोक यांना आपापल्या स्थानीं स्थिर कोणी केलें ?' असा प्रश्न विचारला आहे. आणि उत्तरांत, वर सांगितलेल्या 'तीनहि लोकांस ब्रह्मानें त्यांच्या स्थानांत स्थिर केलें आहे' असें सांगितलें आहे. वरील कोष्टकाप्रमाणें तीनहि लोक–व्यक्ति, राष्ट्र आणि जग यांत त्यांचें स्थान कोठें आहे तें कळून येतें. व्यक्तिमध्यें मस्तक, हृदय आणि नाभीच्या खालील भाग हे तीन लोक आहेत. आत्मा त्यांस आधारभूत आहे. शरीरांत अधिष्ठित जो अमूर्त आत्मा तो शरीरांतील या तीनहि केंद्रांस धारण करतो, आणि त्यांचे सर्व कार्य चालवितो. अमूर्त राजशक्ति राष्ट्रीय त्रिलोकांच्या संरक्षणाचा बंदोबस्त करते. आणि अमूर्त व्यापक ब्रह्म जगाच्या त्रैलोक्यास धारण करीत आहे.

या २४ व्या मंत्रांतील प्रश्नांत पूर्वोक्त सर्व मंत्रांतील प्रश्नांचा समावेश झालेला आहे. ही गोष्ट खास ध्यानांत ठेवण्यासारखी आहे कीं, पहिल्या दोन मंत्रांत नाभीच्या खालील शरीराच्या अवयवांसंबंधीं प्रश्न आहेत. मंत्र ३ ते ५ यांत मध्यभाग आणि छातीसंबंधीं प्रश्न आहेत आणि मंत्र ६ ते ८ मस्तकाविषयीं प्रश्न आहेत. याप्रमाणें हे प्रश्न व्यक्तींत समावलेल्या तीनहि लोकांविषयीं स्थूल शरीरासंबंधीं आहेत. मंत्र ९ ते १० मध्यें मनाची शक्ति आणि भावना यांविषयीं प्रश्न आहेत. मंत्र ११ मध्यें सर्व शरीरांतील व्यापक रक्ताविषयीं प्रश्न आहे. मंत्र १२ त नामरूप, यश, ज्ञान आणि चारित्र्य यासंबंधीं प्रश्न आहेत. मंत्र १३ प्राणासंबंधीं प्रश्नाचा आहे. मंत्र १४ आणि १५ जन्म, मृत्यु वगैरे विषयीं प्रश्नांचे आहेत. मंत्र १७ मध्यें संतति, वीर्य इत्यादि संबंधीं प्रश्न आहेत. हे सर्व मंत्र व्यक्तीच्या शरीरांत जे तीन लोक आहेत त्यासंबंधीं आहेत. वरील मंत्रांचा विचार केला असतां ही गोष्ट स्पष्ट होते. या मंत्रांचा–प्रश्नांचा क्रम पाहिला असतां असें दिसतें कीं स्थूल शरीराच्या पायापासून सुरवात करून सूक्ष्म आत्मशक्तिपर्यंतचे विचार वाचकांच्या मनांत उत्तम रीतीनें दृढ व्हावेत अशी ही वेदाची रचना आहे. जडशरीराच्या मोठ्या भागापासून सुरवात करून चेतन आत्म्यापर्यंत अनायासें वाचक येऊन पोचले आहेत. नुसते प्रश्न केल्यानेंच वाचकांला असें अद्भुत ज्ञान प्राप्त झाले आहे. ही खुबी प्रश्न विचारण्याची पद्धत आणि त्यांच्या क्रमांमध्यें आहे.

२४ व्या मंत्रांत प्रश्न केले आहेत कीं हे तिन्ही लोक कोणी धारण केले आहेत ? त्याचें उत्तर २५ व्या मंत्रांत दिलें आहे कीं 'ब्रह्मच या तिन्ही लोकांस धारण करतें.' अर्थात् शरीरांत रहाणाऱ्या तिन्ही लोकांना आधार शरीरांतील आत्म्याचा आहे. हा आध्यात्मिक भाव येथें स्पष्ट झाला आहे. याप्रमाणें ५० प्रश्नांचें उत्तर एकच मंत्रानें दिलें आहे.

अन्य मंत्रांतून (मंत्र १६, १८ आणि २४) पर्यंत जितके प्रश्न विचारले आहेत त्यांचें 'आधिभौतिक आणि आधिदैविक' असे दोन भाग पडतात. त्यांतील वैयक्तिक भाग पहिल्या विभागांत येऊन गेला आहे. त्याचें उत्तर सुद्धां २५ व्या मंत्रानेंच दिलें आहे. सर्वांस आधारभुत 'ब्रह्म' च आहे हें तें उत्तर आहे. तात्पर्य एकूण ७१ प्रश्नांस उत्तर एकच 'ब्रह्म' शब्द आहे. त्यांत सर्वांचा समावेश आहे. प्रश्नानुसार 'ब्रह्म' शब्दाचे अर्थ 'ज्ञान, आत्मा, परमात्मा, परब्रह्म' इत्यादि होऊं शकतात. त्याचा संबंध पूर्वीच्या विवरणांत दाखविला आहे.

व्यक्तीमध्यें किंवा जगतांत जें 'प्रेरक' आहे त्याचा 'ब्रह्म' शब्दानें असा बोध झाला. परंतु हा केवळ शाब्दिक बोध आहे. प्रत्यक्ष अनुभवाचा नाहीं. शब्दानें बोध झाला असतां मनांत अशी चिंता निर्माण होते कीं त्याचें प्रत्यक्ष ज्ञान कसें होईल ? आपणांस शरीराचें प्रत्यक्ष ज्ञान होऊं शकतें, आणि बाह्य जगताचें सुद्धां प्रत्यक्ष ज्ञान होऊं शकतें, पण त्यांच्या अंतर्यामी प्रेरकास कोणी जाणूं शकत नाहीं ? त्यास जाणण्याचा उपाय पुढील मंत्रांत सांगितला आहे—

(८) ब्रह्मप्राप्तीचा उपाय

या २६ व्या मंत्रांत अनुष्ठानासाठीं विद्या सांगितली आहे. जें आत्मस्वरूपाचें दर्शन करवितें तें अनुष्ठान हें आहे. सर्वप्रथम 'अथर्वा बनण्याची गोष्ट आहे.' 'अ-थर्वा' शब्दाचा अर्थ आहे निश्चल. थर्व शब्दाचा अर्थ गति अथवा चंचलता. चंचलता सर्व प्राणीमात्रांत असते. शरीर चंचल आहे त्यामुळें इंद्रियें चंचल आहेत. तीं कोठेंच स्थिर नसतात. त्यापेक्षांही मन चंचल आहे, या मनाच्या चंचलतेला तर सीमाच नाहीं. याप्रमाणें जी चंचलता आहे त्यामुळें आत्मशक्तीचा आविर्भाव होऊं शकत नाहीं. जेव्हां, मन, इंद्रियें आणि शरीर हीं स्थिर होतात तेव्हांच आत्म्याची शक्ति विकसित होऊन प्रगट होते.

आसनांच्या अभ्यासानें शरीराची स्थिरता होते, आणि शारीरिक आरोग्य प्राप्त झाल्यानें सुख मिळतें. ध्यानानें इंद्रियें स्थिर होतात आणि भक्तीनें मन शांत होतें. याप्रमाणें योगी स्वतःच्या चंचलतेचा निरोध करतो. त्यामुळें अशा योग्याला

' अ-थर्वा ' अर्थात् निश्चल असें म्हणतात. ही निश्चलता प्राप्त करण्यासाठीं पुष्कळ अभ्यासाची जरूरी आहे. सुगमतेनें ती साध्य होत नाहीं. वर्षानुवर्षे निरंतर व एकनिष्ठेनें प्रयत्न केल्यानेंच मनुष्य ' अ-थर्वा ' होऊं शकतो. या अथर्व्याचा जो वेद आहे त्यास अथर्ववेद म्हणतात. प्रत्येक मनुष्य योगी बनूं शकत नाहीं. त्यामुळें प्रत्येकास अथर्ववेद उपयोगाचा नाहीं, परंतु बाकी तीन वेद ' सद्बोध, सत्कर्म, सदुपासना ' रूप असल्यामुळें सर्व लोकांसाठीं आहेत आणि त्यामुळेंच वेदांस ' त्रयीविद्या ' असें म्हणतात. चतुर्थ ' अथर्व ' अथवा ' ब्रह्मवेद ' विशिष्ट स्थितीस पोंहोचण्याचा प्रयत्न करणाऱ्या विशिष्ट प्रकारच्या पुरुषासाठीं असल्यानें त्यास या ' त्रयी ' मध्यें गणण्यांत येत नाहीं. तात्पर्य या दृष्टीनें पाहिलें असतां सुद्धां ' अथर्वा ' ची विशिष्टता स्पष्ट समजून येते.

याप्रमाणें ' अ-थर्वा ' म्हणजे निश्चल झाल्यानंतर मस्तक आणि हृदय यांना एकरूप केलें पाहिजे. शिवणें याचा तात्पर्यार्थ एकत्र आणणें, एकाच कार्याला जुंपणें असा आहे. मस्तक विचार करण्याचें काम करतें तर हृदय भक्तींत तल्लीन होतें. मस्तकांतील तर्क जेव्हां चालू असतात तेव्हां हृदयांत भक्ति राहूं शकत नाहीं. याच्या उलट हृदय भक्तीनें परिपूर्ण भरलें तर तेथें तर्क बंद पडतो. फक्त तर्क वाढला तर नास्तिकता वाढेल आणि फक्त भक्ति वाढली तर अंधश्रद्धा वाढणें स्वाभाविक आहे. त्यामुळें या वेदमंत्रांत मस्तक आणि हृदय यांस एकरूप करण्यास सांगितलें आहे. याप्रमाणें मस्तक जर स्वतःचे तर्क भक्तियुक्त अंतःकरणानें करील तर नास्तिकपणास वाढूं देणार नाहीं आणि भक्ति करतां करतां जर हृदय आंधळें होऊं लागलें तर मस्तक त्यास ज्ञानरूपी नेत्र देईल. याप्रमाणें दोघांनीं एकरूप होण्यांतच दोघांचा लाभ आहे. मस्तकांत ज्ञानरूपी नेत्र आहेत आणि हृदयांतील भक्तींत मोठी शक्ति आहे. त्यामुळेंच जर दोन्ही एकत्रित झालीं तर मोठा लाभ होईल.

राष्ट्रीय शिक्षणाचा विचार करणारांस या मंत्रापासून पुष्कळच चांगला बोध मिळूं शकेल. शिक्षणाची व्यवस्था अशी असली पाहिजे कीं ज्यामुळें विद्यार्थ्यांची विचारशक्ति वाढेल, आणि त्याबरोबरच हृदयांतील भक्ति पण वाढावी. ज्या शिक्षणप्रणालिकेनें फक्त तर्कशक्ति वाढेल अथवा नुसती भक्ति वाढेल ती प्रणालिका फार विघातक होईल. मस्तक आणि हृदय यांना एका मार्गावर आणून त्यांस एकत्रित चालविण्याचा जो स्पष्ट उपदेश या मंत्रांत दिला आहे तो दुसऱ्या कोणत्याही ग्रंथांत नाहीं, किंवा दुसऱ्या कोणत्याहि शास्त्रांत ही गोष्ट नाहीं. वेदज्ञानाचें वैशिष्ट्य अशा प्रकारें या मंत्रानें सिद्ध होतें. उपासनेची सिद्धि यानेंच होते. वाचक या मंत्रांत वेद-ज्ञानाची सत्यता पाहूं शकतील.

पहिली अवस्था ' अ-थर्वा ' होण्याची आहे. त्यानंतर मस्तक आणि हृदय शिवून एकत्र करणें. जेव्हां दोनहि एका दिशेनें कार्य करूं लागतील तेव्हां उत्कृष्ट प्रगति होईल. तेवढी योग्यता प्राप्त करण्यास फार दृढ अभ्यासाची जरूरी आहे. त्यानंतर मस्तकावर आणि मेंदूचे आंत प्राणाची प्रेरणा करावयाची आहे. मेंदूत मस्तकाच्या श्रेष्ठ भागांत ब्रह्मलोक आहे. या ब्रह्मलोकांत प्राणासह आत्मा जातो. ही योगानें साध्य होणारी शेवटची पण उच्चतम अवस्था आहे. येथें प्राण कशा प्रकारें दाखल होतो ? असा प्रश्न विचारता येईल. गुदापाशीं मूलाधार स्थान आहे, तेथून प्राण पृष्ठवंशाच्या आंतून वर चढूं लागतो. मूलाधार, स्वाधिष्ठान इत्यादि आठ चक्रें या पृष्ठवंशाशीं किंवा मेरुदंडाशीं जोडलेलीं आहेत. त्यांतून प्रवास करतां करतां जसजसा अभ्यास वाढूं लागतो तसतसा प्राण वर चढतो आणि अंतीं ब्रह्मलोकांत किंवा मस्तकांत मेंदूच्यावर प्राण पोहोंचतो. त्यावेळीं त्या उपासकास ब्रह्मसाक्षात्कार होतो. तात्पर्य सर्वांस प्रेरक जें ब्रह्म तें प्राण येथें पोहोंचल्यानंतर अनुभविलें येतें. पहिल्या २५ मंत्रांच्या द्वारें ज्याचें वर्णन झालें त्यांस जाणण्याचा हाच एक मार्ग आहे. मस्तकाच्या तर्कशक्तिपलीकडे ब्रह्माचें स्थान आहे. त्यामुळें जोपर्यंत तर्कपरंपरा चालू राहील तोपर्यंत ब्रह्माचा अनुभव होत नाहीं. परंतु जेव्हां तर्कांच्या पलिकडे आपण पोहोंचतों त्याच वेळीं त्या ब्रह्मतत्त्वाचा अनुभव आपणांस होतो. या अनुष्ठानाचें फळ पुढील चार मंत्रांत सांगितलें आहे.

(९) अथर्व्याचें शिर

या २७ व्या मंत्रांत अथर्व्याच्या शिराची योग्यता वर्णिली आहे. स्थिरचित्त योग्याचें नांवच ' अथर्वा ' असें आहे. या योग्याचें शिर देवांचा सुरक्षित खजिना–निधि आहे. म्हणजे देवाचें जें देवपण आहे तें याच्या मस्तकांत सुरक्षित रहातें. शरीरांत हीं सर्व ज्ञान आणि कर्म इंद्रियें देव आहेत. तसेंच पृथ्वी, आप, तेज, वायु, विद्युत, सूर्य इत्यादि देवांचे अंश शरीरांत इतरत्र आहेत ते सुद्धां देव आहेत. या सर्व देवांचा संबंध मस्तकांत आहे. जणूं काय सर्व देवांची मुख्य सभा शिरांत भरते. सर्व देव स्वतःचें सत्त्व मस्तकांत सुरक्षित ठेवतात. सर्व देवांच्या सत्त्वांशानींच मस्तक बनलें आहे. आणि मस्तकाचा हा भाग (मेंदू) खूपच सुरक्षित आहे. त्याची सुरक्षितता ' प्राण, अन्न आणि मन ' याकारणानें होते. अर्थात् प्राणायामानें, सात्त्विक अन्नाच्या सेवनानें आणि मनाच्या शांतीनें देवांचा उक्त खजिना सुरक्षित राहतो. प्राणायामानें सर्व दोष जळून जातात. सात्त्विक अन्नानें शुद्ध

परमाणूंचा संचय होतो आणि मनाच्या शांतीनें समता रहाते. अर्थात् प्राणायाम न केल्यानें दोषबीजें जशींच्या तशींच रहातात. खराब अन्न खाण्यानें रोगबीजें वाढतात आणि मनाच्या अशांतीनें मानसिक अस्वस्थता वाढते. या कारणानें देवांचा निधि (खजिना) नष्ट-भ्रष्ट होतो.

या मंत्रांत योग्याच्या शिराची योग्यता सांगितली आहे, आणि आरोग्याची गुरुकिल्ली दाखवून दिली आहे. (१) विधिपूर्वक प्राणायाम, (२) शुद्ध सात्विक अन्नाचें सेवन, (३) आणि मनाची परिशुद्ध शांति हीं आरोग्याचीं मूळ कारणें आहेत. योगसाधनेच्या सिद्धतेसाठीं त्याचप्रमाणें जास्त प्रमाणांत आरोग्यासाठीं सदासर्वदा यांची आवश्यकता आहे.

स्वतःचें मस्तक देवांचा खजिना बनविण्यासाठीं प्रत्येकानें प्रयत्न केला पाहिजे. नाहींतर तें राक्षसांचें निवासस्थान होईल, आणि तसें झालें तर संकटें आणि दुःखें यांस सीमाही राहणार नाहीं. राक्षस नेहमीं हल्ला करण्यास तयार असतात. त्यांचें बल पण प्रचंड असतें, म्हणून सर्व प्रकारें तयार राहून सावधतेनें स्वसंरक्षण केलें पाहिजे. त्याचप्रमाणें दैवी भावनांचा विकास करून राक्षसी भावना निर्मूल केल्या पाहिजेत. याप्रमाणें दैवी भावना स्थिर झाल्यानंतर जो अनुभव प्राप्त होतो त्याचें वर्णन नंतरच्या मंत्रांत केलें आहे.

(१०) सर्वत्र पुरुष

आतां जेव्हां २६ व्या मंत्राप्रमाणें अनुष्ठान केलें जातें आणि २७ व्या मंत्राप्रमाणें ' दैवी संपत्ती 'चें चांगल्या प्रकारें रक्षण करण्यांत येतें, तेव्हां मंत्र २८ मध्यें सांगितलेलें फल अनुभवावयास मिळतें. ' वर, खालीं, तिरपा सर्वस्थळीं हा पुरुष व्यापक आहे, ' असा अनुभव येतो. त्याच्याशिवाय असें कोणतेंहि रिकामें स्थान नाहीं. परमात्म्याची सर्वव्यापकता याप्रमाणें निदर्शनास येते. पुरीमध्यें रहाण्यामुळें (**पुरि+वस=पुर्+उस्=पुरुषः**) आत्म्याला पुरुष म्हणतात. हा पुरुष जसा बाहेर आहे तसाच शरीराच्या आंतहि आहे; म्हणून त्यांस शरीराबाहेर शोधण्यापेक्षां शरीराच्या आंत शोधणें जास्त सोपें आहे. गोपथ ब्राह्मणांत ' अथर्वा ' शब्दाची व्युत्पत्ति याच दृष्टीनें खालीलप्रमाणें दिली आहे—

' अथ अर्वाक् एनं एतासु अप्सु अन्विच्छ इति । '

(गो. १।४) (आतां या पाण्यांत ईश्वराला तूंच शोध) तात्पर्य बाहेरील शोधानें आत्मा प्राप्त होत नाहीं. त्यासाठीं अंतरंगांतच शोधावें लागतें. येथें अथर्ववेदाचें कार्य दाखविलें आहे—

अथ + (अ) र्वा (क्) = अथर्वा

स्वतःच्या अंतरांत आत्म्यास शोधण्याची विद्या ज्यानें सांगितली आहे तोच अथर्ववेद आहे. सर्व अथर्ववेदांत हीच विद्या आहे. अथर्ववेद अन्य वेदांपासून निराळा कसा आणि वेदत्रयीच्या बाहेर अथर्ववेदास कां ठेविलें त्याचें स्पष्टीकरण येथें सांपडतें. सर्व जनता स्वतःमध्यें वसणाऱ्या आत्म्याचा साक्षात्कार करूं शकत नाहीं, त्यामुळें जे विशेष सज्जन योगमार्गांत प्रगति करूं इच्छितात अथवा जे सिद्ध पुरुष आहेत त्यांच्यासाठीं हा अथर्ववेद आहे.

जेथें जो रहातो तेथेंच त्याला पाहिलें पाहिजे आणि आत्मा या शरीररूपी नगरींत रहातो म्हणून त्याचा शोध या नगरींतच केला पाहिजे. या शरीरास पुरी असें म्हटलें आहे, कारण ही सप्तधातूंनीं युक्त आणि अन्य उपयुक्त शक्तींनीं परिपूर्ण आहे. या पुरीं जो रहातो त्यास पुरुष म्हणतात. पुरुष अथवा पूरुष असे दोन्ही शब्द आहेत आणि दोन्हींचा अर्थ एकच आहे.

पुढें ३१ व्या मंत्रांत या नगरीचें वर्णन येईल. वाचक तेथेंच त्या नगरीचें वर्णन वाचूं शकतील. ब्रह्मपुरी, ब्रह्मनगरी, अमरावती, देवनगरी, अयोध्यानगरी इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या या नगरीस यथावत् ओळखण्याचें जें फळ मिळतें तें पुढें २८ व्या मंत्रांत सांगितलें आहे. ब्रह्मनगरीस जो उत्तम प्रकारें जाणतो त्यास सर्वात्मभावाचा अनुभव मिळतो. जो पुरुष आपल्या आत्म्यांत आपल्या हृदयाकाशांत आहे तो वर, खालीं, तिरपा सर्व दिशांस परिपूर्ण व्यापक आहे. तो नाहीं असें एकही स्थान नाहीं असा अनुभव उपासकास येथें मिळतो. ' स्वतः आपणांस आत्म्यांत आणि आत्म्याला स्वतःच्या ठिकाणीं तो पाहूं लागतो. ' (ईश. उ. ६) ज्यास असा अनुभव होतो त्यास शोक, मोह होत नाहींत, आणि त्याच्या हातून कोणतेंहि अपवित्र कार्यही होत नाहीं.

या मंत्रांत ' **सृष्ट** ' शब्द विशिष्ट अर्थानें वापरला आहे. (poured out, connected, abundant, ornamented) प्रसरलेला, गुंतलेला, विपुल, सुशोभित असे अर्थ ' **सृष्ट** ' शब्दाचे येथे आहेत. (१) ज्याप्रमाणें पाणी झिरपून वाहूं लागलें म्हणजे सर्वत्र पसरतें त्याचप्रमाणें आत्मा सर्वत्र पसरलेला आहे. आत्म्यास सर्वांचा मूळ प्रवाह म्हणतात. प्रवाहरूपानें पाणी बाहेर पडून सर्वत्र पसरतें त्यावरून हा अर्थ येथें गृहीत केला आहे. (२) पसरण्यामुळें त्याचा संबंध सर्वांशीं येतो. (३) तो विपुल प्रमाणांत असल्यानेंच चारी बाजूंस पसरला आहे. (४) सर्वांची शोभा त्याच्यामुळें असल्यानें तो स्वतः सुशोभितहि

आहे असें म्हटलें आहे. 'सृष्ट' शब्दाचे हे अर्थ सर्व कोशांत सारखे दिलेले आहेत, आणि येथें तर ते सर्व उत्तम दिसतात. परंतु असा विचार या अर्थांचा न करतां या 'सृष्ट' शब्दाचा कित्येकांनीं 'उत्पन्न झाला' असा प्रसिद्ध अर्थ घेऊन या मंत्राचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. आतां खरा अथवा चांगला अर्थ कोणता त्याचा वाचकांनींच विचार करावा.

या मंत्रांत '**सृष्ट ३**' आणि '**बभूवाँ ३**' हे शब्द प्लुत आहेत. प्लुत स्वराचा उच्चार तिप्पट लांब करावा लागतो. प्लुत शब्दाचें उच्चारण अत्यंत आनंदाच्या वेळीं प्रेमातिशयाचें होत असतें. त्याचे अन्य प्रसंग ही आहेत. परंतु येथें आनंदातिशयानेंच त्यांचा उपयोग केला आहे. ब्रह्मपुरीस जाणल्यामुळें अत्यंत आनंद होतो, आणि परमात्म्याची सर्वव्यापकता प्रत्यक्ष अनुभवास आल्यानें आनंदाची परिसीमा–आनंदाचा पारावार लोटतो. त्यास मर्यादा कोठून असणार ? या परमानंदास शब्दांनीं प्रगट करण्यासाठीं प्लुत स्वराची योजना या मंत्रांत केली आहे.

ज्या पुरुषास॰ परमात्मसाक्षात्काराचा अनुभव याप्रमाणें होतो तो आनंदानें नाचूं लागतो. तो त्या आनंदांत मग्न होऊन जातो. तो प्रेमानें ओतप्रोत भरून जातो. शोक-मोहरहित व आनंदमय होतो. आतां या ब्रह्मज्ञानाचें आणखी एक फल पहा—

(११) ब्रह्मज्ञानाचें फल

ब्रह्मनगरीचें थोडेसें अधिक वर्णन या २९ व्या मंत्रांत दिलें आहे. '**अमृतेन आवृता ब्रह्मणः पुरिः**' अर्थात् अमृतानें वेढलेली ही ब्रह्माची नगरी आहे. येथें 'अ–मृत' शब्दाचें अज, अमर, अजरामर, आत्मा असे अर्थ घेणें उचित आहे. या ब्रह्मपुरींत आत्मा परिपूर्ण आहे. आत्मा अमृतरूप झाल्यानें जो त्यास प्राप्त करतो तो अमर होतो. त्यासाठीं प्रत्येकानें यथाशक्ति या मार्गानें पुढें जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही ब्रह्माची नगरी कोठें आहे ? त्याच्या स्थानाची माहिती ३१ व्या मंत्रांत वाचकास सांपडेल—

ब्रह्मनगरीस यथावत् जाणल्यामुळें ब्रह्म आणि ब्राह्म प्रसन्न होतात, आणि उपासकास चक्षु, प्राण आणि प्रजा देतात. 'ब्रह्म' शब्दानें 'आत्मा, परमात्मा, परब्रह्म' याचा बोध होतो. आणि 'ब्राह्माः' शब्दानें ब्रह्मापासून उत्पन्न झालेले दुसरे देव अर्थात् अग्नि, वायु, रवि, विद्युत्, इंद्र, वरुण इत्यादि देवांचा बोध होतो.

ब्रह्मनगरीस जाणल्यानें ब्रह्माची प्रसन्नता प्राप्त होते आणि दुसऱ्या सर्व इतर देवांचीही प्रसन्नता होते. प्रसन्न होऊन या देवता आणि सर्व देवांचे मूळ प्रेरक ब्रह्म त्या उपासकास तीन वस्तु देतें. या तीन वस्तु 'चक्षु, प्राण आणि प्रजा' या शब्दांनीं या मंत्रांत सांगितल्या आहेत.

चक्षु शब्दानें इंद्रियांचें ज्ञान होतें. सर्व इंद्रियांत चक्षु मुख्य आहे, आणि मुख्याचें ग्रहण केल्यानें गौणांचा बोध आपोआपच होतो. 'प्राण' शब्दानें आयुष्याचा बोध होतो. कारण 'प्राण हेंच आयुष्य आहे.' प्रजा शब्दानें स्वतःची औरस संतति असा अर्थ घेतां येईल. तात्पर्य 'चक्षु, प्राण आणि प्रजा' शब्दांनीं क्रमशः (१) संपूर्ण इंद्रियांचें स्वास्थ्य, (२) दीर्घ आयुष्य आणि (३) उत्तम संततीचा बोध होतो. उपासनेनें प्रसन्न झालेले ब्रह्म आणि देव वर सांगितलेल्या तीन वस्तु देतात. हें ब्रह्मज्ञानाचें फळ आहे.

(१) शरीराचें उत्तम बल आणि आरोग्य, (२) अति दीर्घ आयुष्य आणि (३) सुप्रजा निर्माण करण्याची शक्ति ब्रह्मज्ञानानें प्राप्त होते. यामध्यें मनाची शांति, बुद्धीची समता आणि आत्मिक बलाची संपन्नता अंतर्भूत आहेत ही गोष्ट वाचकांनीं विसरूं नये. या शिवाय दुसरी कोणतीहि सिद्धि असणेंच शक्य नाहीं. मानसिक शांतीच्या अभावीं, बौद्धिक समता नसल्यानें आणि आत्मिक निर्बलतेच्या स्थितींत शारीरिक स्वास्थ्यही प्राप्त होण्याची संभावना नाहीं, दीर्घायुष्य नाहीं आणि सुप्रजा निर्माण करण्याची शक्यता सुद्धा नाहीं. हे सद्गुण तसेंच दुसरे सर्व शुभ सद्गुण ब्रह्मज्ञानानें सहज प्राप्त होतात.

ब्रह्मकृपा आणि देवांची प्रसन्नता यामुळें जें उत्तम फळ मिळावयाचें तें हेंच होय. प्राचीनकाळीं आमच्या आर्यराष्ट्रांत अति दीर्घायु, बलिष्ठ आणि स्वेच्छेनुरूप स्त्रीपुरुष संतति निर्माण करणारे लोक होते. त्याचप्रमाणें ही संतति विद्वान्, शूरवीर वगैरे उत्तम गुणांनीं युक्त अशी इच्छेनुसार उत्पन्न करीत असत. या बाबतीचा प्रयोग शतपथ ब्राह्मणाचे अंतिम अध्यायांत अथवा बृहदारण्यक उपनिषदांत शेवटच्या भागांत स्पष्ट शब्दांत सांगितला आहे. ऐतिहासिक ग्रंथांत याबाबतींत पुष्कळ पुरावे मिळतात. वाचक तेथें त्याची खात्री करूं शकतील. तीं अवतरणें येथें देण्यास पुरेसा अवकाश नाहीं. येथें फक्त एवढेंच सांगावयाचें आहे कीं ब्रह्मज्ञानाच्या प्राप्तीनें स्वतःचें शरीरस्वास्थ्य संपादन करून, अति दीर्घआयुष्य प्राप्त करून त्याबरोबरच स्वतःच्या इच्छेनुसार उत्तम संततीची उत्पत्ति पण करता येते. ज्याकालीं ज्या देशांत ज्या लोकांना ही विद्या साध्य झाली असेल ते लोक धन्य होऊं शकतात ! एकेकाळीं आर्यांना ही विद्या प्राप्त झाली होती आणि भविष्यकालीं पण प्रयत्नानीं ती विद्या प्राप्त होऊं शकेल.

संतानोत्पत्तीचा संभव आहे अशा वयोमर्यादेपर्यंत ब्रह्मज्ञान

प्राप्त व्हावें अशी शिक्षणाची प्रणालिका असावी. आठव्या वर्षी उपनयन संस्कार झाल्यावर उत्तम गुरुजवळ योगादि अभ्यासास आरंभ केल्यास २० अथवा २५ व्या वर्षी ब्रह्म साक्षात्कार होणें संभवनीय आहे. अष्टावक्र, शुकाचार्य, सनत्कुमार वगैरेंना वीस वर्षांची वयोमर्यादा ओलांडण्यापूर्वीच तत्त्वज्ञान प्राप्त झालें होतें. त्यांच्यापेक्षां जास्त वयांत तत्त्वज्ञान प्राप्त झालेले सत्पुरुष भरतखंडाच्या इतिहासांत पुष्कळच आहेत. तात्पर्य, विशेष योग्यता असणारे पुरुष अल्पकाळांत जें कार्य साध्य करतात, तेंच साध्य करण्यास मध्यम योग्यतेच्या लोकांस जास्त कालावधि लागतो, आणि कनिष्ठ योग्यतावाल्यांना तर दीर्घ काल लागेल. त्यामुळें येथें सर्वसाधारणपणें असें सांगतां येईल कीं ब्रह्मचर्य समाप्तिपर्यंत ही योग्यता प्राप्त होऊं शकेल, आणि त्यानंतर गृहस्थाश्रमांत सुयोग्य संतति निर्माण करण्याची गोष्ट ही कांहीं अशक्य कोटींतील नाहीं.

हल्लीं ब्रह्मज्ञानप्राप्तीचा विषय हा वृद्धांचाच आहे असा एक समज लोकांचा झालेला दिसतो. त्यांच्या या मताचें खंडन या मंत्रांतील कथनानें परस्परच होतें. ब्रह्मज्ञान हा विषय खरें पाहिलें तर ' ब्रह्म-चाऱ्यां ' चाच आहे. अरण्यांत गुरुकुलांत रहाणारे हे ब्रह्मचारी या ब्रह्मप्राप्तीचा मार्ग आचरूं शकतात; आणि ब्रह्मचर्याश्रमाच्या समाप्तीपर्यंत ' ब्रह्म-पुरी ' ची पुरेपूर माहिती मिळवूं शकतात. त्याप्रमाणेंच या जीवनांत (१) शारीरिक स्वास्थ्य (२) दीर्घ आयुष्य आणि (३) सुप्रजा निर्माण करण्याची शक्ति इत्यादींचा पाया ते घालूं शकतात. याप्रमाणें खरा ब्रह्मचारी ब्रह्मपुरीला जाऊन आणि ब्रह्मज्ञानी होऊन, ब्रह्मनिष्ठ असतां बाकीचे तीनहि आश्रम शांतीपूर्वक, त्यागपूर्वक भोग भोगून आणि तरी सुद्धां पाण्यांतील कमलपत्राप्रमाणें निर्लेप आणि निर्दोष आयुष्य घालवूं शकतात; असे आदर्शरूप वसिष्ठ, जनक, याज्ञवल्क्य, श्रीकृष्ण वगैरे होऊन गेले.

जीवनाच्या प्रत्येक अवस्थेंत ब्रह्मज्ञानासाठीं प्रयत्न व्हावयास हवेत. ही गोष्ट येथें एवढ्यासाठीं लिहिली आहे, कीं जर नवयुवकांची प्रवृत्ति या विषयाकडे झाली तर त्यांस जीवन पवित्र बनवून आणि उत्तम नागरिक बनून सर्व जगांत शांति प्रस्थापित करण्याच्या महान् कार्यांत स्वतःचें जीवन समर्पित करण्याचें महान् सौभाग्य प्राप्त होईल. अस्तु. हा मंत्र दुसऱ्या सुद्धां अनेक बाबतींचा बोध करून देत आहे. परंतु त्यासाठीं हें स्थळ योग्य नसल्यानें त्याचें अधिक स्पष्टीकरण येथें होऊं शकणार नाहीं. पाठक फक्त वरील दृष्टीनें या मंत्राचा अधिक विचार करतील अशी आशा आहे. या मंत्राचें जास्त स्पष्टीकरण पुढील मंत्रांत पहा—

मंत्र २९ मध्यें जें सांगितलें आहे त्याचें स्पष्टीकरण या मंत्रांत

आहे. ब्रह्मपुरीचें ज्ञान प्राप्त झाल्यावर जे अपूर्व लाभ प्राप्त होतात त्यांचें वर्णन या मंत्रांत आहे. (१) अतिवृद्धावस्थे-पूर्वीं त्याचे नेत्र (दृष्टि) इत्यादि इंद्रियें यास सोडत नाहींत. त्या-प्रमाणें (२) प्राणसुद्धां त्यास त्या वृद्धावस्थेपूर्वीं सोडत नाहींत. प्राण लवकरें निघून जाणें त्यास अकालीं मृत्यु म्हणतात. आणि अल्प आयुष्यांत इंद्रियशक्ति कमी होणें इत्यादिमुळें आंधळेपण, बहिरेपण वगैरे जे दोष निर्माण होतात ते दुःखदायक असतात. ब्रह्मज्ञान्यांस हे कष्ट होतच नाहींत.

१ ते ८ वर्षांपर्यंत कुमार अवस्था
९ ते १६ वर्षांपर्यंत बाल्य अवस्था
१७ ते ७० वर्षेपर्यंत तारुण्य अवस्था
७१ ते १०० वर्षेपर्यंत वृद्ध अवस्था
१०० ते १२० वर्षेपर्यंत जीर्ण अवस्था आणि तदनंतर मृत्यु.

ब्रह्मज्ञान्याचे प्राण त्यास जीर्णावस्थेपूर्वीं सोडीत नाहींत. या अवस्थेपर्यंत तो आरोग्य आणि शांति या दोन्हींचा उपभोग घेतो. आणि त्यानंतर स्वेच्छेनें या शरिराचा त्याग करतो. ज्या-प्रमाणें भीष्मपितामह, रघुराजा इत्यादिकांनीं केला. (संदर्भासाठीं ' मानवी आयुष्य ' नांवाचें पुस्तक पहा.)

तात्पर्य ही ब्रह्मविद्या याप्रमाणें लाभदायक आहे. हा लाभ प्रत्यक्ष आहे. यानंतर जो अभौतिक अमृताचा लाभ होतो त्याचप्रमाणें आत्मशक्तीच्या विकासाचा अनुभव येतो तो तर निराळाच. वाचकांनीं याबाबतींत विचार करावा. पुढील मंत्रांत देवांच्या नगरीचें स्वरूप दाखविलें आहे. पहा—

(१२) ब्रह्माची नगरी, अयोध्या नगरी

हें मनुष्यशरीरच देवांची ' अयोध्या नगरी ' आहे. तिला नऊ दारें. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या, एक मूत्रद्वार आणि एक गुदद्वार मिळून-आहेत. पूर्वद्वार मुख आणि पश्चिम द्वार गुदा आहे. पूर्वद्वारानें आंत प्रवेश होतो आणि पश्चिमद्वारानें बाहेर निघून जातां येतें. दुसरीं द्वारें लहान असून त्यांची कार्यें निश्चित आहेत. प्रत्येक द्वारांत रक्षक देव हजर आहेत. आणि स्वतःची नियुक्त कामें सोडून ते दुसरीं कामें करीत नाहींत. नव-द्वारासंबंधीं श्रीमद्भगवद्गीतेंत म्हटलें आहे– ' जो आसक्तिविरहित कर्म करून तें सर्व ब्रह्मास अर्पण करतो त्यास जरासुद्धां पाप लागत नाहीं. उदाहरणार्थ पाण्यामध्यें असणाऱ्या कमलपत्राला ज्याप्रमाणें पाणी स्पर्शत नाहीं. म्हणून कर्मयोगी शरीरानें, मनानें, बुद्धीनें आणि इंद्रियांनीं आसक्ति सोडून आत्मशुद्धीसाठीं कर्म करीत असतो. जो योगयुक्त झाला तो नर कर्मफल सोडून देऊन अंतीं पूर्ण शांति प्राप्त करून घेतो. परंतु जो योगयुक्त नाहीं त्याच

वासनाफळासाठीं आसक्त होऊन बंधन प्राप्त होतें. सर्व कर्मांचा मनानें संन्यास करून जितेंद्रिय देहवान् पुरुष या नवद्वारांच्या नगरांत कांहीं करीत नाहीं. कांहीं दुसऱ्याकडून करवितही नाहीं आणि स्वतः आनंदांत रहातो. (गीता. ५।१०-१३) अर्थात् सर्व कांहीं करीत असतां जणूं काय आपण कांहींच करीत नाहीं तद्वत् शांत असतो. अशी श्रेष्ठ सिद्धि या देहांत आहे. प्रयत्नानें ती प्राप्त होऊं शकते.

नवद्वारांशिवाय या ब्रह्मपुरींत आठ चक्रें आहेत (१) मूलाधार-चक्र हें गुदद्वारापाशीं जेथें पृष्ठवंशरज्जु जोडलेला असतो त्याच्या शेवटी आहे. हें द्वार या नगरीचें मूळ आधारस्थान आहे. (२) स्वाधिष्ठान चक्र त्याचेवर आहे· (३) मणिपूर चक्र नाभि-स्थानांत आहे. (४) अनाहत चक्र हृदयस्थानांत आहे. (५) विशुद्धि चक्र कंठस्थानांत आहे. (६) ललना चक्र जिव्हेच्या मुळाशीं आहे. (७) आज्ञाचक्र दोन भुवयांचेमध्यें. (८) सहस्रार चक्र मस्तकांत आहे. याशिवाय दुसरीहि चक्रें आहेत. परंतु हीं मुख्य आहेत. यापैकीं एक एका चक्राचें योगसाधनेच्या मार्गांत अत्यंत महत्त्व आहे. कारण कीं प्रत्येक चक्रांत प्राण पोहोंचतांच तेथून कांहीं अद्भुत शक्तीचा आविष्कार होतो. या आठ चक्रामुळें ही नगरी पुष्कळच सामर्थ्यशाली बनली आहे. ज्याप्रमाणें शत्रूंपासून किल्ल्याचें रक्षण करण्यास, शस्त्रास्त्रांचा साठा तयार ठेवण्यांत येतो, त्याप्रमाणें या नगरीचें रक्षण करण्या-करितां या आठ चक्रांत शस्त्रास्त्रांसहित संपूर्ण शक्ति ठेवण्यांत आल्या आहेत. या चक्राच्या द्वारें आपणास आरोग्य, मन, बुद्धि इंद्रियें आणि सर्व शरीरास शक्तीचा पुरवठा होतो. जो मनुष्य या सर्व शक्तींचीं अष्ट चक्रें स्वतःच्या ताब्यांत ठेवतो त्यास शारीरिक आरोग्य, दीर्घ आयुष्य, सुप्रजानिर्माण शक्ति, इंद्रियांचें स्वातंत्र्य, मनाची शांति, बुद्धीची समता, आत्मिक बल सहज प्राप्त होते.

त्या नगरींत जो हृदयकोष आहे त्यांत ' **आत्मन्वत् यक्ष** ' रहातो. या यक्षास ब्रह्मज्ञानीच जाणूं शकतो. हा यक्ष केनोपनिषदांत त्याचप्रमाणें देवी भागवतांत सुद्धां सांगितला आहे. हा यक्ष सर्वांचा प्रेरक आहे. हा ' आत्मवान् ' यक्ष आहे. हा इंद्रियें आणि प्राण या सर्वांना प्रेरणा देऊन कार्यें करवितो. हाच अन्य देवांचा अधिदेव आहे. शरीरांत ज्या देवांचे अंश आहेत त्या सर्वांना नियंत्रित करणारा हाच आहे. हा आत्मदेव आत्मा-राम आहे. या ' रामाची ' ही नगरी ' अयोध्या ' नांवानें प्रख्यात आहे.

या नगरींत तेजोमय स्वर्ग आहे. स्वर्गस्थान येथेंच आहे. स्वर्गप्राप्तीसाठीं इतर कोठें बाहेर जाण्याची जरुरी नाहीं. या पुरींतच तो स्वर्ग आहे. जो त्यास पाहूं इच्छितो त्यास तो येथेंच पहावयास मिळतो. सात्त्विक भावना, राजस भावना आणि तामस भावना या त्याच्या आऱ्या आहेत. त्यामुळें तिच्यांत तीन गति उत्पन्न होतात. तिला पहाण्यामुळें तिच्या अद्भुत रचनेची माहिती होते. या तीनहीं गतींना शांत करून त्रिगुणाच्या पलीकडे गेलें असतां त्या ' आत्मवान् यक्षा ' चें दर्शन होतें.

ज्याप्रमाणें ही ब्रह्माची नगरी (**ब्रह्मणः पूः**) त्याचप्रमाणें ती देवांची (**देवानां पूः**) नगरी सुद्धां आहे. ज्याप्रमाणें ती ब्रह्मानें परिपूर्ण आहे त्याप्रमाणें ती देवांनींसुद्धां परिपूर्ण आहे. पृथ्वी-वरील सर्व देव आणि देवता त्यांत रहातात आणि त्यांस आकर्षून ठेवणारा आत्मदेव त्यांमध्यें अधिष्ठाता होऊन रहातो. हा ' आत्म-वान् यक्ष ' आत्मा शब्दाप्रमाणें पुल्लिंगी असून पुरुष नाहीं. ' देवी ' शब्द स्त्रीलिंग असतां तो स्त्री नाहीं. आणि ' यत् ' शब्द नपुंसकलिंगी असून सुद्धां तो नपुंसकलिंगी नाहीं. तीनहि लिंगाहून भिन्न असा तो शुद्ध तेजस्वी केवळ ' आत्मा ' आहे. तो दर्शनीय आहे. या ब्रह्मपुरींत जाऊन त्याचें दर्शन कशारीतीनें करतां येतें तें पुढील मंत्रांत सांगितलें आहे.

(१३) स्वतःच्या राजधानींत ब्रह्माचा प्रवेश

ही ब्रह्मपुरी तेजस्वी आहे आणि (हरिणी) दुःखांचें हरण कर-णारी आहे. तिला प्राप्त करून घेतलें असतां तसेंच पूर्णपणें वशीभूत केलें असतां सर्व दुःखें दूर होतात. म्हणूनच त्यास पुरी म्हणतात. कारण त्यांत पूर्णता आहे. पूर्ण आहे ती ' पुरी ' म्हटली जाते. पूर्ण होणें म्हणजेच यशस्वी होणें. जो परिपूर्ण होतो तो यशस्वी होतो. अपूर्णतेशीं यशाचा कांहीं संबंध नाहीं. परंतु पूर्णतेशींच यशाचा संबंध असतो.

जो तेजस्वी, दुःखहारक, पूर्ण आणि यशस्वी आहे तो कधींहि पराजित होत नाहीं. अर्थात् हमेशा विजयी होतो. (१) तेज, (२), निर्दोषिता (३), पूर्णता (४), यश आणि (५) विजय हे पांच गुण एकदुसऱ्याशीं संबंधित आहेत. (१) भ्राज, (२) हरण, (३) पुरी, (४) यश, (५) अपराजित हे मंत्रांत सांगितलेले पांच शब्द वर सांगितलेल्या पांच गुणांचे द्योतक आहेत, पाठकांनीं हे पांच गुण ध्यानांत ठेवावेत आणि ते स्वतःमध्यें स्थिर करून वाढविण्याचा प्रयत्न करावा. जेथें हे पांच गुण आहेत तेथें [हिरण्य] धन राहील यांत कांहीं शंका नाहीं.

धन्यता जेणें करून प्राप्त होते तें धन आणि वर सांगितलेल्या पांच गुणांत धन्यता रहातेच.

वरील पांच गुणांनीं युक्त अशा नगरींत ब्रह्म प्रवेश करतें. पाठक स्वतः अनुभवूं शकतो कीं स्वतःच्या अंतरांत हें ब्रह्म हृदयाकाशांत आहे. जेव्हां आपलें मन बाह्य व्यवहार सोडून अंतर्मुख होतें, एकाग्र होतें तेव्हां आत्म्याचें ज्ञान होण्याची शक्यता असते आणि त्यावेळींच ब्रह्माची ओळख पटण्याचा संभव आहे. कारण वेदांत दुसऱ्या एका ठिकाणीं म्हटलें आहे कीं, ‘ जो पुरुषांत ब्रह्म पाहूं शकतो तोच परमेष्ठीला जाणूं शकतो.’ (अथर्व. १०।७।१७) अर्थात् जो स्वतःच्या हृदयांत ब्रह्माचा आवेश जाणूं शकतो, अनुभवूं शकतो तोच परमेष्ठी प्रजापतीस जाणूं शकतो.

(१४) अयोध्येचें मार्गदर्शन

प्रिय पाठक हो ! आपण येथपर्यंत येऊन पोहोंचलात. वाटचाल केलीत. आतां आपलें स्थळ अयोध्यानगरी अजून किती दूर आहे ? त्याचा विचार करा. या अयोध्यानगरींत प्रवेश होतांच रामराजाचें दर्शन होईल असें समजूं नका. राजधानींत प्रवेश करतांच महाराजांची मुलाखत होत नाहीं. तेथें राहून तेथील स्थानिक अधिकारी, सत्य, श्रद्धा इत्यादींची प्रसन्नता संपादन करून महाराजांचे दरबारांत पोहोंचलें पाहिजे. म्हणून आपण जरा जलद चालून तेथें त्वरित पोहोंचाल अशी आशा आहे. तुमचे साथीदार, ईर्ष्या, द्वेष इत्यादि आहेत ते तुम्हांस जलद चालण्यास अडथळा करितात. प्रतिक्षणीं त्यांच्यापुढें तुमची शक्ति क्षीण होत आहे त्याचा विचार करा, आणि सर्व संकटें आणि आवरणें दूर करून एकाच उद्देश्यानें अयोध्येचा मार्ग आक्रमण करा. नंतर तुम्हांस त्या ‘ यक्षाचें ’ दर्शन होईल. त्याचें दर्शन इंद्रास एकवार झालें होतें. आपणांस रस्त्यांत ‘ हैमवती उमादेवी ’ भेटेल तिचें दर्शन घेऊन तिला वंदन करून तुम्हीं पुढें जावें. ती देवी आपणांस खरा रस्ता दाखवील. याप्रमाणें भक्तीच्या शांत प्रकाशांत सुविचारासह मार्ग आक्रमण करा. तसें केलेंत म्हणजे तो पुष्कळ लांबच लांब असा मार्ग तुम्हांस अत्यंत जवळचा होऊन जाईल. चुकून तुम्हीं इतस्ततः भटकणार नाहीं आणि वर सांगितल्याप्रमाणें मार्ग आक्रमण कराल अशी आशा आहे.

(१५) केनसूक्त आणि केनोपनिषद्

अथर्ववेदांत ज्याप्रमाणें केनसूक्त आहे तद्वत् उपनिषदांमध्यें केनोपनिषद् आहे. दोघांचाहि प्रारंभ ‘ केन ’ पदानें होतो. हें ‘ केन ’ पद अत्यंत महत्त्वाचें आहे. त्याचा अर्थ ‘ कोणीं ’ असा होतो. सर्व तत्त्वज्ञानाचा उगम या शब्दानें होतो. जगाचें जें हें दृश्यरूप आपणांस दिसतें तें [केन] कोणीं बनविलें. त्याचप्रमाणें [केन] त्याचा विचार कोणीं केला; [केन] कोणाच्या सहाय्यानें त्याचा विचार केला; [केन] कोणत्या कारणांनीं विचार केला, त्याचा जो बोध होतो तो कोणत्या प्रकारें होतो, इत्यादि अनेक विचार ‘ केन ’ शब्दामध्यें आहेत.

मनुष्य जें पहातो त्याचा हेतु जाणण्याचा प्रयत्न करतो. लहान मुलें जेव्हां एकाद्याकडे आश्चर्यानें पहातात तेव्हां हा कोण आहे ? काय म्हणतो ? कोठून आला ? कोठें जाणार आहे ? अशा अनेकविध प्रश्नांच्या उत्तराच्या अपेक्षेनें पहातात. आणि या सर्व प्रश्नांचीं उत्तरें मिळवूं इच्छितात. उत्तरानें जर त्यांचें समाधान झालें तरच तो शांत होतो, गप्प बसतो. नाहींतर तो प्रश्न विचारीत राहतो. मानवी मनांत इतकी विलक्षण जिज्ञासा बाल्यावस्थेपासून आहे आणि ती स्वाभाविक आहे.

परंतु जेव्हां मनुष्य मोठा होतो तेव्हां संसार चिंतेंत फसून त्याची जिज्ञासा नष्ट होते. आणि मग तो [केन] हें कोणीं केलें असा प्रश्न विचारण्याचें विसरून जातो. जेव्हांपासून असा प्रश्न करण्याचें त्यास विस्मरण होतें, तेव्हांपासून त्यास ज्ञान प्राप्त होणें बंद होतें. कारण कीं जिज्ञासा असली तरच ज्ञानाचा मार्ग खुला असतो.

या विश्वांत कोट्यावधि माणसें आहेत पण त्यांतील किती, “ मीं कोठून आलों, येथें कशासाठीं आलों, मला कोठें जावयाचें आहे ? ’ असे स्वाभाविक प्रश्न स्वतःच्या मनांत उत्पन्न होऊं देतात? असेच प्रश्न ‘ केन ’ पदानें येथें करण्यांत आले आहेत. साधारणतः मनुष्य जागृत होतो, झोंपतो, खातो, पितो आणि अंतीं मरून जातो.

हा जननमरणव्यापार इतका आश्चर्यकारक आहे कीं कोणाहि मननशील मनुष्यास असे विचार आल्याशिवाय रहात नाहींत. परंतु त्यांतील किती मनुष्यें असा विचार करतात ? मनन करणारा असेल त्यासच मनुष्य म्हणावें. जो मनन करीत नाहीं तो मनुष्य या संज्ञेस पात्र नाहीं. त्यामुळें या मनुष्यसमाजांत त्यासच मनुष्य म्हणावें जो ‘ केन ’ या प्रकारें प्रश्न करतो. हें

असे ' केन ' शब्दाचें महत्त्व आहे. हा प्रश्न मनुष्याची मानवता सिद्ध करणारा आहे. पाठकांनीं या शब्दाचें महत्त्व जाणून घेऊन त्यावरून स्वतःच्या जीवनाचा विचार करावा.

मीं कोणत्या शक्तीमुळें बोलतों, कोणत्या शक्तीमुळें विचार करतों, कोणत्या शक्तीमुळें जिवंत आहें, कोणत्या शक्तीमुळें जगांत जन्ममरण तसेंच प्रजनन होत आहे. या संपूर्ण सांसारिक क्रियांचा मूलाधार कोण आहे ? तो या सर्व खटाटोपांचें निर्माण कशासाठीं करतो ? हे प्रश्न प्रत्येक मनुष्याच्या मनांत निर्माण व्हावयास पाहिजेत. पण कोणत्या मनुष्याच्या अंतःकरणांत ते उद्भवतात बरें ? पाठकांनीं या बाबतींत विचार करावा.

अर्थात् मनुष्यजात अगणित वर्षे या भूमंडलावर उत्पन्न झाली आहे. परंतु मनुष्यें अद्याप खऱ्या अर्थानें मनुष्यें झालीं नाहींत. जे ' केन ' असा प्रश्न करतात आणि योग्य मार्गानें त्याचें उत्तर प्राप्त झाल्याशिवाय स्वस्थ राहूं शकत नाहींत तींच खरीं मनुष्यें होत.

ज्याप्रमाणें अन्य अनेक कीटक निर्माण होतात, मरतात, त्याप्रमाणें मनुष्यप्राणी पण जन्मतो आणि मरतो. मीं कशासाठीं जन्मतों आणि कशासाठीं मरणार आहें त्याचा विचार सुद्धां कोणीं करीत नाहीं. स्वतःच्या जीवनाविषयीं कसे प्रश्न केले पाहिजेत तें या सूक्तांत सांगितलें आहे. मानवी जीवनाचे किती तरी प्रश्न येथें दिले आहेत. फक्त एवढेच प्रश्न करण्यास मनुष्य शिकला तरी त्यास आत्मज्ञान होईल आणि त्याचें जीवित सफल होईल.

म्हणून पाठकानें जिज्ञासाबुद्धीनें या केनसूक्ताचें सतत मनन करावें आणि समस्त विश्वांत जी अद्भुत शक्ति आहे, त्या अद्भुत शक्तीच्या विषयीं ज्ञान प्राप्त करून घेऊन स्वतःचें जीवन सार्थकी लावावें. मानवी जीवनाची सफलता प्राप्त करून देणारें हें ज्ञान आहे. केनसूक्तानें जो हा जिज्ञासाजागृतीचा मार्ग दाखविला आहे त्यानें जाऊन, त्याचें आचरण करून सर्व साधक सिद्ध होतील अशी आशा आहे.

आत्मसमर्पणानें ईश्वराची पूजा

कांड ६, सूक्त ८०

(ऋषिः- अथर्वा । देवता- चंद्रमाः)

अन्तरिक्षेण पतति विश्वा भूतावचाकशत् ।
शुनो दिव्यस्य यन्महस्तेना ते हविषा विधेम ॥ १ ॥
ये त्रयः कालकाञ्जा दिवि देवा इव श्रिताः ।
तान्त्सर्वानह्व ऊतयेऽस्मा अरिष्टतातये ॥ २ ॥

अर्थ— जो (विश्वा भूता अवचाकशत्) सर्वभूतांना प्रकाशित करतां करतां (अन्तरिक्षेण पतति) आकाशांत चालतो त्या (दिव्यस्य शुनः) द्युलोकांत गमन करणाऱ्या सूर्याचें जें महत्त्व आहे. (तेन हविषा ते विधेम) त्या हवीनें आम्हीं तुझें पूजन करितों. (१)

(ये कालकाञ्जाः) जे तीन काळाचे कुंज (दिवि देवा इव श्रिताः) द्युलोकांत देवाप्रमाणें रहातात (तान् सर्वान्) त्यां सर्वांस (अस्मै ऊतये) याच्या रक्षणासाठीं आणि (अरिष्टतातये अह्व) कल्याणासाठी बोलाविले आहे. (२)

भावार्थ— सर्व जगताला प्रकाशित करणारा सूर्य आकाशांत संचार करतो. त्याचें महत्त्व आणि तेज विशेष आहे, ते तेज आमच्यांत जितकें आहे त्या सर्वाचें समर्पण करून आम्ही ईश्वराची उपासना करीत आहोंत. (१)

देवतांप्रमाणें तीनहि काळ अर्थात् उष्णकाळ, वृष्टिकाळ आणि शीतकाळ हे तीन काल कुंज द्युलोकांत राहणाऱ्या सूर्याशीं संबंध ठेवतात. या तीन काळांपासून स्वतःचें रक्षण करून मनुष्यानें आत्मकल्याण साधावें. (२)

अप्सु ते जन्म दिवि ते सधस्थं समुद्रे अन्तर्महिमा ते पृथिव्याम् ।
शुनो दिव्यस्य यन्महस्तेना ते हविषा विधेम ॥ ३ ॥

अर्थ— (अप्सु ते जन्म) पाण्यांत तुझी उत्पत्ति आहे, (दिवि ते सधस्थं) द्युलोकांत तुझें स्थान आहे, आणि तसेंच (समुद्रे अन्तः पृथिव्यां ते महिमा) समुद्रांत आणि पृथ्वीवर तुझें महात्म्य आहे. त्या तुझ्या (दिव्यस्य शुनः) द्युलोकांत गमन करणाऱ्या सूर्याचें (यत् महः) जें महत्त्व आहे (तेन ते हविषा विधेम) त्या महत्त्वानें आम्ही तुझी पूजा करित आहोंत. (३)

भावार्थ— प्रकृतीच्या आरंभीच्या जलमय अवस्थेपासून सूर्याची उत्पत्ति झाली आणि तो द्युलोकांत रहातो. पृथ्वी आणि समुद्रांत त्याचें तेज प्रगट होतें. या सूर्याची जी शक्ति माझे ठिकाणीं आहे ती सर्व मीं परमेश्वराचे पूजेसाठीं समर्पित करतों. (३)

' सूर्यादि देवांचे अंश मनुष्यांमध्यें आहेत, त्यांच्या शक्तीनें मनुष्य सामर्थ्यशाली बनतो, म्हणून त्या उक्त शक्तीचें समर्पण जगाच्या कल्याणासाठीं करून परमेश्वराची पूजा करणें हें त्या मनुष्याचें उचित कर्तव्य आहे. '

आत्मज्योतीचा मार्ग

कांड ४, सूक्त १४

(ऋषिः- भृगुः । देवता- आज्यं अग्निः)

अजो ह्य१ग्नेरजनिष्ट शोकात्सो अपश्यज्जनितारमग्रे ।
तेन देवा देवतामग्र आयन्तेन रोहान्रुरुहुर्मेध्यासः ॥ १ ॥
क्रमध्वमग्निना नाकमुख्यान्हस्तेषु बिभ्रतः ।
दिवस्पृष्ठं स्वर्गत्वा मिश्रा देवेभिराध्वम् ॥ २ ॥
पृष्ठात्पृथिव्या अहमन्तरिक्षमारुहमन्तरिक्षाद्दिवमारुहम् ।
दिवो नाकस्य पृष्ठात्स्व१र्ज्योतिरगामहम् ॥ ३ ॥

अर्थ— (हि अग्नेः शोकात् अजः अजनिष्ट) कारण कीं परमात्मरूप विश्वप्रकाशक अग्नीच्या तेजानें अजन्मा जीवात्मा प्रगट झाला आहे. (सः अग्रे जनितारं अपश्यत्) त्यानें सर्वप्रथम आपणांस निर्माण करण्याऱ्याचें दर्शन केलें. (अग्रे तेन देवाः देवतां आयन्) प्रारंभींच त्याच्या सहाय्यानें देवांनीं देवत्व प्राप्त करून घेतलें. (तेन मेध्यासः रोहान् रुरुहुः) त्यानें पवित्र होऊन उच्च स्थानाला ते प्राप्त होतात. (१)

(उख्यान् हस्तेषु बिभ्रतः) अन्नांना हातांत घेऊन उभे राहिलेल्या तुम्हीं, (अग्निना नाकं क्रमध्वम्) अग्नीच्या मदतीनें स्वर्ग प्राप्त करा. (दिवः पृष्ठं स्वः गत्वा) द्युलोकावर जाऊन आत्मज्योतीस प्राप्त करून (देवेभिः मिश्राः आध्वं) देवांशीं मिळून त्यांच्याबरोबर बसा. (२)

(अहं पृथिव्याः पृष्ठात् अन्तरिक्षं आरुहं) मीं पृथ्वीच्या पृष्ठभागावरून अंतरिक्षलोकांत चढून गेलों. (अन्तरिक्षात् दिवं आरुहं) अंतरिक्षांतून द्युलोकावर चढून गेलों. (नाकस्य दिवः पृष्ठात्) द्युलोकाच्या सुखमय पृष्ठभागावरून (अहं स्वः ज्योतिः अगाम्) मीं आत्म्याची ज्योति प्राप्त केली. (३)

भावार्थ— परमात्म्याच्या जगत्प्रकाशक तेजापासून हा अजन्मा जीवात्मा प्रगट झाला. त्यावेळीं त्यानें स्वतःच्या पित्याचें दर्शन केलें. देव त्याच्या शक्तीनें देवत्व प्राप्त करून घेतात. जे त्याची उपासना करतात ते पवित्र बनून अनेक उच्चावस्था प्राप्त करून घेतात. (१)

अन्न दान करीत असतां तुम्ही अग्नींच्या सहाय्यानें स्वर्गमार्गावर आक्रमण करा आणि तेथूनहि अधिक उच्च भूमिकेवर जाऊन आत्मिक ज्योतिस्थान प्राप्त करून घेऊन देवांबरोबर बसा. (२)

पृथ्वीवरून अंतरिक्ष, अंतरिक्षाहून द्युलोक आणि द्युलोकाच्या पलिकडे श्रेष्ठ असें आत्मप्रकाशाचें स्थान आहे. मीं या क्रमानें हे लोक मिळविले आहेत. (३)

स्व१र्यन्तो नापेक्षन्त आ द्यां रोहन्ति रोदसी ।
यज्ञं ये विश्वतोधारं सुविद्वांसो वितेनिरे ॥ ४ ॥
अग्ने प्रेहि प्रथमो देवतानां चक्षुर्देवानामुत मानुषाणाम् ।
इयक्षमाणा भृगुभिः सजोषाः स्वर्यन्तु यजमानाः स्वस्ति ॥ ५ ॥
अजमनज्मि पयसा घृतेन दिव्यं सुपर्णं पयसं बृहन्तम् ।
तेन गेष्म सुकृतस्य लोकं स्वरारोहन्तो अभि नाकमुत्तमम् ॥ ६ ॥
पञ्चौदनं पञ्चभिरङ्गुलिभिर्दर्व्योद्धर पञ्चधैतमोदनम् ।
प्राच्यां दिशि शिरो अजस्य धेहि दक्षिणायां दिशि दक्षिणं धेहि पार्श्वम् ॥ ७ ॥
प्रतीच्यां दिशि भसदमस्य धेह्युत्तरस्यां दिश्युत्तरं धेहि पार्श्वम् ।
ऊर्ध्वायां दिश्य१जस्यानूकं धेहि दिशि ध्रुवायां धेहि
पाजस्यमन्तरिक्षे मध्यतो मध्यमस्य ॥ ८ ॥

अर्थ— (**ये सुविद्वांसः**) जे उत्तम विद्वान् (**विश्वतो धारं यज्ञं वितेनिरे**) जे सर्वप्रकारच्या धारणाशक्ति देणाऱ्या यज्ञाचा प्रसार करतात, ते (**स्वः यन्तः द्यां न अपेक्षन्ते**) आत्मज्योती प्राप्त करणारे असल्यानें स्वर्गसुखाची अपेक्षा करीत नाहींत, ते (**रोदसी आरोहन्ति**) पृथ्वी आणि स्वर्गावर जातात. (४)

हे (**अग्ने**) प्रकाशक ! (**देवतानां प्रथमः प्रेहि**) देवांमध्यें तूं आम्हांस प्रथम असा प्राप्त हो ! तूं (**देवानां उत मानुषाणां चक्षुः**) देवांचे आणि मनुष्यांचे डोळे आहेस. (**इयक्षमाणाः सजोषाः यजमानाः**) यज्ञ करणारे आणि समान प्रीतिभाव ठेवणारे यजमान (**भृगुभिः स्वः स्वस्ति यन्तु**) तपस्व्यांसह आत्मतेजाचें सुख प्राप्त करोत. (५)

(**दिव्यं सुपर्णं पयसं**) दिव्य, तेजस्वी, अत्यंतपूर्ण, गतिमान् आणि (**बृहन्तं अजं घृतेन, पयसा अनज्मि**) अजन्म्या परमात्म्याची तूप आणि दुधाच्या यज्ञानें पूजा करतों. (**उत्तमं नाकं अभि आरोहन्तः**) उत्तम स्वर्गावर जातां जातां (**तेन सुकृतस्य लोकं स्वः गेष्म**) त्यापासून पुण्य आणि आत्मप्रकाशाच्या लोकास प्राप्त करूं. (६)

(**एतं पञ्चौदनं ओदनं**) या पांच प्रकारच्या अन्नास. (**पञ्चभिः अंगुलिभिः दर्व्या पञ्चधा उद्धर**) पांच बोटांनीं धरलेल्या पळीनें पांच प्रकारें वर घेऊन जा. (**अजस्य शिरः प्राच्यां दिशि धेहि**) अजन्म्याचें मस्तक पूर्व दिशेस ठेव. त्याचप्रमाणें (**दक्षिणायां दिशि दक्षिणं पार्श्वं**) दक्षिण दिशेस उजवी कुस राहूं दे. (७)

(**अस्य भसदं प्रतीच्यां दिशि धेहि**) त्याच्या कंबरेचा भाग पश्चिम दिशेस ठेव आणि (**उत्तरं पार्श्वं उत्तरस्यां दिशि धेहि**) डावी कुस उत्तर दिशेस असूं दे आणि (**अस्य पाजस्यं ध्रुवायां दिशि धेहि**). त्याचा पोटाचा भाग ध्रुवदिशेस ठेव. तसेंच (**अस्य मध्यं मध्यतः अन्तरिक्षे**) त्याचा मध्यभाग अंतरिक्षांत ठेव. (८)

भावार्थ— जे ज्ञानी विद्वान विश्वाधारक यज्ञाचा प्रसार करतात ते पृथ्वीवरून द्युलोकापर्यंत वर चढतात. तेथून उच्च असें आत्म्याच्या प्रकाशाचें स्थान प्राप्त करीत असतां दुसऱ्या कोणत्याही सुखाची अपेक्षा करीत नाहींत. (४)

हे सर्वप्रकाशक ! तूं सर्व देवांत मुख्य आहेस, तू आम्हाला प्राप्त हो. तूं ज्याप्रमाणें देवांचे नेत्र आहेस त्याचप्रमाणें मनुष्यांचे पण नेत्र तूंच आहेस. यज्ञ करणारे आणि सर्वांवर समभावनेनें प्रेम करणारे यजमानच तपस्वी मुनींसह सुखपूर्वक आत्म्याचा प्रकाशलोक मिळवितात. (५)

दिव्यपूर्ण, पूर्ण तेजस्वी, गतिमान् आणि अजन्मा अशा परम आत्म्याची आम्ही, तूप, दूध वगैरे आहुतींनीं यज्ञद्वारें पूजा करतों. त्यामुळें उत्तम स्वर्ग प्राप्त करून त्याच्या वरील भागांत जे आत्मिक प्रकाशाचें स्थान आहे तें आम्हीं मिळवितों. (६)

हें पांच प्रकारचें यज्ञीय अन्न आहे. पांच बोटांनीं दर्वी धरून या अन्नास पांच प्रकारें वर घ्या. या अजन्म्याचें मस्तक पूर्व-दिशेस आणि उजवी बाजू (कूस) दक्षिण दिशेस ठेव. (७)

शृतमजं शृतया प्रोर्णुहि त्वचा सर्वैरङ्गैः संभृतं विश्वरूपम् ।
स उत्तिष्ठेतो अभि नाकमुत्तमं पद्भिश्चतुर्भिः प्रति तिष्ठ दिक्षु ॥ ९ ॥

अर्थ— याप्रमाणें (**सर्वैः अंगैः संभृतं**) याप्रमाणें सर्व अंगांनीं सम्यक् भरलेला असा म्हणून (**विश्वरूपं शृतं अजं**) विश्वरूप बनलेल्या परिपक्व अजन्म्या आत्म्याला (**शृतया त्वचा प्र ऊर्णुहि**) परिपक्व आच्छादनांनीं आच्छादित कर. (**सः**) तो तूं (**इतः उत्तमं नाकं अभि उत्तिष्ठ**) येथून उत्तम स्वर्ग प्राप्त करण्यासाठीं ऊठ आणि (**चतुर्भिः पद्भिः दिक्षु प्रति तिष्ठ**) चार पायांनीं सर्व दिशांस प्रतिष्ठित हो. (९)

भावार्थ— त्याच्या कमरेचा भाग पश्चिम दिशेस, उत्तरेस डावी कूस, पाठीचा भाग ऊर्ध्वदिशेस आणि पोट ध्रुवदिशेस आणि मध्यभाग अंतरिक्षांत ठेव. (८)

याप्रमाणें स्वतःच्या सर्वांगांनीं परिपूर्ण विश्वरूप बनलेल्या अजन्मा जीवात्म्याला परिपक्व परमात्म्याच्या आच्छादनानें आच्छादित कर आणि उत्तम स्वर्ग लोक प्राप्त करण्यासाठीं कटिबद्ध हो. स्वतःच्या चारी पायांनीं सर्व दिशांत प्रतिष्ठित हो. (९)

आत्मज्योतीचा मार्ग

स्वर्गधामाचा मार्ग

या सूक्तांत स्वर्गधामाचा मार्ग दाखविला आहे, त्यामुळें या सूक्ताचें महत्त्व श्रेष्ठ होय. पहिल्याच मंत्रांत परम पित्याच्या अमृतपुत्राच्या उत्पत्तीचें वर्णन आहे—

परमपित्याचा अमृतपुत्र

अग्नेः शोकात् अजः अजनिष्ट (मं. १)

' अग्नीच्या प्रकाशानें अजन्मा जीवात्मा प्रगट झाला आहे. ' येथें अग्नि पदानें सर्व प्रकाशक परमात्म्याचा अर्थ ग्रहण करणें योग्य आहे. अथर्ववेदाच्या कांड ९ सू. १० (१५) मंत्र २८ त सांगितलें आहे कीं, ' एकच सत्यस्वरूप परमात्म्याचें कविजनांनीं निरनिराळ्या नांवानीं वर्णन केलें आहे. त्या एका परमात्म्यालाच इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, दिव्य, सुपर्ण, गरुत्मान्, यम, मातरिश्वा आणि सत् म्हटलें आहे. ' हीं सर्व एकाच परमात्म्याचीं नांवें आहेत. त्यांतून या सूक्तांत ' अग्नि ' (मं. १) दिव्य, सुपर्ण (मं. ६) हे शब्द योजिले आहेत. या परमात्म्याच्या तेजानें या अमृत पुत्राची उत्पत्ति आहे. या अमृतपुत्राची उत्पत्ति वर्णन करण्याचें कारण अथवा उद्देश इतकाच कीं हा अमृतपुत्र स्वतःची उन्नति करून स्वतःच्या पित्यासारखा होऊं शकतो. प्रत्येक प्राण्याचा पुत्र पित्यासारखा होऊं शकतो. बीजांतून वृक्ष होत असतो. एक लहानशा ठिणगींतून भयंकर दावाग्नि प्रगट होतो. स्वतःच्या पित्याप्रमाणें होणें हा पुत्राचा अधिकारच आहे. जीवात्म्याच्या उन्नतीची ही अंतिम मर्यादा आहे. ही मर्यादा पुष्कळ काळपर्यंतच्या सतत अनुष्ठानानें परिपूर्ण होऊं शकते. आणि त्यावेळीं हा अमृत-पुत्र पित्याच्या वैभवानें युक्त होतो. पुत्र पित्यासमान आज होवो, वा कालांतरानें होवो, परंतु त्यास पित्याचें वैभव निःसंशय प्राप्त होतेंच हें सत्य आहे. वेदानें या सूक्ताच्या द्वारें लोकांस तसें आश्वासन दिलें आहे. जगांतील दुःखें पाहून मनुष्यांनीं निराश होऊं नये, धर्मानुष्ठान करीत पुढें सरावें. तें अनुष्ठान परिपूर्ण होईल तेव्हां पापांचा नाश होऊन तो (अमृतपुत्र) त्या परमपित्याच्या वैभवानें परिपूर्ण होऊन जाईल. अनुष्ठानाची तीव्रता अथवा निर्दोषता या कारणांनीं अवधि थोडा लागेल अथवा जास्त लागेल ही गोष्ट प्रत्येक उपासकाच्या स्वतःवर अवलंबून आहे. पित्याचे गुण पुत्रांत थोडे असतील तर त्यांचा विकास करणें हें पुत्राचें कर्तव्य आहे. पित्याची मदत हाताशी असतेच, ' पुत्राच्या गुणांची परिसीमा याचाच अर्थ त्याचें पित्यासमान होणें हें होय. '

पित्याचें दर्शन

या पुत्रानें सर्व प्रथम, ' **जनितारं अपश्यत्** ' (मं. १) स्वतःच्या पित्याचें दर्शन केलें. त्यानंतर हा पुत्र संसारांत गुर-फटल्यानें त्यापासून (पित्यापासून) विमुख झाला, यावेळीं ही विमुखता वाढली कीं, तो स्वतःच्या पित्यास अगदीं विसरून गेला म्हणून आतां त्यानें सर्वप्रथम त्या आपल्या पित्याचें स्मरण करावें. आणि मग त्याचें दर्शन करावें. हाच त्याच्या उन्नतीचा

मार्ग आहे. त्याच्या दर्शनानें—

मेध्यासः रोहान् रुरुहुः (मं. १)

' पवित्र होतां होतां उन्नतीच्या स्थानीं पोहोचूं शकतो ' या-प्रमाणें पुत्र एक एक पायरीनें वर चढत आहे, आणि विशिष्ट अधिकार प्राप्त करून घेत आहे. पवित्र होणें हा एकमात्र उपाय आहे. त्यामुळें पुत्राचा अधिकार वाढीस लागतो. पवित्र होण्याचा उपाय ' मेध्य ' शब्दानें सांगितला आहे. ' मेध्य ' म्हणजे मेधास योग्य. ' मेध ' चा अर्थ सत्कार, संगति, दानरूप कर्म, ' जें कर्म सत्कार करण्यालायक, सत्पुरुषांस आदरणीय, जनतेचें संगठण साधणारे, परोपकारार्थ दान करणारे, आत्मसमर्पण करणारे, त्यास ' **मेध्य** ' म्हणावें. या प्रकारच्या कर्मानीं मनुष्य पवित्र होतो आणि उच्च भूमिका प्राप्त करून घेतो. आणि अंतीं जेथून आला तेथें जाऊन पोंहोचतो.

दुसऱ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, ' या अग्नीच्या सहाय्यानें स्वर्गमार्गावर प्रगति करा. ' वस्तुतः यज्ञांत जें यजन होतें तें परमात्म्याचेंच असतें, तरी पण यज्ञास आरंभ अग्नींत आहुति टाकल्यानें होत असतो. या यज्ञद्वारा आत्मसमर्पणाची दीक्षा देण्यांत येते. स्वतःजवळचें तूप समष्टीसाठीं अर्पण करण्यांत येतें. या यज्ञानें म्हणजेच आत्मसमर्पणानें उन्नति होते. या स्थूल यज्ञांत, प्रथम कक्षेच्या यज्ञांत तूप तसेंच हवनसामग्रीच्या आहुतींनीं म्हणजेच स्वतःशिवाय भिन्न बाह्य पदार्थांचें समर्पण होतें. पुढें जसजशी योग्यता वाढत जाते तसतसें स्वतःच्या (मालकीच्या) पदार्थांचें समर्पण होत जातें, अंतीं सर्वमेध यज्ञांत आत्मसर्वस्वाचें समर्पण होतें. त्यामुळें परम उच्च अवस्थेची प्राप्ति होते. ज्याप्रकारें अग्नींत तूप वगैरे पदार्थांचें समर्पण होतें तद्वतच—

हस्तेषु उख्यान् बिभ्रतः (मं. २)

' शिजविलेलें अन्न दान करण्यासाठीं स्वतःच्या हातीं घेऊन तयार रहा ' भुकेनें पीडलेल्यास अन्नदान करण्यानें महान् पुण्य प्राप्त होतें. येथें हें अन्नदान प्रत्यक्ष फलदायक आहे. भुकेनें पीडलेल्याला अन्न दिल्यानेंच त्याचा आत्मा संतुष्ट होतो, आणि त्याचा संतोष पाहून दान देणाऱ्याचा आत्मा पण कृतकृत्य होतो. दानानें दात्याची उन्नति होते याचा प्रत्यक्ष अनुभव अन्नदानानें अनुभवण्यास मिळतो. येथें अन्नाचा दृष्टांत सांगितला आहे. भुकेनें पीडलेल्यास अन्नदान, तहानेनें पीडलेल्यास जलदान, अज्ञानानें पीडलेल्यास ज्ञानदान, निर्बलतेनें पीडलेल्यास शक्ति द्वारा सहाय्य, निर्धनतेनें पीडलेल्यास धन दान, पारतंत्र्यानें पीडिलेल्यास स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं सहाय्य इत्यादि अनेक प्रकारचीं दानें असतात. हीं सर्व दानें अन्नदानाप्रमाणें अगत्याचीं आहेत, असें समजलें पाहिजे. हे सर्व यज्ञ आहेत आणि यज्ञाशीं संलग्न असणाऱ्या कर्माचें तें प्रमुख अंग आहे. जनतेच्या सेवेनें परमात्म्याचें अर्चन याप्रकारें होऊं शकतें. या यज्ञद्वारानें मनुष्य स्वर्गांत जातो एवढेंच नव्हे तर त्याचेहिवर आत्मप्रकाश लोक आहे. तेथें जातो, आणि तेथें तो देवांसमवेत असतो. याप्रमाणें मनुष्य देवरूप होतो. (मं. २)

पृथ्वीवरून अंतरिक्ष, अंतरिक्षांतून द्युलोक, द्युलोकाहून आत्मप्रकाश असलेला लोक वर आहे. ही उच्चता स्थानानें प्राप्त होत नाहीं तर स्थितीनें प्राप्त होते. अर्थात् हे चारी लोक एकाद्या घरच्या मजल्याप्रमाणें एकावर दुसरा असे रचलेले नाहींत, तर एकाचे आंत दुसरा, दुसऱ्याचे आंत तिसरा असे आहेत. स्थूल शरीर, सूक्ष्म शरीर, कारण शरीर, आत्मा या चारी अवस्था मनुष्यामध्येंच (अंतरंगांत) आहेत. त्यांचीं बाह्यरूपें पृथ्वी, अंतरिक्ष, द्यौ, आणि स्वः (आत्मप्रकाश) हीं होत. त्यांचीं नांवें भूः, भुवः, स्वः, महः वगैरे आहेत. ज्याप्रमाणें स्थूल शरीराचे आंत सूक्ष्म शरीर असतें, त्याचप्रमाणें पृथ्वीचे आंत अंतरिक्ष लोक असतो. सामान्य मनुष्य स्थूल भूलोकांत फिरत असतो. जेव्हां तो शुद्ध आणि परिपक्व होतो, तेव्हांच तो अंतरिक्षादि उच्च भूमिकांवर कार्य करूं शकतो. महान् तपस्व्यानांच ही गोष्ट साध्य होते. (मं. ३)

विश्वाधार यज्ञ

(यज्ञं विश्वतोधारं यज्ञं) ' विश्वास सर्व प्रकारें आधार देणारा तो आहे. ' (मं. ४) हें चौथ्या मंत्रांतील सांगणें सत्य आहे. यज्ञाचा अर्थ आहे त्याग आणि या त्यागानेंच सर्व जग टिकलें आहे. प्रत्येक स्थानीं सत्य आहे. पिता स्वतःच्या वीर्यत्यागानें संतानोत्पत्तीस आधार देतो. त्याचप्रमाणें माता स्वतःस गर्भ धारण करतां यावें म्हणून कष्ट सहन करते, म्हणजे तितक्या प्रमाणांत ती स्वतःच्या सुखाचा त्यागच करते आणि संतति झाल्यावर त्यास स्वतःचे दुधानें पोसण्यांतहि त्यागच करते. याप्रमाणें मातापित्याच्या अपूर्व त्यागानें संतानोत्पत्ति होते. याप्रमाणें असाच त्याग पशुपक्षी, वृक्ष वनस्पति इत्यादि मध्यें आहे. त्यामुळें त्यांची सृष्टि चालू आहे. सूर्य स्वतःचा प्रकाश जगतास अर्पण करतो, त्याचप्रमाणें अग्नि, वायु, जल इत्यादि देवता स्वतःच्या शक्तींचा जगाच्या कल्याणासाठीं त्याग करतात. या त्यागावरच जगाचें अस्तित्व आहे. परमात्म्यानें स्वतःच्या त्यागानेंच हा संसार निर्माण केला. या प्रकारच्या विचारानें पाठकाचें ध्यानीं येईल कीं या त्यागानें म्हणजेच आत्म-

समर्पणरूपी माझ्या यज्ञानें हें विश्व चालत आहे. त्यामुळेंच यज्ञास विश्वाधार म्हटलें आहे. आणि तें शाश्वत सत्य आहे.

ये सुविद्वांसः विश्वतोधारं यज्ञं वितेनिरे ।
(ते) रोदसि द्यां रोहन्ति, स्वर्यतः न अपेक्षन्ते ॥
(मं. ४)

' जे उत्तम विद्वान् या विश्वाधार यज्ञाला पसरवितात अर्थात् स्वतःच्या सर्व आयुष्यभर करीत रहातात, ते या भूमीवरून सरळ द्युलोकांत जातात. ते तेथील स्वर्गसुखाची सुद्धां इच्छा करीत नाहींत; आणि त्यापेक्षांहि श्रेष्ठ असें आत्मज्योति प्रकाशमय स्थान प्राप्त करून घेतात. ' हा लोक फक्त आत्मसमर्पणरूपी यज्ञ केल्यानेंच प्राप्त होतो.

खरे डोळे

पांचव्या मंत्रांत या परमात्म्यास ' देव आणि मनुष्यें यांचे डोळे असें म्हटलें आहे.'

देवतानां उत मानुषाणां चक्षुः । (मं. ५)

' देव आणि मनुष्यांचें डोळे हा आत्मा आहे.' मनुष्याचा डोळा त्याच्या शरीरांतच असतो पण तो स्वतःच्या शक्तीनें काम (पहाण्याचें) करूं शकत नाहीं; सूर्यप्रकाशाशिवाय डोळा कांहींहि पाहूं शकत नाहीं. त्यामुळें सूर्यास ' डोळ्याचा डोळा ' असें म्हणतात. परंतु सूर्य सुद्धां परमात्म्याच्या प्रकाशशक्तीविना प्रकाश देण्याचें कार्य करूं शकत नाहीं. त्यामुळें परमात्म्यास ' सूर्याचा सूर्य ' म्हणतात. यावरून असें सिद्ध होतें कीं डोळ्याचा डोळा सूर्य आणि सूर्याचा सूर्य परमात्मा होय. त्यावरून ' डोळ्याचा खरा डोळा ' तर परमात्मा हाच होय. हा भाव वरील मंत्रभागाचा आहे. हें सत्य फक्त डोळ्यापुरतेंच आहे असें नव्हे, तर शरीराच्या सर्व इंद्रियांबद्दलहि तें तितकेंच सत्य आहे. म्हणून ज्याप्रमाणें डोळ्याचा डोळा असतो, तद्वत् कानाचा कान, नाकाचें नाक, मनाचें मन आणि बुद्धीची बुद्धि आहे. याप्रमाणें सर्व इंद्रियांचें मूळ स्रोत तेज आहे. त्यास अशा प्रकारें जाणणें आणि त्याचा अनुभव करणें हें अनुभवानेंच साध्य होतें. तो—

देवतानां प्रथमः (मं. ५)

' सर्व देवांत प्रथम आहे. ' म्हणजे त्यापूर्वी कोणी होऊन गेला नाहीं. सर्वप्रथम तो होता. आणि सर्वांचे शेवटीं तोच राहील. सूर्यादि देव अत्यंत तेजस्वी आहेत, निःसंशय पुष्कळ शक्तिशाली आहेत. परंतु ते त्याच्याच शक्तीनें बनलेले आहेत आणि त्याच्या शक्तीमुळेंच स्वतःचीं कार्यें करूं शकतात. ज्या देवतेचें महात्म्य असें आहे त्याच देवाचें यजन (पूजन) यज्ञांत होत असतें. त्यामुळें ' यज्ञ ' हें नांव आत्म्याचें आहे. खरा यज्ञपुरुष तोच आहे. यज्ञांत जे या यज्ञपुरुषाची पूजा करतात ते—

इयक्षमाणाः सजोषाः यजमानाः स्वः भृगुभिः स्वस्ति यन्तु । (मं. ५)

' यज्ञ करणारे आणि समान प्रेमभाव राखणारे यजमान आत्मिक प्रकाशस्थानास भृगूंच्यासह सुगमतेनें जातात ' त्याची पूजा करण्याचें हें फळ आहे. जे तपश्चर्या करून स्वतःच्या पापांचें भर्जन म्हणजे नाश करतात त्यांस ' भृगु ' असें नांव आहे. तपः-सामर्थ्यानें पापाचा नाश करणाऱ्यास ' भृगु ' म्हणतात. हे तपस्वी सरळ आत्म्याच्या प्रकाशलोकांत जातात. पूर्वोक्त प्रकारें यज्ञ करणारे याजक त्याच लोकांत जातात. आणि सर्वांवर समान प्रेमभाव ठेवतात, अर्थात् ज्यांची समदृष्टि झाली आहे, त्यांच्या-शिवाय इतर लोकांस या लोकांस प्राप्त करण्याचा अधिकार नाहीं. सहाव्या मंत्राचें कथन हाच आशय व्यक्त करीत आहे.

दिव्यं सुपर्णं पयसं बृहन्तं अजं पयसा घृतेन अनज्मि । (मं. ६)

' दिव्य, पूर्ण, वेगवान्, महान् अजन्मा आत्म्याची दूध आणि तुपानें मीं यज्ञांत पूजा करतों ' हा मंत्रभाग अत्यंत स्पष्ट आहे. यज्ञांत पूजा आहुतीनीं होते. हवनांत आहुति देणें हा आत्म-समर्पणाचा आरंभ असतो. या यज्ञाचें स्वरूप अंतीं आत्मसमर्पण करणें हेंच आहे. या पूर्ण आत्मसमर्पणाची पहिली पायरी म्हणजे यज्ञांत कांहीं आहुति टाकणें हें होय. समर्पणशक्ति वाढविल्यानें त्याची खरी पूजा होऊं शकते. आणि त्याचरोबरच स्वतःची आत्मशक्ति वाढत जाते.

तेन उत्तमं नाकं अभि आरोहन्तः ।
सुकृतस्य स्वः लोकं गेष्म । (मं. ६)

' त्याच्यापासून उत्तम स्वर्गलोक प्राप्त करतां करतां आम्हीं सुकृताच्या आत्मज्योतिरूप लोकास प्राप्त करूं ' हें पूर्वी सांगित-लेल्या आत्मयज्ञाचें फळ आहे. खऱ्या वैदिकयज्ञाचें हेंच अंतिम साध्य आहे.

पंचामृत भोजन

येथें पंचामृत भोजनाचें विधान आहे. पंचामृत तर सर्व लोकांच्या माहितीचें आहे. दूध, दही, तूप, साखर आणि मध या पांच पदार्थांना पंचामृत म्हणतात. परंतु आत्मसमर्पणरूपी महायज्ञांत आमचीं इंद्रियेरूपी गायी आहेत आणि या यज्ञमंड-पांत त्यांचें दोहन होतें. त्या दुधानें जीं पांच अमृतें बनतात तीं येथें ध्यावयाचीं आहेत. हे ' पंच+ओदन ' आहेत. पंच-

ज्ञानेंद्रियांनीं प्राप्त होणारीं हीं पांच अमृतें आहेत. ज्ञानाचें दुसरें नांव अमृत आहे. येथें पांच ज्ञानांना पंच ओदन म्हटलें आहे, कारण ज्याप्रमाणें ओदन अथवा अन्न स्थूल शरीराला पोषक असतें, त्याचप्रकारें हे पांच प्रकारचे ज्ञानरस अथवा ' सुधारस ' आत्मा–बुद्धि–मन यांचें पोषण करितात, त्यांचा उद्धार केला पाहिजे—

एतं ओदनं दर्व्या पंचधा उद्धर । (मं. ७)

' हें अन्न दर्वीनें पांच प्रकारें वर घे, ' म्हणजे पांच प्रकारांनीं त्याचा उद्धार कर. हें अन्न पंचविध असून एकदुसऱ्यापासून भिन्न आहे. पांच प्रकारें त्याचा उद्धार होण्याचा संभव आहे. यामुळें असें ध्यानीं येतें कीं, हें पंचज्ञानेंद्रियांनीं प्राप्त होणारें पंचविध ज्ञानच होय. प्रत्येक इंद्रियानें प्राप्त होणारें ज्ञान उच्च अथवा नीच असतें. म्हणून येथें सूचना केली आहे कीं, ' उद्धर, ' उद्धार कर अर्थात् पांच प्रकारचें ज्ञान अशा प्रकारें प्राप्त करून घे कीं ज्यामुळें उद्धार होईल. दोन प्रकारचें ज्ञान तुजपुढें आलें तर त्यांतील तुझा उद्धार करील तेंच ज्ञान स्वीकार, आणि दुसरें दूर कर. प्रत्येक विषयांत अशारीतीनें मनुष्यासमक्ष दोन प्रकार येतात. स्वतःच्या उद्धाराची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें पांच प्रकारचें ज्ञान अशा रीतीनें प्राप्त करून घ्यावें कीं त्यामुळें त्याचा उद्धार व्हावा हें त्यास उचित आहे. अन्नाचा भांड्यांतून उद्धार (उचलणें) पळीनें अथवा चमच्यानेंच करणें शक्य आहे. म्हणून या मंत्रांत पळीनें उद्धार करण्याचा उपदेश केला आहे. पंच ज्ञानरूपी पंचपक्वान्नाचा उद्धार करणारी पळी येथें कोणती तें विचार करण्यासारखें आहे. त्यासाठीं खालीं दिलेला मंत्र पहाण्यासारखा आहे—

तिर्यग्बिलश्चमस ऊर्ध्वबुध्नस्तस्मिन्यशो निहितं विश्वरूपम् । तदासत ऋषयः सप्त साकं ये अस्य गोपा महतो बभूवुः ॥ (अथर्व. १०।८।९)

' तिरप्या तोंडाचा एक चमचा आहे, ज्याचा खालचा भाग वर वळलेला आहे आणि ज्यांत विश्वरूप यश ठेवलें आहे. तेथेंच सात ऋषि रहातात ते त्याचे रक्षक आहेत. ' येथें जो चमचा सांगितला तें मनुष्याचें शिर त्याचें तोंड खालीं आणि खालचा भाग वर आहे. त्यांत विश्वरूप यश आणि विश्वाचें ज्ञान आणि आत्म्याचें विज्ञान एकत्रित केलें आहे. सात ऋषि त्यांत रहातात ते त्याचे रक्षक आहेत. या मंत्रानें पळी अथवा चमच्याची माहिती चांगल्या प्रकारें होते. हें सर्व रूपक मस्तकावर केलें आहे. त्यांतून ज्ञानरूपी अन्न घेण्यांत येतें आणि चांगलें आणि वाईट यांचा विचार येथेंच करावयाचा असतो.

वरील मंत्रांतील ' चमचा ' शब्दाचा संबंध या सूक्तांतील ' दर्वी ' शब्दाशीं जोडला पाहिजे. पाठकाच्या हें ध्यानीं येईल कीं ही पळी आणि चमचा एकच आहे. येथें पाठकांस सूचना अशी आहे कीं यज्ञांत जी जी सामग्री अथवा चमचा किंवा पळी-सारखीं जीं साधनें आवश्यक असतात तीं सर्व शेवटीं स्वतःच्या शरीरावरच (रूपक रूपानें) पहावयाचीं असतात. ही वेद परिभाषा आहे. येथें चमचा शब्द शरीरावर आरोपित आहे. दुसऱ्या ठिकाणीं समिधा शब्द असाच आरोपित केला आहे. याप्रकारें सर्व शब्द मंत्रांत भिन्न भिन्न स्थानीं आधारित आहेत. अशा प्रकारें वेद असे दाखवितात कीं, अंतिम यज्ञ आत्मसर्वस्व समर्पणानें होतो. येथें याप्रकारें पांच प्रकारचें ज्ञान आत्मोद्धारा-साठीं प्राप्त करण्याचा उपदेश या सातव्या मंत्राच्या पूर्वार्धांत केला आहे. त्यानंतर दोन मंत्रानीं म्हणजे सातव्याचा उत्तरार्ध आणि संपूर्ण आठव्या मंत्रानें स्वतःचें शरीर विश्वरूप बनविण्याचा उपदेश केला आहे.

विश्वरूप बना (व्हा)

आपलें शरीर केवळ आपणांसाठीं नाहीं परंतु तें सर्व विश्वाच्या चांगल्यासाठीं आहे. म्हणून तें विश्वासाठीं समर्पण केलें पाहिजे. मी सर्व जगाचा एक अवयव आहे. अवयवाची पूर्णता अवयवी-साठीं समर्पित होण्यांत आहे. ज्याप्रमाणें शरीराच्या अवयवाची पूर्णता शरीराच्या कल्याणकार्यासाठीं समर्पित होण्यानें होऊं शकते, त्याचप्रमाणें एक मनुष्याची पूर्णता त्यानें समष्टीसाठीं आत्मार्पण करण्यानें होते. हीच आत्मसमर्पणाची कल्पना या मंत्रांत सांगि-तली आहे तिचें स्वरूप असें आहे—

१ पूर्वदिशेसाठीं माझें मस्तक अर्पण केलें आहे.
२ दक्षिणदिशेसाठीं उजवी बाजु (कूस) अर्पण केली आहे.
३ पश्चिमदिशेसाठीं माझा पश्चात् भाग अर्पण केला आहे.
४ उत्तरादिशेसाठीं माझी डावी बाजू (कूस) अर्पण केली आहे.
५ ऊर्ध्वदिशेसाठीं माझी पाठ आणि पृष्ठवंश अर्पण केला आहे.
६ ध्रुवदिशेसाठीं माझें पोट अर्पण केलें आहे.
७ मध्यदिशारूप अंतरिक्षासाठीं माझा मध्यभाग समर्पण केला आहे.

(मं. ७।८)

' याप्रमाणें माझें सर्व शरीर सर्व दिशांना समर्पण केल्यामुळें ' मी विश्वासाठीं जिवंत आहे. माझ्या शरीराचा अमुक भाग विश्वा-च्या अमुक भागासाठीं समर्पण केलेला आहे. याप्रमाणें सर्व विश्वासाठीं माझें आत्मसमर्पण झालेलें आहे. आता माझें जीवन जगासाठीं आहे. समष्टीच्या कल्याणासाठीं मी आत्मयज्ञ केला आहे. हें या उपदेशाचें तात्पर्य आहे. त्यानंतर—

सर्वैः अंगैः विश्वरूपं संभृतं शृतं अजं शृतया त्वचा प्रोर्णुहि। (मं. ९)

' स्वतःच्या सर्वांगानीं विश्वरूप बनून नंतर परिपक्व झालेल्या अजन्म्या जीवात्म्याला परमात्म्याच्या परिपक्व त्वचेसदृश झांकणांनीं झांकून टाकला पाहिजे.' स्वतःस आपण सर्व बाजूनीं परमात्म्याच्या आवरणानें झांकून गेलों आहोत असा अनुभव व्हावयास पाहिजे. परमात्मा आपल्या आजुबाजूस सर्वत्र व्यापलेला आहे असा अनुभव आला पाहिजे. ही गोष्ट स्वाभाविकपणें आपोआप होईल. त्यानंतर—

चतुर्भिः पद्भिः दिक्षु प्रति तिष्ठ।
इतः उत्तमं नाकं अभि उत्तिष्ठ। (मं. ९)

' स्वतःच्या चार पायांनीं सर्व दिशांस प्रतिष्ठित हो. आणि नंतर येथून सरळ उत्तम स्वर्गाकडे चल.' आतां तुला रस्त्यांत कोणी अडविणार नाहीं. येथें वर्णिलेले चार पाय, म्हणजे जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुरीय या अवस्था होत. चतुष्पाद अज आत्म्याचें वर्णन मांडुक्योपनिषदामध्यें आहे.

सोऽयमात्मा चतुष्पाद् ॥ २ ॥ जागरितस्थानो बहिः प्रज्ञ...प्रथमः पादः ॥ ३ ॥ स्वप्नस्थानोऽन्तः प्रज्ञः---द्वितीयः पादः ॥ ४ ॥ सुषुप्तस्थान एकीभूतः प्रज्ञानघन एवानन्दमयो ह्यानन्द-भुक्चेतोमुखः प्राज्ञस्तृतीयः पादः ॥५॥ अदृष्टमव्यवहार्य......एकात्मप्रत्ययसारं... चतुर्थं मन्यन्ते ॥ ७ ॥ (मांडुक्य उपनिषद्)

' हा अज आत्मा चतुष्पाद आहे. ज्यामध्यें बाह्यजगताचें ज्ञान होतें ती जागृति हा त्याचा पहिला पाय आहे. ज्यांत त्याची प्रज्ञा आंतच सामावलेली रहाते तें स्वप्न हा त्याचा दुसरा पाय होय. तिसरा पाय सुषुप्ति अर्थात् गाढ निद्रा. ज्यावेळीं एकात्म होऊन आनंद अवस्थेंत लीन होतो आणि अदृष्टरूपी अव्यवहार्य होतो हा त्याचा चौथा पाय होय.

हें वर्णन आत्म्याचे चतुष्पाद दाखवीत आहे. कित्येक लोक पायाचें वर्णन येथें असल्यानें ' चतुष्पाद अज ' या शब्दांचा अर्थ ' चार पायांचा बकरा ' असा करतात आणि नंतर अर्थाचा अनर्थ करतात म्हणून त्यांनीं या उपनिषद् वचनांचें मनन करणें हें योग्य होईल. सरळ उत्तम स्वर्गांत जाणें हें या चार पायांनींच संभवनीय आहे. ही गोष्ट आतां स्पष्ट झाल्यानें त्यासंबंधीं जास्त कांहीं लिहिणें रहात नाहीं. जागृति, स्वप्न, सुषुप्ति आणि तुर्यावस्थेंत जो अनुभव मिळतो आणि जागृतीमध्यें जीं कर्में केलीं जातात, त्या द्वारानेंच मनुष्याची उन्नति होणें शक्य आहे. त्याशिवाय दुसरा कोणताहि अन्य मार्ग नाहीं.

एक शंका

या सूक्तांत भूलोकावरून अंतरिक्ष, अंतरिक्षावर स्वर्ग, स्वर्गावर आत्मप्रकाशलोक असें म्हटलें आहे (मंत्र ३). मंत्रांत ' आरुह् ' पद पण वर चढण्याची क्रिया दर्शवितें. त्यामुळें सर्वसाधारण लोकांस हे लोक एकावर दुसरा असे आहेत असें वाटेल. पण तसें नाहीं. हे लोक शरीरांतच गुदापासून बेंबीपर्यंत भूलोक, बेंबीपासून गळ्यापर्यंत अंतरिक्षलोक, मस्तक हा स्वर्गलोक आणि आत्मप्रकाशलोक जेथें हृदयामध्यें हृदयाचे धबकारे होत असतात तेथें. येथें असें समजतां येईल कीं पहिले तीन लोक एकावर एक असे आहेत, परंतु चौथा लोक खालीं मध्यभागीं आहे अर्थात् येथें वर या शब्दानें जागेच्या (स्थलाच्या) वर खालीपणाचा बोध नसून अवस्था, योग्यता, अनुभव इत्यादींच्या उच्च-नीच भावाविषयींचें ज्ञान आहे. वास्तविक अशी स्थिति आहे कीं, भूः, भुवः, स्वः, महः आदि लोक अथवा पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग, आत्मज्योति इत्यादि लोक सर्व स्थानीं आहेत. ज्याप्रमाणें एकाच ठिकाणीं, दगड, रेती, वायु, जल, उष्णता, विद्युत् इत्यादि रहातात, त्याचप्रमाणें उक्त सर्व लोक एकाच स्थानीं आहेत. जे लोक स्वतःच्या सूक्ष्म इंद्रियांस सूक्ष्म लोकांत काम करण्यास योग्य बनवितात, त्यांनांच उच्च लोकांत रहाण्याचा हक्क प्राप्त होतो. अर्थात् येथें रहाणारा मनुष्य सुद्धां आत्मप्रकाश लोकाचा अनुभव घेऊं शकतो.

पाठकांनीं या सूक्ताचें मनन अशाप्रकारें करावें आणि उचित बोध करून घेऊन स्वतःच्या आध्यात्मिक उन्नतीच्या मार्गांत प्रगति करावी.

*

आत्मोन्नतीचें साधन

(ऋषिः-अथर्वा ' ब्रह्मवर्चस कामः ' । देवता-आत्मा)

कांड ७, सूक्त १

धीती वा ये अनयन्वाचो अग्रं मनसा वा येऽवदन्नृतानि ।
तृतीयेन ब्रह्मणा वावृधानास्तुरीयेणामन्वत नाम धेनोः ॥ १ ॥
स वेद पुत्रः पितरं स मातरं स सूनुर्भुवत्स भुवत्पुनर्मघः ।
स द्यामौर्णोदन्तरिक्षं स्व१: स इदं विश्वमभवत्स आभवत् ॥ २ ॥

अर्थ— (**ये वा मनसा धीती**) जे स्वतःच्या मनानें ध्यानास (**वाचः अग्रं अनयन्**) वाणीच्या मूळ स्थाना[illegible] [illegible]होचवितात. त्याचप्रमाणें (**ये वा ऋतानि अवदन्**) जे सत्य बोलतात, ते (**तृतीयेन ब्रह्मणा वावृधानाः**) [illegible] (**तुरीयेन**) चौथ्या भागानें (**धेनोः नाम अमन्वत**) कामधेनूच्या नांवाचें मनन करितात. (१)

([illegible] **सुनुः भुवत्**) तोच उत्पन्न झाला. (**सः पुत्रः पितरं सः च मातरं वेद**) तोच स्वतःच्या मातापित्यास [illegible]. (**सः पुनर्मघः भुवत्**) तो वारंवार दान देणारा होतो. (**सः द्यां अन्तरिक्षं स्वः औणोंत्**) तो द्युलोक, अन्तरिक्ष आणि आत्मप्रकाशास स्वतःच्या आधीन करतो. (**इदं विश्वं अभवत्**) तो हें सर्व विश्व बनतो आणि [illegible] **आभवत्**) तो सर्वत्र असतो (२)

भावार्थ— (१) मनानें ध्यान करून वाणीची उत्पत्ति जेथून होते त्या वाणीच्या मूलस्थानास पहाणें, (२) हमेशा सत्य बोलणें, (३) ज्ञानानें संपन्न होणें, (४) कामधेनुस्वरूप परमेश्वराच्या नांवाचें मनन करणें हीं चार आत्मोन्नतीचीं साधनें [illegible] (१)

[illegible] ही चतुर्विध साधना करतो त्याचा जन्म सफल होतो. तो स्वतःच्या मातापिता स्वरूपी परमात्म्यास जाणतो. तो आत्म[illegible] [illegible] त्यामुळें तो त्रिभुवनास स्वतःच्या शक्तीनें घेरतो. जणूंकाय तो विश्वरूप झाला आहे आणि सर्वत्र व्यापला आहे. (२)

आत्मोन्नतीचें साधन

साधन मार्ग

आत्मोन्नतीचा साधनमार्ग या सूक्तांत सांगितला आहे. हा मार्ग चतुर्विध आहे. अथवा असें समजा कीं हा मार्ग दाखविणारीं चार सूत्रें सांगितलीं आहेत. तीं आत्मोन्नतीचीं चार सूत्रें अशीं आहेतः—

ऋतानि अवदन्—सत्य बोलणें. अर्थात् कपटी अथवा [illegible] बोलावयाचें नाहीं आणि अन्य इंद्रियास सुद्धां असत्य मार्गास [illegible] करावयाचें नाहीं, सदा सत्यनिष्ठ, सत्यव्रती आणि सत्यभाषी होणें (मं. १)

ब्रह्मणा वावृधानः—बंधनातून मुक्ति देतें त्या ज्ञानाचें नांव ब्रह्म. (**मोक्षे धीर्ज्ञानं**) ज्ञानाचा अर्थच बंधनातुन सुटण्याच्या उपायाचें ज्ञान. या ज्ञानांत जो पुढें पुढें जातो. म्हणजे ज्ञानानें जो परिपूर्ण होतो, जो आत्मज्ञानाच्या साधनाचा उपाय करूं इच्छितो, त्यास हें ज्ञान अवश्य असलें पाहिजे. (मं. १)

३ **धेनोः नाम अमन्वत**— कामधेनूच्या नांवाचें मनन करतो. भक्तांची मनःकामना पुरविणारी कामधेनु परमेश्वराची शक्तीच आहे. त्याची गुणबोधक नामें अनंत आहेत. त्याच्या मननानें आणि ते गुण स्वतःचें अंतरंगांत स्थिर करण्यानें

मनुष्याची उन्नति होते. (मं. १)

मनसा धीती वाचः अग्रं अनयन्— मनाच्या एकाग्रतेनें ध्यानद्वारा वाणीच्या मूलस्थानीं पोहोंचणें. हें आत्म्याच्या स्थानाला प्राप्त करून घेण्याचें साधन आहे. वाणी उत्पन्न कशी होते तें पहा—

आत्मा बुद्ध्या समेत्यार्थान् मनो युङ्क्ते विवक्षया ।
नमः कायाग्निमाहन्ति स प्रेरयति मारुतम् ॥ ६ ॥
मारुतस्तूरसि चरन्मंद्रं जनयति स्वरम् ॥ ७ ॥
सोदीर्णो मूर्ध्न्यभिहतो वक्त्रमापद्य मारुतः ।
वर्णाञ्जनयते तेषां विभागः पञ्चधा स्मृतः ॥ ८ ॥

(पाणिनीय शिक्षा)

(१) आत्मा बुद्धीच्या सहाय्यानें विशेष प्रयोजनाचें अनुसंधान करतो. (२) त्यानंतर तें प्रयोजन प्रगट करण्यासाठीं मनाला नियुक्त करतो. (३) मन शरीरांतील अग्नीस प्रेरित करतें. (४) तो अग्नि वायूस गति देतो. (५) तो वायु छातीच्यावर येऊन मंद्र स्वर उत्पन्न करतो. (६) तो मूर्धस्थानांत येऊन तोंडाच्या विविध स्थानीं आघात करतो. (७) विविधस्थानांच्या आघातानें विविध वर्ण निर्माण होतात. त्यास वाणी म्हणतात.

वाणीची उत्पत्ति या प्रकारें होते. जेव्हां मनुष्य ध्यानानें वाणीची उत्पत्ति पहातो आणि (**वाचः अग्रं**) वाणीच्या मूल स्थानास प्राप्त करून घेतो, तेव्हां तो आत्म्याला त्यास्थानीं पहातो. याप्रमाणें वाणीचें मूलस्थान शोधीत असतां आत्म्याची माहिती होते. वाणीच्या मूलस्थानाला पहाण्याची क्रिया अन्तर्मुख होऊन अंतरंगाचें निरीक्षण करण्यानें होते. उदाहरणार्थ एखादा शब्द घेऊं. तो शब्द कित्येक अक्षरांनीं म्हणजे वर्णांनीं झालेला असतो. हे वर्ण वायूनें तोंडाच्या आंत निरनिराळ्या स्थानीं आघात केल्यानें उत्पन्न होतात. वर्णोत्पत्तिपूर्वी जो वायु छातींत पसरतो त्यांत हे निरनिराळे वर्ण नम्रतात. त्यापूर्वी जेव्हां अग्नि वायूस प्रेरणा देतो, तेव्हां तर त्यांत शब्दाचें नांवनिशान पण असत नाहीं. त्याचेहि पूर्वी मनाची प्रेरणा आहे. आणि तत्पूर्वी आत्म्याची बोलण्याची प्रवृत्ति आहे. याप्रमाणें जसजसें खोलांत जाऊन पहाण्याचा प्रयत्न करावा, तों तों मानसिक ध्यानपूर्वक वाणीच्या मूलस्थानाचा पत्ता लागतो आणि तेथेंच आत्म्याचें दर्शन होतें. याच विषयाचें वेदांत वर्णन असें केलेलें आहे.

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः । गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥ ४५ ॥
इन्द्रं मित्रं वरुणमग्निमाहुरथो दिव्यः स सुपर्णो गरुत्मान् । एकं सद्विप्रा बहुधा वदन्त्यग्निं यमं मातरिश्वानमाहुः ॥ ४६ ॥

(ऋ. १।१६४, अथर्व ९।१०।२७-२८)

' वाणीस चार पाय आहेत. मननशील ब्रह्मज्ञानी ते जाणतात. त्यांतील तीन हृदयांत गुप्त आहेत. आणि प्रगट असा वाणीचा चौथा पाय आहे. तो म्हणजे मनुष्याची भाषा. तिच्या सहाय्यानें तो बोलतो. ही वाणी तेथून ज्या मूळकारणानें प्रगट होते तो एकच सत्य वस्तु आहे. परंतु ज्ञानी लोक त्या वस्तूला अनेक नांवें देतात. तिला इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, यम, मातरिश्वा वगैरे म्हणतात. '

ज्याच्यामुळें वाणी प्रगट होते तोच आत्मा होय. आणि त्यामुळेंच वाणीचें मूळ शोधीत असतां आत्म्याची प्राप्ति होते. याप्रमाणें या सूक्तांत सांगितलें आहे.

सारांश आत्म्याचा शोध करण्याचा मार्ग या प्रकारें या सूक्तांत सांगितला आहे. त्यास जर संक्षिप्त करणें असेल तर ' (१) [illegible] निष्ठा, (२) सत्यज्ञान, (३) प्रभुगुणमनन आणि (४) वाङ्मूलान्वेषण या चार शब्दांनीं सूचित होणारा हा आत्मोन्नतीचा मार्ग आहे. मनुष्य या मार्गानें जाऊन स्वतःच्या आत्म्याचा पत्ता लाऊं शकतो. आणि सत्याच्या आश्रयानें आणि ज्ञानाच्या प्रकाशानें यथेच्छ उन्नति प्राप्त करूं शकतो. येथें ज्ञानाचा अर्थ ' बंधनांतून मुक्त होण्याचें निश्चित ज्ञान ' असा समजावयाचा. अन्य पांच भौतिक ज्ञानासाठीं संस्कृतमध्यें विज्ञान शब्द आहे. जो या श्रेष्ठ ज्ञानानें युक्त होतो तो मनुष्य—

(५) सः सुनुः भुवत्– त्यासच खरा जन्मलेला असें म्हणावें. म्हणजे त्यानेंच जन्म घेऊन स्वतःचें जन्म सार्थक केलें असें म्हणता येईल. इतर लोक जन्म तर घेतात, परंतु त्यांचा जन्म व्यर्थ होतो, कारण कीं जन्माचें प्रयोजन ते सफल करूं शकत नाहींत. त्यामुळें त्यांचा जन्म व्यर्थ होतो. [illegible] सफल होण्याचें साधन असें आहे—

(६) सः पुत्रः पितरं मातरं च वेद– जो पुत्र स्वतःच्या मातापित्यांस जाणतो. स्वतःच्या मातापित्यास यथावत् जाणल्यानें पुत्राचा जन्म सफल होतो. जेव्हां तो आपल्या मातापित्यांच्या गुणांचें योग्य प्रकारें मनन करील तेव्हांच तो त्यांना जाणूं शकेल. हा गुणांचें मनन करण्याचा उपदेश (**नाम अमन्वत** । मं. १) पहिल्या मंत्राच्या शेवटच्या चरणांत सांगितला आहे. पित्याचें अथवा मातेचें नांव घेणें अथवा त्यांच्या गुणांचें मनन करणें हें अशासाठीं आहे कीं, पुत्रानें स्वतःस सुयोग्य बनवून पित्यासमान व्हावें. मातापित्यास जाणण्यानें हें साध्य करावयाचें आहे. माझे मातापिता असे शुद्धाचरणी होते,

मीं सुद्धां तसाच शुद्धाचरणीं होईन. मातापित्यास जाणल्यानें पुत्रामध्यें अशा प्रकारची उन्नतीसाठीं प्रेरणा होते. येथें ' पुत्र ' शब्दाचा अर्थ विशेष महत्त्वपूर्ण आहे. ' पु+त्र ' म्हणजे जो स्वतःच स्वतःला **(पुनाति)** पवित्र करतो आणि **(त्रायते)** स्वतःचें रक्षण करतो तोच खरा पुत्र होय. स्वतः स्वतःला निर्दोष पवित्र आणि शुद्ध बनविणें आणि स्वतःच स्वतःचें दोष आणि पापापासून रक्षण करणें हें कार्य जो करतो तो खऱ्या अर्थानें पुत्र होय. जे असें करीत नाहींत ते केवळ जन्तु मात्र होत. अशा प्रकारें जो सुपुत्र आहे, तो जेव्हां स्वतःच्या परमपित्याच्या गुण-कर्माचें मनन करतो त्यावेळीं त्याच्या मनांत असा विचार येतो कीं मी सुद्धां माझ्या परमपित्यासारखा आणि मातेसारखा होईन. प्रयत्न करून मीं तसा होईन, या विचारानें तो प्रेरित होतो. त्यामुळें—

(७) सः पुनर्मघः भुवत्– तो वारंवार दान देणारा होतो. तो स्वतः तन, मन, धन इत्यादि स्वतःच्या सर्वशक्ति जनतेच्या कल्याणासाठीं वारंवार समर्पित करतो. दान करण्यांत तो पाऊल मागें घेत नाहीं. त्याचेंच नांव यज्ञ आहे. स्वतःच्या शक्तींचा यज्ञ करण्यानेंच मनुष्य उन्नत होत जातो. तो असें पहातो कीं, परमपिता स्वतःच्या सर्वशक्ति सर्वांच्या कल्याणासाठीं समर्पित करीत आहे. ही गोष्ट पाहून तो त्याचें अनुकरण करतो. अशा प्रकारें परमपित्याच्या अनुकरणानें तो प्रत्येक वेळीं जास्त जास्त शक्ति प्राप्त करून घेतो. आणि त्यास जितकी जास्त जास्त शक्ति मिळत जाते तसतसें त्याचें कार्यक्षेत्र व्यापक होत जातें. उदाहरणार्थ अडाणी (अज्ञानी) मनुष्य स्वतःच्या पोटापाण्याच्या उद्योगक्षेत्रांत कार्य करीत असतो. गृहस्थाश्रमी मनुष्य स्वतःच्या कुटुंबाच्या भरणपोषणाच्या कार्यक्षेत्रांत गुंतलेला असतो. नगर सुधारक स्वतःच्या नगर सुधारणेच्या कार्यांत तन्मय होऊन जातो. राष्ट्राचा पुढारी राष्ट्रीय कार्यक्षेत्रांत स्वतःच्या हालचाली करीत असतो. त्याचप्रमाणें, **' वसुधैव कुटुंबकम् '** वृत्तीचा संन्यासी संपूर्ण जनता आपलाच परिवार समजून त्यांच्या कल्याणासाठीं आत्मसमर्पण करतो. याप्रमाणें ज्याला ज्याप्रमाणांत अधिक शक्ति प्राप्त होत जाते, त्या त्या मानानें तो अधिकाधिक विस्तृत कार्यक्षेत्रांत काम करतो. याप्रमाणें शक्तीची वाढ होतां होतां अंतीं—

(८) स द्यां अन्तरिक्षं स्वः और्णोत्– तो द्युलोक, अंतरिक्ष, आणि सर्व प्रकाशमय लोकांत व्यापून रहातो. मनुष्याची शक्ति जेव्हां फार वाढते, तो जेव्हां विशेष उन्नत होतो त्यावेळीं तो अवकाशांत संपूर्णपणें व्यापून रहातो. साधारण आत्म्याचा ' महात्मा ' झाल्यानें ही गोष्ट सिद्ध होऊं शकते. त्यामुळें—

(९) सः इदं विश्वं अभवत्– तो हें सर्व विश्वरूप होऊन रहातो. जेव्हां त्याची शक्ति परमसीमेपर्यंत वृद्धिंगत होते तेव्हां त्यास आपण विश्वरूप झालों आहोंत असा अनुभव येतो. कांहीं मनुष्यें फक्त ' शरीररूप ' असतात, म्हणजे त्यांच्या शरीरास कष्ट झाल्यानें ते दुःखी होतात. कित्येक माणसें ' कुटुंबरूप ' असतात. त्यांच्या कुटुंबांतील कोणा माणसास दुःख झाल्यानें ते दुःखी होतात. कित्येक लोक ' राष्ट्ररूप ' बनलेले असतात. त्यांस राष्ट्रांतील कोणीहि मनुष्य दुःखी झाल्यानें दुःख होतें. त्याचप्रमाणें जे ' विश्वरूप ' बनलेले असतात त्यांस संपूर्ण विश्वांत कोणीहि दुःखी दिसला तर त्यांस दुःख होतें. याचप्रमाणें त्यांच्या अधिकाराप्रमाणें त्यांस सुखही मिळतें. या प्रकारें मनुष्याच्या शक्तीचा विस्तार होतो आणि मनुष्य जेव्हां विश्वरूप होतो, तेव्हां त्याच्या उन्नतीची परम सीमा होते, अशावेळीं—

(१०) सः आभवत्– तो सर्वत्र पसरतो. स्वतः म्हणजे विश्वरूप झालेला आत्मा समस्त विश्व व्यापून रहातो. प्रारंभीं मनुष्याचा आत्मा स्वतःच्या शरीराइतकाच पसरतो, परंतु त्याची शक्ति जसजशी वाढूं लागते तसतसें त्याचें कार्यक्षेत्र जास्त विस्तृत झाल्यानें तो विश्वरूप होऊन जातो. हा आत्म्याचा प्रसार शक्तीच्या विस्तारामुळें होतो. त्याचें उदाहरण असें देतां येईल. एक दिवा आहे. त्याचा प्रकाश एका लहानशा खोलींतच पसरला आहे. आतां कांहीं यंत्रप्रयोगानें त्याच्या प्रकाशशक्तींचा विस्तार करण्यांत आला तर तो दिवा दहावीस मैलापर्यंत प्रकाश देण्यास समर्थ होईल. अग्नीची एक लहानशी ठिणगी सुद्धां महान् दावानलाचें रूप धारण करूं शकते. त्याचप्रकारे जीवात्म्याच्या शक्तीचा विकास होण्याची कल्पना पाठकानें करावी.

कित्येक माणसें अशीं असतात कीं त्यांची आज्ञा त्यांच्या परिवारांतच कोणी मानीत नाहीं, इतकी त्यांची शक्ति अल्प असते. परंतु कित्येक महात्मे असे असतात कीं ज्यांच्या शब्दमात्रें करून लाखो नव्हे कोट्यावधि माणसें आत्मबलिदान करण्यास तयार होतात. हा आत्मशक्तीच्या विकासाचा दाखला (उदाहरण) आहे. याप्रमाणें परमसीमेपर्यंत आत्म्याच्या शक्तीचा विकास होण्याचा संभव आहे. या शक्तीच्या विकासाचीं चार साधनें प्रथम मंत्रांत सांगितलीं आहेत. त्या साधनाच्या द्वारें जे अनुष्ठान करतील त्यांस स्वतःची शक्ति विकसित झाल्याचा अनुभव मिळेल. आत्मोन्नतीचा विचार या सूक्तांत असल्यानें हें सूक्त प्रत्यक्ष फलदायी आहे. या सूक्ताचें जास्तींत जास्त मनन पाठक करून अधिकाधिक लाभ मिळवतील अशी आशा आहे.

जीवात्म्याचें वर्णन

कांड ७, सूक्त २

(ऋषिः-अथर्वा ब्रह्मवर्चसकामः । देवता- आत्मा)

अथर्वाणं पितरं देवबन्धुं मातुर्गर्भं पितुरसुं युवानम् ।
य इमं यज्ञं मनसा चिकेत प्र णो वोचस्तमिहेह ब्रवः ॥ १ ॥

अर्थ— (**यः मनसा**) जो मनानें (**इमं यज्ञं अथर्वाणं पितरं**) या पूजनीय आणि स्वतः जवळ रहाणाऱ्या पिता आणि (**देवबन्धुं**) देवांशीं संबंध ठेवणाऱ्या (**मातुः गर्भं**) मातेच्या गर्भांत येणाऱ्या (**पितुः असुं**) पित्याच्या प्राणस्वरूप (**युवानं**) सदातरुण आत्म्याला (**चिकेत**) जाणतो त्यानें (**इह तं नः प्रवोचः**) येथें आम्हांस सर्वांस त्याचें ज्ञान द्यावें आणि (**इह ब्रवः**) येथेंच त्याचें स्पष्टीकरणही करावें. (१)

भावार्थ— जो ज्ञानी स्वतःच्या मनःशक्तीद्वारें या पूजनीय स्वतः पाशीं रहाणाऱ्या, पित्याप्रमाणें रक्षक, देवांशीं संबंध ठेवणाऱ्या, मातेच्या गर्भांत येणाऱ्या, पित्याचें प्राण धारण करणाऱ्या, सदा तरुण म्हणजे कधींहि वृद्ध न होणाऱ्या आणि कधीं बाल्यावस्थेंत पण न रहाणाऱ्या आत्म्याला जाणतो, तो त्याच्या संबंधीचें ज्ञान आम्हां सर्वांस सांगो आणि त्याचें जास्त स्पष्टीकरणही करो. (१)

जीवात्म्याचें वर्णन

जीवात्म्याचे गुण

या सूक्तांत मुख्यतः जीवात्म्याच्या गुणांचें वर्णन केलें आहे. त्याचें मनन केल्यानें जीवात्माचें ज्ञान होतें—

(१) **मातुः गर्भे**- मातेच्या गर्भांत येणारा जीवात्मा आहे. जन्म घेण्यासाठीं तो मातेच्या गर्भांत येतो. यजुर्वेदांत त्या विषयीं असें म्हटलें आहे—

पूर्वो ह जातः स उ गर्भे अन्तः ।
स एव जातः स जनिष्यमाणः ॥ (वा. यजु. ३२।४)

' तो प्रथम उत्पन्न झाला होता. तो यावेळीं गर्भांत आलेला आहे. तो सर्वप्रथम जन्मला होता व भविष्यकाळीं पण जन्म घेईल. ' याप्रमाणें वारंवार जन्म घेणारा हा जीवात्मा आहे.

(२) **पितुः असुं**- पित्यापासून तो प्राणशक्ति धारण करतो. पित्यापासून प्राणशक्ति आणि मातेपासून रयिशक्ति प्राप्त करून तो शरीर धारण करितो.

(३) **युवानं**- तो हमेषा तरुण असतो. तो कधीं वृद्ध होत नाहीं तसाच बालक पण रहात नाहीं. त्याचें शरीर उत्पन्न होतें आणि सहा विकार प्राप्त करतें. (**जायते**) उत्पन्न होतें, (**अस्ति**) रहातें, (**वर्धते**) वाढतें, (**विपरिणमते**) परिणत होतें, (**अपक्षीयते**) क्षीण होतें आणि (**विनश्यति**) नाश पावतें. हे सहा विकार शरीरास प्राप्त होतात. हे सहा विकार होत असून सुद्धां शरीरांत रहाणारा आत्मा सदैव तरुण असतो. तो शरीराप्रमाणें बालक अथवा वृद्ध होत नाहीं. तो अजर आणि अबालक आहे म्हणजे त्यास युवावस्थेंत रहाणारा म्हणतात.

(४) **देवबन्धुं—** तो देवांचा बंधु आहे. देवांना स्वतःशीं बांधून घेणारा जीवात्मा आहे. पाठकांस येथें स्वतःच्या शरीरांत असें पाहण्यास मिळेल कीं, या जीवात्म्यानें स्वतःसमवेत सूर्याचा अंश नेत्ररूपानें डोळ्याच्या ठिकाणीं ठेविला आहे. वायूचा अंश प्राणरूपानें नाकाच्यास्थानीं ठेवला आहे. याप्रमाणें अन्य देवतांचे अंश सुद्धां इंद्रियांमध्यें आणून ठेवले आहेत. या सर्व देवतांच्या अंशांना तो स्वतःबरोबर आणतो आणि स्वतः बरोबर घेऊन जातो. ज्याप्रमाणें भाऊ भाऊ सर्व विचारानें एकत्र नांदतात तद्वत् हा जीवात्मा सर्व देवतांना भावासारखा आहे. आणि देवतांचे अंश त्याचे धाकटे भाऊ आहेत. याप्रकारें तो देवांचा भाऊ आहे.

(५) **अथर्वाणं** (अथ+अर्वाक्- अथर्वा) स्वतःजवळ स्वतःच्या आंत राहणारा. त्यास शोधण्यासाठीं बाहेर कोठें भ्रमण करावें लागत नाहीं. कारण कीं तो सर्वांत जवळ आहे. त्याचेपेक्षां समीप दुसरा कोणी पदार्थ नाहीं.

(६) **पितरं—** तो पित्यासमान रक्षक आहे. जोंपावेतों तो शरीरांत रहातो, तोंपर्यंत शरीराचें तो रक्षण करतो. जणूं काय त्याच्या शक्तीनें शरीराचें रक्षण होतें. जेव्हां तो हें शरीर सोडून जातो तेव्हां या शरीराचें रक्षण कोणी करूं शकत नाहीं. तो जेव्हां या शरीरास सोडून जातो त्यानंतर शरीर सडूं लागतें.

(७) **यज्ञं—** तो येथें यजनीय म्हणजे पूजा करण्यास योग्य आहे. त्याच्यासाठींच येथील सर्व व्यवहार करण्यांत येतात. अन्न, पान, भोग, नियम हें सर्व त्याच्या संतोषासाठीं त्याला अर्पण करण्यांत येतें. परंतु जर तो नसला तर कांहींच केलें जाणार नाहीं. जों पावेतों तो या शरीरांत आहे तोंपर्यंतच सर्व भोग अथवा त्याग केले जातात.

हे सात शब्द जीवात्म्याचें वर्णन करण्यासाठीं या सूक्तांत वापरण्यांत आले आहेत. जीवात्म्याचे गुणधर्म त्यांसंबंधीं विचार केल्यानें कळतात. त्याचा विचार (**मनसा चिकेत**) मनानेंच होऊं शकतो. ज्या पाठकास स्वतःच्या जीवात्म्याचें ज्ञान प्राप्त करून घेण्याची इच्छा आहे त्यानें मनन केलें पाहिजे. मनन जेव्हां उत्तम होईल तेव्हां तो ज्ञानी होईल आणि या ज्ञानाचें (**प्रवोचुः**) प्रवचन करील व (**इह ब्रवः**) येथें व्याख्या करील. कोणीहि मनुष्यानें मनन न करतां प्रवचन करूं नये म्हणजे मननपूर्वक जेव्हां उत्तम ज्ञान प्राप्त होतें तेव्हांच दुसऱ्यास मनुष्य तें ज्ञान देऊं शकतो.

स्वयंपूर्ण ज्ञान ज्यानें मिळविलें असेल त्यासच उपदेश देण्याचा अधिकार प्राप्त होतो. स्वतःस उत्तम ज्ञान नसतां जो उपदेश देण्याचा प्रयत्न करतो तो घातक होतो. उपदेश देण्यास योग्य अधिकारी ज्ञानीच होय.

जेव्हां या जीवात्म्याचें ज्ञान उत्तम प्रकारें होतें तेव्हां तो मनुष्य परमात्म्यास जाणण्यास समर्थ होतो. या बाबतींत अथर्ववेद श्रुति अशी आहे.

ये पुरुषे ब्रह्म विदुस्ते विदुः परमेष्ठिनम् ॥

(अथर्व. १०।७।१७)

' जो सर्व प्रथम पुरुषाचें ठायीं असणाऱ्या ब्रह्मास जाणतो तोच परमेष्ठी प्रजापतीस जाणतो. ' ही ज्ञान प्राप्त करण्याची रीत आहे. स्वतःच्या शरीरांत गुप्त असलेल्या आत्म्याला जाणल्यानें परमेश्वराचें ज्ञान प्राप्त होतें. अशा प्रकारें या मंत्राच्या मननानें प्रथम जीवात्म्याचें ज्ञान होईल आणि त्यास परमसीमेपर्यंत विस्तृत असलेल्या परमात्म्याचा बोध करण्यास तें समर्थ होईल.

आत्म्याचा परमात्म्यांत प्रवेश

कांड ७, सूक्त ३

(ऋषिः- अथर्वा ' ब्रह्मवर्चसकामः ' । देवता- आत्मा)

अया विष्ठा जनयन्कर्वराणि स हि घृणिरुरुर्वराय गातुः ।
स प्रत्युदैद्धरुणं मध्वो अग्रं स्वया तन्वा तन्वमैरयत ॥ १ ॥

अर्थ— (**अया वि-स्था**) या प्रकारच्या विशेष स्थितीनें तो (**कर्वराणि जनयन्**) विविध कर्में करतां करतां (**सः**) तो (**हि वराय गातुः**) श्रेष्ठ देवाच्या प्राप्तीकरितां विस्तृत मार्गरूप आणि (**घृणिः**) तेजस्वी होतां होतां (**सः**) तो (**मध्वः धरुणं अग्रं प्रति उदैत्**) मधुरतेस धारण करणाऱ्या अग्रभागाकडे पोंहोंचण्यासाठीं आपली वर गति करतो, आणि (**स्वया तन्वा**) स्वतःच्या सूक्ष्म शरीरानें त्या देवाच्या (**तन्वं ऐरयत**) सूक्ष्मतम शरीराकडे स्वतःला प्रेरित करतो. (१)

भावार्थ— अशा प्रकारें तो श्रेष्ठ कर्में करतो, आणि त्यामुळें स्वतः परमेश्वराकडे जाण्याचा श्रेष्ठ मार्ग दाखविणारा होतो आणि दुसऱ्यास प्रकाश देतो. तो स्वतः मधुर अमृत धारण करणाऱ्या परमेश्वराजवळ जाण्याच्या हेतूनें स्वतःच स्वतःस उन्नत बनवितो आणि समाधीच्या स्थितींत स्वतःच्या सूक्ष्म शरीरानें परमात्म्याच्या विश्वव्यापक सूक्ष्मतम कारणशरीराच्या जवळ पोंहोंचण्यासाठीं स्वतःच स्वतःला प्रेरित करतो. या प्रकारें तो स्वतः परमात्म्यामध्यें प्रविष्ट होऊन असतो. (१)

आत्म्याचा परमात्म्यांत प्रवेश

जीवाची शिवामध्यें प्रगति

जीवात्म्याची गति परम मंगलमय शिवात्म्यांत कशी होते तें या सूक्तांत सांगितलें आहे. त्याचें अनुष्ठान क्रमपूर्वक असें सांगितलें आहे.

(१) अया-वि-स्था कर्-वराणि जनयन्- या उत्तम स्थितींत राहून तो मुमुक्षु जीव श्रेष्ठ कर्में करतो. विशेष उत्तम स्थितींत रहाण्याचा अर्थ असा कीं सर्व साधारण मनुष्याची जी स्थिति असते तशा साधारण स्थितींत न रहाणें. आहार, निद्रा, भय, मैथुन इत्यादि विषयांत साधारण मनुष्य पशुसारखा असतो. अशा सामान्य स्थितीचा त्याग करून मनुष्यानें विशेष स्थितींत रहावें. म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह, शुद्धता, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरभक्ति करतां करतां मनुष्य स्वतः स्वतःला विशेष परिस्थितींत ठेवतो आणि त्या विशिष्ट परिस्थितीस अनुरूप असें श्रेष्ठ कार्य करतो. यामुळें त्यास दोन सिद्धि प्राप्त होतात. त्या सिद्धि अशा प्रकारच्या आहेत—

(२) सः घृणिः- तो तेजस्वी होतो, तो दुसऱ्यास मार्गदर्शक होतो. तो जनतेचा उत्साह आणि चेतना जागृत करतो तो स्वतेजानें दुसऱ्यांस प्रकाशित करतो, आणि—

(३) सः वराय उरुः गातुः- तो श्रेष्ठ स्थानीं जाणाऱ्या विस्तृत मार्गासारखा होतो. ज्याप्रमाणें विस्तृत मार्गावरून चालणारा मनुष्य स्वतःच्या लक्ष्यस्थानीं विनासायास जातो, त्याप्रमाणें त्या पुरुषाचें जीवन इतर मनुष्यांस विस्तृत मार्गासारखें होतें. अन्य मनुष्यास दुसरा मार्ग पहाण्याची जरुरी रहात नाहीं. फक्त त्याचें जीवनचरित्र तपासणें आणि त्या अनुसार चालण्यासाठीं आवश्यक कर्में करणें. असें केलें असतां त्याचें जीवन सफल होतें. आणि या जगांत जे वर म्हणजे श्रेष्ठ आहेत ते श्रेष्ठ परमात्म्या जवळ सरळ जाऊन पोंहोचतात. अशा प्रकारें तो सन्मार्गगामी पुरुष अन्य मनुष्यांस मार्गदर्शक होतो. तो स्वतः मार्ग दाखवीत नाहीं परंतु त्याचें चरित्र पाहून लोक स्वतःच त्याचें अनुकरण करतात आणि सुधरून जातात. म्हणजेच तो स्वतःच मार्ग दाखवित नाहीं, परंतु लोकांसाठीं तो एक विस्तृत मार्गासारखा होतो—

(४) सः मध्वः धरुणं अग्रं प्रति उत् ऐत्- तो मधुरता धारक अंतीमस्थानीं जाण्यासाठीं वर चढतो. ज्याप्रमाणें सूर्य सकाळीं उगवल्यावर वर चढत जातो आणि जसजसा वर चढत जातो तसतसें त्याचें तेज वाढत जातें, त्याचप्रमाणें मुमुक्षु पुरुष (**उदैत्**) वर वर चढतो, म्हणजे अधिकाधिक उच्च अवस्था प्राप्त करून घेतो. त्याचा वर चढण्याचा हेतु असा आहे कीं तो (**मध्वः अग्रं**) मधुरतेच्या परम श्रेष्ठ केंद्रास प्राप्त करूं इच्छितो. मधुरतेचें जें मूळ आहे, जेथून मधुरता सर्वत्र पसरते त्या स्थानास प्राप्त करून घेण्याची अभिलाषा त्यास असते. आणि या हेतूनें तो स्वप्रयत्नानीं उच्चतर भूमिका प्राप्त करून घेतो. आणि अंतीं—

(५) स्वया तन्वा तन्वं ऐरयत्- स्वतःच्या सूक्ष्म स्वभावानें परमात्म्याच्या सूक्ष्मतम (स्वभावा) कडे स्वतःला स्वतःच प्रेरित करतो. या मंत्रभागांत 'तनु' शब्द आहे लौकिक संस्कृतभाषेंत त्याचा अर्थ शरीरवाचक आहे ही गोष्ट सत्य असली तरी येथें 'तनु' शब्दाचा अर्थ, 'सूक्ष्म, बारीक, स्वभाव, गुण, विशेषता' असा आहे. हाच अर्थ येथें घेतला पाहिजे. तरी पण आमच्या मतें त्याचा वास्तविक अर्थ 'जीवात्मा स्वतःच्या स्वभावधर्मानें परमात्म्याच्या स्वभावधर्मात प्रेरित होतो' असा आहे. पाठकांनीं त्याचा जास्त विचार करावा. आत्मोन्नति अवस्थेंत ही अवस्था सर्वोत्कृष्ट आहे. ही अवस्था प्राप्त होण्यासाठींच पूर्वोक्त सर्व अनुष्ठान आहे. वाचक या सूक्ताच्या मननानें हें समजूं शकेल कीं या विधीनें केललें अनुष्ठान फुकट जात नाहीं परंतु प्रत्येक अवस्थेंत विशिष्ट फळ देणारें होतें आणि अंतीं जीवात्म्याची गति शिवात्म्यांत होते. ही उन्नतीची परिसीमा होय

प्राणाचें साधन

कांड ७, सूक्त ४

(ऋषिः- अथर्वा ब्रह्मवर्चसकामः । देवता- वायुः)

एकया च दुशभिश्चा सुहुते द्वाभ्यामिष्टये विंशत्या च ।
तिसृभिश्च वहसे त्रिंशता च वियुग्भिर्वाय इह ता वि मुञ्च ॥ १ ॥

अर्थ— हे (**सुहुते वायो**) उत्तम प्रकारें बोलविण्यास योग्य प्राणदेवा ! (**एकया च दशभिः च**) एक आणि दहांनीं (**द्वाभ्यां विंशत्या च**) दोन आणि वीसांनीं तसेंच (**तिसृभिः च त्रिंशता च**) तीन आणि तिसांनीं तूं (**इष्टये वहसे**) यज्ञासाठीं जातोस, त्यामुळें तूं (**वियुग्भिः इह ताः विमुञ्च**) विशेष योजनांनीं त्यास येथें मुक्त कर. (१)

भावार्थ—हे स्तुति करण्यालायक प्राणा ! तूं अकरा, बावीस, आणि तेहतीस शक्तिद्वारा या जीवन यज्ञांत कार्य करतोस, त्यामुळें तूं स्वतःच्या विशेष योजनांच्या द्वारा सर्व प्रजेस दुःखांतून मुक्त कर (१)

प्राणाचें साधन

प्राणसाधनानें मुक्ति

या शरीरांत प्राणाचें शासन सर्वत्र चालतें.ही गोष्ट सर्व जाणतात. स्थूल शरीरांत पांच कर्मेंद्रियें आणि पांच ज्ञानेंद्रियें आहेत. या दहा इंद्रियांचा संयोजक मेंदु आहे. त्या सर्व अकरा शक्ति होतात. या अकरा शक्ति या प्राणाच्या आधीन आहेत. यांतील प्रत्येकांत प्रवेश करून प्राण कार्य करतो. अर्थात् हीं अकरा प्राणाचीं कार्यस्थानें आहेत. त्यानंतर सूक्ष्म शरीरांत वासना शरीरांत याच अकरा शक्ति कार्य करीत आहेत. त्या सर्व प्राणाच्या आधीन आहेत. स्थूल शरीराच्या अकरा आणि सूक्ष्म शरीराच्या अकरा अशा बावीस शक्ति स्वप्नावस्थेंत प्राणाचे आधीन असतात. तिसरीं मज्जातंतूचीं अकरा केंद्रें आहेत. तीं मस्तकांत सुरू होऊन गुदेपर्यंतच्या पृष्ठ वंशा मध्यें आहेत. त्यांच्या आधीन राहून शरीराचे विविध भाग कार्य करितात. ते सुद्धां प्राणाच्या शक्तीमुळेंच स्वतःचें कार्य करू शकतात. हीं सर्व मिळून तेहतीस शक्तिकेंद्रें होतात. त्यामध्यें प्राणशक्ति कार्य करीत आहे. जणू तेहतीस केंद्रांच्या द्वारें प्राणाचें संचलन होतें. अथवा हीं तेहतीस केंद्रें प्राणाच्या रथाचे घोडे आहेत. असें समजावें. अशा रथांत बसून प्राण सर्व शरीरांत गमन करतो आणि तेथील कार्य करतो.

या सूक्तांत अकरा, बावीस, आणि तेहतीस प्राणांस चालवितात असें म्हटलें आहे. ही संख्या या शक्ती केंद्रांची सूचक आहे. हें शरीरही एक यज्ञशाला आहे. त्यांत शतसांवत्सरिक यज्ञ चालविण्यांत येतो. हा यज्ञ प्राणद्वारा होतो. आणि प्राण या शक्ति केंद्राच्या द्वारें या यज्ञ भूमींत येतो आणि कार्य करितो.

प्राणाची योजना

प्राणास (**वियुग्भिः विमुञ्च**) विशेष योजनेंतून मुक्त कर. म्हणजे विशेष योजना करण्यांत यावी व तद्द्वारा मुक्ति मिळवावी. येथें असा विचार केला पाहिजे कीं प्राणाच्या (**वियुग्भिः**) विशेष योजना कोणत्या ? आणि त्यांपासून मुक्ति कशी मिळते ? हें पहाण्यासाठीं पूर्वोक्त शक्ति काय करतात, आणि त्यांची स्वाभाविक प्रवृत्ति कशी आहे हें पाहिलें पाहिजे.

आपणांस नेत्र आहेत ते पहाण्यासाठीं बनविले आहेत. पण ते वाईट नजरेनें दुसऱ्याकडे पाहूं शकतात. कान शब्द ऐकण्यासाठीं आहेत. पण ते अत्यंत वाईट शब्द ही ऐकतात. मुख बोलण्यासाठीं आहे परंतु तें इतकें खराब बोलते कीं त्यामुळें विविध कलह निर्माण होतात. उपस्थ इंद्रिय सुप्रजननासाठीं आहे पण तें व्यभिचारास प्रवृत्त होतें. याप्रकारें या शतसांवत्सरिक यज्ञांत संमिलित होणाऱ्या सर्व शक्ति अयोग्य मार्गास प्रवृत्त होतात. प्राणायामानें मनाची चंचलता दूर होते आणि मन स्थिर झाल्यानें पूर्वोक्त तेहतीस शक्ति बरोबर सरलमार्गावर येतात. प्राणाच्या विशेष योजना याच आहेत. या विशेष योजनांच्या द्वारा नियुक्त असलेला प्राण या तेहतीस शक्तींना संयमांत ठेवतो. त्यांस वाईट विचारापासून मुक्त करतो आणि सत्कार्यास प्रेरित करतो. या प्रकारें प्राण-साधन द्वारा मुक्तीचा सरळ मार्ग आक्रमण्यास फार सुगम होतें. पाठकानें या दृष्टीनें या सूक्ताचा विचार करावा आणि प्राण साधनद्वारा आपली उन्नति सिद्ध करावी.

आत्मयज्ञ

कांड ७, सूक्त ५

(ऋषिः- अथर्वा 'ब्रह्मवर्चसकामः' । देवता- आत्मा)

यज्ञेन॑ यज्ञम॑यजन्त दे॒वास्तानि॒ धर्मा॑णि प्रथ॒मान्या॑सन् ।
ते ह॒ नाकं॑ महि॒मानः॑ सचन्त॒ यत्र॒ पूर्वे॑ सा॒ध्याः सन्ति॑ दे॒वाः ॥ १ ॥
य॒ज्ञो ब॑भूव॒ स आ ब॑भूव॒ स प्र ज॑ज्ञे॒ स उ॑ वावृ॒धे पुनः॑ ।
स दे॒वाना॒मधि॑पतिर्बभूव॒ सो अ॒स्मासु॒ द्रवि॑ण॒मा द॑धातु ॥ २ ॥
यद्दे॒वा दे॒वान्ह॒विषाय॑जन्ता॒मर्त्या॒न्मन॒सामर्त्ये॑न ।
मदे॑म॒ तत्र॑ पर॒मे व्यो॑म॒न्पश्ये॑म॒ तदुदि॑तौ॒ सूर्य॑स्य ॥ ३ ॥
यत्पुरु॑षेण ह॒विषा॑ य॒ज्ञं दे॒वा अत॑न्वत ।
अस्ति॒ नु तस्मा॒दोजी॑यो॒ यद्वि॒हव्ये॑नेजि॒रे ॥ ४ ॥

अर्थ-- (**देवाः यज्ञेन यज्ञं अयजन्त**) देवगण यज्ञानें यज्ञपुरुषाची पूजा करतात. (**तानि धर्माणि प्रथमानि आसन्**) ते धर्म उत्कृष्ट आहेत. (**ते महिमानः नाकं सचन्ते**) ते महत्व प्राप्त करतां करतां सुखपूर्ण लोक प्राप्त करून घेतात. (**यत्र पूर्वे साध्याः देवाः सन्ति**) जेथें पूर्वीचे साधनसंपन्न देव राहतात. (१)

(**यज्ञः बभूव**) यज्ञ प्रगट झाला. (**स आबभूव**) तो सर्वत्र पसरला (**स प्रजज्ञे**) तो विशेषरीतीनें ज्ञानाचें साधन झाला आणि (**स उ पुनः वावृधे**) तो परत वृद्धि पावूं लागला. (**सः देवानाम् अधिपतिः बभूव**) तो देवांचा अधिपती झाला. (**स अस्मासु द्रविणं आ दधातु**) तो आम्हांस धन देवो (२)

(**देवा यत् अमर्त्यान् देवान्**) जेथें देव अमर देवांस (**हविषा अमर्त्येन मनसा अयजन्त**) स्वतःच्या हविरूप अमर मनानें यजन करतात. (**तत्र परमे व्योमन् मदेम**) तेथें त्या परम आकाशांत आम्हीं सर्व आनंद प्राप्त करतों आणि तेथेंच (**सूर्यस्य उदितौ तत् पश्येम**) सूर्याचा उदय झाल्यानंतर त्याचा प्रकाश आम्हीं पहातों. (३)

(**यत् देवाः**) जो देवांनीं (**पुरुषेण हविषा यज्ञं अतन्वत**) पुरुष रूपी हवीनें यज्ञ केला. (**तस्मात् ओजीयः नु अस्ति**) त्यापेक्षां अधिक बलवान् काय आहे ? (**यत् विहव्येन ईजिरे**) जे विशेष यजनद्वारा होतें. (४)

भावार्थ-- श्रेष्ठ याजक स्वतःच्या आत्म्याच्या योगानें परमात्म्याची उपासना करतात. तो मानसोपासनेचा यज्ञविधि सर्वांहून श्रेष्ठ आणि मुख्य आहे, याप्रकारची उपासना करणारे जेथें पूर्वकाला पासून साधन संपन्न राहतात, ते सुखपूर्ण स्वर्गधाम प्राप्त करतात. (१)

हा मानसोपासनारूपी यज्ञ प्रथम प्रगट झाला. तो सर्वत्र पसरला, त्याला सर्वांनीं जाणलें आणि त्यानंतर तो पुष्कळच वाढला, जणूं काय तो सर्व उपासकांचा स्वामीच बनला. हा यज्ञ आम्हांस धन अर्पण करो. (२)

याजकांनीं जेव्हां स्वतःच्या अमर्त्यशक्तींनीं युक्त मनानें देवांची उपासना केली तेव्हां त्यांस आनंद प्राप्त झाला. ज्याप्रमाणें सूर्योदय होण्यानें प्रकाश प्राप्त होतो, तद्वत् यज्ञानें सर्वांस आनंद झाला. (३)

याजक स्वतःच्या आत्मरूपी हवींनीं जो यज्ञ करतो, त्यापेक्षां चांगला दुसरा कोठला यज्ञ असूं शकेल ? जो विविध हविर्द्रव्यांच्या हवनानें प्राप्त होईल ? (४)

मुग्धा देवा उत शुनायजन्तोत गोरङ्गैः पुरुधायजन्त ।
य इमं यज्ञं मनसा चिकेत प्र णो वोचस्तमिहेह ब्रवः ॥ ५ ॥

अर्थ— (**मुग्धाः देवाः**) मूढ याजक (**उत शुना अजयन्त**) कुत्र्यानें यजन करतात. (**उत गोः अंगैः पुरुधा अयजन्त**) गाईच्या अवयवांनीं पुष्कळ प्रकारें यजन करतात. (**यः इमं यज्ञं मनसा चिकेत**) जो हा यज्ञ मनानें करूं जाणतो तो (**इह नः प्रवोचः**) आम्हांस या बाबतींत ज्ञान देवो आणि (**इह तं ब्रवः**) तो आम्हांस येथें उपदेश करो. (५)

भावार्थ—कुत्र्याच्या आणि गाईच्या अंगांनी जे हवन करतात ते याजक मूढ होत. जो याजक या मानसिक यज्ञास मनानें करूं जाणतो तो ज्ञानीच यज्ञाचा उपदेश करूं शकतो आणि यज्ञाचें महत्व कथन करूं शकतो म्हणजे समजावुं शकतो. (५)

आत्मयज्ञ

मानसिक आणि आत्मिक यज्ञ

यज्ञ पुष्कळ प्रकारचे असतात. त्या सर्वांत मानसिक अथवा आत्मिक यज्ञ सर्वांत श्रेष्ठ आहे. मनाचें समर्पण केल्यानें मानसिक यज्ञ होतो आणि आत्म्याच्या समर्पणानें आत्मयज्ञ होतो. दोहोंचे भाव जवळ जवळ सारखेच आहेत. हें समर्पण परमेश्वरासाठींच करावयाचें असतें. या जगांत परमेश्वराचीं जीं कार्यें आहेत त्यांपैकीं—

(१) सज्जनांचें रक्षण.

(२) दुष्ट जनास दूर करणें आणि

(३) धर्माची व्यवस्था.

हीं तीन कार्यें मनुष्य परमात्म्यासाठीं करूं शकतो. परमात्म्याचीं अनंत कार्यें आहेत. परंतु तीं सर्व मनुष्य करूं शकत नाहीं. हीं तीन कार्यें तो स्वशक्तिनुसार करूं शकतो. त्यामुळें जेव्हां मनुष्य स्वतःला या तीन कार्यांसाठीं समर्पित करतो तेव्हां त्याचें समर्पण परमेश्वरासाठीं आहे असें मानण्यांत येतें. मनानें अथवा स्वतःच्या आत्मशक्तीनें वरील त्रिविध कार्यें करणें त्याचेंच नांव मन आणि आत्मा परमेश्वरासाठीं अर्पण करण्यासारखें आहे.

प्रत्येक यज्ञांत सुद्धां तीन कार्यें करावयाचीं असतात

(१) (**पूजा**) श्रेष्ठ लोकांचा सत्कार,

(२) स्वतःचें अंतरांत संगतीकरण अथवा संघटन, आणि

(३) (दान) दुर्बलांस सहाय्य.

प्रत्येक यज्ञांत हीं तीन कार्यें आलींच पाहिजेत. त्याशिवाय यज्ञ सफल अथवा चांगले फल देणारा होणार नाहीं. मन आणि आत्मा समर्पित करून जो यज्ञ केला जातो तो या तीन कर्मांसहच असतो. जणूं काय त्याशिवाय यज्ञ होणारच नाहीं. अर्थात—

(१) सज्जनांचें रक्षण करून त्यांचा सत्कार करणें (२) दुर्जनास दंड देऊन दूर करणें आणि पुन्हां दुर्जन आपणांस कष्ट देणार नाहीं त्यासाठीं उत्तम संघटना करणें, (३) धर्माची व्यवस्था करून जे दुर्बल आहेत त्यांस योग्य तें सहाय्य करणें हीं त्रिविध यज्ञकर्मे होत.

हीं त्रिविध कर्मे स्वतःच्या मनःसमर्पणद्वारा अथवा आत्मसमर्पणद्वारा केलीं पाहिजेत. साधकास हें ठाऊक आहे कीं ज्या कार्यांस मन आणि आत्म्यानें सुरवात करावी तें कार्य उत्तम होतें. आपले हात पाय व इंद्रियें मनाच्या सहाय्या वांचून कांहीं कार्य करूं शकत नाहींत. मन आणि आत्म्याच्या समर्पणाच्या उपदेशानें स्वतःच्या शक्तींचें समर्पण झालें असें मानावें लागेल. या सूक्ताच्या तिसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं—

अमर्त्येन मनसा हविषा देवान् यजन्त (मं. ३)

' अमर मनरूपी हवीनें देवांचें यजन करतो. ' तुपाचें हवन करणें म्हणजे तूप त्या देवतेसाठीं समर्पित करणें आणि स्वतः त्याचा उपभोग न करणें. ' **इंद्राय इदं हविः दत्तं न मम** ' इंद्रदेवतेसाठीं हें घृतादि हवि समर्पित केलें आहे. त्यांच्यावर आतां माझा अधिकार नाहीं आणि मी माझ्या सुखासाठीं त्याचा उपयोग करणार नाहीं. याप्रमाणें स्वतःचें मन आणि आत्मा समर्पण करण्याचें तात्पर्य यज्ञ होय. स्वतःचें मन आणि आत्मा परमेश्वरासाठीं अर्पण केल्यावर आपमुखत्यारीनें कार्य करितां येणार नाहीं. पूर्वी सांगितलेलीं जी ईश्वराचीं कार्यें आहेत तींच करतां येतील अथवा करण्यांत येतील. ज्याप्रमाणें घृतादि पदार्थ यज्ञांत होमण्यांत येतात, त्याचप्रमाणें मानसयज्ञांत मनाचें समर्पण करण्यांत येतें आणि आत्मयज्ञांत आत्म्याचें समर्पण करण्यांत येतें. घृतादि बाह्य पदार्थ समर्पण केल्यानें जो यज्ञ होईल त्यापेक्षां मनःसमर्पणानें

अथवा आत्मसमर्पणानें जो यज्ञ होईल तो कित्येक पटीनीं श्रेष्ठ होईल. त्यासाठीं म्हटलें आहे कीं—

तानि धर्माणि प्रथमान्यासन् । (मं. १)

' हा मानसकर्मरूप यज्ञ प्रथम श्रेणीचा आहे. ' म्हणजे सर्व श्रेष्ठ कर्तव्य आहे. एक मनुष्य तूप, समिधा इत्यादींनीं यज्ञ करतो. दुसरा आत्मसमर्पणानें यज्ञ करतो. या दोघांत आत्मसमर्पण करणाराच श्रेष्ठ होय. त्याचें वर्णन या सूक्तांत खालील शब्दांनीं केलेलें आहे—

यत् पुरुषेण हविषा देवा यज्ञं अतन्वत ।
अस्ति नु तस्मादोजीयो यद्विहव्येनेजिरे ॥ (मं. ४)

' याजक लोक जो यज्ञ (स्वतःच्या अंतरातील प्रकृति पुरुषांतील) स्वतःच्या आत्मसमर्पणाच्या योगें करतात त्यापेक्षां दुसरा कोणता यज्ञ श्रेष्ठ असूं शकेल ? जे अन्य यज्ञ (आत्म्याहून भिन्न) प्राकृतिक पदार्थांच्याद्वारें समर्पण करून केले जातात ते निःसंदेह गौण आहेत. मनुष्याजवळ प्रकृति आणि पुरुष, जड आणि चैतन्य, देह आणि आत्मा असे दोनच पदार्थ आहेत. त्यांत पुरुष अथवा चेतन आत्मा श्रेष्ठ आणि प्रकृति गौण आहे. अन्य यज्ञ प्राकृतिक पदार्थांच्या सहाय्यानें (समर्पणानें) होतात म्हणून ते गौण होत आणि हा मानसिक आणि आत्मिक यज्ञ आत्मसमर्पणद्वारा होतो म्हणून तो श्रेष्ठ आहे. श्रेष्ठ यज्ञ तर जो ज्ञानी याजक असेल तोच करूं शकतो. साधारण हीनस्थितींतील मूढ जें कर्म करतो तें निंदनीय कर्मच होतें. पहा—

मुग्धा देवा उत शुनायजन्तोत गोरंगैः पुरुधायजन्त । य इमं यज्ञं मनसा चिकेत प्र णो वोचस्तमिहेह ब्रवः ॥ (मं. ५)

' मूढ याजक कुत्र्याच्या आणि गाइच्या अंगांनीं यज्ञ करितात. ' मूढलोकांच्या या कृत्यास मूर्खांचेंच कृत्य म्हणतां येईल. त्यास कोणी श्रेष्ठ कर्म तर म्हणणार नाहींच. ' जे श्रेष्ठ याजक हा आत्मयज्ञ करण्याचा मानसिक विधि जाणतात, तेच येथें येऊन त्या यज्ञाचा उपदेश करोत. ' पूर्वोक्त मांस यज्ञापेक्षां मानस यज्ञ पुष्कळच श्रेष्ठ आहे. जे मानसयज्ञ करणें जाणतात, तेच तसा उपदेश करण्याचे अधिकारी आहेत. मानसयज्ञाचें हें महात्म्य पहा.

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । ते ह नाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥ (मं. १)

' या आत्मयज्ञानें याजक परमात्म्याची पूजा करतो, आत्मयज्ञद्वारा देवांची पूजा करणें हें श्रेष्ठ कार्य आहे. हे याजक श्रेष्ठ होऊन जेथें पूर्वी साधक पोंहोचले आहेत त्या स्वर्गधामास पोंहोचतात. ' अशाप्रकारचा हा आत्मयज्ञाचा महिमा आहे. दुसऱ्या कोणत्याहि गौणयज्ञानें हें श्रेष्ठ फल प्राप्त होऊं शकत नाहीं. हा आत्मयज्ञच सर्वश्रेष्ठ आहे. या विषयीं हा मंत्र पहा—

यज्ञो बभूव स आबभूव स प्रजज्ञे स उ वावृधे पुनः । स देवानामधिपतिर्बभूव सोऽस्मासु द्रविणमादधातु ॥ (मं. २)

' हा आत्मयज्ञ प्रगटला, हा आत्मयज्ञ सर्वत्र पसरला, त्याचें महत्त्व सर्वांनीं जाणलें, आणि त्यामुळें तो वाढला. तो इतका वाढला कीं, देवांचा अधिपति होऊन गेला. त्याचेमुळें आम्हांस महत्त्व प्राप्त होवो. '

या सर्वांपेक्षां आत्मयज्ञच आमचें श्रेष्ठत्व वाढविण्यास समर्थ आहे. त्याची तुलना दुसऱ्या कोणत्याहि गौण यज्ञाशीं होऊं शकणार नाहीं. या यज्ञांत (**मनसा हविषा यजन्त**) (मं. ३) मनरूपी हवीचें समर्पण करणें आहे. आणि हा यज्ञ केल्यानें—

तत्र परमे व्योमन् मदेम (मं. ३)

' त्या परमाकाशांत आम्हांस आनंद प्राप्त होईल. ' हा यज्ञ करण्याचें असें फल आहे. त्यांत ' परम ' शब्द विशेष मनन करण्यासारखा (योग्य) आहे. ' **पर, परतर, परतम,** ' हे शब्द श्रेष्ठता वाचक असून तुलनेचें एकदुसऱ्यापेक्षा वरचढ आहेत. त्यांतील परतम शब्दाचें संक्षेपरूपच (**पर-म**) आहे. मध्यस्थ तकाराचा लोप झाला आहे. म्हणजे जे सर्वांहून श्रेष्ठ तेंच ' परतम अथवा परम ' आहे. व्योम तीन प्रकारचे आहेत. (१) एक परव्योम, (२) दुसरें परतर व्योम आणि (३) तिसरें परतम अथवा परमव्योम, आधुनिक परिभाषेंत जर म्हणावयाचें झालें तर, ' सूक्ष्म, कारण आणि महाकारण ' अवस्थांनीं हे तीन शब्द ' **पर, परतर, परतम** ' व्योमाचे भाव व्यक्त करतात. ' **व्योमन्** ' शब्द सुद्धां विशेष महत्त्वाचा आहे. त्यात ' **वि+ओम्+अन्** ' असे तीन शब्द आहेत. त्यांचा क्रमानें अर्थ ' प्रकृति+परमात्मा आणि +जीवात्मा ' असा होतो. सूक्ष्म. कारण आणि महाकारण अवस्थामध्यें प्रकृति, जीव, आणि परमात्म्याचा जो अनुभव होतो, तोच या तीन शब्दांनीं व्यक्त होतो आणि तो या सूक्तांत सांगितलेला आत्मसमर्पण यज्ञ केल्यानें प्राप्त होतो. अन्य गौण यज्ञ केल्यानें जो अनुभव मिळेल तो या पेक्षा न्यून श्रेणीचा अर्थात् गौण असणार; कारण ते दुसरे यज्ञ आत्म यज्ञापेक्षां निःसंशय गौण आहेत. गौणाचें फळ गौण आणि श्रेष्ठाचें फल श्रेष्ठ मिळणें हें स्वाभाविक आहे. हा आत्मयज्ञ केल्यानें परम-

व्योमांत जी उच्चतम अवस्था प्राप्त होते आणि जो उच्च अनुभव अनुभवण्यास मिळतो तो कसा असतो. त्यासाठीं एक दृष्टांत देऊं-

सूर्यस्य उदितौ तत्पश्येम (मं. ३)

' सूर्याच्या उदय होण्यानें जो प्रकाश दिसून येतो त्याच प्रकारचा आम्ही त्या आनंदाचा प्रत्यक्ष अनुभव घेऊं ' म्हणजे ज्याप्रमाणें सूर्यप्रकाश दिवसा भूमीवर रहाणाऱ्यांस प्रत्यक्ष दिसतो त्याप्रमाणें या तिसऱ्या व्योमांत संचार करणाऱ्या श्रेष्ठ आत्म्यांस तेथील सुख प्रत्यक्ष दिसतें (प्राप्त होतें.) ज्याप्रमाणें येथील सूर्य प्रत्यक्ष आहे त्याच प्रकारें येथें पण याच सूर्याचा सूर्य असणारच आणि तो तेथें प्रत्यक्ष दिसत असेल. '

याप्रकारें आत्मयज्ञाचें फळ या सूक्तांत सांगितलेलें आहे. या सूक्तांत ' **पुरुषेण हविषा** ' (मं. ४) पुरुष अर्थात् आत्मारूपीं हवीनें यज्ञ, त्याचप्रमाणें ' **मनसा हविषा** ' (मं. ३) मनरूपीं हवीनें यज्ञ करण्याचें विधान आहे. ज्याप्रमाणें ' सोमा ' चें हवन केलें असतां त्यास ' सोमयज्ञ ' असें म्हणतात, अज नांवाच्या बीजांचे हवन करण्यानें ' अजमेध ' म्हणण्यांत येतें, त्याप्रमाणें ' पुरुष ' अर्थात् आत्म्याचें समर्पण होण्यानें ' पुरुष यज्ञ ' अथवा आत्मयज्ञ ' आणि ' मना ' चें हवन होण्यानें ' मानसयज्ञ ' म्हटलें जातें. याचप्रकारें भगवद्गीतेंत (भ. गी. अ. ४) ' द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, ज्ञानयज्ञ, ब्रह्मयज्ञ, इंद्रिय यज्ञ, विषय यज्ञ, कर्म यज्ञ, योग यज्ञ, प्राण यज्ञ इत्यादि यज्ञ सांगितले आहेत. जें समर्पण अथवा ज्या वस्तुचें हवन यज्ञांत होतें तें नांव त्या यज्ञास प्राप्त होतें.

' पुरुष ' रूपी हवीचें समर्पण होण्यानें या सूक्तांत वर्णन केलेल्या यज्ञास ' पुरुषयज्ञ ' म्हणतात. येथें प्रकृति पुरुषांतर्गत पुरुष शब्द येथें समजला पाहिजे आणि तो आत्म्याचा वाचक आहे. या सूक्तांत ' पुरुषयज्ञ अथवा पुरुषमेध ' या शब्दाचा अर्थ स्पष्ट होतो. तो या स्पष्टीकरणानें जास्त स्पष्ट झाला आहे. आणि त्यासाठींच या सूक्ताचें थोडें जास्त स्पष्टीकरण केलें आहे.

पुरुषमेध

पुरुमेध प्रकरण पुरुषसूक्तांत आहे. हें पुरुषसूक्त ऋग्वेदांत (मं. १०।९०) आहे. वा. यजुर्वेदांत (अ. ३०) आहे. सामवेदांत थोडेसें, आणि अथर्ववेदांत (कां. १९।६) आहे.

या पुरुषसूक्तांत जें पुरुषमेध यज्ञाचें वर्णन आहे तो यज्ञ या सूक्तांत सांगितलेला आहे. त्यामुळें या सूक्ताचा विचार चांगल्या रीतीनें केल्यानें, ' पुरुषसूक्ता ' च्या यज्ञाचें स्वरूप उत्तमप्रकारें ध्यानीं येईल. दोनहि सूक्तांत एकच विषयाचें वर्णन आहे. या सूक्तांत आलेला '**यज्ञेन यज्ञं अयजन्त०**' आणि '**यत्पुरुषेण हविषा०**' हे मंत्र पण या सूक्तांत येऊन गेले आहेत. त्यावरून दोनहि सूक्तांचा विषय एकच आहे ही गोष्ट सिद्ध होते. पुरुष सूक्तांत मनुष्य यज्ञाचा विषय आहे असें कित्येक लोक मानतात तें अयुक्त आहे. ही गोष्ट या सूक्ताबरोबर पुरुषसूक्ताचें मनन केल्यानें स्पष्टपणें समजून येईल. आमच्या मतें पुरुषसूक्तांत पण ह्या आत्मयज्ञाचाच विषय आहे,

आत्मोन्नति-विद्या

कांड ५, सूक्त १

(ऋषिः- बृहद्दिवोऽथर्वा । देवता- वरुणः)

ऋधङ्मन्त्रो योनिं य आबभूवामृतासुर्वर्धमानः सुजन्मा ।
अदब्धासुर्भ्राजमानोऽहेव त्रितो धर्ता दाधार त्रीणि ॥ १ ॥

अर्थ— (**यः अमृत+असुः सुजन्माः**) जो वस्तुतः अमर प्राणशक्तीनें युक्त आहे तरी सुद्धां उत्तम जन्म घेऊन (**वर्धमानः**) वाढतो आणि (**ऋधक्+मंत्रः**) सत्याचें मनन करतां करतां (**योनिं आबभूव**) मूळ उत्पत्ति स्थानास प्राप्त होतो, तो (**अदब्ध+असुः**) कधींहि दबून जाणार नाहीं अशा प्राणशक्तीनें युक्त होऊन (**अहा इव भ्राजमानः**) दिवसाप्रमाणें प्रकाशणारा (**त्रितः धर्ता त्रीणि दाधार**) रक्षक आणि धारक होऊन तिघांस धारण करतो. (१)

भावार्थ— वास्तविकपणें पाहिलें असतां जो अमर जीवनशक्तीनें युक्त आहे, तो सुद्धां जन्म घेऊन स्वतःच्या शक्तींची वृद्धि करतो आणि सत्याचें पालन करतां करतां स्वतःच्या मूलस्थानास प्राप्त करतो. त्यामुळें अदम्य आत्मशक्तीनें युक्त होऊन दिवसाप्रमाणें प्रकाशणाऱ्या रक्षण आणि धारणशक्तीनें युक्त होऊन स्वतःच्या तीनहि अवस्था स्वाधीन करून घेतो. (१)

आ यो धर्माणि प्रथमः ससाद ततो वपूंषि कृणुषे पुरूणि ।
धास्युर्योनिं प्रथम आ विवेशा यो वाचमनुदितां चिकेत ॥ २ ॥
यस्ते शोकाय तन्वं रिरेच क्षरद्धिरण्यं शुचयोऽनु स्वाः ।
अत्रा दधेते अमृतानि नामास्मे वस्त्राणि विश एरयन्ताम् ॥ ३ ॥
प्र यदेते प्रतरं पूर्व्यं गुः सदःसद आतिष्ठन्तो अजुर्यम् ।
कविः शुषस्य मातरा रिहाणे जाम्यै धुर्यं पतिमेरयेथाम् ॥ ४ ॥
तदू षु ते महत्पृथुज्मन्नमः कविः काव्येना कृणोमि ।
यत्सम्यञ्चावभियन्तावभि क्षामत्रा मही रोधचक्रे वावृधेते ॥ ५ ॥

अर्थ— (यः प्रथमः धर्माणि आससाद) जो पहिला होऊन धर्मांना प्राप्त करतो (ततः पुरूणि वपूंषि कृणुषे) त्यामुळें तो पुष्कळ शारीरिक शक्ति धारण करतो आणि (यः अनुदितां वाचं आचिकेत) जो अप्रकट वाणीस जाणतो (धास्युः प्रथमः योनिं आविवेश) धारण करणाऱ्यांत तो प्रथम होऊन मूळ उत्पत्ति स्थानांत प्रवेश करतो. (२)

(यः ते शोकाय तन्वं अनुरिरेच) ज्यानें तुला प्रकाश देण्यासाठीं शरीराबरोबर शरीर जोडून दिलें आणि तें सुद्धां पुवळ्यासाठीं कीं (स्वाः शुचयः हिरण्यं क्षरत्) स्वतःच्या शुद्ध दीप्ति सुवर्णा प्रमाणें पसराव्या. (अत्र अमृतानि नाम दधेते) येथें अमर नांवें तो धारण करतो, त्यामुळें (विशः अस्मै वस्त्राणि आ ईरयन्ताम्) प्रजेनें त्याचेसाठीं वस्त्रें प्रेरीत करावीं. (३)

(यत् एते) जे हे (सदः सदः आतिष्ठन्तः) प्रत्येक धर्मसभेंत बसून (अजुर्यं प्रतरं पूर्व्यं प्रगुः) जरारहित प्राचीन आणि सर्वांपूर्वींचा आत्मा प्राप्त करतात, (कविः शुषस्य मातरौ) कवि होऊन शक्ति मान्य करणारी त्याचप्रमाणें (जाम्यै धुर्यं पतिं) बहिणीसाठीं धुरीण पालक पतीचें वर्णन करणारी जशी माता (आ ईरयेथां) प्रेरणा करते. (४)

हे (पृथु-ज्मन्) विशेषगति देणाऱ्या ईश्वरा ! (तत् उ) त्यासाठीं (कविः) मीं कवि स्वतःच्या (काव्येन) काव्य-द्वारा (ते सु महत् नमः कृणोमि) तुला अनेक नमस्कार करतो. (यत् सम्यञ्चौ अभियन्तौ मही रोध-चक्रे) कारण कीं जोडलेल्या गतिमान् मोठ्या प्रतिरोधक गति असणाऱ्या चाकांप्रमाणें (अत्र क्षां अभि वावृधेत) येथें पृथ्वीवर दोघेहि वाढतात. (५)

भावार्थ— जो अन्य मनुष्यांहून श्रेष्ठ होऊन विशेष नियमांचें पालन करतो, हा अनुष्ठानी तो आश्चर्यकारक शक्तींचा प्रकाश करतो. त्यानंतर तो गूढ वाणी जाणतो. तिच्या योगानें धारणशक्तींनीं युक्त आणि प्रथम स्थानास योग्य असा होऊन स्वतःच्या मूलस्थानीं प्रवेश करतो. (२)

ज्या प्रभूनें मनुष्याच्या अंतःप्रकाशास सर्वत्र पसरविण्यासाठीं त्यास अनुकूल शरीर दिलें, ज्याच्या योगें तो शुद्ध सुवर्णाप्रमाणें स्वतःचा प्रकाश चारी बाजूंस (सर्वत्र) पसरवितो, त्यांतच अमृतरूपी यश दाखविणाऱ्यांचें नाम सार्थकीं लागतें आणि त्यासाठींच सर्व प्रजानीं त्यास स्वतःचें आच्छादक वस्त्र अर्पण करावें आणि त्याच्यामधील पडदा दूर करून त्याच्या सन्मुख उभे रहावें. (३)

जीं मनुष्यें प्रत्येक धर्मकृत्यांत आदरानें भाग घेतात आणि त्यात ते तो अजर, अमर, अशा पुराण पुरुषाचा आदर करतात ते अतीन्द्रियार्थ दर्शी शक्तींचे प्रेमी बनून स्वतःच्या बहिणीच्या पतीचा आदर करण्याप्रमाणें आदरभावानें सर्वांशीं व्यवहार करतात. (४)

हे सर्व संचालक ईश्वरा ! त्याच दृष्टीनें मीं कवीच्या दृष्टीनें माझ्या काव्यमय वाणीनें तुझें महान् यश गात तुझ्यासमोर अत्यंत नम्र होतो. विरुद्ध गतींचीं दोन चक्रें जेव्हां एकाच केंद्रांत मिळून कार्य करूं लागतात तेव्हां महान् शक्ति निर्माण होते. (येथें जड आणि चेतन गुण धर्मांचे दोन पदार्थ तुझ्या सन्मुख नम्र होऊन जातात आणि ते नम्रतेनें शक्तिशाली बनतात असें तात्पर्य आहे.) (५)

सप्त मर्यादाः कवयस्ततक्षुस्तासामिदेकामभ्यंहुरो गात् ।
आयोर्ह स्कम्भ उपमस्य नीडे पथां विसर्गे धरुणेषु तस्थौ ॥ ६ ॥
उतामृतासुर्व्रत एमि कृण्वन्नसुरात्मा तन्व१स्तत्सुमद्गुः
उत वा शक्रो रत्नं दधात्यूर्जया वा यत्सचते हविर्दाः ॥ ७ ॥
उत पुत्रः पितरं क्षत्रमीडे ज्येष्ठं मर्यादमह्वयन्त्स्वस्तये ।
दर्शन्नु ता वरुण यास्ते विष्ठा आवर्व्रततः कृणवो वपूंषि ॥ ८ ॥
अर्धमर्धेन पयसा पृणक्ष्यर्धेन शुष्म वर्धसे अमुर ।
अविं वृधाम शग्मियं सखायं वरुणं पुत्रमदित्या इषिरम् ।
कविशस्तान्यस्मै वपूंष्यवोचाम रोदसी सत्यवाचा ॥ ९ ॥

अर्थ—(कवयः सप्त मर्यादाः ततक्षुः) ज्ञानी मनुष्यांनीं सात मर्यादा नक्की केल्या आहेत (तासां एकां इत् अभिगात्) त्यांतील एकीचें जरी उल्लंघन केलें तर मनुष्य (अंहुरः) पापी होतो. पापाशिवायचा (आयोः स्कंभः ह) आयुष्याचा आधार स्तंभ होऊन (उपमस्य नीडे) नजिकच्या स्थानांत जेथें (पथां विसर्गे) मार्गांचा फैलाव होत नाहीं अशा (धरुणेषु तस्थौ) ध्रुवस्थानांत रहातो (६)

(व्रतः कृण्वन् अमृत-असुः एमि) व्रतरूप होऊन कर्में करतां करतां आणि अमर प्राणशक्तिनें युक्त होऊन मीं चालतों. (तत् आत्मा असुः तन्वः समुद्गुः) त्यामुळें आत्मा, प्राण, आणि शरीर उत्तम गुणवान् होतात. (उत वा शक्रः रत्नं दधाति) आणि समर्थ होऊन रत्नादि धन धारण करतो. (वा यत् हविर्दाः ऊर्जया सचते) अथवा हवन करणाऱ्या बलानें युक्त होतो. (७)

(पुत्रः क्षत्रं पितरं ईडे) पुत्र दुःखापासून आपलें रक्षण करणाऱ्या पित्याची मदत इच्छितो. (उत मर्यादं ज्येष्ठं स्वस्तये आह्वयन्) आणि मर्यादा स्थापन करणाऱ्या श्रेष्ठास कल्याणासाठीं बोलावतो. (याः ते वपूंषि कृणवः) विस्थाः ता नु दर्शयत) जीं तुझीं विशेष स्थानें आहेत तीं दाखविता दाखविता हे (वरुण) श्रेष्ठ प्रभो ! (आवर्व्रततः तुम्हींच वारंवार भ्रमण करणाऱ्यांचीं शरीरें बनवितो. (८)

हे (अ-मूर) अमूढ म्हणजे ज्ञान्या (ज्ञानवान्) (पयसा अर्धेन अर्धं पृणक्षि) तूं पोषकरसानें अर्ध्याहून अर्ध्याची पूर्णता करतोस आणि (अर्धेन शुष्म वर्धसे) अर्ध्यानें बळ वाढवितोस. (अविं शग्मियं) रक्षक आणि समर्थ (सखायं वरुणं) मित्र आणि श्रेष्ठ (अदित्याः इषिरं पुत्रं) अदीनतेस वाढवणारा आणि नरकापासून रक्षण करणाऱ्याला (वृधाम) वाढवितोस. (सत्य वाचा रोदसी) सत्य वचनी द्यावा पृथिवी (अस्मै कविशस्तानि वपूंषि अवोचाम) कविद्वारा याच्या प्रशंसित शक्तींचें वर्णन करतों. (९)

भावार्थ— ज्ञानी माणसांनीं मनुष्याच्या व्यवहारासाठीं सात मर्यादा निश्चित केल्या आहेत. त्यांतील एकीचें जरी उल्लंघन झालें तरी मनुष्य पापी होतो. परंतु जो निष्पाप राहूं इच्छितो तो स्वतःच्या जीवनाच्या आधारस्तंभासारखा होऊन स्वतःच्या जवळच्या केंद्रांत, जेथें विविध मार्ग फैलावले नाहींत तेथें, अशाप्रकारें आधारभूत स्थानांत अचल होऊन रहातो. (६)

स्वतः व्रतरूप होऊन अमृतमय जीवनरसानें युक्त होतां होतां मीं विहरतों. त्यामुळें प्राण आत्मा आणि तीनहि शरीरांतील विविध शक्ति वाढतात आणि समर्थ झाल्यामुळें उत्तमरमणीयता पण प्राप्त होते. याप्रकारें जे आत्मसमर्पण करतात ते बलवान् होतात. (७)

पिता पुत्राचें रक्षण करतो म्हणून प्रत्येक पुत्र पित्याचें सहाय्य मिळविण्याची इच्छा करतो. या प्रकारें मर्यादेचा आदेश देणाऱ्या प्रत्येक गुरुजनांलाही पण प्रत्येक मनुष्य बोलावितो. या दोन्ही कारणासाठीं तो सर्व श्रेष्ठ प्रभूची प्रार्थना करतो कारण तोच स्वतःचीं श्रेष्ठ स्थानें दाखवितो आणि वारंवार शरीर देऊन रक्षणही करितो. (८)

हे सर्वज्ञ परमेश्वरा ! तूं पोषक रसानें आमच्या अर्ध्या भागास पूर्ण करतोस. आणि अर्ध्याभागाची शक्ति तूंच वाढवितोस. तूं रक्षक, समर्थ, श्रेष्ठ मित्र, अदीनतेस वाढविणारा, नरकापासून वांचविणारा (असा आहेस) म्हणूनच तुझा महिमा आम्हीं गातों सत्यवचन बोलणारे त्याच्या प्रशंसनीय शक्तींचें गुणगान करतात. (९)

आत्मोन्नति-विद्या

आत्मोन्नति-मार्ग

ज्या मार्गानें जाण्यामुळें आत्म्याची शक्ति वाढते त्या मार्गास आत्मोन्नतीचा मार्ग म्हणतात. त्या मार्गाचा उपदेश या सूक्तांत केला आहे. त्यामुळेंच साधक लोकांच्या दृष्टीनें हें सूक्त महत्त्वाचें आहे. भाषा दृष्टीनें पाहिलें तर सूक्त फार क्लिष्ट आहे. त्यांतील भावाचा त्वरित बोध होऊं शकत नाहीं. तरी पण विचार केला असतां आणि पूर्वापर संबंध पाहिला असतां जो बोध होऊं शकतो तो येथें आम्हीं देतों—

आत्म्याची उन्नति

(१) **अमृतासुः- (अ-मृत-असुः)** हा जीवात्मा अमर जीवनशक्तीनें युक्त आहे. अर्थात् तो अमर आहे. कधीं मृत्यु पावणार नाहीं. ' अज ' आणि ' अमर ' हीं दोनहि त्याचीं नांवें आहेत. या नांवावरून तो ' अजन्मा ' आणि न मरणारा आहे ही गोष्ट सिद्ध होते. जरी वस्तुतः तो जन्म मरणापासून मुक्त आहे तरी या शरीरासह तो जन्म घेतो आणि या शरीरासह मृत्यु पावतो असें मानण्यांत येतें. त्याचें वर्णन ' **अजायमानो बहुधा विजायते** । (य. ३१।१९) ' न जन्म घेणारा पुष्कळ प्रकारें जन्म धारण करतो म्हणजे हा अजन्मा आत्मा स्वयं अमर प्राणशक्तीनें युक्त आहे, तरी सुद्धां जन्ममरण अवस्थेचा अनुभव घेतो. या मंत्रांत सुद्धां '**अमृतासुः सुजन्मा**' अमर जीवनशक्तीनें युक्त असून सुद्धां तो उत्तम जन्म घेणारा असें त्याचें वर्णन केलें आहे त्याचा हेतु सुद्धां हाच आहे. (मं.१)

(२) **सु-जन्मा**- उत्तम जन्म घेणारा, जन्म घेऊन उत्तम कार्य करणारा, ज्यानें स्वतःच्या जन्माचें सार्थक केलें आहे. हा आत्मा वस्तुतः अजन्मा आणि अमर आहे. पण या शरीरासह तो जन्म घेतो, येथें येऊन परम पुरुषार्थ करतो आणि स्वतःचें अमरत्व प्राप्त करून घेतो. (मं. १)

(३) **वर्धमानः**- वृद्धि पावणारा, वर सांगितल्याप्रमाणें परमपुरुषार्थ करतां करतां स्वतःची शक्ति विकसित करतो अर्थात् नर जन्म प्राप्त करून आत्मोन्नतीच्या मार्गानें जाऊन स्वतःच्या अजर आणि अमरशक्तींना वृद्धिंगत करतो. (मं. १)

(४) **ऋघङ्+असुः**- सत्याचा मंत्र जपणारा, अर्थात् सत्याचें पालन करणारा, सत्याचें मनन आणि खोल विचार करणारा, जेव्हां अशी अवस्था होते तेव्हां उन्नति होण्यास सुरवात होते. (मं. १)

(५) **अदब्ध+असुः**- न दबणाऱ्या प्राणशक्तीनें युक्त, हा अदम्य बलानें संपन्न आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणें निष्ठेनें सत्याचें पालन केल्यानें आत्मिक बल वाढतें आणि आत्मिक बलानेंच स्वतःच्या अजर आणि अमर आत्मशक्तींचा अनुभव येतो. (मं. १)

(६) **भ्राजमानः**- प्रकाशमय, आतां यासमयीं तो स्वतेजानें चमकतो. सत्यनिष्ठा आणि आत्मिक बळ यांच्यामुळें मनुष्याचें तेज वाढतें. (मं. १)

(७) **योनिं आबभूव**- स्वतःच्या मूळ उत्पत्ति स्थानास प्राप्त करून घेतो. परिघा जवळ न जाता तो केंद्रस्थानीं पोंहोचतो. चक्राच्या परीघांत गति जास्त असते. केंद्रांत ती अगदींच अल्प असते, त्यामुळें परीघांत अशांति असते आणि केंद्रांत शांति असते. त्यामुळें योगी लोक केंद्रस्थानीं असणाऱ्या परमात्म्याला प्राप्त करून घेऊन शांति प्राप्त करून घेतात आणि इतर मनुष्यें परीघांत फसून महागतीसह जलद चक्रांत सांपडतात. वरील प्रकारचा मुमुक्षु जीव मध्यकेंद्रस्थानांत जातो आणि शांतीचा अनुभव करतो.

याप्रकारें तो (**त्रितः**) रक्षक आणि (**धर्ता**) धारक होतो. म्हणजे दुसऱ्याचें रक्षण आणि धारण करणारा होतो. आणि (**त्रीणि दाधार**) स्वतःच्या तीन अवस्था (स्थूल, सूक्ष्म आणि कारण) यांस धारण करतो. म्हणजे या अवस्था स्वतःच्या स्वाधीन करून घेतो. याप्रमाणें प्रथम मंत्राचे मनन करण्यानें खालीं दिल्याप्रमाणें बोध होतो.

प्रथम मंत्रानें बोध

अदम्य आत्मशक्तीचें तेज

' मनुष्य स्वतःच्या आत्म्याला अमर जीवनशक्तीनें परिपूर्ण करण्याचा अनुभव करो. नर जन्म प्राप्त झाल्यावर स्वतःचें जन्म सार्थक्य करण्यासाठीं उत्तम प्रशस्त कर्म करो, आणि स्वतःची शक्ति वाढवो. सत्याचें पालन करून, आत्म्याच्या शक्तीच्या अदम्यतेचा अनुभव करून उत्तम प्रकारें दिवसाच्या प्रकाशाप्रमाणें प्रकाशित होत राहो. अंतीं स्वतः परमात्म्याच्या केंद्रांत स्वतःचें स्थान स्थिर करून जनतेचा रक्षक आणि उद्धारक होऊन स्वतःच्या तीनहि अवस्था स्वतःचें आधीन करून घेवो. ' (मं. १)

हें या प्रथम मंत्राचें तात्पर्य पहातां सहजच ध्यानीं येतें कीं, ' जनतेचें रक्षण आणि धारण केल्यावांचून म्हणजे जनतेच्या उद्धाराच्या प्रयत्नांत आत्मसमर्पण केल्याशिवाय स्वतःच्या अदम्य आत्मशक्तीचा विकास होत नाहीं आणि आत्मविकासाची

अंतिम भूमिका सुद्धां प्राप्त होत नाहीं.' असो आतां दुसऱ्या मंत्राचा आशय पहा—

(८) यः प्रथमः धर्माणि आससाद- जो प्रथम होऊन धर्माच्या नियमांचें पालन करतो, जो सर्वश्रेष्ठ बनून धर्मनियमांचें पालन योग्य प्रकारे करतो आणि केव्हांहि धर्मनियमांच्या पालनांत शिथिलता येऊं देत नाहीं. (मं. २)

(९) ततः पुरूणि वपूंषि कृणुषे- त्यामुळें त्रिविध शारीरिक शक्तींना तो धारण करतो. '**वपु**' चा अर्थ शरीर अथवा शरीराची शक्ति असा आहे. मनुष्याचें शरीर स्थूल, सूक्ष्म आणि कारण असें तीन प्रकारचें आहे. आणि त्यामुळें त्याच्या शक्ति सुद्धां तीन प्रकारच्या आहेत. वरील धर्मनियमांचें पालन करण्यानें मनुष्य शरीरांतील या शक्ति वाढत जातात. जणूं काय मनुष्य धर्मनियमांच्या पालनाच्या द्वारें शरीराच्या या विविधशक्ति निर्माण करतो आणि वाढवितो. (मं. २)

(१०) यः अनुदितां वाचं चिकेत- जो अप्रगट वाणीस जाणतो म्हणजे गुप्त वाणीद्वारा प्रगट होणारे संदेश जाणतो. मनुष्य जी वाणी बोलतो ती व्यक्त, अथवा प्रगट अथवा 'उदित' वाणी होय. ही व्यक्त वाणी फारच स्थूल आहे. तीस वैखरी असें म्हणतात. तिच्या पूर्वींच्या '**परा, पश्यन्ती,** आणि **मध्यमा**' या तीन गुप्त, गुह्य आणि अव्यक्त अथवा अनुदित वाणी आहेत. प्रगट वाणीपेक्षां या गुप्त वाणींमध्यें आत्म्याचा प्रभाव अधिक भरलेला आहे. जो प्रगट वाणीनें इतका व्यक्त होऊं शकत नाहीं. ज्ञानी मनुष्यें या अनुदित वाणीचे संदेश जाणतात आणि स्वीकारतात. याविषयीं वेदांत इतरत्र असें वर्णन आहे—

चत्वारि वाक्परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः । गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ॥

(ऋ. १।१६४।४५ अथर्व. ९।१०।२७)

'वाणीचीं चार पदें आहेत, तीं विवेकी ब्रह्मज्ञानी जाणतो. त्यांतील तीन हृदयामध्यें गुप्त आहेत आणि चवथी मनुष्य बोलतो ती.' वरील मंत्राच्या कथनासह या मंत्राचा विचार केला पाहिजे. यांत जी '**अनुदितां वाचं**' (अप्रगट गुह्य वाणी) ला पहाण्याचें वर्णन आहे तें वाणी (**गुहा निहिता**) हृदयाच्या गुंफेंत गुप्त आहे. ब्रह्मज्ञानी तिला जाणतात. म्हणजे या गुह्य वाणीस जाणणें ही विशेष योग्यतेची गोष्ट आहे.

(११) प्रथमः धास्युः योनिं आविवेश- प्रथम धारणाशक्तीनें युक्त होऊन मूल उत्पत्ति स्थानांत दाखल होतो. अर्थात् जे पूर्वोक्त प्रकारें स्वतःची उन्नति करतात ते मूल केंद्रस्थानांत प्रवेश करून अनुपम शांति अनुभवतात. [या विषयीं प्रथम मंत्रांत जास्त विवरण केलें आहे. त्याची पुनरावृत्ति येथें करण्याची जरूरी नाहीं.] या दुसऱ्या मंत्रांत जो उपदेश केला आहे त्याचा सारांश असा आहे.

'**मनुष्यनें पहिलें** व्हावें, धार्मिक श्रेष्ठ कर्मांची आराधना करावी, स्वतःच्या स्थूल, सूक्ष्म आणि कारणशरीराची शक्ति विकसित करावी, गुह्य वाणीचे गुप्त संदेश जाणावे आणि मूल केंद्रस्थानांत स्वतःचें स्थान स्थिर करून तेथील आनंद प्राप्त करावा. (मं. २)

साधकानें प्रथम मंत्राच्या बोधामध्यें यांतील बोध मिळवून आत्मोन्नतीचा उपदेश प्राप्त करावा. आतां तिसऱ्या मंत्राचें मनन करूं.

शरीरधारणाचा उद्देश

(१२) ते शोकाय तन्वं रिरेच, स्वाः शुचयः हिरण्यं क्षरत्- तुझ्या प्रकाशाच्या विस्तारासाठीं तुझ्याशीं शरीराचा योग करण्यांत आला आहे. त्यामुळें तुझ्या स्वतःचे स्वयं प्रकाशी किरण सुवर्णापारखे तेजस्वी होऊन जीवात्म्यासह जें शरीर मिळालें आहे त्याचें कारण जीवात्म्याचे स्वयंप्रकाशी किरण चारी बाजूंस पसरावे आणि जीवात्मा जास्त तेजस्वी व्हावा. म्हणजे हें शरीर हें कोणत्याही प्रकारें बंधनरूप नाहीं. परंतु बुद्धिसाठीं आहे. जो मनुष्य स्वतःच्या उन्नतिसाठीं प्रयत्न करितो त्यास तें सहाय्यरूप होतें. आणि जे लोक तिरस्कारार्ह कार्यांत मग्न रहातात, त्यांना हेंच मनुष्य शरीर बंधनरूप होतें. म्हणून मनुष्यानें स्वतःच्या शरीराचा उद्देश समजून येईल असें कार्य करावें. आणि स्वतःच्या शरीराची अशी उत्तम उन्नति करावी कीं ज्याचीं प्रकाश किरणें त्याच्या चारी बाजूंस पसरून सर्वांस प्रकाशित करतील आणि स्वतः स्वतःच्या आत्म्यास कृतकृत्य करतील. शरीराचा मुख्य उद्देश शारीरिक भोगविलास भोगण्याचा नाहीं, परंतु आत्मिक बल वाढविण्याचा आहे. ही गोष्ट या मंत्र भागानें सिद्ध केली आहे. (मं. ३)

(१३) अत्र अमृतानि नाम दधेते- येथें या देहांत पुष्कळ अमृतनामें धारण करण्यांत आलीं आहेत. म्हणजे या देहांत पुष्कळ अमृतें ठेवलेलीं आहेत. मनुष्यानें या शरीररूपी क्षेत्रांतील अमृत प्राप्त करण्यासाठीं अनुष्ठान करावें हें त्यास उचित आहे. या शरीरांतील अमृत आत्म शक्तींचा अनुभव घेऊन पुष्कळ लोक संतमहन्त बनून मुक्त धामास प्राप्त झालेले आहेत. या प्रकारें हें शरीर अमृतप्राप्तीस सहायक आहे. स्वतःच्या शरीरास तसें समजून मनुष्यानें त्याचा उत्तम उपयोग करावा आणि अमर

व्हावें. जर या शरीरांत अनेक अमृतें असतील तर खरोखर या शरीराचा स्वामी जीवात्मा हाच त्या अमृतांचा खरा स्वामी आहे. परंतु त्याची अवस्था त्याच्याच अज्ञानानें अशी झाली आहे की तो अमृतांचा मालक असून सुद्धां मृत्यूस नेहमीं भीत असतो-ज्या प्रमाणें कोणी अज्ञानी मनुष्य स्वतःचें द्रव्य भूमींत पुरून ठेवलेलें आहे हें माहित नसल्यानें स्वतःला निर्धन समजून दुःख करतो, त्याच-प्रमाणें या शरीररूपी कर्मक्षेत्रांत जीं अनेक प्रकारचीं अमृतें आहेत. त्यांस प्राप्त करण्यासाठीं (**अमृतत्वस्य ईशानः**) (ऋ. १०। ९०।३) अमरत्वाचा स्वामी असून सुद्धां तो मृत्यूला भीत असतो. यासाठींच मनुष्यास हें आवश्यक आहे की त्यानें स्वतःचें अमरत्व अनुभवावें, त्यासाठीं धर्माचरण करावें आणि स्वतःची उन्नतीची साधना करावी. (मं. ३)

१४ विशः वस्त्राणि परयन्तां— प्रजेनें वस्त्रें बनविण्यास गति द्यावी अथवा मनुष्यांनीं स्वतःचीं वस्त्रें दूरीत करावीं. मनुष्यांनीं स्वतःच्या बाह्य आवरणास फेंकून द्यावें आणि स्वतःच्या शुद्ध स्वरूपांत उभे रहावें. मनुष्यें कपड्यांनीं स्वशरीर झांकून स्वतःचें मूळरूप लपवितात. म्हणून स्वतः स्वतःच्या आच्छादनांत लपून राहूं नये, हें स्वतःची उन्नति इच्छणाऱ्या मानवास उचित आहे. परंतु त्यानें सत्य निष्ठेनें स्वतःची वास्तविक स्थिति उघड करावी आणि ती प्रकाशांत आणावी. त्यामुळें मनुष्याची उन्नति होऊं शकते. ढोंग करण्यानें मनुष्याची उन्नति होणार नाहीं, होऊं शकत नाहीं. तो दुसऱ्यास कदाचित् भ्रमांत पाडूं शकेल, पण स्वतःला फसवूं शकणार नाहीं. म्हणून स्वतः आच्छादन रहित होऊन स्वतःच्या शुद्ध स्वरूपाचें निरीक्षण करून स्वतःच्या उन्नतीच्या मार्गानें पुढें जावें—

हिरण्मयेन पात्रेण सत्यस्यापिहितं मुखम् ।
तत्त्वं पूषन्नपावृणु सत्यधर्माय दृष्टये ॥

(य. ४०।१५)

' सोन्याच्या झांकणानें सत्याचें तोंड झांकलेले आहे. सत्यास पहाण्यास तें झांकण दूर केलें पाहिजे. ' हा उपदेश आणि या मंत्रांतील उपदेश ' स्वतःची आच्छादनाचीं वस्त्रें दूर फेंका ' हे दोनहि उपदेश एकच भाव प्रकट करतात हें स्पष्ट आहे.

तृतीय मंत्राचा भाव

स्वतःमध्यें लपलेलें अमृत

' स्वतःच्या तेजाचीं किरणें सर्वत्र पसरावीं यासाठीं ज्यानें उत्तम शरीर दिलें आणि ज्यांत अनेक अमृतमय यशें ज्याच्या कृपेनें आम्हीं धारण करूं शकूं त्याचे सन्मुख स्वतःचें आच्छादन दूर फेकून शुद्ध स्वरूपांत उपस्थित व्हावें. (मं. ३)

या तिसऱ्या मंत्राचा बोध लक्षांत घेऊन आणि मनन करून आतां आम्ही चतुर्थ मंत्राचा विचार करीत आहोंतः—

(१५) **सदः सदः आतिष्ठन्त अजुर्यं पूर्व्यं प्रतरं प्रगुः**-प्रत्येक धर्मविचारांच्या यज्ञ शाळेंत बसणारे लोक अजर, पुरातन आणि सर्वोत्कृष्ट आत्म्यास प्राप्त करतात. ज्यास प्राप्त करावयाचें तो (**अजुर्यं**) जरारहित, (**पूर्व्यं**) सर्वांहून प्राचीन आणि पुरातन त्याचप्रमाणें पूर्ण आणि (**प्रतरं**) सर्वांहून अत्यंत उत्कृष्ट आहे, म्हणून त्यास प्राप्त केलें पाहिजे. त्यास प्राप्त केल्यानें आम्ही जरारहित पूर्ण आणि उत्कृष्ट होऊं शकतों. ही अवस्था प्राप्त करण्यासाठीं प्रत्येकाचे प्रयत्न झाले पाहिजेत. ही अवस्था प्राप्त करण्यासाठीं सर्व प्रथम अशा सभांतून गेलें पाहिजे जेथें धर्मासंबंधीं विचार होत असतात, आणि यज्ञ करण्यांत येतात. अशा सज्जनांच्या संगतींत राहिल्यानें हळू हळू मनावर शुभ संस्कार होतात. आणि मनुष्य शुद्ध, पवित्र, आणि उन्नत होत जातो. (**उपनिषद्**) ' **उप+नि+षद्** ' नांव ब्रह्म विद्येचें आहे. या शब्दांतील (**उप+नि**) हे उपसर्ग दूर करण्यात आले तर ' **सद्** ' शब्द बाकी राहतो, तोच येथील सद् शब्द आहे, ब्रह्म प्राप्तीच्या उपायाचें चिंतन करण्यास लोक शांतीनें जेथें बसतात त्या सभेचें नांव ' सद् अथवा उपनिषद ' असें आहे. (**अजुर्यं**) अजर, (**पूर्व्यं**) प्राचीन आणि (**प्रतरं**) उत्कृष्ट आत्म्याच्या (**उप**) जवळ (**नि**) समीप, (**सद्**) बसणें हा त्या शब्दाचा भाव आहे. त्याच्या योगें आत्मप्राप्तीच्या अनुष्ठानाचा मार्ग ध्यानांत येऊं शकेल.

(१६) **कविः शुपस्य मातरा, जाम्ये धुर्यं पतिं रिहाणे, परयेथां**— अतींद्रियार्थ दर्शी आणि बलाची मान्यता धारण करणारा बहिणीच्या हितासाठीं तिच्या समर्थ पतीची प्रशंसा करण्याच्या इच्छेनें सर्वांशी व्यवहार करतो. मेव्हण्याचा विशेष आदर करतो. बहिणीचा पति जेव्हां येतो तेव्हां सर्व त्याचा सन्मान करतात, कारण की जर त्याचा अपमान झाला तर स्वतःच्या बहिणीसच कष्ट होतील; असा विचार त्यांचे मनांत असतो. तोच आदराचा विचार इतरांशीं संबंध ठेवतांना, व्यवहार करतांना मनांत ठेवला पाहिजे, ज्याप्रमाणें घरीं आलेल्या जांवयांचे मान सन्मान करण्यांत येतात, तशाच प्रकारच्या आदरभावानें सर्वांशी व्यवहार करणें योग्य होईल. कित्येकांस दुसऱ्यांचा अपमान करण्याची संवय असते, त्यामुळें निष्कारण द्वेषभाव वाढतो. यासाठीं प्रेमवृद्धिंगत होईल असा व्यवहार करणेंच योग्य आहे. मनुष्यानें दूर दृष्टीनें विचार करण्याची संवय केली पाहिजे आणि शक्तीचा सन्मान केला पाहिजे, बळाचा उपयोग दुसऱ्यांशीं

प्रेमाखातरच केला पाहिजे. बळाचा उपयोग, दुसऱ्यास दाबून टाकण्यांस होतां कामां नये.

चवथ्या मंत्राचा भावार्थ

दुसऱ्यांशीं व्यवहार आदरयुक्त असावा

' धर्मसभांमधून धर्मनिष्ठेनें बसणाऱ्या अनुक्रमें सर्वोत्तम, जरारहित पुण्यपुरुषास प्राप्त करतात. ते दिव्यदृष्टीनें युक्त होऊन आणि शक्तींचें महत्त्व जाणून सुद्धां ज्याप्रमाणें बहिणींच्या समर्थपतीशीं करावा तसा दुसऱ्यांशीं आदरयुक्त व्यवहार करतात.' (मं. ४)

याप्रमाणें चतुर्थ मंत्राचें मनन केल्यानंतर पांचव्या मंत्राचा विचार करूं.—

(१७) कविः काव्येन ते सुमहत् नमः कृणोमि– मीं कवि माझ्या काव्यानें तुला नमस्कार करतो. प्रथम कवि झालें पाहिजे. कवि होण्याचा अर्थ या स्थूल जगतापलिकडे ज्या सूक्ष्म शक्ति कार्य करीत आहेत, त्यांस प्रत्यक्ष करणें. या प्रकारें जो मनुष्य कवि अथवा क्रांत दर्शी असतो तो स्वतःचे अनुभव प्रगट करतो त्यास काव्य म्हणतात. हें काव्य त्या सूक्ष्मशक्तींचें शब्दचित्र असल्या कारणानें तें परमात्म्याचें वर्णन करणारें असतें. तें सुद्धां एकप्रकारें परमात्म्याचें पूजनच होय. त्यांत परमात्म्याची भक्ति आणि पूजा असते. आणि परमात्म्यासंबंधीं श्रद्धा प्रगट केलेली असते. हेंच (**महत् नमनं**) मोठें नमन होय. जो कवि होऊन काव्यदृष्टीनें या विश्वाचें निरीक्षण करतो अथवा स्थूलामध्यें सूक्ष्म शक्ति पाहतो तोच पुष्कळ मनन करणारा आहे. आत्मोन्नतीसाठीं अशाच दृष्टीची अत्यंत आवश्यकता आहे. (मं. ५)

(१८) अत्र सम्यञ्चौ अभियन्तौ मही रोधचक्रे क्षां अभि वावृधेते– ' बरोबर रहाणारी आणि गतिमान दोन्ही मोठी विरोधचक्रें या भूमीवर सर्वांस प्रगति करून देतात. या मंत्रभागांत ' एकत्र मिळालेल्या दोन विरोधी चक्रांचें वर्णन आहे. ' हीं एक दुसऱ्याशीं जोडलेली विरोधी चक्रें कोठें आहेत त्याचा विचार केला पाहिजे. स्थूल, सूक्ष्म; जड, चेतन; दृश्य प्रकृति, पुरुष; ही नांवें या ' विरोधक चक्रां ' चीं आहेत. हीं दोन्ही परस्पर गुणधारण करणारीं आहेत. अर्थात् जडाचे गुण निराळे, चेतनाचे गुण निराळे आहेत. जड–चेतन, प्रकृति–पुरुष यांचा परस्पर विरोध प्रसिद्ध आहे. तीं (चक्रें) जेव्हां परस्पर सहाय्यक होतात तेव्हां उन्नति होते. तीं परस्पर विघातक होतात तेव्हां नाश होतो. यामंत्रांत ही गोष्ट सांगितली आहे कीं ही दोन्ही चक्रें (**सम्यंचौ**) परस्पर सहकार करतील, एकमेकांस सहायभूत होतील तर (**अभिवावृधाते**) सर्व प्रकारें वारंवार वृद्धि करणारी होतात. शक्तींचा विकास करतात. यावरून हें सिद्ध होतें कीं जर तीं परस्पर विघातक होऊं लागलीं तर शक्ति क्षीण होऊं लागते. आपल्या शरीराचेंच पहाना. स्थूल शरीरांत सूक्ष्म शक्ति आहे. शरीरास जर संयमद्वारें उत्तम स्थितींत ठेवलें तर हें स्थूलशरीर सूक्ष्म शक्तिचें सहायक, पोषक आणि संवर्धक होतें. याहून उलट जर असंयमद्वारा या शरीरास स्वतंत्रतेची सूट दिली तर तें व्यसनांत सांपडतें आणि दोनांह शक्तींचा क्षय होतो. साधक स्वतःच्या शरीरांनच याप्रमाणें स्थूल आणि सूक्ष्म दोन विरोधीचक्रें कशीं आहेत आणि परस्पर विरोधी असतां सहकारानें कशीं परस्पर सहाय्यक होतात आणि विरोधी झालीं असतां एक दुसऱ्यांस विघातक कशीं होतात तें पाहील तर त्यास हें समजेल कीं, शरीर व्यसनांत सांपडलें असतां विरोधक बनतें. ही गोष्ट ध्यानीं आली असतां साधकास या मंत्राचा उपदेश प्रत्यक्ष समजेल. या परस्पर विरोधी चक्रांस एकाच कार्यास जोडून परस्पर सहायक बनवून स्वतःच्या विकासाच्या कार्याला जोडणे हाच या मंत्राचा उपदेश आहे. याप्रमाणें विरोधी शक्तीस एकाच कार्यांत परस्पर सहाय्यक बनवून स्वतःची शक्ति वाढविणें आणि काव्यदृष्टीनें स्थूलामध्यें सूक्ष्माचा अनुभव करून त्याचे समोर भक्तीनें नम्र होणें हेंच आत्मोन्नतीस आवश्यक आहे. (मं. ५)

पांचव्या मंत्राचा भाव

विरोधक शक्तींची एकतेनें वृद्धि

मीं आपली स्थूल शारीरिक शक्ति आणि सूक्ष्म आत्मशक्ति एकाच कार्यास योजीन आणि त्यांच्या परस्पर विरोधास दूर करून आणि त्यांस परस्पर सहायक करून दोनांह शक्तींनीं दोघींचें पोषण करीन. या प्रकारें अतींद्रियार्थ दृष्टीचें स्थूलाचें आंत सूक्ष्म-शक्तीस पाहून स्वतःच्या काव्यानें त्या चालक अनंत अंतःशक्तीच्या सन्मुख भक्तीयुक्त अंतःकरणानें नम्र होइन. (मं. ५)

अशा पांचव्या मंत्राच्या मननानंतर सहाव्या मंत्राचा विचार करूं.

(१९) कवयः सप्त मर्यादाः ततक्षुः तासां एकां इत् अभि अगात् अंहुरः– ज्ञानी लोकांनीं सात मर्यादा निश्चित केल्या आहेत, त्या पैकीं एकामर्यादेचें उल्लंघन केलें तरी तो पापी होतो. (१) चोरी न करणें, (२) व्यभिचार न करणें करणें, (३) ब्रह्म हत्या न करणें, (४) गर्भपात न करणें, (५) सुरापान न करणें, (६) वारंवार दुराचार न करणें, (७) आणि पाप केलें असलें तर असत्य बोलून त्यास न लपविणें, या त्या सात मर्यादा कवि लोकांनीं निश्चित केल्या आहेत. त्यांतील एक पण मर्यादेचें उल्लंघन करणारा पापी होतो, तर मग एका पेक्षां अधिक मर्यादा उल्लंघन केल्यानें मनुष्य पापी होइलच यांत

शीला स्थान कोठें आहे ? या सात मर्यादांचा विचार करण्यानें सात पुण्यकर्मे कोणती आणि सात पापकर्मे कोणती तें साधकास कळूं शकेल. सात मर्यादांतील सहावी आणि सातवी अत्यंत महत्वाच्या आहेत. मनुष्याचे हातून पाप झालें तर त्या पासून स्वतःस वांचविण्याचा त्यानें प्रयत्न केला तर फारसें नुकसान होण्याचा संभव नाहीं; पण पुनः पुनः शिक्षा झाली असतां सुद्धां आणि मनाई केली असतां सुद्धां तो फिरून तेंच कुकर्म करूं लागला तर त्याच्या अवनतीस मर्यादा राहणार नाहीं. म्हणून अज्ञानानें कदाचित् एखादें पाप घडलें, दोषयुक्त आचरण झालें तर त्यानें वारंवार त्या प्रमाणें न करावें हें उन्नति इच्छिणाऱ्या लोकांस उचित होय. आणि असावधानतेचें एखादें दुराचरण स्वतःच्या हस्तें घडलें तर असत्य बोलून तें छपविण्याचा प्रयत्न करतां कामां नये. कारण कीं तसें करण्यानें तो कलंक जास्त दाट होईल. आणि त्यामुळें अधिक पाप होत राहील. म्हणून दोष असेल तर सत्य बोलून तो यथार्थ रूपानें प्रगट केला पाहिजे हेंच योग्य होय. मनुष्याच्या उन्नतीस या सात मर्यादा अत्यंत सहायकारी आहेत. त्यासाठीं कोणत्याहि माणसानें त्यांतील कोणतीच उल्लंघू नये. (मं. ६)

(२०) **आयोः स्कंभः**– आयुष्याचा आधारस्तंभ हो. अर्थात् आयुष्याचा विघातक होऊं नकोस. वरील सात मर्यादा उल्लंघन केल्यानें आयुष्याचा नाश होतो आणि मर्यादांचें पालन केल्यानें आयुष्याचा आधार मजबूत होतो. मर्यादांचें पालन करणें म्हणजे संयमी आयुष्य घालविणें, संयमानें जीवन व्यतीत केल्यानें जीवनाचा आधार शक्तिशाली होतो आणि उत्तम दीर्घ जीवन प्राप्त होतें. (मं. ६)

(२१) उपमस्य नीडे, पथां विसर्गे धरुणेषु तस्थौ– जो उपमा देण्यालायक आहे आणि जो सर्वांच्या जवळ आहे, त्या परमात्म्याच्या स्थानांत त्याचप्रमाणें अनेक मार्ग जेथें येऊन मिळाल्यानें समाप्त होतात अशा धारक केंद्रांत तो रहातो. येथें तीन प्रकारचे उपदेश आहेत. (**उपमस्य नीडे**) उपमा देण्यास योग्य असा तो परमात्मा आहे. (**रूपं रूपं प्रतिरूपो बभूव**) (ऋ. ६।४७।१८) जगतांतील प्रत्येक रूपास तो आदर्श नमुनारूप आहे, याप्रकारचें वर्णन वेदांत आहे. यावरून सिद्ध होतें कीं तो परमात्मा सर्वांस आदर्शरूप आहे. त्याच्या (**नीडे**) घरट्यांत आपणांसाठीं स्थान मिळविलें पाहिजे. सदाचारानें आयुष्य व्यतीत करणारासच त्याच्या घरट्यांत शांत जीवन जगण्यास स्थान मिळतें. तें स्थान कसें असतें त्याचें वर्णन येथें '**पथां विसर्गे**' या शब्दांनीं केलें आहे. '**विसर्ग**' शब्दाचा अर्थ विराम करण्याचें स्थान, अथवा समाप्तिचें स्थान. (**पथां**) सर्वमार्गांचें (**विसर्गे**) हें विरामाचें अथवा समाप्तीचें स्थान आहे. अथवा '**सर्ग**' शब्दाचा अर्थ आहे 'उत्पत्ति' '**विसर्ग**' चा अर्थ '**विगत सर्ग**' अर्थात् उत्पत्ति जेथें नाहीं तें स्थान. जेथें विविध मार्गांची भानगड नाहीं म्हणजे विविध मार्ग एकरूप होऊन जातात तें स्थान. जेथें विविध मार्गावर चालण्याचे कष्ट पडणार नाहींत अशा स्थानीं राहिलें पाहिजे. सर्व मार्गांनीं जाणारे लोक शेवटीं जेथें पोंहोंचतात त्या स्थानीं पोंहोंचून आणि तेथें जाऊन स्थिर राहिलें पाहिजे.

सहाव्या मंत्राचा भाव

सात मर्यादा

'ज्ञानी मनुष्यांनीं व्यवहारासाठीं सात मर्यादा नक्की केल्या आहेत. त्यांतील एखादीचें सुद्धां उल्लंघन केल्यानें मनुष्य पापी होतो. परंतु या सात मर्यादा पालन करून धर्मानुकूल व्यवहार करून स्वतःच्या जीवनाचा आधारस्तंभ होतो, तो सर्वांस उपमा देण्यालायक परमात्म्याच्या स्थानांत जेथें अनेक मार्ग जाऊन पोंहोंचतात त्या स्थानीं जाऊन स्थिर होतो. (मं. ६)'

अशा रीतीनें सहावा मंत्र समजून घेतल्यानंतर सातव्या मंत्राचें मनन करूं.

(२२) व्रतः कृण्वन् अमृतासुः एमि– व्रतरूप होऊन विविध सत्कर्में करतां करतां अमर प्राणशक्तीनें युक्त होऊन प्रगति करतो. उन्नति इच्छिणाऱ्या मनुष्यास हें उचितच आहे कीं त्यानें (**व्रतः**) व्रती व्हावें. व्रती होणें म्हणजे व्रताचें पालन करणें हा ज्याचा स्वभावधर्म झाला आहे असें होणें. एक मनुष्य असा आहे कीं तो नियम करतो आणि त्याप्रमाणें वागतो आणि दुसरा मनुष्य असा आहे कीं स्वाभाविकपणें तो नियमाविरुद्ध वर्तन करीत नाहीं. पहिला मनुष्य प्रयत्नपूर्वक नियमाचें पालन करतो, दुसरा स्वभाव धर्माचें पालन करतो. याप्रमाणें नियमरूप झालेला जो मनुष्य तोच '**व्रतः**' शब्दानें येथें निर्दिष्ट केला आहे. असा श्रेष्ठ मनुष्य स्वाभाविकपणेंच सत्कर्म करीत रहातो. (**अ+मृत+असुः**) अमर जीवनशक्तीनीं संपन्न होतो. स्वाभाविकपणें नियमांचें पालन करणें आणि स्वाभाविकपणें सत्कर्म करणें हें येथें दर्शविलें आहे. प्रथम जेव्हां प्रयत्नपूर्वक तो व्रतपालन आणि सत्कर्म करील तेव्हां बऱ्याच कालावधीनें त्याचा स्वभाव तसा होईल. आणि स्वभाव तसा बनला म्हणजे तो अमृतरूप होईल. येथें अमर होण्याची गोष्ट मुख्य सांगितली आहे हें साधकानें विसरूं नये. हल्लीं मनुष्य–स्वभावच खोटें बोलण्याचा कुकर्म करण्याचा आणि नियमोल्लंघना करण्याचा झाला आहे. त्या योगें त्याचा अधःपात होतो. परंतु जेव्हां तो स्वाभाविकपणें सत्य बोलेल आणि असत्याची कल्पना

सुद्धां त्याचें मनांत येणार नाहीं. तेव्हां तो अनन्यभावानें नियमांचें पालन करीलच आणि त्यामुळें त्याच्या सर्व अडचणी (संकटें) दूर होऊन तो अमर होऊन जाईल.

(२३) **तत् आत्मा असुः तन्व सुमद्गुः**– उपरोक्त अनुष्ठानानें आत्मा, प्राण, शरीर हीं सर्व गुणवान् होतात. म्हणजे आत्मा, प्राण, आणि शरीर शुभगुणांनीं आणि बळानें संपन्न होतें आणि तो मनुष्य विलक्षण महान् कार्यें करण्यांत समर्थ होतो. या अनुष्ठानानें हे लाभ होतात. (मं. ७)

(२४) **शक्रः रत्नं दधाति**– समर्थ होऊन धनास धारण करतो. हें सुद्धां पूर्वोक्त अनुष्ठानाचें फल आहे. (मं. ७)

(२५) **हविर्दाः अर्जया, सचते**– स्वतःस हवि समर्पण करणारा बलानें संयुक्त होतो. तन मन आणि धन यज्ञासाठीं समर्पित करणाऱ्याची शक्ति वृद्धिंगत होते. परोपकारानें स्वतःचें बल वाढतें. (मं. ७)

सातव्या मंत्राचा भाव

' उत्तम व्रतांचें अनुष्ठान करून परम पुरुषार्थ करणें हा ज्यांचा स्वभाव झाला आहे असे अदम्य, अमर, जीवनशक्तिनें युक्त होऊन आणि आत्मिक प्राणासह शारीरिक शक्तीनें बलवान आणि पूर्ण समर्थ होऊन आत्मशक्तींचा परोपकारासाठीं यज्ञ करून कृत्य कृत्य होतात. ' (मं. ७)

सातव्या मंत्राचें याप्रमाणें मनन केल्यावर आतां आठव्या मंत्राचा विचार करूं-

२६ **पुत्रः क्षत्रं पितरं ईडे**— पुत्र स्वतःचें दुःख निवारण करणाऱ्या पित्याची स्तुति करतो. सहाय्यता इच्छितो अथवा त्याची कृपा इच्छितो. (**क्षत्+त्र**) क्षत्र शब्दाचा अर्थ दुःखापासून रक्षण करणारा, पिता दुःखापासून रक्षण करणारा आहे. त्यासाठींच पुत्र पित्यास शरण जातो. याचप्रमाणें मनुष्य एवढ्यासाठींच परमात्म्याची उपासना करतो. कीं तो सर्वांची दुःखें दूर करितो. या कारणानेंच परमेश्वरास सर्वांचा पिता म्हटलें आहे. (मं. ८)

(२७) **मर्यादं ज्येष्ठं स्वस्तये अह्वयन्**— मर्यादेचें पालन करणाऱ्या श्रेष्ठ पुरुषाची प्रार्थना स्वतःच्या कल्याणासाठीं सर्व करतात. म्हणजे स्वकल्याणाची इच्छा प्रत्येक मनुष्यांत आहे त्यासाठीं तो श्रेष्ठ गुरुजनाची उपासना आणि ईश्वराची पूजा करतो. (मं. ८) म्हणजे दुःखापासून बचावण्यासाठीं आणि कल्याण प्राप्त करण्याची इच्छा असेल अशा मनुष्यानें परमात्म्याची भक्ति केली पाहिजे.

(२८) **विस्थाः दर्शयन्**— तो ईश्वर स्वतःचें (वि) विशेष (**स्था**) स्थान दाखवितो. जो मनुष्य त्या परमात्म्याची उपासना करतो त्यास तो ईश्वर स्वतःची विशेष आनंदाचीं स्थानें अर्पण करतो. तेथें हे जीवात्मे जातात आणि आनंद प्राप्त करून घेतात.

(२९) **आवर्वृततः वपूंषि कृणवः**– वारंवार जन्ममरणाच्या मार्गांत भ्रमण करणाऱ्याचे देह तो बनवितो. म्हणजे जीं मनुष्यें पूर्वोक्त उपासनाद्वारा मुक्ति प्राप्त करीत नाहींत. त्यांस मुक्ति देण्याच्या इच्छेनें ईश्वर उत्तम शरीर त्यांस देतो. त्याचा हेतु असा कीं हा जीव या शरीराच्या सहाय्यानें प्रशस्त कर्म करून स्वतःसाठीं मुक्ति धाम प्राप्त करील. तसेंच तेथील परमानंदाचा भोक्ता होईल.

आठव्या मंत्राचा भाव

परम पित्याची उपासना

पुत्र स्वतःच्या रक्षणासाठीं पित्यास शरण जातो ज्याप्रमाणें मनुष्य स्वतःच्या कल्याणासाठीं श्रेष्ठ पुरुषाची संगत करतो. त्याचप्रमाणें मनुष्य स्वतःचा परम पिता आणि परम गुरु जो परमात्मा त्याची उपासना करतो. अशा उपासकांना तो ईश्वर स्वतःचीं विशेष आनंदाचीं स्थानें दाखवितो म्हणजे त्यानें तेथें जावें आणि आनंद पूर्ण व्हावें. परंतु जीं मनुष्यें त्याची उपासना करीत नाहींत त्यांस वारंवार जन्ममरणाचा अनुभव देण्यासाठीं तो शरीर देतो. म्हणजे त्यानें त्या शरीरांच्या द्वारें आवश्यक अनुभव मिळवून आणि स्वतःची शक्ति विकसित करून त्यानें मुक्ति धामासाठीं योग्य व्हावें. (मं. ८)

येथें आठव्या मंत्राचा भाव समाप्त झाला. त्याचें मनन करावें. आणि आतां नवव्या मंत्राचा विविचार करूं—

(३०) **अर्धेन पयसा अर्धं पृणाक्षि**— अर्ध्या पौष्टिक रसानें अर्धभाग पूर्ण करतो. येथें शरीर, इंद्रियें इत्यादि स्थूल शरीराची पुष्टि स्पष्ट आहे. अर्धाभाग स्थूल आणि अर्धाभाग सूक्ष्म आहे. आमच्या स्थूल शरीराची, इंद्रियें वगैरेंची पुष्टि विविध पौष्टिक रसांनी परमेश्वरच करतो. हे पदार्थ निर्माण करून त्यानें प्राणिमात्रांवर अनंत उपकार केले आहेत. हें पाहून त्याच्या उपकारांचें स्मरण केलें पाहिजे. (मं. ९)

(३१) **अर्धेन शुष्म वर्धसे**– अर्ध्यानें शक्ति वाढवितो. ज्याप्रमाणें अर्ध्यानें पोषण करीतो त्याचप्रमाणें अर्ध्यानें शक्ति वाढवितो. याप्रमाणें पुष्टि आणि शक्ति देऊन तो परमात्मा सर्वांस पुष्ट आणि बलवान् करितो. (मं. ९)

(३२) **तो ईश्वर (अविं=अवति**) रक्षक (**शग्मियं**) सुख वाढविणारा (**सखायं**)सर्वांचा मित्र (**इषिरं**) अन्नादिकांनीं युक्त आणि (**वरुणं-वरं**) वरिष्ठ सर्वांहून श्रेष्ठ आहे. त्याचे हे

गुण जगतांत अनुभवले पाहिजेत. आणि त्यागुणांचें स्मरण आणि अनुभव करतां करतां त्याची उपासना केली पाहिजे. (मं. ९)

(३३) **कविशस्तानि वपूंषि असै अवोचाम-** कविच्या दृष्टीनें प्रशस्त विविध रूपें पाहून त्याची आम्हीं प्रशंसा करतों. या जगांत जीं विविध शरीरें आहेत त्यांचे विलक्षण गुणधर्म पाहून मनुष्य त्या ईश्वराच्या महान् ऐश्वर्याचें अनुमान करतो, ईश्वराच्या सामर्थ्याची कल्पना करतो. (मं. ९)

(३४) **रोदसी सत्यवाचा-** द्यावा पृथ्वीमध्यें त्याची सत्य वाणी पूर्णपणें भरलेली आहे. ती सत्य आहे व ती गुह्य वाणी आहे. त्या गुह्य वाणीचे संदेश मनुष्यानें आत्मसात् केले पाहिजेत. या सूक्ताच्या दुसऱ्या मंत्रांत अप्रगट वाणीचें जे संदेश ऐकावयास सांगितले आहेत. ती वाणी हीच. (**सत्या वाक्**) सत्य वाणी होय. तीही द्यावा पृथ्वींत म्हणजे संपूर्ण विश्वांत भरलेली आहे. आपण जी वाणी बोलतो ती क्षणभंगूर आहे परंतु ही विश्वव्यापक वाणी सत्य अमृतरूप आहे. त्यामुळेंच जे शुद्धात्मे आहेत त्यांस तिचे अखंड संदेश खोल हृदयांतून ऐकूं येत असतात. जगाचे स्थूल संदेश ऐकण्याचे कान निराळे आणि सत्य वाणीचा अखंड संदेश ऐकण्याचे कान दुसरेच आहेत. (मं. ९)

नवव्या मंत्राचा भाव

' परमेश्वर स्वतःच्या एका भागाने सर्वांस पुष्टि देतो आणि दुसऱ्या भागानें बल देतो. तो सर्वांचा रक्षक, जीवन दाता, मित्र आणि सुख दाता आहे. तोच सर्वांस अन्न वगैरे देऊन पोषण करतो. संपूर्ण जगांतील पदार्थांस पाहून आणि त्यांतील कवि दृष्टिनें प्रसंसा योग्य गुणधर्मांचा अनुभव घेऊन तद्द्वारा आम्हीं सर्व परमेश्वराची प्रशंसा करतों. तो सत्य वाणीनें संपूर्ण द्यावा पृथ्वींत व्यापलेला आहे हें आम्हीं पहातों. (मं. ९)

येथें नवव्या मंत्राचें मनन संपूर्ण झालें. साधक या नऊ मंत्रांत आत्म साक्षात्काराचा मार्ग पाहूं शकतात. आणि वैदिक गूढ अध्यात्मविद्या या सूक्तांत कशी आहे त्याचा अनुभव मनन पूर्वक करूं शकतात. सूक्तांत गूढ रीतीनें जो उन्नतीच्या मार्गाचा उपदेश केला आहे त्याचा सारांश असा-

या सूक्ताचें सार

(१) मनुष्यानें स्वतःच आपण अमर जीवनशक्तीनीं परिपूर्ण आहें असा अनुभव करावा. स्वतःच्या जीवनाच्या सार्थकतेसाठीं प्रशस्त कार्यें करावीं. स्वतःच्या शक्तींची वाढ करावी. सत्यपालनानें स्वतःच्या आत्मिक शक्तीस अदम्य करावें. जनतेचा रक्षक आणि आधार होऊन स्वतःच्या सर्व अवस्था (स्थिति) स्वतःचे आधीन ठेवाव्यात. याप्रकारें स्वाधीनता प्राप्त करून स्वतःच्या स्वरूप स्थितींत केंद्रांत आनंदानें रहावें.

(२) मनुष्यानें श्रेष्ठ होण्याची इच्छा मनांत सदैव दृढ ठेवावी-त्याच्या सिद्धीसाठीं नेहमीं सत्कर्में करीत रहावें. स्वत.चें शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि इत्यादि शक्तींचा विकास करून त्या स्वाधीन ठेवाव्यात. गुह्य वाणीचे गुप्तसंदेश ऐकून तदनुसार आचरण करावें आणि स्वरूप स्थितीस प्राप्त करून घेऊन तेथें आनंदानें रहावें.

(३) मनुष्यास हें शरीर एवढ्यासाठीं प्राप्त झालें आहे कीं त्याच्या आत्म्याचा प्रकाश सर्वत्र पसरावा त्यांत अमृत रस पण भरलेला आहे. ज्याच्या कृपेनें हें सर्व प्राप्त झालें आहे त्याचे सन्मुख शुद्ध होऊन आणि दोषांस दूर करून जाणें योग्य आहे. म्हणजे स्वतःची मलीन वस्त्रें (विचार) दूर करून त्याचे सन्मुख स्वतःच्या शुद्ध रूपांत उपस्थित झालें पाहिजे.

(४) सज्जनांच्या संगतींत रहावें आणि परमात्म प्राप्तीचा विचार त्यांसहवर्तमान करून, दिव्यदृष्टीनें पहा आणि प्रत्येक प्रकारच्या बलाचा आदर कर आणि प्रत्येकाशीं आदराचें वर्तन ठेव, कधीं कोणाचा अपमान करूं नको.

(५) तुझ्या सर्व शक्तींचा सत्कार्यांत उपयोग कर. परस्पर विरोधी शक्तींतील विरोधक भाव दूर करून त्यांस एकदुसऱ्याचा सहायक बनीव. असें करण्यानें परस्परांची शक्ति परस्परांचे पोषण करतील. स्थूलामध्यें सूक्ष्म शक्तीचें कार्य पाहून त्या महान् सूक्ष्मशक्तीसमोर नम्रतापूर्वक रहा.

(६) चोरी, दुराचार, व्यभिचार, मद्यपान, गर्भपात इत्यादि कुकर्में करूं नकोस. ज्ञानी जनांच्या मार्गांत विघ्न उत्पन्न करूं नकोस. एकही कुकर्म नको म्हटलें असतां वारंवार करू नकोस. आणि दुराचार घडलाच तर तो लपविण्याचें प्रयत्न करूं नकोस. सदाचाराच्या या मर्यादा आहेत. त्यांचें उल्लंघन केल्यानें मनुष्य पापी होतो. आणि या मर्यादांत राहिल्यानें मनुष्य पुण्यवान होऊन उन्नति प्राप्त करून घेतो. या पुण्यमार्गानें जाणारा मनुष्य धर्मानुकूल व्यवहार करून संयमानें तो स्वतःच्या जीवनाचा आधार होऊन, जेथें विविध मार्ग एकत्रित होतात आणि जेथें उपमादेण्यालायक योग्य परमात्म्याचें स्थान आहे. अशा स्थानीं तो जातो.

(७) उत्तम व्रतें आणि नियमांचें पालन कर आणि परमपुरुषार्थी हो. स्वतःच्या आत्म्याच्या अदम्य शक्तीचा अनुभव कर. आणि स्वतःच्या शक्तींचा विस्तार करून त्यांचा उपयोग जनतेच्या कल्याणासाठीं प्रशस्त सत्कर्मांत कर.

(८) ज्याप्रमाणें बालक निर्भय होण्यासाठीं स्वतःच्या

पित्याचा आश्रय शोधतें त्याप्रमाणें तूं सद्गुरुचा आश्रय शोध. त्याचप्रमाणें निर्भयता आणि कल्याण प्राप्त करण्यासाठीं परमपिता आणि परमगुरु परमात्म्यास शरण जा. तो सर्व उपासकांना आनंद स्थानांत पोहोचवितो. जे त्याची भक्ति करीत नाहींत त्यांस विविध शरीरें धारण करावयास लावतो. ते त्या त्या जन्मांतील विविध अनुभव घेतां घेतां अंतीं त्याचे जवळच पोहोंचतात.

(९) परमेश्वर स्वतःच्या अर्ध्या शक्तीनें सर्वांस पुष्टि देतो आणि अर्ध्या शक्तीनें सर्वांस बलवान् बनवितो. तोच सर्वांचा जीवनदाता, रक्षक, मित्र आणि सहायक आहे. त्याच्या गुणांचें ध्यान करून, त्याच्या गुणांचें कार्य न्याहाळून त्याच्या महान् शक्तीचा अनुभव सर्वांनीं करावा. त्याची सत्यवाणी सर्वत्र व्यापक आहे. त्या गुह्यवाणीचा संदेश प्राप्त कर आणि उन्नत हो.

याप्रमाणें या सूक्ताचें सार आहे. हें सार पुष्कळच उद्बोधक आहे, आणि हें खऱ्या आत्मोन्नतीचा मार्ग दाखवितें. साधकानें त्याचें मनन करावें आणि उचित बोध प्राप्त करून घ्यावा. या सूक्ताचा उपदेश स्वतःचे आचरणांत आणणारा साधक निःसंदेह होऊन स्वतः विशेष योग्यता प्राप्त करून घेईल, आणि ऊच्च श्रेणींत जाऊन सन्मानित बनूं शकेल.

हें सूक्त गूढ अध्यात्मविद्येचा उपदेश देत आहे. ही विद्या अत्यंत गूढ आहे. कदाचित् त्यामुळेंच या सूक्ताची भाषा गूढ आणि गुप्तभावानें परिपूर्ण अशी ठेविली आहे. या सूक्ताचे शब्द आणि वाक्यें सरळ नाहींत कीं तीं सहजासहजीं समजूं शकतील. या कारणासाठीं साधकांनीं या सूक्ताचें मनन वारंवार केलें पाहिजे येथें आम्हीं विविध प्रकारें या सूक्ताचा भाव सरलतापूर्वक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. तरी कित्येक मंत्र भाग न समजतील असे अस्पष्ट राहिले आहेत. जर कोणी साधक अधिक मनन करून या मंत्रावर अधिक प्रकाश पाडतील तर त्यांचे जनतेवर अनंत उपकार होतील.

आत्मा

कांड ७, सूक्त ६७

(ऋषिः– ब्रह्मा । देवता– आत्मा)

पुन॒र्मैत्वि॒न्द्रि॒यं पुन॑रा॒त्मा द्रवि॑णं॒ ब्राह्म॑णं च ।
पुन॑र॒ग्नयो॒ धिष्ण्या॑ यथास्था॒म क॑ल्पयन्तामि॒हैव ॥ १ ॥

अर्थ— (**मा इन्द्रियं पुनः एतु**) मला इंद्रियशक्ति पुनः प्राप्त होवो. (**आत्मा द्रविणं ब्राह्मणं च पुनः**) मला आत्म्याचें चैतन्य आणि ब्रह्म पुनः प्राप्त होवोत. (**धिष्ण्याः अग्नयः यथा-स्थाम**) बुद्धि वगैरे स्थानांचे अग्नि यथायोग्य स्थानांत (**इह एव पुनः कल्पयन्तां**) येथेंच पुनः शक्तिशाली होवोत. (१)

भावार्थ— सर्व इंद्रियांच्या शक्ति, ज्ञान, चेतना, आत्मा, बुद्धि, मन इत्यादि सर्व चैतन्यशक्ति मला प्राप्त होवोत आणि येथें त्या उन्नत होवोत. (१)

पांच ज्ञानेंद्रियें आणि कर्मेंद्रियें पांच मिळून इंद्रियें दहा होतात. आत्मा हें जीवाचें नांव आहे. द्रविण शब्दाचा अर्थ येथें मनाचा उत्साह आणि चैतन्य असा आहे. ब्राह्मण याचा अर्थ ब्रह्मन्– आत्म्याची ज्ञानशक्ति असा आहे. धिष्ण्याचा अर्थ बुद्धि अथवा अंतःकरणाच्या शक्ति. हें अग्निस्वरूप चेतन आहे. सर्व त्या आत्म्याच्या शक्ति येथें स्थिर होवोत. उन्नत होवोत आणि प्रकाश रूप होऊन मला सहायक होवोत.

आत्म्याचे गुण

कांड २, सूक्त ११

(ऋषिः- शुक्रः । देवता- कृत्यादूषणम्)

दूष्या दूषिरसि हेत्या हेतिरसि मेन्या मेनिरसि । आप्नुहि श्रेयांसमति समं क्राम ॥ १ ॥
स्रक्त्योऽसि प्रतिसरोऽसि प्रत्यभिचरणोऽसि । आप्नुहि श्रेयांसमति समं क्राम ॥ २ ॥
प्रति तमभि चर योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मः । आप्नुहि श्रेयांसमति समं क्राम ॥ ३ ॥
सूरिरसि वर्चोधा असि तनूपानोऽसि । आप्नुहि श्रेयांसमति समं क्राम ॥ ४ ॥
शुक्रोऽसि भ्राजोऽसि स्वरसि ज्योतिरसि । आप्नुहि श्रेयांसमति समं क्राम ॥ ५ ॥

अर्थ— (**दूष्याः दूषिः असि**) दोषांना दूषित करणारा म्हणजे दोषांचें दोषितपण दूर करणारा तूं आहेस. (**हेत्याः हेतिः असि**) शस्त्राचें शस्त्र तूं आहेस. (**मेन्याः मेनिः असि**) वज्राचें वज्र तूं आहेस. (**श्रेयांसं आप्नुहि**) परम कल्याण तूं प्राप्त कर आणि (**समं अति क्राम**) तुझ्यासारखे असतील त्यांच्या पुढें जा. (१) (**स्रक्त्यः असि**) तूं गतिशील आहेस, (**प्रतिसरः असि**) तूं पुढें जाणारा आहेस, (**प्रत्यभिचरणः असि**) तूं दुष्टांवर हल्ला करणारा आहेस. (२) (**तं प्रति अभिचर**) त्याच्यावर तूं चढाई कर कीं (**यः अस्मान् द्वेष्टि**) जो एकटा आम्हां सर्वांचा द्वेष करणारा आहे, आणि (**यं वयं द्विष्मः**) ज्या एकट्याचा आम्ही सर्व द्वेष करतों. (३) (**सूरिः असि**) तूं ज्ञानी आहेस (**वर्चोधाः असि**) तूं तेजास धारण करणारा आहेस, (**तनूपानः असि**) शरीराचा रक्षक सुद्धां तूंच आहेस. (४) (**शुक्रः असि**) तूं वीर्यवान् अथवा शुद्ध आहेस (**भ्राजः असि**) तूं तेजस्वी आहेस (**स्वः असि**) तूं आत्मिक शक्तींनीं युक्त आहेस. (**ज्योतिः असि**) तूं तेजस्वरूप आहेस; यासाठीं तूं श्रेय प्राप्त कर आणि जे तुझ्यासमान आहेत त्यांच्या पुढें जा. (५)

भावार्थ— आत्मा दोषांचे दोष दूर करणारा आहे. तोच शस्त्रांत महान् शस्त्र आणि अस्त्रांत महान् अस्त्र आहे. (१) आत्मा प्रगति करणारा आहे. पुढें जाण्याचा त्याचा स्वभाव आहे व दुष्टतेला तो दूर करतो. (२) जो दुष्ट एकटा सर्व सज्जनांचा द्वेष करतो आणि ज्या एका दुष्टाचा सर्व सज्जन द्वेष करतात, त्यास तूं दूर कर. (३) तूं ज्ञानी आहेस, तेजास धारण करणारा आहेस, शरीराचा खरा रक्षक आहेस. (४) तूंच बलवान् आहेस, तूंच तेज आहेस, त्याचप्रमाणें आत्मिक बलयुक्त आहेस. तूं स्वतः प्रकाशरूप आहेस, त्यामुळें तुझ्यासमान जे लोक असतील त्यांच्यापुढें तूं जा आणि निःश्रेयस म्हणजे मुक्ति प्राप्त कर. (५)

आत्म्याचे गुण

शरीरांत आत्म्याचें कार्य

सगुणात्मक शरीरांत निर्गुण निराकार आत्म्याचे गुण प्रत्यक्षांत आणण्याचा उपदेश या सूक्तांत केला आहे. आतां हे गुण कोणते तें पहा —

(१) **दूष्याः दूषिः असि—** दोषांना दोष देणारा अर्थात् दोषांस दूर करणारा (तूं) आहेस. स्वतःच्या शरीरांतच याचा अनुभव घेऊन पहा. आपलें शरीर मलयुक्त असतांहि त्यास स्वच्छ आणि जिवंत ठेवतो, आणि त्याचें त्यानें नंदनवन बनविलें आहे.

सडणाऱ्या शरीरास सडूं न देणारा, मरणाऱ्या शरीरास मरूं न देणारा म्हणजे जिवंत ठेवणारा, दोषमय शरीरानेंहि आनंदधाम प्राप्त करणारा आत्मा आहे. (मं. १)

(२) **हेत्याः हेतिः मेन्याः मेनिः असि—** शस्त्रांतील शस्त्र आणि वज्रांतील वज्र असा हा आत्मा आहे. शत्रूंचा नाश शस्त्र करतें, पण शस्त्र चालविणारा म्हणजेच शस्त्राचें शस्त्ररूप हा आत्मा नसला तर तें शस्त्र शत्रूंचा नाश कसें करील ?

यामुळें आत्म्याच्या प्रेरक शक्तीच्या महत्त्वाचें ज्ञान होऊं शकतें. (मं. १)

(३) **सत्यः असि**- आत्मा गतिमान् आहे. '**अत— सातत्यगमने**' (सतत गति करणें) या धातुवरून आत्मा शब्द झाला आहे. सतत प्रयत्नशीलतेचा तो द्योतक आहे. तोच भाव या शब्दांत आहे. लहान मुलांत काय किंवा मोठ्या मनुष्यांत काय सतत प्रयत्नशीलता (धडपड) तर पहावयास सांपडतेच. कोणींहि मुकाट्यानें हात जोडून स्वस्थ बसूं इच्छित नाहीं. उद्योगानें स्वतःची उन्नति करून घेण्याची इच्छा प्रत्येक प्राण्यांत स्पष्ट दिसते. (मं. २)

(४) **प्रतिसरः असि**- पुढें जाणारा, शत्रूंवर हल्ला करून त्यास दूर करणारा, स्वतःचा अभ्युदय करणारा आहे. आत्मा ' इंद्र ' आहे आणि तो सर्वदा स्वतःच्या शत्रूंचा पराभव करतो. (मं. २)

(५) **प्रत्यभिचरणः असि**- दुष्ट शत्रूंना हरविणारा तो आहे. (हा शब्दहि वरील शब्दाच्या अर्थाचाच आहे.) (मं. २)

येथपावेतों या दोन मंत्रांतील या पांच शब्दांनीं आत्म्याच्या ज्या गुणांचें वर्णन केलें आहे, त्यांचा संबंध बाहेरच्या शत्रूंशीं आहे. आतां आत्म्याच्या आंतरिक स्वतःच्या गुणांचें वर्णन चौथ्या आणि पांचव्या मंत्रांत केलें आहे—

(६) **सूरिः असि**- तूं ज्ञानी आहेस. आत्मा चित्स्वरूप असल्यानें ज्ञानवान् आहे, म्हणून त्याच्याबद्दल हा शब्दप्रयोग केला आहे. (मं. ४)

(७) **वर्चो-धाः असि**- तेज, बल, ओज इत्यादि धारण करणारा आहेस. शरीरांत जोंपर्यंत आत्मा रहात आहे तोंपर्यंतच तेज, बल, ओज इत्यादि रहातात, हें तर प्रत्येकास माहित आहेच. (मं. ४)

(८) **तनूपानः असि**- शरीराचा रक्षक आहेस. जोंपर्यंत आत्म्याचें वास्तव्य या शरीरांत असतें, तोंपर्यंत शरीराचें रक्षण उत्तम होतें. जेव्हां आत्मा या शरीरांतून निघून जातो तेव्हां शरीर सडूं लागतें. यावरून स्पष्ट होतें कीं आत्मा हाच शरीराचा रक्षक आहे. (मं. ४)

(९) **शुक्रः असि**- वीर्यवान्, बलवान् आणि शुद्ध आहेस. आत्म्यालाच ' शुक्र ' (यजु. ४०।८) म्हटलें आहे. तेव्हां त्याचें जास्त विवरण करण्याची जरूरी नाहीं. (मं. ५)

(१०) **भ्राजः असि**- तेजस्वी आहेस म्हणजे दुसऱ्यास प्रकाश देणारा आहेस. आत्मा सर्वांचा प्रकाशक आहे. तो मध्यें राहून सर्वांस तेजस्वी बनवितो. (मं. ५)

(११) **स्वः असि**-आत्मिक बलानें युक्त आहेस. (**स्व+र्**) स्वतःच्या बलानें युक्त म्हणजेच स्वतः प्रकाशरूप आहेस. (मं. ५)

(१२) **ज्योतिः असि**- स्वतः ज्योति आहेस. प्रकाश स्वरूप आहेस. (मं. ५)

हे सर्व शब्द आत्म्याचा स्वभावधर्म दाखवितात. मनुष्य आपल्या स्वतःस अत्यंत निर्बल, अशक्त आणि पूर्ण परावलंबी समजतो, आणि अज्ञानामुळें त्यास तसा अनुभवहि येतो. या सूक्तांत आत्म्याचे स्वभाव गुणधर्म सांगितले आहेत. त्यांचा विचार केला तर साधकास निश्चित समजून येईल कीं आत्मा निर्बल नाहीं, त्याच्यांत सुद्धां परमात्म्यासारखेच प्रभावशाली गुणधर्म आहेत. हा आत्मा ज्ञानी, पुरुषार्थी, प्रयत्नशील, स्वयं ज्योति, प्रभावशाली, बलवान् आणि शरीराचा रक्षक आहे. त्यामुळें आपल्या स्वतःस नेहमीं अशक्त अथवा निर्बल समजणें योग्य नाहीं. जरी हा लहान असला तरी त्याच्या विकासाची मर्यादा फार मोठी आहे.

ज्यावेळीं आपल्या मनांत निर्बलतेची भावना जागृत होते त्यावेळीं साधक जर या सूक्तानें मनन करील आणि या शब्दांतील भाव स्वतःमध्यें पहाण्याचा प्रयत्न करील तर त्याची मानसिक निर्बलता दूर होईल; आणि तो या सूक्ताच्या बलानें निःसंदेह निःश्रेयस अभ्युदय प्राप्त करण्यास योग्य रीतीनें बलवान् होईल. आत्मशक्तीचें वर्णन करणारीं जीं अनेक सूक्तें आहेत त्यांत हें सूक्त महत्त्वाचें आहे. हें अत्यंत सरळ आणि भावपूर्ण असल्यानें तें पुष्कळ मनन करण्यायोग्य आहे. हें सूक्त निर्बलास सुद्धां बलवान् करील.

चौथ्या मंत्रांत सांगितलें आहे कीं, ' जो अनेकांस त्रास देतो अशा शत्रूस दूर कर. ' या मंत्रांत विचार करण्यासारखी एक गोष्ट अशी आहे कीं शत्रुत्व करणारा एक आहे, त्रास देणारा एकटा आहे आणि त्रास दिले गेलेले अनेक आहेत. अल्पसंख्यांकांकडून बहुसंख्यांकास कष्ट पोंहोचण्याची कल्पना यांत आहे. अशाप्रसंगीं अशा शत्रूस दूर करणेंच योग्य होईल. जो दुष्ट अनेक सज्जनांस त्रासवितो तो दंड देण्यास योग्यच होय.

श्रेयःप्राप्ति

या सूक्तांतील प्रत्येक मंत्राचा द्वितीय चरण एकच आहे. तो असा—

आप्नुहि श्रेयांसं अतिसमं अतिक्राम॥ (मं. १-५)

' तुझ्या समान जे लोक असतील त्यांच्यापुढें जा आणि परम कल्याण प्राप्त करून घे. ' या वाक्याचें हें सार आहे. ' श्रेय प्राप्त कर ' हें तर वैदिक धर्माचें मुख्य ध्येय आहे. मुक्ति, मोक्ष, निर्वाण, श्रेय, निःश्रेयस इत्यादि शब्द एकच भाव दाखवितात. वैदिक धर्मानें हें एकच ध्येय सर्वांसमोर ठेविलें आहे. या ध्येयाची

सिद्धि प्राप्त होण्यास या सूक्तांत आत्म्याच्या गुणांचें वर्णन उपासकांना दिलें आहे. या गुणांचें मनन करतां करतां आत्मा उन्नतीच्या मार्गानें प्रगति करतो आणि निश्चितपणें निःश्रेयसापर्यंत पोंहोचतो. याचा मार्ग याप्रमाणें आहे—

उन्नतीचा मार्ग

याच्या उन्नतीचा मार्ग एकाच वाक्यांत दर्शविला आहे, तें चिरस्मरणीय वाक्य असें—

समं अतिक्राम (मं. १–५)

' स्वतःच्या समान योग्यतेच्या लोकांच्याहि पुढें जा, ' हा मार्ग आहे. जर तो प्रथम श्रेणींत शिकत असेल तर त्याच्या मनांत मीं या लोकांपुढें (द्वितीय श्रेणींत) कसा आणि केव्हां जाईन असे विचार आले पाहिजेत. जेव्हां तो दुसऱ्या श्रेणींत जाईल तेव्हांहि असेच विचार असले पाहिजेत, कीं या द्वितीय श्रेणींतील लोकांपुढें मीं कसा आणि केव्हां जाईन ? याप्रमाणें स्वतःच्या श्रेणीपेक्षां पुढें जात त्यानें स्वतःच्या उन्नतीची साधना करावी—

स्वतःच्या उन्नतिसाठीं साधन प्राप्त करणें हें तर प्रत्येकास जरुरीचें आहे, परंतु त्यासाठीं स्वतःच्या श्रेणींतील इतरांपेक्षां पुढें जाण्याचें ध्येय लक्षांत ठेवणें योग्य आहे. प्रथम श्रेणींतील मनुष्यानें प्रथम (अथवा दशम) श्रेणींतील इतरांचें पुढें जाण्याची महत्त्वाकांक्षा जरुर बाळगावी; परंतु त्याचवेळीं दहाव्या श्रेणीच्या पुढें जाण्याच्या स्वतःच्या विचारामुळें प्रथम श्रेणींचीं कर्तव्यें विसरूं नयेत. प्रायः असंभव ध्येय समोर ठेऊन लोक स्वकर्तव्यापासून वंचित रहातात, असें कोणीं न करावें, या उद्देशानेंच हा मंत्र सांगितला आहे कीं अंतिम साध्य कोणतेंहि असो त्याचा विचार न करतां, त्या त्यावेळीं ज्या श्रेणींत तुम्हीं आहांत त्या श्रेणींतच स्थिर होऊन त्यासमयीं तुमचीं जीं कर्तव्यें असतील तीं दक्षतेनें पार पाडा. या प्रकारें वर्तन केल्यानें सर्वांची यथायोग्य उन्नति होत राहील आणि यथासमय सर्वच उन्नतीच्या परम सोपानावर जाऊन पोहोंचतील.

परंतु स्वतःच्या श्रेणीपेक्षां भिन्न श्रेणींतील मनुष्याशीं स्पर्धा करणाऱ्या मनुष्यास सिद्धि मिळणें कठीण तर खरेंच; इतकेंच नव्हे तर कित्येक वेळां त्याची अवनति होण्याचा अधिक संभव आहे. जर एक लहान मूल स्वतःच्या वयाच्या मुलांबरोबर कुस्ती करणें सोडून एकाद्या मोठ्या मल्लाबरोबर कुस्ती करण्यास जाईल तर त्यास त्यांत सिद्धि तर मिळणार नाहींच पण त्याची उन्नति सुद्धां होणार नाहीं. परंतु क्रमशः स्वतःच्या वयाच्या मुलांशीं कुस्ती करतां करतां तो स्वतः मोठा पहेलवान नक्की होऊं शकेल. याचप्रमाणें दुसऱ्या विषयांत सुद्धां समजावें. मुक्तीचा मार्गहि याच क्रमानें जास्त सुरक्षित आहे.

साधकानें या गोष्टीचा जास्त विचार करावा. उन्नतीच्या मार्गाचा हा उपदेश सर्वांस सर्वदा मनन करण्यास योग्य आहे असें आमचें मत आहे. स्वतःची अधोगति न होऊं देतां क्रमशः उन्नतीची प्राप्ति याच मार्गानें निःसंदेह साध्य होईल.

दिव्य दृष्टि

कांड ४, सूक्त २०

(ऋषिः– मातृनामा । देवता– मातृनामा)

आ पश्यति प्रति पश्यति परा पश्यति पश्यति । दिवमन्तरिक्षमाद्भूमिं सर्वं तद्देवि पश्यति ॥ १ ॥
तिस्रो दिवस्तिस्रः पृथिवीः षट् चेमाः प्रदिशः पृथक् । त्वयाहं सर्वा भूतानि पश्यानि देव्योषधे॥२॥

अर्थ— हे (देवि) दिव्यदृष्टीचे देवी ! तूं (तत् आपश्यति) तें सर्व तूं प्रत्यक्ष पहातेस (प्रति पश्यति) प्रत्येक वस्तूस पहातेस, (परा पश्यति) दुरून पहातेस (पश्यति) आणि पहातेस. (दिवं अन्तरिक्षं आत् भूमिं) द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वीस (सर्वं पश्यति) म्हणजेच या सर्वांस तूं पहातेस. (१)

हे (देवि) दिव्य औषधे ! (तिस्रः दिवः तिस्रः पृथिवीः) तीन द्युलोक आणि तीन पृथ्वी लोक (इमाः च पृथक् षट् प्रदिशः) आणि वेगळ्या या सहा प्रदिशा आणि (सर्वा भूतानि) सर्व भूतमात्र या सर्वांस (अहं त्वया पश्यामि) मीं तुझ्या सामर्थ्यानें पहातों. (२)

भावार्थ— हे दिव्यदृष्टि ! तुझ्या कृपेनें चारी बाजूंस पहातां येतें आणि या तीनहि लोकांतर्गत राहिलेल्या सर्व पदार्थांचें ज्ञान प्राप्त होऊं शकतें. (१)

या औषधिप्रयोगानें दृष्टि उत्तम होते आणि त्याच्यामुळें त्रिलोक, सर्व दिशा आणि सर्व भूतें इत्यादिकें ज्ञान प्राप्त होऊं शकतें. (२)

*

दिव्यस्य सुपर्णस्य तस्य हासि कनीनिका। सा भूमिमा रुरोहिथ वह्यं श्रान्ता वधूरिव ॥ ३ ॥
तां मे सहस्राक्षो देवो दक्षिणे हस्त आ दधत्। तयाहं सर्वं पश्यामि यश्च शूद्र उतार्यः ॥ ४ ॥
आविष्कृणुष्व रूपाणि मात्मानमप गूहथाः। अथो सहस्रचक्षो त्वं प्रति पश्याः किमीदिनः ॥ ५ ॥
दर्शय मा यातुधानान्दर्शय यातुधान्यः। पिशाचान्त्सर्वान्दर्शयेति त्वा रभ ओषधे ॥ ६ ॥
कश्यपस्य चक्षुरसि शुन्याश्च चतुरक्ष्याः। वीध्रे सूर्यमिव सर्पन्तं मा पिशाचं तिरस्करः ॥ ७ ॥
उदग्रभं परिपाणाद्यातुधानं किमीदिनम्। तेनाहं सर्वं पश्याम्युत शूद्रमुतार्यम् ॥ ८ ॥

अर्थ— (तस्य दिव्यस्य सुपर्णस्य) त्या दिव्य सूर्याची (कनीनिका ह आसि) लहान प्रतिमा तूं आहेस. (सा) ती तूं (भूमिं आरोहिथ) भूमीवर आली आहेस (श्रान्ता वधूः वह्यं इव) ज्याप्रमाणें थकलेली कुलवधू रथांत बसते. (३)

(सहस्राक्षः देवः तां मे दक्षिणे हस्ते आदधत्) सहस्र नेत्र असणाऱ्या सूर्यानें ती दृष्टि माझ्या उजव्या हातांत ठेविली आहे, (तया अहं सर्वं पश्यामि) तिच्या योगें मीं सर्व पहातों. (यः च शूद्रः उत आर्यः) जो शूद्र आहे, आणि जो आर्य आहे. (४)

(रूपाणि आविष्कृणुष्व) रूपांस प्रगट कर (आत्मानं मा अप गूहथाः) स्वतःस लपवून ठेवूं नकोस (अथो) आणि हे (सहस्र-चक्षो) हजार डोळयांच्या देवा ! (त्वं किमीदिनः प्रति पश्याः) तूं आतां मीं काय भोगावें असें म्हणणाऱ्यास पहा. (५)

(मा यातुधानान् दर्शय) जे दुःख देणारे आहेत ते मला दाखव (यातुधान्यः दर्शय) पीडकवृत्ति दाखव. हे औषधे ! तूं (सर्वान् पिशाचान् दर्शय) सर्व रक्त पिणारांना दाखव (इति त्वा आरभे) यासाठीं मीं तुझें सहाय्य घेत आहें. (६)

(कश्यपस्य चक्षुः असि) तूं द्रष्ट्याचा नेत्र आहेस (चतुरक्ष्याः शुन्याः च) चार डोळयांच्या कुतरीचाहि तूं डोळा आहेस (वीध्रे सर्पन्तं सूर्यं इव) आकाशांत चालणाऱ्या सूर्यासमान (पिशाचं मा तिरस्करः) रक्त पिणाऱ्यांस लपूं देऊं नकोस. (७)

(किमीदिनं यातुधानं) आज कोणता भोग भोगावयाचा असें म्हणणाऱ्या यातना देणाऱ्या दुष्टांस (परि-पाणाद् उदग्रभं) रक्षणानें मीं पकडून ठेवलें आहे (तेन) त्यामुळें (अहं सर्वं पश्यामि) मीं सर्व पहातों. (उत शूद्रं उत आर्यं) कोण शूद्र आणि कोण आर्य आहे. (८)

भावार्थ— आमचे डोळे जणूं सूर्याची लहानशी प्रतिमाच आहेत. ज्याप्रमाणें कुलवधु थकून गेल्यामुळें रथांत बसते त्याप्रमाणें ही नेत्ररूपी कुलवधु या शरीररूपी रथांत येऊन बसली आहे. (३)

सूर्य देवानें ही दर्शनशक्ति मला दिली आहे. त्यामुळें मीं सर्व पाहूं शकतों आणि कोण श्रेष्ठ आहे आणि कोण दुष्ट आहे तें सुद्धां जाणूं शकतों. (४)

दिव्य दृष्टिमुळें सर्व रूपांचा प्रकाश मला दिसतो. कोणी सुद्धां त्यापासून लपून राहूं शकत नाहीं. स्वतःच्या स्वार्थी भोगासाठीं कोणता दुष्ट दुसऱ्यांस कष्ट देतो त्याचीहि माहिती होते. (५)

कष्ट देणारा कोण आहे, त्याचे सहाय्यकर्ते कोण आहेत, दुसऱ्यांचें रक्त शोषण करणारे कोण आहेत, ते सर्व त्याच्यामुळें मला माहित व्हावें. (६)

खरा द्रष्टा आत्मा आहे. तो डोळ्यांनीं पहातो. तो चार विभागांत कार्य करणाऱ्या बुद्धीचा सुद्धां नेत्र आहे. (७)

मीं माझ्या रक्षणाचा बंदोबस्त असा केला आहे कीं जो कोणीं स्वार्थी भोगतृष्णेसाठीं दुसऱ्यांस कष्ट देतो त्याचा पत्ता मला मिळावा. त्यामुळें श्रेष्ठ आणि दुष्ट यां दोघांस मीं यथावत् जाणतों. (८)

यो अन्तरिक्षेण पतति दिवं यश्चातिसर्पति । भूमिं यो मन्यते नाथं तं पिशाचं प्र दर्शय ॥ ९ ॥

अर्थ— (यः अन्तरिक्षेण पतति) जो अंतरिक्षांत चालतो (यः च दिवं अति सर्पति) आणि जो द्युलोकाचे ही पलीकडे जातो (तं पिशाचं प्रदर्शय) त्या रुधिरांत सुद्धां जाणाऱ्यास दाखव. (भूमिं यो मन्यते नाथं) जो भूमिचाही नाथ आहे. (९)

भावार्थ— शेवटीं जो अंतरिक्षांत चालतो, जो द्युलोकाचें उल्लंघन करतो आणि भूमीचाहि जो नाथ आहे, त्याचें दर्शनही या दृष्टीनें होतें. (९)

दिव्यदृष्टि

मातृनाम्नी औषधि

संस्कृतांत माता नांवाच्या औषधि अनेक आहेत, त्यांपैकीं 'आखुकर्णी, महाश्रावणिका आणि घृतकुमारी या तीन दृष्टिदोषांचें निवारण करणाऱ्या प्रसिद्ध आहेत—

संस्कृत नांव	मराठी नांव	गुण
१ आखुकर्णी	कोहळा (वै. निघं)	चक्षुष्या (डोळ्यांचें तेज वाढविणारी)
२ महाश्रावणिका	(रा. नि. व. ५)	लोचनी (डोळ्यांचें तेज वाढविणारी)
३ घृतकुमारी	भा.	नेत्र्या (डोळ्यांचें तेज वाढविणारी)

या तीन औषधींचें नांव माता आहे, आणि या तीनहि औषधी डोळ्यासाठीं मोठ्या हितकारक आहेत. येथें या सूक्तांत या तीनींपैकीं कोणती औषधी उल्लेखिली आहे तें नक्की करण्याचें काम चांगल्या वैद्यांचें आहे. या औषधीच्या प्रयोगानें नेत्राचें बल वाढवून अति वृद्धावस्थेपर्यंत डोळ्यांस उत्तम कार्य करण्याच्या योग्य स्थितींत ठेवणें हें अनुष्ठानी मनुष्यास शक्य आहे. येथें 'माता' आणि 'मातृनाम्नी' या दोहोंचाही एकच अर्थ आहे.

पहिल्या दोन मंत्रांत या 'माता' औषधीचें आणि 'दर्शन-शक्ती'चें वर्णन आहे. दृष्टीनें सर्व पहाणें शक्य आहे. या औषधीनें दृष्टि बलवान् होते. त्यामुळें या औषधींच्या कृपेनें जणूं काय आम्ही सर्व पाहूं शकतों.

तिसऱ्या मंत्रांत आमची दृष्टि सूर्याची पुत्री आहे, असें म्हटलें आहे. तिचें लग्न आमच्या आत्म्याशीं लागलें आहे. ती येथें स्वतःच्या पतीच्या घरीं या जीवात्म्याच्या शरीररूपीं घरांत दाखल झाली आहे. येथें सासरीं येऊन पुष्कळ कामें केल्यानें ती थकून गेली आहे. थकून गेल्यानें ती आतां आराम (विश्रांती) करीत आहे; म्हणजे वृद्धावस्थेंत दृष्टि मंद झाली आहे. अशावेळीं या 'माता' औषधीच्या प्रयोगानें ती थकून गेलेली दृष्टि पुनः पूर्ववत् तरुणीप्रमाणें होते.

चौथ्या मंत्रांत म्हटलें आहे कीं, सहस्राक्ष अशा सूर्यदेवानें आम्हांस ही दृष्टि दिली आहे. तिच्यामुळें सर्व कांहीं पहातां येते. येथें स्थूल वस्तूंच्या दर्शनापेक्षां जास्त कांहीं पहाणें असा भाव आहे– ज्याप्रमाणें 'आर्य आणि शूद्रतेचें' ज्ञान सुद्धां प्राप्त करून घेणें. कोणता मनुष्य श्रेष्ठ आहे आणि कोणता दुष्ट आहे हें ज्ञान त्याच्या बाह्य आचरणावरून होऊं शकतें, असा येथें अर्थ आहे. वेदांनीं येथें स्थूल दृष्टीनें पहात असतां सूक्ष्मतेनें जाणण्याची सूचना केली आहे. पांचव्या आणि सहाव्या मंत्रांचा असाच आशय आहे. सहाव्या मंत्राचें तर स्पष्ट सांगणें आहे कीं 'दृष्टि ही वस्तुतः आत्म्याचा डोळाच आहे.' म्हणजे शरीरांत 'द्रष्टा' म्हणजे आपला जीवात्माच आहे. तोच या डोळारूपी बारींतून सर्व पदार्थ पहातो. त्यामुळें असें म्हणतां येईल कीं खरी दृष्टि तर त्या जीवात्म्याजवळच आहे, आणि डोळा ही फक्त बारी आहे. म्हणूनच या मंत्रांत म्हटलें आहे कीं आत्म्याची अंतर्दृष्टि हीच खरी दृष्टि (नेत्र) होय आणि ती उघडली पाहिजे. जीवात्म्याचें नांव 'कश्यप' अथवा 'पश्यक' आहे.

कारण तोच पाहणारा आहे. त्याच्याजवळ 'चार डोळ्यांची कुत्री' आहे; म्हणजे ती कुत्रीच या शरीररूपीं अध्यात्मक्षेत्राचें रक्षणकार्य करते. ही चार डोळे असणारी कुत्री आमची बुद्धि आहे; आणि ती स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण या चारी भूमिका स्वतःच्या चार डोळ्यांनीं पहाते. या प्रत्येक क्षेत्रांत

पाहण्यासाठीं तिचे डोळे भिन्न आहेत. ते तीस सत्य ज्ञान देतात आणि कोणी शत्रु या स्थानांत घुसून जात असला तर त्यास अटकाव करून त्या जागेचें रक्षण करते. जोपर्यंतही चार डोळे असणारी कुत्री जागी आहे तोपर्यंत या स्थानीं सूर्यप्रकाशासारखा तेजस्वी प्रकाश असतो. त्या प्रकाशांत जीवात्मा स्वतःच्या घातक वैऱ्यांना दूर करून स्वतःच्या उन्नतीच्या मार्गानें आगेकूच करतो. येथें सातव्या मंत्रांत दृष्टीचीं चार क्षेत्रें दाखविलीं आहेत; आणि असें सूचित केलें आहे कीं फक्त स्थूल डोळे उघडून चालणार नाहीं परंतु हे चार विभिन्न निरनिराळे डोळे उघडण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि तेथील परिस्थिति पहाण्याची शक्ति उत्पन्न केली पाहिजे. स्थूल दृष्टिपेक्षां येथील दृष्टि फारच सूक्ष्म आहे आणि अत्यंत सूक्ष्म गोष्टी ती पाहूं शकते.

आठव्या मंत्रांत उपदेश केला आहे कीं पूर्वोक्त चार क्षेत्रांत (परी-पाण) सुरक्षणाची अशी व्यवस्था करावयास हवी कीं कोणी घातक दुष्ट तेथें शिरला असला तर त्यास पकडून एकदम दूर करतां यावा. कोणत्याही वेळीं अथवा कोणत्याहि कारणानें घातक दुष्ट भाववाल्यांना स्वतःच्या या स्थूल, सूक्ष्म, अथवा कारण इत्यादि शरीरांत प्रवेश करूं देऊं नये. जो मनुष्य स्वतःच्या कार्यक्षेत्रांत संपूर्ण सुरक्षणाची व्यवस्था करतो तोच उन्नत बनतो. इतरांचें अधःपतन होतें.

शेवटच्या मंत्रांत सांगितलें आहे कीं ' जो प्रत्येक पदार्थमात्राचे ठायीं विचरतो, जो द्युलोकाच्याही पलिकडे आहे आणि जो या भूमीचा एकमेव स्वामी आहे त्यास पहा. ' त्यास पहाणें हें अंतिम दर्शन आहे. या परमात्म्याचें दर्शन करणें म्हणजे अंतिम वस्तूचें दर्शन करण्यासारखें आहे. त्याचें नांव ' पिशाच ' असें सांगितलें आहे, **' पिशित्+अश्न '** म्हणजे रक्ताच्या प्रत्येक कणांत जाऊन पोहोंचलेला आहे. प्रत्येक पदार्थाच्या कणाकणांतून जो पसरलेला आहे, त्यास न्याहाळलें पाहिजे. ज्यावेळीं त्याचें दर्शन होतें त्या वेळीं मनुष्याची अंतिम दृष्टि उघडते आणि मनुष्य दिव्यदृष्टि होऊन जातो. त्या परमात्म्यास प्रत्यक्ष करणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्य आहे. हें अनुष्ठान केलेंच पाहिजे. ज्यावेळीं अंतरीं पवित्रता उत्पन्न होईल तेव्हां त्याचें दर्शन होईल.

वेदानें येथें स्थूल पदार्थ दाखवितां दाखवितां सूक्ष्म आणि सूक्ष्मतम परमात्म्याचें दर्शन घडविण्याची कशी सुंदर युक्ति योजिली आहे ती साधकानें अवश्य ध्यानीं आणावी. स्थूल नेत्रेंद्रियाचें बळ वाढविणारी ' माता ' नांवाची औषधि आंतरिक नेत्राची शक्ति वाढविणारी ' औषधि ' सुद्धां आहे. परंतु येथें **' ओष+धी '** दोषांस धुवून अंतःकरणास शुद्ध करणारी औषधि असा सांकेतिक अर्थ आहे. या प्रकारचा अर्थाचा श्लेष अर्थ लक्षांत घेऊन आणि त्याचें मनन करून साधकानें या सूक्ताचा उपदेश जाणावा.

आत्मिक बल

कांड ५, सूक्त ९

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- वास्तोष्पतिः, आत्मा)

दिवे स्वाहा ॥ १ ॥ पृथिव्यै स्वाहा ॥ २ ॥ अन्तरिक्षाय स्वाहा ॥ ३ ॥
अन्तरिक्षाय स्वाहा ॥ ४ ॥ दिवे स्वाहा ॥ ५ ॥ पृथिव्यै स्वाहा ॥ ६ ॥
सूर्यो मे चक्षुर्वातः प्राणोऽन्तरिक्षमात्मा पृथिवी शरीरम् ।
अस्तृतो नामाहमयमस्मि स आत्मानं नि दधे द्यावापृथिवीभ्यां गोपीथाय ॥ ७ ॥

अर्थ— (दिवे) द्युलोक (अन्तरिक्षाय) अन्तरिक्ष आणि (पृथिव्यै) पृथ्वी लोकासाठीं (स्वाहा = सु+आह) उत्तम स्तुति वचनें बोलतों. (१-६)

(सूर्यः मे चक्षुः) सूर्य माझा डोळा आहे. (वातः प्राणः) वायु प्राण आहे. (अन्तरिक्षं आत्मा) अंतरिक्ष आत्मा आहे, आणि (पृथिवी शरीरं) पृथ्वी माझें शरीर आहे. (अस्तृतः नाम अयं अहं अस्मि) अमर नांवाचा तो सुद्धां मीच आहें. (द्यावापृथिवीभ्यां गोपीथाय) द्यावा-पृथ्वीद्वारा सुरक्षित होण्यासाठीं (सः आत्मानं निदधे) तो मीं स्वतःस निःशेष अर्पण करीत आहें. (७)

भावार्थ— द्युलोक, अंतरिक्ष लोक आणि पृथ्वीलोक या तीनहि लोकांची आणि त्यांत विद्यमान पदार्थांची मी प्रशंसा करतों. (१-६)

उदायुरुद्बलमुत्कृतमुत्कृत्यामुन्मनीषामुदिन्द्रियम् ।
आयुष्कृदायुष्पत्नी स्वधावन्तौ गोपा मे स्तं गोपायतं मा ।
आत्मसदौ मे स्तं मा मा हिंसिष्टम् ॥ ८ ॥

अर्थ— माझें (आयुः उत्) आयुष्य उत्तम (बलं उत्) बल उत्तम (कृतं उत्) केलेलें कर्म उत्तम (कृत्यां उत्) कापण्याची शक्ति उत्तम (मनीषां उत्) बुद्धि उत्तम (इन्द्रियं उत्) इन्द्रियें उत्तम होवोत. (आयुष्कृत् आयुष्पत्नी) आयुष्याची वृद्धि करणारा आणि जीवनाचें पालन करणारा तसेंच (स्वधावन्तौ) स्वतःची धारणा शक्ति वाढविणारे तुम्हीं दोघे द्यावापृथिवी (मे गोपा स्तं) माझे रक्षक व्हा. (मा गोपायतं) माझें रक्षण करा. (मे आत्मसदौ स्तं) माझ्या आत्म्यांत राहणारे तुम्हीं व्हा. (मा मा हिंसिष्टम्) माझा कधीं सुद्धां विनाश करूं नका. (८)

भावार्थ— सूर्य माझे डोळे, वायु माझे प्राण, अंतरिक्ष माझें अंतःकरण आणि पृथ्वी माझें स्थूल शरीर बनलेली आहे. मी अमर आणि अदम्य आहें. द्युलोक आणि पृथ्वी लोक माझें रक्षण करतात. त्यामुळें मीं स्वतःला त्यांच्या स्वाधीन करतों. (७)

माझें आयुष्य, शक्ति, क्रियाशक्ति, कापण्याची शक्ति, मनन शक्ति, इंद्रिय शक्ति इत्यादि उत्तम अवस्थेंत राहोत. आयुष्य देणारी आणि जीवनाचें पालन करणारी, तसेंच धारणा शक्तीनें युक्त दोन्ही द्यावा पृथ्वी आहेत, त्या माझें रक्षण करोत. त्या दोघीं माझ्या अंतरांत राहून माझें रक्षण करोत आणि माझ्या शक्तीस कधींहि क्षीण होऊं न देवोत. (८)

आत्मिक बल

कांड ५, सूक्त १०

(ऋषिः— ब्रह्मा । देवता— वास्तोष्पतिः)

अश्मवर्म मेऽसि यो मा प्राच्या दिशोऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ १ ॥
अश्मवर्म मेऽसि यो मा दक्षिणाया दिशोऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ २ ॥
अश्मवर्म मेऽसि यो मा प्रतीच्या दिशोऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ ३ ॥
अश्मवर्म मेऽसि यो मोदीच्या दिशोऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ ४ ॥
अश्मवर्म मेऽसि यो मा ध्रुवाया दिशोऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ ५ ॥
अश्मवर्म मेऽसि यो मोर्ध्वाया दिशोऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ ६ ॥
अश्मवर्म मेऽसि यो मा दिशामन्तर्देशेभ्योऽघायुरभिदासात् । एतत्स ऋच्छात् ॥ ७ ॥

अर्थ— (मे अश्मवर्म असि) माझें दगडासारखें दृढ कवच तूंच आहेस (यः अघायुः) जो पापी (प्राच्याः दक्षिणायाः प्रतीच्याः उदीच्याः ध्रुवायाः दिशां अन्तर्देशेभ्यः) पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर, ध्रुव, ऊर्ध्व आणि या दिशांच्या मधील प्रदेशांनीं (मा अभि दासात्) माझा नाश करील, (सः एतत् ऋच्छात्) तो स्वतः या विनाशास प्राप्त होवो. (१-७)

भावार्थ— हें माझें कवच आहे. जे पापी सर्व दिशा-उपदिशांमधून मजवर हल्ला करून माझा नाश करूं इच्छितात, त्यांचा स्वतःचाच नाश होवो. (१-७)

बृहता मन उप ह्वये मातरिश्वना प्राणापानौ ।
सूर्याच्चक्षुरन्तरिक्षाच्छ्रोत्रं पृथिव्याः शरीरम् । सरस्वत्या वाचमुप ह्वयामहे मनोयुजा ॥ ८ ॥

अर्थ—(बृहता मन उपह्वये) महान् ज्ञानयुक्त मनाची मीं मागणी करतों (मातरिश्वना प्राणापानौ) वायूनें प्राण आणि अपान (सूर्यात् चक्षुः) सूर्यापासून नेत्र (अन्तरिक्षात् श्रोत्रं) अन्तरिक्षापासून कान (पृथिव्याः शरीरं) पृथ्वीपासून शरीर (मनोयुजा सरस्वत्या वाचं) मननयुक्त विद्येसह वाणीची (उपह्वयामहे) आम्ही मागणी करतों. (८)

भावार्थ— मला ज्ञानयुक्त मन, वायुपासून प्राण, सूर्यापासून डोळे, अंतरिक्षापासून कान, पृथ्वीपासून स्थूल शरीर आणि मननशक्तीनें युक्त अशा विद्येसह उत्तम वाणीची मीं इच्छा करतों. त्यांची मला प्राप्ति होवो. (८)

आत्मिक बल

आत्मिक शक्ति

आत्मिक शक्तीचा विकास करण्यासाठीं ज्या विशेष विचारांची धारणा आपल्या मनामध्यें होणें आवश्यक आहे, ती धारणा या दोन सूक्तांत सांगितली आहे. नवव्या आणि दहाव्या या दोन सूक्तांचे ऋषि ब्रह्मा आणि देवता वास्तोष्पति आहेत. म्हणजे या दोनही सूक्तांचे विषय एकच आहेत तेव्हां दोनहि सूक्तांचा विचार एकत्रच करूं.

नवव्या सूक्तांतील पहिले सहा मंत्र वस्तुतः तीनच असून, द्विवार म्हटल्यानें सहा आहेतसें वाटतें. पृथ्वी, अन्तरिक्ष आणि द्युलोक या तीनहि लोकासाठीं स्वाहा म्हणजे (सु+आह) उत्तम शब्द द्वारा प्रशंसा केली आहे. द्युलोकांत सूर्य, नक्षत्र इत्यादि आहेत. अंतरिक्षांत इंद्र, वायु, चंद्र, विद्युत् इत्यादि आहेत आणि पृथ्वीवर, धान्य, जल वगैरे अनंत पदार्थ आहेत. त्यांचा उपयोग मनुष्य करतो आणि सुखी होतो. या कारणामुळें या तीनहि लोकांतील अनंत पदार्थांची तसेंच त्या लोकांची मनुष्यानें प्रशंसा करावी हें योग्यच आहे. कारण त्यांच्याशिवाय मनुष्य जीवंत राहूं शकणार नाहीं; म्हणून ही प्रशंसा करणें योग्य होईल, यांत कांहीं शंका नाहीं.

या तीनहि लोकांत रहाणारे सर्व पदार्थ मनुष्यास उपकारक आहेत म्हणून मनुष्यानें त्यांची प्रशंसा करणें योग्य आहे, हें समजून ते पदार्थ आपल्या अंतरंगांतच आहेत असें पाहण्यास शिकलें पाहिजे. ते माझ्यामध्यें येऊन राहिले आहेत आणि माझ्या शक्तीला जास्त प्रकाशित करीत आहेत, असा भाव मनांत धारण करण्याचा उपदेश सातव्या मंत्रांत केला आहे. त्या मंत्राचा आशय असा आहे—

' सूर्य माझे डोळे आहेत, वायु माझा प्राण झाला आहे, अन्तरिक्ष लोक माझें अंतःकरण झाला आहे, पृथ्वी माझें स्थूल शरीर बनली आहे. ' (मं. ७) सातव्या मंत्रांत याप्रमाणें सांगितलें आहे. याप्रमाणें द्युलोकांतील सूर्य, अंतरिक्ष लोकांतील वायु आणि पृथ्वी लोकांतील पदार्थ अनुक्रमें माझे डोळे, प्राण आणि स्थूल शरीरांत येऊन राहिले आहेत. याप्रमाणें या तीन्ही लोकांशीं माझा सरळ संबंध जडला आहे. या तीनहि लोकांचे अंश येऊन माझ्यामध्यें (शरीरांत) राहिले आहेत, अथवा त्यांचा अवतार माझ्या शरीरांत झाला आहे. या गोष्टीचा विचार केल्यानें स्वतःच्या आत्मशक्तीची कल्पना सहज होईल. ही गोष्ट अथर्ववेदाच्या अन्य मंत्रांत सुद्धां सांगितली आहे. उदाहरणार्थ पहा—

सूर्यश्चक्षुर्वातः प्राणं पुरुषस्य वि भेजिरे ।
अथास्येतरमात्मानं देवाः प्रायच्छन्नग्नये ॥
अथ. ११।८।३१

' सूर्य आणि वायु हे क्रमशः पुरुषाचा डोळा आणि प्राण यांत अनुक्रमें विभक्त झाले आहेत, त्याचप्रमाणें इतर देवांनीं आत्मभागांना (शरीराच्या) दुसऱ्या भागांसाठीं दिले आहेत. ' म्हणून म्हटलें आहे—

तस्माद्वै विद्वान् पुरुषमिदं ब्रह्मेति मन्यते ।
सर्वा ह्यस्मिन्देवता गावो गोष्ठ इवासते ॥
अथर्व० ११।८।३२

' त्यामुळें ज्ञानी या पुरुषास ब्रह्म समजतो; कारण कीं सर्व देवता त्याच्या आंत अशा रीतीनें राहिलेल्या आहेत, जणूं काय

गोशाळेंत सर्व गायी रहातात. ' या मंत्रांत सर्व देव मनुष्याच्या शरीरांत विविध अवयवांत रहातात, असें सांगितलें आहे. पूर्वोक्त मंत्रांत कित्येक देवतांच्या स्थानांचें वर्णन आहे आणि या मंत्रांत सर्व देवता येथें राहतात असें सांगितलें आहे. म्हणून दुसऱ्या देवतांचीं स्थानें मननानें नक्की करतां येतील. हें मनन केल्यानंतर उपनिषदांत कित्येक दुसऱ्या देवतांच्या स्थानांचा सुद्धां निर्देश आहे, तो मनोरंजक असल्यानें आपण पाहूं—

अग्निर्वाग्भूत्वा मुखं प्राविशत्, वायुः प्राणो भूत्वा नासिके प्राविशत्, आदित्यश्चक्षुर्भूत्वाऽक्षिणी प्राविशत्, दिशः श्रोत्रं भूत्वा कर्णौ प्राविशन्, औषधिवनस्पतयो लोमानि भूत्वा त्वचं प्राविशन्, चंद्रमा मनो भूत्वा हृदयं प्राविशत्, मृत्युरपानो भूत्वा नाभिं प्राविशत्, आपो रेतो भूत्वा शिश्नं प्राविशन् ॥

(ऐ. उ. १।२।४)


' अग्नि वाणी होऊन मुखांत प्रवेशिला. वायु प्राण होऊन नाकांत शिरला. सूर्य डोळे होऊन नेत्रांत राहिला. दिशा कान होऊन श्रवणाच्या जागीं राहिल्या, औषधि आणि वनस्पति शरीरावरील केस होऊन शरीराच्या त्वचेंत शिरल्या. चंद्रमा मन होऊन हृदयांत शिरला. मृत्यु अपान होऊन नाभिस्थानीं राहिला. पाणी वीर्य होऊन शिश्नांत प्रवेशलें. ' याप्रमाणें निरनिराळ्या देवता निरनिराळ्या स्थानीं राहूं लागल्या. याप्रमाणें आपल्या शरीरांत देवतांचें वास्तव्य आहे, म्हणून त्यास ' देवांचें मंदिर ' म्हटलें आहे. बाह्य सृष्टींत मोठमोठे सूर्य वगैरे देव आहेत. त्यांचे अंश बीजरूपानें येथें आपल्या शरीरांत आले आहेत. या अंशांतूनच नंतर निरनिराळ्या मोठमोठ्या देवता झाल्या आहेत. या विषयीं खालील उपनिषद्वचन पहा—

मुखाद्वाग्वाचोऽग्निः...नासिकाभ्यां प्राणः प्राणाद्वायुः...अक्षिभ्यां चक्षुश्चक्षुष आदित्यः, कर्णाभ्यां श्रोत्रं श्रोत्राद्दिशः...त्वचो लोमानि लोमभ्यः औषधिवनस्पतयः,...हृदयान्मनः मनसश्चन्द्रमाः......नाभ्या अपानोऽपानान्मृत्युः, शिश्नाद्रेतो रेतस आपः ॥ ४ ॥ (ऐतरेय उ. १।१)

' मुखांतून वाणी, वाणींतून वाचा... नासिकेंतून प्राण, प्राणांतून वायु, डोळ्यांतून चक्षु, चक्षूंतून सूर्य, कानांतून श्रोत्र आणि श्रोत्रांतून दिशा,... त्वचेंतून लोम आणि रोमांतून औषधि आणि वनस्पति, हृदयांतून मन आणि मनांतून चंद्रमा, बेंबींतून अपान, अपानांतून मृत्यु, शिश्नांतून रेत आणि रेतांतून पाणी झालें. '

या दोन्ही वचनांची साधक जर तुलना करील तर त्याच्या ध्यानीं येईल कीं पहिल्यांत सर्व देवतांपासून आपल्या शरीरांत सूक्ष्म देव झाल्याचें वर्णन आहे, तर दुसऱ्यांत सूक्ष्म अंशांतून वृद्धि होऊन मागून मोठे देव झाल्याचें वर्णन आहे. उदा० मनुष्य शरीरांतून वीर्यबिन्दु निर्माण होतात आणि नंतर त्या बिंदूंतून पुनः मनुष्यशरीर होतें. त्याचप्रमाणें संकोच आणि विस्तार येथेंहि होतो. असतु.

मनुष्यांत सूर्यादि सर्व देवांच्या शक्ति आहेत, ही गोष्ट मनुष्यानें ध्यानांत ठेवावी. मीं कांहीं क्षुद्र नाहीं तर माझ्यांत परमात्म्याच्या सर्व शक्ति आहेत. फक्त माझ्या शक्ति अंशरूपें आहेत आणि त्याची शक्ति परिपूर्ण आहे. अर्थात् माझ्यामध्यें ज्या शक्ति आहेत त्यांचा विकास धर्मानुष्ठानानें होणार आहे, हा सातव्या मंत्राचा आशय आहे. हा मंत्र मनुष्यास एक प्रकारची विशिष्ट शक्ति देतो. साध-



कानें त्याचा अनुभव स्वतःच्या मनांत करावा. या शक्ति स्वतःमध्यें आहेत असें पाहिल्यानंतर म्हणण्यांत येतें कीं—

अयं अहं अस्तृतः नाम अस्मि । (मं. ७)

' मीं या अदम्य अथवा अमर शक्तींनें युक्त आहें. ' साधकानें या गोष्टीचा विचार करावा. माझ्यामध्यें एवढी शक्ति आहे आणि मीं अमर आहें. शरीर नाश पावल्यानें मीं नाश पावत नाहीं. ज्याप्रमाणें परमात्मा, **' अ-मर '** आहे त्याच प्रकारें आत्मदृष्टीनें मीहि **' अ-मर '** आहें, असा विश्वास या मंत्रांतून मिळतो. साधकास असा अनुभव येईल कीं हा विचार मनांत धारण केल्यानें आत्मिक बळ किति तरी वाढतें. वेदाचें शिक्षण आत्मिक बल वाढवितें, स्वतःच्या शक्तींचें ज्ञान करवितें. जेव्हां मनुष्य याप्रमाणें आत्मशक्तीचा अनुभव करतो तेव्हां सर्व जगासाठीं स्वतः स्वतःचें आत्मसमर्पण करतो—

आत्मानं द्यावापृथिवीभ्यां गोपीथाय निदधे । (मं. ७)

' मीं स्वतःला द्यावापृथिवीच्या रक्षणासाठीं समर्पित करतों. ' या प्रकारें सर्व जगत् त्याचें रक्षण करतें. जो सुरक्षित आहे तो सर्व विश्वांत निर्भय होऊन फिरतो. त्या निर्भयतेनें त्याची उन्नति होते आणि त्यानंतर तो जितकें अधिक आत्मसमर्पण करील तितकें जास्त बल त्यास प्राप्त होतें. यारीतीनें ' आयु, बल, शक्ति, कर्म, बुद्धि, इंद्रियें इत्यादि शक्तींनीं सर्वांपेक्षां श्रेष्ठ तो होतो. ' (मं. ८) तो त्याच्या शक्तीचा विकास आहे. या प्रकारें अन्न देणारे दोन्हीं लोक त्याचें पूर्ण रक्षण करतात. (मं. ८) हे लोक वस्तुतः—

मे आत्मसदौ स्तम् । (मं. ८)

' माझ्या आत्म्यांत रहाणारे आहेत. ' ही गोष्ट उपनिषद्-वचन द्वारां या पूर्वीं दाखविली आहे. आपल्या शरीरांत आत्म्याच्या आधारानें हें सर्व सूर्यादि पदार्थ अर्थात् तीनहि लोक रहातात. हे सर्व उन्नति करतात आणि धर्ममार्गानें चालणाराची कधीं अवनति होऊं देत नाहींत. या प्रकारें नवव्या सूक्ताचा विचार झाला. आतां दहाव्या सूक्ताचा विचार करूं—

दगडाचें कवच

दहाव्या सूक्ताच्या आरंभीं सात मंत्रांनीं ' दगडी कवचाचें ' वर्णन आलें आहे. पूर्वीं सांगितलेलें ज्ञानच मनुष्याचें ' दगडी कवच ' आहे. तें दगडाप्रमाणें दृढ आहे. त्यामुळें मनुष्य सुरक्षित होऊन उन्नति प्राप्त करूं शकतो. ' कोणत्याहि दिशेनें शत्रूनें हल्ला केला तरी ज्याच्या शरीरावर पूर्वोक्त ज्ञानरूपी कवच घातलेलें आहे तो नेहमीं सुरक्षितच असतो. ' (मं. १-७) हें या सात मंत्रांचें तात्पर्य आहे. जें ज्ञान दगडासारख्या सुदृढ कवचाप्रमाणें आहे तेंच आरंभीं सांगितलेलें ज्ञान या सूक्ताच्या आठव्या मंत्रांत पुनः सांगण्यांत आलें आहे—

' सूर्यापासून दृष्टि, अंतरिक्षापासून कान, पृथ्वीपासून शरीर, वायूपासून प्राणापान, समस्त शक्तींपासून मन आणि सरस्वतीपासून वाणी प्राप्त करतो. ' (मं. ८) या मंत्रांतहि पहिल्या सूत्रांतील ज्ञानच सांगितलें आहे; कारण हें मनुष्याचें रक्षक सुदृढ कवच आहे. साधकानें हें ज्ञान आत्मसात् करावें आणि निर्भय व्हावें.

मुक्तीचा सरळ मार्ग

कांड २, सूक्त ३४

(ऋषिः- अथर्वा । देवता- पशुपतिः)

य ईशे पशुपतिः पशूनां चतुष्पदामुत यो द्विपदाम् ।
निष्क्रीतः स यज्ञियं भागमेतु रायस्पोषा यजमानं सचन्ताम् ॥ १ ॥

अर्थ— (**यः पशुपतिः**) जो पशुपति (**यः द्विपदां उत चतुष्पदां ईशे**) द्विपाद आणि चतुष्पदांचा स्वामी आहे, (**सः निष्क्रीतः**) तो पूर्ण रीतीनें प्राप्त होतां होतां (**यज्ञियं भागं एतु**) यजनीय विभागास प्राप्त होवो. (**रायः पोषाः यजमानं सचन्ताम्**) धन आणि पुष्टि यज्ञ करणारास प्राप्त होवो. (१)

भावार्थ— जो द्विपाद आणि चतुष्पाद वगैरे प्राण्यांचा स्वामी एकच ईश्वर आहे, तो निःसंशय रीतीनें प्राप्त झाल्यावर पूजास्थानांत पूजा प्राप्त करतो, आणि त्याच्या कृपेनें सर्व प्रकारचें धन आणि पुष्टि उपासकांस प्राप्त होते. (१)

प्रमुञ्चन्तो भुवनस्य रेतो गातुं धत्त यजमानाय देवाः ।
उपाकृतं शशमानं यदस्थात्प्रियं देवानामप्येतु पाथः ॥ २ ॥
ये बध्यमानमनु दीध्याना अन्वैक्षन्त मनसा चक्षुषा च ।
अग्निष्टानग्रे प्र मुमोक्तु देवो विश्वकर्मा प्रजया संरराणः ॥ ३ ॥
ये ग्राम्याः पशवो विश्वरूपा विरूपाः सन्तो बहुधैकरूपाः ।
वायुष्टानग्रे प्र मुमोक्तु देवः प्रजापतिः प्रजया संरराणः ॥ ४ ॥
प्रजानन्तः प्रति गृह्णन्तु पूर्वे प्राणमङ्गेभ्यः पर्याचरन्तम् ।
दिवं गच्छ प्रति तिष्ठा शरीरैः स्वर्गं याहि पथिभिर्देवयानैः ॥ ५ ॥

अर्थ—(हे देवाः) हे देवहो ! (भुवनस्य रेतः प्रमुञ्चन्तः) भुवनाच्या वीर्याचें ज्ञान करतां करतां (यजमानाय गातुं धत्त) यज्ञ करणाऱ्यास सन्मार्ग प्रदान करा. (यत् शशमानं उपाकृतं देवानां प्रियं पाथः अस्थात्) सुसंस्कृत देवांचें जें सोमरूप प्रिय अन्न आहे तें आम्हांस (एतु) प्राप्त होवो. (२)

(ये दीध्यानाः) जे प्रकाशमान (बध्यमानं अनु) बांधलेल्यांना अनुकूलतेसह (मनसा च चक्षुषा अन्वैक्षन्त) मनानें आणि डोळ्यांनीं पाहतात, (विश्वकर्मा प्रजया संरराणः देवः अग्निः) विश्वकर्ता प्रजेपासून आनंद पावणारा प्रकाशमान देव (तान् अग्रे प्रमुमोक्तु) त्यांना प्रथम मुक्त करो. (३)

(ये ग्राम्याः विश्वरूपाः पशवः) जे खेड्यांतील विविध रंगाचे पशु (बहुधा विरूपाः सन्तः एकरूपाः) प्रायः अनेक रूपधारी असून एकरूप असल्यासारखेहि आहेत. (प्रजया संरराणः प्रजापतिः वायुः देवः) प्रजेसह रमणारा प्रजेचें पालन करणारा वायुदेव (तान् अग्रे प्रमुमोक्तु) त्यांना पहिल्यानें मुक्त करो. (४)

(पूर्वे प्रजानन्तः) प्रथम विशेष जाणणारे ज्ञानी (परि आचरन्तं प्राणं) सर्वत्र परिभ्रमण करणाऱ्या प्राणास (अङ्गेभ्यः प्रति गृह्णन्तु) सर्व अंगांनीं ग्रहण करोत. (शरीरैः प्रतितिष्ठ) शरीराच्या सर्व अंगांत प्रतिष्ठित हो. त्यानंतर (देवयानैः पथिभिः स्वर्गं याहि, दिवं गच्छ) देवांस जाण्यास योग्य अशा मार्गानें स्वर्गांत जा, प्रकाशमय स्थानास प्राप्त कर. (५)

भावार्थ— सर्व देव या उपासकास संसाराचें वीर्य प्रदान करतात, सन्मार्ग दाखवितात आणि सुसंस्कृत देवांस प्रिय असें वनस्पतीचें अन्न त्या उपासकास देतात. (२)

जे तेजस्वी ज्ञानी पुरुष स्वतःच्या मनानें आणि डोळ्यांनीं बद्ध स्थितींत राहिलेल्या प्राण्यांना दयादृष्टीनें पहातात, त्यांनाच विश्वास निर्माण करणारा आणि प्रजेंत रमणारा (आनंद पावणारा) प्रकाशमय देव सर्व प्रथम त्यांनाच मुक्त करतो. (३)

खरोखर विविध रंगारूपाचे असतां एकाच रूपाचे आहेत असे ग्राम्यपशु त्यांना सुद्धां प्रजेसह रहाणारा आणि प्राणांचा प्राणदेव प्रथम मुक्त करतो. (४)

जे ज्ञानी लोक सर्व शरीरांत संचार करणाऱ्या प्राणास सर्व अंगें आणि अवयवांतून एकत्रित करून स्वतःच्या अधिकारांत आणतात, ते शरीरानें सुदृढ असल्यानें दिव्य मार्गानें सरळ स्वर्गाप्रत जातात आणि प्रकाशमय स्थान प्राप्त करून घेतात. (५)

मुक्तीचा सरळ मार्ग

प्राणाचा आयाम

शरीरांत प्राण ही एक अद्भुत शक्ति आहे. वास्तविक प्राण हा एकच आहे, पण शरीराच्या निरनिराळ्या अवयवांत आणि अंगांत कार्य करीत असल्यामुळें त्यास अनेक प्रकारचा मानण्यांत आला आहे. या एकासच अनेक नांवेंही देण्यांत आलीं आहेत. ईश्वरी नियमाप्रमाणें एकच प्राण अनेक अवयवांत जातो आणि तेथें स्वेच्छेनें प्रवृत्त होतो. जर या प्राणावर मनुष्याच्या इच्छेचें स्वामित्व होईल म्हणजे जर प्राण मनुष्याच्या इच्छेप्रमाणें अंगांत आणि अवयवांत जाईल आणि इच्छेनुसार त्याची शरीरांत स्थिति होईल, तर शरीराचा कोणताहि अवयव कधींच रोगी होणार नाहीं, आणि इच्छामरणाची सिद्धीहि प्राप्त होईल. जर प्राणावर प्रभुत्व मिळवितां आलें तरच या सर्व गोष्टी होऊं शकतील; म्हणून पांचव्या मंत्रांत सांगितलें आहे कीं—

प्रजानन्तः पूर्वे पर्याचरन्तं प्राणं अंगेभ्यः प्रतिगृह्णन्तु। (मं. ५)

' ज्ञानी श्रेष्ठ लोकांनीं संचार करणाऱ्या प्राणांस स्वतःच्या सर्व अंगांत एकत्रित करून स्वतःच्या स्वाधीन करून घ्यावें. ' या मंत्रांत या कार्याचा अधिकारी कोण आहे तें सुद्धां सांगितलें आहे. प्राणाचें कार्य सुद्धां सांगितलें आहे आणि प्राणास स्वाधीन करून घेण्याचा उपदेश सुद्धां केला आहे. त्याचें अनुसंधान पहा—

१ **प्र-जानन्तः पूर्वे** - (**प्र-जानन्तः**) विशेष जाणणारे म्हणजे शरीरशास्त्र आणि योगशास्त्राचे विशेष ज्ञाते. प्राणायामशास्त्र उत्तम जाणणारे योगी (**पूर्वे**) प्रथम म्हणजे नवीन टिकाऊ नाहींत पण जे जुने अनुभवी आहेत, त्या लोकांनीं स्वतःचीं अंगें आणि अवयवांतील प्राणांस एकत्रित करून स्वतःच्या स्वाधीन करावें.

२ **पर्याचरन्तं प्राणं- (परि+आचरन्)** सर्व बाजूंस संचार करणाऱ्या प्राणांस स्वाधीन करावें. प्राण सर्व शरीरांत संचार करीत आहे, स्वेच्छेनें संचार करीत आहे, त्यास स्वतःच्या इच्छेनुरूप कार्य करण्यास प्रयुक्त करावें. प्राणाचा संचार जेथें योग्य रीतीनें होत नाहीं तेथें रोग होतो; म्हणून जर प्राणांस आपल्या इच्छेनें नियमित करतां येईल तर सर्व शरीर निरोगी ठेवणें तसेंच दीर्घायुष्य प्राप्त करणें सुद्धां शक्य होईल.

(३) अंगेभ्यः प्राणं प्रतिगृह्णन्तु- शरीराचे अवयव आणि अंगें यांत प्राण एकत्रित करून त्यास आपल्या इच्छेप्रमाणें शरीरांत प्रेरित करण्याची सूचना येथें केली आहे.

योगशास्त्रांत प्राणायामविधि सांगितला आहे. त्याच्या अनुष्ठानानें ही सिद्धि प्राप्त होऊं शकते. साधकांस या विषयांत जास्त परिश्रम करण्याची इच्छा असेल तर कोणा चांगल्या योग्याजवळ राहून ब्रह्मचर्यादि नियमांचें पालन करून तो अनुष्ठानानें स्वतःची इष्टसिद्धि प्राप्त करून घेऊं शकेल. स्वतःच्या शरीराच्या सर्व अंगांतून आणि अवयवांतून प्राण एकत्रित करणें आणि पुनः त्यास पूर्वस्थानीं पसरविणें, या सर्व क्रिया आपल्या स्वाधीन असल्या पाहिजेत. त्यामुळें कोणती सिद्धि मिळते तें या मंत्रांत पहा—

शरीरैः प्रतितिष्ठः । (मं. ५)

' स्वतःच्या शरीरांसह स्थिर हो. ' ही पहिली सिद्धि आहे. स्थूल, सूक्ष्म आणि कारण हीं तीन शरीरें आहेत. याप्रमाणें सात शरीरें सुद्धां समजण्यांत येतात. अंग आणि अवयवांची मोजदाद केल्यानें आणखी खोल विचार करावा लागेल, म्हणून तो विचार आम्हीं सोडून देतो. या शरीरांसह मनुष्य सुदृढ आणि सुप्रतिष्ठित राहूं शकतो. जे पूर्वोक्त रीतीनें साधना करतील आणि प्राणास स्वतःच्या आधीन ठेवतील ते निरोगी, सुदृढ आणि दीर्घायु होतील. हा तर प्रत्यक्ष लाभ झाला; पण प्राणायाम साध्य केल्यानें दुसरे अप्रत्यक्ष सुद्धां अनेक लाभ होतात. या अप्रत्यक्ष लाभांसंबंधीं सुद्धां हा मंत्र असें म्हणतो—

दिवं गच्छ । देवयानैः पथिभिः स्वर्गं याहि । (मं. ५)

' प्रकाशमयस्थान प्राप्त कर. देवांच्या मार्गांनीं स्वर्गांत जा. ' ही अन्तिम सिद्धि आहे. ती प्राणाच्या वशीकरणानें आणि या प्रकारच्या मार्गांनीं प्राप्त होते. योगसाधनेच्या द्वारा प्राप्त होणारी प्रायः सर्व धर्मग्रंथांत वर्णिलेली ही अंतिम सिद्धि आहे.

पशुपति रुद्र

पूर्वोक्त पांच मंत्रांत प्राणाचें वर्णन केलें आहे. तो वश करून घेतल्यानें होणारे लाभ वर्णिले आहेत, आणि त्याचा विधि सुद्धां सांगितला आहे. या प्राणास वेदामध्यें ' रुद्र पशुपति ' वगैरे नांवें वापरलीं आहेत. प्राण शब्द परमात्मावाचक असो अथवा शरीरांतील प्राणाचा वाचक असो, दोन्हीं अवस्थांत वरील (रुद्र पशुपति) शब्द त्यास लागू पडतो. यजुर्वेदाच्या रुद्राध्यायांत हा शब्द रुद्राचा वाचक सांगितला आहे; आणि प्राण रुद्र

आहे. ही गोष्ट शतपथादि ब्राह्मणग्रंथांत अनेकवार सांगण्यांत आली आहे. त्यामुळें पशुपति शब्द रुद्र आणि प्राण एकाच अर्थी प्रयुक्त झाला तरी त्याबद्दल कोणास संदेह रहाण्याचें कारण नाहीं.

शरीरांत ' पशुभाव ' आहे. स्थूल शरीरांत पाशवी बळ असतें. इंद्रियांमध्यें भोगेच्छा, काम, क्रोध, इत्यादि पशुभाव असतात. मनांत असलेली कुवासना हा पशुभाव आहे. याप्रमाणें स्थूल, सूक्ष्म आणि कारण शरीरांच्या क्षेत्रांत अनेक प्रकारचे पशु (भाव) विद्यमान आहेत. त्यांस स्वाधीन ठेवणारा त्यांचा स्वामी हा प्राणच आहे. प्राणास ताब्यांत ठेवलें असतां हे पशु कोणत्याहि प्रकारें कष्ट देत नाहींत. पशुपति होणें ही एक महान् सिद्धि आहे. ती प्राणास वश केल्यानें प्राप्त होते. प्राणाचें वर्णन अन्यत्र असें केलें आहे—

प्राणाय नमो यस्य सर्वमिदं वशे ।
यो भूतः सर्वस्येश्वरो यस्मिन्त्सर्वं प्रतिष्ठितम् ॥
(अथर्व. ११।४।१)

' ज्याच्या स्वाधीन हें सर्व आहे, जो सर्वांचा स्वामी आहे आणि ज्याच्यांत सर्वांचें वास्तव्य आहे, त्या प्राणास प्रणाम असो. ' हें प्राणाचें वर्णन पहा आणि प्रथम मंत्र पहा. ' द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांचा जो स्वामी आहे तो स्वतःचा झाल्यावर त्या पूज्यस्थानीं जातो आणि धन तसेंच पुष्टि उपासकांस मिळते. ' (मं. १)

द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांच्या शरीरांस चालविणारे प्राणच आहेत. त्याच्या अस्तित्वामुळें सर्व इंद्रियें कार्य करतात, आणि तो निघून गेला म्हणजे हें शरीर प्रेतरूप बनतें; म्हणून द्विपाद आणि चतुष्पादांचा स्वामी प्राण आहे (असें म्हटलें आहे). हा प्राण (**निःक्रीतः**) पूर्णपणें खरीदला जातो तेव्हांच तो पूर्ण आधीन बनतो. कोणताहि पदार्थ विकत घेतल्यानेंच आपण त्याचे स्वामी बनतो, म्हणून हा प्राण खरेदी कशाप्रकारें करतां येईल त्याचा विचार केला पाहिजे.

द्रव्य देऊन ज्याप्रमाणें दुसऱ्या वस्तु खरेदी करतां येतात, त्याप्रमाणें प्राण हा धन देऊन खरेदी करतां येत नाहीं. त्यास योगानुष्ठानरूपी तपानें खरीदणें शक्य आहे, म्हणजे तो पूर्ण स्वाधीन होतो. पूर्ण स्वाधीन झाल्यानंतरच ' तो (**यज्ञियं भागं**) पूजास्थानांत प्राप्त होतो. ' यज्ञस्थलांत तो प्राप्त होतो. योगीजन प्राणायामद्वारा त्याची उपासना करतात त्यामुळें—

रायस्पोषा यजमानं सचन्ताम् । (मं. १)

' शोभा आणि पुष्टि यजमानास मिळते. ' मंत्रांत ' राय ' शब्द आहे. ' धन, शोभा ' इत्यादींचा तो वाचक आहे. योगमार्गानें प्राणाची उपासना केल्यानें हें प्रत्यक्ष फळ प्राप्त होतें. त्याबरोबरच पांचव्या मंत्रांत ' शरीर प्रतिष्ठा ' म्हणजे शरीर स्वास्थ्यरूपी फळ मिळतें म्हणून सांगितलें आहे, त्याचा विचार येथेंच व्हावयास पाहिजे. कारण ' शरीराची प्रतिष्ठा ' सुद्धां शरीराची शोभा आणि पुष्टि होण्यानेंच होते.

बीज शक्ति

या प्राणाच्या अनुष्ठानानें दुसरी एक महत्त्वपूर्ण शक्ति प्राप्त होते, त्याचें वर्णन दुसऱ्या मंत्रद्वारा झालेलें आहे—

भुवनस्य रेतः प्रमुञ्चन्तः देवाः गातुं धत्त । (मं. २)

' त्रिभुवनाचें बीज पसरविणारा देव त्यास योग्य मार्ग दाखवितो. ' त्रिभुवनांत अनंत पदार्थ आहेत आणि त्यांचीं अनंत सूक्ष्म बीजें आहेत. हें त्रिभुवनाचें ' रेत ' अथवा वीर्य होय. हें वीर्य सूर्यादि देवांजवळ असतें. जो पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्राणांस वश करतो त्या पुरुषांस हें वीर्य देवांच्या द्वारां प्राप्त होतें. ब्रह्मचर्याच्या प्रतिष्ठेनें जो वीर्याचा लाभ झाल्याचें वर्णन योगसूत्रांत आहे तें वीर्य हेंच होय. साधकानें विचार केला तर त्याच्या ध्यानीं येईल कीं बीजांमध्यें केन्द्रीभूत शक्ति आहे आणि ती महान् शक्ति आहे. तिचा विस्तार अपरिमित होऊं शकतो. ही बीजशक्ति जर आपणांत आली आणि वृद्धिंगत झाली तर आपली शक्ति सुद्धां वाढेल. योग्यांत जी विलक्षण शक्ति आलेली असते त्याचें कारण हेंच आहे कीं तो सूर्यादि देवांकडून बीजशक्ति प्राप्त करून घेतो आणि तिचा उपयोग करतो.

योग्याचें अन्न

द्वितीय मंत्राच्या उत्तरार्धांत योग्यास सेवन करण्यास योग्य अशा सात्त्विक अन्नाचें वर्णन केलें आहे—

यत् शशमानं उपाकृतं देवानां प्रियं पाथः अस्थात् तत् अपि एतु ॥ (मं. २)

' ज्या वनस्पतींस उत्तम संस्कार केले आहेत आणि जें अन्न देवांना प्रिय आहे तें आम्हांस प्राप्त होवो. ' यांत दिव्य अन्नाचें थोडें वर्णन आहे. अन्न नरम म्हणजे पचनास हलकें आणि पचनशक्ति न बिघडविणारें असावें. ' शशमान ' शब्द चंद्र अथवा सोम औषधींचा वाचक आहे. हें देवांचें अन्न आहे. सोम अन्न वनस्पतींचा रस आहे. या रसांत गाईचें ताजें दूध आणि सातूचें पीठ मिसळण्यांत येतें. हा रस पोषण, कान्ति आणि बळ वाढविणारा आहे. अन्न (**देवानां प्रियं**) देवतांना प्रिय आहे. देव शब्दाचा अर्थ इंद्रियें असा सुद्धां होतो. तो अर्थ घेतला तर अन्न असें असलें पाहिजे कीं तें इंद्रियांस हितकारक आहे, असा अर्थहि या वाक्याचा होतो. शरीरास हानिकारक आणि इंद्रियांस निर्बल बनविणारें असें कोणतेंहि अन्न (पदार्थ) घेतां कामां नये.

या मंत्रांतील **' पाथः '** शब्द सुद्धां पिण्यास योग्य अशा अन्नाचा बोध देतो. हें सर्व वर्णन वनस्पतिजन्य रस, रूप, बलवर्धक आणि पुष्टिवर्धक अन्नांचा बोध करवितें. दुधाबरोबर सोमरस अथवा अन्न अथवा औषधिरस इत्यादि सेवन करण्यास योग्य आहे. सोमरसपानाचा विधि यज्ञप्रकरणांत प्रसिद्ध आहे.

मुक्तीचा मार्ग

तृतीय मंत्रांत मुक्तीचा सरळ मार्ग सांगितला आहे. तो प्रत्येकानें मनन करण्यासारखा आहे.

ये दीध्यानाः मनसा चक्षुषा च बध्यमानं अनु अन्वैक्षन्त (मं. ३)

' जे तेजस्वी लोक मनानें आणि डोळयांनीं बंधनांत पडलेल्यांना अनुकंपेच्या नजरेनें पहातात. ' ते मुक्तीचे अधिकारी आहेत. तेच बंधनांतून मुक्त होऊं शकतात आणि कैवल्यधामास पोहोंचून तेथें विराजमान होऊं शकतात.

(**स्वयं दीध्यानाः**) तेजस्वी असून सुद्धां ज्या तपस्व्यांनीं स्वतःचें तेज तपानुष्ठानानें वाढविलें आहे त्यांनींच, स्वतःच्या (**मनसा**) मनानें, स्वतःच्या अंतःकरणांतील खोल भावनांनीं, त्याचप्रमाणें स्वतःच्या (**चक्षुषा**) डोळयांनीं बंधनांत फसतात त्यांजकडे अथवा गुलामींत सडणाऱ्या परतंत्र जीवांकडे दयादृष्टीनें पहावें. येथें त्यांजकडे फक्त पहावयाचें नाहीं तर अंतःकरणपूर्वक त्यांच्या हीन स्थितीचा विचार केला पाहिजे. त्या अवस्थेचें हृदयपूर्वक मनन केलें पाहिजे. त्यांच्या सहाय्यासाठीं आपल्याकडून होईल तितकें सहाय्य केलें पाहिजे त्यासाठीं प्रयत्न केले पाहिजेत. त्यांच्या सहाय्यासाठीं आत्मसमर्पण केलें पाहिजे. जे महात्मे दीनांच्या सहाय्यासाठीं आत्मसमर्पण करितात तेच मुक्तीचे अधिकारी होतात. गरीबांच्या हृदयांत परमात्म्याचें वास्तव्य आहे असें समजून त्यांची सेवा करणें अथवा दीनांच्या उद्धारासाठीं प्रयत्न करण्यानें तद्द्वारा परमात्म्याची उपासना जे करतात तेच मुक्तीचे अधिकारी होतात. त्यांस सद्गति कशा प्रकारें प्राप्त होते तें पहा—

प्रजया संरराणः विश्वकर्मा अग्निः देवः अग्रे तान् प्रमुमोक्तु । (मं. ३)

' प्रजेबरोबर राहणारा विश्वकर्मा तेजस्वी देव प्रथम त्यांना मुक्त करो. ' या मंत्रांत स्पष्ट शब्दद्वारा सांगितलें आहे कीं, ईश्वर प्रजेसह राहतो म्हणजे प्रजाजनांच्या हृदयांत रहातो. दीन प्रजेमध्यें त्यास जे कष्ट पडतात ते दीन प्रजेची सेवा करण्यानेंच दूर होऊं शकतात, म्हणून दीन प्रजेची सेवा करणें हें परमात्म्याची भक्ति करण्यासारखें आहे. यासाठीं या मंत्राच्या पूर्वार्धांत सांगितलें आहे कीं ' बद्धस्थितींत दुःखी आणि दीन असलेल्या मनुष्यांकडे अनुकंपेच्या नजरेनें, मनानें आणि डोळयांनीं पहाणारा सर्वप्रथम मुक्त होतो. ' साधकानें येथें परमात्म्याच्या उपासनेचा सत्य मार्ग पहावा आणि त्या मार्गानें जाऊन मुक्तीचे अधिकारी व्हावें.

विश्वरूपांत एकरूपता

विश्वाचें रूप अनेक प्रकारचें आहे. या विश्वांत प्रत्येक स्थानीं विविधता दिसते. एकाहून दुसरा भिन्न आणि दुसऱ्याहून तिसरा भिन्न ही भेदाची प्रतीति जगांत सर्वत्र आहे. हा भेद असाच कायम राहील काय ? कीं तो नाहींसा करण्याची कांहीं युक्ति आहे, असा विचार मनांत येतो. चवथा मंत्र सांगतो कीं या भेदांत अभेद पहाण्यास शिका. जसें—

विश्वरूपा विरूपाः सन्तः बहुधा एकरूपाः ।
(मं. ४)

' विश्वांत दिसणारीं रूपें अनेक आणि विविध असलीं तरी तीं एक प्रकारें एकरूपच आहेत. ' उदाहरणार्थ खेडेगांवांतलें पशु पहा. गाई रूप, रंग आणि आकारानें भिन्न दिसतात हा दृष्टिभेद आहे. सामान्य नजरेनें पाहिलें तर भिन्नता आहे, परंतु सामान्य दृष्टीचा त्याग करून ' गाय-पणा (**गोत्व**) च्या समष्टिदृष्टीनें पहा. या दृष्टीनें सर्व गाई विविध रंगाच्या असल्या तरी गाय या जातींत समाविष्ट झालेल्या दिसतील. जातीय दृष्टीनें अभिन्नता आणि व्यक्ति दृष्टीनें विभिन्नता याप्रमाणें अनुभवास येते. आतां खेडेगांवांतील पशूमध्यें गाय, बैल, घोडे, बकरी, शेळी, गाढव इत्यादि अनेक पशु येतात. ते एकमेकांहून अगदीं भिन्न आहेत यांत जराहि शंका नाहीं; पण या सर्व जाति भेदभिन्नत्व सोडून **' पशुत्व '** या सामान्य म्हणजे ते सर्व पशुजातीचे आहेत या सामान्य नजरेनें पाहतांच त्यांचें भिन्नत्व नष्ट होऊन पशुभावानें सर्व एकच दिसून येतात. याचप्रमाणें पशु आणि माणसें हीं निःसंशय भिन्न आहेत, परंतु दोघेहि प्राणी असल्या कारणानें त्यांचें भिन्नत्व संपून प्राणीभावांत एकत्व दिसतें. याप्रमाणें भिन्नता आणि अभिन्नता यांचा विचार व्हावयास पाहिजे. कोणत्या दृष्टीनें अभिन्नता दिसते आणि कोणत्या दृष्टीनें भिन्नता आहे त्याचा निश्चय व्हावयास पाहिजे. आपल्या शरीरांत प्राण दहा स्थानांत विभागलेला असल्यामुळें त्यास निरनिराळीं दहा नांवें आहेत. विभिन्न दहा कार्यें करीत असतां सुद्धां ते सर्व दहा मिळून एकच स्वरूप आहे. अशा प्रकारें तो प्राण दहा प्रकारचा तर नाहींच. विभिन्न प्राणांमध्यें अभिन्न प्राणाचें कार्य पहाणें हीच शास्त्राची दृष्टि आहे. अशा प्रकारें विभिन्न इंद्रियांत अभिन्न इन्द्राची (आत्म्याची) शक्ति कार्य करीत आहे. हा अनुभव घेणें हें शास्त्रीय दृष्टीनें पहाणें होय.

इंद्रियांची भिन्नता तर लहान बालक सुद्धां समजूं शकतें, परंतु त्यांच्यामध्यें एकाच आत्म्याची शक्ति समान नियमांनी कार्य करीत आहे हें पहाण्यासाठीं विशेष अभ्यासाची जरुरी आहे. त्यानेंच तें साध्य होईल. याप्रमाणें जल, अग्नि, वायु, सूर्य वगैरे तेहतीस देवतांमध्यें अभिन्न आत्म्याची परम शक्ति कार्य करीत आहे. विविध प्रकारच्या विभिन्न जगतांत अभिन्न रीतीनें तो ओतप्रोत भरलेला आहे. या दृष्टीनें जगाकडे पहाणें ही एक दृष्टीची उच्च अवस्था आहे. अशा उच्च दृष्टीनें पहाणारा महात्मा मुक्तीचा अधिकारी आहे. या विषयीं चौथ्या मंत्राचा उत्तरार्ध पहा-

प्रजया संरराणः प्रजापतिः वायुः देवः तान् अग्रे प्रमुमोक्तु । (मं. ४)

'प्रजेसह राहणारा, प्रजेचें पालन करणारा प्राणरूप देव त्या महात्म्यांस प्रथम मुक्त करो.' जे महात्मे विविध प्रकारच्या विभिन्न जगतांत अभिन्न अशा एक शक्तीच्या कार्याचा अनुभव करतात ते मुक्तीचे खरे अधिकारी होत. पूर्वोक्त मुक्तीच्या अधिकाऱ्यांचीं हींच लक्षणें आहेत. अशा प्रकारें या सूक्तानें मुक्तीचा मार्ग क्रमशः दाखविला आहे. साधक जर या सूक्ताचा विचार करतील तर त्यांस पुष्कळ बोध प्राप्त होईल. सुबोधतेसाठीं संक्षेपानें पुनः सारांश येथें सांगतों—

१. ज्ञानी योगी स्वतःच्या शरीरांत सर्वत्र संचार करणाऱ्या प्राणास स्वतःच्या सर्व इंद्रियें आणि अवयवांतून एकत्रित करून स्वतःच्या स्वाधीन करून घेतो, त्यामुळें शरीर सुदृढ बनतें आणि प्रकाशमय दिव्य मार्गानें त्यास स्वर्गप्राप्ती सुद्धां होते. (मं. ५)

२ प्राण सर्व द्विपाद आणि चतुष्पादांचा संचालक आहे. तो स्वाधीन झाल्यानें (शरीराची) पुष्टि आणि शोभा वाढवितो. (मं. १)

३ प्राणास वश केल्यानें विश्वचालक सूर्यादि देवांपासून महान् वीर्याची शक्ति प्राप्त होते. त्यासाठीं दिव्य सुसंस्कार केलेल्या अन्नाचें भोजन करणें योग्य आहे. (मं. २)

४ जो स्वतःच्या मनानें आणि दृष्टीनें दीनजनांस अनुकंपेनें पहातो आणि त्यांचा उद्धार करण्यासाठीं आत्मसमर्पण करतो, त्यास विश्वकर्ता देव सर्वप्रथम मुक्त करतो. (मं. ३)

५ जगाच्या विविध स्वरूपांत जो एक शक्तीच्या अभिन्न एकतेचा अनुभव घेतो त्यास तो प्रजापालक देव सर्वांत प्रथम मुक्ति देतो. (मं. ४)

या सूक्ताचें तात्पर्य वरील सारांत आहे. अशा दृष्टीनें साधक जर या सूक्ताचा विचार करतील तर त्यांस या मार्गासंबंधीं अनेक बोध प्राप्त होतील.

मन सारथी आहे आणि इंद्रियरूपी दहा घोडे त्याला जुंपलेले आहेत.



शरीररूपी रथामध्यें आत्मा आणि बुद्धि बसलेली आहेत.

पशु

पशुवाचक शब्दप्रयोगद्वारा या सूक्तांत पुष्कळच महत्त्वाचा उपदेश केला आहे. येथें पशु म्हणजे गाय, म्हैस, घोडा वगैरे पशु असा अर्थ समजण्याची आवश्यकता नाहीं; कारण मनुष्य सुद्धां एक पशुच आहे. जोंपर्यंत मनुष्यांतील पशुभाव संपूर्णपणें नष्ट झालेला नाहीं, तोंपर्यंत तो पशुसमानच समजावा. जितक्या प्रमाणांत त्याच्यांतील पशुभावाचा नाश होईल तितक्या प्रमाणांत त्याचा विकास होईल. मनुष्यशरीरांत सर्व इंद्रियें पशुरूप आहेत. या शरीररूपी रथास इतके सर्व पशु जोडलेले आहेत. हे पशु जर उन्मत्त झाले तर त्या (रथा) चा सर्वनाश होईल. त्यासाठीं या सर्व पशूंना (इंद्रियें) काबूंत ठेवण्याचा मनुष्यानें प्रयत्न केला पाहिजे. मनामध्यें सुद्धां काम, क्रोध वगैरे पशुभाव आहेत. या पशूंना चांगल्या शिक्षणद्वारें वश केलें पाहिजे आणि मनुष्यत्वाचा (**मननशीलत्व**) विकास केला पाहिजे. मनुष्य होण्यास प्रारंभ झाल्यानंतर या सूक्तांत सांगितलेलें अनुष्ठान करण्याचा अधिकार त्यास प्राप्त होतो. याचा विचार वाचकानें करावयाचा आहे, आणि या सूक्ताचा अधिकांत अधिक लाभ मिळविण्याची पराकाष्ठा करावयाची आहे.

मुक्ति

कांड ७, सूक्त ८३

(ऋषिः– शुनःशेपः । देवता– वरुणः)

अप्सु ते राजन्वरुण गृहो हिरण्ययो मिथः ।
ततो धृतव्रतो राजा सर्वा धामानि मुञ्चतु ॥ १ ॥
धाम्नोधाम्नो राजन्नितो वरुण मुञ्च नः ।
यदापो अघ्न्या इति वरुणेति यदूचिम ततो वरुण मुञ्च नः ॥ २ ॥
उदुत्तमं वरुण पाशमस्मदवाधमं वि मध्यमं श्रथाय ।
अधा वयमादित्य व्रते तवानागसो अदितये स्याम ॥ ३ ॥

अर्थ— हे वरुण राजन् ! (**ते गृहः अप्सु**) तुझें घर पाण्यांत आहे आणि ते (**मिथः हिरण्ययः**) सुवर्णमय सुद्धां आहे. (**ततः धृतव्रतः राजा**) तेथून व्रत पालन करणाऱ्या राजानें (**सर्वा धामानि मुञ्चतु**) सर्व स्थानें मुक्त-बंधनरहित करावींत. (१)

हे वरुण राजा ! (**इतः धाम्नः धाम्नः नः मुञ्च**) या प्रत्येक बंधनस्थानांतून तू आम्हांस मुक्त कर. (**यत् ऊचिम**) जें आम्हीं बोलतों कीं (**आपः अघ्न्याः इति**) पाणी अवध्य गायीप्रमाणें प्राशस्त्य आहे आणि (**वरुण इति**) हे वरुणा तूंही श्रेष्ठ आहेस. हे वरुण ! (**ततः नः मुञ्च**) या कारणानें तू आम्हांस मुक्त कर. (२)

हे वरुण ! (**उत्तमं पाशं अस्मत् उत् श्रथाय**) उत्तम पाशांस आम्हांपासून ढिलें कर. (**अधमं पाशं अवश्रथाय**) अधम पाशांस सुद्धां काढून घे. आणि (**मध्यमं पाशं विश्रथाय**) मध्यम पाश काढून टाक. हे आदित्य ! (**अधा वयं तव व्रते**) आतां आम्हीं तुझ्या नियमांत राहून (**अनागसः अ-दि-तये स्याम**) निष्पाप होऊन बंधन रहित– मुक्ति-अवस्थेसाठीं योग्य होऊं. (३)

भावार्थ— हे सर्व राजाधिराज प्रभो ! तुझें सुवर्णासारखें चमकणारें धाम जलांत आहे. तूं जगताच्या सत्य नियमांचें पालन करणारा एकमेव राजा आहेस. तूं आम्हांस सर्व बंधनांतून मुक्त कर. (१)

आम्हां सर्वांस सर्व बंधनांतून मुक्त कर. मुक्तीच्या इच्छेनेंच आम्ही आपलें गुणगान करीत आहोंत. (२)

हे श्रेष्ठ देवा ! तूं मला उत्तम, मध्यम आणि अधम, सर्वच पाशांतून मुक्त कर. तुझें व्रत करतां करतां निष्पाप होऊन आम्हीं बंधनांतून मुक्त होण्यास योग्य होऊं. (३)

प्रास्मत्पाशान्वरुण मुञ्च सर्वान्य उत्तमा अधमा वारुणा ये ।
दुष्वप्न्यं दुरितं नि ष्वास्मदथ गच्छेम सुकृतस्य लोकम् ॥ ४ ॥

अर्थ— हे वरुणा ! (ये उत्तमाः ये अधमाः वारुणाः पाशाः) जे उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ वरुणाचे पाश आहेत त्या (सर्वान् पाशान् अस्मत् प्रमुञ्च) सर्व पाशांतून आम्हांस मुक्त कर. सर्व पाश आमच्यापासून दूर कर. (दुष्वप्न्यं दुरितं अस्मत् निः स्व) दुष्ट स्वप्न आणि पापाच्या आचरणापासून आम्हांस वांचीव. (अथ गच्छेम सुकृतस्य लोकं) त्यामुळें आम्ही आतां पुण्य लोक प्राप्त करूं. (४)

भावार्थ— आमचे सर्व पाश मुक्त कर. आमचें पाप दूर कर म्हणजे आम्ही पुण्यलोक प्राप्त करूं. (४)

मुक्ति

तीन पाशांतून मुक्ति

मनुष्यांना मुक्ति पाहिजे असते, परंतु ती मुक्ति सर्व बंधनांतून निवृत्त झाल्याशिवाय मिळूं शकत नाहीं. उत्तम, मध्यम आणि अधम अशा तीन वृत्तींचीं तीन बंधनें मनुष्यास बंधनांत पाडतात. सात्विक, राजस आणि तामस वृत्तींचीं हीं बंधनें आहेत. तीं मनुष्यास बंधनांत टाकून पराधीन बनवितात. तमोवृत्तींच्या बंधनापेक्षां सात्विक वृत्तींचें बंधन निःसंशय पुष्कळ चांगलें, यांत शंका नाहीं; परंतु कसेंहि असलें तरी तें बंधन तर खरेंच. बेडी लोखंडाची असली काय किंवा सोन्याची असली काय, बंधन तें बंधन खरेंच. त्याचप्रमाणें हीन मनोवृत्तींपेक्षां श्रेष्ठ मनोवृत्तींचें बंधन निःशंक चांगलें खरें, परंतु चित्तवृत्तींचा निरोध करूं जातां तें बंधनच आहे. तेवढ्यासाठींच या सूक्तांत सांगितलें आहे कीं, उत्तम, मध्यम आणि अधम अशा सर्व प्रकारच्या बंधनांतून म्हणजे सर्व प्रकारच्या वृत्तींच्या पाशांतून आम्हांस मुक्त कर.

पापांपासून दूर रहा

बंधनें दूर होण्यासाठीं मनुष्य (अन्-आगस्) निष्पाप असला पाहिजे. पापवृत्ति दूर झाल्यावांचून बंधनें क्षीण होण्याचा संभव नाहीं. (दुरितं) जें पाप अंतःकरणांत असतें तें दूर झालें पाहिजे. परमेश्वरहि तेव्हांच (म्हणजे पापापासून मुक्त झाल्यावर) बंधनांतून मुक्त करण्याची दया करूं शकतो, त्यामुळें मुक्तीची इच्छा करणाऱ्यानें पापापासून स्वतःस दूर राखिलें पाहिजे.

त्यासाठीं ईश्वरभक्ति हेंच एकमात्र मुक्तीचें श्रेष्ठ साधन आहे. ‘ दिति ’ नांवाचें बंधन आहे. त्यांतून जो मुक्त होतो त्यास ‘ अदिति ’ ची प्राप्ति होते. हीच मुक्तीची प्राप्ति होय.

परमेश्वर (धृत-व्रतः) आमच्या व्रतांचा निरीक्षक आहे. तो स्वतःच्या नियमानुसार वागतो आणि त्याच्या नियमानुसार जो वागतो त्याच्यावरच तो दया करतो. जो सरळ मार्गानें चालतो तोच निर्विघ्नपणें मुक्ति प्राप्त करून घेतो.

व्रताचा अंगिकार

व्रत धारण केल्याशिवाय मुक्ति मिळूं शकत नाहीं, असा एक उपदेश या सूक्तांतून मिळत आहे; कारण कीं (धृत-व्रत) व्रत धारण करणाराच येथें बंधनमुक्त होण्यास अधिकारी होतो असें सांगितलें आहे. व्रताचरण केल्यानें मनोबलाची आणि आत्मिकबलाची वृद्धि होते. जे लोक व्रत पालन करण्यांत शिथिलता दाखवितात त्यांस उन्नति कधींच प्राप्त होत नाहीं. सत्य बोलणें, सत्याचरण करणें, ब्रह्मचर्य पालन करणें, पवित्रता धारण करणें इत्यादि अनेक व्रतें आहेत. त्या सर्वांची गणना येथें करतां येणार नाहीं. साधकानें स्वतःच्या कर्तृत्वशक्तीचा विचार करावा आणि जें व्रत करणें असेल त्यास प्रारंभ करावा. एक वेळ अंगिकारलेल्या व्रताच्या पालनांत शिथिलता दाखवूं नये. याप्रमाणें केल्यानें व्रतपालन करण्याचें सामर्थ्य येईल आणि क्रमशः उन्नति सुद्धां होत राहील.

मुक्ति
कांड ६, सूक्त १२३
(ऋषिः- भृगु । देवता- विश्वेदेवाः)

एतं सधस्थाः परि वो ददामि यं शेवधिमावहाज्जातवेदाः ।
अन्वागन्ता यजमानः स्वस्ति तं स्म जानीत परमे व्योमन् ॥ १ ॥
जानीत स्मैनं परमे व्योमन्देवाः सधस्था विद लोकमत्र ।
अन्वागन्ता यजमानः स्वस्तीष्टापूर्तं स्म कृणुताविरस्मै ॥ २ ॥
देवाः पितरः पितरो देवाः । यो अस्मि सो अस्मि ॥ ३ ॥
स पचामि स ददामि स यजे स दत्तान्मा यूषम् ॥ ४ ॥
नाके राजन्प्रति तिष्ठ तत्रैतत्प्रति तिष्ठतु ।
विद्धि पूर्तस्य नो राजन्त्स देव सुमना भव ॥ ५ ॥

अर्थ— हे (सधस्थाः) बरोबर रहाणाऱ्यांनों ! (वः एतं शेवधिं परि ददामि) तुम्हांस हा खजिना मीं देतों. (यं जातवेदाः आवहात्) ज्यास जातवेदानें तुम्हांपर्यंत पोंचविला आहे. जो (यजमानः स्वस्ति अनु आगन्ता) यजमान कुशलतेनें बरोबर येईल. (तं परमे व्योमन् जानीत स्म) त्यास परम स्वर्गांत स्थित झालेला असें समजावें. (१)

हे (सधस्थाः देवाः) बरोबर रहाणाऱ्या देवानों ! (एनं परमे व्योमन् जानीत स्म) त्याला परम स्वर्गधामांत स्थित झालेला समजा आणि (अत्र लोकं विद) त्याच्यांत हा लोक आहे असें समजा. (यजमानः स्वस्ति अनु आगन्ता) यज्ञकर्ता सुखानें मागाहून येईल. (अस्मै इष्टापूर्तं आविः कृणुत स्म) त्यासाठीं इष्ट आणि पूर्णता प्रगट होऊन प्राप्त होईल असें करा. (२)

(देवाः पितरः) देव पितर आहेत आणि (पितरः देवाः) पितर देव आहेत; म्हणजे (पितरः) पालक (देवाः) देवता आहेत, पूजनीय आहेत, आणि जे पूजनीय आहेत तेच खरे पालक असतात. (यः अस्मि सः अस्मि) जो वास्तविक मीं आहें तीच माझी सहज स्थिति आहे. (३)

(सः पचामि) मीं तें शिजवितों (सः ददामि) मीं तें देतों (सः यजे) मीं तो यज्ञ करतों (सः दत्तात् मा यूषं) त्या दानापासून मीं निराळें न व्हावें. (४)

हे राजा ! (नाके प्रतितिष्ठ) स्वर्गधामांत प्रतिष्ठित हो. (तत्र एतत् प्रतितिष्ठतु) तेथें आमचा हा यज्ञ प्रतिष्ठित होवो. हे राजा ! (नः पूर्तस्य विद्धि) आमच्या पूर्तीचा उपाय जाण आणि हे देवा ! (सुमनाः भव) उत्तम मनाचा हो. (५)

भावार्थ— सर्वज्ञ देवानें जो आत्मशक्तीचा खजिना तुमच्या स्थानापर्यंत पोहोंचविला आहे, तो मीं तुम्हांस देतों. त्याच्या मागें यजमान येईल आणि तो परम स्वर्गधामास पोहोंचेल. (१)

सत्कर्म करणारा परमधामांत स्थिर होतो, ही गोष्ट निश्चित आहे. यज्ञकर्ता त्याच धामांत पोंहोंचतो त्याचें योग्यतापूर्वक हृदयानें स्वागत करा. (२)

जे पालन करतात ते देव आहेत आणि जे दैवीभावांनीं युक्त आहेत तेच पालन करतात. मनुष्य बाह्य जगांत स्वतःची योग्यता वाटेल तितकी दाखवो त्याच्या अंतरात्म्याची जी अवस्था असेल तितकीच त्याची वास्तविक योग्यता समजावी. (३)

मीं यज्ञासाठीं अन्न शिजवितों, मीं दान करतों, मी यज्ञ करतों. मीं दान करण्यांतून कधींहि निवृत्त न व्हावें. (४)

स्वर्गधामांत स्थिर हो. हें आमचें कर्म स्वर्गांत स्थिर होवो. स्वतःस पूर्णत्व आणण्याचें शिकावें आणि उत्तम मनयुक्त व्हावें. (५)

मुक्ति प्राप्त करण्यास पहिली गोष्ट ही ध्यानांत ठेवावयाची कीं, शक्तीचा खजिना स्वतःच्या आत्म्यांतच आहे. तो कोठें बाहेर नाहीं. शक्तिसुद्धां आंतूनच- अंतःकरणांतून प्राप्त व्हावयाची आहे. बाहेरून नाहीं. जे ही कल्पना मनांत धारण करतात तेच स्वर्गधामांत पोहोंचतात. जे असें समजतात कीं शक्ति बाहेरूनच कोठून प्राप्त व्हावयाची आहे ते मागें रहातात. जे सत्कर्म करतात तेच स्वर्ग प्राप्त करून घेतात. इतर लोक मागें रहातात. सत्कर्मांचा अर्थ जनतेचें पालन करणें. या कार्यानें देवत्व प्राप्त होतें आणि ज्याच्यांत देवत्व आहे तो जनतेचें पालन करतोच. मनुष्य स्वतःच्या शुद्धतेच्या बाबतींत ढोंग करून दुसऱ्यास फसवूं शकेल परंतु सत्कर्माच्या कसोटीनें त्याची योग्यता वास्तविक जितकी असेल तितकीच दिसून येते. ढोंग करण्यानें योग्यता वाढत नाहीं. मनुष्य खिजविणें, देणें इत्यादि जीं कर्में करील तीं यज्ञासाठींच केलीं पाहिजेत म्हणजे जनतेच्या कल्याणासाठींच तीं त्यानें करावींत आणि कर्म करण्यापासून कधीं माघार घेऊं नये. त्यामुळें स्वर्गाची प्राप्ति होते आणि तेथेंच सुख प्राप्त होतें.

मुक्तीचा अधिकारी

कांड ६, सूक्त १११

(ऋषिः- अथर्वा। देवता- अग्निः)

इमं मे॑ अग्ने पुरु॑षं मुमुग्ध्य॒यं यो ब॒द्धः सुय॑तो॒ लाल॑पीति ।
अतोऽधि॑ ते कृणवद्भाग॒धेयं॒ य॒दानु॑न्मदि॒तोऽस॑ति ॥ १ ॥
अ॒ग्निष्टे॒ नि शमयतु यदि॑ ते॒ मन॒ उद्यु॑तम् । कृणोमि॑ वि॒द्वान्भे॑षजं यथानु॑न्मदि॒तोऽस॑सि ॥ २ ॥
दे॒वैन॑सादु॒न्मदि॑तमु॒न्मत्तं॒ रक्ष॑स॒स्परि॑ । कृ॒णोमि॑ वि॒द्वान्भे॑षजं य॒दानु॑न्मदि॒तोऽस॑ति ॥ ३ ॥
पुन॑स्त्वा दुरप्स॒रसः॒ पुन॒रिन्द्रः॒ पुन॒र्भगः॑ । पुन॑स्त्वा दु॒र्विश्वे॑ दे॒वा यथानु॑न्मदि॒तोऽस॑सि ॥ ४ ॥

अर्थ— हे अग्नि ! (**यः बद्धः सुयतः लालपीति**) जो बद्ध मनुष्य जास्त बांधला गेल्यामुळें पुष्कळ आक्रोश करीत आहे (**मे इमं पुरुषं मुमुग्धि**) माझ्या या पुरुषास मुक्त कर. (**यदा**) जेव्हां मनुष्य (**अनुन्मदितः असति**) उन्मादरहित होतो (**अतः ते भागधेय अधि कृणवत्**) त्यावेळीं तुझें भाग्य सर्व प्रकारें उदयास येईल. (१)

(**अग्निः ते निशमयतु**) तेजस्वी देव तुझ्यांत शांति उत्पन्न करो. (**यदि ते मनः उद्युतं**) जर तुझें मन अगदीं उडून गेलें असेल (**यथा अनुन्मदितः अससि**) ज्यामुळें तूं उन्मादरहित होशील. (**भेषजं विद्वान् कृणोमि**) नवें औषध जाणत असल्यानें मीं तसें करतों. (२)

(**देव-एनसात् उन्मदितं**) देवासंबंधीं पापामुळें जर उन्माद झाला असेल (**राक्षसः परि उन्मत्तं**) राक्षसाच्या पापामुळें उन्माद झाला असेल तर (**विद्वान् भेषजं कृणोमि**) मीं समजून औषध करतों. (**यतः अनुन्मदितः असति**) ज्यामुळें तूं उन्मादरहित होशील. (३)

(**अप्सरसः त्वा पुनः दुः**) अप्सरांनीं तुला पुनः दिलें आहे, (**इंद्रः पुनः भगः पुनः**) इंद्र आणि भगानें तुला पुनः दिलें आहे. (**विश्वे देवाः त्वा पुनः अदुः**) विश्वेदेवांनीं तुला पुनः दिलें आहे. (**यथा अनुन्मदितः अससि**) ज्यामुळें तूं उन्मादरहित झाला आहेस. (४)

भावार्थ— जो बद्ध आहे आणि बंधनमुक्त होण्यासाठीं आक्रोश करीत आहे त्यास मुक्ति मिळते. जो उन्मत्त होत नाहीं, त्याचें भाग्य उदयास येतें. (१)

ज्याचें मन उदास झालें आहे, त्याला परमेश्वरच शांति देईल. जो उन्मत्त होत नाहीं त्याच्या उन्नतिसाठीं उपाय होऊं शकतो. (२)

दैवी आणि राक्षसी पाप करण्यामुळें जे उन्मत्त होतात त्यांस उपाय करून त्यांचा उन्माद दूर करतां येतो. (३)

अप्सरा, इंद्र, भग आणि इतर अन्य देवांच्या मदतीनें या रोग्यास पुनः आरोग्य प्राप्त झालें आहे; म्हणजे त्याचा उन्माद दूर झाला आहे. (४)

*

मुक्तीचा अधिकारी

मुक्त कोण होऊं शकतो ?

जो मनुष्य बद्धावस्थेंत बद्धतेनें त्रस्त होतो आणि मुक्त होण्यास धडपडतो, आक्रोश करतो, आणि स्वतःच्या बद्धावस्थेबद्दल पूर्ण असमाधान व्यक्त करतो तो मुक्तीचा अधिकारी आहे. पहा

यः सुयतः बद्धः लालपीति, इमं पुरुषं मुमुग्धि ।
(मं. १)

' जो उत्तम रीतीनें बद्ध झालेला मनुष्य आक्रोश करतो त्या पुरुषास मुक्त कर. ' जे बद्धावस्थेंत संतुष्ट रहातात त्यांची मुक्तता होत नाहीं. कारण ते जन्मतःच गुलाम आहेत आणि गुलामींत रहाण्यास सिद्ध आहेत, आणि गुलामींत रहाण्यांत आनंद मानतात; कित्येक तर असे असतात कीं ते गुलामी टिकून रहाण्याकरितां यत्नही करतात. असे लोक कायम गुलामींतच रहावयाचे. जे गुलामींत राहूं इच्छित नाहींत, गुलामींतून मुक्त होण्याची ज्यांस तळमळ लागली आहे आणि गुलामींतून सुटण्यासाठीं महा-आक्रोश करतात ते गुलामींतून मुक्त होऊं शकतात. ' मीं गुलामीनें त्रासून गेलों आहें. यापुढें मी गुलामींत राहूं इच्छित नाहीं. हे देव हो ! हें बन्धन तोडण्यास मला मदत करा. यापुढें गुलामींत रहाण्यापेक्षां मीं मरण जास्त पसंत करीन.' याप्रमाणें खऱ्या हृदयानें कल्पांत करून जो स्वतःच्या अंतःकरणाचा भाव व्यक्त करतो तो मुक्तीचा अधिकारी आहे. याप्रमाणें आक्रोश करून सुद्धां जे प्रमाद करतील ते मुक्त होणार नाहींत. परंतु प्रमादरहित होऊन जे प्रयत्न करतील ते मुक्त होतील. या विषयीं या मंत्राचा उपदेश पहा—

यदा अनुन्मदितः असाति, अतः भागधेयं अधि कृणवन् ॥ (मं. १)

' जेव्हां उन्मत्त होत नाहीं तेव्हांच नंतर त्याच्या भाग्याचा उदय होतो. ' अर्थात् केवळ गुलामीविरुद्ध मनाचे भाव प्रगट केल्यानेंच कार्य सिद्ध होईल असें नाहीं. गुलामीनें त्रासून गेलेला मनुष्य जर वेडेपणा करूं लागला, अयोग्य वर्तन करूं लागला तर त्यामुळें त्यास कांहींच लाभ होणार नाहीं. त्यानें उन्मत्त अथवा प्रमादी दोन्ही होतां कामा नये. त्यानें दक्षतेनें आणि योग्य दिशेनें स्वतःच्या कर्तव्यांत तत्पर राहिलें पाहिजे; तरच त्याचें भाग्य उदयास येईल. बंधनांतून मुक्त होण्याची आतुरता, मनांतील भाव स्पष्ट शब्दांत व्यक्त करण्याचें धैर्य व दक्षतेनें स्वकर्तव्य करणें, हीं तीन साधनें साध्य करण्यानेंच त्याचें भाग्य उदयास येऊं लागतें.

सामान्यतः मुक्ति प्राप्त करण्याचे हे उपाय आहेत. ही मुक्ति आध्यात्मिक असो, अथवा राजकीय, सामाजिक किंवा एखाद्या रोगापासून मिळविण्याची मुक्ति असो, हे नियम अथवा साधनें सर्व प्रकारच्या मुक्तीसाठीं एकसारखींच लागू पडतात.

मन उदास झाल्यानंतर

मुक्तीचा मार्ग फार कठीण आहे. एखादेवेळीं सिद्धि मिळते, उलट एखादेवेळीं हानी सुद्धां होते. हानीच्या वेळीं मन उदास होतें. कोणत्याहि गोष्टीकडे मन लागत नाहीं. मनुष्य किंकर्तव्यमूढ होतो, अशावेळीं—

यदि ते मन उद्युतं, अग्निः निशमयतु । (मं. २)

' जर तुझें मन उदास झालें असेल तर तो तेजस्वी देव तुला शांति देवो. ' त्यासमयीं मुक्तीची इच्छा करणाऱ्या मनुष्यानें, प्रभूची प्रार्थना करावी. प्रभु त्यास अवश्यमेव शांति देईल. मन कितीही दुःखी असलें तरी प्रभूस शरण गेल्यानें त्याला शांति प्राप्त होईल; त्यामुळें मुक्तीची इच्छा करणाऱ्यांनीं उदासीनतेचे वेळीं प्रभूस शरण जावें, तसेंच केव्हांहि उदासीनता न यावी यासाठीं सर्वदा त्याची भक्ति करावी. त्यानें मनांत शांति रहाते, प्रमाद होत नाहींत आणि उन्नतीचा मार्ग पूर्णपणें मोकळा होतो.

पापाचे दोन भेद

पापाचे दोन भेद आहेत. एक देवांसंबंधीं पाप आणि दुसरें राक्षसांच्या कारणानें होणारे पाप. पृथ्वी, आप, तेज, वायु, औषधि इत्यादि अनेक देवता आहेत. त्यांच्याविषयीं मनुष्य पापें करतो. भूमीचें अपहरण, पाणी बिघडविणें, वायु दूषित करणें वगैरे जीं आहेत तीं देवांसंबंधीं पापें होत. या पापामुळें दोष होतात व मनुष्य प्रमाद करतो आणि दुःखें भोगतो. दंभ, दर्प, अभिमान इत्यादि राक्षसी भाव आहेत, त्यांच्यामुळें मनुष्य पाप करतो आणि दोषी होऊन दुःख भोगतो. याप्रकारें दोन प्रकारचीं पापें आहेत. मनुष्यानें या दोन प्रकारच्या पापांपासून आपलें रक्षण करावें. हा उपदेश देण्यासाठीं खालीं दिलेला मंत्रभाग आहे—

देव एनसात् उन्मदितं रक्षसस्परि उन्मत्तम् ।
भेषजं कृणोमि यदानुन्मदितः असति । (मं. ३)

'देवतासंबंधींच्या पापांमुळें जे दोष झाले आहेत आणि राक्षसांच्या संबंधीं पापांमुळें जे दोष झाले आहेत ते दूर करण्याचा मीं उपाय करतों. त्यामुळें तूं उन्मादरहित होशील.' या मंत्राचा भाव आतां वाचकांच्या ध्यानीं आला असेलच. या दोन प्रकारचे दोष दूर होण्यामुळेंच मनुष्याचा भाग्योदय होतो, आणि त्यांचीं बंधनें दूर होऊं शकतात. तसेंच त्यास मुक्तिसुद्धां मिळूं शकते.

अंतिम मंत्राचा भाव असा आहे कीं मनुष्य जर पूर्वोक्त प्रकारें निर्दोष असेल तर सर्व देवगण त्यास सहाय करतात आणि तो प्रमादरहित बनतो.

हें सूक्त थोडेंसें क्लिष्ट वाटेल पण या वर दर्शविलेल्या रीतीनें विचार केला असतां या सूक्ताचा कांहीं अंश सुबोध होऊं शकतो.

अमरत्वाची प्राप्ति

कांड ७, सूक्त १०६

(ऋषिः- अथर्वा । देवता- जातवेदा वरुणश्च)

यदस्मृति चकृम किं चिदग्न उपारिम चरणे जातवेदः ।
ततः पाहि त्वं नः प्रचेतः शुभे सखिभ्यो अमृतत्वमस्तु नः ॥ १ ॥

अर्थ— हे (**जातवेदः अग्ने**) ज्ञातवेद प्रकाशदेव ! (**यत् चरणे किंचित् अस्मृति चकृम** ; जर आचरणांत विस्मरणानें आम्हीं कांहीं केलें आणि त्यांत (**उपारिम**) कांहीं अशुद्धि केली असेल, तर हे (**प्रचेतः**) उत्कृष्ट चित्त असणाऱ्या देवा ! (**त्वं नः ततः पाहि**) तूं आम्हांस त्यापासून वांचीव ! आणि (**नः सखिभ्यः**) आमच्या मित्रांना (**शुभे अमृतत्वं अस्तु**) शुभ मार्गानें अमरत्व प्राप्त होवो. (१)

भावार्थ—ही उत्तम प्रार्थना आहे. हे प्रभो ! आम्हीं जें आचरण करतों त्यांत आमच्या समजुतीनें अथवा अज्ञानानें जर कांहीं अशुद्धि झाली तर त्या अपराधाची क्षमा कर आणि आम्हांस शुभ मार्गानें अमृतत्वाची प्राप्ति होवो.' ही उत्तम प्रार्थना आहे आणि प्रत्येक मनुष्यानें ती नेहमींच करण्यासारखी आहे. (१)

दिव्य वचन

कांड ७, सूक्त १०५

(ऋषिः- अथर्वा । देवता- मन्त्रोक्ता)

अपक्रामन्पौरुषेयाद्वृणानो दैव्यं वचः । प्रणीतीरभ्यावर्तस्व विश्वेभिः सखिभिः सह ॥ १ ॥

अर्थ— (**पौरुषेयाद् अपक्रामन्**) सामान्य मनुष्यानें करण्यास योग्य अशा कर्मांपासून दूर राहून (**दैव्यं वचः वृणानः**) दिव्य वचनांचा स्वीकार कर, (**विश्वेभिः सखिभिः सह**) स्वतःच्या सर्व मित्रांसह (**प्रनीतीः अभ्यावर्तस्व**) उत्कृष्ट नीतिनियमांस अनुकूल असें वर्तन कर. (१)

भावार्थ— सामान्य, असभ्य, अशिक्षित, मनुष्य जसा हीन व्यवहार करील तसा (करणें) सोडून दिलें पाहिजे. दिव्य उपदेश वचनांचा- वेदवचनांचा- स्वीकार केला पाहिजे. आणि स्वतःच्या सर्व इष्टमित्रांसह त्या उपदेशाच्या श्रेष्ठ आदेशानुसार स्वतःचें आचरण ठेवलें पाहिजे. उन्नतीचा हाच मार्ग आहे.

उच्च होऊन रहावें

कांड ७, सूक्त १०२

(ऋषिः- प्रजापतिः । देवता- द्यावपृथिवी, अन्तरिक्षम् मृत्युः)

नमस्कृत्य द्यावापृथिवीभ्यामन्तरिक्षाय मृत्यवे । मेक्षाम्यूर्ध्वस्तिष्ठन्मा मां हिंसिषुरीश्वराः ॥ १ ॥

अर्थ— (द्यावापृथिवीभ्याम्) द्युलोक आणि पृथ्वीलोक यांना तसेंच (**अन्तरिक्षाय मृत्यवे नमस्कृत्य**) अन्तरिक्ष आणि मृत्यूस नमस्कार करून (**ऊर्ध्वः तिष्ठन् मेक्षामि=मेषामि=मेषामि**) उंच उभा राहून निरीक्षण करतों त्यामुळें (**ईश्वराः मा मा हिंसिषुः**) स्वामी-अधिकारी माझा नाश न करोत. (१)

भावार्थ— द्युलोक, अंतरिक्षलोक आणि भूलोक यांत रहाणाऱ्या अग्रपुरुषांस आणि मृत्यूस नमस्कार करून स्वतःच्या धर्ममर्यादेच्या अनुसार मीं रहातों. उच्च होऊन, उच्च स्थानांत राहून, उच्च विचार करून, उच्च लोकांशीं संबंध जोडून, डोळे उघडे ठेऊन जगाचें निरीक्षण करतों, आणि योग्य आचरण करतों. त्यामुळें या विश्वाचे अधिकारी माझी हिंसा न करोत, माझा घात न करोत. (१)

अध्यात्म प्रकरण

कांड १३, सूक्त १

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- अध्यात्मं, रोहितादित्यदेवते)

उदेहि वाजिन्यो अप्स्वन्तरिदं राष्ट्रं प्र विश सूनृतावत् ।
यो रोहितो विश्वमिदं जजान स त्वा राष्ट्राय सुभृतं बिभर्तु ॥ १ ॥
उद्वाज आ गन्यो अप्स्वन्तर्विश आ रोह त्वद्योनयो याः ।
सोमं दधानोऽप ओषधीर्गाश्चतुष्पदो द्विपद आ वेशयेह ॥ २ ॥

अर्थ— हे (**वाजिन् उत् एहि**) सामर्थ्यवान् आत्मदेव ! तूं उदयास प्राप्त हो. (**यः अप्सु अन्तः**) जो तूं आपोमय प्राणाच्या पलीकडे आहेस, तो तूं (**इदं सूनृतावत् राष्ट्रं प्रविश**) या प्रिय राष्ट्रांत प्रवेश कर. (**यः रोहितः इदं विश्वं जजान**) ज्या देवानें हें सर्व विश्व उत्पन्न केलें आहे (**सः त्वा राष्ट्राय सुभृतं बिभर्तु**) तो तुला या राष्ट्रासाठीं उत्तम भरणपोषण करून धारण करो. (१)

(**यः अप्सु अन्तः**) जो आपोमय प्राणांच्या आंत विद्यमान आहे जो (**वाजः उत् आगन्**) सामर्थ्यशाली झाला आहे. (**याः त्वत् योनयः विशः**) ज्या तुझ्या जातीच्या प्रजा आहेत, त्यांच्यामध्यें तूं (**आरोह**) उच्च स्थानीं विराजमान् हो. (**इह सोमं दधानः**) या राष्ट्रांत सोमादि वनस्पतींचें पोषण करून (**अपः ओषधीः गा चतुष्पदः द्विपदः**) पाणी, ओषधि, गाई, चतुष्पाद आणि द्विपाद प्राणी यांचा (**आवेशय**) निवास कर. (२)

भावार्थ— प्रत्येक आत्मा अभ्युदय आणि निःश्रेयस प्राप्त करो, प्रत्येक मनुष्य राष्ट्राची उन्नति आणि त्यासह स्वतःची उन्नति करो. स्वतःच्या राष्ट्रावर प्रेम करो, आणि त्याची उन्नति करण्याचा प्रयत्न करो. ह्या सूर्यदेवानें या जगाची उत्पत्ति केली आहे आणि तोच तुम्हांस राष्ट्रीय उन्नति करण्यासाठीं पुष्ट करो. (१)

जलामध्यें जें विद्यमान आहे तेंच मनुष्याचें सामर्थ्य आहे. त्या सामर्थ्यानें युक्त होऊन स्वतःच्या सजातीय प्रजेंत म्हणजे स्वतःच्या राष्ट्रांत राहून मनुष्यानें अभ्युदय प्राप्त करून घेतला पाहिजे. या आपल्या राष्ट्रांत राहून वनस्पति, जलस्थान, गायी, औषधि आणि अनेक द्विपाद-चतुष्पाद पशूंना तो धारण करो. (२)

यूयमुग्रा मरुतः पृश्निमातर इन्द्रेण युजा प्र मृणीत शत्रून् ।
आ वो रोहितः शृणवत्सुदानवस्त्रिषप्तासो मरुतः स्वादुसंमुदः ॥ ३ ॥
रुहो रुरोह रोहित आ रुरोह गर्भो जनीनां जनुषामुपस्थम् ।
ताभिः संरब्धमन्वविन्दन्षडुर्वीर्गातुं प्रपश्यन्निह राष्ट्रमाहाः ॥ ४ ॥
आ ते राष्ट्रमिह रोहितोऽहार्षीद्व्यास्थन्मृधो अभयं ते अभूत् ।
तस्मै ते द्यावापृथिवी रेवतीभिः कामं दुहाथामिह शक्वरीभिः ॥ ५ ॥
रोहितो द्यावापृथिवी जजान तत्र तन्तुं परमेष्ठी ततान ।
तत्र शिश्रियेऽज एकपादोऽदृंहद् द्यावापृथिवी बलेन ॥ ६ ॥
रोहितो द्यावापृथिवी अदृंहत्तेन स्वः स्तभितं तेन नाकः ।
तेनान्तरिक्षं विमिता रजांसि तेन देवा अमृतमन्वविन्दन् ॥ ७ ॥

अर्थ— हे (मरुतः) मरेपर्यंत लढणाऱ्या वीरांनो ! (यूयं उग्राः पृश्निमातरः) तुम्ही सर्व फारच शूरवीर आणि भूमीस स्वतःची माता समजणारे आहांत. तुम्ही (इन्द्रेण युजा शत्रून् प्रमृणीत) इंद्राबरोबर राहून शत्रूंचा नाश करा. हे (सुदानवः रोहितः आ शृणवत्) उत्तम दान देणाऱ्या वीरांनो ! तो सूर्यदेव तुमचें म्हणणें ऐको. (त्रि-सप्तासः मरुतः स्वादु-संमुदः) आपण तीन गुणिले सात म्हणजे एकवीस प्रकारचे वीर उत्तम आनंद देणारे आहांत. (३)

(रोहितः रुहः रुरोह) प्रकाशमान् सूर्यदेव उच्च स्थानांत विराजमान् झालेला आहे, म्हणजे (जनुषां जनीनां उपस्थं गर्भः आरुरोह) स्त्रियांच्या गर्भाशयांत गर्भ स्थिर झाला आहे. (षट् उर्वीः ताभिः संरब्धं अन्वविन्दन्) सहा दिशांनीं त्यांनीं पोषण करून वाढविलेला गर्भ प्राप्त केला आहे. तो (गातुं प्रपश्यन् इह राष्ट्रं आहाः) उन्नतीचा मार्ग जाणून तो या राष्ट्रास उन्नत करीत आहे. (४)

(ते राष्ट्रं इह रोहितः आहार्षीत्) तुझ्या राष्ट्राला याच सूर्यदेवानें येथें आणून ठेविलें आहे. (मृधः वि आस्थन्) शत्रूंस दूर केलें आणि (ते अभयं अभूत्) तुझ्यासाठीं निर्भयता उत्पन्न केली आहे. (तस्मै ते रेवतीभिः शक्वरीभिः द्यावापृथिवी इह कामं दुहाथां) त्या तुझ्या हितासाठीं धन आणि शक्तीच्या योगानें हे द्युलोक आणि पृथ्वीलोक या राष्ट्रांत पुरेसे उपभोग देवोत. (५)

(रोहितः द्यावापृथिवी जजान) या सूर्यदेवानें या द्युलोक आणि पृथ्वीलोकास उत्पन्न केलें आहे. (तत्र परमेष्ठी तन्तुं ततान) तेथें परमात्म्यानें सूत्रात्म्यास पसरविलें आहे. (तत्र एकपादः अजः शिश्रिये) तेथें एका पायाच्या आत्म्यानें आश्रय घेतला आहे. त्यानें (बलेन द्यावापृथिवी अदृंहत्) स्वतःच्या बलानें द्यावापृथिवीला सुदृढ बनविलें. (६)

(रोहितः द्यावापृथिवी अदृंहत्) सूर्यदेवानें द्युलोक आणि पृथिवी लोकांस सुदृढ बनविलें, (तेन तेन स्वः नाकः स्तभितं) त्यानेंच स्वर्ग नांवाचा सुखपूर्ण लोक वर टिकवून धरिला आहे. (तेन अन्तरिक्षं रजांसि विमिता) त्यानें अंतरिक्ष लोक बनविला आणि (तेन देवाः अमृतं अन्वविन्दन्) त्यानें सर्व देवांस अमरत्व प्राप्त करून दिलें आहे. (७)

भावार्थ— सर्व लोकांनीं स्वतःच्या मातृभूमीचें रक्षण स्वतःच्या उग्र शौर्यानें करावें. मातृभूमीच्या शत्रूंचा नाश करावा. मनांत उदारतायुक्त दातृत्वभाव धारण करावा. शूर वीर जे मरेपर्यंत लढणारे आहेत, तेच उत्तम आनंद देणारे होतात. (३)

तो सूर्य उदयास आला आहे, जणूं काय तो आपल्या मातेच्या मांडीवर बसला आहे. जणूं काय साही दिशांनीं त्या गर्भाचें तेज धारण केलें आहे. हा गर्भ कालेंकरून उन्नत होतो. स्वतः उन्नतीचा मार्ग जाणतो, आणि राष्ट्रास सुद्धां उन्नत बनवितो. (४)

या सूर्यदेवानेंच तुझ्या राष्ट्रास उच्च स्थितींत आणून ठेविलें आहे. त्यानें शत्रूंना दूर केलें आणि निर्भय बनविलें. या राष्ट्रांत रहाणाऱ्यासाठीं या भूमींत धन आणि शक्ति प्राप्त होवो. (५)

याच सूर्यदेवानें द्युलोक आणि पृथ्वीलोक बनविलें, येथें परमात्म्याच्या आत्म्याला सूत्ररूपानें पसरविलें, तेथें जीवात्म्यानें आश्रय केला आहे. त्यानें स्वतःच्या शक्तीनें या पृथ्वीस सुदृढ बनविली. (६)

वि रोहितो अमृशद्विश्वरूपं समाकुर्वाणः प्ररुहो रुहश्च ।
दिवं रूढ्वा महता महिम्ना सं ते राष्ट्रमनक्तु पयसा घृतेन ॥ ८ ॥
यास्ते रुहः प्ररुहो यास्त आरुहो याभिरापृणासि दिवमन्तरिक्षम् ।
तासां ब्रह्मणा पयसा वावृधानो विशि राष्ट्रे जागृहि रोहितस्य ॥ ९ ॥
यास्ते विशस्तपसः संबभूवुर्वत्सं गायत्रीमनु ता इहागुः ।
तास्त्वा विशन्तु मनसा शिवेन संमाता वत्सो अभ्येतु रोहितः ॥ १० ॥
ऊर्ध्वो रोहितो अधि नाके अस्थाद्विश्वा रूपाणि जनयन्युवा कविः ।
तिग्मेनाग्निर्ज्योतिषा वि भाति तृतीये चक्रे रजसि प्रियाणि ॥ ११ ॥

अर्थ— (रोहितः प्ररुहः रुहः च समाकुर्वाणः विश्वरूपं वि अमृशत्) सूर्यदेवानें उच्च आणि नीच अशा सर्व दिशांना एकत्र करून सर्व विश्वाच्या रूपास बनविण्याचा विचार केला. तो (महता महिम्ना दिवं रूढ्वा) स्वतःच्या महान् सामर्थ्यानें द्युलोकावर आरूढ होऊन (ते राष्ट्रं पयसा घृतेन सं अनक्तु) तुझ्या राष्ट्रास दूध आणि तुपानें भरपूर करो. (८)

(याः ते रुहः प्ररुहः याः ते आरुहः) जे तुमचे मार्ग पुढें, व वर चढण्याचे मार्ग आहेत (याभिः दिवं अन्तरिक्षं आपृणासि) ज्यांच्या योगानें तूं द्युलोक आणि अंतरिक्षास भरपूर पूर्ण करतोस (तासां ब्रह्मणा पयसा वावृधानः) त्यांच्या बलवर्धक रसानें वाढणारा तूं (रोहितस्य विशि राष्ट्रे जागृहि) सूर्यदेवाच्या प्रजेंत आणि राष्ट्रांत जागृत रहा. (९)

(ते तपसः याः विशः संबभूवुः) तुझ्या प्रकाशानें ज्या प्रजा उत्पन्न झाल्या आहेत (ताः इह वत्सं गायत्रीं अनु अगुः) त्या प्रजा येथें संतति आणि स्वतःचें प्राण-त्राणासंबंधीं व्यवहारास अनुकूल होऊन वर्तत आहेत (ताः शिवेन मनसा त्वा विशन्तु) त्या प्रजा शुभसंकल्पयुक्त मनानें तुझ्यामध्यें प्रवेश करोत. (संमाता रोहितः वत्सः अभ्येतु) माता आणि सूर्यरूपी वासरू हीं मिळून पुढें जावोत. (१०)

(युवा कविः विश्वा रूपाणि जनयन्) तरुण ज्ञानी सर्व जगाच्या रूपास प्रकाशित करून (रोहितः ऊर्ध्वः नाके अधि अस्थात्) सूर्य वर स्वर्गांत राहिला आहे. हा (अग्निः तिग्मेन ज्योतिषा विभाति) अग्नि तीक्ष्ण प्रकाशानें प्रकाशत आहे. हा (तृतीये रजसि प्रियाणि चक्रे) तिसऱ्या अंतरिक्ष लोकांत सर्वांसाठीं प्रिय पदार्थ तयार करीत आहे. (११)

भावार्थ— सूर्यदेवानेंच पृथ्वी, द्युलोक आणि अंतरिक्ष लोकांस सुदृढ बनविलें आहे. त्यामुळें सर्व देवांना अमरत्व प्राप्त झालें आहे. (७)

सूर्यामुळेंच सर्व जगाला सुंदर रूप प्राप्त झालें आहे. तो स्वतःच्या महात्म्यानें स्वर्गलोकावर चढून या राष्ट्राला दूध आणि तुपानें भरपूर करतो. (८)

स्वर्ग प्राप्त करण्याचे जे अनेक मार्ग आहेत त्यांच्या ज्ञानानें, तसेंच दुधातुपानें हृष्टपुष्ट बनून या राष्ट्रांत आणि या प्रजेंत सतत जागृत रहा. (९)

सूर्यापासूनच हे सर्व प्रजाजन, सर्व प्राणीमात्र उत्पन्न झाले आहेत. हा सर्व प्रजा स्वतःच्या प्राणरक्षणाच्या प्रयत्नांत सर्वदा दत्तचित्त रहातो. या सर्व प्रजा उत्तम शिवसंकल्पयुक्त मनानें ईश्वरांत आश्रय घेऊन राहोत. माता आणि पुत्र मिळून उन्नतीस प्राप्त होवोत. (१०)

हा सर्वदा तरुण, सर्वांस पहाणारा सूर्य सर्व रूपांस प्रकाशित करीत करीत द्युलोकांत राहिला आहे. स्वतःच्या सर्व प्रखर तेजासह तो प्रकाशत आहे. आणि तिसऱ्या लोकांत राहून सर्वांसाठीं प्रिय पदार्थ तयार करीत आहे. (११)

सहस्रशृङ्गो वृषभो जातवेदा घृताहुतः सोमपृष्ठः सुवीरः ।
मा मां हासीन्नाथितो नेत्त्वा जहानि गोपोषं च मे वीरपोषं च धेहि ॥ १२ ॥
रोहितो यज्ञस्य जनिता मुखं च रोहिताय वाचा श्रोत्रेण मनसा जुहोमि ।
रोहितं देवा यन्ति सुमनस्यमाना स मा रोहैः सामित्यै रोहयतु ॥ १३ ॥
रोहितो यज्ञं व्यदधाद्विश्वकर्मणे तस्मात्तेजांस्युप मेमान्यागुः ।
वोचेयं ते नाभिं भुवनस्याधि मज्मनि ॥ १४ ॥
आ त्वा रुरोह बृहत्यूउत पङ्क्तिरा ककुब्वर्चसा जातवेदः ।
आ त्वा रुरोहोष्णिहाक्षरो वषट्कार आ त्वा रुरोह रोहितो रेतसा सह ॥ १५ ॥

अर्थ— हा (**जातवेदाः सहस्रशृङ्गः वृषभः**) तयार झालेल्या सर्व पदार्थांस जाणणारा हजारों किरणांनीं युक्त अशी वृष्टि करणारा (**घृताहुतः सोमपृष्ठः सुवीरः**) तुपाच्या आहुति स्वीकारणारा, सोमाचें हवन ज्याच्यावर होतें, असा हा उत्तम वीर आहे. हा (**नाथितः मा मा हासीत्**) प्रार्थना केल्यानंतर माझा त्याग न करो; तसेंच (**त्वा इत् न जहानि**) तुला निश्चयपूर्वक मीं सोडणार नाहीं. (**मे गो-पोषं वीर-पोषं च धेहि**) मला गायींचें पालन करण्याचें तसेंच वीरांचें पालन करण्याचें सामर्थ्य दे. (१२)

(**रोहितः यज्ञस्य जनिता मुखं च**) सूर्य यज्ञाचा उत्पन्न कर्ता आणि यज्ञाचें मुख आहे (**वाचा श्रोत्रेण मनसा च रोहिताय जुहोमि**) वाणीनें, कानांनीं, मनानें मीं सूर्यासाठीं हवन करतों. (**सुमनस्यमानाः देवाः रोहितं यन्ति**) उत्तम संकल्प करणारे देव सूर्यास प्राप्त होतात. (**सः सामित्यैः रोहैः मा रोहयतु**) तो सभेसाठीं अनेक उत्कर्षांनीं मला उन्नत करो. (१३)

(**रोहितः विश्वकर्मणे यज्ञं व्यदधात्**) सूर्यानें विश्वकर्म्यासाठीं यज्ञ केला. (**तस्मात् इमानि तेजांसि मा उप आ गुः**) त्या यज्ञानें हीं तेजें मला प्राप्त झालीं आहेत. (**भुवनस्य मज्मनि अधि ते नाभिं वोचेयम्**) त्यामुळें या भुवनाच्या महत्त्वामध्यें तुझा भाग मुख्य आहे असें मीं म्हणतों. (१४)

हे (**जातवेदः**) सर्व उत्पन्न झालेल्यांस जाणणाऱ्या ! (**त्वा बृहती आरुरोह**) तुझ्यावर बृहती चढली आहे. (**उत पंक्तिः आ ककुब् वर्चसा आ**) पंक्ति आणि ककुब् स्वतःच्या तेजासह चढल्या आहेत. (**उष्णिहाक्षरः त्वा आरुरोह**) उष्णिक् छंदाचीं अक्षरेंही तुझ्यावर चढलीं आहेत; त्याचप्रमाणें (**रोहितः रेतसा सह**) सूर्य स्वतःच्या वीर्यानें युक्त होऊन राहिला आहे. (१५)

भावार्थ— हाच सूर्य अग्नि आहे, ज्यांत तूप आणि सोमाच्या आहुति टाकण्यांत येतात. तो माझा कधींही त्याग न करो, आणि मींहि त्याचा त्याग कधीं न करावा. यामुळें आमची संतति आणि गाई हृष्टपुष्ट होवोत. (१२)

याच सूर्यापासून यज्ञ बनले आहेत. यज्ञांत अग्निरूपानें तोच मुख्य आहे. हवन करीत असतां वाणी, कान आणि मन यांचा एकत्रित उपयोग केला गेला पाहिजे. शुभसंकल्प करणारे सर्व त्यांप्रत पोहोंचतात. त्यानें मजवर कृपा करावी, आणि सभांच्याद्वारें जी मानवाची उन्नति होण्याचा संभव आहे ती मला प्राप्त करून द्यावी. (१३)

सूर्यदेवाच्या योगानें या सर्व शुभ कर्मांचा स्रोतरूपयज्ञ झाला आहे. त्याच्यामुळें जी शक्ति प्राप्त होते ती सर्व मला प्राप्त व्हावी. या सर्व संसारामध्यें तीच महत्त्वाची शक्ति आहे. (१४)

बृहती, पंक्ति, ककुब्, उष्णिक्, वषट्कार वगैरे सर्व त्या एकाच देवाचें वर्णन करीत आहेत. जणूं काय तो त्यांच्यांतच राहिलेला आहे. (१५)

अयं वस्ते गर्भं पृथिव्या दिवं वस्तेऽयमन्तरिक्षम् ।
अयं ब्रध्नस्य विष्टपि स्वर्लोकान्व्यानशे ॥ १६ ॥
वाचस्पते पृथिवी नः स्योना स्योना योनिस्तल्पा नः सुशेवा ।
इहैव प्राणः सख्ये नो अस्तु तं त्वा परमेष्ठिन्पर्यग्निरायुषा वर्चसा दधातु ॥ १७ ॥
वाचस्पत ऋतवः पञ्च ये नौ वैश्वकर्मणाः परि ये संबभूवुः ।
इहैव प्राणः सख्ये नो अस्तु तं त्वा परमेष्ठिन्परि रोहित आयुषा वर्चसा दधातु ॥ १८ ॥
वाचस्पते सौमनसं मनश्च गोष्ठे नो गा जनय योनिषु प्रजाः ।
इहैव प्राणः सख्ये नो अस्तु तं त्वा परमेष्ठिन्पर्यहमायुषा वर्चसा दधामि ॥ १९ ॥
परि त्वा धात्सविता देवो अग्निर्वर्चसा मित्रावरुणावभि त्वा ।
सर्वा अरातीरवक्रामन्नेहीदं राष्ट्रमकरः सूनृतावत् ॥ २० ॥

अर्थ—(**अयं पृथिव्याः गर्भं वस्ते**) तो पृथ्वीच्या गर्भांत रहातो. (**अयं दिवं अन्तरिक्षं वस्ते**) तो द्युलोक आणि अंतरिक्ष लोकांत रहातो. (**अयं ब्रध्नस्य विष्टपि स्वर्लोकान् व्यानशे**) तो या प्रकाशलोकाच्या शिरोभागीं स्वर्गलोकास व्यापतो. (१६)

हे (**वाचस्पते**) वाणीच्या अधिपते! (**नः पृथिवी स्योना**) आम्हांसाठीं पृथ्वी सुखकर होवो. (**योनिः स्योना**) आमच्यासाठीं आमचें घर सुखकारक होवो. (**नः तल्पा सुशेवा**) आम्हासाठीं बिछाने सुखदायी होवोत. (**इह एव नः सख्ये प्राणः अस्तु**) येथेंच आमच्या सख्यासाठीं प्राण राहो. हे परमेष्ठिन् ! (**तं त्वा अग्निः आयुषा वर्चसा परि दधातु**) तुला हा अग्नि आयुष्य आणि तेजानें युक्त करो. (१७)

हे वाचस्पते ! (**ये नौ विश्वकर्मणः पंच ऋतवः परि संबभूवुः**) जे आमच्या संपूर्ण कर्मांना सहाय्य करणारे पांच ऋतु उत्पन्न झाले आहेत, ते आमचे प्राण येथेंही आमच्याशीं सख्यानें राहोत. हे परमेष्ठिन् ! त्या तुला, हा (**रोहितः**) सूर्य आयुष्य आणि तेजासह धारण करो. (१८)

हे वाचस्पते ! आमचें (**मनः सौमनसं**) मन उत्तम शुभसंकल्पयुक्त होवो. (**नः गोष्ठे गाः जनय**) आमच्या गोशाळेंत उत्तम गायीं उत्पन्न कर आणि (**योनिषु प्रजाः**) घरांत संतति उत्पन्न कर. येथें आमच्या सख्यांत हे प्राण राहोत. हे परमेष्ठिन् ! त्या तुला (**अहं**) मीं आयुष्य आणि तेजासह (**दधामि**) धारण करतों. (१९)

(**सविता देवः त्वा परि धात्**) सविता देव तुझ्या चारही बाजूस राहो. (**अग्निः वर्चसा, मित्रावरुणौ त्वा अभि**) अग्नि स्वतःच्या तेजानें, तसेंच मित्र आणि वरुण चारी बाजूंस तुझें रक्षण करोत. (**सर्वाः अरातीः अवक्रामन् एहि**) सर्व शत्रूंवर चढाई करीत तूं पुढें चल. (**इदं राष्ट्रं सूनृतावत् अकरः**) या राष्ट्रास आनंदपूर्ण कर. (२०)

भावार्थ— हा एकच देव पृथ्वी, अंतरिक्ष आणि द्युलोकांत विद्यमान आहे. हा द्युलोकाच्या उच्च स्थानीं असूनसुद्धां सर्वांत व्यापून राहिला आहे. (१६)

हे वाणीच्या अधिपते ! आमच्यासाठीं पृथ्वी, घर, बिछाना इत्यादि सर्व पदार्थ सुखदायक होवोत. आमच्यांत प्राण दीर्घकालपर्यंत राहोत आणि आम्हांस तेजासह दीर्घ आयुष्य प्राप्त होवो. (१७)

जे विविध कर्में करणारे ऋतु आहेत, ते आम्हांस सहायक होवोत, आणि आम्हांस दीर्घ आयुष्य आणि तेजस्विता प्राप्त होवो. (१८)

आमचें मन शुभसंकल्प करणारें होवो. आमच्या गोशाळेंत पुष्कळ गायी राहोत, आणि आमच्या घरांत वीर संतान (निर्माण) होवो. मी दीर्घायुष्य आणि तेजस्वितेसह परमात्म्यास धारण करतों. (१९)

सर्व देव आमचे सहायक होवोत. सर्व शत्रूंचा पराजय होवो आणि हें आमचें राष्ट्र आनंद आणि प्रसन्नतेनें युक्त होवो. (२०)

यं त्वा पृषती रथे प्रष्टिर्वहति रोहित । शुभा यासि रिणन्नपः ॥ २१ ॥
अनुव्रता रोहिणी रोहितस्य सूरिः सुवर्णा बृहती सुवर्चाः ।
तया वाजान्विश्वरूपां जयेम तया विश्वाः पृतना अभि ष्याम ॥ २२ ॥
इदं सदो रोहिणी रोहितस्यासौ पन्थाः पृषती येन याति ।
तां गन्धर्वाः कश्यपा उन्नयन्ति तां रक्षन्ति कवयोऽप्रमादम् ॥ २३ ॥
सूर्यस्याश्वा हरयः केतुमन्तः सदा वहन्त्यमृताः सुखं रथम् ।
घृतपावा रोहितो भ्राजमानो दिवं देवः पृषतीमा विवेश ॥ २४ ॥
यो रोहितो वृषभस्तिग्मशृङ्गः पर्यग्निं परि सूर्यं बभूव ।
यो विष्टभ्नाति पृथिवीं दिवं च तस्माद्देवा अधि सृष्टीः सृजन्ते ॥ २५ ॥
रोहितो दिवमारुहन्महतः पर्यर्णवात् । सर्वा रुरोह रोहितो रुहः ॥ २६ ॥

अर्थ— हे (**रोहित**) सूर्या ! (**यं त्वा पृषतीः पृष्टिः वहति**) ज्या तुला विविध रंगाची घोडी घेऊन जाते, असा तूं (**अपः रिणन् शुभा यासि**) पाण्यास चालवित प्रकाशासह शुभरीतीनें येतोस. (२१)

(**रोहितस्य अनुव्रता**) सूर्यास अनुकूल चालणारी (**सूरिः सुवर्णा सुवर्चाः बृहती रोहिणी**) ज्ञानी, उत्तम रंगाची, तेजस्वी मोठी रोहिणी आहे. तिच्यापासून (**विश्वरूपान् वाजान् जयेम**) आम्हीं अनेक प्रकारें अन्न प्राप्त करूं, आणि (**विश्वाः पृतनाः अभिष्याम**) सर्व शत्रूंच्या सेनांना पराजित करूं. (२२)

(**इदं रोहितस्य सदः रोहिणी**) या सूर्याचें घर रोहिणी आहे. (**असौ पन्थाः येन पृषती याति**) हा मार्ग तोच आहे जिकडून त्याची विविध रंगाची घोडी जाते. (**तां गन्धर्वाः कश्यपाः उन्नयंति**) त्यास गंधर्व आणि कश्यप उन्नत करतात. (**कवयः तां अप्रमादं रक्षन्ति**) ज्ञानी लोक प्रमादरहित होऊन त्याचें रक्षण करतात. (२३)

(**केतुमन्तः अमृताः हरयः अश्वाः सूर्यस्य रथं सदा सुखं वहन्ति**) प्रकाशयुक्त अमर गतिमान् घोडे सूर्याच्या रथाला नेहमीं सहज चालवितात. (**घृतपावा भ्राजमानः देवः रोहितः इमा पृषती दिवं विवेश**) घृतानें पवित्र होणारा तेजस्वी सूर्यदेव या विविध रंगाच्या प्रभेसह द्युलोकांत प्रवेश करतो. (२४)

(**यः तिग्मशृंगः वृषभः रोहितः**) जो तीक्ष्ण शिंगाचा बलवान् रोहित (**अग्निं परि, सूर्यं परि बभूव**) अग्नि आणि सूर्य यांच्या चोहों बाजूनें असतो (**यः पृथिवीं दिवं च विष्टभ्नाति**) जो पृथ्वी आणि द्युलोकास टिकवून धरतो. (**तस्मात् देवाः सृष्टीः अधिसृजन्ते**) त्यापासून हें देव सृष्टीची उत्पत्ति करतात. (२५)

(**महतः अर्णवात् रोहितः दिवं परि आरुहत्**) महासमुद्रांतून सूर्य द्युलोकापेक्षांहि वर चढला आहे. (**रोहितः सर्वाः रुहः रुरोह**) हा सूर्य सर्व उंच स्थानापेक्षांहि वर चढला आहे. (२६)

भावार्थ— सूर्याच्या विविध रंगाचीं किरणें सूर्यतत्त्वाला येथपर्यंत आणतात. त्यामुळें आम्हांस प्रकाश मिळतो. (२१)

सूर्यप्रकाशांत प्रगति करविण्याची शक्ति आहे, त्यामुळें आम्हांस अनेक प्रकारचीं अन्नें आणि पुष्कळ सामर्थ्य प्राप्त होतें. (२२)

सूर्यच या अद्भुत शक्तीचें घर आहे. सर्व विविधरंगाचीं सूर्यकिरणें सर्वदा शक्ति पसरवितात. ज्ञानी लोक विशेष दक्षतेनें त्यांस स्वतःच्या अंतरांत धारण करतात. (२३)

हीं प्रकाशमान् अद्भुत अमर शक्तीनें युक्त किरणें सर्वदा सुखदायक असतात. या पुष्टिकारक किरणांनीं युक्त असा सूर्य या द्युलोकांत प्रकाशत आहे. (२४)

हा तीक्ष्ण किरणांचा बलवान् सूर्य चारी बाजूस फिरून जगतांतील सर्व पदार्थांस धारण करतो. (२५)

सूर्य उदयानंतर आकाशाच्या मध्यापर्यंत वर चढतो आणि तेथून सर्वांवर प्रकाश पाडतो. (२६)

*

वि मिमीष्व पयस्वतीं घृताचीं देवानां धेनुरनपस्पृगेषा ।
इन्द्रः सोमं पिबतु क्षेमो अस्त्वग्निः प्र स्तौतु वि मृधो नुदस्व ॥ २७ ॥
समिद्धो अग्निः समिधानो घृतवृद्धो घृताहुतः ।
अभीषाड् विश्वाषाडग्निः सपत्नान्हन्तु ये मम ॥ २८ ॥
हन्त्वेनान्प्र दहत्वरिर्यो नः पृतन्यति । क्रव्यादाग्निना वयं सपत्नान्प्र दहामसि ॥ २९ ॥
अवाचीनानव जहीन्द्र वज्रेण बाहुमान् । अधा सपत्नान्मामकानग्नेस्तेजोभिरादिषि ॥ ३० ॥
अग्ने सपत्नानधरान्पादयास्मद्व्यथया सजातमुत्पिपानं बृहस्पते ।
इन्द्राग्नी मित्रावरुणावधरे पद्यन्तामप्रतिमन्यूयमानाः ॥ ३१ ॥
उद्यंस्त्वं देव सूर्य सपत्नानव मे जहि । अवैनानश्मना जहि ते यन्त्वधमं तमः॥ ३२ ॥
वत्सो विराजो वृषभो मतीनामा रुरोह शुक्रपृष्ठोऽन्तरिक्षम् ।
घृतेनार्कमभ्यर्चन्ति वत्सं ब्रह्म सन्तं ब्रह्मणा वर्धयन्ति ॥ ३३ ॥

अर्थ-- (पयस्वतीं घृताचीं वि मिमीष्व) दूध देणाऱ्या आणि तूप देणाऱ्या गाईंना सिद्ध करा. (एषा देवानां धेनुः अनपस्पृक्) या देवांची गाय हालचाल न करणारी आहे. (इन्द्रः सोमं पिबतु) इंद्र सोम पीवो, (क्षेमः अस्तु) सर्वांचें क्षेम असो, (अग्निः प्र स्तौतु) अग्नि स्तुति करो. (मृधः विनुदस्व) शत्रूंना दूर कर. (२७)

(अग्निः समिद्धः घृतवृद्धः घृताहुतः समिधानः) अग्नि चांगल्याप्रकारें प्रदीप्त झाल्यावर त्यांत तुपाच्या आहुति टाकून तयार केलेला अग्नि उत्तम प्रकारें जळत आहे. तो (अभिषाड् विश्वाषाड् अग्निः ये मम सपत्नान् हन्तु) सर्वत्र विजय मिळवून शत्रूंना दूर करणारा अग्नि जे माझे शत्रु आहेत त्यांचा नाश करो. (२८)

(यः अरिः नः पृतन्यति) जे शत्रु आमच्यावर सैना आणून हल्ला करतात (एतान् हन्तु प्रदहतु) त्या शत्रूंस मारून टाको, जाळून भस्म करो. (क्रव्यादा अग्निना वयं सपत्नान् प्र दहामसि) मांसभक्षक अग्निद्वारा आम्हीं शत्रूंना भस्म करतों. (२९)

हे इंद्रा ! (वज्रेण बाहुमान् अवाचीनान् अवजहि) वज्रानें पुष्कळ सामर्थ्यवान् होऊन शत्रूंस खालीं दाबून मारून टाक. (अधा मामकान् सपत्नान् अग्नेः तेजोभिः आदिषि) आणि माझ्या शत्रूंस अग्नीच्या तेजांनीं स्वतःच्या आधीन करून घेतों. (३०)

हे अग्नि ! (सपत्नान् अस्मान् अधरान् पादय) आमच्या शत्रूंस आम्हां समक्ष तूं खालीं पाडावेंस. हे बृहस्पति ! (उत्पिपानं सजातं व्यथय) दुःख देणाऱ्या सजातीय शत्रूंस पीडा दे. हे इंद्राग्नि, हे मित्रावरुणहो ! (अप्राति मन्यूयमानाः अधरे पद्यन्ताम्) आमचे शत्रु निष्फळ क्रोध करून ते खालीं पडूं देत. (३१)

हे सूर्यदेव ! (त्वं उद्यन् मे सपत्नान् अवजहि) तूं उगवतां उगवतां माझ्या शत्रूंचा नाश कर. (एनान् अश्मना अवजहि) या शत्रूंचा दगडांनीं नाश कर. (ते अधमं तमः यन्तु) ते घोर अंधःकारांत जावोत. (३२)

(विराजः वत्सः मतीनां वृषभः शुक्रपृष्ठः अन्तरिक्षं आ रुरोह) विराटाचा पुत्र, बुद्धींना वाढविणारा बलशाली होऊन अंतरिक्षांवर चढला आहे. (घृतेन वत्सं अर्कं अभि अर्चन्ति) ते तुपानें वत्सरूप सूर्याची पूजा करतात. ते स्वतः (ब्रह्म सन्तं ब्रह्मणा वर्धयन्ति) ब्रह्म असून ज्ञानपूर्ण स्तुतींनीं सर्वांचें संवर्धनहि करतात. (३३)

भावार्थ— उत्तम दूध आणि तूप देणाऱ्या गायी पाळल्या जाव्या. त्या गाईच्या दूध आणि तुपाचें यज्ञांत हवन व्हावें. दहीदुधाबरोबर सोमरस प्यावा. त्यामुळें सर्वांचें कल्याण होईल, आणि या यज्ञाच्या द्वारें झालेली उपासना सर्वांचें कल्याण करील. (२७-२८)

दिवं च रोह पृथिवीं च रोह राष्ट्रं च रोह द्रविणं च रोह ।
प्रजां च रोहामृतं च रोह रोहितेन तन्वं१ सं स्पृशस्व ॥ ३४ ॥
ये देवा राष्ट्रभृतोऽभितो यन्ति सूर्यम् । तैष्टे रोहितः संविदानो राष्ट्रं दधातु सुमनस्यमानः ॥ ३५ ॥
उत्त्वा यज्ञा ब्रह्मपूता वहन्त्यध्वगतो हरयस्त्वा वहन्ति । तिरः समुद्रमति रोचसेऽर्णवम् ॥ ३६ ॥
रोहिते द्यावापृथिवी अधि श्रिते वसुजिति गोजिति संधनाजिति ।
सहस्रं यस्य जनिमानि सप्त च वोचेयं ते नाभिं भुवनस्याधि मज्मनि ॥ ३७ ॥
यशा यासि प्रदिशो दिशश्च यशाः पशूनामुत चर्षणीनाम् ।
यशाः पृथिव्या अदित्या उपस्थेऽहं भूयासं सवितेव चारुः ॥ ३८ ॥
अमुत्र सन्निह वेत्थेतः संस्तानि पश्यासि । इतः पश्यन्ति रोचनं दिवि सूर्यं विपश्चितम् ॥ ३९ ॥

अर्थ— (**दिवं च रोह, पृथिवीं च रोह**) द्युलोकावर व पृथ्वी लोकावर चढ (**राष्ट्रं च रोह द्रविणं च रोह**) राष्ट्रावर चढ आणि धनावर चढ (**प्रजां च रोहअमृतं च रोह**) प्रजा आणि अमरत्व यांवर चढ (**रोहितेन तन्वं सं स्पृशस्व**) तुझ्या लाल रंगानें माझ्या शरीरास स्पर्श कर. (३४)

(**ये राष्ट्रभृतः देवाः सूर्यं अभितः यन्ति**) जे राष्ट्रपोषक देव सूर्याच्या चारीबाजूंस फिरत आहेत (**तैः संविदानः रोहितः सुमनस्यमानः ते राष्ट्रं दधातु**) त्याशीं मिळालेला रोहित सुप्रसन्न होऊन तुझ्या राष्ट्रास धारण करो. (३५)

(**ब्रह्मपूताः यज्ञाः त्वा उत् वहन्ति**) मंत्रानें पवित्र झालेले यज्ञ तुला वर उठवितात. (**अध्वगतः हरयः त्वा वहन्ति**) मार्गानें जाणारे घोडे तुला घेऊन जातात. (**समुद्रं अर्णवं तिरः अति रोचसे**) समुद्र आणि महासागर यांच्या पलीकडे तू प्रकाशित करतोस. (३६)

(**वसुजिति गोजिति संधनाजिति रोहिते द्यावापृथिवी अधिश्रिते**) धन, गायी आणि ऐश्वर्य प्राप्त करणारेच सूर्याच्या आश्रयानें द्युलोक आणि भूलोक राहिले आहेत. (**यस्य सहस्रं सप्त च जनिमानि**) ज्या तुझे हजार आणि सात जन्म झाले आहेत. (**भुवनस्य मज्मनि अधि ते नाभिं वोचेयम्**) या जगाच्या महिम्याचें तूं केंद्र आहेस असें मीं म्हणेन. (३७)

(**प्रदिशः दिशः च यशाः यासि**) दिशा आणि उपदिशांत यशस्वी होऊन तूं जात आहेस. (**पशूनां उत चर्षणीनां यशाः**) पशु आणि प्रजेंत यशस्वी होऊन तूं जात आहेस. (**पृथिव्याः अदित्याः उपस्थे यशाः**) पृथ्वीवर आणि अदितीच्या पुढें तूं यशस्वी होऊन (**अहं सविता इव चारुः भूयासं**) मीं सूर्यासारखा सुंदर होईन. (३८)

(**अमुत्र सन् इह वेत्थ इतः सन् तानि पश्यसि**) तेथें राहून येथील ज्ञान प्राप्त करतोस आणि येथें राहून तेथील पहातोस (**इतः दिवि रोचनं विपश्चितं सूर्यं पश्यन्ति**) येथून द्युलोकांत अशा प्रकाशमान् सूर्यास ज्ञानी लोक पहातात. (३९)

भावार्थ— अग्नीमध्यें तुपाचें हवन होवो, अग्नीच्या उपासनेनें समाजाची संघटना होवो आणि सर्व मिळून स्वतःच्या शत्रूंना दूर पळवून लावोत. स्वतःच्या आंत जे शत्रु आहेत त्यासुद्धां ताब्यांत ठेविलें पाहिजे. कोणाहि शत्रूनें वर डोकें काढतां कामा नये. (२९-३६)

धन, गाई आणि ऐश्वर्य सूर्याशीं संबंधित आहे. त्याचे हजार प्रकार आहेत. सर्वांचें मध्य केंद्र सूर्यच आहे. (३७)

दिशा, उपदिशा, पशु, प्रजाजन, भूमि वगैरे सर्वांचें यश केवळ सूर्य आहे. सूर्यास आदर्श समजून सर्वांनीं सूर्यासारखें सुंदर बनावें. (३८)

सूर्य दूरदूरचे प्रदेश पहातो. द्युलोकांत राहून सुद्धां सर्वत्र प्रकाशतो. (३९)

देवो देवान्मर्चयस्यन्तश्चरस्यर्णवे । समानमग्निमिन्धते तं विदुः कवयः परे ॥ ४० ॥
अवः परेण पर एनावरेण पदा वत्सं बिभ्रती गौरुदस्थात् ।
सा कद्रीची कं स्विदर्धं परागात्क्व स्वित्सूते नहि यूथे अस्मिन् ॥ ४१ ॥
एकपदी द्विपदी सा चतुष्पद्यष्टापदी नवपदी बभूवुषी ।
सहस्राक्षरा भुवनस्य पङ्क्तिस्तस्याः समुद्रा अधि वि क्षरन्ति ॥ ४२ ॥
आरोहन्द्यामृमृतः प्राव मे वचः । उत्त्वा यज्ञा ब्रह्मपूता वहन्त्यध्वगतो हरयस्त्वा वहन्ति ॥४३॥
वेद तत्ते अमर्त्य यत्त आक्रमणं दिवि । यत्ते सधस्थं परमे व्योमन् ॥ ४४ ॥
सूर्यो द्यां सूर्यः पृथिवीं सूर्य आपोऽति पश्यति । सूर्यो भूतस्यैकं चक्षुरा रुरोह दिवं महीम् ॥४५॥

अर्थ— (देवः देवान् मर्चयसि, अर्णवे अन्तः चरसि) प्रकाशमान् होऊन दुसऱ्या प्रकाशणाऱ्यांस शुद्ध करतोस, समुद्रांत संचार करतोस (समानं अग्निं इंधते) समान तेजस्वी अग्नीस प्रदीप्त करतोस (कवयः तं परे विदुः) ज्ञानी त्यास निराळा समजतात. (४०)

(एना गौः अवः परेण, परः अवरेण पदा वत्सं बिभ्रती) ही गाय जवळच्या स्थानांत राहणाऱ्यास दूरच्या पावलांनीं आणि दूरच्यांस जवळच्या पावलांनीं वासरास धारण करीत (उत् अस्थात्) वर उठते (सा कद्रीची कं स्विद् अर्धं परा अगात्) ती कोठून येते आणि कोणत्या अर्धभागाजवळ जाते? ती (क्व स्वित् सूते) कोठें प्रसूत होते (अस्मिन् यूथे न) या संघांत तर होत नाहीं. (४१) (ऋ. १।१६४।१७; अथर्व ९।९।१७)

(सा एकपदी द्विपदी चतुष्पदी अष्टापदी नवपदी बभूवुषी) ती एक, दोन, चार, आठ, नऊ पायांची, तसेच पुष्कळ होण्याची इच्छा करणारी (सहस्राक्षरा भुवनस्य पंक्तिः) हजारों अक्षरांची भुवनांच्या पंक्ति आहेत. (तस्याः समुद्राः अधि विक्षरन्ति) तिच्यामुळें सर्व समुद्रांचे रस वहातात. (४२) (ऋ. १।१६४।४१; अथर्व. ९।१०।२१)

(अमृतः द्यां आरोहन् मे वचः प्र अव) तूं अमरदेव द्युलोकावर आरूढ होऊन माझ्या भाषणाचें रक्षण कर. (त्वा ब्रह्मपूताः यज्ञाः उत् वहन्ति) मंत्रानें पवित्र झालेले यज्ञ तुझी वृद्धि करतात. तसेंच (अध्वगतयः हरयः त्वा वहन्ति) रस्त्यानें चालणारे घोडे तुला घेऊन चालतात. (४३)

हे (अमर्त्य) देव! (यत् ते दिवि आक्रमणं) तुझें द्युलोकांत जें आक्रमण आहे तें आणि (यत् ते परमे व्योमन् सधस्थं) तुझें जें दूर आकाशांत स्थान आहे, (तत् ते वेद) तें तुझें तुला माहित आहे. (४४)

(सूर्यः द्यां सूर्यः पृथिवीः सूर्यः आपः अति पश्यति) सूर्य द्युलोक, पृथ्वी आणि जलांना पूर्णपणानें पहातो. (सूर्यः भुवनस्य एकः चक्षुः महीं दिवं आरुरोह) सूर्य सर्व भुवनांचा एकच नेत्र आहे. तो महान् द्युलोकावर आरूढ झालेला आहे. (४५)

भावार्थ— सूर्य सर्व प्रकाशकेन्द्रांना सुद्धां प्रकाशित करतो. त्याच्या उदयानें अग्नि प्रदीप्त होतो. ज्ञानी लोक सूर्यालाच श्रेष्ठ मानतात. (४०)

ही गाय दूरच्या पावलांनीं जवळच्या आणि जवळच्या पावलांनीं दूरच्या वत्साचें भरणपोषण करते. ती कोठून आली, कीं जी अर्ध्या भागास धारण करते ? तिची प्रसूति कोठें होते ? तें जाणलें पाहिजे. ती या संघांत रहात नाहींच. (४१)

ही वाणीरूप गाय म्हणजे काव्यमय वाणी, एक, दोन, चार, आठ अथवा नऊ पदांच्या छंदांत विभक्त झालेली आहे. ती अनेक प्रकारची आहे, आणि हजारों अक्षरांपर्यंत तिची मर्यादा पसरलेली आहे. जणूं काय ती सर्व भुवनांना पूर्ण करणारी आहे, आणि तिच्यांतून विविध काव्यरस स्रवत आहेत. (४२)

सूर्य वाणीचा रक्षक आहे. आकाशांत चढून तो सर्वांस शक्ति देतो. सर्व यज्ञ त्याचें महात्म्य वाढवितात. त्याचे किरण त्याला सर्व जगांत सर्व स्थळीं पोहोंचवितात. (४३)

सूर्याचें स्थान द्युलोकांत आहे, त्याचें महत्त्व हे सर्व ज्ञानी लोक जाणतात. (४४)

उर्वीरासन्परिधयो वेदिर्भूमिरकल्पत । तत्रैतावग्नी आधत्त हिमं घ्रंसं च रोहितः ॥ ४६ ॥
हिमं घ्रंसं चाधाय यूपान्कृत्वा पर्वतान् । वर्षाज्यावग्नी ईजाते रोहितस्य स्वर्विदः ॥ ४७ ॥
स्वर्विदो रोहितस्य ब्रह्मणाग्निः समिध्यते । तस्माद्घ्रंसस्तस्माद्धिमस्तस्माद्यज्ञोऽजायत ॥ ४८ ॥
ब्रह्मणाग्नी वावृधानौ ब्रह्मवृद्धौ ब्रह्माहुतौ । ब्रह्मेद्धावग्नी ईजाते रोहितस्य स्वर्विदः ॥ ४९ ॥
सत्ये अन्यः समाहितोऽप्स्वन्यः समिध्यते । ब्रह्मेद्धावग्नी ईजाते रोहितस्य स्वर्विदः ॥ ५० ॥
यं वातः परि शुम्भति यं वेन्द्रो ब्रह्मणस्पतिः । ब्रह्मेद्धावग्नी ईजाते रोहितस्य स्वर्विदः ॥ ५१ ॥
वेदिं भूमिं कल्पयित्वा दिवं कृत्वा दक्षिणाम् ।
घ्रंसं तदग्निं कृत्वा चकार विश्वमात्मन्वद्वर्षेणाज्येन रोहितः ॥ ५२ ॥
वर्षमाज्यं घ्रंसो अग्निर्वेदिर्भूमिरकल्पत । तत्रैतान्पर्वतानग्निर्गीर्भिरूर्ध्वाँ अकल्पयत् ॥ ५३ ॥

अर्थ—(ऊर्वीः परिधयः आसन्) मोठ्या परिधी होत्या. (भूमिः वेदिः अकल्पयत्) भूमीस वेदी करण्यांत आलें. (तत्र रोहितः हिमं घ्रंसं च एतौ अग्नी आधत्त) तेथें सूर्यानें शीत आणि उष्ण असे दोन अग्नि स्थापित केले आहेत. (४६)

(हिमं घ्रंसं च आधाय पर्वतान् यूपान् कृत्वा) शीत आणि उष्ण हे ऋतु करून आणि पर्वतांस यूप बनवून (वर्षाज्यौ अग्नी स्वर्विदः रोहितस्य ईजाते) वर्षारूपी तुपानें यज्ञ करणारे हे दोन अग्नि रोहित देवासाठीं यज्ञ करतात. (४७)

(स्वर्विदः रोहितस्य ब्रह्मणा अग्निः समिध्यते) आत्मज्ञानी सूर्याच्या मंत्रांनीं अग्नि प्रदीप्त करण्यांत येतो. (तस्माद् घ्रंसः तस्मात् हिमः तस्मात् यज्ञः अजायत) त्याच्यापासून उष्णता, त्याच्यापासून थंडी आणि त्याच्यापासून यज्ञ करण्यांत येतो. (४८)

(ब्रह्मणा वावृधानौ ब्रह्मवृद्धौ ब्रह्माहुतौ अग्नी) ज्ञानानें वृद्धि पावणारे, मंत्रांसह प्रदीप्त होणारे, मंत्रांनीं हवन केले गेलेले हे दोन अग्नि आहेत. (स्वर्विदः रोहितस्य ब्रह्मेद्धौ अग्नी ईजाते) आत्मज्ञानी सूर्याच्या प्रकाशांत मंत्रानें प्रज्वलित केलेले हे दोन अग्नी प्रदीप्त होतात. (४९)

(अन्यः सत्ये समाहितः) एक सत्यांत स्थिर आहे (अन्यः अप्सु समिध्यते) दुसरा पाण्यांत प्रदीप्त होतो. (स्वर्विदः रोहितस्य ब्रह्मेद्धौ अग्नी ईजाते) आत्मज्ञानी सूर्याच्या प्रकाशांत या मंत्रांनीं पेटविलेले हे दोन्ही अग्नि प्रदीप्त होतात. (५०)

(वातः इंद्रः ब्रह्मणस्पतिः वा यं परि शुंभति) वायु इंद्र आणि ब्रह्मणस्पति हे त्यांच्यासाठीं प्रकाश पसरवित आहेत त्या (स्वर्विदः) आत्मज्ञानी सूर्य देवासाठीं हे अग्नि प्रकाशित होत आहेत. (५१)

(भूमिं वेदिं कृत्वा दिवं दक्षिणां कृत्वा) भूमीची वेदी तयार करून आणि द्युलोकाची दक्षिणा करून (घ्रंसं तदग्निं कृत्वा वर्षेण आज्येन रोहितः विश्वं आत्मन्वत् चकार) उष्ण ऋतूस तेथील अग्नि बनवून वृष्टिरूपी तुपानें, सूर्यानें सर्व जगास आत्मसात् केलें आहे. (५२)

(वर्षं आज्यं घ्रंसः अग्निः भूमिः वेदिः अकल्पयत्) वृष्टीस तूप, उष्णतेस अग्नि, भूमीस वेदी करण्यांत आलें (तत्र अग्निः गीर्भिः एतान् पर्वतान् ऊर्ध्वान् अकल्पयत्) तेथें अग्नीनें शब्दांच्या सहाय्यानें पर्वतांस उंच केलें आहे. (५३)

भावार्थ— सूर्य, द्युलोक आकाश पृथ्वी, पाणी या सर्वांस पहातो. सूर्यच सर्वांचा प्रकाशक आहे. तो पृथ्वी आणि आकाशास प्रकाशित करतो. (४५)

या यज्ञाचा प्रारंभ भूमीरूपी वेदीवर झाला, त्याच्या मर्यादा फार विस्तृत होत्या, शीत काळ आणि उष्णकाळ असे दोन अग्नि या यज्ञांत होते. (४६)

गीर्भिरूर्ध्वान्कल्पयित्वा रोहितो भूमिमब्रवीत् । त्वयीदं सर्वं जायतां यद्भूतं यच्च भाव्यम् ॥ ५४ ॥
स यज्ञः प्रथमो भूतो भव्यो अजायत ।
तस्माद्ध जज्ञ इदं सर्वं यत्किं चेदं विरोचते रोहितेन ऋषिणाभृतम् ॥ ५५ ॥
यश्च गां पदा स्फुरति प्रत्यङ्सूर्यं च मेहति । तस्य वृश्चामि ते मूलं न च्छायां करवोऽपरम् ॥ ५६ ॥
यो माभिच्छायमत्येषि मां चाग्निं चान्तरा । तस्य वृश्चामि ते मूलं न च्छायां करवोऽपरम् ॥ ५७ ॥
यो अद्य देव सूर्य त्वां च मां चान्तरायति । दुष्वप्न्यं तस्मिञ्छमलं दुरितानि च मृज्महे ॥ ५८ ॥
मा प्र गाम पथो वयं मा यज्ञादिन्द्र सोमिनः । मान्त स्थुर्नो अरातयः ॥ ५९ ॥
यो यज्ञस्य प्रसाधनस्तन्तुर्देवेष्वाततः । तमाहुतमशीमहि ॥ ६० ॥

अर्थ— (गीर्भिः ऊर्ध्वान् कल्पयित्वा रोहितः भूमिं अब्रवीत्) शब्दांनीं पर्वतांस उंच बनवून सूर्यानें पृथ्वीस म्हटलें कीं (यत् भूतं यच्च भाव्यं सर्वं त्वयीदं जायताम्) जें झालें आहे आणि जें, व्हावयाचें आहे तें सर्व तुझें होऊन राहो. (५४)

(सः प्रथमः यज्ञः भूतः भव्यः अजायत्) तो पहिला यज्ञ भूत काळ आणि भविष्यकाळांसाठीं झाला. (तस्मात् इदं सर्वं जज्ञे, यत् किं च इदं विरोचते) जें कांहीं प्रकाशतें तें त्याच्यापासून उत्पन्न झालें आहे. (ऋषिणा रोहितेन आभृतं) रोहित-ऋषीनें-सूर्यदेवानें त्याचें पालनपोषण केलें आहे. (५५)

(यः गां च पदा स्फुरति) जो गायींस पायानें लाथ मारतो (सूर्यं च प्रत्यङ् मेहति) किंवा सूर्यासमोर लघ्वी करतो, (तस्य ते मूलं वृश्चामि, परं छायां न करवः) त्या पुरुषाचें मूळ मीं कापून टाकतों आणि त्यानंतर तूं तुझी छाया तेथें करूं नकोस. (५६)

(यः मां अभिच्छायं अत्येषि) तूं जो मला स्वतःच्या छायेंत ठेवून चालतोस, (मां अग्निं च अंतरा) माझ्या आणि अग्नीच्या मधून जो जातो त्याचे मूळ मीं कापून टाकतो, ज्यामुळें नंतर तूं त्याच्यावर छाया करूं शकणार नाहींस. (५७)

हे देव सूर्य ! (यः अद्य त्वां च मां च अंतरा आयति) जो आज तुझ्या आणि माझ्यामध्यें येतो (तस्मिन् दुष्वप्न्यं शमलं दुरितानि च मृज्महे) त्यांत दुष्ट स्वप्न, दुष्ट कल्पना आणि पाप यांची शुद्धि आम्ही करतों. (५८)

(वयं पथः मा प्रगाम) आम्हीं मार्ग सोडणार नाहीं. हे इंद्रा ! (सोमिनः यज्ञात् मा) आम्हीं सोमयागापासून दूर न व्हावें. (नः अरातयः अन्तः मा तस्थुः) आमचे शत्रु आमच्या उन्नतींच्या आड न येवोत. (५९)

(यः यज्ञस्य प्रसाधनः तन्तुः देवेषु आततः) जो यज्ञाचा साधक ज्ञानतंतु देवांत पसरलेला आहे. (तं आहुतं अशीमहि) त्याचें सेवन आम्हीं करावें. (६०) (ऋ. १०।५७।२)

भावार्थ— पर्वतास यूप (यज्ञस्तंभ) बनविण्यांत आलें, पाऊस तुपाचें काम करूं लागला, आणि मंत्रपाठानें या यज्ञास प्रारंभ झाला. त्यांत वायु ब्रह्मणस्पति बनून कार्य करूं लागला. स्वर्ग हीच दक्षिणा याजकांसाठीं ठेवण्यांत आली. या यज्ञानें आत्मिक बल सर्वांत प्राप्त झालें. (४७–५३)

जें भूत, भविष्य, वर्तमान आहे तें सर्व त्याच्याशीं संबंध ठेवतें. (५४)

हा यज्ञ भूत, भविष्यासाठीं आदर्श झाला. या यज्ञानें सर्व कांहीं झालें. (५५)

जो गायींस लाथ मारतो, सूर्यासमोर मलमूत्रादि त्याग करतो तो दंडास पात्र आहे. (५६)

जे स्वतःच्या छायेंत दुसऱ्यास ठेवतात, अग्नि, सूर्य आणि त्यांच्या उपासकांच्या मध्यें येतात (अंतरायरूप होतात) ते सुद्धां दंडनीय आहेत. (५७–५८)

आम्हीं आमचा शुद्ध मार्ग कधीं न सोडावा, यज्ञांपासून दूर न व्हावें, आमचे शत्रू कधींही प्रबळ न व्हावेत. (५९)

जो यज्ञ देवामध्यें देवत्वाचें लक्षण होऊन राहिला आहे तो आम्हां सर्वांत आहे. (६०)

अध्यात्मम्

कांड १३, सूक्त २

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- अध्यात्मं, रोहितादित्यदैवत्यं)

उदस्य केतवो दिवि शुक्रा भ्राजन्त ईरते । आदित्यस्य नृचक्षसो महिव्रतस्य मीढुषः ॥ १ ॥
दिशां प्रज्ञानां स्वरयन्तमर्चिषा सुपक्षमाशुं पतयन्तमर्णवे ।
स्तवाम सूर्यं भुवनस्य गोपां यो रश्मिभिर्दिश आभाति सर्वाः ॥ २ ॥
यत्प्राङ् प्रत्यङ् स्वधया यासि शीभं नानारूपे अहनी कर्षि मायया ।
तदादित्य महि तत्ते महि श्रवो यदेको विश्वं परि भूम जायसे ॥ ३ ॥
विपश्चितं तरणिं भ्राजमानं वहन्ति यं हरितः सप्त बह्वीः ।
स्रुताद्यमत्त्रिर्दिवमुन्निनाय तं त्वा पश्यन्ति परियान्तमाजिम् ॥ ४ ॥

अर्थ— (मीढुषः महिव्रतस्य नृचक्षसः अस्य आदित्यस्य) सिंचन करणाऱ्या, महान् व्रतें करणाऱ्या, मनुष्यांचें निरीक्षण करणाऱ्या या सूर्याचे (शुक्राः भ्राजन्तः केतवः उत् ईरते) शुद्ध तेजस्वी किरण उदय पावून चकाकत आहेत. (१)

(अर्चिषा प्रज्ञानां दिशां स्वरयन्तं) प्रकाशानें जाणणाऱ्या दिशांना प्रकाशित करणाऱ्या (अर्णवे सुपक्षं आशुं पतयन्तं) समुद्रांत उत्तम किरणांनीं चालणाऱ्या, (भुवनस्य गोपां सूर्यं स्तवाम) त्रिभुवनाच्या रक्षक सूर्याची आम्हीं प्रशंसा करतों. (यः रश्मिभिः सर्वाः दिशः आभाति) जो स्वतःच्या किरणांनीं सर्व दिशांना प्रकाशित करतो. (२)

(यत् प्राङ् प्रत्यङ् स्वधया शीभं यासि) तूं तुझ्या धारकशक्तीनें पूर्व आणि पश्चिम दिशेस फार त्वरेनें जातोस. (मायया नानारूपे अहनी कर्षि) स्वतःच्या शक्तीनें अनेक रूपांच्या दिवस आणि रात्री बनवितोस. हे आदित्य ! (तत् ते महि महि श्रवः) तो तुझाच महान् महिमा आहे. (यत् एकः विश्वं भूम परि जायसे) जो तूं एकटा सर्व संसारावर प्रभाव पाडतोस. (३)

(बह्वीः सप्त हरितः) मोठीं सात किरणें (यं भ्राजमानं तरणिं विपश्चितं वहन्ति) जीं तेजस्वी तारक ज्ञानी देवास घेऊन जातात (यं अत्रिः स्रुतात् दिवं उन्निनाय) ज्यास अत्री [आत्म्या] नें वहाणाऱ्या जलापासून द्युलोकापर्यंत पोहोंचविलें आहे (तं त्वा आजिं परियान्तं पश्यन्ति) ते त्या तुला चारहि बाजूंस फिरतांना पहात आहेत. (४)

भावार्थ— सूर्यामुळें वृष्टि होते, तो महाव्रतधारी आहे. तो मनुष्यांचें निरीक्षण करतो. पृथ्वी वगैरे धारण करतो. त्याचा उदय झाल्यानें सर्व बाजूंस स्वच्छ प्रकाश होतो. (१)

तो सूर्य स्वतःच्या प्रकाशानें दाही दिशांस प्रकाशित करतो, अंतरिक्षांत संचार करतो. तो या सर्व भुवनांचें रक्षण करणारा आहे. त्याची स्तुति करणें योग्य आहे. (२)

जो पूर्वेस उदय पावून पश्चिमेस अस्तास जातो, जो आपल्या प्रकाशानें दिवस आणि अप्रकाशानें रात्र करतो, त्याचा महिमा मोठा आहे. तोच जगांत अत्यंत प्रभावशाली आहे. (३)

सात तेजस्वी किरणें सूर्याच्या प्रकाशास प्रभावयुक्त करितात. ज्ञानी लोक त्यांचें महत्त्व जाणतात. हा सूर्य द्युलोकावर चढून आपलें तेज सर्वत्र पसरवितो. (४)

मा त्वा दभन्परियान्तमाजिं स्वस्ति दुर्गाँ अति याहि शीभम् ।
दिवं च सूर्य पृथिवीं च देवीमहोरात्रे विमिमानो यदेषि ॥ ५ ॥
स्वस्ति ते सूर्य चरसे रथाय येनोभावन्तौ परियासि सद्यः ।
यं ते वहन्ति हरितो वहिष्ठाः शतमश्वा यदि वा सप्त बह्वीः ॥ ६ ॥
सुखं सूर्य रथमंशुमन्तं स्योनं सुवह्निमधि तिष्ठ वाजिनम् ।
यं ते वहन्ति हरितो वहिष्ठाः शतमश्वा यदि वा सप्त बह्वीः ॥ ७ ॥
सप्त सूर्यो हरितो यातवे रथे हिरण्यत्वचसो बृहतीरयुक्त ।
अमोचि शुक्रो रजसः परस्ताद्विधूय देवस्तमो दिवमारुहत् ॥ ८ ॥
उत्केतुना बृहता देव आगन्नपावृक्तमोऽभि ज्योतिरश्रैत् ।
दिव्यः सुपर्णः स वीरो व्यख्यददितेः पुत्रो भुवनानि विश्वा ॥ ९ ॥

अर्थ— (**परियान्तं आजिं त्वा मा दभन्**) चारी बाजूंस भटकणाऱ्या तुला शत्रू दाबून न टाकोत. (**स्वस्ति दुर्गान् शीभं अति याहि**) सुखरूपपणें कठिण स्थळांच्या पलीकडे त्वरित चल. हे सूर्य ! (**दिवं च देवीं पृथिवीं च अहोरात्रे विमिमानः यत् एषि**) द्युलोक आणि दिव्य पृथ्वीला अहोरात्र निर्माण करून तूं चालतोस. (५)

हे सूर्या ! (**ते चरसे रथाय स्वस्ति**) तुझ्या चालणाऱ्या रथाचें शुभमंगल असो. (**येन उभौ अन्तौ सद्यः परि यासि**) ज्यामुळें दोन्ही सीमापर्यंत तूं तत्काल जातोस. (**सप्त बह्वीः यदि वा वहिष्ठाः हरिताः शतं अश्वाः यं ते वहन्ति**) सात किरण अथवा चालणारीं शंभर अश्वरूप किरणें तुला चालवतात. (६)

हे सूर्या ! (**अंशुमन्तं स्योनं सुवह्निं वाजिनं सुखं रथं अधितिष्ठ**) तेजस्वी सुखदायक चालणाऱ्या गतिमान् उत्तम रथावर चढ. (**सप्त०**) तीं सात अथवा शंभर किरणें तुला घेऊन जात आहेत. (७)

(**सूर्यः हिरण्यत्वचसः बृहतीः सप्त हरितः यातवे रथे अयुक्त**) सूर्यानें सुवर्णासारख्या चमकणाऱ्या महान् सात किरणांस चालण्यासाठीं स्वतःच्या रथास जोडलें आहे. (**शुक्रः देवः तमो विधूय रजसः परस्तात् अमोचि दिवं आरुहत्**) शुद्ध देवानें अंधःकारास त्याच्या स्थानावरून दूर करून रजोलोकाच्या पलिकडे सोडलें आणि तो स्वतः द्युलोकावर चढला. (८)

(**देवः बृहता केतुना उत् आगन्**) सूर्यदेव पुष्कळ प्रकाशासह उदय पावला आहे. (**तमः अपावृक् ज्योतिः अश्रैत्**) त्यानें अंधःकारास दूर केलें आणि तेजाचा आश्रय केला आहे. (**सः दिव्यः सुपर्णः अदितेः वीरः पुत्रः विश्वा भुवनानि व्यख्यत्**) त्या दिव्य प्रकाशमान् आदितीच्या वीरपुत्र सूर्यानें सर्व भुवनांना प्रकाशित केलें आहे. (९)

भावार्थ— तूं सर्वत्र प्रकाशास पसरवितोस, तुझे किरण अतिशीघ्र गतीचे आहेत. तुझ्या प्रकाशानें सर्वांचें कल्याण होतें. तूं द्युलोक आणि पृथ्वी प्रकाशित करतोस, तसेंच दिवस आणि रात्री तूंच निर्माण करितोस. (५)

तुझा रथ कल्याणकारी आहे. त्यानेंच तूं उदयापासून अस्तापर्यंत आक्रमण करतोस. सात किरणें आणि अनंत प्रकाश तुझा प्रभाव वाढवित आहेत. (६)

तुझा रथ तेजस्वी, गतिमान्, सुखदायी व बलवान् आहे. त्याचीं किरणें तुझा प्रभाव वाढवित आहेत. (७)

सूर्य स्वतःच्या चमकणाऱ्या किरणांसहित रथांत विराजमान् झाला आहे. हा प्रकाशमान् देव अंधःकारास अत्यंत दूर पळवून लावतो आणि तो द्युलोकांत विराजमान् झाला आहे. (८)

सूर्याचा उदय होत आहे त्यामुळें अंधःकार दूर होत आहे. त्याच्या प्रकाशानें संपूर्ण विश्व प्रकाशित होतें. (९)

उद्यन्रश्मीना तनुषे विश्वा रूपाणि पुष्यसि ।
उभा समुद्रौ क्रतुना वि भासि सर्वांल्लोकान्परिभूर्भ्राजमानः ॥ १० ॥
पूर्वापरं चरतो माययैतौ शिशू क्रीडन्तौ परि यातोऽर्णवम् ।
विश्वान्यो भुवना विचष्टे हैरण्यैरन्यं हरितो वहन्ति ॥ ११ ॥
दिवि त्वात्त्रिरधारयत्सूर्या मासाय कर्तवे । स एषि सुधृतस्तपन्विश्वा भूतावचाकशत् ॥ १२ ॥
उभावन्तौ समर्षसि वत्सः संमातराविव । नन्वे३तदितः पुरा ब्रह्म देवा अमी विदुः ॥१३॥
यत्समुद्रमनु श्रितं तत्सिषासति सूर्यः । अध्वास्य विततो महान्पूर्वश्चापरश्च यः ॥ १४ ॥
तं समाप्नोति जूतिभिस्ततो नाप चिकित्सति । तेनामृतस्य भक्षं देवानां नाव रुन्धते ॥ १५ ॥

अर्थ— (**उद्यन् रश्मीन् आ तनुषे**) उदयानंतर तूं किरणें पसरवितोस. (**विश्वा रूपाणि पुष्यसि**) सर्व रूपांस पुष्ट करतोस. (**उभौ समुद्रौ क्रतुना विभासि**) दोन्ही समुद्रांस तूं यज्ञाच्या द्वारानें प्रकाशित करतोस आणि (**परिभूः भ्राजमानः सर्वान् लोकान्**) सर्वांवर प्रभाव पाडणारा तूं स्वतः तेजस्वी असल्यानें सर्व लोकांस प्रकाशित करतोस. (१०) [७]

(**एतौ शिशू क्रीडन्तौ मायया पूर्वापरं चरतः**) हे दोघे बालक म्हणजे सूर्य आणि चंद्र खेळतां खेळतां स्वतःच्या शक्तीनें मागें पुढें चालतात आणि (**अर्णवं परियातः**) समुद्रापर्यंत भ्रमण करीत पोंचतात. (**अन्यः विश्वा भुवना विचष्टे**) त्यांपैकीं एक सर्व भुवनांना प्रकाशित करतो आणि (**अन्यः ऋतून् विदधत् नवः जायसे**) दुसरा ऋतूंस निर्माण करीत नवा नवा होतो. (११) (अथर्व. ७।८१ [८६] ।१;१४।१।२३)

हे सूर्या ! (**मासाय कर्तवे अत्रिः त्वा दिवि अधारयत्**) महिने करण्यासाठीं अत्रीनें तुला द्युलोकांत धारण केलें. (**सः तपन् विश्वा भूता अवचाकशत् सुधृतः एषि**) तो तापत तापत सर्व भूतांना प्रकाशित करीत स्वतः स्थिर होऊन चालतो. (१२)

(**वत्सः मातरौ इव उभौ अन्तौ सं अर्षसि**) ज्याप्रमाणें बालक मातापित्याजवळ जातो, त्याप्रमाणें तूं दोन्ही अंतिम भागांस पोंचतोस. (**ननु इतः पुरा अमी देवाः एतत् ब्रह्म विदुः**) निश्चयानें यापूर्वीच या देवांनीं या ब्रह्मास जाणलें आहे. (१३)

(**यत् समुद्रं अनुश्रितं तत् सूर्यः सिषासति**) जें समुद्राच्या आश्रयानें रहातें ते सूर्य प्राप्त करण्यास इच्छितो. (**अस्य यः पूर्वः अपरः च महान् अध्वा विततः**) हा त्याचा पूर्व आणि पश्चिमेचा मोठा मार्ग पसरलेला आहे. (१४)

(**तं जूतिभिः समाप्नोति, ततो न अपचिकित्सति**) तो मार्ग तो त्वरेनें पूर्ण करतो. या मार्गापासून तो स्वतःच्या मनास इतस्ततः भटकूं देत नाहीं. (**तेन देवानां अमृतस्य भक्षं न अवरुन्धते**) या कारणानें देवांच्या अमृत अन्नभागांपासून तो वंचित होत नाहीं. (१५)

भावार्थ— सूर्याच्या उदयानंतर त्याचा प्रकाश पसरतो. समुद्रापर्यंत सर्व भूमीवर सर्व लोक यज्ञकर्म सुरू करीत आहेत. याप्रमाणें सर्व जगत् देदिप्यमान् होत आहे. (१०)

विश्वरूपी घरांतील लहानमोठी (चंद्र आणि सूर्य हीं) बालकें स्वतःच्या शक्तीनें खेळतां खेळतां समुद्रापर्यंत पुरुषार्थ करीत करीत जात आहेत. त्यांतील एक जगतास प्रकाशित करतो, आणि दुसरा ऋतु निर्माण करतो. याप्रमाणें सर्व गृहस्थांचे पुत्र स्वतःच्या पुरुषार्थानें जगास प्रकाशित करोत. (११)

सर्व महिने (उत्पन्न) करण्यासाठीं द्युलोकांत सूर्य प्रकाशित होतो. तो प्रकाशतो आणि सर्वांस धारणहि करतो. (१२)

ज्याप्रकारें बालक मातापित्यास प्राप्त करून घेतें. त्याचप्रमाणें सूर्य उदय आणि अस्त विभागांस प्राप्त करून घेतो. त्याचीं सर्व तत्त्वें सर्व देव यथावत् जाणतात. (१३)

जीं रत्नें समुद्रांत आहेत त्यांस सूर्य प्राप्त करून घेतो. पूर्वेपासून पश्चिमेपर्यंतचा हा सूर्याचा मार्ग अत्यंत कठिण आहे. (१४)

*

उदु त्यं जातवेदसं देवं वहन्ति केतवः । दृशे विश्वाय सूर्यम् ॥ १६ ॥
अप त्ये तायवो यथा नक्षत्रा यन्त्यक्तुभिः । सूराय विश्वचक्षसे ॥ १७ ॥
अदृश्रन्नस्य केतवो वि रश्मयो जनाँ अनु । भ्राजन्तो अग्नयो यथा ॥ १८ ॥
तरणिर्विश्वदर्शतो ज्योतिष्कृदसि सूर्य । विश्वमा भासि रोचन ॥ १९ ॥
प्रत्यङ् देवानां विशः प्रत्यङ्ङुदेषि मानुषीः । प्रत्यङ् विश्वं स्वर्दृशे ॥ २० ॥
येना पावक चक्षसा भुरण्यन्तं जनाँ अनु । त्वं वरुण पश्यसि ॥ २१ ॥
वि द्यामेषि रजस्पृथ्वहा मिमानो अक्तुभिः । पश्यन् जन्मानि सूर्य ॥ २२ ॥

अर्थ— (केतवः त्यं जातवेदसं देवं सूर्यं) किरणें त्या बनलेल्यांना जाणणाऱ्या सूर्य देवास (विश्वाय दृशे) समस्त विश्वाच्या दर्शनासाठीं (उत् उ वहन्ति) उच्च स्थानांत प्रकाशित करतात. (१६) [ऋ. १।५०।१; वा. यजु. ७।४१., अथर्व. २०।४७।१३]

(यथा त्ये तायवः, नक्षत्रा अक्तुभिः अप यन्ति) जसे चोर त्याप्रमाणें नक्षत्रें रात्रीसह दूर पळून जात आहेत. (विश्वचक्षसे सूराय) विश्वास प्रकाशित करणाऱ्या सूर्यास तीं जागा करून देत आहेत. (१७) (ऋ. १।५०।२; अथर्व. २०।४७।१४)

(यथा भ्राजन्तः अग्नयः) जसे चमकणारे अग्नि असतात तशीं (अस्य केतवः रश्मयः जनान् अनु वि अदृश्रन्) त्याचीं किरणें ध्वजरूपानें लोकांकडे जात आहेत असें वाटतें. (१८) (ऋ. १।५०।३; वा. य. ८।४०; अथर्व. २०।४७।१५)

हे (रोचन सूर्य) प्रकाशमान् सूर्या ! तूं (तरणिः विश्वदर्शतः ज्योतिष्कृत् असि) तारक विश्वास दाखवणारा आणि प्रकाशित करणारा आहेस, (विश्वं आ भासि) सर्व जगतास प्रकाशित करतोस. (१८) (ऋ. १।५०।४)

(देवानां विशः प्रत्यङ्) देवांच्या प्रजेकडे आणि (मानुषीः प्रत्यङ् उदेषि) मानवी प्रजेसाठीं उदय पावतोस, तसेंच (स्वः दृशे विश्वं प्रत्यङ्) प्रकाशाचें दर्शन देण्यास सर्व विश्वाकडे जातोस. (२०) [८] (ऋ. १।५०।५)

हे (पावक वरुण) पवित्र करणाऱ्या श्रेष्ठ देवा ! (येन चक्षसा त्वं जनान् भुरण्यन्तं अनु पश्यसि) ज्या डोळ्यांनीं तूं माणसांतील भरणपोषण करणाऱ्या मनुष्यास पाहतोस, त्याच दृष्टीनें मलासुद्धां पहा. (२१) (ऋ. १।५०।६)

हे सूर्या ! (अक्तुभिः अहः मिमानः) रात्रीच्या सहाय्यानें दिवसाचें माप काढतां काढतां (पृथु रजः द्यां एषि) विस्तृत अंतरिक्ष आणि द्युलोकास तूं प्राप्त होतोस आणि (जन्मानि पश्यन्) सर्व जन्म घेणाऱ्यांस तूं पहातोस. (२२) (ऋ. १।५०। ६)

भावार्थ— तो त्वरित स्वतःच्या मार्गास समाप्त करतो. स्वतःच्या मनास इकडे तिकडे भटकूं देत नाहीं. त्या कारणानें अमृतान्नाचा भाग त्यास नियमानुसार प्राप्त होतो. (१५)

सूर्यदेवाचीं किरणें संपूर्ण विश्वास प्रकाशित करण्यासाठींच प्रकाशतात, आणि त्यास उच्चभागीं धारण करितात. (१६)

ज्याप्रमाणें मालकाच्या आगमनानें चोर पळून जातात. त्याचप्रमाणें सूर्याच्या उदयामुळें नक्षत्रें दिसेनाशीं होतात, आणि सूर्यदेवासाठीं स्थान रिकामें करून देतात. (१७)

चमकणाऱ्या अग्नीप्रमाणें त्याचीं किरणें अत्यंत तेजस्वी व सर्वांस प्रकाश देणारीं आहेत. (१८)

सूर्य तेजस्वी आहे, तारक आहे, सर्वांस रूप दर्शविणारा आहे, कांतीस पसरविणारा आहे. त्याच्या योगेंच सर्व जग तेजस्वी बनतें. (१९)

दैवी आणि मानवी प्रजेच्या कल्याणासाठीं हा सूर्य उगवला आहे. सर्व विश्वास तो तेजाचा मार्ग दाखवितो. (२०)

सूर्य ज्या प्रेममय दृष्टीनें पुरुषार्थी मनुष्यास पहातो, त्याच दृष्टीनें माझ्याकडे त्यानें पहावें आणि तसेंच प्रेम मजवर ठेवावें. (२१)

सूर्य अंतरिक्ष लोकांत संचार करतो आणि सर्व लोकांच्या व्यवहारांचें निरीक्षण करतां करतां दिवस आणि रात्र असे विभाग करीत द्युलोकांत विराजतो. (२२)

सप्त त्वां हरितो रथे वहन्ति देव सूर्य । शोचिष्केशं विचक्षणम् । ॥ २३ ॥
अयुक्त सप्त शुन्ध्युवः सूरो रथस्य नप्त्यः । ताभिर्याति स्वयुक्तिभिः ॥ २४ ॥
रोहितो दिवमारुहत्तपसा तपस्वी ।
स योनिमैति स उ जायते पुनः स देवानामधिपतिर्बभूव ॥ २५ ॥
यो विश्वचर्षणिरुत विश्वतोमुखो यो विश्वतस्पाणिरुत विश्वतस्पृथः ।
सं बाहुभ्यां भरति सं पतत्रैर्द्यावापृथिवी जनयन्देव एकः ॥ २६ ॥
एकपाद् द्विपदो भूयो वि चक्रमे द्विपात्त्रिपादमभ्येति पश्चात् ।
द्विपाद्ध षट्पदो भूयो वि चक्रमे त एकपदस्तन्वं समासते ॥ २७ ॥

अर्थ— हे सूर्य देवा ! (सप्त हरितः शोचिष्केशं विचक्षणं त्वा रथे वहन्ति) सात किरणें शुद्ध करणाऱ्या व प्रकाशणाऱ्या तुला रथांतून घेऊन जातात. (२३) (ऋ. १।५०।८)

(सूरः रथस्य नप्त्यः सप्त शुंध्युवः अयुक्त) सूर्याच्या ज्ञानमय रथास सात शुद्ध किरणें जोडलीं आहेत. (ताभिः स्वयुक्तिभिः याति) त्यांच्या सहाय्यानें स्वतःच्या योजनेनें तो पुढें जातो. (२४) (ऋ० १।५०।९)

(तपसः तपस्वी रोहितः दिवं आरुहत्) प्रकाशानें तेजस्वी झालेला सूर्य द्युलोकावर चढला आहे. (सः योनिं एति) तो मूलस्थानीं जाऊन पोंचतो. (सः उ पुनः जायते) तो पुनः पुनः उत्पन्न होतो. (सः देवानां अधिपतिः बभूव) तो देवांचा स्वामी झाला आहे. (२५)

(यः विश्वचर्षणिः उत विश्वतः मुखः) जो सर्व प्राणिमात्रांच्या रूपांनीं युक्त आणि सर्व बाजूंस मुखें असलेला आहे, (यः विश्वतः पाणिः उत विश्वतः पृथः) ज्याचे हात आणि बाहू सर्व दिशांस पसरलेले आहेत, (बाहुभ्यां पतत्रैः सं सं भरति) जो स्वतःचे बाहू आणि पाय यांच्या योगानें सर्वांचें भरणपोषण करतो असा (द्यावापृथिवी जनयन् देवः एकः) भूलोक आणि द्युलोकास निर्माण करणारा एकच देव आहे. (२६) (ऋ. १०।८१।३; वा० य० १७।१९ पाठान्तरयुक्त)

(एकपाद् द्विपदः भूयः विचक्रमे) एक पायाचा दोन पायांच्या पेक्षां जास्त चालतो, (द्विपात् त्रिपादं पश्चात् अभ्येति) दोन पायांचा तीन पायांच्या मागून येऊन मिळतो, (द्विपात् ह षट्पदः भूयः विचक्रमे) दोन पायांचा निश्चयपूर्वक सहा पायांच्यापेक्षां जास्त चालतो. (ते एकपदः तन्वं समासते) ते एक पायाच्या शरीराचा आश्रय करतात. (२७) (ऋ० १०।११७।८; अथर्व० १३।३।२५) (पाठान्तरयुक्त)

भावार्थ— सूर्यदेवाचीं सात किरणें त्यास रथांतून चालवितात. तो पवित्र किरणांचा स्वामी आणि ज्ञानी आहे. (२३)

ज्ञानमय सूर्याच्या रथास सात किरणें जोडलीं आहेत. तीं पावित्र्य आणि शुद्धि निर्माण करणारीं आहेत. तीं स्वतःच्या योजनेनुसार चालणारीं आहेत (२४)

प्रकाशमान् सूर्य द्युलोकांत आरूढ होऊन नंतर स्वतःच्या स्थानीं पोंहोचतो, नंतर त्याचा उदय होतो. याप्रमाणें तो अन्य देवांचा अधिपति झाला आहे. (२५)

सर्व प्राण्यांस रूप देणारा सूर्य आहे. त्याचें तोंड सर्वत्र आहे. त्याचप्रमाणें हात आणि बाहूही सर्वत्र आहेत. तो स्वतःच्या हातांनीं सर्वांचें पोषण करतो. तो एकच देव पृथ्वीपासून द्युलोकांपर्यंत सर्व पदार्थमात्रांस उत्पन्न करतो. (२६)

हा एक पायाचा असूनहि दुसऱ्या अनेक पाय असणाऱ्यांपेक्षां पुढें जात असतो. दुसरे अनेक पाय असणारे या एक पाय असणाऱ्याच्या आश्रयानें रहातात. (२७)

अतन्द्रो यास्यन्हरितो यदास्थाद् द्वे रूपे कृणुते रोचमानः ।
केतुमानुद्यन्त्सहमानो रजांसि विश्वा आदित्य प्रवतो वि भासि ॥ २८ ॥
बण्महाँ असि सूर्य बडादित्य महाँ असि ।
महांस्ते महतो महिमा त्वमादित्य महाँ असि ॥ २९ ॥
रोचसे दिवि रोचसे अन्तरिक्षे पतङ्ग पृथिव्यां रोचसे रोचसे अप्स्व१न्तः
उभा समुद्रौ रुच्या व्यापिथ देवो देवासि महिषः स्वर्जित् ॥ ३० ॥
अर्वाङ् परस्तात्प्रयतो व्यध्व आशुर्विपश्चित्पतयन्पतङ्गः ।
विष्णुर्विचित्तः शवसाधितिष्ठन्प्र केतुना सहते विश्वमेजत् ॥ ३१ ॥
चित्रश्चिकित्वान्महिषः सुपर्ण आरोचयन्रोदसी अन्तरिक्षम् ।
अहोरात्रे परि सूर्यं वसाने प्रास्य विश्वा तिरतो वीर्याणि ॥ ३२ ॥

अर्थ— (**अतन्द्रः यास्यन् हरितः यदा आस्थात्**) आळस न करणारा जेव्हां जाण्याची इच्छा करतो तेव्हां तो स्वतःच्या घोड्यांवर आरूढ होऊन (**रोचमानः द्वे रूपे कृणुते**) तो प्रकाशित होऊन दोन रूपें धारण करतो. हे आदित्य ! (**केतुमान् उद्यन् विश्वा रजांसि सहमानः**) किरणांनीं युक्त होऊन उदय प्राप्त करणारा, सर्व लोकांस जिंकणारा तूं (**प्रवतः विभासि**) उच्चस्थानावरून प्रकाशतोस. (२८)

हे सूर्य, हे आदित्य ! (**बट् महान् असि**) तूं सर्वांहून श्रेष्ठ आहेस, (**ते महतः महिमा महान्**) तुझ्यासारख्या महान् देवाचा महिमा फार मोठा आहे. (२९) (ऋ० ८।१०१।११; वा० य० ३३।२९; अथर्व. २०।५८।३)

हे (**देव पतंग**) चालक देवा ! तूं (**दिवि अन्तरिक्षे पृथिव्यां अप्सु अंतः रोचसे**) द्युलोक, अंतरिक्ष, पृथ्वी आणि पाण्यांतसुद्धां प्रकाशित होतोस. (**रुच्या उभौ समुद्रौ व्यापिथ**) तूं आपल्या तेजानें दोन्ही समुद्र व्यापतोस. असा तूं (**स्वः-जित् देवः महिषः असि**) प्रकाशास प्राप्त करणारा देव महान् सामर्थ्ययुक्त आहेस. (३०) [९]

(**आशुः विपश्चित् पतंगः व्यध्वे प्रयतः**) शीघ्रगतीचा ज्ञानी संचालक विशेषतः मार्गांत शुद्ध (**परस्तात् अर्वाङ्**) वरून येथपर्यंत (**विष्णुः विचित्तः शवसा अधितिष्ठन्**) व्यापक आणि विशेष विचारशक्तीनें युक्त, स्वतःच्या बलानें जास्त अधिष्ठित होऊन (**केतुना एजत् विश्वं प्र सहते**) प्रकाशानें गतिमान् अशा विश्वास धारण करतो. (३१)

(**चित्रः चिकित्वान् महिषः सुपर्णः**) विलक्षण ज्ञानी, समर्थ आणि उत्तम गतिमान् (**अन्तरिक्षं रोदसी आरोचयन्**) अंतरिक्ष, पृथ्वी आणि द्युलोक यांना प्रकाशित करणारा सूर्य आहे. अशा (**सूर्यं अहोरात्रे परिवसाने**) सूर्यावर रात्र-दिवस अवलंबून आहेत व ते (**अस्य विश्वा वीर्याणि प्र तिरतः**) त्याचीं सर्व वीर्ये चारीही बाजूस पसरवितात. (३२)

भावार्थ—तो आळस सोडून नेहमीं स्वतःच्या कर्तव्यांत तत्पर रहातो. तो प्रकाश आणि अंधार उत्पन्न करतो. या किरणांनीं सर्वांस प्रभावित करीत तो उच्चस्थानीं विराजतो. (२८)

सूर्य सर्वांहून श्रेष्ठ आहे आणि त्याचा महिमासुद्धां मोठा आहे. (२९)

हा सूर्य पृथ्वी, द्युलोक, अंतरिक्ष तसेंच जलांत प्रकाशतो. पृथ्वी आणि अंतरिक्षांत दोन्ही ठिकाणच्या जलस्थानांत स्वतःचा प्रकाश पसरवितो. तोच सर्वांहून अधिक सामर्थ्ययुक्त आहे. (३०)

हा शीघ्रगामी संचालक, शुद्ध मार्गाचा दर्शक तेथून येथपर्यंत सर्व विश्वास स्वतःच्या प्रकाशानें प्रकाशित करतो. (३१)

हा विलक्षण सामर्थ्यशाली या तीनहि लोकांस प्रकाशित करतो. दिवस आणि रात्र निर्माण करून सर्वांस पराक्रम शक्ति समर्पित करतो. (३२)

तिग्मो विभ्राजन्तन्वं१ शिशानोऽरंगमासः प्रवतो रराणः ।
ज्योतिष्मान्पक्षी महिषो वयोधा विश्वा आस्थात्प्रदिशः कल्पमानः ॥ ३३ ॥
चित्रं देवानां केतुरनीकं ज्योतिष्मान्प्रदिशः सूर्य उद्यन् ।
दिवाकरोऽति द्युम्नैस्तमांसि विश्वातारीद्दुरितानि शुक्रः ॥ ३४ ॥
चित्रं देवानामुद्गादनीकं चक्षुर्मित्रस्य वरुणस्याग्नेः ।
आप्राद् द्यावापृथिवी अन्तरिक्षं सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ ३५ ॥
उच्चा पतन्तमरुणं सुपर्णं मध्ये दिवस्तरणिं भ्राजमानम् ।
पश्याम त्वा सवितारं यमाहुरजस्रं ज्योतिर्यदविन्ददत्रिः ॥ ३६ ॥
दिवस्पृष्ठे धावमानं सुपर्णमदित्याः पुत्रं नाथकाम उप यामि भीतः ।
स नः सूर्य प्र तिर दीर्घमायुर्मा रिषाम सुमतौ ते स्याम ॥ ३७ ॥

अर्थ—(तिग्मः विभ्राजन् तन्वं शिशानः) तीक्ष्ण प्रकाश असणारा आणि स्वतःच्या शरीरास तीक्ष्ण बनविणारा (अरंगमासः प्रवतः रराणः) पर्याप्त गति असणारा, उच्च स्थानीं क्रीडा करणारा, (ज्योतिष्मान् पक्षी महिषः वयोधाः) तेजस्वी आकाशांत संचार करणारा पक्षी बलवान् आणि बल धारण करणारा (विश्वाः प्रदिशः कल्पमानः आस्थात्) सर्व दिशांत सामर्थ्ययुक्त होऊन स्थिर रहातो. (३३)

(देवानां केतुः चित्रं अनीकं) देवांचा ध्वज, विलक्षण मूळ आधाररूप (ज्योतिष्मान् सूर्यः प्रदिशः उद्यन्) तेजस्वी सूर्य दिशांमध्यें उदयास येतांच (शुक्रः विश्वा दुरितानि तमांसि द्युम्नैः अतारीत्) शुद्ध सूर्य सर्व पापरूपी अंधःकाराला स्वतःच्या तेजानें पार करून आणि (दिवा करोति) दिवसाचा प्रकाश उत्पन्न करतो. (३४) (अथर्व. २०।१०७।१३)

(देवानां चित्रं अनीकं, मित्रस्य वरुणस्य अग्नेः चक्षुः) देवांचे अद्भुत धारक बळ, मित्र वरुण आणि अग्नि यांचा नेत्र (द्यावापृथिवी अंतरिक्षं आप्रात्) द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वीस व्यापतो असा (सूर्यः जगतः तस्थुषः च आत्मा) सूर्य स्थावर जंगमांचा आत्मा आहे. (३५) (ऋ. १।११५।१, वा. यजु. ७।४२, १३।४६ अथर्व. २०।१०७।१४)

(उच्चा पतन्तं सुपर्णं दिवः मध्ये भ्राजमानं तरणिं) उच्च स्थानांतून जाणाऱ्या पक्ष्याप्रमाणें आकाशाच्या मध्यभागीं तेजस्वी होऊन तरंगणारा (यं अजस्रं ज्योतिः आहुः तं सवितारं त्वा पश्याम) ज्यास विशेष तेजस्वी असें संबोधितात अशा सूर्याला आम्हीं पहातों (यत् अत्रिः अविन्दत्) ज्यास भोक्ता प्राप्त करतो. (३६)

(दिवः पृष्ठे धावमानं सुपर्णं आदित्याः पुत्रं) द्युलोकाच्या पाठीवर धांवणाऱ्या पक्ष्यासारख्या आदितीच्या पुत्राला (नाथकामः भीतः उपयामि) स्वामित्वाची इच्छा करणारा मीं भयभीत झालेला जसा शरण जातों. हे सूर्या! (सः नः दीर्घं आयुः प्रतिर) तो तूं आम्हांस दीर्घ आयुष्य दे. (ते सुमतौ स्याम मा रिषाम) तुझ्या उत्तम बुद्धीमध्यें आम्हीं राहूं. त्यामुळें आमचा नाश न होवो. (३७)

भावार्थ—हा तेजस्वी आणि तीव्र सूर्य पर्याप्त गतीनें युक्त आणि नेहमीं उच्च स्थानीं विराजणाऱ्या पक्ष्याप्रमाणें आकाशांत संचार करतो. सर्व दिशांस तेज देत तो स्थिर राहिला आहे. (३३)

हा देवांच्या आगमनाची सूचना देतो. हा विचित्र अद्भुत बलानें युक्त आहे. जेव्हां तो उगवतो तेव्हां सर्व जगांतील अंधार दूर करून सर्वत्र प्रकाश पसरवितो. (३४)

हा सर्व देवांचें बल आणि सर्व देवांची दृष्टि आहे. तो स्वतःच्या प्रकाशानें जगास भरून टाकतो. हा सूर्य जसूं काय सर्व स्थावर जंगमाचा आत्माच आहे. (३५)

हा शीघ्रगति पक्ष्याप्रमाणें आकाशांत तरंगत आहे. जें आपण पाहूं शकतों तें त्याचें तेज विलक्षण आहे. जो त्याचा स्वीकार करूं इच्छितो त्यास तें प्राप्त होतें. (३६)

सहस्राह्ण्यं वियतावस्य पक्षौ हरेर्हंसस्य पततः स्वर्गम् ।
स देवान्त्सर्वानुरस्युपदद्य संपश्यन्याति भुवनानि विश्वा ॥ ३८ ॥
रोहितः कालो अभवद्रोहितोऽग्रे प्रजापतिः । रोहितो यज्ञानां मुखं रोहितः स्व१राभरत् ॥ ३९ ॥
रोहितो लोको अभवद्रोहितोऽत्यतपद्दिवम् । रोहितो रश्मिभिर्भूमिं समुद्रमनु सं चरत् ॥ ४० ॥
सर्वा दिशः समचरद्रोहितोऽधिपतिर्दिवः । दिवं समुद्रमाद्भूमिं सर्वं भूतं वि रक्षति ॥ ४१ ॥
आरोहञ्छुक्रो बृहतीरतन्द्रो द्वे रूपे कृणुते रोचमानः ।
चित्रश्चिकित्वान्महिषो वातमाया यावतो लोकानभि यद्विभाति ॥ ४२ ॥
अभ्य१न्यदेति पर्यन्यदस्यतेऽहोरात्राभ्यां महिषः कल्पमानः ।
सूर्यं वयं रजसि क्षियन्तं गातुविदं हवामहे नाधमानाः ॥ ४३ ॥

अर्थ—(हरेः हंसस्य सहस्राह्ण्यं स्वर्गं पततः अस्य पक्षौ वियतौ) कांहीं तरी उचलणाऱ्या हंसाप्रमाणें गतियुक्त, हजार दिवसांच्या मार्गावर स्थित द्युलोकावर चालणाऱ्या या सूर्याच्या दोनहि बाजूंस किरणें पसरलेलीं आहेत. (स सर्वान् उरसि उपदद्य) तो सर्व देवांना स्वतःच्या छातीवर धारण करीत करीत (विश्वा भुवनानि सं पश्यन् याति) सर्व भुवनांना पहात पहात तो चालत आहे. (३८) (अथर्व. १०।८।१८, १३।३।१४)

(रोहितः कालः अभवत्) हा सूर्यच कालरूप झाला आहे. (अग्रे रोहितः प्रजापतिः पूर्वी सूर्यच प्रजापालक झालेला आहे. (रोहितः यज्ञानां मुखं) हा सूर्य यज्ञांचें मुख होऊन (स्वः आभरत्) प्रकाश प्रदान करतो ३९

(रोहितः लोकः अभवत्, दिवं अतपत्) सूर्यच सर्व लोक झाला आणि द्युलोकास प्रकाशित करूं लागला. (रोहितः रश्मिभिः भूमिं समुद्रं अनु सं चरत्) सूर्यच स्वतःच्या किरणांनीं भूमि आणि समुद्र यांत संचार करतो. (४०) [१०]

(दिवः अधिपतिः रोहितः सर्वाः दिशः समचरत्) द्युलोकाचा स्वामी सूर्य सर्व दिशांत संचार करतो. (दिवं समुद्रं आत् भूमिं सर्वं भूतं वि रक्षति) द्युलोक, समुद्र, भूमि, तसेंच सर्व प्राणी सर्वांचें तो रक्षण करतो. ४१

(अतंद्रः शुक्रः रोचमानः बृहतीः आरोहन्) आळसरहित बलवान् तेजस्वी सूर्य विस्तृत दिशांत आरूढ होऊन (द्वे रूपे कृणुते) दोन रूपें बनवितो. तो (चित्रः चिकित्वान् महिषः) पुष्कळच ज्ञानी आणि समर्थ (वातं आयाः) वायूस प्राप्त होतो. (यत् यावतः लोकान् अभि विभाति) जितके लोक आहेत त्या सर्वांस तो प्रकाशित करतो. (४२)

(अहोरात्राभ्यां कल्पमानः महिषः) दिवस आणि रात्रींनीं समर्थ होणारा हा सूर्य (अन्यत् अभि एति. अन्यत् अभि अस्यते) एका भागानें सन्मुख होतो आणि दुसऱ्या भागानें दूर फेंकला जातो. (वयं नाधमानाः गातुविदं रजसि क्षियन्तं सूर्यं हवामहे) आम्हीं सर्व त्रस्त होऊन मार्गदर्शक आणि अंतरिक्षांत निवास करणाऱ्या सूर्याची स्तुति करतों. (४३)

भावार्थ— आकाशाच्या पृष्ठभागावर धांवणाऱ्या पक्ष्याप्रमाणें हा सूर्य आहे. मीं दुःखानें पीडित होऊन भयभीत झालेला त्याची प्रार्थना करतों कीं त्यानें आम्हांस दीर्घायुष्य द्यावें आणि आम्हांस सुरक्षित ठेवावें. (३७)

ह्या तेजस्वी सूर्याचीं किरणें हजार दिवस प्रवास करीत सर्व बाजूंस दूरपर्यंत जातात. ह्याच सर्व देवांचा आधार आहे. तो सर्वांचें निरीक्षण करीत करीत चालतो. (३८)

हा सूर्य काल, प्रजापालक, यज्ञ, तेज आहे व तो सर्व लोकांस उत्तेजित करतो. हा स्वतःच्या प्रकाशानें सर्व जगास परिपूर्ण करतो. (३९-४०)

हा द्युलोकाचा स्वामी सर्वत्र संचार करून सर्व जगाचें रक्षण करतो. (४१)

आळस सोडून समर्थ आणि तेजस्वी असा सूर्य सर्वांत उच्च स्थानीं आरूढ होतो. अंधःकार आणि प्रकाश याच्यापासून उत्पन्न होतात. जेथपर्यंत लोक (पसरलेले) आहेत तेथपर्यंत त्याचा प्रकाश पसरतो. (४२)

पृथिवीप्रो महिषो नाधमानस्य गातुरदब्धचक्षुः परि विश्वं बभूव ।
विश्वं संपश्यन्त्सुविदत्रो यजत्र इदं शृणोतु यदहं ब्रवीमि ॥ ४४ ॥
पर्यस्य महिमा पृथिवीं समुद्रं ज्योतिषा विभ्राजन्परि द्यामन्तरिक्षम् ।
सर्वं संपश्यन्त्सुविदत्रो यजत्र इदं शृणोतु यदहं ब्रवीमि ॥ ४५ ॥
अबोध्यग्निः समिधा जनानां प्रति धेनुमिवायतीमुषासम् ।
यह्वा इव प्र वयामुज्जिहानाः प्र भानवः सिस्रते नाकमच्छ ॥ ४६ ॥

अर्थ— (**महिषः पृथिवी-प्रः**) बलवान् पृथ्वीस पूर्ण करणारा (**नाधमानस्य गातुः अदब्धचक्षुः विश्वं परि बभूव**) दुःखी मनुष्याचा मार्गदर्शक, ज्याचे नेत्र बंद झाले नाहींत असा सूर्य विश्वावर आहे. हा (**विश्वं संपश्यन् सुविदित्रः यजत्रः**) सर्व विश्वास पहाणारा ज्ञानी याजक (**इदं शृणोतु यत् अहं ब्रवीमि**) हे त्यानें ऐकावें कीं जें मीं सांगतों. (४४)

(**अस्य महिमा पृथिवीं समुद्रं परि**) याचें महात्म्य समुद्र आणि पृथ्वीवर चहूंकडे पसरलेलें आहे. (**ज्योतिषा विभ्राजन् द्यां अन्तरिक्षं परि**) तेजानें प्रकाशणाऱ्या द्युलोक आणि अंतरिक्षांत सर्वत्र तो पसरला आहे. (**सर्वं संपश्यन्०**) सर्वांस पहाणाऱ्या या ज्ञानी याजकानें मीं सांगतों तें ऐकावें. (४५)

(**जनानां समिधा अग्निः प्रति अबोधि**) मनुष्यांच्या समिधांनीं अग्नि जागृत झाला आहे. (**धेनुं इव उषसां आयतिं**) गायीसारखी उषा त्याच्या येण्याच्या समयीं जागृत होते. (**वयां प्र उज्जिहानाः यह्वा इव**) शाखांस वर फेंकणाऱ्या वृक्षांप्रमाणें (**भानवः नाकं अच्छ प्र सिस्रते**) किरणें स्वर्गधामाकडे पोंहोंचतात. (४६) [११]

भावार्थ— हा सूर्य दिवस आणि रात्र करतो. ज्यावेळीं पृथ्वीचे जे भाग समोर असतील तेथें दिवस असतो, आणि दुसऱ्या भूभागांत रात्र असते. या अंतरिक्ष लोकांत विराजमान् असलेल्या तेजस्वी सूर्याची आम्हीं स्तुति करतों. तो आम्हांस मार्गदर्शक होवो. (४३)

हा सूर्य सामर्थ्यशाली आहे. दुःखी मनुष्यास हाच सुखाचा मार्ग दाखवितो. सर्व विश्वांत त्याची प्रभुता आहे. हें वर्णन तो ऐको. (४४)

त्याचें महात्म्य पृथ्वी, द्युलोक आणि अंतरिक्षांत पसरलेलें आहे. (४५)

जनतेनें ज्या समिधा होमांत टाकल्या होत्या, त्यामुळें हा अग्नि प्रदीप्त झाला. ज्याप्रमाणें गाय सकाळीं जागी होते त्याप्रमाणें अग्नि जागृत झाला आहे. ज्याप्रमाणें वृक्ष आपल्या शाखा वर आकाशांत पसरावितात, त्याप्रमाणें अग्नीच्या ज्वाला सरळ वर जातात आणि प्रकाशास पसरवितात. (४६)

अध्यात्मम्

कांड १३, सूक्त ३

(ऋषिः- ब्रह्मा । देवताः- अध्यात्मम्, रोहितादित्यदैवतम्)

य इमे द्यावापृथिवी जजान यो द्रापिं कृत्वा भुवनानि वस्ते ।
यस्मिन्क्षियन्ति प्रदिशः षडुर्वीर्याः पतङ्गो अनु विचाकशीति ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १ ॥
यस्माद्वाता ऋतुथा पवन्ते यस्मात्समुद्रा अधि विक्षरन्ति ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ २ ॥
यो मारयति प्राणयति यस्मात्प्राणन्ति भुवनानि विश्वा ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ३ ॥
यः प्राणेन द्यावापृथिवी तर्पयत्यपानेन समुद्रस्य जठरं यः पिपर्ति ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ४ ॥

अर्थ— (**यः इमे द्यावा-पृथिवी जजान**) जो या दोन्ही द्युलोक आणि पृथ्वीलोकांस उत्पन्न करतो (**यः भुवनानि द्रापिं कृत्वा वस्ते**) जो सर्व भुवनांचें वस्त्र [आंगरखा] करून त्यांत रहातो, (**यस्मिन् षट् उर्वीः प्रदिशः क्षियन्ति**) ज्याच्यामध्यें महान् सहा दिशा निवास करतात. (**यः पतङ्गः अनु विचाकशीति**) ज्यास गतिमान् सूर्य प्रकाशित करतो. (**यः एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति**) जो अशा ज्ञानी ब्राह्मणाचा नाश करतो अथवा त्यास कष्ट देतो (**एतत् आगः तस्य क्रुद्धस्य देवस्य**) त्याचें पाप त्या क्रुद्ध देवाप्रत होतें. हे (**रोहित**) **सूर्या!** त्या पाप्यास (**उत् वेपय**) थरथरां कांपीव; त्याचप्रमाणें (**प्रक्षिणीहि**) त्याचा नाश कर. (**ब्रह्मज्यस्य पाशान् प्रति मुञ्च**) ब्रह्मघातक्यावर पाश टाक म्हणजे त्यास बंधनांत टाक. (१)

(**यस्मात् वाताः ऋतुथा पवन्ते**) ज्याच्यामुळें वारे ऋतूंस अनुसरून वहातात, (**यस्मात् समुद्राः अधि विक्षरन्ति**) ज्याच्यामुळें समुद्र, जलप्रवाह विविध प्रकारानें प्रवाहित होतात. ॥०॥ (**यः मारयति प्राणयति**) जो मारतो, जो जिवंत ठेवतो, (**यस्मात् विश्वा भुवनानि प्राणन्ति**) ज्याच्यामुळें सर्व भुवनें जिवंत आहेत ॥०॥ (२-३)

भावार्थ— ज्या परमात्म्यानें हें संपूर्ण जगत् निर्माण केलें आणि जो त्यांत व्यापून उरला आहे, ज्याच्या आंत सूर्यानें प्रकाशित होणाऱ्या सर्व दिशा आणि उपदिशा आहेत, तो विश्वाधिपति परमात्मा त्याच्यावर फार रागावतो. जो ज्ञानी मनुष्यास कष्ट देतो, त्यांस कांपवितो, अगदीं निर्बल करून टाकतो आणि अंतीं बंधनांत टाकतो. (१)

यस्मिन्विराट् परमेष्ठी प्रजापतिरग्निर्वैश्वानरः सह पङ्क्त्या श्रितः । यः परस्य प्राणं परमस्य तेज आददे ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ५ ॥
यस्मिन्षडुर्वीः पञ्च दिशो अधि श्रिताश्चतस्र आपो यज्ञस्य त्रयोऽक्षराः ।
यो अन्तरा रोदसी क्रुद्धश्चक्षुषैक्षत ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ६ ॥
यो अन्नादो अन्नपतिर्बभूव ब्रह्मणस्पतिरुत यः । भूतो भविष्यद्भुवनस्य यस्पतिः ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ७ ॥
अहोरात्रैर्विमितं त्रिंशदङ्गं त्रयोदशं मासं यो निर्मिमीते ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ८ ॥
कृष्णं नियानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति । त आववृत्रन्त्सदनादृतस्य ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् । ॥ ९ ॥

अर्थ— (**यः प्राणेन द्यावापृथिवी तर्पयति**) जो प्राणानें द्युलोक आणि भूलोकास तृप्त करतो आणि (**यः अपानेन समुद्रस्य जठरं पिपर्ति**) जो अपानानें समुद्राचें पोट पूर्ण करतो ॥०॥ (**यस्मिन्**) ज्याच्या ठायीं विराट् परमेष्ठी, प्रजापति, अग्नि, वैश्वानर (**सह पङ्क्त्या श्रितः**) एका पंक्तींत आश्रय घेऊन राहिले आहेत. ॥०॥ (४–५)

(**यस्मिन् षट् उर्वीः पञ्च दिशः अधिश्रिताः**) ज्याच्या ठायीं सहा आणि पांच मोठ्या दिशा आश्रित झाल्या आहेत, तसेंच ज्याच्या ठिकाणीं (**चतस्रः आपः यज्ञस्य त्रयः अक्षराः**) चार प्रकारचें जल आणि यज्ञाचीं तीन अक्षरें आहेत, (**यः अन्तरा क्रुद्धः चक्षुषा रोदसी ऐक्षत**) जो आंतून क्रुद्ध होऊन द्युलोक आणि भूलोकांस पहातो. ॥ ० ॥ (६)

(**यः अन्नादः अन्नपतिः उत यः ब्रह्मणस्पतिः बभूव**) जो अन्नभक्षक, अन्नाचा स्वामी आणि ज्ञानाचा स्वामी झाला आहे, तसेंच (**यः भुवनस्य पतिः भूतः भविष्यत्**) जो जगताचा स्वामी होता आणि अजून राहिला ॥ ० ॥ (**यः अहोरात्रैः विमितं त्रिंशत् अंगं**) जो दिवस आणि रात्रीच्या तीस दिवसांचा बनलेला एक महिना असे (**त्रयोदशं मासं यः निर्मिमीते**) तेरावा महिना जो निर्माण करतो. (७–८)

(**अपः वसानाः सुपर्णाः हरयः**) जलास धारण करणारीं उत्तम गतिमान् सूर्य किरणें (**कृष्णं नियानं दिवं उत्पतन्ति**) कृष्णवर्ण अथवा नीलवर्णाच्या सर्वांच्या स्थानरूपीं द्युलोकाकडे गति करतात, (**ते ऋतस्य सदनात् आववृत्रन्**) ते किरण जलाच्या स्थानापासून पुनः पुनः परत येतात. ॥०॥ हे (**कश्यप**) पहाणाऱ्या देवा ! (**यत् ते चंद्रं रोचनावत्**

भावार्थ— ज्याच्या प्रेरणेनें वायु आणि जलप्रवाह चालू आहेत, जो सर्वांस मारतो अथवा (मेलेल्यांस) जिवंत करतो, ज्याच्या जीवनशक्तीमुळें प्राणीमात्र जीवंत रहातात, जो प्राणानें द्यावापृथिवीस तृप्त करून अपानानें समुद्रास परिपूर्ण करतो, ज्याच्यांत अग्नि वगैरे सर्व देव पंक्तींत रहातात. ज्याच्यांत सर्व दिशा, सर्व जलप्रवाह, यज्ञाचें सर्व विधिज्ञान आश्रित झालें आहेत; जो क्रुद्ध होऊन आपल्या डोळ्यांनीं सर्वांचें निरीक्षण करतो. (२-६)

*

यत्ते चन्द्रं कश्यप रोचनावद्यत्संहितं पुष्कलं चित्रभानु ।
यस्मिन्त्सूर्या आर्पिताः सप्त साकम् ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १० ॥

बृहदेनमनु वस्ते पुरस्ताद्रथंतरं प्रति गृह्णाति पश्चात् । ज्योतिर्वसाने सदमप्रमादम् ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ ११ ॥

बृहदन्यतः पक्ष आसीद्रथंतरमन्यतः सबले सध्रीची । यद्रोहितमजनयन्त देवाः ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १२ ॥

स वरुणः सायमग्निर्भवति स मित्रो भवति प्रातरुद्यन् ।
स सविता भूत्वान्तरिक्षेण याति स इन्द्रो भूत्वा तपति मध्यतो दिवम् ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १३ ॥

सहस्राह्ण्यं वियतावस्य पक्षौ हरेर्हंसस्य पततः स्वर्गम् ।
स देवान्त्सर्वानुरस्युपदद्य संपश्यन्याति भुवनानि विश्वा ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १४ ॥

पुष्कलं संहितं चित्रभानु) जें तुझें अत्यंत आनंददायक प्रकाशमय पुष्कळच एकत्रित झालेलें विचित्र तेज आहे (यस्मिन् सप्त सूर्याः साकं आर्पिताः) त्यांत सात सूर्य एकमेकांच्या सान्निध्यांत रहातात. ॥०॥ (९–१०)

(बृहत् एनं पुरस्तात् अनुवस्ते) विशाल गायन ज्याच्या समोर होत आहे आणि (रथंतरं पश्चात् प्रति गृह्णाति) त्यानंतर रथन्तर गायन याचें ग्रहण करतें. (११)

(बृहत् अन्यतः पक्ष आसीत्) बृहत् गायनाचा एक पक्ष आहे आणि (रथंतरं अन्यतः) रथन्तर गायनाचा दुसरा पक्ष आहे, (सबले सध्रीची) हे दोन्ही बलवान् आणि बरोबर रहाणारे पक्ष आहेत. (यत् रोहितं देवाः अजनयन्त) तेथें देवांनीं रोहित सूर्यास निर्माण केलें. ॥०॥ (१२)

(सः वरुणः सायं अग्निः भवति) तो वरुण आहे तरी सायंकाळीं अग्नि होतो. (सः प्रातः उद्यन् मित्रः भवति) तोच प्रभातीं उदयकालीं मित्र म्हणविला जातो. (सः सविता भूत्वा अन्तरिक्षेण याति) तोच सविता होऊन अंतरिक्षांत संचार करतो. (सः इंद्रः भूत्वा मध्यतः दिवं तपति) तो इंद्र होवून द्युलोकांत मध्यभागीं तपतो ॥०॥ (१३)

भावार्थ— जो एकमात्र सर्वांचा भक्षक आहे आणि असें असूनहि जो सर्वांस अन्न आणि ज्ञान देतो, जो एकच सर्वत्रांचा स्वामी होता, आहे आणि राहील, जो दिवस रात्र, महिना तसेंच वर्षरूपी कालचक्र निर्माण करतो, ज्याचीं किरणें पृथ्वीवरील जल घेऊन आकाशांत वर चढतात आणि तेथें मेघमंडळांत प्रकाशित होतात; ज्याचा प्रकाश एकत्रित होऊन सर्वांस प्रकाशित करतो आणि ज्यांत हे सर्व सूर्य रहातात. (७–१०)

अयं स देवो अप्स्व१न्तः सहस्रमूलः पुरुशाको अत्त्रिः । य इदं विश्वं भुवनं जजान ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १५ ॥

शुक्रं वहन्ति हरयो रघुष्यदो देवं दिवि वर्चसा भ्राजमानम् ।
यस्योर्ध्वा दिवं तन्व१स्तपन्त्यर्वाङ् सुवर्णैः पटरैर्वि भाति ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १६ ॥

येनादित्यान्हरितः संवहन्ति येन यज्ञेन बहवो यन्ति प्रजानन्तः । यदेकं ज्योतिर्बहुधा विभाति ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १७ ॥

सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा ।
त्रिनाभि चक्रमजरमनर्वं यत्रेमा विश्वा भुवनाधि तस्थुः ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १८ ॥

अर्थ— (**हरेः हंसस्य सहस्राह्ण्यं स्वर्गं पततः अस्य पक्षौ वियतौ**) हरणशील हंसाप्रमाणें गतियुक्त, हजार दिवसांच्या मार्गावर स्थित द्युलोकावर चालणारा या सूर्याच्या दोन्ही बाजूंस किरणें पसरलीं आहेत. (**सः सर्वान् उरसि उपदद्य**) तो सर्व देवांस स्वतःच्या छातीवर धारण करीत करीत (**विश्वा भुवनानि सं पश्यन् याति**) सर्व भुवनांस पहात पहात चालतो. (१४) (अथर्व. १०।८।१८; १३।२।३८)

(**यः इदं विश्वं भुवनं जजान**) ज्यानें हें सर्व जगत् निर्माण केलें (**अयं सः देवः सहस्रमूलः पुरुशाखः अत्त्रिः अप्सु अन्तः**) तो तोच देव आहे. ज्याचीं हजारो मुळें आणि शाखा आहेत, आणि जो सर्वांचा भक्षक आहे; तो जलामध्यें रहातो. ॥०॥ (१५)

(**वर्चसा भ्राजमानं शुक्रं देवं**) तेजानें चमकणाऱ्या पवित्र देवास (**रघुष्यदः हरयः दिवि वहन्ति**) गतिमान् किरणें द्युलोकांत चालवितात. (**यस्य ऊर्ध्वाः तन्वः दिवं तपन्ति**) ज्याचे वरील भाग सूर्यलोकांस तापवितात, आणि (**अर्वाक् सुवर्णैः पटरैः विभाति**) इकडचा भाग उत्तम रंगीत तेजानें चमकतो ॥०॥ (**येन हरितः आदित्यान् सं वहन्ति**) ज्याच्यासह किरणें सूर्यास चलायमान करतात, (**येन यज्ञेन प्रजानन्तः बहवः यन्ति**) ज्या यज्ञासह पुष्कळ ज्ञानी जातात (**यत् एकं ज्योतिः बहुधा विभाति**) जें एक तेज अनेक प्रकारें प्रकाशतें. ॥०॥ (१६–१७)

(**एकचक्रं रथं सप्त युञ्जन्ति**) एक चक्राच्या रथास सात अश्व किरणें जोडलीं आहेत. (**सप्तनामा एकः अश्वः वहति**) सात नांवाचा एकच अश्व त्यास चालवितो. त्याचें (**त्रिनाभि अजरं अनर्वं चक्रं**) तीन केंद्रांचें जरारहित आणि नाशरहित हें चक्र आहे. (**यत्र इमा विश्वा भुवना अधि तस्थुः**) जेथें हीं सर्व भुवनें स्थिर झालीं आहेत. ॥०॥ (१८) (ऋ. १।१६४।२; अथर्व ९।९।२)

भावार्थ— बृहत् आणि रथन्तर हीं गायनें त्याच्या पुढें मागें चालत असतात. हे दोघे यज्ञाचे प्रबल पक्ष आहेत. त्यांचें गायन झाल्यानंतरच सूर्य उगवतो. तोच वरुण, अग्नि, मित्र, सविता आणि इंद्र असा क्रमानें सायंकाळीं, सकाळीं, द्वितीय प्रहरीं आणि मध्याह्नीं होतो. (म्हणजे वरील नांवें त्याचींच आहेत.) या तेजस्वी सूर्याचीं किरणें हजार दिवसपर्यंत प्रवास करीत चौफेर दूरपर्यंत जातात. तोच सर्व देवांचा आधार आहे. तो सर्वांचें निरीक्षण करीत करीत चालतो. ज्यानें हें जग निर्माण केलें तो देव हाच आहे; ज्याचीं मुळें आणि शाखा हजारोंच्या संख्येनीं आहेत. तो जलांत विराजमान् आहे. (११–१५)

अष्टधा युक्तो वहति वह्निरुग्रः पिता देवानां जनिता मतीनाम् ।
ऋतस्य तन्तुं मनसा मिमानः सर्वा दिशः पवते मातरिश्वा ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ १९ ॥
सम्यञ्चं तन्तुं प्रदिशोऽनु सर्वा अन्तर्गायत्र्याममृतस्य गर्भे ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ २० ॥
निम्रुचस्तिस्रो व्युषो ह तिस्रस्त्रीणि रजांसि दिवो अङ्ग तिस्रः ।
विद्मा ते अग्ने त्रेधा जनित्रं त्रेधा देवानां जनिमानि विद्म ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ २१ ॥
वि य और्णोत्पृथिवीं जायमान आ समुद्रमदधादन्तरिक्षे ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् । ॥ २२ ॥

अर्थ— (**देवानां पिता मतीनां जनिता**) देवांचा पालक आणि बुद्धीचा उत्पादक (**उग्रः वह्निः अष्टधा युक्तः वहति**) उग्र अग्नि आठ प्रकारांनीं युक्त होऊन चालतो. (**ऋतस्य तन्तुं मनसा मिमानः**) यज्ञाच्या सूत्रास मनानें मापतो, (**मातरिश्वा सर्वाः दिशः पवते**) अंतरिक्षांत निवास करणारा सर्व दिशांत गति करतो. ॥०॥ (१९)

(**सम्यञ्चं तन्तुं सर्वाः प्रदिशः अनु**) या सरळ यज्ञाच्या सूत्रास सर्व दिशांच्या अनुसार (**गायत्र्यां अंतः अमृतस्य गर्भे**) गायत्रींत अमृताच्या गर्भांत तो पहातो. (२०)

(**तिस्रः निम्रुचः तिस्रः व्युषः**) तीन अस्त आणि तीन उदयकाल आहेत. हे (**अंग**) प्रिय ! (**त्रिणी रजांसि तिस्रः दिवः**) तीन अंतरिक्ष आणि तीन द्युलोक आहेत. हे अग्नि ! (**ते त्रेधा जनित्रं विद्म**) तुझे तीन जन्म आम्हीं जाणतों. ॥०॥ (**यः जायमानः पृथिवीं वि और्णोत्**) जो जन्मल्याबरोबर पृथ्वीस आच्छादित करतो, (**अन्तरिक्षे समुद्रं आ अदधात्**) अंतरिक्षांत समुद्रास धारण करतो. ॥० ॥ (२१–२२)

भावार्थ— तेजस्वी सूर्यास द्युलोकांत किरणें प्रकाशित करतात. त्याचीं वरील किरणें द्युलोकास प्रकाशित करतात. बाजूचीं किरणें बाजूस प्रकाशित करतात. एक चक्राच्या रथास सात किरणें प्रकाशित करतात. एकाच किरणाचे ते सात भाग आहेत. त्याचें चक्र अजर, अमर आहे आणि त्याच्या आधारानें सर्व भुवनें रहातात. तो सर्व देवांचा आणि बुद्धींचा उत्पादक आणि पालक आहे. हा प्रचंड अग्नि हा आठ प्रकारचा होऊन तो प्रकाशतो. त्याच्या योगानें यज्ञाचें अखंड सूत्र पसरलें आहे. तो अंतरिक्षांत राहून सर्वत्र प्रकाशतो. हा यज्ञतंतु सर्व दिशांस पसरला आहे. तो गायत्रीच्या अमृतकेंद्रांत राहिला आहे. (१६–२०)

त्वमग्ने क्रतुभिः केतुभिर्हितो३र्कः समिद्ध उदरोचथा दिवि ।
किमभ्यार्चन्मरुतः पृश्निमातरो यद्रोहितमजनयन्त देवाः ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ २३ ॥
य आत्मदा बलदा यस्य विश्वे उपासते प्रशिषं यस्य देवाः । योऽस्येशे द्विपदो यश्चतुष्पदः ॥
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ २४ ॥
एकपाद् द्विपदो भूयो वि चक्रमे द्विपात्त्रिपादमभ्येति पश्चात् ।
चतुष्पाच्चक्रे द्विपदामभिस्वरे संपश्यन्पङ्क्तिमुपतिष्ठमानः ।
तस्य देवस्य क्रुद्धस्यैतदागो य एवं विद्वांसं ब्राह्मणं जिनाति ।
उद्वेपय रोहित प्र क्षिणीहि ब्रह्मज्यस्य प्रति मुञ्च पाशान् ॥ २५ ॥
कृष्णायाः पुत्रो अर्जुनो रात्र्या वत्सोऽजायत । स ह द्यामधि रोहति रुहो रुरोह रोहितः ॥२६॥

अर्थ— हे अग्नि, (**त्वं क्रतुभिः अर्कः क्रतुभिः हितः**) तूं यज्ञानें आणि सूर्यकिरणांनीं युक्त आहेस. तूं (**समिद्धः दिवि उत् अरोचथाः**) प्रदीप्त होऊन द्युलोकांत प्रकाशतोस. (**मरुतः पृश्निमातरः किं अभ्यार्चन्**) भूमीस माता समजणारे मरुत् त्याची अर्चना करण्यास सुरवात करतात. (**यत् देवाः रोहितं अजनयन्त**) ज्यावेळीं देवांनीं सूर्यास प्रगट केला. ॥०॥ (२३)

(**यः आत्मदा बलदा यस्य प्रशिषं विश्वे देवाः उपासते**) जो आत्मिक बल देणारा आणि शक्ति देणारा आहे, ज्याच्या आज्ञेचें पालन सर्व देव करतात. (**यः अस्य द्विपदः चतुष्पदः ईशे**) जो या द्विपाद आणि चतुष्पादांचा स्वामी आहे. ॥०॥ (२४)

(**एकपाद् द्विपदः भूयः विचक्रमे**) एक पायांचा दोन पायांच्या पेक्षां जास्त धांवतो (**द्विपात् त्रिपाद् पश्चात् अभ्येति**) दोन पायांचा तीन पायांच्या मागें चालतो. (अथर्व. १३।२।२७) (**चतुष्पाद् द्विपदं अभिस्वरे पंक्तिं संपश्यन् उपतिष्ठमानः चक्रे**) चार पायांचा दोन पायांच्या एकाच स्वरांत रहाणाऱ्यांच्या पंक्तींत पहातां पहातां, त्यांच्या जवळून सेवा घेतो. (**तस्य देवस्य०**) ज्ञानी ब्राह्मणांचा नाश केल्यानें जें पाप होतें तें त्या देवाप्रत तें [पाप पोंचतें]. तें नाश करणाऱ्यास थरथरा कांपवितें, निर्बळ बनवितें आणि बंधनांत पाडतें. (२५) (ऋ. १०।११७।८)

(**कृष्णायाः रात्र्याः पुत्रः वत्सः अर्जुनः अजायत**) काळ्या रंगाच्या रात्रीचा पुत्र, बालक, प्रकाशमान् सूर्य झाला आहे. (**सः रोहितः रुहः रुरोह**) तो लाल रंगाचा सर्व पुढें जाणाऱ्यांपेक्षां वर चढला आहे. तोच (**ह द्यां रोहति**) निश्चयानें द्युलोकावर चढतो. (२६) [१४]

भावार्थ- अस्त, उदय, उषा, द्यु, अंतरिक्ष, पृथ्वी हे सर्व तीनच्या संख्येंत आहेत, सर्वांचा जन्म तीन प्रकारचा आहे. जन्मतांच पृथ्वीस प्रकाशित करतो, आणि अंतरिक्षांत पाण्यास धारण करितो अग्नि यज्ञासह आणि सूर्य किरणांसह प्रकाशित होत आहे. प्रदीप्त अग्नि यज्ञांत आणि प्रकाशमान् सूर्य द्युलोकांत प्रकाशत आहे. जेव्हां देवांमार्फत सूर्याचा उदय होतो तेव्हां वायुसुद्धां वहातो. (२१-२३)

आत्मिक आणि शारीरिक बल देणारा देव आहे. त्याची आज्ञा सर्व मानतात. सर्व द्विपाद आणि चतुष्पाद त्याच्या आज्ञेंत रहातात. (२४)

हा देव एक पायाचा असून सुद्धां अनेक पायाच्या (देवां) पेक्षां पुढें जातो. तो सर्वांची पूजा स्वीकारतां स्वीकारतां सर्वांस समान ठेऊन सर्वांचा नेता होतो. जे ज्ञानी ब्राह्मणास त्रास देतात ते या देवाचा अपराध करतात. ते या अपराध्यास थरथरां कांपवितात, आणि बंधनांत टाकतात. (२५)

रात्री व्यतीत झाल्यानंतर दिवस झाला आणि सूर्योदय झाला. त्याच्या उदयाबरोबरच तो सर्वांपेक्षां वर चढूं लागला आणि अंतीं द्युलोकांत विराजमान् होऊन प्रकाशित होऊं लागला. (२६)

अध्यात्मम्

कांड १३, सूक्त ४

(ऋषिः- ब्रह्मा । देवताः- अध्यात्मम्, रोहितादित्यदैवतम्)

[१] स एति सविता स्वर्दिवस्पृष्ठेऽवचाकशत् ॥ १ ॥
रश्मिभिर्नभ आभृतं महेन्द्र एत्यावृतः ॥ २ ॥
स धाता स विधर्ता स वायुर्नभ उच्छ्रितम् । रश्मि० ॥ ३ ॥
सोऽर्यमा स वरुणः स रुद्रः स महादेवः । रश्मि० ॥ ४ ॥
सो अग्निः स उ सूर्यः स उ एव महायमः । रश्मि० ॥ ५ ॥
तं वत्सा उप तिष्ठन्त्येकशीर्षाणो युता दश । रश्मि० ॥ ६ ॥
पश्चात्प्राञ्च आ तन्वन्ति यदुदेति वि भासति । रश्मि० ॥ ७ ॥
तस्यैष मारुतो गणः स एति शिक्याकृतः । ॥ ८ ॥
रश्मिभिर्नभ आभृतं महेन्द्र एत्यावृतः ॥ ९ ॥
तस्येमे नव कोशा विष्टम्भा नवधा हिताः । ॥ १० ॥
स प्रजाभ्यो वि पश्यति यच्च प्राणति यच्च न ॥ ११ ॥
तमिदं निगतं सहः स एष एक एकवृदेक एव ॥ १२ ॥
एते अस्मिन्देवा एकवृतो भवन्ति ॥ १३ ॥

अर्थ— [१] (स्वः सविता दिवः पृष्ठे अवचाकशन् सः एति) तो सूर्य द्युलोकाच्या पृष्ठभागावर प्रकाशतो आणि स्वतःच्या तेजानें पुढें जातो. (१) त्यानें स्वतःच्या (रश्मिभिः नभः आभृतं) किरणांनीं आकाश भरून टाकलें. हा (महेन्द्रः आवृतः एति) महेन्द्र तेजानें व्याप्त होऊन चालत आहे. (२) (स धाता०) तो धाता, विधाता आणि तोच (वायुः) वायु आहे. ज्यानें (नभः उच्छ्रितं) आकाश उंच केलें आहे. (३)

तो अर्यमा, वरुण, रुद्र आणि महादेव आहे. (४) तो अग्नि, सूर्य आणि महायमहि तोच आहे. (५) (तं एकशीर्षाणः दश वत्साः युताः उपतिष्ठन्ति) त्याच्याबरोबर एक डोक्याचीं दहा वासरें एकत्र मिळून रहातात. (६)

(पश्चात् प्राञ्च आ तन्वन्ति) नंतर पूर्व दिशेस तेज पसरतें. (यत् उदेति विभासति) जें उदय पावतें आणि प्रकाश देतें. (७)

(तस्य स एष मारुतः गणः शिक्याकृतः एति) त्याच्यासह हा वायुगण शिंक्यांत पकडकेल्याप्रमाणें चालतो. (८) त्यानें किरणांनीं आकाश व्यापिलें आहे. हा महेन्द्र तेजानें आवृत होऊन चालत आहे. (९) (तस्य इमे नव कोशा विष्टम्भा नवधा हिताः) त्याचे हे नऊ कोष विविध रूपांत नऊ प्रकारें ठेवलेले आहेत. (१०)

(सः प्रजाभ्यः विपश्यति यत् च प्राणति यत् च न) तो प्रजेला पहातो. जे प्राण धारण करतात आणि जे धारण करीत नाहींत. (११) (तं इदं निगतं सहः) तें हें एकत्रित झालेलें सामर्थ्य आहे. (सः एषः एकः एकवृत् एकः एव) तो हा एकच आहे, एकमात्र व्यापक देव केवळ एकच आहे. (१२)

(एते देवाः अस्मिन् एकवृताः भवन्ति) या सर्व देवता त्याच्यामध्यें एकरूप झाल्या आहेत. (१३) [१५]

[५]

[२] कीर्तिश्च यशश्चाम्भश्च नभश्च ब्राह्मणवर्चसं चान्नं चान्नाद्यं च ॥ १४ ॥
य एतं देवमेकवृतं वेद ॥ १५ ॥
न द्वितीयो न तृतीयश्चतुर्थो नाप्युच्यते । य एतं० ॥ १६ ॥
न पञ्चमो न षष्ठः सप्तमो नाप्युच्यते । य एतं० ॥ १७ ॥
नाष्टमो न नवमो दशमो नाप्युच्यते । य एतं० ॥ १८ ॥
स सर्वस्मै वि पश्यति यच्च प्राणति यच्च न । य एतं० ॥ १९ ॥
तमिदं निगतं सहः स एष एक एकवृदेक एव । य एतं० ॥ २० ॥
सर्वे अस्मिन्देवा एकवृतो भवन्ति । य एतं० ॥ २१ ॥

[६]

[३] ब्रह्म च तपश्च कीर्तिश्च यशश्चाम्भश्च नभश्च ब्राह्मणवर्चसं
चान्नं चान्नाद्यं च । य एतं० ॥ २२ ॥
भूतं च भव्यं च श्रद्धा च रुचिश्च स्वर्गश्च स्वधा च ॥ २३ ॥
य एतं देवमेकवृतं वेद ॥ २४ ॥
स एव मृत्युः सोऽमृतं सोऽभ्वं१ स रक्षः ॥ २५ ॥
स रुद्रो वसुवनिर्वसुदेये नमोवाके वषट्कारोऽनु संहितः ॥ २६ ॥
तस्येमे सर्वे यातव उप प्रशिषमासते ॥ २७ ॥
तस्यामू सर्वा नक्षत्रा वशे चन्द्रमसा सह ॥ २८ ॥

अर्थ— [२] (यः एतं देवं एकवृतं वेद) जो या देवास एकमात्र एकच आहे असें जाणतो त्यास कीर्ति, यश, (अम्भः) पाणी, (नभः) आकाश आणि (ब्राह्मणवर्चसं) ब्रह्मतेज, अन्न आणि (अन्नाद्यं) खानपानादि सर्व भोग प्राप्त होतात. (१४-१५) हा दुसरा, तिसरा, चवथा, पांचवा, सहावा, सातवा, आठवा, नववा, दहावा आहे (न अपि उच्यते) असें म्हणूं शकत नाहीं. (१६-१८)

(स सर्वस्मै विपश्यति यत् च प्राणति यत् च न) जो जीवित आहे आणि जो जिवंत नाहीं, त्या सर्वांस तो पहातो. (१९) (तं इदं०) तें हें एकत्रित झालेलें सामर्थ्य आहे, तो एकच आहे. एकमात्र व्यापक देव केवळ एकच आहे. हे सर्व देव त्याच्यामध्यें एकरूप होतात. (२०-२१)

[३] (ब्रह्म) ज्ञान, तप, कीर्ति, यश, (अंभः नभः) जळ, आकाश, ब्रह्मतेज, अन्न आणि खानपानादि पदार्थ, भूत, भविष्य, श्रद्धा, (रुचिः) तेज, कान्ति, स्वर्ग आणि स्वधा त्याला प्राप्त होतात. जो (यः एतं देवं एकवृतं वेद) या देवास एकमात्र व्यापक देव म्हणून ओळखतो. (२२-२४)

तोच मृत्यु आहे, तोच अमृत आहे, तो (अभ्वं) महान् आहे आणि तो (रक्षः) रक्षक अथवा राक्षस आहे. (२५) तो रुद्र (वसुदेये वसुवनिः नमोवाके अनुसंहितः वषट्कारः) धनदानाच्या समयीं धन प्राप्त करणारा आणि तोच नमस्कार यज्ञांत उत्तम रीतीनें उच्चारलेला वषट्कार आहे. (२६) (तस्य प्रशिषं इमे सर्वे यातवः उप आसते) त्याच्या आज्ञेंत हे सर्व राक्षसादि रहातात. (२७) (तस्य वशे अमू सर्वा नक्षत्रा चन्द्रमसा सह) त्याच्या ताब्यांत हीं सर्व नक्षत्रें चंद्रासह रहातात. (२८)

[७]

[४] स वा अह्नोऽजायत तस्मादहरजायत ॥ २९ ॥
स वै रात्र्या अजायत तस्माद्रात्रिरजायत ॥ ३० ॥
स वा अन्तरिक्षादजायत तस्मादन्तरिक्षमजायत ॥ ३१ ॥
स वै वायोरजायत तस्माद्वायुरजायत ॥ ३२ ॥
स वै दिवोऽजायत तस्माद् द्यौरध्यजायत ॥ ३३ ॥
स वै दिग्भ्योऽजायत तस्माद्दिशोऽजायन्त ॥ ३४ ॥
स वै भूमेरजायत तस्माद्भूमिरजायत ॥ ३५ ॥
स वा अग्नेरजायत तस्मादग्निरजायत ॥ ३६ ॥
स वा अद्भ्योऽजायत तस्मादापोऽजायन्त ॥ ३७ ॥
स वा ऋग्भ्योऽजायत तस्मादृचोऽजायन्त ॥ ३८ ॥
स वै यज्ञादजायत तस्माद्यज्ञोऽजायत ॥ ३९ ॥
स यज्ञस्तस्य यज्ञः स यज्ञस्य शिरस्कृतम् ॥ ४० ॥
स स्तनयति स वि द्योतते स उ अश्मानमस्यति। ॥ ४१ ॥
पापाय वा भद्राय वा पुरुषायासुराय वा ॥ ४२ ॥
यद्वा कृणोष्योषधीर्यद्वा वर्षसि भद्रया यद्वा जन्यमवीवृधः ॥ ४३ ॥
तावांस्ते मघवन्महिमोपो ते तन्वः शतम् ॥ ४४ ॥
उपो ते बध्वे बद्धानि यदि वासि न्यर्बुदम्। ॥ ४५ ॥

अर्थ—[४] (सः वै अह्नः, रात्र्याः अन्तरिक्षात्, वायोः, दिवः, दिग्भ्यः, भूमेः, अग्नेः, अद्भ्यः, ऋग्भ्यः, यज्ञात् अजायत) तो निश्चयपूर्वक दिवस, रात्र, अंतरिक्ष, वायु, द्यु, दिशा, भूमि, अग्नि, जल, ऋचा आणि यज्ञांपासून झाला, त्याचप्रमाणें (तस्मात् अहः, रात्रिः, अन्तरिक्षं, वायुः, द्यौः, दिशः, भूमिः, अग्निः, अपः, ऋचः, यज्ञः अजायत) त्याच्याचपासून दिवस रात्र, अंतरिक्ष, द्युलोक, वायु, द्यु, दिशा, भूमि, अग्नि, जल, ऋचा, यज्ञ झाले (२५-३९)

(सः यज्ञः तस्य यज्ञः) तो यज्ञ आहे, त्याचाच यज्ञ आहे. (सः यज्ञस्य शिरस्कृत्) तो यज्ञाचें मस्तक करणारा आहे म्हणजे तो यज्ञाची प्रमुख देवता आहे. (४०) (सः स्तनयति, सः विद्योतते) तो गरजतो, तो चमकतो. (सः उ अस्मानं अस्यति) तो दगड (गारा) फेंकतो. (४१) (पापाय वा भद्राय वा पुरुषाय वा असुराय वा) त्या पाप्यासाठीं, उत्तम पुरुषासाठीं, राक्षसी वृत्तीच्या पुरुषासाठीं (४२) (यत् वा ओषधीः कृणोषि, यत् वा वर्षासि) जो औषधि निर्माण करतो, जो पाऊस पाडतो (भद्रया यत् वा जन्यं अवीवृधः) जन्मलेल्याला तूं उत्तम कल्याणकारी बुद्धीनें लहानाचा मोठा करतोस. (४३) हे (मघवन्) इंद्र! (तावान् ते महिमा) तो तुझा महिमा आहे. (उप ते शतं तन्वः) हीं तुझीं शेकडों शरीरें आहेत. (४४) (उपः ते बध्वे बद्धानि) हे सर्व कोट्यावधि तुझ्याशीं संबंधित (बांधलेले) आहेत, (यदि वा न्यर्बुदं असि) आणि तूं अब्ज संख्येनें आहेस. (४५)

[८]

[५] भूयानिन्द्रो नमुराद्भूयानिन्द्रासि मृत्युभ्यः ॥ ४६ ॥
भूयानरात्याः शच्याः पतिस्त्वमिन्द्रासि विभूः प्रभूरिति त्वोपास्महे वयम् ॥ ४७ ॥
नमस्ते अस्तु पश्यत पश्य मा पश्यत ॥ ४८ ॥
अन्नाद्येन यशसा तेजसा ब्राह्मणवर्चसेन ॥ ४९ ॥
अम्भो अमो महः सह इति त्वोपास्महे वयम् । नमस्ते० । अन्ना० ॥ ५० ॥
अम्भो अरुणं रजतं रजः सह इति त्वोपास्महे वयम् । नमस्ते० । अन्ना० ॥ ५१ ॥

[९]

[६] उरुः पृथुः सुभूर्भुव इति त्वोपास्महे वयम् । नमस्ते० । अन्ना० ॥ ५२ ॥
प्रथो वरो व्यचो लोक इति त्वोपास्महे वयम् । नमस्ते० । अन्ना० ॥ ५३ ॥
भवद्वसुरिदद्वसुः संयद्वसुरायद्वसुरिति त्वोपास्महे वयम् ॥ ५४ ॥
नमस्ते अस्तु पश्यत पश्य मा पश्यत ॥ ५५ ॥
अन्नाद्येन यशसा तेजसा ब्राह्मणवर्चसेन ॥ ५६ ॥

अर्थ— [५] (**न-मुरात् इन्द्रः भूयान्**) अमर देवांपेक्षां सुद्धां इन्द्र मोठा आहे. (**इन्द्रः मृत्युभ्यः भूयान् असि**) इंद्रा ! तूं मृत्यूपेक्षांसुद्धां मोठा आहेस. (४६) (**इन्द्रः अरात्याः भूयान्**) हे प्रभू ! शत्रूंपेक्षां सुद्धां तूं मोठा आहेस. (**त्वं शच्याः पतिः असि**) तूं शक्तीचा स्वामी आहेस. (**विभूः प्रभूः इति वयं त्वा उपास्महे**) तूं व्यापक आणि स्वामी आहेस, अशा रीतीनें आम्ही तुझी उपासना करतों. (४७) (**पश्यत नमस्ते अस्तु**) हे दर्शनीया ! तुला नमस्कार असो. (**पश्यत मा पश्य**) हे शोभना ! माझ्याकडे पहा. (४८) (**अन्नाद्येन यशसा तेजसा ब्राह्मणवर्चसेन**) खानपान, यश, तेज आणि ब्रह्मवर्चस्वांनीं तूं मला युक्त कर. (४९) (**अम्भः अमः महः सहः इति वयं त्वा उपास्महे**) जळ, पौरुष, महत्ता आणि बलस्वरूप असा तूं त्या तुझी आम्हीं उपासना करतों. (५०) (**अम्भः अरुणं रजः रजतं सह इति त्वा वयं उपास्महे**) जल, लाल, शक्ति आणि श्वेत सामर्थ्यरूप तुझी आम्हीं उपासना करीत आहों. (५१)

[६] (**उरुः पृथुः सुभूः भुवः इति त्वा वयं उपास्महे**) महान् विस्तृत, उत्तम होणारा, ज्ञानयुक्त असा तूं आम्हीं तुझी उपासना करीत आहों. ॥०॥ (५२)

(**प्रथः वरः व्यचः लोकः इति त्वा वयं उपास्महे**) विस्तृत, श्रेष्ठ, व्यापक आणि स्थानदात्या अशा तुझी आम्हीं उपासना करीत आहों. ॥०॥ (५३) (**भवद्वसुः, इदद्वसुः, आयद्वसुः इति त्वा वयं उपास्महे**) धनयुक्त, या धनानें युक्त, सर्व धनांनां एकत्र करणाऱ्या, सर्व धनास स्वतःपाशीं ठेवणारा तूं आहेस असें मानून आम्हीं तुझी उपासना करतों. (५४) (**पश्यत ते नमः अस्तु**) हे दर्शनीय ! तुझ्यासाठीं आमचा नमस्कार असो. (**मा पश्य**) मजकडे पहा. (५५) (**अन्नाद्येन०**) खानपान, यश, तेज, आणि ब्रह्मवर्चस यांनीं मला युक्त कर. (५६)

भावार्थ— हा देव धाता, विधाता, अग्नि, वायु, रुद्र, महादेव इत्यादि आहे. बाकी सर्व देवता त्याच्या आंत सामावलेल्या आहेत. तो एकच आहे. निःसंशय तो एकच आहे. जो त्यास एकरूपानें पहातो तो तेजस्वी, वर्चस्वी आणि खानपानादि भोगांनीं युक्त होतो. त्याच्यापासून सर्व पदार्थ झाले आहेत, आणि सर्व पदार्थांत तो विद्यमान् आहे. यज्ञसुद्धां त्याच्यापासून झाला आणि तो यज्ञांतच राहतो. तो वाईट आणि चांगला दोन्हींच्या पालनासाठीं वनस्पति उत्पन्न करतो. हा सर्व त्याचा महिमा आहे. त्यास शेंकडों, हजारों, कोटयावधि, अब्ज शरीरें आहेत. तीं सर्व अमर आणि मृत्यूपेक्षांसुद्धां श्रेष्ठ आहेत. सर्व शक्ति त्याच्याच आहेत आणि सर्व शक्तींची उपस्थिति त्याच्यांतच आहे. याप्रमाणें त्या देवाची उपासना सर्वांनीं करावी हें योग्य होय. (१–५६)

*

अथर्ववेदाच्या तेराव्या कांडाचें मनन

अध्यात्म प्रकरण

रोहित देवता

अथर्ववेदाच्या तेराव्या कांडाची देवता ' रोहित ' आहे. या रोहिताचें स्वरूप काय आहे ? त्याचें प्रथम मनन करणें आवश्यक आहे. अथर्ववेदाच्या सर्वानुक्रमणिकेंत या देवतेविषयीं याप्रमाणें निर्देश आहे—

उदेहि वाजिन्निति काण्डं ब्रह्माध्यात्मं रोहितादित्यदैवत्यम् त्रैष्टुभम् ॥ (अथर्व. बृ. स. १३।१)

' या तेराव्या कांडाची देवता ' ब्रह्म अध्यात्म, रोहित आदित्य आहे.' हा आदित्य शब्दच येथें या कांडाच्या देवतेचा निर्णय करण्यास सहायक होऊं शकेल. आदित्याचा अर्थ सूर्य आहे. या समग्र कांडाचा संपूर्ण विचार केल्यानें समजूं शकते कीं हा सूर्यच या कांडाची प्रमुख देवता आहे. तिचेंच वर्णन जास्त आहे. या विषयाचा सूचक मंत्रभाग खालीं दिल्याप्रमाणें आहे—

रोहित सूर्य

अनुव्रता रोहिणी रोहितस्य (१।२२)
इदं सदो रोहिणी रोहितस्य (१।२३)

' रोहिणी नक्षत्र या रोहिताचें घर आहे आणि ही रोहिणी रोहितास अनुसरते.' येथें आकाशांत असलेल्या रोहिताचें वर्णन आहे. त्यामुळें ते सूर्यास लागू पडणारेंच आहे. दुसऱ्या सूक्तांतील २४ वा मंत्र साक्षात् सूर्यवर्णनाचाच आहे; आणि २५ व्या मंत्रांत ' हा तपस्वी रोहित द्युलोकावर आरूढ होतो,' असें म्हटलें आहे. त्यावरून येथें रोहित हा शब्द पूर्वी म्हटलेल्या सूर्यासाठींच आहे.

रोहितः कालो अभवत् । (२।३९)

येथें ' रोहित काल अथवा समय ' आहे असें म्हटलें आहे. सूर्यामुळें काळ (दिवस, रात्र, सकाळ, दुपार वगैरे) निर्माण होतो, ही गोष्ट तर स्वयंसिद्धच आहे; कारण कीं दिवस आणि रात्र त्याच्यामुळेंच होतात. इतरत्रहि पण कित्येक ठिकाणीं सूर्याचें नांव ' काल ' असें आलें आहे. पुढें पहा—

रोहितो यज्ञानां मुखम् । (२।३९)

' रोहित यज्ञाचें मुख आहे. ' तें सूर्यच होय. कारण सूर्योदय झाल्यानंतर यज्ञास प्रारंभ होतो. पुढें पहा—

रोहितोऽत्यतपद्दिवम् ॥ (२।४०)

' रोहित द्युलोकावर तपत आहे.' हें वर्णन स्पष्टपणें सूर्याचें आहे. यांत तपत आहे हें क्रियापद स्पष्टपणें सूर्याचा उल्लेख करीत आहे. कारण या जगांत सूर्याशिवाय तपणारा दुसरा कोणी पदार्थ नाहीं. तिसऱ्या सूक्ताचा अंतिम मंत्र पुढें पहा—

कृष्णायाः पुत्रो अर्जुनो रात्र्या वत्सोऽजायत ।
स ह द्यामधि रोहति रुहो रुरोह रोहितः ॥ (३।२६)

' काळ्या रंगाच्या रात्रीस श्वेत रंगाचा पुत्र झाला. तो रोहित वाढत वाढत द्युलोकावर चढला. ' या वर्णनांत स्पष्टपणें रोहित हें नांव सूर्यासाठीं आलें आहे. रात्रीचा पुत्र निःसंशय सूर्यच आहे कारण तो रात्रीच्या उदरांतच जन्मतो. याप्रमाणें अलंकारिक वर्णन वेदांत इतरत्रसुद्धां आहे.

याप्रमाणें या सूक्तांत रोहित शब्दानें सूर्याचें वर्णन मुख्यतः आहे हें स्पष्ट दिसून येतें. तरीसुद्धां रोहित म्हणजे अग्नि असा निर्देशसुद्धां या सूक्तांत आहे.

रोहित–अग्नि

रोहितो यज्ञस्य जनिता । (१।१३)

' रोहित यज्ञाचा उत्पादक आहे. ' अग्नीच यज्ञाचा उत्पादक आहे. ही गोष्ट सिद्ध करण्यास अन्य प्रमाण देण्याची आवश्यकता नाहीं. परंतु सूर्योदयानंतर यज्ञ होतो म्हणून सूर्यच यज्ञाचा उत्पादक आहे असें मानण्यास हरकत नाहीं, आणि तसा तो आहे सुद्धां. परंतु अग्नीमध्यें प्रत्यक्ष आहुति टाकण्यांत येतात त्या कारणानें अग्नीहि यज्ञाचा उत्पादक आहे. हीच गोष्ट अन्य शब्दांनीं सुद्धा सांगितली आहे.

रोहितो यज्ञं व्यदधात् । (१।१४)

' रोहित यज्ञास तयार करतो (बनवितो).' हा अग्नीच आहे त्यामुळें तो यज्ञास उत्पन्न करूं शकतो. असो. याप्रमाणें रोहित नांव अग्नीचें सुद्धां आहे. या सूक्ताचे मंत्र पहातां कित्येक मंत्र स्पष्टपणें सूर्यपरत्वें आहेत. कित्येक अग्निपरत्वें आहेत ही गोष्टहि स्पष्ट आहे. कित्येक दोघांचें वर्णन करितात. ही विचित्र स्थिति काय आहे ? सूक्त वाचतां वाचतां मधेंच अग्नि आणि सूर्याचे मंत्र मिश्र झालेले येतात, ही गोष्ट वाचकांच्या ध्यानीं आली असेलच. असें कां ? याचा विचार करणें जरुरीचें आहे.

वेदांत आग्नेय पदार्थांचें केंद्र सूर्य समजण्यांत आलें आहे. आपल्या पृथ्वीवर जो अग्नि आहे तो सूर्याचा पौत्र आहे. विद्युत् सूर्याचा पुत्र आणि अग्नि विद्युताचा पुत्र आहे. त्यामुळें अलंकारिक भाषेंत अग्नि सूर्याचा पौत्र झाला. अग्नि कसा उत्पन्न होतो असा प्रश्न येथें उपस्थित होतो. त्याचा उल्लेख असा करतां येईल. सूर्याच्या उष्णतेनें मेघमंडळांत विद्युत् निर्माण होते. ही विद्युत् वाळलेल्या गवतावर अथवा वाळलेल्या झाडावर पडली तर अग्नि उत्पन्न होतो. त्यामुळें वास्तविक हा अग्नि सूर्याचाच अंश आहे. वस्तुतः विचार केला असतां हें सहजीं ध्यानीं येऊं शकतें कीं या पृथ्वीवर अथवा या सूर्यमंडळांत जें कांहीं अग्नितत्त्व अथवा उष्ण पदार्थ अथवा उष्णता उत्पन्न करणारे पदार्थ आहेत, ते सर्व सूर्यामुळेंच उष्णता देण्यास समर्थ आहेत. अग्नि सूर्यापासूनच निर्माण झाला ही गोष्ट या पूर्वी दाखविली आहेच. आतां वाचकांनीं लाकडांचा विचार करावा. लाकडें जाळल्यानें अग्नि उत्पन्न होतो. ही उष्णता लाकडांत कोठून आली ? वृक्ष सूर्यकिरणांपासून जी उष्णता मिळते ती स्वतःमध्यें संग्रहित करून ठेवतात. तीच उष्णता लाकडांत असते आणि जळण्यामुळें ती प्रगट होते. वस्तुतः ती सूर्यांतून आलेलीच उष्णता आहे. याचप्रमाणें लाकडाचे कोळसे, खाणींतील कोळसे, घासलेट वगैरे जे पदार्थ उष्णता उत्पन्न करणारे आहेत, असें आपण समजतों, त्यांची सर्व उष्णता सूर्यापासून प्राप्त झालेली असते. सूर्याशिवाय असा दुसरा पदार्थ नाहीं कीं जो उष्णता देऊं शकतो. त्यामुळें सर्व आग्नेय पदार्थ सूर्याचींच विभिन्न रूपें आहेत.

तीन अग्नि

पृथ्वीवर अग्नि, अंतरिक्षांत विद्युत आणि द्युलोकांत सूर्य असे हे तीन अग्नि आहेत. वेदांत तीन अग्नींचें वर्णन पुष्कळ वेळां आलें आहे. ते तीन अग्नि हेच होत; पण हे तीन अग्नि भिन्न भिन्न नाहींत, तर ते सर्व एकाच अग्नीचीं रूपें आहेत, आणि तो एक अग्नि सूर्यच आहे. कारण सूर्याचेंच रूपांतर होऊन [illegible] आहे. म्हणून म्हटलें आहे कीं—

स एति सविता० । सो अग्निः स उ इन्द्रः ।

(४।१-५)

‘ तो सूर्यच अग्नि आणि इंद्र म्हणजेच विद्युत् आहे.’ कारण कीं सूर्यानेंच अग्नि आणि विद्युत् हीं दुसरीं रूपें धारण केलीं आहेत. याप्रमाणें जरी तीन अग्नि आपण पहात असलों तरी एकाच सूर्याला याप्रमाणें तीन विभिन्न रूपांत आपण पहात असतों.

जेव्हां गुरुकुलांत आठ वर्षांचा मुलगा दाखल होतो तेव्हां त्यास संध्येनंतर अग्नींत हवन करण्याचा उपदेश करण्यांत येतो. त्याचवेळीं त्यास समजतें कीं आपलें उपास्य दैवत अग्नि आहे. तो श्रद्धेनें आणि भक्तीनें अग्नीची उपासना करतो, आणि मनांत विचार करतो कीं, काय, हा अग्निदेव स्वतंत्र आहे काय ? विचार करतां करतां वर्षाऋतूंत त्याच्या नजरेस आकाशांत चमकणारी वीज पडते. एखादेवेळीं ही वीज एखाद्या झाडावर पडते आणि तें झाड पेट घेतें; त्याचवेळीं गुरु त्यास समजावितो कीं आपला पृथ्वीवरील अग्नि, याप्रमाणें विजेमधून पृथ्वीवर उत्पन्न झाला आहे. त्यानंतर तो विद्युत्‌ला महान् देव समजतो. परंतु जास्त विचार करतां त्याला कळून येतें कीं ही विद्युत् सूर्यामधून उत्पन्न झालेली आहे आणि मग तो सूर्यालाच महान् देव मानतो. त्यावेळीं तो म्हणतो—

स एति सविता स्वर्दिवस्पृष्ठे० ।
स धाता स विधर्ता स वायुः० ।
स वरुणः स रुद्रः स महादेवः ।
सो अग्निः स उ सूर्यः स उ महायमः ॥ (४।१-५)

‘ तोच सविता, धाता, विधर्ता, वायु, वरुण, रुद्र, महादेव, अग्नि, सूर्य आणि महायम आहे. ’ याप्रमाणें या सूर्यमालेचा, कर्ता, धर्ता, अधिष्ठाता, तो सूर्यच आहे. या सर्वांचा एकमात्र आधार सूर्य आहे. हें ज्ञान त्या शिष्यास प्राप्त होतें. त्यावेळीं तो स्वतःची सूर्योपासना गायत्री मंत्रानेंच करतो—

तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।

या गुरुमंत्राचा अर्थ तो त्यावेळीं असा करतो, ‘ आम्हीं त्या सूर्याच्या, बुद्धीला उत्तेजित करणाऱ्या तेजाचें ध्यान करीत आहोंत.’ याप्रमाणें ध्यान करतां करतां तो सूर्याला स्वतःच्या ब्रह्मवर्चस्वाचा आदर्श मानतो. स्वतःच्या तपश्चर्येचा त्यास आदर्श मानतो. स्वतःच्या ब्रह्मचर्याचें स्वरूप तो सूर्यांत पहातो. आदित्यरूप ब्रह्मचारी होण्याची तो उत्कट इच्छा मनांत बाळगतो. तो असा विचार करतो कीं, जर हें सर्व सूर्यमंडळ या सूर्यापासून झालें आहे तर या पृथ्वीवरचे सर्व जीवजंतु आणि त्यापैकीं मीं एक सुद्धां मिळून सर्व सूर्याचेच अंश आहोंत. सूर्यापासून भिन्न असा कांहीं पदार्थ नाहींच. म्हणूनच वेदानें म्हटलें आहे—

योऽसावादित्ये पुरुषः सोऽसावहम् ॥

(वा. य. ४०।१६)

‘ सूर्याचें आंत जो पुरुष आहे तो मींच आहे. ’ सूर्याशीं माझा इतका घनिष्ठ संबंध आहे कीं सूर्य माझा पिता असून मीं त्याचा अमृत पुत्र आहे. जें सत्त्व आदि त्यांत आहे तें माझ्यांत आहे. माझी परमगति आदित्य आहे आणि माझा प्रारंभ पण आदित्यापासूनच झाला आहे. मीं त्याच आदित्यांतुन जन्मलों

आहे. या आदित्याच्या शक्तीनेंच मी जिवंत आहें आणि अंतीं मी त्या आदित्यांतच मिळून जाईन.

यतो वा इमानि भूतानि जायन्ते, येन जातानि जीवन्ति । यं प्रयन्त्यभिसंविशन्ति, तद्विजिज्ञासस्व तद्ब्रह्मेति ॥ (तै. उ. ३।३)

'ज्याच्यामुळें हीं सर्व भूतें उत्पन्न होतात, उत्पन्न झाल्यानंतर ज्याच्यामुळें जिवंत रहातात, नंतर अंतीं ज्याच्यांत जाऊन मिळतात, तेंच ब्रह्म आहे.' या ब्रह्माचीं लक्षणें तो शिष्य यावेळीं सूर्यांत सार्थ झालेलीं अनुभवतो. कारण कीं सर्व भूतमात्र सूर्यापासून उत्पन्न झाले; त्यांचें सूर्यामुळें पालन–पोषण होतें, अंतीं सूर्यालाच जाऊन तीं मिळतात. या अनुभवानें हें स्पष्ट शाबित होतें कीं, सूर्यच आमच्यासाठीं साक्षात् ब्रह्मरूप आहे. याप्रमाणें विचार करीत तो ब्रह्मचारी सूर्यासच स्वतःचें उपास्य दैवत समजतो. त्यावेळीं त्याच्यासमोर हीं वाक्यें दिसतात—

एतद्वै ब्रह्म दीप्यते यदादित्यो दृश्यते । (कौ. उ. २।१६)
आदित्यां ब्रह्मेत्यादेशः । (छां. उ. ३।१९।१)
आदित्यं ब्रह्मेत्युपास्ते । (छां. उ. ३।१९।१)
स य एतमेवं विद्वानादित्यं ब्रह्मेत्युपास्ते ॥ (छां. उ. ३।१९।४)
यश्चायं पुरुषे यश्चासावादित्ये स एकः ॥ (तै. उ. २।८।१; ३।१०।४)
यश्चायं हृदये यश्चासावादित्ये स एकः ॥ (मै. उ. ६।१७; ७।७)
आदित्यो ब्रह्म ॥ (मै. उ. ६।१६)
ब्रह्म तमसः परमपश्यदमुष्मिन्नादित्ये... विभाति ॥ (मै. उ. ६।२४)
य एष आदित्ये पुरुषः स परमेष्ठी आत्मा ॥ (महानि. उ. २३।१)
आदित्ये पुरुष एतमेवाहं ब्रह्मोपासे ॥ (बृ. उ. २।१।२; ३।१३)
आदित्यात्मा ब्रह्म ॥ (मै. उ. ६।१६)
आदित्यवर्णमूर्जस्वन्तं ब्रह्म । (मै. उ. ६।२४)

'जो हा सूर्य दिसत आहे तेंच ब्रह्म प्रकाशत आहे. आदित्य ब्रह्म आहे, असा आदेश आहे. आदित्य ब्रह्म आहे अशी उपासना करतो. जे मनुष्यांत आहे आणि जें आदित्यांत आहे, तें एकच आहे. हें जें हृदयांत आहे आणि जें आदित्यांत आहे, तें एकच आहे. आदित्यच ब्रह्म आहे. अंधःकाराच्या पलीकडे रहाणारा हा आदित्य आहे आणि त्याच्यांत ब्रह्म प्रकाशत आहे. या आदित्यांत जो पुरुष आहे, तोच परमेष्ठी आत्मा आहे. या आदित्यांत जो पुरुष आहे तेंच ब्रह्म आहे आणि मीं त्याचीच उपासना करतों. या आदित्याचा आत्मा ब्रह्म आहे. ब्रह्म तेजस्वी आहे आणि सूर्याच्या रंगाप्रमाणें आहे.'

याप्रमाणें अनेक वाक्यें सूर्यास ब्रह्म म्हणणारीं अशीं आहेत. हीं वाक्यें त्या ब्रह्मचाऱ्याच्या समोर येतात, आणि तो आदित्यास ब्रह्म समजून त्याची उपासना करूं लागतो. जो ब्रह्मचारी पूर्वीं अग्नीची उपासना करित होता व नंतर विद्युतेची उपासना करूं लागला होता, तोच आतां सूर्यास स्वतःचा आदर्श मानून त्याची उपासना करूं लागला. सूर्यास कर्ता, धर्ता मानूं लागला. तोच सर्वांचें केंद्र आहे, तोच सर्वांचा धारक आहे, सर्व तेजाचें केंद्र आहे, सर्वांस आधीन ठेवणारा तो एकच देव आहे. सूर्यमालेच्या सर्व ग्रह–उपग्रहांचा तो धारक आहे. तो सूर्यमंडळांत आलेल्या सर्व पदार्थांस धारण करतो. तो हाच देव यांत शंकाच नाहीं. त्यामुळेंच अथर्वश्रुतींत म्हटलें आहे—

स धाता स विधर्ता । (अथर्व. १३।४।३)

'तोच सविता सर्वांचा आधार आणि विशेषेंकरून आधार देणारा आहे,' पूर्वोक्त उपनिषदांच्या वचनांत 'या आदित्यांत ब्रह्म आहे.' अशीं वचनें येऊन गेलीं आहेत. त्यामुळें आदित्याचा देह आणि त्यामध्यें विराजमान् ब्रह्म आहे ही कल्पना व्यक्त होते. जणूं काय सूर्यांचा दृश्यमान आकार आहे तोच ब्रह्माचा देह आणि त्यामध्यें व्यापक ब्रह्म आहे. ज्याप्रमाणें मनुष्यास देह आणि आत्मा आहे त्याचप्रमाणें सूर्यासहि देह आणि आत्मा आहे. त्यामुळेंच 'सूर्यांत जो पुरुष आहे तो मींच आहें.' या कथनाचें तात्पर्य असें आहे कीं सूर्यांत जें ब्रह्म आणि गोलक आहे त्याचा अंश माझा आत्मा आणि देह आहे हें स्पष्ट आहे. या पृथ्वीवर जें जें म्हणून निर्माण झालेलें आहे तें तें सर्व सूर्याच्या अंशानें निर्माण झालें आहे. ही गोष्ट जर आपण मानूं लागलों तर सर्व चराचर पार्थिव आणि अपार्थिव वस्तु ज्या ज्या कांहीं या भूमीवर आहेत त्या सर्व सूर्यापासून निर्माण झाल्या आहेत असें सिद्ध होतें.

पूर्वीप्रमाणेंच तो ब्रह्मचारी स्वतःच्या मनांत या वाक्यांचें अनुसंधान करतो. तो विचार करतो कीं—

स एष एक एकवृदेक एव । (अथर्व. १३।५।२०)
सर्वे अस्मिन् देवा एकवृतो भवन्ति । (अथर्व. १३।५।१)

'तो एकच आहे, एकमात्र एकच आहे, सर्व देव त्याच्याठायीं एकरूप होतात.' ज्या अग्नि, विद्युत् वगैरे भिन्न देवता आहेत, त्या सर्व सूर्यांत एकरूप होतात. त्याचप्रमाणें ही पृथ्वीसुद्धां एकेकाळीं सूर्यरूपच होती; आणि जर ही पृथ्वी सूर्यांचा भाग होती

तर त्यावरील सर्व पदार्थ सुद्धां सूर्यरूपच होते, यांत कांहीं शंका नाहीं.

वरील अनुसंधानानें मनन करतां करतां तो ब्रह्मचारी विचार करतो आणि मनांत पुनः पुनः म्हणतो, अनुभव करतो, मनांतल्या मनांत कल्पना करतो आणि स्वतःचें मत निश्चित आणि शंकारहित करण्याचा प्रयत्न करतो. तो नेहमीं ध्यान करतो कीं—

प्रभूरिति त्वोपास्महे वयम् ।
मह इति त्वोपास्महे वयम् ।
सुभूर्भुव इति त्वोपास्महे वयम् ।
लोक इति त्वोपास्महे वयम् ॥
(अथर्व. १३।८-९।४७-५३)

' तूं प्रभू आहेस, तूं महान् आहेस, तूं उत्तम सत्ता आणि ज्ञानानें युक्त आहेस आणि तूंच सर्वांस योग्य स्थान देतोस असा तूं आहेस. आम्हीं तुझी उपासना करतों.' (**वयं त्वा उपास्महे**) आम्हीं सर्व तुझी उपासना करतों, या शब्दांत सर्व एकत्र मिळून उपासना करतों म्हणजे संघद्वारा होणारी उपासना आहे. व्यक्ति-द्वारा होणारी ही उपासना नव्हे. हा संघ गुरुकुलनिवासी ब्रह्म-चाऱ्यांचा असो अथवा खेड्यांत अथवा शहरांत रहाणाऱ्या लोकांचा असो. त्यामुळें वरील विचारसरणींत कांहीं फरक पडत नाहीं. सूर्यमालेंतील अंतर्गत वस्तुमात्रांचा प्रभु आणि कर्ता-धर्ता सूर्यच आहे. तोच सूर्याहून श्रेष्ठ आहे. तोच सर्वांस ज्ञान देणारा आहे. तोच सर्वांतर्यामीं निवास करणारा आहे, हें निश्चित आहे. हा तसेंच ४६ ते ५६ पर्यंतचे ११ मंत्र, या मंत्रांत जे अनेक गुण वर्णन केले आहेत ते उपासनेच्यावेळीं सूर्याच्या ठिकाणीं कसे पाहण्यांत येतात, त्याचा विचार उपासकानें करावा आणि स्वतःच्या उपास्यदेवतेची शक्ति स्वतःमध्यें धारण करण्याचा प्रयत्न करावा. ' जसें माझें उपास्य दैवत तसाच तेजस्वी आणि कर्ता-धर्ता मीं व्हावें ' अशीच आकांक्षा उपासकाच्या मनांत सर्वदा असावी आणि सतत केलेली अशी उपासना सफलहि होतेच.

स स्तनयति स वि द्योतते स उ अश्मानमस्यति ।
पापाय वा भद्राय वा पुरुषायासुराय वा ॥
(१३।७।४१-४२)

' तो आमचा उपास्य देव, पुण्यात्म्या मनुष्यांवर आणि पापी राक्षसांवर एकसारख्या रीतीनेंच गर्जना करतो, चमकतो आणि गारांचा आणि पावसाचा वर्षाव करतो. ' तो कोणाचा पक्षपात करीत नाहीं. त्याचा प्रकाश सर्वांसाठीं समान रीतीनें पडतो. तो फक्त पुण्यात्म्यासाठीं प्रकाशतो आणि पापात्म्यासाठीं नाहीं असें होत नाहीं. तो सर्वांसच स्वतःच्या प्रकाशानें मार्ग दाखवितो. हा मंत्रभाग वाचून उपासक सुद्धां म्हणूं लागतो कीं ' मी सर्व मनुष्यमात्र त्याचप्रमाणें प्राणीमात्रांशीं समभावानें वागेन कोणावर पक्षपात करणार नाहीं. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, निषाद, अंत्यज, चांडाल वगैरे सर्वांस समभावानें सहाय्य करीन. माझें उपास्य सूर्यदेव आहे. तो स्वतःचा प्रकाश सर्वांस देतो. ही गोष्टच माझें कर्तव्य मला दाखविते, म्हणून मी सुद्धां तसेंच करीन. समभाव ठेवणें हेंच माझें कर्तव्य आहे. ' सामाजिक आचरणांत विषमता ठेवतां कामा नये. ही उपासना सामाजिक उपासना आहे. सर्वांनीं एकत्र मिळून ही उपासना करावी. ज्यांच्या वर उपास्यदेव सूर्याचा प्रकाश पडतो त्या सर्वांनीं या उपासनेंत सामिल व्हावें.

सर्व लोकांस आणि जगास अंधारांतून दूर करून प्रकाशांत आणण्यासाठीं रात्र आणि दिवसाच्या समयीं या सूर्यदेवाचा अवतार होतो. प्रत्येक युगांत याप्रमाणें या सूर्यदेवाचा अवतार होत आला आहे. तो येथें अवतरून आम्हांस प्रकाशाचा मार्ग दाखवून आमचा उद्धार करतो. जर प्रत्येक युगांत याप्रमाणें हा देव अवतार घेणार नाहीं तर सर्व जग अंधारांत राहील, आणि जीवमात्र जीवित राहूं शकणारच नाहीं. आपणां सर्वांचें जीवन त्याच्या प्रकाशाशीं संबद्धित झालें आहे. हा आमच्या जीव-नाचा आधार असा हा देव आहे. त्याची जीवनशक्तीच सर्वांचें जीवन होऊन राहिली आहे. याप्रमाणें या जगाचे अणुरेणु त्याच्याशीं संबंधित झालेले आहेत. या वेळेस उपासकास खालील मंत्र समोर दिसतो—

तस्मादहरजायत ... रात्रिरजायत ... अन्त-
रिक्षमजायत ... वायुरजायत ... द्यौरजायत ...
... दिशोऽजायन्त ... भूमिरजायत ... अग्निर-
जायत ... आपोऽजायन्त ... ऋचोऽजायन्त ...
... यज्ञोऽजायत ॥ (१३।७।२९-३९)

' या सूर्यदेवामुळेंच दिवस, रात्र, अंतरिक्ष, वायु, द्यौ, दिशा, भूमि, जल, अग्नि, मंत्र आणि यज्ञ झाले आहेत.' जर सूर्य नसतां तर यापैकीं कांहींच झालें नसतें. या सर्वांचा कर्ता-धर्ता जो सूर्य-देव तोच आमचें उपास्य आहे.

तावांस्ते मघवन् महिमोपो ते तन्वः शतम् ।
... यदि वासि न्यर्बुदम् ॥ (अ. १३।७।४४-४५)

' हे ऐश्वर्यवान् प्रभू ! तुझा हा महिमा अद्भुत आहे. हीं सर्व शेकडों, (हजारों, लाखों, कोट्यावधि) अब्जाच्या संख्येनें अनंत शरीरें आहेत तीं सर्व तुझींच आहेत. ' तात्पर्य, या विश्व-रूपांत तूंच सर्वत्र भरला आहेस; कारण कीं ही भूमिसुद्धां तुझ्या-

पासून झाली आहे, आणि भूमीपासून सर्व पदार्थ झाले आहेत. त्यामध्यें तुझ्याहून भिन्न असा कोणताच पदार्थ नाहीं. हा देव एकमात्र एकच आहे.

न द्वितीयो न तृतीयश्चतुर्थो नाप्युच्यते ।
न पञ्चमो न षष्ठः सप्तमो नाप्युच्यते ।
नाष्टमो न नवमो दशमो नाप्युच्यते ॥

(अ. १३।५।१६-१८)

' तो एकच आहे, दुसरा, तिसरा, चौथा, पांचवा, सहावा, सातवा, आठवा, नववा आणि दहावा तो नाहींच.' कारण की तो एकमात्र एकच असून एकच आहे. सूर्यमालेंत सूर्याचें हेंच स्थान आहे, हेंच महत्त्व आहे, हेंच वैभव आहे, आणि हेंच ऐश्वर्य आहे. तसेंच—

स एव मृत्युः सोऽमृतं सोऽभ्वं स रक्षः ।
स रुद्रो वसुवनिर्वसुदेये नमोवाके० ॥
तस्येमे सर्वे यातव उप प्रशिषमासते ।
तस्यामू सर्वा नक्षत्रा वशे चन्द्रमसा सह ॥

(अ. १३।६।२५-२८)

' तोच मृत्यु आहे, तोच अमृत आहे, तोच मोठा देव आहे, तोच रक्षक अथवा राक्षस आहे, तोच रुद्र आहे, ही सर्व चालणारी ग्रह-नक्षत्रें वगैरे तसेंच सर्व नक्षत्रें आणि चंद्रमा सुद्धां त्याच्या आज्ञेत रहातात. ' कारण की सूर्यमालेंतील विद्यमान् सर्व ग्रह सूर्याच्या आकर्षणातच राहिलेले आहेत. सूर्याच्या आकर्षणाचा प्रभाव सर्वांवर पडत आहे. याप्रमाणें हा सूर्यदेव सर्वांस अमरत्व देणारा आहे आणि सर्वांस मृत्यूहि देणारा आहे. तोच चंद्र आहे, तोच राक्षस आहे आणि तोच संरक्षकसुद्धां आहे. अर्थात् तोच सर्व कांहीं आहे.

सूर्य नसल्यामुळें अथवा सूर्याच्या अतितापानें मृत्यु होतो. त्याचप्रमाणें सूर्यप्रकाश जीवन देतो, म्हणून तो अमरत्व देणारा आणि त्यामुळेंच त्या एका देवास हीं सर्व नांवें लावतां येतात. आतापर्यंत अमृत, मृत्यु, रक्षक, रुद्र हीं नांवें येऊन गेलीं आहेत. यानंतर या सूक्तांत दुसरीं आलेलीं नांवें पाहूं—

स एति सविता⋯महेन्द्रः⋯स धाता...विधर्ता स वायुः⋯ सोऽर्यमा स वरुणः सः रुद्रः स महादेवः । सोऽग्निः स उ सूर्यः स उ एव महायमः । (अ. १३।४।१-५)

' तो सविता, महेन्द्र, धाता, विधर्ता, अर्यमा, वरुण, रुद्र, महादेव, अग्नि, सूर्य, महायम आहे. ' हीं सूर्याचीं नांवें आहेत. तसेंच—

इन्द्रः⋯ शच्याः पतिः⋯विभूः⋯ प्रभूः ।

(अ. १३।८।४६-४७)

' इन्द्र, शचिपति, विभु, प्रभुहि तोच आहे.' हीं सर्व नांवें त्या देवाचीं वाचक आहेत. म्हणजे हीं सर्व नांवें त्याचेंच गुणवर्णन करीत आहेत. जर हें सत्य आहे तर या देवतेचे जे मंत्र आहेत ते सर्व सूर्यदेवाचेंच वर्णन करतात, असें मानलें पाहिजे तरच हीं नांवें सार्थ, अन्वर्थक आणि योग्य होऊं शकतील. अशी कल्पना त्या उपासकाच्या मनांत येताच तो या मंत्रांत त्याचें वर्णन पाहूं लागतो, आणि स्वतःच्या उपास्य देवाचें महात्म्य जाणतो आणि तें मनांत ठसावण्याचा प्रयत्न करतो.

स एति सविता स्वर्दिवस्पृष्ठेऽवचाकशत् ।
रश्मिभिर्नभ आभृतं महेन्द्र एत्यावृतः ॥
स प्रजाभ्यो वि पश्यति यच्च प्राणति यच्च न ॥

(अ. १३।४।१.२,११)

' तो द्युलोकाच्या पाठीवर प्रकाशतो, त्याच्या किरणांनीं आकाश भरून गेलें आहे, सर्व प्रजेस तो विशेष प्रकारें पहातो. ' हें सर्व वर्णन उपासकास प्रत्यक्ष दिसतें. सूर्य आकाशांत प्रकाशतो, त्याच्या किरणांनीं आकाश भरून गेलें आहे, तो सर्वांस पहातो, हा सर्व गोष्टी मनुष्यास दररोज दिसतात. याप्रमाणें स्वतःच्या उपास्य देवाचा महिमा उपासक जाणतो आणि त्याच्याविषयीं स्वतःच्या मनांत त्याच्या (उपास्य देवते) विषयीं आदर द्विगुणित होतो.

या कांडाचीं पहिलीं तीन सूक्तें मुख्यतः सूर्याचीं [illegible] आहेत. याप्रमाणें मुख्यतः जे मंत्र सूर्याचें वर्णन [illegible] विशेषेंकरून ध्यानाच्या वेळीं ब्रह्मचर्याश्रमांत [illegible] त्यांचें [illegible] मनन करूं.

सूर्यस्याश्वा हरयः केतुमन्तः सदा वहन्त्यमृताः सुखं रथम् ।
घृतपावा रोहितो भ्राजमानो दिवं देवः पृषतीमा विवेश ॥ २४ ॥
उद्यंस्त्वं देव सूर्य सपत्नानव मे जहि ॥ ३२ ॥
ये देवा राष्ट्रभृतोऽभितो यन्ति सूर्यम् ॥ ३५ ॥
इतः पश्यन्ति रोचनं दिवि सूर्यं विपश्चितम् ॥
सूर्यो द्यां सूर्यः पृथिवीं सूर्य आपोऽति पश्यति ।
सूर्यो भूतस्यैकं चक्षुरा रुरोह दिवं महीम् ॥ ४५ ॥
यो अद्य देव सूर्य त्वां च मां चान्तरायति ॥ ५८ ॥

(अ. १३।१)

' सूर्याचे घोडे नेहमीं प्रकाशयुक्त असतात. ते त्याच्या रथास सहजच चालवितात. सर्वत्र पवित्रता पसरविणारा सूर्यदेव विविध-

रंगाच्या प्रभेनें द्युलोकांत प्रवेश करतो. हे सूर्यदेवा ! उदयास येऊन तूं माझ्या शत्रूंचा नाश कर. प्रकाशास पोषक देव सूर्याच्या चौफेर भ्रमण करतात. द्युलोकांत प्रकाशित होणाऱ्या सूर्यास सर्व लोक पहातात. सूर्य द्युलोक, भूमिलोक वगैरे सर्वांस पहातो. सर्व जगाचे चक्षु एकमात्र सूर्यच आहे. तो द्युलोकावर आरूढ होऊन विराजतो. हे सूर्या ! जो पुरुष तुझ्या आणि माझ्यामध्यें विरोध निर्माण करतो तो पापी आहे. ' इत्यादि मंत्र सूर्याचें वर्णन स्पष्टपणें करीत आहेत, आणि उपास्य देवाचें महत्त्व उपासकाच्या अंतःकरणांत स्थिर करीत आहेत. या प्रथम सूक्ताच्या इतर मंत्रांचासुद्धां या मंत्रांच्या अनुसंधानानें विचार केला पाहिजे. आतां द्वितीय सूक्ताच्या मंत्रांत सूर्याचें वर्णन किती गंभीरपणें केलें आहे, तें पहा—

उदस्य केतवो दिवि शुक्रा भ्राजन्त ईरते ।
आदित्यस्य नृचक्षसो महिव्रतस्य मीढुषः ॥ १ ॥
त्वाम सूर्य भुवनस्य गोपां यो रश्मिभिर्दिश आभाति सर्वाः ॥ २ ॥
विपश्चितं तरणिं भ्राजमानं वहन्ति यं हरितः सप्त बह्वीः ॥ ४ ॥
दिवं च सूर्य पृथिवीं च देवीमहोरात्रे विमिमानो यदेषि ॥ ५ ॥
स्वस्ति ते सूर्य चरसे रथाय येनोभावन्तौ परियासि सद्यः । यं ते वहन्ति हरितो वहिष्ठाः शतमश्वा यदि वा सप्त बह्वीः ॥ ६ ॥
सुखं सूर्य रथमंशुमन्तं स्योनं सुवह्निमधि तिष्ठ वाजिनम् ॥ ७ ॥
सप्त सूर्यो हरितो यातवे रथे हिरण्यत्वचसो बृहतीरयुक्त ॥ ८ ॥
उद्यन्रश्मीना तनुषे विश्वा रूपाणि पुष्यसि ॥१०॥
दिवि त्वात्रिरधारयत्सूर्या मासाय कर्तवे ॥ १२ ॥
यत्समुद्रमनुश्रितं तत् सिषासति सूर्यः ॥ १४ ॥
(अ. १३।२)

' वृष्टि करणारा, नियमाप्रमाणें चालणारा, मानवांचें निरीक्षण करणारा अशा सूर्याचे तेजस्वी किरण सूर्योदय झाल्यानंतर पुष्कळच चमकतात. जो स्वतःच्या तेजस्वी किरणांनीं सर्व दिशांना प्रकाशित करतो त्या सूर्यदेवाची आम्हीं प्रशंसा करतों, त्याचे गुण गातों. पुष्कळ प्रभावशाली सात किरणें तेजस्वी आणि ज्ञानी सूर्यदेवास घेऊन जातात. द्युलोक, भूलोक, आणि अहोरात्री यांस निर्माण

करून, हे सूर्या, तूं जात आहेस. ज्याच्या सहाय्यानें तूं दोन्ही सीमेपर्यंत प्रवास करतोस त्या चालणाऱ्या रथास सुख मिळो. महान् सात किरणें अथवा गतिमान् शंभर किरणें तुला चालवित आहेत. हे सूर्या ! तूं अशा सुखदायी उत्तम गतिमान् रथावर चढ. सूर्यानें सोन्यासारखींच चमकणारीं तेजस्वी किरणें वेगासाठीं स्वतःच्या रथास जोडलीं आहेत. उदय झाल्यावर तूं किरणांस पसरवितोस आणि सर्व रूपांस प्रकाशित करतोस. महिन्याचे विभाग करण्यास तुला द्युलोकांत ठेविलें आहे. जे समुद्राच्या आश्रयानें रहातात ते सूर्यास प्राप्त करण्यास इच्छितात. '

येथपर्यंतचे सर्व मंत्र बहुशीं सूर्यासंबंधींच आहेत. जे मंत्र येथें अर्थ दिले आहेत ते वाचकांनीं पूर्वीच्या ठिकाणीं पाहून त्यांच्या अर्थाचें मनन करावें. त्यावरून येथपर्यंतचे सर्वच मंत्र सूर्याचें गुणगान करणारे आहेत हें स्पष्टपणें समजून येईल. त्यापुढील नऊ मंत्र (१६ ते २४) ऋग्वेद मंडळ १।५० मध्यें आलेले आहेत. त्यांची देवतासुद्धां सूर्यच आहे. त्यामुळें ते सूर्याचें गुणवर्णन करीत आहेत यांत कांहीं शंका नाहीं. त्यांतील कित्येक मंत्र यजुर्वेद आणि अथर्ववेदांत इतरत्र आलेले आहेत, आणि सर्व ठिकाणीं ते सूर्यदेवतेसंबंधींचेच मंत्र आहेत.

या कारणानें त्यांच्याविषयीं येथें जास्त विचार करण्याची जरुरी नाहीं. त्यानंतरच्या मंत्रांत सूर्यासंबंधीं मंत्र असे आहेत—

अतन्द्रो यास्यन्हरितो यदास्थाद् द्वे रूपे कृणुते रोचमानः । केतुमानुद्यन्त्सहमानो रजांसि विश्वा आदित्य प्रवतो वि भासि ॥ २८ ॥
बण्महाँ असि सूर्य बडादित्य महाँ असि ।
महांस्ते महतो महिमा त्वमादित्य महाँ असि ॥२९॥
रोचसे दिवि रोचसे अन्तरिक्षे पतङ्ग पृथिव्याम् ।
रोचसे रोचसे अप्स्वन्तः ॥ ३० ॥
अहोरात्रे परि सूर्यं वसाने ॥ ३१ ॥
चित्रं देवानां केतुरनीकं ज्योतिष्मान् प्रदिशः सूर्य उद्यन् । दिवाकरोऽति द्युम्नैस्तमांसि विश्वातारीद् दुरितानि शुक्रः ॥ ३४ ॥
सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च ॥ ३५ ॥
उच्चा पतन्तमरुणं सुपर्णं मध्ये दिवस्तरणिं भ्राजमानम् । पश्याम त्वा सवितारं यमाहुरजस्रं ज्योतिर्यदविन्ददत्रिः ॥ ३६ ॥
स नः सूर्य प्र तिर दीर्घमायुः ॥ ३७ ॥
रोहितः कालो अभवद्रोहितोऽग्रे प्रजापतिः ॥ ३९ ॥

रोहितो रश्मिभिर्भूमिं समुद्रमनु सं चरत् ॥ ४० ॥ सूर्यं वयं रजसि क्षियन्तं गातुविदं हवामहे नाधमानाः ॥ ४३ ॥ (अथर्व. १३।२)

' कधींहि आळस न करणारा हा सूर्यदेव स्वतःच्या किरणरूप अश्वावर आरूढ होऊन जात आहे आणि जगांत छाया आणि प्रकाशहीं दोन रूपें तयार करतो. किरणांनीं युक्त होणारा हा सूर्य उच्च स्थानावरून चमकत आहे. सूर्य सर्वांहून मोठा आहे. सूर्याचा महिमा सर्वांपेक्षां पुष्कळच मोठा आहे. सूर्य द्युलोकांत, अंतरिक्षांत, पृथ्वीवर आणि समुद्रांत प्रकाशत आहे. सूर्यावरच दिवस आणि रात्रीचा आधार आहे. देवांच्या विजयी ध्वजासारखा हा प्रकाशमान् सूर्य अंधःकारास हटवून सर्वत्र प्रकाश पसरवितो. हा सूर्यच स्थावरजंगम पदार्थांचें जीवन आहे. आकाशांत उंचांत उंच स्थानावरून उडणाऱ्या पक्ष्याप्रमाणें आकाशांत तरंगणारा हा तेजस्वी सूर्य आणि त्याचा प्रकाश आपणांस सर्वत्र दिसतो. हा सूर्य आम्हांस दीर्घ आयुष्य देतो. सूर्य हाच काल आहे, आणि सूर्य हाच प्रजापति आहे. हा सूर्यदेव स्वतःच्या किरणांनीं भूमि आणि समुद्रास प्रकाशित करतो. सूर्य आमचा मार्गदर्शक आहे; आणि त्याचें गुणगान आम्हीं करतों. '

हे सर्व मंत्र स्पष्टपणें सूर्याचें वर्णन करितात. जर असें निश्चित होईल कीं या मंत्रांत सूर्याचें वर्णन आहे तर मध्यें सोडलेल्या मंत्रांत सुद्धां सूर्याची स्तुति आहे हें निश्चित आहे. आतां तिसऱ्या सूक्तांतील कांहीं मंत्र पहा—

कृष्णं नियानं हरयः सुपर्णा अपो वसाना दिवमुत्पतन्ति । त आववृत्रन्त्सदनादृतस्य ॥ ९ ॥
यत्ते चन्द्रं कश्यप रोचनावद्यत्संहितं पुष्कलं चित्रभानुः । यस्मिन्त्सूर्या आर्पिताः सप्त साकम् ॥ १० ॥
स सविता भूत्वान्तरिक्षेण याति स इन्द्रो भूत्वा तपति मध्यतो दिवम् ॥ १३ ॥
शुक्रं वहन्ति हरयो रघुष्यदो देवं दिवि वर्चसा भ्राजमानम् । यस्योर्ध्वा दिवं तन्वस्तपन्त्यर्वाङ् सुवर्णैः पटरैर्वि भाति ॥ १६ ॥
सप्त युञ्जन्ति रथमेकचक्रमेको अश्वो वहति सप्तनामा ॥ १८ ॥
कृष्णायाः पुत्रो अर्जुनो रात्र्या वत्सोऽजायत । स ह द्यामधि रोहति ॥ २६ ॥ (अ. १३।३)

' पाण्यास धारण करणारीं सूर्य किरणें नील वर्ण आकाशाच्या दिशेनें वर जात आहेत. ते जलापर्यंत म्हणजे मेघमंडळापर्यंत पोंहोंचतात. हे सूर्या ! जो आनंद देणारा चंद्र प्रकाश आहे त्यांत सूर्याचीं सात किरणें संकलित झालीं आहेत. (अर्थात् सूर्याचीं किरणें चंद्रावर पडून तेथून परावृत्त होऊन जो प्रकाश आपणांस मिळतो तो चंद्रम्याच्या नांवानें प्रसिद्ध आहे.) तोच सूर्य जेव्हां अंतरिक्षांत असतो तेव्हां त्यास सविता म्हणतात. जेव्हां तो मध्याह्नीं तापत असतो, तेव्हां त्यास इंद्र म्हणतात. (अर्थात् सकाळीं ८ ते १०॥ वाजेपर्यंत सूर्याचें नांव सविता आहे, आणि ११ ते १ पर्यंत सूर्याचें नांव इंद्र आहे.) सूर्यरूपी पवित्र देवाचा प्रकाश आकाशांत पसरला आहे. ज्याचीं किरणें एका बाजूनें द्युलोकास प्रकाशित करतात आणि दुसऱ्या बाजूनें भूमंडळास विविध प्रकाशाची चमक दाखवितात. सूर्याच्या रथास सात घोडे जोडलेले आहेत. (म्हणजे सात किरणें). कृष्णा नांवाच्या काळ्या रंगाच्या रात्रीचा पुत्रच हा प्रकाशमान् सूर्य आहे. तो द्युलोकावर अधिष्ठित झाला आहे. '

याप्रमाणें तीनहि सूक्तांचे जे मंत्र आहेत, ते सर्व सूर्याचें वर्णन करीत आहेत. त्यांतील कित्येक मंत्र स्पष्ट आहेत. कांहीं अग्नि रूपानें सूर्याचें वर्णन करीत आहेत. कित्येक विद्युत्च्या नांवानें सूर्याचें वर्णन करतात आणि कित्येक स्पष्टपणें सूर्याचेंच वर्णन करीत आहेत. वाचकांनीं या मंत्राचे शब्दार्थ यापूर्वी दिलेले आहेत ते वारंवार पहावे, मनन करावे आणि मंत्रांचा आशय जाणून पहावें कीं सूर्याची स्तुति कशाप्रकारें केली आहे.

या कांडाची देवता रोहित, आदित्य आणि अध्यात्म आहे. आदित्य आणि रोहित हीं नांवें तर सूर्याचींच आहेत. रोहित नांव अग्नीचें सुद्धां आहे; परंतु अग्नि परंपरेनें सूर्याशीं संबंधित असल्यानें आणि त्याचा पौत्र असल्यानें तो सूर्याचाच अंश आहे. अध्यात्मपक्षीं हें सूक्त आत्म्याच्या दृष्टीनें पाहिलें पाहिजे. त्याचें तात्पर्य हेंच कीं व्यक्तिगत आत्म्याचा विचार करतां व्यक्ति सुद्धां सूर्याचाच अंश आहे. त्यामुळें जो प्राकृतिक अंश सूर्यामध्यें आहे आणि ब्रह्माचें सत्व सूर्यामध्यें आहे तें अंशरूपानें प्रत्येक व्यक्तिमध्यें उतरलें आहे. कारण कीं या सूर्यमालेंत जे अणुरेणु आहेत ते सूर्यांतून आलेले आहेत. याप्रमाणें जे विचार यापूर्वी दर्शविले, ते ध्यानीं आणतां व्यक्तिगत सूर्याच्या सत्तेचा अनुभव होतो. हें सूर्याचें अध्यात्मविज्ञान आहे.

परमात्मा सर्वव्यापक आणि पूर्ण निराकार आहे. त्याची उपा-

सना निर्विषय ध्यानादिद्वारें होऊं शकते. परंतु प्रत्येक मनुष्य प्रारंभापासून अंतापर्यंत अमूर्त ब्रह्माची उपासना यथायोग्य रीतीनें करूं शकेलच असें सांगतां येत नाहीं. उदाहरणार्थ, नुकतेंच यज्ञोपवीत धारण केलेला बालक, ज्याचें वय फार तर ६ ते ८ वर्षे असेल, तो अमूर्त ब्रह्माचें ध्यान कसें करूं शकेल? त्यास तें अशक्य आहे. ध्यानधारणेच्या सिद्धीनंतर ही उपासना करणें संभवनीय आहे. ही निरालंबोपासना उन्नतीच्या अवस्थेंत संभवनीय आहे. तोपर्यंत सालंबोपासना करणें योग्य असतें. त्यांत अग्निहोत्राच्या अग्नीपासून सुरवात करून वाढतां वाढतां सूर्योपस्थान करतां करतां उपासक स्वतःची प्रगति करूं शकतो. ही सालंबोपासना या कांडांतील सर्व सूक्तांच्या मंत्रांत दाखविली आहे, आणि या उपासनेसाठीं 'सूर्या' चाच निर्देश येथें केला आहे.

निरुक्तादि ग्रंथांत जेथें देवतांचें निरूपण केलें आहे तेथें सुद्धां वेदांतील त्या देवतांचें वर्णन सूर्यावरच करण्याचा प्रयत्न केला आहे, आणि देव-शत्रु, असुरांचीं नांवें मेघावर आरोपित करण्याचा प्रयत्न केला आहे. जर तें प्रकरण उपासक सूक्ष्म दृष्टीनें येथें लक्ष्यांत घेईल तर त्यास हीच गोष्ट येथें सुद्धां केलेली स्पष्ट दिसेल.

या सूक्तांत सूर्याचीं जीं नांवें सांगितलीं आहेत त्यांत रुद्र, इंद्र, चंद्र, महेन्द्र, सविता, आदित्य, धाता, विधाता, विधर्ता, पतंग, अर्यमा, वरुण, यम, महायम, देव, महादेव, एक, एकवृत, रोहित, सुपर्ण, अरुण वगैरे नांवें सांगितलीं आहेत. म्हणजे या नांवांच्या अनेक देवतांच्या सूक्तांनीं एकाच सूर्यदेवाचें वर्णन केलें आहे. ही गोष्ट अशा रीतीनें स्पष्ट होते. सर्व अन्य देव एकाच सूर्यांत मिळून जातात. अशा प्रकारच्या वर्णनानें अनेक देवांचा भेदभाव सूर्यांत नष्ट होतो, हें स्पष्ट आहे; अर्थात् अनेक देवतांच्या मंत्रांनीं वेदांत सूर्याचेंच वर्णन आहे आणि तें उपासनेसाठींच आहे हें सिद्ध होतें.

पुराणांतून सुद्धां सूर्यावरच 'विष्णू' चें रूपक आरोपित करून अनेक अवतारांचें वर्णन आणि अनेक कथाप्रसंग वर्णन केले आहेत. श्रीमद्भागवतांत सुद्धां प्रातःकाळच्या सूर्याचें नांव ब्रह्मा, मध्याह्नीच्या सूर्याचें नांव विष्णु आणि रात्रीच्या वेळच्या सूर्याचें नांव शिव असें सांगून त्रिमूर्तीस सूर्यांतच सामावलें आहे. याप्रमाणें सूर्याच्या रूपकावर ब्रह्मा, विष्णु, शिव यांच्या अनंत कथा कल्पिल्या आहेत, ही गोष्ट तेथें स्पष्ट होते. ब्रह्माची पत्नी सावित्री, विष्णुपत्नी लक्ष्मी, आणि शिवपत्नी काली या सर्व याप्रमाणें सूर्याचींच रूपकें आहेत. त्याचें सविस्तर वर्णन करूं गेलों तर हजारों पृष्ठांचा एक महाग्रंथच होईल, पण असा ग्रंथ तयार करण्याचा येथें विचार नाहीं, आणि तशी जरूरीसुद्धां नाहीं. येथें जितकें दिग्दर्शन केलें तितकेंच वैदिक विषयाच्या ज्ञानासाठीं पुरेसें आहे. वेदांतील ठिकठिकाणचीं वर्णनें ज्या प्रमाणें सूर्यावर आधारित आहेत, त्याचप्रमाणें ब्राह्मणग्रंथांतील कथा आणि इतिहास, पुराणांतील कथा सुद्धां सूर्यावरील रूपकालंकारानेंच रचिल्या आहेत, ही गोष्टच संक्षेपानें येथें सांगण्याचा उद्देश होता. त्याचा अर्थ कोणीं असा समजूं नये कीं उपरोक्त ग्रंथांचीं ओळन् ओळ सूर्याच्या वर्णनपर आहे, परंतु एवढेंच समजलें पाहिजे कीं मुख्य कथाप्रसंग सूर्यावरील रूपकालंकार मानूनच रचण्यांत आला आहे. उपप्रसंगांत विविधप्रकारचीं दुसरीं वर्णनें-हि असतील. याप्रमाणें सर्व ग्रंथांतील वर्णन मुख्यतः सूर्यासाठींच आहे. एवढें सांगितल्यानंतर सर्वांचें उपास्य दैवत सूर्यच आहे ही गोष्ट सूचित होते. त्याचें विस्तारपूर्वक वर्णन एखाद्या स्वतंत्र ग्रंथांत करूं एवढें सांगून या कांडाचें विवेचन येथेंच समाप्त करतों.

बोधवाक्य

या कांडांतील कित्येक वाक्यें विविध रीतीनें विशेष उपदेश देत आहेत. आतां त्याचा विचार संक्षेपानें करूं—

(१) **उदेहि वाजिन्**- (१) हे बलवान् ! अभ्युदयाप्रत जा. स्वतःचा अभ्युदय करून घे पण अवनत होऊं नकोस.

(२) **इदं राष्ट्रं प्रविश सूनृतावत्**- या सत्यनिष्ठ राष्ट्रांत आवेश उत्पन्न कर. या प्रिय राष्ट्रांत प्रवेश करून कार्य कर.

(३) **स त्वा राष्ट्राय सुभृतं बिभर्तु**- तो तुला स्वतःच्या राष्ट्राच्या उन्नतीसाठीं उत्तम भरणपोषणाच्या साधनांनीं युक्त करो. तूं स्वतःच्या राष्ट्रांत राष्ट्रीय उन्नतीसाठीं उत्तम भरणपोषणांच्या साधनांनीं युक्त होऊन विराजमान् हो.

(४) **उद्वाज आगन्**- (२) तुझी शक्ति उन्नतीसाठीं खर्च कर, उन्नतीच्या कार्यासाठीं स्वतःचें सामर्थ्य कारणीं लाव.

(५) **विश आरोह त्वद्योनयो याः**- ज्यांच्यांत तूं जन्मला आहेस त्यांत तूं श्रेष्ठ हो. तुझ्या जातींत तूं श्रेष्ठ होऊन उच्च स्थान प्राप्त करून घे.

(६) **अप ओषधीर्गाश्चतुष्पदो द्विपद आवेशयेह**- जलस्थानें, औषधींचीं उपवनें, गायी, द्विपाद आणि चतुष्पाद या सर्वांस येथें आपल्या देशांत उत्तम प्रकारें राहूं द्या. त्यांनीं येथें राहून श्रेष्ठ व्हावें.

(७) **यूयमुग्राः पृश्निमातरः** (३)- तुम्हीं भूमीस माता समजणारे, महान् उग्रवीर आहांत. शूरवीर सर्व मिळून स्वतःच्या मातृभूमीचा सत्कार करा.

(८) **प्रमृणीत शत्रून्**- शत्रूंचा नाश कर.

(९) **रुहो रुरोह** (४)- पुढें जाणाऱ्यांनीं प्रगति करावी. जे उन्नति साधूं इच्छितात त्यांनीं मध्येंच थांबूं नये. त्यांच्या मार्गांत अडचणी न याव्यात.

(१०) **गातुं प्रपश्यन्निह राष्ट्रमाहाः**- उन्नतीच्या मार्गानें जातां जातां तूं राष्ट्रास उन्नतीच्या मार्गावर घेऊन जा.

(११) **आ ते राष्ट्रमिह रोहितोऽऽहार्षीत्** (५)- तुझ्या या राष्ट्राला या परिस्थितींत त्या वीरानेंच आणलें आहे. त्याचा सन्मान करणें तुला उचित आहे.

(१२) **व्यास्थन्मृधो अभयं ते अभूत्**- त्यानें शत्रूंना दूर पळवून लाविलें आहे, आणि तुझ्यासाठीं निर्भय परिस्थिति निर्माण केली आहे.

(१३) **सं ते राष्ट्रमनक्तु पयसा घृतेन** (८)- तुझ्या राष्ट्रांत दूध आणि तूप पुष्कळ होवो. हे पौष्टिक पदार्थ विपुल प्राप्त होवोत.

(१४) **ब्रह्मणा पयसा वावृधानो विशि राष्ट्रे जागृहि** (९) ज्ञान आणि दुधानें पुष्ट होणारा तूं स्वतःच्या प्रजाजनांत आणि राष्ट्रांत जागृत रहा. कधीं झोंपूं नकोस. राष्ट्रांत जागृत राहून राष्ट्रास उन्नत करण्याचा प्रयत्न कर.

(१५) **यास्ते विशस्तपसः संबभूवुः** (१०)–प्रजा तपासाठीं संघटित होते, म्हणजेच स्वतःची उन्नति करून घेण्यास उद्युक्त होते.

(१६) **तास्त्वा विशन्तु मनसा शिवेन**- ते प्रजाजन शुभ कामनांनीं तुझ्यासह सत्कार्यांत प्रविष्ट होवोत. सर्व एकत्र येऊन शुभकार्यें करावीं.

(१७) **विश्वा रूपाणि जनयन्युवा कविः** (११)- तरुण कवि स्वतःच्या काव्यांत अनेक रूपकें रचतो. अनेक रूपकें उत्पन्न करतो.

(१८) **तिग्मेनाग्निर्ज्योतिषा विभाति**- अग्नि तीक्ष्ण प्रकाशानें प्रकाशतो.

(१९) **गोपोषं च मे वीरपोषं च धेहि**- (१२) माझ्या गायी आणि वीरांचें पोषण होत राहो.

(२०) **वाचा श्रोत्रेण मनसा जुहोमि**- (१३) वाणी, कान आणि मनानें यज्ञ करतो. (वाणीनें मंत्रोच्चारण, कानानें मंत्रश्रवण आणि मनानें मनन करीत मीं हवन करतों.)

(२१) **स मा रोहैः सामित्यै रोहयतु**- तो मला उन्नतीसह समितीसाठीं उन्नत करो.

(२२) **तस्मात्तेजांस्युप मेमान्यागुः** (१४)- त्या (यज्ञानें) अनेक तेजें मला प्राप्त होवोत. यज्ञद्वारा विविध तेजें प्राप्त होतात.

(२३) **आ त्वा रुरोह रेतसा सह** (१५)- वीर्यासह तो मला उन्नत करो. पराक्रमासह तो (यज्ञ) त्याची प्रगति करो.

(२४) **वाचस्पते पृथिवी नः स्योना योनिस्तल्पा नः सुशेवा**- (१७) हे वाणीच्या पते ! पृथ्वी आमच्यासाठीं कल्याणकारी होवो. घर आमच्यासाठीं सुखकारक होवो. बिछाने आम्हां सर्वांसाठीं सुखकारक होवोत.

(२५) **इहैव प्राणः सख्ये नो अस्तु**- प्राण येथेंच आमच्याशीं मित्रत्वानें राहो. आम्हीं दीर्घायु व्हावें.

(२६) **तं त्वा परमेष्ठिन् पर्यग्निरायुषा वर्चसा दधातु**- हे परमात्मन् ! अग्नि तुला आयुष्य आणि तेजानें युक्त करो.

(२७) **वाचस्पते सौमनसं मनश्च गोष्ठे नो गा जनय योनिषु प्रजाः** (१९)- हे वाणीचे अधिष्ठात्या ! माझें मन सुविचारयुक्त होवो. गोशाळेंत गायी असोत आणि घरांत संतति असो.

(२८) **सर्वा अरातीरवक्रामन्नेहि** (२०)- सर्व शत्रूंवर चढाई करीत तूं पुढें जा. सर्व शत्रूंचा नाश कर आणि उन्नत हो.

(२९) **इदं राष्ट्रमकरः सूनृतावत्**- या राष्ट्रास सत्यनिष्ठ तसेंच आनंदयुक्त कर.

(३०) **अनुव्रता रोहिणी सूरिः सुवर्णा बृहती सुवर्चाः** (२२)- विदुषी, उत्तम रंगाची, तेजस्विनि, वृद्धि पावणारी, अनुकूल स्त्री वृद्धीचें कारण होवो.

(३१) **तया वाजान् विश्वरूपान् जयेम**- तशा विदुषी अनुकूल स्त्रीसह सर्व प्रकारचें अन्न आणि बल प्राप्त करूं.

(३२) **तया विश्वाः पृतना अभिष्याम**- त्याच्या योगें सर्व शत्रूंस पराजित करूं (जिंकूं).

(३३) **तां रक्षन्ति कवयोऽप्रमादम्** (२३)- कवींनीं

प्रमादरहित होऊन त्याचें रक्षण करावें.

(३४) अश्वा हरयः केतुमन्तः सदा वहन्त्यमृताः सुखं रथं (२४)- वेगवान् तेजस्वी घोडे नेहमीं उत्तम सुखदायी रथास उत्तम रीतीनें घेऊन जातात.

(३५) वि मिमीष्व पयस्वतीं घृताचीं धेनुरनपस्पृगेषा (२७)- दूध आणि तूप देणाऱ्या गायींना विशेष रीतीनें तयार कर. जी दूध काढण्याच्या वेळीं हालचाल करणार नाहीं, अशी उत्तम गाय असावी.

(३६) क्षेमो अस्तु, विमृधो नुदस्व- सर्वांचें कल्याण होवो, शत्रु दूर जावोत.

(३७) अभिषाड्, विश्वाषाड् सपत्नान् हन्तु ये मम (२८)- जे माझे शत्रु आहेत त्या सर्वांचा नाश विजयी वीर करो.

(३८) हन्त्वेनान्प्र दहत्वरिर्यो नः पृतन्यति (२८) -जे शत्रु सेनेसह आमच्यावर हल्ला करतात त्यांस मारले जावें.

(३९) वयं सपत्नान् प्रदहामसि- आम्हीं सर्व शत्रूंस जाळून टाकूं.

(४०) अवाचीनानव जहि अधा सपत्नान्मामकान् (३०)- आमच्या शत्रूंस खालीं पाडून दाबून टाक.

(४१) सपत्नानधरान्पादयस्वास्मत् (३१)- आमच्या शत्रूंना खालीं पाड.

(४२) अस्मदूव्यथया सजातमुत्पिपानम्- आमच्या सजातीय शत्रूंस व्यथायुक्त कर, दुःखी कर.

(४३) अधरे पद्यन्तामप्रतिमन्यूयमानाः (३१)- आमचे शत्रु कारणाशिवाय क्रोधित होऊन खालीं पडोत.

(४४) सपत्नानव मे जहि, अवैनानश्मना जहि, ते यन्त्वधमं तमः (३२)- माझ्या शत्रूंचा नाश कर, शत्रूंचा दगडांनीं नाश कर. माझे शत्रु अंधारांत पडोत.

(४५) वत्सं ब्रह्म सन्तं ब्रह्मणा वर्धयन्ति (३३)- बालकांस ज्ञानवान् करीत ज्ञानासह वाढवितात.

(४६) पृथिवीं च रोह, राष्ट्रं च रोह, द्रविणं च रोह, अमृतं च रोह (३४)- पृथ्वी, राष्ट्र, धन, प्रजा आणि अमरत्व यांची वाढ कर.

(४७) ये राष्ट्रभृतः तैष्टे राष्ट्रं दधातु सुमनस्यमानाः (३५)- जे राष्ट्रपोषक वीर आहेत त्यांच्या द्वारें त्यांच्या राष्ट्राचें उत्तम मनानें उद्धारण व्हावें.

(४८) भूमिमब्रवीत् त्वदीयं सर्वं जायतां यद् भूतं यच्च भाव्यम् (५४)- त्यानें मातृभूमीस सांगितलें कीं, 'जें झालें आहे आणि जें व्हावयाचें आहे, तें सर्व तुला अर्पण असो.'

(४९) स यज्ञः प्रथमो भूतो भव्यो अजायत। तस्माद्ध जज्ञ इदं सर्वं यत्किंचेदं विरोचते। (५५)- तो प्रथम झाला, आणि होणारा यज्ञ झाला. त्याच्यापासून जें कांहीं झालें तें चमकत आहे.

द्वितीय सूक्त

(५०) स्तवाम भुवनस्य गोपाम् (२)- भुवनाच्या रक्षकाची प्रशंसा करतों.

(५१) मा त्वा दभन्परियान्तमाजिं (५)- युद्धांत जाणाऱ्या तुला शत्रु न पराजित करोत.

(५२) स्वस्ति दुर्गां अति याहि शीघ्रम्- कुशलतेनें शीघ्र कठिण स्थानांच्या पलिकडे जा.

(५३) रथमंशुमन्तम् स्योनं सुवह्निमाधि तिष्ठ वाजिनम् (७)- तेजस्वी, सुखदायी, बलवान् उत्तम चालणाऱ्या सुंदर रथावर चढ.

(५४) द्यावापृथिवी जनयन् देव एकः (२६)- एकाच ईश्वरानें द्युलोक आणि भूलोक उत्पन्न केले.

(५५) अतन्द्रो यास्यन् (२८)- आळसाचा त्याग केला तरच प्रगति करणें शक्य आहे.

याप्रमाणें अनेक उपदेशपर वाक्यें या कांडांत आहेत. तीं वाक्यें मुख्य देवतांचें वर्णन करतां करतां उपासकांस बोध देतात. वाचकानें या प्रकारें या कांडाचें अध्ययन करावें.

अध्यात्म प्रकरण

कांड १५, सूक्त १

(ऋषिः- अथर्वा । देवता:- अध्यात्मं, व्रात्यः)

व्रात्य आसीदीयमान एव स प्रजापतिं समैरयत् ॥ १ ॥
स प्रजापतिः सुवर्णमात्मन्नपश्यत्तत्प्राजनयत् ॥ २ ॥
तदेकमभवत्तल्ललाममभवत्तन्महदभवत्तज्ज्येष्ठमभवत्तद्ब्रह्माभवत्तत्तपो
ऽभवत्तत्सत्यमभवत्तेन प्राजायत ॥ ३ ॥
सोऽवर्धत स महानभवत्स महादेवोऽभवत् ॥ ४ ॥
स देवानामीशां पर्यैत्स ईशानोऽभवत् ॥ ५ ॥
स एकव्रात्योऽभवत्स धनुरादत्त तदेवेन्द्रधनुः ॥ ६ ॥
नीलमस्योदरं लोहितं पृष्ठम् ॥ ७ ॥
नीलेनैवाप्रियं भ्रातृव्यं प्रोर्णोति लोहितेन द्विषन्तं विध्यतीति ब्रह्मवादिनो वदन्ति ॥ ८ ॥

[२]

स उदतिष्ठत्स प्राचीं दिशमनु व्यचलत् ॥ १ ॥

अर्थ— [१] (व्रात्यः ईयमानः आसीत्) व्रात्य म्हणजे समूहाचें हित करणारा समूहपति सर्वांचा प्रेरक होता. (सः प्रजापतिं सं ऐरयत्) त्यानें प्रजापालकास उत्तम प्रेरणा दिली. (१) (सः प्रजापतिः) त्या प्रजापतीनें (आत्मन् सुवर्णं अपश्यत्) आत्म्यास उत्तम तेजस्वी वर्णयुक्त असा पाहिला, आणि (तत् प्र अजनयत्) त्यानें सर्वांना उत्पन्न केलें. (२)

(तत् एकं अभवत्) तो एक झाला. (तत् ललामम् अभवत्) तो विलक्षण झाला. (तत् महत् अभवत्) तो मोठा झाला. (तत् ज्येष्ठं अभवत्) तो श्रेष्ठ झाला. (तत् ब्रह्म अभवत्) तो ब्रह्म झाला. (तत् तपः अभवत्) तो तापविणारा झाला, (तत् सत्यं अभवत्) तो सत्य झाला, (तेन प्र अजायत) त्याच्यापासून तो प्रगट झाला. (३)

(सः अवर्धत) तो वाढला (सः महान् अभवत्) तो मोठा झाला (सः महादेव अभवत्) तो महादेव अर्थात् मोठा देव झाला. (४)

(सः ईशां देवानां परि ऐत्) तो सर्व लहान देवांचा अधिष्ठाता झाला. (सः ईशानः अभवत्) तो ईश्वर झाला. (५) (सः एक व्रात्यः अभवत्) तो एकमात्र सर्व समूहाचा स्वामी झाला. (सः धनुः आदत्त) त्यानें धनुष्य धारण केलें (तत् एव इंद्रधनुः) तेंच इंद्र-धनुष्य होय. (६) (अस्य उदरं नीलं) याचें पोट निळ्या रंगाचें आहे. (पृष्ठं लोहितं) पाठ लाल आहे. (७) (नीलेन एव) निळ्या भागानेंच तो (अप्रियं भ्रातृव्यं प्र ऊर्णोति) अप्रिय शत्रूंना घेरतो आणि (लोहितेन द्विषन्तं विध्यति) लालभागानें द्वेष करणाऱ्यांस छेदतो, (इति ब्रह्मवादिनः वदन्ति) असें ब्रह्मवादी म्हणतात. (८)

[२] (सः उत् अतिष्ठत्) तो वर उठला (सः प्राचीं दिशं अनुव्यचलत्) तो पूर्व दिशेकडे अनुकूल रीतीनें चालला. (१)

तं बृहच्च रथन्तरं चादित्याश्च विश्वे च देवा अनुव्यचलन् ॥ २ ॥
बृहते च वै स रथन्तराय चादित्येभ्यश्च विश्वेभ्यश्च
देवेभ्य आ वृश्चते य एवं विद्वांसं व्रात्यमुपवदति ॥ ३ ॥
बृहतश्च वै स रथन्तरस्य चादित्यानां च विश्वेषां च
देवानां प्रियं धाम भवति तस्य प्राच्यां दिशि ॥ ४ ॥
श्रद्धा पुंश्चली मित्रो मागधो विज्ञानं वासोऽहरुष्णीषं
रात्री केशा हरितौ प्रवर्तौ कल्मलिर्मणिः ॥ ५ ॥
भूतं च भविष्यच्च परिष्कन्दौ मनो विपथम् ॥ ६ ॥
मातरिश्वा च पवमानश्च विपथवाहौ वातः सारथी रेष्मा प्रतोदः ॥ ७ ॥
कीर्तिश्च यशश्च पुरःसरावैनं कीर्तिर्गच्छत्या यशो गच्छति य एवं वेद ॥ ८ ॥
स उदतिष्ठत्स दक्षिणां दिशमनु व्यचलत् ॥ ९ ॥
तं यज्ञायज्ञियं च वामदेव्यं च यज्ञश्च यजमानश्च पशवश्चानुव्यचलन् ॥ १० ॥
यज्ञायज्ञियाय च वै स वामदेव्याय च यज्ञाय च यजमानाय च
पशुभ्यश्चा वृश्चते य एवं विद्वांसं व्रात्यमुपवदति ॥ ११ ॥
यज्ञायज्ञियस्य च वै स वामदेव्यस्य च यज्ञस्य च
यजमानस्य च पशूनां च प्रियं धाम भवति तस्य दक्षिणायां दिशि ॥ १२ ॥
उषाः पुंश्चली मन्त्रो मागधो विज्ञानं वासोऽहरुष्णीषं
रात्री केशा हरितौ प्रवर्तौ कल्मलिर्मणिः ॥ १३ ॥

अर्थ— (तं बृहत् च रथंतरं च आदित्याः च विश्वेदेवाः च अनुव्यचलन्) त्यास बृहत् रथंतर, आदित्य, विश्वेदेव अनुकूल झाले. (२) (य एनं विद्वांसं व्रात्यं उपवदति) जो अशा विद्वान् व्रतोपासकांस वाईट शब्द बोलतो तो बृहत्, रथंतर आदित्य आणि विश्वेदेवांचा (आवृश्चते) अपराधी होतो. (३) (यः एवं वेद) जो हें जाणतो तो, बृहत्, रथंतर, आदित्य आणि विश्वेदेवांचें प्रियधाम होतो. (तस्य प्राच्यां दिशि) त्याच्या पूर्वदिशेस (श्रद्धा पुंश्चली) श्रद्धारूपी स्त्री, (मित्रः मागधः) सूर्यस्तुति करणारा मित्र (विज्ञानं वासः) विज्ञान वस्त्र (अहः उष्णीशं) दिवस हेंच पागोटें (रात्री केशाः) रात्र हेच केस (हरितौ प्रवर्तौ) किरण कुंडले (कल्मलिः मणिः) तारे मण्याप्रमाणें होतात. (४–५) (भूतं च भविष्यत् च परिष्कंदौ) भूतकाल आणि भविष्यकाल त्याचे रक्षक बनतात आणि (मनः विपथं) मन त्याचा युद्धरथ होतो. (६) (मातरिश्वा च पवमानः च विपथवाहौ) श्वास आणि उच्छ्वास त्याच्या रथाचे घोडे आहेत. (वातः सारथी) प्राण त्याचा सारथी आणि (रेष्मा प्रतोदः) वायु त्याचा चाबुक बनला आहे. (७) (कीर्तिः च यशः च) कीर्ति आणि यश त्याचे (पुरःसरौ) अग्रगामी आहेत. (एनं कीर्तिः आगच्छति) त्याच्याजवळ कीर्ति येते. त्याच्याजवळ (यशः आगच्छति) यश येतें. (८) [१] (सः) तो उठतो आणि दक्षिण दिशेस अनुकूल होऊन संचरतो. (९) त्याला यज्ञायज्ञिय, वामदेव्य, यज्ञ, यजमान आणि (पशवः च अनुव्यचलन्) पशुसुद्धां अनुकूल होतात. (१०) (यः एवं विद्वांसं व्रात्यं उपवदति) जो अशा विद्वान् व्रतानुचाऱ्याचा उपहास करतो तो यज्ञायज्ञिय वामदेव्य, यज्ञ, यजमान आणि पशूंसंबंधीं (आवृश्चते) अपराधी होतो. (११) (यः एवं वेद) जो ही गोष्ट जाणतो तो यज्ञायज्ञिय, वामदेव्य, यज्ञ, यजमान आणि पशूंचें प्रिय-स्थान होतो. त्याला दक्षिण दिशेस (उषाः पुंश्चली) उषारूपी स्त्री (मन्त्रः मागधः) मंत्र प्रशंसा करणारा विज्ञान वस्त्र, दिवस पागोटें, रात्र-केंस, किरण-कुंडलें तारे (नक्षत्रें) मण्याप्रमाणें होतात. (१२–१३)

अमावास्या च पौर्णमासी च परिष्कन्दौ मनो विपथम् ।
मातरिश्वा० । कीर्तिश्च० ॥ १४ ॥
स उदतिष्ठत्स प्रतीचीं दिशमनु व्यचलत् ॥ १५ ॥
तं वैरूपं च वैराजं चापश्च वरुणश्च राजानुव्यचलन् ॥ १६ ॥
वैरूपाय च वै स वैराजाय चाद्भ्यश्च वरुणाय च राज्ञ
आ वृश्चते य एवं विद्वांसं व्रात्यमुपवदति ॥ १७ ॥
वैरूपस्य च वै स वैराजस्य चापां च वरुणस्य च राज्ञः
प्रियं धाम भवति तस्य प्रतीच्यां दिशि ॥ १८ ॥
इरा पुंश्चली हसो मागधो विज्ञानं वासोऽहरुष्णीषं
रात्री केशा हरितौ प्रवर्तौ कल्मलिर्मणिः ॥ १९ ॥
अहश्च रात्री च परिष्कन्दौ मनो विपथम् । मातरिश्वा० । कीर्तिश्च० ॥ २० ॥
स उदतिष्ठत्स उदीचीं दिशमनु व्यचलत् ॥ २१ ॥
तं श्यैतं च नौधसं च सप्तर्षयश्च सोमश्च राजानुव्यचलन् ॥ २२ ॥
श्यैताय च वै स नौधसाय च सप्तर्षिभ्यश्च सोमाय च राज्ञ
आ वृश्चते य एवं विद्वांसं व्रात्यमुपवदति ॥ २३ ॥
श्यैतस्य च वै स नौधसस्य च सप्तर्षीणां च सोमस्य च
राज्ञः प्रियं धाम भवति तस्योदीच्यां दिशि ॥ २४ ॥
विद्युत्पुंश्चली स्तनयित्नुर्मागधो विज्ञानं वासोऽहरुष्णीषं
रात्री केशा हरितौ प्रवर्तौ कल्मलिर्मणिः ॥ २५ ॥

अर्थ— (अमावास्या च पौर्णमासी च परिष्कन्दौ) अमावास्या आणि पूर्णिमा त्याच्या संरक्षक होतात. मन त्याचा युद्धरथ आहे. श्वास आणि उच्छ्वास त्याच्या रथाचे घोडे आहेत. प्राण सारथी आणि वायु त्याचा चाबूक आहे. (पुढें पूर्वीप्रमाणें). (१४) [२] (सः०) तो उठला (सः प्रतीचीं दिशं अनुव्यचलत्) तो पश्चिम दिशेस अनुकूलतेप्रमाणें संचार करू लागला. (१५) तेव्हां त्याला वैरूप, वैराज, जल आणि राजा वरुण अनुकूल झाले. (१६) जे अशा विद्वान् व्रतचाऱ्याचा अपमान करतात ते वैरुप, वैराज, जल आणि राजा वरुणाचे अपराधी होतात. (१७) जे ही गोष्ट जाणतात ते वैरूप, वैराज, जल आणि राजा वरुणाचें प्रियधाम बनतात. (१८) त्याच्यासाठीं पश्चिम दिशेस (इरा पुंश्चली) भूमिरूपी स्त्री (हसः मागधः) हास्य प्रशंसक विद्वान् वस्त्र० (१९) (अहः च रात्री च परिष्कन्दौ) दिवस आणि रात्र त्याचे रक्षक होतात. (पुढें पूर्वीप्रमाणें) (२०) (सः०) तो उठला आणि तो (उदीचीं दिशं) उत्तरदिशेस अनुकूल होऊन चालला. (२१) (तं श्यैतं च सप्तर्षयः च राजा सोमः च अनुव्यचलन्) श्येत, नौधस् सप्तर्षि आणि राजा सोम त्यास अनुकूल होऊन चालू लागले. (२२) जे या प्रकारच्या विद्वान् व्रात्याचा उपहास करतात ते श्येत, नौधस्, सप्तर्षि आणि राजा सोम यांचे अपराधी होतात. (२३) जे ही गोष्ट जाणतात ते श्येत, नौधस्, सप्तर्षि आणि राजा सोम यांचे प्रियधाम होतात. (२४) त्याच्यासाठीं उत्तर दिशेस (विद्युत् पुंश्चली) वीजरूपी स्त्री (स्तनयित्नुः मागधः) गर्जना करणारा मेघ प्रशंसक, विज्ञान वस्त्र, दिवस पागोटें, रात्र केस, किरणें, कुंडलें, तारे मण्याप्रमाणें होतात. (२५)

श्रुतं च विश्रुतं च परिष्कन्दौ मनो विपथम् ॥ २६ ॥
मातरिश्वा च पवमानश्च विपथवाहौ वातः सारथी रेष्मा प्रतोदः ॥ २७ ॥
कीर्तिश्च यशश्च पुरःसरावैनं कीर्तिर्गच्छत्या यशो गच्छति य एवं वेद ॥ २८ ॥

[३]

स संवत्सरमूर्ध्वोऽतिष्ठत् तं देवा अब्रुवन्व्रात्य किं नु तिष्ठसीति ॥ १ ॥
सोऽब्रवीदासन्दीं मे सं भरन्त्विति ॥ २ ॥
तस्मै व्रात्यायासन्दीं समभरन् ॥ ३ ॥
तस्या ग्रीष्मश्च वसन्तश्च द्वौ पादावास्तां शरच्च वर्षाश्च द्वौ ॥ ४ ॥
बृहच्च रथंतरं चानूच्ये आस्तां यज्ञायज्ञियं च वामदेव्यं च तिरश्च्ये ॥ ५ ॥
ऋचः प्राञ्चस्तन्तवो यजूंषि तिर्यञ्चः ॥ ६ ॥
वेद आस्तरणं ब्रह्मोपबर्हणम् ॥ ७ ॥
सामासाद उद्गीथोऽपश्रयः ॥ ८ ॥
तामासन्दीं व्रात्य आरोहत् ॥ ९ ॥
तस्य देवजनाः परिष्कन्दा आसन्त्संकल्पाः प्रहाय्या३ विश्वानि भूतान्युपसदः ॥ १० ॥
विश्वान्येवास्य भूतान्युपसदो भवन्ति य एवं वेद ॥ ११ ॥

अर्थ— (श्रुतं विश्रुतं च परिष्कन्दौ) ज्ञान आणि विज्ञान हे त्याचे रक्षक, मन त्याचा युद्धरथ आहे. (२६) श्वास आणि उच्छ्वास त्याच्या रथाचे घोडे (पुढील भाग पूर्वोक्तप्रमाणे) (२७-२८) [४]

[३] (सः संवत्सरं ऊर्ध्वः अतिष्ठत्) तो वर्षभर उभा राहिला. (तं देवा अब्रुवन्) देव त्याला म्हणाले. (व्रात्य, किं नु तिष्ठसि इति) हे व्रती ! तू का उभा आहेस ? (१) (सः अब्रवीत्) तो म्हणाला (मे आसन्दीं सं भरन्तु इति) मला बसण्यास आसन आणा. (२) तेव्हां (तस्मै व्रात्याय आसन्दीं समभरन्) त्या व्रतीस बसण्यास चौरंग आणला. (३) (तस्याः ग्रीष्मः च वसन्तः च) त्या चौरंगाचे ग्रीष्म आणि वसंत असे (द्वौ पादौ आस्तां) दोन पाय होते, आणि (शरत् च वर्षाः च द्वौ) शरद् आणि वर्षा असे दोन पाय होते. (४) (बृहत् च रथंतरं च) बृहत् आणि रथन्तर हे दोघे (अनूच्ये आस्तां) बाजूच्या फळ्या होते. (५) (यज्ञायज्ञियं वामदेव्यं च तिरश्च्ये) यज्ञायज्ञिय व वामदेव्य हे तिरप्या फळ्या होते. (५) (ऋचः प्राञ्चः तन्तवः) ऋग्वेदाचे मंत्र लांबीचे तंतु होते, आणि (यजूंषि तिर्यञ्चः) यजुर्वेदाचे मंत्र तिरपे तंतु होते. (६) (वेद आस्तरणं) त्यावर वेद आंथरले होते. (ब्रह्म उपबर्हणं) ब्रह्मज्ञान त्याचें पांघरूण होतें. (७) (साम आसादः) सामवेद गादी होती. (उद्गीथः उपश्रयः) उद्गीथ उशी होती. (८) (तां आसंदीं व्रात्यः आरोहत्) त्या प्रकारच्या ज्ञानरूपी खाटल्यावर तो व्रती चढला. (९) (देवजनाः तस्य परिष्कन्दाः आसन्) देवजन त्याचे रक्षक झाले. (संकल्पाः प्रहाय्याः) त्याचे संकल्प त्याचे दूत आणि (विश्वानि भूतानि उपसदः भवन्ति एव) सर्व भूतें त्याच्यापाशी बसणारी होतीं. (१०) (यः एवं वेद) जो हे तत्त्व जाणतो (विश्वानि भूतानि अस्य उपसदः भवन्ति एव) सर्व भूतमात्र त्याचे साथी —बरोबर बसणारे मित्र झाले—यांत काय संशय ? (११)

[४]

तस्मै प्राच्या दिशः ॥ १ ॥
वासन्तौ मासौ गोप्तारावकुर्वन्बृहच्च रथंतरं चानुष्ठातारौ ॥ २ ॥
वासन्तावेनं मासौ प्राच्या दिशो गोपायतो बृहच्च
रथंतरं चानु तिष्ठतो य एवं वेद ॥ ३ ॥
तस्मै दक्षिणाया दिशः ॥ ४ ॥
ग्रैष्मौ मासौ गोप्तारावकुर्वन्यज्ञायज्ञियं च वामदेव्यं चानुष्ठातारौ ॥ ५ ॥
ग्रैष्मावेनं मासौ दक्षिणाया दिशो गोपायतो यज्ञायज्ञियं च
वामदेव्यं चानु तिष्ठतो य एवं वेद ॥ ६ ॥
तस्मै प्रतीच्या दिशः ॥ ७ ॥
वार्षिकौ मासौ गोप्तारावकुर्वन्वैरूपं च वैराजं चानुष्ठातारौ ॥ ८ ॥
वार्षिकावेनं मासौ प्रतीच्या दिशो गोपायतो वैरूपं च
वैराजं चानु तिष्ठतो य एवं वेद ॥ ९ ॥
तस्मा उदीच्या दिशः ॥ १० ॥
शारदौ मासौ गोप्तारावकुर्वञ्छ्यैतं च नौधसं चानुष्ठातारौ ॥ ११ ॥
शारदावेनं मासावुदीच्या दिशो गोपायतः श्यैतं च
नौधसं चानु तिष्ठतो य एवं वेद ॥ १२ ॥
तस्मै ध्रुवाया दिशः ॥ १३ ॥
हैमनौ मासौ गोप्तारावकुर्वन्भूमिं चाग्निं चानुष्ठातारौ ॥ १४ ॥

अर्थ—[४] (तस्मै प्राच्या दिशः) त्याच्यासाठीं पूर्व दिशा (१) (वासन्तौ मासौ गोप्तारौ अकुर्वन्) वसंत ऋतूचे दोन मास रक्षक बनविले, (बृहत् च रथन्तरं च अनुष्ठातारौ) बृहत् आणि रथंतरांस सेवक बनविलें. (२) (यः एवं वेद) जो हें जाणतो त्याचे पूर्व दिशा, वसन्तऋतूचे दोन महिने रक्षक होतात आणि बृहत् व रथंतर सेवक होतात. (३) [१]

त्याच्यासाठीं दक्षिण दिशा (४) ग्रीष्मऋतूचे दोन महिने रक्षक झाले. यज्ञायज्ञीय आणि वामदेव्य नोकर झाले. (५) जो हें जाणतो त्याचे दक्षिण दिशा, ग्रीष्म ऋतूचे दोन महिने रक्षक होतात आणि यज्ञायज्ञीय व वामदेव्य नोकर होतात. (६) [२]

त्याच्यासाठीं पश्चिम दिशा (७) वर्षाऋतूचे दोन महिने रक्षक झाले. वैरूप आणि वैराज अनुचर झाले. (८) जो हें जाणतो त्याचे दक्षिण दिशा आणि वर्षाऋतूचे दोन मास रक्षक होतात आणि वैरूप आणि वैराज अनुचर होतात. (९) [३]

त्याच्यासाठीं उत्तर दिशा (१०) शरद् ऋतूचे दोन महिने रक्षक झाले आणि श्येत आणि नौधस अनुचर झाले. (११) जो हें जाणतो त्याचे उत्तर दिशा व शरद् ऋतूचे दोन मास रक्षक होतात आणि श्येत व नौधस अनुचर होतात. (१२) [४]

त्याच्यासाठीं ध्रुव दिशा (१३) हेमन्त ऋतूचे दोन महिने रक्षक झाले; आणि भूमि व अग्नि त्याचे अनुचर झाले. (१४)

हैमनावेनं मासौ ध्रुवाया दिशो गोपायतो
भूमिश्चाग्निश्चानु तिष्ठतो य एवं वेद ॥ १५ ॥
तस्मा ऊर्ध्वाया दिशः ॥ १६ ॥
शैशिरौ मासौ गोप्तारावकुर्वन्दिवं चादित्यं चानुष्ठातारौ ॥ १७ ॥
शैशिरावेनं मासावूर्ध्वाया दिशो गोपायतो
द्यौश्चादित्यश्चानु तिष्ठतो य एवं वेद ॥ १८ ॥

[५]

तस्मै प्राच्या दिशो अन्तर्देशाद्भवमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ १ ॥
भव एनमिष्वासः प्राच्या दिशो अन्तर्देशादनुष्ठातानु
तिष्ठति नैनं शर्वो न भवो नेशानः ॥ २ ॥
नास्य पशून्न समानान्हिनस्ति य एवं वेद ॥ ३ ॥
तस्मै दक्षिणाया दिशो अन्तर्देशाच्छर्वमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ ४ ॥
शर्व एनमिष्वासो दक्षिणाया दिशो अन्तर्देशादनुष्ठातानु
तिष्ठति नैनं शर्वो न भवो नेशानः । नास्य पशून्न० ॥ ५ ॥
तस्मै प्रतीच्या दिशो अन्तर्देशात्पशुपतिमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ ६ ॥
पशुपतिरेनमिष्वासः प्रतीच्या दिशो अन्तर्देशादनुष्ठातानु तिष्ठति० । नास्य० ॥ ७ ॥

अर्थ— जो हें जाणतो त्याचे ध्रुव दिशा, हेमंत ऋतूचे दोन महिने रक्षक होतात आणि पृथ्वी व अग्नि त्याचे अनुचर होतात. (१५) [५]

त्याच्यासाठीं ऊर्ध्वदिशा (१६) शिशिर ऋतूचे दोन मास रक्षक झाले. द्यु आणि आदित्य अनुचर झाले (१७) जो हें जाणतो त्याचे ऊर्ध्व दिशा, शिशिर ऋतूचे दोन महिने रक्षक होतात आणि द्युलोक आणि आदित्य त्याचे सेवक होतात. (१८) [६]

[५] (तस्मै प्राच्याः दिशः अन्तर्देशात्) त्याच्यासाठीं पूर्वदिशेच्या अन्तर्देशांतून (इष्वासं भवं अनुष्ठातारं अकुर्वन्) धनुर्धारी भवाला अनुष्ठाता बनविलें. (१) (यः एवं वेद) जो हें जाणतो (एनं इष्वासः भव) त्याचा धनुर्धारी भव (प्राच्याः दिशः अन्तर्देशात्) पूर्वदिशेच्या अन्तर्देशांतून (अनुष्ठाता अनुतिष्ठति) अनुष्ठाता होऊन रहातो आणि (न शर्वः न भवः ईशानः एनं) शर्व, भव अथवा ईशान त्याचा घात करीत नाहींत. (२) (न अस्य पशून् समानान् हिनस्ति) त्याचीं जनावरें आणि याच्या समान बंधूंची हिंसा करीत नाहींत. (३) [१]

त्याच्यासाठीं दक्षिणदिशेच्या अन्तर्देशांतून धनुर्धारी शर्वाला अनुष्ठाता केले. (४) जो ही गोष्ट जाणतो त्यास तो धनुर्धारी शर्व दक्षिण दिशेच्या अन्तर्देशांतून अनुष्ठाता बनून आणि शर्व, भव अथवा ईशान याचा घात करीत नाहींत आणि त्याच्या पशूंची आणि बंधूंचीं हिंसा करीत नाहींत. (५) [२]

त्याच्यासाठीं (प्रतीच्याः दिशः) पश्चिम दिशेच्या अंतर्देशांतून (पशुपतिं इष्वासं) पशुपतीस धनुर्धारी अधिष्ठाता बनविले. (६) जो ही गोष्ट जाणतो त्याचा धनुर्धारी पशुपति पश्चिम दिशेमध्यें अनुष्ठाता होऊन रहातो, आणि त्याचा शर्व, भव आणि ईशान घात करीत नाहींत, आणि त्याचे पशु आणि बांधवांची हिंसा करीत नाहींत. (७) [३]

*

तस्मा उदीच्या दिशो अन्तर्देशादुग्रं देवमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ ८ ॥
उग्र एनं देव इष्वास उदीच्या दिशो अन्तर्देशादनुष्ठातानु तिष्ठति० । नास्य० ॥ ९ ॥
तस्मै ध्रुवाया दिशो अन्तर्देशाद्रुद्रमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ १० ॥
रुद्र एनमिष्वासो ध्रुवाया दिशो अन्तर्देशादनुष्ठातानु तिष्ठति० । नास्य० ॥ ११ ॥
तस्मा ऊर्ध्वाया दिशो अन्तर्देशान्महादेवमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ १२ ॥
महादेव एनमिष्वास ऊर्ध्वाया दिशो अन्तर्देशादनुष्ठातानु तिष्ठति० । नास्य० ॥ १३ ॥
तस्मै सर्वेभ्यो अन्तर्देशेभ्य ईशानमिष्वासमनुष्ठातारमकुर्वन् ॥ १४ ॥
ईशान एनमिष्वासः सर्वेभ्यो अन्तर्देशेभ्योऽनुष्ठातानु
तिष्ठति नैनं शर्वो न भवो नेशानः ॥ १५ ॥
नास्य पशून्न समानान्हिनस्ति य एवं वेद ॥ १६ ॥

[६]

स ध्रुवां दिशमनु व्यचलत् ॥ १ ॥
तं भूमिश्चाग्निश्चौषधयश्च वनस्पतयश्च वानस्पत्याश्च वीरुधश्चानुव्यचलन् ॥ २ ॥
भूमेश्च वै सोऽग्नेश्चौषधीनां च वनस्पतीनां च वानस्पत्यानां
च वीरुधां च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ ३ ॥

अर्थ—त्याच्यासाठीं (**उदीच्याः दिशः**) उत्तरदिशेच्या अन्तर्देशांतून (**उग्रं देवं इष्वासं०**) उग्रदेवास धनुर्धारी अनुष्ठाता बनविलें. (८) जो हें जाणतो त्याचा उग्रदेव उत्तरदिशेच्या अन्तर्देशांतून अनुष्ठाता बनून रहातो, आणि शर्व, भव अथवा ईशान त्याचा घातपात करीत नाहींत आणि त्याच्या पशूंची अथवा बंधूंची हिंसा करीत नाहींत. (९) [४]

त्याच्यासाठीं (**ध्रुवायाः दिशः**) ध्रुव दिशेच्या अन्तर्देशांतून (**रुद्रं इष्वासं०**) रुद्रास धनुर्धारी अनुष्ठाता बनविलें. (१०) जो ही गोष्ट जाणतो, त्याचा धनुर्धारी रुद्र ध्रुव दिशेच्या अन्तर्देशांतून अनुष्ठाता होऊन रहातो. शिव, भव आणि ईशान त्याचा घातपात करीत नाहींत आणि त्याच्या पशूंची अथवा बांधवांची हिंसा करीत नाहींत. (११) [५]

त्याच्यासाठीं (**ऊर्ध्वायाः दिशः**) ऊर्ध्वदिशेच्या अन्तर्देशांतून (**महादेवं इष्वासं०**) महादेवास धनुर्धारी अनुष्ठाता केलें. (१२) जो हें जाणतो त्याचा धनुर्धारी महादेव ऊर्ध्वदिशेच्या अन्तर्देशांतून अनुष्ठाता होऊन रहातो. शिव, भव आणि ईशान त्याचा घातपात करीत नाहींत आणि त्याच्या पशूंची आणि बांधवांची हिंसा करीत नाहींत. (१३) [६]

त्याच्यासाठीं (**सर्वेभ्यः अंतर्देशेभ्यः**) सर्व अंतर्देशांतून (**ईशानं इष्वासं०**) ईशान धनुर्धारी अनुष्ठाता बनविलें. (१४) जो हें जाणतो त्याचा धनुर्धारी ईशान सर्व दिशांच्या अंतर्देशांतून अनुष्ठाता बनून रहातो. शर्व, भव आणि ईशान त्याचा नाश करीत नाहींत आणि त्याच्या पशूंची आणि बंधूंची हिंसा करीत नाहींत. (१५-१६) [७]

[६] (**सः ध्रुवां दिशमनु व्यचलत्**) तो ध्रुव दिशेकडे अनुकूलतेप्रमाणें चालला. (१) त्यामुळें (**तं भूमिः अग्निः च ओषधयः च वनस्पतयः च**) त्याला भूमि, अग्नि, औषधी, वनस्पति (**वानस्पत्याः च वीरुधः च अनुव्यचलन्**) आणि लहान आणि मोठीं झाडेंसुद्धां अनुकूल होऊन रहातात. (२) (**यः एवं वेद**) जो हें जाणतो (**सः भूमेः च वै अग्नेः च**) तो भूमि आणि अग्नीचें (**औषधीनां च वनस्पतीनां**) औषधी आणि वनस्पतींचें (**वानस्पत्यानां च वीरुधां**) लहान आणि मोठ्या वृक्षांचें (**प्रियं धाम भवति**) प्रिय स्थान होतो. (३) [१]

स ऊर्ध्वां दिशमनु व्यचलत् ॥ ४ ॥
तमृतं च सत्यं च सूर्यश्च चन्द्रश्च नक्षत्राणि चानुव्यचलन् ॥ ५ ॥
ऋतस्य च वै स सत्यस्य च सूर्यस्य च चन्द्रस्य च
नक्षत्राणां च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ ६ ॥
स उत्तमां दिशमनु व्यचलत् ॥ ७ ॥
तमृचश्च सामानि च यजूंषि च ब्रह्म चानुव्यचलन् ॥ ८ ॥
ऋचां च वै स साम्नां च यजुषां च ब्रह्मणश्च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ ९ ॥
स बृहतीं दिशमनुव्यचलत् ॥ १० ॥
तमितिहासश्च पुराणं च गाथाश्च नाराशंसीश्चानुव्यचलन् ॥ ११ ॥
इतिहासस्य च वै स पुराणस्य च गाथानां च नाराशंसीनां च
प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ १२ ॥
स परमां दिशमनु व्यचलत् ॥ १३ ॥
तमाहवनीयश्च गार्हपत्यश्च दक्षिणाग्निश्च यज्ञश्च यजमानश्च पशवश्चानुव्यचलन् ॥ १४ ॥
आहवनीयस्य च वै स गार्हपत्यस्य च दक्षिणाग्नेश्च यज्ञस्य च
यजमानस्य च पशूनां च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ १५ ॥
सोऽनादिष्टां दिशमनु व्यचलत् ॥ १६ ॥
तमृतवश्चार्तवाश्च लोकाश्च लौक्याश्च मासाश्चार्धमासाश्चाहोरात्रे चानुव्यचलन् ॥ १७ ॥

अर्थ— (**सः ऊर्ध्वां दिश**) तो ऊर्ध्व दिशेस अनुकूल होऊन चालूं लागला. (४) त्यामुळें (**तं ऋतं च सत्यं च सूर्यः च चंद्रः च नक्षत्राणि च०**) त्याला अनुकूल ऋत, सत्य, सूर्य, चंद्र आणि नक्षत्रें झालीं. (५) जो हें जाणतो तो ऋत, सत्य, सूर्य, चंद्र आणि नक्षत्रें यांचें प्रियधाम होऊन रहातो. (६) [२]

(**सः उत्तमां दिशं०**) तो उत्तम दिशेस अनुकूलतेनें चालूं लागला. (७) त्यामुळें (**तं ऋचः च सामानि च यजूंषि च ब्रह्म च०**) त्याला ऋचा, साम, यजु आणि ब्रह्म म्हणजे अथर्ववेद अनुकूल झाले. (८) जो हें जाणतो तो ऋचा, साम, यजु आणि ब्रह्माचें प्रिय धाम होऊन रहातो. (९) [३]

(**सः बृहतीं दिशं०**) तो बृहती दिशेकडे अनुकूल होऊन चालूं लागला. (१०) त्यामुळें (**तं इतिहासः च पुराणं च गाथाः च नाराशंसीः च**) इतिहास, पुराण, गाथा आणि नाराशंसी त्यास अनुकूल झाले. (११) जो हें जाणतो तो इतिहास, पुराण, गाथा आणि नाराशंसीचें प्रियधाम होऊन रहातो. (१२) [४]

(**सः परमां दिशं०**) तो परमदिशेकडे अनुकूल होऊन चालला. (१३) त्यामुळें (**तं आहवनीयः च गार्हपत्यः च दक्षिणाग्निः च यज्ञः च यजमानः च पशवः च०**) त्याला आहवनीय, गार्हपत्य, दक्षिणाग्नि, यज्ञ, यजमान आणि पशु अनुकूल झाले. (१४) जो हें जाणतो तो आहवनीय, गार्हपत्य, दक्षिणाग्नि, यज्ञ, यजमान आणि पशूंचें प्रियधाम बनतो. (१५) [५]

(**सः अनादिष्टां दिशां०**) तो अनादिष्ट दिशेकडे अनुकूलतेप्रमाणें चालूं लागला. (१६) (**तं ऋतवः च आर्तवाः च लोकाः च लौक्याः च मासाः च अर्धमासाः च अहोरात्रे च०**) त्यामुळें त्याला ऋतु आणि ऋतुसंबंधीं पदार्थ, लोक आणि लोकांसंबंधीं पदार्थ, महिने, पक्ष, दिवस आणि रात्र अनुकूल झाले. (१७)

ऋतूनां च वै स आर्तवानां च लोकानां च लौक्यानां च मासानां
चार्धमासानां चाहोरात्रयोश्च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ १८ ॥
सोऽनावृत्तां दिशमनु व्यचलत्ततो नावर्त्स्यन्नमन्यत ॥ १९ ॥
तं दितिश्चादितिश्चेडा चेन्द्राणी चानुव्यचलन् ॥ २० ॥
दितेश्च वै सोऽदितेश्चेडायाश्चेन्द्राण्याश्च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ २१ ॥
स दिशोऽनु व्यचलत्तं विराडनु व्यचलत्सर्वे च देवाः सर्वाश्च देवताः ॥ २२ ॥
विराजश्च वै स सर्वेषां च देवानां सर्वासां च देवतानां
प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ २३ ॥
स सर्वानन्तर्देशाननु व्यचलत् ॥ २४ ॥
तं प्रजापतिश्च परमेष्ठी च पिता च पितामहश्चानुव्यचलन् ॥ २५ ॥
प्रजापतेश्च वै स परमेष्ठिनश्च पितुश्च पितामहस्य
च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ २६ ॥

[७]

स महिमा सद्रुर्भूत्वान्तं पृथिव्या अगच्छत्स समुद्रोऽभवत् ॥ १ ॥
तं प्रजापतिश्च परमेष्ठी च पिता च पितामहश्चापश्च श्रद्धा च
वर्षं भूत्वानुव्यवर्तयन्त ॥ २ ॥

अर्थ— जो हें जाणतो तो ऋतु आणि ऋतुसंबंधीं पदार्थ, लोक आणि लोकांसंबंधीं पदार्थ, महिने, पक्ष, दिवस आणि रात्र यांचें प्रियधाम बनतो. (१८) [६]

(**सः अनावृत्तां दिशं०**) तो अनावृत्त दिशेकडे अनुकूल होऊन चालला, आणि (**ततः न अवर्त्स्यन् अमन्यत**) तेथून परत न फिरण्याचा विचार त्यानें केला. (१९) त्यामुळें (**तं दितिः च अदितिः इडा च इंद्राणी च०**) त्याला दिति, अदिति, इडा आणि इंद्राणि अनुकूल झाल्या. (२०) जो हें जाणतो तो दिति, अदिति, इडा आणि इंद्राणीचें प्रियधाम बनतो. (२१) [७]

(**सः दिशः अनुव्यचलत्**) तो सर्व दिशांस अनुकूल होऊन चालूं लागला. त्यामुळें (**तं विराट् सर्वे च देवाः सर्वाः च देवताः च०**) त्याला विराट्, सर्व देव आणि सर्व देवता अनुकूल झाल्या. (२२) जो ही गोष्ट जाणतो तो विराट्, सर्व देव आणि देवतांचें प्रियधाम बनतो. (२३) [८]

(**सः सर्वान् अन्तर्देशान् अनु०**) तो सर्व अंतर्देशांत अनुकूल होऊन चालूं लागला. (२४) त्यामुळें तो (**तं प्रजापतिः च परमेष्ठी च पिता च पितामहः च अनु०**) त्याला प्रजापति, परमेष्ठी, पिता आणि पितामह अनुकूल होऊन चालूं लागले. (२५) जो हें जाणतो तो प्रजापति, परमेष्ठी, पिता आणि पितामह यांचें प्रियधाम बनतो. (२६) [९]

[७] (**सः महिमा स-द्रुः भूत्वा**) तो महा समर्थ गतियुक्त होऊन (**पृथिव्याः अन्तं अगच्छत्**) पृथ्वीच्या अंतापावेतों गेला आणि (**सः समुद्रः अभवत्**) तो समुद्र झाला. (१) (**तं प्रजापतिः च परमेष्ठी च पिता च पितामहः च आपः च श्रद्धा च वर्षं च भूत्वा अनुव्यवर्तयन्त**) त्याच्या बरोबर प्रजापति, परमेष्ठी, पिता, पितामह, श्रद्धा वृष्टि होऊन राहिले. (२)

एनमापो गच्छत्यैनं श्रद्धा गच्छत्यैनं वर्षं गच्छति य एवं वेद ॥ ३ ॥
तं श्रद्धा च यज्ञश्च लोकश्चान्नं चान्नाद्यं च भूत्वाभिपर्यावर्तन्त ॥ ४ ॥
ऐनं श्रद्धा गच्छत्यैनं यज्ञो गच्छत्यैनं लोको गच्छत्यैनमन्नं
गच्छत्यैनमन्नाद्यं गच्छति य एवं वेद ॥ ५ ॥

[८]

सोऽरज्यत ततो राजन्योऽजायत ॥ १ ॥
स विशः सबन्धूनन्नमन्नाद्यमभ्युदतिष्ठत् । ॥ २ ॥
विशां च वै स सबन्धूनां चान्नस्य चान्नाद्यस्य च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ ३ ॥

[९]

स विशोऽनु व्यचलत् ॥ १ ॥
तं सभा च समितिश्च सेना च सुरा चानुव्यचलन् ॥ २ ॥
सभायाश्च वै स समितेश्च सेनायाश्च सुरायाश्च प्रियं धाम भवति य एवं वेद ॥ ३ ॥

[१०]

तद्यस्यैवं विद्वान्व्रात्यो राज्ञोऽतिथिर्गृहानागच्छेत् ॥ १ ॥
श्रेयांसमेनमात्मनो मानयेत्तथा क्षत्राय ना वृश्चते तथा राष्ट्राय ना वृश्चते ॥ २ ॥
अतो वै ब्रह्म च क्षत्रं चोदतिष्ठतां ते अब्रूतां कं प्र विशोवेति ॥ ३ ॥

अर्थ— (यः एवं वेद) जो हें जाणतो (एनं आपः आगच्छति) त्यास जल प्राप्त होतें. (एनं श्रद्धा आगच्छति) त्यास श्रद्धा प्राप्त होते. (एनं वर्षं आगच्छति) त्यास वर्षा प्राप्त होते. (३) (तं श्रद्धा च यज्ञः च लोकः च अन्नं च अन्नाद्यं च भूत्वा अभिपर्यावर्तन्त) त्याच्या भोंवतीं सर्व बाजूंस श्रद्धा, यज्ञ, लोक, अन्न आणि खाण्यापिण्याचे पदार्थ राहूं लागले. (४) जो हें जाणतो. (एनं श्रद्धा आगच्छति) त्याला श्रद्धा प्राप्त होते. (एनं यज्ञः आगच्छति) त्यास यज्ञ प्राप्त होतो,(एनं लोकः आगच्छति) त्याला लोक प्राप्त होतो, (एनं अन्नं आगच्छति) त्याला अन्न प्राप्त होतें, आणि (एनं अन्नाद्यं आगच्छति) त्याला खाद्यपेय पदार्थ प्राप्त होतात. (५)

[२] [८] (सः अरज्यत) तो सर्वांस आनंदित करूं लागला, त्यामुळें तो (राजन्यः अजायत) राजा— क्षत्रिय बनला. (१) (सः सबन्धून् विशः अन्नं अन्नाद्यं अभ्युदतिष्ठत्) स्वतःच्या सर्व बंधुबांधवांसह सर्व प्रजाजन, तसेंच अन्न आणि खानपानाचें पदार्थ त्यास प्राप्त झाले. (२) जो ही गोष्ट जाणतो तो स्वतःच्या बंधुबांधवांचें, प्रजाजनांचें अन्न आणि खाद्य पदार्थांचें प्रियधाम बनतो. (३)

[९] (सः विशः अनुव्यचलत्) तो प्रजेस अनुकूल होऊन वर्तूं लागला. (१) त्यामुळें (तं सभा च समितिः च) त्यास सभा आणि समिति (सेना च सुरा च अनुव्यचलन्) सैन्य आणि खजिना अनुकूल झाले. (२) जो ही गोष्ट जाणतो तो सभा, समिति, सैन्य आणि धनभांडाराचें प्रियधाम होऊन रहातो. (३)

[१०] (तत् यस्य यज्ञः गृहान् एवं विद्वान् व्रात्यः आतिथिः) ज्या राजाच्या घरीं असा विद्वान् व्रतचारी अतिथि (आगच्छेत्) येतो. (१) (एनं आत्मनः श्रेयांसं मानयेत्) यास आपलें कल्याण करणारा समजून त्याचा सन्मान करावा. (तथा) तसें केल्यानें (क्षत्राय न आवृश्चते) क्षात्र वृत्तीपासून मागें हटत नाहीं आणि (तथा राष्ट्राय न आवृश्चते) असें केल्यानें राष्ट्राचाहि अहितकारी होत नाहीं. (२) (अतः वै ब्रह्म च क्षत्रं च उदतिष्ठतां) त्यामुळें ज्ञान आणि वीर्य उत्पन्न होतें. (ते अब्रूताम्) ते दोघे सांगतात कीं (कं प्रविशाव इति) आम्हीं कोठें प्रवेश करून रहावें ? (३)

अतो वै बृहस्पतिमेव ब्रह्म प्रा विंशत्विन्द्रं क्षत्रं तथा वा इति ॥ ४ ॥
अतो वै बृहस्पतिमेव ब्रह्म प्राविंशदिन्द्रं क्षत्रम् ॥ ५ ॥
इयं वा उ पृथिवी बृहस्पतिर्द्यौरेवेन्द्रः ॥ ६ ॥
अयं वा उ अग्निर्ब्रह्मासावादित्यः क्षत्रम् ॥ ७ ॥
ऐनं ब्रह्म गच्छति ब्रह्मवर्चसी भवति ॥ ८ ॥
यः पृथिवीं बृहस्पतिमग्निं ब्रह्म वेद ॥ ९ ॥
ऐनमिन्द्रियं गच्छतीन्द्रियवान्भवति ॥ १० ॥
य आदित्यं क्षत्रं दिवमिन्द्रं वेद ॥ ११ ॥

[११]

तद्यस्यैवं विद्वान्व्रात्योऽतिथिर्गृहानागच्छेत् ॥ १ ॥
स्वयमेनमभ्युदेत्य ब्रूयाद्व्रात्य क्वाऽवात्सीर्व्रात्योदकं व्रात्य तर्पयन्तु
व्रात्य यथा ते प्रियं तथास्तु व्रात्य यथा ते वशस्तथास्तु व्रात्य
यथा ते निकामस्तथास्त्विति ॥ २ ॥
यदेनमाह व्रात्य क्वाऽवात्सीरिति पथ एव तेन देवयानानव रुन्द्धे ॥ ३ ॥

अर्थ— (अतः वै बृहस्पतिं एव ब्रह्म प्राविशतु) यामुळे निःसंदेहपणे बृहस्पतीमध्यें ब्रह्मज्ञान प्रवेशो, आणि (तथा वै इन्द्रं क्षत्रं इति) त्याचप्रमाणें इंद्रांत क्षत्र (क्षात्रिय) प्रविष्ट होवो. (४) (अतः वै बृहस्पतिं एव ब्रह्म प्राविशत् इन्द्रं क्षत्रं च) म्हणून बृहस्पतिमध्यें ब्रह्म व इंद्रांत क्षात्रियत्व प्रविष्ट झालें. (५) (इयं वै उ पृथिवी बृहस्पतिः) निश्चयपूर्वक ही पृथ्वी बृहस्पति आहे, आणि (द्यौः एव इन्द्रः) द्युलोक इंद्र आहे. (६) (अयं वै उ अग्निः ब्रह्म) हा अग्नि निःसंदेह ब्रह्म आहे आणि (असौ आदित्यः क्षत्रं) हा आदित्य क्षत्र आहे. (७) (यः पृथिवीं बृहस्पतिं) जे पृथ्वीला बृहस्पति आणि (अग्निं ब्रह्म वेद) आणि अग्नीला ब्रह्म म्हणून ओळखतो, (एनं ब्रह्म आगच्छति) त्यास ब्रह्मज्ञान आपोआप होतें आणि तो (ब्रह्मवर्चसी भवति) ब्रह्मज्ञानानें तेजस्वी होतो. (८-९) (यः आदित्यं क्षत्रं) जो आदित्यास क्षत्र आणि (दिवं इन्द्रं वेद) द्युलोकास इंद्र असें जाणतो (एनं इन्द्रियं आगच्छति) त्याच्या-जवळ इंद्राची शक्ति येते आणि (इन्द्रियवान् भवति) इंद्राच्या शक्तीनें युक्त होतो. (१०-११)

[११] (तत् एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः) या प्रकारचा विद्वान् व्रतपालक अतिथि (यस्य गृहान् आगच्छेत्) ज्याच्या घरीं येतो. (१) (स्वयं एनं अभ्युदेत्य ब्रूयात्) त्यानें स्वतः त्याच्याजवळ जाऊन म्हणावें कीं, (व्रात्य, क्व अवात्सीः) हे व्रतधारी ! आपण कोठें रहातां ? (व्रात्य उदकं) हे व्रतधारी ! हें पाणी आपणांसाठीं आहे. (व्रात्य तर्पयन्तु) हे व्रतधारी ! हे माझे लोक तुम्हांस तृप्त करोत. (व्रात्य यथा ते प्रियं तथा अस्तु) हे व्रताचारी जशी आपली इच्छा आहे तसें होवो. (हे व्रात्य, यथा ते निकामः तथा अस्तु इति) हे व्रती ! जशी तुमची अभिलाषा असेल तसें होवो. (२)

(यत् एनं आह व्रात्य क्व अवात्सीः इति) जो यास म्हणतो कीं हे व्रतधारी ! आपण कोठें रहातां तर (तेन देवयानान् पथः एव अवरुन्द्धे) त्या प्रश्नामुळें तो देवांकडे जाणारे मार्ग स्वतःच्या आधीन करून घेतो. (३)

यदेनमाह व्रात्योदकमित्यप एव तेनाव रुन्द्धे ॥ ४ ॥
यदेनमाह व्रात्य तर्पयन्त्विति प्राणमेव तेन वर्षीयांसं कुरुते ॥ ५ ॥
यदेनमाह व्रात्य यथा ते प्रियं तथास्त्विति प्रियमेव तेनाव रुन्द्धे ॥ ६ ॥
ऐनं प्रियं गच्छति प्रियः प्रियस्य भवति य एवं वेद ॥ ७ ॥
यदेनमाह व्रात्य यथा ते वशस्तथास्त्विति वशमेव तेनाव रुन्द्धे ॥ ८ ॥
ऐनं वशो गच्छति वशी वशिनां भवति य एवं वेद ॥ ९ ॥
यदेनमाह व्रात्य यथा ते निकामस्तथास्त्विति निकाममेव तेनाव रुन्द्धे ॥ १० ॥
ऐनं निकामो गच्छति निकामे निकामस्य भवति य एवं वेद ॥ ११ ॥

[१२]

तद्यस्यैवं विद्वान्व्रात्य उद्धृतेष्वग्निष्वधिश्रितेऽग्निहोत्रेऽतिथिर्गृहानागच्छेत् ॥ १ ॥
स्वयमेनमभ्युदेत्य ब्रूयाद्व्रात्यातिसृज होष्यामीति ॥ २ ॥
स चातिसृजेज्जुहुयान्न चातिसृजेन्न जुहुयात् ॥ ३ ॥
स य एवं विदुषा व्रात्येनातिसृष्टो जुहोति ॥ ४ ॥
प्र पितृयाणं पन्थां जानाति प्र देवयानम् ॥ ५ ॥

अर्थ— (यत् एनं आह) जो त्याला म्हणतो, (व्रात्य उदकं इति) हे व्रताचरण करणाऱ्या, हें पाणी तुझ्यासाठीं आहे, (तेन अपः एव अवरुन्द्धे) त्या वचनामुळें भरपूर जल त्याला मिळतें. (४) (यत् एनं आह व्रात्य तर्पयन्तु इति) जो त्यास असें म्हणतो कीं, हे व्रती ! माझीं माणसें तुम्हांस संपूर्ण तृप्ति देवोत, (तेन प्राणं वर्षीयांसं कुरुते) तो त्या वचनामुळें स्वतःच्या प्राणास दीर्घ करतो. (५) (यत् एनं आह व्रात्य यथा ते प्रियं तथा अस्तु इति) जो त्यास म्हणतो कीं, हे व्रतानुष्ठात्या, जें तुला प्रिय तें होवो. (तेन प्रियं एव अवरुन्द्धे) त्या वचनानें प्रिय पदार्थांस तो स्वतः आधीन करतो. (६) (यः एवं वेद) जो हें जाणतो कीं (एवं प्रियं आगच्छति) त्यास प्रिय प्राप्त होतें आणि (प्रियस्य प्रियः भवति) तो प्रियांचा प्रिय होतो. (७) (यत् एनं आह व्रात्य यथा ते वशः तथा अस्तु इति) जो त्यास म्हणतो कीं हे व्रती ! जी तुझी इच्छा असेल तसेंच होवो, (तेन वशं एव अवरुन्द्धे) त्या वचनानें तो सर्वांना स्वतःच्या वश करतो. (८) जो हें जाणतो (वशः एनं आगच्छति) त्यास सर्व वश होतें, तो (वशीनां वशी भवति) वश करणाऱ्या लोकांस तो स्वतःच्या वश करतो. (९) (यत् एनं आह व्रात्य यथा ते निकामः तथा अस्तु इति) जो त्यास म्हणतो हे व्रताचरण करणाऱ्या ! जी आपली अभिलाषा आहे तसें होवो. (तेन निकामं एव अवरुन्द्धे) त्यामुळें तो स्वतःचें इच्छित प्राप्त करून घेतो. (१०) (एनं निकामः आगच्छति) यामुळें त्याची अभिलाषा पूर्ण होते हें जो जाणतो (निकामस्य निकामे भवति) त्याची अभिलाषा पूर्ण होते. (११)

[१२] (तत् यस्य गृहे) ज्याच्या घरीं (एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः) असा विद्वान् व्रतधारी अतिथि (उद्धृतेषु अग्निषु अग्निहोत्रे अधिश्रिते आगच्छेत्) अग्नि प्रदीप्त होऊन अग्निहोत्र होण्याच्या समयीं येवो. (१) (स्वयं एनं अभ्युदेत्य ब्रूयात्) स्वतः त्यास सामोरें जाऊन म्हणावें कीं, (व्रात्य अतिसृज होष्यामि इति) हे व्रती ! मला आज्ञा द्या, मीं हवन करीन ! (२) (सः च अतिसृजेत् जुहुयात्) जर त्यानें आज्ञा दिली तर हवन करावें. (न च अतिसृजेत् न जुहुयात्) जर आज्ञा न दिली तर न करावें. (३) (सः यः एवं विदुषा व्रात्येन अतिसृष्टो जुहोति) जो अशा प्रकारच्या व्रतधारी विद्वानाच्या आज्ञेनें हवन करतो (पितृयाणं देवयानं च पन्थां प्रजानाति) तो पितरांकडे आणि देवांकडे जाणारे मार्ग जाणतो. (४–५)

न देवेष्वा वृश्चते हुतमस्य भवति ॥ ६ ॥
पर्यस्यास्मिंल्लोक आयतनं शिष्यते य एवं विदुषा व्रात्येनातिसृष्टो जुहोति ॥ ७ ॥
अथ य एवं विदुषा व्रात्येनानतिसृष्टो जुहोति ॥ ८ ॥
न पितृयाणं पन्थां जानाति न देवयानम् ॥ ९ ॥
आ देवेषु वृश्चते अहुतमस्य भवति ॥ १० ॥
नास्यास्मिंल्लोक आयतनं शिष्यते य एवं विदुषा व्रात्येनानतिसृष्टो जुहोति ॥ ११ ॥

[१३]

तद्यस्यैवं विद्वान्व्रात्य एकां रात्रिमतिथिर्गृहे वसति ॥ १ ॥
ये पृथिव्यां पुण्या लोकास्तानेव तेनाव रुन्द्धे ॥ २ ॥
तद्यस्यैवं विद्वान्व्रात्यो द्वितीयां रात्रिमतिथिर्गृहे वसति ॥ ३ ॥
येऽन्तरिक्षे पुण्या लोकास्तानेव तेनाव रुन्द्धे ॥ ४ ॥
तद्यस्यैवं विद्वान्व्रात्यस्तृतीयां रात्रिमतिथिर्गृहे वसति ॥ ५ ॥
ये दिवि पुण्या लोकास्तानेव तेनाव रुन्द्धे ॥ ६ ॥
तद्यस्यैवं विद्वान्व्रात्यश्चतुर्थीं रात्रिमतिथिर्गृहे वसति ॥ ७ ॥
ये पुण्यानां पुण्या लोकास्तानेव तेनाव रुन्द्धे ॥ ८ ॥

अर्थ— (यः एवं विदुषा व्रात्येन अतिसृष्टः जुहोति) जो अशाप्रकारें विद्वान् व्रतधाऱ्याच्या आज्ञेनें हवन करतो (अस्य हुतं भवति) त्याचें अग्निहोत्र सफल होतें आणि (देवेषु न आवृश्चते) देवांमध्यें त्याचा कांहीं दोष होत नाहीं. (अस्मिन् लोके) या लोकीं (अस्य आयतनं परिशिष्यते) त्याचा आश्रय सुरक्षित रहातो, (अथ यः एवं विदुषा व्रात्येन अनतिसृष्टो जुहोति) आणि जो या प्रकारें विद्वान् व्रतधाऱ्याच्या आज्ञेशिवाय हवन करतो, (८) तो (न पितृयाणं न देवयानं पन्थां जानाति) देवतांचा अथवा पितरांकडे जाणारा कोणताच मार्ग जाणत नाहीं. (९) (अस्य हुतं भवति) त्याचें हवन निष्फळ होतें. (१०) (देवेषु आवृश्चते) देवांचा अपराधी होतो. (अस्मिन् लोके अस्य आयतनं शिष्यते) या लोकांत त्यास आधार रहात नाहीं. (यः) जो अशा विद्वान् व्रतधाऱ्याच्या आज्ञेविना हवन करतो. (११)

[१३] (तत् यस्य गृहे एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः एकां रात्रिं वसति) ज्याच्या घरांत अशा प्रकारचा विद्वान् व्रतधारी एक रात्र रहातो. (१) (ये पृथिव्यां पुण्या लोकाः) या पृथ्वीवर जे पुण्य लोक आहेत (तान् तेन एव अवरुन्द्धे) त्यांस तो त्यामुळें प्राप्त करतो. (२) (तत् यस्य गृहे एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः द्वितीयां रात्रिं वसति) ज्याच्या घरीं अशा प्रकारचा विद्वान् व्रतधारी दुसरी रात्र रहातो. (३) (तेन) त्यामुळें (ये अन्तरिक्षे पुण्याः लोकाः) अंतरिक्षांत जे पुण्य लोक आहेत, (तान् एव अवरुन्द्धे) त्यांस तो प्राप्त करतो. (४) (तत् यस्य गृहे एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः तृतीयां रात्रिं वसति) ज्यांच्या घरांत अशा प्रकारचा व्रतधारी विद्वान् तिसरी रात्र रहातो. (५) (ये दिवि पुण्याः लोकाः) द्युलोकांत जे पुण्य लोक आहेत, (तान् तेन एव अवरुन्द्धे) त्यांस त्यामुळें तो प्राप्त करतो. (६) तत् यस्य गृहे एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः चतुर्थीं रात्रीं वसति) ज्याच्या घरीं अशा प्रकारचा विद्वान् व्रतधारी चौथी रात्र रहातो. (७) (ये पुण्यानां पुण्या लोकाः) पुण्यकारकांचे जे पुण्य लोक आहेत, (तान् तेन एव अवरुन्द्धे) त्यामुळें त्यांची तो प्राप्ति करून घेतो. (८)

तद्यस्यैवं विद्वान्व्रात्योऽपरिमिता रात्रीरतिथिर्गृहे वसति ॥ ९ ॥
य एवापरिमिताः पुण्या लोकास्तानेव तेनाव रुन्द्धे ॥ १० ॥
अथ यस्याव्रात्यो व्रात्यब्रुवो नामबिभ्रत्यतिथिर्गृहानागच्छेत् ॥ ११ ॥
कर्षेदेनं न चैनं कर्षेत् ॥ १२ ॥
अस्यै देवताया उदकं याचामीमां देवतां वासय इमामिमां
देवतां परि वेवेष्मीत्येनं परि वेविष्यात् ॥ १३ ॥
तस्यामेवास्य तद्देवतायां हुतं भवति य एवं वेद ॥ १४ ॥

[१४]

स यत्प्राचीं दिशमनु व्यचलन्मारुतं शर्धो भूत्वानुव्यचलन्मनोऽन्नादं कृत्वा ॥ १ ॥
मनसान्नादेनान्नमत्ति य एवं वेद ॥ २ ॥
स यद्दक्षिणां दिशमनु व्यचलदिन्द्रो भूत्वानुव्यचलद्बलमन्नादं कृत्वा ॥ ३ ॥
बलेनान्नादेनान्नमत्ति य एवं वेद ॥ ४ ॥
स यत्प्रतीचीं दिशमनु व्यचलद्वरुणो राजा भूत्वानुव्यचलदपोऽन्नादीः कृत्वा ॥ ५ ॥

अर्थ—(तत् यस्य गृहे एवं विद्वान् व्रात्यः अतिथिः अपरिमिताः रात्रीः वसति) ज्याच्या घरांत अशा प्रकारचा विद्वान् व्रतपालक अतिथि अपरिमित रात्री राहतो, (९) (ये एव अपरिमिताः पुण्याः लोकाः) जे अपरिमित पुण्य लोक आहेत, (तान् एव तेन अवरुन्द्धे) त्यांस तो त्यामुळें प्राप्त करून घेतो. (१०) (अथ यस्य गृहान् अव्रात्यः व्रात्यब्रुवः नामबिभ्रति अतिथिः आगच्छेत्) ज्याच्या घरीं व्रताचरण न करणारा केवळ नामधारी अविद्वान् अतिथि येईल, (११) (एनं कर्षेत्) काय गृहस्थ त्याचा तिरस्कार करील ? (एनं च न कर्षेत्) याचा तिरस्कार न करावा. (१२) गृहस्थानें म्हणावें कीं (अस्यै देवतायै उदकं याचामि) या देवतेसाठीं मीं पाण्याची प्रार्थना करतों. (इमां देवतां वासये) या देवतेचें वास्तव्य मीं घरांत करीत आहें, (इमां इमां देवतां परिवेविष्यात्) या देवतेस मीं वाढतों. (१३) (तस्यां एव देवतायां अस्य तत् हुतं भवति) त्या देवतेंत त्या गृहस्थीचें तें हवन होतें. (यः एवं वेद) जो हें तत्त्व जाणतो. (१४) (अर्थात् नामधारी अतिथि घरीं आला असतां तो आपली जणूं उपास्यदेवताच आहे असें मानून सर्व भोग जणूं स्वतःच्या उपास्य देवतेला देत आहोंत अशा भावनेनें त्याला अर्पण करावेत. याप्रकारें समर्पण केल्यानें सर्व दान त्या उपास्य देवतेस पोंहोंचतें.)

[१४] (सः यत् प्राचीं दिशं अनुव्यचलत्) तो जेव्हां पूर्वदिशेकडे चालूं लागतो तेव्हां (मारुतं शर्धः भूत्वा) वायु बल होऊन आणि (मनः अन्नादं कृत्वा) मनाला अन्न खाणारा करून (अनुव्यचलत्) चालूं लागतो. (१) (यः एवं वेद) जो हें जाणतो तो (अन्नादेन मनसा अन्नं अत्ति) अन्न भक्षण करण्याच्या भावनेनें अन्न खातो. (२) (सः दक्षिणां०) तो जेव्हां दक्षिण दिशेस चालूं लागतो तेव्हां (इन्द्रः भूत्वाः) इंद्र म्हणजे प्रभु बनून आणि (बलं अन्नादं कृत्वा) बलास अन्नभक्षक करून (अनुव्यचलत्) चालूं लागतो. (३) जो हें जाणतो तो (अन्नादेन बलेन अन्नं अत्ति) अन्नभक्षक बलानें अन्न खातो. (४) (सः प्रतीचीं दिशं०) जेव्हां तो पश्चिम दिशेकडे चालतो तेव्हां (वरुणः राजा भूत्वा) वरुण राजा बनून आणि (अपः अन्नादीः कृत्वा) पाण्यास अन्नभक्षक बनवून चालतो. (५)

अद्भिरन्नादिभिरन्नमत्ति य एवं वेद ॥ ६ ॥

स यदुदीचीं दिशमनु व्यचलत्सोमो राजा भूत्वानुव्यचलत्
सप्तर्षिभिर्हुत आहुतिमन्नादीं कृत्वा ॥ ७ ॥

आहुत्यान्नाद्यान्नमत्ति य एवं वेद ॥ ८ ॥

स यद् ध्रुवां दिशमनु व्यचलद्विष्णुर्भूत्वानुव्यचलद्विराजमन्नादीं कृत्वा ॥ ९ ॥

विराजान्नाद्यान्नमत्ति य एवं वेद ॥ १० ॥

स यत्पशूननु व्यचलद्रुद्रो भूत्वानुव्यचलदोषधीरन्नादीः कृत्वा ॥ ११ ॥

ओषधीभिरन्नादीभिरन्नमत्ति य एवं वेद ॥ १२ ॥

स यत्पितॄननु व्यचलद्यमो राजा भूत्वानुव्यचलत्स्वधाकारमन्नादं कृत्वा ॥ १३ ॥

स्वधाकारेणान्नादेनान्नमत्ति य एवं वेद ॥ १४ ॥

[redacted]

स यद्देवाननु व्यचलदीशानो भूत्वानुव्यचलन्मन्युमन्नादं कृत्वा ॥ १९ ॥
मन्युनान्नादेनान्नमत्ति य एवं वेद ॥ २० ॥
स यत्प्रजा अनु व्यचलत्प्रजापतिर्भूत्वानुव्यचलत्प्राणमन्नादं कृत्वा ॥ २१ ॥
प्राणेनान्नादेनान्नमत्ति य एवं वेद ॥ २२ ॥
स यत्सर्वानन्तर्देशानन्‍नु व्यचलत्परमेष्ठी भूत्वानुव्यचलद्ब्रह्मान्नादं कृत्वा ॥ २३ ॥
ब्रह्मणान्नादेनान्नमत्ति य एवं वेद ॥ २४ ॥

[१५]

तस्य व्रात्यस्य ॥ १ ॥ सप्त प्राणाः सप्तापानाः सप्त व्यानाः ॥ २ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य प्रथमः प्राण ऊर्ध्वो नामायं सो अग्निः ॥ ३ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य द्वितीयः प्राणः प्रौढो नामासौ स आदित्यः ॥ ४ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य तृतीयः प्राणोऽभ्यूढो नामासौ स चन्द्रमाः ॥ ५ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य चतुर्थः प्राणो विभूर्नामायं पवमानः ॥ ६ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य पञ्चमः प्राणो योनिर्नाम ता इमा आपः ॥ ७ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य षष्ठः प्राणः प्रियो नाम त इमे पशवः ॥ ८ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य सप्तमः प्राणोऽपरिमितो नाम ता इमाः प्रजाः ॥ ९ ॥

अर्थ— (सः यत् देवान् अनुव्यचलत्) जेव्हां तो देवांजवळ जातो तेव्हां (ईशानः भूत्वा) ईशान होऊन (मन्युं अन्नादं कृत्वा) उत्साहास अन्नभक्षक करून चालतो. (१९) जो हें तत्त्व जाणतो तो (मन्युना०) उत्साहासह अन्नभक्षण करतो. (२०) (सः यत् प्रजाः अनु०) जेव्हां तो प्रजेकडे जातो तेव्हां तो (प्रजापतिः भूत्वा) प्रजापालक होऊन (प्राणं अन्नादं कृत्वा) प्राणास अन्न खाणारा बनवून तो चालतो. (२१) जो हें जाणतो तो (प्राणेन अन्नादेन०) प्राणशक्तीनें अन्नाचा भोग करतो. (२२) (सः यत् सर्वान् अन्तर्देशान् अनु०) जेव्हां तो सर्व अन्तर्देशाप्रत जातो तेव्हां (परमेष्ठी भूत्वा) परमेष्ठी होऊन (ब्रह्म अन्नादं कृत्वा) ब्रह्मास अन्न खाणारा बनवून चालतो. (२३) जो हें जाणतो तो (ब्रह्मणा अन्नादेन अन्नं अत्ति) ब्रह्मज्ञानासह अन्नादींचा भोग करतो. (२४)

[१५] (तस्य व्रात्यस्य) त्या व्रात्याचे (सप्त प्राणाः सप्त अपानाः सप्त व्यानाः) सात प्राण, सात अपान आणि सात व्यान आहेत. (१-२) (तस्य व्रात्यस्य) त्या व्रात्याचे (यः अस्य प्रथमः प्राणः) जो त्याचा प्रथम प्राण आहे (अयं ऊर्ध्वः नाम अग्निः) तो ऊर्ध्व नांवाचा अग्नि आहे. (३) त्या व्रात्याचा जो द्वितीय प्राण आहे तो (प्रौढः नाम असौ स आदित्यः) प्रौढ नांवाचा हा आदित्य आहे. (४) त्या व्रात्याचा जो तृतीय प्राण आहे तो (अभ्यूढः नाम असौ स चंद्रमाः) अभ्यूढ नांवाचा हा चंद्र आहे. (५) त्या व्रात्याचा जो चतुर्थ प्राण आहे तो (विभूः नाम अयं स पवमानः) विभु नांवाचा हा पवमान वायु आहे. (६) त्या व्रात्याचा जो पांचवा प्राण आहे तो (योनिः नाम ताः इमाः आपः) योनि नांवाचें पाणी आहे. (७) त्या व्रात्याचा सहावा प्राण (प्रियः नाम ते इमे पशवः) प्रिय नामक पशु आहेत. (८) त्या व्रात्याचा सप्तम प्राण (अपरिमिताः नाम ताः इमाः प्रजाः) अपरिमित नांवाच्या प्रजा आहेत. (९)

[१६]

तस्य व्रात्यस्य । योऽस्य प्रथमोऽपानः सा पौर्णमासी ॥ १ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य द्वितीयोऽपानः साष्टका ॥ २ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य तृतीयोऽपानः सामावास्या ॥ ३ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य चतुर्थोऽपानः सा श्रद्धा ॥ ४ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य पञ्चमोऽपानः सा दीक्षा ॥ ५ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य षष्ठोऽपानः स यज्ञः ॥ ६ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य सप्तमोऽपानस्ता इमा दक्षिणाः ॥ ७ ॥

[१७]

तस्य व्रात्यस्य । योऽस्य प्रथमो व्यानः सेयं भूमिः ॥ १ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य द्वितीयो व्यानस्तदन्तरिक्षम् ॥ २ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य तृतीयो व्यानः सा द्यौः ॥ ३ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य चतुर्थो व्यानस्तानि नक्षत्राणि ॥ ४ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य पञ्चमो व्यानस्त ऋतवः ॥ ५ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य षष्ठो व्यानस्त आर्तवाः ॥ ६ ॥
तस्य व्रात्यस्य । योऽस्य सप्तमो व्यानः स संवत्सरः ॥ ७ ॥
तस्य व्रात्यस्य । समानमर्थं परि यन्ति देवाः संवत्सरं वा
एतदृतवोऽनुपरियन्ति व्रात्यं च ॥ ८ ॥
तस्य व्रात्यस्य । यदादित्यमभिसंविशन्त्यमावास्यां चैव तत्पौर्णमासीं च ॥ ९ ॥

अर्थ— [१६] (तस्य व्रात्यस्य) त्या व्रात्याचा (यः प्रथमः अपानः) जो पहिला अपान आहे (सा पौर्णमासी) ती पौर्णमासी आहे. (१) त्या व्रात्याचा द्वितीय अपान ती अष्टका आहे. (२) त्या व्रात्याचा तिसरा अपान ती अमावस्या आहे. (३) त्या व्रात्याचा चतुर्थ अपान ती श्रद्धा आहे. (४) त्या व्रात्याचा पंचम अपान दीक्षा आहे. (५) त्या व्रात्याचा सहावा अपान तो यज्ञ आहे. (६) त्या व्रात्याचा सातवा अपान ती दक्षिणा आहे. (७)

[१७] (तस्य व्रात्यस्य) त्या व्रात्याचा (यः अस्य) जो त्याचा (प्रथमः व्यानः) प्रथम व्यान आहे (सा इयं भूमिः) ती ही पृथ्वी आहे. (१) त्या व्रात्याचा द्वितीय व्यान अन्तरिक्ष आहे. (२) त्या व्रात्याचा तृतीय व्यान आहे तो द्युलोक आहे. (३) त्या व्रात्याचा चतुर्थ व्यान जो आहे (तानि नक्षत्राणि) तीं नक्षत्रें होत. (४) त्या व्रात्याचा पंचम व्यान (ते ऋतवः) ते ऋतु होत. (५) त्या व्रात्याचा सहावा व्यान तो (ते आर्तवाः) ऋतु-परत्वें उत्पन्न होणारे पदार्थ होत. (६) त्या व्रात्याचा सप्तम व्यान जो तो संवत्सर आहे. (७) त्या व्रात्याच्या (समानं अर्थं) समान अर्थाला (देवः परियन्ति) सर्व देव घेरतात, अनुकूल होतात; (संवत्सरं वै एते ऋतवः अनुपरियन्ति) संवत्सरास हे ऋतु निश्चयपूर्वक अनुकूलतेनें व्यापतात. (व्रात्यं च) व्रात्यासहि घेरतात. (८) त्या व्रात्याचा जे भाव (यत् आदित्यं अभिसंविशन्ति) आदित्यांत प्रविष्ट होतात, (अमावास्यां च एव तत् पौर्णमासीं च) अमावास्या आणि पौर्णिमेंतहि ते असतात. (९)

तस्य व्रात्यस्य । एकं तदेषाममृतत्वमित्याहुतिरेव ॥ १० ॥

[१८]

तस्य व्रात्यस्य ॥ १ ॥
यदस्य दक्षिणमक्ष्यसौ स आदित्यो यदस्य सव्यमक्ष्यसौ स चन्द्रमाः ॥ २ ॥
योऽस्य दक्षिणः कर्णोऽयं सो अग्निर्योऽस्य सव्यः कर्णोऽयं स पवमानः ॥ ३ ॥
अहोरात्रे नासिके दितिश्चादितिश्च शीर्षकपाले संवत्सरः शिरः ॥ ४ ॥
अह्ना प्रत्यङ् व्रात्यो रात्र्या प्राङ् नमो व्रात्याय ॥ ५ ॥

अर्थ— (तस्य व्रात्यस्य) त्या व्रात्याचें (तत् एषां एकं अमृतत्वं) तें या सर्वांचें एक अमरपण आहे (इति एव आहुः) असें म्हणतात. (१०)

[१८] (तस्य व्रात्यस्य) त्या व्रात्याचा (यत् यस्य दक्षिणं अक्षि असौ सः आदित्यः) जो उजवा डोळा आहे तो सूर्य आहे. (यत् अस्य सव्यं अक्षि असौ सः चन्द्रमाः) जो डावा डोळा तो चंद्र होय. (१-२) जो याचा (दक्षिणः कर्णः) उजवा कान आहे. (सः अयं अग्निः) तो अग्नि आहे (यः अस्य सव्यः कर्णः) जो त्याचा डावा कान (सः अयं पवमानः) तो हा पवमान होय. (३) (अहोरात्र नासिके) याचें अहोरात्र हें नाक होय. (दितिः अदितिः च शीर्षकपाले) दिति आणि अदिति या डोक्याच्या दोन बाजू आणि (संवत्सरः शिरः) वर्ष त्याचें डोकें आहे. (४) (व्रात्यः अह्ना) हा व्रात्य दिवसा (प्रत्यङ्) पूर्व दिशेकडे तोंड करून आणि (रात्र्या प्राङ्) रात्रीच्या वेळीं पश्चिमेकडे तोंड करून राहतो. अशा (व्रात्याय नमः) व्रात्यास माझा नमस्कार असो. (५)

व्रात्य नामक अध्यात्म प्रकरणाचा विचार

व्रात्याचा अर्थ

या पंधराव्या कांडांत ' व्रात्याचा ' विचार केला आहे. त्यामुळें या कांडांतील व्रात्याचा अर्थ काय असावा तें नक्की केलें पाहिजे. या व्रात्य शब्दाचा अर्थ पुष्कळ प्रकारें होऊं शकतो.

(१) ' व्रात ' चा अर्थ ' समूह, समाज, संघ, मनुष्य, जनता ' असा आहे. त्याला जें कल्याणकारक (तेभ्यः हितः) त्यास ' व्रात्य ' म्हणतात.

(२) (व्राते भावः व्रात्यः) समूहांत उत्पन्न झालेला, समाजांत ज्याचा जन्म झाला आहे, संघांत, जो रहातो तो.

(३) समूहाचा पालक, पति अथवा स्वामी.

(४) व्रतांसाठीं समर्पित, व्रताचरणांत तत्पर, तपस्वी, नियमानुष्ठानांत तत्पर, व्रती, ब्रह्मचर्य वगैरे व्रतांचें पालन करणारा.

(५) (व्रजति इति व्रात्यः जस्य सः) भ्रमण करणारा, परिव्राजक, संन्यासी, उपदेशक, देशींविदेशीं फिरून धर्मोपदेश करणारा.

याप्रमाणें व्रात्य शब्दाचे वेदांमध्यें अनेक अर्थ आहेत. स्मृतींमध्यें या व्रात्य शब्दाचा अर्थ त्याच्याविरुद्ध आहे. वेदमर्यादा आणि आश्रममर्यादांचें उल्लंघन करणारा तो व्रात्य असें स्मृतिग्रंथांचें म्हणणें आहे. तीनहि वर्णांचीं कर्तव्यें न केल्यामुळें जो पतित झाला आहे, तो व्रात्य असें स्मृतींचें मत आहे. व्रात्यस्तोमानें शुद्धि केल्यानें त्याची शुद्धि होते आणि तो पुनः पुनीत होतो. आणि त्यास द्विजत्व प्राप्त होतें.

वेदांतील व्रात्य शब्द आणि स्मृतींच्या व्रात्य शब्दाच्या अर्थां-

मध्यें एवढें महदंतर आहे. वेदांतील व्रात्याचा अर्थ उत्तम असा आहे. तर स्मृतींतील व्रात्याचा अर्थ अधम आहे. वेदांतील व्रात्य जनतेचें कल्याण करणारा आहे परंतु स्मृतींचा व्रात्य बहिष्कार करण्यास योग्य आहे. शब्दाच्या अर्थांतील एवढी मोठी भिन्नता श्रुति आणि स्मृतींच्या कालामध्यें जो महान् काल व्यतीत झाला, त्याचा पुरावा आहे.

ज्याप्रमाणें ' ब्राह्मण–ब्रुव, क्षत्रिय–ब्रुव ' हे शब्द अधम ब्राह्मण आणि अधम क्षत्रियवाचक आहेत, त्याचप्रकारें (अथर्व. १५। १३।११) ' **अव्रात्य, व्रात्यब्रुव, नामबिभ्रति** ' हे तीन शब्दहि हीनतावाचक आहेत. व्रात्य शब्द धारण करणारे परंतु जे व्रात्य नाहींत; ज्याप्रमाणें आजकाल संन्यासी नांव धारण करणारे साधुसुद्धां अधर्माचरणी असतात त्याचप्रमाणें व्रात्य नाम धारण करणारेहि व्रात्याच्या श्रेष्ठ गुणांनीं रहित मनुष्यें निन्दनीय होत. हा वेदमंत्र (१५।१३।११) स्पष्ट दाखवीत आहे कीं येथें व्रात्य शब्दाचा अर्थ फार पूज्य असा आहे.

व्रात्य ईश्वर

व्रात्य शब्दाचे जे उत्तम अर्थ वर देण्यांत आले आहेत ते पूर्णपणें ईश्वरासच लागू पडतात. परमेश्वर व्राताचा म्हणजे समूहाचा आणि गणांचा स्वामी असल्यानें व्रात्य आहे. संपूर्ण नियमांचें आणि व्रतांचें यथायोग्य पालन करणारा असल्यानेंहि तो व्रात्य आहे. सर्वांचें कल्याण करणारा असल्यामुळें व्रात्य आहे. याप्रमाणें व्रात्य शब्दाचे सर्वच अर्थ ईश्वरांत पूर्णपणें लागू होतात. त्यामुळें या पंधराव्या कांडाच्या पहिल्या पर्यायसूक्तांत या परमेश्वराचें वर्णन व्रात्य शब्दानें केलें आहे.

ईयमानः व्रात्यः प्रजापतिं समैरयत् । (१।१)

' प्रेरक व्रात्यानें प्रजापालक देवाना प्रेरित केलें ' म्हणजे जग निर्माण करण्यास प्रेरणा केली.

सः प्रजापतिः सुवर्णं आत्मानं अपश्यत् तत् प्राजनयत् ॥ (१।२)

' या प्रजापति देवानें उत्तम चमकणाऱ्या रंगाच्या मूळ दैवी प्रकृतिरूपी प्रकृत्यात्म्यास पाहिलें आणि त्यानें सर्व जगत् निर्माण केलें. ' येथें ' सुवर्ण आत्मा ' शब्दानें उत्तम रंगारूपानें युक्त चमकणाऱ्या मूळ प्रकृति अथवा दैवी प्रकृतीचें वर्णन आहे. त्यांत तेज आहे, चमक आहे आणि ही त्रिगुणात्मक प्रकृतीच सर्व जगतास निर्माण करणारी आहे. या जननक्रियेनें एक, ललाम, महत्, ज्येष्ठ, ब्रह्म, तप आणि सत्य ' हे सात पदार्थ उत्पन्न झाले. या सात नांवाप्रमाणेंच ' **भूः, भुवः, स्वः, महः, जनः, तपः, सत्यं** ' हीं सात नांवेंहि तुलनात्मकदृष्टीनें पहाण्यासारखीं आहेत. दोन्हीं स्थळीं ' महत्, तप, सत्य ' हे तीन शब्द समान आहेत. त्यामुळें हीं दोनहि सप्तकें एक दुसऱ्याचें पर्याय असणें संभवनीय आहे. प्रकृतीपासून सृष्टि उत्पन्न झाल्यामुळें सप्तलोक, सप्त भुवन, सप्त धाम इत्यादि जे उत्पन्न झाले यांचे सूचकच हे शब्द आहेत, असें सामान्यपणें वाटतें. साधकानें याचा जास्त विचार करावा. या प्रकारें सर्व भुवनें उत्पन्न झाल्यानंतर त्या प्रेरक देवाचें महत्त्व सर्वांस व्यक्त झालें आणि या कारणानेंच (**सः महादेवः अभवत्**) त्यास महादेव म्हणूं लागले; म्हणजे हा महादेव शब्द दुसऱ्या लहान देवांचा अधिदेव आहे, म्हणजे स्वामी आहे ही गोष्ट येथें आपोआप स्पष्ट झाली. हीच गोष्ट खालील मंत्रांत सुद्धां सांगितली आहे.

स देवानां ईशां पर्यैत् सः ईशानः अभवत् (१।५)

' तो अनेक देवांचा अधिपति ठरल्यामुळें त्यास ईशान म्हणूं लागले. ' येथें देव–महादेव, ईश–ईशान, ईश–ईश्वर इत्यादि शब्दांचा अर्थ स्पष्ट झाला. देव आणि ईश हे लहान अधिपति आहेत आणि महादेव, तसेंच ईशान अथवा ईश्वर हे सर्वतोपरि सर्वांवर अधिकार चालविणाऱ्या सार्वभौम परमात्म्याचे वाचक आहेत. याचप्रमाणें ब्रह्म, आत्मा वगैरे शब्दांचा एकच परमात्मा अर्थ आहे. त्यांतसुद्धां ब्रह्म-परब्रह्म, आत्मा–परमात्मा हे शब्द वर सांगितल्याप्रमाणें लहान मोठ्यांचे वाचक आहेत, यांत शंका नाहीं; परंतु ब्रह्म आणि आत्मा हे शब्द निरनिराळ्या वेळीं दोन्हीं अर्थीं वापरले जातात.

आपल्या शरीराचीच ही गोष्ट पहा. कान, डोळे, नाक वगैरे अवयवांत प्रत्येकीं हजारों कीटाणु आपणांमध्यें ईश आहेत, आपल्या प्रकृतीचे स्वामी आहेत. परंतु या असंख्य कीटाणूंवरहि डोळे, नाक, कान वगैरे इंद्रियांत रहाणारा, या सर्व इंद्रियांचा अधिष्ठाता देव आहे. अर्थात् तो या सूक्ष्म कीटाणूंपेक्षां मोठा ईश्वर आहे. त्यानंतर प्रत्येक इंद्रियांत एक एक देवतेचा अंश आहे आणि इंद्रियांमध्यें असणाऱ्या या देवतांवर जीवात्म्याचें प्रभुत्व आहे. त्यामुळें येथें इंद्रियांचा अधिपति ' देव ' आहे आणि जीवात्मा ' महादेव ' आहे. लहान मोठा हा भेद असल्यानें एक देव आहे, दुसरा महादेव आहे. तो त्याच्यापेक्षां श्रेष्ठ असणाऱ्या देवापेक्षां लहान देव आहे. जर पायरी पायरीनें उच्च कोटींत गेलों तर अंतिम स्थितींत परमात्मा सर्वांचा महादेव आहे. याप्रमाणें देव आणि महादेव यांचा विचार तुलनात्मक दृष्टीनें समजण्याजोगा आहे. ही गोष्ट आणखी जरा स्पष्ट करूं.

देव		महादेव	
ईश		ईशान	
आत्मा		परमात्मा	
ब्रह्म		परब्रह्म	
इन्द्र		महेन्द्र	
ईश		ईश्वर	
कीटाणु	(देव)	इंद्रियाधिपति	(महादेव)
इंद्रियाधिपति	(देव)	जीवात्मा	(महादेव)
जीवात्मा	(देव)	राजा	(महादेव)
राजा	(देव)	सम्राट्	(महादेव)
ग्रामपति	(देव)	प्रान्तपति	(महादेव)
राष्ट्रपति	(देव)	जगत्पति	(महादेव)
चंद्रादि ग्रह	(देव)	सूर्य	(महादेव)
तारागण	(देव)	विराट्	(महादेव)

अशा प्रकारें पूर्वापरसंबंधानें एक देव आणि दुसरा महादेव दोघेहि आहेत. अंतीं सर्व चराचराचा हा परमात्मा निश्चयपूर्वक एकच महादेव आहे आणि हाच प्रथम पर्याय सूक्ताचा प्रेरक म्हणून प्रथम मंत्रांत वर्णिला आहे. तो एकच आहे त्यामुळें त्यास ' एक व्रात्य ' अर्थात् एकमात्र परमेश्वर अथवा सर्वांचा नियंता म्हटलें आहे. तो सर्वांचा शासक आहे. त्याचें धनुष्य अप्रतिहत आहे. तेंच (इन्द्र धनुः) प्रभूचें धनुष्य असें आहे कीं (द्विषन्तं विध्यति) या धनुष्यानें विद्वेषी लोकांचा पूर्ण नाश होतो. परमेश्वराचें शासन सर्वतोपरि आहे, आणि या शासनानें हिंसकांचा नाश होतो आणि सज्जनांचें रक्षण होतें, म्हणून या एकदेवाची उपासना सर्वांनीं केली पाहिजे. हा उपदेश प्रथम पर्यायसूक्तांत केला आहे.

त्यानंतर ब्रह्मचाऱ्याचें वर्णन आहे. आतां त्याचा आपण विचार करूं—

ब्राह्मण विभाग
व्रात्य ब्रह्मचारी

'ब्रह्मचारी' तो आहे कीं जो ब्रह्मयाप्रमाणें आचरण करतो, अथवा स्वतः ब्रह्मस्वरूप होण्यासाठीं व्रताचरण करतो. ब्रह्मयाचें आचरण कसें असतें ? त्याविषयीं वर्णन प्रारंभींच्या पर्यायसूक्तांत उत्तम रीतीनें केलें आहे. ब्रह्मचारी असा होऊं इच्छितो आणि जो ब्रह्मचारी तसा सद्गुणैश्वर्यसंपन्न असतो त्याची योग्यता विशेषच आहे.

ज्यावेळीं असा ब्रह्मचारी पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर दिशांस, देशदेशांतरांतून भ्रमण करतो, लोकांस धर्म आणि सदाचाराचे संदेश ऐकवतो, लोकांचें भलें करण्यासाठीं आत्मसमर्पण करतो, तेव्हां जगांतील सर्व देव, सूर्य, चंद्र, विश्वेदेव, वरुण, सप्तर्षि इत्यादि सर्व त्यास सहाय्य करतात. वेदाचे रथान्तरादि सर्व प्रभावशाली मंत्र ज्ञानविज्ञानासहित त्याच्या अंतरांत स्फुरित होतात. त्याच्या सहाय्यार्थ प्रगट होतात. जी श्रद्धा त्याची धर्मपत्नी आहे ती नित्य त्याच्या आज्ञेप्रमाणें वागण्यास तत्पर असते. उषःकालीही त्या धर्मपत्नीसह मोठ्या श्रद्धेनें तो उपासना करतो. इरा म्हणजे वाणी ही त्या श्रद्धेची अनुसारिणी होते. ज्याप्रमाणें वीज मेघांत शोभते त्याप्रमाणें त्याची सुसंस्कृत वाणी उषःकालाच्या वेळीं श्रद्धेनें युक्त होऊन त्याची शोभा वाढविते.

त्याचा मित्र वेदमंत्ररूपी (मागध) स्तुतिपाठक आहे. अर्थात् तो जर कोणाची स्तुति करीत असला तर ती केवळ सर्वांच्या मित्ररूप परमेश्वराची स्तुति वेदमंत्रद्वारा करतो. कोणत्याहि लोभांत तो पडत नाहीं. कोणत्याहि मर्त्याची प्रशंसा तो कधींच करीत नाहीं. वेदमंत्राच्या उपदेशाची सत्यता पाहून त्यास आश्चर्यदर्शक (हसः) हंसूं येतें. त्या दिव्य हास्यांत तो मस्त रहातो, आणि जेव्हां तो लोकांस उपदेश करतो, वेदमंत्रांची व्याख्या करतो, तेव्हां असें प्रतीत होतें कीं मेघगर्जना (स्तनयित्नुः) होऊन अमृताप्रमाणें वेदोपदेशाचा पाऊस जणूं काय पडत आहे.

वस्त्र (वासः) शरीराची लज्जा निवारणासाठीं असतें. त्याचें शरीर, इंद्रियें, मन आणि बुद्धीची लज्जा निवारण करण्यासाठीं त्याचें वस्त्र (विज्ञान) ज्ञान आणि विज्ञानाचा बोध आणि प्रतिबोध होय. हें विज्ञानरूपीं वस्त्र परिधान केलेला तो ब्रह्मचारी इतर वस्त्रभूषणांपेक्षां जास्त सुशोभित दिसतो; कारण ज्ञान आणि विज्ञानच मनुष्याचें खरें आणि उत्तम भूषण आहेत.

दिवस त्याच्या डोक्याचें वस्त्र म्हणजे पागोटें आहे. आणि रात्रीचा काळा रंग त्याचे केस आहेत. सूर्यकिरणें त्याचीं कुंडलें आहेत. आकाशांतील तारागण त्याचे मणि आहेत; म्हणजे त्याची शोभा वाढविणारीं हीं सर्व आभूषणें आणि जडजवाहिर आहेत. याप्रमाणें हा ब्रह्मचारी निसर्गद्वारा स्वतःचीं आभूषणें सजवितो. सोन्याचांदीचे दागिने मनुष्यास भूषणरूप होत नाहींत. जो विज्ञानात्मा पुरुष आहे त्याचीं हींच निसर्गाचीं भूषणें असतात. निसर्गनियमांनीं युक्त जीवन व्यतीत करणारा ब्रह्मचारी असतो, त्यामुळेंच नैसर्गिक पदार्थ त्याचीं भूषणें होतात आणि त्याची शोभा वाढवितात.

भूतकालाचा इतिहास आणि भविष्यकाळची उन्नतीची योजना (भूतं भविष्यत् च) हे त्याचे दोन रक्षक आहेत. त्यांच्यामुळें सुरक्षित झालेला तो स्वतःचें प्रचारकार्य करीत जातो. याचप्रमाणें अमावास्या आणि पूर्णिमा, म्हणजेच महिन्याचे कृष्ण

आणि शुक्लपक्ष, दिवस आणि रात्र, हे अहोरात्रीचे दोन विभाग, तसेंच (**श्रुतं विश्रुतं**) ज्ञान आणि विज्ञान, ऐकलेला उपदेश आणि त्याच्या मननानें प्राप्त झालेलें विज्ञान हे सुद्धां सर्व त्याचे रक्षक म्हणजे रक्षण करणारे आहेत. हा ब्रह्मचारी जो उपदेश करतो त्याचा आधार ' भूत ' काळच्या इतिहासांत असतो, आणि त्याचा हा उपदेश ऐकण्यास येणाऱ्या श्रोत्यांच्या मनांत भविष्यकाळाच्या मोठमोठ्या आशा, स्वतःच्या उन्नतीसंबंधींच्या आकांक्षा उत्पन्न होतात. त्यामुळें श्रोत्यांची क्रमानें उन्नति होते. दिवसरात्रीचा कार्यक्रम, पूर्व आणि उत्तरपक्षाचा कार्यक्रम त्याच्या उपदेशानें निश्चित होतो. याप्रमाणें (**श्रुत**) ज्ञान आणि (**विश्रुत**) विज्ञानानें हा ब्रह्मचारी सर्वांची उन्नति करतो.

मनुष्य ' मनोरथ ' करीत असतो. हे त्याच्या ' मना ' चेच ' रथ ' असतात. कित्येकांस हवेंत किल्ले बांधण्याची संवय (**मनोराज्य**) असते. त्याप्रमाणें हा ब्रह्मचारीसुद्धां (**मनः विपथं**) मनाचे रथ दवडवीत असतो. त्यांत तो बसतो, मनानेंच रथ करतो, मनानें त्यांत बसतो, मनानें त्यांत सफर करतो. त्याच्या मनोरथाचे (**मातरिश्वा पवमानः च**) श्वास आणि उच्छ्वास हे दोन घोडे आहेत. जे साधक प्राणायाम करीत असतील त्यांस हें माहित असेल कीं प्राणाची स्थिरता मनाच्या स्थिरतेवर अवलंबून असते. कारण कीं मनाचे घोडे प्राण आहेत; म्हणजेच मनोरथाचे घोडे प्राणच आहेत. हे घोडे स्थिर राहिले तर रथ स्थिर राहील आणि घोडे जर चालूं लागले तर रथसुद्धां चालूं लागेल. प्राण आणि मनाचा संबंध नित्य आहे ही गुप्त गोष्ट येथें अलंकारिकपणें सांगितली आहे. प्राण चंचल असले तर कोणीहि मनुष्य मनास शांत ठेवूं शकत नाहीं.

अशाप्रकारच्या सुयोग्य ब्रह्मचाऱ्यास कीर्ति आणि यश प्राप्त होतात. कीर्ति आणि यशाची गुरुकिल्ली या सदाचारांत आहे. त्याच्यी योग्यतेवर त्याचें यश अवलंबून आहे. जो कोणी आपली योग्यता या ब्रह्मचाऱ्यासारखी बनवितो तोहि त्याच्यासारखाच कीर्तिमान् आणि यशस्वी होतो. हा सर्व उपदेश साधकास द्वितीय पर्यायसूक्तांत पहावयास सांपडतो.

ब्रह्मचाऱ्याचें आसन

ब्रह्मचारी एक वर्षभर तपश्चर्या करतो. तो उभा राहून तपश्चर्या करतो. त्याची ही तपश्चर्या पाहून इतरांस कष्ट होतात, म्हणून ते त्यास बसण्यास चौरंग देतात. परंतु ज्या चौरंगावर ब्रह्मचारी बसतो तो ज्ञानरूपी चौरंग आहे. लाकडाचा चौरंग त्यास पसंत पडत नाहीं.

या ब्रह्मचाऱ्याच्या चौरंगाचे चार पाय वसंत, ग्रीष्म, वर्षा आणि शरद् हे चार ऋतु आहेत; म्हणजे या ऋतूंवर तो रहातो. बृहत्, रथंतर वगैरे साम या चौरंगाचे पडदे आहेत. या चौरंगावर गादी आंथरलेली नाहीं. त्याच्या कपड्याचे आडवे उभे तंतु ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेदाचे मंत्र आहेत; म्हणजेच वेदज्ञानाच्या गादीवर तो आरूढ होतो. या ज्ञानमय सिंहासनावर तो विराजमान् होतो, त्यावेळीं सर्व देव त्याचे रक्षक बनतात आणि स्वतःच्या विविध शक्तींनें त्याच्या चौफेर उभे राहून त्याचें रक्षण करतात.

ज्या ज्ञानाच्या अचल आधारानें तो उभा आहे त्याची योग्यता अशीच विशेष आहे. हा उपदेश तिसऱ्या पर्यायसूक्तांत दिला आहे.

रक्षक ऋतु आणि देव

पुढच्या चौथ्या पर्यायसूक्तांत सांगितलें आहे कीं सहा ऋतु आणि त्यांचे बारा महिने त्याचे (**गोप्तारो**) रक्षक होतात; म्हणजे या सर्व महिन्यांत त्याचें रक्षण केलें जातें.

त्यानंतर पांचव्या पर्यायसूक्तांत सांगितलें आहे कीं सर्व दिशा आणि अन्तर्दिशामध्यें भव, शर्व, पशुपति, उग्रदेव, रुद्र, महादेव आणि ईशान हे सात देव स्वतःचे धनुष्यबाण हातांत धारण करून त्याचे अनुयायी होतात आणि त्याचें रक्षण करतात. साधकानें असें समजूं नये कीं हीं सात भिन्न देवांचीं नांवें आहेत. हीं सर्व ईशानाचींच नांवें आहेत. ईशानच असा एक देव आहे कीं, ज्याचीं गुणधर्मबोधक हीं सात नांवें आहेत. हा एकच देव सर्वांचा ईश अथवा स्वामी आहे, त्यामुळेंच त्यास ' ईशान ' म्हटलें आहे. त्याच्या ताब्यांत अनंत देव आहेत. तो त्या सर्व देवांचा मुख्य अधिष्ठाता असल्यामुळें त्यास ' महादेव ' म्हणतात. हा ईश्वरच सर्व पाप्यांना योग्य दंड देऊन रडवितो. त्यामुळें त्यास रुद्र म्हणतात. पाप्यांनाच तो रुद्र भयंकर ' उग्र ' वीरभद्र प्रतीत होतो. त्याच्याजवळ अतुल पाशवी शक्ति आहे; अथवा तो सर्व जीवांचा पालक आहे म्हणून त्यास ' पशुपति ' म्हणतात. तो अत्यंत गतिमान् आणि प्रचंड वेगवान् असल्यानें त्याला ' शर्व ' (**शर्वति गच्छति**) असेंहि म्हणतात. तो सर्व जगास भूति आणि ऐश्वर्य प्रदान करतो म्हणून त्यास भवसुद्धां म्हणतात. याप्रमाणें उपरोक्त सात शब्द एकाच देवाचे द्योतक आहेत. हा एकच देव सात कामें करतो. त्यामुळें त्यास सात निरनिराळीं नांवें देण्यांत आलीं आहेत. या सर्वांचा देवाधिदेव हा या ब्रह्मचाऱ्याचा साथी, मित्र, रक्षक आणि अनुयायी होतो.

देवांचें साहाय्य

नंतरच्या सहाव्या पर्यायसूक्तांत या ब्रह्मचाऱ्यास सर्व देवतांचें सहाय्य मिळतें असें वर्णन आहे. पृथ्वीवर त्याला भूमि, अग्नि, औषधि,

वनस्पति, वृक्ष वगैरे सहाय्यक होतात. ऊर्ध्व भागांत सूर्य, चंद्र, नक्षत्र, मेघोदक आणि वायु सहाय्यक होतात. उत्तम ज्ञानक्षेत्रांत ऋचा, यजु, साम आणि ब्रह्म म्हणजे अथर्व या वेदांचे मंत्र सहाय्य देतात. इतिहासामध्यें इतिहास, पुराणें, गाथा, नाराशंसी त्यास अनुकूल होतात. यज्ञक्षेत्रांत आहवनीय, गार्हपत्य वगैरे यज्ञ त्यास सहाय्य देतात. कालक्षेत्रांत ऋतु, महिने, पक्ष, अहोरात्र हे त्याचे सहाय्यक होतात. अध्यात्मिक क्षेत्रांत जेव्हां त्याची प्रगति होते तेव्हां तेथें (**अदिति**) मूळ प्रकृति, (**दिति**) प्रकृतीची विकृति, (**इन्द्राणी**) इंद्राची म्हणजे आत्म्याची शक्ति, (**इडा**) वाणी वगैरेंचें सहाय्य होतें; आणि या क्षेत्रांत त्यास एवढा मोठा आनंद प्राप्त होतो की त्यामुळें तृप्ति मिळवून तो (**न अवत्स्यन् इति अमन्यत**) येथून मी परत फिरणारच नाहीं असें तो मानतो. इतकी तल्लीनता त्याला त्यांत प्राप्त होते. पूर्वी सर्व देव त्यास सहाय्य देतात आणि नंतर तो सर्वांचें प्रियधाम होतो.

सातव्या पर्यायसूक्तांत सांगितलें आहे की, अशी पूर्णावस्था प्राप्त झाल्यानंतर त्याला उत्तम श्रद्धा स्वानुभवानें प्राप्त होते. त्यानंतर या अनुभवास तो कधीं विसरत नाहीं. येथें त्यास पूर्ण ब्रह्मावस्था प्राप्त होते व हाच खरा ब्राह्मण होय.

क्षत्रिय विभाग–वैदिक राज्य

क्षत्रियसुद्धां ब्रह्मचर्याचें पालन करून उत्तम क्षत्रिय होतो. त्यास राजन्य अशासाठीं म्हटलें जातें की (**सः अरज्यत**) तो लोकांचें रंजन करतो. लोकांस प्रसन्न करतो, जनतेस सुरक्षित ठेवतो. सर्व प्रजाजनांचें रक्षण करण्यामुळें त्याला सर्व प्रकारच्या खानपान इत्यादि भोगांची प्राप्ति होते. सर्व लोक त्याचे अनुयायी होतात. हा विषय आठव्या पर्यायसूक्तांत सांगितला आहे; आणि नंतर नवव्या पर्यायसूक्तांत राजप्रकरणाचा उपदेश केला आहे.

(**सः विशः अनुव्यचलन्**) तो क्षत्रिय राजा ब्रह्मचर्याचें पालन करून नंतर सिंहासनावर आरूढ होऊन प्रजेच्या मतानुसार हा राज्यशासन चालविण्यास सुरवात करतो. राजा प्रजामताप्रमाणें चालणारा असल्यानें त्या राजाला (**सभा**) ग्रामसभा आणि (**समिति**) राष्ट्रीय महापरिषद् (**सेना**) चतुरंग सैन्य आणि (**सुरा**) ऐश्वर्य, धनकोश त्याला अनुकूल होतात; म्हणजे जो राजा प्रजेच्या मतांना अनुसरणारा असत नाहीं त्याला त्यांची अनुकूलता मिळत नाहीं. याचा सरळ अर्थ असा की राजाचा अधिकार प्रजेची सेना, सभा आणि धनकोश यांच्यावर नाहीं. त्यामुळें जर प्रजा प्रसन्न असली तरच त्यांची अनुकूलता प्राप्त होईल. नाहीं तर नाहीं.

*

वैदिक स्वराज्याचा हा अर्थ आहे, हा आदर्श आहे. पूर्ण स्वराज्य यालाच म्हणतात. ज्या राज्यव्यवस्थेंत प्रजेचें अनुरंजन करणारा राजाच राज्यगादीवर टिकूं शकतो, आणि प्रजेस दुःख देणाऱ्यास राष्ट्रांतूनसुद्धां पदच्युत करण्यांत येतें, आणि ज्या शासनसंस्थेंत, धनकोश, सेना आणि राष्ट्रसभा प्रजामताच्या आधीन असते त्यासच ' वैदिक स्वराज्यशासन ' म्हणतां येईल. त्यापेक्षां दुसरें कोणतेंहि भिन्न अनुशासन आसुरीशासन समजलें पाहिजे.

अतिथि सत्कार

पुढें दहा, अकरा, बारा आणि तेरा या पर्यायसूक्तांत अतिथि सत्काराचा महत्त्वपूर्ण विषय चर्चिला आहे. येथें असें सांगितलें आहे की ज्याच्या घरीं अतिथि येईल त्या गृहस्थानें असें समजावें की, (**एनं आत्मानः श्रेयांसं मानयेत्**) तो आपणापेक्षां पुष्कळच श्रेष्ठ आहे आणि त्याचा सत्कार केल्यानें स्वतःचें निःसंदेह कल्याण होणारच आहे; म्हणजे या भावनेनें गृहस्थानें अतिथीचा पुष्कळच सत्कार केला पाहिजे. ब्राह्मण प्रत्यक्ष बृहस्पति आहे आणि क्षत्रिय (**आदित्यः**) सूर्य अथवा इंद्राची मूर्ति आहे. यांपैकीं जर कोणी कोणा गृहस्थाच्या घरीं अतिथिरूपानें आला तर तें त्या गृहस्थाचें महद्भाग्य समजलें पाहिजे. अतिथि घरीं आला तर त्याचा सत्कार या प्रकारें केला पाहिजे—

१ (**व्रात्य क्व अवात्सीः**) ब्रह्मचारी, आपण कुठले रहिवासी आहांत ?

२ (**व्रात्य उदकं**) हे ब्रह्मचारी, आपणांसाठीं हें जल आणलें आहे, त्याचा स्वीकार करावा.

३ (**तर्पयन्तु**) हे अतिथि ! माझे लोक आपणांस तृप्ति देवोत.

४ (**व्रात्य, यथा ते प्रियं तथा अस्तु**) हे विद्वान् जें आपणांस प्रिय तेंच होवो. तेंच करण्यांत येईल.

५ (**यथा ते वशः तथा अस्तु**) जशी आपली इच्छा तसेंच होवो.

६ (**यथा ते निकामः तथा अस्तु**) जी आपली मनकामना तसें होवो. त्याप्रमाणें आम्हीं वागूं.

जर गृहस्थाच्या घरीं अग्निहोत्राच्या समयीं अतिथि आला अथवा अतिथि आल्यानंतर अग्निहोत्राची वेळ झाली तर त्या अतिथीची अनुज्ञा घेऊन अग्निहोत्र करावें. जर अतिथीनें आज्ञा दिली तर अग्निहोत्र करावें. त्यानें आज्ञा न दिल्यास करूं नये. जर एखादा गृहस्थ अतिथीच्या आज्ञेविरुद्ध अग्निहोत्र करील तर त्याचें तें हवन व्यर्थ जातें. (पर्यायसूक्त १२ पहा).

अतिथि पुष्कळ दिवस घरीं राहिला आणि त्याची सेवा उत्तम

रीतीनें करण्यांत आली तर त्या गृहस्थास मोठें पुण्यफल लाभतें.

जर अतिथिरूपानें कोणी अज्ञानी मनुष्य आला असला तरी त्याच्या ठिकाणीं आपल्या उपास्य देवतेची कल्पना करून आणि सर्व भाग त्या देवतेला समर्पण करण्याच्या इच्छेनें त्या अतिथीला अर्पण करावा. येथें तेरावें पर्यायसूक्त समाप्त होतें.

अतिथीचें स्वरूप

(**शर्धः**) बलस्वरूप, (**इन्द्रः**) शत्रूंचें निर्दालन करणारा, (**वरुणः**) वरिष्ठ देव, (**सोमः**) शान्तरूप, (**विष्णुः**) सर्वत्र भ्रमण करणारा, (**रुद्रः**) शत्रूंस रडविणारा, (**यमः**) नियामक, प्रजेस नियमांत ठेवणारा, (**अग्निः**) तेजस्वी, (**बृहस्पतिः**) ज्ञानवान्, (**ईशानः**) स्वामी, (**प्रजापतिः**) प्रजापालक, (**परमेष्ठी**) परम उच्च पदावर विराजमान् होण्यास योग्य अतिथि आहे. सुयोग्य अतिथींत हे सर्व गुण असल्याकारणानें अतिथीस हीं नांवें प्राप्त होतात–जणूं काय या सर्व देवांचें अंश अतिथींत एकत्रित झाले आहेत.

हें वर्णन १४ व्या पर्यायसूक्तांत आहे. त्यानंतर पंधराव्या पर्यायसूक्तांत त्याच्या प्राणांचें वर्णन आहे. या अतिथींत सात प्राण आहेत. अग्नि, आदित्य, चंद्र, वायु, जल, पशु आणि प्रजा या सात देवता त्याच्या सात प्राणांत निवास करतात. सात प्राण हे सात इंद्रियांत रहाणाऱ्या सात महान् शक्ति आहेत.

नंतर सोळाव्या पर्यायसूक्तांत अतिथीच्या सात अपानांचें वर्णन आहे. पूर्णिमा, अष्टका, अमावास्या, श्रद्धा, दीक्षा, यज्ञ आणि दक्षिणा या सात त्याच्या अपानांत रहातात. मनुष्याचीं सर्व दुःखें दूर करणाऱ्या शक्तीचें नांव (**सर्वं दुःखं अपानयति इति अपानः**) अपान आहे. या साती श्रद्धा, दीक्षा इत्यादि मनुष्याचीं दुःखें दूर करतात, म्हणून त्यांचें नांव अपान असें ठेविलें आहे.

यापुढें सतराव्या पर्यायसूक्तांत अतिथीचे सात व्यान–भूमि, द्यौ, अंतरिक्ष, नक्षत्र, ऋतु, ऋतूद्भव पदार्थ, संवत्सररूप आहेत असें वर्णन आहे, आणि अठराव्या पर्यायसूक्तांत, अतिथीचे डोळे सूर्य आणि चंद्र, कान अग्नि आणि वायु, नाक अहोरात्र, शीर्ष कपाळ, दिति–अदिति आणि संवत्सर त्याचें मस्तक आहे.

अशा प्रकारचा पूज्य व्रात्य सर्वांस नमन करण्यायोग्य आहे.

या प्रकरणांत जें अतिथीचें स्वरूप वर्णन करण्यांत आलें आहे तें बरोबर ध्यानांत येत नाहीं. तरीसुद्धां आहे त्या वर्णनानें एवढें तर प्रतीत होतें कीं अतिथि सर्व देवतास्वरूप असल्यानें परमपूज्य आहे.

या पंधराव्या कांडांत अतिथि सत्कारचा विषय आहे. प्रत्येक गृहस्थाचा हा धर्म आहे, म्हणून या कांडाचा विचार प्रत्येक गृहस्थानें करणें आवश्यक आहे.

जातवेदाः

कांड १९, सूक्त ३

(ऋषिः– अथर्वाङ्गिराः । देवता– अग्निः)

दिवस्पृथिव्याः पर्यन्तरिक्षाद्वनस्पतिभ्यो अध्योषधीभ्यः ।
यत्रयत्र विभृतो जातवेदास्ततं स्तुतो जुषमाणो न एहि ॥ १ ॥
यस्ते अप्सु महिमा यो वनेषु य ओषधीषु पशुष्वप्स्व१न्तः ।
अग्ने सर्वास्तन्व१ः सं रभस्व ताभिर्न एहि द्रविणोदा अजस्रः ॥ २ ॥

अर्थ— (**दिवः**) द्युलोकांपासून (**पृथिव्याः**) पृथ्वीवरून, (**अन्तरिक्षात् परि**) अंतरिक्षांतून, (**वनस्पतिभ्यः ओषधिभ्यः**) वनस्पति आणि औषधींपासून, (**यत्रयत्र जातवेदाः विभृतः**) जेथें जेथें अग्नि भरलेला आहे, (**ततः स्तुतः**) तेथून प्रशंसा पावून (**जुषाणः**) सेवन करण्यालायक होऊन (**नः एहि**) आमच्याजवळ येवो. (१)

हे अग्नि ! (**यः ते अप्सु महिमा**) तुझें जें महात्म्य पाण्यांत आहे, (**यः वनेषु**) जें वनांत आहे, (**सर्वाः तन्वः संरभस्व**) तुझी तीं सर्व शरीरें उत्तम रीतीनें एकत्रित करून (**ताभिः नः एहि**) त्या सर्वांसह आमच्याजवळ ये आणि आमच्यासाठीं (**द्रविणोदाः अजस्रः**) धन देणारा अविनाशी हो. (२)

यस्ते देवेषु महिमा स्वर्गो या ते तनूः पितृष्वाविवेश ।
पुष्टिर्या ते मनुष्येषु पप्रथेऽग्ने तया रयिमस्मासु धेहि ॥ ३ ॥
श्रुत्कर्णाय कवये वेद्याय वचोभिर्वाकैरुप यामि रातिम् ।
यतो भयमभयं तन्नो अस्त्वव देवानां यज हेडो अग्ने ॥ ४ ॥

अर्थ—(यः ते देवेषु स्वर्गः महिमा) तुझें जें महात्म्य देवांना सुख देणारें आहे, (या ते तनू पितृषु आविवेश) तुझें जें शरीर पितरांत-पालकांत राहिलें आहे (या ते पुष्टिः मनुष्येषु पप्रथे) तुझी जी पोषक शक्ति मानवांमध्यें पसरलेली आहे, हे अग्नि ! (तया अस्मासु रयिं धेहि) तिच्या सहाय्यानें आम्हांमध्यें धन प्रस्थापित कर. (३)

(श्रुत्कर्णाय कवये वेद्याय) ज्याचे कान ऐकणारे आहेत, जे कवि आणि जाणण्यास योग्य आहेत त्यांच्याजवळ (वचोभिः वाकैः) शब्द आणि वाक्यांनीं (रातिं उपयामि) दान मागतों. (यतः भयं) जेथून भय उत्पन्न होण्याचा संभव आहे, (तत् नः अभयं अस्तु) तेथून आम्हांस अभय असो. हे अग्नि ! (देवानां हेडः यज) देवांचा क्रोध शांत कर. (४)

भावार्थ— या सर्व स्थळीं अग्नि आहे. द्युलोकांत सूर्य, अंतरिक्षांत विद्युत्, पृथ्वीवर आगीच्या रूपानें, औषधि, वनस्पति, वगैरे मध्यें अनेक रूपांनीं अग्नि राहतो. तो आमचा सहायक होवो.

[श्रुत्कर्णः— प्रार्थना करणाऱ्यांचें बोलणें ऐकणारा. कविः— ज्ञानी. वेद्यः— जाणण्यास योग्य. उपासक स्वतःच्या भाषणांनीं दान मागतो. जेथून भयाची शक्यता आहे तेथून निर्भयता प्राप्त होवो, तेथून भय दूर होवो, देवांचा क्रोध आपणावर न व्हावा असें आपलें आचरण असावें.]

जगताचा राजा

कांड १९, सूक्त ५

(ऋषिः- अथर्वाङ्गिराः । देवता- इंद्रः)

इन्द्रो राजा जगतश्चर्षणीनामधि क्षमि विषुरूपं यदस्ति ।
ततो ददाति दाशुषे वसूनि चोदद्राध उपस्तुतश्चिदर्वाक् ॥ १ ॥

अर्थ— (इन्द्रः) इंद्र प्रभु (जगतः चर्षणीनां) पशुपक्षी इत्यादि जगांतील मनुष्यांचे (अधि क्षमि विषुरूपं यद् अस्ति) पृथ्वीवर जे कांहीं अनेक रंगरूपाचे पदार्थ आहेत त्या सर्वांचा (राजा) एक अद्वितीय राजा आहे. (ततः दाशुषे वसूनि ददाति) तेथून तो दात्यांना अनेक प्रकारचें धन देतो. (उपस्तुतः चित्) त्याची स्तुति करण्यामुळें (अर्वाक् राधः चोदत्) तो येथें धन पाठवितो. (१)

भावार्थः— स्थावर जंगमांचा एक अद्वितीय राजा परमेश्वरच आहे. ज्या कांहीं वस्तुमात्र येथें आहेत, त्यांच्यावर त्याचा अधिकार आहे. तो दात्यास धन देतो स्तुति करणाऱ्याकडे धन पाठवितो. त्याचे गुण जाणण्यानें मनुष्याची उन्नति होते.

जगताचा मूळ पुरुष

कांड १९ सूक्त ६

(ऋषिः- नारायणः । देवता- पुरुषः)

सहस्रबाहुः पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् । स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशाङ्गुलम् ॥ १ ॥
त्रिभिः पद्भिर्द्यामरोहत्पादस्येहाभवत्पुनः । तथा व्यक्रामद्विष्वङशनानशने अनु ॥ २ ॥
तावन्तो अस्य महिमानस्ततो ज्यायांश्च पूरुषः । पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ॥३॥
पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भाव्यम् । उतामृतत्वस्येश्वरो यदन्येनाभवत्सह ॥ ४ ॥
यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् । मुखं किमस्य किं बाहू किमूरू पादा उच्येते ॥ ५ ॥
ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्योऽभवत् । मध्यं तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥ ६ ॥

अर्थ— (**सहस्र बाहुः**) हजार हातांचा (**सहस्र अक्षः**) हजार डोळ्यांचा (**सहस्र पाद्**) हजार पायांचा एक (**पुरुषः**) पुरुष आहे. (**स भूमिं विश्वतो वृत्वा**) तो भूमीस चारी बाजूंनीं घेरून (**दशांगुलं अत्यतिष्ठत्**) विश्वास व्यापून दहा आंगूळें उरला आहे. (१)

(**त्रिभिः पद्भिः द्यां अरोहत्**) तीन अंशांनीं द्युलोकावर चढतो आणि (**अस्य पात् इह पुनः पुनः अभवत्**) त्याचा एक अंश पुनः पुनः येथें जन्मतो (**तथा विष्वङ् अशन-अनशने अनुव्यक्रामत्**) त्याचप्रमाणें चारी बाजूंनीं खाणारा आणि न खाणारा चेतन आणि जडरूपानें व्यापून राहिला आहे. (२)

(**तावन्तः अस्य महिमानः**) त्याचा एवढा महिमा आहे, तो (**ततो ज्यायान् च पुरुषः**) पुरुष त्याच्यापेक्षांहि महान् आहे. (**अस्य पादः विश्वा भूतानि**) त्याचा एक अंश तीं हीं सर्व भूतमात्रें होत आणि (**अस्य त्रिपाद् दिवि अमृतं**) त्याचे तीन अंश द्युलोकांत अमर आहेत. (३)

(**यद् भूतं यच्च भाव्यं**) जें झालें आहे आणि जें व्हावयाचें आहे, (**इदं सर्वं पुरुष एव**) तें सर्व पुरुषच आहे. (**उत अमृतत्वस्य ईश्वरः**) आणि त्या अमरपणाचा स्वामी आहे. (**यत् अन्येन सह अभवत्**) जो दुसऱ्यासह जडासह असतो. (४)

(**यत् पुरुषं व्यदधुः**) जे विद्वान् लोक या पुरुषाचें वर्णन करतात, त्यांना त्याची (**कतिधा व्यकल्पयन्**) कितीप्रकारें कल्पना केली आहे ? (**अस्य मुखं किं**) त्याचें मुख कोठें आहे ? (**किं बाहू**) त्याचे बाहू कोण आहेत ? (**किं ऊरू**) त्याच्या मांड्या कोणत्या ? आणि (**पादा उच्येते**) त्याचे पाय कोणास म्हणण्यांत येतें ? (५)

(**अस्य मुखं ब्राह्मणः**) या पुरुषाचें मुख ब्राह्मण-ज्ञानी आहेत, (**राजन्यः बाहू अभवत्**) क्षत्रिय त्याचे बाहू झाले (**मध्यं तत् अस्य यत् वैश्यः**) त्याचा मध्यभाग वैश्य झाला आहे, (**पद्भ्यां शूद्रः अजायत**) त्याचे पाय शूद्र झाले आहेत. (६)

भावार्थ— हजारों मनुष्यांचे हात, पाय, डोळे इत्यादि ज्याचे अवयव आहेत, असा मानव समाजरूपी विराट् पृथ्वीवर चौफेर पसरलेला आहे. सर्व मानवांचे सर्व अवयव त्याचे अवयव आहेत. ज्याचें रूप दश अंगुळें आहे असा तो विश्व व्यापून राहिला आहे. पृथ्वीवर सर्वत्र जे मानवसमाज आहेत ते मिळून हा एक पुरुष झाला आहे. (१)

त्याचे तीन अंश द्युलोकास व्यापून राहिले आहेत आणि एक अंश येथें जड आणि चैतन्यरूपांत दिसत आहे. तो येथें वारंवार जन्म घेतो. (२)

जो भूतकाळीं झाला आणि जो भविष्यकाळीं होणार आहे तो सर्व हा एकच पुरुष आहे. जगासह रहाणारा तो अमरत्वाचा स्वामी आहे. तो जडासह रहातो. (४)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र त्या पुरुषाचे मुख, बाहू, मध्यभाग आणि पाय आहेत. म्हणजे चारी वर्ण या पुरुषाचीं चार अंगें आहेत. (६)

|| ७ ||
चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत । मुखादिन्द्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ||८||
नाभ्या आसीदन्तरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत । पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ अकल्पयन् || ९ ||
विराडग्रे समभवद्विराजो अधि पूरुषः । स जातो अत्यरिच्यत पश्चाद्भूमिमथो पुरः || १० ||
यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत । वसन्तो अस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्मः शरद्धविः || ११ ||
तं यज्ञं प्रावृषा प्रौक्षन्पुरुषं जातमग्रशः । तेन देवा अयजन्त साध्या वसवश्च ये || १२ ||
तस्मादश्वा अजायन्त ये च के चोभयादतः । गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः || १३ ||
तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे । छन्दांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत || १४ ||
तस्माद्यज्ञात्सर्वहुतः संभृतं पृषदाज्यम् । पशूँस्तांश्चक्रे वायव्यानारण्या ग्राम्यश्च ये

अर्थ—(मनसः चन्द्रमाः जातः) त्याच्या मनापासून चंद्र झाला, (चक्षोः सूर्यः अजायत) त्याच्या डोळ्या-
पासून सूर्य झाला (मुखात् इन्द्रः च अग्निः च) त्याच्या मुखापासून इंद्र आणि अग्नि झाले आणि (प्राणात् वायुः
अजायत) त्या पुरुषाच्या प्राणांपासून वायु झाला. (७)

त्या पुरुषाच्या (नाभ्याः अन्तरिक्षं आसीत्) नाभीपासून अंतरिक्ष झालें, (शीर्ष्णः द्यौः सं अवर्तत)
शीर्षांतून द्युलोक उत्पन्न झाला (पद्भ्यां भूमिः) पायांपासून भूमि झाली (दिशः श्रोत्रात्) कानांपासून दिशा
झाल्या (तथा लोकान् अकल्पयन्) त्याचप्रमाणें अन्य लोकांची कल्पना प्रजापतीच्या शरीराच्या अंगांत करण्यांत आली
आहे. (८)

(अग्रे विराट् समभवत्) प्रथम विराट् उत्पन्न झालें (विराजः अधि पूरुषः) विराटाच्यावर अधिष्ठाता पुरुष
झाला. (सः जातः अति अरिच्यत्) तो जन्माबरोबरच पसरला (भूमिं अथो पश्चात् पुरः) प्रथम भूमीवर आणि
मागाहून लहान लहान शरीरांत पसरला. (९)

(यत् पुरुषेण हविषा) जेव्हां पुरुषरूप हवीनीं (देवाः यज्ञं अतन्वत) देवांनीं यज्ञ केला, (वसन्तः अस्य
आज्यं आसीत्) वसंत ऋतु त्या यज्ञांत तूप होतें. (ग्रीष्मः इध्मः) ग्रीष्म ऋतु त्याचीं काष्ठें होतीं (शरत् हवि)
शरद् ऋतु हवि होता. (१०)

(तं अग्रशः जातं) त्या प्रथम उत्पन्न झालेल्या (यज्ञं पुरुषं) यज्ञीय पुरुषाला (प्रावृषा प्रोक्षन्) वृष्टीच्या
पाण्यानें सिंचन केलें. (तेन) त्यामुळें (साध्याः वसवः च ये देवाः) साध्य आणि वसु नांवाचे जे देव आहेत ते
(अयजन्त) यज्ञ करीत राहिले. (११)

(तस्मात् अश्वाः अजायन्त) त्याच्यापासून घोडे उत्पन्न झाले (ये च के च उभयादतः) ज्याच्या दोन्ही बाजूस
दांत आहेत. (गावः ह जज्ञिरे तस्मात्) त्यापासून गायी उत्पन्न झाल्या. (तस्मात् अजावयः जाताः) त्याच्या-
पासून बकऱ्या आणि मेंढ्या उत्पन्न झाल्या. (१२)

(तस्मात् सर्वहुतः यज्ञात्) त्या सर्वस्वाची आहुती देण्याच्या यज्ञापासून (ऋचः सामानि जज्ञिरे) ऋचा
आणि सामगायन उत्पन्न झालें. (छन्दः ह जज्ञिरे तस्मात्) त्या यज्ञापासून छंद म्हणजे अथर्ववेद जन्मला आणि
(तस्मात् यजुः अजायत्) त्या यज्ञापासून यजुर्वेद झाला. (१३)

(तस्मात् सर्वहुतः यज्ञात्) त्या सर्व हवन करण्याच्या यज्ञापासून (पृषद-आज्यं संभृतं) दही आणि तूप
हीं उत्पन्न झालीं. (तान् वायव्यान् पशून्) त्या वायव्य पशूंपासून (आराण्याः ग्राम्याः च ये) आरण्यक पशु आणि
ग्रामीण पशु उत्पन्न झाले. (१४)

भावार्थ— देवांच्या यज्ञांत या ऋतूमध्यें उत्पन्न होणारे पदार्थच यज्ञसामग्री होती. (१०)

सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः । देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन् पुरुषं पशुम् ॥ १५ ॥
मूर्ध्नो देवस्य बृहतो अंशवः सप्त सप्ततीः । राज्ञः सोमस्याजायन्त जातस्य पुरुषादधि ॥ १६ ॥

अर्थ— (देवाः यत् यज्ञं तन्वानाः) देव जो यज्ञ करीत होते (अस्य सप्त परिधयः आसन्) त्या यज्ञास सात परिधि होत्या. (त्रिः सप्त समिधः कृताः) तिप्पट सात (एकवीस) समिधा केल्या होत्या आणि पुरुषं पशुं अबध्नन्) परमेश्वररूपी पुरुषास ध्यान करण्यासाठीं चित्तांत बांधून ठेविला होता; म्हणजे परमेश्वराचें ध्यान करून त्यास आपल्या अंतःकरणांत ते स्थिर करीत होते. (१५)

(बृहतः देवस्य) मोठ्या देवाच्या अर्थात् (सोमस्य राज्ञः) सोम राजाच्या (मूर्ध्नः) डोक्यापासून (सप्ततीः सप्त) सत्तर वेळां सात (अंशवः) किरणें (अजायन्त) उत्पन्न झालीं (जातस्य पुरुषात् अधि) जेव्हां तो पुरुषापासून उत्पन्न झाला. (१६)

भावार्थ—ज्याच्यापासून सर्व सृष्टि बनली तीं हीं किरणें सूक्ष्म प्रकाशमय तत्त्वें आहेत. मोठा देव सोमराजा सर्वाधार असून तोच प्रभू आहे. त्याच्यापासून हीं तत्वें प्रगट झालीं आणि सर्व सृष्टि उत्पन्न झाली. (१६)

सर्व मानवसमाज जो या पृथ्वीवर चारी बाजूस पसरला आहे तो सर्व मानवसमाज या पुरुषाचे शरीर आहे. हजारों मुख, हजारों बाहू, हजारों उदरें, हजारों पाय या पुरुषास आहेत. या वर्णनाकडे यासाठीं लक्ष दिलें पाहिजे आणि त्याचें समजून मनन केलें पाहिजे.

ब्रह्म

कांड १९ सूक्त ४३

(ऋषिः-ब्रह्मा । देवता-ब्रह्म, बहवो देवाः)

यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
अग्निर्मा तत्र नयत्वग्निर्मेधां दधातु मे । अग्नये स्वाहा ॥ १ ॥
यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
वायुर्मा तत्र नयतु वायुः प्राणान्दधातु मे । वायवे स्वाहा ॥ २ ॥
यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
सूर्यो मा तत्र नयतु चक्षुः सूर्यो दधातु मे । सूर्याय स्वाहा ॥ ३ ॥

अर्थ— (दीक्षया तपसा सह) दीक्षा आणि तपासह (यत्र ब्रह्मविदः यान्ति) जेथें ब्रह्मज्ञानी जातात (अग्निः मा तत्र नयतु) अग्नि मला तेथें नेवो. (अग्निः मे मेधां दधातु) अग्नि मला बुद्धि देवो. (अग्नये स्वाहा) अग्नीला हें सर्व अर्पण असो. (१)

॥०॥ (वायुः मा तत्र नयतु) वायु मला तेथें घेऊन जावो (वायुः प्राणान् दधातु मे) वायु माझ्यामध्यें प्राण धारण करो. ॥०॥ (२)

॥०॥ (सूर्यः मा तत्र नयतु) सूर्य मला तेथें घेऊन जावो. (सूर्यः मे चक्षुः दधातु) सूर्य मला डोळे देवो. ॥०॥ (३)

यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
चन्द्रो मा तत्र नयतु मनश्चन्द्रो दधातु मे । चन्द्राय स्वाहा ॥ ४ ॥
यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
सोमो मा तत्र नयतु पयः सोमो दधातु मे । सोमाय स्वाहा ॥ ५ ॥
यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
इन्द्रो मा तत्र नयतु बलमिन्द्रो दधातु मे । इन्द्राय स्वाहा ॥ ६ ॥
यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
आपो मा तत्र नयन्त्वमृतं मोप तिष्ठतु । अद्भ्यः स्वाहा ॥ ७ ॥
यत्र ब्रह्मविदो यान्ति दीक्षया तपसा सह ।
ब्रह्मा मा तत्र नयतु ब्रह्मा ब्रह्म दधातु मे । ब्रह्मणे स्वाहा ॥ ८ ॥

अर्थ —॥०॥ (चन्द्रो मा तत्र नयतु) चंद्र मला तेथें नेवो, आणि (चन्द्रः मे मनः दधातु) चन्द्र माझ्या-मध्यें मनाची स्थापना करो. ॥०॥ (४)

॥०॥ (सोमः मा तत्र नयतु) सोम मला तेथें घेऊन जावो आणि (सोमः मे पयः दधातु) सोम मला दूध देवो. (५)

॥०॥ (इंद्रः मा तत्र नयतु) इंद्र मला तेथें घेऊन जावो आणि (इन्द्रः मे बलं दधातु) इंद्र मला बल देवो. ॥०॥ (६)

॥०॥ (आपः मा तत्र नयन्तु) जलप्रवाह मला तेथें घेऊन जावो आणि (अमृतं मा उपतिष्ठतु) अमृत मला प्राप्त होवो. ॥०॥ (७)

॥०॥ (ब्रह्मा तत्र नयतु) ब्रह्मा मला तेथें घेऊन जावो आणि (ब्रह्मा मे ब्रह्म दधातु) ब्रह्मा मला ज्ञान देवो. ॥०॥ (८)

आत्मा

कांड १९, सूक्त ५१

(ऋषिः- ब्रह्मा । देवता- आत्मा, सविता च ।)

अयुतोऽहमयुतो मे आत्मायुतं मे चक्षुरयुतं मे श्रोत्रमयुतो मे प्राणोऽयुतो
मेऽपानोऽयुतो मे व्यानोऽयुतोऽहं सर्वः ॥ १ ॥
देवस्य त्वा सवितुः प्रसवेऽश्विनोर्बाहुभ्यां पूष्णो हस्ताभ्यां प्रसूत आ रभे ॥ २ ॥

अर्थ— (अहं अयुतः) मी पूर्ण आहें. (मे आत्मा अयुतः) माझा आत्मा पूर्ण आहे. (मे चक्षुः अयुतं) माझे नेत्र पूर्ण आहेत. (मे श्रोत्रं अयुतं) माझे कान पूर्ण आहेत. (मे प्राणः अयुतः) माझे प्राण पूर्ण आहेत. (मे अपानः अयुतः) माझा अपान पूर्ण आहे, (मे व्यानः अयुतः) माझा व्यान पूर्ण आहे. (अहं सर्वः अयुतः) मी सर्व रीतीनें परिपूर्ण आहें. (१)

(सवितुः देवस्य प्रसवे) सविता देवाच्या प्रेरणेनें (अश्विनोः बाहुभ्यां) अश्विनाच्या बाहूंनीं आणि (पूष्णः हस्ताभ्याम्) पूषाच्या हातांनीं (प्रसूतः) उत्पन्न झालेला मीं (आरभे) या कार्याचा आरंभ करतों. (२)

परमात्मा

कांड १९, सूक्त ७२

(ऋषिः- भृग्वङ्गिरा ब्रह्मा । देवता- परमात्मा देवाश्च ।)

यस्मात्कोशादुद्भराम वेदं तस्मिन्नन्तरव दध्म एनम् ।
कृतमिष्टं ब्रह्मणो वीर्येण तेन मा देवास्तपसावतेह ॥ १ ॥

अर्थ— (यस्मात् कोशात्) ज्या पेटींतून (वेदं उद्भराम) आम्ही वेद काढके (तस्मिन् अंतः) तिच्यांतच (एनं अवदध्म) या वेदांस पुन्हां परत ठेवतों. (ब्रह्मणः वीर्येण इष्टं कृतं) ज्ञानरूप वीर्यानें जें कर्म करावयाचें होतें तें आम्हीं केलें. (तेन तपसा) त्या तपानें (देवाः इह अवत) देव येथें आमचें रक्षण करोत. (१)

भावार्थ— वेदांचे ग्रंथ लिहिलेले होते. ते पेटींत ठेवण्यांत येत. जरूर पडली म्हणजे ते बाहेर काढून कार्य करण्यांत येई, आणि कार्य पूर्ण झाल्यावर ते परत पेटींत ठेऊन देण्यांत येत. या वेदांत परमात्म्यासंबंधीं ज्ञान भरलें होतें. (१)

दुःखमोचन आणि विजयप्राप्ति

कांड १६, सूक्त १

(ऋषिः- अथर्वा । देवता- प्रजापतिः)

अतिसृष्टो अपां वृषभोऽतिसृष्टा अग्नयो दिव्याः ॥ १ ॥
रुजन्परिरुजन्मृणन्प्रमृणन् ॥ २ ॥
म्रोको मनोहा खनो निर्दाह आत्मदूषिस्तनूदूषिः ॥ ३ ॥
इदं तमति सृजामि तं माभ्यवनिक्षि ॥ ४ ॥
तेन तमभ्यतिसृजामो योऽस्मान्द्वेष्टि यं वयं द्विष्मः ॥ ५ ॥
अपामग्रमसि समुद्रं वोऽभ्यवसृजामि ॥ ६ ॥
योऽप्स्वग्निरति तं सृजामि म्रोकं खनिं तनूदूषिम् ॥ ७ ॥

अर्थ— [१] अपां वृषभः अतिसृष्टः) पाण्याचा वर्षाव करणारा मुक्त झाला. (दिव्याः अग्नयः अतिसृष्टाः) दिव्य अग्नि मुक्त करण्यांत आले. (१) (रुजन् परिरुजन्) तोडत तोडत, सर्व प्रकारें फोडीत फोडीत, (मृणन् प्रमृणन्) मारीत मारीत आणि नाश करीत करीत, (२) (म्रोकः खनः) घातक आणि खोदणारा (निर्दाहः) जाळणारा, (मनोहा) मनाचा नाश करणारा, (आत्मदूषिः) आत्म्याला दूषण देणारा (तनूदूषिः) शरीरास दूषित करणारा, (३) (इदं तं अति सृजामि) या आणि त्या दुसऱ्या शत्रूस मीं दूर करतों. (तं मा अभ्यवनक्षि) मी त्यास पुनः कधींहि प्राप्त न व्हावें. (४) (यः अस्मान् द्वेष्टि) जो आमचा द्वेष करतो आणि (यं वयं द्विष्मः) ज्याचा आम्ही द्वेष करतों (तं तेन अभिअति सृजामः) त्यांना त्याच्या द्वारें आम्ही दूर करतों. (५) (अपां अग्रं असि) तूं जलाच्या अग्रभागीं आहेस, (वः समुद्रं अभि अवसृजामि) तुम्हांला मीं समुद्राकडे सोडून देतों. (६) (यः अप्सु अग्निः) जो जलांत अग्नि आहे, (तं अति सृजामि) त्यास मी मुक्त करतों. (म्रोकं खनिं तनूदूषिं) घातक, खाऊन टाकणाऱ्या आणि शरीरास दूषित करणाऱ्यास मीं दूर करतों. (७)

यो वं आपोऽग्निराविवेश स एष यद्वो घोरं तदेतत् ॥ ८ ॥
इन्द्रस्य व इन्द्रियेणाभि षिञ्चेत् ॥ ९ ॥
अरिप्रा आपो अप रिप्रमस्मत् ॥ १० ॥
प्रास्मदेनो वहन्तु प्र दुष्वप्न्यं वहन्तु ॥ ११ ॥
शिवेन मा चक्षुषा पश्यतापः शिवया तन्वोप स्पृशत त्वचं मे ॥ १२ ॥
शिवानग्नीनप्सुषदो हवामहे मयि क्षत्रं वर्च आ धत्त देवीः ॥ १३ ॥

[२]

निर्दुरर्मण्य ऊर्जा मधुमती वाक् ॥ १ ॥
मधुमती स्थ मधुमतीं वाचमुदेयम् ॥ २ ॥
उपहूतो मे गोपा उपहूतो गोपीथः ॥ ३ ॥
सुश्रुतौ कर्णौ भद्रश्रुतौ कर्णौ भद्रं श्लोकं श्रूयासम् ॥ ४ ॥
सुश्रुतिश्च मोपश्रुतिश्च मा हासिष्टां सौपर्णं चक्षुरजस्रं ज्योतिः ॥ ५ ॥
ऋषीणां प्रस्तरोऽसि नमोऽस्तु दैवाय प्रस्तराय ॥ ६ ॥

[३]

मूर्धाहं रयीणां मूर्धा समानानां भूयासम् ॥ १ ॥

अर्थ— (यः अग्निः आपः वः आविवेश) जो अग्नि जलांत प्रवेश करतो (सः एषः) तो हा आहे. (यत् वः घोरं तत् एतत्) जो तुम्हांस भयंकर आहे तो हाच आहे. (८) (इन्द्रस्य इन्द्रियेण वः अभिषिञ्चेत्) इंद्राच्या इंद्रियांनीं आपणांस अभिषेक करण्यांत येवो. (९) (अरिप्राः आपः) जल निर्दोष आहे तें (अस्मत् रिप्रं अप) आमचें पाप दूर करो. (१०) (अस्मत् एनः प्रवहन्तु) आमच्यापासून पाप दूर करो. तसेंच (दुष्वप्न्यं प्र वहन्तु) दुष्ट स्वप्नाच्या हेतूमसुद्धां दूर करो. (११) हे (आपः) जलांनो ! (मा शिवेन चक्षुषा पश्यत) मला कल्याणकारक दृष्टीनें पहा. (मे त्वचं शिवया तन्वा उपस्पृशत) माझ्या त्वचेस आपल्या शुभ तनूनें स्पर्श करा. (१२) (अप्सुषदः शिवान् अग्नीन् हवामहे) पाण्यांत रहाणाऱ्या शुभकारक अग्नींस आम्हीं बोलावित आहोंत (देवीः) हे दिव्य पाण्या ! (मयि क्षत्रं वर्चः आधत्त) माझ्यांत क्षात्रबळ आणि तेज धारण करा. (१३)

[२] (दुः अर्मण्यः निः) दुर्गति दूर होवो (ऊर्जा मधुमति वाक्) बलवान् मधुर वाणी होवो. (१) (मधुमती स्थ) वाणी मधुर होवो. (मधुमतीं वाचं उदेयं) मीं मधुर भाषण बोलावें. (२) (मे गोपा उपहूतः) माझ्या गोपालास-इंद्रियपालकास बोलाविण्यांत आलें. (गोपीथः उपहूतः) वाणीच्या रक्षकास, गोरक्षकास अथवा इंद्रियरक्षकास बोलाविण्यांत आलें. (३) (सु-श्रुतौ कर्णौ) माझे दोन्ही कान उत्तम ज्ञान ऐकणारे होवोत. (भद्र-श्रुतौ कर्णौ) कल्याणवचन ऐकणारे माझे कान होवोत. (भद्रं श्लोकं श्रूयासं) कल्याणमय प्रशंसा मीं नेहमीं ऐकत रहावी. (४) (सुश्रुतिः च उपश्रुतिः च) उत्तम श्रवणशक्ति आणि दुरून ऐकण्याची शक्ति (मा मा हासिष्टां) माझा कदापि त्याग न करो (सौपर्णं ज्योतिः चक्षुः) गरुडासारखी तीक्ष्ण दृष्टि मजजवळ (अजस्रं) सदा राहो. (५) (ऋषीणां प्रस्तरः असि) तूं ऋषींचें आवरण आहेस. (दैवाय प्रस्तराय नमः अस्तु) दैवरूप आवरणास नमस्कार असो. (६)

[३] (रयीणां अहं मूर्धा भूयासं) धनाचा मी मस्तकाप्रमाणें उच्च स्वामी बनावें. तसेंच (समानानां मूर्धा भूयासं) समान लोकांचा मीं मुख्य व्हावें. (१)

*

रुजश्च मा वेनश्च मा हासिष्टां मूर्धा च मा विधर्मा च मा हासिष्टाम् ॥ २ ॥
उर्वश्च मा चमसश्च मा हासिष्टां धर्ता च मा धरुणश्च मा हासिष्टाम् ॥ ३ ॥
विमोकश्च मार्द्रपविश्च मा हासिष्टामार्द्रदानुश्च मा मातरिश्वा च मा हासिष्टाम् ॥ ४ ॥
बृहस्पतिर्म आत्मा नृमणा नाम हृद्यः ॥ ५ ॥
असंतापं मे हृदयमुर्वी गव्यूतिः समुद्रो अस्मि विधर्मणा ॥ ६ ॥

[४]

नाभिरहं रयीणां नाभिः समानानां भूयासम् ॥ १ ॥
स्वासदसि सूषा अमृतो मर्त्येष्वा ॥ २ ॥
मा मां प्राणो हासीन्मो अपानोऽवहाय परा गात् ॥ ३ ॥
सूर्यो माह्नः पात्वग्निः पृथिव्या वायुरन्तरिक्षाद्यमो
मनुष्येभ्यः सरस्वती पार्थिवेभ्यः ॥ ४ ॥
प्राणापानौ मा मां हासिष्टं मा जने प्र मेषि ॥ ५ ॥
स्वस्त्यद्योषसो दोषसश्च सर्वं आपः सर्वगणो अशीय ॥ ६ ॥
शक्वरी स्थ पशवो मोप स्थेषुर्मित्रावरुणौ मे प्राणापानावग्निर्मे दक्षं दधातु ॥ ७ ॥

अर्थ— (रुजः च वेनः च मा मा हासिष्टां) तेज आणि कान्ति मला सोडून न जावोत. (मूर्धा च विधर्मा च मा मा हासिष्टां) शिर आणि विशिष्ट धर्म मला न सोडोत. (२) (उर्वः च चमसः च मा मा हासिष्टां) शिजविण्यायोग्य आणि चमस मला न सोडोत. (धर्ता च धरुणः च मा मा हासिष्टां) धारक आणि आधार देणारा मला न सोडो. (३) (विमोकः च आर्द्रपविः च मा मा हासिष्टां) मुक्त करणारा आणि ओलीं शस्त्रें मला सोडून न जावोत. (आर्द्रदानुः च मातरिश्वा च मा मा हासिष्टां) पाणी देणारा आणि वायु मला न सोडो. (४) (बृहस्पतिः मे आत्मा) माझा आत्मा ज्ञानसंपन्न आहे, आणि (नृमणाः नाम हृद्यः) मनुष्यामध्यें मनन करणारा आणि हृदयांत रहाणारा आहे. (५) (मे हृदयं असंतापं) माझें हृदय संतापरहित होवो. (गव्यूतिः उर्वी) माझी गायींची जोडी मोठी होवो. (विधर्मणा समुद्रः अस्मि) विशेष धर्मांनीं मीं समुद्रासमान आहें. (६)

[४] (अहं रयीणां नाभिः) मी धनाचें केंद्र आहें. (समानानां नाभिः भूयासं) समान लोकांचें सुद्धां मी केन्द्र आहें. (१) (मर्त्येषु अमृतः) मर्त्यामध्यें अमर आहें. (सु-आसत्) उत्तम रीतीनें बसणारा आणि (सु-उषा) उत्तम तेजाचा तूं आत्मा (असि) आहेस. (२) (प्राणः मा मा हासीत्) प्राण मला न सोडोत. (अपानः अवहाय मा परा गात्) अपानसुद्धां मला सोडून दूर कोठें न जावा. (३) (सूर्यः अह्नः मा पातु) दिवसा सूर्य माझें रक्षण करो. (अग्निः पृथिव्याः) अग्नि पृथ्वीवरून (वायुः अन्तरिक्षात्) वायु अंतरिक्षांतून (यमः मनुष्येभ्यः) यम मनुष्यांपासून (सरस्वती पार्थिवेभ्यः) सरस्वती पृथ्वीपासून उत्पन्न झालेल्या पदार्थांपासुन माझें रक्षण करो. (४) (प्राणापानौ मा मा हासिष्टं) प्राण आणि अपान मला न सोडोत. (जने मा प्रमेषि) मनुष्यांत घातक न होवोत. (५) हे (आपः) पाण्या ! (अद्य स्वस्ति) आज कल्याण होवो, (उषसः च दोषसः च) दिवस आणि रात्रीपासून (सर्वः सर्वगणः) सर्व आणि सर्व गणांनीं युक्त होऊन (अशीय) सुख प्राप्त करूं (६) (शक्वरीः स्थ) आपण सामर्थ्यवान् आहांत. (पशवः मा उपस्थेषुः) पशु माझ्याजवळ राहोत (मित्रावरुणौ मे प्राणापानौ) मित्र आणि वरुण माझे प्राण आणि अपान तसेंच (अग्निः मे दक्षं दधातु) अग्नि बळ देवो. (७)

[५]

विद्म ते स्वप्न जनित्रं ग्राह्याः पुत्रोऽसि यमस्य करणः ॥ १ ॥
अन्तकोऽसि मृत्युरसि ॥ २ ॥
तं त्वा स्वप्न तथा सं विद्म स नः स्वप्न दुष्वप्न्यात्पाहि ॥ ३ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं निर्ऋत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ४ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रमभूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ५ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं निर्भूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ६ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं पराभूत्याः पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ७ ॥
विद्म ते स्वप्न जनित्रं देवजामीनां पुत्रोऽसि यमस्य करणः । अन्तको० । तं त्वा० ॥ ८ ॥
अन्तकोऽसि मृत्युरसि ॥ ९ ॥
तं त्वा स्वप्न तथा सं विद्म स नः स्वप्न दुष्वप्न्यात्पाहि ॥ १० ॥

[६]

अजैष्माद्यासनामाद्याभूमानागसो वयम् ॥ १ ॥
उषो यस्माद्दुष्वप्न्यादभैष्माप तदुच्छतु ॥ २ ॥
द्विषते तत्परा वह शपते तत्परा वह ॥ ३ ॥
यं द्विष्मो यच्च नो द्वेष्टि तस्मा एनद्गमयामः ॥ ४ ॥

अर्थ— [५] (स्वप्न ते जनित्रं विद्म) हे स्वप्ना ! तुझ्या उत्पत्तीचा हेतु आम्हीं जाणतों. तूं (ग्राह्याः पुत्रः असि) व्याधीचा पुत्र आहेस, आणि (यमस्य करणः) यमाचें साधन आहेस. (१) तूं (अन्तकः असि) अन्त करणारा आहेस आणि तूं (मृत्युः असि) मृत्यु आहेस. (२) हे स्वप्ना (तं त्वा तथा सं विद्म) अशा तुला आम्हीं जाणतों. हे स्वप्ना ! (सः नः दुष्वप्न्यात् पाहि) असा तूं आम्हांस दुष्ट स्वप्नापासून वांचीव. (३) (स्वप्न ते जनित्रं विद्म) हे स्वप्ना, तुझ्या उत्पत्तीचा हेतु आम्हीं जाणतों. (निर्ऋत्याः पुत्रः असि) तूं दुर्गतीचा पुत्र आहेस आणि (यमस्य०) यमाचें साधन आहेस. (४) स्वप्नाचा हेतु आम्हीं जाणतों (अभूत्याः पुत्रः०) अभूतीचा तूं पुत्र आहेस. (५) (निर्भूत्याः पुत्रः०) निर्धनतेचा तूं पुत्र आहेस. (६) तूं (पराभूत्या पुत्रः०) पराभवाचा पुत्र आहेस. (७) (देवजामीनां पुत्रः०) इंद्रियांच्या विकृतीचा तूं पुत्र आहेस. (८) (अन्तकः असि मृत्युः असि) तूं अन्तक आहेस, मृत्यु आहेस. (९) (स्वप्न, तं त्वा तथा सं विद्म) हे स्वप्ना, अशा तुला आम्हीं जाणतों. (सः नः दुष्वप्न्यात् पाहि) असा तूं आमचें दुष्ट स्वप्नापासून रक्षण कर. (१०)

[६] (अद्य अजैष्म) आज आम्हीं विजय प्राप्त केला आहे. (अद्य असनाम) आम्हीं प्राप्तव्य प्राप्त केलें आहे. (वयं अनागसं अभूम) आम्हीं निष्पाप झालों आहोंत. (१) हे (उषः) उषःकाला ! (यस्मात् दुष्वप्न्यात् अभैष्म) ज्या दुष्ट स्वप्नाला आम्हीं भितों, (तत् अप उच्छतु) तें आमच्यापासून दूर होवो. (२) (तत् द्विषते परा वह) त्या द्वेष करणाऱ्यास दूर ने. (तत् शपते परा वह) त्या शाप देणाऱ्यास दूर कर. (३) (यं द्विष्मः) ज्याचा आम्हीं द्वेष करतों (यत् च नः द्वेष्टि) जे आम्हां सर्वांचा द्वेष करतात, (तस्मै एनत् गमयामः) त्याच्याजवळ आम्हीं त्यास घेऊन जातों. (४)

उषा देवी वाचा संविदाना वाग्देव्युषसा संविदाना ॥ ५ ॥
उषस्पतिर्वाचस्पतिना संविदानो वाचस्पतिरुषस्पतिना संविदानः ॥ ६ ॥
तेऽमुष्मै परा वहन्त्वरायान्दुर्णाम्नः सदान्वाः ॥ ७ ॥
कुम्भीका दूषीकाः पीयकान् ॥ ८ ॥
जाग्रद्दुष्वप्न्यं स्वप्नेदुष्वप्न्यम् ॥ ९ ॥
अनागमिष्यतो वरानवित्तेः संकल्पानमुच्या द्रुहः पाशान् ॥ १० ॥
तदमुष्मा अग्ने देवाः परा वहन्तु वध्रिर्यथासद्विथुरो न साधुः ॥ ११ ॥

[७]

तेनैनं विध्याम्यभूत्यैनं विध्यामि निर्भूत्यैनं विध्यामि
पराभूत्यैनं विध्यामि ग्राह्यैनं विध्यामि तमसैनं विध्यामि ॥ १ ॥
देवानामेनं घोरैः क्रूरैः प्रैषैरभिप्रेष्यामि ॥ २ ॥
वैश्वानरस्यैनं दंष्ट्रयोरपि दधामि ॥ ३ ॥
एवानेवाव सा गरत् ॥ ४ ॥
योऽस्मान्द्वेष्टि तमात्मा द्वेष्टु यं वयं द्विष्मः स आत्मानं द्वेष्टु ॥ ५ ॥

अर्थ— (**उषा देवी वाचा सं विदाना**) उषादेवी वाणीशीं संमिलित होवो, आणि (**वाक् देवी उषसा संविदाना**) वाक् देवी उषादेवीशीं संमिलित होवो. (५)

(**उषस्पतिः वाचस्पतीना संविदानः**) उषेचा पति वाणीच्या पतीशीं संमिलित होवो आणि (**वाचस्पतिः उषस्पतिना संविदानः**) वाणीचा पति उषेच्या पतीशीं संमिलित होवो. (६) (**ते अरायान् दुर्णाम्नः सदान्वाः**) त्यांस निर्धनता वाईट नांवासह कष्ट आणि इतर आपत्ति (**अमुष्मै परा वहन्तु**) या शत्रूजवळ घेऊन जावो. (७) (**कुम्भीकाः दूषीकाः पीयकान्**) घड्याप्रमाणें वाढणारे उदररोग, शरीरांत दोष उत्पन्न करणारे रोग आणि प्राणघातक रोग यांना (८) तसेंच (**जागृत् दुष्वप्न्यं**) जागृतीच्या वेळीं येणारें दुष्ट स्वप्न आणि (**स्वप्ने दुष्वप्न्यं**) स्वप्नाच्या वेळीं येणारें दुष्ट स्वप्न. (९)

(**अनागमिष्यतः वरान्**) प्राप्त न होणारे श्रेष्ठ पदार्थ (**अवित्तेः संकल्पान्**) दरिद्रतेचे संकल्प (**अमुच्याः द्रुहः पाशान्**) द्रोह करणाऱ्या न सुटणाऱ्या पाशांना (१०) हे अग्नि ! त्या सर्व विपत्तींना (**तत् अमुष्मै**) शत्रूजवळ (**देवाः परा वहन्तु**) सर्व देव घेऊन जावोत. (**यथा**) ज्यामुळें ते शत्रु (**वध्रिः**) निर्बळ, (**विथुरः**) व्यथायुक्त आणि (**साधुः न असत्**) खराब होवोत. (११)

[७] (**तेन एनं विध्यामि**) त्याच्यायोगें याचा मी वेध करतों (**अभूत्या, निर्भूत्या, ग्राह्या एनं विध्यामि**) दुर्गति, दारिद्र्य आणि रोगांनीं त्याचा वेध करतों. (**पराभूत्या०**) पराभवानें त्यास पीडित करतों. (**तमसा एनं विध्यामि**) अज्ञानानें त्याचा वेध करतों. (१) (**देवानां घोरैः क्रूरैः प्रैषैः**) देवांच्या घोर क्रूर दुःखांनीं (**एनं अभिप्रेष्यामि**) त्यास दुःखी करतों. (२) (**वैश्वानरस्य एनं दंष्ट्रयोः अपि दधामि**) वैश्वानराच्या दाढेंत त्यास सोंपून देतों. (३) (**सा एव अनेव**) ती आपत्ति या रीतीनें अथवा अन्य रीतीनें या शत्रूला (**अव गरत्**) गिळून टाकते. (४) (**यः अस्मान् द्वेष्टि**) जो आमचा द्वेष करतो (**तं आत्मा द्वेष्टु**) त्याचा आत्मा त्याचा द्वेष करो (**यं वयं द्विष्मः**) ज्याचा आम्ही द्वेष करतों (**सः आत्मानं द्वेष्टु**) तो स्वतःच्या आत्म्याचा द्वेष करो. (५)

निर्द्विषन्तं दिवो निः पृथिव्या निरन्तरिक्षाद्भजाम ॥ ६ ॥
सुयामंश्चाक्षुष ॥ ७ ॥
इदमहमामुष्यायणेऽमुष्याः पुत्रे दुष्वप्न्यं मृजे ॥ ८ ॥
यददोअदो अभ्यगच्छन्यद्दोषा यत्पूर्वां रात्रिम् ॥ ९ ॥
यज्जाग्रद्यत्सुप्तो यद्दिवा यन्नक्तम् ॥ १० ॥
यदहरहरभिगच्छामि तस्मादेनमव दये ॥ ११ ॥
तं जहि तेन मन्दस्व तस्य पृष्टीरपि शृणीहि ॥ १२ ॥
स मा जीवीत्तं प्राणो जहातु ॥ १३ ॥

[८]

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स ग्राह्याः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १-४ ॥ १ ॥

अर्थ—(द्विषन्तं) द्वेष करणाऱ्याचा (दिवः अन्तरिक्षात् पृथिव्याः) द्युलोक, अंतरिक्ष आणि पृथ्वीवरून (निः भजामः) सामना करतों. (६) हे (सुयामन् चाक्षुष) उत्तम नियामक निरीक्षका ! (७) (इदं अहं) हा तो मी (अमुष्यायण अमुष्याः पुत्रे) या गोत्राच्या याच्या पुत्रांत (दुष्वप्न्यं मृजे) दुष्ट स्वप्नास पाठवितों. (८) (यत् अदः अदः) जे हा दोष (अभिगच्छन्) मीं त्याच्यांत प्राप्त झालेला पहातों (यत् दोषाः यत् पूर्वां रात्रीं) जे दोष रात्रीं अथवा पूर्वरात्रीं, (९) (यत् जाग्रत्) जे जागत असतां, (यत् सुप्तः) जे झोंपलेले असतां (यत् दिवा यत् नक्तं) जो दिवसा आणि रात्रीं (१०) (यत् अहः अहं अभिगच्छामि) जे प्रतिदिनीं मीं पहातों. (तस्मात् एनं अव दये) त्या दोषांसाठीं मीं त्यास मारतों. (११) (तं जहि) त्यास मारून टाक, (तेन मन्दस्व) त्याच्या बरोबर चाल, (तस्य पृष्टीः अपि शृणीहि) त्याच्या फांसळ्या तोडून टाक. (१२) (स मा जीवीत्) तो जीवंत न राहो (तं प्राणः जहातु) त्याचा प्राण त्याग करो. (१३)

[८] (अस्माकं जितं) आमचा विजय होवो, (अस्माकं उद्भिन्नं) आमचा उदय होवो, (अस्माकं ऋतं) आमचें सत्य वाढो, (अस्माकं तेजः) आमचें तेज वाढो, (अस्माकं ब्रह्म) आमचें ज्ञान वाढो, (अस्माकं स्वः) आमचा आत्मप्रकाश वाढो, (अस्माकं यज्ञः) आमचें यज्ञकर्म सफळ होवो, (अस्माकं पशवः) आमच्या घरीं पशु राहोंत, (अस्माकं प्रजाः) आमची प्रजा वृद्धि पावो, (अस्माकं वीराः) आमच्यामध्यें वीर उत्पन्न होवोत. (१)

(तस्मात् अमुं निर्भजामः) या अपराधासाठीं त्या शत्रूवर आम्ही हल्ला करतों. (अमुं अमुष्यायणं अमुष्याः पुत्रं असौ यः) जो या गोत्राचा याचा पुत्र आमचा शत्रु आहे. (२) (सः ग्राह्याः पाशात् मा मोचि) तो रोगांच्या पाशांतून मुक्त न होवो. (३) (तस्य इदं वर्चः तेजः प्राणं आयुः निवेष्टयामि) त्याचें तेज, बळ, प्राण आणि आयुष्य मीं घेरून टाकतों, आणि (इदं एनं अधराञ्चं पादयामि) मीं त्यास खालीं पाडतों. (४) ॥०॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स निर्ऋत्याः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ५ ॥ २ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
सोऽभूत्याः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ६ ॥ ३ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम्
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स निर्भूत्याः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ७ ॥ ४ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम्
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स पराभूत्याः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ८ ॥ ५ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स देवजामीनां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ९ ॥ ६ ॥

अर्थ— (सः निर्ऋत्याः पाशात् मा मोचि) तो दुर्गतीच्या पाशातून मुक्त न होवो. ॥०॥ (५) ॥०॥ (सः अभूत्याः पाशात् मा मोचि) तो दारिद्र्याच्या पाशातून मुक्त न होवो. ॥०॥ (६) ॥०॥ (सः निर्भूत्याः पाशात् मा मोचि) तो दुरवस्थेच्या पाशातून मुक्त न होवो. ॥०॥ (७) ॥०॥ (सः पराभूत्याः पाशात् मा मोचि) तो पराभवाच्या पाशातून मुक्त न होवो. ॥०॥ (८) ॥०॥ (सः देवजामीनां पाशात् मा मोचि) तो इंद्रियांच्या दोषांतून मुक्त न होवो. ॥०॥ (९) ॥०॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स बृहस्पतेः पाशान्मा मोचि
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १० ॥ ७ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम्
तस्मादमुं निर्भजामोऽमुममामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स प्रजापतेः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ११ ॥ ८ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स ऋषीणां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १२ ॥ ९ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स आर्षेयाणां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १३ ॥ १० ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
सोऽङ्गिरसां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १४ ॥ ११ ॥

अर्थ-- (सः बृहस्पतेः........प्रजापतेः........ऋषीणां......आर्षेयाणां.........अंगिरसां......

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स आङ्गिरसानां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १५ ॥ १२ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
सोऽथर्वणां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १६ ॥ ११ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स आथर्वणानां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १७ ॥ १४ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स वनस्पतीनां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १८ ॥ १५ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुममुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स वानस्पत्यानां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ १९ ॥ १६ ॥

अर्थ—आंगिरसानां.........अथर्वणां......आथर्वणानां.........वनस्पतीनां.........वानस्पत्यानां...

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स ऋतूनां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २० ॥ १७ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ य ।
स आर्तवानां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २१ ॥ १८ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स मासानां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २२ ॥ १९ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
सोऽर्धमासानां पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि । ॥ २३ ॥ २० ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
सोऽहोरात्रयोः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २४ ॥ २१ ॥

अर्थ— ऋतूनां........आर्तवानां........मासानां........अर्धमासानां........अहोरात्रयोः......

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
सोऽह्नोः संयतोः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २५ ॥ २२ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स द्यावापृथिव्योः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २६ ॥ २३ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स इन्द्राग्न्योः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २७ ॥ २४ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम्
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स मित्रावरुणयोः पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २८ ॥ २५ ॥

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम्
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स राज्ञो वरुणस्य पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ २९ ॥ २६ ॥

अर्थ—अह्नः संयतः......द्यावापृथिव्योः......इन्द्राग्न्योः......मित्रावरुणयोः......वरुणस्य राज्ञः......

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमृतमस्माकं तेजोऽस्माकं ब्रह्मास्माकं स्वरस्माकं
यज्ञोऽस्माकं पशवोऽस्माकं प्रजा अस्माकं वीरा अस्माकम् ।
तस्मादमुं निर्भजामोऽमुमामुष्यायणममुष्याः पुत्रमसौ यः ।
स मृत्योः पड्वीशात् पाशान्मा मोचि ।
तस्येदं वर्चस्तेजः प्राणमायुर्नि वेष्टयामीदमेनमधराञ्चं पादयामि ॥ ३०-३३ ॥ २७ ॥

[९]

जितमस्माकमुद्भिन्नमस्माकमभ्यष्ठां विश्वाः पृतना अरातीः ॥ १ ॥
तदग्निराह तदु सोम आह पूषा मा धात्सुकृतस्य लोके ॥ २ ॥
अगन्म स्वः स्वरगन्म सं सूर्यस्य ज्योतिषागन्म ॥ ३ ॥
वस्योभूयाय वसुमान्यज्ञो वसु वंशिषीय वसुमान्भूयासं वसु मयि धेहि ॥ ४ ॥

अर्थ— (मृत्योः पड्वीशात् मा मोचि) तो बृहस्पति, प्रजापति, ऋषि, ऋषींपासून उत्पन्न झालेले, अंगिरसापासून उत्पन्न झालेले, अथर्व, अथर्वापासून उत्पन्न झालेले, वनस्पति, वनस्पतीपासून उत्पन्न झालेले, ऋतु, ऋतूपासून उत्पन्न झालेले, महिने, अर्धमहिना, अहोरात्र, दिवस, द्यु, पृथ्वी, इंद्र, अग्नि, मित्र, वरुण, राजा वरुण आणि मृत्यु यांच्या पाशांतून मुक्त न होवोत. (१०-३२) (तस्य इदं वर्चः०) त्याचें हें तेज, कान्ति, प्राण आणि आयु इत्यादींना मीं वेरून टाकतों आणि खालीं पाडतों. (३३)

[९] (अस्माकं जितं) आमचा विजय होवो (अस्माकं उद्भिन्नं) आमचा उदय होवो. (विश्वाः पृतनाः अरातीः) सर्व शत्रुसेनेचा निरोध केला. (१) (अग्निः तत् आह) अग्नि असें म्हणाला, (सोमः उ तत् आह) सोमानें सुद्धां हेंच सांगितलें. (पूषा सुकृतस्य लोके मा धात्) पूषा मला पुण्यलोकांत धारण करो. (२) आम्हीं (स्वः अगन्म) आत्मज्योतीस प्राप्त होतों. (३) वस्यः भूयाय) ऐश्वर्याच्या वृद्धीसाठीं (वसुमान् भूयासं) धनयुक्त होऊं, (वसुमान् यज्ञः) ऐश्वर्ययुक्त यज्ञच आहे. (वसु वंशिषीय) ऐश्वर्य प्राप्त करूं (मयि वसु धेहि) माझ्यांत धनाची धारणा कर अर्थात् मला धन दे. (४)

दुःखमोचन आणि विजयप्राप्ति

विजयाची प्राप्ति

प्रत्येक मनुष्यानें स्वतःच्या विजयासाठीं प्रयत्न केला पाहिजे. लहानांत लहान मूल सुद्धां स्वतःचा पराजय सहन करूं शकत नाहीं. पराभवाची सहज शंका वाटली तरी तें बालक रडूं लागतें, मारामारी करतें, आणि पराजयापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करतें. त्याचप्रमाणें मनुष्यांत सुद्धां पराभवाचें स्वागत करण्याची इच्छा असत नाहीं म्हणजे तो पराभव सहन करण्यास तयार नसतो. नेहमीं स्वतःचा विजय व्हावा, स्वतःचें यश वाढावें, स्वतःची कीर्ति दिगंतरीं पसरावी, अशीच इच्छा मनुष्य करीत असतो. त्यामुळें हा विजय कशा प्रकारें प्राप्त होईल त्याचा मनुष्यानें विचार केला पाहिजे. या विजयसूक्ताच्या नऊ पर्यायसूक्तांत विजयप्राप्तीसाठीं आवश्यक बाबींचा विचार केला आहे. त्यामुळें स्वतःच्या विजयाची इच्छा असणाऱ्या साधकानें त्याचें मनन केलें पाहिजे आणि त्यापासून लाभ मिळविला पाहिजे.

विजयाचे प्रकार

विजयाचे अनेक प्रकार आहेत. एक अध्यात्मिक क्षेत्रांतील विजय, दुसरा आधिभौतिक क्षेत्रांतील विजय, तिसरा अधिदैविक क्षेत्रांतील विजय हे मुख्यतः तीन प्रकारचे विजय आहेत; पण

प्रत्येक क्षेत्रांतील विजयाचे आणखीहि प्रकार आहेत. त्या सर्वांचा विचार येथें होऊं शकणार नाहीं. पण सरलतेसाठीं त्यांचें थोडें थोडें स्वरूप दर्शविण्यांत येईल.

आध्यात्मिक विजय

आध्यात्मिक क्षेत्रांत शरीर, इंद्रियें, मन, प्राण, बुद्धि, अहंकार, चित्त, काम, आत्मा, प्रकृति इत्यादि सर्व प्रकारच्या विकृतींचा संबंध येतो. त्यांस निर्दोष ठेवणें, त्यांस स्वतःच्या निजशक्तींनीं परिपूर्ण ठेवणें, आणि त्यां सर्वांस आत्मोन्नतीसाठीं निर्विघ्नपणें जोडून दिल्यानें आध्यात्मिक क्षेत्रांत विजय होतो. येथें प्रत्येक इंद्रियाची प्रकृति, त्याची विकृति, त्यांत उत्पन्न होणारे दोष, आणि रोग, त्यांचे गुण वगैरेविषयीं सर्व विचारांचा समावेश होतो. जणूं काय, वैद्यशास्त्र, आरोग्यशास्त्र, मानसशास्त्र, वगैरे शास्त्रें आध्यात्मिक विजयाची सिद्धता करण्यासाठींच मनुष्यास प्राप्त झालीं आहेत. त्याची सूचना देण्यासाठीं प्रथम पर्यायसूक्तांत म्हटलें आहे कीं—

निर्दाहः तनूदूषिः मनो-हा आत्मदूषिः इदं तं अति-सृजामि ।

' शरीराची आग, शरीराचे सर्व दोष, मनाचे नाशकभाव आणि आत्म्याचा घात करणारे सर्व विचार या सर्वांस मीं दूर करतों. ' या चारांत बहुतेक सर्व आत्म्याचा पराजय करणारीं कारणें येऊन गेलीं आहेत. विविध रोगांमुळें आपल्या शरीरांत, दाह, पीडा, कष्ट आणि दुःख होतें. शरीरांत जेव्हां दोषांचा संचय होतो तेव्हांच कष्ट उत्पन्न होतात. तेव्हांच विविध रोग होतात. मनाच्या वाईट भावनांनीं मनाची निर्बलता येते आणि या सर्वांमुळें आत्म्याचें अधःपतन होतें. साधकानें या चार शब्दांची नीट ओळख करून घ्यावी, विचार करावा आणि समजून घ्यावें कीं, या चारांमुळें आध्यात्मिक क्लेश कसे निर्माण होतात. जर नीट रीतीनें मनन केलें आणि या चारांच्या व्याप्तीचा विचार केला तर ही गोष्ट वाचकांच्या ध्यानांत येईल कीं मनुष्याच्या वैयक्तिक सर्व क्लेशांचें मूळ या चार शब्दांतच आहे. जर या बाबतींत योग्य प्रतिबंध करण्यांत आला तर अध्यात्मिक क्षेत्रांत निश्चयपूर्वक विजय प्राप्त होईल. पूर्वोक्त चार शब्दांचे प्रतिशब्द समजून घेतल्यानेंच विजयाचीं साधनें उत्तम प्रकारें समजूं शकतात.

शमः तनूशुद्धिः मनःशुद्धिः आत्मशुद्धिः ।

हे चार शब्द असे आहेत कीं ज्यामुळें पूर्वोक्त चार दोष दूर होऊं शकतात. इंद्रियदमन, इंद्रियशमन इत्यादि द्वारा शरीराचा दाह दूर होतो, आणि शरीरांत सर्वत्र शांति प्रवर्तते. तनुशुद्धीनें शरीराचे सर्व दोष दूर होतात. मनाच्या पवित्रतेनें मनाचें बळ वाढतें, आणि आत्मशुद्धीनें आत्मोन्नति होते. याप्रमाणें विचार केला असतां समजून येईल कीं अध्यात्मोन्नतीचीं हीं चार साधनें आहेत आणि म्हणून पूर्वोक्त चार दोषांस दूर करण्याची सूचना प्रथम पर्यायसूक्तांत केली आहे. या उद्देशानेंच श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं—

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥६२॥
क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥६३॥
रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥
प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥

(भ. गी. २)

' विषयांच्या चिंतनामुळें आसक्ति, आसक्तिपासून कामना, कामनेपासून क्रोध, क्रोधापासून मूढता, मूढतेपासून बुद्धिनाश, बुद्धिनाशानें मनुष्याचा सर्वनाश होतो. परंतु ज्याचें मन वश असतें आणि ज्याचीं इंद्रियें रागद्वेषरहित असतात तो इंद्रियांकडून कामें करून घेत असतां सुद्धां प्रसन्न असतो. चित्त प्रसन्न राहिल्यानें सर्व दुःखें दूर होतात, आणि त्याची बुद्धि स्थिर होते. ' या श्लोकांत अध्यात्मिक दुःखांचें कारण सांगितलें आहे, आणि त्यांस दूर करण्याचे मार्ग आणि उपायसुद्धां सांगितले आहेत. त्यामुळें हे श्लोक आत्मविजयाविषयीं विचार करतांना फार बोधप्रद ठरतात. असो. याप्रमाणें जे जे दोष शरीर, इंद्रियें, मन, बुद्धि आणि आत्म्यांत असतात त्यांचा काय परिणाम होतो तें पाहूं—

रुजन् प्रमृणन् प्रोकः खनः । (पर्याय सू. २।३)

जेथें दोष असतात तेथें ते ' तोडतात, मुरडतात (मुरगळतात), चेंदामेंदा करतात, धांवतात, कापतात, खोदतात, खड्डा पाडतात. ' याप्रमाणें अनेक रीतींनीं नाश करतात. साधकानें स्वतःच्या अंतरांतील कामक्रोधाकडे पाहिलें तर त्यास स्पष्ट दिसून येईल कीं हे काम आणि क्रोध मनुष्याच्या शरीरांत खोदण्याचें, तोडण्याचें, मुरडण्याचें आणि नाश करण्याचें कार्य कशारीतीनें करतात. काम हा शरीरास आधारभूत जें वीर्य त्याचा नाश करतो. क्रोधानें रक्तांतील जीवनपेशींचा नाश होतो. याप्रकारें सर्व विकार तोडण्याचें आणि नाश करण्याचें कार्य करणारे आहेत; म्हणून आध्यात्मिक भूमिकेच्या या सर्व शत्रूंस दूर केले पाहिजे. म्हणून म्हटलें आहे—

यं वयं द्विष्मः तं अभि अति सृजामः । (मं. ११५)
म्रोकं खनिं तनूदूषिं अति सृजामि । (मं. ११७)

' ज्या रोगादींचा आणि विविध दोषांचा आम्हीं द्वेष करतों म्हणजे त्यांस आमच्याजवळ ठेवूं इच्छित नाहीं, त्यांस आम्हीं दूर करतों. घातक, खोदणाऱ्या आणि शरीरांतील दोष वाढविणाऱ्या सर्व दोषांचा आम्ही नाश करतों.' हे दोष एवढ्यासाठीं दूर करावयाचे कीं अध्यात्मक्षेत्रांतील सर्व दोष दूर व्हावेत, आणि प्रसन्नता वाढावी. हाच विषय आणखी पुढें पहा—

यत् वः घोरं तत् (अति सृजामि) । (मं. ११८)
अरिप्रा आपः अस्मत् एनः प्रवहन्तु । (मं. ११।१०-११)
आपः शिवायाः तन्वा मा उपस्पृशत । (मं. ११।१२)
इन्द्रस्य इंद्रियेण अभिषिञ्चेत् । (मं. ११९)

' जे माझ्यांत भयंकर हानिकारक दोष आहेत ते सर्व मी प्रथम दूर करतों. दोष दूर करण्यासाठीं पाण्यानें चिकित्सा करणें योग्य आहे. शुद्ध जल आमच्या शरीरांतून सर्व दोषांस आणि सर्व पापांस दूर करो. जलानें आपल्या शुभ गुणांनीं माझ्या शरीरास स्पर्श करावा. इन्द्र म्हणजे आत्मा, त्याच्या शक्तीनें अभिषेक करण्यांत यावा.' येथें जलचिकित्सेनें सर्व दोष दूर करण्याचा उपदेश आहे तो अत्यंत महत्त्वाचा आहे. शरीरांत जे कांहीं दोष असतील ते पाण्याच्या विविध प्रयोगांनीं दूर करणें, त्यास जलचिकित्सा म्हणतात. शरीरास थंड पाण्याचा स्पर्श जाऊन सुखकारक वाटला म्हणजे शरीर स्वस्थ आहे असें समजावें. जेव्हां शीतल जलस्पर्श कष्टदायक वाटतो तेव्हां शरीरांत कांहीं दोष घुसलेला आहे हें नक्की समजावें. हे सर्व दोष जलचिकित्सेनें दूर केले पाहिजेत आणि इंद्राच्या शक्तियुक्त जलानें स्नान केलें पाहिजे. ज्याप्रमाणें पाण्याच्या स्नानानें सर्व शरीर भिजतें, त्याचप्रमाणें आत्म्याच्या शक्तीनें सर्व शरीराचें संचालन व्हावयास पाहिजे. समग्र शरीरांत आत्मशक्तीचा सुखानें संचार झाला पाहिजे, त्यामुळें—

मयि क्षत्रं वर्चः आधत्त । (मं. ११।१३)

' माझ्यांत (मनुष्यांत) क्षात्रबळ आणि तेजस्विता वाढो.' जल हें सर्व कार्य करील. जलचिकित्सेनें वीर्य वाढतें, दोष दूर होतात, आणि शरीरकान्ति सुद्धां वाढते. याप्रकारें शरीराचें उत्तम स्वास्थ्य प्राप्त होतें. हें स्वास्थ्य प्राप्त व्हावें यासाठीं...

अपां वृषभः अति सृष्टः ।
दिव्याः अग्नयः अति सृष्टाः (मं. ११२२)

' जलवृष्टि करणारे मेघ स्वतःच्या स्थानांतून मुक्त झाले म्हणजे त्यांनीं पृथ्वीवर वृष्टि केली. दिव्य अग्नि म्हणजे वीज ती सुद्धां स्वतंत्रपणें प्रकाशित होत आहे (चमकत आहे).' म्हणजेच विशेष वृष्टि झाली. परमेश्वराच्या नियमाप्रमाणें जी वृष्टि होते तिचा हेतु असा कीं, ' मनुष्यानें त्यापासून स्वतःचें स्वास्थ्य प्राप्त करून घेऊन आध्यात्मिक उन्नति सिद्ध करावी. येथें आत्मिक उन्नतीचा उपदेश करतां करतां मेघाच्या दृष्टांतानें सर्व लोकांस सांगितलें आहे कीं ज्याप्रमाणें मेघ जगाच्या कल्याणासाठीं पूर्ण आत्मसमर्पण करतो त्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यानें जगाच्या कल्याणासाठीं आत्मयज्ञ केला पाहिजे. हा विचार या सोळाव्या कांडाच्या प्रथम पर्यायसूक्तांत मुख्यत्वें सांगितला आहे. स्वतःच्या उन्नतीची इच्छा करणारा साधक याच्या मननाच्या सहाय्यानें पूर्ण बोध घेऊं शकतो.

इन्द्रियशुद्धि

आत्मोन्नतीसाठीं इंद्रियांच्या पवित्रतेची अत्यंत आवश्यकता असते. पवित्रतेशिवाय कोणताहि उन्नति होणें असंभवनीय आहे. त्यामुळें द्वितीय पर्यायसूक्तांत, मनाच्या पवित्रतेचा विषय संक्षेपानें सांगितला आहे. यांत आधीं सर्व मनुष्यांस एक अत्यंत उत्तम उपदेश केला आहे. तो साधकानें प्रथम पढावा आणि स्मरण करावा—

दुः+अर्मण्यः निः । (मं. २।१)

' दुष्ट गति अर्थात् खराब चालचलन, दुष्ट व्यवहार दूर होवोत. आमचे दुष्ट व्यवहार आमच्यांतून निर्मूळ होवोत. ' दुष्ट गतीस पोहोंचविणारे भाव आमच्यांत न रहावे आणि आमच्या समाजांत दुराचारी मनुष्य न रहावा. याप्रमाणें प्रत्येक व्यक्ति सुधरेल तर त्याचप्रमाणें सर्व समाज सुधरेल. व्यक्ति आणि समाज सुधारण्याचे नियम एकच आहेत. व्यक्तीस सुधारण्यास त्याचे दुष्ट गुण दूर केले पाहिजेत; आणि समाजास सुधारणें असेल तर दुष्ट गुण असलेल्या व्यक्तीस समाजांतून दूर केलें पाहिजे. समाजांतून दुष्ट गुणयुक्त मनुष्यांस दूर करणें म्हणजे समाजांतील दुष्ट गुणांचें आश्रयस्थान नाहींसें करणें. याप्रमाणें उन्नतीसाठीं दुष्टता दूर केली पाहिजे असा नियम आहे. याप्रमाणें सर्वसाधारण सुधारणेचा–उन्नतीचा उपदेश केल्यानंतर स्पष्टीकरण करण्याच्या उद्देशानें कित्येक इंद्रियांचा निर्देश करून आत्मसुधारणेचा मार्ग दाखविला आहे, तो—

ऊर्जा मधुमती वाक् मधुमतीं वाचं उदेयम् ॥
(मं. २।१-२)

' वाणी मधुर आणि बलवान् व्हावी, मनुष्यानें बलशाली आणि मधुर वाणीनें एकमेकांशीं गोष्टी कराव्यात. ' मनुष्यांत जीं आपआपसांत भांडणें होतात त्यांचें कारण त्यांचीं कटुभाषणें (भाषा) होय. मनुष्याच्या मनांतील विष कटुशब्दद्वारें बाहेर येतें आणि

सर्वत्र विष भरलेलें वातावरण निर्माण होतें; म्हणून जर मनुष्य स्वतःची अंतःशुद्धि करील तर त्याच्या मुखांतून कटु शब्द सहसा बाहेर येणार नाहींत.

मनुष्यानें अशी भाषा वापरावी कीं ती मधुर असेल, शत्रूमध्यें सुद्धां मित्रभाव निर्माण करील आणि असलेला मित्रभाव सुदृढ होईल. या उपदेशाप्रमाणें फक्त शाब्दिक माधुर्यच दाखविलेलें नाहीं तर त्या माधुर्याबरोबर शब्दांत बल अथवा तेज **(ऊर्जः)** असलें पाहिजे. उत्साहवर्धक शब्दच उच्चारले पाहिजेत. कित्येक मनुष्यें स्वतःच्याच मुलांस मोठ्या कौतुकानें अथवा लाडानें ' तूं गुलाम आहेस,' म्हणून हाक मारतात, दुसऱ्या एखाद्यास रागानें ' मर तूं ' असें म्हणतात, आणखी एखाद्यास ' तूं अगदीं लुच्चा आहेस अथवा हरामखोर आहेस ' असें म्हणतील. या अथवा अशा शब्दप्रयोगांनीं आपली वाणी तर मलिन होतेच एवढेंच नाहीं तर ऐकणारांच्या मनांत सुद्धा बोलणाऱ्याविषयीं घृणा निर्माण होते. मानसिक निर्बलता उत्पन्न होते. म्हणून मनुष्यानें प्रभावशाली, बलपूर्ण, उत्साहपूर्ण शब्दांचा उपयोग करावा, हें त्यांस उचित होय. स्वतःच्या पुत्रास ' तूं इंद्र आहेस, तूं अमर हो, तूं सत्यस्वरूप आहेस, तूं आनंदघन आहेस ' असें म्हणावें. असें म्हणण्यानें सर्व ऐकणारांच्या मनांत उत्साहाचें वायुमंडळ उत्पन्न होतें. मनुष्यांचीं नांवें ' रडतोंड्या, धोंड्या, दगडु ' अशीं ठेवण्याऐवजीं, ' निर्भय, उत्साह, उत्तमराव ' अशीं ठेवलीं पाहिजेत. त्यामुळें प्रत्येकवेळीं त्या नांवाचें उच्चारण होतांना मनांत शुभ विचार आपोआप उत्पन्न होतात. प्रत्येक साधकानें असा विचार करावा कीं प्रयत्नपूर्वक निश्चयेंकरून मीं स्वतःच्या वाणीनें अशुभ विचार प्रगट करणार नाहीं. परंतु नेहमीं उत्साहमय विचार प्रगट व्हावें एतदर्थ काय केलें पाहिजे ? या प्रश्नाचें उत्तर मात्र येथें दोनच शब्दांनीं दिलें आहे. **' गोपा '** आणि **गो पीथः '** हे दोन शब्द फार महत्त्वपूर्ण आहेत. मनुष्याचा संपूर्ण सत्यधर्म या शब्दांत समावलेला आहे. **' गोपः '** शब्दाचा अर्थ आहे इन्द्रियांचें रक्षण. **' गोपीथः '** शब्दाचा अर्थ आहे इंद्रियांची शक्ति ताब्यांत ठेवणें. एका शब्दानें इंद्रियांचें शक्तिवर्धन करण्याचा उपदेश असून दुसऱ्यानें ती शक्ति इंद्रिय संयमनद्वारा काबूंत ठेवण्याचा उपदेश मिळतो. ज्याप्रमाणें गुराखी गायींचें रक्षण करतां करतां त्यांस ताजें सरस गवत आणि अन्न देऊन परिपुष्ट करतो, परंतु त्यांस वाटेल तिकडे भटकूं देऊन दुसऱ्याच्या शेतांचें नुकसान करूं देत नाहीं, त्याप्रमाणें मनुष्यानें सुद्धां इंद्रियांची शक्ति वाढवावी पण ती ताब्यांत सुद्धां ठेवावी. याप्रमाणें मनुष्याच्या उन्नतीसाठीं इंद्रियसंयम आणि मनोनिग्रह दोन्हींची आवश्यकता आहे. उपासकानें हा बोध या दोन शब्दांतून ग्रहण करावा. जे कोणी असा संयम [illegible] सच जवळ बोलावणें योग्य (**उपहूतः**) आहे. [illegible] स्वतःचीं इंद्रियें स्वेच्छाचारी होऊं देतात [illegible] ण्यास योग्य नाहींत. साधकानें याचा विचार [illegible] वेदोपदेशानें स्वतःचें वैयक्तिक आणि सामाजिक [illegible]. यापुढें कानांसंबंधीं खूपच सुंदर उपदेश दिला आहे—

भद्रश्रुतौ कर्णौ सुश्रुतौ कर्णौ भद्रं श्लोकं श्रूयासम्
सुश्रुतिः च उपश्रुतिः च मा मा हासिष्टाम्

([illegible])

' माझे कान चांगला उपदेश ऐकोत, माझे कान [illegible] देश ऐकून पवित्र होवोत. ' कल्याणकारक [illegible]. उत्तम उपदेश ऐकण्याची आणि चांगले शब्द [illegible] ण्याची माझी शक्ति कधींहि क्षीण न होवो [illegible] सार्थकतेचें साधन दर्शविलें आहे. ईश्वरानें मनुष्याला [illegible] साठीं दिले आहेत कीं त्यानें नेहमीं चांगला उपदेश [illegible] शब्द कधींहि ऐकूं नयेत. ऋग्वेदांत सुद्धां सांगितलें आहे कीं—

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवा भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः

(ऋ. [illegible])

' आम्हीं कानांनीं कल्याणकारक गोष्टी ऐकाव्या आणि डोळ्यांनीं शुभ गोष्टी पहाव्यात. ' हा सर्व उपदेश [illegible] आहे कीं त्यायोगें मनुष्याची सुधारणा व्हावी, मनुष्य पवित्र [illegible], मनुष्याची उन्नति व्हावी. याप्रमाणें कानांच्याविषयीं [illegible] नंतर डोळ्यासंबंधीं सांगितलें आहे कीं—

सौपर्णं चक्षुः अजस्रम् । (मं. [illegible]

' गरुडाप्रमाणें माझी दृष्टि तीक्ष्ण होवो. ' [illegible] कल्याणकारी वस्तूच पाहो. याप्रकारें इंद्रियशुद्धीविषयीं [illegible] सूक्तांत सांगितलें आहे. तसेंच—

ऋषीणां प्रस्तरः असि । दैवाय प्रस्तराय नमः [illegible]

' तूं ऋषींचें आवरण आहेस [illegible] दनाला) माझा नमस्कार आहे. [illegible] मंदिर आहे, तें दिव्य मंदिर आहे. [illegible] मनुष्यानें अंतःकरणांत पूज्यभाव धारण केला पाहिजे. [illegible] उपासनेनेंच सर्वांचें हित होणार आहे. याप्रकारें द्वितीय सूक्तांत सांगण्यांत आलें आहे.

आधिभौतिक विजय

पूर्वोक्त प्रकारें मनुष्याची आध्यात्मिक आणि वैयक्तिक उन्नति झाल्यानंतर त्यानें स्वतःचा आधिभौतिक विजय संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचा विचार या १६ व्या कांडाच्या तिसऱ्या

सूक्तांत केला आहे. त्या बोधप्रद उपदेशाचें आतां वाचकांनीं मनन करावें.

अहं रयीणां मूर्धा भूयासं। समानानां मूर्धा भूयासम्। (मं. ३।१२)

अहं रयीणां नाभिः भूयासं। समानानां नाभिः भूयासम्। (मं. ४।१-२)

'मीं धनाचा स्वामी आणि केंद्र बनावें. मी समानधर्माच्या (योग्यतेच्या) लोकांचा मुख्य व्हावें. त्यांच्या केंद्रस्थानीं असावें.' स्वतःची योग्यता पुढारी होण्यायोग्य असावी, असली पाहिजे. प्रत्येक मनुष्य नेता होऊं शकत नाहीं; तरी सुद्धां बहुगुणसंपन्न होण्याचा प्रयत्न प्रत्येक मनुष्य जर करील तर त्याची सुधारणा निःसंशय होईलच. या दृष्टीनें अशी इच्छा मनुष्यानें स्वतःच्या मनांत धारण करावी आणि धर्मानुकूल उन्नतीसाठीं प्रयत्न करावा. असे नेता होण्यास जे योग्य गुण मनुष्यांत वृद्धिंगत झाले पाहिजेत त्यांची सूचना या सूक्तांत पुढील मंत्रांत दिली आहे, ती पहा—

रुजः, वेनः, मूर्धा, विधर्मा, उरवः, चमसः, धर्ता, धरुणः, विमोकः, आर्द्रपविः, आर्द्रदानुः, मातरिश्वा च मा मा हासिषाम् (मं. ३।२-४)

'तेजस्विता, महत्त्वाकांक्षा, मस्तकाची शक्ति, विशेष गुणधर्म, यज्ञसाधन, धारकशक्ति, बंधमुक्त होण्याची इच्छा, शस्त्रसिद्धि, दान करण्याची इच्छा आणि प्रेम हे माझा त्याग न करोत.' हे गुण मनुष्यांत स्थिर रहावेत आणि वृद्धि पावावेत तरच तो मनुष्यजातीचें केंद्र अथवा पुढारी होऊं शकेल. हे गुण विशेष महत्त्वाचे आहेत, म्हणून त्यांचा अधिक विचार केला पाहिजे. (**रुजः**) तेजस्विता- त्यांत शरीर, इन्द्रियें, मन, बुद्धि आणि परमात्म्याच्या तेजस्वितेचा समावेश होतो. मनुष्यानें सर्व प्रकारें तेजस्वी झालें पाहिजे. (**वेनः**) इच्छा- स्वतःची वैयक्तिक, सामाजिक आणि राष्ट्रीय इच्छा. या इच्छांनींच मनुष्य पुरुषार्थी होतो, आणि विशेष श्रेष्ठ कर्में करून स्वतःचा आणि समाजाचा उद्धार करतो. (**मूर्धा**) मस्तक- मनुष्याची उच्चता अथवा नीचता ही त्याच्या मस्तकाच्या शक्तीवर आधारित असते; म्हणून मनुष्यानें मस्तकशक्ति वाढविणें अगत्याचें आहे. (**विधर्मा**) विशेष धर्मानें युक्त होणें. साधारण गुणकर्म आणि धर्मानें युक्त मनुष्य साधारण राहील; परंतु जर त्यास विशिष्ट योग्यता प्राप्त करून घ्यावयाची असेल, जर तो समाज आणि राष्ट्राचा नेता किंवा पुढारी होऊं इच्छित असेल, तर त्यानें स्वतःच्या ठिकाणीं विशेष धर्मांची वृद्धि करणें उचित आहे. सामान्य माणसांत जे धर्म असत नाहींत ते त्यानें तपश्चर्यादिकांनीं स्वतःच्या ठिकाणीं वाढविले पाहिजेत. (**उरवः, चमसः**) हीं यज्ञपात्रें आहेत. हीं यज्ञाच्या सर्व साधनांचीं उपलक्षणें आहेत. सर्व प्रकारचे यज्ञ केल्यानें आणि यज्ञमय जीवन असल्यामुळें मनुष्याची योग्यता वाढते. मनुष्यानें क्रतु (**यज्ञ**) रूप असलें पाहिजे. शतक्रतु बनणें हें मनुष्याचें ध्येय असलें पाहिजे. (**धर्ता**) धारण करणारा. समाजाची धारणा, राष्ट्राची धारणा, धर्माची धारणा करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे. दुसऱ्या प्राण्यास स्वतःच्या शक्तीचा आधार देणें, यास धारणा करणें असें समजावें. (**धरुणः**) याचा अर्थ धारक असा होतो. त्यांत बल अधिक आहे. स्वतः स्थिर राहून दुसऱ्यास दुःखसमुद्रांतून पार करण्यासाठीं स्वतःचा आधार देण्याचें कार्य करणें मनुष्यास योग्य आहे. मनुष्यानें स्वतःमध्यें एवढी शक्ति प्राप्त करून घेतली पाहिजे.

(**वि-मोकः**) विमोचन करणारा, मनुष्यांना मुक्त करणारा, मनुष्यांस बंधनांतून सोडविणारा. मनुष्यास स्वतंत्रता देणारा जो पुढारी असेल तोच सर्वश्रेष्ठ समजला पाहिजे. यानें लोकांचें परित्राण (रक्षण), सज्जनांचें रक्षण, दुर्जनांचें निर्दालन आणि धर्माची स्थापना करणें असा अर्थ होतो. (**आर्द्र-पविः**) पवीचा अर्थ आहे तलवार, खड्ग अथवा शस्त्र. शत्रूच्या रक्तानें ज्याचें शस्त्र ओलें झालें आहे अथवा शत्रूंचा नाश करून ज्याचें शस्त्र ओलें होण्यासाठीं तत्पर आहे त्याचें हें नांव आहे. धर्मयुद्ध करण्यासाठीं जो तयार असतो त्याचें हें नांव आहे. (**आर्द्र-दानुः**) आर्द्रता, स्नेहामुळें दुसऱ्यासाठीं जो दान करतो. म्हणजे ज्याचें मन नेहमीं स्नेहानें ओलें असतें, प्रेमानें आर्द्र असतें, जो स्नेहानें आर्द्र आहे त्याचें हें नांव आहे. (**मातरि-श्वा**) स्वतःच्या आईचा आश्रय घेणारा, जो मातृभक्त आहे, मातृभूमींत जो एवढ्यासाठीं रहातो कीं स्वतःच्या जीवनसमर्पणानें मातृभूमीची सेवा होईल. एवढ्यासाठींच जो मातृभूमींत परिभ्रमण किंवा संचार करीत असतो.

हे बारा शब्द मनुष्याचीं विशेष कर्तव्यें दर्शवितात. मनुष्यानें हीं कर्तव्यें करावींत. हीं कर्तव्यें मनुष्यापासून कधीं दूर न जावोत. या कर्तव्यांस मनुष्य कधीं विन्मुख न होवो. या धर्मानें अथवा त्यांत उपदेशिलेल्या कर्तव्यांनीं जो मनुष्य युक्त असेल तोच श्रेष्ठ आणि उच्च होय. येथें कदाचित् कांहीं निर्बल मनुष्यें म्हणतील, 'आम्हीं निर्बल आहोंत, आम्हीं हे गुणधर्म धारण करूं शकणार नाहीं.' त्यांच्यासाठीं आत्म्याचा स्वभाव कसा असतो तें या सूक्ताचे मंत्र स्वतःच सांगत आहेत—

आत्मा बृहस्पतिः नृमणाः हृद्यः। (मं. ३।५)

विधर्मणा समुद्रः असि। (मं. ३।६)

मर्त्येषु अमृतः सुषा। (मं. ४।२)

' आत्मा ज्ञानयुक्त आहे, तो मनुष्याच्या हृदयांत निवास करतो, तो मनुष्याच्या अंतरांत मनन करणारा आहे, स्वतःच्या विशेष धर्मानें समुद्रासारखा पसरलेला आणि गंभीर आहे. मरणधर्म असणाऱ्या शरीरांत रहात असून सुद्धां तो अमर आहे. तो उत्तम तेजानें युक्त आहे. ' स्वतःच्या आत्म्याचे हे गुणधर्म आहेत हें जाणून विचारानें आणि मननानें मनुष्यानें या गुणांचा साक्षात्कार केला पाहिजे. या ज्ञानानें मनुष्याची निर्बलता दूर होईल, आणि तो पूर्वोक्त गुण स्वतःमध्यें वाढविण्यास समर्थ होईल. याप्रमाणें आत्मिक बळ प्राप्त झाल्यानें—

असंतापं हृदयं । उर्वी गव्यूतिः । (मं. ३।६)

' हृदय संतापरहित म्हणजे शांत असतें आणि गो नाम इंद्रियांची शक्ति पुष्कळ विस्तृत असते. ' स्वतःची सर्व शक्ति वाढते, जीवन प्रभावशाली होतें. आत्म्याची शांति त्याच्या सर्व व्यवहारांत दिसून येते, आणि तो वाटेल तशा भयंकर प्रसंगांत सुद्धां गंभीर आणि शांत राहून कार्य करूं शकतो, कधींहि अशांत होत नाहीं. शरीराचा नाश झाला तरी मीं अमर आहें असा विश्वास त्याला निर्भय बनवितो आणि त्याच्याकडून मोठमोठीं सत्कार्यें करवितो. अशा स्थितींत सर्व देव त्याचे रक्षक होतात.

सूर्यः वायुः अग्निः यमः सरस्वती-पातु । (मं. ४।३)

' सूर्य, वायु, अग्नि, यम आणि सरस्वती त्याचें रक्षण करतात.' सूर्य नेत्रस्थानांत, वायु प्राणस्थानांत, अग्नि वाणीस्थानांत, यम शिरस्थानांत, सरस्वती बुद्धिस्थानांत, राहून प्रत्येक प्रकारची मदत देतात, आणि त्यास स्वतःच्या दिव्यशक्तीनें पवित्र करतात. आत्मशक्तीनें युक्त अशा पुरुषास याप्रमाणें सर्व देव सहाय्यभूत होतात. हा विषय यापूर्वी चर्चिला गेला आहे, आणि वेदांमध्येंसुद्धां त्याबद्दल वारंवार सांगण्यांत आलें आहे; म्हणून जो मनुष्य आत्मज्ञान करून घेतो आणि स्वतःच्या जीवनास यज्ञरूप बनवितो त्यास सर्व देवतांचें सहाय्य असतें, असा विश्वास साधकानें स्वतःच्या मनांत दृढ बाळगावा. असा मनुष्य निर्भय होऊन व्यवहार करतो, आणि त्यामुळें तो सर्व मनुष्यांचा नेता होण्यास योग्य ठरतो. तो म्हणतो कीं—

प्राणः मां मा हासीत् अपानः अवहाय मा परागात् । (मं. ४।३)

' माझा प्राण आणि माझा अपान मला सोडून कोठें दूर न जावोत. ' तो एवढ्यासाठीं असें म्हणतो कीं त्यानें स्वतःचें सर्व जीवन ईश्वराच्या भक्तींत आणि सेवेसाठीं समर्पित केलेलें असतें. तो स्वतःच्या जीवनद्वारा जनतेची सेवा करूं इच्छितो. स्वतःचे प्राण ईश्वरासाठींच तो समर्पित करूं इच्छितो. दुसऱ्या कोणत्याहि कार्याचें त्यास स्मरण रहात नाहीं. त्यास माहित असतें कीं—

मित्रावरुणौ मे प्राणापानौ । शक्वरीः आपः स्वस्ति । (मं. ४।७)

' स्वतःचे प्राण आणि अपान हे आतां प्रत्यक्ष मित्र आणि वरुण देवता आहेत, आणि जलांतील सामर्थ्य माझें कल्याण करीत आहे. ' याप्रमाणें तो पहातो आणि त्यास अनुभव येतो कीं, स्वतःचा सर्व देह आणि जीवन देवतामय झालें आहे. यावेळीं तो दुष्ट कल्पनांपासून पूर्णपणें अगदीं दूर असतो. तो सहजीं देवतास्वरूप बनतो आणि सहजगतीनें प्रशस्त कार्य करतो. असें कार्य करण्यास त्यास कांहीं प्रयास पडत नाहींत, कारण आतां तो विश्वरूप झालेला असतो. यावेळीं त्यास अनुभव येतो कीं—

अग्निः मे दक्षं । (मं. ४।७)

' अग्नि माझ्यांत बल धारण करीत आहे. ' दुसऱ्या देवता विभिन्न सामर्थ्य धारण करतात. त्याचा आत्मा प्रत्यक्ष ईश्वरी गुणांनीं प्रभावशाली झालेला असतो. असे महात्मे धन्य होत ! असाच मनुष्य प्रभावशाली नेता होऊं शकतो, तोच लोकसंग्रह करण्यास समर्थ होऊं शकतो, आणि तोच जगतांतील मनुष्यमात्रांस सत्यमार्ग दाखवूं शकतो. युगायुगीं असे सत्पुरुष निर्माण होत असतात, आणि जनतेंत कार्य करीत असतात. स्वतः बंधनांत पडून सुद्धां बंधनांत सडत पडलेल्या मनुष्यांस बंधनांतून निवृत्तीचा मार्ग दाखवितात.

स्वप्न

पुढें पांचव्या आणि सहाव्या पर्यायसूक्तांत स्वप्नविषय सांगितला आहे. या सूक्तांत दुष्ट स्वप्नाचीं जीं कारणें दिलीं आहेत तीं हीं—

ग्राह्याः... निर्ऋत्याः... अभूत्याः... निर्भूत्याः ... पराभूत्याः देवजामीनां पुत्रः स्वप्नः । (मं. ५।१-८)

' रोग, दुरावस्था, दारिद्र्य, दुर्गति, पराभव आणि इंद्रियदोषांच्या कारणांनीं दुष्ट स्वप्नें पडतात. ' हीं दुष्ट स्वप्नें जणूं काय मृत्यूचा संदेशच होय; म्हणून दुष्ट स्वप्न पडतांच मनुष्यानें स्वतःच्या शरीरांतील रोगबीजें दूर करण्याचा प्रयत्न करावा हें त्यास उचित होय. दुष्ट स्वप्नांचीं जीं कारणें येथें सांगितलीं आहेत त्याचा थोडा जास्त विचार येथें करणें जरूर आहे. (**ग्राही**) भयानक रोग जे शरीरांत एकदां शिरल्यावर सहसा शरीरास सोडत नाहींत, दुःख देतात आणि अंतीं प्राण हरण करतात असे रोग शरीरांत असले तर वारंवार दुष्ट स्वप्नें पडतात. अशा रोगामुळें जर दुष्ट स्वप्नें पडत असतील तर त्याची योग्य

चिकित्सा करवून रोगबीजांचा नाश करविला पाहिजे आणि शरीर निरोगी बनविलें पाहिजे. या कार्यासाठीं या कांडाच्या सुरवातीच्या सूक्तांतच जलचिकित्सेचा उपाय सांगितला आहे. (**निर्ऋति**) ऋतीचा अर्थ आहे उन्नति, अभ्युदय, सामर्थ्य. म्हणजे निर्ऋतीचा अर्थ त्याच्या विरुद्ध आहे. अवनति, अधःपात, क्षीणता आणि निर्बलता यांच्या योगेंसुद्धां दुष्ट स्वप्नें पडतात. त्यांस दूर करण्यास जे उपाय आहेत ते योजिले पाहिजेत. (**अभूति**) ऐश्वर्यापासून च्युत होणें. आणि (**निर्भूति**) म्हणजे महासंकटांत सांपडणें. तसेंच (**पराभूति**) पराजय होणें, परतंत्र, पराधीन अथवा परवश होणें. या कारणांनीं दुष्ट स्वप्नें पडतात. हीं कारणें दूर करण्यास अनेक उपाय आहेत. प्रत्येकासाठीं निरनिराळे उपाय आहेत, म्हणून त्यांचें अवलंबन योग्यरीतीनें केलें पाहिजे. मुख्य उपाय स्वावलंबनानें स्वाधीनता प्राप्त करून घेतली पाहिजे. (**देव-जामी**) आपल्या शरीरांत देव नांव इंद्रियांसाठीं योजिलें आहे. त्यांच्या शक्ति विविध आहेत. त्यांच्या कमीजास्त होण्यामुळें सुद्धां दुष्ट स्वप्नें पडतात; म्हणून संयमानें स्वतःच्या इंद्रियांस निर्दोष आणि निरोगी ठेवणें अत्यंत आवश्यक आहे. अर्थात् अशा प्रकारें आपल्या शरीरांत आणि राष्ट्रांत दुष्ट स्वप्नें पडण्याचीं जीं कारणें उत्पन्न झालीं असतील त्यांस दूर करणें मनुष्याचें कर्तव्य आहे.

मनुष्याची परीक्षा स्वप्नांनीं होते. मनुष्यास स्वप्नें कसलीं पडतात, त्यावर तो रोगी आहे कीं निरामय आहे, सदाचारी आहे कीं दुराचारी आहे, शुभ विचारी आहे कीं अशुभ विचारी आहे याचा निश्चय होऊं शकतो. मीं ईश्वरउपासना करीत आहें, ऋषींच्या आश्रमांत ऋषींशीं संवाद करीत अथवा त्यांच्याकडून धर्मज्ञानविषयक गोष्टी ऐकत आहें, सत्पुरुषांच्या समागमांत आहें इत्यादि स्वप्नें उत्तम अथवा चांगलीं समजलीं जातात. अशीं शुभ स्वप्नें पडणें अथवा अजिबात स्वप्नें न पडणें या दोन्ही अवस्था शरीराचें स्वास्थ्य सुचवितात; पण जर या व्यतिरिक्त दुष्ट स्वप्नें पडूं लागलीं तर आरोग्यांत कांहीं बिघाड झाला असें समजावें, आणि नंतर तात्काल त्यास सुधारण्याचा यत्न केला पाहिजे. म्हणून म्हटलें आहे कीं—

यस्मात् दुष्वप्नात् अभैष्म तत् अपउच्छतु । (मं. ६।२)

' ज्या दुष्ट स्वप्नानें आम्हांस भय वाटतें अशा दुष्ट स्वप्नांचीं कारणें आमच्यापासून दूर राहोत. ' तें कारण कोठें इतरत्र जावो. आमच्याजवळ नको. अशा प्रकारें आपण स्वतःची निर्दोषता सिद्ध केल्यावर तो निर्दोष मनुष्य म्हणूं शकतो कीं—

अद्य अजैष्म, अद्य असनाम, वयं अनागसः अभूम ।
(मं. ६।१)

' आज आम्हीं विजय प्राप्त केला, आज आम्हीं प्राप्तव्य तें प्राप्त केलें, कारण आज आम्हीं निष्पाप झालों आहोंत. ' निष्पाप होण्यानेंच सर्व प्राप्तव्य प्राप्त करतां येतें. विजय प्राप्त करण्याची ही गुरुकिल्ली आहे. पापामुळें उन्नति होते असें जें वाटतें तो फक्त भास असतो. त्यांत खोल अवनतीचीं बीजें दडून राहिलेलीं असतात, म्हणून उपासकांनीं ध्यानांत ठेवावें कीं वेदाच्या आज्ञानुसार निष्पाप धर्माचरणानें जी उन्नति प्राप्त होते तीच प्राप्त केली पाहिजे, आणि तीच चिरस्थायी होईल.

पुढें सातव्या सूक्तांत द्वेष्यास दूर करणें आणि त्याचा नाश करणें हा विषय आहे. तें सूक्त स्वतः स्पष्ट असल्यानें त्यास जास्त स्पष्ट करण्याचें कारण नाहीं. अध्यात्मभूमिकेंत कुविचार, रोग, इत्यादि शत्रु आहेत. आधिभौतिक भूमिकेंत दोन्हीं स्थळीं जे जे शत्रु निवास करीत असतील त्यांस दूर केलें पाहिजे, तेव्हांच विजय प्राप्त होऊं शकतो.

विजय

आठव्या सूक्तांत स्वतःस विजय प्राप्त करण्यासंबंधीं एक मंत्र आहे. तो प्रत्येक वैदिकधर्मीयानें पाठ करण्याजोगा आहे. आतां तो मंत्र पहा—

अस्माकं जितं, उद्भिन्नं, ऋतं, तेजः, ब्रह्म, स्वः, यज्ञः, पशवः, प्रजाः, वीराः । (मं. ८।१)

या मंत्राचा प्रत्येक शब्द अत्यंत महत्त्वपूर्ण भावांनीं युक्त असल्यामुळें येथें प्रत्येक शब्दाचा विचार विशेषरीतीनें करूं या. (**जितं**) या सर्व प्रकारच्या शत्रूंवर विजय प्राप्त झाला आहे. आधिभौतिक आधिदैविक आणि आध्यात्मिक शत्रूंवर विजय प्राप्त करण्यासाठीं आपली शक्ति वाढविलीच पाहिजे. (**उद्भिन्नं**) ही आपल्या सर्व प्रकारच्या अभ्युदयानें साध्य होणारी गोष्ट आहे. आपली संघटना, आपला शक्तिविकास, आपली आंतरिक शक्ति, आपली तेजोवृद्धि वगैरे द्वारां हें सर्व सिद्ध होऊं शकते. पहिला विजय आपल्या शत्रूंवर मिळविला पाहिजे. यज्ञ आपल्या आंतरिक स्थितीवर निर्भर असतो. (**ऋतं**) ऋतचा अर्थ खरा मार्ग, सरसता, योग्य व्यवहार, ज्यांत वांकडी वाट जराहि असत नाहीं, प्रत्येक व्यवहारांत जर अशी सरलता राहील तरच पूर्वोक्त विजय मिळूं शकेल. (**तेजः**) तेजस्विता, प्रभाव, उग्रता, इत्यादि गुण विजयाचे सहचर आहेत. (**ब्रह्म**) सत्य ज्ञान, आत्मसामर्थ्य, विज्ञान, वेदज्ञान हीं सर्व निःसंशय ऋतासहच राहिलीं पाहिजेत. अनृत—असत्याबरोबर त्यांचें वास्तव्य अगदींच असंभाव्य. (**स्वः—सु-वरः**) आत्म्याचा प्रकाश, आपलें यश अथवा आपल्या पुण्यकर्मद्वारें प्राप्त होणारा पुण्यलोक. (**यज्ञः**) देवपूजा, संगती-

करण आणि **दानरूप** श्रेष्ठ कर्म. या सर्वांची स्थिति आणि उन्नति यज्ञानेंच होऊं शकते. (**पशवः**) गायी, बैल, घोडे वगैरे पशु मनुष्याचें वैभव वृद्धिंगत करतात. (**प्रजाः**) संतति, पुत्र, पुत्री वगैरे अथवा प्रजाजन. (**वीराः**) वीर पुत्र अथवा वीर्यवान् लोक, शूर वीर. साधक जर नीट विचार करील तर त्याच्या ध्यानीं येईल कीं वरील सर्व गोष्टी या विजयामार्गे आपोआप येणाऱ्या आहेत. वाचकांस अतएव सानुरोध प्रार्थना कीं, त्यांनीं हा मंत्र मुखोद्गत करावा. सांजसकाळ त्यांनीं या मंत्रानें ईश्वराची प्रार्थना करावी, आणि स्वतःस वैयक्तिक तसाच सामुदायिक विजय प्राप्त होईल अशी परिस्थिति त्वरित प्राप्त होईल असें वागावें आणि अशी प्रार्थना त्या प्रभूपाशीं मनोभावें करावी.

या आठव्या पर्यायसूक्तांत पुढें जे मंत्र आहेत ते शत्रूंचा नायनाट करण्यास प्रोत्साहन देणारे आहेत. ते केवळ अर्थवादाचे मंत्र आहेत. त्यामुळें त्यांच्याविषयीं जास्त कांहीं लिहिण्याची जरुरी नाहीं. वाचकांनीं स्वतःच ते वाचून त्यांचा आशय समजून घ्यावा. त्यानंतर शेवटच्या नवव्या पर्यायसूक्तांत चारच वचनें आहेत, परंतु तीं नित्यस्मरणांत ठेवावी अशीं महत्त्वाचीं आहेत—

जितं अस्माकं, उद्भिन्नं अस्माकं, विश्वा अरातीः [illegible] । (मं. ९।१)

' आमचा विजय, आमचा उदय आणि आम्हीं सर्व शत्रुसेनेचा पराभव करण्याइतकें सामर्थ्य आमच्यांत वाढवितों. ' तसेंच—

पूषा सुकृतस्य लोके मा धात् । (मं. ९।२)

" ' ईश्वरानें मला पुण्यलोकांत धारण करावें ' असा मीं सदाचारी शुद्ध, पूत आणि पवित्र होईन. ' तसेंच—

स्वः अगन्म, सूर्यस्य ज्योतिषा अगन्म । (मं. ९।३)

' आत्म्याचें तेज प्राप्त करूं, सूर्याच्या ज्योतीस मिळूं. ' तसेंच—

वस्योभूयाय वसुमान् भूयासम् । वसुमान् यज्ञः । वसु वशिषीय । (मं. ९।४)

' पुष्कळ धन प्राप्त केलें पाहिजे, मीं धनवान् व्हावें; कारण कीं धनानें यज्ञ होतात. त्यासाठीं मला धन पाहिजे. '

हे चारी मंत्र इतक्या उत्तम भावानें परिपूर्ण आहेत, इतके सुबोध आहेत, इतके सरळ आहेत कीं जणूं काय हे चार मंत्र म्हणजे या सर्व कांडाचें सारच काढलें आहे. साधक त्याचें मनन करील तर त्यास सुद्धां पुष्कळ आनंद होईल, आणि त्यांच्या मननानें त्याचा आत्मा सुद्धां उल्हसित होईल.

या कांडाचें मनन करून या कांडाचा जो उच्चभाव आहे तो उपासक स्वतःच्या मनांत स्थिर करील अशी आशा आहे. या विजयमार्गानें चालून स्वतःचा, स्वतःच्या समाजाचा, स्वतःच्या जातीचा आणि स्वतःच्या राष्ट्राचा विजय संपादण्याचें कार्य करून कृतकृत्य व्हावें.